# सिद्धी प्रकाशन

SIDDHI PUBLICATION

श्रीनगर, नांदेड.

येथे सर्व प्रकारची पुस्तके, नियतकालिके व मासिके प्रकाशित केली जातील.
पुस्तकांसाठी ISBN नंबर उपलब्ध.

संपर्क : सौ.पल्लवी लक्ष्मण शेटे मो. 9623979067




OUR SERVICES

- ISBN Book
- Call for paper
- International Research Journal
- Ph.D. & M.Phil Thesis Book
- E-Book
- Conference and Seminar Proceeding
- Educational Videos and Notes
- Educational Activities

G Pay PhonePe BHIM 9623979067


SIDDHI Siddhi Prakashan

Worldwide International Inter Disciplinary Research Journal

Website : www.wiidrj.com

Menoffice Address: Director : Mr. Tejas Rampurkar, Hyderabad.
Tuljai Niwas Ramkrishna Nagar, Near Ganpati Mandir
Vasmat Road Parbhani, Maharashtra (India)

Email :shrishprakashan2009@gmail.com

Mob : +91-9623979067

9 772454 790004 >



Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed)

भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल

Year - 9, Vol. 2, Issue- XCV, 21 March 2024



ISSN : 2454-7905
MAH/NAN/10936/2015
SJIF 2024 - Impact Factor : 8.278


# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)


Year - 9, Vol. 2, Issue- XCV, 21 March 2024


# भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल




:: संपादक ::

**डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर**

## Quartly Research Journal

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

**ISSN: 2454 – 7905**

*SJIF Impact Factor:* 8.278

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

***A Peer Reviewed Referred Journal***

**Quarterly Research Journal**

**(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)**

**www.wiidrj.com**

**Vol. II ISSUE - XCV Year – 9 21 March 2024**

**Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.**

And

Abhinav Bharat Shikshan Sanstha's

## Netaji Subhashchandra Bose Arts, Commerce and Science College, Nanded. (Maharashtra)

Art's, Commerce and Science College,
Tarasingh Market, Vazirabad, Nanded (Maharashtra)

Establishment Year : 1971 Re- Accredited B+ by NAAC

**Department of Economics**

**One day Interdisciplinary National Level Seminar (Online) - 21 March 2024**

# "India's Journey Towards Superpower"

**:: Editor in Chief ::**

**Dr. Rajesh Gangadharrao Umbarkar**
Dept. of Economics, Assistant Professor,
Netaji Subhashchandra Bose Arts, Commerce and Science College, Nanded. (Maharashtra)

## Address for Correspondence

**Editor in Chief : Mrs. Pallavi Laxman Shete Website: www.wiidrj.com**

Ramkrishna Nagar near Ganpati Mandir Vasmat Road Parbhani (India –Maharashtra)

**Email:** siddhiprakashan674@gmail.com / Shrishprakashan2009@gmil.com

**Mob. No:** +91-9623979067 **Director : Mr. Tejas Rampurkar, Hyderabad.**

(For International contact only +91-8857894082)


# Worldwide International Inter Disciplinary Research

## (A Peer Reviewed Referred)

**Worldwide International Inter Disciplinary Research (A Peer Reviewed Referred)** is quarterly published journal for Research scholars, teachers, businessman and scientists to integrate disciplines in an attempt to understand the complexities in the current affairs.

We also believe that both researchers and practitioners can contribute their knowledge by translating understanding into action and by linking theory and practice. This would enhance the relevance and thought in various related fields.

This Journal expected to bring together specialists in the field of commerce, economics, management and industry from different part of the world to address important issues regarding commerce, management and economics. One of the objectives of the journal is to create dialogue between scholars of various disciplines.

The editor, editorial team and the publisher do not hold any responsibility for the views expressed in **Worldwide International Inter Disciplinary Research (A Peer Reviewed Referred)** or for any error or omission arising from it.

The journal will cover the following Faculties for All Subject:

| | |
|---|---|
| • Arts/ Humanities / Soc. Sci. / Sports | • Engineering |
| • Commerce | • Medical /Ayurveda |
| • Science | • Law |
| • Education | • Journalism |
| • Agriculture | • Mass Communication- **Library sci.** |
| • Pharmaceutical | • Social Work |
| • Management | • Any Other |


**Director : Mr. Tejas Rampurkar** (For International contact only +91-8857894082)

***Printed by***

Anupam Printers, Hyderabad

**Cost: Rs. 600/-**



**Editors of Worldwide International Peer Reviewed Journal are not responsible for opinions expressed in literature published by journal.**

**The views expressed in the journal are those of author(s) and not the publisher or the Editorial Board. The readers are informed, authors, editor or the publisher do not owe any responsibility for any damage or loss to any person for the result of any action taken on the basis of the work (c) The articles/papers published In the journal are subject to copyright of the publisher. No part of the publication can be copied or reproduced without the permission of the publisher.**

# Editorial Board


| | |
|---|---|
| **Dr. P. Neelkantrao**<br>Dept. of Economics, Pratibha Niketan Mahavidyalaya, Nanded. (MH., India.) | **Dr. Suhas Pathak**<br>Dept. of School of Media studies S.R.T.M.U. Nanded. (MH., India.) |
| **Dr. Pramod Ravindra Deshpande**<br>Wake Forest School of Medicine, Dept. of Cancer Biology,Winston Salem, NC, USA. | **Dr. Sachin G. Khedikar**<br>Principal & Professor,Dept. of Rachana-Sharir, Shri. O. H. Nazar Ayurved College, SURAT (India.) |
| **Dr Ashutosh Gupta**<br>Dept. of Sanskrit, HNB Garhwal University, Srinagar Garhwal Uttrakhand 246174 (India.) | **Dr. Mayuresh M. Rampurkar**<br>Sardar Vallabhbhai Patel Hospital,(Neurosurgery),Ahmedabad. (G.India.) |
| **Dr. Manish Deshpande**<br>N.S.B.College, Nanded. (MH., India.) | **Dr. Kulkarni J. N.**<br>Library sci. S.R.T.M.U.Nanded. (MH., India.) |


# Co-Editorial Board


| | |
|---|---|
| **Dr. N. N. Bandela**<br>Dept. of Envi. Science Dr.B.A.M.U. Aurangabad. (MH., India.) | **Dr. Suman K. S.**<br>Dept. of Oriental languages, Loyola College,(Autonomous) Affiliated to University of Madras,Nungambakkam, Chennai-600034 (India.) |
| **Dr. S. P. Hangirgekar**<br>Dept. of Chemistry Shivaji University, Kolhapur. (MH., India.) | **Dr. Baswaprabhu Jirli**<br>Dept. of Extension Education, Institute of Agricultural Sci. BHU, Varanasi. (India.) |
| **Smt. Martha B.**<br>Department of English, Dr. B.R. Ambedkar F.G. College, Ladgeri, Bidar, Karnataka (India.) | **Dr. Chandan Bora**<br>Dept. Of Commerce (MH., India.) |
| **Dr. Mahesh Joshi**<br>Dept. Of Education S.R.T.M.U. Nanded.(MH., India.) | **Dr. Mangesh W. Nalkande**<br>Dept. of Kayachikitsa Govt. Ayurved College, Nanded. (MH., India.) |
| **Dr. Viraj Vilas Jadhav**<br>Professor and HOD, Dept. of Rachanasharir, Shri dhanwantry ayurvedic College and hospital sector 46 B CHANDIGARH. (India.) | **Dr. M.B. Kulkarni**<br>Govt. Medical College, Nanded. (MH., India) |

## Peer-Review Committee

| | |
|---|---|
| **Dr. U. D. Joshi**<br>Principal<br>Y. College, Ambajogai. (MH., India.) | **Dr. Vasant Biradar**<br>Principal<br>Mahatma Phule College, Ahmedpur. (MH., India.) |
| **Dr. Joshi Prashantkumar Panditdev**<br>Department of Zoology (Fishery Science) Adarsh College, Hingoli-431513 (MH., India.) | **Prof. Dr. Mahendrakumar Y. Kulkarni**<br>Head,Dept. of zoology<br>N.S.B. Colloege, Nanded. (MH., India.) |
| **Dr. Bibhishan Kare**<br>Rrsearch Guide, Professor and HOD<br>Dept. of Sociology, NSB College, Nanded. | **Dr. Sanjay S. Pekamwar**<br>School of Pharmacy,<br>SRTM University, Nanded (MH., India.) |
| **Dr. Prashant Andage**<br>Dept. of Envi. Sci<br>Ratnagiri sub Center, Mumbai University(MH., India.) | **Dr. Shashikant B. Dargu**<br>Dept. Of Sanskrit<br>N. S. B. College, Nanded(MH., India.) |
| **Dr. Shivraj G. Vannale**<br>School of Chemical Sciences<br>S.R.T.M.U. Nanded(MH., India.) | **Dr. Subhash T. Pandit**<br>Department of Economics,<br>S. V. Night College, Dombivli (E) (MH., India.) |
| **Dr. Sadavarte Rajesh K.**<br>Dept. of Computer,<br>N.S.B. College, Nanded. (MH., India.) | **Dr. Vinay D. Bhogle**<br>Dept. of English Degloor College, Deglor(MH., India.) |
| **Dr. Kalpana Kadam (Bedre)**<br>Dept.of Political Sci., N.S.B. College,Nanded.(MH., India.) | **Dr. Sharada Bande**<br>Head, Dept. of History, S. S. Suryabhanji Pawar College, Purna (Jn.) (MH., India.) |
| **Dr. Deshpande R. P.**<br>Dept. Zoology<br>Sharda Mahavidyalaya, Parbhani. (MH., India.) | **Dr. Gananjay Y. Kahalekar**<br>Mahatma Jyotiba Phule Mahavidyalay,<br>Mukhed Dist. Nanded. (MH., India.) |
| **Dr. Prashant G. Gawali**<br>Associate Professor, Dept. of Physics<br>Bahirji Smarak Mahavidyalya, Basmathnagar,<br>Dist. Hingoli (MH., India.) | **Dr. Vikas Kundu**<br>Geeta College of Education Butana(kundu),<br>Sonepat – Haryana |
| **Prof. K. Varalaxmi**<br>Deputy Director Sanskrit Academy,<br>Osmania University, Hyderabad. | **Dr. Kamalakar Sharad Ingale**<br>Head of Political Science Department<br>SSMM Arts, Commerce and Science College,<br>Pachora, Dist. Jalgaon. |
| **Dr. Anand R. Ashturkar**<br>Dept. of Envi. Sci. N.S.B.College, Nanded (MH., India.) | **Dr. Sandip Kale**<br>Dept. English, NSB College, Nanded. |

## Advisor Committee

| | |
|---|---|
| **Dr. Milind V. Rampurkar**<br>Govt. Ayurved College, Mumbai. (MH., India.) | **Dr. Sudhir Kokare**<br>Nanded. (MH., India.) |
| **Dr. Sanjay G. Shirodkar**<br>Principal<br>Swa. Sawarkar College, Beed. (MH., India.) | **Prof. Dr. Chitanand M. P.**<br>Dept. Of Microbiology<br>N. S. B. College, Nanded. (MH., India.) |
| **Dr. Darmapurikar Bhalchandra V.**<br>Dept. of Political sci., NSB college, Nanded. (MH., India.) | **Dr. Ashish Divde**<br>Head Dept.of Envi.Sci,H.J.P.Mahavidyalaya,H.Nagar.(MH., India.) |
| **Shri. Bidrkar**<br>Shivaji College, Parbhani (MH., India.) | **Asst. Prof. Devidas G. Yelne**<br>Dept. of Hindi, NSB College, Nanded. |
| **Adv.Yadupat Ardhapurkar**<br>Law.,Nanded. (MH., India.) | **Dr. Karale Nagesh Baburao**<br>Saraswati Mahavidyalaya, Kaij Dist. Beed. (MH., India.) |
| **Dr. Nagesh R. Khadkekar**<br>SRTMU, Nanded. (MH., India.) | **Dr. Jeevan Pimpalwadkar** (Marathi)<br>Research Guide, SRTMU Nanded. (MH., India) |
| **Dr. A.I. Shaikh**<br>Associate Professor & Head, School of Social Sciences,<br>SRTMU, Nanded. (MH., India) | **Dr. Rajendr Jadhav**<br>Nanded. (MH., India.) |
| **Shri Bharat Jangam**<br>Director Jangam Academy, Nepal.. | **Dr. Jayanth Chapla**<br>Dept of Zoology Osmania University, Hyderabad. (India) |
| **Shri. Santkumar Mahajan**<br>Nanded. (MH., India.) | |

Abhinav Bharat Shikshan Sanstha's

# Netaji Subhashchandra Bose Arts, Commerce and Science College, Nanded. (Maharashtra)

Art's, Commerce and Science College,
Tarasingh Market, Vazirabad, Nanded (Maharashtra)

**Department of Economics**

**One day Interdisciplinary National Level Seminar (Online) - 21 March 2024**

# "India's Journey Towards Superpower"

## Committee

| Organizing Committee Member | Advisory Committee |
|---|---|
| 1. Dr. Mrs. K. M. Kadam<br>2. Shri K. J. Kamble<br>3. Dr. S. B. Dargu<br>4. Dr. S. A. Vibhute<br>5. Dr. M. R. Deshpande<br>6. Dr. G. B. Pande<br>7. Dr. V. L. Tarode<br>8. Dr. D. M. Badure<br>9. Dr. A. U. Rathod<br>10. Dr. S. S. Kale<br>11. Dr. A. R. Ashtoorkar<br>12. Dr. S. G. Wanale<br>13. Dr. S. S. Sakale<br>14. Dr. B. V. Dharmapurikar | 1. Prof. Dr. B. D. Kare<br>2. Mrs. S. P. Wakodkar<br>3. Shri A. S. Kousadikar<br>4. Prof. Dr. P. Mahajan<br>5. Prof. Dr. J. S. Masure<br>6. Dr. M. A. Bangar<br>7. Prof. Dr. S. B. Phad<br>8. Dr. I. A. Khan |
| **Technical Support Team** | **Certificate Committee/Postal D.** |
| 1. Dr. S. A. Vibhute<br>2. Dr. B. D. Waghmare<br>3. Dr. S. S. Sakale<br>4. Mr. Kiran Waghmare<br>5. Shri U. V. Basarkar<br>6. Shri. Shubham Shelke<br>7. Shri. Manik Nilewad<br>8. Shri. Mayur | 1. Shri A. S. Kousadikar<br>2. Dr. Mrs. A. B. Joshi<br>3. Mrs. S. M. Lahankar<br>4. Shri. R. U. Kotgire<br>5. Mrs. J. R. Shiurkar |
| **Online Registration Committee** | **Report Committee** |
| 1. Prof. Dr. M. Y. Kulkarni<br>2. Dr. A. S. Bhawankar<br>3. Mr. D. G. Yelne<br>4. Mr. V. D. Mathpati<br>5. Dr. S. N. kasture<br>6. Shri A. S. Barbind | 1. Dr. Mrs. K. M. Kadam<br>2. Dr. S. S. Koturwar<br>3. Dr. S. S. Sakale |

# :: शुभेच्छा संदेश ::

अधिकांश शिक्षण संस्था या राजकीय दृष्ट्या प्रेरित आणि एकल विचाराच्या असल्याने समाजात राष्ट्रभक्तीचा दिवा तेवत ठेवण्यासाठी, राष्ट्रीय विचारांचे महाविद्यालयातील तरुणांवर संस्कार होण्यासाठी एक महाविद्यालय असावे. या उद्देशाने प्रेरित होऊन संस्थेची व महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. याला समाजातून भरभरून प्रेम व मदत प्राप्त झाली. म्हणूनच आमच्या संकल्पनेला मूर्त स्वरूप आले.

संस्थेचे नावं काय असावे हा विचार करताना प्रखर राष्ट्रप्रेमी असलेले स्वा. सावरकरांनी स्थापन केलेली अभिनव भारत या क्रांतिकारी संघटनेचेच नावं संस्थेला दिले गेले जी आज "**अभिनव भारत शिक्षण संस्था, नांदेड**" या नावाने कार्यरत आहे. स्वा. सावरकरांच्या मते, रणाविना स्वातंत्र्य कोणा मिळाले या धारनेला साजेसे असे एक व्यक्तिमत्व डोळ्यासमोर आले ते म्हणजे नेताजी सुभाषचंद्र बोस होय. म्हणून **नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय** हे नाव महाविद्यालयास देण्यात आले.

महान क्रांतिकारक सरदार भगतसिंग यांच्या मातोश्री श्रीमती विद्यावतीदेवी यांच्या शुभ हस्ते भूमी पूजन करून महाविद्यालयाची पायाभरणी करण्यात आली. राष्ट्रप्रेम व राष्ट्रासाठी समर्पनाची भावना असलेला विद्यार्थी घडविणे हा हेतू लक्षात घेऊन आजतागयत संस्था कार्यरत आहे.

महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागातर्फे नाविन्यपूर्ण असा उपक्रम नेहमीच घेतला जातो. त्याचाच एक भाग म्हणून आज अर्थशास्त्र विभागातर्फे "भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल" या विषयावर एकदिवसीय ऑनलाइन राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. त्यांच्या या कार्यास माझ्या हार्दिक शुभेच्छा...!

**मा. बालासाहेब बापूराव पांडे**

**अध्यक्ष**

अभिनव भारत शिक्षण संस्था, नांदेड. (महाराष्ट्रराज्य)

# :: मनोगत ::

स्वातंत्र्यवीर सावरकरांची अभिनव भारत ही संकल्पना डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रप्रेमी व्यक्तींनी राष्ट्रीय विचाराने प्रेरित होऊन अभिनव भारत शिक्षण संस्थेची 1970 मध्ये स्थापना केली. या संस्थेने नेताजी सुभाषचंद्र बोस यांची शिस्त, कणखर बाणा, अभ्यासूवृत्ती डोळ्यासमोर ठेवून, त्यांच्या व्यक्तिमत्त्वा सारख्या विद्यार्थ्यांच्या पीढ्या निर्माण करण्याच्या हेतूने 1971 मध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाची स्थापना केली. नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाचे वैशिष्ट्य म्हणजे, या महाविद्यालयाची पायाभरणी शहीद भगतसिंग यांच्या मातोश्री विद्यावती देवी यांच्या शुभहस्ते झाली.

तेव्हा पासून आतापर्यंत महाविद्यालयाने दैदीप्यमान अशी प्रगती केली. महाविद्यालयात शैक्षणिक गुणवत्ते बरोबरच एक आदर्श असा विद्यार्थी घडविण्याचे कार्य अविरतपणे चालू आहे. महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन दरवर्षी केले जाते. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाने दि. 21 मार्च 2024 रोजी "भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल" या विषयावर एकदिवसीय आभासी पद्धतीने राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. निश्चितच या चर्चासत्राद्वारे भारत महासत्तेच्या दिशेने वाटचाल करताना समाजात एक सकारात्मकता निर्माण होऊन आपला देश महासत्ता बनेल, त्या दृष्टीने टाकलेले हे एक पाऊल आहे. या एका नव्या व चालू विषयावर अर्थशास्त्र विभागाने चर्चासत्राचे आयोजन केल्याबद्दल मी या विभागाचे कौतुक करू इच्छितो आणि त्यांच्या या कार्यास हार्दिक शुभेच्छा....

**प्राचार्य**

**डॉ. सुधीर शिवणीकर**

नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

नांदेड. (महाराष्ट्रराज्य)

# :: संपादकीय ::

प्रिय आदरणीय शिक्षक, प्राध्यापक, सहकारी मित्र, वाचक, अभ्यासक, संशोधक मित्रांनो !

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि अभिनव भारत शिक्षण संस्था, नांदेड द्वारा संचलित नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदेड, अर्थशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने दि. 21 मार्च 2024 रोजी "भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल" या विषयावर झालेल्या एकदिवसीय ऑनलाइन राष्ट्रीय चर्चासत्राच्या निमित्ताने चर्चासत्रात सादर झालेल्या आणि संकलित केलेल्या शोधनिबंध संग्रहाचा हा सुबक आणि आखीवरेखीव असा संशोधनमूल्य आणि संदर्भमूल्य लाभलेला दर्जेदार संपादित ग्रंथ आपल्या हाती देताना मला किंबहुना आम्हाला मनापासून आनंद होत आहे. यासाठी आपण आम्हाला जे भरभरून सहकार्य केले त्याबद्दल पण मी आपला सर्व प्रथम आभारी आहे.

"भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल" या विषयावर व्यापक अशी चर्चा घडवून आणावी आणि आपण सर्वांनी आपला देश महासत्ता कसा होईल यासाठी प्रयत्न करावे व त्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकावे. या यज्ञ कुंडात सर्वांचा खारीचा वाटा असावा. या हेतूने प्रेरित होऊन आम्ही हे चर्चासत्र आमचे मार्गदर्शक संस्थेचे अध्यक्ष मा. बालासाहेब पांडे यांच्या अध्यक्षतेखाली आणि संस्थेच्या सचिव अड. विनिता जोशी व महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. सुधीर शिवणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले होते.

डॉ. विकास सुकाळे, डॉ. वरदराज बापट, श्री मिलिंद मराठे, डॉ. अशोक टिपरसे, डॉ. नामदेव मुंढे, प्रो. डॉ. डी. डी. चौधरी व डॉ. रत्नाकर कांबळे यांनी मार्गदर्शन केले त्यांचा मी कायम ऋणी आहे.

भारत जागतिक महासत्ता होण्याच्या मार्गावर आहे हे अजूनही अनेकांना स्वप्नरंजन वाटते. मात्र भारतीय अर्थव्यवसंस्थेच्या दीर्घकालीन भवितव्याबद्दल आंतरराष्ट्रीय नाणेनिधींचा जो अंदाज आहे तो या बाबतीत बरेच काही सांगून जातो.

2000 मध्ये भारताचे देशांतर्गत उत्पादन होते 0.5 लाख कोटी डॉलर्स म्हणजे जगाच्या एकूण उत्पन्नात आपला हिस्सा होता फक्त 1.5(दीड) टक्का.2011 मध्ये

भारताचे एकूण उत्पन्न झाले 1.9 लाख कोटी डॉलर्स म्हणजे जगाच्या एकूण उत्पन्नाच्या 2.8 टक्के आणि आता ते 8 लाख कोटी डॉलर्सच्या जवळ जवळ जात आहे म्हणजे जगाच्या एकूण उत्पन्नाच्या 7 टक्के. यावरून आपणास लक्षात येईल.

भारत भविष्यात सर्वात मोठी आर्थिक महासत्ता म्हणून उदयाला येईल यावेळी जीडीपी चीनच्या तुलनेत 90 टक्के व अमेरिकेपेक्षा 30 टक्के जास्त असेल असे सेंटर फॉर इकॉनॉमिक्स अँड बिझनेस रिसर्चने आपल्या अहवालात म्हटले आहे.

तथापि आपल्या देशाकडे अनेक संधी आहेत जसे की तरुण आणि शिक्षित लोकसंख्या, समृद्ध इतिहास, वैविध्यपूर्ण संस्कृती, वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आणि डिजिटल परिवर्तनाचा स्वीकार या द्वारे भारत आपल्या आव्हानांवर मात करू शकला आणि संधीचा फायदा उठवू शकला व काही कडक निर्णय घेऊ शकला तर 2030 पर्यंत देश जागतिक महासत्ता बनण्यास सक्षम असेल. म्हणजेच महासत्ता बनण्यासाठी अजून बराच कालावधी आहे. पण त्या दिशेने पाऊल टाकल्या शिवाय स्वप्न कसे पूर्ण होईल. ज्यांना हे निव्वळ स्वप्न वाटत आहे त्यांना 370, तीन तलाख, सर्जिकल स्ट्राईक, राममंदिर हे स्वप्नच वाटत होतं, गरज आहे ती फक्त प्रबळ इच्छाशक्तीची यातूनच स्वप्नातील भारत उभा राहील. भविष्यात भारत जागतिक नेता बनेल यात शंका नाही.

म्हणूनच यादिशेने आपले एक पाऊल टाकण्यासाठी भारताची महासत्तेच्या दिशेने होणारी वाटचाल या विषयावर हा राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे.

पायाभूत सुविधांमध्ये सरकारच्या सततच्या गुंतवणुकीमुळे भारत विज्ञान व तंत्रज्ञानात अग्रेसर बनत आहे. बाजाराचा मोठा आकार, परकीय गुंतवणुकीतील वाढ, उच्च भांडवल निर्मिती, उत्तम व्यापार धोरण, पायाभूत सुविधा, उच्च उत्पादकता आणि तंत्रज्ञानातील प्रगती ही काही कारणे आहेत त्यामुळे भारत महासत्तेच्या दिशेने वाटचाल करेल.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (International Monetary Fund) सहा मार्च रोजी आपला नवा अंदाज प्रसिद्ध केला आहे. यामध्ये सांगण्यात आलंय की, भारत, चीन, अमेरिका आणि इंडोनेशिया हे चार देश जागतिक अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये पुढील पाच वर्षात महत्त्वाचं योगदान देत राहतील.

या रिपोर्टमध्ये भारत महत्वाच्या भूमिकेत असल्याचं सांगण्यात आलं आहे. जागतिक अर्थव्यवस्थेच्या वाढीतील ५० टक्क्यांपेक्षा जास्त योगदान या चार देशांचे

असेल. विशेष म्हणजे आयएमएफने २०२३ मध्ये देखील अशाच प्रकारचा अंदाज व्यक्त केला होता. (Three Other Countries To Contribute More Than Half of Global Economic Growth in Next Five Years)

भारत ही जगातील सर्वाधिक गतीने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. भारताचा आर्थिक विकास दर हा सात ते आठ टक्क्यांच्या दरम्यान राहिलेला आहे. जगातील अनेक देशांवर आर्थिक संकट आलेले आहे. शिवाय, अनेक देशांचा आर्थिक विकास संथ गतीने होत आहे. अशा स्थितीत भारतीय अर्थव्यवस्था चांगली कामगिरी करत आहे. आयएमएफच्या रिपोर्टने एकप्रकारे यावर शिक्कामोर्तब केले आहे.

भारत हा विकसनशील देशांमध्ये मोडतो. अशा स्थितीत भारताला एक विकसित राष्ट्र म्हणून उदयाला येण्यासाठी आणखी काही वर्ष जावी लागणार आहेत. असे असले तरी भारतीय अर्थव्यवस्था ही सर्वाधिक गतीने वाढत आहे. सध्या भारताची अर्थव्यवस्था ही पाचव्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. केंद्र सरकारने भारताला तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था करण्याचे स्वप्न पाहिले आहे.

**मूडीजची रेटिंग :-**

जागतिक रेटिंग एजन्सी मूडीजने भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा अंदाज काही दिवसापूर्वी व्यक्त केला होता. मूडीजने यापूर्वी ६.१ अर्थव्यवस्था वाढीचा वेग दर्शवला होता. तो वाढवून आता ६.८ टक्के करण्यात आला आहे.

मागील वर्षाच्या शेवटच्या महिन्यात देशाच्या अर्थव्यवस्थेने वेग घेतला आहे. या कालावधीत जीडीपी वाढीचा दर ८.४ टक्के राहिला. जागतिक सर्वेक्षणात अर्थव्यवस्था वाढीचा वेग ६.६ टक्के असेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला कारण ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीत भारताच्या अर्थव्यवस्थेने वेग घेतला.

या कालावधीत जीडीपी 8.4 टक्क्यांनी वाढला आहे. दीड वर्षात GDPची सर्वात वेगवान वाढ झाली आहे आणि रॉयटर्सने सर्वेक्षण केलेल्या अर्थशास्त्रज्ञांच्या 6.6% अंदाजापेक्षा खूप पुढे आहे. (Moody's raises India's 2024 GDP growth estimate to 6.8 percent)

GVA 6.5 टक्क्यांनी वाढला. GVA हे अर्थव्यवस्थेत उत्पादित वस्तू आणि सेवांच्या एकूण मूल्याचे मोजमाप आहे आणि त्यात अप्रत्यक्ष कर आणि अनुदाने समाविष्ट नाहीत.

ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीत GVA आणि GDP मधील तफावत मुख्यतः त्या तिमाहीत सबसिडीमध्ये तीव्र घट झाल्यामुळे होते.

**भारताच्या अर्थव्यवस्थेची कामगिरी चांगली':-**

भारताच्या अर्थव्यवस्थेने 2023 मध्ये चांगली कामगिरी केली आहे. 2023 मध्ये अपेक्षेपेक्षा आम्हाला 2024 च्या वाढीचा अंदाज 6.1 टक्क्यांवरून 6.8 टक्क्यांपर्यंत वाढवण्यास प्रवृत्त केले आहे. आधीच अपेक्षेप्रमाणे, G-20 अर्थव्यवस्थांमध्ये भारत सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था राहील. मूडीजने 2024 च्या ग्लोबल मॅक्रो इकॉनॉमिक आउटलुकमध्ये म्हटले आहे.

या वर्षीच्या अंतरिम अर्थसंकल्पात 2024-25 मध्ये 11.1 लाख कोटी रुपयांच्या भांडवली खर्चाचे वाटप किंवा GDP च्या 3.4 टक्के उद्दिष्ट ठेवले आहे, जे 2023-24 च्या अंदाजापेक्षा 16.9 टक्के जास्त आहे. "लोकसभा निवडणुकांनंतर धोरणातील सातत्य आणि पायाभूत सुविधांच्या विकासावर सतत लक्ष केंद्रित करण्याची आम्हाला अपेक्षा आहे," असे मूडीजने म्हटले आहे.

**खाजगी औद्योगिक भांडवली खर्च वाढण्याची अपेक्षा आहे:-**

एजन्सीने म्हटले आहे की, खाजगी औद्योगिक भांडवली खर्चातील वाढ मंदावली असली तरी, सध्या सुरू असलेल्या पुरवठा साखळीतील प्रमुख उत्पादन उद्योगांना चालना देण्यासाठी सरकारच्या उत्पादनाशी संबंधित प्रोत्साहन योजनेला गुंतवणूकदारांच्या प्रतिसादामुळे वेग वाढण्याची अपेक्षा आहे.

भारत, इंडोनेशिया, मेक्सिको, दक्षिण आफ्रिका, UK आणि US यासह अनेक G-20 देशांसाठी 2024 हे वर्ष निवडणुकीचे वर्ष आहे. अहवालात म्हटले आहे की, आजच्या अशांत जगात, निवडणुकांचे परिणाम सीमेपलीकडे आहेत. तसेच ते आर्थिक आणि सार्वजनिक धोरणाच्या पलीकडे जाऊ शकतात.

भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे आणि जागतिक बँकेपासून ते IMF पर्यंत सर्वांनी तिचे कौतुक केले आहे. सांख्यिकी मंत्रालयाने 29 फेब्रुवारी रोजी जारी केलेल्या आकडेवारीनुसार डिसेंबर तिमाहीत भारताचे सकल देशांतर्गत उत्पादन (GDP) वेगाने वाढले आहे. एवढा सर्व विचात लक्षात घेतल्यास नक्कीच स्वप्नातील भारत साकार होईल.

या चर्चासत्रात भारतातील केवळ महाराष्ट्रच नव्हेतर पंजाब, हरियाणा, आसाम, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, राज्यस्थान, पश्चिम बंगाल अशा विविध राज्यातून रिसर्च पेपर आले आहेत. त्या सर्व संशोधक प्राध्यापक व संशोधक विध्यार्थी यांचे मी अभिनंदन करतो व असेच सहकार्य भविष्यात राहील अशी अपेक्षा करतो.

या राष्ट्रीय चर्चा सत्रात मला मार्गदर्शन करणारे उपप्राचार्य डॉ. कल्पना कदम, प्रा. के. जे. कांबळे, डॉ. शशिकांत दरगु, प्रो. डॉ एम. वाय. कुलकर्णी, डॉ. मनीष देशपांडे, डॉ. गिरीष पांडे, माझे मित्र डॉ. भालचंद्र धर्मापुरीकर, डॉ. आनंद अष्टुरकर, डॉ. संदीप काळे, डॉ. सागर साकळे, श्री. बासरकर, श्री. करडखेडकर, श्री. बनसोडे, तथा योग्य दिशा देणारे प्रा. किंगावकर मॅडम आणि सहकारी प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा मी खूप खूप आभारी आहे.

धन्यवाद!

**संपादक**

**डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर**

सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,

नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

नांदेड. (महाराष्ट्रराज्य)

मो. ९६२३९७९०६७

# Guidelines for Submission of Manuscript

**COVERING LETTER FOR SUBMISSION:**

**DATE: ____________**

**To,**
**THE EDITOR,**
WIPRJ,
Parbhani.

Subject: Submission of the article with the title ……………………………………………

……………………………..…………………………………………………………...…….

**DEAR Editor,**

Please find my submission of article for possible publication in your journal.

I hereby affirm that the contents of this manuscript are original. Furthermore it has neither been published elsewhere fully or partly, nor itis under review for publication anywhere.

I affirm that all author(s) have seen and agreed to the submitted version of the manuscript and their inclusion of name(s) as co-author(s).

Also, if our/my manuscript is accepted, I/We agree to comply with the formalities as given in the journal and you are free to publish our contribution in your journal.

**Name and Sign of Author/Authors**
Designation:
Affiliation with full address & Pin Code:
Residential address with Pin Code:
Mobile Number (s):
Landline Number (s):
E-mail Address:
Alternate E-mail Address:

**2. INTRODUCTION:** Manuscript must be in British English prepared on a standard A4 size paper setting. It must be prepared on a single space and single column with 1” margin set for top, bottom, left and right. It should be typed in 12point Times New Roman Font (English Article) and 16 point in DVB-TT Surekh in Pagemaker (Marathi / Hindi Article).

**3. MANUSCRIPT TITLE and HEADINGS:** The title of the paper should be bold capital. All the headings should be bold.All sub-headings should have also bold.

**4. AUTHOR(S) NAME(S) and AFFILIATIONS:** The author(s) full name, designation, affiliation(s), address, and email address should be there.

**5. ABSTRACT:** Abstract should be in fully italicized text, not exceeding 250 words. The abstract must be informative.

**6. KEYWORDS:** Abstract must be followed by list of keywords, subject to the maximum of five.

**7. FIGURES and TABLES:** These should be simple, centered, separately numbered and self-explanatory, and titles must be above the tables/figures. Sources of data should be mentioned below the table/figure.

**8. REFERENCES:** The list of all references should be alphabetically arranged. It must be single spaced, and at the end of the manuscript. The author(s) should mention only the actually utilized references in the preparation of manuscript and they are supposed to follow **Harvard Style of Referencing**.

# Review Process

Each research paper submitted to the journal is subject to the following reviewing process:

1. Each research paper/article will be initially evaluated by the editor to check the quality of the research article for the journal.
2. The articles passed through screening at this level will be forwarded to two referees for blind peer review.
3. At this stage, two referees will carefully review the research article, each of whom will make a recommendation to publish the article in its present form/modify/reject.
4. The review process may take one/two months.
5. In case of acceptance of the article, journal reserves the right of making amendments in the final draft of the research paper to suit the journal's standard and requirement.

**Worldwide International Inter Disciplinary Research Journal**

(A Peer Reviewed Referred)

**(ISSN – 2454 7905)**

# COPYRIGHT WARRANTY AND AUTHORISATION FORM

**Date:**

**TO,**
**THE PUBLISHING EDITOR,**
**Worldwide International Inter Disciplinary Research** (A Peer Reviewed Referred),
Parbhani.

**SUBJECT: COPYRIGHT WARRANTY AND AUTHORISATION FORM**
**(The article cannot be published until this copyright authorization agreement is received by the Editor)**

## DECLARATION

I/We ………………………………………………………………………………………………………………... the author/authors of the paper titled…………………………………………………………………………………..
…………………………………………………………………………………………………………………authorize you to publish the above mentioned article **Worldwide International Inter Disciplinary Research** (A Peer Reviewed)

**I/We hereby declare that:**

1. This article authored by me/us is an original and genuine research work. It does not infringe on the right of others and does not contain any libelous or unlawful statements. It has not neither been submitted for publication nor published elsewhere in any print/electronic form.
2. I/We have taken permission from the copyright holder to reproduce the matter not owned by me and acknowledged the source.
3. I/We permit editors to publish the said paper in the journal or in any other means with editorial modification, if any.
4. I/We assign all the copyright of this article to the journal, and have not assigned any kind of rights for its publication to any other publisher(s).
5. I/We agree to indemnify the Editors, **Worldwide International Inter Disciplinary Research** (A Peer Reviewed Referred) against all claims and expenses arising from any breach of warranty on my/our behalf in this agreement.
6. In case of a paper by multi-authored article, I/corresponding authors have obtained permission to enter into agreement and assign copyright from all the co-authors, in writing and all the co-authors have thoroughly read and agreed with above warranties and authorization.
7. All disputes subject to jurisdiction of Nanded court only.

| | |
|---|---|
| **Name** | : ……………………………………………………………………………….. |
| **Official Address** | :……………………………………………………………………………….. |
| | ……………………………………………………… Pin …………………….. |
| **e-mail id** | :……………………………………………………………………………….. |
| **Mobile and Phone No.** | : ……………………………………………………………………………….. |
| **Signature of the Author(s)** | : ……………………………………………………………………………….. |

# *Worldwide International* Inter Disciplinary Research Journal

## (A Peer Reviewed Referred)

## (ISSN 2454 7905)



**Dr. Rajesh G. Umbarkar**

Ramkrishna Nagar near Ganpati Mandir Vasmat Road Parbhani (India –Maharashtra)

**Phone :** +91 9623979067 **Email :** siddhiprakashan674@gmail.com / Shrishprakashan2009@gmil.com

**www.wiidrj.com**


**Dear Editor,**

I wish to be an Annual Member and agree to abide by your rules and regulations.

1. Name in Full :______________________________________________

2. Nationality: ____________________

3. Address for Correspondence: ______________________________________

______________________________________________________________

Phone (STD code): ___________________ Mobile No : ______________________

4. Name of the College/Employer : __________________________________

______________________________________________________________

5. Present Position/Designation: ______________________________________

6. Email Address: _____________________________________________

**Date:** **(Signature of the applicant)**

**Place: Stamp Seal:**

**ANNUAL SUBSCRIPTION RATES:**

| | **Domestic** | **International** |
|---|---|---|
| **Individual** | **Rs. 1500** | **$ 150** |
| **Institutional** | **Rs. 1500** | **$ 150** |

**<u>Director</u> : Mr. Tejas Rampurkar** (For International contact only +91-8857894082)

Subscriptions must be sent by Demand Draft drawn on any Nationalized Bank at Nanded, in favour of **Mrs.Pallavi Laxmanrao Shete** Subscription can also be made by depositing cash or electronic transfer in our bank account.

Name of the Bank : **State Bank of India**,**Branch – Taroda Naka Dist**. NANDED. (MH., India.)

IFSC Code : **SBIN0016667**

Branch Code : 16667

Account Number : **20286425949**

# INDEX


| Sir. No. | Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| 01. | भारत - नेपाल संबंध | प्रा. डॉ. अतुल नारायण खोटे | 01 |
| 02. | G-20 (शिखर सम्मेलन) | डॉ. गूंजा पंवार | 04 |
| 03. | सौर उर्जा–-एक अध्ययन | शेख रशिदा रहेमतुल्ला | 10 |
| 04. | राजनीतिक प्रतिनिधियों का प्रतिनिधित्व | डॉ. रामसिया चर्मकार | 14 |
| 05. | मोदीकालीन परराष्ट्रीय धोरणाची गतिमानता : एक चिकित्सक अध्ययन | डॉ. सुभाष दौलतराव उपाते | 20 |
| 06. | भारताची महासत्तेकडे वाटचाल : संरक्षण क्षेत्रातील परिवर्तन | प्रोफेसर डॉ. चंद्रकांत बन्सीधर भांगे | 23 |
| 07. | भारत एक महासत्ता म्हणून? शेजारी राष्ट्र सोबत असलेले संबंध व महत्त्व : | श्री आडे गजानन धर्मा | 25 |
| 08. | भारताचे बदलते परराष्ट्र धोरण | डॉ. रमेश एकनाथ भारुडकर | 28 |
| 09. | भारत आणि चीन आर्थिक संबंधाचे बदलते संदर्भ | प्रा. डॉ. इकबाल खान गफार खान | 32 |
| 10. | भारतीय परराष्ट्र धोरण आणि विकास | प्रा. डॉ. गणेश मनोहर लिंबोळे | 35 |
| 11. | भारतातील डिजिटल बँकिंग : एक आर्थिक अभ्यास | प्रा. डॉ. अनिल दिगंबर वाडकर | 39 |
| 12. | भारताच्या परराष्ट्र धोरणातील बदल | कु. कांचन माधव गिरी<br>डॉ. स्मिता उमाकांतराव कोंडेवार | 48 |
| 13. | भारताची महासत्ते कडे वाटचाल होताना भारताच्या परराष्ट्र धोरणातील बदल | प्राध्यापक जयाप्रभाकर देशमुख (वाबळे) | 55 |
| 14. | भारताच्या महासत्तेकडील वाटचालीसमोरील आव्हाने | डॉ. मनिषा परमेश्वर काकडे | 61 |
| 15. | भारतातील क्रिडा क्षेत्राचे यश व प्रगती | Dr. Naresh P. Borkar | 66 |
| 16. | क्रीडा क्षेत्रामध्ये भारताचे यश | प्रा. भारत विठ्ठलराव पल्लेवाड | 69 |
| 17. | शिक्षण क्षेत्रातील बदल नवीन शैक्षणिक धोरण 2020 | श्री. कैलास गोविंदा वाघ | 72 |
| 18. | भारतीय ज्ञान प्रणाली आणि नवीन शैक्षणिक धोरण २०२० | प्रा. डॉ. टी. एम. गुरुनुले | 76 |
| 19. | G-20 आणि भारत | डॉ. अर्चना रामाजी मेश्राम | 79 |
| 20. | भारतीय अर्थव्यवस्थेमधील विविध विकासात्मक योजनाचे मुल्यमापन | प्रा. डॉ. गव्हाळे बी. व्ही. | 84 |
| 21. | भारताच्या महासत्तेकडील वाटचालीत भारतीय तत्वज्ञानाचे योगदान | सहा. प्रा. अश्विनी शिवाजी जैवळ | 89 |
| 22. | भारतातील परकीय गुंतवणूक धोरण अंमलबजावणी व विविध कायदे | सानप मनिषा किसन<br>डॉ. एस. बी. पाते | 93 |
| 23. | भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल आणि मराठी ग्रामीण कादंबरी | डॉ. शिवाजी आनंदराव सूर्यवंशी | 100 |

| | | | |
|---|---|---|---|
| 24. | शाश्वत विकास व पर्यावरण ऱ्हास | डॉ. मंजूषा राजेंद्र ठाकरे | 103 |
| 25. | ग्रामीण भागाच्या विकासात रस्त्यांचे महत्त्व | डॉ. बबन मधुकर सोनवणे<br>दिलीप आप्पा जगताप | 106 |
| 26. | शाश्वत विकास सशक्त भारतासाठीची गरज !! | प्रा. डॉ. सुदाम गेमू राठोड | 110 |
| 27. | स्वातंत्र्योत्तर भारतीय विकासाच्या अंतर्विरोधाची ७५ वर्षे | प्रा. डॉ. सुर्यकांत लक्ष्मणराव शेळके | 113 |
| 28. | भारतीय राज्यघटनेला होत असलेली 75 वर्षे | श्रीम. सुप्रिया सिताराम दाते | 120 |
| 29. | भारतीय अंदाजपत्रकाचा तुलनात्मक अभ्यास (२०२३-२४ व २०२४-२५) | प्रा. महेश वाळू जाधव | 123 |
| 30. | शेती आणि आधुनिक तंत्रज्ञान | प्रो. डॉ. नारायण नामदेव गाढे<br>प्रा. सुजाता वसंत आहेर | 127 |
| 31. | भारताची महासत्तेकडील वाटचाल : कृषीपर्यटनामुळे शेती विकासाचे बदललेले स्वरूप | वाघ जीवनकुमार शामराव<br>डॉ. अमोल गायकवाड | 133 |
| 32. | ई-कॉमर्स - उत्क्रांती ट्रेंड, आव्हाने आणि भविष्यातील संभावना | डॉ. शेळके दिगंबर सखाराम<br>श्री. घोलप सागर बाळासाहेब | 139 |
| 33. | भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने | प्रा. एस. एच. हेरवाडे | 142 |
| 34. | भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल आणि भारतीय अर्थव्यवस्थे पुढील आव्हाने | तुळशिदास मोतीराम शेंडे | 146 |
| 35. | बजेट 2024-25 स्थैर्याकडून सामर्थ्याकडे | सौ. भारती माने | 150 |
| 36. | डिजीटल भारत सशक्त भारत : एक अध्ययन | प्रा. डॉ. आनेराव एम. एम. | 152 |
| 37. | भारतीय सहकार चळवळीत महाराष्ट्राचे योगदान | श्री. शिवनाथ भगवान भुजबळ<br>प्रा. डॉ. अमोल तुकाराम खाडे | 155 |
| 38. | भारतीय शेती व शेती समोरील समस्या : एक अभ्यास | अर्जुन रामराव ढोणे<br>डॉ. शालिनी कदम | 158 |
| 39. | भारतीय कृषी क्षेत्रात झालेले बदल | प्रो. डॉ. एम. डी. कच्छवे | 163 |
| 40. | माहितीचे स्त्रोत असणाऱ्या ग्रंथालय क्षेत्रात काळानुसार झालेले बदल - एक अभ्यास | लीना नारायणराव पुप्पलवार | 170 |
| 41. | शास्त्रीय संगीतातील काळानुरूप बदलते गीत प्रकार | डॉ. दिपाली चंद्रकांत पांडे | 174 |
| 42. | युवा विकास व सक्षमीकरणासाठीचे विविध कार्यक्रम-उपक्रम” | डॉ. सुवर्णा साहेबराव बरडे | 178 |
| 43. | जल सिंचन : एक दृष्टिक्षेप | प्रो. डॉ. नारायण नामदेव गाढे<br>प्रा. पूनम शशिकांत चिंचोरे | 184 |
| 44. | हवामान बदललाचे भारतीय शेतीवर परिणाम : आव्हाने आणि अनुकूल धोरणे | प्रो. डॉ. सुराजकुमार एस. प्रसाद<br>पूनम शेखर शेलार | 189 |
| 45. | भारतातील पायाभूत सुविधांमध्ये वाहतूक क्षेत्राचे अध्ययन | डॉ. कांचनमाला क्षीरसागर | 193 |

| | | | |
|---|---|---|---|
| 46. | भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल आणि कृषी क्षेत्रातील समस्या व आव्हाने | श्री. खरबे नारायण तुकाराम | 197 |
| 47. | शेती क्षेत्राची सद्यस्थिती, आर्थिक विकासातील भूमिका आणि वाटचाल | प्रवीण सोमा पारधी | 202 |
| 48. | जागतिकीकरण व पर्यावरणातील बदल | प्रा. डॉ. संजय गंगाराम सुरेवाड | 207 |
| 49. | भूविज्ञान | श्री. कैलास गोविंदा वाघ | 212 |
| 50. | बदलती सामाजिक परिस्थिती :- विभक्त कुटुंब पद्धती | डॉ प्रकाश तुकाराम शिंदे<br>ज्ञानेश्वर बाबुराव लुटे | 214 |
| 51. | पर्यटन विकास | छाया अनिल वाकोडे | 217 |
| 52. | पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी व समतोल राखण्यासाठी झालेले बदल | भारती रंगनाथ भगत | 221 |
| 53. | कामगारविषयक कायद्यामधील बदल एक दृष्टिक्षेप | मडके साधना हरिदास | 223 |
| 54. | भारतातील कृषी क्षेत्रामधील बदल (नवीन योजना) | कावळे सुप्रिया संजय<br>क्षीरसागर हिरामण मधुकर | 227 |
| 55. | आपत्ती व्यवस्थापनातील बदल | प्रा. कविता जयराम दवंड काटकर | 230 |
| 56. | शिक्षण क्षेत्रातील बदल नवीन शैक्षणिक धोरण 2020 - एक अभ्यास | श्रीमती पाटील सत्वशिला गोरखनाथ | 235 |
| 57. | शिक्षण क्षेत्रातील बदल नवीन शैक्षणिक धोरण 2020 | भारती रंगनाथ भगत | 239 |
| 58. | The Group Of Twenty (G20) | प्रा. मीना लक्ष्मण मुळीक<br>प्रा. मयुरी विद्याधर कांबळे | 242 |
| 59. | भारतीय कापड उद्योग : संधी आणि आव्हाने | श्री. पवार रामेश्वर भाऊसाहेब<br>डॉ. डी. एन. सोनवणे | 245 |
| 60. | प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना (पी.एम किसान) एक विश्लेषण – विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य | लांडगे कृष्णा दगडू<br>डॉ. खर्डे अरुण चांगदेव | 248 |
| 61. | पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी व समतोल राखण्यासाठी सेंद्रिय शेतीचे योगदान | धनश्री हरिश्चंद्र देशमुख<br>डॉ. नारायण नामदेव गाडे | 253 |
| 62. | भारताची महासत्तेकडील वाटचाल – भारत व G-20 | प्रा. डॉ. सौ. सुप्रिया हेमंतकुमार काळे | 259 |
| 63. | शिक्षण क्षेत्रातील बदल: नवीन शैक्षणिक धोरण,अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम - एक अभ्यास | संदीप दौलतगिर गिरी<br>प्रा. डॉ. रमेश भालेराव | 265 |
| 64. | नागरी सहकारी पतसंस्था स्वरूप, कार्ये आणि आव्हाने : एक अध्ययन | मंगला गोरख पाटील<br>डॉ. अविनाश आर. निकम | 269 |
| 65. | “भारतातील रेल्वे वाहतुकीच्या विकासाचा चिकित्सक अभ्यास” | डॉ. संते लालचंद्र रामचंद्र | 273 |
| 66. | वर्तमान महाराष्ट्रातील राजकारण : विरोधाभास आणि समस्या | प्रा. स्वप्निल भारत रणखांबे | 277 |

| | | | |
|---|---|---|---|
| 67. | पुणे व कोल्हापूर जिल्ह्यातील तांदूळ उत्पादकतेचा तुलनात्मक अभ्यास (२०१०-११ ते २०१९-२०) | रचना कोळपे<br>निखिल तांबे<br>नितेश राठोड | 281 |
| 68. | डॉ. आंबेडकर आणि सामाजिक न्याय | मंगवडे जी. एन. | 290 |
| 69. | योगा आणि भारत | श्री. विवेक विनायकराव कुलकर्णी | 294 |
| 70. | खानदेशातील साहित्यिक : एक दृष्टिक्षेप | प्रा. डॉ. अरुण डी. मोरे | 296 |
| 71. | मराठी साहित्यातील बदलते प्रवाह | प्रा. सुखदा सदाशिव - हाटवळ | 299 |
| 72. | प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या अध्ययनात येणाऱ्या अडचणीचा शोध | प्रविण गिरधर शिंदे<br>डॉ. मंदा तापीराम मोरे | 304 |
| 73. | शैक्षणिक आव्हाने आणि समायोजन; बीड जिल्ह्यातील कोविड-19 मध्ये कुटुंबातील सदस्य गमावलेल्या मुलांचा अभ्यास | भद्रे प्रतिभा विश्वनाथ | 308 |
| 74. | विद्यार्थ्यांच्या विज्ञान अध्ययनातील अटल टिंकरिंग लॅब मधील तार्किक क्षमता विकसित करण्यासाठी राबवलेल्या कृती उपक्रम व परिणामकारकतेचा अभ्यास | श्री. माधव गोरख करंजे<br>डॉ. गौरी विजय पाटील | 314 |
| 75. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार | प्रिती ताराचंद निकाळजे<br>डॉ. आर. एन. आलटे | 317 |
| 76. | शिक्षण क्षेत्रातील बदल नवीन शैक्षणिक धोरण 2020 | Shri. Gajanan Kondiba Choudhuri | 319 |
| 77. | भारताची महासत्तेकडे वाटचाल आणि मराठी साहित्यातील जाणिवा | प्रा. राजरत्न कि. दवणे | 322 |
| 78. | विदर्भातील सिंचन अनुशेषाच्या परिस्थितीचे अध्ययन | डॉ. महादेव आसाराम रिठे | 328 |
| 79. | ऐतिहासिक बदल | मनिषा वामाराव लांडगे | 332 |

# भारत - नेपाल संबंध

**प्रा. डॉ. अतुल नारायण खोटे**
स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय रिसोड, जिल्हा वाशिम. पिन 444506.

**प्रस्तावना-**

हिमालय की दक्षिणी ढलान पर स्थित नेपाल संसार का एक मात्र हिंदू राज्य है। जिसकी स्थापना पृथ्वी नारायण शहा द्वारा 1769 ई. में की गयी। एशिया के दो बडे देशों चीन और भारत की सीमाए नेपाल को छुती है। नेपाल के जनक पृथ्वी नारायण शाह ने इसे "दो चट्टानों के बीच खेले हुए फूल" की संज्ञा प्रदान की। भारत की बहुत बड़ी सीमा नेपाल से लगती है। अंत: भारत की दृष्टि में नेपाल का महत्व शुरू से बना हुआ है और जब से चीन का तिब्बत पर आधिपत्य हो गया है, तब से भारत नेपाल की और सूक्ष्म दृष्टि लगाए रहता है। इसी कारण पंडित नेहरू ने कहा था कि नेपाल पर किया गया कोई भी आक्रमण भारत की सुरक्षा के लिए खतरे का संकेत होगा।

इसी परिप्रेक्ष्य में 31 जुलाई, 1950 को भारत और नेपाल में शांति और मित्रता की संधि पर हस्ताक्षर किए। इस संधि में यह स्पष्ट प्रावधान किया गया कि दोनों में से कोई भी देश दूसरे देश पर किसी विदेशी आक्रमण या उसकी सुरक्षा के लिए उत्पन्न संकट को सहन नहीं करेगा। भारत और नेपाल ने वचन दिया कि किसी तीसरे (अन्य) देश की ओर से उत्पन्न या संभावित संकट या उसकी धमकी का प्रभावी सामना करने और सुरक्षा सुनिश्चित करने के लिए वे पारस्परिक परामर्श करेंगे । इस संधि के हस्ताक्षर के पश्चात भारत और नेपाल ने तिब्बत, नेपाल और भूटान के मध्य दरों पर चौकसी रखने के लिए सत्रह चौकिया स्थापित की।

1960 तक नेपाल का 95 प्रतिशत व्यापार अकेले भारत से होता था और भारत ने नेपाल की पूर्ण सहायता करते हुए उसके लिए आर्थिक विकास का विस्तृत कार्यक्रम भी बनाया। आर्थिक सहाय्यता के क्षेत्र में 1967 मे भारत ने नेपाल की विकास कार्यों के लिए 50 करोड की राशि नेपाल सरकार को दी ।सडक निर्माण और ऊर्जा विकास, भारत द्वारा नेपाल की विकास सहायता के दो प्रमुख क्षेत्र थे।

भारत में नेपाल के साथ उच्च स्तर पर संबंधों को कायम रखना चाहा लेकिन नेपाल ने अपनी नीति बदलते हुए स्पष्ट कहा कि वह भारत विशेष तक सीमित न रहकर, अबाद रूप से पाकिस्तान सहित अन्य देशों में भी यातायात की सुविधा तथा मुक्त व्यापार का अधिकार प्राप्त करना चाहता है। ज्ञातव्य है कि अनेक वस्तुएं भारत से नेपाल में तस्करी द्वारा ले जायी रही थीं फिर उन्हीं वस्तुओं को कर मुक्त व्यापार की सुविधा के अधीन अन्य देशों को निर्यात किया जाता था। बहुत सी विदेशी वस्तुएं जिनका आयात नेपाल में कर मुक्त व्यवस्था के अधीन भारत के मार्ग से होता था, उन्हें पुनः भारत में लाकर अधिक मूल्य पर बेचा जाता था। भारत को यह स्वीकार नहीं था कि नेपाल को पाकिस्तान के साथ कर-मुक्त व्यापार की सुविधा प्रदान की जाए। नेपाल ने भारत विरोधी एक और कदम तब उठाया जब उसने चीन से काठमांडू-ल्हासा सडक मार्ग बनाने का समझोंता कर लिया। यह समझोता स्पष्टतः एक भारत विरोधी कदम था।

1975 से नेपाल ने आवाज उठाई कि उसे शांति का क्षेत्र घोषित किया जाए। चीन, पाकिस्तान, श्रीलंका और बांग्लादेश ने नेपाल के इस दृष्टिकोण को अपना समर्थन प्रदान किया, लेकिन भारत ने इसका तीव्र विरोध किया। भारत का कहना है कि अगर शांति का क्षेत्र घोषित ही किया जाना है, तो सिर्फ नेपाल को ही क्यों, संपूर्ण उपमहाद्वीप को ही शांति का क्षेत्र घोषित किया जाना चाहिए। नेपाल के इस दृष्टिकोण को भी भारत शंका की दृष्टि से देखता है। क्योंकि इसे स्वीकार करना उसके राष्ट्रीय हितों के प्रतिकूल है। यदि नेपाल को शांति का क्षेत्र घोषित कर दिया जाता है, तो चीन की ओर से भारत के लिए खतरा बढ़ सकता है।

**भारत-नेपाल संबंधों की समीक्षा--** दिसंबर 1989 में भारत का प्रधानमंत्री पद संभालते ही श्री विश्वनाथ प्रताप सिंह ने भारत-नेपाल संबंधों को मधुर बनाने की नीति अपनायी। जून 1990 में नेपाल के प्रधानमंत्री भारत आए, तब से द्विपक्षीय

संबंधों में सुधार की प्रक्रिया और तेज हो गई । दोनों देशों के प्रधानमंत्रीयों ने 10, जून 1990 को दो नए समझौतों पर हस्ताक्षर किए। दिसंबर 1991में नेपाली प्रधानमंत्री जी. पी. कोइराला ने नई दिल्ली में प्रधानमंत्री नरसिंह राव से महत्वपूर्ण वार्ता की। जून 1996 में नेपाली प्रधानमंत्री देउबा की भारत यात्रा के दौरान महाकाली नदी के विकास के संबंध में एक संधि पर हस्ताक्षर किए गए। इसी सकारात्मक प्रगति में -2025 मार्च 2002 को नेपाली, प्रधानमंत्री देउबा ने भारत के छेः दिवसीय यात्रा की. भारत ने माओवादी गतिविधियों से निपटने के लिए नेपाल को सैन्य उपकरण और सैन्य प्रशिक्षण सहित हर संभव सहायता दिए जाने का वादा किया। भारत ने नेपाल की भूमि पर पाकिस्तान की गुप्तचर एजेंसी आई. एस. आई द्वारा भारत विरोधी आतंकवादी गतिविधियों के लिए इस्तेमाल करने पर अपनी चिंता प्रकट की, नेपाल ने इस पर सकारात्मक निर्णय के तहत आई. एस. आई. की गतिविधियों के संबंध में जानकारी देते रहने का वादा किया। साथ ही साथ दोनों देशों ने परस्पर सहयोग से आतंकवाद का सफाया करने का संकल्प व्यक्त किया। भारतीय उद्योग परिसंघ (CII) और भारतीय वाणिज्य एवं उद्योग संघ (FICCI) की एक संयुक्त बैठक में उद्योगपतियों को संबोधित करते हुए प्रधानमंत्री देउबा ने नेपाल की नई पनबिजली नीति के अंतर्गत नेपाल के पनबिजली के क्षेत्र में भारतीय निवेश को आमंत्रण दिया। 23 से 28 जून, 2002 को नेपाल के नवनियुक्त नरेश ज्ञानेंद्रिय वीर विक्रम शाह देव ने भारत की छह दिवसीय यात्रा की। दोनों देशों ने निर्णय लिया कि नेपाली सेना को आतंकवादी विरोधी प्रशिक्षण और विशेष प्रकार के उपकरनो की सस्ती कीमत पर आपूर्ति की सुविधाए सुनिश्चित की जाएगी और दोनों देशों के व्यापारिक संबंध और मजबूत किए जाएंगे।

**भारत-नेपाल आर्थिक-तकनीकी संबंध-** नेपाल की विकास कार्य मे सबसे अधिक धन भारत का ही लगा हुआ है। नेपाल को भारत से हर तरह का प्रशिक्षण, तकनीकी और गैर-तकनीकी, भी मिलता है। कोलंबो योजना के अंतर्गत भी भारत में अनेक नेपाली नागरिकों को प्रशिक्षण दिया है। भारत ने नेपाल की जिन परियोजनाओं के लिए सहायता दी है, उनमें प्रमुख है- (i)देवी घाट, त्रिशूल, करनाली, पंचेश्वर जल-विद्युत योजनाएं, (ii) त्रिभुवन गणपथ, काठमांडू-त्रिशूली मार्ग, त्रिभुवन हवाई अड्डा, (iii) काठमांडू रक्सौल टेलीफोन संयंत्र, (iv) चत्र नहर परियोजना, कोसी और गंडक परियोजना, (v) भूवैज्ञानिक अनुसंधान तथा खनिज खोजबीन का काम, (vi ) बीरगंज और हितौदा रेल निर्माण, तथा (vii) काठमांडू घाटी के एक उपनगर पाटन में एक औद्योगिक बस्ती की स्थापना । नेपाल में भारत की प्रसिद्ध परियोजनाओं में से एक नेपाल की पूर्व पश्चिम राजमार्ग पर कोल्हापुर-महाकाली क्षेत्र में 22 पुलों के निर्माण का कार्य हाल ही में पूरा हुआ है। डिसेंबर 1990मे एक द्विपक्षीय करार पर हस्ताक्षर हुए जिसके अंतर्गत भारत टर्न की और सहाय्यक अनुदान के आधार पर रक्सौल मे 3 करोड रुपये की लागत से एक नये रोड एव रेल पूल का निर्माण करेगा | जो की भारत-नेपाल से आने-जाने के लिए और माल लाने-ले-जाने के लिए सर्वाधिक महत्वपूर्ण सीमा स्थल होगा। दिसंबर 1991 में भारत ने नेपाल के महान देशभक्त एवं स्वतंत्रता संग्राम सेनानी वी. एच. कोइराला की पुण्यतिथि में 'भारत-नेपाल फाउंडेशन' बनाने का प्रस्ताव स्वीकार कर लिया। दोनों ही देश दो-दो करोड रुपए की अंशदान से स्थापित इस फाउंडेशन के द्वारा दीपक्षीय सहयोग को बढ़ावा देंगे। वे औद्योगिक क्षेत्र में साझा उद्यम लगाने को भी सहमत हो गये। इसके अंतर्गत चीनी, कागज तथा सीमेंट पर विशेष ध्यान दिया जाएगा। नेपाल के आग्रह पर भारत विराट नगर में वी. पी. कोइराला स्मृति मेडिकल कॉलेज, रंगीली में एक टेलीफोन एक्सचेंज, विराट नगर-झापा तथा चताराविपुर मार्ग के निर्माण, जनकपुर- बीजलपुर के रेल लाइन के नवीनीकरण और रक्सौल तक की रेल लाइन को बड़ी लाइन में परिवर्तित करने को राजी हो गया है।

भारत-नेपाल संबंध मे सुधार के प्रयत्न- मै 1991मे नई राजनीतिक प्रणाली के अंतर्गत हुए आम चुनावो के बाद प्रधानमंत्री श्री जी. पी. कोइराला की सरकारने नेपाल में शासन संभाला जिससे दोनो देशों के लिए विविध क्षेत्रों में पारस्पारिक लाभदायक सहयोग की दिशा में अधिकतम विस्तार की एक नईं शुरुआत हुई। इसका उद्देश भारत-नेपाल संयोग की दिशा में एक ऐसे नये युग की सुरुआत करना था जिसके प्रति दोनों देशों की सरकारों ने 10 जून, 1990 की भारत-नेपाळ संयुक्त विज्ञप्ति में अपनी वचनबद्धता व्यक्त की थी।

**निष्कर्ष-**

भारत और नेपाल के मध्य सदियों से एक अंतरंग रिश्ता है। भौगोलिक सीमाओं से परे दोनों देशों के पारस्परिक संबंधों का आधार सांस्कृतिक एकता रही है, जो इतिहास के विभिन्न थपेड़ों से अप्रभावित रही है, लेकिन वर्तमान में नेपाल की राजनीतिक स्थिति वास्तव में गंभीर और वह लोकतांत्रिक तथा अन्य संस्थाओं की मजबूती और राजनीतिक एकजूटता की मांग कर रही है। भारत ने नेपाल को सदैव सकारात्मक सहयोग प्रदान किया है। दूसरी तरफ नेपाल कहीं-ना-कहीं इस बात से भी आतंकित रहता है कि कहीं कोई बड़ा देश उस पर आधिपत्य न कर ले। भारत के तत्कालीन विदेश मंत्री जसवंत सिंह ने अगस्त 2001में काठमांडू की यात्रा की और सकारात्मक सहयोग देने का वादा किया। संक्षेप में कहां जाए, तो नेपाल के साथ सद्भाव और सहयोगपूर्ण संबंध भारत के राजनीतिक, आर्थिक और सामरिक हितों के लिए अत्यंत महत्वपूर्ण है। भारत तथा नेपाल के बीच स्थायी संबंध, सार्क के अन्य सदस्य देशों तथा चीन के साथ संबंधों पर भी प्रभाव डालते हैं। परिवर्तित विश्वव्यापी संदर्भ और दक्षिण एशिया में उत्पन्न परिस्थितियों को ध्यान में रखकर दोनों देशों द्वारा आपसी संबंधों को स्थायित्व प्रदान करने की दिशा में ठोस पहल की शुरुआत करने की आवश्यकता है।

**संदर्भ-**

1. रावत बहादुरसिंह, भारतीय विदेश नीति के निर्धारक तत्व एवं सिद्धांत, प्रतियोगिता दर्पण (मासिक) अप्रैल 2020।
2. फडिया बि. एल., अंतरराष्ट्रीय राजनीति, साहित्य भवन पब्लिकेशन आगरा।
3. अशोक कुमार, राजकीय विज्ञान, उपकार प्रकाशन आगरा, 2000.
4. दृष्टी The Vision 18 Oct. 2019.
5. अंतरराष्ट्रीय संबंध और राजकरण प्राध्यापक वराडकर.

# G-20 (शिखर सम्मेलन)

**डॉ. गूंजा पंवार**

सहायक प्राध्यापक (गृह विज्ञान) शासकीय विवेकानंद स्नातकोत्तर महाविद्यालय, मैहर, सतना, म.प्र.

**G20 क्या है? परिचय ?**

ग्रुप ऑफ टवेंटी (G20) अंतर्राष्ट्रीय आर्थिक सहयोग का प्रमुख मंच है। इसमें शामिल सभी प्रमुख देश अंतर्राष्ट्रीय आर्थिक मुद्दों पर वैश्विक आर्किटेक्चर और शासन को आकर देने तथा मजबूती करने में महत्वपूर्ण भूमिका निभाते है। 1997-1998 में एशियाई वित्तीय संकट के मद्देनजर की गई थी। 26 सितम्बर 1999 में अमेरिका के वाशिंगटन डीसी में स्थापित, G20 को ग्रुप ऑफ टवेंटी कहा जाता है। इस समूह के 19 देश सदस्य है, ग्रुप का 20वां सदस्य यूरोपीय संघ है। भारत ने इस बार कमल के फूल के साथ धरती को अपना लोगों (Logo) बनाया था। यह लोगों (Logo) तीन रंग का है, जो इंडियन फ्लेग (भारतीय झंड़ा) से लिया गया है, और यह रंग है- केसरिया, सफ़ेद, हरा और नीला है। G20 का उद्देश्य वैश्विक आर्थिक और वित्तीय मुद्दों को संबोधित करना, वित्तीय स्थिरता को बढ़ावा देना और टिकाऊ और समावेशी आर्थिक विकास को बढ़ावा देना है। G20 शिखर सम्मेलन का आयोजन भारत के नई दिल्ली में दिनांक 09 और 10 सितम्बर,2023 को 18वां G20 शिखर सम्मेलन के रूप में आयोजन किया गया। यह पहला शिखर सम्मेलन था, जब भारत ने G20 देशों के शिखर सम्मेलन की मेजबानी (अतिथि सत्कार) किया। इस शिखर सम्मेलन का विषय "वसुधैव कुटुंबकम्" था, एक पृथ्वी, एक परिवार, एक भविष्य (One Earth, One Family, One Future)" प्राचीन संस्कृत ग्रंथों और सतत विकास के लक्ष्य में निहित है। प्रारम्भ में, G20 वित्त मंत्रियों और केन्द्रीय बैंक गवर्नर की बैठक के रूप में कार्य करता था, लेकिन वैश्विक वित्तीय संकट के जवाब में 2008 में इसे नेताओं के स्तर के शिखर सम्मेलन में अपग्रेड किया गया। G20 समूह के 19 देश अर्थात अर्जेटीना, ऑस्ट्रेलिया, ब्राज़ील, कनाडा, चीन, फ्रांस, जर्मनी, भारत, इंडोनेशिया, इटली, जापान, कोरिया गणराज्य, मेक्सिको, रूस, सऊदी अरब, दक्षिण अफ्रीका, तुर्किये यूनाइटेड किंगडम, संयुक्त राज्य अमेरिका और यूरोपीय संघ शामिल हुए। यह सदस्य विश्व सकल घरेलू उत्पाद का लगभग 85 प्रतिशत, कुल अंतर्राष्ट्रीय व्यापार का 75 प्रतिशत और वैश्विक जनसंख्या का दो-तिहाई हिस्सा है। इन सदस्य देशों के अलावा, G20 प्रत्येक वर्ष अतिथि देशों और संयुक्त राष्ट्र, विश्व बैंक, अंतर्राष्ट्रीय मुद्रा कोष (International Monetary Fund – IMF), आर्थिक सहयोग और विकास संगठन (Organization for Economic Co-operation and Development – OECD), आसियान (ASEAN) आदि। जैसे अंतर्राष्ट्रीय संगठनों को अपनी बैठकों में भाग लेने के लिये आमंत्रित करता है। भारत G20 शिखर सम्मेलन की शुरुआत में नई दिल्ली पर आम सहमति हासिल करने में सफलतापूर्वक सफल रहा, जिसमें संयुक्त राष्ट्र के सतत विकास लक्ष्यों, जलवायु कार्यवाही और हरित विकास पहल, बहुपक्षीय वितपोषण पर ध्यान केन्द्रित करने, डिजिटल सार्वजनिक बुनियादी ढांचा, कृत्रिम बुद्धिमता (AI), और अंतर्राष्ट्रीय कराधान आदि पर फोकस किया गया था।

**वैश्विक जैव ईंधन गठबंधन:-**

- यह भारत के नेतृत्व में एक पहल है, जिसका उद्देश्य जैव ईंधन अपनाने को बढ़ावा देने के लिये सरकारों, अंतर्राष्ट्रीय संगठनों तथा उद्योगों का गठबंधन सुनिश्चित करना है।
- इस पहल का लक्ष्य जैव ईंधन को ऊर्जा संक्रमण के एक प्रमुख घटक के रूप में स्थापित करना तथा रोजगार सृजन व आर्थिक विकास में योगदान देना है।
- यह भारत के मौजूदा PM-JIWAN योजना, SATAT और GOBAR DHAN योजना जैसे जैव ईंधन कार्यक्रमों को गति देने में मदद करना।

- ❖ अंतर्राष्ट्रीय ऊर्जा एजेंसी के अनुसार, शुद्ध शून्य लक्ष्य के परिणामस्वरूप वर्ष 2050 तक जैव ईंधन क्षमता में साढ़े तीन से पाँच गुना वृद्धि की जायेगी।
- ❖ इस गठबंधन की शुरुआत नौ आरंभिक सदस्य देशों:- भारत, अमेरिका, ब्राज़ील, अर्जेंटीना, बांग्लादेश, मॉरीशस, दक्षिण अफ्रीका और संयुक्त अरब अमीरात के साथ की गई थी।
- ❖ वैश्विक जैव ईंधन गठबंधन (Global Biofuels Alliance – GBA) के सदस्य देश जैव ईंधन के प्रमुख उत्पादक और उपभोक्ता है। इथेनॉल के उत्पादन में संयुक्त राज्य अमेरिका द्वारा 52 प्रतिशत, ब्राज़ील द्वारा 30 प्रतिशत एवं भारत द्वारा 3 प्रतिशत के साथ लगभग 85 प्रतिशत के योगदान के साथ इन्हीं देशों में इसकी लगभग 81 प्रतिशत खपत होती है, और इसमें शामिल होने के लिये 19 देश और 12 अंतर्राष्ट्रीय संगठन पहले ही सहमती व्यक्त कर चुके है।

**वैश्विक जैव ईंधन गठबंधन का समर्थन करने वाले देश जिन्हें G20 में आमंत्रित किया गया:-**

बांग्लादेश, सिंगापूर, मॉरीशस, संयुक्त अरब अमीरात ।

**वैश्विक जैव ईंधन गठबंधन के गैर-समर्थक देश:-**

आइसलैंड, केन्या, गुयाना, पैराग्वे, सेशेल्स, श्रीलंका, युगांडा और फ़िनलैंड ।

**अंतर्राष्ट्रीय संगठन:-**

विश्व बैंक, एशियाई विकास बैंक, विश्व आर्थिक मंच, विश्व एलपीजी संगठन, संयुक्त राष्ट्र-सभी के लिये ऊर्जा, UNIDO, बायोफ्यूचर्स प्लेटफार्म, अंतर्राष्ट्रीय नागरिक उड्डयन संगठन, अंतर्राष्ट्रीय ऊर्जा एजेंसी, अंतर्राष्ट्रीय ऊर्जा मंच, अंतर्राष्ट्रीय नवीकरणीय ऊर्जा एजेंसी, विश्व बायोगैस एसोसिएशन।

**भारत-मध्य पूर्व-यूरोप आर्थिक गलियारा (IMEC):-**

- ❖ भारत-मध्य पूर्व-यूरोप आर्थिक गलियारा (IMEC) की स्थापना के लिये भारत, अमेरिका, सऊदी अरब, यूरोपीय संघ, संयुक्त अरब अमीरात, फ्रांस, जर्मनी और इटली की सरकारों के बीच एक समझौता ज्ञापन पर हस्ताक्षर किये गए।
- ❖ भारत-मध्य पूर्व-यूरोप आर्थिक गलियारा (IMEC) वैश्विक अवसंरचना और निवेश के लिये साझेदारी (Partnership for Global Infrastructure Investment – PGII) नामक एक व्यापक पहल का हिस्सा है।
- ❖ Partnership for Global Infrastructure Investment (PGII) को सबसे पहले जून 2021 में ब्रिटेन में आयोजित G7 शिखर सम्मेलन के दौरान पेश किया गया था। इसका लक्ष्य सार्वजनिक और निजी निवेश के संयोजन के माध्यम के विकासशील देशों में बुनियादी ढाँचा परियोजनाओं को वित्तपोषित करना है।
- ❖ (IMEC) भारत, मध्य-पूर्व और यूरोप को जोड़ने वाली एक महत्वपूर्ण बुनियादी ढाँचा परियोजना है। इस परियोजना का लक्ष्य रेलवे और समुद्री मार्गों सहित परिवहन गलियारों का एक नेटवर्क स्थापित करना है।
- ❖ इससे चीन के बेल्ट एंड इनिशिएटीव (BRI) की प्रतिक्रिया के रूप में देखा जाता है, यह एक वैकल्पिक बुनियादी ढाँचा नेटवर्क प्रदान करता है।

**वित्तीय समावेशन दस्तावेज के लिये G20 ग्लोबल पार्टनरशिप:-**

विश्व बैंक द्वारा तैयार वित्तीय समावेशन दस्तावेज के लिये G20 ग्लोबल पार्टनरशिप ने केंद्र सरकार के तहत पिछले एक दशक में भारत के डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर (DPI) के परिवर्तनकारी प्रभाव की सराहना की है। यह दस्तावेज निम्नलिखित पहलुओं पर बल देता है, जिन्होंने डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर (DPI) परिदृश्य को आकार देने में बड़ी भूमिका निभाता है।

**तीव्र वित्तीय समावेशन:-**

भारत के डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर (DPI) दृष्टिकोण ने केवल 06 वर्षों में 47 वर्षों की वित्तीय समावेशन प्रगति हासिल की। जन धन-आधार-मोबाइल (JAM) ट्रिनिटी की सहायता से वित्तीय समावेशन दर को वर्ष 2008 में 25 प्रतिशत से बढ़ाकर 06 वर्षों के भीतर 80 प्रतिशत से अधिक किया गया। विभिन्न विनियामक ढाँचे, राष्ट्रीय नीतियों और आधार-आधारित सत्यापन ने डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर (DPI) की स्थापना में अहम योगदान दिया।

**प्रधानमंत्री जन धन योजना (PMJDY) की सफलता:-**

प्रधानमंत्री जन धन योजना (PMJDY) खातों की संख्या 147.2 मिलियन (मार्च 2015) से तीन गुना बढ़कर 462 मिलियन (जून 2022) हो गई। इसमें से 56 प्रतिशत खाता-धारक महिलाएँ है, अर्थात इनकी संख्या 260 मिलियन से अधिक है। अप्रैल 2023 तक 12 मिलियन से अधिक ग्राहकों को आकर्षित करते हुए प्रधानमंत्री जन धन योजना (PMJDY) ने कम आय वाली महिलाओं को बढ़ावा दिया।

**सरकार से व्यक्ति (G2P) भुगतान:-**

G2P भुगतान मुख्य रूप से दो चैनलों के माध्यम से गरीब व्यक्ति तक पहुंचता है:

(i) सामाजिक हस्तांतरण ।

(ii) वर्तमान और सेवानिवृत्त श्रमिकों को भुगतान करना ।

उपलब्ध आंकड़ों के आधार पर हमारा अनुमान है की वैश्विक स्तर पर कम से कम 170 मिलियन गरीब व्यक्तियों को नियमित G2P भुगतान प्राप्त होता है। G2P भुगतान और सामाजिक सुरक्षा जाल (SSN) पहल ओवरलैप होती है, दोनों उपभोग को बढ़ावा देने और भेदता को कम करने के उद्देश्य से कार्यक्रमों के साथ गरीब व्यक्तियों को लक्षित करते है। हालाँकि सामाजिक सुरक्षा जाल (SSN) परिव्यय का एक बड़ा हिस्सा अक्सर गैर-नकद समर्थन में जाता है, जैसे की खाद्य वितरण (उदाहरण के लिये स्कूल भोजन कार्यक्रम), लक्षित मूल्य सब्सिडी (उदाहरण के लिये भारत की सार्वजनिक वितरण प्रणाली जो 478,000 उचित मूल्य की दुकानों के माध्यम से सब्सिडी वे बुनियादी खाद्य पदार्थों में 3.1 बिलियन अमेरिकी डॉलर बेचती है) और स्वास्थ्य शिक्षा जैसी आवश्यक सेवाओं के लिये शुल्क छूट।

भारत में डिजिटल G2P आर्किटेक्चर ने 53 मंत्रालयों के 312 योजनाओं के माध्यम से लाभार्थियों को 361 बिलियन अमेरिकी डॉलर के अंतरण की सुविधा प्रदान की। इसके माध्यम से मार्च 2022 तक 33 बिलियन अमेरिकी डॉलर की कुल बचत की गई, जो GDP के 1.14 प्रति-शत के बराबर है।

**एकीकृत भुगतान इंटरफ़ेस (UPI) के उपयोग में उत्तरोत्तर वृद्धि:-**

1. मई 2023 में 9.41 बिलियन से अधिक UPI लेन-देन हुए, जिनकी कीमत 14.89 ट्रिलियन रुपए थी।
2. वित्त वर्ष 2022-2023 में UPI लेन-देन भारत की नॉमिनल GDP के 50 प्रतिशत के करीब पहुँच गया।

**निजी क्षेत्र की दक्षता:-**

DPI ने जटिलता, लागत और समय को कम करते हुए निजी संगठनों के संचालन को सुव्यवस्थित किया। कुछ NBFC'S ने 8 प्रतिशत अधिक ऋण रूपांतरण दर, मूल्य-हास लागत में 65 प्रतिशत बचत और धोखाधड़ी का पता लगाने में 66 प्रतिशत लागत की कमी हासिल की।

DPI उपयोग के साथ भारत में बैंकों की ग्राहक ऑनबोर्डिंग लागत 23 अमेरिकी डॉलर से घटकर 0.1 अमेरिकी डॉलर हो गई।

**KYC की अनुपालन लागत में कमी: -**

अनुपालन लागत को 0.12 अमेरिकी डॉलर से घटाकर 0.06 अमेरिकी डॉलर किए जाने से कम आय वाले ग्राहक अधिक आकर्षित हुए।

**सीमा पार भुगतान: -**

UPI-Pay Now लिंकेज के कारण सिंगापूर के साथ सीमा पार से त्वरित और सस्ते भुगतान सुनिश्चित हुए।

**अकाउंट एग्रीगेटर फ्रेमवर्क: -**

13.46 मिलियन सहमति के साथ डेटा साझा करने के लिये 1.13 बिलियन खातों को सक्षम किया गया।

डेटा एम्पावरमेंट एंड प्रोटेक्शन आर्किटेक्चर (DEPA):- यह व्यक्तियों को उनके डेटा पर नियंत्रण प्रदान करता है, नवाचार और प्रतिस्पर्धा को बढ़ावा देता है।

**किन देशों के साथ हुई द्विपक्षीय बातचीत:-**

सम्मेलन के अन्दर भारत की 15 देशों के साथ द्विपक्षीय बातचीत हुई, अमेरिका ने बातचीत के दौरान 31 ड्रोन खरीदने के लिये भारत की ओर से अनुरोध पत्र जारी करने का स्वागत किया। श्री नरेन्द्र मोदी और जो बाइडन ने कहा की दोनों सरकार स्ट्रेटजिक पार्टनरशिप पर काम करती रहेंगी और सेमी कंडक्टर सप्लाई चैन के लिये काम करेगी।

ब्रिटेन के प्रधानमंत्री ऋषि सुनक और भारत के प्रधानमंत्री श्री नरेन्द्र मोदी के साथ बातचीत में मुक्त व्यापार समझोते के साथ ही दोनों देशों के बीच आपसी व्यापार और निवेश में तेजी लाने की प्रतिबद्धता जताई गई, वही बांग्लादेश से सुरक्षा सहयोग, सीमा प्रबंधन, व्यापार और कनेक्टिविटी, जल संसाधन, बिजली और ऊर्जा सहयोग पर चर्चा हुई। भारत के प्रधानमंत्री श्री नरेन्द्र मोदी जी ने जो बाइडन, बांग्लादेश की प्रधानमंत्री शेख हसीना और मॉरीशस के प्रधानमंत्री प्रविंद जुगनोथ के साथ द्विपक्षीय बैठक किया। भारत के प्रधानमंत्री श्री नरेन्द्र मोदी जी ने ब्रिटेन, जापान, जर्मनी और इटली से द्विपक्षीय वार्ता हुई, 10 सितम्बर को प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी जी ने कनाडा के प्रधानमंत्री जस्टिन टुडो से बात किया और वहां खालिसतानी अलगाव-वादियों को लेकर भारत की चिंता से अवगत कराया।

**हरित विकास, जलवायु वित्त और जीवन:-** भारत का ध्यान जलवायु परिवर्तन पर है, जिसमें जलवायु वित्त और प्रौधोगिकी पर विशेष जोर दिया गया है, साथ ही विकासशील देशों के लिये उचित ऊर्जा परिवर्तन सुनिश्चित किया गया है।

LIFE कार्यक्रम का परिचय, जो पर्यावरण के प्रति जागरूक प्रथाओं को बढ़ावा देता है और भारत की स्थाई परम्पराओं पर आधारित है।

**त्वरित, समावेश और लचीला विकास:-** उन क्षेत्रों पर ध्यान केन्द्रित करें जिनमें संरचनात्मक परिवर्तन लाने की क्षमता है, जिसमें वैश्विक व्यापार में छोटे और मध्यम आकार के उद्यमों का समर्थन करना, श्रम अधिकारों और कल्याण को बढ़ावा देना, वैश्विक कौशल अंतर को संबोधित करना और समावेशी कृषि मूल्य शृंखला और खाद्य प्रणालियों का निर्माण करना शामिल है।

**एसडीजी पर प्रगति में तेजी लाना: -** सतत विकास लक्ष्य के लिये 2030 एजेंडा में निर्धारित लक्ष्यों को प्राप्त करने की प्रतिबद्धता, जिसमें विशेष रूप से कोविड-19 महामारी के प्रभाव को संबोधित करने पर ध्यान केन्द्रित किया गया।

**तकनीकी परिवर्तन और डिजिटल सार्वजनिक अवसंरचना:-** प्रौधोगिकी के प्रति मानव केन्द्रित दृष्टिकोण को बढ़ावा देना और डिजिटल सार्वजनिक बुनियादी ढांचे, वित्तीय समावेशन और कृषि और शिक्षा जैसे क्षेत्रों में तकनीक-सक्षम विकास जैसे क्षेत्रों में ज्ञान-साझाकरण बढ़ाना।

**21वी सदी के लिये बहुपक्षीय संस्थाएँ:-** बहुपक्षवाद में सुधार लाने और एक अधिक जवाबदेह, समावेशी और प्रतिनिधि अंतर्राष्ट्रीय प्रणाली बनाने का प्रयास जो 21वी सदी की चुनौतियों से निपटने के लिये उपयुक्त हो।

**महिला नेतृत्व वाला विकास:-** सामाजिक आर्थिक विकास और एसडीजी के उपलब्धि को बढ़ावा देने के लिये महिला सशक्तिकरण और प्रतिनिधित्व पर ध्यान देने के साथ समावेशी वृद्धि और विकास पर जोर दिया गया था।

**स्वास्थ्य देखभाल में लचीलापन और अनुसंधान:-**

यह अधिक लचीला, न्यायसंगत, सतत और समावेशी स्वास्थ्य प्रणाली बनाने के लिये वैश्विक स्वास्थ्य व्यवस्था को मजबूत करने हेतु प्रतिबद्ध है। इस प्रयास में विश्व स्वास्थ्य संगठन (WHO) की केन्द्रीय भूमिका है। इसका लक्ष्य

आगामी दो से तीन वर्षों के अंदर प्राथमिक स्वास्थ्य देखभाल, स्वास्थ्य क्षेत्र में कार्यबल और आवश्यक स्वास्थ्य सेवाओं को महामारी से पहले के स्तर से बेहतर स्तर तक बढ़ाना है।

इसमें वन हेल्थ दृष्टिकोण (जो रोगानुरोधी प्रतिरोध से निपटने पर विशेष ध्यान देने के साथ एक ही तंत्र के अंदर पशुओं, पादपो और मनुष्यों में बीमारियों को ट्रैक करता है) अपनाने पर जोर दिया गया है। तपेदिक और AIDS जैसी मौजूदा महामारियों का समाधान करने के अतिरिक्त G20 विस्तारित कोविड पर शोध के महत्व को रेखांकित करता है।

**वित्त ट्रैक (Finance Track) समझोते:-**

भारत की G20 की अध्यक्षता ने क्रिप्टोकरेंसी के लिये एक समन्वित और नीति एवं नियामक ढांचे की नींव रखी है। इसमें क्रिप्टो परिसंपति विनियमन हेतु वैश्विक सहमति पर जोर दिया गया। G20 देशों की नई दिल्ली में घोषणा क्रिप्टो-परिसंपति पारिस्थितिक तंत्र के तेजी से विकास से जुड़े जोखिम की निगरानी पर जोर देती है।

**भारत का सांस्कृतिक प्रदर्शन:-**

(i) भारत मंडपम (अनुभव मंडपम से प्रेरित)
(ii) भगवान नटराज की कांस्य प्रतिमा (चोल शैली)
(iii) ओडिशा के सूर्य मंदिर का कोणार्क चक्र और नालंदा विश्वविद्यालय की छवि (प्रतिष्ठित प्रष्ठ भूमि के रूप में प्रयुक्त)
(iv) तंजावुर पेंटिंग और ढोलरा कला
(v) बोधि वृक्ष के नीचे स्थापित भगवान बुद्ध की पीतल की मूर्ति
(vi) विविध संगीत विरासत (हिन्दुस्तानी, लोक संगीत, कर्णाटक, भक्ति)

**G20 शिखर सम्मेलन 2023 में नवीनतम भारत – अमेरिका सहयोग: -**

लचीला सेमीकन्डक्टर आपूर्ति श्रृंखला और दूरसंचार बुनियादी ढाँचे पर ध्यान केन्द्रित करते हुए भारत और संयुक्त राज्य अमेरिका अपनी प्रौधोगिकी साझेदारी को मजबूत कर रहे है। भारत चीनी दूरसंचार उपकरणों को कम करने की प्रक्रिया के साथ तालमेल बिठाते हुए अमेरिका के रिप एंड रिप्लेस पायलट प्रोजेक्ट का समर्थन करता है। भारत और अमेरिका ने अंतरिक्ष एवं कृत्रिम बुद्धिमता (AI) जैसे नए तथा उभरते क्षेत्र में विस्तारित सहयोग के माध्यम से भारत – अमेरिका प्रमुख रक्षा साझेदारी को मजबूत और विविधता-पूर्ण बनाने की अपनी प्रतिबद्धता की पुष्टि की।

**GE F-414 जेट इंजन समझोते: -** अमेरिका ने हाल ही में GE F-414 जेट इंजन निर्माण के लिये जनरल इलेक्ट्रिक एयरोस्पेस और हिन्दुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL) के बीच एक वाणिज्य समझोते हेतु अधिसूचना प्रक्रिया पूरी की। यह समझौता अमेरिका और भारत के बीच रक्षा सहयोग में एक बड़ा कदम है, जो अपनी घरेलू रक्षा विनिर्माण क्षमताओं को बढ़ाने के लिये भारत की प्रतिबद्धता को उजागर करता है।

**G20 ने उम्मीदें बढाई: -**

अमेरिका राष्ट्रपति जो बाइडन भी G20 सम्मेलन में चर्चा के दौरान शामिल किए गए मुद्दों पर सहमति जताई। उन्होंने कहा की वर्ष 2023 के G20 सम्मेलन ने ये साबित कर दिया की ये संगठन दुनिया की बड़ी समस्याओं के हल की दिशा में काम कर सकता है। उन्होंने सोशल मीडिया प्लेटफार्म (ट्विटर) पर लिखा “ऐसे समय में जब दुनिया जलवायु परिवर्तन, अपनी कमजोरियों और संघर्ष से जूझ रही है तो ऐसे समय में इस वर्ष के G20 सम्मेलन ने साबित किया है की इसके पास दुनिया की बड़ी समस्याओं का हल है।

भारत के प्रधानमंत्री श्री नरेन्द्र मोदी से 50 मिनट की बातचीत में जो बाइडन ने अमेरिका और भारत के बीच रिश्तों को और मजबूत और बहुआयामी करने की प्रतिबद्धता जताई।

प्रधानमंत्री श्री नरेन्द्र मोदी ने सम्मेलन के समापन के दौरान ब्राज़ील के राष्ट्रपति लुईस इनास्यू लूला डा सिल्वा को G20 समूह की अध्यक्षता सौंप दी। इसके प्रतीक के तौर पर उन्हें श्री नरेन्द्र मोदी जी ने गैवल (हथौड़ा) पेश किया। प्रधानमंत्री

नरेन्द्र मोदी जी ने सोशल मीडिया (ट्विटर) पर लिखा “भारत ने ब्राज़ील को गैवल (हथौड़ा) दी, हमें अटूट विश्वास है की वह समर्पण और दूरदर्शिता के साथ नेतृत्व करेंगे।

**निष्कर्ष: -**

भारत की G20 प्रेसीडेंसी के दौरान प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी जी ने Business Today के एक विशिष्ट साक्षात्कार में विभिन्न विषयों पर बात की। उन्होंने G20 देशों के बीच मानव केन्द्रित विकास की ओर एक स्थानांतरण को बढ़ावा दिया, पुराने परिप्रेक्ष्य से नए दृष्टिकोण की ओर बढ़ते विचारो की चर्चाएँ पेश की। प्रधानमंत्री मोदी जी ने G20 की भूमिका को एक आशा की किरण के तौर पर दर्शाया, जो वैश्विक दक्षिण की चिंताओ और आशाओं को प्रतिबिंबित करती है। उन्होंने जलवायु पर मानव प्रभाव को स्वीकार करने की आवश्यकता को जोर दिया और प्रौधोगिकी और जीवनशैली परिवर्तन के माध्यम से नवाचारी समाधानों की आवश्यकता को भी दरकिनार किया। प्रधानमंत्री ने मास प्रवृतियों और व्यक्तिगत भागीदारी को असली परिवर्तन के लिये प्रेरक के रूप में बताया और भारत की भूमिका को सामान्य ढांचे के माध्यम से डेब्ट पुनर्गठन को बढ़ावा देने में भी बल दिया।

अंत में G20 एक प्रभावशाली अंतर्राष्ट्रीय मंच है जो वैश्विक आर्थिक और वित्तीय मुद्दों को संबोधित करता है, वित्तीय स्थिरता और सतत आर्थिक विकास को बढ़ावा देता है। भारत एक महत्वपूर्ण उभरती अर्थव्यवस्था है, G20 में एक महत्वपूर्ण भूमिका है और वर्तमान G20 अध्यक्ष के रूप में इसके पास अपने वैश्विक नेतृत्व को प्रदर्शित करने और बुनियादी ढांचे के विकास, वित्तीय समावेशन, जलवायु परिवर्तन और वैश्विक स्वास्थ्य जैसी अपनी प्राथमिकताओं को बढ़ावा देने का अवसर है। G20 की अध्यक्षता भारत को वैश्विक नीति चर्चाओं को आगे बढ़ाने, अपने आर्थिक और विकासात्मक हितों को आगे बढाने और अपनी अंतर्राष्ट्रीय प्रतिष्ठा और प्रभाव को बढाने की अनुमति देती है।

**सन्दर्भ ग्रन्थ सूची: -**


1. The Hindu- प्रकाशन तिथि 12 सितम्बर 2023
2. Testbook- प्रकाशन तिथि 29 अक्तूबर 2023
3. Drishti IAS- प्रकाशन तिथि 14 सितम्बर 2023
4. Wikipedia- प्रकाशन तिथि 14 सितम्बर 2023
5. Pmmodiyojanaye.in - प्रकाशन तिथि 29 जनवरी 2024

# सौर उर्जा—एक अध्ययन

(विशेष संदर्भ-- अंबाजोगाई)

संशोधिका

**शेख रशिदा रहेमतुल्ला**

सौर ऊर्जा अक्षय ऊर्जा कहेलाती है. ये ऊर्जा हमे सुरज से मिलती है यह ऊर्जा हमे फोटो फोटोवोल्टीक मतलब सौर पॅनल के जरीए हमे सौर ऊर्जा मिलती है. मानव समाज में ऊर्जा का महत्व अनन्यसाधारण आहे कभी कबार ऐसा कहा जाता है ऊर्जा के बिना मानव जीवन अधुरा है. सही तो है हर चीज में ऊर्जा चाहिये खाना बनाने के लिए, घर मे लाईट लगाना है तो ऊर्जा चाहिये, अध्ययन के लिए ऊर्जा चाहिए, पश्चिमी देशो मे बडे पैमाने पर सोलार ऊर्जा का इस्तेमाल हो रहा है.

हमारा हिंदुस्तान भी सौर ऊर्जा को बडे पैमाने पर इस्तेमाल कर रहा है. सौर ऊर्जा सुरज से निकलने वाली प्रकाश और उष्मा है जो विद्युत उत्पन्न करती है सौर शक्ती, सौर तापीय ऊर्जा सौर जल तापन सहित और वास्तू कला इन जैसी तकनी को कि एक श्रृंखला के रूप मे उपयोग मे किया जाता है.

यह एक नवीकरणीय ऊर्जा है जो हमे प्रकृती से मिलती है इस ऊर्जा की कोई मर्यादा नही होती मन चाहा चार्ज करो, मजा चाहा ऊर्जा खर्च करो इस तकनीकी को निष्क्रिय और सक्रिय सौर ऊर्जा रूप वर्णन किया जाता.

1. सक्रिय सौर तकनीको में ऊर्जा की निर्मिती फोटोवोल्टीक प्रणालीसे की जाती है इसमे सौर शक्ती और सौर जल तापन का उपयोग किया जाता है.
2. निष्क्रिय सौर तकनीको मे एक इमारत को सूर्यकिरण की ओर उन्मुख करना, प्रकाश फैलाने वाले गुणोकी सामग्री को इकठ्ठा करना और स्थान को निश्चित करना है जो वायू को प्रसारित करती है. सूर्य विद्युत चुंबकीय विकिरण उत्पन्न करता है जिसका उपयोग सूर्य के रूप मे किया जा सकता है.

सूर्य की ऊर्जा अक्षय ऊर्जा है यह कभी खत्म नही हो सकती सूर्यने रौद्र रूप लिया तो पराबैंगनी किरणे पृथ्वी पर आसकती है इसलिये निसर्ग ने इससे बचने के लिये आकाश पर ओझोन वायू की परत झाली होती है उसे ओझोन छत्री कहते है. जिनसे चरिंदे-परिंदे, जानवर, मानव की सूर्य की सीधे किरणो से हिफाजत की जाती है.

सूर्य की जरुरत अभी समस्त मानव प्राणी को है. एक दिन सुरज नही निकला तो समस्त जीवन परेशान हो जाते है. 1 kw सोलर प्लान लगाने का खर्चा आता है 50,000 रु. 9 kw की सोलर प्लांट लगाने का खर्च 4 लाख 4000 आया है इस पर 30% सबसिडी मिली है. 1 लाख 35 हजार डिस्काउंट मिला है. 1wk के सोलर प्लांट रोजाना 5 युनिट की बिजली बनाती है. 9 wk के सोलर प्लांट रोजाना 45 युनिट की बिजली बनाते है. इलेक्ट्रिसिटी 1350 रही है इलेक्ट्रिसिटी एव्हरेज रेट 8 युनिट तो महिने से देखा जाये तो 350×8=11000 रुपये से बचाता है और साल के 1 लाख 30 हजार यांनी के वह हर साल 1 लाख 30 हजार कमाता है.

"सूर्य से उष्मा और प्रकाश अन दोनो के रूप में मिलने वाली ऊर्जा को सौर ऊर्जा कहते है." सौर ऊर्जा से पृथ्वी के हवामान मे बदलाव आता है. सुरज से पृथ्वी को 174 पेटा वॅट ऊर्जा मिलती है इसमे से 30% ऊर्जा परावर्तित होती है बची हुई ऊर्जा वातावरण में absourb होती है. इसी ऊर्जा से वातावरण और जमीन आता तपती है. वातावरण गरम होने की वजह से समुंदर का पानी तपता है और पानी की भाप बनती है.

सुरज की रोशनी पृथ्वी पर रोशनी हसीन करने का मुख्य स्त्रोत है सुरज को पृथ्वी पर आने के लिए 8 मिनिट लगते है मानव, प्राणी, पक्षी, कीटक, मुंग्या सभी सजीव पृथ्वी पर आनेवाले सुबह के सुरज की रोशनी का इंतजार करते है. सौर ऊर्जा का इस्तेमाल मानव अपनी जिंदगी मे बडे आसानी से करता है.

**अनुसंधान के उद्देश**

1. सौर ऊर्जा पारंपरिक ऊर्जा कहेलाती है इसका अध्ययन करना
2. पृथ्वीतल के समस्त मानव और प्राणी जाती के लिए सूर्य की ऊर्जा फायदेमंद है यह जानना.
3. सुबह की सौर ऊर्जा मानव के लिए बहुत फायदेमंद है.

**डाटा कलेक्शन :--**

**प्राथमिक डाटा कलेक्शन :---**

'सौर ऊर्जा एक अध्ययन' इस पर संशोधिका अनुसंधान कर रही है इस विषय के लिए प्राथमिक तौर पर अध्ययन किया गया लोगो मे पहूचकर सौर ऊर्जा का इस्तेमाल बिजली के रूप मे किस तरह किया जा रहा है इसके फायदे भी बहुत है यह भी जान लिया कितना खर्च आया यह भी जाने के कोशिश की.

**दुय्यम डाटा कलेक्शन :---**

यहाँ पर अनुसंधान छात्र ने इंटरनेट, मासिक, संदर्भ ग्रंथ, वेबल्यूग्राफी का अध्ययन किया साथही समाचार पत्र, पेपर कटिंग इन सबका अध्ययन किया है, उत्तरदाताओं की राय भी जान भी.

**सौर ऊर्जा का श्रेय :---**

सौर ऊर्जा को बनाने का श्रेय दो वैज्ञानिको को माना जाता है प्रथम 1839 इसवी सन मे अलेक्झांडर एडमन बैकलल और द्वितीय 1873 मे विलफ्स्मिथ को माना जाता है. सबसे पहले बाईक लेन फोटोवोल्टीक के इफेक्ट का पता लगाया जिन्होने बताये कैसे सूर्य के प्रकाश की किरण से बिजली बनाई जा सकती है और कितनी बनाई जा सकती है और द्वितीय वैज्ञानिक ने सोनियम में फोटोकान्डक्वास्टिक की पावर का पता लगाया क्यूकी किसी पॅनल के अंदर फोटोकान्डक्वास्टिक का सबसे बडा या जरुरी काम होता है फोटोकान्डक्वास्टिक ही संपर्क मे आने पर बिजली पैदा करती है.

**सौर ऊर्जा और प्रकृती :--**

सौर ऊर्जासे पौधे और पत्तियां अपना खाना खुद बनाती है. मानव ही सुबह की कवली कवली धूप लेता जिसे मानव को इससे 'डी विटामिन' मिलता से हर व्यक्ती अपनी हड्डीयों को मजबूत बनाते है. सौर ऊर्जा इंसान मानव और प्राणी जाती के लिए बहुत महत्वपूर्ण है एक दिन सुरज नही निकला तो पुरा वातावरण थंडगार हो जाता है इसलिये सुरज हमारे मानव जाती में बहुत बडे मित्र की भूमिका निभाता है आज कल तो सुरज का इस्तमाल ऊर्जा के लिए किया जा रहा है सौर ऊर्जा को बडे पैमाने पर इस्तेमाल कारो के रिचार्ज के लिए किया जा रहा है हमारी सरकार इसके लिए सवलत दे रही है पूरे विश्व मे सौर ऊर्जा का बडे पेमाने पर इस्तेमाल किया जा रहा है.

**सौर ऊर्जा की जरूरत :---**


1. अगर हमने दिन भर मे 100 unit बनाये तो MSEB की 103 unit हमने इस्तेमाल की तो MSEB 100 unit मायनस करके हमे बहुत कम बिजली बिल देती है.
2. बरसात मे सोलर पॅनल 50% सोलार इलेक्ट्रिसिटी तयार करता है.
3. सर्दीयोंमे सोलर पॅनल से कम ऊर्जा मिलती है.
4. उत्तरदाता कहेता है सौर कुकर, सर चुल्हा तो इस्तेमाल नही किया


लेकिन हमने लोखंडी सावरगाव मे सोलार कॅमेरा इस्तेमाल किया है. जिसे पता चलता है की खेत मे से क्या चोरी हुआ है, किसने चोरी किया है, की खेत मे कोई शेर तो नही आया है, खंबे की तार तो नही टूटकर गिरी ना हमे यह सब जानकारी मिलती है. सौर कॅमेरा इस तरह लगाया जाता की वो कॅमेरा चारो दिशा को घूम सकता है.

धीरे धीरे कोयला और पानी पर चलने वाली बिजली खतम होने के कगार पर है. इसलिये सौर ऊर्जा + विद्युत दोनो का इस्तेमाल हो रहा है अगर लोगो की रोज की बिजली की जरुरत पुरी होने के बाद बचे हुई सौर ऊर्जा के युनिट MSEB को बेच सकते है.

**उत्तरदाताओ की जानकारी :----**

100% उत्तरदाता बताते है सौर उर्जा सूरजसे मिलती





45 % उत्तरदाते कहेते है बरसात मे सोलार फोटोवोल्टिक सेलपर अलग परिणाम होता है 45 % उत्तरदाते कहेते है बरसात मे सोलार फोटोवोल्टिक सेलपर अलग परिणाम नही है. 10 % उत्तरदाते कहेते है बरसात मे सोलार फोटोवोल्टिक सेलपर अलग परिणाम होता है यह नही जानते.

5 % उत्तरदाते कहेते है थिन फिल्म और क्रिस्टल लाईन इन दोनो से 3 से 2 वॉट बिजली मिलती है. 5 % उत्तरदाते कहेते है थिन फिल्म और क्रिस्टल लाईन इन दोनो से 2 से 3 वॉट भी बिजली नही मिलती है. 90% उत्तरदाते कहेते है थिन फिल्म और क्रिस्टल लाईन इन दोनो से 3 से 4 वॉट बिजली मिलती है.

5) 10 % उत्तरदाते कहेते है हमारे पास थिन फिल्म सोलार पॅनल है. 85 % उत्तरदाते कहेते है हमारे पास क्‍रिस्टललाईन फिल्म सोलार पॅनल है. 5 % उत्तरदाते कहेते है हमारे पास कोईभी सोलार पॅनल नही है




6) 95 % उत्तरदाते कहेते है सोलार पॅनलसे मिली हूई बिजली MSEB को बेच सकते है. 5% उत्तरदाता कहेते है सोलार पॅनलसे मिली हूई बिजली MSEB को बेच नही सकते है.
7) 90 % उत्तरदाते कहेते है देश की जनता को सोलार पॅनलके लिए पंतप्रधान योजना से सबसिडी मिलती है. 10 % उत्तरदाते कहेते है देश की जनता को सोलार पॅनलके लिए मुख्यमंत्री योजना से सबसिडी मिलती है.
8) 60 % उत्तरदाते कहेते है MSEB की बिजली सोलार पॅनलके होते हुए इस्तेमाल की तो बील नही आएगा आया तो कटके आएगा. 40 % उत्तरदाते कहेते है MSEB की बिजली सोलार पॅनलके होते हुए इस्तेमाल की तो बील थोडा आएगा.

**सौर ऊर्जा के फायदे और नुकसान**

1) सौर ऊर्जा के फायदे बहुत है
2) विदेश तेल और जीवाश्म इंधन इस पर अब निर्भर न रहकर सौरशक्ती पर अवलंबन बढ गया .
3) एक बार सौर पॅनल बिठा दिया तो तीस वर्ष तक चलता है
4) पारंपरिक विद्‌युत धारा से अधिक सुरक्षित है

**सौर ऊर्जा के नुकसान :--**

1) रात मे अगर सौर ऊर्जा नही रहेती इसलिये एक बडे बॅटरी बँक की जरुरत होती है
2) बादल वाले दिनो मे उतनी ऊर्जा नही पैदा होती.

**निष्कर्ष :--**

सौर ऊर्जा मानव को मिली हुई एक अजीम तोफा है इसे संभालने की जरूरत है. मानव को किसी भी चीज की फिकर नही वह बिनधास्त जीता है लेकिन प्रकृती को ही मानव की बहोत फिक्र है.

**संदर्भसूची**

1) Webliography-- www.solar energy.com
2) क्रॉनिकल --- सौर ऊर्जा का अध्ययन
3) Survey in Ambajogai for Solar engery

# राजनीतिक प्रतिनिधियों का प्रतिनिधित्व

**डॉ. रामसिया चर्मकार**

सहायक प्राध्यापक-राजनीति विज्ञान, रबीन्द्रनाथ टैगोर विश्वविद्यालय, रायसेन

**प्रस्तावना**

भारतीय राजनीति में सरकारों द्वारा जो कर्ज लिया जाता है वह क्षेत्र व नागरिकों के विकास को सामने रख कर लिया जाता है। यह सैद्धांतिक रुप है, जबकि व्यवहारिकता इसके परे दिखती है। जिनके नाम से कर्ज लिया जाता है उसका विकास भी उस रुप में नही दिखता जिस रुप में कर्ज लिया जाता है। बल्कि वे व्यक्ति या संस्थाए अधिक सशक्त, प्रभावशाली व विकसित हो जाती है जो उनके विकास के लिए कार्य करती हैं। प्रदेश में पेंशनर्स को 59 महीने का 4700 करोड़ रुपये से अधिक एरियर नही दिया गया। 54 प्रतिशत वेतनभोगी सामाजिक सुरक्षा लाभ से वंचित, महिला कामगार ज्यादा प्रभावित हैं। देश में 87 प्रतिशत लोगों के पास जीवन बीमा का अभाव तो 73 प्रतिशत के पास पर्याप्त स्वास्थ्य बीमा कवरेज ही नही है। प्रदेश के नागरिकों कि अनुवृत्ति को न के बराबर साथ ही कर्मचारियों व अधिकारियों को ओपीएस की जगह एनपीएस में लाने के साथ ही स्पष्ट कर दिया। प्रतिनिधि नौकरशाही को अपना आर्थिक प्रतिद्वंदि के रुप में देखने चलते वह नौकरशाहों को आर्थिक रुप से कमजोर कर रहा है। प्रदेश को 3.85 लाख करोड़ रूपये कर्ज के साथ ही हर नागरिक पर 47 हजार रूपये का कर्ज है। 9 सालों में केन्द्र सरकार ने 205 लाख करोड़ का कर्ज लिया, हर नागरिक 1.40 लाख रुपये से अधिक का कर्जदार है। सरकारें कर के अतिरिक्त स्वयं के आय पर निर्भर बने।

**मुख्य शब्द -** ओपीएस, एनपीएस, कर्ज, प्रतिनिधि, कर्मचारी, कर्जदार, नागरिक।

**उद्देश्य –**

1. विकास के कर्ज से कौन सशक्त व प्रभावशाली हो रहा है।
2. ओपीएस और एनपीएस के बीच अंतर को समझना।
3. प्रतिनिधियों व नौकरशाहों के मध्य आर्थिक प्रतिद्वंदिता को समझना।
4. प्रतिनिधियों व नागरिकों की आर्थिक स्थिति।

**शोध प्रविधि-** शोध पत्र " राजनीतिक प्रतिनिधियों का प्रतिनिधित्व " एक तरह से द्वितीयक सामग्री संकलन पर आधारित है। जिसमें विश्लेषणात्मक तथ्यों के आधार पर शोध पत्र को लिखा गया है। इन्हीं तथ्यों से शोध पद्धति के अध्ययन का आधार तय किया गया है। शोध पत्र का निर्माण कर शोध प्रविधि के माध्यम से विभिन्न समाचार पत्रों का अध्ययन, इसके साथ इन्टरनेट में उपलब्ध तथ्यों के आधार पर शोध पत्र तैयार किया गया है। इस माध्यम से शोध पत्र पूर्ण करने में सहायता प्राप्त हुई है जो आगामी पाठकों और शोधार्थीयों के लिए उपयोगी सिद्ध हो सकती है।

**विवरण एवं विश्लेषण-**

किसी भी क्षेत्र को संचालित या शासन करने के लिए वित्त महत्वपूर्ण भूमिका निभाता है। विधानसभा चुनाव के पूर्व तक मध्य प्रदेश में 3.85 लाख करोड़ रूपये का कर्ज है। इस लिहाज से प्रदेश के हर नागरिक पर 47 हजार रूपये का कर्ज है। मौजूदा बजट के मुताबिक सरकार की आमदनी 2.25 लाख करोड़ है और खर्च इससे 54 हजार करोड़ अधिक है। अब नई सरकार चलाने के लिए वर्तमान बजट से अधिक राशि की आवश्यकता होगी। आगामी 3 माह में सरकार 25000 करोड़ का कर्ज लेने वाली है। कर्ज लेने के विषय में नरेन्द्र मोदी ने लोकसभा में बोला था कि कर्ज लो और घी पीओ। परिणाम स्वरुप 9 सालों में 205 लाख करोड़ का कर्ज लिया, हर नागरिक 1.40 लाख रुपये से अधिक का कर्जदार है। जनता ने तो कर्ज नही लिया, तो वो कैसे घी पी सकती है ?

मध्य प्रदेश 2023-24 का बजट 3.14 लाख करोड़ रूपये का है। इसका करीब 25.2 प्रतिशत हिस्सा वेतन, भत्ते और ब्याज की अदायगी में ही चला जाता है। अकेले वेतन भत्ते को देखें तो वित्तीय वर्ष खत्म होने तक 56314 हजार करोड़

रूपये से अधिक इस पर खर्च होंगे। पेंशन पर बजट का 18.64 प्रतिशत होता है। पेंशन पर बजट का 18636 करोड़ रूपये और ब्याज पर (22850 करोड़) 7.56 प्रतिशत ब्याज भुगतान पर 13.73 प्रतिशत खर्च होगा। प्रदेश सरकार ने 2010 में केन्द्र सरकार से 10 हजार करोड़ व 2022 में 15 हजार करोड़ रूपये का कर्ज लिया। सरकार ने दावा किया था कि कर्ज का इस्तेमाल इंफ्रास्ट्रक्चर विकसित करने में किया जाएगा। इस वर्ष सरकार ने 17 बार बाजार से कर्ज उठा चुकी है। चालू वित्तीय वर्ष 2023-24 में 8 बार कर्ज लिया जा चुका है। कर्ज लेने पर सरकार द्वारा तर्क दिया जाता है कि कर्ज लेना कोई गलत नही है, विकास कार्य होगे तो कर्ज लिया जाएगा। यदि कर्ज लेकर ही सरकार चलानी है और नागरिकों को यू ही कर्जदार बनाना है तो सरकार का स्वयं का कार्य क्या है? उसके अपने कौन-कौन से रोगजार है? सरकार को चाहिए कि वे स्वयं के रोजगार का निर्माण कर विकास कार्यों को और तेज गति से करने के साथ ही नागरिकों को कर्ज मुक्त करें।

**सरकार ने सबसे ज्यादा कर्ज बाजार से उठाया-**

| कर्ज | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|
| बाजार से | 45573 करोड़ रूपये | 28432 करोड़ रूपये |
| नाबार्ड से | 2385 करोड़ रूपये | 3300 करोड़ रूपये |
| रा. सह. वि. नि. | 9.77 करोड़ रूपये | 40 करोड़ रूपये |
| रिजर्व बैंक | - | 2.00 करोड़ रूपये |
| अल्प बचत निधि से | 6273 करोड़ रूपये | 7500 करोड़ रूपये |
| केन्द्र से उधार | 10929 करोड़ रूपये | 15636 करोड़ रूपये |
| योग | 65170 करोड़ रूपये | 54910 करोड़ रूपये |

**हर साल 20 हजार करोड़ से अधिक ब्याज का भुगतान –**

1. 10 फरवरी 2023 तक सरकार बाजार से 19 हजार करोड़ रूपये का कर्ज ले चुकी थी। इस लिहाज से 31 मार्च 2023 तक राज्य का कुल कर्ज 3 लाख 31,651 करोड़ रूपये हो गया।
2. 2016-17 में जीएसडीपी का 5.03 प्रतिशत कर्ज था, 2021-22 में 3.38 प्रतिशत रह गया।
3. प्रदेश में 2016-17 में प्रदेश के आधारभूत ढांचे, सड़के, बांध और सिचाई क्षमता विकसित करने में 32,463 करोड़ व 2021-22 में 44,463 करोड़ रूपये खर्च किए।
4. वित्तीय वर्ष 2020-21 में जनवरी 2021 तक कुल 24 हजार करोड़ बाजार से कर्ज लिय गया।
5. साल 2020-21 में मध्य प्रदेश पर 2.95 लाख करोड़ रूपये कर्ज का अनुमान रहा जिस पर कर्ज का मूलधन 14,828 करोड़ रूपये और ब्याज के 20040 करोड़ रूपये अनुमान है।
6. 2022-23 तक लिए गए कर्ज पर मूलधन की 24,114 करोड़ रूपये और ब्याज के 22163 करोड़ रूपये भुगतान का अनुमान है।

**23 सालों में प्रति व्यक्ति कर्ज 47000 बढ़ गया**

1. वित्तीय वर्ष 31 मार्च 2023 को 3.31 लाख करोड़ का कर्ज था, जो 2023-24 के अंत तक 3.85 लाख करोड़ रूपये हो गया।
2. 2001-02 में प्रदेश पर 23 हजार करोड़ को कुल कर्ज था। जनसंख्या के हिसाब से प्रतिव्यक्ति बमुश्किल 3,500 हजार रूपये का कर्ज था।
3. 23 सालों में मध्य प्रदेश के हर व्यक्ति पर 47 हजार रूपये का कर्जदार हो गया है। प्रदेश के अधिकतम नागरिकों को इस बात की भी जानकारी नही होगी कि वह इतने हजार के कर्जदार है। यह कर्ज बरकरार रहने के साथ ही नागरिक और अधिक कर्जदार होगे।

**3 साल में प्रति व्यक्ति कर्ज 10 हजार बढ़ा**

| वर्ष | कुल खर्च | प्रति व्यक्ति खर्च |
|---|---|---|
| 2001-02 | 23883 करोड़ रूपये | 3200 रूपये |
| 2005-06 | 45199.99 करोड़ रूपये | 5900 रूपये |
| 2010-11 | 67197.84 करोड़ रूपये | 9256 रूपये |
| 2015-16 | 111101 करोड़ रूपये | 13840 रूपये |
| 2020-21 | 253335.60 करोड़ रूपये | 32000 रूपये |
| 2021-22 | 295532.91 करोड़ रूपये | 37441 रूपये |
| 2022-23 | 331651.07 करोड़ रूपये | 41000 रूपये |
| 2023-24 | 385000 करोड़ रूपये | 47000 रूपये |

जनता द्वारा चुनी हुई सरकारें क्या वाकेय जनता की जरुरतों के अनुसार ही व्यवहार करते है? चुने हुए प्रतिनिधि जनता, कर्मचारियों व पेंशनरों का कितना ध्यान रख रहे उक्त कर्ज से समझा जा सकता है। प्रदेश मंे कोविड के बाद से रेलवे ने 60 साल से अधिक उम्र के लोगों के साथ स्टूडेंट रियायत व खिलाडियों को यात्रा के दौरान टिकट खरीदने पर मिलने वाली राहत बंद कर रखी है। लेकिन सरकार ने पूर्व विधायकों के लिए रेलवे सेवा पर खर्च बंद नही किया है। 5 साल में पूर्व विधायकों के रेलवे सफर पर मध्य प्रदेश सरकार द्वारा लगभग 5 करोड़ रूपये वा विधायकों के वेतन व भत्ते पर पांच साल पांच माह में 155 करोड़ खर्च कर चुकी है। कोविड के पहले यात्रा कराते समय रेलवे द्वारा 60 साल से अधिक उम्र वाले पुरूष को 40 एवं 60 साल से अधिक उम्र की महिला को टिकट में 50 फिसदी की राहत दी जाती थी। इसी तरह स्टूडेन्ट को 25 से 50 एवं खिलाडियों को उनके प्रमाण पत्र व उपलब्धियों के आधार पर 20 से 50 फीसदी तक रेलवे टिकट में रियायत दी जाती थी। कोविड के बाद से सरकार व रेलवे ने सभी तरह की राहत बंद कर दी। प्रदेश सरकार ने पूर्व विधायकों की रेलवे यात्रा पर 5 साल में प्रतिवर्ष औसत 1 करोड़ खर्च किया। 5 साल रहे विधायकों पर वेतन से अधिक एलाउंस पर खर्च किया गया। मध्य प्रदेश सरकार 5 साल 5 माह में विधायकों को कुल 39 करोड़ का वेतन, 102 करोड़ का अलाउंस, 10 करोड से अधिक यात्रा भत्ते व 3 करोड़ से अधिक मेडिकल पर खर्च किया गया। इसी तरह विधायाकों के अलाउंस पर 5 साल में 1 अरब 55 करोड़ रूपये खर्च किये गये।

| वर्ष | खर्च |
|---|---|
| 2018-19 | 1.92 करोड़ |
| 2019-20 | 1.65 करोड़ |
| 2020-21 | 37 लाख |
| 2021-22 | 67 लाख |
| 2022-23 अगस्ट तक | 70 लाख |
| **कुल** | **5.31 करोड़** |

**पांच साल में विधायकों पर किया गया खर्च**

| साल | वेतन | अलाउंस | यात्रा भत्ता | मेडिकल भत्ता |
|---|---|---|---|---|
| 2018-19 | 73961293 | 174278107 | 17944999 | 3646995 |
| 2019-20 | 71200742 | 189967645 | 23837953 | 1402005 |
| 2020-21 | 70390652 | 183744247 | 8390775 | 6571904 |
| 2021-22 | 72021919 | 188118449 | 31662520 | 6766709 |
| 2022-23 | 71100000 | 189660000 | 17236091 | 6457218 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अप्रैल 2023 से अब तक | 35532582 | 94783548 | 15610889 | 6366746 |

ओल्ड पेंशन स्कीम को लेकर मध्य प्रदेश में यह मामला तेज होता जा रहा है। वही दूसरी तरफ जिन माननीयों को इस पर निर्णय लेना है, वे खुद अपनी पुरानी पेंशन प्रणाली यानी ओल्ड पेंशन स्कीम ओपीएस का फायदा ले रहे हैं। पूर्व सांसदों और विधायकों को इस समय 20 हजार से लेकर 50 हजार रूपये तक औसतन पेंशन मिल रही है। जबकि 2004-5 के बाद भर्ती हुए कर्मचारियों व अधिकारियों को नवीन पेंशन योजना में जाना पड़ रहा है। पुरानी पेंशन योजना के प्रावधान के अनुसार सेवानेवृत्त के समय कर्मचारी को 50 हजार रुपये वेतन मिलता है तो उसे पेंशन के तौर पर प्रत्येक माह 25000 रुपये मिलते थे। जबकि एनपीएस के प्रावधान के अनुसार 50 हजार वेतन में सेवानिवृत्त होने वाले कर्मचारी को करीब 2700 रुपये मासिक पेंशन मिलेगा। ओपीएस में प्रत्येक वर्ष 2 बार महंगाई राहत भी जुड़ती है। कर्मचारी की मौत होने पर पत्नी या पति को भी पेंशन मिलना जारी रहता है, लेकिन नवीन पेंशन योजना (ओपीएस) में ऐसा कोई प्रावधान भी नही किया गया है। इसके अतिरिक्त एनपीएस में नवीन गड़बड़िया मिल रही है। एनपीएस के दायरे में आने वाले प्रदेश के 4 लाख 44 हजार 142 कर्मचारियों के पंेशन से हर महीने 10 प्रतिशत राशि काटी जा रही है। दस साल से काटी जा रही राशि एक निजी कंपनी के खाते में जाती है, लेकिन सैकड़ों कर्मचारियों के पेंशन खाते में यह राशि जमा नही हुई। सरकार भी इसमें 14 प्रतिशत राशि मिलाती है। एनपीएस में जमा राशि शेयर बाजार में लगा दी जाती है और बाजार में नुकसान होता है तो कर्मचारी के जमा राशि में से कटौती कर लेती है। यह जानकारी कर्मचारी तक नही पहुच पाती। प्रदेश में पेंशनर्स को 59 महीने का 4700 करोड़ रुपये से अधिक एरियर नही दिया गया। 54 प्रतिशत वेतनभोगी सामाजिक सुरक्षा लाभ से वंचित हैं। वही महिला कामगार ज्यादा प्रभावित हैं। देश में 87 प्रतिशत लोगों के पास जीवन बीमा का अभाव है तो वही 73 प्रतिशत लोगों के पास पर्याप्त स्वास्थ्य बीमा कवरेज ही नही है। प्रदेश के नागरिकों कि अनुवृत्ति को न के बराबर साथ ही कर्मचारियों व अधिकारियों को ओपीएस की जगह एनपीएस में लाने के साथ ही स्पष्ट कर दिया।

ओपीएस और एनपीएस को लेकर रिजर्ब बैंक ऑफ इंडिया ने अपनी एक अध्ययन रिपोर्ट में बताया है कि अगर ओपीएस को राज्य सरकारे लागू करती हैं तो न केवल आर्थिक दबाव बढ़ेगा, बल्कि प्रदेश के विकास पर भी बुरा असर पडने के साथ ही ये एक बड़ा झटका होगा। आरबीआई ने अपने रिपोर्ट में आगे बताया है कि ओपीएस को बंद करने से जो फायदें मिले हैं वो सब खत्म हो जाएगा। ओपीएस की वजह से आने वाली पीढ़ियों के हितों को भी भारी नुकसान पहुचने के साथ ही विकास कार्यों के लिए जारी होने वाले फंड में भी कमी आएगी। आरबीआई ने जो अपनी रिपोर्ट जारी की है वह एक तरफा रिपोर्ट जारी कि है वो भी कर्मचारियों को लेकर ओपीएस और एनपीएस के मध्य। आइबीआई जो चाहिये था कि वह सरकारी कर्मचारियों और प्रतिनिधियों के बीच ओपीएस को लेकर बढ़ते आर्थिक दबाव का अध्यय करना चाहिए था। जिससे यह स्पष्ट हो पाता कि ओपीएस से सरकारी कर्मचारियों और प्रतिनिधियों में से किसकों अधिक फायदा होता है या आने वाले समय में किसको सर्वाधिक फायदा होगा। चुनाव परिणाम आने के बाद आरबीआई ने अपनी रिपोर्ट प्रकाशित की। इसके बाद केन्द्र सरकार ने स्पष्ट कर दिया कि वह ओपीएस लागू नही करेगी।

**हर बार विधायक-सांसद बनने पर बढ़ती है पेंशन-एक साथ तीन पेंशन भी...**

विधानसभा में यह भी नियम बना दिया गया है कि कोई नेता जो कभी विधायक रहा, सांसद रहा या राजनीति में आने से पहले सरकारी नौकरी वाला रहा है, वह तीनों की पेंशन एक साथ लेने का अधिकार है।

- यदि कोई एक बार सांसद बन गया तो वह 25 हजार और विधायक बन गया तो 20 हजार रुपये पेंशन का हकदार हो जाता है।
- राज्यसभा सदस्य बन गया है तो 6 साल का कार्यकाल पूरा होने के बाद 27 हजार रुपये से उसकी पेंशन की शुरुआत होती है। उसके बाद हर साल इसमें कम से कम 500 रुपये का इजाफा होता है।

- मध्य प्रदेश में लगभग 400 पूर्व विधायक हैं, इनमें कुछ ऐसे भी हैं, जिनकी पेंशन 50 हजार रुपये से अधिक है।
- देश में करीब 4,700 पूर्व सांसद और 300 कुटुंब पेंशन धारक हैं। जिन पूर्व सांसदों का निधन हो जाता है, उनके परिवार को पेंशन मिलती है।

हाल ही में कुटुंब पेंशन भी बढ़ाई गई। प्रदेश में कुटंुब पेंशन 18 हजार दी जाती थी जिसे हाल ही पूर्व विधायकों ने अपनी सुविधाएं भी बढ़वा ली हैं। जैसे कि विधानसभा विश्राम ग्रह के साथ दिल्ली में मध्य प्रदेश भवन में रूकने की सुविधा ज्यादा कर दी गई है।

मध्य प्रदेश के पूर्व सचिव का कहना है कि ओपीएस की तुलना में एनपीएस में बहुत छोटी राशि पेंशन के रूप में मिलती है। जो कर्मचारी 35 से 40 वर्षों तक सेवा देगा, उसे एनपीएस में और जो सिर्फ एक दिन या 5 साल विधायक या सांसद रहते हैं तो उन्हें पुरानी पेंशन व्यवस्था से पैसा मिले, यह तो दोहरापन है। इसे अनुचित ही कहा जाएगा। राज्य या देश के प्रतिनिधि पेंशन के मामले में इतनी भिन्नता का समर्थन क्यो कर रहें हैं? नौकरशाहों का सवाल भी अपने आप में गलत नही है। 2014 के लोकसभा चुनाव के समय भाजपा ने लोकसभा और विधानसभा चुनाव एक साथ कराने के मुद्दे को अपने चुनावी घोषणा पत्र में शामिल किया था। देश के प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी भी एक राष्ट्र एक चुनाव, व सिविल कोड के समर्थन में हैं, तो फिर देश में समान पेंशन का भी प्रधानमंत्री के द्वारा समर्थन किया जाना चाहिए। क्योंकि ये भी तो हैं देश के ही नागरिक, ये भी अपने मत का उपयोग सरकार बनाने के लिए करते हैं। तो ऐसा क्यों कि देश का एक नागरिक एक साथ एक से अधिक पेंशन पाने का अधिकार रखता है और दूसरा नही? एक को पुरानी पेंशन के अंतर्गत रखा जाता है तो दूसरे को नवीन पेंशन में। एक को बिना संघर्ष के पुरानी पेंशर दी जारी है तो दूसरे को संघर्ष करना पड़ रहा है कि उसे भी पुरानी पेंशन दी जाए। जिन माननीयों को इस विषय पर निर्णय लेना है, वे खुद पुरानी पेंशन योजना का फायदा ले रहें हैं। पूर्व सांसदों और विधायकों को इस समय 20 हजार से लेकर 50 हजार रुपये तक औसतन पेंशन मिल रही है। वर्तमान में विधायकों का मासिक वेतन भत्तों के साथ 1.10 लाख रुपये है। मंत्रियों का वेतन 2 लाख रुपये तक जाता है। मध्य प्रदेश विधानसभा द्वारा यह नियम बना गया है कि कोई नेता जो कभी विधायक रहा, सांसद रहा या राजनीति में आने से पहले सरकारी मुलाजिम था, वह तीनों तरह की पेंशन एक पाने का हकदार है। इतना ही नही इस तहर की व्यवस्था बना दी गई है कि हर बार विधायक-सांसद बनने पर पेंशन बढ़ती है।

**निष्कर्ष**

जिन संवैधानिक संस्थानों का निर्माण राष्ट्र व नागरिकों के विकास हेतु किया गया था उन्हीं के माध्यम से शनैः शनैः ऐसे नियमों का निर्माण कर स्वयं को राजनीतिक रुप से शक्तिशाली व भौतिक सुविधाओं से सुसज्जित किया जा रहा है और नागरिकों की भौतिक जरुरते, मुख्य आर्थिक रुप से राजनीति सत्ता से जनता को किस कदर दूर कर दिया गया है इस बात से जनता अभी भी अनभिग्न है। इनके विकास के लिए कर्ज लिया जाता है और उन्हीं का विकास कहां विकसित हो रहा है इसकी जानकारी कहा से होगी। जनता कर्ज नही लेती, किन्तु उसे कर्ज रुपी घी पीना पड़ता है। नवीन राजनीति यह कह रही है कि जो व्यक्ति सत्ता (प्रतिनिधि) से संबंधित रहेगा केवल उसे ही सुविधाओं को पाने का अधिकार रहेगा। क्योकि वह शासक वर्ग में रहा है, न कि नौकरशाही में। संविधान में नौकरशाहों के लिए पेंशन व्यवस्था किया गया है जबकि प्रतिनिधियों के लिए ऐसी कोई व्यवस्था नही रही। नवीन राजनीतिक नेत्त्व ने संवैधानिक व्यवस्था को उलट दिया है। जिन कर्मचारियों, अधिकारियों से अपनी योजनाओं का क्रियांवयन का दायित्व देते हैं उन्हीं को नवीन पेंशन योजना में नवीन परेशानियां सौगात स्वरुप दी गई है। 2004 से सरकारी क्षेत्र की नौकरियों को सीमित करने के साथ ही न के बराबर भर्तियां की जा रही है, और नीजिकरण का दायरा बड़ा दिया गया है, जिसमें पेंशन नामक बीमारी नही होती है। सरकारी क्षेत्रों में ठेकेदारी प्रथा और डेली वेज के रुप में काम कराया जा रहा है जिन्हंे कुछ नही मिलना है। इसके विपरीत एक दिन का भी प्रतिनिधि होने पर जीवन भर व एक से अधिक पेंशन पाने का हकदार है। एक मुख्यमंत्री व एक से अधिक

उपमुख्यमंत्री का होना आर्थिक भार के रुप में नही गिना जाएगा। जबकि प्रतिनिधियों की संख्या कुछ महिनों में बढ़ती रहेगी। प्रतिनिधि ओपीएस को अपने लिए लागू रखेगें। प्रतिनिधि नौकरशाही को अपना आर्थिक प्रतिद्वंदि के रुप में देखता है। इसलिए वह नौकरशाहों को पद व आर्थिक रुप से कमजोर कर उसे संविदा व निजीकरण के रुप में किया जा रहा है।

**संदर्भ**


1. दैनिक भास्कर 21/11/2023 पृ. सं. 03, 09
2. दैनिक भास्कर 23/11/2023 पृ. सं. 03
3. दैनिक भास्कर 30/11/2023 पृ. सं. 06
4. पत्रिका 10/12/2023 पृ. सं. 06
5. पीपुल्स समाचार 13/12/2023 पृ. सं. 12
6. पत्रिका 16/12/2023 पृ. सं. 13
7. दैनिक भास्कर 15, 17/12/2023 पृ. सं. 01, 04
8. https://www.bbc.com/hindi/articles/cw4x5l4new4o
9. https://navbharattimes.indiatimes.com/state/madhya-pradesh/bhopal/mp-news-ops-vs-nps-mla-and-minister-getting-old-pension-and-govt-employees-push-to-accept-new-pension-scheme-el23/articleshow/105511158.cms
10. https://hindi.news18.com/news/business/govt-total-liabilities-rose-by-128-point-41-lakh-crore-in-december-due-to-pandemic-prdm-4160450.html
11. https://www.bhaskar.com/business/news/india-clarifies-on-imf-debt-report-misconceptions-132330393.html

# मोदीकालीन परराष्ट्रीय धोरणाची गतिमानता : एक चिकित्सक अध्ययन

**डॉ. सुभाष दौलतराव उपाते**
सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख, आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली – ४४१२०७

**सारांश :**

युक्रेनवरील रशियन आक्रमणावर टीका करण्यास नरेंद्र मोदी सरकारचा नकार आणि मास्कोमधील पाश्चात्य निर्बंधनात पाठिंबा देण्याच्या अनिच्छेने भारताचे रशियन कनेक्शन अधोरखीत केले आहे. रशियाबद्दलच्या जुन्या विचारसरणीला बळकटी देणे म्हणजे 'ग्लोबल साऊथ' चा दिल्लीचा पुनशौध आणि विकसनशील जगाच्या कारणासाठी भारताचा नुतनीकरणावर भर. तथापी जवाहरलाल नेहरू काळापासून भारताच्या परराष्ट्र धोरणातील स्पष्ट सातत्य मोदींच्या नेतृत्वाखाली भारताच्या आंतरराष्ट्रीय संबंधामधील महत्वपूर्ण निर्गमनांवर मुखवटा घालते. सद्यास्थितीत २०२२ मध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनुसार भारत युनायटेड किंगडमला मागे टाकून जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला. रशिया दृयुक्रेन युध्दा दरम्यान भारतासाठी भू–राजकीय आणि कुटनितीक स्तरावर हा एक कठीण काळ होता. कारण अमेरिका आणि युरोपसोबतचे धोरणत्मक संबंध आणि रशियाशी असलेले पारंपारिक संबंध यामुळे निवडी अधिक कठीण होत होत्या. या संदर्भाने भारताच्या परराष्ट्रीय धोरणातील सातत्य आणि बदल याचा चिकित्सक अभ्यास होणे गरजेचे आहे.

**मूळ शब्द :–** परराष्ट्रीय धोरण, सातत्यता, बदल, कुटनिती.

**प्रस्तावना :–**

भारताचे परराष्ट्रीय धोरण नेहरू युगापासून आदर्शवादाची कास धरून सार्वभौमत्वाला अबाधित ठेवत जागतिक समुदायामध्ये प्रभाव प्रस्थापित करून संतुलन राखण्यास प्रतिबद्ध आहे. प्रसिद्ध राजकीय शास्त्रज्ञ जोसेफ नाय यांचे "सॉफ्ट पॉवर द मिन्स टू सक्सेस इन वर्ल्ड पॉलिटिक्स" या विषयावरील काम ही संकल्पना प्रभावीपणे साकारते व सूचित करते की, एखाद्या राष्ट्राचा प्रभाव केवळ त्याच्या लष्करी किंवा आर्थिक सामर्थ्यावर अवलंबून नाही तर त्याची संस्कृती, राजकीय मूल्ये आणि परदेश यावरही अवलंबून असतो. धोरणे, परराष्ट्र धोरणातील निश्चितता हे आक्रमक नसून ते 'स्मार्ट पॉवर' व्यावहारिक पातळीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने ही ठाम भूमिका दाखवून दिली आहे. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वातील परराष्ट्रीय धोरण हे जागतिक राजकारणात निर्णायक खेळाडू म्हणून राष्ट्र स्थापन करण्याच्या दिशेने वाटचाल करणारे आहे. इंडो–पॅसिफिकमध्ये भारताची ठाम भूमिका, बहुपक्षीय संस्थांमध्ये त्याची अधिक सक्रिय भूमिका आणि हवामान बदल, दहशतवाद यासारख्या मुद्यांवर आंतरराष्ट्रीय कायद्यांवर प्रभाव पाडण्यास त्यांच्या राजनयिक प्रयत्नांमधून स्पष्ट होते.

**उद्देश :–**

१.मोदीकालीन धोरण निर्णयात्मक व गतिमान आहे.
२.मोदीकालीन धोरण व्यावहारिकतेवर भर देणार आहे.
३.मोदीकालीन परराष्ट्रीय धोरण खिलाडू स्वरूपाचे आहे.

**गृहितकृत्ये :–**

१.नेहरूंच्या आदर्शवादाचा आधार घेऊन असंलग्नतेला बगल दिली.
२.मोदीकालीन भारताचे परराष्ट्र धोरण खिलाडू वृत्तीचे बनले आहे.
३.मोदीकालीन परराष्ट्रीय धोरणात गतीमानता आलेली आहे

**शीतयुद्ध समाप्तीनंतर परराष्ट्र धोरण :–**

शीतयुध्दाच्या समाप्तीमुळे नक्कीच नव्या परराष्ट्र धोरणाची शक्यता खुली होईल असे दिसते. ज्यात पाश्चिमात्य विरोधकांना ओहोटी लागण्यास प्रारंभ होईल. तथापि, ''दिल्ली आणि इस्लामाबादमधील काश्मीर वाद सोडवण्याच्या अमेरिकेच्या सक्रियतेने आणि भारताने आपला अण्वस्त्र कार्यक्रम मागे घेण्याची मागणी यामुळे १९९० च्या दशकात वॉशिंग्टन सोबत दिल्लीचे मतभेद झाले. अमेरिकेच्या एकधृवीय स्थितीमूळे भारताच्या महत्वाच्या राष्ट्रीय सुरक्षेचे हित धोक्यात येऊ शकते. या भितीने दिल्लीने मॉस्को आणि बिजिंगमध्ये सामील होऊन युती रशिया–भारत–चीन फोरम एकधृविय स्थितीचे धोके मर्यादित केले.''[१] तथापि, दोन दशकात अमेरिकेकडून संभाव्य काश्मीरमध्ये न डगमगण्याच्या अमेरिकेच्या निर्णयामूळे आणि आंतरराष्ट्रीय आण्विक व्यवस्थेशी भारताच्या संघर्षाचे निराकरण करण्यात वॉशिंग्टनच्या मदतीमूळे कमी झाले. पण २१ व्या शतकाच्या

दुसऱ्या दशकात चीनकडून आव्हान वाढले म्हणून २०१३,२०१४, २०१७ आणि २०२० भारत संतुलन राखण्यासाठी अमेरिकेशी सुरक्षा संबंधाना चालना देण्यासाठी, गैर पाश्चिमात्य ऐक्य वाढविण्यासाठी चीन सोबत भागीदारी करण्याच्या ध्यासातून निर्णायकपणे पुढे आला. चीन आणि तद्वतच जसजसे चीनकडून आव्हान वाढत गेले तसतसे भारताने आशियातील सत्ता संतुलनाचा पाठपुरावा औपचारिकपणे व्यक्त करण्यास सुरुवात केली.

**एशिया सोसायटी पॉलिसी इन्स्टिट्युट इंडिया सेंटर :–**

२०२२ च्या मध्यात एशिया सोसायटी पॉलिसी इन्स्टिट्युट चे इंडिया सेंटर सुरू करतांना भारताचे परराष्ट्र मंत्री सुब्रम्हण्यम जयशंकर यांनी ''उगवत्या पण विभाजित आशिया" कडे लक्ष वेधले''[२] ''आशियासाठी आशियाई'' या संकल्पनेतील अडचणी अधोरेखित करताना आज अनेकदा चिनी लोकांकडून प्रचारा केला जातो. जयशंकर म्हणतात, "वास्तविकता दर्शविण्यापेक्षा आशिया खंडातील मजबूत अभिसरण गृहित धरल्या जाते'' ते पुढे म्हणाले की, ''आशियासाठी आशिया ही देखील एक भावना आहे जी भूतकाळात अगदी आपल्या देशात राजकीय रोमॅंटिसिझमद्वारे प्रोत्साहित केल्या गेली होती. बाडुंग स्पिरीटने मात्र पहिल्या दशकातच त्याची वास्तविकता तापसली. खरच भूतकाळातील अनुभव पुष्टी करतो की वास्तविक राजकीय बाबतीत आशियाई लोक कोणाच्याही मागे नाहीत''[३] अमेरिकेला आशियापासून दूर ठेवणे हा नेहरूंचा विचार असेल, तर मोदी सरकारने प्रादेशिक समतोल घडविण्यात अमेरिकेचे महत्व ओळखले आहे. जयशंकर यांनी म्हटल्याप्रमाणे, ''संकुचित आशियाई चंगळवाद खरं तर आशिया खंडाच्या स्वतरूच्या हिताच्या विरूद्ध आहे. आशियामध्ये युनायटेड स्टेट्स किंवा ऑस्ट्रेलियासारख्या जवळच्या लोकांमध्ये कायदेशीर हितसंबंध आहेत.''[४] दूरची सत्ता अमेरिका, यापुढे भारतासाठी धोका म्हणून पाहिले जात नाही, पण तो शेजारी चीन भारताच्या मुख्य राष्ट्रीय सुरक्षेच्या हितसंबंधांना कमी लेखत आहे.

**मैत्रीपूर्ण व्यवहाराचा आशय :–**

रशिया केंद्रीत संरक्षण धोरणांमधून अमेरिका आणि त्याच्या मित्र राष्ट्रांसोबतच्या सुरक्षा संबंधाच्या वाढत्या वजनाकडे निर्णायक संक्रमण होते. युएस आणि सोव्हिएत युनियन या शीतयुध्दातील महासत्तांच्या लष्करी युती नाकारणे हे असंलग्नतेचे मुख्य तत्व होते. तथापि, सरावात भारताला ते तत्व वाकवावे लागले कारण त्याला भेडसावणाऱ्या सुरक्षा आव्हानांचा सामना करावा लागला. वर नमूद केल्याप्रमाणे, १९६२ मध्ये नेहरू लष्करी मदतीसाठी केनेडीकडे वळले. तेव्हा भारत युतीपासून दूर राहू शकतो या विचारावर तणाव आला. १९७१ मध्ये पूर्व पाकिस्तानातील संकटाला वेग आला आणि चीन–अमेरिकेतील संबंध उलगडू लागल्याने दिल्लीने १९७१ मध्ये सोव्हिएत युनियन सोबत सुरक्षा करारावर स्वाक्षरी केली. जरी ही सर्व व्यावहारिक हेतूंसाठी एक युती होती, तरीही भारतीय प्रवचनाने भारताच्या परराष्ट्र धोरणाची असंलग्नता धोरणाच्या संदर्भात परिभाषा करणे चालूच ठेवले.

१९७७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत इंदिरा गांधीचा पराभव करणाऱ्या सर्वव्यापी राजकीय युतीने पंतप्रधानावर सोव्हिएत युनियनच्या खूप जवळ जाऊन असंलग्नतेच्या मार्गापासून विचलित झाल्याचा आरोप केला होता. त्यांनी ''अस्सल अलाइनमेंट'' च्या धोरणाचे पालन करण्याचे आश्वासन दिले. तथापी एकदा ते सत्तेत आल्यानंतर, रशियाबरोबरच्या धोरणात्मक भागीदारीमूळे रशियाबरोबरच्या प्रतिबद्धतेत फारसा बदल झाला नाही''[५] रशियासोबतच्या घनिष्ठ संबंधावर द्विपक्षीय एकमत केवळ सोव्हिएत युनियनलाच मागे टाकले नाही तर १९९० च्या दशकातील काही अडथळ्यानंतरही ते महत्वपूर्ण राहिले.

**व्यवहारिकतेवर आधारित धोरण :–**

नरेंद्र मोदी सरकारने रशियन संबंधामध्ये गुंतवणूक करणे सुरूच ठेवले. परंतू २१ व्या शतकात मॉस्कोची मुक्तता हळूहळू कमी होऊ लागली आणि एकतर, १९९० च्या दशकापासूनच्या गतीमान आर्थिक वृध्दीमूळे भरत रशियापेक्षा मोठी अर्थव्यवस्था बनला. २०२२ मध्ये भारताचे US$३.५ ट्रिलियन S$२.३ ट्रिलियन) च्या जवळपास दुप्पट होते. मोठ्या प्रमाणावर पाश्चात्य निर्बंध लादल्यामूळे रशियन अर्थव्यवस्था संकुचित होत असताना दोन्ही बाजूंमधील आर्थिक दरी वाढतच जाईल. व्यापार आघाडीवर, रशिया सतत किरकोळा बनला आहे. १९९० च्या दशकात सोव्हिएत युनियन हा भारताचा सर्वोच्च व्यापार भागीदार होता. ज्यामध्ये सुमारे US$५.५ बिलियन (S$७.५बिलियन) द्विपक्षीय व्यापार होता. US&५.१बिलियन S$६.९ बिलियन सह अमेरिका मागे आहे.''[६] तीन दशकानंतर २०२०–२१ मध्ये भारताचा रशियाबरोबरचा व्यापार US$१० अब्ज (S$ १३.६ अब्ज) पेक्षा कमी होता.[७] २०२२ मध्ये द्विपक्षीय व्यापारात मोठी वाढ झाली कारण युक्रेन विरूद्ध रशियन आक्रमणानंतर आंतरराष्ट्रीय तेल बाजार घट्ट होत असतांना भारताने मोठ्या प्रमाणात सवलतीच्या रशियन तेलाची आयात करण्यास सुरूवात केली.[८] २०२१ मध्ये भारताचा युएस बरोबरचा व्यापार जवळपास $१६० अब्ज (S$२१७ बिलियन) होता. ज्यात वस्तू आणि सेवांचा समावेश होता.[९] तरीही कायम राहिलेली बाब म्हणजे रशियन शस्त्रांवर भारताचे अवलंबित्व कायम आहे.

**शस्त्रास्त्रे खरेदी व्यवहार :—**

भारताने २१ व्या शतकात अमेरिका, फ्रान्स आणि इस्त्रायल कडून अधिक शस्त्रे मिळवून शस्त्रास्त्रांच्या आयातीमध्ये विविधता आणली असली तरीही भारताच्या संपूर्ण यादीत रशियाचा वाटा ७० टक्क्याहून अधिक आहे. स्पेअर्स आणि इतर उपकरणांसाठी दिल्लीचे मॉस्कोवर अवलंबित्व कायम आहे आणि भारताच्या चीन बरोबरच्या दीर्घ आणि विवादित सीमेवर असलेल्या संघर्षाच्या दरम्यान दिल्लीने तीक्ष्ण धार प्राप्त केली आहे. याच अवलंबित्वाने इतर कारणांबरोबरच भारताला युरोपमधील रशियन आक्रमणाबाबत मौन बाळगण्यास भाग पाडले आहे. रशिया हा भारताचा महत्वपूर्ण संरक्षण भागीदार असतांना गेल्या २० वर्षाची बाब म्हणजे युरोप आणि आशियातील अमेरिका आणि त्याच्या मित्र राष्ट्रांसोबत वाढणारे सुरक्षा सहकार्य, यामध्ये लष्करी देवाणघेवाण, द्विपक्षीय आणि सुक्ष्म संयुक्त सराव प्रगत शस्त्रास्त्रांची खरेदी आणि चतुर्भुज सुरक्षा संवाद (ऑस्ट्रेलिया, भारत, जपान आणि अमेरिका) (द क्वाड) सारख्या धोरणात्मक युतीचा समावेश आहे. जरी भारत रशिया—भारत—चीन गट आणि BRICS (ब्राझील, रशिया,भारत, चीन आणि दक्षिण ऑफ्रिका) मध्ये बसत असला तरी, भारताच्या सुरक्षा धोरणातील नवीन नवकल्पना पाहणारा क्वाड आहे. मॉस्को आणि बीजींग यांच्यातील वाढत्या धोरणात्मक भागीदारीमध्ये चीनचा समतोल राखण्यासाठी भारताचा रशियावरचा भूतकाळातील अवलंबित्व कमी झाले आहे.[१०]

शीतयुद्धाच्या शिखरावर पोहोचलेल्या तिसऱ्या जगातील नेतृत्वाचा पाठपुरावा करून मोदी युगात समविचारी युती बनवण्याकडे भारताचे स्थलांतर. १९६२ नंतर आशियाई ऐक्य या कल्पनेने बळकटी घेतल्याने, १९६० च्या दशकात जागतिक असंलग्नता चळवळ उभारण्याच्या भारताच्या उत्साहाला खूप महत्व प्राप्त झाले आणि १९७० च्या दशकात भारतीय परराष्ट्र धोरणाने मूलगामी सूर प्राप्त केल्यामूळे त्याला लक्षणीय आकर्षण मिळाले. शीतयुध्दानंतर भारताचे लक्ष असंलग्न चळवळीपासून दूर गेले आणि तात्काळ आणि विस्तारित शेजारी क्षेत्रीय सहकार्यावर भर देण्यात आला. प्रमुख अर्थव्यवस्थांसोबत आर्थिक सहकार्य वाढले आणि त्यांच्या महासत्ता संबंधाची पुनर्रचना करण्यात आली. भारताचे लक्ष BRICS, QUAD आणि G-४ (ब्राझील, जर्मनी, भारत आणि जपान संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद सुधारणा शोध आहेत.) त्याचप्रमाणे प्रमुख सत्तांसह गटांकडे वळले आहे. भारताने G—२० आणि G—७ सारख्या बहुपक्षीय संस्था आणि दक्षिण पूर्व आशियाई राष्ट्रांच्या संघटना आणि गल्फ कोऑपरेशन कौन्सिल सारख्या प्रादेशिक संस्थांना गुंतवून ठेवण्यासाठी बरीच ऊर्जा खर्ची घातली.

पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली, भारतीयांनी असंलग्नता चळवळी संदर्भाने आणि विस्तृतपणे 'ग्लोबल साऊथ' मध्ये सहभागी होण्यात आपले स्वारस्य नूतनीकरण करताना पाहिले आहे. तथापि, ही प्रतिबद्धता दक्षिणेला पश्चिमेविरुद्ध एकत्रित करण्याच्या जुन्या साच्यात नाही. जयशंकर यांनी भारताची कल्पना "दक्षिण पश्चिम सत्ता" म्हणून मांडली आहे. जी पश्चिम आणि दक्षिण यांच्यातील पूल म्हणून काम करते. 'ग्लोबल साऊथ' वर जोर देण्याकडे प्रादेशिक आणि जागतिक प्रभावासाठी चीनशी भारताच्या स्पर्धेचा भाग म्हणूनही पाहिले जाऊ शकते. शीतयुद्ध काळात विकसनशील देशात लक्षणीय समभाग निर्माण केल्याने, दिल्ली त्यांना फक्त सोडू इच्छित नाही तर दिल्लीत असेही म्हटले जाते की, बीजींग आणि मॉस्कोला जगाच्या या महत्वाच्या भागावर वर्चस्व देण्यापेक्षा अमेरिका दक्षिणेतील भारतीय नेतृत्वाला प्राधान्य देत आहे. भारतीय परराष्ट्रीय धोरणातील हे घटक मोदी युगातील भारताच्या वाढत्या भौतिक सामर्थ्याशी जुळणाऱ्या अत्याधुनिक कुटनितीकडे निर्देश करतात. काही जुने कनेक्शन टिकून राहतात पण अगदी वेगळ्या संदर्भात. या अनुषंगाने लॉर्ड पामर्स्टनला विचारात घेता असे म्हणता येते, ''हमारे कोई शाश्वत मित्र नही है और नही हमारे कोई सदा बने रहने वाले शत्रु । केवल हमारे हित ही शाश्वत है और उनहितो का अनुसरण संवर्धन हमारा कर्तव्ये है'' — लॉर्ड पामर्स्टन

**संदर्भ :—**


1. फ्रँक औडोनेल आणि मायकेल पापा : ''भारताचे बहु—सरेखन व्यवस्थापन आणि रशिया—भारत— चीन त्रिकोण'' आंतरराष्ट्रीय घडामोडी, खंड, ९७, ३ मे २०१९
2. सुब्रमण्यम जयशंकर : ''आशिया सोसायटी पॉलिसी इन्स्टिट्यूटच्या शुभारंभा प्रसंगी टिप्पणी'' नवी दिल्ली, २९ ऑगस्ट २०२२
3. राव चंद्रशेखर : ''जनता सरकार आणि सोव्हिएत कनेक्शन'' वर्ल्ड टुडे, खंड ३४, क्रमांक २, फेब्रुवारी १९७८
4. संदर्भ : https://wits-worldbank-org/countryprofile/en/country/IND/year/1990/ summary text येथे उपलब्ध आहे
5. भारतीय दुतावास : ''भारत रशिया आर्थिक संबंधाचा संक्षिप्'' २०२१, https://www.indianembassy-moscow.gov.in/overview.php
6. टाइम्स ऑफ इंडिया : हा कल टिकतो का हे पाहणे बाकी आहे. ''रशिया भारताचा सातवा सर्वात मोठा व्यापारी भागीदार'' २६ ऑक्टोबर २०२२
7. https://www-trade-gov/knowledge&product/exportingindia&market-
8. सी राजा मोहन : ''ब्रिक्स आणि क्वाड दरम्यान रू भारताचा नवीन आंतरराष्ट्रीयवाद'' ISAS संक्षिप्त सिंगापूर इन्स्टिट्यूट ऑफ साउथ एशियन स्टडीज, सहा जुलै २०२२
9. शर्मा डॉ. मथुरालाल : प्रमुख देशो की विदेश नीतिया कॉलेज बुकडिपोए जयपूर प्र.आ.१९८८, पृ. क्र.३

# भारताची महासत्तेकडे वाटचाल :- संरक्षण क्षेत्रातील परिवर्तन

**प्रोफेसर डॉ. चंद्रकांत बन्सीधर भांगे**
सैनिक शास्त्र विभाग प्रमुख व संशोधक मर्गदर्शक, श्री. शिवाजी कॉलेज, परभणी (महाराष्ट्र)

आज 21 व्या शतकात विश्व एक ग्राम बनले आहे ते वेगाने झालेली विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांती, माहितीची देवान-घेवान असो अथवा इतर क्षेत्रातील विशेषत: 1989 ला भारताने स्विकारलेले जागतिकीकरण भारतीय अर्थव्यवस्थेसाठी क्रांतीकारक ठरले आहे. आज भारत आहे विविध क्षेत्रात प्रगती साधत आहे आणि पुढील काळात भारताने 2047 ला विकसित राष्ट्र होण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. या उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यासाठी भारताला संरक्षण खात्याकडे, क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्यासाठी आवश्यकता आहे. कारण 21 व्या शतकात प्रत्यक्षात युध्द करणे कठीण असल्याचे युक्रेन-रशिया युध्द असो अथवा इस्त्रायल पॅलेस्टाईन युध्द ऐवजी सॉफ्ट पावरचा अर्थात परराष्ट्र धोरण-कुटनीतीचा अवलंब हा महत्वूपर्ण आहे. ते भारताने वेळोवेही सिध्द केलेले आहे. तरी संरक्षण क्षेत्रात ही परिवर्तनशिल असणे ही काळाची गरज आहे.

**भारताचे संरक्षण धोरण :**

स्वतंत्रता प्राप्तीनंतर भारताचे पंतप्रधान नेहरू हे अलिप्तवादी, शांतता व सहजीवन विचारांचे असल्याने त्यांनी संरक्षण धोरणास विशेष प्राधान्य दिले नाही. परिणाम 1962 ला चीन ने भारतावर युध्द लादून भारताचा मानहानीकारक पराभव केला यानंतर भारताचे संरक्षण मंत्री म्हणून यशवंतराव चव्हानांची नियुक्ती झाली. यशवंतराव चव्हानांनी संरक्षण धोरणात बदल करीत लष्कर भरतीसोबतच लष्करी साधन सामुग्री परदेशाकडून प्राप्त करने, निर्माण करणे यास प्राधान्य दिले. अश्यातच 1965 ला पाकीस्तानने भारतातवर आक्रमण केले असता भारतीय सैन्यंने शौर्य गाजवित पाकीस्थानचा पराभव केला आणि भारताची प्रतिष्ठा वाढली. भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी असतांना पाकिस्तान च्या पूर्व आणि पश्चिम पाकीस्थान अंतर्गत वादातून भारतावर हल्ला चढविला.

या हल्ल्याचा भारताने प्रतिकार करीत पाकीस्थानी सैन्याचा पराभव करीत 95000 सैन्य युध्दबंदी केले. सिमला करारातून उभय पक्षातील संबंध सुरळीत बनले. परंतू पाकिस्तानने भारत विरोधी कार्यवाह्यात वाढ केली ती म्हणजेच दहशतवादाच्या माध्यमातून एवढेच नव्हे तर 1999 ला पाकिस्तानने कारगिलमध्ये घूसखोरी केली यातून कारगिल क्षेत्रात भारत-पाक युध्द होऊन पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय दबाव आणि भारतीय सैन्याच्या शौर्यापूढे माघार घेतली. परंतू दशहरतवादी कार्यवाह्या सुरूच ठेवल्या विशेषत: हा 2016 ला काश्मीर मध्ये उरी येथे भारतीय लष्करी छावणीवर हल्ला केला यात भारतीय 19 जवान शहीद झले. याची प्रतिक्रिया भारताने पाकव्याप्त काश्मीरमध्ये सर्जिकल स्ट्राईक करून पाकव्याप्त दहशतवादी छावण्यावर हल्ला चढविला. हा हल्ला भारताच्या मुत्सद्दी रणनीतीचा परिपाक होता. यानंतर भारताने 370 वे कलम काश्मीर हटवीले आणि दशहतवादाचा बंदोबस्त करण्यासाठी भारतीय लष्कराकडून कार्यवाह्या होत आहे. यावरून भारतासाठी संरक्षण क्षेत्र आज महत्वपूर्ण आहे. हे सिध्द होते. भारताने 2047 ला विकसित राष्ट्र होण्यासाठी संरक्षण धोरणात परिवर्तन घडवून आणले आहे. अर्थात स्वदेशी लष्करी उत्पादन वाढविण्यावर भर देण्यात आलेला आहे. संरक्षणक्षेत्रात भारताला दुसऱ्या राष्ट्रावरील अवलंबत्व कमी करावयाचे आहे. यातून मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत कार्यक्रम राबविला जात आहे. या अंतर्गत भारतातील कपंन्याकडून, उद्योगाकडून लष्कराशी संबंधीत उत्पादने निर्मिती वाढविण्यावर भर देण्यात आलेला आहे. शिवाय भारताची विदेशी लष्करी क्षेत्राशी संबंधीत खरेदी कमी करून भारतात स्वदेशी स्वावलंबन लष्करी उत्पादन निर्माण करून जगातील महत्वपूर्ण राष्ट्र भारत बनू पाहत आहे. सरंक्षण लष्करी क्षेत्रात भारताकडून टँक, चिलखती व वाहने, हेलिकॉप्टर, पानबुडी, क्षेपणास्त्र आणि विविध प्रकारच्या दारुगोळा बनवीला जात आहे. अर्थात 155 मिमी आर्स्टिलरी गन, धनुष, लाईट कॉम्बेट, एअर क्राप्ट तेजस, सरफेस टू

इयर क्षेपनास्त्र , सिस्टिम आकाश, मेन बॅटल अर्जून T-90 टॅंक , T-72 टॅंक, चीता हेलिकॉप्टर, एडवास लाईट हेलीकॉप्टर, डोर्नियर DO-228 एकअरक्राफ्ट , हाई मोनिलिटी ट्रक का उत्पादन भारतात होत आहे.

भारतीय नौदलासाठी आईएनएस वागीर, आईएनएस कलवरी, आईएनएस खंडेरी, आईएनए करंज, आईएनएस, वेला, आईएनएस, वागीशीर ची निर्मिती ही भारतात होत आहे. अर्थात ही स्थिती भारताला 2047 ला विकसित राष्ट्र होण्यासाठी मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत अश्या कार्यक्रमातून संरक्षण क्षेत्रात परिवत्रन आणून संरक्षण उत्पादने अधिकाधिक स्वदेशी बनवावी लागतील याशिवाय युध्द टळेल अशी कुटनीती अवलंबववी लागले.

भारतातील वाढता संरक्षण स्वदेशी विस्तार कार्य्रम यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिष्ठा तर वाढेलच परंतू भारतात रोजगारासाठी देखील ही व्यवस्था भविष्यात महत्वपूर्ण सिध्द होईल. भारतातील संरक्षण उत्पादने भारताची लष्करी क्षमता वाढत आहे. त्याचप्रमाणे भारतीय संरक्षण उत्पादनांना आंतरराष्ट्रीय बाजार उपलब्ध होत आहे, मागणी येत आहे. सध्यस्थितीत 85 पेक्षा अधिक राष्ट्र भारतीय संरक्षण उत्पादन विकत घेत आहेत. मागील सहा वर्षात भारतीय संरक्षण निर्यात 10% ने वाढलेली आहे ही स्थिती पुढे नेण्यासाठी खाजगी क्षेत्राची गुंतणवणूक भारतीय सरंक्षण क्षेत्रासाठी आवश्यक आहे.

भारतीय संरक्षणक्षेत्रातील मागील अनेक दशकात महत्वाच्या विषय होता की, राष्टांचे संरक्षण अथवा विकास परंतू भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी झाल्यापासून संरक्षण क्षेत्राकडे विशेष लक्ष देवून संरक्षणासाठी अनेक कार्यक्रम सुरू केले आहेत. त्यात मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत यातून स्पष्ट होते की आता संरक्षण अथवा विकास नसून विकास आणि संरक्षण हे एकमेकांना पुरक असे आहे.

महत्वपूर्ण, भारताची शेजारील राष्ट्रापासून सुरक्षा हा मुद्दा देखील महत्वपूर्ण आहे. भारताचे शेजारील राष्ट्र चीन आणि पाकीस्तान, हे भारतीय सुरक्षाला प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे आव्हाने देत आहेत. अर्थात 2020 मध्ये गलवान मध्ये भारतीय आणि चीनी सैनिकात हिंसक चकमक घडून आली होती. तेंव्हा पासून भारताची चिंता वाढली आहे. तसेच तिबेटमधील चीनने आपली ताकद वाढविलेली आहे. शेजारील राष्ट्र मालदिव देखील भारत विरोधात जाऊन चीनशी जवळीक करून पाहत आहे. नेपाळ देखील चीनशी सलोखा वाढवत आहे. अशा आव्हान स्थितीत आणि 2047 विकसित राष्ट्र उद्दिष्टे या दृष्टीकोनातून भारताचे संरक्षण क्षेत्रातील झालेले बदल यामुळे भारतीय क्षमता आणि प्रतिष्ठा वाढत आहे. परंतू शेजारील राष्ट्रांना एक धाक देखील निर्माण करत आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


1) डॉ. लल्लनजी सिंह, राष्ट्रीय रक्षा और सुरक्षा, प्रकाश बूक डेपो, बरेली 2021
2) राम सुरत पाण्डेय, राष्ट्रीय सुरक्षा एवं आंतराष्ट्रीय सम्बंध, प्रकाश बूक डेपो, बरेली 2021
3) डॉ. विलास नाबदे, भारतीय लोकशाहीची 75 वर्ष, समीक्षा, पूनम पब्लिकेशन, नवी दिल्ली -2023

# भारत एक महासत्ता म्हणून? शेजारी राष्ट्र सोबत असलेले संबंध व महत्त्व :

**श्री आडे गजानन धर्मा**

सहाय्यक प्राध्यापक (राज्यशास्त्र) कै. बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय. हिंगोली

**प्रस्तावना** :

भारताच्या शेजारी काही राष्ट्राची सीमा आहे. या राष्ट्र सोबत भारताचे हितसंबंध व महत्त्व राजकीय, सामाजिक, आर्थिक व काही प्रमाणात धार्मिक स्वरूपाचे आहेत. या शेजारी राष्ट्रासोबत नेहमीच भारताचे जवळचे व सहकार्याची भूमिका निभवत असते .आज भारतात शेजारी राष्ट्र सोबत काही प्रमाणात आरोग्य, संरक्षण विज्ञान -तंत्रज्ञान, अन्नधान्य व काही वैचारिक विचार या बाबींची देवाण-घेवाण मोठ्या प्रमाणात होत असतात. शेजारच्या राष्ट्रसोबत असलेले संबंध या सकारात्मक भूमिका घेत. भारत शेजारच्या राष्ट्रांना काही सवलती स्वरूपात मदत व सहकार्य करतो. तेच संबंध हे शेजारी राष्ट्राशी कशा पद्धतीने व्यापार, आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक बाबतीत शेजारी राष्ट्राशी आज मोठ्या प्रमाणात एकमेकांचे व्यवहार संघटन काही प्रादेशिक संघटनेचे यामध्ये समावेश होतो. यामुळेच या लेखात शेजारी राष्ट्रप्रति असलेले संबंध महत्त्व स्पष्ट मांडणी लेखांमध्ये करण्यात येत आहे. त्यामुळे भारत आज काही प्रमाणात अजून शेजारी राष्ट्रशी एक महासत्ता म्हणून उभी राहण्यास काही हरकत नसेल, असे स्पष्टता करता येऊ शकते?

**शेजारील राष्ट्र सोबत असलेले संबंध धोरण व उद्देश धोरण :**

अलीकडेच भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी मालदीवचे राष्ट्रपतीची भेट घेतली. त्यावेळी सांगितले की, भारताचे नेबरहूड फर्स्ट धोरण आणि मालदीवची इंडिया फर्स्ट धोरण एकमेकांना पूरक आहेत आणि विशेष भागीदारी पुढे नेत आहेत. तसेच भारताची शेजारी राष्ट्र सोबत कशा पद्धतीचे धोरण असले पाहिजे.

आपल्या नेबरहूड फर्स्ट धोरणाअंतर्गत भारत आपल्या सर्व शेजाऱ्यांसोबत मैत्रीपूर्ण आणि परस्पर फायदेशीर संबंध विकसित करण्यासाठी वचनबद्ध आहेत. म्हणूनच भारत हा सक्रिय भागीदार आहे. आणि या देशांमधील अनेक प्रकल्पांमध्ये त्यांचा सहभाग आहे. भारताचे नेबरहूड फर्स्ट धोरण स्थिरता आणि समृद्धीसाठी परस्पर फायदेशीर लोकाभिमुख प्रादेशिक फ्रेमवर्क तयार करण्यावर लक्ष केंद्रित करते. तसेच भारत शेजारील राष्ट्रासोबत सुरक्षा आणि व्यापक लोकसंपर्क सहकार्य तसेच सुधारित पायाभूत सुविधा विविध क्षेत्रातील विकास मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित करत आहेत. भारताचा संबंध शेजारी राष्ट्रांसाठी सल्लागार परस्पर परिणाम केंद्रित दृष्टिकोनावर आधारित आहे.

**उद्देश :**

भारता दक्षिण आशियाई प्रादेशिक सार्क (SAARC) सदस्यांसोबत समंजस्य करार केला आहे. हे करार संसाधने, ऊर्जा, वस्तू, श्रम आणि माहितीचा मुक्त प्रवाह सुनिश्चित करतात. संबंध सुधारणे व शेजाऱ्यांशी संबंध सुधारणे म्हणजेच विकासाचा अजिंठा साकारण्यासाठी शांतता आवश्यक असल्याने शेजाऱ्यांशी संबंध सुधारणे हे प्राधान्य आहे. शेजारील राष्ट्रांशी संलग्न होऊन आणि संवादावरे राजकीय संपर्क निर्माण करून जोरदार प्रादेशिक मत्स्यगिरीवर लक्ष केंद्रित करणे होय. आर्थिक सहकार्य शेजाऱ्यांसोबतचे व्यापार संबंध व वाढवण्यावर ते लक्ष केंद्रित करते. भारताने या प्रदेशातील विकासाचे साधन म्हणून सार्क मध्ये सहभाग घेतला आहे. आणि गुंतवणूक केली आहे. बांगलादेश भूतान भारत नेपाळ BBIN हे ऊर्जा विकासासाठी चे गट म्हणजेच मोटार वाहने जलशक्ती व्यवस्थापन आणि आंतर ग्रिड कनेक्टिव्हिटी हे असेच एक उदाहरण आहे. आपत्ती व्यवस्थापन धोरण आपत्ती व्यवस्थापन प्रतिसाद संसाधन व्यवस्थापन हवामान अंदाज आणि दळणवळण आणि सर्व दक्षिण आशियाई नागरिकांसाठी आपत्ती व्यवस्थापनातील क्षमता आणि कौशल्य यावर सहकार्य करण्यावर देखील लक्ष केंद्रित करत आहे. लष्करी आणि संरक्षण सहकार्य भारताची एक लक्ष आहे. भारत विविध

संरक्षण सराव आयोजित करून तसेच भाग घेऊन लष्करी सहकार्यावर व या प्रदेशातील सुरक्षा अधिक मजबूत करण्यावर भर देत आहे.

**भारताचे शेजारील राष्ट्रांसोबत असलेले संबंध :**

**1) भारत -भूतान :**

भारत भूतान मैत्री करार 1949 हा करार इतर गोष्टीबरोबरच शाश्वत व शांतता आणि मैत्री मुक्त व्यापार आणि वाणिज्यला प्रधान करतो आणि एकमेकांच्या नागरिकांना सामान्य न्याय प्रदान करतो. 2007 मध्ये या करारावर पुन्हा वाटाघाटी करण्यात आल्या आणि भुतांनच्या सार्वभौमताला प्रोत्साहन देण्यासाठी तरतुदीचा समावेश करण्यात आला आणि परराष्ट्र धोरणावर भारताचे मार्गदर्शन घेण्याची गरज काहीशी नाहीशी झाली. जलविद्युत सहकार्य अंतर्गत जलविद्युत क्षेत्रातील सहकार्यावरील 2006 च्या या कराराच्या प्रोटोकॉल अंतर्गत भारताने भूतानला 2020 पर्यंत किमान 10000 मेगावॅट जलविद्युत आणि त्यातून अतिरिक्त वीज आयात करण्यास मदत करण्याचे मान्य केले आहे.आर्थिक साहाय्य भारत हा भुतांनचा प्रमुख विकास भागीदार आहे. 1961 मध्ये भूतांनची पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाल्यापासून भारत भूतांनच्या FYp आर्थिक सहाय्यद देत आहे. भारताने भूतांनच्या 12 व्या FYp ( फर्स्ट इयर पॉलिसी) 2018 ते 2023 साठी 4500 कोटी रुपये दिले आहे.

**2) भारत - मालदीव** :

अलीकडेच नॅशनल कॉलेज फॉरपॉलिशिंग अँड लॉ इंप्रसिमेन्ट (NCPLE) चे उद्घाटन भारताच्या परराष्ट्र मंत्र्यांनी 2022 मध्ये मालदीवच्या दोन दिवशी भेटीदरम्यान केले. पुनर्वसन केंद्रAdduReclamation आणि किनारा संरक्षणप्रकल्पासाठी US$ ८० दशलक्ष करारावर स्वाक्षरी केली. अड्डु येथे औषध डिटॉक्सिफिकेशन आणि पुनर्वसन केंद्र भारतीय साह्याने बांधले आहे.आरोग्य सेवा, शिक्षण, मत्स्यपालन, पर्यटन, क्रीडा संस्कृती यासारख्या क्षेत्रात भारतात द्वारे राबविण्यात येत आहे व वीस उच्च प्रभावशाली समुदाय विकास प्रकल्पांपैकी एक केंद्र आहे. आर्थिक सहकार्य पर्यटन हा मालदीवच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार आहे. हे देश आता काही भारतीयांसाठी एक प्रमुख पर्यटन स्थळ आहे आणि इतरांसाठी नोकरीचे ठिकाण आहे. ऑगस्ट 2021 मध्ये AFCONS या भारतीय कंपनीने मालदीवमधील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी करारावर स्वाक्षरी केलेली आहे. जी ग्रेटर मेल कनेक्टिव्हिटी प्रोजेक्ट (GMCP) आहे.

**3) भारत- नेपाळ :**

उच्चस्तरीय भेट अलीकडेच भारतीय पंतप्रधानांनी लुंबिनी, नेपाळ, बुद्धाचे जन्मस्थान, येथे भेट दिली आहे. जिथे त्यांनी नेपाळच्या पंतप्रधानांसह भारतीय साह्याने बांधल्या जाणाऱ्या बौद्ध विहाराची पायाभरणी केली. 1950 च्या शांतता आणि मैत्रीचा करार या करारात भारतीय आणि नेपाळी नागरिकांना परस्पर वागणूक देण्याबाबतच सांगितले आहे. दोन्ही देशातील हे भारतीय आणि नेपाळी दोन्ही व्यवसायासाठी राष्ट्रीय उपचार देखील स्थापित करते. (म्हणजेच एकदा आयात केल्यावर परदेशी वस्तूंना देशांतर्गत वस्तूपेक्षा वेगळी वागणूक दिली जाणार नाही). जलविद्युत प्रकल्प दोन्ही देशांनी सतलज जलविद्युत निगम लिमिटेड (SJVN) आणि नेपाळ विद्युत प्राधिकरण (NEA) यांच्यातील एक करारासह पाच करारावर स्वाक्षरी केली आहे. 490.2 मेगावॅट अरुण-4 जलविद्युत प्रकल्पाच्या विकास आणि अमलबजावणीसाठी. नेपाळने भारतीय कंपन्यांना नेपाळमधील पश्चिम शेती जलविद्युत प्रकल्पात गुंतवणूक करण्याचे निमंत्रणही दिले आहे.

**4) भारत- श्रीलंका :**

संकरित शक्ती भारत आणि श्रीलंका यांनी एक सामाजिक सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. ज्यांनी भारताला जाफना जवळील तीन बेटांवर नैनितिव, डेल्फर किवा निंद्दूथीवु आणि अनलाईतिवु संकरित ऊर्जा प्रकल्प

उभारण्याची तरतूद केली आहे. तसेच सागरी बचाव समन्वय केंद्रे व युनिटरी डिजिटल आयडेंटिटी फॉर्म वर्क हे एक डिजिटल साधन होय. बायोमेट्रिक डेटावर आधारित वैयक्तिक ओळख पडताळणी डिवाइस होय.

सर्व बाबींचा विचार करता भारत शेजारील राष्ट्रांशी गुजराल सिद्धांतावर आधारावर आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, व्यवहार करत असतो व शेजाऱ्यांना गुजराल सिद्धांताप्रमाणे मापक व जास्त सवलती देत असतो. एवढेच नव्हे तर भारताने चीन सोबतही पंचशील तत्वाने व्यवहार ठेवले आहेत. इतरही काही राष्ट्रांसोबत मिळून सार्क प्रादेशिक व सहकारी संघटनाची स्थापना केल्या आहेत. ज्यामध्ये सार्क बिमस्टेक, सांघय यासारख्या संघटनेचा समावेश होतो. तसेच भारत व बांगलादेश मैत्री संबंध सध्या दिवसेंदिवस प्रस्थापित होताना दिसत आहे. या सर्व बाबींचा विचार करता भारत हा शेजारील राष्ट्रांसाठी गुजराल सिद्धांतानुसार वागणूक व व्यवहार संबंध प्रस्थापित करण्यात यशस्वी होताना दिसत आहे. म्हणूनच या सर्व बाबींचा विचार करता भारत कुठेतरी शेजारील राष्ट्रांसाठी महासत्ता म्हणून उभी राहु शकते? असे असल्याचे आपल्याला मान्य करणे चुकीचे ठरणार नाही असे दिसून येते.

**समारोप :**

सर्व शेजारील राष्ट्रांचा विचार करता भारत हा या राष्ट्रांसाठी महत्त्वपूर्ण व सहकारी राष्ट्र म्हणून भूमिका बजावताना दिसतो. कारण गुजराल सिद्धांतावर आधारित धोरनाचे अवलंब करतो आहे. शेजारील राष्ट्रांत भारतात उंची सामर्थ्य व संबंधात गुणतेवर आधारित आहेत. व सहकार्य व मदतीची भावना ही एक लहान राष्ट्र व मित्रराष्ट्र आपलाच एक राष्ट्र म्हणून शेजारील राष्ट्रांशी मोठ्या प्रमाणात चांगल्या मैत्रीपूर्ण सहकार्याने संबंध प्रस्थापित करताना दिसत आहे. तसेच शेजारील राष्ट्रांसाठी कधीही जागतिक स्तरावर आज भारत शेजारील राष्ट्रांसाठी खंबीरपणे उभा आहे. व शेजारील राष्ट्रांना मदत व सहकार्य ची भावना नेहमीच सकारात्मक बाजूने ठेवत असतो, त्यामुळे आज शेजारील राष्ट्रांसाठी भारताला एक महासत्ता म्हणून भारताकडे शेजारील राष्ट्र बघत असल्याचे दिसून येते. कारण आज भारत जगाच्या पाठीवर एकमेव देश आहे जो शेजारील राष्ट्रांवर एक योग्य अशा भूमिकेतून वागणूक सहकार्य व मदतीची भावना ठेवून राहत असतो आणि नेहमीच मदत व सहकार्य करत असतो. त्यामुळे भारताला एक महासत्ता म्हणून उभे राहण्याची सुवर्णसंधी दिसून येत आहे.

**संदर्भ सूची :**

1) नेपाळ डायरी - प्रकाश वाकोडे प्रकाशन -ASINB089G आवर्ती - जून 2020
2) इंडियन पोलिटी - मूळ लेखक एम लक्ष्मीकांत अनुवाद - श्रीकांत गोखले प्रकाशन -के सागर पुणे. आवर्ती - मे 2017
3) भारताचे शेजारी राष्ट्रांशी संबंध- हर्षवर्धन यादव प्रकाशन - के सागर पुणे आवर्ती -जून 2020
4) इंडिया - भूतान रिलेशन -डॉ. जानी श्रीवास्तव प्रकाशन - पॅसिफिक बुक इंटरनॅशनल आवर्ती - 20 ऑगस्ट 2021
5) दृष्टी आयएस नोट्स - दिव्य चक्रवर्ती सर.
6) आंतरराष्ट्रीय संबंध -शैलेंद्र देवळाणकर प्रकाशन- विद्या बुक्स पब्लिकेशन औरंगाबाद आवर्ती- जानेवारी 2021.

# भारताचे बदलते परराष्ट्र धोरण

**डॉ. रमेश एकनाथ भारुडकर**

राज्यशास्त्र विभाग प्रमुख अ‍ॅड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय आष्टी

**प्रस्तावना -**

भारताचे प्राचीन काळापासून जगातील इतर देशांशी सौहार्दाचे संबंध होते. पण ब्रिटिश राजवटीमध्ये त्यांच्या वसाहतवादी हेतूने प्रेरित परराष्ट्र धोरणामुळे भारताच्या इतर देशांशी असणाऱ्या संबंधामध्ये बदल झाला. भारताच्या परराष्ट्र धोरणाची स्थूल जडणघडण स्वातंत्र्यपूर्व काळातच झाली. ब्रिटिशांच्या परराष्ट्र धोरणावर टीका करून राष्ट्रीय चळवळीतील धुरिणांनी सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि शांततापूर्ण सहअस्तित्व या तत्वांवर आधारित परराष्ट्र धोरणाचा पुरस्कार केला. स्वातंत्र्यप्राप्तीपासून ते आजपर्यंत देशाच्या परराष्ट्र धोरणनिर्मितीवर पंतप्रधानांचा विशेष प्रभाव दिसून येतो. स्वातंत्र्यानंतर पहिले पंतप्रधान आणि परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार पं. नेहरू यांनी ब्रिटिशांच्या परराष्ट्र धोरणातील कटू अनुभवापासून बोध घेत देशाचे परराष्ट्र धोरण आखले. अलिप्ततावाद, वसाहतवाद आणि साम्राज्यवादाला विरोध, वर्णद्वेष विरोध, जागतिक शांतता, प्रादेशिक सहकार्य, नि:शस्त्रीकरणाला पाठिंबा ही भारतीय परराष्ट्र धोरणाची तत्त्वे आहेत.नेहरूप्रणीत आदर्शवादी परराष्ट्र धोरणाच्या मर्यादा पाकिस्तान आणि चीनशी झालेल्या युद्धानंतर आणि भारताच्या पाश्चिमात्य देशांशी असणाऱ्या असमान संबंधामधून दिसून आल्या. इंदिरा गांधींच्या काळामध्ये परराष्ट्र धोरणामध्ये आदर्शवाद ते वास्तववाद असा बदल झाला. वाढती सैन्यशक्ती आणि वेगाने आकार घेत असलेला आण्विक कार्यक्रम, बांग्लादेशाच्या निर्मितीतील भूमिका, शांततामय आण्विक चाचणी, अण्वस्त्र प्रसार बंदी (NPT) करारावर सही करण्यास नकार आणि भारत व सोव्हिएत रशिया यांच्यातील करार हा बदल दर्शवतो.१९९० च्या दशकामध्ये सोव्हिएत रशियाचे पतन, शीतयुद्धाची समाप्ती झाली. याचवेळी भारत आर्थिक संकटातून वाटचाल करत होता. परिणामी जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या माध्यमातून अमेरिकेच्या संपर्कात यावे लागले. यानंतर भारताने एलपीजी मॉडेलचा अंगीकार करून अर्थव्यवस्था खुली केली. या घटनेमुळे भारताचे परराष्ट्र धोरण व्यूहात्मक बाबींकडून भू-आर्थिक बाबींकडे झुकले. या संरचनात्मक बदलामुळे भारताची ‘परकीय मदतीकडून थेट परकीय गुंतवणुकीकडे वाटचाल सुरू झाली. याचवेळी भारताने ‘पूर्वेकडे पहा’ धोरणाचा (Look East Policy) अंगीकार केला. यावेळी पूर्व आशियायी देशांमध्ये वेगाने आर्थिक विकास घडून येत होता. यामुळे पर्यटन, व्यापार आणि आर्थिक सहकार्य यांना चालना देण्याचा प्रयत्न होता.यानंतर ‘गुजराल सिद्धांता’च्या साहाय्याने शेजारील देशांशी देवाण-घेवाणीची अपेक्षा न करता संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होता. यामुळे बांग्लादेशासोबत गंगा पाणी वाटप करार झाला. यानंतरचा कालखंड ‘प्रबुद्ध राष्ट्रीय हिताने’(Enlightened National Interest) प्रेरित होता. भारताने १९९८ मध्ये अणुचाचण्या केल्या, इस्रायलशी संबंध प्रस्थापित केले व सोबतच पश्चिम आशियायी राष्ट्रांबरोबर ऊर्जा राजनय सुरू ठेवला. भारताने नेहमी बहुध्रुवी जागतिक व्यवस्थेचा पुरस्कार केला. भारताने BRICS, IBSA, G20, G4 आदी संस्थांद्वारे उदयोन्मुख आर्थिक सत्तांबरोबर सहकार्याला बळ देण्याचा प्रयत्न केला. तसेच अमेरिका-भारत अणुकरारानंतर अमेरिकेशीही जवळचे संबंध प्रस्थापित केले. आतापर्यंत भारतीय परराष्ट्र धोरणाचा ढोबळपणे आढावा घेतला. यामध्ये एक बाब नेहमी ध्यानात घ्यावी की, गेल्या काही दशकांपासून आंतरराष्ट्रीय स्तरावर होत असलेले बदल आणि त्यांचा भारतावरील प्रभाव तसेच या बदलांना प्रतिसाद म्हणून आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये केलेला बदल व रणनीती यांचे सूक्ष्म आकलन महत्त्वाचे आहे. प्रतुत शोधनिबंधामध्ये भारताचे बदलते परराष्ट्र धोरण याबाबत आढावा घेण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे -**

१. भारताच्या बदलत्या परराष्ट्र धोरणाचा आढावा घेणे.

२. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे महत्व जाणून घेणे.

**भारताचे परराष्ट्र धोरण-**

देशाच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी इतर देशांशी मैत्रीपूर्ण संबंध राखणे महत्त्वाचे आहे, असे संबंध विशिष्ट तत्त्वे आणि धोरणांवर आधारित असतात. अशा तत्त्वे आणि धोरणांना परराष्ट्र धोरण म्हणता येईल. परराष्ट्र धोरणाची तत्त्वप्रणाली साधी आणि संक्षिप्त असू शकते किंवा गुंतागुंतीची आणि संदिग्धपण असू शकते. परराष्ट्र धोरणात निश्चितपणे राष्ट्र- राज्याची राजकीय उद्दिष्टे, नैतिक तत्त्वे आणि राष्ट्रहिताची परिभाषा यांचा समावेश होतो. परराष्ट्र धोरण पोकळीत अस्तित्वात येऊ शकत नाही. राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि ऐतिहासिक संदर्भामध्ये परराष्ट्र धोरण तयार होत असते. राष्ट्र-राज्याच्या निर्मितीशी संबंधित ऐतिहासिक घडामोडी, राष्ट्र निर्मितीची वैचारिक तत्त्व चौकट आणि राष्ट्र-राज्याच्या अस्तित्वाचे तार्किक अधिष्ठान यांच्या संगमातून राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाचा उगम होतो. राष्ट्राच्या राज्यसंस्थेचा प्रकार, अर्थव्यवस्थेचे स्वरूप व गरजा राजकीय परिस्थिती, भौगोलिक स्थान आणि सांस्कृतिक जडणघडण यांच्या संयुक्त साच्यातून परराष्ट्र धोरणाला आकार प्राप्त होतो. आधुनिक काळात राष्ट्र राज्यांना आपापल्या राष्ट्र हितांचे रक्षण आणि संवर्धन करण्यासाठी परराष्ट्र धोरण आखण्याची आवश्यकता निर्माण झाली.

**भारताच्या परराष्ट्र धोरणाची सर्वसाधारण उद्दिष्टे पुढीलप्रमाणे –**

१. देशाची अखंडता आणि एकात्मतेचे रक्षण करणे.

२. देशाच्या नागरिकांची सुरक्षा आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी बाह्य शक्तींना आवश्यक त्या प्रमाणे प्रभावित करणे.

३. इतर देशांमध्ये वास्तव्यांस असणाऱ्या देशाच्या नागरिकांची सुरक्षा आणि कल्याणाबाबत योग्य ती पावले उचलणे.

४. इतर देशांशी सांस्कृतिक संबंध बळकट करणे.

५. इतर देशांशी व्यापार वाणिज्य तंत्रज्ञान शिक्षण पर्यावरण क्रीडा इत्यादी सर्व क्षेत्रांमध्ये संपर्क वाढवून देशाच्या अर्थव्यवस्थेस त्याचा लाभ पोहोचवणे.

**भारताचे बदलते परराष्ट्र धोरण-**

इंडो-पॅसिफिक सागरी क्षेत्र आणि नव्याने उदयास येत असलेली ऑस्ट्रेलिया, भारत, जपान आणि अमेरिका यांची चतुर्भुज युती म्हणजेच क्वाड ही भारताच्या आंतरराष्ट्रीय संबंधातील मोठी विसंगती असल्याचे मानले जात आहे. इंडो पॅसिफिक प्रदेश आणि क्वाड यांचे विरोधक आणि समर्थक या दोघांचेही याबाबतीत एकमत झाले आहे. अलिप्ततावादी धोरण आणि लष्करी स्वायत्तता ही दोन तत्वे प्रदीर्घ काळ भारताच्या परराष्ट्र धोरणाचा अविभाज्य भाग होती. आता इंडो-पॅसिफिक आणि क्वाडच्या निमित्ताने भारत या तत्वांपासून काहीसा दूर जात चालला आहे. यावर काही प्रमाणात टीका होत असली तरी याचे स्वागतही केले जात आहे.सध्या भारत त्याच्या पारंपरिक अलिप्ततवादी धोरणापासून दूर जात एका वेगळ्या प्रकारे परराष्ट्र धोरणाची आखणी करत आहे. असे असले तरीही आजूबाजूच्या आशियाई देशांना क्वाडचे महत्व पटवून देणे हे आव्हानात्मक असणार आहे. क्वाड आणि चीन यांच्यातील संघर्षाबाबत आशियात मोठ्या प्रमाणावर चिंतेचे वातावरण आहे. आशियातील ही नवी दरी समजून घेत अनेक देशांनी अलिप्ततवादी धोरणाचा अवलंब केला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर भारताला जी चिंता वाटत होती त्याप्रकारची चिंता आता या देशांनाही वाटते आहे.आशियाई राष्ट्रवादाचा योग्य रीतीने वापर करून या देशांना आपल्या बाजूला वळवून घेणे, हे भारताच्या दृष्टीने हिताचे असणार आहे. भारताच्या

अलिप्ततावादी धोरणाचा काळजीपूर्वक अभ्यास केला तर असे दिसून येते की जागतिक महासत्तांच्या राजकारणात बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याताना राष्ट्रावादाला अनन्यसाधारण महत्व आहे.

**भारताचा अलिप्ततावादी धोरणाचा अवलंब-**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने अलिप्ततावादी धोरणाचा अवलंब केला. ज्यावेळेस संपूर्ण जग दोन बाजूंमध्ये विभागले जात होते त्यावेळेस कोणतीही बाजू न निवडण्याचे भारताने ठरवले. दोन शतके भारत परकीय सत्तेच्या अधिपत्याखाली होता. परिणामी जागतिक स्तरावर महासत्तांच्या संघर्षात आपले स्वातंत्र्य कोणाच्यातरी अधीन राहून गमावणे भारतीय नेत्यांना पटणारे नव्हते.भारताने ज्याप्रकारे राष्ट्रीय हितासाठी शीतयुद्धातील दोन्ही बाजूंशी जुळवून घेण्याची भूमिका घेतली, त्याचप्रमाणे वेळ आल्यावर कोणत्याही एका बाजूला समर्थन देण्यापासून भारत मागे राहिला नाही. अमेरिका आणि चीन यांच्या युतीने बिघडलेला प्रादेशिक सुरक्षा समतोल राखण्यासाठी १९७० मध्ये भारताने रशियाची मदत घेतली. या प्रयत्नात भारत सोविएत रशियाच्या अधिक जवळ गेला होता. परिणामी आता अमेरिकेसोबत संबंध सुधारण्यावर भर देणे गरजेचे आहे, असे मत १९८० च्या दशकात पंतप्रधान इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनी मांडले होते.सोविएत रशियाच्या पतनानंतर, भारताने लष्करी सहकार्यासाठी अमेरिकेसोबत संबंध सुधारण्याचे प्रयत्न सुरू केले. युनिपोलर किंवा एकध्रुवीय जगातील अमेरिकेच्या कृतींबाबत भारताला साशंकता होती. म्हणूनच रशियाच्या पुढाकाराने निर्माण झालेल्या स्ट्रेटेजिक त्रिकोणामध्ये भारताने चीनसह सहभाग घेतला. अर्थात पुढे यात ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका जोडले गेल्याने ब्रिक्सचा उदय झाला. २००० मध्ये चीनच्या वाढत्या हालचाली आणि भारताच्या भूमी आणि सागरी सीमांवरील कारवाया लक्षात घेता संरक्षण आणि सुरक्षा सहकार्याच्या मुद्द्यांवर भारताने अमेरिकेची मदत घेतली. अमेरिकेपासून लष्करी स्वायतत्ता मिळवण्यासाठी भारताचा रशिया आणि चीनकडे अधिक कल होता. पण चीनच्या वाढत्या प्रभावामुळे निर्माण झालेली परिस्थिती सुधारण्यासाठी भारत-अमेरिका यांच्यातील संबंध सुधारत गेले.

भारताच्या परराष्ट्र संबंधांमध्ये अलिप्ततावाद आणि लष्करी स्वायत्तता यांना अनुसरून नेहमीच निर्णय घेतले गेले नाहीत, तर त्या त्या वेळी उद्भवलेल्या परिस्थितीचे गांभीर्य समजून घेत भारताने पावले उचलली आहेत. परंतु भारतातील शिक्षण आणि राजकीय क्षेत्रातील तज्ञांकडून नेहमीच भारत अलिप्ततावादी धोरण अनुसरणारा देश आहे असे चित्र निर्माण केले गेले आहे.भारतासंबंधीचे हे चित्र उर्वरित आशियाच्या बाबतही दिसून आले आहे. आशियातील काही देशांनी अमेरिकेशी हातमिळवणी केली आहे. पण हा अपवाद वगळता इतर सर्व देशांनी स्वतंत्र राहण्याचे आणि स्वातंत्र्य टिकवून ठेवण्याचे धोरण अनुसरले आहे. चीनने परिस्थितीनुसार बाजू निवडण्याचे धोरण अनुसरले. आधी सोविएत रशिया आणि मग अमेरिका यांच्याशी जोडून घेण्याचा चीनने निर्णय घेतला. काही देशांनी अलिप्ततावादी धोरणाचा अवलंब केला. परंतु त्या देशांसाठी अलिप्ततावाद आणि इतर देशांना पाठिंबा यांच्यातील रेषा पुसट होती. १९५० मध्ये अमेरिकेसोबत अँटी- कम्यूनिस्ट युतीने जोडल्या गेलेल्या पाकिस्तानने भारताला शह देताना चीनसोबत जाण्यात फारसा वेळ दवडला नाही. फिलिपाईन्स आणि थायलंड हे देश आधी अमेरिकेचे मित्रराष्ट्र म्हणून ओळखले जायचे परंतु आता त्यांनी चीनसोबत संबंध जोडलेले आहेत. सुरक्षा संबंधात अमेरिकेवर अवलंबून असलेल्या दक्षिण कोरियाने आता वॉशिंग्टन आणि बीजिंग यांच्यासोबतच्या संबंधात समतोल साधलेला आहे. पाश्चिमात्य देशांशी संबंध असलेल्या अनेक आशियाई राष्ट्रांनी नव्या शीतयुद्धात चीन किंवा क्वाडची बाजू घेण्यास नकार दिला आहे.यामुळे आशियाई देशांतील परस्पर संबंधांचे दर्शन घडते आहे. शीत युद्ध ही संकल्पना आता सर्वज्ञात आहे. परंतु अमेरिका आणि सोविएत रशिया यांच्यातील संघर्ष हा अमेरिका आणि चीन यांच्यातील संघर्षापेक्षा वेगळा आहेत. याचे पहिले कारण म्हणजे अमेरिका आणि सोविएत रशिया यांच्यातील संघर्ष आशियाच्या भूमीवर झाला नाही. पण अमेरिका आणि चीन यांचा संघर्ष थेट संघर्ष आशियाची भूमी आणि सागरी सीमांमध्ये होतो आहे. सध्याची आशियाची स्थिती तत्कालीन मध्य युरोपाप्रमाणे

आहे.रशिया हा देश युरोपच्या पूर्व भागात स्थित आहेत. ह्याविपरीत चीन हा देश आशियाच्या मध्यभागी स्थित आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे युरोप हा रशियाच्या अर्थव्यवस्थेशी जोडलेला नव्हता. पण चीन हा आशियाच्या अर्थव्यवस्थेचे एक अविभाज्य भाग आहे. वॉशिंग्टन आणि बीजिंग यांच्यातील संघर्षाला अमेरिका आणि चीनच्या परस्पर आर्थिक अवलंबित्वाची किनार आहे.

**भारताचा चीनच्या विस्तारवादी धोरणाला विरोध -**

आशियातील प्रत्येक देश चीनच्या सीमेशी जोडला गेलेला आहे. तसेच अमेरिकेची आशियाप्रती असलेली बांधिलकी याबाबत आशियात साशंकतेचे वातावरण आहे. तसेच चीनने ऑस्ट्रेलियाला केलेली सक्ती पाहता उघडपणे कोणताही आशियाई देश चीनच्या विरुद्‌ध उभा राहण्यास तयार होणार नाही. त्यामुळे प्रत्येक देश अलिप्ततावाद आणि तटस्थतेची भाषा बोलत आहे.पण आशियाई राष्ट्रवादाने चीनची विस्तारवादी वृत्ती मान्य केली आहे हे समजणे चुकीचे ठरेल. परंतु आर्थिक स्वावलंबित्व, राजकीय भूगोल, बीजिंगचा वाढता प्रभाव लक्षात घेता कोणत्याही राष्ट्राला त्याच्यावर असेलला चीनचा प्रभाव कमी करणे शक्य होणार नाही.भारताने २०२० मध्ये भारतीय राष्ट्रावादाचे दर्शन जगाला घडवले आहे आणि त्यामुळे चीन राष्ट्रावादाला एक मोठे आव्हान निर्माण झाले आहे. चीनच्या सीमेवर घटनांना वेग येत असला तरीही आशियाई राष्ट्रवाद हा बळकट आहे. अमेरिकेतील काही लोकांच्या मते 'राष्ट्रवाद' हा एकप्रकारे शाप आहे. पण आशियातील लढाईत राष्ट्रवाद हे एक प्रभावी शस्त्र ठरणार आहे. क्वाडचे यश दोन महत्वाच्या गोष्टींवर अवलंबून आहे. एक म्हणजे चीनवरील वाढत्या आर्थिक अवलंबित्वाला पर्याय निर्माण करणे आणि दुसरे म्हणजे चीनकडून राजकीय आणि सुरक्षा समर्थन मिळणाऱ्या आशियाई देशांसाठी राजकीय आणि आर्थिक सुरक्षिततेचे वातावरण निर्माण करणे.

**निष्कर्ष -**

भारतीय परराष्ट्र धोरण नेहरू नंतरच्या काळात बदललेले दिसते. ज्यात परराष्ट्र धोरणात आर्थिक घटक महत्त्वपूर्ण झालेला दिसतो. नेहरूंच्या आदर्शवादी प्रतिमेतून वास्तववादाकडे परराष्ट्र धोरण आले असून सध्या यात आर्थिक व संरक्षण या दोन्हींचा प्रभाव परराष्ट्र धोरणावर दिसून येतो. १९९१ नंतर भारताचे परराष्ट्र धोरण हे वास्तववादाकडे झुकलेले आहे. भारताचा रशियाकडे असणारा कल हा अमेरिकेकडे गेलेला दिसतो. १९९१ नंतर एक ध्रुवीय व्यवस्था निर्माण झाली व यात राष्ट्रीय हिताला महत्त्व देणे आवश्यक होते. त्यानुसार राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने भारताने आपले परराष्ट्र धोरण बदलले. याचा परिणाम भारताने पोखरण अणुस्फोट घडवून अण्वस्त्र सज्जता जगाला दाखवली. बदलत्या जागतिक परिदृश्यात भारत जागतिक बाजारपेठ म्हणून विकसित झाला व परराष्ट्र धोरणात आर्थिक संबंधास महत्त्वपूर्ण स्थान आले. ज्यात विविध क्षेत्रीय आर्थिक संघटनात भारताचा सहभाग वाढू लागला. भारत आज परराष्ट्र धोरणाबाबत कोणत्याही देशावर अवलंबून नसून स्व:हिताच्या दृष्टीने आपले परराष्ट्र धोरण आखत आहे. भारतीय परराष्ट्र धोरणाची मूलभूत चौकट प्रभावी असून लोकशाही, साम्राज्यवादविरोधी, वंशवादाला विरोध, युद्‌ध प्रवृतीला विरोध, आंतरराष्ट्रीय सुरक्षा, शांतता व सहकार्य, अहिंसावाद या तत्त्वांचा प्रभाव अजूनही परराष्ट्र धोरणावर आहे. या परराष्ट्र धोरणावर भारतीय पंतप्रधानांच्या कारकिर्दीचा प्रभाव पडला असून त्यांच्या व्यक्तित्वाचाही प्रभाव यात निदर्शनास येतो. १९४७ ते आजपर्यंत या कालखंडात भारतीय परराष्ट्र धोरणात अनेक बदल झाले. पण यात भारताने कधीही साम्राज्यवादी, आक्रमक असे परराष्ट्र धोरण स्वीकारले नाही. भारताने नेहमी दुसऱ्या देशाच्या सार्वभौमत्वाचा व अखंडतेचा आदर केला आहे व त्या दृष्टीनेच इतर देशाशी संबंध प्रस्थापित केले आहेत.

**संदर्भ ग्रंथ सूची -**


1) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, भारताचे परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतर, प्रतिमा पब्लिकेशन, २०१८
2) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, भारताचे परराष्ट्र धोरण नवीन प्रवाह, सकाळ पब्लिकेशन, २०१८
3) प्रा. व्ही. बी. पाटील, भारताचे परराष्ट्र धोरण, के सागर पब्लिकेशन, २०१७
4) ब्रि. हेमंत महाजन, भारताचे परराष्ट्र धोरण काल आज आणि उद्या, नचिकेत पब्लिकेशन, 2016
5) www.Wikipedia.com

# भारत आणि चीन आर्थिक संबंधाचे बदलते संदर्भ

**प्रा. डॉ. इकबाल खान गफार खान**
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख) श्री रेणुका देवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय माहूर ता.माहूर जि. नांदेड. पिन कोड 43 17 21

**प्रस्तावना :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रत्येक राष्ट्रांना परस्परांशी राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, व्यापारी संबंध ठेवावे लागतात. कोणतेही राष्ट्र आता एकाएकी अलिप्त राहू शकत नाही. इतके जग लहान झाले आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात चीन सोबत राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक इत्यादी संबंधित धोरण आखताना चीनचा एक शेजारी राष्ट्र किंवा शत्रू राष्ट्र या दृष्टिकोनातून विचार करून चालणार नाही, तर जागतिक राजकारणात चीन सारखा एक महत्त्वपूर्ण राष्ट्राशी भारताचे संबंध कसे असावेत असा विचार करणे अधिक संयुक्त ठरेल. त्याच अनुषंगाने भारत आणि चीन या दोन शेजारी राष्ट्रांचे बदलते आर्थिक संबंध भविष्यकाळात कसे असतील, याचा प्रस्तुत शोध निबंधाच्या उद्देश आहे.

भारताचे अंतर्गत धोरण स्वातंत्र्य समृद्धी शांतता यावर आधारित असल्याने शेजारील राष्ट्र सोबत मैत्रीचे संबंध ठेवण्यावर भर दिले. स्वतंत्र प्राप्तीनंतर भारताने आपली अर्थव्यवस्था मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून खाजगी उद्योग व सहकारी उद्योग सुरू केला. कारण भारताला झपाट्याने आर्थिक विकास करायचा होता. म्हणून अमेरिका व सो.रशिये तसेच सर्व राष्ट्रांशी स्नेह संबंधित ठेवण्याचे धोरण ठेवले. भारताच्या शांततावादी धोरणाला बहुतेक राष्ट्राचा पाठिंबा प्राप्त झाला होता.

1990 नंतर देशांतर्गत धोरणात आर्थिक सुधारणा सरकारने स्वीकारल्यामुळे समाजवादी विशेषणाला आता अर्थ उरला नाही. कारण देशात नवीन आर्थिक धोरण म्हणजे भांडवलशाहीचे पुनरागमन, मुक्त बाजारपेठ, स्पर्धा, नफा हे मूल्य असलेली अर्थरचना स्वीकारली गेली. याचा परिणाम म्हणजे भारत – अमेरिका, जपान, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स इ.मित्र बनले.

शीत युद्धोत्तर काळात भारत आणि चीन हे दोन्ही देश महासत्ता म्हणून उदयास येत आहे आर्थिक विकासासाठी दोघांनाही परस्पर शांतता आणि सहकार्याची गरज आहे. 1962 सारखी परिस्थिती आज राहिलेली नाही. आर्थिक व व्यापारी संबंध राजकीय प्रश्न सोडविण्यासाठी योग्य ती पार्श्वभूमी तयार करू शकतात, याची जाणीव या दोन्ही देशांना आहे. यामुळेच वादग्रस्त प्रश्न किंवा विषयावर जैसे थे परिस्थिती ठेवून आर्थिक, व्यापारी, संस्कृतिक, विज्ञान व तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रांमध्ये परस्पर सहकार्य प्रस्थापित करणे आवश्यक आहे. 1990 नंतर भारत आणि चीन यांच्यातील बदल होत गेलेले संबंध भविष्यकाळात काळामध्ये आंतरराष्ट्रीय अर्थकारणावर त्याचा परिणाम मांडण्याचे प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधातून केला जाणार आहे.

**उद्दिष्टेः**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी खालील प्रमाणे उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१. भारत आणि चीन या देशातील आर्थिक, राजकीय, संस्कृती व व्यापारी संबंधाची पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा अभ्यास करणे.

३. भारत आणि चीन च्या आर्थिक संबंधाचे बदलते स्वरूप अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :** प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीचे उपयोग केलेला आहे. शोधनिबंधासाठी स्रोत म्हणून द्वितीय सामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे. त्यासाठी विविध ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेट, शासकीय अहवाल इत्यादींचा वापर करण्यात आलेला आहे.

**भारत आणि चीन आर्थिक संबंधाचे बदलते संदर्भ :**

भारत आणि चीन हे शेजारी देश आहे इ.स. पूर्वी पासून या दोन्ही देशात विचार आणि वस्तूंचे आदान प्रदान चालत होते. 1947 नंतर काही वर्षात भारताने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात चीनला खूप सहकार्य केले. परंतु 1962 ला सीमा वादावरून चीन भारतावर आक्रमण केल्यामुळे या दोन्ही देशातील राजकीय, आर्थिक, व्यापारी संबंध संपुष्टात आले होते. पण आशियातील या दोन प्रमुख दीर्घकाळ शत्रुत्वाचे संबंध राहणे दोन्ही राष्ट्राच्या हिताचे नाही याची जाणीव दोन्ही उभय पक्षी राष्ट्रांना झाली आणि 1976 पासून संबंध सुधारण्याचे प्रयत्न सुरू झाले.. जनता पक्षाच्या सरकारमधील परराष्ट्रमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांनी 1979 ला चीनला भेट दिली तर 1988 मध्ये तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधींनी चीनला भेट दिली. यामुळे भारत चीन संवादाला सुरुवात झाली. त्यामुळे भारत आणि चीन यांच्यातील आर्थिक, व्यापारी, सांस्कृतिक व शैक्षणिक संबंधी दृढ होत गेले. व्यापारी व शिष्ट मंडळाची आणि राजकीय नेत्यांची एक दुसऱ्या देशाला भेटी देण्याची प्रक्रिया सुरू होऊन सीमा प्रश्न बाबत दोन्ही देशात वाटाघाटी ला सुरुवात झाली.

1991 मध्ये सो.रशियाचे विघटन झाल्यानंतर जागति राजकारणाचे वारे बदलले. अमेरिका ही एकच महासत्ता म्हणून अस्तित्वात राहिल्याने सहाजिकच जगातीक राजकारणाचे सूत्र वॉशिंग्टन मधून हालायला लागली. आणि जागतिकीकरणाच्या वाढत्या प्रभावामुळे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील देवाण-घेवाण, व्यापार व आर्थिक क्षेत्राला महत्त्व प्राप्त झाले. म्हणून भारत आणि चीनने आपले वादग्रस्त प्रश्न बाजूला ठेवून आर्थिक व व्यापारी संबंध प्रस्थापित करण्यावर अधिक भर दिला. भारत 1993 मध्ये तर चीन 2001 मध्ये W.T.O. चा सदस्य बनल्यानंतर अर्थव्यवस्थेशी जुळवून घेण्याची क्षमता दोन्ही देशात झपाट्याने वाढली आहे. आर्थिक सत्तेचे केंद्र आता पश्चिमेकडून पूर्वकळे सरकले आहे. चीन आणि भारत ही दोन राष्ट्रे आर्थिक महासत्ता म्हणून पुढे येत आहे. 2025 पर्यंत जगातील पहिल्या पाच क्रमांकाच्या आर्थिक महासत्तेमध्ये भारत आणि चीनचा समावेश असेल, सर्वात जास्त आर्थिक विकास घडून आणणारे देश म्हणून एकविसाव्या शतकात भारत व चीन पुढे आले आहे. भारत व चीन यांचे आर्थिक विकास दर व दरडोई उत्पन्नात वाढ होत आहे. म्हणून दोन्ही महासत्तांच्या सहयोगाने जागतिकी राजकारणाला एक नवी दिशा मिळू शकते.

भारत आणि चीन या दोन्ही राष्ट्रांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन विकास कार्यांना प्राधान्य देऊन आर्थिक सहकार्य संबंधांना प्राथमिकता दिली. यातूनच जागतिक पातळीवर नवीन समीकरण उदयास येण्याची स्थिती निर्माण होऊ शकते, याचा प्रत्यय म्हणून दोन्ही राष्ट्र एशिया परिषद, ब्रिक्स,G 20 इत्यादी आंतरराष्ट्रीय संघटनेचे सदस्य बनले आहेत. भारताच्या दृष्टीने चीनची आर्थिक विकासाची सूत्रे स्किल, स्केल आणि स्पीड ही भारताला आर्थिक विकासासाठी आवश्यक आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी चीन विषयी आशावादी आहेत. कारण चीनच्या साहयाने भारताला प्रगती साधायची आहे. चीन व भारत आशिया खंडातील प्रमुख राष्ट्र आहेत. या दोन्ही राष्ट्रात आर्थिक विकासावर मत एक्के झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या चीन भेटीमध्ये आर्थिक पातळीवर भारत आणि चीन यांच्यात 22 अब्ज डॉलर्सच्या व्यापाराचे करार व्यापाराचे करार झाले आहेत चीनचे अध्यक्ष जिनपिंग हे 2014 मध्ये भारतात आले होते. त्यावेळी त्यांनी वीस अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीची चर्चा व करार केला.

चीनची अर्थव्यवस्था ही वेगाने विकसित होणारी व्यवस्था आहे जपानला मागे टाकून चीनने दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याचे मान मिळविला आहे वेगाने विकसित होणाऱ्या चीनला भारतासारख्या मोठ्या बाजारपेठेची गरज आहे भारतालाही आर्थिक विकासासाठी मोठ्या प्रमाणावर विदेशी गुंतवणूक आवश्यक आहे माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारत आघाडीवर आहे याची चीनला जाणीव आहे याचा फायदा भारताने करून घेतला पाहिजे.

1990 नंतर विशेष करून आर्थिक क्षेत्रात भारत आणि चीन या दोन्ही देशांमध्ये जागतिकरणाचे वारे झपाट्याने वाहयला सुरुवात झाली. आर्थिक व व्यापारी क्षेत्रात दोन्ही देशांना भरपूर वाव असल्यामुळे मागील दोन दशकात सीमावादाच्या भू- राजकारणात राहण्याबरोबरच आर्थिक क्षेत्रात परस्पर सहकार्य करण्याच्या प्रयत्न दोन्ही देशात दोन्ही देशाकडून होताना दिसून येते. तसेच आर्थिक विकासाच्या दरात सातत्य ठेवणे व त्या अनुषंगाने परकीय गुंतवणूक

वाढविण्यावर भर देणे गरजेचे बनले आहेत युरोपीय व पश्चिमी ,6देशांच्या आर्थिक मॉडलच्या परिणामी जागतिक बाजारपेठेवर निर्माण झालेल्या प्रभावात आपण मागे पडणार नाही या काळजीतून इतर राष्ट्रीय जागतिक व्यापारी संघटना बरोबरच परस्परांतील अर्थ व्यापार क्षेत्रातील संबंध वृद्धिगंत करून नवीन बाजारपेठा काबीज करण्यावर आज भारत आणि चीन भर देताना दिसून येत आहे. तसेच भारत आणि चीन मधील अर्थ व्यापार 100 अब्ज अमेरिकी डॉलर च्या पुढे जाण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर भारत आणि चीन मधील अर्थ राजकारण एकीकडे झपाट्याने बदलत असताना, सीमावाद हा सुद्धा दिसून येतो.

**निष्कर्ष :**

१) आंतरराष्ट्रीय अर्थकरणाचे स्वरूप काही प्रमाणात बदलत आहे आणि त्या बदलास चीन व काही प्रमाणात भारत कारणीभूत ठरत आहे त्यामुळे आता नव्या शक्यता निर्माण झाल्या आहेत असे मला वाटते.

२) भविष्यात आर्थिक राजकारणाचे निश्चितपणे भारत आणि चीन केंद्रबिंदू असतील.

३) चीनच्या हेतू बद्दल संशय अजूनही दूर झालेला नाही, सीमावरती भागावरील आपला दावा अद्याप सोडलेला नाही.

४) चीनच्या आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताविरुद्धची भूमिकेत बदल झालेला दिसून येत नाही.

५) भारत आणि चीन ही दोन राष्ट्रे भौगोलिक क्षेत्रफळ व प्रचंड लोकसंख्येच्या आधारावर जगात बलाढ्य राष्ट्र म्हणून ओळखली जातात.

६) भारत आणि चीनच्या आर्थिक व सैनिकी शक्तीमुळे जागतिक राजकारणात अमुलाग्र बदल झाला आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची :

१) डॉ .ना.य. डोळे, आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

२) डॉ.भूषण जोरगुलवार शहापूरकर, आंतरराष्ट्रीय संबंध,

३) डॉ.शैलेंद्र देवळाणकर, समकालीन जागतिक राजकारण,विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

४) डॉ. मेहत्रे डी.एच., भारताचे परराष्ट्र धोरण,

५) डॉ. अमृतकर प्रशांत, आंतरराष्ट्रीय संबंध,चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

६) डॉ. गुप्ता सतीश, भारत की आंतरराष्ट्रीय विदेश निती, इशिका पब्लिशिंग हाऊस, जयपुर.

# भारतीय परराष्ट्र धोरण आणि विकास

**प्रा. डॉ. गणेश मनोहर लिंबोळे**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग. मविप्र कर्मवीर आबासाहेब तथा ना. म. सोनावणे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सटाणा. ता. बागलाण. जि. नाशिक-.४२२३०१.

**गोषवारा :**

भारताने परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे पहात असताना 'वसुधैव कुटुंबकम' या मुल भारतीय संस्कृतीचा विचार आत्मसात केलेला आहे. भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांना ओळखले जाते. भारताने अलिप्ततावादी धोरणाचा पुरस्कार शीतयुद्ध काळात करून अमेरिका आणि सो.रशिया यांच्या राजकीय गटात सामील न होता स्वतंत्र विचार जोपासला. सन १९५० नंतर पंचशील तत्व भारतीय परराष्ट्र धोरणाचा महत्वाचा भाग होता. सन १९९० नंतर भारताने स्वीकारलेली समाजवादी लोकशाहीची जागा उदारमतवादी भांडवलशाही व्यवस्थेने व्यापली. सन २००४ नंतर भारतीय परराष्ट्र धोरण पश्चिमेला अधिक पूरक राहिले आहे. जागतिक राजकारणात महत्वाची भूमिका महत्वाची आहे. भारत हि आज उभारती महासत्ता आहे.

**संशोधन लेखाची वैशिष्टे :**

1) **भारताचे परराष्ट्रीय धोरण ऐतिहासिकदृष्ट्या वासाहातिक काळातील परराष्ट्र धोरण अभ्यासने**
2) **भारतीय परराष्ट्र धोरणाची पंडित नेहरूची भूमिका आणि विचारधारा यांचा आढावा घेणे.**
3) **१९९० नंतर आंतरराष्ट्रीय परीस्थिती मधील बदलाच्या चौकटीत भारताचे परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणे. .**

भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची जडणघडण स्वातंत्र्यपूर्व ब्रिटीश काळात झालेली दिसते. राष्ट्रीय सभा आणि नंतरच्या भारतीय काँग्रेसने आंतरराष्ट्रीय प्रश्नांसंबंधी वेळोवेळी स्वीकारलेल्या धोरणातून आपले परराष्ट्र धोरण दृष्टीपथास येते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीला जागतिक पातळीवरील वसाहतवादाशी जोडून भारतीय स्वातंत्र्य चळवळीला जागतिक पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न राष्ट्रीय सभा अथवा राष्ट्रीय काँग्रेसने केलेला होता. भारताने ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणाचा निषेध सतत केलेला आहे. अनेक आंतरराष्ट्रीय घटनांच्या संदर्भात भारताने स्पष्ट भूमिका घेतली आहे. इंग्रजांच्या खलीफाविरोधी धोरणाचा निषेध म्हणून भारतात खिलाफत चळवळ सुरू करण्यात आली. सन १९२० मध्ये आयरिस लोकांच्या स्वातंत्र्यलढ्यास भारताकडून पाठिंबा देण्यात आला होता. याशिवाय भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संयुक्त राष्ट्रांत माध्यमातून भारताने इंडोनेशिया, ट्युनिशिया, मोरोक्को, अल्जीरिया इ. आफ्रिकी-आशियाई देशांच्या मुक्तीसाठी भारताने उल्लेखनीय कार्य केले आहे. १९५६ मध्ये इंग्लंड व फ्रान्स यांनी सुएझ कालव्यासंबंधी केलेल्या सैनिकी हस्तक्षेपास भारताने त्याकाळी स्पष्ट विरोध केला केलेला होता. संयुक्त राष्ट्राच्या माध्यमातून वसाहतींना स्वातंत्र्य मिळावे यासाठी एक ठराव संमत करून त्याच्या अंमलबजावणी साठी एक २४ सदस्यांची समिती नेमली होती भारत हा या समितीचा प्रमुख सदस्य होता. तसेच दक्षिण आफ्रिकेतील वंशभेदाविरुद्ध जागतिक लोकमत संघटित करण्यासाठी भारताने खूप प्रयत्न केले दिसून येतात.

शीतयुद्धाच्या काळात अनेक प्रसंगी उदा. कोरियन युद्ध, इंडोचायना संघर्ष, सुएझचा पेचप्रसंग अशा प्रसंगी भारताने दोन्ही पक्षांत समझोता घडवून आणण्यासाठी पुढाकार घेतला होता. तिसऱ्या जगाच्या विकासाच्या दिशा निश्चित करण्यासाठी अलिप्त राष्ट्रांच्या परिषदा घेऊन त्यांतून आंतरराष्ट्रीय राजकारणात व संयुक्त राष्ट्रांत एक तिसरी शक्ती निर्माण करण्यात भारताचे योगदान महत्वाचे होते. यासाठी बेलग्रेड (१९६१), कैरो (१९६४), लूसाका (१९७०), अल्जिअर्स (१९७३) आणि कोलंबो (१९७६) येथे परिषदा भरविण्यात आल्याचे दिसून येते.

भारताने परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे पहात असताना 'वसुधैव कुटुंबकम' या भारतीय संस्कृतीचा विचार आत्मसात केलेला होता. भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून पंडित जवाहरलाल

नेहरू यांना ओळखले जाते. काँग्रेसने १९२८ मध्ये परराष्ट्रीय धोरणासाठी स्वतंत्र विभाग सुरू करून त्याची धुरा पंडित नेहरूंनी दिली होती. भारताला स्वातंत्र मिळाल्या नंतर सार्वभोम अशा स्वतंत्र परराष्ट्र धोरणाची निर्मिती पंडित नेहरूंच्या कालखंडात झाली. जागतिक पातळीवरती शीतमहायुध्द काळात आफ्रिका व अशिया राष्ट्रांच्या मिळून असणाऱ्या तिसऱ्या जगाचे नेतृत्व पंडित जवाहरलाल नेहरू यांनी नेतृत्व केले होते.

भारतीय परराष्ट्र धोरणात शीतयुद्धाकालीन कालखंडात आंतरराष्ट्रीय राजकारणाचे संदर्भ लक्षात घेऊन तिसऱ्या जगासाठी अलिप्ततावादी धोरणाचा पुरस्कार करून आपल्या देशाचा विकास साध्य करण्याची भूमिका पंडित नेहरूंनी स्पष्टपणे घेतली होती. नेहरूंच्या अलिप्ततावादी धोरणाचे चार प्रमुख तत्वे होते. यामध्ये १) शांतता २) निशस्त्रीकरण ३) विकास ४) परस्परावलंबित्व या तत्वांचा प्रामुख्याने समावेश आहे. याशिवाय भारताने १९५० मध्ये पंचशील धोरणाच्या आधारे आपले परराष्ट्र धोरण निश्चित केले होते. या पंचशील तत्वात १) प्रत्येक राष्ट्राची भौगोलिक एकात्मता सार्वभौमत्वाचा आदर करणे २) युद्ध व आक्रमणाचा विरोध ३) इतर राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे ४) समानता आणि परस्पर फायदा ५) शांततापूर्ण सहजीवन या धोरणाचा समावेश दिसून येतो. नेहरूंच्या या पंचशील धोरणाचा पुरस्कार आज जागतिक समुदायाने केल्यास खऱ्या अर्थाने 'वसुदेव कुटुंबकम' या उक्तीप्रमाणे जागतिक परिस्थिती निर्माण होईल अशा आशावाद दिसून येतो. याबरोबरच वसाहातिक कालखंडामध्ये स्वातंत्र्याच्या मागणीसाठी लढा देणारा सर्व राष्ट्रांना भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या माध्यमातून पाठींबा असल्याचे वेळोवेळी नमूद केले आहे. परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात भारताने याकाळात विशिष्ट अशा धोरणांचा स्वीकार केलेला होता. यामध्ये १) वसाहतवादास विरोध २) हुकूमशाहीस विरोध ३) वंशवादाचा विरोध ४) उदारमतवादी लोकशाहीचा स्वीकार ५) शांतता व मैत्रीपूर्ण सहकार्य ६) युद्धास विरोध ७) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता ८) आंतरराष्ट्रीय संघटनेला समर्थन अशा ठळक मुद्द्यांचा समावेश दिसून येतो.

पंडित नेहरू काळात भारतात स्वतंत्र परराष्ट्र मंत्री नेमले गेले नाहीत नंतरच्या कालखंडात वेगळा परराष्ट्रमंत्री नेमण्यात आला तरीही परराष्ट्र क्षेत्रात तत्कालीन पंतप्रधानाचा प्रभाव टिकून होता. भारत आणि पाकिस्थान यांच्यातील ताश्कंद करार आणि सिमला करार यांसारख्या महत्वाच्या वाटाघाटी तत्कालीन पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली झाल्या होत्या.

भारतीय नेत्यांना सुरुवातीच्या काळात पाकिस्तानकडून आपणास सर्वात जास्त धोका आहे असे वाटत होते. यामुळे त्याच दृष्टीकोनातून संरक्षण व्यवस्था सज्ज केली होती. पाकिस्ताnने अमेरिकेशी युती केल्यावरही स्वसामर्थ्याच्या बळावर त्याचे संभाव्य आक्रमण परतवण्याचा विश्वास भारताला होता. भारताची संरक्षक दले शस्त्रास्त्रांसाठी याकाळी इंग्लंडवर अवलंबून होती. त्यामुळे पाश्चात्य देशांशी दुरावा निर्माण झाला, तरी भारताने त्यांच्याशी आपले संबंध तोडले नाहीत. चीनमधील आणि भारत यांच्यातील हिमालयाचा अडसर लक्षात घेवून चीनकडून आपणास धोका नाही. त्यामुळे तत्कालीन चीनमधील साम्यवादी शासनास राजनैतिक मान्यता देऊन, संयुक्त राष्ट्रांत साम्यवादी चीनला प्रवेश मिळावा म्हणून भारताने प्रयत्न केले होते. सन १९५४ मध्ये भारत आणि चीन यांच्यात पंचशील करार झाला. परतुं सन १९६२ चीनच्या आक्रमणानंतर चीनसंबंधीची भारताची भूमिका चुकीची ठरली.

भारताने अलिप्ततावादी विचार स्वीकारला असला तरीही राष्ट्रहितास आवश्यक वाटेल तेव्हा त्यास मुरड घातलेली स्पष्ट दिसते. सन १९६२ च्या भारत-चीन युद्धानंतर भारताने अमेरिकेकडून लष्करी मदत घेतली. सन १९७१ मध्ये संभाव्य भारत-पाक युद्धात चीनने हस्तक्षेप करू करण्याची शक्यता लक्षात घेवून रशियाशी करार केला. पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या काळात भारत पाकिस्थान यांच्यात १९६५ मध्ये युद्ध झाले. या युद्धात भारताचा विजय झाला व आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची प्रतिमा उंचावली होती. नंतरच्या काळात पाकिस्तान व चीन या दोन्हींपासून भारतास संरक्षण करण्याची आवश्यकता निर्माण झाली. चीनने अणुस्फोट केल्यानंतर ही जाणीव अधिकच तीव्र झाली. रशिया-चीन यांच्यातील वाद यामुळे सन १९६२ नंतर भारताचे परराष्ट्रीय धोरण रशियाकडे धार्जिणे झाले

होते. भारताने रशियाकडून लष्करी व आर्थिक अशा महत्त्वाच्या क्षेत्रांत साह्य मिळविले. अणुतंत्रज्ञानाचा विकास करण्यासाठी भारताने कॅनडा व अमेरिका यांकडून साह्य मिळविले. सन १९७४ मध्ये भारताने अणुस्फोट केला. या क्षेत्रातही स्वावलंबी होण्यासाठी भारत प्रयत्नशील आहे. परतुं अद्यापही युरेनियमसाठी भारत अमेरिकेवर व युरोपियन देशावर विसंबून आहे.

लाल बहादूर शास्त्री यांच्यानंतर इंदिरा गांधी यांचा काळ परराष्ट्र धोरणातील वास्तववादाचा काळ म्हणून ओळखला जातो. भारताचे वाढते लष्करी सामर्थ्य, वेगाने आकार घेत असलेला आण्विक कार्यक्रम, बांगलादेशाच्या निर्मितीतील निर्णायक भूमिका, राष्ट्रहितासाठी अण्वस्त्रप्रसार बंदी करारावर स्वाक्षरी करण्यास दिलेला नकार व सोव्हिएत रशिया यांच्यातील करार या त्यांच्या काळातील महत्त्वाच्या बाबीतून आदर्शवाद पासून ते वास्तववाद हा बदल दिसून येतो.

राजीव गांधी यांच्या काळात त्यांनी शेजारील देशांशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कारकीर्दीत सार्कची स्थापना झाली. तसेच सन १९८७ साली श्रीलंकेशी करार करून शांती सेना पाठवली गेली. पी. व्ही. नरसिंह राव यांच्या कारकीर्दीत शीतयुद्धोत्तर जगातील बदलत्या राजकारणाचा परराष्ट्र धोरणावर प्रभाव पडला. त्यांच्या काळामध्ये जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारले गेले ज्यातून परराष्ट्र धोरणामध्ये आर्थिक मुद्दा कळीचा बनला. याच काळात 'पूर्वेकडे पहा' हे धोरण स्वीकारून भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये पूर्वेकडील देशांना महत्त्व प्राप्त करून दिले.

सन १९९० नंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर शीतमहायुद्धाचा अंत झाला व नवीन विश्वरचना निर्माण झाली. अस्तित्वात असणारी द्विध्रुवीय विश्व रचना समाप्त होऊन एकध्रुवीय व बहु ध्रुवीय अशा प्रकारची जागतिक व्यवस्था निर्माण झाली. बदलणाऱ्या आंतरराष्ट्रीय राजकीय परिस्थितीच्या अनुषंगाने भारतानेही आपल्या परराष्ट्र धोरणात परिस्थितीजन्य बदल केलेले दिसून येतात. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या परराष्ट्र धोरणास असणारी आदर्शवादी विचारसरणीची जागा वास्तववादी विचारधारेने घेतली. सन १९९० च्या कालखंडामध्ये तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव आणि अर्थमंत्री मनमोहन सिंग यांच्या काळात भारताने आर्थिक उदारीकरणाचा पुरस्कार करून व आर्थिक राजनय मजबूत करण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

सन १९९० नंतर भारताच्या परराष्ट्र धोरण हे अमेरिका आणि पश्चिमी राष्ट्र धार्जिण राहिले आहे. तत्कालीन परराष्ट्र मंत्री इंद्रकुमार गुजराल यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवी दिशा देण्याचे काम केले आहे. यामध्ये भारत पाक संबंध सुधारणे, दक्षिण आशिया पातळीवरील सदस्य राष्ट्रांमध्ये सहकार्य वाढविणे, भारताच्या आर्थिक व व्यापारी हितसंबंधांची जपणूक करणे, संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेत स्थान मिळविणे, आर्थिक व व्यापारी हितसंबंधांसाठी आसियान युरोपियन महासंघ यांच्यासोबत व्यापारी संबंध प्रस्थापित करणे अशा घटकांना प्राधान्य देण्यात आले. भारत आणि पाक या संबंधात विशेष कुटनीतीचा वापर करण्यात आला. यासाठी केंद्र व बाह्य अशा सिद्धांताचा वापर करून वादग्रस्त मुद्दा बाजूला सारून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात सहकार्य वाढविण्यावर भर देण्यात आला होता.

अटलबिहारी वाजपेयी यांच्या कारकीर्दीमध्ये परराष्ट्र धोरणामध्ये राष्ट्रीय हितसंबंधांना महत्त्व प्राप्त झाले . त्यांच्या काळात १९९८ साली दुसरी अणुचाचणी झाली त्यातून भारत हा अण्वस्त्रधारी देश आहे अशी जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा निर्माण झाली. राष्ट्रीय लोकशाही आघाडी शासनाच्या कालखंडात भारताने अधिक वास्तववादी धोरणाचा स्वीकार करून ११ मे व १३ मे १९९८ मध्ये भारताणे अण्वस्त्र चाचणी घेवून स्वतःस अण्वस्त्र राष्ट्र म्हणून घोषित केले. याचा परिणाम भारतावर अनेक प्रकारची आर्थिक बंधन अमेरिका व जागतिक समुदायाकडून लादण्यात आली होती. परतुं तत्कालीन भारताचे परराष्ट्रमंत्री जसवंत सिंग यांनी अमेरिकेचे उपपरराष्ट्रमंत्री स्ट्रॉब टॅलबोट यांच्यासोबत चर्चेच्या अनेक फेऱ्या करून भारताच्या अण्वस्त्र निर्मितीची धोरणाची आवश्यकता स्पष्ट केली. भारताचे

अण्वस्त्र धोरण हे प्रथम वापर नाही.(No first Use) आणि आत्मरक्षणासाठी आवश्यक तेवढ्याच अ्णवस्त्रच विकास (Minimum Credible Deterrence) तत्वांवर आधारलेला आहे.

वाजपेयी यांच्या काळात कारगिल युद्ध घडून आले ज्यामध्ये पुन्हा एकदा पाकिस्तानचा पराभव झाला. असे असले तरी त्यांनी पाकिस्तानशी सलोख्याचे संबंध ठेवण्याचा प्रयत्न अटल बिहारी वाजपेयी आणि डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळामध्ये होता. सन २००५ साली भारत व अमेरिका यांच्यामध्ये नागरी अणुकरार करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले व २००८ साली हा अणुकरार घडून आला. यामुळे अण्वस्त्र धोरणाला आपोआप जागतिक मान्यता मिळाली. पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या काळात परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून दहशतवाद हा मुद्दा आंतरराष्ट्रीय स्तरावर कळीचा बनवला गेला. परतुं याचा काळात भारताची आर्थिक स्थिती मजबूत होऊन उभरती महासत्ता म्हणून भारताची ओळख निर्माण झाली.

सन २०१४ साली नरेंद्र मोदी सत्तेवर आल्यावर त्यांच्या परराष्ट्र धोरणामध्ये दक्षिण आशियायी राष्ट्रांना प्रथम स्थान दिल्याचे दिसून येते. त्यांच्या मंत्रिमंडळामध्ये परराष्ट्र धोरण व राष्ट्रीय सुरक्षा या विषयांशी निगडित पदावर तज्ञ सनदी सेवकांची नियुक्ती झाली. नरेंद्र मोदी यांच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय संबंध, परराष्ट्र धोरण व राजनय हे महत्त्वपूर्ण विषयांकडे विशेष लक्ष पुरविले आहे. त्यांनी यूपीए सरकारची बरीच धोरणे पुढे सुरू ठेवली. पूर्वीच्या लूक ईस्ट पॉलिसीऐवजी 'ॲक्ट ईस्ट धोरण' व 'लूक वेस्ट' धोरणाची सुरुवात केली. मोदी यांच्या परराष्ट्र धोरणामध्ये व्यापाराबरोबरच सुरक्षा, संस्कृती, भू-राजकीय व भू-सामरिक मुद्द्यांना प्राथमिकता दिलेली दिसून येते. सन २०१४ ते २०२४ पर्यत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एकूण ७६ विदेश दौरे करून भारतीय परराष्ट्र व्यवहार व्यापक केले आहेत.

आज भारत जागतिक पातळीवर पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. ९ आणि १० सप्टेंबरला २०२३ रोजी भातात दिल्ली येथे जी २० समुहाच्या शिखर परिषद झाली. परिषदेचे अध्यक्ष पद भारताने भूषविले होते. यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची मोठी प्रतिमा उंचावली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर गेल्या काही वर्षांपासून अनेक घटना घडून गेल्या. प्रथम कोरोना महामारीचे संकट, रशिया- युक्रेन युद्ध आणि आता तैवानवरून चीन-अमेरिका संघर्ष अशा महत्वाच्या घडामोडी घडत आहेत. याच काळात नवीन जागतिक व्यवस्था उदयास येत आहे. अशा परिस्थितीत भारताने आर्थिक क्षेत्रात स्वतःला महत्त्वपूर्ण भूमिका घेतली आहे. BRICS, SCO ते QUAD अशा सर्व बहुराष्ट्रीय गटांमध्ये भारताचा सहभाग महत्वाचा आहे. शीतयुद्धाच्या समाप्तीने भारतासाठी विकासाची नवीन संधी निर्माण झाली आहे. आसियान देश, युरोपियन युनियन, मध्य आशिया ते आखाती देश, आफ्रिका आणि अगदी लॅटिन अमेरिकन आर्थिक गटापर्यंतच्या भारताने संबंध निर्माण केले आहेत. याशिवाय, भारताने युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि रशियासोबत वेळोवेळी धोरणात्मक संबंध जोपासले आहेत.

भारताने केवळ युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकाच नाही नव्हे तर फ्रान्स आणि इंग्लंड यांसारख्या युरोपातील मित्र राष्ट्रांशीही धोरणात्मक भागीदारीसाठी विविध करार केले आहेत. भारताने पूर्व आशियातील आर्थिक महासत्ता जपान आणि दक्षिण कोरियासोबतही असेच करार केले आहेत. तर जगातील एकमेकांचे प्रतिस्पर्धी राष्ट्रसमूह भारताला सक्रिय सहभागी करण्यासाठी विशेष प्रयत्न करीत आहेत. परंतु हे सर्व असूनही भारताने चातुर्याने आणि राजनयिक कौशल्याने विरोधी देशांशी आपले संबंध संतुलित ठेवले.

**संदर्भ.**

१ खरे विजय,२००८,जागतिक राजकारणात भारत, पुणे, के सागर पब्लिकेशन्स.

२ देवळाकर शैलेंद्र,२००७,भारतीय परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थितत्यतर,पुणे, प्रतिमा प्रकाशन.

३. देवळाकर शैलेंद्र,२०१७,भारतीय परराष्ट्र धोरण नवीन प्रवाह, पुणे, सकाळ प्रकाशन.

४.पाटील वा.भा.२०१५, भारताचे परराष्ट्र धोरण,जळगाव,प्रशांत पब्लिकेशन.

४ लोकसत्ता.

५ महाराष्ट्र टाईम्स.

7. Times of India.

# भारतातील डिजिटल बँकिंग : एक आर्थिक अभ्यास

**प्रा. डॉ. अनिल दिगंबर वाडकर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, श्री कुमारस्वामी महाविद्यालय औसा, जील्हा-लातूर, महाराष्ट्र

**सारांश**

"मानवी शरीरामध्ये जसे रक्तवाहिन्यांना महत्त्व आहे. तसे कोणतेही देशाच्या आर्थिक विकासामध्ये अधिकोषण व्यवसायाला महत्त्व आहे.जगामध्ये प्राचीन काळापासून अधिकोषन व्यवसाय सुरू आहे. प्रामुख्याने 18 व 19 व्या शतकामध्ये जगातील अनेक देशात या व्यवसायात हळुवारपणे सुधारणा सुरू झाल्या. अगोदरच्या काळात मानवाच्या गरजा या मर्यादित होत्या.व्यवहारांची संख्याही मर्यादित होती.परंतु 21 व्या शतकातील माहिती तंत्रज्ञानाच्या जलद प्रगतीमुळे जगभरातील बँकिंग व्यवसाय व त्यामधील व्यवहारांची संख्या प्रचंड वाढली आहे.त्यात भारतही मागे नाही. भारत हा लोकसंख्येच्या बाबतीत जगामध्ये दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. भारतीयांना बँकिंग विषयक पायाभूत सुविधा निर्माण करून देण्यात डिजिटल क्रांती ही काळाची गरज होती /आहे. डिजिटल क्रांतीमुळे बँकिंग क्षेत्रात इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, प्री.पेड कार्ड, एटीएम, यूएसएसडी, पी.एस.ओ., यु.पी.आय.इत्यादी डिजिटल व्यवहारासाठीचे घटक विकसित झाले.परिणामी वेळ व पैशांची बचत होऊन भारतीय अर्थव्यवस्थेत आर्थिक व्यवहारांत अचूकतेसह गतिमानता प्राप्त झाली.ही भारतीय अर्थव्यवस्थेतील मोठी उपलब्धी आहे."

**प्रस्तावना**

अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासात बँकिंग व्यवसाय अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका निभावतो. भारतामध्ये वैदिक काळात इसवी सन पूर्व 2000 ते 2014 आणि जातक कथांमध्ये इसवी सन पूर्व 600 ते 400 व्याजाने पैसे देणे घेण्याचा उल्लेख आढळतो. तसेच कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये ही इसवी सन पूर्व 375 ते 283 मध्ये बँकिंग व्यवसायाचा, व्याजाच्या दराचा उल्लेख आढळतो. भारतामध्ये अठराव्या शतकात 1720 मध्ये बँक ऑफ बॉम्बे आणि 1770 मध्ये बँक ऑफ हिंदुस्थान आणि 1773 मध्ये जनरल बँक ऑफ बेंगॉल आणि बिहारची स्थापना झाली होती. 19 व्या शतकात प्रेसिडेन्सी बँकेची कलकत्ता, मुंबई व मद्रास प्रांतात अनुक्रमे 1806, 1840 व 1943 ला स्थापना झाली. नंतरच्या काळात प्रेसिडेन्सी बँकांचे एकत्रीकरण होऊन 1921 साली इम्पिरियल बँक स्थापन झाली व 1955 मध्ये तिचे स्टेट बँक ऑफ इंडिया असे नामकरण करण्यात आले. एक एप्रिल 1935 मध्ये रिझर्व बँक ऑफ इंडिया ची स्थापना करण्यात आली. त्यानंतर आरबीआय मधील कृषी विभाग वेगळा करून, राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकासासाठी 1982 मध्ये, नाबार्ड ची स्थापना करण्यात आली.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात विशेषता इंदिरा गांधीजींच्या पंतप्रधान पदाच्या काळात देशातील सर्वसामान्यांच्या , शेतकऱ्यांच्या व भूमिहीन शेतमजुरांच्या गरजा ओळखून इंदिरा गांधीजींनी 1969 मध्ये 14 बँकांचे व 1980 मध्ये 06 बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. भारतातील ग्रामीण भागांच्या गरजा ओळखून 20 ऑक्टोबर 1975 रोजी सरकारने प्रादेशिक ग्रामीण बँकेची स्थापना केली. वास्तवात प्रादेशिक ग्रामीण बँकेच्या देशभरातील 26 राज्य व तीन केंद्रशासित प्रदेशात 43 बँका असून 21,856 इतक्या तिच्या शाखा आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेत प्रामुख्याने सरकारी, खाजगी, विदेशी आणि सहकारी अशा चार प्रकारच्या बँकां कार्यरत आहेत.

डिजिटल बँकिंग मध्ये डिजिटल पेमेंटला काही वेळा इलेक्ट्रॉनिक पेमेंट म्हटले जाते. मोबाईल, संगणक, मोबाईल वायरलेस डेटा, किंवा डिजिटल चैनल यासारख्या डिजिटल उपकरणाचा वापर करून पेमेंट एका खात्यातून दुसऱ्या खात्यात ट्रान्सफर केले जाते. भारत सरकार डिजिटल पेमेंट ला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष प्रयत्न करत आहे. 'डिजिटल इंडिया' हा या मोहिमेचा एक भाग आहे. अर्थव्यवस्थेला डिजिटल सक्षम करण्यासाठी 'फेसलेस, पेपरलेस, कॅशलेस' हे

उद्दिष्ट आहे. विविध इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा अवलंब करून व्यवहारातील रोकड विरहित पैशाची देवाण-घेवाण ही क्रिया डिजिटली पूर्ण करण्याच्या क्रियेस डिजिटल पेमेंट किंवा बँकिंग असे म्हणतात.

जगामध्ये सर्वप्रथम 1950 ते 1960 या दशकामध्ये डिजिटल बँकिंग (प्रिंटर पेपर याचा अवलंब करून)ला सुरुवात झाली. 1950 मध्ये जपानने त्यांच्या बँक क्षेत्रात पहिला एटीएम सुरू केला. 1970 मध्ये स्विझरलँड मध्ये पहिली डिजिटल बँक व्यवस्था सुरू झाली. 1980 मध्ये अमेरिकेत पहिला इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर (EFT) करण्यात आला. 1990 मध्ये इंटरनेटची सुरुवात झाली आणि जगभरामध्ये बँकिंग क्षेत्रात बँकिंगच्या पर्यायी साधनांचा विकास करण्याकडे कल वाढला. वर्ष 2000 मध्ये मोबाईल फोन मध्ये क्रांती घडून आली. परिणामी मोबाईल बँकिंग मध्ये तीव्र प्रगती झाली. वर्ष 2010 मध्ये भारतातील डिजिटल बँकिंगच्या व्यवसायात युनिफाईड पेमेंट इंटरफरन्स(UPI) आणि आधार इनबेल्ड पेमेंट सिस्टीम (AePS) प्रणाली एप्लीकेशन आणि सेवांचा वापर तत्परतेने सुरू झाला. 8नोव्हेंबर 2016 रोजी भारत सरकारने केलेल्या नोटबंदीच्या निर्णयानंतर, तसेच देशातील वित्तीय समावेशनासाठी भारत सरकारने केलेला अभिनव प्रयोग यामुळे बँकिंग क्षेत्रातील डिजिटल प्रणालीचा अवलंब अत्यंत तीव्र गतीने वाढून तो आज सर्वसामान्यांच्या द्वारे आपल्या दैनंदिन आर्थिक व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढल्याचा दिसून येतो.

भारतामध्ये 01 मार्च 2023 अखेर, सार्वजनिक क्षेत्रातील व्यावसायिक बँका - 12, खाजगी बँका 21, प्रादेशिक ग्रामीण बँका 43, राज्य सहकारी बँका 34, नागरी सहकारी बँका 49, विदेशी बँका 2, विदेशी बँकांच्या भारतामध्ये शाखा 46, प्रतिनिधी कार्यालयासह भारतात अस्तित्वात असलेल्या विदेशी बँका 22, पेमेंट बँका 6, खाजगी क्षेत्रातील लहान बँका 12 अस्तित्वात आहेत. याशिवाय अनेक लहान लहान बँका कार्यरत आहेत. प्रामुख्याने या सर्व बँकांमध्ये व त्यांच्या शाखा मध्ये देशभरात डिजिटल बँकिंगचा अवलंब करण्यात आलेला आहे. परिणामी देशातील बँकिंग व्यवसायातील व्यवहारांची संख्या तात्काळ व अचूक होत असल्यामुळे, भारतीय अर्थव्यवस्थेचा गतिमान विकास होत आहे.

**डिजिटल बँकिंगची परिभाषा**

"अचूक गतिमानतेसह अधिकोषण व्यवसायात इंटरनेट आधारित इलेक्ट्रॉनिक्स साधनाच्या साहयाने ग्राहकांना बँकिंग विषयक सेवा व व्यवहार तात्काळ देणाऱ्या प्रक्रियेला डिजिटल बँकिंग असे म्हणतात. ज्यामध्ये इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, यूपीआय, डिजिटल वॉलेट्स, एटीएम सेवा, यु एस एस डी,पी ओ एस, डेबिट कार्ड ,क्रेडिट कार्ड इत्यादीचा समावेश होतो."

देशातील जवळपास सर्वच बँका व त्यांच्या शाखा या देशभरामध्येच नव्हे तर, विदेशामध्येही आर्थिक व्यवहार करण्यासाठी मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, फोन बँकिंग, एसएमएस बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, प्रीपेड कार्ड, ट्रॅव्हल कार्ड, गिफ्ट कार्ड, पेट्रो कार्ड, विसा कार्ड, रूपे कार्ड, प्लॅटिनम कार्ड, एटीएम मशीन मधून पैसे काढणे व भरणे, टॅबलेट बँकिंग, पी ओ एस बँकिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, चाट बोट,भीम ॲप,NPCI ने तयार केलेले ॲप्स , फेब्रुवारी 2006 मध्ये BCSBI या संस्थेची डिजिटल बँकिंग व्यवसायातील सुरक्षितता व सांकेतिकरण यासाठी ची स्थापना,गुगल-पे, फोन-पे,पेटीएम,जिओ पेमेंट,अमेझॉन पेमेंट,इंडिया पोस्ट पेमेंट बँक, एअरटेल पेमेंट, फिनो पेमेंट इत्यादीच्या माध्यमातून बँकिंग क्षेत्रातील व्यवहार उत्तमरीत्या केले जात आहेत. देशातील सामान्यातील सामान्य नागरिकाद्वारे आपल्या दैनंदिन जीवनातील, झोपेतून उठल्यापासून झोपेपर्यंतच्या सर्व व्यवहारात (चहा पिणे, नाश्ता करणे,मोबाईल रिचार्ज, टीव्ही रिचार्ज, लाईट बिल भरणे, भाजीपाला खरेदी करणे, सार्वजनिक वाहतुकीद्वारे प्रवास करणे, किराणा खरेदी करणे, ऑनलाइन आवडत्या विविध वस्तू खरेदी करणे, इतरांची देणे देणे, बँकांमध्ये डिपॉझिट करणे, विविध सेवांचे चार्जेस देणे, इतरांकडून तात्काळ ऑनलाइन पैसे घेणे. इत्यादी)डिजिटल बँकिंगचा अवलंब केला जात आहे. परिणामी वेळ व श्रमाची तसेच पैशाची बचत होत आहे.

**शोधनिबंधाचे महत्त्व**

जगामध्ये प्रत्येक राष्ट्र आर्थिक मक्तेदारी निर्माण करण्याच्या उद्देशाने जीवघेणी स्पर्धा करून आपले अस्तित्व निर्माण करण्याचा व टिकविण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याचबरोबर वाढत्या लोकसंख्येला , उद्योजकांना, बाजारपेठेतील व्यापाऱ्यांना व ग्राहकांना तात्काळ आणि अचूकपणे त्यांचे व्यवहार पूर्ण करता करता यावेत यासाठी तसेच भारतीय अर्थव्यवस्थेचे संख्यात्मक व गुणात्मक आकारमान वाढावे यासाठी अधिकोषण व्यवसायात झालेली डिजिटल क्रांती हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व निदानात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. शोधनिबंधासाठी प्रामुख्याने द्वितीय माहिती सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये विशेषता शासकीय व निमशासकीय प्रकाशनाद्वारे प्रकाशित ग्रंथ, संबंधित शासन संस्थांचे अहवाल, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे इत्यादीचा अवलंब करण्यात आला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

प्रस्तुत शोधनिबंधाला योग्य दिशा मिळण्यासाठी काही महत्त्वपूर्ण उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेतती पुढील प्रमाणे…

1) भारतातील डिजिटल बँकिंगचे स्वरूप अभ्यासणे
2) डिजिटल बँकिंगचा विकासात्मक आढावा घेणे
3) डिजिटल बँकिंग मधील संधी व आव्हानांचा शोध घेणे
4) महत्वपूर्ण निष्कर्ष काढणे

**डिजिटल बँकिंगचे स्वरूप**

भारतातील डिजिटल बँकिंग मध्ये नाविन्यपूर्ण क्रांती घडून आली आहे. देशातील ग्राहकांना संगणक, स्मार्टफोन आणि टॅबलेट यासारख्या इलेक्ट्रॉनिक उपकरणाचा वापर करून सोयीस्करपणे आणि सुरक्षित बँकिंग व्यवहार करण्याची परवानगी देणाऱ्या सेवा या प्रणालीमध्ये पुरविल्या जातात.

**1) इंटरनेट बँकिंग:-** डिजिटल बँकिंग चा हा एक प्रकार असून इंटरनेट द्वारा जोडणी असलेल्या, संगणक, मोबाईल किंवा टॅबलेट या इलेक्ट्रॉनिक्स माध्यमाद्वारे बँकेच्या वेबसाईट द्वारे सुरक्षित व्यवहार या प्रणालीमध्ये करता येतो. इंटरनेट बँकिंग मध्ये बँकेत खाते असलेल्या ग्राहकाला सुरक्षित लॉगिन आयडी आणि स्ट्रॉंग पासवर्ड तयार केल्यानंतर तसेच ओटीपी च्या माध्यमातून बँकिंग संकेतस्थळावर इच्छित बँकिंग व्यवहार सुरक्षितपणे करता येतात.

**2) मोबाईल बँकिंग:-** देशातील अधिकोषन व्यवसायात कार्यरत असलेल्या बँकांद्वारे बँकिंग व्यवहाराचे ॲप्स तयार करण्यात आलेले असतात. संबंधित बँकेच्या संकेतस्थळावरून ग्राहकाला बँकेचे ॲप् आपल्या मोबाईलवर किंवा टॅबलेट वर डाऊनलोड करता येते. बँकेद्वारे एटीएम कार्ड ग्राहकांना दिलेले असते. या एटीएम कार्डच्या साहयाने बँकिंग ॲप आपल्या मोबाईल फोनवर सक्रिय करून त्याला स्ट्रॉंग पासवर्ड देऊन डिजिटली आर्थिक व्यवहार करता येतात. यामध्ये खात्यावरील शिल्लक तपासणे, निधी हस्तांतरित करणे, बिले भरणे, कर्जासाठी अर्ज करणे, चेक बुक, नवीन एटीएम कार्ड यासाठी अर्ज करणे यासारखे व्यवहार करता येतात.

**3) एटीएम कार्ड:-** भारतामध्ये अनेक आर्थिक व्यवहारांमध्ये एटीएम कार्ड मोठ्या प्रमाणात वापरले जाते. बँका आपल्या ग्राहकांना तात्काळ आर्थिक सेवा प्रदान करण्यासाठी ग्राहकाच्या खात्याशी निगडित एटीएम कार्ड पुरवठा करतात. या एटीएम कार्ड चे अनेक वैशिष्ट्ये आहेत. त्यामध्ये डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, प्री पेड कार्ड, ट्रॅव्हल कार्ड, गिफ्ट कार्ड, पेट्रो कार्ड इत्यादी प्रकार आहेत. त्यामध्येही अनेक उपप्रकार आहेत या कार्डच्या साहयाने आपल्या दैनंदिन जीवनातील तसेच विशिष्ट आर्थिक व्यवहार डिजिटल सुरक्षितपणे पूर्ण करू शकतो.

**4) यु एस एस डी:-** डिजिटल व्यवहाराच्या या प्रकारामध्ये मोबाईल फोनवर *99#हा क्रमांक टाकून आर्थिक व्यवहार करता येतात. या प्रकारामध्ये कोणत्याही प्रकारचे ॲप डाऊनलोड करण्याची आवश्यकता नाही. तसेच इंटरनेटची गरज नाही. नॅशनल पेमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया NPCI आणि अनस्ट्रक्चरड सप्लीमेंट्री सर्विस डेटा या संस्थांनी या सेवेला प्रोत्साहन दिले आहे. यु एस एस डी द्वारे ग्राहकाला आपले मर्यादित आर्थिक व्यवहार करता येतात.

**5) एटीएम मशीन सेवा:-**ग्राहकाला आपल्या खात्यातून इतरांच्या खात्यात एटीएम मशीनच्या सहाय्याने डिजिटल आर्थिक व्यवहार करता येतात, निधीचे हस्तांतरण करता येते. आपल्या खात्यातील रक्कम खात्याचा व्यवहार तपशील चेक करता येतो. तसेच आपल्या खात्यावरून रोख पैसे काढता येतात व खात्यात पैसे भरता सुद्धा येतात. एटीएम कार्डचा पिन चेंज करता येतो. ही सेवा 24×7 तास सुरू असते.

**6) पी ओ एस टर्मिनल्स:-** डिजिटल आर्थिक व्यवहार करण्यासाठी वापरले जाणारे हे एक इलेक्ट्रॉनिक्स मशीन आहे. बाजारातील दुकानांमध्ये अनेक कार्ड पेमेंट करण्यासाठी पॉईंट ऑफ सेल POS या मशीनचा वापर केला जातो. क्रेडिट आणि डेबिट कार्ड  रीड करण्यासाठी, मशीनमध्ये सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर मध्ये बसवले जाते. पीओएस मशीन ग्राहकाच्या कार्डची वैधता, अचूकता तपासते. यानंतर आपणास गोपनीय संकेतांकाच्या साह्याने किंवा ओटीपी द्वारे आपला व्यवहार पूर्ण करता येतो. तसेच ही सेवा सेवा मोबाईल फोन व इंटरनेटवर देखील उपलब्ध आहे. पी ओ एस टर्मिनल चे विविध प्रकार आहेत उदाहरणार्थ भौतिक पीओएस, मोबाईल पीओएस आणि स्टोअर मध्ये असतात.तसेच पेट्रोल पंपावर ही असतात.याद्वारे आपणास आपल्या व्यवहाराचे सुरक्षित डिजिटल पेमेंट करता येते.

**7) युनिफाईड पमेंट इंटरफेस (UPI):-** डिजिटल बँकिंग मधील ही एक रियल टाईम पेमेंट सिस्टीम आहे. यूपीआय ही एक प्रकारची इंटरऑपरेबल पेमेंट प्रणाली आहे. तिच्या सहाय्याने कोणतेही बँक खाते असलेला ग्राहक, यूपीआय आधारित ॲपच्या सहाय्याने पैसे पाठवू शकतो आणि प्राप्त ही करू शकतो. ही सेवा स्मार्टफोनवरील यूपीआय ॲप वर एकापेक्षा जास्त बँक खाते लिंक करण्यासाठी मान्यता देते. यूपीआय चा मुख्य फायदा म्हणजे ते वापरकर्त्यांना बँक खाते क्रमांक किंवा IFSC कोड शिवाय पैसे पाठवू शकतो. या व्यवहारात फक्त वर्चुअल पेमेंट ॲड्रेस ची गरज असते. डिजिटल मार्केटमध्ये अनेक ॲप्स आहेत.Android आणि IOS दोन्ही प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत. यूपीआयने  भारतात कमी काळात अत्यंत व्यापक लोकप्रियता प्राप्त केली आहे. अलीकडच्या काळात त्याचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे.

**8 ) मोबाईल वॉलेट:-** वर्तमानामध्ये डिजिटल स्वरूपात आपले अनेक आर्थिक व्यवहार तात्काळ करण्यासाठी,मोबाईल वॉलेट ही सेवा अत्यंत महत्वपूर्ण ठरत आहे. अँड्रॉइड किंवा आयओएस प्रणाली असलेल्या कोणत्याही मोबाईल वरून प्ले स्टोअर मधून ॲप डाऊनलोड करून ती वापरली जाऊ शकते. डिजिटल किंवा मोबाईल वॉलेट बँक खाते डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड माहिती किंवा बँक खाते माहिती, एनकोड केलेल्या स्वरूपात सुरक्षित व्यवहाराची परवानगी देते.कोणतीही व्यक्ती मोबाईल वॉलेटमध्ये पैसे जमा करू शकतो आणि ते पेमेंट करण्यासाठी किंवा वस्तू आणि सेवा खरेदी करण्यासाठी वापरू शकतो यामुळे क्रेडिट आणि डेबिट कार्ड वापरण्याची किंवा सी व्ही व्ही किंवा चार अंकी पिन लक्षात ठेवण्याची गरज नाही. भारतीय अर्थव्यवस्थेत तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील बदलामुळे डिजिटल मोबाईल वॉलेट्सचे विविध ॲप डिजिटल बाजारात आलेले आहेत.उदा. Paytm, Google pay, Amazon pay, phone pay, Freecharge, Bhim app, ICICI pockets, Jio money, HDFC pay zapp, City master pass, MobiKwik,Yono SBI,Ola money, M, Vodafone m Pesa,Oxygen ,Citrus pay, Airtel payment Bank ,Pay money, Momoexpress इत्यादी एम वॉलेटचा वापर डिजिटल बँकिंग मध्ये केला जातो. मोबाईल वॉलेट द्वारे बाजारातील विविध आर्थिक व्यवहार जसे की पेमेंट करणे, निधी स्वीकारणे, व्यवहाराचा तपशील पाहणे, ऑनलाईन खरेदी करणे यासारखी विविध कार्य करू शकतो.

**9) BHIM ॲप:-** भारतीय डिजिटल बँकिंग मध्ये भीम ॲप हे एक प्रकारचे आर्थिक व्यवहाराचे इलेक्ट्रॉनिक साधन आहे. यूपीआय एप्लीकेशन वापरून आपण पेमेंट करू शकतो. यूपीआयच्या सहकार्याने देखील कार्यकर्ते आणि व्हीपीए वापरून व्यवहार केले जाऊ शकतात. कोणतीही व्यक्ती आपले बँक खाते भीम सहजपणे लिंक करू शकते. तसेच एकापेक्षा अधिक

बँक खाते देखील या ॲप्लिकेशन ना जोडणे शक्य आहे. रोख व्यवहारापेक्षा डिजिटल पेमेंट खूप सोपे आणि सुरक्षित आहे. ते रोख पेमेंट पेक्षा अधिक सोयीस्कर आहेत. डिजिटल आर्थिक व्यवहारामुळे रोख रक्कम सोबत बाळगण्याची आवश्यकता नाही. आर्थिक व्यवहार सुधारण्यासाठी व त्याची गतिमानता वाढविण्यासाठी डिजिटल पेमेंट हे एक महत्त्वाचे साधन आहे. डिजिटल पेमेंटच्या साहयाने आपण विमा, विविध बिले भरणे, बचत करणे ,बाजारातील आर्थिक व्यवहार करणे इत्यादी कार्य सुरक्षितपणे करू शकतो.

**10) इलेक्ट्रॉनिक डेटा इंटरचेंज EDI:-** डिजिटल बँकिंग क्षेत्रात EDI हे एक नवीन तंत्रज्ञान आहे. प्रमाणित इलेक्ट्रॉनिक स्वरूपाचा अवलंब करून संस्था मधील माहितीच्या देवाण-घेवाणीचे कार्य करते.

**11) इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरण EFT:-** अलीकडच्या काळात अधिकोषण व्यवसायात एका बँकेतून दुसऱ्या बँकेत निधीचे इलेक्ट्रॉनिक हस्तांतरण इ एफ टी च्या साहयाने करता येते. यामध्ये नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर NEFT रियल टाईम ग्रॉस सेटलमेंट, RTGS तात्काळ पेमेंट सेवा, IMPS अशा स्वरूपाचे डिजिटल आर्थिक व्यवहार करता येतात. एकविसाव्या शतकातील माहिती तंत्रज्ञानाच्या काळामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेत डिजिटल बँकिंगच्या क्षेत्रात व्यापारी, ग्राहक, उद्योजक, सर्वसामान्य भारतीय यांचे आर्थिक व्यवहार अचूक व गतिमान होण्यासाठी, त्यांची वेळ व श्रम वाचविण्यासाठी इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या आधारे इलेक्ट्रॉनिक डिवाइसच्या माध्यमातून भारतीय बाजारपेठेत डिजिटल बँकिंगने क्रांती घडवून आणलेली आहे. या व्यवहारात काही अडचणी निर्माण झाल्या तर ग्राहकाचे शंका निरसन करण्यासाठी चॅटबॉट, ईमेल, हेल्पलाइन नंबर इत्यादी ऑनलाइन सुविधा निर्माण करून देण्यात आले आहेत.

**भारतातील डिजिटल बँकिंगचा विकास**

देशातील डिजिटल बँकिंगच्या प्रणालीमध्ये इंटरनेट बँकिंग मोबाईल बँकिंग यूपीआय डेबिट कार्ड क्रेडिट कार्ड ई वॉलेट इत्यादी इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे बँकिंग व्यवहार अचूक व गतिशील पणे केले जात आहेत. वर्ष 2000 नंतर डिजिटल बँकिंग व्यवहाराला प्रचंड गती प्राप्त झाल्याची दिसून येते. डिजिटल बँकिंग चा विकास करण्यामध्ये NPCI व BCSBI या संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे दिसून येते.देशामध्ये डिजिटल बँकिंगच्या माध्यमातून केलेल्या व्यवहारांची संख्या व कोणकोणते इलेक्ट्रॉनिक माध्यमे डिजिटल बँकिंग शी जोडले गेले आहेत हे आपणास पुढील सारणी वरून लक्षात येते.

**भारतातील डिजिटल बँकिंग UPI व्यवहाराची संख्या व मूल्य**

| अ.क्र. | वर्ष | UPI वर पेमेंट पार्टनरची संख्या | व्यवहारांची संख्या दशलक्ष | भारतीय रुपयातील मूल्य दशलक्ष | USD मूल्य अब्ज |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2016 | 35 | 2.65 | 8930.7 | 0.12 |
| 2 | 2017 | 67 | 418.8 | 5,70,208.7 | 7.7 |
| 3 | 2018 | 129 | 3,746.32 | 58,57,104.5 | 79.04 |
| 4 | 2019 | 144 | 10,787.54 | 1,83,66,381.8 | 247.86 |
| 5 | 2020 | 207 | 18,880.89 | 3,38,77,447.2 | 457.19 |
| 6 | 2021 | 282 | 38,744.55 | 7,15,92,858.0 | 966.17 |
| 7 | 2022 | 382 | 74,044.48 | 12,59,48,187.3 | 1,699.71 |
| 8 | 2023 | 522 | 1,17,675.97 | 18,28,44,068.2 | |

या डेटामध्ये ऑगस्ट 2018 नंतर त्याच खात्यात डेबिट/ क्रेडिट असलेले व्यवहार वगळले आहेत.

वरील सारणी वरून 2016 ते 2023 या वर्षांमधीलदेशांमध्ये डिजिटल बँकिंग व्यवसायात झालेल्या व्यवहारांची संख्या व त्याचे मूल्य प्रवृती आपल्या निदर्शनास येते.

**UPI व्यवहारातील प्रमुख ॲपचा बाजारातील हिस्सा**

| अ.क्र. | मोबाईल बँकिंग ॲप | व्यवहाराचे मूल्य रुपये | टक्केवारी % | श्रेणी क्रमांक | व्यवहाराची संख्या दशलक्ष | टक्केवारी | श्रेणी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Phone Pe | 5,247,424,900,000 | 49.25 | 1 | 2,993.83 | 47.33 | 1 |
| 2 | Google Pay | 3,666,690,900,000 | 34.42 | 2 | 2,130.63 | 33.68 | 2 |
| 3 | Pay TM | 1,111,496,600,000 | 10.43 | 3 | 933.88 | 14.76 | 3 |
| 4 | Cred | 197,164,300,000 | 1.85 | 4 | 14.89 | 0.24 | 9 |
| 5 | Yes Bank Apps | 152,360,400,000 | 1.43 | 5 | 60.80 | 0.96 | 5 |
| 6 | ICICI Bank Apps | 115,092,900,000 | 1.08 | 6 | 37.34 | 0.59 | 7 |
| 7 | BHIM | 78,239,500,000 | 0.73 | 7 | 24.48 | 0.39 | 8 |
| 8 | Amazon Pay | 67,518,000,000 | 0.63 | 8 | 68.77 | 1.09 | 4 |
| 9 | Axis Bank Apps | 12,139,500,000 | 0.11 | 9 | 53.99 | 0.85 | 6 |
| 10 | Airtel Payments App | 5,552,600,000 | 0.05 | 10 | 1.41 | 0.12 | 10 |

वरील सारणी मध्ये डिजिटल बँकिंग व्यवहारात UPI द्वारे, विविध मोबाईल ॲप च्या साहयाने झालेल्या व्यवहाराचे मूल्य, त्याची टक्केवारी, श्रेणी, व्यवहारांची संख्या व त्याची टक्केवारी व श्रेणी दर्शविण्यात आली आहे .यामध्ये प्रामुख्याने फोन पे,गुगल पे, पेटीएम, क्रेड, येस बँक ॲप, आयसीआयसीआय बँक ॲप, भीम ॲप ,ॲमेझॉन पे, ॲक्सिस बँक ॲप, एअरटेल पेमेंट ॲप इत्यादी प्रमुख ॲपच्या व्यवहारांचा तपशील दर्शविण्यात आला आहे.

**डिजिटल बँकिंग क्षेत्रातील आव्हाने**

संपूर्ण जग माहिती तंत्रज्ञानाच्या युगात प्रचंड गतीने झेप घेत आहे. दिवसेंदिवस सातत्याने नवनवीन बदल व नवनवीन तंत्रज्ञान बाजारात उपलब्ध होत आहे. बदलत्या काळाबरोबर व तंत्रज्ञानाबरोबर आपण बदललो नाही तर अनेक आव्हानांना आपणास सामोरे जावे लागते. डिजिटल बँकिंग क्षेत्रासमोरील अनेक आव्हाने आहेत ती पुढील प्रमाणे

**1)डिजिटल साक्षरता:-** डिजिटल बँकेचे व्यवहार करत असताना अजूनही बहुसंख्य भारतीयांना त्याबाबतीतले संपूर्ण ज्ञान अवगत नाही. परिणामी बँकिंग व्यवहार करत असताना अनेक चुका होतात आणि त्यामुळे आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते. यासाठी डिजिटल बँकिंग व्यवहारा बाबत साक्षर होणे एक आव्हान आहे.

**2) इंटरनेट कनेक्टिव्हिटी:-** माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात इंटरनेट कनेक्टिव्हिटी उच्च दर्जाची निर्माण झाली असे आपण ऐकतो. 4g ,5g,7g नेट कनेक्टिव्हिटी आहे. किंवा 100 MBPS ,400 MBPS स्थिर स्पीड आहे असे ऐकतो. काही ठिकाणी अनुभवतो परंतु अजूनही उत्तम दर्जाची स्थिर गती असलेली नेट कनेक्टिव्हिटी संपूर्ण भारतीय पर्यंत किंवा असे बँकिंगचे आर्थिक व्यवहार डिजिटल रित्या करणाऱ्या पर्यंत पोहोचलेली नाही. त्यामुळे डिजिटल आर्थिक व्यवहार सक्षमपणे करण्यास अडथळे येत आहेत.

**3)सुरक्षितता:-** डिजिटल बँकिंग व्यवहार करत असताना इलेक्ट्रॉनिक साधनावर म्हणजेच संगणक, लॅपटॉप, टॅबलेट, मोबाईल फोन यामध्ये विविध कुकीजची बेधडकल एन्ट्री होते. त्यासाठी उच्च दर्जाचे फायरवाल, अँटीव्हायरस ऍक्टिव्ह असणे गरजेचे आहे. तरी परंतु हॅकर्स या सर्व प्रणाली तोडून ग्राहकाचा डेटा चोरी करून आर्थिक फसवणूक करत आहेत.

**4)इलेक्ट्रॉनिक साधनांची उपलब्धता:-** डिजिटल बँकिंग प्रणालीतील व्यवहारांची गती वाढविण्यासाठी भारतीय कडे अशा प्रकारचे इलेक्ट्रॉनिक डिवाइस सुरक्षित इंटरनेट कनेक्टिव्हिटी सह उपलब्ध असणे आवश्यक आहे. परंतु अजूनही देशातील 35 ते 40 टक्के सर्वसामान्य भारतीयांच्या मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत. त्यांना आपल्या जीवनामध्ये रोजगार अन्न वस्त्र निवारा आरोग्य शिक्षण या गोष्टीसाठी संघर्ष करावा लागत आहे तर मग चांगल्या दर्जाचे लॅपटॉप संगणक किंवा

मोबाईल फोन कसे उपलब्ध होणार? बँकेमध्ये खाते असणाऱ्या सर्व ग्राहकाकडे चांगल्या दर्जाचे इलेक्ट्रॉनिक डिव्हाइस बँकिंग व्यवहारासाठी उपलब्ध होणे हे एक आव्हान आहे.

**5) नियमांचे पालन:-** डिजिटल बँकिंग व्यवहारासंबंधी रिझर्व बँकेने तसेच NPCI व BCSBI ने व्यवस्थित नियमावली सर्व ग्राहकापर्यंत व वापरकर्त्यापर्यंत पोहोचवली पाहिजे. त्यासाठीचे प्रशिक्षण वर्ग राबवणे गरजेचे आहे. परंतु असे संपूर्ण क्षमतेने होत नसल्यामुळे, वापरकर्त्याकडून नियमांचे उल्लंघन होत आहे व डिजिटल बँकिंग व्यवहारात अडचणी निर्माण होत असल्याच्या दिसून येतात.

**6) ग्राहकांचे उत्पन्न:-** भारतीय अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बेरोजगारी आहे. काम करण्याची क्षमता असून सुद्धा अर्थव्यवस्थेत रोजगारांना काम उपलब्ध होत नाही परिणामी त्यांच्याकडे उत्पन्न नाही म्हणून अधिकोषण व्यवसायाशी ते जुळले जात नाहीत. ज्यांचे बँकेमध्ये खाते आहेत त्या खात्यामध्ये आवश्यक राशी सुद्धा ठेवता येणे शक्य नाही. त्यामुळे डिजिटल बँकिंग व्यवहारापासून खूप मोठा वर्ग अलिप्त रहात आहे.

अशाप्रकारे डिजिटल बँकिंग क्षेत्रामध्ये अनेक आव्हाने असले तरी भारताने डिजिटल बँकिंग व्यवहारात अल्पावधीतच प्रचंड यशस्वीता साध्य केली आहे हे नाकारता येत नाही.

**डिजिटल बँकिंग ची फायदे**

डिजिटल बँकिंग प्रणालीतून अनेक प्रकारचे फायदे होतात ती पुढील प्रमाणे.

**1) वेळेची बचत:-** डिजिटल बँकिंग तंत्रज्ञान आपल्या सोबत उपलब्ध असल्याने आपण कोठूनही आर्थिक व्यवहार करू शकतो. निधीचे हस्तांतरण करू शकतो, जगभरातील कोणत्याही पोर्टलवरून घरी बसून खरेदी करू शकतो, पैसे पाठवू शकतो पैसे स्वीकारू शकतो व्यवहाराचा तपशील चेक करू शकतो त्यामुळे ग्राहकांचा खूप मोठा वेळ वाचतो. बँकेत जाऊन तासंतास लाईनला उभे राहण्याची आवश्यकता नाही.

**2) श्रमाची बचत:-** डिजिटल बँकिंग व्यवसायामुळे सर्वसामान्यांच्या श्रमाची बचत होते. आपले महत्त्वाचे काम टाळून प्रत्यक्ष बँकेमध्ये जाऊन दिवसभर थांबून आर्थिक व्यवहार करावे लागत होते. परिणामी ग्राहकांचे श्रम मोठ्या प्रमाणात खर्ची पडत होते. डिजिटल बँकिंग मुळे क्षणभरात आपण आपले आर्थिक व्यवहार आपल्या कामावरून फोटो मी करू शकतो व आपल्या श्रमाची बचत होते.

**3) पैशाची बचत:-** अधिकोषण व्यवहार करण्यासाठी सर्वसामान्य माणसाला आपला रोजगार बुडवून, तसेच व्यापाऱ्यांना भांडवलदारांना आपले आर्थिक व्यवहार करण्यासाठी स्वतः बँकेमध्ये जाणे किंवा आपली माणसे बँकेत पाठवून देणे यासाठी पैसा खर्च करावा लागत असे. परंतु वास्तवात डिजिटल बँकिंग प्रणालीमुळे तेथे जाऊन उभे राहण्याची किंवा आपला रोजगार उडविण्याची आवश्यकता नाही आपण कोठूनही आपले आर्थिक व्यवहार क्षणभरात पूर्ण करू शकतो त्यामुळे पैशाची बचत होते.

**4) सहजता:-** डिजिटल बँकिंग प्रणाली चा वापर करणे सहज शक्य आहे. शिक्षित मुले इंटरनेट बँकिंग आयडी पासवर्ड च्या साह्याने व्यवहार करू शकतात. परंतु डिजिटल किंवा मोबाईल वॉलेट आल्यामुळे अकाउंट नंबर व IFSC कोड शिवाय फोन-पे, गुगल-पे, पे टी एम च्या साह्याने पैसे पाठवणे व स्वीकारणे सहज शक्य आहे.

**5) नियंत्रण:-** डिजिटल बँकिंग व्यवहारामध्ये आपल्या बँक खात्याचा तपशील आपण स्वतः हाताळत असल्यामुळे, आपल्या खात्यात जमा होणारी राशी व आपल्या खात्यातून रूपांतरित होणारी राशी यावर आपले पूर्ण नियंत्रण राहते. तसेच आपली देणी व घेण्याचे व्यवहार कोणत्या वेळेत करावयाचे आहेत यासंबंधीची सर्व माहिती आपल्याकडे उपलब्ध असते. त्यानुसार आपल्या आर्थिक व्यवहारावर आपणास नियंत्रण ठेवणे सहज शक्य होते. अशाप्रकारे ग्राहकाच्या वेळेनुसार ,बँकिंग नियमावलीनुसार, ग्राहकांना डिजिटल बँकिंग द्वारे त्यांचे आर्थिक व्यवहार सहज, सुलभरीत्या, कोणत्याही वेळेमध्ये श्रमाची ,वेळेची व पैशाची बचत करून पूर्ण करता येतात.

**डिजिटल बँकिंग सुरक्षितता उपाय**

भारतामध्ये लोकसंख्येचा खूप मोठा भाग अजूनही डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापराबाबत अनभीज्ञ आहे. बँकिंग क्षेत्रातील तंत्रज्ञानात्मक साक्षरता वाढीसाठी बँकांकडून प्रसारमाध्यमांकडून सरकारी एजन्सी कडून मार्गदर्शन केले जात असले तरी, अजूनही डिजिटल बँकिंगमध्ये ग्राहकांची फसवणूक मोठ्या प्रमाणात होत असल्याची अनेक उदाहरणे आहेत. यासाठी सुरक्षात्मक उपाय सुचवत आहे.

1) आपल्या संगणकामध्ये, मोबाईल मध्ये किंवा टॅबलेट मध्ये कोणतेही अनावश्यक ॲप्स डाऊनलोड करू नका. कारण संबंधित ॲप्स डाऊनलोड सोबत आपणास अनेक परवानगीची विचारणा केली जाते आणि आपण तेथील ओके बटन प्रेस करतो व आपल्या मोबाईल मधील अत्यंत महत्त्वपूर्ण डेटा जागतिक संकेतस्थळावर आपण खुला ठेवतो.
2) आपण हाताळत असलेल्या नेट बँकिंग चा आयडी आणि पासवर्ड, मोबाईल बँकिंगचा एमपीन, तसेच पासवर्ड, एटीएम चा पिन सुरक्षित ठेवला पाहिजे. डिजिटल इलेक्ट्रॉनिक डिवाइस वर तो कोठेही लिहून ठेवला ठेऊ नये.
3) आपल्या खात्याची नेट बँकिंग तसेच मोबाईल बँकिंग व डिजिटल वॅलेट या साधनांची माहिती इतर कोणालाही व्हाट्सअप ईमेल किंवा फोनवरून शेअर करू नये. ती गोपनीय ठेवण्यात यावी.
4) आपण वापरत असलेल्या डिजिटल आर्थिक व्यवहारांची माहिती व पासवर्ड, कितीही गरज असली तरी, कितीही निकटच्या व्यक्तींना ती सांगू नये गोपनीय ठेवावी.
5) आपल्या इलेक्ट्रॉनिक डिवाइस चा ब्लूटूथ सहसा सार्वजनिक जागी वापरू नये. कारण तिथे तुमची खाजगी महत्वाची असलेली माहिती ट्रान्सफर होऊ शकते. मोबाईल वरून बँकिंग व्यवहार करणे जरी सोयीचे असले तरी एक प्रकारे ते फार धोक्याचे आहे. म्हणून सार्वजनिक ठिकाणी ब्लूटूथ वापरू नये.
6) आपण ऑनलाइन रित्या कुठेही आपले खात्याचे लॉगिन आयडी व पासवर्ड लिहून ठेवू नये. तसेच डायरीवर लिहून ठेवलेले आयडी व पासवर्ड हे कोणाच्या हाती लागू नये याची दक्षता घ्यावी.
7) कोणतेही अनोळखी संकेतस्थळ उत्सुकतेने उघडू नका त्याला आपल्या डिवाइस मध्ये परवानगी देऊ नका.
8) आपल्या बँकिंग खात्याचे डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, पासपोर्ट इत्यादी संबंधी माहिती व त्याचे फोटो आपल्या मोबाईलवर स्टोअर करून ठेवू नये.
9) आपला मोबाईल चोरीला गेला किंवा हरवल्यास तात्काळ पोलीस ठाण्यामध्ये जाऊन तक्रार करा तसेच बँकेलाही तात्काळ कळवा.
10) बँकेतून फोन आला तर तो खरा असा असो की खोटा, त्यावर आपल्या बँकिंग खात्याची कोणतीही माहिती तसेच आपल्या एटीएम चा पिन, CVV नंबर, लॉगीन आयडी, पासवर्ड, कोणालाही कोणत्याही परिस्थितीत सांगू नका. आपली काही अडचण असेल तर प्रत्यक्ष बँक शाखेला जाऊन भेट द्या व अडचणीचे निरसन करून घ्या.
11) आपल्या संगणकावर, लॅपटॉपवर किंवा टॅबलेट वर चांगल्या कंपनीचे अँटीव्हायरस ऍक्टिव्ह ठेवा. जेणेकरून वायरसमुळे आपला डेटा हॅक होऊ शकणार नाही.
12) आपल्या एटीएम चा पिन, मोबाईल बँकिंगचा M Pin, तसेच इंटरनेट बँकिंग चा लॉगिन आयडी व पासवर्ड सातत्याने बदलत रहा. तसेच नवीन पासवर्ड व एम पिन ठेवत असताना आपली जन्मतारीख, गाडी नंबर, घर नंबर, मोबाईल नंबर, लग्न वर्ष असे ठेवू नका.कारण अशी सर्वसाधारण माहिती हॅकर्स सहज मिळऊ शकतात.
13) डिजिटल आर्थिक व्यवहार करत असताना संबंधिताचा खाते क्रमांक, आयएफसी कोड, बरोबर आहे किंवा नाही याची पूर्णता: खात्री केल्यानंतरच पेमेंट करा.

अशाप्रकारे डिजिटल बँकिंग द्वारे आर्थिक व्यवहार करत असताना सावधानता बाळगली तर निश्चितच आपली फसवणूक होणार नाही. तसेच श्रम, वेळ व पैशाची बचत होईल. आपल्या कामांमध्ये अधिक सोयीस्करपणा व गतीमानता निर्माण होईल.

**निष्कर्ष**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासावरून काही महत्वपूर्ण निष्कर्ष काढण्यात आली आहेत ती पुढील प्रमाणे.

1) भारतातील डिजिटल बँकिंग व्यवहारांची सुरक्षितता व अचूकता व गती वाढविण्याचे कार्य NPCI व BCSBI या संस्थांच्या कार्यक्षमतेमुळे अधिक वाढली आहे.
2) भारतीय डिजिटल बँकिंग प्रणाली मध्ये इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, एसएमएस बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, प्रीपेड कार्ड, ट्रॅव्हल कार्ड, गिफ्ट कार्ड, पेट्रो कार्ड, विसा कार्ड, रूपे कार्ड, प्लॅटिनम कार्ड, एटीएम मशीन मधून पैसे काढणे व भरणे, टॅबलेट बँकिंग,पी ओ एस बँकिंग, डिजिटल मोबाईल वॉलेट्सचे, बँकिंगचे विविध ॲप याचा समावेश होतो. बँकिंग व्यवहाराच्या या प्रगतीमुळे बँकिंग क्षेत्रात अमुलाग्र गतिमान बदल आहेत.
3) डिजिटल बँकिंग व्यवहारातील तंत्रज्ञानात्मक सुधारणेमुळे सर्वसामान्य भारतीयांचे आर्थिक व्यवहार व बँकिंग व्यवसायातील समावेश वाढला आहे. तसेच त्यांची वेळ, श्रम व पैसा याची बचत होत आहे.
4) भारतीय बँकिंग व्यवसायात अमुलाग्र बदल झाले असले तरी, डिजिटल बँकिंग व्यवहारात हॅकर्सच्या द्वारे मोठ्या प्रमाणात फसवणूक ही वाढत आहे. यासाठी इंटरनेटद्वारे घुसणारे मालवेअर, संगणक व मोबाईल बँकिंग वरील सर्व व्यवहाराची सुरक्षितता वाढविणे काळाची गरज आहे.
5) डिजिटल बँकिंग व्यवहार करणाऱ्या सर्व ग्राहकांनी संस्थाने आपल्या बँक खात्याशी निगडित सर्व प्रकारची माहिती गोपनीय ठेवावी. (विशेषता नेट बँकिंग आयडी व पासवर्ड, मोबाईल बँकिंग M पिन, एटीएम कार्ड पिन, प्रत्येक ग्राहकाने व वित्तीय संस्थेने, आपण व्यवहार करत असलेल्या इलेक्ट्रॉनिक डिवाइसवर, ॲक्टिव्ह ॲंटीव्हायरस कार्यरत ठेवावे व सातत्याने अपडेट करावे.) तसेच RBI, NPCI व CBSBI यांनी डिजिटल बँकिंग व्यवहारासंबंधी सांगितलेल्या सर्व नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची**


1) Indian banking,S.Natarajan/R.Parmeswaram, S.Chand publication New Delhi, January 2023.
2) Information technology & digital banking, Indian institute of banking and finance, Macmillan education India PVT, limited, January 2023
3) Digital Bank strategies to lanch or become a digital Bank,Charis Skinner, Embassy Books, January 2017.
4) रिझर्व बँक ऑफ इंडिया वार्षिक अहवाल, 2022- 23.
5) वित्त मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग, भारत सरकार वार्षिक अहवाल 2022- 23.
6) योजना मासिक, अंक 6, जानेवारी 2018, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार
7) आर्थिक समीक्षा, वार्षिक अहवाल 2022- 23, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार
8) https://www.thehindubusinessline.com/money-and-banking/upi-ends-2023
9) https://www.weforum.org/agenda/2023/06/india

# भारताच्या परराष्ट्र धोरणातील बदल

**कु. कांचन माधव गिरी**
एम.ए.(अर्थशास्त्र) बी.एड.
पीपल्स कॉलेज, नांदेड.
**डॉ. स्मिता उमाकांतराव कोंडेवार**
सहा.प्राध्यापक आणि संशोधक मार्गदर्शक. कैं. वसंतराव काळे वरिष्ठ महाविद्यालय नांदेड.

**गोषवारा (Abstract) :**

आपण आधुनिक काळातील राजकीय व्यवस्थेपासून अभ्यासले असता आपणाला असे लक्षात येते की, जगातील सर्वच राष्ट्रे ही आपल्या राष्ट्राच्या हितासाठी प्रयत्नशील दिसतात. व ते आपल्या राष्ट्रहिताचा विचार करीत असतात. प्रत्यक्षपणे करताना ते प्रत्येक राष्ट्र एकमेकांना नियंत्रित करण्याच्या प्रयत्नामध्ये असतात. आजच्या काळात राष्ट्रहिताचा विचार केला असता, परराष्ट्र धोरणाला अनन्यसाधारण महत्व दिलेले दिसून येते. त्यामुळे भारतातील परराष्ट्र धोरणाचा विकास होत असताना आपल्याला भारतीय परराष्ट्र धोरणाचा जो विकास झाला त्यामध्ये प्रामुख्याने स्वातंत्र्यपूर्वीचा कालखंड होता. त्यानंतर स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा कालखंड आणि जागतिकीकरणाच्या नंतरचा कालखंड अशा प्रकारे या स्तरावर विचार महत्त्वपूर्ण ठरते. कारण अनेक वेळा राष्ट्राराष्ट्रांमध्ये संघर्ष निर्माण होतात. त्याच पद्धतीने भारतातील परराष्ट्र धोरणाचे स्वरूप कशा पद्धतीने बदलत गेले आहे. त्यांचा आपण भारताच्या परराष्ट्र धोरणातील बदल या शोधनिबंधामध्ये अभ्यास करणार आहोत.

**प्रस्तावना (Introduction) :**

सर्वच देश सर्वगुणसंपन्न म्हणजे स्वयंपूर्ण असतात. व ते एकमेकांवर अवलंबून असतात. त्यामुळे कोणत्या राष्ट्रासोबत आपुलकीची भावना ठेवायची व कोणत्या राष्ट्रांमध्ये सम्मिलित व्हायचे इत्यादि बाबत प्रत्येक राष्ट्राला निर्णय घ्यावे लागतात. हे विचार करत असताना ते फार काळजीपूर्वक निर्णय घ्यावे लागतात. त्याला आपण परराष्ट्र धोरण असे म्हणू शकतो. सर्वोच्च शासन करता मार्फत परराष्ट्र धोरणाची निर्मिती होत असली, तरीसुद्धा आधुनिक काळातील लोकशाहीनुसार परराष्ट्रीय धोरणाची निर्मिती ही राज्य शासन कर्त्यांमार्फत असूनसुद्धा याचा वास्तविकरीत्या प्रभावा मोठ्या प्रमाणात मंत्रिमंडळावर पडत असल्याचे आपणास लक्षात येते, अशा या परराष्ट्र धोरणासंबंधित वेगवेगळ्या कायद्यांना व निर्णयांना कायदे मंडळाची संमती घ्यावी लागते. सध्याच्या आधुनिक युगातील माहिती व तंत्रज्ञानाच्या होकरामध्ये देखील कोणत्याही देशाला स्वयंपूर्ण नाही, ही सध्याची वस्तुस्थिती आहे. त्यामुळे प्रत्येक देशाला आपापल्या देशाचा राष्ट्राचा विकास घडवून आणण्यासाठी एकमेकांशी राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक अशा पद्धतीने संबंध ठेवावे लागतात. प्रत्येक राष्ट्राला आपापल्या देशाच्या विकासासाठी परराष्ट्र धोरण हे आखावी लागते. कारण प्रत्येक राष्ट्राच्या परराष्ट्रीय धोरणा आणि वेळ एकमेकांसोबत चांगल्या प्रकारचे संबंध निर्माण होऊन त्यास योग्य दिशा प्राप्त होते. कारण प्रत्येक राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावर त्या देशाचे विकास निर्भर असतो. परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत आपण खोलवर अध्ययन केले असता आपणास असे लक्षात येते की, एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राशी व्यवहार करणे हे होय. एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राशी केलेल्या व्यवहारात आपणास परराष्ट्र धोरण म्हणता येईल. यामध्ये परराष्ट्र धोरण आखताना प्रत्येक राष्ट्र आपल्या हितसंबंधांच्या दृष्टीकोणातून असल्याचे आपणास लक्षात येते.

**परराष्ट्र धोरण आणि राष्ट्र हितसंबंध**

परराष्ट्र धोरण हे आपल्या देशातील आर्थिक विकास व त्याची संरक्षण करण्याच्या उद्दिष्टाने आखण्यात येते, म्हणून राष्ट्रीय हितसंबंध हे देखील एक परराष्ट्र धोरणातील महत्त्वपूर्ण उद्दिष्टे म्हणून याकडे पाहिले जाते. भारतातील

स्वातंत्र्यच्या किती वर्षासह भारतात स्वतःच्या बाबतीमध्ये निर्णय घेतात. यामधे “राष्ट्रीय हित सर्वोपरी आहे”. हा त्या आंतरराष्ट्रीय संबंधांचा निश्चितचा मूलभूत सिद्धांत आहे. त्याच पद्धतीने भारताने सुद्धा आपल्या राष्ट्रीय सुरक्षा धोरणाचा बाबतीमध्ये इतर परराष्ट्रप्रमाणे आपले राष्ट्रीय हितसंबंध जोपासले गेले आहे.

**परराष्ट्र धोरणाच्या व्याख्या (Definations) :**

**प्रो.चार्ल्स बर्टन मार्शल,**

“परराष्ट्र धोरण म्हणजे राजकीय सत्तेने आपल्या क्षेत्राबाहेरील राजकीय वातावरणाला प्रभावित करण्यासाठी केलेली वाटचाल होय”.

**जोसेफ फ्रँकेल,**

“परराष्ट्र धोरणात निर्णय आणि कृतीचा समावेश असतो, ज्यामध्ये काही प्रमाणात एक राज्य आणि इतर संबंधाचा समावेश असतो”.

वरील व्याख्यांवरून आपणास असे लक्षात येते की, प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रांनी आपापल्या मतानुसार इतर राष्ट्राशी केलेला व्यवहार तसेच आपल्या देशातील व्यवहारांची एक संबंध निर्माण करणारी अंतरराष्ट्रीय पद्धत म्हणजे परराष्ट्रीय धोरण होय. परराष्ट्र धोरणामध्ये एका देशाचे दुसऱ्या देशाशी असलेल्या व्यवहारातून जी संबंध प्रस्थापित केले ज़ातात, त्याची अंमलबजावणी देखील आंतर राष्ट्रीय पातळीवर केली जाते. आपणाला असे म्हणता येईल की, आपापल्या राष्ट्राच्या हितासाठी काही उद्दिष्टे पाळली जावी तसेच ते वगळा निर्णय इत्यादींचा समावेश होता.

**संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे (Objective of Research plan) :**

1. भारताचे परराष्ट्र धोरण समजून घेणे.
2. परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे व तत्वे अभ्यासणे.
3. भारतातील परराष्ट्रीय धोरणाचे निर्धारक घटकांचे अध्ययन करणे.

**संशोधन पद्धती (Research Methodology) :**

सदरील संशोधनासाठी दुय्यम तथ्यांचा या शोधनिबंधामध्ये वापर करण्यात आला आहे. तसेच विविध ग्रंथ, विविध पुस्तके, मासिके, साप्ताहिके तसेच इंटरनेटवरून देखील माहिती संग्रहित केली गेली आहे.

**भारताचे परराष्ट्रीय धोरण**

सन 1947 पासून भारताला स्वातंत्र मिळून भारत आणि स्वतंत्रपणे आपले परराष्ट्र धोरण आखण्यास सुरूवात केली होती. आपल्या भारताच्या संविधानामध्ये जी मार्गदर्शक तत्वे आहेत त्या तत्वांमध्ये असे नमूद केले आहे की, राज्याने परराष्ट्र धोरण कशा पद्धतीने आखावे याविषयी सविस्तरपूर्वक तरतूद केलेली आहे. कलम 51 नुसार परराष्ट्रीय धोरणाची एक व्यवस्थितशी व्यापकता भारतातील 26 धोरणातील मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद केलेली आहे. जी त्याअन्वये भारत हा आपले राष्ट्रीय हित समोर ठेवून आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतातील शांतता व सुव्यवस्था तशी सुरक्षिततेच्या बाबतीमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील वाजवा तसेच समस्यादेखील शांततेच्या मार्गाने कशा पद्धतीने सोडवल्या जातील, याचे स्पष्टीकरण केले आहे. भारतीय परराष्ट्र धोरणामध्ये इतर राष्ट्रांशी मैत्रीसंबंध कशा पद्धतीने ठेवावेत. तसेच आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर करणे हे आपले महत्त्वपूर्ण असे उद्दिष्टे मानले आहे. तसेच भारताने परराष्ट्र धोरणासंबंधी उद्दिष्टे ही ठरवली आहेत. त्यांचा आढावा आपण खालील प्रमाणे घेऊयात;

**भारतातील परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्टे**

भारतातील परराष्ट्र धोरणामध्ये राष्ट्र हित समोर ठेवून काही उद्दिष्टे ही ठरवण्यात आली, जेणेकरून त्यातून आपला राष्ट्रांच्या विकासाची योग्य दिशा मिळेल. त्यामुळे भारतातील परराष्ट्र धोरणात वेगवेगळ्या प्रकारची उद्दिष्टे ही ठरवण्यात आली होती. ती उद्दिष्टे ही पुढील प्रमाणे आहेत.

1) भारताच्या शेजारील देशांशी व अन्य देशांशी मैत्रीपूर्ण संबंध जोपासणे. 4.आपल्या देशाच्या संरक्षणामध्ये कोणत्याही प्रकारचा होणार नाही, याची दक्षता घेणे.
2) आर्थिक विकासाच्या दृष्टीने भारताचे परराष्ट्रसोबत आर्थिक तसेच व्यापारी संबंध प्रस्थापित करणे.

3) आंतरराष्ट्रीय पातळीवर एकता सद्भावना तसेच राष्ट्रीय विकासासाठी समर्थन विकसित करणे
4) आपल्या राष्ट्राच्या हितासाठी शांततामय मार्गाने जागतिक अंतर्गत राजकारणामधील तूटवडा सोडवणे.

**भारतीय परराष्ट्र धोरणातील तत्वे**

भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये काही मूलभूत तत्वे होती. त्यामध्ये प्रामुख्याने अलिप्ततेचे धोरण, पंचशील तत्वां मध्ये साम्राज्यात वसादवादाला विरोध, वर्णभेदाचा विरोध, आशियाई आफ्रिकन राष्ट्रात मैत्रिणीचा भाव, सुरक्षितता आणि जागतिक शांतता, संयुक्त राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय संघटनांना सहकारी करणे, गुजराल सिद्धांत अशा पद्धतीने आपल्याला भारताच्या परराष्ट्र धोरणातील मूलभूत तत्वेही पहायवयास मिळतात. मूलभूत तत्वांमध्ये भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव टाकणारा घटकांचा देखील विचार केला. त्यापासून त्यामध्ये भारताच्या परराष्ट्र धोरणावर महात्मा गांधीजीनी अहिंसावाद आणि शांततेचा पुरस्कार तसेच रविंद्रनाथ टागोर यांच्या आंतरराष्ट्रीयवादाचा संकल्पनांचा तसेच महर्षि, इत्यादि विचारांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात पडल्याचे आपणास दिसून येते. त्याचप्रकारे पंडित जवाहरलाल नेहरूंचादेखील लोकशाही समाजवादाचा प्रभाव भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रामुख्याने असल्याचे लक्षात येते.

**भारतीय परराष्ट्र धोरण निर्धारित करणारे घटक**

परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक हे तात्कालिक व कायम स्वरूपी अशा दोन प्रकारचे असतात, त्यामुळे जे राष्ट्र आपले परराष्ट्र धोरण निर्धारित करीत असते. तेव्हा प्रत्येक राष्ट्राला आपल्या राष्ट्राची राष्ट्रीय हितबाह्य वातावरण त्याचप्रकारे अंतर्गत वातावरण, राष्ट्रीय मूल्य परराष्ट्र धोरणाची वेगवेगळी उद्देश व इतर राष्ट्रांचे घेतलेले निर्णय इत्यादी गोष्टी लक्षात ठेवून परराष्ट्र धोरणही निर्धारित करता येते.

**आपल्या देशाचे भौगोलिक घटक**

प्रत्येक राष्ट्राच्या परराष्ट्रीय धोरणाचा भौगोलिक घटक हा एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून ओळखला जातो. आणि तो वेग निश्चित प्रकारचा घटक असून शासनाला भौगोलिक स्थानाचा शासन विचार करूनच आपल्या देशाचे परराष्ट्र धोरण हे निश्चित करून घ्यावे लागते. त्यामुळे भौगोलिक घटकाला महत्त्वपूर्ण असे भारतीय परराष्ट्र धोरणातील निर्धारक घटकांपैकी एक महत्त्वपूर्ण असा म्हणून याकडे पाहिले जाते.

**आर्थिक विकास**

कोणत्याही देशाचा विकास हा आर्थिक रीत्या झाला पाहिजे. कारण कोणत्याही देशाची सत्ता हि त्याच्या आर्थिक विकासा वरुन ठरते. त्यामुळे देशाचा आर्थिक विकास हा राष्ट्रीय सत्तेतील महत्त्वपूर्ण घटक वाढवला जातो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपला देश आर्थिक दृष्ट्या मागासलेला होता. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी हे अचूकपणे स्पष्ट करून दिले की, आपल्या देशाचा सर्वांगीण, प्रगती घडवून आणण्यासाठी आर्थिक विकासावर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. त्याच्यासाठी त्यांच्या नेतृत्वाखालील भारत सरकारने आर्थिक विकासाच्या कार्यक्रमाला प्राधान्य देऊन सहकार्य केले. त्यामुळे परराष्ट्र धोरणातील निश्चित करणारे घटक म्हणून आर्थिक विकासाकडे देखील पाहिले जाते.

**जागतिक महासत्तांमधील संघर्ष**

जागतिक पातळीवरील सोवियत यूनियन व अमेरिका या महासत्तांमध्ये संघर्ष चालू होते. त्या संघर्षाचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर परिणाम झाला. नसेल तर चांगलेच कारण सोवियत युनियन व अमेरिका या दोन सत्तांचा संघर्ष मध्ये आपण सहभाग घ्यायचा किंवा त्यापैकी कोणा एकाची बाजू घेता येणार नाही, हेच आपल्या परराष्ट्र धोरणाचा महत्त्वपूर्ण मुद्दा राहिला होता.

**अलिप्तवादी चळवळ**

अलिप्तवादी चळवळीला राष्ट्राराष्ट्रांमधील राजकरणातील होणारे महासंघर्ष याची भनक लाभलेली होती. जसे सोवियत यूनियन व अमेरिका या दोन महासत्तांपैकी कोणत्याही एका गटात सामिल न होण्याकरीता जागतिक स्तरावरील शांतता व सुव्यवस्था तसेच त्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहणे. अशा प्रकारचे अलिप्तवादी चळवळीचा हेतू होता.

**आंतरराष्ट्रीय संघटना**

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर संयुक्त राष्ट्रे ही आंतरराष्ट्रीय संघटना अस्तित्वात आलेली आपणास लक्षात येते. तो संयुक्त राष्ट्रांच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आआंतरराष्ट्रीयरित्या भूमिका पार पाडू लागल्या. आंतरराष्ट्रीय स्तरावर जागतिक शांतता प्रस्थापित करणे व जागतिक शांततेला त्याच पद्धतीचे वातावरण निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटन आपल्या पद्धतीने चांगल्या प्रकारे कार्य करत आहेत. त्यामुळे सर्व राष्ट्रीय राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संघटनांचा उल्लेख केला पाहिजे. तसेच विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेला विकास म्हणून आंतरराष्ट्रीय संघटनांना मोठ्या प्रमाणावर महत्त्व प्राप्त झाल्याचे लक्षात येते. या पद्धतीने आपल्याला उल्लेख करता येईल, असे भारतीय राज्य घटनेमध्ये राज्यांच्या धोरणांची आंतरराष्ट्रीय शांतता व सुव्यवस्था त्या पद्धतीने मार्गदर्शक तत्वे इत्यादी मध्ये वाढ घडवून आण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनेना महत्त्व दिले गेले आहे. त्यामुळे भारतीय परराष्ट्र धोरण निश्चित करणार्या घटकांपैकी एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून आंतरराष्ट्रीय संघटनांकडे पाहिले जाते.

**भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल**

भारताच्या परराष्ट्र धोरणाचा आढावा आपण दोन टप्प्यांमध्ये घेणार आहोत. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा सुरुवातीचा टप्पा पंडित नेहरू यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाची आखणी ही फार पूर्वी काळात झाल्याचे लक्षात येते. त्यांनी प्रामुख्याने आंतरराष्ट्रवादाची भूमिका स्वीकारून राष्ट्रहितासाठी जगामध्ये जागतिक शांतता व सुरक्षितता निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. या काळात प्रामुख्याने भारताच्या परराष्ट्र धोरणावर प्रमुख तीन अशा बाबींचा भर होता. त्यातील पहिले म्हणजे पाकिस्तान आणि चीनी या देशांकडून मिळणारे धोके विचारात घेण्यात आले. दुसरे म्हणजे स्वावलंबनाचा असणारा ग्रह आणि परराष्ट्र धोरणाचा देखील बर हेदेखील तत्कालीन परराष्ट्र धोरणाचे वैशिष्टय़ होते आणि तिसरा म्हणजे सर्व राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय घडामोडींचे आकलन कोणत्याही सध्याच्या दबावाशिवाय असणे होईल. फार पूर्वीपासून भारताने आशिया खंडातील देशांसोबत मैत्रीपूर्व संबंध निर्माण करण्याचे अथक प्रयत्न केलेली लक्षात येते.

आशियाई राष्ट्रांशी मैत्रीपूर्व सहकार्यविकास करून साधनाचा आणि आपले स्वातंत्र्य हे दीर्घकाल ठेवण्यासाठी खूप प्रयत्न केले. तसेच या काळामध्ये शेजारील राष्ट्रराष्ट्रासोबत होणारे संघर्ष यांना देखील भाग पाडले गेले. परराष्ट्रीय धोरणात प्रामुख्याने व्यापार तंत्रज्ञान शिक्षण तसेच अर्थकारण इत्यादि वेगवेगळ्याचा समावेश झाल्याचे लक्षात येते. त्यानंतर 1991 नंतर भारतीय अर्थव्यवस्थेने शासनाचे नियंत्रण नियंत्रित करून मुक्त आर्थिक धोरण स्वीकारणे. त्यामुळे शेजारील देशांबरोबर देखील वापरामध्ये मोठय़ा प्रमाणात वाढ झाली व जागतिक व्यापारात भारताने आपला सहभाग देखील नोंदवला. सन 1990 नंतरच्या काळामध्ये हाइलँड अग्नी आशियाई राष्ट्र म्हणजे सिंगापूर इत्यादी राष्ट्रांसोबत असलेले आर्थिक संबंध हे भारताने बळकट करून दाखवले. तसेच जपान, चीन, युरोप, इस्त्राईल अशा अनेक संघीय राष्ट्रांशी देवाणघेवाणी मोठ्या प्रमाणात वाढवून आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक आर्थिक संघटनामध्ये भारताने सहभाग वाढवून अमेरिकेबरोबर आपले संबंध बळकट करून घेतले. तसेच देवाणघेवाणीतून विश्वास देखील वाढीस लागला. आंतरराष्ट्रीय समूहामध्ये भारताचे स्थानही उंचावले गेले. त्याचप्रमाणे भारताच्या अनेक धोरणातदेखील भारताच्या राष्ट्रीय परराष्ट्र धोरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. भारत प्रामुख्याने एक वस्त्रधारी राष्ट्र आहे. परंतु एक महत्त्वपूर्ण जबाबदार अनुसरधारी राष्ट्र म्हणून आपण भूमिका स्वीकारलेली आहे. कारण जगात जागतिक शांतता सुव्यवस्था सुरक्षित असावी, हे भारताचे प्रमुख ध्येय होते.

**शीतयुद्ध समाप्तीच्या आणि जागतिकीकरणाच्या काळात भारतीय परराष्ट्र धोरणाचे बदलते स्वरूप**

1991 नंतरचा आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये सत्ता संघर्षाचे स्वरूप बदललेले आपणास लक्षात येते. जगातील दोन महासत्तापैकी एक महासत्तेचं आपल्या भारताला परराष्ट्र धोरणामध्ये प्रामुख्याने बदल करावा लागला. याची सुरुवात पी.व्ही. नरसिंहराव यांच्या काळापासून झालेली आपणास लक्षात येते. जागतिकीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्था मुक्त अर्थव्यवस्थेत झालेली आहे. त्यामुळे शीतयुद्धोत्तर काळात भारतीय परराष्ट्र धोरणात कशा पद्धतीने मांडणी केलेली आपण खालील प्रमाणे पाहणार;

**भारतातील परराष्ट्र धोरणातील पी.व्ही. नरसिंहराव यांची भूमिका**

पी.व्ही.नरसिंहराव यांनी आपल्या धोरणामध्ये अर्थशास्त्र हा आपला परराष्ट्रीय धोरणाचा महत्त्वपूर्ण असा भाग असतो. भारताची भौगोलिक व राजकीय स्थिती कमकुवत असताना कशा पद्धतीने त्यांनी आपल्या पंतप्रधान पदी सूत्रे हाती घेतली होती. तसेच 1991 हे वर्ष जागतिक व्यवस्थेतील एक गोंधळाचे वर्ष म्हणून ओळखले जाणारे वर्ष आहे. त्यांच्या कुवतीमधून सद्दाम हुसेनच्या नेतृत्वाखाली काही इराकी सैन्याना अमेरिकेच्या नेतृत्वाखाली युद्ध भडकवण्याचे काम केले होते. अशा प्रकारच्या इत्यादी मुद्दयांचा सारखा राष्ट्रांवर प्रभाव पडला व त्यामुळे भारतात प्रबळ भागीदार असला तरीसुद्धा मैत्रीपूर्ण आहे. याची खात्री त्यांनी जगाला पटवून दिली. भारताच्या वाढत्या मैत्रीपूर्ण सहकार्याचे काम अमेरिकेशी असलेल्या या काळामध्ये झाले होते. तेव्हा नरसिंहराव यांनी आपल्या राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणामध्ये वास्तववाद कशा पद्धतीने आणता येईल तसेच शेजारी देशांशी संबंध कशा प्रकारे मैत्रीपूर्ण ठेवण्यात येतील त्यासाठी अथक प्रयत्न केले.

**भारतातील परराष्ट्र धोरणातील अटलबिहारी वाजपेयी यांची भूमिका**

अटल बिहारी वाजपेयी यांनी जगाला भारताच्या परराष्ट्र धोरणाची ओळख करून दिली. अटलबिहारी वाजपेयी यांनी वास्तववाद व आदर्शवादाचे उत्कृष्ट पद्धतीने भारताविषयी दृष्टी व त्यांची जागतिक दृष्टीकोन समोर आणताना चांगल्या प्रकारे गुंतवणूक केली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या राष्ट्रीय हितसंबंधांना आकार देण्यासाठी व्यावहारिक पद्धतीचा वापर करण्यात आला होता. तसेच 2001 मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या झालेल्या इरान भेटीसोबत दोन देशांमध्ये पाकिस्तानमार्गे गॅस पाइपलाइनची कल्पना देखील पुढे घेण्यात आली. तसेच 2002 मध्ये इराणचे राष्ट्रपती मोहम्मद खातामी हे देखील भारतीय राजनैतिक संबंधांना एक आयाम प्राप्त करण्यासाठी प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भारत दौर् यावर आले होते. त्यामुळे दोघांमध्ये एक नवीन मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाले.

**भारतातील परराष्ट्र धोरणामध्ये डॉ मनमोहनसिंग यांची भुमिका**

डॉ.मनमोहन सिंग यांनी पंतप्रधान वाजपेयी तसेच पाकिस्तानात वर्षी शांतता करण्यासाठी प्रक्रिया चालू ठेवली. व भारत पाकिस्तानातील सीमामधील विवाद तसेच चीनसोबतचा सीमा विवाद सोडवण्यासाठी त्यांच्याकडून अनेक प्रयत्न करण्यात आले. तसेच चीनचे राष्ट्राध्यक्ष हू जिंताओ, नोव्हेंबर 2006 मध्ये भारतात भेटीसाठी आले होते. आणि डॉ. मनमोहन सिंग आणि जानेवारी 2008 मध्ये बीजिंगला भेट दिली होती. चीन आणि भारत या दोघांमधील जो मैत्रीपूर्ण सहसंबंध याचा विकास हा डोनाल्ड सहामध्ये करण्यात येऊ लागला. तसेच भारतात एप्रिल 2006 मध्ये भारत आफ्रिका शिखर परिषद घेण्यात आली .

**भारतातील परराष्ट्र धोरणातील नरेंद्र मोदी यांची भूमिका**

भारताच्या परराष्ट्र धोरणासाठी आतापर्यंतचे सर्वांत नॉन पंतप्रधान म्हणून 'नरेंद्र मोदी' यांना ओळखले जाते. तरीसुद्धा अपला राष्ट्राच्या पहिल्या पंतप्रधानापेक्षा स्वतःला वेगळी करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न देखील त्यांनी केला आहे. त्यात नरेंद्र मोदी यानी नेहरूंच्या आंतरराष्ट्रीय संबंध मध्ये जी काही तत्त्वे होती. ती कायम स्वरूपी ठेवण्याची भूमिका पार पाडली आहे.. एकंदरीत आपल्याला सांगायचे म्हणजे आपल्या भारताच्या परराष्ट्र धोरणाचा ज्यावेळेस आपण विचार करतो, त्या वेळेस आपल्या राष्ट्रातील परराष्ट्र धोरणाचा उद्देश हा आर्थिक विकास असतो. त्यामुळे आपल्या शेजारील देशांसोबत जे आर्थिक संबंध वाढवण्यासाठी नरेंद्र मोदी प्रयत्न करताना आपल्याला दिसत आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या राष्ट्रातील परराष्ट्र धोरणामध्ये आर्थिक विकासाला अनन्यसाधारण असे महत्त्व देऊन, त्यामध्ये परदेशी गुंतवणूक ही प्रोत्साहित करून या बाबतीत एक आकर्षण निर्माण करून घेतले तसेच परराष्ट्रसोबत असणारे परदेशी भांडवलाचा ओघदेखील त्यांनी वाढवून माहिती व तंत्रज्ञानावर भर देण्यासाठी तसेच आरोग्य राष्ट्राची व आपला राष्ट्रीय हितसंबंध जोपासण्यासाठी चांगल्या पद्धतीने मोलाचे कार्य केलेले लक्षात येते. सन 2014 मध्ये आपल्या भारतातील पंतप्रधानपदी रुजू झाल्यानंतर नरेंद्र मोदी आणि अत्यंत प्रभावीपणे आपल्या राष्ट्रातील परराष्ट्र धोरणाला एक धोरणात्मक खेळाडू बनवल्याचे लक्षात येते.

**भारताचे बदलते परराष्ट्र धोरण**

भारतातील आंतरराष्ट्रीय संबंधातील एक मोठी विसंगती म्हणून इंडो पॅसिफिक सागरीक्षेत्र आणि नव्याने उदयास येत असलेल्या ऑस्ट्रेलिया भारत जपान आणि अमेरिका इत्यादी प्रकारच्या एकत्रीतकरण होय. कारण एंड पॅसिफिक तसेच कोड यांचे विरोधक आणि समर्थक या दोघांचेही बाबतीमध्ये एकमत झालेले आपल्याला लक्षात येते. तसेच अलिप्तवादी धोरण आणि लष्करी स्वायत्तता हीदेखील तत्वप्रणाली अखंड काळ चालू राहून भारताच्या परराष्ट्र धोरणाचा एक अविभाज्य घटक म्हणून याला ओळखले जाते. आपल्या भारत राष्ट्राच्या दृष्टीनेदेखील ते एकही तेव्हा असल्याचे आपणास लक्षद्या भारत राष्ट्राच्या अलिप्तवादी धोरणाचा विचार केला असता असे लक्षात येते की, जागतिक पातळीवरील महासत्तांच्या राजकारणात ज्या पद्धतीने बदलत्या परिस्थिती एकांकीकरण करण्यामध्ये राष्ट्रवादाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जाने अलिप्तवादी धोरणाचा अवलंब केला तसेच जा वेळेस संपूर्ण जग दोन विभागांमध्ये विभागले जात होते. त्यावेळी भारत राष्ट्राने कोणत्याही एकामध्ये सामील न होण्याचा निर्णय घेतला होता भारताच्या परराष्ट्र संबंध मध्ये अलिप्तवाद आणि लष्करी स्वायत्तता यांना अनुकूल असा नेहमीच निर्णय घेतले गेल्याचे लक्षात येत नाही, तर त्यावेळी उद्भवलेली परिस्थिती लक्षात घेऊन भारत आणि नंतर काही पावले उचलली त्यामध्ये भारतातील शिक्षण आणि राजकीय क्षेत्रातील तज्ज्ञांकडून नेहमी भारत अलिप्ततावादी धोरण असणारा देश आहे, असे दिसून येते. सन 2020 मध्ये भारतराष्ट्रांनी भारतीय राष्ट्रवादाचे बाजू जगाला दाखवून दिली, त्याचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव चीन रस्त्यावरती पडून समोर एक आव्हान निर्माण झाल्याचे लक्षात येते.

**भारताच्या परराष्ट्र धोरण सध्यस्थिती आव्हाने**

2017-18 पासून आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये खूप काही वेगळ्या पद्धतीने बदल झालेले लक्षात येतात. इंग्लंड राष्ट्राचे युरोपियन युनियनमधून बाहेर पडणे, ट्रम्प यांनी इराणसोबत आण्विक करार रद्द करणे तसेच चीनबरोबर व्यापार युद्ध करणे असे इत्यादी प्रकारची संरक्षण हेतूने आर्थिक धोरणे स्वीकारणे. तसेच रशियाबरोबर नवीन शुद्ध करणे, मध्य पूर्व येथून सैन्य माघारी घेणे अशा इत्यादी गोष्टी लागती कर्णाच्या दशकानंतर जी परिस्थिती निर्माण झालेली आहे, ते कशा पद्धतीने बदलली गेली. याच्या खुना येथे स्पष्टपणे लक्षात येते. या अशा इत्यादी बदलांना भारत कशा पद्धतीने स्वीकार करून आपल्या भारत राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणांमध्ये महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे चीन रशिया अमेरिका पाकिस्तान आणि त्याचा शेजारी इतर अनेक रस्त्यांचा देखील समावेश होतो. या सर्व संबंधित असणारा भारताच्या परराष्ट्र धोरणा मधील कोणते आव्हाने असतील याचा आपण खालीलप्रमाणे आढावा घेणार आहोत.

भारत आणि पाकिस्तान यांच्या मधील संबंध काही दिवसापासून गोष्ट नसून मधील अंतर्गत मुद्दा म्हणजे काश्मीर आणि त्याच्याशीपलीकडील सीमेकडून होणारा दहशतवाद हा कारणीभूत ठरतो. कारण अफगाणिस्तान व पाकिस्तान तालिबानचा पुन्हा एकदा वाढत चाललेला प्रभाव भारत राष्ट्रातील दहशतवादी बाबतीमध्ये मोठ्या प्रमाणात चिंता वाढवणारी एक बाब म्हणून आपणास दिसून येते. हा होणारा दहशतवाद थांबवण्यासाठी भारत राष्ट्राने अमेरिकेतर्फे पाकिस्तानवर दबावदेखील आणला, पण भारत हा पाकिस्तानला जागतिक राजकारणामध्ये एकटे पाडण्यास सक्षम नाही. याच महत्त्वपूर्ण असे कारण म्हणून पाकिस्तान व चीन या दोघांमध्ये मैत्रीपूर्ण असलेला संबंध होय. कारण चीन सातत्याने पाकिस्तानची आर्थिक राजकीय तसेच सुरक्षाविषयक बाबतींमध्ये सहाय्य करतो. त्या पुढेही पाहिले असता आपणास लक्षात येते की, रशिया, चीन, पाकिस्तान असा या तिघांचा एक संच देखील भारतासाठी एक चिंतेचा विषय ठरू शकतो, हे म्हणायला देखील आपल्याला हरकत नाही. अमेरिकेसोबत भारताचे मैत्रीपूर्ण संबंध गेलं दशवर्षापासून व्यवस्थाबद्ध असल्याचे लक्षात येते. त्याअगोदर हे संबंध सुधारण्यासाठी काही मर्यादाही स्पष्ट केल्याचे लक्षात येते. भारत राष्ट्र आणि अमेरिकेबरोबर जो आण्विक करार करून आणि दोघांमध्ये जे सैनिकी सहकारी वाढवून पॅसिफिक व हिंदी महासागर या क्षेत्रामध्ये चीनला रोखण्यासाठी एकत्र येऊन जे मैत्रीपूर्वसंबंध प्रस्थापित केले होते. त्यामध्ये यश देखील आले अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी व्हिसासंबंधित जे नियम बदलले ते भारतीयांना जाचक देखील आहे. त्यामुळे अमेरिका या राष्ट्रातील नोकरांवर कोणत्याही प्रकारची मर्यादा येणार नाही हेही दिसुन येते हे स्पष्टपणे उल्लेखले आहे.

**निर्वासितांची संकटे**

भारतात 1951 चा निर्वासित आणि त्याचा 1967 प्रोटोकॉलचा पक्ष असताना देखील भारत हा जगातील सर्वात मोठ्या निर्वासित प्राप्तकर्त्यांची एक म्हणून ठरलेला आहे. तसेच भारतामध्ये मानव अधिकार आणि राष्ट्रीयही त्यांच्या संरक्षणाचे कायम स्वरुपी समतोल राहण्याचे देखील आव्हान आपल्याला म्हणून पहावयास मिळते. तसेच मानव अधिकारनवर भारताची प्रादेशिक आणि जागतिक स्थिती निश्चित करण्यासाठी देखील हे एक महत्त्वपूर्ण बाब ठरतात.

**रशिया युक्रेन समस्या**

भारतासारख्या राष्ट्रांना राजकारण आणि नैतिक अत्यावश्यक या दोघांपैकी एकाची निवड करणे, फार कठीण ठरले जाईल. कारण हा आंतरराष्ट्रीय स्तरावरील मुद्दा असल्यामुळे हा एक गुंतागुंतीचा विषय म्हणून लक्षात येते. तसेच भारत राष्ट्रीयमध्ये रशिया हा एक व्यापारी भागीदार असल्यामुळे युरोपियन राष्ट्रांमध्ये त्याचा फायदा देखील होऊन, ते थेट रशियाच्या विरोधामध्ये गेले तर आपल्या भारत या राष्ट्रासाठी राष्ट्रीय हितसंबंध जोपासण्यामध्ये खालावेल. तसेच प्रत्यक्षपणे वास्तववादी मागणीनुसार भारत, रशिया, युक्रेन यांमधील संघर्ष संघर्ष मध्ये नैतिक दृष्टिकोण बाळगण्यास कठीण जाईल. आणि त्याद्वारे हा एक गुंतागुंतीचा प्रश्न निर्माण होईल. जागतिक स्तरावरील परराष्ट्राचा विचार करता आशिया व आफ्रिका खंडाला महत्त्वाचे स्थान देऊन हिंदी महासागरातील क्षेत्रामधील प्रभाव लक्षात घेणे गरजेचे आहे. तसेच अलिप्तता चळवळीमध्ये भारतीय राष्ट्राचे भविष्य काय याबाबतीमध्ये आपल्याला परराष्ट्रांशी विदेशनीती देखील ठरवावी लागणार आहे. तसेच चीनची होणारी आर्थिक वाढत्या जगाचे नेतृत्व करण्यासाठी काही महत्वपूर्ण अशा धोरणातदेखील भारताला बदल करावा लागेल. भारतीय परराष्ट्र धोरणाचा विचार करताना स्पष्टपणे राष्ट्रवादा भारतीय औद्योगिक विकासामध्ये काही वेळा खालावू शकतो. त्यामुळे प्रत्यक्षपणे राष्ट्रवादाचा विचारदेखील करताना आपल्याला त्यामध्ये बदल करावे लागतील.

**निष्कर्ष (Conclusion):**

भारताच्या परराष्ट्र धोरणातील बदल या शोधनिबंधामध्ये आपणाला असे लक्षात येते की, भारत आणि स्वतंत्र झाल्यापासून आतापर्यंतची भारतीय परराष्ट्र धोरणाची वेगवेगळी उद्दिष्टे उतरवलेली होती. ती किती पद्धतीमध्ये पूर्ण झाली व त्याच पद्धतीने भारतीय परराष्ट्र धोरणामध्ये काही वेगवेगळे नवे प्रवाह नव्या अडचणी आलेल्या तसा भारत राष्ट्राने स्वीकार केला आहे का? आंतरराष्ट्रीय जागतिक पातळीवरदेखील भारतीय परराष्ट्र धोरणामुळे भारताचे महत्त्व आहे का? तसेच शेजारी राष्ट्रांशी संबंधित कोणत्या प्रकारचे संबंध आहेत? त्यांचा त्याच्या विकासावर कशा पद्धतीने परिणाम झाला आहे?कारण कोणत्याही देशाचे परराष्ट्र धोरण हे त्या देशाच्या राष्ट्रीय हितसंबंधांशी संबंधित असते. त्याची काय उद्दिष्टे ठरवलेली असतात त्याच पद्धतीने जागतिक पातळीवरील आंतरराष्ट्रीय स्तरावर कोणतेही राष्ट्र हे त्याच्या परिस्थिती अनुरूप व राष्ट्राच्या शक्तीप्रमाणे धोरण ठरवण्याचे कार्यकर्ते त्यामध्ये फारसे बदल नसते. परंतु काही विचारांप्रमाणे ठरवलेल्या उद्दिष्टाप्रमाणे बदल करू शकत असल्यामुळे परराष्ट्रीय धोरणामध्ये कमी जास्त प्रमाणामध्ये बदल होऊ शकतो, याला आपण नाही म्हणू शकणार नाही.

**संदर्भ (Refrences):**


1. C. R. Kothari, Research Methodology : Methods And Techniques, New Age International Publishers.
2. डॉ.सुधाकर इंगळे प्राचार्य प्रवीण कामथे, संशोधन पद्धतीशास्त्र, साईज्योती पब्लिकेशन्स .
3. डॉ. एस.व्ही. ढमढेरे डॉ.संभाजी काळी, संशोधन पद्धतीच्या मूलभूत संकल्पना, डायमंड पब्लिकेशन.
4. कृष्णा बालने लातूर, भारताचे परराष्ट्र धोरण, किंडले प्रकाशन .
5. डॉ.शैलेंद्र देवळाणकर ,भारताची परराष्ट्र धोरण नवीन, प्रसिद्ध परराष्ट्र धोरण विश्लेषक पीएचडी जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली .
6. सी.राजा मोहनवन,9 एप्रिल, 2021. भारताचे परराष्ट्र धोरण बदलतेय, ऑब्जर्वर रिसर्च फाऊंडेशन .
7. Www.pudhari.com
8. Www.india.com

# भारताची महासत्ते कडे वाटचाल होताना भारताच्या परराष्ट्र धोरणातील बदल

**प्राध्यापक जयाप्रभाकर देशमुख (वाबळे)**
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)
जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय गोवेली (कल्याण ) ता. कल्याण जिल्हा : ठाणे

**प्रस्तावना**

**1**947 ला भारत स्वतंत्र झाला आणि त्यावेळी जगामध्ये दोन महासत्तांमध्ये जग विभागले गेले. भांडवलशाही आणि साम्यवादी भारत कोणत्या गटात सहभागी होणार याकडे अख्या जगाची लक्ष लागून होते परंतु भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताच्या संपूर्ण परराष्ट्र नितीचा अभ्यास केला, आणि कोणत्यातरी गटात सामील होणे म्हणजे परत कुणाच्यातरी अधिपत्याखाली जाणे यातून आपण दीडशे वर्ष काय शिकलो हा प्रश्न पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासमोर उभा राहिला त्यातून त्यांनी सुवर्णमध्य शोधला तो म्हणजेच " अलिप्ततावाद " इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष आणि भारताचे पंडित जवाहरलाल नेहरू यांना अलिप्तवादाचे जनक म्हणतात. सगळ्या शेजारी राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध असावे यावर विश्वास ठेवून होते. अशी कल्पना साम्राज्यवाद गट वाद याला कायम नेहरूंनी विरोध केला भारताचे परराष्ट्र धोरण नेहरूंच्या "पंचशील **तत्वावर** "आधारलेले आपल्याला दिसते एक प्रत्येक देश आपल्या आणि दुसऱ्या देशाचे शांततेसाठी प्रयत्न करेल.**लष्करी** संघटना व लष्करी करारापासून अलिप्तत राहणे. सहकार्य व सहजीवनाचे धोरण, स्वातंत्र व सार्वभौमत्व याचा अधिकार, निर्भयतेने धोरण प्रसंगनुरूप कारवाई करण्याचे स्वातंत्र्य या पाच तत्वांवर भारताची परराष्ट्र नीती अवलंबलेली आपल्याला दिसते.

भारताच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट पंडित नेहरूंनी काय ठेवले होते 1925 ला भारतातील काँग्रेस समितीने एक ठराव पास करून इंग्रजी राजवटीला परराष्ट्रीय खाती निर्माण करण्याची शिफारस केली. 1928 मध्ये हा विभाग निर्माण करण्यात आला त्याचे प्रमुख पंडित नेहरू यांना बनवण्यात आले तेव्हापासून 1964 पर्यंत परराष्ट्रीय निर्माण करण्याची काम पंडित नेहरूंनी अतिशय चांगल्या प्रकारे केलेले दिसते तसे बोलायला गेले तर भारतीय परराष्ट्र धोरणाचा पायाच पंडित नेहरू घातला भारतीय धोरण ठरवत असताना काही उद्दिष्टे समोर ठेवली काही ठेवली काही अपूर्णही राहिली

1) भारताचे सार्वभौमत्व टिकवणे राष्ट्रीय हितसंबंधांचे रक्षण करणे.

2)संयुक्त राष्ट्र संघटनेला सर्वतोपरी मदत करणे जागतिक शांतता टिकवण्यासाठी प्रयत्न करणे.

3) राष्ट्रा राष्ट्रातील वाद शांततेच्या मार्गाने टिकवण्यावर भर देणे.

4) सोवियत रशिया साम्यवादी अमेरिका भांडवलशाही कोणत्याही गटात न जाता त्यांच्याशी मैत्रीचे संबंध ठेवणे.

5) राष्ट्रकुल या संस्थेचे पारंपारिक संबंध टिकून ठेवणे.

6)कोणत्याही प्रकारच्या वसाहतवादाला विरोध करणे.

7) गुलामगिरीत पडलेल्या राष्ट्रांना मुक्ततेचा मार्ग दाखवणे आणि त्यांना मदत करणे.

8) आपल्या शेजारी असणाऱ्या राष्ट्रांची मैत्रीशी संबंध करणे व टिकवणे.

9)शस्त्र नियंत्रण व निशस्त्रीकरण योजनांमध्ये सहभागी होऊन सर्वोत्तरी सहकार्य परंतु नंतर या कराराला भारताने विरोध केला.

10) संयुक्त राष्ट्र संबंधांच्या आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन करणे.

11) मानवी किंवा नैसर्गिक आपत्ती सापडलेल्या राष्ट्रांना सर्वोतोपरी मदत करणे.

ही उद्दिष्ट समोर ठेवून भारतातील नेते परराष्ट्रनीती धोरण अवलंबल्यासाठी सज्ज झाले.

**भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्वे**

1) अलिप्त वाद धोरणाचा स्वीकार

2) वसाहतवाद वर्णभेदला विरोध

3) आंतरराष्ट्रीय सुरक्षितता व शांततेवर भर

4) आफ्रिका व आशिया खंडात बरोबर मैत्रीचे संबंध

5) पंचशील तत्वाचा आदर

**अमेरिका आणि सोवियत रशिया या दोन्ही महासत्तांबरोबर मैत्रीपूर्ण संबंध**

भारताच्या परराष्ट्र धोरणाचा इतिहास जर बघितला तर पंडित जवाहरलाल नेहरू पासून सुरू झालेला प्रवास नरेंद्र मोदी पर्यंत येऊन थांबतो, भारताच्या बाबतीत प्रत्येक पंतप्रधानांनी मागच्या पंतप्रधानांची परराष्ट्रनीती पुढे नेली आणि भारताला आंतरराष्ट्रीय राजकारणात सज्ज केले पण अलीकडच्या काळात भारताच्या परराष्ट्र धोरणात काही बदल झालेले आपल्याला दिसतात.



**1990 नंतर भारताच्या परराष्ट्र धोरणातील बदल**

1990 नंतर भारताच्या परराष्ट्र धोरणात बदल झालेले आपल्याला दिसतात आंतरराष्ट्रीय परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी भारताला आपल्या परराष्ट्र धोरणात बदल करावे लागले काही उद्दिष्टे विश्व रचनेमध्ये कालबाह्य ठरली आहेत परिणामी त्याची जागा आता नवीन उद्दिष्टयांनी घेतली पंडित जवाहरलाल नेहरूंच्या काळातील काही उद्दिष्टे आजही कायम आहेत त्यांच्या पूर्ततेसाठी भारत प्रयत्नशील आहे.

**परराष्ट्र धोरणातील बदल**

**1)आर्थिक उद्दिष्टांना प्राधान्य-**- 1990 नंतर भारत जागतिकीकरणात आला भारताने जागतिक व्यापार संघटना डब्ल्यूटीओ चे सदस्यत्व स्वीकारले जागतिकीकरण आर्थिक उदारीकरण खाजगीकरण या धोरणाला अवलंब केला भारताने आर्थिक आणि व्यापारी हितसंबंधांच्या संरक्षणाला प्राधान्य देण्यास सुरुवात केली रशियाने आणि अमेरिकेने लष्करी संघटना निर्माण केल्या या संघटनांचा सदस्य राष्ट्रांना प्रचंड आर्थिक आणि लष्करी मदत केली.

**2)आदर्शवादाकडून वास्तव वादाकडे प्रवास -** भारताचे परराष्ट्र धोरण सुरुवातीला दुर्लक्षित राहिले परराष्ट्र धोरणाच्या आणि राजनयाच्या आधारे आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये भारताचे इथे संबंध जोपासण्याचे प्रयत्न फारसे झाले नाहीत राजकीय पक्षांची आणि नेत्यांची बांधिलकी अंतर्गत प्रश्नांची असल्यामुळे आंतरराष्ट्रीय प्रश्नांची विशेष दखल घेण्याचा प्रयत्न केला नाही परराष्ट्र धोरण सत्ताधारी पक्षाचे कार्यक्षेत्र बनून राहिले.

**3) संपूर्ण निशस्त्रीकरणाला पाठिंबा** - 1968 मध्ये अन्न वस्त्र प्रसार बंदी करार करण्यात आला हा करार पूर्णपणे पक्षपाती होता कमकुवत राष्ट्रांचा यामध्ये कुठेही उल्लेख नव्हता म्हणून या करारावर स्वाक्षरी करण्यास भारताने विरोध केला 1995 मध्ये अनिश्चित काळासाठी मुदतवाढ देण्यात आली अमेरिका या करारावर भारताने स्वाक्षरी करावी यासाठी दबाव आणत होता परंतु भारताचे स्पष्ट मत अशी की शस्त्रीकरण ही पूर्णपणे असावे पंडित जवाहरलाल नेहरूंच्या तत्वात हे महत्वाचे उद्दिष्ट होते आणि भारत आजही त्याला बांधील आहे अण्वस्त्रांच्या विद्वंसक परिणामांची भारताला जाणीव असल्याने सुरुवातीपासूनच भारताचे प्रयत्न अनुअस्त्र मुक्त विश्व निर्मितीच्या दिशेने होताना आपल्याला दिसले.

**4) जबाबदार अण्वस्त्रधारी राष्ट्रांची भूमिका स्वीकार**णे - जागतिक राजकारणा भारताला एक जबाबदार अण्वस्त्रधारी राष्ट्र म्हणून भूमिका पार पाडायची आहे भारत स्वातंत्र्याच्या अगोदरपासून अनुअस्त्र निर्मितीच्या विरोधात होता परंतु जगातील राजकीय समीकरणे बदलत गेली आणि भारताला आत्मरक्षणासाठी अनुअस्त्र विकास करण्याशिवाय पर्याय नव्हता परिणामी भारताने 1998 मध्ये राजस्थान मधील पोखरण येथे पाच अणुचाचण्या करून स्वतःला अनुअस्त्र धारी राष्ट्र म्हणून घोषित केले.भारताची अण्वस्त्रधारी हे फक्त आत्मरक्षणासाठी असतील ही ग्वाही त्यांनी जगाला दिली.

**5) बहु ध्रुवी विश्व रचनेच्या निर्मितीसाठी प्रयत्न - 1991** ला सोवियत रशियाची विघटन झाली एक सत्ता संपुष्टात आली 1960 नंतरच्या दशकामध्ये अमेरिकेचा वाढत्या एकाधिकारशाही प्रदर्शन करण्याला अनेक घटना घडल्या अमेरिकेच्या एकाधिकारशाहीला शह देण्यासाठी रशियाची जपान यासारख्या राष्ट्रांशी भारताने सहकार्य वाढवली आणि एक ध्रुवी विश्व रचना तयार करण्यासाठी प्रयत्न केले

**6) संयुक्त राष्ट्र संघटनेचा लोकशाही करण्यासाठी - दुस**ऱ्या महायुद्धात आणि शीतयुद्धात संयुक्त राष्ट्र संघटनेला म्हणावी तशी यश आले नाही अमेरिका काही तिच्या मित्र राष्ट्रांच्या प्रभावातून संयुक्त राष्ट्र संघटनेला मुक्त करण्यासाठी या संघटनेची लोकशाही करण्यासाठी प्रयत्न भारताने केले.

**7) सुरक्षा परिषदेमध्ये सदस्यत्व मिळवण्यासाठी प्रयत्न - सु**रक्षा परिषदेत भारताला कायमस्वरूपी सदस्यत्व मिळावे यासाठी प्रयत्न सुरू केले 1992 त्यावेळचे पंतप्रधान पी व्ही नरसिंहराव यांनी आम सभेच्या वार्षिक बैठकीत अधिवेशना सुरक्षा परिषदेला विस्तार करून भारताला त्यामध्ये स्थायी सदस्यत्व दिले जावे अशी मागणी भारताने केली स्थायी सदस्यांसाठी आपली दावेदारी सांगितली भारताच्या दावेदारीत रशिया इंग्लंड आणि फ्रान्स राष्ट्रांनी समर्थन दिले.

**8) दहशतवाद विरुद्ध आंतरराष्ट्रीय जनमत संघटित करणे** - दहशतवादाला बळी पडलेल्या राष्ट्रांमध्ये भारत एक राष्ट्र आहे भारताने अशा राष्ट्रांना संघटित केले आणि जगातून दहशतवाद हद्दपार करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेत आपली बाजू भक्कमपणे मांडली उदाहरणार्थ पाक पुरस्कृत जम्मू काश्मीरमधील दहशतवाद

**9) अमेरिकी बरोबर संबंध** - अमेरिका महासत्ता आहे तसेच संयुक्त राष्ट्र संघटनेवर त्याचे चांगले नेतृत्व आहे वचक आहे तसेच अमेरिकेमध्ये लोकशाही आहे काश्मीरमधील दहशतवादाकडे अमेरिकेने लक्ष वळवण्याचा भारत प्रयत्न करीत आहे 2001 नंतर दहशतवाद निर्मूलन मोहिमेत भारत अमेरिकेला एक महत्त्वाचा साथीदार आणि भागीदार आहे भारताबरोबरच मोठ्या काळासाठी संरक्षण करार करण्याची अमेरिकेने तयारी आणि इच्छा दोन्ही दाखवले या करारामुळे भारताला अमेरिकाकडून संरक्षण क्षेत्रात मोठी मदत मिळवण्याची शक्यता आहे.

**10) पाकिस्तानच्या केंद्रीय परराष्ट्र धोरणापासून मुक्तता -** पाकिस्तान आरोप प्रत्यारोपाची राजकारण करण्यापेक्षा सुरक्षा परिषदेत कायम सदस्य मिळवणे युरोपियन युनियन अशी आणि यासारखे व्यापार संघटनांकडून व्यापारी सवलती मिळवणे दहशतवादी शस्त्रीकरण आणि पर्यावरण संरक्षण क्षेत्रात प्रभावी भूमिका पार पाडणे भारत आणि पाकिस्तानच्या तणावाचा फायदा कायम अमेरिका चीन उचलत असतो

**11) विश्व व्यापार संघटनेत गरीब अविकसित विकसनशील हितसंबंधांचे सं**रक्षण करणे----आशिया, आफ्रिका खंडातील गरीब अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक हितसंबंधांचे प्रतिनिधी भारत स्वतंत्र काळापासून करत आला जागतिक व्यापार संघटनेच्या चर्चांमधून भारत विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक आणि व्यापारीत संबंधांची प्रतिनिधित्व करत आहे तिसऱ्या जगाचे नेतृत्व करणे भारताचे विभागीय महासत्ता बनण्याच्या स्वप्नांशी पूरक आहेत.

**2014 नंतरचे परराष्ट्र धोरणात झालेले बदल**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात परराष्ट्र धोरण आणि अंतर्गत धोरण यामध्ये सुसंगती राखली आहे एका दुवा काम पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने केले भारताच्या खऱ्या अर्थाने विकास व्हायचा असेल तर विविध देशांशी संबंध प्रस्थापित होणे आणि गुंतवणुकीचा भारताकडे वळवणे गरजेचे आहे असे त्यांचे मत होते त्यासाठी त्यांनी खालील परराष्ट्र निधीचा अवलंब केला तो पुढील प्रमाणे

**1))मेक इंडियाची मॉडेल** - भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांच्या परदेश दौऱ्यांमध्ये देशाच्या परराष्ट्र धोरणाचा अत्यंत सातत्य दिसून येत आहे त्यांच्या अनेक परराष्ट्र भारताच्या विकासाच्या संदर्भात पुढचं पाऊल टाकताना दिसले प्रदेश दौऱ्यांमध्ये देशाची प्रतिमा निर्माण करणे त्याचबरोबर देशाचे प्रसिद्धी मार्केटिंग करणे हेतूने **डिजिटल इंडिया, स्मार्ट सिटी,स्किल इंडिया, मेक इन इंडिया,क्लीन इंडिया,**यासारख्या देशांतर्गत प्रकल्पांना त्यांनी परराष्ट्र धोरणाशी जोडले आणि देशाला आंतरराष्ट्रीय राजकारणात पर्यंत नेले.

**2) सुरक्षा विषयक आव्हाने** - सुरक्षा विषयक आव्हाने हा भारतासाठी महत्त्वाचा प्रश्न विचारात घेण्याजोगा आहे देशाची परराष्ट्र नेते आणि देशांची सुरक्षा यांचा अतिशय जवळचा संबंध असतो भारतासमोरही अशी अनेक सुरक्षाविषयक आव्हान आहेत आपल्या शेजारी असणारे नेपाळ, बांगलादेश,पाकिस्तान,चीन ,श्रीलंका,यांच्यापासून धोका निर्माण झाला बांगलादेशातून खोटा नोटा तसेच शस्त्रे स्फोटक पदार्थ भारतामध्ये अफू गांजा आणि चरस मोठ्या प्रमाणात भारतात पाठवले जात आहे,दहशतवादांची तस्करी होत आहे श्रीलंकेमधून भारतातही वेगवेगळ्या ठिकाणी विघातकृती करण्याचा प्रयत्न होत आहे. दहशतवाद जोपासणारा पाकिस्तान शेजारी येऊन डोक्यावर बसला आहे एकीकडे अमेरिकेसारख्या बलाढ राष्ट्राशी संबंध वाढवणे पाकिस्तानी लष्कराबद्दल पण आणणे पाकिस्तानलाही राजकीय वर्तुळातून विश्वासात घेणे यासाठी प्रयत्न चालू आहे

**3) आशियाई राष्ट्रांचे नेतृत्व**- आशियात राजकारण समतोल साधने आणि त्याबरोबर आशियाचे नेतृत्व करणे हे उद्दिष्ट समोर ठेवून भारताचे परराष्ट्र धोरण सक्षम बनवण्याचे ठरवले आहे.

**4) परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांना आकर्षित करणे - भारतातून प्रदेशात गेलेले आणि त्यातील ठिकाणी जाऊन** स्थायिक झालेले त्यांना परत भारताकडे आणणे आणि त्यांना भारतासाठी आकर्षित करणे त्यांना देशाचा विकास प्रक्रियेत समाविष्ट करून घेणे तो राजनयाच्या माध्यमातून आकर्षित करणे आणि सांस्कृतिक राजन यांच्या माध्यमातून पूर्वेकडील पश्चिमेकडील देशांशी भारताचे संबंध असणारे देशांशी संबंध घनिष्ठ करणे.

**5) चीन बाबतची धोरण** - पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या परराष्ट्र धोरणामध्ये चीनबाबत स्पष्ट भूमिका आहे ती अत्यंत वास्तववादी दिसते पूर्वीची बोलणार नाही असे भारताचे परराष्ट्रीय धोरण होते. राजीव गांधीच्या कार्यकाळापासून हे धोरण बदललेले आपल्याला दिसले व्हियतनम क्षेपणास्त्र संदर्भात केलेला करार हा चीनवर दबाव निर्माण करण्याचा प्रकार आहे केवळ हिंदी महासागरापुरते आपले अस्तित्व मर्यादित नाही आशिया मध्ये आमचा दबदबा आहे हे दाखवण्यासाठी भारताचे एक शक्तिशाली जहाज तिथे वावरत आहे.

**6) अमेरिका व युरोप ची वाढती जवळीक** - अमेरिका शी संबंध जोपासताना भारताने आपली पारंपारिक विचारसरणी थोडीशी बाजूला करून नवीन विचारसरणी अंगीकारणाची मानसिकता स्पष्ट केली आणि त्यानुसार अमेरिका व युरोप आपली मैत्री वाढवण्यासाठी आणि आर्थिक करार करण्यासाठी आपली विचारसरणी थोडीशी बाजूला ठेवलेली आपल्याला दिसते.

**7) धोक्यात आलेले देशाच्या सागरी सीमा सुरक्षा बलशाली** करणे - भारताच्या व्यापारापैकी 96% व्यापार हा समुद्रमार्गे होतो भारतासारख्या विकसनशील देशाला सागरी सीमा सुरक्षा खूप महत्त्वाच्या आहेत भारताला एकूण 7516 किलोमीटरचा समुद्रकिनारा आणि 1200 बेटे मिळालेले आहेत या सर्वांचे रक्षण करणे आवश्यक आहे पाकिस्तान आणि श्रीलंके पासून मच्छीमारांना धोका निर्माण होत आहे अंदमान निकोबार आणि लक्षद्वीप बेटा जवळ समुद्रामध्ये मोठ्या प्रमाणात घुसखोरी दिसते परराष्ट्यांशी जहाजे आपल्या भागात येऊन मासेमारी करताना आपल्याला दिसतात सागरी सुरक्षेसाठी भारतातील नौदलाची ताकद वाढविण्याची गरज आहे त्यासाठी सागरी मार्गाची रक्षण करण्याला प्राधान्य दिले आहेत हिंदी महासागर क्षेत्रातील छोट्या देशाने भेटी देणे आणि त्यांच्याशी संरक्षण संबंध वृद्धिगत करणे याला सरकारने प्राधान्य दिलेले आपल्याला दिसते.

**8) भूतान नेपाळशी संबंध** - नेपाळ आणि भुतांनच्या भारताच्या अंतर्गत तसेच बाह्य सुरक्षित फार मोठा संबंध आहे चीन यांच्या माध्यमातून भारतावर आक्रमण करू शकतो त्यामुळे या देशांशी संबंध सुधारणे भारतासाठी खूप महत्त्वाचे होते नेपाळ आणि भूतान मध्ये बाराही महिने नद्यांना पाणी असते ज्याचा वापर करून वीज निर्माण होऊ शकते आणि स्वस्तामध्ये ती वीज भारताला मिळू शकते.

**9) आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव पाडणे** - फोरम फॉर इंडिया पॅसिफिक आयर्लंड को ऑपरेशनच्या माध्यमातून जागतिक नेतृत्वाची इच्छा आणि क्षमता भारत ठेवतो एक नैतिकता आणि जबाबदारी मानणारा देश म्हणून भारताकडे जगामध्ये बघितले जाते. विकसनशील देश आणि अविकसित देश भारताकडे आपला नेतृत्व शाली देश म्हणून बघतात आणि त्यांच्या इच्छा आणि त्यांच्या विश्वासाला खरं उतरण्यासाठी भारत कटिबद्ध आहे.

अशा पद्धतीने स्वातंत्र्यानंतर आणि अलीकडच्या काळात भारताच्या परराष्ट्र धोरणात बदल झालेला आपल्याला दिसतो परंतु तरीही भारताच्या परराष्ट्र धोरणावर काही टीकाकारांनी टीका केलेल्या आपल्याला दिसतात.

**भारताच्या परराष्ट्र धोरणांवरील टीका -**

1) भारताने आपले परराष्ट्र धोरण असताना स्वहितापेक्षा जागतिक हिताला जास्त महत्त्व दिले
2) ज्या देशांना भारताची मदत केली परराष्ट्र धोरणाच्या अंतर्गत तेथे देश भारताशी एकनिष्ठ राहिले नाही (उदा-बांगलादेश) आणि ज्या ज्या राष्ट्रांनी भारताला मदत केली त्या राष्ट्रांशी भारत एकनिष्ठ न राहता उलट त्यांचे भारतांशी मतभेद गैरसमज जास्त वाढलेले दिसते.
3) भारताला जागतिक राजकारणात जास्त मित्र बनवता आले नाही उलट भारताने शत्रू जास्त मिळवलेले दिसतात.
4) भारतीय परराष्ट्र धोरण उदारमतवाद वादाकडे झुकलेले दिसले भारतीय परराष्ट्र धोरणात वास्तववादाचा अभाव दिसतो आंतरराष्ट्रीय हितसंबंधांचे रक्षण करण्यास भारत यशस्वी ठरला.
5) भारताला आपल्या शेजारी असणाऱ्या देशांशी चांगले संबंध बनवता आले नाही (उदा-नेपाळ भूतान बांगलादेश चीन पाकिस्तान)
6) काही टीकाकारांच्या मते भारताने स्वीकारलेले अलिप्ततेचे धोरण चुकीचे आहे भारताने कोणत्या तरी एका गटात सामील होणे गरजेचे होते कारण जगात कोणताही देश स्वावलंबी नाही भारताने अलिप्तवाद स्वीकारला आणि एका बाजूला रशिया झुकलेला दिसतो
7) भारतीय परराष्ट्र धोरणावर आजही पंडित जवाहरलाल नेहरू यांचा प्रभाव दिसतो आंतरराष्ट्रीय बदलत्या परिस्थितीनुसार भारताने धोरणात बदल करणे गरजेचे होते परंतु तसे झालेले दिसले नाही म्हणजेच भारताच्या परराष्ट्र धोरणात गतिमानतेचा अभाव आहे
8) भारताने स्वातंत्र्यानंतर अलिप्त राहणे पसंत केले. त्यातूनच भारताच्या पुढाकाराने जगात तिसरा गट निर्माण झाला ही भारताचे परराष्ट्र धोरणावरची एक टीका आहे.

**निष्कर्ष.**

भारताच्या परराष्ट्रीय धोरणावर टीका होत असल्या तरी भारताच्या परराष्ट्र धोरणाने मोठे यश संपादन केलेले आहे. विश्व राज्याची संकल्पना भारताने मांडली त्यामुळे स :व हितापेक्षा दुसऱ्या देशाचा विकास भारताने केला असे जरी म्हटले जात असले तरीही भारताने स्वाहिताकडे दुर्लक्ष कधीच केलेले नाही भारताच्या परराष्ट्रीय धोरणामुळे भारताने आंतरराष्ट्रीय पातळीवर चांगले मित्र राष्ट्र बनवले( उदा अरब इस्राईलच्या युद्धात भारताने अरब ची बाजू घेतली त्यामुळे 14 अरब मित्र भारताने मिळवले. )शेजारच्या राष्ट्रांशी भारताने कायम मित्रत्वाचे संबंध ठेवले त्यांच्याशी सतत सहकार्याने संबंध सुधारण्याची प्रयत्न केले परंतु शेजारील राष्ट्राने म्हणावा तेवढा प्रतिसाद भारताला दिला नाही ज्यावेळी काश्मीरचा प्रश्न आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर मांडला गेला त्यावेळी भारताला एकटे पाडण्याचा प्रयत्न केला गेला भारताला एकटं पाडण्यासाठी पाकिस्तानी चीन अमेरिका आणि पाकिस्तान अशी युती घडवून आणली त्यामुळे भारताचा सुरक्षिततेला

मोठा धोका निर्माण झाला, तेव्हा सोवियत रशियाने भारताची बाजू भक्कमपणे संयुक्त राष्ट्रसंघात मांडली त्यामुळे आपली सुरक्षितता जपण्यासाठी भारताने रशिया 20 वर्षाचा मैत्रीचा करार केला आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात भारत रशिया मैत्रीची चर्चा होऊ लागली शांततेसाठी भारताने सतत प्रयत्न केलेले आहेत. संयुक्त राष्ट्राचे समर्थन करण्यासाठी ज्या ज्या वेळी संयुक्त राष्ट्रांना सैन्याची गरज भासली त्या त्या वेळी भारताने त्यांच्या सांगण्यावरून जगभरात आपले सैन्य शांतीसैनिक कान्या कोपऱ्यात पाठवले अलिप्तता धोरणाबाबत भारतावर टीका होतात,परंतु भारताने जगाला भारतासारखे अविकसित आणि विकसनशील देशांना एक नवीन पर्याय उपलब्ध करून दिला भारताला नक्कीच तिसऱ्या जगाचे नेतृत्व करायला आवडेल अलिप्तता चळवळीत दोन तृतीयांश देशांनी भारताला पाठिंबा दिलेला आहे याचा अर्थ भारताने अलिप्तता धोरण चुकीचे नव्हते. भारताने आपले परराष्ट्र धोरण वेळोवेळी बदललेले दिसले त्यासाठी भारताने अणुचाचण्या करून आपल्या परराष्ट्र धोरणाला गतिमानता दिली भारताने फक्त आपल्या स्वार्थासाठी आंतरराष्ट्रीय राजकारण कधीच केले नाही वेळ प्रसंगी अमेरिका सुवेत रशिया या दोघांच्याही आक्रमक कार्यवाहीचा व हस्तक्षेपाचा भारताने वेळोवेळी विरोध केला जोपर्यंत आपण आपली ताकद वाढवत नाही तोपर्यंत समोरील देश आपल्याला आपल्यापुढे झुकत नाही हे आपल्याला जेव्हा भारताने पाच अणुचाचण्या केल्या तेव्हा चीन व पाकिस्तान सहकार्याची भाषा बोलायला लागली हे कळले पंचशील तत्वाचा धोरणामुळे भारताने आपले परराष्ट्र धोरण एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. अलिप्त गटाचे नेतृत्व शांतता मध्ये असते ही भारताची धोरणे यशस्वी झालेली आपल्याला दिसते म्हणजेच आंतरराष्ट्रीय राजकारणात बहुतांशी प्रमाणात भारताचे परराष्ट्र धोरण यशस्वी झालेले आपल्याला दिसते अंतर्गत राजकारणाची परराष्ट्र धोरणावर परिणाम होताना आपल्याला दिसतात निर्णय घेण्याची यंत्रणा एक संघता नसली तर धोरण आखण्यात अडथळे निर्माण होतात परराष्ट्र धोरण हे मूल्यता आर्थिक व्यापारी आणि संरक्षण विषयक संबंधातून आकाराला येत असते या दोन्ही आघाड्यावर आज भारत निर्णायक वळणावर उभा आहे याबाबत भारत आता जो निर्णय घेईल त्यावर भारताचे पुढील भवितव्य अवलंबून असणार आहे तेव्हा निर्णय घेताना तो विचारपूर्वक घेणे आणि एकदा निर्णय घेतला की अनेक आकड्यांवर युद्ध पातळीवर कामाला लागणे यावर भारताला पर्याय उरणार नाही करत असताना फुकटचे आदर्शवादी संकल्पनांच्या झोपड्यातून देशाला बाहेर काढण्याबरोबरच वास्तवाची काच धरणे ही मोठी आव्हान भारतासमोर असणार आहेत. अलिप्तवादाची जागा आता स्ट्रॅटेजिक ऑटोनॉमि (व्यूहात्मक स्वायत्तता) ने घेतली आहे देश जोपर्यंत आर्थिक, औद्योगिक,संरक्षण,संशोधन,आणि ऊर्जा आदी क्षेत्रात भारत स्वयंपूर्ण बनत नाही तोपर्यंत स्ट्रॅटेजिक ऑटोनॉमि ला काही अर्थ नाही.

**संदर्भ**

1)आंतरराष्ट्रीय संबंध भारतीय परराष्ट्र धोरण -ड्रा. बी. डी. तोडकर

2) भारताचे परराष्ट्रीय धोरण -ड्रा. वा. भा. पाटील.

3) आंतरराष्ट्रीय संबंध -ड्रा. बा. भा. पाटील

4) भारताचे परराष्ट्र धोरण निर्णायक वळणावर - सचिन दिवाण

5) सर्व वर्तमानपत्रे( लोकमत, सकाळ, पुढारी, इंडिया टाइम्स) त्यामधील राज्यशास्त्र संशोधकांचे लेख

# भारताच्या महासत्तेकडील वाटचालीसमोरील आव्हाने

**डॉ. मनिषा परमेश्वर काकडे**

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय गोवेली, कल्याण.

**प्रस्तावना**

सद्यस्थितीत आपण भारताच्या स्वातंत्र्याचा 75 वा अमृत महोत्सव साजरा केला आहे.. मागील 75 वर्षांमध्ये भारताने अनेक चढउतारांना तोंड दिले आहे.भारताचे माजी राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी तरुणाईच्या जोरावर 2020 मध्ये भारत जागतिक महासत्तेकडे वाटचाल करेल असा युक्तिवाद मांडला होता. त्या दृष्टीने विचार करता भारत हा क्षेत्रफळानुसार सातवा सर्वात मोठा देश आहे. 1991 च्या उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण या आर्थिक सुधारणानंतर भारतीय अर्थव्यवस्था 10 पट वेगाने वाढली व सध्या 2.5 ट्रिलियन डॉलर्सची जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे, तर 2030 पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था असेल असे अनेक तज्ञांचे मत आहे. लष्करी सामर्थ्यात भारत चौथ्या क्रमांकाचा शक्तिशाली देश आहे. तसेच भारत हा जगातील सर्वात मोठी युवाशक्ती असलेला देश आहे, जो विकासाला वेगाने पुढे नेण्यास सक्षम आहे. कोरोनाच्या काळात जगात भारताच्या औषधे आणि आयटी उद्योगानेही अभूतपूर्व कामगिरी केली आहे. जगात पाचव्या क्रमांकावर उभा असलेला भारत अवकाश क्षेत्रातही आपले सामर्थ्य दर्शवीत आहे. भारतात पायाभूत सुविधांचाही झपाट्याने विस्तार होत आहे व प्रशिक्षित कामगारांची वाढती संख्या यामुळे भारताला उत्पादन केंद्र बनता आले आहे.

भारताचा वाढता आर्थिक विकास दरही जगाचे लक्ष वेधून घेत आहे. बदलत्या आर्थिक परिस्थितीत विदेशी गुंतवणुकीचा वेग वाढत आहे. उत्पादनापासून ते माहिती तंत्रज्ञानापर्यंत, रासायनिक उद्योगांपासून इलेक्ट्रॉनिक उद्योगांपर्यंत, कृषी क्षेत्रापासून ते सेवा क्षेत्रापर्यंत भारत जगाच्या नकाशावर आपले अस्तित्व निर्माण करीत आहे.म्हणजेच भारताने नि:संशय गेल्या काही दशकांमध्ये लक्षणीय आर्थिक वाढ अनुभवली आहे, असे असले तरी जागतिक सत्ता होण्यासाठी अजूनही भारतापुढे अनेक आव्हाने आहे जी भारताला जागतिक महासत्ता होण्यापासून रोखू शकतात. भविष्यात भारताच्या विकासाला बाधा आणणाऱ्या विविध राजकीय, भौगोलिक, आर्थिक आणि देशांतर्गत घटकांचा अभ्यास या शोधनिबंधात केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. भारताची जागतिक महासत्तेकडे वाटचाल करताना येणाऱ्या राजकीय /आंतरराष्ट्रीय आव्हानांचा अभ्यास करणे.
2. भारताचे जागतिक महासत्तेकडे वाटचाल करताना येणाऱ्या आर्थिक आव्हानांचा आणि त्याचबरोबर इतर आव्हानांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

या शोधनिबंधाचा अभ्यास विषय समग्रलक्षी स्वरूपाचा आहे आणि शोधनिबंधासाठी वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. त्यासाठी दुय्यम साधनसामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने संदर्भग्रंथ, मासिके, त्रैमासिके, नियतकालिके, वर्तमानपत्रे, इंटरनेटवरील विविध उपयुक्त वेबसाईटवरील आकडेवारी आणि माहिती यांचा आधार घेण्यात आला आहे.

**भारताच्या महासत्तेकडील वाटचालीसमोरील आव्हाने**

**अ. राजकीय/ आंतरराष्ट्रीय आव्हाने**

**1. सागरी सीमांचे संरक्षण** :- भारताच्या पूर्वेला बंगालचा उपसागर, पश्चिमेला अरबी समुद्र तर दक्षिणेला अथांग पसरलेला हिंदी महासागर आहे. भारताला लाभलेल्या या तीनही सागरातून आक्रमणाचा धोका आहे.विशेषतः हिंदी महासागरात वर्चस्व स्थापन करण्यासाठी चीनची भूमिका ही महत्त्वाची आहे. दक्षिण चीन समुद्राच्या 80% क्षेत्रावर चीन

आपला हक्क सांगत आहे. सागरी भागावर चीनचे वाढत असणारे वर्चस्व हे मोठे आव्हान भारतासमोर निर्माण झाले आहे. तसेच भारतात सागरी सीमांमध्ये होणारी घुसखोरी आणि भारतातील मासेमारी करणाऱ्यांना होणारा त्रास ही देखील आव्हाने आहे.

**2. अंदमान निकोबार द्वीप समूहातील बेटावरील हक्कांचा प्रश्न** :- भारतातील अंदमान निकोबार तसेच त्या द्वीपसमूहातील बेटांवर पूर्वीपासून भारतीयांचे वास्तव्य आहे. त्यावर चीन आपला हक्क दाखवतो हा प्रश्न सोडविण्यासाठी भारताला तिबेट, नेपाळ व बांगलादेश यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे गरजेचे आहे.

**3. शेजारील राष्ट्राबरोबरचा सीमावाद व विवाद** :- भारताचा चीन आणि पाकिस्तान (ऐतिहासिक,सीमा आणि वैचारिक मुद्द्यांवर) या दोन्ही देशांशी सीमावाद आहे. त्यामुळे पाकिस्तानशी 1947 -48,1971, 1999 आणि 2001 मध्ये चार युद्धे झाली. तसेच 1962 मध्ये चीनची युद्ध झाले आहे तसेच बांगलादेशाशी (पाण्याच्या उपलब्धतेबद्दल) विवादांमुळे भारताच्या विकासात अडथळा येतात. गेल्या 75 वर्षांमध्ये केवळ बांगलादेश व श्रीलंकेसोबतच्या सीमा समस्यांचे निराकरण करण्यात यश आले असले, तरी इतर देशांच्या सोबतच्या सीमा वारंवार भडकल्या आहेत म्हणूनच भारताचे शेजारी जसे की चीन आणि पाकिस्तान भारतावर अविश्वास दाखवतात. राजकीय तणाव कमी करण्यासाठी आर्थिक सहकार्य कशा पद्धतीने वाढवावे हे आवाहन भारतासमोर आहे.

**4. शेजारील राष्ट्रांमध्ये आपले स्थान वरचढ ठेवण्याचे आव्हान** :- आर्थिक प्रगती साधण्यासाठी अराजकीय प्रलोभने असली तरी गती येण्यासाठी व आर्थिक पाया मजबूत करण्यासाठी जोपर्यंत भारत जोमदारपणे प्रयत्न करत नाही तोपर्यंत चीनवर मात करणे व शेजारी राष्ट्रांवर दबाव टाकणे हे ध्येय साध्य होणार नाही. बांगलादेश, पाकिस्तान व नेपाळ सोबत चीनचे सगळ्यात जास्त व्यापारी संबंध आहे..पाकिस्तान व नेपाळमध्ये आर्थिक गुंतवणूक करण्यात चीन सगळ्यात अग्रेसर आहे. इंडो पॅसिफिक प्रदेशात इतर देशांवर आर्थिक दबाव टाकणे व त्यांना आपल्या अनुकूल भूमिका घ्यावयास लावणे यात चीन आघाडीवर आहे. भारताने महत्त्वाच्या आर्थिक सुधारणांना गती देण्यास विलंब केल्यास भारताला पुरेसा लाभ उठविता येणार नाही. शेजारील राष्ट्रांमध्ये आपले स्थान वरचढ ठेवण्यासाठी भारताची जलद आर्थिक प्रगती होणे गरजेचे आहे.

**5. आंतरराष्ट्रीय प्रतिनिधित्वाचा अभाव** :- भारत हा UNOचा स्थायी सदस्य नाही. जरी सध्या तो परिषदेत कायमस्वरूपी जागा मिळवण्यासाठी सक्रियपणे चार राष्ट्रांच्या गटापैकी एक आहे अशा प्रकारे महासत्तेप्रमाणे आंतरराष्ट्रीय घटनांवर आपला प्रभाव वाढविण्याची क्षमता भारतामध्ये नाही.

6. तिसऱ्या जगाचे प्रतिनिधित्व सध्या भारत करीत आहे ही जबाबदारी पेलण्यास अनेक अडथळे येत आहे त्यामुळे भारत हे प्रतिनिधित्व सांभाळण्यास असमर्थ ठरत आहे.

7. युनायटेड नेशन मधील भारताचे कायमस्वरूपी सदस्यत्व मिळण्याबाबत चीनची विरोधी भूमिका हे देखील एक महत्त्वाचे आवाहन आहे.

**ब. आर्थिक आव्हाने**

**1. निर्वाह शेती व शेतीशी निगडित समस्या** :- 2020 पर्यंत, जागतिक बँकेच्या मते, भारतातील एकूण कर्मचाऱ्यांपैकी अंदाजे 41.49% कृषी क्षेत्रात कार्यरत आहेत. भारताला 15 कृषी-हवामान झोन असलेली लागवडीयोग्य जमीन आहे. जवळजवळ सर्व प्रकारची हवामान परिस्थिती, मातीचे प्रकार आणि विविध प्रकारची पिके घेण्यास सक्षम आहेत. तथापि, घटती उत्पादकता आणि आधुनिकीकरणाचा अभाव यामुळे शेतीच्या प्रगतीला बराच काळ अडथळा निर्माण झाला आहे. शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नाप्रमाणेच प्लॉटचा आकार कमी होत आहे. बहुसंख्य भारतातील शेतकरी निर्वाह शेती करतात. यामुळे अनेक शेतकऱ्यांना मोठा धोका निर्माण होतो.अजूनही शेतमालाला योग्य भाव मिळत नाही म्हणून दरवर्षी लाखो शेतकरी आत्महत्या करतात. हवामानाचा अचूक अंदाज वर्तवणारी यंत्रणा अजूनही आपल्याला भारतात उभारता आलेली

नाही. देशातील बँकांनी शेती क्षेत्राकडे प्राधान्याने कर्ज पुरवठा करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना अल्प दराने आणि अखंडित वीज अजूनही पुरविली जात नाही.

**2. दारिद्र्य** :- 2011 पर्यंत, भारतातील अंदाजे 21.9% लोक दारिद्र्यरेषेखाली जगत होते. भारतात 364 दशलक्ष लोक आहेत जे दररोज $3 पेक्षा कमी उत्पन्नावर जगतात. शहरातील 40% जनता झोपडपट्टीत राहते. जागतिक बँकेची सरासरी दारिद्र्यरेषा ,श्रीमंत आणि गरीब यांच्यातील भयंकर अंतर, देशाच्या संपत्तीच्या जवळपास 80% संपतीवर श्रीमंतांचे नियंत्रण या वस्तुस्थितीमुळे भारतातील दारिद्र्याची स्थिती आणखी स्पष्ट होते.भारताच्या वेगाने होत असलेल्या आर्थिक वाढीमुळे, ग्रामीण लोकसंख्येचा एक महत्त्वपूर्ण भाग शहरांकडे स्थलांतरित होत राहण्याची शक्यता आहे, ज्यामुळे शहरी दारिद्र्याचा मुद्दा दीर्घकाळात अधिक महत्त्वाचा होईल. बहुतांश लोकसंख्या अजूनही पुरेसा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, वीज किंवा कचरा विल्हेवाट न करता, लाखो पन्हळी लोखंडी बांधकामांनी बनलेल्या मेगा-झोपडपट्ट्यांमध्ये गरिबी आणि निराशेचे जीवन जगत आहे.

**3. जीडीपी मध्ये वाढ करणे** :- आज भारताचा जीडीपी 2.8 ट्रिलियन डॉलर इतका आहे तर अमेरिकेचा जीडीपी 21 ट्रिलियन डॉलर असून चीनचा 14 ते 15 ट्रिलियन डॉलर इतका आहे. अमेरिका आणि भारतामध्ये लोकसंख्येचा मुख्य फरक असल्याने भारतीय लोकसंख्येचा विचार करता, आर्थिक महासत्ता बनविण्यासाठी आपला जीडीपी 22 ट्रिलियन डॉलर इतका इतका नाही तर 84 ट्रिलियन डॉलरपर्यंत नेणे ही महत्त्वाची समस्या आहे. भारताला आर्थिक महासत्ता म्हणून प्रस्थापित करण्यासाठी वाढीव कालावधीत उच्च विकासदर टिकवून ठेवणे हे देखील महत्त्वाचे आव्हान आहे.

**4. लोकसंख्याशास्त्रीय परिस्थिती** :- एकीकडे, अतिरिक्त 200 ते 300 दशलक्ष लोकांना अन्न उपलब्ध करणे आणि शिक्षित करणे आवश्यक आहे तर दुसरीकडे वृद्ध लोकसंख्येची समस्या आहे. ज्यामुळे फायद्यांवर अवलंबून असलेल्या लोकांच्या संख्येत वाढ होते. कारण त्यांचे वय किंवा आरोग्य त्यांना काम करण्यापासून प्रतिबंधित करते. या दोन्ही घटनांमुळे भारताच्या सत्तेच्या वाढीवर ताण येतो आणि पूर्ण क्षमता साध्य करण्यात अडचणी निर्माण होतात.

**5. पायाभूत सुविधांचा विकास** :- शाश्वत आर्थिक विकासासाठी पायाभूत सुविधा ही एक महत्त्वाची बाब आहे. भारताने या क्षेत्रात प्रगती केली आहे. तरीही रस्ते, पाणी, वाहतूक, वीज आणि डिजिटल कनेक्टिव्हिटी यासारख्या क्षेत्रात आणखी गुंतवणूक आणि सुधारणा करण्याची गरज आहे.भारतातील अनेक गावात अजूनही डांबरी रस्ते नाही, जे रस्ते आहेत त्यात खड्डे जास्त आहे. गावांमध्ये तसेच शहरांमध्ये देखील 24 तास वीज व पाणी देणे अजूनही शक्य झालेले नाही. देशाला महासत्ता होण्यासाठी शिक्षण, आरोग्य, सामाजिक तसेच भौतिक पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी लागते. आपल्या देशात विचार करता शिक्षणावर सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या दोन टक्के इतकी रक्कम देखील खर्च होत नाही तर विज्ञानावर साधारणपणे 0.7% इतकाच खर्च आपण करतो. अशावेळी भारत महासत्ता होऊ शकतो का याचा विचार प्रत्येक सुजाण नागरिकाने करायला हवा.

**6. पर्यावरण** :- देशाच्या विकासात पर्यावरण हा महत्त्वाचा घटक आहे. भारतात शहरांची वाढ अतिशय अनिर्बंधपणे झालेली आहे. त्यामुळे शहरे बकाल झालेली दिसतात. घनकचरा व्यवस्थापन प्रश्न खूप जटिल बनला आहे. भारतातील अनेक शहरे प्रदूषणाच्या व वाहतूक कोंडीच्या बाबतीत जगात पुढे आहे. बहुतेक नद्यांची गटार गंगा झालेली आहे.

**7. शिक्षण** :- 140 कोटी लोकसंख्येच्या देशात हाताच्या बोटावर मोजण्या इतकी नोबेल पारितोषिक विजेते आणि ऑलम्पिक मेडल विजेते आहे. याचे मूळ कारण आपल्या शिक्षण पद्धतीमध्येच आहे. अजूनही तळागाळातल्या गरीब लोकांपर्यंत शिक्षण पोहोचलेले नाही. भारतात प्राथमिक आणि उच्च शिक्षणात केवळ विद्यार्थी नोंदणी दर वाढवण्यावर भर देण्यात येत आहे. शिक्षणाच्या बाजारीकरणामुळे शिक्षण खूप महाग झाले आहेत आणि खूपच कमी लोक उच्च शिक्षणापर्यंत पोहोचू शकत आहेत .देशातील उच्च शिक्षणात गोंधळाचे वातावरण आहे. उच्च शिक्षणातील विद्यार्थी नोंदणीचे प्रमाण वाढवण्याकरिता अधिक संख्येने महाविद्यालयाना मंजूरी देण्यात येत आहे. देशात शाळा आणि महाविद्यालये मोठ्या प्रमाणावर आहेत हे खरे असले तरी 17 ते 23 वयोगटातील 120 दशलक्ष तरुणांपैकी फक्त 12

दशलक्ष तरुण महाविद्यालयीन किंवा विद्यापीठीय शिक्षण घेतात. तसेच कौशल्य शिक्षणाला भारतात कमी महत्त्व दिले जात आहे. परिणामी हाताने काम करण्याची सवयच युवा पिढीला लागताना दिसून येत नाही. श्रमप्रतिष्ठेसाठी कौशल्य शिक्षणाला प्राधान्य देण्याची आज नितांत गरज आहे.

**8. आरोग्य व्यवस्था** :- देशात अजूनही लहान मुले वेळेवर ऑक्सिजन न मिळाल्याने मृत पावतात कुपोषणामुळे दरवर्षी दहा लाख बालके मृत पावतात.भारतात खाजगी संस्थांचा विकास व्हावा म्हणून सरकारी शिक्षण व आरोग्य व्यवस्थेचा मुद्दाम बळी देण्यात येत आहे.

**9. रोजगार** :- जगातील सर्वात जास्त युवा लोकसंख्या आज भारतात आहे. त्या युवाशक्तीच्या आधारे देशाला महासत्ता होण्याची क्षमता प्राप्त झाली आहे. तरी या तरी त्या तरुणाला कुशल मनुष्यबळात रूपांतरण करण्यासाठी आणि त्यांच्यातील अनन्यसाधारण ऊर्जेचा वापर राष्ट्र विकासासाठी करण्याचा कोणताही कार्यक्रम भारतात दिसून येत नाही. कधीकाळी भारतीयांना नोकरी देण्याकरिता जगभरातील कंपन्या तयार होत्या. आता भारतीय नोकरी घेऊन जातील, अशी भीती व्यक्त होते आहे.

**10. अन्नसुरक्षा कायदा** :- अन्न सुरक्षा कायद्यामुळे गरिबांना अन्न मिळणार आहे. परंतु, त्यामुळे आपण जनतेला आळशी तर करीत नाही ना, याचाही विचार धोरणकर्त्यांना करण्याची गरज आहे. अन्न सुरक्षा कायद्यामुळे देशातील ३० टक्के जनता आळशी होण्याची शक्यता आहे. तसेच युवकांना काम करण्याचे प्रोत्साहन मिळत नसल्याने ते व्यसनाधीन होण्याची भिती आहे.

**क. इतर घटक**

**1. जातीव्यवस्था व जातीय संघर्ष** :- भारतातील लोक जाती-धर्मांमध्ये एवढे गुरफटून गेले आहे की, लोक या सगळ्यांच्या मागे लागून आपल्याच प्रगतीत अडथळा निर्माण करत आहे. धर्मवेडेपणा, देवपुळेपणा, अंधश्रद्धा यामुळे आजचा वैज्ञानिक दृष्टिकोन हरवत चालला आहे. चांगलं झालं तरी देवाने केलं आणि वाईट झालं तरी देव अशी आपल्या भारतीयांची भावना आहे. या जाती व्यवस्थेच्या जोखड्यातून बाहेर काढणे हे खूप मोठे आव्हान ठरणार आहे. तसेच भारतात लोकशाहीची योग्य व्यवस्था अस्तित्वात असूनही लोकांनी लोकशाही लागू होण्यावर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संघर्ष व अशांततेचा मार्ग मोकळा झालेला आहे. लोकांमध्ये होणारे सतत जातीय संघर्षामुळे त्यात आणखीन भर पडून संपूर्ण देश राजकीय दृष्ट्या अस्थिर होत आहे

**2. हिंदू-मुस्लिम संबंध** :- भारतामध्ये सर्वच राजकीय पक्षांनी आणि धर्मवादी संघटनांनी या समस्येवर गंभीर विचार करून हे संबंध नेहमीच सौहार्दाचे व रचनात्मक कसे राहतील हे पाहिलं पाहिजे. पण नेमक्या याच प्रश्नाचा वापर राजकीय वरचढपणा दाखवण्यासाठी भारतात होत आहे. या प्रश्नाला अस्मितेचे रूप देऊन समाजाचं दोन गटांत धृवीकरण करण्याचा प्रयत्न केला जातो. आता मोदी सरकार देशाचं आर्थिक आणि लष्करी बळ वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. त्याची दखल जग घेत आहे. पण सामाजिक वीण अधिक घट्ट करण्याच्या आघाडीवर मात्र मोदी सरकार सपशेल अपयशी ठरत आहे. सरकारातले मंत्री, सरकारी पक्षाचे कार्यकर्ते उघडउघड जातीयवादी व चिथावणीखोर विधानं करत आहेत. फेसबुक, ट्विटरवर जातीयवादी पोस्टची संख्या वाढत आहे. भारत हा देश नेहमीच सहिष्णू राहिला आहे, पण आता मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर असहिष्णुतेच्या चर्चेला वेग आला आहे. या सर्व घटना देशाच्या सामाजिक विणीवर थेट आघात करणाऱ्या आहेत. जी गोष्ट ईशान्य भारतातील बंडखोर साधू शकले नाहीत, जिथे नक्षलवादी हताश झालेत, पाकिस्तानला ज्यात अपयश आलं, ती भारताची सामाजिक वीण सैल करण्याची किमया देशातल्या जातीयवादी शक्ती सहजपणे साध्य करू शकतील. त्यामुळेच देशात सामाजिक एकोपा टिकवून ठेवण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

**3. लोकांची बदललेली मानसिकता** :- स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात संघराज्य उदयास आले. संस्थानिक जाऊन नंतर राजकीय संस्थाने भारतात अनेक ठिकाणी उदयास आली. अनेक वेळा या राजकारणातील घराणेशाहीला नावे ठेवली जातात.पण निवडणुकीमध्ये त्याच घराण्यातील वारसाला निवडून दिले जाते. निवडून कोणाला द्यायचे हे सर्व लोकांच्या

हातात आहे. परंतु आज पैसा हे निवडणूक जिंकण्याचे एकमेव साधन बनले आहे. सद्यस्थितीत लोकांच्या घरापुढे चांगला रस्ता नसला तरी चालेल, कमी दरात वीज आणि शुद्ध पाणी मिळाले नाही तरी चालेल, शिक्षण आणि आरोग्य सेवा कमी खर्चात मिळाली नाही तरी चालेल, पण देशात मोठ्या प्रमाणात मंदिरे, पुतळे, मज्जिद, चर्च उभारले पाहिजे अशी लोकांची मानसिकता भारतात आहे. आता समाजाला धार्मिक, जातीय, भाषिक आधारावर समाजात तेढ निर्माण करणारे राजकारणी हवे की लोकांच्या मूलभूत समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारे राजकारणी हवे हे सर्व लोकांवर अवलंबून आहे आणि त्यासाठी लोकांची मानसिकता बदलणे गरजेचे आहे.

**समारोप**

एकविसाव्या शतकात भारताने अर्थशास्त्र व विज्ञानात मोठी झेप घेतली आहे.जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून भारतीय अर्थव्यवस्था उदयास येत आहे. भारतीय कंपन्या आता जागतिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्यात आघाडीवर आहे. इंग्लंडमध्ये सर्वाधिक रोजगार देणारी कंपनी म्हणून टाटा समूहाकडे बघण्यात येते. ही परिस्थिती बदलत असताना गेल्या पाच वर्षात समोर आलेल्या आर्थिक घोटाळ्यांमुळे देशाचे मोठे नुकसान होत झाले आहे. दहा वर्षांपूर्वी देश झपाट्याने विकास करीत होता परंतु भ्रष्टाचाराच्या मालिकांमुळे देश झपाट्याने मागे पडत आहे. पर्यावरण, शेती, अन्न, जमिनीची सुपीकता, बेरोजगारी, दारिद्र्य यासारखे मूळ प्रश्न अद्यापही कायम आहे. युवा लोकसंख्येचे मिळालेले वरदान व त्या आधारे महासत्ता होण्याची संधी राजकीय नेत्यांच्या अकार्यक्षम व नेतृत्व हिनतेमुळे वायातर जाणार नाही अशी शंका उपस्थित होत आहे.अशाप्रकारे सामाजिक, आर्थिक व राजकीय आव्हाने भारताच्या महासत्ता होण्याच्या मार्गात अडथळा आणत असून विजेते पद मिळवण्यासाठी त्यावर मात करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**संदर्भ सूची**

1.डॉ. अनिल चव्हाण, भारतीय अर्थव्यवस्था (1980 पासून), प्रशांत पब्लिकेशन, जून 2019

2. डॉ. बि.डी. तांडेकर, आंतरराष्ट्रीय संबंध (2014 पासूनचे भारतीय परराष्ट्रीय धोरण), प्रशांत पब्लिकेशन,जानेवारी 2017

3. Datt Ruddar & K. P. M Sundaram, Indian Economy, 2014

4. Grover Madhav, Challenges preventing india to become a great power, Times of India, 3 Augest 2019

5. दत्त गौरव व आश्विनी महाजन, भारतीय अर्थव्यवस्था (हिंदी), 55 वा संस्करण, एस. चंद अँण्ड कंपनी लिमिटेड, 2018.

6. पवार मंगेश, महासत्तेची संधी हुकणार तर नाही? महाराष्ट्र टाइम्स, 17 नोव्हेंबर 2013.

7. https://www.esakal.com/kokan/todays-latest-marathi-news-kop23a62641-txt-sindhudurg

8. https://pudhari.news

9. http://samruddhabharat.blogspot.com/2014/02/?m=1

10. https://marathi.indiatimes.com/editorial/article/-/articleshow/7203281.cms

# भारतातील क्रिडा क्षेत्राचे यश व प्रगती

**Dr. Naresh P. Borkar**
Smt. Rewaben Manoharbhai Patel Mahila Mahavidyalaya, Bhandara

**प्रस्तावणा :-**

भारतात प्राचिन काळापासून अनेक प्रकारचे खेळ खेळले जातात. भारतात अनेक पारंपारिक व प्रादेशिक खेळ खेळले जातात. भारत हा एकशे चाळीस कोटीपेक्षा अधिक लोकसंख्या असलेला देश आहे. भारतातील लोकांकडे असलेल्या प्रतिभा, क्षमता आणि संभाव्यतेचा साठा मोठया प्रमाणावर उपलब्ध आहे. आश्चर्यदायक गोष्ट म्हणजे, भारतात मानवी संसाधनांचे मोठे भांडार उपलब्ध असूनही, केवळ 2% लोक हे नियमितपणे खेळांमध्ये भाग घेत असतात. जागतिक स्तरावर खेळांच्या स्पर्धेत फार अल्प प्रमाणावर भाग घेतात. यावरुन अशी शंका निर्माण होते की, भारतात संधींचा अभाव आहे की भारतीय समाजाची खेळाविषयी आस्था कमी आहे? किंवा इच्छुक खेळाडूंना योग्य मार्गदर्शनाची आवश्यक्ता आणि उपलब्धता यांच्याशी काही संबंध आहे का? या उद्येशातुन भारतातील विविध क्रीडा प्रकारांची व्याप्ती समजून घेऊन आणि भारतातील क्रीडा उद्योगाचे भविष्य काय आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न सदर अभ्यासात करण्यात आला आहे.

**उद्येश :-**

भारतातील क्रीडा क्षेत्राचे यश आणि प्रगती जाणून घेणे हा सदर अभ्यासाचा मुख्य उद्येश आहे. त्यासोबतच भारतातील क्रीडा उद्योगाचे भविष्य याचेही अध्ययन सदर निबंधात करण्यात आले आहे.

**भारतातील क्रीडा क्षेत्राची व्याप्ती :-**

विशेषतः क्रीडा क्षेत्रात भारत हे प्रतिभेचे भांडार आहे. परंतु कधीही या प्रतिभेचा शोध घेण्याचा प्रयत्न केला गेला नाही आणि तिला योग्य प्रकाश दिला गेला नाही. खेळाविषयी प्रेरणेचा अभाव आणि राजकीय नेत्यांच्या पाठिंब्यामुळे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, अनुभवी लोकांकडून मिळालेल्या अनुभवामुळे खेळाविषयी प्रेरणा निर्माण करता येउ शकते.

प्राचीन भारताचा इतिहास पाहिला तर असे आढळते की, खेळांना पालक आणि शिक्षक दोघांनीही महत्त्व दिले होते. त्यावेळच्या लोकांना समजले होते की मुलाच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी खेळात भाग घेणे आवश्यक आहे. प्राचिन काळी दानपट्टा, कुस्ती, मार्शल आर्ट्स, तिरंदाजी, तलवारबाजी, वजन उचलणे इत्यादी उपक्रमांना खूप आदर होता. त्या काळात, विद्यार्थ्यांना मैत्रीपूर्ण खेळांमध्ये देखील सहभागी होण्यास प्रोत्साहित केले जात होते. प्राचिन भारतातील सक्रिय खेळाचे पुरावे महाभारत, रामायण, पुराणकथा, इ. महाकाव्यांमध्येही आढळतात.

परंतु आधुनिक काळातील गेल्या काही दशकांच्या अभ्यासावरुन असे आढळते की, भारतातील पालकांनी शारीरिक आरोग्याला जास्त महत्त्व देणे बंद केले आहे आणि स्पर्धात्मक युगामध्ये त्यांना फक्त त्यांच्या मुलांच्या शैक्षणिक उत्कृष्टतेची व विकासाची चिंता जास्त आहे. जर भरतातील पालकांनी खेळांमध्ये विशेष प्रमाणात रस घेतला तर मुलांची खेळाविषयी आवड निर्माण करता येउ शकते.

पालकांचा आपल्या पाल्याविषयी हा पक्षपातपणा, हे एक प्रमुख कारण आहे की, ज्याने या अत्यंत पात्र क्रिडाक्षेत्राच्या वाढीस अडथळा आणला गेला आहे. त्याशिवाय, भारतातील इतर क्रीडा प्रकारांची लोकप्रियता कमी होण्यात क्रीडा अधिका–यांच्या अज्ञान व पक्षपातपणाचाही हातभार आहे. पण 2011–21 च्या दशकात खेळांच्या या ट्रेंडमध्ये बदल झालेला आहे, असे आढळते.

अलिकडे भारतीय क्रीडा क्षेत्र जवळजवळ सर्व प्रकारच्या खेळांमध्ये उत्सुकतेने रस घेत आहे, परिणामी सहभाग, प्रेक्षकसंख्या आणि क्रीडा–संबंधित उद्योगांची वाढ होत आहे. भारताचे आर्थिक वातावरण सुधारत असतांना, डिस्पोजेबल उत्पन्नात वाढ झाली आहे आणि त्यासोबतच खेळाविषयी बदलते दृष्टीकोण यामुळे क्रीडा–संबंधित वस्तू आणि सेवांच्या मागणीत मोठया प्रमाणात वाढ होत आहे.

प्रसिद्ध इंडियन प्रीमियर लीग, अंदाजे 5 अब्ज पेक्षा जास्त, इतर लीगसह देखील त्यांचे शेअर्स भारतातील खेळक्षेत्राला मोठे योगदान देत आहेत, ज्यामुळे भारतीय क्रीडा उद्योगाला पाच वर्षांपूर्वी 1 अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त टप्पा गाठण्यास मदत झाली आहे. अनेक उद्योजकांनी "Sport Village Schools" सारखे खेळाचे

मॉडेल्स तयार केले आहेत, जे शाळांना क्रीडा शिक्षण स्वीकारण्यास सक्षम बनवतात आणि जागतिक स्पर्धेसाठी नवीन चेहरे तयार करण्यात महत्वाची भूमिका बजावतात.

**भारतातील खेळांची प्रगती :-**

किडाक्षेत्रासाठी भारत ही एक मोठी बाजारपेठ आहे. गेल्या काही वर्षांत असे आढळले आहे की, या उद्योगाने सर्व विभागांमध्ये झपाट्याने वाढ अनुभवली आहे. भारतात लाखो क्रीडाप्रेमी आहेत आणि दूरदर्शनवरील या खेळांच्या वाढत्या प्रेक्षकसंख्येमुळे ही संख्या सतत वाढत जाणार आहे.

सोबतच भारत सरकारने ऍथलेटिक सुविधा आणि प्रशिक्षणामध्ये महत्त्वपूर्ण गुंतवणूक केली आहे, ज्यामुळे आगामी काळात आणखी खेळाडू व किडाप्रेमी तयार होउ शकतात. त्यासोबतच वाढत्या क्रीडा उद्योगामुळे रोजगाराच्या संधीही वाढलेल्या आहेत. एक दिवस आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करण्याचे स्वप्न पाहणा—या तरुणांनाही यामुळे आशा निर्माण झालेली आहे.

भारतातील ‘‘खेलो इंडिया’’ कार्यक्रमामधून अनेक नवनविन चॅम्पियन ऍथलीट उदयास येण्याबरोबरच भारत सरकारने जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणात वाढ होण्याचे भाकीत केले आहे. तळागाळातील क्रीडाक्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या आधुनिकीकरणावर लक्ष केंद्रित करणे आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तरुण खेळाडूंना तांत्रिक व शास्त्रशुध्द प्रशिक्षण प्रदान करणे, हे या कार्यक्रमाचे उद्येश आहे. ‘‘खेलो इंडिया’’ या कार्यक्रमाने लोकांच्या खेळाबद्दलच्या समजुतीमध्येही महत्त्वपूर्ण बदल घडवून आणण्यात यश प्राप्त केले आहे. हा महत्वपूर्ण बदल खेळाडूंना त्यांच्या शालेय जीवनात त्याच्या खेळाविषयीच्या कार्यात मदत करते आणि त्यांना क्रीडा क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी प्रोत्साहित करते. सोबतच भारत सरकार खेळाडूंना 8 वर्षांच्या कार्यकाळासाठी वार्षिक 5 लाख रुपये शिष्यवृत्ती प्रदान करते, जे खेळाडूंना त्यांच्या किडा कौशल्यांचा विकास करण्यास मदत करते आणि भारताच्या भावी नायकांना केंद्रीय सहाय्यता प्रदान करते. विशेष म्हणजे, भारतातील मोठमोठया शहरातील झोपडपट्टीतील अनेक मुलांना या उद्योगाचा विशेष फायदा होत आहे. त्यातून अनेक नायक पुढे येण्यास मदत होत आहे.

**भारतातील क्रीडा उद्योगातील सुधारणा :-**

भारतीय जनतेच्या बदलत्या मानसिकतेने देशातील क्रीडा उद्योगाला एक नवीन जीवन दिले आहे. तरीही, आपल्याला खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. ज्या लोकांना खेळात सहभागी व्हायचे आहे आणि करिअर करायचे आहे त्यांना अधिक सामाजिक मान्यता आणि संधी मिळायला हव्यात. बदलत्या काळानुसार खेळाचे महत्व कसे जिवंत ठेवता येईल, याचाही शोध घेतला पाहिजे. भारतीय खेळांमध्ये ख—या अर्थाने प्रगती होण्याआधी अनेक बदल आहेत ज्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, देशाने क्रीडा पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे आणि उत्तम प्रशिक्षण सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. तसेच त्यांना मनोचिकित्सकाची गरज आहे, क्रीडापटूंना त्यांच्या मनोवृत्तीत काही बदल करणे आवश्यक आहे, जे त्यांना त्यांच्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचण्यास मदत करेल.

अलीकडील एका मानसशास्त्रीय संशोधनात असे आढळून आले की "स्टार ऍथलीट" असण्याची मानसिकता असलेल्या लोकांमध्ये यशस्वी होण्याची अधिक शक्यता असते. "स्टार ऍथलीट" बनण्याची मानसिकता विकसित करणे हे यश मिळविण्यासाठी फायदेशीर आहे. म्हणून, आपण खेळांना एक भरभराट, आकर्षक व्यवसाय आणि क्रीडा उद्योग म्हणून प्रोत्साहन देण्याची गरज आहे.

‘‘खेलोगे कुदोगे, होंगे खराब, पडोगे लिखोगे, बनोगे नवाब’’ म्हणजेच खेळल्या—कुदल्याने मुलं आळशी व कंटाळवाणे बनतात, तर लिहल्या—वाचल्याने मुलं नवाब बनतात. या सुप्रसिध्द भारतीय म्हणीपासून भारताने बाहेर पडण्याचा मार्ग मोकळा केला आहे. आता ही म्हणून विकसित झाली आहे, ती म्हणजे, ‘‘खेलोगे कुदोगे, होंगे लाजवाब, पडोगे लिखोगे, बनोगे नवाब’’ खेळल्याने असामान्य बनतो तर अभ्यास तुम्हाला नवाब बनविते. जर खेळले नाही तर मुलगा आळशी व कंटाळवाणा बनतो.

**किडा क्षेत्रातील भारताची कामगिरी :-**

भारत अनेक वर्षापासून जागतीक स्तरावर किडाक्षेत्र स्पर्धा करत आहे. तसेच भारत हे नेहमीच क्रीडा क्षेत्रातील शक्तीस्थान राहिलेले आहे. अलीकडच्या काळात ऑलिम्पिक आणि राष्ट्रकुल खेळांमध्ये भारताने

मोठी प्रगती करुन आतापर्यंतची सर्वाधिक पदके जिंकलेली आहेत. क्रिडाक्षेत्रातील सुधारित सराव, उपलब्ध अनेक सुविधा आणि मदत यामुळे भारतातील खेळाडूंनी जगासमोर आपली क्षमता सिद्ध केली आहे.

21 व्या शतकाच्या शेवटी क्रिडाक्षेत्रातील बदलाचा वारा जो वाहू लागला तो बहुतेक क्रीडा शाखांमध्ये पसरलेला आहे आणि भारतातील खेळाडू कबड्डी, बॉक्सिंग, कुस्ती, धनुर्विद्या, हॉकी, क्रिकेट, इत्यादी अनेक क्रीडा प्रकारांमध्ये खूप रस घेत आहेत आणि त्यामध्ये उत्कृष्ट कामगिरीही करत आहेत.

2022 मध्ये जे कॉमनवेल्थ गेम्स झाले त्यात भारतीय खेळाडूंनी एकूण 61 पदके प्राप्त केली, त्यात 22 सुवर्ण, 16 रौप्य आणि 23 कांस्यपदक जिंकले होते. त्यात संकेत सरगर बर्मिंगहॅम येथे पदक जिंकणारा पहिला भारतीय ठरला होता, त्याने पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटात रौप्यपदक पटकावले. मीराबाई चानू ही कॉमनवेल्थ 2022 मध्ये सुवर्ण जिंकणारी पहिली भारतीय होती, तर बर्मिंगहॅम येथे Weight Lifting मध्ये शीर्ष स्थान पटकावणारा जेरेमी लालरिनुंगा हा पहिला भारतीय होता. सुधीरने कॉमनवेल्थ 2022 मध्ये पॅरास्पोर्ट्समध्ये भारतासाठी पहिले सुवर्णपदक जिंकले. पॅरा पॉवरलिफ्टिंग पुरुषांच्या हेवीवेट प्रकारात तो चॅम्पियन ठरला. अशाप्रकारे या सर्व खेळाडूंनी त्यांनी केलेल्या कामगिरीने देशाला खूप अभिमान मिळवून दिला.

**भारतातील खेळांचे भविष्य :-**

भारत हा लोकसंख्येच्या दृष्टीने महत्वाचा देश आहे, भारतातील लोकांकडे असलेल्या प्रतिभा, क्षमता आणि संभाव्यतेचा साठा मोठया प्रमाणावर उपलब्ध आहे. त्यामुळे भारतात अनेक खेळांना मोठया प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत. शासकिय धोरणामूळे अलिकडे खेळांना विशेष महत्व प्राप्त झाले आहे. पुढील काळात भारत जागतिक स्तरावर खेळांमध्ये आपले वर्चस्व निश्चितच प्रसपीत करेल.

**निष्कर्ष :-**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मागिल सात दशकांमध्ये भारताने अनेक पथदर्शक क्रीडा क्षणांचा सामना केलेला आहे. भारतातील खेळ म्हणजे आदिवासी खेळांपासून ते मुख्य प्रवाहातील खेळांपर्यंत भारतात खेळल्या जाणा—या विविध प्रकारच्या खेळांचा संदर्भात आहे. भारत हा खेळातील उत्कृष्ट कामगिरी करणा—यांचा गुलदस्ता मानला जातो. आज अनेक प्रकारचे खेळ मोठ्या आवडीने आणि आदराने खेळले व पाहिले जातात. अलिकडे भारतीय क्रीडाक्षेत्राचा सुवर्णकाळ नुकताच सुरू झालेला आहे. 1948 मध्ये पहिले ऑलिम्पिक पदक जिंकण्यापासून ते कॉमनवेल्थ 2022 मध्ये सर्वोत्तम कामगिरी नोंदवण्यापर्यंत, भारताने स्वातंर्त्यानंतर क्रीडा क्षेत्रात खूप मोठा पल्ला गाठला आहे.

भारत सरकार, खाजगी क्रिडा सहाय्यक संस्था, प्रायोजक संस्था आणि मेहनती खेळाडू व त्यांचे पालक यांच्या सततच्या प्रयत्नांनी भारताला क्रिकेटच्या छायेतुन बाहेर काढले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिडा स्कोअर बोर्डव्दारे भारताला एक नविन स्थान मिळाले आहे.

यावरुन स्पष्ट होते की गेल्या काही वर्षापासून भारतातील क्रिडाक्षेत्र सतत विकासाच्या वाटेवर आहे. फुटबॉल, तिरंदाजी, स्विमिंग, चेस, खो—खो, इत्यादी खेळांना खेळाडू पसंत करीत आहेत. गेल्या काही वर्षात देशातील काही पारंपारीक खेळांनासुध्दा प्रोत्साहन दिले आहे. त्यात कबड्डी या खेळाने चांगलीच प्रगती कली आहे.

**संदर्भसुची :-**


1) Kales M. L. & Sangria M.S. (1988), "Physical and History of Physical Education", Parkas Brothers, Ludhiana.
2) Chu Donald, (1982), "Dimension of Sports Studies", John Wiley & Sons, New York, Chic ester, Brisbane Toronto, Singapore.
3) Sethumadhava Rao V. S. (2002), "Brand Image of Physical Education", HPE Forum 2(2).
4) Connor Kuntz & Dummer (1996), "Teaching across the curriculum : Language enriched Physical Education for Preschool children, Adapted Physical Activity Quarterly, Vol. 13.
5) Gail Brenner (2003), Webster's New World. Nathan M. Murata (2003), Language Augmentation Strategies in Physical Education, the Journal of Physical Education, Recreation & Dance, Vol. 74.
6) Shephard R. J., Jequier J. C, La Barre R. and Rajie M. (1980), Habitual Physical Activity.
7) Grewal C. S. (1989), "Why Physical Education", Vyayam Vidnyam.

# क्रीडा क्षेत्रामध्ये भारताचे यश

**प्रा. भारत विठ्ठलराव पल्लेवाड**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई जि. बीड

**प्रस्तावना**

भारताने प्रत्येक क्षेत्रामध्ये योध्दा आणि बाजी मारनारा देश म्हणून स्वत:ची ओळख निर्माण केली आहे, दररोज एका नव्या आयामाला गवसणी घालताना दिसताना आपण पाहत आहोत. तसेच दररोज नवनवीन शिखर गाठणाऱ्या देशाच्या यादीत भारताचे आहे. त्याच बरोबर भारत देश हा क्रीडा क्षेत्रामध्ये तर अव्वल स्थानाच्या यादी मध्ये आहे. खेळामुळे देशाची एक वेगळीच ओळख निर्माण होत असते ती ओळख आपल्या देशाने निर्माण केलेली आपल्याला दिसून येत आहे. जगामध्ये वेगवेगळे खेळ खेळले जातात त्या प्रत्येक खेळामध्ये भारत सहभागी होऊन यश मिळवीत असतांना आपणास दिसून येत आहे. ऑलिंम्पीक सारख्या सपर्धे मध्ये भारताची खूप मोठ्या प्रमाणात प्रगती झालेली आपणास दिसून येते, जगातील मानाच्या स्पर्धेत म्हणजेच ऑलिम्पिकमध्ये देशाची मान अभिमानाने उंचावणारी कामगिरी करणाऱ्या भारतीय खेळाडू यंदाच्या 75 व्या स्वातंत्र्य दिनी प्रमुख पाहुण्यांचा मान देण्यात आलाय. जपानमधील टोकियो ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी आतापर्यंतची सर्वोच्च कामगिरी नोंदवलीये. 15 ऑगस्ट 1947 पासून भारताने वेगवेगळ्या क्षेत्रात विशेष छाप सोडलीये. क्रीडा क्षेत्र ही त्याला अपवाद नाही. खेळ हे जगात देशाची विशेष छाप सोडण्याचं एक प्रभावी माध्यम बनले असून भारतीय खेळाडूंनी आपल्या लक्षवेधी कामगिरीनं जगात डंका वाजवून दाखवलाय.

भारतातील लोकप्रिय खेळांना इतिहासात निर्विवाद स्थान आहे ज्यामुळे काही विलक्षण कौशल्य आणि अष्टपैलू प्रदर्शन तयार होते. या सर्व खेळांना ऐतिहासिक किंवा सांस्कृतिक महत्त्व आहे. यातील काही खेळ अगदी प्राचीन काळापासून मागे जातात. कालांतराने क्रिकेट आणि इतर खेळांना लोकप्रिय बनविण्यावरही ब्रिटीश राजांचा प्रभाव होता. फाळणीनंतर भारतातील अनेक लोकप्रिय खेळ दैनंदिन जीवनाचा भाग बनले होते, विशेषकरुन प्रसारणाच्या आगमनाने. एक्सपोजरमध्ये विलक्षण क्रीडा लोकांचा उदय झाला. बऱ्याच मोठ्या स्पर्धा आणि बहु-क्रीडा स्पर्धेचे आयोजनही भारत करत आहे. भविष्यातील तारेच्या विकासामध्ये याला मोठी चालना मिळाली आहे. विशिष्ट कालावधीत लोकप्रिय झालेल्या इतर खेळांमध्ये तिरंदाजी, पोहणे, शिकार करणे आणि वेटलिफ्टिंगचा समावेश आहे. यातील बऱ्याच खेळांना हार्ड फिक्स नियमांचे बंधन नव्हते. जगाच्या इतर भागांशिवाय कोणताही परिणाम न घेता ते अत्यंत प्राचीन फॅशनमध्ये खेळले गेले. “पण आम्ही त्यांच्याच खेळाने एक दिवस त्यांचा पराभव करू या अपेक्षेने त्यांनी तसे केले नाही.” मिहिर बोस हे पुरस्कार प्राप्त पुस्तकाचे लेखक देखील आहेत.

15 ऑगस्ट 1947 रोजी इंग्रजांनी या आश्चर्यकारक देशात पाऊल टाकल्यानंतर 347 XNUMX वर्षांनंतर भारताने ब्रिटीशांचा मुकुट सोडला. हा एक अनिश्चित काळ होता, कोणालाही माहित नव्हते की भारत स्वत: कसे विकसित होईल आणि कोणत्या प्रकारची ओळख ते मूर्त स्वरुप धारण करेल. पण भारतातील लोकप्रिय खेळ बळकट व सामर्थ्याने वाढत गेले. फाळणीनंतर भारताला अनेक खेळामध्ये यश आले. अनेक महान अथलीट्स तयार करण्यासह देशाने अनेक स्पर्धांचे आयोजन केले.

**ईस्ट इंडिया कंपनी आणि ब्रिटीश राज**

ईस्ट इंडिया कंपनीने सोळाव्या शतकात कुख्यात त्याचे पंजे भारतीय मातीत बुडविले. दोन्ही देशांमधील “विदेशी” वस्तूंची आयात आणि निर्यात करण्यातही महत्त्वपूर्ण भूमिका होती. त्यानंतरच आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याची शाखा सुरू झाली. ईस्ट इंडिया कंपनी ही भारताच्या वसाहतीत एक योगदान देणारी सिंडिकेट आहे. एक बंडखोरी अगदी जवळ आली होती आणि 1857 XNUMX मध्ये मेरठमध्ये उठाव झाला. ईस्ट इंडिया कंपनीने जमीन कर वाढवून भारतीय लोकांसाठी ब्रिटिश सामाजिक सुधारणस भाग पाडले. बंड मजबूत होता पण शेवटी अयशस्वी. यामुळे कंपनी कमजोर झाली, जी

आता स्वतःहून जगू शकणार नाही. प्रशासनाची नवीन प्रणाली सुरू केली गेली. अशा प्रकारे भारत 1858 XNUMX मध्ये ब्रिटीशांचा मुकुट बनला. या परिस्थितीत भारतातील लोकप्रिय खेळ वेगाने पुढे गेलेले आहेत.

**क्रीडा विकास आणि यश**

15 ऑगस्ट 1947 रोजी इंग्रजांनी या आश्चर्यकारक देशात पाऊल टाकल्यानंतर भारताने ब्रिटीशांचा मुकुट सोडला. हा एक अनिश्चित काळ होता, कोणालाही माहित नव्हते की भारत स्वत: कसे विकसित होईल आणि कोणत्या प्रकारची ओळख ते मूर्त स्वरुप धारण करेल. पण भारतातील लोकप्रिय खेळ बळकट व सामर्थ्याने वाढत गेले. फाळणीनंतर भारताला अनेक खेळामध्ये यश आले. अनेक महान अथलीट्स तयार करण्यासह भारत देशाने अनेक स्पर्धांचे आयोजन केले. स्पर्धा आयोजनाने भारताच्या खेळाडूंच्या खेळामध्ये दिवसेन दिवस प्रगती होत गेली. ऑलिम्पिक, स्पर्धेमध्ये भारताची कामगिरी सुधारताना दिसत होती. भारताने अनेक आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मार्च 1951 मध्ये दिल्ली येथे आशियाई स्पर्धा झाल्या या स्पर्धेत भारताने पंधरा सुवर्ण पदके जिंकली. त्यानंतर एकतीस वर्षांनी नोव्हेंबर-डिसेंबर 1982 मध्ये त्याच शहरात बहू-क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. येथे भारताला तेरा सुवर्णपदके मिळाली. 2 ऑक्टोबर ते 1 नोव्हेंबर 1982 या कालावधीत हैदराबाद-सिकंदराबाद येथे भारताने पहिला आफ्रो-आशियाई क्रीडा मल्टी स्पोर्ट स्पर्धा आयोजित केल्या. या स्पर्धांमध्ये भारताला एकोणीस (19) पदके जिंकण्यात यश मिळविले. तसेच आशियाई क्रीडा स्पर्धा, कॉमनवेल्थ क्रीडा स्पर्धा विश्व कप क्रीडा स्पर्धा अशा स्पर्धांमध्ये दिवसेंदिवस भारताने प्रगती केलेली आपल्या दिसते. भारत देश विविध खेळाच्या विश्व क्रमवारीत अव्वल स्थानावर आहे. अशा प्रकारे भारत क्रीडा स्पर्धेत यश मिळवीत आहे.

**क्रिकेट**

भारताने क्रिकेट मध्ये खूप मोठ्या प्रमाणात प्रगती केली, आणि १९८३ ला कपिल देव यांच्या नेतृत्वाखाली भारताने वेस्टइडीज सारख्या तगड्या देशाचा पराभव करून क्रिकेटचा विश्व कप जिंकला. तेथून पुढे भारताने क्रिकेट मध्ये आपला दबदबा निर्माण करण्यास सुरुवात केली. पुढे भारताने 2007 मध्ये 20-20 विश्व कपची सुरुवात झाली आणि भारताने 20-20 चा विश्व कप महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वखाली जिंकला. पुढे २०११ मध्ये एकदिवसीय विश्व कप भारताने महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वखाली जिंकून क्रिकेट मध्ये आपल्या देशाचा दबदबा निर्माण केला आहे. तसेच २०२३ च्या विश्व कप मध्ये भारत अंतिम सामना खेळला आहे. अशी भारताची प्रगती झालेली आपल्याला दिसते.

**हॉकी**

स्वातंत्र्यापूर्वीपासूनच ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय हॉकी संघाचा विशेष बोलबाला राहिलेला आहे. आतापर्यंत भारताने ऑलिम्पिक स्पर्धेत 8 गोल्ड, 1 सिल्वर आणि टोकियोतील ऑलिम्पिक स्पर्धेसह 3 ब्राँझ मेडल मिळवली आहेत. 1948 मध्ये भारतीय हॉकी संघाने चौथे आणि स्वांतंत्र्य भारतासाठी पहिले गोल्ड मिळवले होते. विशेष म्हणजे ग्रेट ब्रिटनला 4-0 अशा गुणांनी पराभूत करून विम्बेच्या स्टेडियमवर तिरंगा फडकवला होता. आज आपण पाहतो की भारताचा हॉकी संघ जगात सद्या तीन नंबर वर आहे. अशा प्रकारे भारताने हॉकी मध्ये प्रगती केलेली आहे.

**आशियाई क्रीडा**

1951 मध्ये क्रीडा क्षेत्रातील मोठी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. राजधानी नवी दिल्लीतून 1951 पासून आशियाई क्रीडा स्पर्धेला सुरुवात झाली. भारताने यजमानपद भुषवलेल्या या स्पर्धेत आशिया खंडातील एकूण 11 राष्ट्रांनी वेगवेगळ्या 57 क्रीडा प्रकारात सहभाग घेतला होता. या स्पर्धेत भारत पदकतालिकेत दुसऱ्या स्थानावर राहिला होता. या स्पर्धेच्या माध्यमातून भारताने एकता आणि मैत्रीचा संदेश दिला होता. आशियाई क्रीडा स्पर्धा दर चार वर्षांनी होतात. या स्पर्धे मध्ये आता ४५ देसहाचा सहभाग असतो. सुमारे 12 हजार खेळाडू सहभागी होताना दिसतात.

**ऑलिम्पिक स्पर्धा**

जगभरात भारतीय हॉकीचा डंका वाजत असताना जगातील मानाच्या स्पर्धेत स्वातंत्र्यानंतर भारताला पहिले वैयक्तिक मेडल मिळाले ते कुस्ती क्रीडा प्रकारात. खाशाबा दादासाहेब जाधव यांनी 1948 मध्ये लंडन ऑलिम्पिकमध्येही भारताचे प्रतिनिधीत्व केले होते. या ऑलिम्पिक स्पर्धेत मेडलने त्यांना हुलकावणी दिली. पण 1952 मध्ये हेलसिंकी ऑलिम्पिक स्पर्धेत त्यांनी देशाला ब्राँझ पदक मिळवून दिले व वैयक्तिक क्रीडा प्रकार मध्ये भारताला ऑलिम्पिक पदक मिळवून देण्याचा मान मिळविला आहे. भारतीय पुरुष फील्ड हॉकी संघ ऑलिम्पिक स्पर्धेत प्रबळ होता, त्याने 1928 ते 1980 दरम्यान बारा ऑलिम्पिकमध्ये अकरा पदके जिंकली आहेत. यामध्ये आठ सुवर्ण पदकांचा समावेश आहे. यापैकी सहा 1928 ते 1956 या काळात सलग जिंकली गेली आहेत. भारतीय फील्ड हॉकी संघाने 1948 उन्हाळी ऑलिंपिकमध्ये अंतिम फेरीत ग्रेट ब्रिटनचा पराभव करून सुवर्णपदक जिंकले . स्वतंत्र राष्ट्र म्हणून भारतासाठी हे पहिले सुवर्णपदक होते. आता भारताला

**राष्ट्रकुल स्पर्धा**

कार्डिफ राष्ट्रकुल स्पर्धेत 1958 मध्ये भारताने कुस्ती क्रीडा प्रकारात पहिल्यांदा सुवर्ण कामगिरी नोंदवली. कुस्तीपटू लीला राम सांगवान यांनी हेवीवेट वजनी गटात गोल्डन कामगिरी करून दाखवली होती. राष्ट्रकुल खेळ ही राष्ट्रकुल परिषदेमधील सभासद राष्ट्रांची एक क्रीडा स्पर्धा आहे. इ.स. १९३० सालापासून राष्ट्रकुल खेळ स्पर्धा सुरु झाली व ती दर चार वर्षांनी भरवली जाते सुरुवातीस ब्रिटिश एम्पायर खेळ, नंतर इ.स. १९५४ पासून ब्रिटिश एम्पायर व राष्ट्रकुल खेळ व इ.स. १९७० पासून ब्रिटिश राष्ट्रकुल खेळ ह्या नावंनी ही स्पर्धा ओळखली जात असे. १९७८ साली राष्ट्रकुल खेळ हे नाव ह्या स्पर्धेला दिले गेले. कॉमनवेल्थ गेम्स फेडरेशन ही लंडन येथे मुख्यालय असलेली संस्था ह्या खेळांचे आयोजन करण्यास जबाबदार आहे. राष्ट्रकुल खेळांत अनेक ऑलिंपिक खेळ तसेच इतर काही विशेष खेळ घेतले जातात. राष्ट्रकुल परिषदेचे ५४ सदस्य असले तरीही राष्ट्रकुल खेळांमध्ये ७१ देश भाग घेतात. अनेक ब्रिटिश परकीय प्रदेश तसेच युनायटेड किंग्डममधील इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंड व वेल्स हे घटक देश वेगवेगळे संघ पाठवतात. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा 2022 बर्मिंगहॅम येथे 28 जुलै ते 08 ऑगस्ट 2022 दरम्यान आयोजित करण्यात आल्या होता. एकूण 215 क्रीडापटूंनी 19 क्रीडा शाखांमधील 141 स्पर्धांमध्ये भाग घेतला, ज्यामध्ये भारताने विविध क्रीडा प्रकारांमध्ये 22 सुवर्ण, 16 रौप्य आणि 23 कांस्य पदके जिंकली. अशा प्रकारे भारत यश संपादन करताना दिसत आहे.

अशा प्रकारे भारतने विविध स्पर्धेत यश मिळविलेले आहे. तसेच भारताची प्रगती खूप मोठ्या प्रमाणात झालेली आपल्याला पहावयास मिळते.

**संदर्भ सूची**


1) The Book Of Sports [Paperback] - William Martin
2) सांघिक खेळ _ डायमंड – डॉ. दीपक व डॉ. सुरेखा
3) Physical Education As a Profession – Dr. A. B. Tare & prof. U. V. Bramhe
4) The Role of Physical Education And Sports In Personality Development -Prof. Dr. D. N. Shimpi
5) क्रीडाज्ञानकोश – प्रा. जॉन्सन बोर्जेस
6) शारीरिक शिक्षण मापन व मूल्यमापन – डॉ. शरद आहेर
7) वाटचाल ओलिंपिक – प्रा. संजय दुधाने

# शिक्षण क्षेत्रातील बदल नवीन शैक्षणिक धोरण 2020

**श्री. कैलास गोविंदा वाघ**
(सहशिक्षक)
जि.प.शाळा खलाणे, ता. शिंदखेडा जि. धुळे

**प्रस्तावना**

मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी समान आणि न्याय समाज विकसित करण्यासाठी तसेच राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा पाया आहे. भारताच्या सातत्यपूर्ण प्रगतीसाठी आणि आर्थिक विकास, सामाजिक न्याय आणि समानता शास्त्रीय सामाजिक प्रगती, राष्ट्रीय एकात्मता आणि संस्कृतीचे जतन या क्षेत्रामध्ये वैश्विक पातळीवर नेतृत्व करण्यासाठी सर्वांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. व्यक्ती, समाज ,देश आणि जगाच्या हितासाठी आपल्या देशातील समृद्ध प्रतिभा आणि संसाधनांचा पुरेपूर वापर करण्याकरता उच्च दर्जाचे सर्व शिक्षण हा भविष्यासाठी सर्वात चांगला मार्ग आहे. पुढच्या दशकात जगातील सर्वात मोठी युवकांची लोकसंख्या भारतामध्ये असेल आणि त्या सर्वांना चांगल्या गुणवत्तेच्या शिक्षणाच्या संधी पुरवण्याच्या आपल्या क्षमतेवर आपल्या देशाचे भवितव्य ठरेल. नवीन शिक्षण धोरणाने सर्व विद्यार्थ्यांनो ते कुठे राहत कुठेही राहत असले तरीही चांगल्या गुणवत्तेची शिक्षण व्यवस्था पुरवली पाहिजे आणि उपेक्षित वंचित आणि अल्प प्रतिनिधित्व असलेल्या गटावरील गटातील विद्यार्थ्यांना काही अडथळे असले तरीही शिक्षण व्यवस्थेत प्रवेश घेण्यासाठी आणि त्या त्यांना उत्कृष्ट कामगिरी करता येण्यासाठी सर्व प्रयत्न केले पाहिजेत. भारताच्या समृद्ध विविधतेचा आणि संस्कृतीचा मान ठेवत आणि त्याचवेळी देशाच्या स्थानिक आणि वैश्विक संदर्भातील गरजा लक्षात घेऊन त्या सगळ्या गोष्टींचा धोरणात समावेश केला पाहिजे भारतातील युवकांना भारत देशाविषयी आणि इथल्या विविध सामाजिक सांस्कृतिक आणि तांत्रिक गरजांबरोबर येथील अद्वितीय कला भाषा आणि ज्ञानाच्या परंपरा विषयी राष्ट्रीय अभिमान आत्मविश्वास आत्मज्ञान परस्पर सहयोग व एकटे साठी आणि भारताने सतत विकासाच्या पायऱ्या चढण्यासाठी ज्ञान होणे अतिशय आवश्यक आहे.मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी समान आणि न्याय समाज विकसित करण्यासाठी तसेच राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा पाया आहे. भारताच्या सातत्यपूर्ण प्रगतीसाठी आणि आर्थिक विकास, सामाजिक न्याय आणि समानता शास्त्रीय सामाजिक प्रगती, राष्ट्रीय एकात्मता आणि संस्कृतीचे जतन या क्षेत्रामध्ये वैश्विक पातळीवर नेतृत्व करण्यासाठी सर्वांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. व्यक्ती, समाज ,देश आणि जगाच्या हितासाठी आपल्या देशातील समृद्ध प्रतिभा आणि संसाधनांचा पुरेपूर वापर करण्याकरता उच्च दर्जाचे सर्व शिक्षण हा भविष्यासाठी सर्वात चांगला मार्ग आहे. पुढच्या दशकात जगातील सर्वात मोठी युवकांची लोकसंख्या भारतामध्ये असेल आणि त्या सर्वांना चांगल्या गुणवत्तेच्या शिक्षणाच्या संधी पुरवण्याच्या आपल्या क्षमतेवर आपल्या देशाचे भवितव्य ठरेल. नवीन शिक्षण धोरणाने सर्व विद्यार्थ्यांना ते कुठे राहत कुठेही राहत असले तरीही चांगल्या गुणवत्तेची शिक्षण व्यवस्था पुरवली पाहिजे आणि उपेक्षित वंचित आणि अल्प प्रतिनिधित्व असलेल्या गटावरील गटातील विद्यार्थ्यांना काही अडथळे असले तरीही शिक्षण व्यवस्थेत प्रवेश घेण्यासाठी आणि त्या त्यांना उत्कृष्ट कामगिरी करता येण्यासाठी सर्व प्रयत्न केले पाहिजेत. भारताच्या समृद्ध विविधतेचा आणि संस्कृतीचा मान ठेवत आणि त्याचवेळी देशाच्या स्थानिक आणि वैश्विक संदर्भातील गरजा लक्षात घेऊन त्या सगळ्या गोष्टींचा धोरणात समावेश केला पाहिजे भारतातील युवकांना भारत देशाविषयी आणि इथल्या विविध सामाजिक सांस्कृतिक आणि तांत्रिक गरजांबरोबर येथील अद्वितीय कला भाषा आणि ज्ञानाच्या परंपरा विषयी राष्ट्रीय अभिमान आत्मविश्वास आत्मज्ञान परस्पर सहयोग व एकटे साठी आणि भारताने सतत विकासाच्या पायऱ्या चढण्यासाठी ज्ञान होणे अतिशय आवश्यक आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे प्रमुख आधार**

- जागतिक शिक्षण विकास कृती कार्यक्रम श्वास्वत विकासाचे उद्दिष्ट SDG 4
- सर्वांसाठी समान गुणवत्तेचे समावेशक शिक्षण आणि निरंतर शिक्षणाच्या संधी
- भारतीय संविधानातील मूल्य नागरिकांचे मूलभूत अधिकार कर्तव्य आणि इतर विविध तरतुदी

- विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रातील प्रगती बिग डेटा, मशीन लर्निंग, कृत्रिम बुद्धिमत्ता यांचे वाढते महत्त्व
- कुशल मनुष्यबळाची वाढती गरज : गणित, संगणक, विज्ञान, यांचे वाढते महत्व
- बहुशाखीय कौशल्यांची गरज : भाषा ,विज्ञान सामाजिक शास्त्रे ,कला, खेळ यांचा एकात्मिक विचार
- भारत केंद्रित शिक्षण
- शिक्षणाचा आकृतीबंध

**नवीन शैक्षणिक धोरण 2020**

नविन आकृती बंधानुसार 5334 शिक्षण पद्धतीनुसार, विद्यार्थ्यांना पायाभूत टप्प्यात 5 वर्षे, तयारीच्या टप्प्यात 3 वर्षे, मधल्या टप्प्यात 3 वर्षे आणि माध्यमिक टप्प्यात 4 वर्षे अशा पद्धतीने शिक्षण घ्यावे लागेल.

**विश्लेषण**

**अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके**

माध्यमिक स्तरावर विषयांच्या निवडीत लवचिकता, विज्ञान सामाजिक शास्त्र, खेळ, कला आणि व्यवसाय शिक्षण यांचा समावेश आहे. एनसीईआरटी आणि एन सी आर टी मिळून अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके तयार करण्यात येणार आहेत. अभ्यासक्रमात आशयापेक्षा संकल्पना स्पष्ट करणे विषय एकात्मिकरण कला एकात्मिक करण ,भारतीय पारंपारिक मूल्य ,मूलभूत मानवी मूल्य आणि संविधानातील मूल्य यांच्यावर आधारलेले मूल्य शिक्षण जे योग्य असेल ते करण्यासाठी मॉरल रिस्पॉन्सिंग सॉफ्ट स्किल यांच्यावर भर असेल. एनसीईआरटी आणि एन सी ई आर टी यांनी अभ्यासक्रमावर विविध विषयांशी संबंधित भूमिका तयार केल्या असून त्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिल्या आहेत.

**भाषा विषयक धोरण**

भारतासारख्या बहुभाषिक देशात भाषा विषयक धोरण हा नेहमीच अतिशय महत्त्वाचा आणि संवेदनशील मुद्दा राहिला आहे. नवीन शैक्षणिक धोरणात मातृभाषा भारतीय भाषा आणि बहुभाषिकत्व यांना महत्त्व दिले आहे. इयत्ता पाचवी पर्यंत शक्य तेथे मातृभाषेतून शिक्षण द्यावे असे धोरण म्हणते या शिफारशीमुळे आता इंग्रजी माध्यमाच्या शाळा बंद होतील असा काही ठिकाणी गैरसमज पसरलेला आहे परंतु तसे होण्याची शक्यता मुळीच नाही. कर्नाटक सरकारने राज्यात शाळांनी एकतर मातृभाषेतून शिक्षण द्यावे किंवा राज्याच्या भाषेतून म्हणजे कन्नड माध्यमातून शिक्षण द्यावे असा निर्णय घेतला होता. हा निर्णय आधी कर्नाटक उच्च न्यायालयाने आणि नंतर सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापिठाने रद्दबादल केला. सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापिठाने दिनांक 6 मे 2014 रोजी दिलेल्या निर्णयात आपल्या मुलांनी शालेय शिक्षण कोणत्या भाषा माध्यमातून घ्यावे हा सर्वस्वी पालकांचा मूलभूत अधिकार असून कोणत्याही राज्य सरकारला किंवा केंद्र सरकारला हस्तक्षेप करता येणार नाही असे म्हटले आहे. या निर्णयानंतर कर्नाटकात इंग्रजी माध्यमाच्या शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची अटक्केवारी 18 वरून 45 पर्यंत वाढली आपल्या भाषेबद्दल प्रचंड अभिमान असलेला दक्षिणेकडील तामिळनाडू केरळ आंध्र प्रदेश व तेलंगण या राज्यातही हे प्रमाण सुमारे 45, 66, 73 आणि 75 टक्के आहे महाराष्ट्रात सुमारे 21ः विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या शाळात जातात महाराष्ट्राचे मोठ्या प्रमाणावर झालेले शहरीकरण औद्योगीकरण उत्तम आर्थिक परिस्थिती आणि महाराष्ट्रात मराठी लोकांचे मोठ्या प्रमाणावर झालेले स्थलांतर अशी इंग्रजी माध्यमाला अतिशय अनुकूल परिस्थिती असूनही इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण दक्षिण कडील राज्यांच्या किंवा पंजाब हरियाणा हिमाचल प्रदेश उत्तराखंड अशा इतर राज्यांच्या तुलनेने कमी का याचा अभ्यास करण्याची गरज आहे. मात्र महाराष्ट्रात सुद्धा माध्यम बाबत वाढता ओढा दिसत आहे कस्तुरी रंजन समितीने आपल्या अहवालात भारतात पंधरा टक्के लोकांना इंग्रजी येते. या लोकांची आर्थिक परिस्थिती इंग्रजी न येणाऱ्या चांगली आहे असे निरीक्षण नोंदविले आहे. बहुजनांनी अभिजनांचे मातृभाषेतून किंवा परिसर भाषेतून शिक्षण विद्यार्थी आणि अधिक चांगल्या प्रकारे ग्रहण करू शकतात याबद्दल कोणाची दुमत असण्याचे कारण नाही. इंग्रजी शिकण्यासाठी इंग्रजी माध्यमात शिकले पाहिजे असे नाही. मातृभाषेतून शिकूनही चांगले इंग्रजी शिकता येते हे पालकांना पटवून देणे गरजेचे आहे. भारतीय भाषेतून शिक्षण देणाऱ्या शाळांकडे शासनाने अधिक लक्ष देण्याची गरज आहे.शैक्षणिक धोरणात विज्ञान आणि गणित हे दोन विषय इयत्ता सहावीपासून माध्यम भाषा आणि इंग्रजी या दोन वर्षातून शिकवावे

असे म्हटले आहे. संस्कृत आणि भारतीय भाषांना विशेष महत्त्व दिले आहे मराठी माध्यमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना इयत्ता सहावीपासून किंवा त्यानंतर दोन–तीन किंवा सहा वर्षे हिंदी बरोबरच संस्कृत उर्दू आणि आणखी एखादी भारतीय भाषाची भाषा शिकण्याची संधी देता येईल.

**अध्ययन अध्यापन पद्धती**

अध्ययन अध्यापन प्रक्रिया पुढील बाबीवर भर देणारी असेल आनंददायी रंजक तर्कशोधक वृत्ती जिज्ञासा सर्जनशील तेला चालना देणारी स्वयंअध्ययन व स अध्ययन अनुभवा आधारित अध्ययन मूल्यमापन हे अध्ययन अध्यापन प्रक्रियेचे अविभाज्य अंग डिजिटल शिक्षण संमिश्र अध्ययन दीक्षा स्वयं चा प्लॅटफॉर्म चा वापर नवीन शैक्षणिक धोरणात स्वयं अध्ययन सह अध्ययन आणि अनुभवा आधारित शिक्षण यांना विशेष महत्त्व दिले आहे.

**मूल्यमापन आणि परीक्षा**

दहावी बारावी परीक्षा होतील आणि त्या घेणारी परीक्षा मंडळी अस्तित्वात राहतील जे बदल आहेत ते पुढील प्रमाणे परीक्षा वर्षातून दोनदा होतील विद्यार्थ्यांना दोनदा परीक्षेला बसता येईल सर्वोत्तम संपादणूक ग्राहय धरण्यात येईल.

वर्णनात्मक आणि वस्तुनिष्ठ अशा दोन भागात परीक्षा होतील.

राज्य राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता अजमावण्यासाठी परक परफॉर्मन्स असेसमेंट ॲनालिसिस ऑफ नॉलेज फॉर हॉलिस्टिक डेव्हलपमेंट या संस्थेची स्थापना करण्यात येईल.

उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था मधील प्रवेश नॅशनल टेस्टिंग एजन्सी एनटीए या संस्थेने घेतलेल्या चाचणीच्या आधारे करण्यात येतील.

घोकंपट्टी आणि कोचिंग क्लास संस्कृती यांची गरज संपवण्यासाठी प्रयत्न केले जातील.

विद्यार्थ्यांना अध्ययन आणि विकास यांना प्रोत्साहन देणाऱ्या आकारिक मूल्यमापनावर संकलित मूल्यमापनापेक्षा अधिक भर देण्यात येईल.

प्रकल्प प्रश्नमंजुषा नाट्यीकरण पोर्टफोलिओज इत्यादीवर आधारलेले आकारिक मूल्यमापन यांचा मूल्यमापनात समावेश करण्यात येईल.

एन सी आर टी आणि एस सी ई आर टी यांच्या मार्गदर्शनाखालील बोधात्मक भावात्मक आणि क्रियात्मक या तीनही क्षेत्रांचा समावेश असलेले 360 अंश बहुआयामी प्रगती पुस्तकाची निर्मिती करण्यात येईल.

विद्यार्थ्यांचे शिक्षकांनी केलेले मूल्यमापन विद्यार्थ्यांना स्वतःचे स्वतः केलेले मूल्यमापन आणि विद्यार्थ्याचे त्यांच्या सहाय्यद प्रकारांनी केलेले मूल्य आपण यांचा एकत्रित विचार करण्यात येईल.

एनसीईआरटी आणि एस सी ई आर टी यांनी विषय न्याय आणि इयत्ता निहाय अध्ययन निष्पत्ती निश्चित केल्या आहेत या अध्ययन निष्पत्ती विद्यार्थ्यांचे मूल्यमापन आणि अध्ययन अध्यापन प्रक्रिया यांचा आधार आहेत या मुले आपण प्रक्रियेच्या पलीकडे सुद्धा काही विद्यार्थी प्रगती करू शकतात.असे विद्यार्थी राष्ट्रीय संपत्तीचा अमूल्य ठेवा असतात हा ठेवा जतन करायला हवा त्याचे संवर्धन करायला हवे अशा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल त्यांच्या बुद्धिमत्तेला आणि गुणांना वाव मिळेल यासाठी त्यांना आव्हान वाटेल अशा कृती अभ्यास यासाठी अध्ययन–अध्यापन पद्धतीत मूल्यमापन पद्धतीत बदल केला आहे.

**शिक्षकांचे प्रशिक्षण**

शैक्षणिक धोरणात बी एड चार वर्षाचा एकात्मिक अभ्यासक्रम प्रस्तावित केला आहे.

**समूह शाळा**

कोठारी आयोगाच्या शाळा समूह योजनेचा या शैक्षणीक धोरणात नव्याने जोरदार पुरस्कार केला आहे.

दूर व्हावे शाळांचे एकाकी पण दूर व्हावे यासाठी एकत्र येऊन भौतिक सुविधा तज्ञ मनुष्यबळ विचार कल्पना यांचे आदान प्रदान करावे ही समूह योजने मागची संकल्पना आहे शाळा समूह म्हणजे एक मध्यवर्ती माध्यमिक शाळा आणि तिच्या परिसरातील प्राथमिक शाळा ही मूळ संकल्पना आहे.

**शाळेची बदलती परिसंस्था**

2020 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शाळेच्या परिसंस्थेला खूप महत्त्व दिले आहे शिक्षक या परिसंस्थेचा केंद्रस्थानी असून विद्यार्थ्यांचे अध्ययन हे तिचे उद्दिष्ट असेल या परिसंस्थेत शिक्षक विद्यार्थी स्थानिक

सुशिक्षित स्वयंसेवक सेवानिवृत्त शिक्षक सरकारी आणि निमसरकारी संस्थांचे सेवानिवृत्त कर्मचारी परिसरातील विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती विद्यार्थ्यांचे पालक माजी विद्यार्थी परिसरातील शिक्षण संस्था या सर्वांचा अंतर्भाव अपेक्षित आहे.पूर्वी पालक आणि इतर स्वयंसेवक शाळेचे घटक नसायचे आता शिक्षक आणि विद्यार्थी यांच्याप्रमाणे ते शाळेच्या परिसंस्थेचे घटक असतील आता पालक आणि इतर घटकांनी शाळेच्या दैनंदिन कामकाजात शिक्षकांना मदत करणे अपेक्षित आहे या दृष्टीने शाळा समूह निपुण भारत अभियान आणि शिक्षकांच्या व्यवसायिक विकासासाठी तीन महत्त्वाची मिशन या धोरणात सुचवली आहेत.

या धोरणात बालशिक्षणापासून वाचनावर भर दिलेला आहे विद्यार्थ्यांना वेगाने आणि समजून वाचता आले तर त्यांच्यात स्वयं मध्येनाची क्षमता निर्माण होते पालकांना वाचण्याची आवड असेल तर मुलांमध्ये सुद्धा वाचण्याची आवाज निर्माण होते हे लक्षात घेऊन शाळेच्या ग्रंथालयातील पुस्तके पालक आणि स्थानिक समाजासाठी उपलब्ध करून देणे आणि शाळेचे ग्रंथालय आणि सार्वजनिक ग्रंथालय यांच्या समन्वयंकडून आणणे अपेक्षित आहे शाळा आणि समूह शाळा या स्तरावर एकाने एकाच शिकवणे शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यासाठी मागासने आयोजित करणे व्यवसाय मार्गदर्शन सत्र आयोजित करणे विद्यार्थ्यांना समुपदेशन विज्ञान प्रदर्शने विविध स्पर्धा गणित विज्ञान भाषा संगीत नृत्य विविध बैठे आणि मैदानी खेळ कला नाट्य वाद विवाद स्पर्धा आरोग्य अशा विविध विषयांसाठी मंडळे चालवणे उन्हाळी शिबिराजीत करणे असे विविध उपक्रम आयोजित करण्यासाठी परिसंस्थेतील व्यक्तींची मदत घेतली जाईल इयत्ता सहावी ते आठवीपर्यंतच्या व्यवसाय शिक्षणाच्या अभ्यासक्रमात स्थानिक कारागीर आणि उद्योजक यांचा सहभाग अपेक्षित आहे या पुढच्या काळात कोडींग कृत्रिम बुद्धिमत्ता अशा घटकाचा समावेश असेल प्रत्येक शाळेत या किंवा इतर ऐच्छिक विषयांसाठी स्वतंत्र शिक्षक नेमणे परवडणार नाही आणि शक्य होणार नाही हे शिक्षक शाळा समोरच्या पातळीवर निर्णय शक्य होईल शाळेला आर्थिक मदत करणारे उद्योजक आणि देणगीदार हे सुद्धा शाळेच्या परिसंस्थेचे घटक असतील या धोरणाची अंमलबजावणी करताना शिक्षकाची भूमिका पूर्णपणे बदलली असेल शिक्षकांमध्ये विषय ज्ञान आणि अध्यापन कौशल्य यांच्या एवढेच संपर्क कौशल सुद्धा असे महत्त्वाचे असेल शाळेच्या कोणत्याही प्रकारे मदत करणारी स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्याचे केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने विद्यांजली हे पोर्टल सुरू केले आहे शाळांना लागणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी सुविधा विद्यार्थ्यांना शिकवणे शिक्षकांचे प्रशिक्षण निवासी आणि अनिवासी भारतीय व्यक्ती स्वयंसेवक म्हणून नोंदणी करू शकतात म्हणून नोंदणी करू शकतात.

## समारोप

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चा मसुदा धोरणाच्या अंमलबजावणीसाठी दोन भागात तयार केलेला कृती कार्यक्रम SARTHAQ PART 1 आणि SAR THAQ PART 2 केंद्र सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशनच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या धोरणाच्या अंमलबजावण्यासाठी उपयुक्त असे इतरही दस्तऐवज या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. धोरण कागदावर किती चांगले असले तरी ते त्याच्या अंमलबजावणीपेक्षा चांगले असू शकत नाही. त्याच्या प्रभावी अंमलबजावणी साठी आवश्यक आहे. ती विद्यार्थ्याचे शिकणेही केंद्रस्थानी ठेवून शाळांची गुणवत्ता वाढविण्याकरता लागणारी तीव्र राजकीय इच्छाशक्ती आणि एक दिलाने एकजुटीने काम करण्याची मानसिकता महत्त्वाची आहे.

## संदर्भसूची

1) IMPLETATION PLAN FOR NATIONAL EDUCATION POLICY 2020 (PART 1 )
2) राष्ट्रीय शिक्षण धोरण धोरण 2020 शिक्षण मंत्रालय भारत सरकार

# भारतीय ज्ञान प्रणाली आणि नवीन शैक्षणिक धोरण २०२०

**प्रा. डॉ. टी. एम. गुरुनुले**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशात्र विभाग प्रमुख,
श्री रेणुकादेवी कला, वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालय, माहूर जि. नांदेड.

**प्रस्तावना:**

नविन शैक्षणिक धोरण 2020 अंमलबजावणीला आता तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. महाराष्ट्रात अमलबजावणी करण्यासाठी आणेक बदल प्रस्तावित होते. प्रस्तावित केलेल्या अनेक बदलांपैकी काही बदल महत्वाचे आहेत. विशेषत: उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात आता होत असलेले बदल महत्वाचे आहेत. उच्च शिक्षण क्षेत्रात अकादमिक बँक ऑफ क्रेडिट्स (एबीसी), मल्टीपल एक्झिट आणि मल्टीपल एंट्री (एमईएमई), नॅशनल क्रेडिट फ्रेमवर्क, नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क, प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस, चार वर्षांचा अंडरग्रेजुएट प्रोग्राम इत्यादी बदल प्रामुख्याने दिसून येतात आणि हे बदल आता जवळजवळ लागू होताना दिसतात. UGC ने अलीकडेच नवीन शैक्षणिक धोरणात भारतीय ज्ञान प्रणाली चे प्रत्येक स्तरावर आणि प्रत्येक विषयात एकत्रीकरण केलेले आहे. तसेच UGC ने 'भारतीय ज्ञानाचा उच्च शिक्षणामध्ये समावेश करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे' आणि 'भारतीय वारसा आणि संस्कृतीवर आधारित अभ्यासक्रमांच्या परिचयासाठी मार्गदर्शक तत्वे' दिलेली आहेत. महाराष्ट्रात, विद्यापीठ स्तरावर पदवी अभ्यासक्रमासाठी आणि स्वायत्त महाविद्यालयांनी २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून भारतीय ज्ञान प्रणाली नुसार सूक्ष्म क्रेडिट अभ्यासक्रम सुरू केले आहेत. पुढील शैक्षणिक वर्षापासून सर्व महाविद्यालये तत्सम अभ्यासक्रम सुरू करणार आहेत. लेखकाने काही स्वायत्त महाविद्यालयांच्या शिक्षकांशी संवाद साधला आहे ज्यांनी त्यांच्या महाविद्यालयांमध्ये भारतीय ज्ञान प्रणाली साठी अभ्यासक्रम तयार केला आहे. त्याची अंमलबजावणी, आव्हाने आणि उच्च शिक्षण क्षेत्रात पुढील संधी. या परस्परसंवादावर आधारित, हा लेख भारतीय ज्ञान प्रणाली च्या एकत्रीकरणाचे महत्त्व, प्रासंगिकता आणि प्रभाव अधोरेखित करतो.

**धोरणकर्त्यांची पार्श्वभूमी**

"प्राचीन आणि शाश्वत भारतीय ज्ञान आणि विचारांचा समृद्ध वारसा या धोरणासाठी मार्गदर्शक प्रकाश आहे" NEP2020 ने शिफारस केली आहे की, प्राचीन भारतातील ज्ञान, शिकण्याच्या स्वदेशी पद्धती, ज्ञान परंपरा, शालेय आणि उच्च शिक्षण या दोन्ही स्तरांवर सर्व विषयांमध्ये समाविष्ट केले जातील. आर्यभट्ट, भास्कराचार्य, ब्रह्मगुप्त, सुश्रुत, चरक, पाणिनी, कणाद, चाणक्य, गौतम, माधव, पिंगला, तिरुवल्लूर, मैत्री, गार्गी, अपला, लोपामुद्रा, रुतुंभरा इत्यादी महान भारतीय विद्वान आणि बहुविद्याशाखीय अध्यापन, संशोधन स्थळे. तक्षशिला, वल्लभी, विक्रमशिला इत्यादींची ओळख सर्व विद्यार्थ्यांना करून दिली पाहिजे, जेणेकरून ज्ञानाचा हा समृद्ध वारसा जपून, जोपासून आजच्या व्यवस्थेत लागू करता येईल.

**भारतीय ज्ञान प्रणाली बद्दलचे गैरसमज**

प्रारंभिक टप्प्यावरच भारतीय ज्ञान प्रणाली विषयांभोवती फिरत असलेल्या दंतकथावर वर चर्चा करणे आवश्यक आहे. भारतीय ज्ञान प्रणाली ही पौराणिक कथांबद्दल नाही. 'पुराणकथा' हा शब्द 'दंतकथा' या शब्दापासून आला आहे. ज्याचा अर्थ सत्य नाही किंवा वस्तुस्थिती नाही असा होतो. भारतात निर्माण झालेले कोणतेही ज्ञान कधीच दंतकथा नव्हते कारण भारतात सिद्धांत आणि व्यवहारात कधीच अंतर नव्हते. भारतीय ग्रंथांमध्ये विकसित केलेले सर्व सिद्धांत व्यावहारिक होते आणि जे प्रचलित होते ते सर्व सिद्धांताच्या भक्कम पायावर आधारित होते. भारतीय ज्ञान प्रणाली ही धार्मिक आहे, धर्मनिरपेक्ष नसलेली दुसरी दंतकथा आहे. जर कोणी "Asto ma sadgamaya…",वाचले तर ते धार्मिक आणि धर्मनिरपेक्ष कसे होईल हे लक्षात येईल. समाज आणि अभ्यासकांनी सर्व प्राचीन ग्रंथांमधील मजकुराचा खरा अर्थ

समजून घेणे आवश्यक आहे आणि ते शुद्ध स्वरूपात पुढील पिढीपर्यंत पोचवले पाहिजे. त्याची प्रासंगिकता आणि महत्त्व विद्यार्थ्यांना समजले पाहिजे. भारतीय ज्ञान प्रणाली म्हणजे केवळ भूतकाळ आणि आपल्या पूर्वजांचे गौरव करणे नव्हे. तर तरुणांमध्ये भारतीयांच्या शैक्षणिक, वैज्ञानिक योगदानाबद्दल अभिमान निर्माण करण्याची आणि 21व्या शतकातील समस्यांना उत्तर देण्यासाठी ज्ञाननिर्मितीचा वारसा पुढे नेण्याची गरज आहे. भारतीय ज्ञान प्रणाली हा विषय समजणे कठीण आहे किंवा ते सर्व आता नामशेष झाले आहेत मग त्यांचा अभ्यास का करायचा असा एक मतप्रवाह आहे. परंतु हा युक्तिवाद वस्तुस्थितीनुसार खरे नाहीत. 180 वर्षांहून अधिक काळ आपण भारतीय असलेले सर्व ज्ञानाचे विषय वाचणे, शिकणे बंद केले आहे. आत्ता शिकलो नाही तर काही वर्षांनी परदेशी लोक भारतात येतील आणि आम्हाला संस्कृत आणि इतर भारतीय ज्ञान प्रणाली शिकवतील म्हणून नवीन शैक्षणिक धोरण महत्वाचे आहे.

**भारतीय ज्ञान प्रणाली म्हणजे काय**

जेव्हा आपण भारतीय ज्ञान प्रणाली बद्दल बोलतो, तेव्हा त्यातील भारत हा आजचा 'राजकीय भारत' नाही. 'सांस्कृतिक' भारतात ज्ञाननिर्मिती शतकानुशतके आणि हजारो वर्षांपासून होत होती. विष्णु पुराणात एक श्लोक आहे जो येथे भारताचा अर्थ कोणता आहे हे स्पष्ट करतो, ते म्हणतात – "उत्तरं यत्स्मद्रुस्य हिमाद्रश्चे ैव दहिणम्| वर्षांतद्भारतम भारती यत्र सन्तहतिः". भारतवर्ष हा हिमालयाच्या दक्षिणेपासून हिंदी महासागराच्या उत्तरेपर्यंतचा प्रदेश आहे आणि त्यांच्या मुलांना भारती म्हणतात. जर आपण हा भारत सोडला तर आपल्याला पाणिनी, तक्षशिला, महाभारत आणि इतर अनेक मौल्यवान ग्रंथ आणि भारतीय ज्ञान प्रणाली मधील लोकांना आशा सोडावे लागेल. दुसरा शब्द 'ज्ञान' आहे. यामध्ये सर्व प्रकारचे औपचारिक शिक्षण, अनौपचारिक शिक्षणपद्धती, त्या प्रणालींमध्ये समाविष्ट असलेले विषय, 64 कला, 14 विद्या, मौखिक परंपरा, भौतिक ज्ञान, अध्यात्मिक ज्ञान, सर्व भारतीय भाषांमधील योगदान, बोलीभाषा, लोकसंस्कृती, आदिवासी परंपरा इत्यादी या एकाच शब्दाखाली येतात. तिसरा शब्द 'प्रणाली' आहे. वास्तविक, भारतीय ज्ञान प्रणाली ही भारतीय ज्ञान परंपरे सोबतही येते. म्हणून या ज्ञाननिर्मितीच्या पद्धतीचा अंतर्भाव करण्याइतपत आपण उदारमतवादी असू शकतो. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ज्ञानाचे हस्तांतरण, अध्यापनशास्त्र आणि पारंपारिक दृष्टीकोन यांचा अभ्यास, जतन आणि पुढच्या पिढीपर्यंत प्रसार करणे आवश्यक आहे. बऱ्याच मौखिक परंपरा जवळजवळ नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत आणि म्हणूनच या परंपरांचे आधुनिक अभ्यासक्रम आणि भारतीय ज्ञान प्रणाली सोबत एकत्रीकरण करून त्यांचे जतन करणे महत्वाचे आहे.

**भारतीय ज्ञान प्रणाली मध्ये काय समाविष्ट करावे**

भारताला शाश्वत ज्ञानाचा समृद्ध वारसा आहे, जे अनेक सहस्राब्दी भारतीयांनी साकारले आहे. लाखो हस्तलिखिते, शास्त्रे, मौखिक परंपरा, लोकगीते, कथा, कलाप्रकार, हस्तकला, जीवनातील सर्व क्षेत्रे व्यापणारी कौशल्ये या ज्ञानातून दिसून येतात. या भूमीत उत्क्रांत झालेला सनातन धर्म, बौद्ध धर्म, जैन धर्म, शीख धर्म आणि येथे प्रवेश केलेल्या आणि गेल्या एक हजार वर्षात आत्मसात झालेल्या इतर सर्वांचे सहअस्तित्व असलेली आपली सर्वात जुनी संस्कृती आहोत. आपल्या समाजाने विविधतेचा आदर करणारी संस्कृती विकसित केली आहे. ही ज्ञानाची भूमी आहे कारण आपण ज्ञानाशिवाय इतर कशालाही शुद्ध मानत नाही. चार वेद-ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद, चार उपवेद-आयुर्वेद, धनुर्वेद, गंधर्ववेद, अर्थशास्त्र, सहा वेदांग-शिक्षा (ध्वनीशास्त्राचे विज्ञान), कल्प (वैदिक कर्मासाठी ऑपरेशन मॅन्युअल), निरुक्त (शब्दांची व्युत्पत्तीशास्त्र), व्याकरण (व्याकरण, भाषाशास्त्र), छंद (ग्रंथ वाचण्यासाठी मीटर), ज्योतिष (खगोलशास्त्र आणि ज्योतिषशास्त्र), अठरा मुख्य पुराणे, दोन इतिहास-रामायण, महाभारत, दर्शने-न्याय, वैशेषिक, मीमांसा (उत्तर आणि पूर्वा), सांख्ययोग, बौद्ध, जैन, चार्वाक, हे सर्व भारतीय ज्ञान प्रणाली चा भाग आहेत. काहींनी त्याला 'धार्मिक' मजकूर म्हटले आहे. त्याचा आशय, तात्विक आणि भौतिक अर्थ समजून घेतल्यास अशा सर्व शंकांचे निरसन होईल. उदाहरणार्थ, सहा वेदांग हे स्पष्ट करतात की प्राचीन भारतीयांनी ज्ञानाचे विषय कसे व्यवस्थित केले. जोपर्यंत आपल्याला ध्वन्यात्मकता समजत नाही तोपर्यंत वेद वाचता येणार नाहीत, जोपर्यंत आपल्याला व्याकरण समजत नाही, जोपर्यंत आपल्याला प्रत्येक शब्दाचा अर्थ कळत नाही तोपर्यंत आपल्याला त्यातील ज्ञान समजणार नाही. महाभारताबद्दल असे म्हटले आहे की– "...यदिहादति नियत्र, यनहादति न किडि", "इथे जे आहे

ते इतरत्र सापडेल; पण जे इथे नाही ते इतर कोठेही सापडत नाही! भारतीय ज्ञान प्रणाली चे इतर प्रमुख विषय तरुणांना भुरळ घालतील कारण ते त्यांना त्यांच्या सध्याच्या अभ्यासक्रमाच्या विषयांशी सहजपणे जोडू शकतात. सर्व समावेशक असलेली यादी खालीलप्रमाणे आहे–गणित, खगोलशास्त्र, एरोस्पेस अभियांत्रिकी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, धातूशास्त्र, स्थापत्य अभियांत्रिकी, आर्किटेक्चर, वैद्यकशास्त्र, मानसशास्त्र, शिपिंग, वस्त्र, डिझाइन, तर्कशास्त्र, तत्वज्ञान, सार्वजनिक प्रशासन, अर्थशास्त्र, आंतरराष्ट्रीय, कायदेशीर प्रणाली, वित्त, व्यवस्थापन इत्यादी. या सर्व ग्रंथात, शेत्रात भारतीयांनी 18 व्या शतकापर्यंत भूतकाळात मोठे योगदान दिले आहे. चोल राजांनी बांधलेल्या सर्वात प्राचीन मानवनिर्मित धरणापासून ते दिल्लीतील लोखंडी स्तंभापर्यंत, विविध मंदिरांच्या भव्य वास्तुकलेपासून ते शिल्पे, प्राचीन बंदरे, अलीकडचे उत्खनन हे सर्व भारतीयांच्या ज्ञानाचा मोठेपणा दाखवून देतात. 19व्या शतकाच्या सुरुवातीस, ब्रिटीशांनी ही सर्व ज्ञाननिर्मिती केंद्रे जबरदस्तीने बंद करण्यास सुरुवात केली आणि पुढील 180 वर्षांहून अधिक वर्षे भारतीय त्याच्या ज्ञानपरंपरेपासून दूर गेले. नविन शैक्षणिक धोरण 2020, हे एक प्रकारे, आधुनिक काळातील अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्रासोबत भारतीय ज्ञान प्रणाली एकत्रित करून या ज्ञानाचा वारसा पुन्हा मिळवण्यासाठी आजच्या पिढीसमोर ठेवत आहे. पारंपारिक अध्यापनशास्त्राचे उदाहरण म्हणजे फिरते शिक्षण. बरेच लोक म्हणतात की ते वाईट आहे, परंतु आपल्या आजीला विचारल्यानंतर कळेल की तिला फक्त पूर्ण संख्याच नव्हे तर त्यांच्या सुरुवातीच्या शालेय दिवसांमध्ये शिकलेल्या अपूर्णांकांचे तक्ते अजूनही आठवतात. मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये ते पावकी, निमकी, डिडकी, सव्वाकीचे तक्ते शिकवत असत. त्या काळातील लोक आजच्या व्यवस्थेतील कोणत्याही पदवीधरापेक्षा सर्व व्यावहारिक गणनेत व्यावहारिकदृष्ट्या हुशार असेल आणि आजच्या विद्यार्थाला कॅल्क्युलेटरची आवश्यकता असते. त्यामुळे आधुनिक काळातील शिक्षणाच्या शोधात आपण एवढ्या मोठ्या कालावधीत कोणता खजिना अंधारात ठेवला आहे हे लक्षात येईल.

**मी/आम्ही काय करू शकतो**

शिक्षणतज्ञांनी प्रथमतः त्यांच्या विषयांशी संबंधित ग्रंथ अस्सल स्त्रोतांकडून वाचावेत. भाषांतरे नेहमीच चांगली नसतात कारण बहुतेक संज्ञा मराठीमध्ये अनुवादित नसतात. साहित्यिक अनुवादापेक्षाही त्याचा अर्थ योग्य संदर्भासह बऱ्याच वेळा देऊ शकत नाही. भारतीय ज्ञान प्रणालीशी संबंधित विषयांवर संशोधन, भाषांतर क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती, संस्था यांच्या सहकार्याने काम केले पाहिजे. भारतीय ज्ञान प्रणाली अंतर्गत सामग्रीचा प्रसार विद्यार्थ्यांसाठी चांगल्या पद्धतीने व्हायला पाहिजे. अध्यापनशास्त्रावर माहितीचा जास्त भडिमार, कठोर आणि ठराविक इतिहास सांगणे टाळले पाहिजे. बहुविध शिक्षण धोरणे, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींद्वारे विषय मनोरंजक बनविले गेले पाहिजे. केवळ भारतीय ज्ञान प्रणाली अभ्यासक्रमांची रचना आणि विकास करतानाच नव्हे तर अंमलबजावणी आणि मूल्यमापन टप्प्यातही भारतीय ज्ञान प्रणाली चे उद्दिष्ट अतिशय स्पष्ट असले पाहिजे. अन्यथा, भारतीय ज्ञान प्रणाली कोर्सला फाउंडेशन कोर्स सामोरे जावे लागेल. भारतीय ज्ञान प्रणाली अभ्यासक्रमांद्वारे पुढच्या पिढीच्या मनात भारतीय असण्याचा अभिमान निर्माण करण्यासाठी आपण सर्वांनी हातमिळवणी करूया आणि नवीन शैक्षणिक धोरण 2020 च्या व्हिजनमध्ये अपेक्षेप्रमाणे आपले राष्ट्र ज्ञान महासत्ता बनवण्याचे भारतीय म्हणून कर्तव्याची जाणीव करून देऊ या.

**संदर्भ:**

1. चरक संहिता
2. सुश्रुत संहिता
3. तेह अष्टांग हृदय
4. डॉ दीपक चोप्रा, परफेक्ट हेल्थ--सुधारित आणि अपडेटेड: संपूर्ण मन बॉडी गाइड, हार्मनी प्रकाशन, 2001
5. वसंत लाड, आयुर्वेद, स्वयं-उपचाराचे विज्ञान: एक व्यावहारिक मार्गदर्शक: सेल्फ-हिलिंगचे विज्ञान, लोटस प्रेस, 1984
6. हठ योग प्रदीपिका
7. पतंजली योग सूत्रे
8. घेरंडा संहिता
9. बीकेएस अय्यंगार, लाइट ऑन योगा: द क्लासिक गाईड टू योग द्वारे जगातील अग्रगण्य प्राधिकरण, थ्रोन्सन प्रकाशन, 2006
10. स्वामी सत्यानंद सरस्वती, आसन, प्राणायाम, मुद्रा आणि बंधन, बिहार योग विद्यालय, 2002

# G-20 आणि भारत

**डॉ. अर्चना रामाजी मेश्राम**
सी.एच.बी. प्राध्यापक एलएडी अॅण्ड आर.पी. कॉलेज ऑफ वूमन्स, शंकरनगर, नागपूर

जी २० हा जगातील २० देशांनी मिळून बनलेला एक शक्तीशाली गट आहे. जी २० हा Group of Twenty चा एक अंतरराष्ट्रीय मंच आहे ज्याची सीापना २६ सप्टेंबर १९९९ मध्ये झाली ज्यामध्ये जागतिक, आर्थिक, मुद्दे, सुलभ आरोग्य सुविधा आणि तांत्रिक प्रगती आणि शाश्वत विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी विश्वातील प्रमुख अर्थव्यवस्थेला एकत्र आणतो १९९० च्या शेवटच्या दशकातील वित्तिय संकटावर मात करण्यासाठी पूर्वी आशिया आणि दक्षिण पूर्व आशियाला प्राभावित केला. त्या पार्श्वभुमीवर जर्मनीमध्ये जी८ देशाची बैठक झाली. यामध्ये मजबूत अर्थव्यवस्था असलेल्या २० देशाचा समावेश करण्यात आला. जी २० हा जगातील प्रमुख देशाच्या अर्थमंत्री व मध्यवर्ती बॅकेच्या गव्हर्नराचा एक गट आहे. वास्तविकपणे हया गटात १९ देश व युरोपीयन संघाचा समावेश आहे. दक्षिण आफ्रिका, कॅनडा, मेक्सिको, अमेरिका अर्जेटिना, ब्राझील, चीन, जपान, दक्षिण कोरिया, भारत, इंडोनेशिया, सोदी अरबिया, रशिया, तुर्कस्तान, युरोपीयन संघ, फ्रान्स, जर्मनी, इटली, युनायटेड किंग्डम, ऑस्ट्रेलिया हया २० देशाचा समावेश जी २० मध्ये होतो. युरोपीयन परिषदेचे अध्यक्ष व युरोपीय मध्यवती बॅकेचे अध्यक्ष युरोपीयन संघाची जी २० मध्ये प्रतिनिधीत्व करतात. जी २० सदस्य देशाचा एकत्रित जीडीपी जगाच्या ८५ टक्के आहे व हे २० देश एकुण जागतिक व्यापाराच्या ७५ टक्के व्यापरासाठी कारणीभूत आहेत. जे एकुण जागतिक लोकसंख्याच्या ६० टक्के जी२० आहे. २००८ च्या सुरवातीच्या बैठकापासून जी २० देशाच्या प्रमुखांनी ठराविक कालावधीत परिषदेत वेळोवेळी सहभाग घेतला आहे आणि अलिकडच्या काळात आपल्या कार्यसूचीच्या विस्तारामुळे या गटामध्ये वित्तमंत्री आणि परराष्ट्र देश जी २० ते त्यांच्या एका विशिष्ट वर्षासाठी बैठक बोलावतो. कोणता देश या बैठकीचे आयोजन करणार हे ठरविण्यासाठी सर्व २० सार्वत्रीम देश पाच वेगवेगळया गटात एकाला विभागले जातात. प्रत्येक समुहात जास्तीत जास्त चार राष्ट्रे आहेत. ही प्रणाली २०१० पासून अस्तित्वात आली आहे, जेव्हा दक्षिण कोरिया जो गट ५ मध्ये आहे. जी २० बैठक आयोजित केली होती. खालील तक्त्यांमध्ये राष्ट्राच्या गटाची सूची दिलेली आहे.

| गट १ | गट २ | गट ३ | गट ४ | गट ५ |
|---|---|---|---|---|
| ऑस्ट्रेलिया | भारत | अर्जेटिना | फ्रान्स | चीन |
| कॅनडा | रशिया | ब्राजील | जर्मनी | इंडोनेशिया |
| सौदी | दक्षिण अफ्रिका | मॅक्सिको | इटली | जपान |
| अरेबिया | अमेरिका | यूनायटेड | | दक्षिण |
| संयूक्त राष्ट | तुर्की | युरोपीयन संघ | किंग्डम | कोरिया |
| | | संघ | | |

जी २० बैठकी दरम्यान जगातील अर्थव्यवस्था मजबुत करण्यावर आणि तिला प्रोत्साहन देण्यावर चर्चा होते. आर्थिक मजबुतीमध्ये देशामध्ये रोजगाराच्या संधी निर्माण होतात. इर्थ शिक्षण, अन्नधान्याच्या किंमती नियंत्रित करणे यावर चल होते. २००९ आणि २०१० च्या दरम्यान झालेल्या जी २०शिखर परिषदेचे सम्मेलन अर्थ वार्षिक होती. नोव्हेंबर २०११ च्या कान्स् सम्मेलनापासून सर्व जी २० परिषदेचे आयोजन दरवर्षी झाले. दोन दशकाहून अधिक काळात एकुण ७ वेळा जी २० च्या बैठका झाल्या आहेत. जी २० परिषद आयोजित करण्याची ही भारताची १८ वी बैठक आहेत. जी २० सदस्यामध्ये भारतासह अनेक देशाचा समावेश आहे. त्या सर्व देशाच्या समावेश कोणत्या खंडात होतो. सर्कल उत्पन्न किती आहे. दरडोई उत्पन्न किती आहे आणि त्या देशांची लोकसंख्या किती आहे हे पुढील तक्त्यात दर्शविले आहे.

| खंड | सदस्य | सकल वार्षिक उत्पन्न दशलक्ष अमेरिकन डॉलर | दरडोई उत्पन्न अमेरिकन डॉलर | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| आफ्रिका | दक्षिण आफ्रिका | ४९२६८४ | ५७०० | ४,९३,२०,५०० |
| उत्तर अमेरिका | कॅनडा<br>मेक्सिको<br>अमेरिका | १,२८१०६४<br>१४,६५,७२६<br>१४,२५६,२७५ | ३९६००<br>९१००<br>४६,४०० | ३,४०,८८,०००<br>१,११,२११,७८९<br>३०९,१७३,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दक्षिण अमेरिका | अर्जेंटिना<br>ब्राझिल | ५८४,३९२<br>२,०१३,१८६ | ७५००<br>८००० | ४०,१३४,४२५<br>१,३३,०८८,७८५ |
| पूर्व आशिया | चीन<br>जपान<br>दक्षिण कोरिया | ८७६५२४०<br>४,१५९,४३२<br>१,३६४,१४८ | ३७००<br>३९,८००<br>१७,१०० | १,३३८,६७२,३६३<br>१२७,३९६,०००<br>४८,८७५,००० |
| दक्षिण आशिया | भारत | ३५२६१२४ | १००० | १,१८०,२५१,००० |
| आग्नेय आशिया | इंडोनेशिया | ९६२,४७१ | २२०० | २३१,३६३,५०० |
| मध्य पूर्व | सौदी अरेबिया | ५९३,३८५ | १४,४०० | २५७२१००० |
| युरेशिया | रशिया<br>तुर्कस्थान | २१०९५५१<br>८८००६१ | ८८००<br>७९०० | १४१,९२७,२९७<br>७२,५६१,३१२ |
| युरोप | यूरोपियन संघ<br>फ्रान्स<br>जर्मनी<br>इटली<br>युनायटेड किंग्डम | १४,७९३,९७९<br>२,१०८,२२८<br>२,८०६,२२६<br>१,७४०,१२३<br>२,१३९,४०० | ३२९००<br>४१,६००<br>४०,८००<br>३६,४००,<br>३५,००० | ५०१,२५९,३४०<br>६५,४४७,३७४<br>८१,७५७,६००<br>६०,३२५,८०५<br>६२,०४१,७०८ |
| ओशनिया | ऑस्ट्रेलिया | ८५१,१७० | ४६,३०० | २४३२८,६३ |

जी २० हे जी ७ या औद्योगिक देशाच्या राष्ट्र गटाचं विस्तारीत रूप मानल जाते. विकसनशील आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांना समावून घेऊन जगाच्या अर्थव्यवस्थेला स्थिरता देणं हा या गटाचा उद्देश आहे. संयुक्त राष्ट्राच जस न्युयार्कमध्ये एक कार्यालय किंवा सचिवालय नाही. अजेंटा आणि समन्वय साधण्याचं काम जी २० देशाचे प्रतिनिधी करतात ज्यांना शेरपा म्हणुन ओळखले जाते. दरवर्षी एका देशाकडे जी २० चं अध्यक्षपद येते. यालाच जी २० प्रेसिडंसी म्हणतात. प्रत्येक प्रेसिडंसीच्या शेवटी जी २० राष्ट्रगटाची बैठक होते आणि कारभार पुढच्या अध्यक्षावर सोपवला जातो. जी २० विद्यमान अध्यक्ष आधीचे आणि पुढचे अध्यक्ष राष्ट्र यांच्या मदतीनं कारभार चालवतात. भारत इंडोनेशिया आणि ब्राझीलच्या मदतीत जी २० चा कारभार पहिले. २०२३ सालची शिखर परिषद भारतात झाली.

**जी २० आणि भारत**

भारतातील २० चे ब्रिदवाक्य 'वसुधैव कुटूंबकम' आणि लोकांमध्ये कमळ भारताच्या प्राचीन वारसा, आपली आस्था, बौद्धिकता यांच चित्र करत. भारतात जी २० ची शिखर परिषद काश्मिरमध्ये करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारने मांडला होता, पण पाकिस्थान, चीन, तुर्की, सौदी अरेबिया ने विरोध दर्शविल्यामुळे दिल्लीत ही परिषद संपन्न झाली.भारताकडे ही प्रेसीडंसी असल्यामुळे भारताने वर्षभरासाठीचा अजेंडाही ठरवला. तसचं अध्यक्ष या नात्याने बांग्लादेश, इजिप्त, मॉरिशस, नेदरलॅंड, नायजेरिया, ओमान, सिंगापूर, स्पेन आणि यूएई या देशाना निमंत्रण दिल होता. जी – २० शी संबंधीत विविध कर कार्याशाखांच्या २०० पेक्षा अधिक बैठका भारतातील ५० शहरामध्ये झालेल्या आहेत. जी २० च्या प्रतिनिधींना आणि बैठकासाठी येणाऱ्या पाहुण्यांना संपूर्ण वर्षभर भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरांचे दर्शन झाले. १ डिसेंबर २०२० ते ३० नोव्हेंबर २०२३ पर्यंत भारत जी २० संघटनेचे अध्यक्षपद भूषवत आहे.

जी २० मध्ये दोन समांतर प्रवाह असतात. विलीय आणि शेर्पा. वित्तमंत्री आणि मध्यवर्ती बॅंकाचे गर्व्हनर वितिय विषयक नेतृत्व करतात. तर शेर्पा, शेर्पा संदर्भात नेतृत्व करतात. जी २० च्या शेर्पा प्रवाहाची प्रक्रिया सर्व सदस्य देशाच्या शेर्पाकडून समन्वयीत केली जाते. शेर्पा त्या त्या देशातील नेत्यांचे वैयक्तिक दूत असतात. शेर्पा प्रवाह १३ कार्यगट २ उपक्रम (RIIG आणि H20 एम्पॉवर) आणि विविध कार्यरत गटाच्या कार्यावर देखरेख करतो. हे सर्व गट वर्षभर भेटतात आणि समांतरपणे त्यांची निरिक्षणे आणि बैठकांचे फलीत या संबंधिचे दस्ताऐवज वेळोवेळी जारी करतात. त्यांच्या बैठकामध्ये होणाऱ्या महत्वपूर्ण चर्चानंतर, शेर्पाच्या बैठकीत त्या विषयांवर सहमती आधारित शिफारशी ठरवल्या जातात. भारतात जी २० चे शेर्पा पियूष गोयल होते. मात्र त्यांच्या कार्यत्यग्रतेमुळे १९८० वा बॅचचे निवृत्व आयएएस अधिकारी अमिताभ कॉन यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली.

याशिवाय जी २० देशामध्ये नागरी समाज, संसद सदस्य, विचारवंत, महिला, यूवा वर्ग, कामगार, व्यवसाय आणि संशोधक यांना एकत्र आणणारे, कार्यगट आहेत. भारताच्या जी २० अध्यक्षपदांतर्गत पहिल्यांदाच, स्टार्टअप जी २० कार्य गटाची स्थापना करण्यात आली असुन यामुळे झपाटयाने बदलणाऱ्या जागतिक परिस्थितीमध्ये आवश्यक असलेला प्रतिसाद म्हणजेच नवोन्मेसाला चालना देणो बळ म्हणुन स्टार्ट अपचे महत्व लक्षात घेतले जाणार आहे. जी २० गटाच्या सामुहिक कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच आपली जोखीम कमी करण्याबाबत सर्वोत्तम पद्धतीचे आदानप्रदान आणि बहुशाखीय संशोधन करण्यासाठी भारताच्या अध्यक्षतेखालील आपती जोखीम कमी करण्याबाबत एक नवीन कृती गट स्थापन करण्यात आला होता.

बांग्लादेश, इजिप्त, मॉरिशस नेदरलॅाड, नायजेरिया, ओमान, सिंगापूर, स्पेन आणि यूएई हे भारताचे विशेष आमंत्रित अतिथी देश आहेत. संयुक्त राष्ट्र ( ), आंतरराष्ट्रीय नावे निधी (IMF) , जागतिक Wad, जागतिक आरोग्य संघटना, (WHO), जागतिक व्यापार संघटना (WTO) आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO), एफएसबी (FSB), ओईसीडी (OECD), एयम चे अध्यक्ष, एनईपी एंडी चे अध्यक्ष, आसियान अध्यक्ष आशियाई विकास बॅक, आंतरराष्ट्रीय सौर आघाडी आणि सीडीआरआय या जी २० ने आमंत्रित केलेल्या आंतरराष्ट्रीय सौर आघाडी आणि सीडीआरआय या जी २० ने आमंत्रित केलेल्या आंतरराष्ट्रीय संस्था आहेत.

**भारतीचे जी २० प्राधान्यक्रम**

कोविड १९ महामारीने हवामान बदलाच्या मोठया प्रभावाखालील आपल्या प्रणालीच्या मर्यादासमारे आणल्या आहेत. या संदर्भात, भारताच्या अध्यक्षपदा च्या कार्यकाळात हवामान बदल हा प्रमुख अजेंडयापैकी एक असेल, ज्यामध्ये केवळ हवामान वित आणि तज्ञानावरच लक्ष केंद्रीत केले जाणार नाही. तर जगभारातील विकसनशील राष्ट्रासाठी उर्जा संक्रमण देखील सुनिश्चित केले जाणार आहे. उद्योग, समाज आणि विविध क्षेत्रांमध्ये हवामान बदलीची समस्या लक्षात घेवुन भारताने जागासाठी LIFE (पर्यावरणासाठी जीवनशैली) आणली आहे. ही एक वर्तन आधारित चळवळ आहे जी आपल्या देशाच्या समृद्ध, प्राचीन शाश्वत परंपराच्या माध्यमातून ग्राहकांना आणि बाजारपेढेला पर्यावरणालाच्या दृष्टीने अनुकल पद्धतीचा अलवंब करायला उपयुक्त करते. भारताच्या जी २० संकल्पनेशी 'वसुधैव कुटूंबकम' किंवा 'एक पृथ्वी एक कुटूंब' एक भविष्य सा संकल्पनेशी सुसंगत आहे. गतिमान सर्वसमावेशक आणि लवचिक विकास वेगवान, टिकाउ (लवचिक) आणि सर्वसमवेशक विकास हे शाश्वत विकासाचा आधारस्तंभ आहेत. आपल्या जी २० अध्यक्षपदाच्या काळात, भारताने अशा क्षेत्रांवर लक्ष केंद्रीत करण्याचे उद्दष्ट ठेवले आहे ज्यात संरचनात्मक परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता आहे. यामध्ये जागतिक व्यापारात MSME च्या एकत्रीकरणाला गती देणे, वाढीसाठी व्यापाराची भावना आणणे, कामगार अधिकारांना प्रोत्साहन देणे आणि कामार कल्याण सुरक्षित करणे, जागतिक कौशल्यांमधील अंतर दूर करणे आणि समावेशी कृषी मूल्य साखळी आणि अन्न प्रणाली तयार करणे इत्यादीचा समावेश आहे.

**शाश्वत विकास उद्दीष्टांना गती देणे.**

भारताचे जी २० अध्यक्षपद २०३० अजेंडाच्या महत्वपूर्ण टप्प्याच्या मध्यात आले आहे. भारताने कोविड –१९ चे हानिकारक प्रभाव लक्षात घेतले आणि कृती करण्याच्या सध्याच्या दशकाचे पुनप्राप्तीच्या दशकात रूपांतर केले. या दृष्टीकोनाशी सुसंगत राहत २०३० शाश्वत विकास उद्दीष्टये साध्य करण्याच्या दिशेने जी २० गटाद्वारे प्रयत्नांची पराकष्ठा करण्यावर भारत लक्ष केंद्रीत करू इच्छितो.

जी २० अध्यक्ष म्हणुन भारत तंत्रज्ञा मानव केंद्रीत दृष्टीकोनावर विश्वास ठेवून सार्वजनिक डिजिटल पायाभूत सूविधा, आर्थिक, समावेशकता आणि कृषीपासून शिक्षणापर्यतच्या विविध क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञान सक्षम विकास यासारख्या प्राधान्य क्षेत्रांमध्ये अधिकाधिक ज्ञानाची देवाणघेवण सूलभ करू शकतो.

**एकविसाव्या शतकासाठी बहुपक्षीय संस्था :**

अधिक जबाबदार आणि सर्वसमावेशक आंतरराष्ट्रीय संस्थासाठी सूधारित बहुराष्ट्रीय वादासाठी जो लावण्याला भारत आपल्या जी २० अध्यक्षपद कार्यकाळात प्राधान्य देईल. एक अशी आंतरराष्ट्रीय व्यवस्थ ज्यात सर्वसमावेशक, न्याय, समान आणि बहुध्रुव्रीय प्रतिनिधीत्व असेल, अशी व्यवस्था की एकविसाव्या शतकातील आव्हानांचा सामना करण्यास योग्य असेल.

**महिला नेतृत्वाखालील विकास**

भारताच्या जी २० केंद्रस्थानी महिला सशक्तिकरण आणि प्रतिनिधीत्व हे मुद्दे असून सर्वसमावेशक वाढ आणि विकास अधीरेखित करण्यासाठी जी २० व्यासपीठाचा वापर करण्याची भारता आशा आहे.

**जी २० शिखर सम्मेलन**

जी २० शिखर सम्मेलन वरच्या स्तरावर बैठका आहेत, ज्यामध्ये सदस्य देशातील राष्ट्रध्यक्ष किंवा सरकार प्रमुख जागतिक मुद्दयावर चर्चा करण्यासाठी एकत्र येतात. हे शिखर सम्मेलन दरवर्षी होतात आणि वेगवेगळया सदस्य देशाद्वारे आयोति केले जातात. जी २० च्या शिखर सम्मेलनाची सूची पुढीलप्रमाणे दिली आहेत.

| सम्मेलन | तारीख | देश | मेजवान शहर | कार्यक्रमाचे स्थान |
|---|---|---|---|---|
| १ली | १४–१५ नोव्हेंबर २००८ | संयुक्त अमेरिका | वॉशिंग्टन डीसी | राष्ट्रीय भवन संग्रहालय |
| २री | २ एप्रिल | युनायटेड किंग्डम | लंडन | एक्सेल लंडन |
| ३री | २४–२५ सितंबर २००९ | संयुक्त राज्य अमेरिका | पिट्सबर्ग | डेविड एल. लॉरेंस कर्न्वेशन सेंटर |
| ४वी | २६–२७ जून २०१० | कॅनेडा | टोरंओ | मेट्रो टोरंटो कर्न्वेशन सेंटर |
| ५वी | ११–१२ नोव्हेंबर २०१० | दक्षिण कोरिया | सोल | COEX कन्वेशन एवं प्रदर्शनी केंद्र |
| ६वी | ३–४ नोव्हेंबर २०११ | फ्रांस | कॉस | पैलेस त्योहारे |
| ७वी | १८–१९ जून २०१२ | मेक्सिको | सॅन जोस डे काबोलॉस | लॉस, काबोस इंटरनेशनल कन्वैशन |
| ८वी | ५–६ सितंबर २०१३ | रशिया | सेंट पिटटबर्ग | कॉन्स्टेंटाईन पैलीस |
| ९वी | १५–१६ नोव्हेंबर २०१४ | ऑस्ट्रेलीया | ब्रिस्बेन | ब्रिस्बेन कन्वैशन और प्रदर्शनी केंद्र |
| १०वी | १५–१६ नोव्हेंबर २०१५ | टर्की | सेरिका अंतलया | रेग्नम कैरीया होटल कन्वैशन सेंटर |
| ११वी | ४–५ सप्टेंबर २०१६ | चीन | प्रमविर | हांग्जो अंतरराष्ट्रीय प्रदर्शनी केंद्र |
| १२वी | ७–८ जुलै २०१७ | जर्मनी | हैम्बर्ग | हैम्बर्ग मेस्से |
| १३वी | ३० नोव्हेंबर – १ डिसेंबर २०१८ | अर्जेंटिना | ब्यूनस आयर्स | कोस्टा सालगुएटो केंद्र |
| १४वी | २८–२९ जुन २०१९ | जपान | ओसाला | इंटेक्स ओसाका |
| १५वी | २१–२२ नोव्हेंबर २०२० | सौदी अरब | रियाद | कोविड १९ मुळे विडीओ कॉन्स्फ्ररन्स ने झाले. |
| १६वी | ३०–३१ ऑक्टोबर २०२१ | इटली | रोम | EUR कन्वेशन सेंटद |
| १७वी | १५–१६ नोव्हेंबर २०२२ | इंडोनेशिया | जुला हुआ बाली | अपूर्व केम्पिंस्की बाली |
| १८वी | ९–१० सितंबर २०२३ | भारत | नवी दिल्ली | भारत मंडपम |
| १९वी | १५–१९ नोव्हेंबर २०२४ | ब्राझिल | रियो डी जेनेरियो | आधुनिक कला का संग्रहन |
| २०वी | टिबीडी २०२५ | दक्षिण आफ्रिका | टीबीडी | टीबीडी |
| २१वी | टिबीडी २०२६ | संयुक्त राज्य अमेरिका | टीबीडी | टीबीडी |

**बी २० शिखर सम्मेलन**

बी २० जी २० देशां के व्यापारिक नेत्यांच्या शिखर सम्मेलन आहे. याची सुरवात २०१२ ला लॉस कानोस पासून झाली.

**सी २० शिखर सम्मेलन**

सी २० जी २० देशातील समाजातील नागरिकाच्या प्रतिनिधीचरा शिखर सम्मलेन आहे. या सम्मेलनाची सुरवात २०१४ मध्ये मेलबर्न पासून झाली.

**एल २० शिखर सम्मेलन**

एल २० जी २० देशातील कामगार आणि रोजगार नेत्याचे शिखर सम्मेलन आहे. सम्मेलनाची सुरवात २००८ मध्ये वॉशिंग्टन मध्ये झाली.

**पी २० शिखर सम्मेलन**

एल २० जी २० देशातीलसम्मेलन आहे. या सम्मेलनाची सुरवात २०१० मध्ये कनाडा मध्ये झाली.

**एस २० शिखर सम्मेलन**

एस २० जी २० देशातील विद्वान आणि नागरिक प्रतिनिधीचे सम्मेलन आहे. या सम्मेलनाची सुरवात २०१७ मध्ये जर्मनी पासून झाली.

**स्टार्टअप २० शिखर सम्मेलन**

स्टार्टअप २० सम्मेलनाची सुरवात २०२३ मध्ये भारतीय प्रेसिडैसी द्वारा झाली. ज्यात स्टार्टअप ला समर्थन केले जाते. स्टार्टअप, कॉरपोरेट्स, गुंतवणूकदार, इनोवेशन एजंसी आणि मुख्य हितधारकाच्या सोबत (तालमेल) केले जाते.

**टी २० शिखर सम्मेलन**

टी २० जी २० देशातील सल्लागाराचं सम्मेलन आहे. या सम्मेलनाची सुरवात २०१२ पासून मेक्सिको सीटीमध्ये झाली.

**यू २० शिखर सम्मेलन**

यू २० (शहरी) शिखर सम्मेलन जी २० देशातील शहरांचे शिखर सम्मेलन आहे. या सम्मेलनाची सुरवात २०१८ मध्ये ब्युनस आयर्सपासून झाली.

**डब्लू (W) २० शिखर सम्मेलन**

पहिल्या डब्लू २० महिला शिखर सम्मेलनाची सुरवात जर्मनी चांसलर एंजेला मर्केल यांनी केलेली आहे. यामध्ये जी २० देशातील महिलांचा समावेश होता. २०१७ मध्ये बर्लीन

**वाय २० शिखर सम्मेलन**

वाय २० जी २० देशातील १८ ते ३० वर्ष वयाच्या यूवा नेता आणि परिवर्तन कर्ताच्या शिखर सम्मेलन आहे. या सम्मेलनाची सुरवात २०१० पासून वैकूनर मध्ये झाली.

**साई २० शिखर सम्मेलन**

सुप्रील ऑडिर इस्टीटयूशन (SAI) २० २०२२ मध्ये इंडोनेशियाई प्रेसिडेंसी ने सुरू केलेले आहे. यात पारदर्शिता आणि जी २० सदस्यांच्या मध्ये सहयोग निर्माण होईल.

**सारांश :**

भारतात ११० पेक्षा जास्त राष्ट्राची १२,३०० पेक्षा जास्त प्रतिनिधीनी जी २० च्या संबंधित लेढका मध्ये भाग घेतला होता. यामध्ये जी २० सदस्य राष्ट्रासोबतच ९ आमंत्रित देश आणि १४ आंतरराष्ट्रीय संगठनाच्या समावेश होता.

भारताने आपल्या अध्यक्षपद कार्यकाळाच्या कार्यक्रमाची सुरवात विविध सांस्कृतिक उपक्रमांनी केली. ज्यामध्ये विविध लोकसहभागाचे उपक्रम, देशभरातील ७५ शैक्षणिक संस्थाबरोबर विशेष विद्यापीठ कनेवर कार्यक्रम जी २० लोगो आणि रंगासह रोषणाई आणि नागालॅड मधील ठोंबिली महोत्सवात जी २० ओळख करून देणे इत्यादीचा समावेश होता. वाळू शिल्प कलाकार सुदर्शन पटनार्थक यांनी ओडीशातील पुरी चौपाटीवर वाळू शिल्पातून भारताच्या जी २० लोगोचे दर्शन घडवतो. वर्षभर चालणाऱ्या विविध कार्यक्रमामध्ये युवा सांस्कृतिक कार्यक्रम आणि कार्यक्रम होणाऱ्या संबंधित शहरातील पेक्षणीय स्थळी आणि परंपरा दर्शविणाऱ्या सहलीचेही नियोजन केले होते.

**संदर्भग्रंथ : —**


१. G 20 inclusive Business Activities summary report, A G 20 Argentina 2018, 2 December 2018, united nations development
२. G 20 Data gaps initiative II : Meeting the policy challenge, Mr. Robert M. Heath and Ervin, IMF, released 1 March 2016.
३. India and the Future of G 20 : Shaping Policies for a Better World, Iqbal Singh Sevea, Amitenduplit, Bloomsbury Publishing Now Delhi 18 November 2023
४. https://www.g20.org/en
५. mr.m.wikipedia.org/wiki/g20
६. आंतराष्ट्रीय अर्थशास्त्र, जी.एम. झामरे, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, महाल, नागपूर.
७. https:en.m.wikipedia.org/wiki/list_of_G20_summits
८. https://www.aajfak.in/events/g20_summit2023
९. https://pib.gov.in/pressrelasepage.aspxsPRIO=1882367

# भारतीय अर्थव्यवस्थेमधील विविध विकासात्मक योजनाचे मुल्यमापन

**प्रा. डॉ. गव्हाळे बी. व्ही.**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख बी.डी.काळे महाविद्यालय घोडेगाव ता. आंबेगाव जि.पुणे ४१२४०८

**सारांश**:—
२०१४ मध्ये सार्वत्रिक निवडणूका झाल्या. त्यामध्ये भाजपा सरकार सत्तेमध्ये आले. भाजप सरकारने म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदीजीनी विविध प्रकारच्या योजना भारतातील विविध जनतेसाठी सुरू केलेल्या आहेत. म्हणून मी माझ्या शांधनिबंधासाठी भारत सरकारने सुरू केलेल्या कोणकोणत्या योजना आहेत? या विविध प्रकारच्या योजना सुरू करण्यामागील सरकारचे कोणते उदेश होते? या विविध योजनेसाठी पात्र कोणत्या व्यक्ती असतील? या विविध योजनांसाठी कोणत्या प्रकारची कागदपत्रांची पूतर्ता करावी लागते? आणि या विविध योजनांचा किती लोकांना लाभ झालेला आहे. इत्यादी घटकांचा विचार केलेला आहे.

**प्रास्ताविक:—**
भारत सरकारने स्वातंत्र्योत्तर काळामध्ये विविध प्रकारच्या योजनांची आखणी करून अंमलबजावणी केलेली आहे. साधारणत: ७४० केंद्रीय योजना आहेत. २०१४ मध्ये सार्वत्रिक निवडणूका झाल्यानतंर भाजपाचे सरकार सत्तेमध्ये आले. आणि देशाचे प्रतप्रधान म्हणून मा. नरेंद्र मोदीजी निवड करण्यात आली. या सरकारने जनतेच्या विकासासाठी विविध प्रकारच्या नवनवीन योजना सुरू केलेल्या आहेत. त्यामध्ये स्टार्ट अप इंडिया (Start up India) मेक इन इंडिया (Make in India) स्टॅन्ड अप इंडिया (Stand up India) मुद्रा लोन योजना/प्रधानमंत्री मुद्रा लोन योजना (Mudra loan Schem) इत्यादीचा समावेश होत आहे.

**शोधनिबंधाची उदिष्टये**:—
१) भारत सरकारच्या विविध योजना कोणत्या आहेत. त्या समजून घेणे.
२) २०१४ पासून पंतप्रधान श्री मा. नरेंद्र मोदीजींनी कोणत्या योजा सुरू केलेल्या आहेत. त्या समजून घेणे.
३) मोदी सरकाच्या विविध योजनाचे उदेश कोणकोणते आहेत. ते समजून घेणे.
४) विविध योजनेसाठी कोणत्या व्यक्ती पात्र असतील, याची माहिती करून घेणे.
५) विविध योजनांचा लाभ कोणाला आणि कितपत झालेला आहे. याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके**:—
१) भारत सरकारच्या विविध योजना कार्यरत आहेत.
२) २०१४ पासून भाजप सरकारने जनतेच्या हिताच्या विविध योजनांची अंमलबजावणी सुरू केलेली आहे.
३) सरकारच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीमुळे रोजगाराची उपलब्धता झालेली आहे.
४) सरकारच्या विविध योजनांचा विविध लोकांना मोठया प्रमाणावर लाभ झालेला आहे.
५) सरकारच्या विविध प्रकारच्या योजनासंबंधीची माहिती सर्व जनतेला आहे.

**सशोधन पध्दती**:— संबंधीत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक आणि निरीक्षण पध्दतीचा वापर केलेला आहे.
२०१४ पासून भारत सरकारने समाजातील विविध वर्गासाठी आणि जनतेसाठी विविध प्रकारच्या योजना सुरू केलल्या आहेत. त्यातील पाच योजना पुढील प्रमाणे सांगता येतील.

**१) मेक इन इंडिया: (Make in India)** २५ सप्टेंबर २०१४ रोजी देशाचे पंतप्रधान श्री मा. नरेंद्र मोदीजी यांनी ही योजना नवी दिल्ली येथे सुरू केली आहे. १३ ते १८ फेब्रुवारी २०१६ मध्ये मुंबईमध्ये महाराष्ट्रातील औद्योगिक व आर्थिक भरारीला उभारी देण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर मेक इन इंडिया सुरू केलेली आहे. या योजनेची अंमलबजावणी ही दिल्ली येथून राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर केली जात आहे. मेक इन इंडियाचे प्रतिक हे एक विशाल चाके असलेला रथ आहे.

**उद्देश:—** १) विदेशी गुंतवणूकीला चालना देणे.
२) तरूण उद्योजकांना प्रेरीत करणे.
३) विविध कौशल्याच्या विकासामध्ये वाढ करणे.
४) बौध्दीक संपादचे संरक्षण करणे.
५) आधुनिक पायाभूत सोयी सुविधा निर्माण करणे.

६) जागतिक व्यापारामध्ये वाटा वाढविणे.

७) मोठ मोठे उत्पादन केंद्र निर्माण करणे.

८) भारताला जागतिक पातळीवर उत्पादनाचे केंद्र बनविणे निर्माण करणे.

९) औद्योगिक पार्क व स्मार्ट सिटी उभारणे आणि औ्द्योगिक कॅरिडोर निर्माण करणे.

१०) व्यवसायीक वातावरण निर्माण करून व्यवसायामध्ये सुलभता आणणे.

**स्वरूप:–** मेक इन इंडिया ही योजना एक प्रकारची स्वदेशी चळवळ समजली जाते. अर्थव्यवस्थेच्या २५ क्षेत्रामध्ये १०० **%** विदेशी थेट गुंतवणूकीला परवानगी देण्यात आलेली आहे. उदा.– ॲटोमोबाइल्स, रसायने, आय.टी., बी.पी.एम., रेल्वे, अक्षय उर्जा, औष्णीक उर्जा, जैवीक तंत्रज्ञान, रस्ते व महामार्ग, इलेक्टॉनिक संस्था, संरक्षण, उत्पादन, अवकाश, कापड व कपडे उद्योग, बंदरे, बांधकाम, खद्य पदार्थ प्रक्रिया, चामडे, आरोग्य, करमणूक, खाण, पर्यटन आणि औषधे अशा प्रकल्पाचा यामध्ये समावेश केलेला आहे. या योजनेव्दारे आज पर्यंत १६.४ लाख कोटी एवढी प्रचंड गुंतवणूक झालेली आहे. अमेरिका आणि चीन या अर्थव्यवस्थेला मागे टाकूण भारतीय अर्थव्यवस्था पुढे गेलेली पहावयास मिळत आहे. व्यावसायीक निर्देशांकामध्ये २०१८ मध्ये १९० देशांमध्ये भारताचा क्रमांक हा ७७ वा लागत होता. या योजनेमार्फत विविध २५ उत्पादन क्षेत्राची निवड केलेली आहे. उदा. वाहान उद्योग, विमान वाहातुक, जैविक तंत्रज्ञान, निरोगीपण, अवकाश, बंदरे, खाणकाम, रेल्वे, आयटी, बीपीएम, रसायने, चामडी उद्योग, बांधकाम, अन्न प्रक्रिया, औषधे, औष्णिक उर्जा, पर्यटन, पूर्ननिर्मीतीक्षम उर्जा, कापड, तेल व वायू, मनोरंजन, रस्ते व महामार्ग, संरक्षण उत्पादने, इलेक्ट्रॉनिक मशिनरी, वाहानांचे सुट्टे भाग उद्योग इ. मेक इन इंडिया उपक्रमाणे लक्षणीय यश मिळविलेले आहे. सध्या मेक इन इंडिया २.० अंतर्गत २७ क्षेत्रावर लक्ष केंद्रित केलेले आहे. भारत सरकारने आजपर्यंत विविध देशांबरोबर करार केलेले आहेत. साधारणत: २५९४ विविध प्रकारचे भारत सरकारने करार झालेले आहेत.

**मेक इन इंडिया उपक्रमामुळे होणारे फायदे**:–

१) मेक इन इंडिया मुळे भारतीय रूपयाला बळ मिळालेले आहे.

२) मेक इन इंडियामुळे रोजगार वाढण्यास मदत झालेली आहे.

३) मेक इन इंडियामुळे व्यवसाय करणे सोपे झालेले आहे.

४) मेक इन इंडिया मुळे स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये वाढ झालेली आहे.

५) मेक इन इंडियामुळे तांत्रिक ज्ञानाला चालना मिळालेली आहे.

६) मेक इन इंडिया उपक्रमाचा परीणाम म्हणून ब्रॅड मूल्य वाढले.

७) मेक इन इंडिया उपक्रमातून भांडवलाचा प्रवाह वाढलेला आहे.

८) मेक इन इंडियामुळे तरूण नवनवीन कल्पना घेवून येत आहेत.

९) मेक इन इंडियामुळे जीवनमानात सुधारणा होत आहे.

१०) विविध प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर वाढलेला आहे.

**मेक इन इंडिया उपक्रमाचे तोटे**:–

१) विविध क्षेत्रामध्ये त्याचे नकारात्मक परिणाम होत आहेत.

२) शेती क्षेत्राकडे दूर्लक्ष होत आहे.

३) लहानलहान व्यापाऱ्यांना त्याचा फटका बसलेला आहे.

४) नैसर्गिक संसाधने नष्ट होत आहेत.

५) लहान लहान उद्योगांचे नुकसान हो आहे.

६) विविध प्रकारचे प्रदुषण वाढत आहे.

७) आंतरराष्ट्रीय ब्रॅन्ड वाढतील

थोडक्यात सारांश स्वरूपात सांगावयाचे झाले तर, या योजनेच्या माध्यमातून भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये एक प्रकारची नवी दिशा प्राप्त होताना दिसत आहे. कारण नवीन तरूण व्यवसायिक निर्माण होतील.

**२) स्टार्ट अप इंडिया:(Start up India)** भारत सरकारने ही नवउद्योजकाना प्रेरीत व प्रोत्साहित करण्यासाठी ही योजना सूरू केलेली आहे. ही योजना १५ ऑगष्ट २०१५ रोजी दिल्ली येथील लाल किल्यावरून स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी घोषित केलेली आहे. आणि १६ जानेवारी २०१६ रोजी अर्थमंत्री मा. अरूण जेटली यांनी ही योजना सुरू केली आहे. अशा प्रकारची अधिकृत घोषणा केलेले आहे.

**उदिष्टये**:–१) स्टार्ट अपला इंडियामुळे नवउद्योजकांना मोठया प्रमाणावर प्रोत्साहन देणे.
२) स्टार्ट अप इंडियामधून मोठया प्रमाणावर रोजगार निर्मीती करणे.
३) स्टार्ट अप इंडियातुन मोठया प्रमाणावर संपत्ती निर्माण करणे.
४) महिला उद्योजकांची क्षमता वाढविण्यासाठी ऑनलाईल व ऑफलाईन अभ्यासासक्रम चालविणे.
५) महिला नवउद्योजकांना कायदेविषयक करविषयक आणि आर्थिक सल्ले देणारी यंत्रणा निर्माण करणे.

**पात्रता:–** १) कंपनीने खाजगी मर्यादित कंपनी किंवा संपत्ती उत्तरदायित्व कंपनी तयार करावी.
२) कंपनीला औद्योगिक धोरण व पदोन्नती विभागून मान्यता मिळालेली असली पाहिजे.
३) व्यवसायसंस्थेचे शिफारस पत्र असले पाहिजे.
४) कंपनीने नावीन्यपूर्ण उत्पादन करावे.
५) कंपनी नवीन असावी, मात्र ५ वर्षा पेक्षा जूनी नको आहे.
६) व्यवसायसंस्थेची उलाढाली ही २५ कोटीपेक्षा जास्त नसावी.

**अर्ज कसा करावा?:–** ज्या व्यक्तींना किंवा संस्थांना या योजनेचा लाभ घेवायाचा आहे. त्यांनी स्टार्ट अप इंडिया पोर्टरला भेट दयावी, कंपनीचे नाव आणि स्थापना नोंदणी दिनांक लिहावी. पॅन, पत्ता, पीन कोड नंबर, राज्य लिहावे. आधिकृत प्रतिनिधी, संचालक, भागीदार यांचा तपशिल लिहावा. आवश्यक कागदपत्र व स्वत:चे प्रमाणपत्र अपलोड करावेत. कंपनीची स्थापना व नोंदणी प्रमाणपत्र अपलोड करावे.

**स्टार्ट अप इंडियाचे फायदे**:– १) आर्थिक फायदे
२) आय कराचा लाभ
३) नोंदणीचे फायदे
४) शासकिय निविदा
५) नेटवर्किगच्या मोठया संधी

थोडक्यात सारांश स्वरूपात सांगावयाचे झाले तर, हया योजनेमुळे नवनवीन उद्योजकांना व्यवसाय सुरू करण्याची उत्तम संधी प्राप्त होणार आहे. त्यामुळे देशामध्ये उद्योजक आणि उद्योगांच्या संख्येमध्ये वाढ होण्यास मदत होणार आहे.

**३) स्टॅन्ड अप इंडिया:(Stand up India)** भारत देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजी यांनी ही योजना ५ एप्रिल २०१६ मध्ये सूरू केलेली आहे. एस.सी. (अनुसूचित जाती) आणि एन.टी. (अनुसूचित जमाती) वर्गातील तरूण व महिलांना विविध प्रकारचे उद्योगव्यवसाय सुरू करण्यासाठी मोठया प्रमाणावर या योजनेव्दारे कर्ज उपलब्ध करून देऊन उद्योजक होण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी ही योजना सूरू केलेली आहे. या योजनेचे बोधवाक्य'' करे प्रयास पाएं विकास'' असे आहे.

**लक्षणे किंवा वैशिष्टये**:– या योजनेअंर्तगत एस.सी व एस.टी. तरूण व महिला उद्योजकांना नवीन प्रकल्प किंवा ग्रीन फिल्ड प्रकल्पासाठी १० लाख ते १ कोटी पर्यंतचे कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे.

**पात्रता**:– १) स्टॅन्ड अप इंडिया ही योजना केवळ महिला कर्जदार किंवा एस.सी. व एस.टी. जातीसाठी आहे.
२) स्टॅन्ड अप इंडियासाठी वय हे वर्ष १८ पेक्षा जास्त असावे.
३) ग्रीन फिल्ड प्रोजेक्ट (नवीन प्रोजेक्ट) उभारणीसाठी स्टॅन्ड अप इंडियाकडून लोन घेता येईल.
४) जुन्या व्यवसायासाठी कर्ज घेवू शकणार नाहीत.
५) प्रकल्प हा व्यवसाय निर्मीती क्षेत्र (Manufacturing sectors) किंवा सेवा क्षेत्रामधील (Service sectors) असावा.
६) कंपनीची वार्षिक उलाढाल ही २५ कोटीपेक्षा अधिक नसावी.

**कर्ज किती उपलब्ध होईल**:– १) १० लाख ते १ कोटी रूपये.
२) मुदती कर्ज व खेळते भांडवल कर्ज यापैकी एक किंवा दोन्ही घेऊ शकतात.
३) दोन्ही कर्ज घेतली तरी पण १ कोटीपेक्षा जास्त नाही.
४) एकूण प्रकल्प खर्चाच्या ७५% कर्ज मिळते.
५) आपले स्वत:चे २५% भांडवल अपेक्षित आहे.

६) नियमानुसार किमान १**%** कर्जदाराला स्वत:चे पैसे गुंतवावे लागतील.

**व्याज दर काय असेल**? –१) व्याजदर किती असावेत याबाबत निश्चिता नाही.

२) किमान व्याजदर घ्यावेत तशा प्रकारची सूचना बॅकांना दिलेली आहे.

३) कर्जाचा व्याजदर बेसीक रेट किंवा एम.सी.एल.आर. अधिक टेनुर परमेन्ट अधिक ३**%** पेक्षा जास्त असू नये.

**परतफेडीचा कालावधी**:– १) कमाल ७ वर्ष

२) किंमान १८ महिन्यापर्यत मुदतीच्या परतफेडीवर देवू शकते.

**कागदपत्र**:– १) आधार कार्ड

२) पॅन कार्ड

३) कोटेशन

४) प्रकल्प अहवाल

५) जातीचा दाखला

६) आवश्यक विशेष श्रेणीप्रमाणपत्र

७) ग्रामीण भागाचा दाखला

८) लोकसंख्या प्रमाणाचा दाखला

९) व्यवसायाच्या ठिकाणाची कागदपत्र किंवा भाडे करार

१०) शिक्षण किंवा कौशल्य विकास प्रमाणपत्र

११) बॅक खाते   १२) प्राधिकरण पत्र

**अर्ज कसा करावा**:– १) स्टॅन्ड अप इंडिया पोर्टलव्दारे ऑनलाईन फॉर्म भरावा.

२) जवळच्या बॅक शाखेव्दारे फॉर्म भरू शकता.

३) लिड डिस्ट्रीक मॅनेजरच्या मदतीने फॉर्म भरता येईल.

थोडक्यात सारांश स्वरूपात सांगावयाचे झाले तर, या योजनेमार्फत अनुसूचित जाती व जमातीमधील महिला आणि इतर महिलांना रोजगार निर्माण होवून आर्थिक सबलीकरण घडून येण्यास मदत होणार आहे.

**४) मुद्रा लोन योजना/प्रधानमंत्री मुद्रा लोन योजना (Mudra loan Schem)** भारतीय नागरिक ज्याच्याकडे बिगर शेतकरी उत्पन्न निर्माण करणाच्या व्यवसायाची योजना आहेत. उदा. उत्पादन किंवा प्रक्रिया किंवा व्यापार किवा सेवा क्षेत्रातील कोणताही उद्योगव्यवसायासाठी १० लाख रूपये पर्यंत कर्ज या योजनेव्दारे दिले जाते. पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजीनी ८ एप्रिल २०१५ रोजी या योजनेची घोषणा केलेली आहे. २०१५–१६ चे अंदाजपत्रकानुसार २०,००० कोटी गुंतवणूकीसाठी मुद्रा बॅकेची घोषणा केलेली आहे. मुद्रा बॅकेची (मायक्रो युनिटस डेव्हलपमेंट ॲण्ड रिफायनास एजन्सी) स्थापना केलेली आहे. कंपनी म्हणून मार्च २०१५ मध्ये कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत गैर बॅकिंग वित्तीय कंपनी म्हणून ७ एप्रिल २०१५ ला आणि आर. बी आय च्या कायदा १९३४ नुसार नोदणी करण्यात आलेली आहे. मुद्रा लोन हे साधारणत: ७ ते १० दिवसामध्ये मिळते. साधारणत: अशा प्रकारच्या कर्जाचे व्याजदर हे ७.३० टक्के असतो.

**उदेश**:– १) प्रथम स्वयंरोजगारासाठी सोयीचे कर्ज किंवा भांडवल उपलब्ध करून देणे.

२) लहान उद्योगाव्दारे रोजगार निर्मीती करणे

**प्रधानमंत्री मुद्रा कर्ज योजनेचे प्रकार**:– प्रधानमंत्री मुद्रा योजनेमार्फत तीन प्रकारचे कर्ज उपलब्ध करून दिले जाते.

| मुद्रा कर्जाचा प्रकार | कर्ज वाटपाचे प्रमाण |
|---|---|
| शिंशू | ५०,०००० पर्यंत |
| किशोर | ५०,००० ते ५ लाख पर्यंत |
| तरूण | ५,००,००० ते १० लाख पर्यंत |

या योजनेव्दारे सुक्ष्म व लघुउद्योगांना कर्जपुरवठा केला जात आहे. २०१७ ते मार्च २०२० अखेर पर्यंत विविध मुद्रा प्रकाराला कर्ज पुरवठा केलेला आहे.

| प्रकार | २०१७–१८ | २०१८–१९ | २०१९–२० |
|---|---|---|---|
| **शिशु** | | | |
| १) खात्यांची संख्या | ३१,४५,६८५ | ३७,५०,५७० | ४१,३२,६७९ |
| २) वाटप केलेले कर्ज | ७,९८,०२६ | १०,०५,२०७ | १२,११,४२८ |
| **किशोर** | | | |
| १) खात्यांची संख्या | ३,५४,८२८ | ५,१०,२४९ | ५,०५,१५४ |
| २) वाटप केलेले कर्ज | ७,३४,३४० | ८,२८,७२८ | ७,२६,८६६ |
| **तरूण** | | | |
| १) खात्यांची संख्या | ९६,११७ | १,२५,१६२ | १,३३,१९९ |
| २) वाटप केलेले कर्ज | ६,९४,२५५ | ७,४०,२६४ | ८,०१,५१६ |
| **एकूण** | | | |
| १) खात्यांची संख्या | ३५,९६,६२० | ४३,८५,९८१ | ४७,७१,०३२ |
| २) वाटप केलेले कर्ज | २२,२६,६२१ | २५,७४,१९९ | २७,३९,८९० |

**संदर्भः– महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२०–२१**

**प्रधानमंत्री मुद्रा कर्ज योजनेअतंर्गत कोण कर्ज मिळवू शकतोः–** १. व्यवसायाचा एकल मालक २. भागीदारी व्यवसायसंस्था ३. सेवा क्षेत्रातील कंपनी ४. सूक्ष्म उद्योग ५. दुरूस्ती दुकाने ६. ट्रक मालक ७. अन्नसंबंधित व्यवसाय ८. सुक्ष्म उत्पादन व्यवसायसंस्था

**प्रधानमंत्री मुद्रा कर्ज योजनेचे फायदेः–** १) देशातील कोणतीही व्यक्ती ज्याला स्वतःचा एखादा छोटासा व्यवसाय सुरू करावयाचा आहे. तो या जोजनेव्दारे कर्ज मिळवू शकतो.

२) देशातील नागरीकाला व्यवसाय सुरू करण्यासाठी हमीशिवाय कर्ज दिले जाईल. याशिवाय कर्जासाठी कोणत्याही प्रकारची प्रोसेसिंग शुल्क घेतले जात नाही.

३) या प्रकारच्या कर्जाच्या परतफेडीचा कालावधी ५ वर्षापर्यंत वाढविला जावू शकतो.

४) कर्ज घेणाऱ्या लाभार्थीला मुद्रा कार्ड मिळते. त्याच्या आधारे व्यवसायिक गरजांवर खर्च करीत असतो.

**प्रधानमंत्री मुद्रा कर्जासाठी कागदपत्रः–** या योजनेसाठी पुढील प्रकारची कागदपत्र आवश्यक असतात. आधार कार्ड, पॅन कार्ड, अर्जदाराचा कायमचा पत्ता, व्यवसायाचा पत्ता, व्यवसाय सुरू करण्याचा पुरावा, मागील तीन वर्षाचे बॅलन्सशिट, आयकर रिटर्न, पासपोर्ट आकाराचे फोटो, व्यवसायासाठी लागणारी यंत्रसामग्रीचे कोटेशन इ.

थोडक्यात सारांश स्वरूपात सांगावयाचे झाले तर, विविध शिशु, किशोर व तरूण श्रेणीमध्ये मुद्रा बॅकेव्या माध्यमातुन कर्ज पुरवठा झाला तर नवनवीन उद्योजक निर्माण होतील. स्वयंरोजराच्या संधी निर्माण होतील आणि बेरोजगारीची समस्या सोडविण्यासाठी फायदेशिर ठरत आहे.

**संदर्भः–**


1) प्रा. डॉ. डी.जी. उशिर, डॉ. एस. आर जावळे, प्रा. डॉ. एस. आर. पगार व डॉ. एस. व्ही. टिळे,' भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास,'' निराली प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती सप्टेंबर २०२१ पृष्ठ क्र. ३.२० ते ३.२५

2) प्रा. डॉ. संभाजी काळे, प्रा. डॉ. बी.डी. उंदरे, प्रा. डॉ. कृष्णा पाडवी व प्रा. डॉ. संतोष वाघमारे,' व्यवसाय व्यवस्थापन', प्रशांत पब्लिकेशन जळगाव, प्रथम आवृत्ती ऑगस्ट २०२१,पृष्ठ क्र. ५९ ते ७२.

3) प्रा. धिंग्रा,प्रा. इश्वर सी,'रिसोर्से प्लनिंग डेव्हलपमेंट अॅन्ड प्रॉब्लेम,' सुलतान चांद अॅन्ड सन्स,नवी दिल्ली आवृत्ती ७ वी.

4) Ruddar Datt & Sundharam P.M.,'Indian Economy',S Chand & Company ltd.,New Delhi,13 Edition.

5) इंटरनेट विकीपिडीया

# भारताच्या महासत्तेकडील वाटचालीत भारतीय तत्वज्ञानाचे योगदान

**सहा. प्रा. अश्विनी शिवाजी जैवळ**

फोस्टर डेव्हलपमेंट शिक्षणशास्त्र महाविद्यालय, छ. संभाजीनगर

**गोषवारा :**

या संशोधन पेपर मध्ये भारताच्या महासत्तेकडील वाटचालीत भारतीय तत्वज्ञानाच्या योगदानाची चर्चा करण्यात आली आहे. भारतीय तत्वज्ञान म्हणजे चिंतनाच्या वा चिकित्सेच्या माध्यमातुन मिळणारे सत्य किंवा यथार्थ स्वरूपाचे ज्ञान होय. भारतीय तत्वज्ञानात कार्यक्षमतेला महत्व देण्यात आले आहे. भारतीय तत्वज्ञानात सक्रियतेला महत्व दिले जाते. भारतीय तत्वज्ञान आत्माविषयक कल्पनेला व्यवस्थित रुप देते. भारतीय तत्वज्ञानानुसार भारत एक महान आध्यात्मिक जाणिवेची जिवंत शक्ती आहे. भारतीय तत्वज्ञानाने भारतीय तरूणांमध्ये जिज्ञासा निर्माण केल्याने तरूणांना अनेक प्रश्न पडू लागल्याने त्या जिज्ञासेतून अनेक नवनविन शोध लागू लागले आहेत व ते प्रगतीकडे वाटचाल करत आहेत. भारतीय तत्वज्ञान जगात शांतता पसरविण्यासाठी खुप मोलाची कामगिरी बजावत आहे. जो देश जगात शांतता निर्माण होण्यात महत्वाची कामगिरी बजावेल तो देश निश्चितपणे महासत्तेकडे वाटचाल करतो. त्यामुळे भारतीय तत्वज्ञानाच्या आधारे भारताची महासत्तेकडे वाटचाल सुरू आहे.

**प्रस्तावना :**

तत्वज्ञान म्हणजे तत्वासंबंधीचे ज्ञान होय. तत म्हणजे जे काही आहे ते, ते सर्व एकुण एक. या ततचा तत म्हणजे तत्व होय. यालाच तत म्हणजे सार असे म्हणतात. तत्वज्ञान या संयुक्त शब्दात तत्व आणि ज्ञान असे दोन शब्द असुन तत्व या शब्दाचा अर्थ सत्य किंवा यथार्थ असाही आहे. तत्वज्ञान म्हणजे सत्य किंवा यथार्थ स्वरूपाचे ज्ञान होय.

मानवी जीवनासह सर्व विश्वाचा अर्थ सांगणाऱ्या सामान्य व मूलभूत संकल्पनांची सुसंगत व तर्कशुद्ध मांडणी करणारी ज्ञानव्यवस्था म्हणजे तत्वज्ञान होय. आपल्या म्हणजे माणसाच्या सर्व प्रकारच्या अनुभवाची उपपत्ती लावणे, हे तत्वज्ञानाचे कार्य आहे. तत्वज्ञानाच्या अत्यंत व्यापक साच्यात सर्व प्रकारचा अनुभव बसवता आला पाहिजे. आपण जे जे काही अनुभवतो म्हणजे पाहतो, जाणतो, भोगतो, अपेक्षितो, त्याच्या योगाने प्रवृत्त होतो व निवृत्त होतो, ते ते तत्वज्ञानाचे सिद्धांत सिद्ध करण्याचे उदाहरण वाटले पाहिजे. आपल्या संस्था, आपली ध्येये, आपले प्रयत्न, आपल्या कला यांचे योग्यत्व – अयोग्यत्व तत्वज्ञानाच्या योगाने आपणास पारखता आले पाहिजे.

भारतीय तत्वज्ञान म्हणजे प्राचीन काळापासुनच करण्यात आलेले तत्वचिंतन होय. जे जे म्हणुन भारतीय आहे, त्या सर्वांचा उगम वेदापर्यंत जाऊन पाहण्याची प्रथा आहे. वेद हे अतिप्राचीन वाङ्मय आहे. वैदिक काळापासुनच भारतीय तत्वज्ञानाची सुरुवात झालेली दिसुन येते. भारतीय तत्वज्ञानात ऋगवेद, यजुर्वेद, अथर्ववेद व सामवेद या चार वेदांचा, उपनिषदांचा, भगवद्गीता याशिवाय नऊ दर्शनांचा समावेश होतो. चिंतनाच्या वा चिकित्सेच्या अवस्थेस पोहोचलेला धर्म तत्वदर्शनाची विशाल पार्श्वभूमी प्रथम निर्माण करतो, त्यास विश्वस्थितिशास्त्र (कॉस्मॉलॉजी) म्हणतात. आधुनिक भारतीय तत्वज्ञानेतिहासकार भगवद्गीता आणि योगवासिष्ठ यांमध्ये निराळी महत्त्वाची तत्वज्ञाने आहेत, असे मानतात.

जेव्हा एखादे साधन निश्चितपणे साध्याकडे नेते, ज्या साधनांनी निश्चितपणे साध्याची सिद्धी होते, असा माणसांना वारंवार नियमित अनुभव येतो, तेव्हा साध्य किंवा साधने हीसुद्धा साध्येच बनतात. ज्ञानेंद्रिये ही प्रत्यक्ष अनुभवाची साधने आहेत, प्रत्यक्ष अनुभव हे साध्य आहे. ज्ञानेंद्रियाची जपणूक मनुष्य किंवा प्राणी पुढील साध्याचा विचार न करता प्राणपणाने करतो. म्हणून ज्या साधनांचा व साध्यांचा नियत संबंध असतो, ती साधनेसुद्धा साध्येच असतात.

ज्ञान हे जीवनाच्या यशाचे मुख्य साधन असल्यामुळे ते माणसाचे साध्यही आहे. म्हणून ज्ञानाकरिता ज्ञान हा विचार भारतीय तत्वज्ञानामध्ये निःश्रेयसाइतका इष्ट मानला आहे. ज्ञानाकरिता ज्ञान अशी प्रवृत्ती असली, तरच सत्याचा मोकळेपणाने शोध येणे अधिक शक्य होते. माणसाची जीवनयात्रा ज्ञानसाधनांच्या म्हणजे प्रत्यक्ष, अनुमान व शब्द यांच्या योगाने चालते. ज्ञानसाधनांच्या मध्ये दोष राहिल्यास यथार्थ ज्ञान म्हणजे सत्याचे ज्ञान न होता विपरित भान किंवा भ्रम होतो. माणसाच्या जीवनयात्रेच्या सफलतेसाठी ज्ञानसाधने युक्त रीतीने वापरण्याची आवश्यकता सिद्ध होते.

भारतीय तत्वज्ञानाच्या माध्यमातुन ज्ञानाकरिता ज्ञान हा विचार व ज्ञानेंद्रिये ही प्रत्यक्ष अनुभवाची साधने व प्रत्यक्ष अनुभव हे साध्य ठरवले तर भारत निश्चितपणे प्रगती साधू शकतो. भारत महासत्तेकडे वाटचाल करत असताना योग्य, अयोग्य, निती, अनिती याची जाणिव ठेवून व्यापार, उद्योग करण्यासाठी तत्वज्ञानाचा आधार घेत आहे.

**भारतीय तत्वज्ञानात कार्यक्षमतेला महत्वः**

अंदाज आणि शोध हा भारतीय तत्वज्ञानाचा मुळ उद्देश आहे. तत्वज्ञानाची प्रत्येक पायरी ही मानवी जीवनाची महत्व पटवुन देणारी चढण आहे. या तत्वज्ञानाच्या केंद्रबिंदुतुन रामायण, महाभारत असे ग्रंथ निर्माण झाले आहेत. त्यात कथासार आहे. कथा ऐकणे हा मानवाचा स्वभाव आहे. म्हणुन कथेतुन मुळ तत्वप्रणालीची पेरणी करत भारतीय महामुनींनी या दोन महाकाव्यांची निर्मिती केली.

निसर्गाने विचार करण्याची संधी फक्त मानवाला बहाल केली आहे. आर्य चाणक्य सारख्या शिक्षकाने केवळ तत्वज्ञानाच्या बळावर चंद्रगुप्त मौर्यसारख्या अत्यंत गरीब घराच जन्म झालेल्या मुलाला राजपदापर्यंत नेले. याचा हाच अर्थ निघतो कि, निसर्ग क्षमता प्रदान करताना गरीब श्रीमंत भेद करत नाही. प्रत्येकाला बुद्धीमत्ता सारखीच प्रदान करतो. जो ईथल्या मोहमायेपासुन स्वतःचे संरक्षण करतो, तो प्रगतीच्या मार्गावरून राजयोगापर्यंत पोहोचतो आणि जो मोहमायेच्या गराड्यात सापडतो त्याचा दुर्योधन किंवा रावण होतो. भारतीयांनी हेच तत्व अमलात आणून कष्टाला पसंता दिली आणि स्वतःची कार्यक्षमता वाढवली आहे. पाश्चिमात्यांच्या तुलनेत भारतीयांची कष्ट करण्याची कार्यक्षमता नक्कीच जास्त आहे. त्यामुळे परदेशातील स्पर्धेत भारतीय आजही तेवढ्याच शर्थेने टिकून आपले अस्तित्व दाखवुन देत आहे. यातुन हेच दिसुन येते मोहमायेचा त्याग करून कष्ट करण्याची तयारी असेल तर प्रगतीचा आलेख नक्कीच उंचावतो.

**भारतीय तत्वज्ञानात सक्रियतेला महत्वः**

कर्म महान असते. आयुष्याच्या अंतिम क्षणापर्यंत कर्म करायचे असते. कर्म हे फळासाठी नसुन शरीराच्या अस्तित्वासाठी असते. कर्म शरीरासह मनालाही निरोगी ठेवते. मानवाला विकसीत होण्यासाठी सतत सक्रिय असावे लागते. या सक्रियतेलाच साधना म्हणतात, जी उपासनेच्या अंर्तगत येते. विशिष्ट ध्येयासाठी योग्य सक्रियता, ध्येयाच्या ज्ञानापर्यंत प्रथम पोहोचवते. ज्ञानानंतर पुन्हा सक्रियता असते जी सफलतेला जन्म देते. केवळ ध्येयाचे ज्ञान असुन त्याची प्राप्ती होत नसते. मार्ग माहिती नसला तरी चालणे गरजेचे असते हेच ज्ञान भारतीय तत्वज्ञानातुन मिळते. या सक्रियतेच्या साधनेतुनच भारतीय त्याचे ध्येय योग्य मार्गाने पादाक्रांत करतो. व आपली व आपल्या राष्ट्राची प्रगती साधतो. भारतीय तत्वज्ञानानुसार कर्तुत्ववान व्यक्ती शरीराने जरी अल्पायुषी असला तरी त्याची चमक चंद्र, सुर्य असेपर्यंत असते. कर्तुत्व नेहमीच कर्त्याच्या आधीन असते आणि कर्ता हा ध्येयापर्यंत असावा लागतो.

**भारतीय तत्वज्ञान आत्माविषयक कल्पनेला व्यवस्थित रुप देते**

भारताचे तत्वज्ञान आत्माविषयक कल्पनेला व्यवस्थित रुप देते. आध्यात्मिक जाणिव मिळवली. या जाणिवेची फळे मिळवावी अशी भारतीय धर्माची आकांक्षा आहे. भारताची कला, भारताचे साहित्य याच उर्ध्वमुख अर्थाने भरलेले आहे. भारताचा सर्व धर्म जीवनविषयक सर्व कायदा या आत्मवस्तुवर आधारलेला आहे. प्रगती करणे भारतीयांना मान्य आहे. पण प्रगती आध्यात्मिक अंतरीक असली पाहिजे असा भारतीयांचा आग्रह आहे. भौतिक विकासाची प्रक्रिया हि बाह्य प्रक्रीया भारतीयांना पटत नाही. भारतीयांच्या संस्कृतीचे विशेष मोल यात आहे कि भारतीय व्यक्ती आपल्या

जीवनाची भिस्त आत्म्याच्या उदात्त कल्पनेवर उभारतो. अध्यात्मिक अनश्वर शाश्वत वस्तुकडे त्याची अत्यंतिक ओढ आहे. जे उच्चतम ध्येय भारताने आपल्यासमोर ठेवले आहे त्या ध्येयाकडे तो श्रद्धेने, प्रामाणिकपणे वाटचाल करत आहे. मानवात सामान्यतः आढळणाऱ्या भारतीय मानवांतही आहेत. तथापि या उणिवांच्या आहारी न जाता भारत आपल्या ध्येयाला श्रद्धेने चिकटून राहीला आहे. या सर्व गोष्टी लवकरच भारताला महासत्ता बनवतील.

**भारतीय तत्वज्ञानानुसार भारत एक महान आध्यात्मिक जाणिवेची जिवंत शक्ती आहे**

प्रत्येक राष्ट्र हे मानवतेतील विकासशील आत्म्याची चैतन्याची एक शक्ती असते. त्यात काही एक तत्व साकार झालेले असते. या तत्वाला नेतृत्व देऊन ते राष्ट्र आपले जीवन जगत असते. भारत एक अशी शक्ती आहे जी जिवंत शक्ती आहे तिला भारतशक्ती असे म्हणतात. ती एक आध्यात्मिक जाणिवेची जिवंत शक्ती आहे, भारताच्या अस्तित्वाचे आणि जीवनाचे तत्व या आध्यात्मिक जाणिवेशी प्रामाणिक राहून व्यवहार करण्यात आहे. अमर राष्ट्रात भारताचे स्थान आहे. हे स्थान त्याला त्याच्या आध्यात्मिकतेच्या सद्गुणांमुळेच लाभले आहे. भारताने आश्चर्यकारक चिवटपणा दाखवला आहे. मोठ्या संकटातुन पार जाण्याची, पुनरूत्थानाची शक्ती त्याने कायम व्यक्त केली आहे. या शक्तीचे गुप्त रहस्य केवळ त्याच्या आध्यात्मिकतेतच सापडेल. भारताचे स्वत्व वैशिष्टपुर्ण आहे आणि भारताचा हजारो प्रकारचा आंतरीक अनुभव व अतिशय विविध व संपन्न वारसा आहे. या वारश्याचे संकिर्ण सत्य व क्रियाशील स्वरूप केवळ भारतच सांभाळु शकेल अशी स्थिती आहे.

मुलभुत विचारणा, विवेक क्रिया, समर्थ अंर्तदृष्टी, निश्चीत प्रक्रिया यांचे सहाय्य घेऊन भारत समोरच्या परिस्थितीला तोंड देतो आहे. संस्कृतीचे शाश्वत रूप सांभाळुन त्या स्वरूपात नवे द्रव्य एकरूप होईल अशा रितीने त्याची परिणामकारक जुळणी करून ते त्या स्वरूपात पचवुन टाकणे यात भारताची प्रज्ञा पुर्वकाळी आपले सामर्थ्य विशेष प्रकट करत असे.

अत्यंत प्राचीन काळापासुन भारतामध्ये भिन्न भिन्न धर्मांच्या संस्थापकांचा उदय झाला असुन त्यांनी परमपवित्र आणि सनातन अशा अध्यात्मिक सत्याच्या शांतिजलाने या जगाला वारंवार शमविले आहे. अध्यात्मिकतेच्या लोंढ्यांनी त्यांनी हे जग पुन्हा पुन्हा तुडुंब भरून टाकले आहे. येथुन उद्भवलेल्या तत्वज्ञानाच्या प्रचंड पुराने उत्तर, दक्षिण, पुर्व, पश्चिम समस्त दिशा, सारे जग व्यापुन टाकले आहे. येथुनच फिरून एक अशी लाट उठणार आहे कि जी आधुनिक जगाच्या ईहलोकनिष्ठ सभ्यतेला अध्यात्मिक संजीवन प्रदान करणार आहे.

**भारतीय तत्वज्ञान आणि भारतीय तरूण**

भारताची मोठी आणि तरूण लोकसंख्या, वेगाने वाढणारा मध्यमवर्ग, गतिशील उद्योजकता, वाढती जागतिक आर्थिक एकात्मकता आणि भारतीय तरूण हा भारतीय तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन कष्ट करण्याची संपुर्ण तयारी दाखवत आहे. कोणत्या गोष्टी स्विकाराव्या आणि कोणत्या गोष्टींचा त्याग करावा हे भारतीय तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन भारतीय तरूण ठरवु शकतो. त्यामुळे भारताच्या सर्वांगीन विकासात भारतीय तत्त्वज्ञानाचे महत्वपुर्ण योगदान आहे.

भारतीय तत्त्वज्ञानाच्या आधारे सर्व व्यक्तींना समान समजून त्यांच्यातील असमानता दुर करून भारतीय तरूण प्रगतीच्या शिखरावर पोहोचु पाहतो आहे. भारतीय तत्त्वज्ञानामुळे भारतीय लोक पर्यावरणाच्या सानिध्यात जास्तीत जास्त वेळ घालवून त्याचबरोबर पर्यावरणाचे संवर्धन करून आपली प्रगताकडील वाटचाल चालू ठेवली आहे. सध्या भारतातील तरूणांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी शिक्षण दिले जात आहे. जेणेकरून तो तरूण नोकरीवर अवलंबुन न राहता स्वतः रोजगार निर्माण करू शकेल. या रोजगाराभिमुख शिक्षणाची पाळेमुळे भारतीय तत्त्वज्ञानात रूजलेली दिसुन येतात.

भारत वैद्यकीय क्षेत्रात खुप प्रगती करत आहे. भारताने उत्पादित केलेल्या लसींचा आज जगातील अनेक देशांना फायदा होत आहे. वैद्यकीय क्षेत्राचे मुळ शोधयला गेले तर ते भारतीय तत्त्वज्ञानातील चरक संहिता या ग्रंथात आपल्याला दिसुन येते.

भारतात शोध आणि तंत्रज्ञानाचे, संशोधनाचे वातावरण तयार झाले आहे. संशोधनात भारत पुढे जात आहे. भारतीयांमध्ये हि जी जिज्ञासा निर्माण झाली आहे त्याचा मुळस्त्रोत वैदीक काळातील शिक्षण पद्धतीत आहे असे दिसून येते. वैदीक काळ, बौद्ध काळ आणि मध्ययुगीन काळ या तीनही काळांमुळे शिक्षणासाठी प्रश्न पद्धती, चर्चा पद्धतींचा उपयोग करण्यात आला. त्यामुळे तरूणांना अनेक प्रश्न पडू लागल्याने त्या जिज्ञासेतून अनेक नवनविन शोध लागू लागले आहेत.

**जागतिक शांततेत भारतीय तत्वज्ञानाचे महत्वः**

भारतीय तत्वज्ञान, संत साहित्य आणि शाश्वतता जोपर्यंत जगासमोर येत नाही तोपर्यंत जगात शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही हे जगाला आता कळले आहे. भारतीय तत्वज्ञानाच्या आधारामुळे आसुरी विचारांच्या नायनाट होतो असे प्रतिपादन प्रख्यात संगणकतज्ञ डा. विजय भाटकर यांनी केले आहे. भारतीय अध्यात्मिक ज्ञान, वेद, भगवद्गीता, ज्ञानेश्वरी व ईतर संत वाङमय हे भारतीय तत्वज्ञान जगात शांतता पसरविण्यासाठी खुप मोलाची कामगिरी बजावत आहे. जो देश जगात शांतता निर्माण होण्यात महत्वाची कामगिरी बजावेल तो देश निश्चितपणे महासत्तेकडे वाटचाल करतो. भारतीय तत्वज्ञानाच्या आधारे भारत महासत्तेकडे वाटचाल करत आहे.

**निष्कर्षः**

भारतीय तत्वज्ञान स्वतःचा शोध घ्यायला शिकवते, जिज्ञासा निर्माण करून प्रश्न विचारायला शिकवते. भारतीय तत्वज्ञान चिंतनाच्या वा चिकित्सेच्या माध्यमातुन सत्य किंवा यथार्थ स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करण्यास उद्युक्त करते. भारतीय तत्वज्ञान सक्रियतेला, कर्मसिद्धांताला महत्व देते. भारतीय तत्वज्ञान शाश्वत मुल्यांना, सत्याला, शांततेला महत्व देते. याच कारणामुळे भारतीय तत्वज्ञान जगात शांतता पसरविण्यासाठी खुप मोलाची कामगिरी बजावत आहे. जो देश जगात शांतता निर्माण होण्यात महत्वाची कामगिरी बजावेल तो देश निश्चितपणे विकासाकडे वाटचाल करतो. भारतीय तत्वज्ञानाच्या आधारे भारत निश्चितपणे महासत्तेकडे वाटचाल करत आहे.

**संदर्भ :**

१. Dasgupta, S. N. A History of Indian Philosophy, 5 Vols., Delhi, 1975.
२. Radhakrishnan S. Indian Philosophy, 2 Vols., London, 1923, 1927.
३. माधवाचार्य, सर्वदर्शनसंग्रह : , आनंदाश्रम प्रत, पुणे, १९२८.
४. आर. डी. रानडे आणि बेलवलकरः भारतीय तत्वज्ञानाचा ईतिहास, ११२७
५. जदुनाथ सिन्हाः भारतीय दर्शन, अनु. गोवर्धन भट्ट, दिल्ली, १९६०
६. डा. विजश्रीः भारतीय दार्शनिक चिन्तन, दिल्ली, २०००
७. डा. नरेंद्रप्रसाद तिवारीः भारतीय दर्शन आणि पाश्चात्य दर्शन, दिल्ली, २००६
८. Dr. P.V. Kane: “History of Dharmshatra”, Vol-2, Pune 1941
९. Dr. R. N. Sharma: “Indian Philosophy”, Vol-I & II, London, 1966
१०. Prof. Hiriyanna: “Outlines of Indian Philosophy”.

# भारतातील परकीय गुंतवणूक धोरण अंमलबजावणी व विविध कायदे

संशोधक

**सानप मनिषा किसन**

सहाय्यक प्राध्यापक संशोधक

मार्गदर्शक

**डॉ. एस. बी. पाते**

मार्गदर्शक तथा अर्थशास्त्र वीभागप्रमुख कला विज्ञान महाविद्यालय, परभणी

**प्रस्तावना-**

वसुंधैव कुटुंब्कम या उक्तीप्रमाणे जग हे खूप जवळ आले आहे. उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकरणामुळे विकासाची गती प्राप्त होण्यास मदत होते. 1929 च्या महामंदी मध्ये व दुसऱ्या युद्धाच्या कालावधीमध्ये परकीय व्यापारावर अनेक जाचक अटी लादले गेलेले दिसून येतात. पण दुसऱ्या महायुद्धानंतर सर्वजण मुक्त अर्थव्यवस्थेकडे झपाट्याने वाटचाल करताना दिसून येते. सन 1946 मध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधी IMF व जागतिक बँक ची स्थापना झाली. भारत त्याचा सभासद झाला व या संस्थेने व्यापारावरील जकाती कमी करण्यासाठी गेट करार संमत केला म्हणजे आंतरराष्ट्रीय खुला व्यापार करणे हे GATT कराराचे मूलभूत उद्दिष्ट होय. जागतिकीकरणाच्या माध्यमातून सर्व देशांनी आपला विकास साध्य करता येणार आहे. वस्तू सेवा तंत्रज्ञान कुशल मनुष्यबळ भांडवल इत्यादीचे वहन विविध देशात सहज होते व त्या च्या साहयाने आर्थिक विकास सहज शक्य होतो. आजच्या विकसित देशांनी अविकसित असताना परकीय भांडवलाची मदत घेतली आहे. भारताने 1991 च्या नवीन धोरणानुसार कायदा फेमा कायदा यामध्ये बदल करून परकीय गुंतवणूक सुलभ केली. 2016 मध्ये देखील परकीय गुंतवणूकीच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेऊन 2017 मध्ये त्याची योग्य अंमलबजावणी केली व खाजगीकरणास प्रोत्साहन दिले आत्मनिर्भर भारत या अंतर्गत विविध देशातील कंपन्यांनी भारतामध्ये येऊन कंपन्या स्थापून उत्पादन करण्याचे आव्हान करण्यात आले त्यामुळे 2021-22 मध्ये भारतातील परकीय गुंतवणूक वाढण्यास मदत झाली. 1991 च्या धोरणात्मक व संरचनात्मक सुधारणेमध्ये भारताने परकीय गुंतवणूकी संदर्भात परवाना धोरण रद्द केले व सरकारी परवानगी शिवाय काही गुंतवणूक शंभर टक्के काही 51% व एक काही क्षेत्र एकोणतीस टक्के अशी केली, प्रतिबंधित क्षेत्र कमी करण्यात आले, कायद्यात सूत्रता निर्माण केली त्यामुळे व्यापार तूट कमी होण्यास मदत झाली. गुंतवणूकीचा ओघ वाढला गेला.

स्वतंत्र भारताने नियोजित अर्थव्यवस्था स्वीकारली त्यामध्ये मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली पण भांडवलशाही पेक्षा कल समाजवादाकडे झुकणारा होता. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू त्यांचे धोरणे व कल देखिल समाजवादाकडे झुकणारा होता. 1947 ते 1991 पर्यंत देशात व्यापक हस्तक्षेप आणि नियमनासह सरकारने संरक्षणवादी आर्थिक धोरण स्वीकारले होते. 1991 मध्ये आर्थिक सुधारणा लागू केल्यानंतर भारतातील परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला असे नाही तर परकीयावर भारताचा नेहमीच गुढ प्रभाव राहिला आहे. प्राचीन काळात देखील भारत हा उत्पादक देश होता. अनेक कृषी उत्पादने, मसाले, नैसर्गिक साधने, खनिज संपत्ती इत्यादी गोष्टींचे व्यापार केंद्र भारत बनला होता. भारतीय परकीय गुंतवणूकीचे स्वातंत्र्य नंतर च्या टप्प्यामध्ये अभ्यास करता येईल.

टप्पा 1 सावधृत्ती 1947 ते 1966 निवडक व प्रतिबंधात्मक वृत्ती 1967 ते 1979 तिसरा टप्पाअंशिक उदारीकरण वृत्ती 1980 ते 1990 आणि चौथा टप्पा उदारीकरण 1991 ते आजपर्यंत या चार टप्प्यांमध्ये अभ्यास केल्यास त्या काळातील आर्थिक स्थिती सामाजिक स्थिती राजकीय स्थिती व बदल व गरज या सर्वांचा सखोल अभ्यास केल्यास

परकीय गुंतवणूकीची गरज का निर्माण झाली. त्यासाठी कायदे करण्याची व बदल करण्याची का गरज निर्माण झाली त्याचे भारत देशासमोरील आव्हाने ते दूर करण्यासाठी आवश्यक घटक इ. जाणीवपूर्वक अभ्यास करण्यासाठी हे टप्पे केलेले आहे. 1947 मध्ये FERA Foreign Exchange Regulation Act. संमत करण्यात आला व 1973 मध्ये मोठ्या प्रमाणात बदल करून फेरा 1973 संमत करून तो 1974 मध्ये अस्तित्वात आला 1997 98 मध्ये फेराचे रूपांतर फेमा यामध्ये करण्यात आले व फेमा 1999 जून 2000 पासून लागू करण्यात आले त्याचबरोबर इडी चे अनेक अधिकार कमी करण्यात आले. 1957 -58 च्या परकीय चलनाच्या सुरुवातीपासूनच परकीय गुंतवणूकीवरील प्रारंभिक सावधगिरीची कठोरता कमी होऊ लागली परकीय गुंतवणूकीबाबत धोरण शिथिल करण्यासाठी १९५१अंतर्गत परकीय गुंतवणूकीसाठी औद्योगिक परवाना प्रणाली मध्ये अनेक नियम उद्योगांचा विस्तार व विधिकरण करणे हे होते. स्वतंत्र भारताने पहिल्या पंचवार्षिक योजनेत सकारात्मक निर्णय घेतले पण उद्योग व शेतीवर नियंत्रण व कोटा ठरवला होता, आयातीवर बंधन होते, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत तूट दिसून येऊ लागली कारण गुंतवणूकीसाठी शासनावर सर्व जबाबदारी होती बॅलन्स ऑफ पेमेंट ची पहिली सूचना 1958 दिली. 1969 मध्ये सरकारने मुख्य उद्योगा व्यतिरिक्त परदेशी कंपन्यासह मोठ्या औद्योगिक क्षेत्राच्या प्रवेशाचे नियमन करण्यासाठी एक अधिकार व प्रतिबंधात्मक व्यापार व्यवहार कायदा MRTPA कायदा आणला

**अर्थ** - "परकीय गुंतवणूक म्हणजे इतर देशातील गुंतवणूकदारांनी देशांतर्गत कंपन्या व मालमत्तेमध्ये केलेली गुंतवणूक"

**उद्दिष्टे (Research objective):-**

1. भारतात परकीय गुंतवणूक कायदे निर्माण करण्याची गरज का निर्माण झाली.
2. भारतातील परकीय गुंतवणूक गुंतवणूक कायदा निर्माण करण्याच्या अगोदरची भारतातील स्थिती व नंतरचा त्यातील परकीय गुंतवणूक प्रवाहां संबंधित समस्या ओळखणे व उपाययोजना करणे.
3. कायद्यातील त्रुटी वर योग्य उपाय नसणे.

**गृहिते (Hypothesis)**

1. भारताच्या स्वातंत्र्यानंतर परकीय गुंतवणूकीतील विविध कायद्यामुळे भारतात परकीय गुंतवणूक वाढली .
2. परकीय गुंतवणूकीच्या कायद्याचा पळवाटांचा फायदा घेऊन विदेशी कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात नफा लाटला.
3. विदेशी कंपन्यांची देशामध्ये मक्तेदारी निर्माण होण्याची भीती वाढली

**संशोधन पद्धती (Research methodology)**

भारतातील गुंतवणूक कायदे व गरज या विषयावर संशोधन करण्यासाठी वर्गीकरणात्मक अर्थशास्त्रीय संशोधन पद्धतीचा वापर केला जाणारा असून तथ्य संकलनासाठी द्वितीय सामग्री संग्रह पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे.

**संशोधन समस्या(Research problem)**

स्वतंत्र भारतासमोर आर्थिक विकास व आर्थिक सेवा सुविधा पायाभूत सुविधाची कमतरता बेरोजगारी, व्यापार तूट, व्यवहारातील असमतोल इत्यादी अनेक समस्या होत्या पण महत्वाचे संरचनात्मक बदलाची गरज निर्माण झाली व भारतातील परकीय गुंतवणूकी संदर्भातील अनेक धोरणे नियम कायदे केले जे जागतिकीकरणाशी अनुकूल होते. जर भारताला आर्थिक विकास साध्य करायचा असेल तर परकीयाची मदत घेणं, गुंतवणूकीमध्ये वाढ करणे गरजेचे होते. हे इतिहासाच्या अनेक दाखल्यावरून दिसून येते म्हणून हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**संशोधनाचा कालावधी व्याप्ती व मर्यादा.**

भारतातील परकीय गुंतवणूक कायदे नियम व महत्व या विषयावर संशोधन करण्यासाठी संशोधन कालावधी 1947 ते 2022 हा घेतला असून संशोधन तथ्य संकलन द्वितीयक सामग्रीच्या साहयाने करण्यात येणार असून त्यासाठी शोधनिबंध, वेबसाईट, वृत्तपत्र, इंटरनेट, विविध शासकीय अहवाल, मासिक, आकडेवारी या संदर्भात घेतली जाणार आहे यामध्ये काही प्रमाणात चुकीची शक्यता नाकारता येत नाही.

स्वातंत्र्यानंतर भारताने मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली पण भारताने भांडवल ऐवजी समाजवादाकडे झूकलेला दिसून येतो. स्वतंत्र भारतापुढे अनेक समस्या होत्या पायाभूत सेवा सुविधा निर्माण करणे, बेरोजगारी दारिद्र्य, आर्थिक विकास, व्यापारतील असंतुलन, वित्तीय तूट अनेक समस्या सोडवण्यासाठी भारतीयाने 1991 मध्ये जरी उदारीकरण धोरण स्वीकारले होते पण त्याचा पाया 1960 नंतर विविध धोरणे नियम कायदे यामधील त्रुटी दिसून आल्या व त्यात जो बदल केला त्यातून 1991 च्या आर्थिक सुधारण्याचा पाया घातलेला दिसून येतो भारताने अलीकडच्या वर्षात अनुकूल सरकारी धोरणाने परकीय गुंतवणूकीचे आकर्षण केंद्र भारत बनला आहे. 2021-2022 मध्ये भारतातील परकीय गुंतवणूक (81 अब्ज डॉलर )झाली आहे भारतातील विविध धोरणे व उपाय योजना विकसित केले आहे उदाहरणार्थ FERA ऐवजी FEMA कायदा, MRTP संदर्भातील नियम, परकीय गुंतवणूकदारांसाठी च्या धोरणातील शिथिलता. त्यामुळे भारतातील परकीय गुंतवणूकीला चालना मिळाली आहे. विशेषतः संरक्षण क्षेत्र, उत्पादन क्षेत्र, रिअल इस्टेट, संशोधन आणि विकास हे भारत सरकारने संरक्षण क्षेत्रातील परकीय गुंतवणूक संचलित मार्गाने 74 टक्के आणि सरकारी मार्गाने शंभर टक्के वाढविले आहे.

**टप्पा 1 सावध वृत्ती 1948 ते 1966**

1947 मध्ये संमत करण्यात आला त्याचा मुख्य उद्देश परकीय कंपन्यांच्या व्यवहारावर नियंत्रण करणे हा होता. फेरा या कायद्यात अनेक बदल करून फेरा 1973 संमत करण्यात आला व जानेवारी 1974 मध्ये अस्तित्वात आला 1997-98 मध्ये फेराचे रूपांतर फेमामध्ये करण्याचा ठराव ठेवला गेला. 1999 मध्ये संसदेत संमत केला आणि फेमा जून 2000 पासून कार्यान्वित करण्यात आला फेमाचा मुख्य उद्देश परकीय चलन व्यापार व्यवहार सुलभ करून भारतातील परकीय चलन बाजारात व्यवस्थित विकास करणे हा होता त्याच बरोबर मक्तेदारी नियंत्रण प्रतिबंध करणे हाही होता. ED (Enforcement Directoral ) चे अधिकार बरेच कमी करण्यात आले .परकीय धोरण विकास व नियम कायदा IRDA 1951 च्या नियमांतर्गत हे केले गेले. विदेशी गुंतवणूकदारांना नफ्याची व पुन्हा गुंतवणूकीची परवानगी देऊन औद्योगिक धोरणातील नियमांमध्ये शिथिलता आणली. इक्विटी सहभाग स्वीकारण्यास तांत्रिक सहकार्याने सुरुवात केली 1958 नंतर परकीय गुंतवणूकीचा मार्ग सुरक्षित करण्यासाठी तात्पुरता परवाना देण्यात आला. AID गुंतवणूक हमी कार्यक्रमात चा दुहेरी कर टाळण्याचा करार करण्यात आला मक्तेदारी आणि प्रतिबंधात्मक व्यापार कायदा MRTPAमध्ये मक्तेदारी कमी करण्याच्या संदर्भात राखीव उद्योग वगळता मोठ्या वजन उद्योगांमध्ये गुंतवणूक करण्याची परवानगी दिली गेली, अशा विविध संरचनात्मक व धोरणात्मक निर्णय घेण्यात आले त्यामुळे परकीय गुंतवणूक वाढण्यास मदत झाली. 1949 मध्ये आश्वासने दिली परकीय उत्पादन संस्था व भारतीय औद्योगिक उत्पादन संस्था असा भेदाभेद केला जाणार नाही. २) संयोगी कंपन्यांना रॉयल्टी कमिशन नफा इत्यादी मायदेशी पाठवता येईल ३) भारत सरकारने राष्ट्रीय करम करण्याचे ठरविल्यास त्या कंपन्यांना योग्य तो मोबदला दिला जाईल. 1950 च्या उत्तरार्धात व 1960 च्या सुरुवातीस पाश्चिमात्य बहुराष्ट्रीय उद्योगांनी भारतात खरे स्वारस्य दाखवायला सुरुवात केली व भारतातील परकीय गुंतवणूकी संदर्भात सरकारच्या वतीने अधिक उदारीकरणाबाबत परिणाम 1960 च्या दशकाच्या उत्तरार्धात प्रतिबंधात्मक वृत्ती स्वीकारली व विविध वित्तीय संकट, तेलाचे संकट, आंतरराष्ट्रीय राजकीय अस्थैर्य, दुष्काळ भारतातील आयातीची गरज या सर्वांमुळे परकीय मदत गरजेची वाटू लागली. १९५१ मध्ये औद्योगिक विकास नियमन कायदा पास केला व १९५६ मध्ये पुन: औद्योगिक धोरणाची मांडणी करण्यात आली. परिशिष्ट अ मध्ये १७ उद्योगामध्ये सरकारी मक्तेदारी होती परिशिष्ट ब मध्ये १२ उद्योगात सरकारची भूमिका मुख्य होती म्हणजे बदल दाखवून मूळ चौकट तशीच होती.

अनिवासी उत्पन्नाच्या स्रोतावर कर कपात देखील कमी केली त्यांच्या शेअर 1966 मध्ये अनिवासी परकीय गुंतवणूक परवानगी दिली गेली व त्याची खाजगी मर्यादा औद्योगिक क्षेत्रात दहा लाख व शेअर्स 49% पर्यंत वाढवले जातील पण लाभांश पाठवण्याची परवानगी दिली जाणार नाही .याच कालखंडामध्ये राजकीय अस्थैर्य दिसून आले त्यामुळे कुठलेही निर्णय देश हितासाठी घेतले गेले नाही.

**टप्पा 2. निवडक आणि प्रतिबंधात्मक वृत्ती 1967 ते 1979**

तेलाचे संकट, भारत पाकिस्तान युद्ध, भारत चीन मधील तणाव नैसर्गिक संकट, तेलाच्या किमतीतील वाढ, BOP काइसेस, राजकीय अस्थैर्य अशा संकटातून भारत जात होता मक्तेदारी आणि प्रतिबंधात्मक कायदा आणि व्यवहार कायदा MRTP 1969 या कायद्यानुसार प्रवेशाचे नियमन व प्रतिबंध करण्यासाठी आणला गेला. 1970 मध्ये नवीन औद्योगिक परवाना धोरण धोरणाने सार्वजनिक क्षेत्रातील राखीव उद्योगांमध्ये मोठे उद्योग. जड उद्योग उभारण्याची परवानगी दिली. 1970 मध्ये विशिष्ट निर्यात वचनबद्धता स्वीकारून उद्योग स्थापनेची व वाढवण्याची परवानगी दिली 100% पर्यंत परदेशी मालकीच्या कंपन्यांनी घोषित केले. 1973 च्या औद्योगिक परवाना धोरणामुळे अ कार्यक्षम सार्वजनिक उद्योग कुंठीत अवस्थेत औद्योगिक क्षेत्र, औद्योगिक वस्तूची वाढती टंचाई अकार्यक्षमता, लाचलुचपत इत्यादी मध्ये सुधारण्याची गरज निर्माण झाली. 1972-73 मध्ये 1973 औद्योगिक धोरणानुसार उद्योगांमधून गुंतवणूकीची परवानगी दिली गेली. परकीय गुंतवणूकीबाबतचे सरकारी धोरण विदेशी गुंतवणूकी आकर्षित करत राहिले. परकीय नियम कायदा 1973 मध्ये अनिवासी भारतीयांच्या गुंतवणूकीच्या रूपात विदेशी भांडवलाच्या आगमनाचे नियमन करण्यासाठी आणि परदेशी लोकांच्या भारतात रोजगारासाठी सुधारणा करण्यात आली. आणि सुधारित नियमानुसार सर्व शाखा आणि भारतीय संयुक्त स्टॉक कंपन्यांमध्ये अनिवासी व्याज 40 टक्के पेक्षा जास्त होते. त्यांना दोन वर्षाच्या कालावधी व त्यांचे अनिवासी शेअर्स सोडून 40 टक्के पर्यंत वाढवले गेले.

फेरा 1973 ने संबंधित कंपन्यांचे तपशीलवार नियमित केले आणि फेराद्वारे सर्व परदेशी गुंतवणूकदारांना भारतीय उद्योगांमधून अक्षरशः बाहेर काढण्यात आले. परदेशी तंत्रज्ञानाच्या खरेदीतून तंत्रज्ञानाचे हस्तांतरण शक्य झाले FEMA कायद्याने परकीय गुंतवणूकीचे कठोर नियमांना शिथिल केले.1973 च्या औद्योगिक धोरणाने भारतातील उद्योगधंद्यांना निर्यातीसाठी आवश्यक असणाऱ्या तंत्रज्ञानाची कुशल मनुष्यबळाची व यंत्रसामग्रीची ओळख करून दिली व परकीय गुंतवणूकीबाबत सरकारी धोरण विदेशी गुंतवणूक करण्यास आकर्षित करत राहिले. परकीय चलन नियम कायदा 1973 च्या सुधारीत नियमानुसार अनिवासी भारतीयांच्या गुंतवणूकीकडे प्रोत्साहित केले गेले. परकीयाना रॉयल्टीच्या मर्यादामुळे परकीय चलनाचा वापर केल्यामुळे रॉयल तिची रक्कम अ प्रभावी ठरत होती. कर सुधारणेतील कर सवलत निर्माण केल्या, मूलभूत उद्योग उत्पादक उद्योग इत्यादी अनेक उद्योग धंद्यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाची प्रचंड आवश्यकता होती. 74 टक्के पर्यंत अनिवासी व्याजासह व्यवसाय करण्याची परवानगी दिली. त्यांना आरबीआय कडून परवानगी घेण्याची सूट देण्यात आली होती. त्यांना नवीन उद्योगाच्या भांडवलाच्या 20 टक्क्यापर्यंत इक्विटी कॅपिटल गुंतवणूक करण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला. 1977 च्या औद्योगिक धोरण विधानाने विदेशी इक्विटी सहभाग 40 टक्के पर्यंत मर्यादित केला होता. तोच FERA Act सरकारी यादी लावून उद्योग निवडतील. तसेच परकीय गुंतवणूक व तंत्रज्ञान मदत करण्यासाठी राष्ट्रीय हिताच्या ठिकाणी परवानगी दिली जाऊ शकते उच्च निर्यात केंद्रित असलेले आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्र आणि शंभर टक्के निर्यात क्षेत्र EPZ वगळता सर्व राष्ट्रीय हितसंबंध व प्रभावी नियंत्रणात खाली भारतातील विदेशी गुंतवणूकीचा लाभांश मंजूर केला गेला. तोच फेरानुसार सरकार अशा उद्योगाची यादी जाहीर करेल. या कायद्याला राक्षसी कायदा असेही म्हणतात.

**टप्पा 3 अंशिक उदारीकरण वृत्ती 1980 ते 1990**

1970 ते 80 या दशकामध्ये BOP संकट ,तेलाच्या प्रचंड किमती ,त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या उदारीकरणाचा विचार केला गेला आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये निर्यातीसाठी प्रचंड स्पर्धा तंत्रज्ञानाचा अभाव उत्पादनाचा निकृष्ट दर्जा आणि उच्च किमती यामुळे भारतीय मालाला फटका बसला MNEs चे विपणन वाहिन्यावर वर्चस्व होते पण 1980 च्या दशकात काही धोरणात्मक घोषणा केलेल्या दिसण्यात येतात APZ साठी कांडला 1965 व सांताक्रुज 1972 मध्ये सुरू झाले त्यासाठी निर्यात युनिट ची स्थापना केली. १९८२-८३ मध्ये सरकारने बँक ठेवी व कॉर्पोरेट कॉर्पोरेट क्षेत्र इक्विटी शेअर्समधील गुंतवणूकी संदर्भातील सुविधा उधारीकरण केले आहेत आरबीआय ने ही गुंतवणूक सुरू

करण्यासाठी एक्सचेंज नियंत्रण प्रक्रिया सुरू केली आहे एक पक्षीय द्वीपक्षीय कर्ज घेण्याचा निर्णय घेतला आहे. कर्जाचे दुष्परिणाम भारताला दिसून आले व त्याचा मर्यादा देखील समजल्या.

40 टक्के पेक्षा जास्त अनिवासी व्यक्ती असणाऱ्या भारतीय कंपन्यांना भारतात स्थावर मालमत्ता देण्याची परवानगी दिली पुढे NRIs परवानगी देण्यात आली. भारतातील 40% ते 74 टक्के ही मर्यादा देखील करण्याचा निर्णय घेतला. औद्योगिक व व्यापार धोरणाच्या उदारीकरण करून कर सुधारणा चलन विषयक सुधारणा, नियोजन सुधारणा, विकेंद्रीकरण औद्योगिक सुधारणा, वित्तीय क्षेत्र सुधारणा, पायाभूत क्षेत्र सुधारणा, परकीय क्षेत्र सुधारणा उदाहरणात आहे शुल्क कपात इत्यादी मध्ये बदल करून १९९१ च्या धोरणाचा पाया घातला गेला.

**टप्पा 4 उदारीकरण वृत्ती 1991 आज पर्यंत**

1980- 90 या कालखंडात राजीव गांधी यांचे धोरणे निष्फळ ठरले. राजकीय अनेक घडामोडी झाल्या, अस्थिर सरकार कुठलाही ठोस निर्णय या काळात घेऊ शकले नाही, आखाती युद्ध, 1990 आर्थिक गैरव्यवस्थापन, 1980-90 आर्थिक संकट, भाव वाढ, असमतोल व्यापारतोल, संरचनात्मक दोष या सर्वांवर उदारीकरणाशिवाय भारतापुढे पर्याय उरला नव्हता चंद्रशेखर सरकार यांनी 1991 मध्ये सोने गहाण ठेवले. IMF कडे सात अब्ज कर्जाची मागणी केली परंतु IMF ने अट वजा सूचना केल्यामुळे भारताने उदारीकरणास परवानगी दिली. तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही.नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली जुलै 1991 मध्ये नवीन औद्योगिक धोरण लागू करण्याचा निर्णय घेतला व त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेची जोडली गेली. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील कार्यक्षमता व उत्पादकता वाढणे सुधारणे हे उद्देश समोर ठेवून थेट परकीय गुंतवणूकीला 51% गुंतवणूकीस मंजुरी दिली राखीव उद्योग क्षेत्रावरून आठ पर्यंत कमी करण्यात आले 1994 पर्यंत सहा पर्यंत कमी केले गेले.MRTP कायद्या सुधारणा करण्यात आली FERA कायदा करून परकीय गुंतवणूक वरील निर्बंध हटवण्यात आले. भारत सरकारने जुलै 1991 पासून भारतीय अर्थव्यवस्थेला संरचनात्मक धोरणाच्या समायोजनाचा एक भाग म्हणून भारतीय कंपन्या मधील विदेशी आर्थिक सहभागात संबंधित अनेक धोरणे व परदेशी तंत्रज्ञानाशी करारकरून अमुलाग्र बदल झाला. थेट परकीय गुंतवणूकीचे प्रस्ताव मंजूर करण्यात येईल. देशात थेट परकीय गुंतवणूकीचे प्रस्ताव मंजूर करण्यासाठी तीन स्तर सुरू करण्यात आले.

1. रिझर्व बँकेची स्वयंचलित प्रणाली
2. औद्योगिक मंजुरीसाठी सचिवालय
3. परदेशी गुंतवणूक प्रोत्साहन मंडळ

नवीन परकीय गुंतवणूकीमध्ये 40 % पर्यंत वाढ केली. 1991 च्या धोरणाने भांडवली बाजार सरकारी यंत्रनेतून पूर्ण मुक्त करण्यात आला .भांडवली समस्या नियंत्रणाचे कार्यालय रद्द करण्यात आले. परकीय चलन नियमन कायदा सुधारणा करण्यात आली फेरा कंपन्यावरील निर्बंध मोठ्या प्रमाणात काढून टाकण्यात आले अशा अनेक सरचनात्मक बदलामुळे सन 2002 ते 2004 मध्य सरकारने भारतातील परकीय गुंतवणूक अधिक उदारीकरण धोरण स्वीकारले आहे. अपवाद वगळता बहुतेक क्षेत्र 100% व काही 51% क्षेत्र व 29% स्वयंचलित मार्गाने ठेवण्यात आले आहे. 2005 मध्ये SEZ स्वीकारून निर्यात प्रवन क्षेत्र व परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी व तंत्रज्ञानाचे हस्तांतरण सुलभ करण्यासाठी अधिक रोजगार निर्माण होण्यासाठी सेझ कायद्याची तरतूद केली.

भारत GATT च्या स्थापने पासून WTO च्या करारामध्ये सहभागी राहिला आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्व भारतासारख्या मोठी अर्थव्यवस्था असलेल्या देशाला माहिति आहे .म्हणून १९९१ चे आर्थिक धोरण स्विकारून भारताने अनेक संरचनात्मक बदल केले. विविध कायदे बदल व शिथिलीकरण केले गेले. गॅटच्या स्थापनेपासून 1953 च्या जिनेव्हा बैठकीत आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक जकाती कमी करण्याची पद्धत सुचवली होती हवाना येथील सनदेवर सही देखील भारताने केली होती .गॅटच्या Escape clauseया कलमामुळे भारतासारख्या अल्प विकसित देशांना आर्थिक विकास करण्यात बरीच मदत झाली या बचाव कलमा चा आधार घेऊन अनेक संस्थात्मक नियंत्रण घातली गेली

निर्यासंदर्भात बाजार संशोधन व पाहणी वगैरे हाती घेतली जातात 1992 पासून 2023 पर्यंत युनायटेड स्टेट्स आणि चीन हे परकीय गुंतवणुकीसाठी सर्वात वर आहेत 2013 मध्ये चीनमध्ये विदेशी गुंतवणूक प्रवाह 241 अब्ज डॉलर होता असे आशिया पॅसिफिकप्रदेशात 34.7% तर 2015 मध्ये भारतातील परकीय गुंतवणूक 27 अब्ज डॉलर व चीनचा 28 अब्ज डॉलर परकीय गुंतवणूक आकर्षित केली गेली. संयुक्त राष्ट्रांमध्ये पूर्णपणे खुली अर्थव्यवस्था आहे .1991 नंतर भारतातील विविध कायद्यामध्ये संरचनात्मक बदल केलेले दिसतात व त्यानुसार भारताने परकीय गुंतवणूक आकर्षित केली आहे .द्विपक्षीय व्यापार करारामध्ये देखील बदल केले आहेत त्याचबरोबर परकीय गुंतवणुकीसोबत कार्बन कर आकारणी यासारखे नियम देखील निर्माण केले आहेत 1991 उदारीकरण धोरणामध्ये अनेक संरचनात्मक बदल केले गेले

**धोरण :** - राजकोषीय तुट कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला

राजकोषीय दुरुस्ती करण्यात आली त्यामध्ये सार्वजनिक खर्च कमी करणे, अंमलबजावणी करणे, अनुदानावर नियंत्रण ठेवणे, FRBIकायदा संमत करणे, यासारखे बदल केले गेले .

**चलन विषयक धोरण :**

१ .खुल्या बाजारात कर्जरोखे खरेदी-विक्री,

२ .रेपोदर रिव्हर्स रेपोदर व्यवहाराची सुरुवात केली गेली .

**नवीन औद्योगिक धोरण 1991 : -**

१ .औद्योगीकरण पद्धत रद्द केली

२ .सार्वजनिक क्षेत्राची भूमिका कमी केली

३.खाजगी निर्गुंतवणूक धोरण लागू करण्यात आले

४ . गुंतवणूक आणि तंत्रज्ञानात मुक्त प्रवेश प्रदान केला

५ .औद्योगिक स्थानीयकरण धोरण शिथिल करण्यात आले .

**वित्तीय क्षेत्र सुधारणा : -**

१ .1991 च्या नरसिंह समितीच्या शिफारसीनुसार बँकावर भांडवलपरपतेचा निकष व्याजादराचे विनिमय बँकिंग क्षेत्र खाजगी क्षेत्रासाठी खुले करण्यात आले

२ .1993 च्या मल्होत्रा समितीच्या शिफारशीनुसार विमा क्षेत्र खाजगी क्षेत्रात खुले करण्यात आले .

3 .भांडवल बाजारात अनेक सुधारणा हाती घेण्यात आल्या SEBI ला वैधानिक दर्जा , OTCEI वराष्ट्रीय रोखे बाजाराची स्थापना ,स्क्रीन आधारित रोखी खरेदी-विक्री हे बदल केले गेले .

**परकीय व्यापार धोरण :**

१.भारतीय अर्थव्यवस्था जगतिक व्यापारासाठी खुली करण्यात आली २. वस्तूची आयात ओपन जनरल लायसनच्या आधारे संमत करण्यात आली .

३ .चालू खात्यावर रुपया परिवर्तनीय करण्यात आला

४.आयात प्रशुल्क व संख्यात्मक बंधने (QR s )कमी करण्यात आले .

**पायाभूत संरचना क्षेत्रात खाजगी गुंतवणूक :-**

विविध पायाभूत संरचना विषयक क्षेत्र खाजगी गुंतवणुकीस खुली करण्यातआली उदाहरणार्थ ऊर्जा दूरसंचार बंदरे विमानतळे रस्ते इ. 2005 पासून SEZ विशेष आर्थिक क्षेत्र हे अंमलबजावणी करून आयात निर्यातीवरील खुली अर्थव्यवस्थेची क्षेत्र निर्माण केले गेले

**राष्ट्रीय उत्पादन धोरण 2011 : -** नुसार पुढील दहा वर्षात जीडीपी मध्ये उत्पादन क्षेत्रात वाटा 25% करणे व 100 मिलियन रोजगार निर्मिती करणे हे धोरण जाहीर केले त्यासाठी परकीय गुंतवणुकीस परकीय तंत्रज्ञानास प्रवेश दिला जाईल व्यवसाय नियंत्रणाचे सुलभीकरण केले जाईल . NIMZ (National Investment and Manifacturing zone) अशा पद्धतीने राजकोषीय तूट कमी करून व्यवहार त्याला स्थैर्य निर्माण करणे व चलनवाढीवर नियंत्रण प्रस्थापित करणे असे अनेक संरचनात्मक बदल केले गेले

परकीय गुंतवणूकीसाठी खालील क्षेत्रामध्ये वाढ करण्यात आली चिकित्सा उपकरण क्षेत्र१००% कॉम्प्युटर क्षेत्र १००%, ई-कॉमर्स 100%, पावर एक्सचेंज 49% ,तर पेट्रोलियम रिफायनरी 49%, प्रतिभूती बाजारातील इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी 49%, प्रसारमाध्यम सेवा 49% दागिने शंभर %, बँकिंग सार्वजनिक क्षेत्र 20%, विमा क्षेत्र 49% अशा पद्धतीने भारतातील परकीय गुंतवणूकीमध्ये बदल केला प्रतिबंधित क्षेत्र लॉटरी ,व्यवसाय, जुगार सटट्बाजी चीटफडं निधी कंपन्या, रियल इस्टेट व्यवसाय, तंबाखू व अमली पदार्थ ,खाजगी गुंतवणूक नसलेले खुली नसलेले अणुऊर्जा आणि रेल्वे इ. क्षेत्र प्रतिबंधित आहे. 2016 मध्ये परकीय गुंतवणूक धोरणात केलेले बदल 1917 मध्ये अमलबजावणी त्यामुळे परकीय गुंतवणूक कायदे नियम सोपे सहज झाले. व गुंतवणुकीत वाढ झाले आहे.

**एफडीआयचा प्रवाह**

| **वर्ष** | **FDI (कोटी)** |
|---|---|
| 2000-01 | 12645 |
| 2002-03 | 14932 |
| 2003-04 | 12117 |
| 2004-05 | 17138 |
| 2005-06 | 24613 |
| 2006-07 | 70630 |
| 2007-08 | 98664 |
| 2008-09 | 85700 |
| 2011-12 | 110350 |

**निष्कर्ष**

स्वातंत्र्यपूर्व ते आजपर्यंत विविध टप्प्यामध्ये भारताने परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी 1991 उदारीकरण धोरण स्वीकारले त्यानंतर खाजगीकरण आणि जागतिकीकरण स्वीकारले पण त्याचा पाया अनेक अशा धोरणातून धोरणात्मक बदलातून व संरचनात्मक बदलातून दिसून येतो व व जागतिकीकरणाचा फायदा भारताला दिसून आला आहे

**संदर्भ ग्रंथ**


1. 'संशोधन पद्धती' प्रदीप आगलावे
2. डॉ.श्री देसाई श्री भालेराव 'भारतीय अर्थव्यवस्था'
3. रंजन कोळंबे, 'भारतीय अर्थव्यवस्था' भागीरथ प्रकाशन
4. डॉ.किरण देसले, 'अर्थशास्त्र', दीपस्तंभ प्रकाशन
5. दत्त सुंदरम भारतीय अर्थव्यवस्था
6. योजना 2014
7. लोकमत
8. लोकसत्ता
9. RBI Bulletin and website

# भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल आणि मराठी ग्रामीण कादंबरी

**डॉ. शिवाजी आनंदराव सूर्यवंशी**
यशवंत महाविद्यालय नांदेड.

सध्याची परिस्थिती पाहता जगातील अन्य राष्ट्रापेक्षा भारत हा विकसनशील राष्ट्र आहे असे म्हटले जात असले तरी भारताची वाटचाल विकसीत राष्ट्रांकडे होताना दिसून येत आहे. महासत्ताक राष्ट्राच्या रांगेमध्ये भारत लवकरच येऊन बसेल यामध्ये कोणतीही शंका वाटत नाही. देशाचा अनेक क्षेत्रामध्ये विकास होत असून दिवसेंदिवस देशाची प्रगती विविध क्षेत्रांमध्ये होताना दिसून येत आहे. त्यामुळे अनेक विचारवंतांना, अभ्यासकांना असे वाटत आहे की लवकरच भारत हा एक महासत्ताक देश म्हणून जगाच्या इतिहासामध्ये ओळखला जाईल. मागील दोन दशकापासून भारत जगातील अन्य राष्ट्रांमध्ये आपले एक विशेष असे योगदान देत आहे. अनेक राष्ट्रांना भारताने आर्थिक मदत करण्याबरोबरच कोरोना सारख्या काळामध्ये अनेक राष्ट्राला भारताने औषधीचा पुरवठा सुद्धा केलेला आहे. जगातील अनेक राष्ट्रांना आर्थिक संकटाचा, आर्थिक टंचाईचा सामना करावा लागत असताना भारत मात्र याबाबत अद्यापही चांगल्या पद्धतीने सक्षम आहे. या जागतिक स्तरावर विविध प्रकारच्या घडामोडी घडत असतानाच भारत एक सुरक्षित राष्ट्र म्हणून व लोकशाही प्रधान राष्ट्र म्हणून जगात ओळखल्या जात आहे.

भारताची महासत्ताक देशाकडे वाटचाल होत असताना त्याचा परिणाम मराठी साहित्यावर सुद्धा जाणवत आहे. विशेषतः मराठी ग्रामीण साहित्याने वैश्विक रूप धारण केल्याचे दिसून येत आहे. मराठी ग्रामीण साहित्य आपली संस्कृती, लोकजीवन, प्रथा, परंपरा घेऊन जागतिक प्रकारच्या संकल्पना स्वीकारताना दिसून येत आहे. मराठी ग्रामीण कविता, मराठी ग्रामीण कादंबरी, मराठी ग्रामीण कथा, मराठी ग्रामीण नाट्य या सर्वच साहित्य प्रकारांवर त्याचा परिणाम जाणवताना दिसून येत आहे. त्यामुळे एकूणच मराठी ग्रामीण साहित्याचे स्वरूप बदललेले दिसून येत आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मराठी ग्रामीण कादंबरी या विषयावर चिंतन मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

१९९० नंतर भारत खऱ्या अर्थाने जागतिकीकरणांसोबत मोठ्या प्रमाणात जोडला गेला आणि तेव्हापासून देशाला महासत्ताकतेचे स्वप्न पडू लागले. त्यामुळे लेखकांची भूमिका बदलली आणि ते सुद्धा आपल्या लेखनामध्ये जागतिकीकरणाचे संदर्भ वापरू लागले. ग्रामीण साहित्याच्या बाबतीत सुद्धा असेच घडले. जग बदलल्यामुळे भारताची भूमिका सुद्धा बदललेली दिसली. परंतु भारतात शेतकरी, शेती, पर्यायाने ग्रामीण भाग मात्र तसाच अविकसित राहिला. याबद्दल आपले मत व्यक्त करताना शेषराव मोहिते म्हणतात की, “१९९० नंतर या बदलांचा वेग प्रचंड वाढला. देशाच्या आर्थिक विकासाचा दर वाढला. माणसाच्या जीवनमानाचा स्तर उंचावला. बदलले नाही ते खेडे आणि त्यातही येथील शेतकरी.”१ मराठी ग्रामीण साहित्याचा विचार करीत असताना सर्वप्रथम मराठी ग्रामीण कादंबरीचा विचार करावा लागेल. असंख्य ग्रामीण कादंबऱ्यांनी देशाच्या महासत्ताकतेचा ग्रामीण साहित्यावर झालेला परिणाम दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. भारताची वाटचाल महासत्ताकतेकडे होत असली तरी याबद्दल अनेक अभ्यासकानी तीव्र शब्दात आपली भूमिका मांडली आहे. याबाबतीत ठोस भूमिका मांडताना शेषराव मोहिते म्हणतात की, “आज जागतिकीकरण आणि आर्थिक उदारीकरणाचे युग अवतरल्यानंतर आपण स्वप्न पाहत आहोत महासत्ताक बनण्याचे; पण महासत्ता होण्याची स्वप्न पाहणे ही राक्षसी महत्वकांक्षा झाली. ती कुणीही बाळगू नये.”२

पुरुषोत्तम बोरकर यांच्या मेड इन इंडिया या कादंबरीमध्ये त्यांनी दाखवलेली मिश्र भाषा हे त्याचेच एक उदाहरण म्हणता येईल. कादंबरीला दिलेलं इंग्रजी भाषेतील शीर्षक असो की कादंबरीच्या कथानकामध्ये हिंदी, इंग्रजी, शहरी व बोली अशा सर्वच भाषांचा केलेला वापर हा कादंबरीवर जागतिकीकरणाचा, महासत्तेचा परिणाम दाखवताना दिसून येते. बदलते ग्रामीण जीवन दाखवत असताना पुरुषोत्तम बोरकरांनी या कादंबरीमध्ये सुशिक्षितांचे विवाहाचे प्रश्न, शेतीवर होणाऱ्या विविध रासायनिक औषधांचा वापर तसेच वापरली जाणारी मिश्र भाषा यासारख्या अनेक बाबींची उकल करण्याचा प्रयत्न केला आहे. रावसाहेब, शुभांगी, पंजाब या पात्रांच्या माध्यमातून कादंबरीतील विशेषतः ग्रामीण

भागातील कितीतरी प्रश्न त्यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. बदलते गाव, तसेच सुशिक्षितांचे प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न मांडत असतानाच बोरकरांनी जागतिकीकरणाचा परिणाम हा ग्रामीण साहित्यावर कसा झाला हे सुद्धा दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. "मेड इन इंडिया या कादंबरीचा एकूण आशयाच्या दृष्टीने विचार केला तर काही ठळक बाबी लक्षात येतात. ही कादंबरी बदलत्या ग्रामीण जीवनाचा वेध घेते. त्यामुळे तिच्यातून स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, मानसिक, पातळीवर बदलणारे खेडे दृश्यमान होते"३

रा. रं. बोराडे यांच्या चारापाणी या कादंबरीमध्ये ग्रामीण भागातील जनावरांच्या चारापाण्याचा विषय मांडला आहे. सुखदेव हा कादंबरीचा नायक ग्रामीण भागामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु गावांमध्ये मलारी नावाचा सरपंच हा राजकीय अवगुण असलेला व्यक्ति सरंजामशाहीचा वापर करायला लागतो. कादंबरीमध्ये दुष्काळ, शेतकऱ्यांच्या अडचणी यासारखे किती प्रश्न मांडण्यात आले आहेत. चाऱ्या अभावी निर्माण झालेला जनावरांचा प्रश्न या कादंबरीत मांडण्यात आलेला आहे. उच्च शिक्षण घेतलेला नायक हा परिवर्तनासाठी प्रयत्न करतो. परंतु तिथे परिवर्तन होत नाही, कादंबरीमध्ये साकारण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. त्याचा एक संदर्भ म्हणून चारापाणी कादंबरीतील पुढील वाक्य विशेष महत्त्वाचे आहे. "चाऱ्याअभावी आपल्या गावातल्या शेतकऱ्यांचे कसे हाल सुरू आहेत, हे सुखदेवाने बावणे साहेबांना सांगितलं व या परिस्थितीचा आबाराव शेळके कसा फायदा घेत आहेत हेही त्याने विस्ताराने कथन केलं."४ महासत्ताक होत असलेल्या देशांमध्ये ग्रामीण भागातील परिवर्तन करणे किती अवघड आहे, हा प्रश्न या निमित्ताने कादंबरीमध्ये उभा करण्यात आलेला आहे.

पूर्व आणि पश्चिम या कादंबरीमध्ये शांतीलाल भंडारी यांनी रहिमपूर नावाचे खेडे साकारून स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये भारत पाकिस्तान हा मुद्दा कसा एरणीवर आला होता, त्यामुळे हिंदू मुस्लिमांच्या दंगली कशा पद्धतीने पेटल्या, त्याचबरोबर गावांमध्ये भरणाऱ्या जत्रेमध्ये हा प्रसंग कसा निर्माण होतो आणि यामध्ये चांगल्या पद्धतीने संबंध असलेल्या या गावांमध्ये कशाप्रकारे जातीय दंगली पेटून संकटे निर्माण होतात, हा विषय या कादंबरीमध्ये आलेला आहे.

झुंबड या महादेव मोरे लिखित कादंबरीमध्ये विडी कामगारांचे, कारखानदारांचे प्रश्न मांडत असतानाच विडीच्या उत्पन्नावरून दोन कारखानदारांमध्ये कसा संघर्ष पेटतो आणि यामुळे कामगारांमध्ये सुद्धा कसा संघर्ष पेटतो आणि एकूणच या कामगारांना आता जगायचे नेमके कसे? असा जो प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहतो, त्यांच्या उदरनिर्वाह, उपजीविकेला कसे अनेक अडथळे निर्माण होतात याविषयीचा संघर्ष या कादंबरीमध्ये आलेला आहे. जागतिकीकरण आणि महासत्ताक दिशेने वाटचाल करणाऱ्या भारत देशामध्ये कामगारांचा प्रश्न कसा उभा राहिलेला आहे, यासारखा विषय या कादंबरीत आलेला आहे. कृषी केंद्रित ग्रामीण भागामध्ये शहरातील थोड्या सुखसोयी आल्या म्हणजे तेथील माणूस किंवा त्यांची मानसिकता पूर्णता बदलली असे झाले नाही. "आपला देश हा खऱ्या अर्थाने खेड्यांचा देश आहे. कृषीकेंद्रीत खेड्यातील माणसाची मानसिकता इतर जणांपेक्षा वेगळी असते. शहरातील काही सुखसोयी आणि सुधारणा खेड्यात आल्या म्हणजे खेड्यांचे रूपांतर शहरात होते सर्वार्थाने खरे नाही."५

झावळ सारख्या कादंबरीमध्ये मासे व्यवसायावर कशी अवकळा आलेली आहे, हे काशिनाथ कोळी या नायकाच्या माध्यमातून साकारण्याचा प्रयत्न केलेला आहे. एकीकडे नदीचे पात्र भरभरून वाहत असल्यामुळे माशाचे प्रमाणही खूप राहायचे. परंतु अलीकडे नदीच्या पात्राचे पाणी कमी होत असल्यामुळे माशाचा व्यवसाय अडचणीत आलेला आहे, शासन स्तरावर विविध प्रकारच्या योजना राबवून अपुऱ्या पाण्याचे प्रमाण वाढविण्याचा प्रयत्न केला जात असला तरी मासेमारी, शेती यासारखे अनेक उद्योग दिवसेंदिवस कसे नाहीसे होत चाललेले आहेत, याचा लेखाजोखा या कादंबरीमध्ये उत्तम बंडू तुपे यांनी मांडलेला आहे.

सरदार जाधव यांच्या कोयता या कादंबरीमध्ये ऊसतोड कामगारांचा प्रश्न उभा करण्यात आलेला आहे. देशाची वाटचाल महासत्ताकतेकडे होत असताना जागतिकीकरणाचे अनेक संदर्भ भारतामध्ये राबत असताना ऊसतोड कामगारांना मात्र किती भयावह जीवन जगावे लागत आहे, हा प्रश्न कोयता या कादंबरीमध्ये आलेला आहे. सदू, मुकादम, रामसिंग गुरुजी, जानू दादा यासारख्या पात्राच्या माध्यमातून तसेच पहाडू आणि पार्वती या मुख्य नायकांच्या माध्यमातून या कादंबरीत साखर कारखाने, ऊसाचे उत्पादन या सर्व घटकांचे चित्रण करीत असतानाच विविध प्रश्नांमध्ये अडकलेले ऊसतोड कामगार, कृषी जीवन याविषयीची माहिती कादंबरीमध्ये आलेली आहे.

सेलझाडा या कादंबरीच्या माध्यमातून नामदेव कांबळे यांनी बलुतेदार पद्धती कशा पद्धतीने बंद होत चाललेली आहे आणि ती बंद झाल्यामुळे अनेक कुटुंबांवर कशाप्रकारे उपजीविकेचा प्रश्न निर्माण झालेला आहे याचे वर्णन या

कादंबरीमध्ये करण्याचा प्रयत्न केलेला आहे. बलुतेदार पद्धतीमुळे ग्रामीण पातळीवर अनेकांना आपले जीवन जगणे सोयीस्कर होत असे. परंतु आता हळूहळू जागतिकीकरणामुळे आणि महासत्ताक देशामुळे बलुतेदारी पद्धती कशा पद्धतीने नाहीशी होत चाललेली आहे, याचा संदर्भ या कादंबरीमध्ये घेण्यात आलेला आहे.

जातवान या कादंबरीमध्ये राजनखान यांनी जाती पातीचे संदर्भ कसे दिवसेंदिवस घट्ट होत चालले आहेत, याचा परिणाम दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे. अनेक संसार या जातीय संघर्षामध्ये कसे देशोधडीला लागत आहेत, याचाही त्यांनी विचार केलेला आहे. सरपंच, शास्त्री, बुवा, शितोळे मास्तर, आचार्य शिवानंद वाणी या पात्रांच्या माध्यमातून त्यांनी जाती-जातीतील संघर्ष कसे आहेत, विशेषतः हिंदू आणि मुस्लिम या जातींमध्ये तेढ निर्माण झाल्यानंतर कशा प्रकारे वातावरण विकृत होऊन जाते व त्यामुळे सामाजिक दंगली कशा पेटतात तसेच धार्मिक प्रश्न कसे निर्माण होतात याचा संदर्भ घेतलेला आहे.

मरणदारी या कादंबरीमध्ये दिगंबर या नायकाच्या माध्यमातून निवडणुकीच्या काळात कसा सत्तासंघर्ष असतो, शिवाय निवडणुकीमध्ये राजकारण कशा खालच्या स्तराला जात असते, निवडणुकीमुळे ग्रामीण भागात कसे गढूळ वातावरण होते, आपापसातील संबंध कशा पद्धतीने बिघडतात याविषयीचे चिंतन आलेले आहे.

अशोक कोळी यांच्या पाडा या कादंबरीमध्ये बागायतराच्या संघटना शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कशाप्रकारे प्रयत्न करतात ते दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे. चांगदेव तापीकर हा या कादंबरीचा नायक आहे. तो शेतकऱ्यांसाठी सुरुवातीच्या काळात जोमाने उभा राहत असला तरी पुढील काळात मात्र शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न तसेच कायम राहतात. याविषयीचे दुःख या कादंबरीमध्ये मांडण्यात आलेले आहे. जागतिक कारणामुळे ठिकठिकाणी आपल्या अन्याय हक्कासाठी कशा पद्धतीने आंदोलने उभी राहत आहेत, याविषयीचा संदर्भ या कादंबरीमध्ये घेण्यात आलेला आहे. परंतु आंदोलने जरी उभी राहिली तरी त्यांना न्याय कसा मिळत नाही याविषयीची माहिती या कादंबरीमध्ये आलेली आहे.

देशाची महासत्ताकतेकडे होणारी वाटचाल, दुसरीकडे जागतिकीकरणामुळे अनेक बदललेले संदर्भ हे प्रश्न अनेक ग्रामीण कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीमध्ये मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु असे जरी असले तरी ग्रामीण भागातील प्रश्न मात्र तसेच कायम आहेत. उलट ग्रामीण समस्या दिवसेंदिवस अतिशय भयावह होताना दिसून येत आहे. महासत्ताक देशाकडे भारताची वाटचाल होत असताना ग्रामीण भागाच्या बाबतीत अद्यापही म्हणावे तसे बदल होताना दिसून येत नाहीत. महासत्ताक, जागतिकीकरणाच्या प्रभावाखाली भारतातील ग्रामीण भाग वावरत असताना या भागापुढे हजारो समस्या तशाच कायम राहिल्या आहेत. किंबहुना त्या समस्यांमध्ये मोठी भर पडताना दिसून येत आहे. त्याचे वास्तव चित्र ग्रामीण कादंबरीकारांनी आपल्या कादंबऱ्यांच्या माध्यमातून टिपलेले दिसून येते. महासत्ताकतेचे, जागतिकीकरणाचे विविध प्रकारचे दुष्परिणाम ग्रामीण भागावर झालेले दिसून येतात. अनेक ग्रामीण कादंबऱ्यांमध्ये हा विषय मांडण्यात आलेला आहे. ग्रामीण भाग ओस पडला असून शहरीकरणाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. त्यामुळे ग्रामीण भागात असलेले कितीतरी रोजगार बुडीत निघाले. शेतीचा प्रश्न गंभीर होत आहे. यांत्रिकीकरण शेतीमध्ये आल्यामुळे, शिवाय रासायनिक खते, औषधांमुळे मातीचा कस कमी होत चालला आहे. “अलीकडच्या काळात शेतकऱ्यांच्या जगण्यातील हे स्वयंभू स्वातंत्र्य नष्ट झाले. त्याचे परावलंबित्व पराकोटीचे वाढले. त्यातून हताशा, हतबलता वाढली.”६ महासत्ताक होऊ घातलेल्या भारत देशात उत्पन्न वाढीची स्पर्धा लागल्यामुळे शेती पर्यायाने ग्रामीण भागात अनेक प्रश्न निर्माण झाले. दिवसेंदिवस जातीयता वाढत चालली. शिवाय आपुलकी हरवत चालली, यासारख्या प्रश्नांना ग्रामीण कादंबऱ्यांनी वाचा फोडण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) ग्रामीण साहित्य बदलते संदर्भ - शेषराव मोहिते - साक्षात प्रकाशन औरंगाबाद - पृष्ठ ४९
२) तत्रैव - पृष्ठ ५०
३) ग्रामीण साहित्य स्वरूप व दिशा - डॉ. वासुदेव मुलाटे - स्वरूप प्रकाशन औरंगाबाद – पृष्ठ १६४
४) चारापाणी - रा. रं. बोराडे - साकेत प्रकाशन औरंगाबाद - पृष्ठ ५५
५) ग्रामीण साहित्य स्वरूप व दिशा - डॉ. वासुदेव मुलाटे - स्वरूप प्रकाशन औरंगाबाद – पृष्ठ १७
६) ग्रामीण साहित्य बदलते संदर्भ - शेषराव मोहिते - साक्षात प्रकाशना औरंगाबाद - पृष्ठ ४५

# शाश्वत विकास व पर्यावरण ऱ्हास

**डॉ. मंजूषा राजेंद्र ठाकरे**

प्रोफेसर, अर्थशास्त्र विभाग प्रमुख अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय नागपूर–४४००१३

**गोषवारा**

प्रस्तुत शोधनिबंधाचे तीन भागात विभाजन करण्यात आले आहे. पहिल्या भागात प्रस्तावनेसह उद्दिष्टे, गृहितके व संशोधन पद्धतींचा अभ्यास करण्यात आला आहे. दुसऱ्या भागात शाश्वत विकास व पर्यावरण या दोन घटकांमध्ये असलेल्या संबंधाचे विवेचन करुन विकासाच्या नावावर चालू असलेला पर्यावरणाचा ऱ्हास याचे टिकात्मक विश्लेषण करण्यात आले आहे तर तिसऱ्या भागात उपाययोजना, निष्कर्श यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

शाश्वत किंवा टिकाऊ विकासा अंतर्गत वर्तमान व भावी पिढीच्या गरजा पूर्ण करताना किंवा विकासाची पाळेमुळे सर्वत्र पसरविताना पर्यावरणाचे कुठलेही नुकसान होणार नाही अशी तडजोड करणे अपेक्षीत आहे. पर्यावरण संरक्षणाशिवाय विकास टिकाऊ होऊच शकत नाही. सध्याच्या काळात नैसर्गिक संसाधनांचा वापर भविष्यातील पिढ्यांच्या गरजा लक्षात घेऊन कसा केला गेला पाहिजे यावर लक्ष केंद्रीत करणे अत्यंत गरजेचे आहे. तेव्हाच आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात इच्छित संतुलन स्थापित केले जाऊ शकेल. शाश्वत विकासाची संकल्पनाच मुळी मनुष्याच्या विकासाशी संबंधीत असली तरी विकास करताना निसर्गाचा अशा प्रकारे वापर केला पाहिजे की जेणेकरुन पर्यावरणाला कुठलीही हानी पोहोचणार नाही. अन्यथा निसर्ग आणि विकासामध्ये संतुलन राखणे कठीण होईल.

शाश्वत विकासासंदर्भातील १)आर्थिक प्रगती, कार्यक्षमता व स्थैर्य, २) पर्यावरणीय समस्या, संसाधने, कचरा ३) सामाजिक सबलीकरण, संघटन आणि समावेशकता, या तीन घटकांतील परस्परसंबंधांचे निराकरणही केले पाहिजे. शाश्वत विकास तीन मूलभूत स्तंभांवर आधारित आहे: सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरण . ब्रुंडलँड अहवाल जो शाश्वत विकासाच्या नावाने जगप्रसिद्ध झाला. या अहवालात गरिबी कमी करणे, जागतिक लिंग समानता आणि संपत्ती पुनर्वितरण या स्वरूपात मानवी संसाधनांच्या विकासाचे द्योतक असल्याचे वर्णन केले आहे.

**प्रस्तावना –**

शाश्वत किंवा टिकाऊ विकासा अंतर्गत वर्तमान व भावी पिढीच्या गरजा पूर्ण करताना किंवा विकासाची पाळेमुळे सर्वत्र पसरविताना पर्यावरणाचे कुठलेही नुकसान होणार नाही अशी तडजोड करणे अपेक्षीत आहे. पर्यावरण संरक्षणाशिवाय विकास टिकाऊ होऊच शकत नाही. सध्याच्या काळात नैसर्गिक संसाधनांचा वापर भविष्यातील पिढ्यांच्या गरजा लक्षात घेऊन कसा केला गेला पाहिजे यावर लक्ष केंद्रीत करणे अत्यंत गरजेचे आहे. तेव्हाच आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात इच्छित संतुलन स्थापित केले जाऊ शकेल. शाश्वत विकासाची संकल्पनाच मुळी मनुष्याच्या विकासाशी संबंधीत असली तरी विकास करताना निसर्गाचा अशा प्रकारे वापर केला पाहिजे की जेणेकरुन पर्यावरणाला कुठलीही हानी पोहोचणार नाही. अन्यथा निसर्ग आणि विकासामध्ये संतुलन राखणे कठीण होईल.

**शाश्वत विकास व पर्यावरण यांचा संबंध –**

आज विकासाची गती एवढी तीव्र झाली आहे, हव तर असे म्हणता येईल की विकासाच्या नावावर जो बागुलबुआ लोकांच्या मनात रुजावला जात आहे, तो मनुष्याकरीता अत्यंत घातक सिद्ध होत आहे. सर्वसामान्य माणसांची विकास संकल्पनेबाबत जी सकारात्मक मानसिकता तयार केली जात आहे ती भावी पिढीच्या दृष्टीने अत्यंत हानीकारक आहे. विकासाच्या संकल्पनेची बीजे सर्वत्र पसरलेली दिसुन येत आहे. देशात नेमक काय चालू आहे हे सर्वसामान्यांना कळण्याच्या आवाक्याबाहेरचे आहे. उदा. जिथे पायवाट आहे किंवा जो भाग अत्यंत मागासलेला आहे त्या भागात जाण्यासाठी दऱ्या–खोऱ्यांमधून वाट काढत जावे लागते. आणि जिथे रस्त्याचे डांबरीकरण केले गेले आहे तिथे सिमेंटीकरणावर भर दिला जात आहे. अत्याधुनिक असे चौपदरी, आठपदरी रस्त्यांच्या विकासाला प्राधान्य देण्यात येत आहे. हे सर्व करित असताना अनेकं शेतकऱ्यांची सुपीक जमीन अत्यंत कमी मोबदला देऊन सरकार हस्तगत करित आहे. म्हणजे एका बाजुने विकास तर दुसऱ्या बाजुने शेतकरी किंवा प्रकल्पग्रस्तांचे अविकास. काही ठिकाणी तर जंगलाचा नाश करुन विकास साध्य करण्याचा प्रयत्न केला जात आहे. ज्याचा विपरित परिणाम पर्यावरणावर होताना दिसतो. वर्षानुवर्षे उभी असलेली डोलदार झाडे क्षणात नामशेष केली जात आहे. यामुळे केवळ जंगलाचाच ऱ्हास झाला असे नाही तर संपूर्ण मानव जातीवर त्याचे विपरीत परिणाम होताना दिसुन येत आहे. याचे सुंदर उदा. म्हणजे चौपदरी व आठपदरी सिमेंट रस्ते. सिमेंटीकरणाचे अत्याधुनिक प्रयोग

अयशस्वी झाल्याचे दिसुन येते. सिमेंट ररत्यावर अपघात होणे हे नित्याचेच झाले आहे. याला कोणते घटक जबाबदार आहे. थोडा दमदार पाऊस पडल्याबरोबर पाणी सरळ घरात घुसत आहे. कारण ड्रेनेज ची योग्य व अपुरी व्यवस्था या सर्व घटकांना जबाबदार आहे. जेव्हा कुठल्याही बाबतीत नियोजन केल्या जाते तेव्हा त्यातुन उद्भवणारे अनुकूल व प्रतिकुल परिणामांचा भविष्यकालीन अंदाज बाधणे आवश्यक असते. तेव्हाच येणाऱ्या संकटांना सहजपणे सामोरे जाण्याची क्षमता नियोजनकर्त्यामध्ये निर्माण होते. परंतु प्रत्यक्षात असा अनुभव दिसुन येत नाही. योजना आखणारे उच्च पदस्थ, अंमलबजावणी करणारे व आदेश पाळणारे सरकारी नौकर, आणि लाभार्थी सर्वसामान्य जनता. परंतु आर्थिक लाभ मिळतो तो केवळ योजना तडीस नेणाऱ्याला. लाभार्थ्यांना मात्र त्याची फार मोठी किंमत चुकवावी लागते. जी कधीही भरुन निघु शकत नाही.

एकीकडे ढगफुटी तर दुसरीकडे कोरडा दुष्काळ अशा विपरीत विसंगतीने मानवाला जिवन जगणे असहय केले आहे. सतत नापीकी, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ यामुळे अन्नधान्याच्या बाबतीत परावलंबीत्वाची भूमीका जोर धरु लागली आहे. छोटया रोपाचं वटवृक्षात रुपांतर व्हायला वर्षानुवर्षे जावी लागतात. आणि मोठमोठाली झाड अत्याधुनिक मशिन द्बारे क्षणभरात नामशेष केली जातात हयाच्या वेदना विकासाच्या नावावर बुलडोझर फिरवण्याचा आदेश देणाऱ्यांना कशा कळू शकेल. हयाला कोणता विकास म्हणायचा? याला खरोखरीच विकास म्हणायचे असेल तर दारिद्रय, बेकारी, बेरोजगारी नामशेष होण्याच्या मार्गावर असायला हवी होती. पण वास्तविक तसे दिसुन येत नाही. कारण यात जर सुधारणा करावयाची असेल तर त्यासाठी टप्पाटप्प्याने पावले उचलणे गरजेचे आहे. दारिद्रय, बेकारी, बेरोजगारी हे अर्थव्यवस्थेला जडलेले रोग असले तरी त्यावर उपाय करणे अगत्याचे नव्हे तर ती काळाची गरज झाली आहे. आजही या प्रश्नांकडे दुर्लक्ष करुन विकास करण्याचा प्रयत्न करत असु तर हे बुद्धिजीवी मनुष्याच्या अपयशाची पहिली पायरी आहे असे म्हटल्यास ते वावगे होणार नाही.

**शाश्वत विकास व पर्यावरणाचा ऱ्हास –**

एकीकडे मनाला भुरळ पाडणारा विकास आणि दुसरीकडे दऱ्या–खोरे यांचा सतत होणारा ऱ्हास, गावपातळीवरील स्थानीक नदयां मोठ मोठया प्रेकल्यात वळत्या करुन नदंयाच अस्तित्व धोक्यात आणणे, प्रकल्पाच्या नावावर पिकाऊ उपजत जमीन हस्तगत करणे कितपत योग्य आहे. नैसर्गिक सौंदर्य नामशेष करुन दऱ्याखोऱ्यांमधून आडवळणाचा रस्ता वाहतुकीसाठी तयार करणे हेच मानवाच्या अधोगतीचे प्रमुख कारण आहे. विकासाच्या नावावर निसर्गाला आव्हान देण्याचा प्रयत्न मुनष्य जाणतेअजाणतेपणाने सतत करित आहे. विकास करताना तो चिरकाळ कसा टिकेल याचा विचार केला पाहिजे. विकासाचे दूरगामी परिणाम आपण सर्वचजण भोगत आहोत. परंतु खरी झळ ही शेतात राबणाऱ्या तसेच सर्व सामान्य नागरिकांना पोहचत आहे. नुकसान त्यांचेच होत आहे. अस्मानी व सूल्तानी संकट त्यांच्यासमोर आ वाचून उभी आहे. आर्थिक सुबत्ता नसल्यामुळे आहे त्या परिस्थितीत ंजगण्याशिवाय पर्याय नाही. जमिनीशिवाय उत्पनाचे अन्यत्र कुठलेही साधन नाही. अशा परिस्थितीत आहे त्यातच समाधान मानन्याकडे लोकांचा कल दिसुन येतो.क

मुनष्याने कितीही प्रगती केलेली असली तरी तो कृत्रिम पर्यावरणाची निर्मिती करण्यास सक्षम नाही.निसर्गदत्त देणगी ची जोपासना करणे हीच पर्यावरण संरक्षणाची पहिली पायरी आहे. परंतु मनुष्य जाणतेअजाणतेपणाने का होईना बुद्धि च्या बळावर नवतंत्रज्ञानाचा आधार घेऊन आपण काहीही निर्माण करु शकतो अशी भावना त्याच्यामध्ये निर्माण झाली आहे. मला वाटते हा बृद्धिजीवी प्राण्यांमध्ये असलेला पर्यावरणासंबंधी एक आकसच आहे. नवनवीन शोध, अत्याधुनिक यंत्र–तंत्र इ. मध्ये अनाकलनीय प्रगती दिसत असली तरी ती पर्यावरणाच्या दृष्टीने किती हानीकारक आहे, याचा अंदाज न वर्तविलेला बरा. आणि याच नवप्रवर्तनाच्या आधारावर विकासांगर्तत मोठ–मोठया पर्वत–पहाडांना चिरुन व्यापारीकरण केले जात आहे. विकासाला प्रोत्साहन देण्याच्या उदात्त हेतुने निसर्गावर घाव पाडल्या जात आहे. अशा पद्धतीने केलेला विकास किती काळ टिकू शकतो ? हा प्रश्नच मुळात अनुत्तरीत आहे.

२०२३–२४ मध्ये जुन–जुलै महिन्यात हिमाचल, उत्तरोचल, आसाम या प्रदेशात निर्माण झालेला प्रश्न कशाचे प्रतीक आहे. विकास करताना भविष्यात निर्माण होणाऱ्या अडवणी व त्यावरील उपाय यांचा लेखाजोखा मांडण्याचा प्रयत्न विकास साध्य करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनी कधी केला का? भविष्यकालीन अंदाज फोल ठरु शकतात हे मान्य आहे. परंतु ढगफटी ची परिस्थिती निर्माण झाली तर मनुष्यहानी होणार नाही यांसंबंधी काही उपाययोजनांचा का केल्या गेल्या नाही? या प्रश्नाकडे गांभीर्याने बघण्याची वेळ आली आहे. अमाप पैसा खर्च करुन बांधलेली मोठ–मोठे पुल, रस्ते, सर्व पाण्याच्या पुरासोबत वाहत गेलं. केवळ कृत्रिमरित्या निर्माण केलेलं सौंदर्यच नामशेष झालं असे नाही तरी अनेक घरे, ब्रिटिश राजवटीच्या काळूातील इमारत सुद्धा वाहुन गेली. याला जबाबदार कोण? पुन्हा नेमक्या सुख–सोयींनी युक्त इमारत, रस्ते बांधणे व पूर्वीप्रमाणेच भौतिक सुविधा उपलब्ध्रा करुन देणे जिकरीचे काम नाही का? कुठे गेला शाश्वत विकास जो चिरकाळ टिकणारा असावयास

पाहिजे होता. ज्याचे फायदे वर्तमान व त्याच्या पुढील पिढीला मिळावयास हवा होता. पुन्हा विकासाचा तोच डोलारा उभा करणे अत्यंत कठीण असे काम आहे.

युनायटेड नेशन्स ने शाश्वत विकासासाठिची वर्ष २०१५ पासुन २०३० पर्यंत एकूण १७ जागतिक ध्येये पुढीलप्रमाणे निश्चित केली. २०१५ च्या ऑगस्ट मध्ये १९३ देशांनी खालील १७ ध्येयांना मान्यता दिली आहे.त्यापैकी पर्यावरणासंबंधीत महत्वपूर्ण ध्येय पुढीलप्रमाणे–

1) उपलब्ध नैसर्गिक साधनांचा जबाबदारीपूर्वक वापर करुन साधनांचा शाश्वत उपभोग आणि उत्पादन नमुना यात समन्वय साधण्याचा प्रयत्न करणे.
2) हवामानात अंदाज वर्तवू न शकणारे बदल आणि त्याचे होत असलेले परिणाम निराकारण करण्यासाठी त्वरीत उपाययोजना करणे.
3) शाश्वत विकासासाठी महासागर, समुद्र, आणि सागरी साधने जतन करणे व त्यांचा सातत्याने वापर करणे.
4) जमिनीचा शाश्वत उपयोग करण्यावर भर देणे, जमिनीवरील पर्यावरण संस्थेचे रक्षण करणे, त्याची पुर्नःस्थापना करणे, त्याचा शाश्वत वापर करण्यास मदत करणे, सातत्याने जंगलांची व्यवस्था बघणे, जंगले ओसाड होण्यापासून थांबवणे, जमिनीची धूप थांबवणे व धूप झालेल्या जमिनीची पुर्नःस्थापना करणे आणि जैवविविधतेची हानी होण्यापासून थांबवणे.

**उपाययोजना –**

शाश्वत विकास हाच मनुष्य व देशहिताच्या दृष्टीने आवश्यक नव्हे तर गरजेचे आहे. शाश्वत विकास हाच निरंतर टिकणारा आहे. अन्यथा दिसणारा विकास हा त संबंधीतच राहु शकेल यात शंका नाही. विकासाची फळे ही वर्तमानाबरोबरच भविष्यकालीन पिढीला चाखता आली पाहिजे. तरच त्याला शाश्वत विकास म्हणता येईल. हा विकास करताना जनसामान्यांचे कल्याण विचारात घेतले पाहिजे.

**निष्कर्श –**

यामध्ये शाश्वत विकासासंदर्भातील १)आर्थिक प्रगती, कार्यक्षमता व स्थैर्य, २) पर्यावरणीय समस्या, संसाधने, कचरा ३) सामाजिक सबलीकरण, संघटन आणि समावेशकता, या तीन घटकांतील परस्परसंबंधांचे निराकरणही केले पाहिजे. शाश्वत विकास तीन मूलभूत स्तंभांवर आधारित आहेः सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरण . ब्रुंडलँड अहवाल जो शाश्वत विकासाच्या नावाने जगप्रसिद्ध झाला. या अहवालात गरिबी कमी करणे, जागतिक लिंग समानता आणि संपत्ती पुनर्वितरण या स्वरूपात मानवी संसाधनांच्या विकासाचे द्योतक असल्याचे वर्णन केले आहे. शाश्वत विकासाचा गाभा म्हणजे सर्वसमावेशक वृद्धी होय. संपत्ती व समृद्धी वितरणात समानता असेल तरच आर्थिक वृद्धी शक्य होते. आणि हीच आर्थिक वृद्धी समावेशक केल्यास विकास शाश्वत बनतो. कल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी सर्वसमावेशक वृद्धी अत्यंत महत्वपूर्ण तत्व मानले जात.

**संदर्भसूची–**

१. भारतीय अर्थव्यवस्था– प्रा. श्रीधर देशपांडे, डॉ. विनायक देशपांडे, हिमालय पब्लिकेशन, नागपूर ,प्रथम आवृत्ती २०१४
२. भारतीय अर्थव्यवस्था– प्रा. सुधाकर शास्त्री, विश्व पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्युटर्स, प्र. आ. १९९९
३. भारतीय अर्थव्यवस्था– प्रा. डॉ. दामाजी, विद्या बुक्स पब्लिकेशन, तुळजापूर, जाने. २०१३
४. भारतीय अर्थव्यवस्था–नियोजन आणि विकास–डॉ.जे.एम.काकडे, प्रा.एस.जी.पाचपोर, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १ जुलै २०१४

# ग्रामीण भागाच्या विकासात रस्त्यांचे महत्त्व

**डॉ. बबन मधुकर सोनवणे**
संशोधक मार्गदर्शक
म.स.गा. महाविद्यालय, मालेगाव कॅम्प (नाशिक)

**दिलीप आप्पा जगताप**
संशोधक विद्यार्थी
म.स.गा. महाविद्यालय, मालेगाव कॅम्प (नाशिक)

**प्रस्तावणा –**

ग्रामीण विकासात रस्त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे त्यांची निर्मिती आणि दुरुस्तीला विशेष महत्त्व दिले जाते. कारण त्यांचा गावातील लोकांना अत्यंत मोठा लाभ होतो. ग्रामीण क्षेत्रात रस्त्यांची भूमिका बहुआयामी आहे, ज्यामध्ये शेती,वाणिज्य, आरोग्य सेवा, शिक्षण आणि अन्नधान्य, ग्रामीण भागात जीवनशैली, आर्थिक संधी सुधारणे इत्यादी. ग्रामीण विकास आपल्यासाठी महत्त्वाचा आहे कारण देशातील 65 टक्के पेक्षा जास्त लोक अजूनही खेड्यांमध्ये राहतात. जे आर्थिक आणि सामाजिक मापदंडांच्या बाबतीत खूप मागे आहेत. संपूर्ण देशाचा विकास होण्यासाठी देशाच्या प्रगती सोबत मोठ्या लोकसंख्येचा विकासही होणे आवश्यक आहे. अन्यथा शहरी आणि खेडी यांच्या उत्पन्नात मोठी तफावत निर्माण होऊ शकते. खेड्यातील लोकांचे जीवनमान सुधारणे आवश्यक आहे. ते मुख्यतः शेतीवर अवलंबून असतात जे खूप उत्पन्न देणारे क्षेत्र नाही, कारण त्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात आणि जीडीपी मध्ये किंवा शेतकऱ्यांच्या उत्पन्नात फारसा योगदान देत नाही. त्यामुळे गावांच्या कौशल्य आणि विकासाबरोबरच उत्तम शेती आणि कृषी पद्धती आवश्यक आहे, जेणेकरून एकूण उत्पादनासोबत उत्पादकता वाढवता येईल मुळात ग्रामीण विकास हा केवळ काही मापदंडांमध्ये सुधारणा करण्यासाठीच नाही तर एक राष्ट्र म्हणून संपूर्ण विकास आणि प्रगती करण्यासाठी देखील महत्त्वाचा आहे. ग्रामीण विकासाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे रस्त्यांसह पुरेशी पायाभूत सुविधांची तरतूद होईल. अन्न, वस्त्र, निवारा, विज, शिक्षण, हवा, पिण्याचे पाणी इत्यादी पायाभूत सुविधांपैकी रस्ते ही एक प्रकारची समाजाला लागणारी पायाभूत सुविधा आहे. लहान आणि मध्यम अंतरासाठी वस्तू आणि प्रवासांच्या वाहतुकीमध्ये रस्ते खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. रस्ते बांधण्यासाठी आणि त्यांची देखभाल करण्यासाठी ते तुलनेने नेहमी सोपे आणि स्वस्त असतात. रस्ते वाहतूक हे भारतातील वाहतुकीचे दुसरे महत्त्वाचे साधन आहे. देशाच्या प्रत्येक कोपऱ्याचा समावेश होतो जो रेल्वे वाहतूक देखील कव्हर करू शकत नाही रस्ते वाहतूक देशाच्या कृषी आणि औद्योगिक क्षेत्राला पायाभूत सुविधा पुरवते शिवाय रस्त्यांचे देखभाल केल्याने मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात. कारण शेती किंवा घरांच्या तुलनेत दुप्पट श्रमिक असतात. 'भारतीय रस्त्यावरून 85 टक्के प्रवासी आणि 70 टक्के मालवाहतूक होते. महामार्ग लांबीनुसार रस्त्यांच्या जाळ्याच्या फक्त दोन टक्के आहेत परंतु यातील 80 टक्के वाहतूक रस्ते करतात'[1]. रस्त्यांच्या जाळ्यांमध्ये राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग,जिल्हा रस्ते; ग्रामीण रस्ते आणि रस्ते आणि बंदरे इत्यादींसाठी विशेष उद्देशाने रस्ते यांचा समावेश होतो. राष्ट्रीय महामार्ग हे देशभरातील प्रमुख धमनी मार्ग आहेत. 'एकूण रस्ते वाहतुकीच्या मागणीच्या सुमारे 45 टक्के गरजा ते पूर्ण करतात'[2]. अलीकडेच राष्ट्रीय राज्य आणि ग्रामीण रस्त्यांसाठी निधीचा एक प्रमुख नवीन शोध तयार करण्यात आला आहे त्याला सेंट्रल रोड फंड (CRF) असे नाव देण्यात आले आहे. शिवाय रस्त्यांच्या विस्तारासाठी राष्ट्रीय महामार्ग विकास प्रकल्प (NHDP) स्थापन करण्यात आले आहे.

**उद्देश –**

1) ग्रामीण विकासात रस्त्यांची भूमिका अभ्यासणे
2) ग्रामीण विकास आणि रस्ते यामधील अंतर संबंध अभ्यासणे
3) ग्रामीण भागातील रस्त्यांची प्रगती अभ्यासणे

**तथ्य संकलन –**

प्रस्तुत शोधनिबंध हा प्रामुख्याने निरीक्षण व दुय्यम साधनसांग्रीवर अवलंबून आहे त्यासाठी विविध पुस्तके, मासिके, शासकिय संकेत स्थळे, वर्तमान पत्रातील लेख यांच्या साहयाने तथ्य संकलन केले आहे .

**विश्लेषण –**

ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागाच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी तयार केलेली'कृती योजना होय'.ग्रामीण भागातील लोकांचे राहणीमान उंच पातळीवर घेऊन जाणे म्हणजेच ग्रामीण विकास होय.ग्रामीण विकास हा फक्त शेती पूरक व्यवसायाशी निगडित नसून देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये ही अनन्यसाधारण असे महत्त्व आहे .कोणत्याही अर्थपूर्ण विकास धोरणाच्या केंद्रस्थानी ग्रामीण विकास असतो. देशाच्या सामाजिक, आर्थिक जडण- घडणीत ग्रामीण विकास महत्त्वपूर्ण भूमिका बजावते .ग्रामीण भागाच्या विकासात गावातील लोकांना शिक्षण,आरोग्य सेवा, व्यापार, गावातील लोकांना अन्नधान्य पुरवणी इत्यादी बरोबरच रस्त्यांची निर्मिती महत्त्वाची भूमिका बजावतात .रस्त्यांच्या निर्मितीमुळे ग्रामीण क्षेत्रांमध्ये संचार,व्यापार आणि रोजगारांच्या संधीमध्ये वाढ घडून येते ग्रामीण भागात विकासाच्या दृष्टीने अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो पायाभूत सुविधा विकासात विशेषता रस्ते नेटवर्क या आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि ग्रामीण विकासास प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात रस्ते ग्रामीण समुदायासाठी लाईफ लाईन म्हणून काम करतात. वस्तू आणि लोकांची वाहतूक सुलभ करतात. बाजारपेठेची उपलब्धता, आरोग्यसेवा,शिक्षण व शहरी केंद्रांची कनेक्टिव्हिटी अशी व्यापक भूमिका रस्ते बजावत असतात. जी गावांना व्यापक जगाशी जोडणाऱ्या धमन्या म्हणून काम करतात. रस्ते विकासाची ऐतिहासिक उत्क्रांती आणि त्याचा समाजावर महत्त्वपूर्ण प्रभाव पडला आहे. प्राचीनतम रस्ते प्रणाली रोमन सारख्या प्राचीन संस्कृतींनी तयार केल्या होत्या, ज्यांनी लष्करी आणि आर्थिक हेतूंसाठी रस्त्यांचे विस्तृत जाळे तयार केले होते. टिकाऊपणा सुधारण्यासाठी आणि मुसळधार पावसाचा प्रभाव कमी करण्यासाठी उंच रस्ते, कल्व्हर्ट आणि ड्रेनेज खड्डे यासारख्या वैशिष्ट्यांसह रोमन रस्ता प्रणाली कार्यक्षम आणि देखरेखीसाठी सोपी बनवण्यात आली होती. मध्ययुगात, तटबंदी आणि संरक्षणाकडे लक्ष केंद्रित केल्यामुळे रस्त्यांचा विकास मंदावला. तथापि, व्यापार आणि व्यापाराच्या उदयानंतर, शहरे आणि शहरांच्या वाढीसह रस्ते विकासाला पुन्हा वेग आला. यामुळे अधिक रस्ते बांधले गेले, जे अनेकदा कच्चा असायचे, ज्यामुळे ते चिखलाचे आणि खराब हवामानात मार्ग काढणे कठीण होते.ग्रामीण भागाच्या विकासात रस्त्यांचे व्यापक जाळे महत्त्वाची भूमिका बजावतात. सुविकसित रस्ते पायाभूत सुविधांचे फायदे आणि त्याचा आर्थिक वाढीवर होणारा परिणाम ज्यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.

**रस्त्यांच्या विकासामुळे सुलभता निर्माण झाल्या: -**

रस्त्यांच्या विकसित झाल्यामुळे आणि सुस्थितीत असलेल्या रस्त्यांमुळे अनेक बाबींमध्ये सुलभता निर्माण होते ग्रामीण भागाला बाजारपेठ, आरोग्य सुविधा मध्ये मोठ्या प्रमाणात सुलभता निर्माण होते ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात आरोग्य विषयक सुविधांचा अभाव स्वतंत्र व स्वातंत्रपूर्व काळात दिसून येतो. ग्रामीण भागातील लोकांना अनेक आरोग्य विषयक समस्या जाणवतांना दिसून येतात. भारतासारख्या विकसनशील देशात अनेक खेडोपाडी आरोग्य विषयक सुविधांचा अभाव दिसुन येतो. अशा वेळेस सुस्थितीत असणारे रस्ते व वाहतुकीच्या उपलब्ध असणाऱ्या सोयी सुविधांमुळे ग्रामीण भागातील लोकांना शहरी भागात उपलब्ध असलेल्या उपचार पद्धतींचा वेळेवर उपचार घेता येतो परिणामी मृत्यूचे प्रमाण कमी होते.रस्ते जर सुस्थितीत नसेल तर शहरी भागामध्ये उपचार घेण्यासाठी लागणारा वेळ तुलनेने जास्त लागतो व त्याचा परिणाम लोकांच्या आरोग्यावर होत असतो.शिवाय रस्ते शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश प्रदान करते आणि विद्यार्थी आणि शिक्षकांची गतिशीलता सुलभ करून रस्ते शिक्षणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.रस्त्यांच्या उपलब्धतेमुळे शैक्षणिक पातळीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ घडून येतील.विद्यार्थ्यांसाठी रस्ते वाहतुकीची सुविधा उपलब्ध असेल तर विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शहरी भागात जाण्यासाठी मदत होते. व ग्रामीण

भागाची शैक्षणिक पातळी उंचावण्यास हातभार लागतो. शिक्षणाने माणूस समृद्ध होतो. रस्ते व वाहतुकीच्या सुविधांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी एक सुजान व समृद्ध नागरिक बनतो व आपल्या गावाच्या व पर्यायाने देशाच्या विकासात भर टाकत असतो मानवी साधन संपत्ती जर सुदृढ, संपन्न व विकसित असेल तर विकास अटळ असतो.रस्त्यांच्या उपलब्धतेमुळे मोठ्या प्रमाणात प्रवासाचा वेळ कमी केला जातो, त्यामुळे गावकऱ्यांना रोजगार, शिक्षण, आरोग्य सेवांच्या संधीमध्ये सुलभता निर्माण होऊन सर्वांगीण मानवी विकासात रस्ते योगदान देतात.

**ग्रामीण सेवा-सुविधा: -**

रस्ते वाहतुकीचा सर्वात मोठा फायदा, ज्यामुळे तो वाहतूक उद्योगाची मुख्य जीवनरेखा बनतो, ती घरोघरी, स्त्रोतापासून गंतव्यस्थानापर्यंत, गोदाम - टोअरहाऊस, घरोघरी सेवा प्रदान करण्याची क्षमता फक्त रस्ते वाहतुकीत आहे. ही अशी गोष्ट आहे जी इतर कोणतीही वाहतूक साधन देऊ शकत नाही. हे नैसर्गिकरित्या कार्टेज खर्च, लोडिंग आणि अनलोडिंग खर्च आणि इतर संबंधित फीडर वाहतूक खर्च कमी करते. घरोघरी सेवा पोहच करत असल्यामुळे शेतकरी, किराणा दुकान अशा कितीतरी व्यवसायीकांचा वेळ व खर्च कमी होतो त्यातुन उत्पादन क्षमता वाढते.

**आर्थिक वाढ उत्प्रेरीत करणे: -**

ग्रामीण भागामध्ये आर्थिक क्रियाकल्पांना चालना देण्यासाठी रस्ते महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.बाजारपेठ आणि शहरी केंद्रांना जोडणी प्रदान करून रस्ते गावकऱ्यांसाठी व्यापार, शेती,शेती पूरक जोडधंदे आणि लघु उद्योगांमध्ये गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित व सक्षम करतात.शहरी भागातील बाजारपेठेतील वाढीव संधीमुळे गावातील उत्पादनांसाठी मोठ्या प्रमाणावर ग्राहकांची उपलब्धता मिळते ग्राहकांच्या उपलब्धतेमुळे उत्पादनाला मागणी निर्माण होते व वाढलेल्या मागणीतून उत्पादकांना मोठ्या प्रमाणावर उत्पादन व गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन मिळते व उत्पादनात वाढ होऊन स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते आणि घरगुती उत्पन्न वाढते या व्यतिरिक्त ग्रामीण भागांना शहरी केंद्रे आणि औद्योगिक क्षेत्राशी जोडून औद्योगीकरण व ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विविधतीकरणाला चालना देता येते.रस्ते पायाभूत सुविधा मधील गुंतवणुकीचा प्रवाह सुलभ करतात व उद्योजकतेला चालना देतात आणि रोजगाराच्या संधी निर्माण करतात खेड्यांमध्ये शाश्वत आर्थिक विकासाचा पाया घालतात.

**रस्ते पायाभूत सुविधांचे सामाजिक परिणाम: –**

गावांमध्ये सामाजिक संवाद आणि सांस्कृतिक देवाणघेवाण निर्माण करण्याचं काम रस्ते करत असतात.सुधारित कनेक्टिव्हिटी गावकऱ्यांना सामुदायिक कार्यक्रम, धार्मिक मिळावे, पर्यटन, सामाजिक कार्यामध्ये अधिक सहजतेने सहभागी होण्यास सक्षम करते.सामाजिक बंध मजबूत करते.आणि एकमेकांमध्ये आपुलकीची भावना वाढवते याव्यतिरिक्त रस्ते विचारांची आणि ज्ञानाची व नवकल्पनांची देवाणघेवाण सुलभ करताना दिसून येतात. थोडक्यात रस्ते केवळ भौतिक जागाच जोडतात असे नाही तर सामाजिक विभाजनांना देखील जोडतात गावागावातील समुदायांमध्ये सर्व समावेशकता आणि एकता वाढवण्यासाठी रस्ते मोलाचे योगदान देताना दिसून येतात.रस्ते आपत्कालीन सेवांना दुर्गम भागात त्वरित पोचवण्यास सक्षम करतात ज्यामुळे आपत्ती निवारणास मदत होते.

**पर्यावरण विषयक सुधारणा: –**

रस्ते ग्रामीण विकासाला हातभार लावत असताना त्यांचे बांधकाम आणि कार्य यामुळे पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतात,जंगल तोड, मातीची धुप आणि अधिवासाचे तुकडीकरण ही ग्रामीण भागातील रस्त्यांच्या पायाभूत सुविधांच्या विकासाशी संबंधित काही पर्यावरणीय आव्हान आहे तथापि शाश्वत रस्ते,नियोजन पद्धती जसे की वनीकरण, धुप नियंत्रण उपाय आणि वन्यजिव कॉरिडॉर हे पर्यावरणीय प्रभाव कमी करण्यास आणि खेड्यांमध्ये पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत करू शकतात याव्यतिरिक्त सायकली आणि चालण्याचे मार्ग यांसारख्या पर्यावरण पूरक वाहतूक पद्धतींना प्रोत्साहन देणे,कार्बन उत्सर्जन कमी करू शकते आणि गाव विकास उपक्रमांमध्ये पर्यावरणीय टिकाऊ पणाला प्रोत्साहन देऊ शकते.

**मालमत्ताच्या मुल्यामध्ये वाढ: -**

चांगल्या रस्त्यांच्या पायाभूत सुविधांमुळे रस्त्यांच्या शेजारी असणाऱ्या विविध प्रकारच्या मालमत्ता जसे की जमीन,घरे व इतर स्थावर मालमत्ताचे मूल्य हे इतर ठिकाणी असणाऱ्या मालमत्तेपेक्षा कितीतरी पट या मालमत्तेचे मूल्य वाढू शकते, कारण स्त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या जमिनी व घरे यामध्ये हंगामी जसे की उन्हाळा या ऋतु मध्ये ऊसाच्या रसाची विकी व इत्यादी अनेक व्यवसाय वाढीस लागतात व बिगर हंगामी जसे की पेट्रोल पंप, हॉटेल ,पंचर दुकान, पान टपरी इत्यादी मोठ्या प्रमाणात व्यवसायाच्या संधी निर्माण होतात. म्हणजेच रस्त्यांच्या निर्मिती मुळे मोठ्या प्रमाणात व्यवसायाच्या संधी निर्माण होवून रोजगार निर्मिती होते व पर्यायाने विकासाच्या मार्गावर वाटचाल होतांना दिसून येते.

**आव्हाने आणि संधी –**

रस्त्यांच्या पायाभूत सुविधांची सध्याची स्थिती वेगवेगळ्या देशांमध्ये मोठ्या प्रमाणात बदलते. विकसित देशांमध्ये, रस्ते पायाभूत सुविधा सामान्यत: चांगल्या प्रकारे राखल्या जातात आणि चांगली कनेक्टिव्हिटी प्रदान करतात, तर अनेक विकसनशील देशांमध्ये, रस्ते पायाभूत सुविधा बर्याचदा खराब स्थितीत असतात आणि कनेक्टिव्हिटीचा अभाव असतो गावाच्या विकासात रस्त्यांचे असंख्य फायदे असूनही अनेक आव्हाने कायम आहेत.मर्यादित निधी, अपुरी देखभाल आणि भौगोलिक अडचणींमुळे अनेकदा दुर्गम खेड्यांमध्ये रस्ते पायाभूत सुविधांच्या विकासात अडथळे येतात. रस्त्यांच्या पायाभूत सुविधांचे असमान वितरण प्रदेशांमधील असमानता वाढवू शकते. ज्यामुळे सामाजिक आणि आर्थिक दुर्लक्ष होऊ शकते तथापि नाविन्यपूर्ण वित्त पुरवठा,यंत्रणा, योग्य नियोजन पद्धती आणि रस्ते बांधणी आणि देखभाल दुरुस्ती यामधील तंत्रज्ञानातील एकत्रीकरण याद्वारे या आव्हानांना तोंड देता येऊ शकते.

**निष्कर्ष –**

विकास प्रक्रियेमध्ये रस्त्यांचे महत्त्व अनन्य साधारण आहे. रस्त्यांच्या निर्मितीमुळे ग्रामीण भागातील सर्व प्रकारच्या आर्थिक क्रियांना गती प्राप्त झालेली आहे. ग्रामीण भागात रस्त्यांची निर्मिती झाल्यामुळे ग्रामीण भागातील उद्योग व्यवसायाला देखील प्रबळ चालना मिळालेली आहे. रस्ते निर्मितीमुळे ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या कृषी क्षेत्राला देखील गतिमानता प्राप्त झालेली दिसून येते. सामाजिक एकतेमध्ये वाढ झाली असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागाची शहरी भागाबरोबर रस्त्यांच्या माध्यमाने जोडणी झाल्यामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या जन जीवनात व राहणीमानात देखील सकारात्मक बदल झालेले दिसून येतात. रस्त्यांच्या निर्मितीमुळे ग्रामीण भागातील वाहतूक व दळणवळणाच्या सुविधा चांगल्या दर्जाच्या उपलब्ध झालेले आहेत. थोडक्यात, ग्रामीण भागात प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून नव्याने तयार झालेल्या रस्त्यांमुळे ग्रामीण भागात विकासाची प्रक्रिया सुरू झालेली दिसून येते.

**संदर्भ –**


1) प्रा. वि. शि. शेणवाई, “भारतीय नियोजन”, व्हीनस प्रकाशन पुणे.
2) प्रा. श्रीनिवास धुत, “ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सहकार”, पिंपळापुरे अँड कं पब्लिशर्स, नागपुर.
3) प्रा. निर्मल भालेराव, “ग्रामिण अर्थशास्त्र”, निराली प्रकाशन.
4) दत्त एव सुन्दरम, “भारतीय अर्थव्यवस्था”, आवृत्ती – 52, एस. चंद. प्रकाशन, मुंबई, २०२२
5) www.emaaymarathi.blogspot.com

# शाश्वत विकास सशक्त भारतासाठीची गरज !!

**प्रा. डॉ. सुदाम गेमू राठोड**
(सहाय्यक प्राध्यापक)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज कार्य महाविद्यालय मोराणे, धुळे

**प्रस्तावना**

**विना सहभाग नही उद्धार !!**

आज शाश्वत विकासासाठी संपूर्ण जग चर्चा करू पाहत आहे. शाश्वत विकासाची गरज आजच्या काळात अधिक अधोरेखित होत आहे. शाश्वत विकासाशिवाय तरुणोपाय नाही. शाश्वत विकासच सशक्त भारतासाठीची गरज आहे. वास्तविक पाहता या सर्व शाश्वत विकासाच्या महा कुंभामध्ये लोकसहभाग, सहकार्य, सर्वकष धोरण, प्रभावी कायदे व त्याची अंमलबजावणी, दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम, प्रभावी गरीबी हटाव कार्यक्रम, सार्वत्रिक शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार, सार्वत्रिक आरोग्य सेवा, सर्वांना स्वच्छ व मुबलक पाणीपुरवठा,लोकप्रतिनिधींच्या तीव्र इच्छाशक्तीची गरज आणि जाणीव याची नितांत आवश्यकता आहे. कारण शाश्वत विकासच उद्याच्या जगाला तारू शकतो हे कोणीही नाकारू शकत नाही.आज विकासाच्या संकल्पना अधिक स्पष्ट झाल्या पाहिजे. औद्योगिक विकास ,ग्रामीण विकास, शहरी विकास, आदिवासी विकास, रस्ते बांधणी, दळणवळणाच्या सोयी, शेती विकास, कुटीर उद्योगाचा विकास, शैक्षणिक क्षेत्रातील क्रांती, वैज्ञानिक क्षेत्रातील क्रांती, महिलांचा सक्रिय सहभाग, वंचित घटकांचा संपूर्ण विकास, जलसिंचनाच्या सोयीसुविधा, वैद्यकीय क्षेत्रातील क्रांती, आरोग्याच्या सेवा सुविधा या सर्व बाबी शाश्वत विकासाच्या मुलाधार आहेत हे नाकारता येणार नाही.

**दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम :**

भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची संख्या सुमारे 40% पेक्षा अधिक आहे आणि देशातील विषम समाज व्यवस्थेमध्ये आर्थिक सत्ता ठराविक लोकांच्याच हातात आहे हे प्रकर्षाने जाणवते. ठराविक उद्योजकांचेसह उत्पन्न एकत्र करून भारतातील सर्वसामान्यांचे दरडोई उत्पन्न काढणे हे योग्य नाही. ज्यामुळे समताधिष्ठित समाज रचना निर्माण करण्याची गरज महासत्ताक होऊ पाहणाऱ्या भारताला आवश्यक आहे.

गरिबी आणि दारिद्र्य हे समाजाला लागलेले शाप आहे आणि म्हणूनच सर्वंकष दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम व्यापक प्रमाणात राबवणे अत्यंत आवश्यक आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेची दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमांमध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे. सदरील यंत्रणेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची मानवतेची भूमिका अत्यंत आवश्यक आहे. योजना व कार्यक्रम गरिबी निर्मूलनासाठीच आहेत पण त्याची प्रभावी अंमलबजावणी तसेच, राबविलेल्या कार्यक्रमाचे सामाजिक लेखापरीक्षण वेळोवेळी होणे अत्यावश्यक आहे. सदरील यंत्रणेत काम करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांना तारप (Asset Verification) तपासणी सक्तीचे आहे परंतु या तपासणीमध्ये लाभार्थ्यांना संकट काळात वेळोवेळी सल्ला आणि मार्गदर्शन करण्याची पुरेशी यंत्रणा अद्याप नाही. आत्तापर्यंत राबविलेल्या योजना व प्रशिक्षण कार्यक्रमाचे वेळोवेळी संशोधन व मूल्यमापन बाह्य सामाजिक संस्थेमार्फत होणे गरजेचे आहे. पहिल्या पंचवार्षिक

योजनेपासून भारतातील दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमाबाबत प्रयत्न केले जात असूनही अपेक्षित दारिद्र्य निर्मूलन होत नाही ही शोकांतिका आहे. सदरील यंत्रणेमार्फत भौतिक आणि आर्थिक अपेक्षित प्रमाणात साध्य होत नाहीत. कारण आज दारिद्र्य रेषेतील यादीमध्ये धन दांडग्यांची नावे ही आढळून येतात हे यंत्रणेचे अपयश आहे.

**शोधनिबंधाची उद्देश:**

१. शाश्वत विकासाचा राजमार्ग अभ्यासणे.

२. शाश्वत विकास आणि दारिद्र्य सहसंबंध अभ्यासणे.

**संशोधन पद्धती:**

सदरील शोध निबंध लिहिताना विविध पुस्तकांचा संदर्भ साहित्य चा, वर्तमानपत्र, मासिके, वेबसाईट वरील लिखित साहित्य, इत्यादींचा वापर करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**शाश्वत विकासाची ध्येय :**

वास्तविक पाहता २०१५ च्या ऑगस्टमध्ये भारतासह १९३ देशांनी एकूण १७ मुख्य ध्येय यांना मान्यता दिली त्यात-

१. **दारिद्र्य निर्मूलन** : सर्वत्र सर्व स्वरूपातील दारिद्र्य गरिबी नष्ट करणे

२. **भूक निर्मूलन**: भूक नष्ट करणे, अन्नाची सुरक्षितता व सुधारित पौष्टिकता साध्य करणे आणि शास्वत शेतांची जाहिरात करणे.

३. **चांगले आरोग्य**: निरोगी आयुष्याची खात्री करून घेणे आणि सर्व वयोगटामधील लोकांना स्वास्थ्य राखण्यास मदत करणे.

४. **दर्जेदार शिक्षण** : सर्वांसाठी सर्व समावेशित व योग्य शिक्षणाची खात्री करून घेणे आणि सर्वांना आयुष्यभर शिक्षणाच्या सुसंधी मिळवून देण्यासाठी मदत करणे.

५. **लैंगिक समानता** : लैंगिक समानता साध्य करणे आणि सर्व महिला व मुलींना अधिकार देणे. ६. शुद्ध पाणी व आरोग्यदायक स्वच्छता : सर्वांसाठी शुद्ध व मुबलक पाणी आणि आरोग्यदायक स्वच्छता उपलब्ध असल्याची खात्री करून घेणे आणि त्याची व्यवस्था बघणे.

७. **नूतनीकरण करण्याजोगी आणि स्वस्त ऊर्जा** : सर्वांना स्वस्त, विश्वसनीय, शाश्वत आणि आधुनिक ऊर्जा उपलब्ध असल्याची खात्री करून घेणे.

८. **चांगल्या नोकऱ्या आणि अर्थशास्त्र** : सर्वांसाठी कायम चालू ठेवलेली (Sustained) सर्वसमावेशक व शाश्वत आर्थिक वाढ पूर्ण आणि फलदायक कामधंदा, नोकरी आणि योग्य काम मिळवून देण्यास मदत करणे.

९. **नवीन उपक्रम आणि पायाभूत सुविधा**: विविध शब्दरचना आवश्यक, लवचिक पायाभूत सुविधा उभारणे, सर्वसमावेशक व शाश्वत उद्योगीकरण आणि भरभराटीस साह्य करणाऱ्या नवीन उपक्रमांना मदत करणे.

१०. **असमानता कमी करणे** : सर्व देशांमधील व देशाची आपापसातील असमानता कमी करणे.

११. **शाश्वत शहरे व वसाहती** :शहरे व मानवी समाजांना सर्वसमावेशक सुरक्षित संवेदनक्षम आणि शाश्वत बनविणे.

१२. **उपलब्ध साधनांचा जबाबदारी पूर्वक वापर** :साधनांचा उपभोग आणि उत्पादन नमुना याची खात्री करून घेणे.

१३. **हवामानाचा परिणाम** : हवामानातील बदल आणि त्याचे परिणाम निराकरण करण्यासाठी त्वरित उपाययोजना करणे.

१४. **शाश्वत महासागर** :शाश्वत विकासासाठी महासागर समुद्र आणि सागरी साधने जतन करणे व वापर करणे.

१५. **जमिनीचा शाश्वत उपयोग** :विविध शब्दरचना आवश्यक जमिनीवरील पर्यावरण संस्थेचे रक्षण करणे व पुन्हा स्थापना करणे आणि शाश्वत वापर करण्यास मदत करणे.

१६. **शांतता आणि न्याय** : शाश्वत विकासासाठी शांतता प्रिया आणि सर्वसमावेशक समाजांना प्रोत्साहन देणे, सर्वांना न्याय मिळवून देणे.

१७. **शाश्वत विकासासाठी भागीदारी** : शाश्वत विकासाची पूर्तता करण्याच्या पद्धती सामर्थ्यवान करणे आणि जगातील भागीदारी मध्ये नवचैतन्य निर्माण करणे.

**संदर्भ** :

१. दारिद्र्य नामा डॉ. अशोक पवार

२. वेबसाईट

३. वर्तमानपत्र ,मासिके, इत्यादी

# स्वातंत्र्योत्तर भारतीय विकासाच्या अंतर्विरोधाची ७५ वर्षे

**प्रा. डॉ. सुर्यकांत लक्ष्मणराव शेळके**
राज्यशास्त्र विभाग
स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालय, डोंबिवली (पूर्व)

**प्रस्तावना :**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला आणि २६ जानेवारी १९५० पासून संवैधानिक लोकशाही व्यवस्थेच्या राज्यकारभाराला आज जवळपास ७५ वर्ष लोटली. तत्कालीन परिस्थिती पाहता भारताची अवस्था अतिशय दयनीय होती. रस्ते, वीज, पाणी, दारिद्र्य, गरिबी, बेकारी, अनारोग्य, अज्ञान, अंधश्रद्धा, तंत्रज्ञानाचा अभाव, शिक्षणाचा अभाव इ. समस्या अशी एकूणच भयंकर परिस्थिती होती. नव्या भारताची उभारणी करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटल्याप्रमाणे आता ब्रिटिशाना दोष देता येणार नव्हते. त्याग, बलिदान आणि समर्पण यातून प्राप्त केलेल्या स्वातंत्र्याचे चीज करण्याची जबाबदारी संविधानकर्त्यानी राज्यावर सोपवली. गेल्या ७५ वर्षात केंद्रात आणि राज्यात अनेक राजकीय पक्षाची (कॉंग्रेस, डावे, बीजेपी इ.) सरकारे आली. दरम्यानच्या काळात सरकारांनी वेगवेगळे निर्णय व धोरण प्रक्रिया व पंचवार्षिक योजनाच्या माध्यमातून शेती, उद्योग, सेवाक्षेत्र, संशोधन, विज्ञान-तंत्रज्ञान, सामाजिक न्याय अशा काही क्षेत्रात महत्वपूर्ण कामगिरी केली. तथापि, भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ वर्षाचे सिंहावलोकन केल्यास सर्वच आलबेल आहे; असे मात्र म्हणता येणार नाही. कारण सत्तेवर आलेल्या सरकारांनी प्रगती आणि विकासाचे कितीही ढोल पिटले तरी ७५ वर्षापूर्वी ज्या समस्या सोडविण्यासाठी राजकीय पक्ष आपला अजेंडा घेवून जनतेच्या समोर जात होते; तोच अजेंडा आणि त्याच समस्या सोडविण्याची आश्वासने आजही राजकीय पक्ष देतात किंवा परस्परावर चिखलफेक करतात. याचा अर्थ संविधाननिर्मात्यांच्या / राष्ट्रनिर्मात्यांच्या स्वप्नातील विषमताविहीन व शोषणमुक्त भारत निर्माण करण्यात आपली सरकारे यशस्वी झाली; असे म्हणता येणार नाही. भगतसिंगाच्या संकल्पनेतील 'मी कुणाचा मालक असणार नाही आणि मी कुणाचा गुलाम असणार नाही' असा समाजवाद किंवा नेहरू गांधीच्या संकल्पनेतील दारिद्र्य, गरिबी, बेकारी, अनारोग्य, अज्ञान, अंधश्रध्दा मुक्त भारत किंवा २५ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत जे शेवटचे भाषण केले त्यात म्हटल्याप्रमाणे 'या देशात राजकीय लोकशाहीबरोबरच सामाजिक व आर्थिक लोकशाही निर्माण करणे आवश्यक आहे त्याशिवाय संवैधानिक लोकशाही टिकणार नाही.' अर्थातच सर्वांना सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय देऊन सामाजिक न्यायावर आधारित समताधिष्ठित समाज व कल्याणकारी राज्याची निर्मिती करण्यात आपण गत ७५ वर्षात काय प्रयत्न केले; असा जर प्रश्न या देशातील शासनकर्त्या वर्गाला विचारले तर त्याचे उत्तर नकारार्थीच असेल. अर्थातच स्वातंत्र्योतर भारताची ७५ वर्षाची वाटचाल ही अंतर्विरोधाने ग्रासलेली आहे; याचाच आढावा या शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

**सकारात्मक बदल :** गत स्वातंत्र्योतर ७५ वर्षाची भारताच्या प्रगती व विकासाची वाटचाल बघितली तर निश्चितच काही क्षेत्रात सकारात्मक बदल दिसून येतात. ज्यामध्ये खालील क्षेत्राचा समावेश करता येईल.

- विज्ञान-तंत्रज्ञान आणि संशोधन
- उत्पादन आणि सेवाक्षेत्र
- सर्वच क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या वापरात वाढ
- शेती आणि शेतीसंबंधी प्रक्रिया उद्योग
- दळणवळण
- पुरवठा साखळीमध्ये सुधारणा
- लायसन्स राजपासून मुक्ती

- आरोग्य आणि शिक्षण इ.

क्षेत्रामध्ये सरकारने केलेली कामगिरी निश्चितच दखलपात्र आहे; हे कोणालाही नाकारता येणार नाही. मात्र ही प्रगती आणि विंकास प्रक्रिया सर्वस्पर्शी व सर्वसमावेशक नसून त्यात सामाजिक न्याय व लोककल्याणाला कोणतीही जागा नाही. मुठ्भरांच्या हिताला प्राधान्य देऊन १९९० च्या नंतरचे जे नवीन आर्थिक धोरण अवतरलेत्याच्या परिणामी ही विकासाची बेटे तयार झाली. हा विकास नेहमीच मुठ्भरांच्या पथ्यावर पडणारा राहिला. सरकार आणि भांडवलदार यांच्या संगनमतातून (crowny capitalism) ही जी वाटचाल सुरु आहे ती जनतेच्या भल्यची कमी आणि भांडवलवादी प्रक्रियेत जे सत्तास्थानी आणि सत्तेच्या परिघात आहेत; अशा लोकांच्या भल्याची ही व्यवस्था आहे. आणि म्हणून जनतेच्या नावाने चालणारी पण मुठ्भरांच्या हितासाठी राबणारी अशी ही भांडवलवादी लोकशाही आहे; समाजवादी लोकशाहीला मूठमाती देऊन झालेला विकास हा घटनात्मक मूल्यांना बगल देणारा आहे. यासाठी खालील तपशील आणि विवेचन पहिले तर अधिक स्पष्ट होईल.

**अंतर्विरोध दर्शविणारी प्रगती व विकास:**

**दारिद्र्यात झालेली घट**

1994 ते 2011 या कालावधीत भारताने दारिद्र्याचं प्रमाण अधिक वेगाने कमी करण्यात यश मिळवलं. या कालावधीत दारिद्र्यरेषेखाल लोकसंख्येचे प्रमाण 45 टक्क्यांवरून 21.9 टक्के इतके झाले. अर्थात या कालावधीत एकूण 13 कोटी लोकसंख्या दारिद्र्यरेषेच्या वर आली. 2011 नंतरची आकडेवारी अजून अधिकृतपणे प्रकाशित होणे बाकी आहे. तथापी, जागतिक बँकेच्या आकडेवारीनुसार संपूर्ण गरीबीचे (अन्न, वस्त्र, निवाऱ्याच्या मूलभूत गरजा पूर्ण न करता येणे) प्रमाण 2019 मध्ये 10.2 टक्क्यांपर्यंत खाली आले आहे. शहरी भारताच्या तुलनेने ग्रामीण भारत या संदर्भात पुढे आहे. 2019 नंतरची आकडेवारी अजून प्रकाशित व्हायची आहे. संपूर्ण गरिबीत असलेली लोकसंख्या इतकी खाली येण्यासाठी तब्बल 75 वर्षांचा कालावधी लागला. विशेषतः दरडोई उत्पन्न वाढीचा विचार करता ही आकडेवारी फसवी आणि भ्रमित करणारी आहे. ही आकडेवारी सत्य असेल तर मग मोडी सरकार ८० करोड गरीब लोकांना फुकट धान्य का पुरवत आहे? या प्रश्नातच त्याचे उत्तर आहे.

**विषमतेमधील वाढ**

त्याच वेळी, या सुधारणांची अंमलबजावणी झाल्याच्या तीन दशकांमध्ये असमानतेमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. अब्जाधीशांच्या संपत्तीने आकाशाला गवसणी घातली आहे. समाजातील कनिष्ठ स्तरातील वर्गाचे राष्ट्रीय संपत्तीमधील योगदान कमी होत चालले आहे. नव्वदच्या दशकात फोर्ब्सच्या यादीत भारतातील एकही नाव नव्हते. 2000 पर्यंत 9 जणांची यादीत वर्णी लागली होती तर 2017 मध्येच हाच आकडा 117 पर्यंत पोहोचला. 2022 मध्ये ही संख्या 166 होती. अब्जाधीश सर्वात जास्त असलेल्या देशांच्या यादीत रशियानंतर भारताचा क्रमांक लागतो. 2017 च्या ऑक्सफॉम रिपोर्टनुसार 77% राष्ट्रीय संपत्ती 10% लोकांकडे एकवटली आहे. सर्वात श्रीमंत 1% नागरिकांकडे 58% राष्ट्रीय संपत्ती आहे.

**भारतातील अब्जाधीशांची संख्या**

| वर्ष | संख्या |
|---|---|
| २००० | ०९ |
| २००५ | २७ |
| २०१० | ६९ |
| २०१५ | ९० |
| २०१७ | ११९ |
| २०२१ | १४२ |

| | |
|---|---|
| **२०२२** | **१६६** |

**(स्रोत: फोर्ब्स)**

उत्पन्नाची आकडेवारी पाहता, 1990 मध्ये सर्वात श्रीमंत 10% लोकांकडे राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा 34.4 % होता. तर सर्वात गरीब 50% लोकांकडे राष्ट्रीय उत्पन्नाचा वाटा 20.3% होता. 2018 पर्यंत हेच प्रमाण अनुक्रमे 57.1% आणि 13.1% होते. त्यानंतर, कोव्हिडची परिस्थिती उद्‌भवली असताना ऑक्सफॅम रिपोर्टनुसार सर्वात श्रीमंतांचे उत्पन्न कैक पटींनी वाढले.

**भांडवलदाराच्या खिशात 20 महिन्यांत 23 लाख कोटीची भर**

2017 पर्यंत 10% श्रीमंतांकडे असलेल्या राष्ट्रीय संपत्तीचा 77% वाटा होता. सर्वात श्रीमंत असलेल्या 1% लोकांकडे राष्ट्रीय संपत्तीचा 58% वाटा होता. आघाडीच्या 100 अब्जाधीशांकडे 2021 मध्ये 57.3 लाख कोटी होते. कोव्हिड महासाथीदरम्यान (मार्च 2020 ते नोव्हेंबर 2021) भारतातील अब्जाधीशांच्या संपत्तीमध्ये 23.14 लाख कोटींची भर पडली. (स्रोत : ऑक्सफॅम)

यावरून ७५ वर्षाचा हिशोब मांडला तर भारतातील एकाचवेळी गरीबी कमी करत असताना विषमतेत वाढ होणे; या दोन विरुद्‌ध वस्तुस्थिती कमालीचा अंतर्विरोध दर्शविणारी आहे.

**पगारातील प्रचंड तफावत**

भारत हा एक असा देश आहे, जिथे असंघटित क्षेत्रातील मनुष्यबळ खूप जास्त आहे. त्यामानाने संघटित क्षेत्रातील कमी आहे. मात्र पगारातील तफावत अभूतपूर्व आहे. 'अपुरे वेतन, वेतनातील तफावत, कामाच्या ठिकाणी असलेली परिस्थिती, सर्वसमावेशक प्रगती नसणे इ. समस्यांसारखे मुद्‌दे हे भारतापुढील मोठे आव्हान आहे, असे ILO च्या एका अहवालात म्हटले आहे. ILO प्रमाणेच अझिम प्रेमजी फाउंडेशननेही केलेल्या आपल्या संशोधन अहवालातही हे मुद्‌दे मांडले आहेत. काही अस्थापनांमध्ये सीईओ म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना कोट्यवधींचे वेतन मिळते; तर त्यांच्या कर्मचाऱ्यांना रु. 10,000 ते 15,000/- इतके मासिक वेतन मिळते. काही खासगी कंपन्यांमध्ये वेतनातील तफावत 1000% हून अधिक आहे. मोठ्या देशांचा विचार करता भारत वेतन तफावतीच्या बाबतीत सर्वात वरच्या काही देशांमध्ये आहे. यामुळे गरीब – श्रीमंतीतील दरी अधिकच वाढलेली दिसते.

भांडवलवादी अर्थकारणाचा इतिहास पाहिला तर दिसून येते की, भांडवशाही जसजशी प्रगत होत जाते, तसतसा अर्थसंकोच (संपत्ती एकवटणे) सखोल होत जातो. तंत्रज्ञानाचा वापर आणि कुशल व अकुशल मनुष्यबळातील तफावतही वाढत जाते. कुशल कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या ज्यादा मोबदल्यामुळे वेतन तफावत वाढत जाते. वर नमूद केलेले विचारात घेतले तरी विकसित व विकसनशील देशांच्या तुलनेने भारतातील वेतन तफावत ही खूपच जास्त आहे.

**गिनी – कोएफिशिएन्ट**

त्याचप्रमाणे, आपण संपत्ती वितरणासाठी निकष समजला जाणारा गिनि को-एफिशिअंट लक्षात घेतला तर 2011 मध्ये तो 35.7 होता. 2018 मध्ये तो वाढून 47.9 इतका झाला आहे. मोठ्या बाजारपेठांचा विचार करता तीव्र असमानतेच्या बाबतीत भारत संपूर्ण जगात पहिल्या काही देशांमध्ये आहे.

| वर्ष | गिनी – कोएफिशिएन्ट |
|---|---|
| १९८३ | ३२.१ |
| १९९३ | ३१.७ |
| २००४ | ३४.4 |
| २०११ | ३५.७ |
| २०१४ | ३४.4 |
| २०१८ | ४७.९ |

**(स्रोत: वर्ल्ड इनइक्वॉलिटी डेटाबेस)**

**उत्पन्नातील विषमता**

प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ थॉमस पिकेटी यांनी भारतातील वाढत्या असमानतेची चर्चा केली आहे. जेव्हा सर्वांत श्रीमंत 1% आणि सर्वांत गरीब 50% लोकांची चर्चा होते. तेव्हा 2015 मध्ये भारतात रशिया व अमेरिकेहून अधिक असमानता दिसून आली. यातून, भारतातील संपत्तीचे ध्रुवीकरण दिसून येते. दारिद्र्याप्रमाणेच विषमता हीसुद्धा एक समाजविघातक गोष्ट आहे.

भारतातील संपत्तीसोबत असमानाताही वाढली, असे आकडेवारीतून दिसून येते आणि या संपत्ती व असमानता यांच्यातील निश्चित संबंधही दिसून येतो. भारतातील अनेक विश्लेषक त्यांच्या सोयीनुसार आकडेवारीची निवड करतात, आपला मुद्दा अधोरेखित करतात आणि इतर समस्यांकडे डोळेझाक करतात. काही जण तर हे मुद्देच समोर येणार नाहीत, याची खातरजमा करतात.

**जीडीपी चे मायाजाल**

सकल राष्ट्रीय उत्पादन' अर्थात 'जीडीपी'चा विचार करता भारतीय अर्थव्यवस्था ही जगात पाचवी मोठी अर्थव्यवस्था बनलेली आहे. याचा आनंद आणि अभिमान साजरा करताना सरकार थकत नाही. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीही आपल्या वाढत्या आर्थिक दराची प्रशंसा करत आहे. आपला जलद गतीने विकास होत आहे, ही चांगलीच गोष्ट आहे. परंतु या विकासाची फळे सामान्य जनतेला चाखायला मिळत आहेत काय, हे पाहण्याचीही तेवढीच गरज आहे. खरे तर देशाचा विकास म्हणजे देशातील सर्व नागरिकांचा विकास. कारण देश म्हणजेच मुख्यत्वे करून देशातील सर्व नागरिकच होत. त्यासाठी देशाचा खरोखरच विकास होत आहे की नाही, हे पाहण्यासाठी अर्थव्यवस्थेचा एकूण आकार बघण्यापेक्षा दरडोई वार्षिक उत्पन्नाचे प्रमाण काय आहे, हे पाहणे अधिक उपयुक्त ठरेल.

केंद्र सरकारच्या सांख्यिकी विभागाने २८ फेब्रुवारी २०२३ रोजी जारी केलेल्या 'प्रेस नोट'मधील आकड्यांच्या आधारावर पुढील विवेचन केलेले आहे. त्यामध्ये आपले २०२१-२२ या वर्षात रु. २०३.२७ लाख कोटी एवढे उत्पन्न अनुमानित केल्याचे दिसून येते. (GDP - रु. २३४.७१ लाख कोटी) परंतु आपले दरडोई वार्षिक उत्पन्न होते फक्त रु. १४८५२४/-. (GDP Per Capita- रु.१७१४९८/-) सकल राष्ट्रीय उत्पादनात जरी आपला जगात पाचवा क्रमांक असला, तरी दरडोई उत्पन्नात मात्र आपण १९० देशांत १४०वा क्रमांक पटकावला आहे. (विकिपीडिया)

यावरून दरडोई राष्ट्रीय उत्पन्नात जगातील १३९ देश आपल्या पुढे आहेत, हे स्पष्ट होते. लाजीरवाणी बाब म्हणजे श्रीलंका आणि बांग्लादेशही आपल्या पुढे आहेत. पाकिस्तानचे उत्पन्न मात्र आपल्यापेक्षा कमी आहे. तथाकथित अतिराष्ट्रवाद्यांच्या समाधानासाठी ही एक गोष्ट बरी म्हणावी लागेल.

यावरून एक गोष्ट लक्षात येते की, आपली अर्थव्यवस्था कितीही मोठी असली तरी सामान्य माणसाचे आयुष्य मात्र दारिद्र्यातच व्यतीत होत आहे. जीडीपीच्या वाढत्या दराचा आम्ही उदो उदो करत आहोत, परंतु दरडोई सकल राष्ट्रीय उत्पादनातही (GDP Per Capita) आपण १८७ देशांच्या यादीत १४५व्या स्थानावर विराजमान आहोत, हेही लक्षात घेण्याची जरुरी आहे.

**जीडीपी वाढ आणि गरिबांचे उत्पन्न**

सकल राष्ट्रीय उत्पादन हे संपूर्ण देशातील सर्व लोकांचे एकत्रितपणे मोजले जाते. या पद्धतीने येणाऱ्या उत्पादन किंवा उत्पन्नाला एकूण लोकसंख्येच्या आकड्याने भागले की, दरडोई उत्पादन किंवा उत्पन्न मिळते. यामध्ये अतिश्रीमंत आणि अतिगरीब यांचेही उत्पादन/उत्पन्न एकत्रितच मोजले जाते. या आकड्यांवरून देशातील सर्व लोकांचे सरासरी उत्पादन/उत्पन्न समजत असले, तरी देशातील गरिबांचे वास्तविक दरडोई उत्पन्न नेमके किती, हे समजू शकत नाही. म्हणून गरिबांचे दरडोई उत्पन्न शोधण्यासाठी 'World Inequality Report २०२२'चा आधार घेतला आहे.

या अहवालावरून लोकसंख्येच्या सर्वांत वरील १ टक्के लोकांचा राष्ट्रीय उत्पन्नात २१.७ टक्के एवढा मोठा वाटा आहे. आणि वरच्या १० टक्के लोकांचा वाटा ५७.१ टक्के एवढा आहे. त्याच वेळी तळातील ५० टक्के लोकांचा वाटा फक्त १३.१ टक्के आहे. या टक्केवारीच्या आधारावर वर उल्लेखित प्रेस नोटमध्ये दिलेल्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचे भाग केले, तर आपल्या हाती पुढील आकडे येतात-

वरच्या १० टक्के लोकांचे एकूण उत्पन्न रु. ११५.८६ लाख कोटी एवढे येते (एकूण रु. २०३.२७ लाख कोटी पैकी). जर भारताची सध्याची एकूण लोकसंख्या १३६.९० कोटी एवढी असल्याचे गृहीत धरले, तर या वरच्या १० टक्के लोकांचे दरडोई वार्षिक उत्पन्न रु. ८४७८४५ एवढे येते. त्यातही सर्वोच्च १ टक्के लोकांचे म्हणजे एकूण १.३७ कोटी लोकांचे दरडोई वार्षिक उत्पन्न रु. ३२,२२,०३३ एवढे येते.

याच आधारावर तळातील ५० टक्के लोकांचे उत्पन्न पाहूयात. त्यांच्या वाट्याला एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी फक्त रु.२६.४२५ लाख कोटी एवढे उत्पन्न येते. त्यावरून एकूण लोकसंख्येपैकी या ६८.४५ कोटी गरीब लोकांचे दरडोई वार्षिक उत्पन्न फक्त रु.३८९०२ एवढेच येते. भारतीय लोकांचे २०२१-२२मधील सरासरी दरडोई उत्पन्न रु. १४८५२४ एवढे येत असले, तरी तळातील लोकांचे दरडोई उत्पन्न जेमतेम रु. ३८,९०२ एवढेच येते, हे यावरून स्पष्ट होते.

जीडीपी वाढीमुळे सर्वसामान्य जनतेला आपल्या देशाचा आर्थिक विकास होत असल्याचे समाधान मिळते. या आर्थिक विकासामुळे वाढलेल्या उत्पन्नाचा फार थोडा भाग गरिबांपर्यंत झिरपतो. पण वरच्या वर्गांच्या उत्पन्नाच्या तुलनेत हा झिरपा अत्यंत नगण्य असतो. त्यामुळे आर्थिक विषमता कमालीची वाढते. या विषमतेमुळे शोषितांच्या वाट्याला आलेल्या अत्यल्प उत्पन्नात त्यांच्या जीवनावश्यक गरजाही नीटपणे पूर्ण होत नाहीत. त्यामुळे या गरिबांमध्ये प्रारंभी असमाधान आणि त्यानंतर मध्यमवर्गाविरुद्ध संताप वाढत जाऊ शकतो. परंतु आर्थिकदृष्ट्या संपन्न वाटत असलेला मध्यमवर्ग तरी खऱ्या अर्थाने सुखी झालेला आहे काय, हेही पाहणे आवश्यक आहे. कारण त्यांचे खरे सुख कशात सामावलेले आहे, याचे भानही त्यांना आता राहिलेले नाही.

यावरून या तथाकथित वाढत्या जीडीपीचा फायदा तळातील लोकांपर्यंत कितीसा पोचत आहे, याचा देशातील संवेदनशील नागरिकांनी तरी विचार केला पाहिजे. राष्ट्रीय उत्पादनात गरीब लोकांचे योगदान फक्त अकुशल श्रमाचा पुरवठा करण्यापुरतेच मर्यादित होऊन राहिले आहे. त्याच्या मोबदल्याच्या रूपाने त्यांच्या पदरात विशेष काही पडत नाही, हेच दिसून येते.

भारताच्या आर्थिक वाढीच्या आकडेवारीचा इतिहास बघितल्यास असे लक्षात लक्षात येते की, आपला तथाकथित आर्थिक विकास जसजसा वाढत आहे, तसतसा गरीब लोकांचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा कमी होत आहे. १९६१ साली तळातील ५० टक्के गरीब लोकांचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा हा २१.२ टक्के एवढा होता. तो वाढत वाढत १९८१ला २३.५ टक्के एवढा झाला. पण तेव्हापासून मात्र तो कमी कमी होत जाऊन २०१९ला १४.७ तर टक्के एवढा कमी झाला. २०२१-२२ या वर्षी तो हिस्सा १३.१ टक्क्यांपर्यंत घसरलेला आहे. (स्त्रोत - 'Wealth Inequality Database 2022')

**जीडीपी आणि गरीब जनता**

वरील विवेचनावरून जीडीपी वाढीसाठी गरिबांच्या सहभागाची फारशी जरुरी नसते, हे लक्षात यायला हरकत नाही. सुरुवातीला पाहिल्याप्रमाणे तळातील ५० टक्के एवढ्या प्रचंड लोकसंख्येचे दरडोई उत्पन्न हे देशाच्या सरासरी वार्षिक उत्पन्नापेक्षा खूपच कमी म्हणजे रु. ४० हजारांपेक्षाही कमी असण्याची शक्यता आहे. आणि एवढे कमी उत्पन्न गरिबांना जगायलाही पुरेसे ठरू शकत नाही, हे स्वाभाविक आहे.

अशा अभावग्रस्त परिस्थितीत या गरीब लोकांनी जीडीपी वाढवण्यासाठी उद्योजकांच्या वस्तू खरेदी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मग या उदारमतवादी अर्थव्यवस्थेचे पुरस्कर्ते आपल्या उद्दाम वाढीसाठी 'Trickle-down Theory'चा आधार घेतात. त्यांच्या मते श्रीमंतांना दिलेले फायदे त्यांच्याकडून होणाऱ्या आर्थिक वाढीमुळे तळातील लोकांपर्यंत पोचणे शक्य होणार असते. 'Trickle-down Theory'वर पूर्वीच शंका उपस्थित केल्या गेल्या होत्या. म्हणून

अशा धोरणांवर मोठ्या प्रमाणात टीकाही झाली होती. परंतु जगातील अनेक देशांच्या नेत्यांवरील या धोरणांचा प्रभाव अद्यापि शिल्लक असल्याचे जाणवते.

**शिक्षण आणि आरोग्या**

दर्जेदार शिक्षण आणि चांगले आरोग्य या विकासाच्या पुर्वावश्यकता असतात. पुरेसे पाणी, वीज, रस्ते आदींच्या सोयी शासनाकडून होणे अपेक्षित असते. आज ग्रामीण भागात शिक्षणाची अत्यंत दुरावस्था आहे. आहे ते शिक्षण घेणेही पैशाच्या अभावामुळे परवडत नाही. १९८६ साली कोठारी आयोगाने शिक्षणावर सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या ६ टक्क्यांपर्यंत खर्च करण्याची शिफारस केली होती. परंतु आपण मात्र शिक्षणावर सरासरी ३ टक्के एवढा तुटपुंजा खर्च करतो.

वित्तीय वर्ष २०२३मध्ये हा खर्च २.९ टक्के एवढा होता. आपल्या शेजारचा भूतान आणि नेपाल यांचा खर्च अनुक्रमे ८.१ टक्के आणि ५.२ टक्के एवढा आहे. १९८ देशांच्या यादीत आपल्यापेक्षा जास्त खर्च करणारे १५४ देश आहेत. यावरून आपण शिक्षणाकडे किती दुर्लक्ष करतो, हे लक्षात येते.

आरोग्याचेही असंख्य प्रश्न आहेत. सार्वजनिक आरोग्यावर शासन अत्यल्प खर्च करते. वित्तीय वर्ष २०२३मध्ये हा खर्च सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या २.१ टक्के इतका अल्प होता. चीनसुद्धा हा खर्च आपल्यापेक्षा अधिक म्हणजे ५ टक्क्याच्या आसपास करतो. १९२ देशांपैकी १७५ देश हा खर्च आपल्यापेक्षा अधिक करतात. सामाजिक कल्याणाच्या योजनांवर इतका कमी खर्च करण्याचे कारण शासनाकडे सामाजिक कल्याणासाठी पैसे उपलब्ध नाहीत, असे दिले जाते. आणि या योजनांसाठी इतर मार्गांनी पैसा उपलब्ध करून शासनाला आपली अर्थसंकल्पीय तूट वाढवायची नाही. कारण उदार अर्थव्यवस्था अशी तूट वाढवण्यास परवानगी देत नाही. त्यांच्या मते अशा तुटीमुळे महागाई वाढते. अशा महागाईने त्यांची उत्पादने जनतेकडून पाहिजे तेवढ्या प्रमाणात खरेदी केली जाऊ शकत नाहीत.

**जीडीपी व शेती**

सरकारच्या कृषीक्षेत्राबाबत असलेल्या उदासीनतेमुळे कृषी क्षेत्राचा एकूण 'जीडीपी'मधील हिस्सा आणि ग्रामीण जनतेचे दरडोई उत्पन्न मागील बऱ्याच वर्षांपासून घटत चालले आहे. १९९०-९१ साली जीडीपीमधील शेतीचा वाटा ३५ टक्के एवढा होता. तो वाटा २०२२-२३ सालापर्यंत १५ टक्क्यांपर्यंत खाली आलेला आहे. जीडीपी वाढ हे ज्याचे मध्यवर्ती उद्दिष्ट आहे, त्या नवीन आर्थिक धोरणाची सर्वंकष अंमलबजावणी १९९१पासूनच सुरू झालेली आहे, हे लक्षणीय आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. यामुळेच ग्रामीण भागातून आरक्षण आंदोलनांचा उदय होत आहे, हे स्पष्ट होण्यासारखे आहे.

**सरकार चर्चा करते पण... कोणासाठी राबते ?**

सरकारसुद्धा चौथ्या पंचवार्षिक योजनेपासून 2020-21 च्या आर्थिक सर्वेक्षणापर्यंत वाढत्या असमानतेबद्दल चर्चा करत आहे. लाभ होणारी खासगी व्यक्ती हा विकासाचा निकष नाही. विकासाचा प्रवास हा समानतेकडे जाणारा असला पाहिजे.", असे 1969-74 या चौथ्या पंचवार्षिक योजनेमध्ये जाहीर करण्यात आले होते. आर्थिक सर्वेक्षण अहवाल 2020-21 ॲरिस्टॉटलच्या वाक्याने सुरू होतो. "गरीबी क्रांती व गुन्ह्यांची जनक आहे." या अहवालात जगप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ थॉमस पिकेटीच्या कामाची चर्चा केली केली आहे. या अहवालाच्या शेवटी निष्कर्ष मांडला आहे की, संपत्ती जसजशी वाढत जाते तसतशी गरीबी कमी होते, या टप्प्यावर वाढणारी संपत्ती असमानतेपेक्षा महत्त्वाची आहे. यातूनच भारत कोणत्या दिशेने वाटचाल करत आहे हे दिसून येते. पहिल्या पंचवार्षिक योजनेत नमूद केले आहे की, सध्या पुरेशी संपत्ती अस्तित्वात नाही. तिचे पुनर्वाटप करणे म्हणजे गरीबीचे पुनर्वाटप करणे असे होईल. म्हणून संपत्ती वाढविण्यावर लक्ष केंद्रीत केले पाहिजे. आज स्वातंत्र्यप्राप्तीच्या 75 वर्षांनंतर भारतातील श्रीमंतांची जगातील 10 अब्जाधीशांमध्ये वर्णी लागली असताना भारत अजूनही त्याच तत्वाची आळवणी करत आहे.

मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांनी 1936 मध्ये मांडलेले औद्योगिक धोरण आणि १९४४ चा ९ सदस्यीय Bombay Plan ते 2020-21 च्या आर्थिक सर्वेक्षणापर्यंत आपण भारताचा औद्योगिक प्रवास पाहिला तर या देशाची सत्ता - संपत्ती

केवळ मूठभर जातदांडग्या आणि धनदांडग्या लोकांच्या हाती एकवटली असून हा मुठ्भारांचा विकास भारतीय संवैधानिक लोकशाही व्यवस्थेला अभिप्रेत नाही. .

**निष्कर्ष :** भारतीय स्वातंत्र्योतर ७५ वर्षाची वाटचाल बघितल्यास खालील निष्कर्ष मिळतात.

१. भारताचा विकास / प्रगती आणि विषमता/ असमानता यात अंतर्विरोध आहे.

२. भारतीय संवैधानिक लोकशाही मूल्यांच्या उदिष्टाना बगल देऊन विकासाची आखणी करण्यात आली.

३. भारतात लोकशाहीच्या नावाने भांडवलशाही व्यवस्था अवतरली असून तिचाच वावर अधिक आहे.

४. विकासाचे राजकारण आणि सामाजिक न्याय व कल्याणकारी राज्य याचा संबंध जोडता आला नाही.

५. एक राज्य/भारत सरकार म्हणून केलेला हा विकास उसणवारीचा विकास असून फसवा विकास आहे.

**संदर्भ :**

१. ऑक्सफॉम रिपोर्ट , २०२२

२. फोर्ब्स रिपोर्ट , २०२२

३. NSS Report, २०२२

४. Wealth Inequality Database 2022'

५ . वर्ल्ड इनइक्वॉलिटी डेटाबेस

६. विकिपीडिया

# भारतीय राज्यघटनेला होत असलेली 75 वर्षे

**श्रीम. सुप्रिया सिताराम दाते**

संशोधक विद्यार्थी, के.जे.सोमैया कॉलेज ऑफ आर्ट, कॉमर्स अँड सायन्स, कोपरगाव

**सारांश :**

भारतीय राज्यघटना म्हणजे भारताची सर्वोच्च कायदेपुस्तिका होय. ही राज्यघटना 26 नोव्हेंबर 1949 रोजी अधिनियमित करून देशाच्या नागरिकांप्रती अर्पण करण्यात आली. आणि 26 जानेवारी 1950 पासून राज्यघटनेची अंमलबजावणी देशभर सुरू झाली. भारतीय राज्यघटनेस 75 वर्षे पूर्ण होत आहेत म्हणूनच राज्यघटना निर्मितीपासून राज्यघटनेच्या आधारावर देशात आजवर झालेल्या अनेक बदलांचे, विकासाचे लोकशाहीच्या बदलत्या स्वरूपाचे सिंहावलोकन करणे आवश्यक ठरते. राज्यघटना निर्मितीची पार्श्वभूमी, राज्यघटनेचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये, राज्यघटनेचा आजवरचा प्रवास आणि भारतीय लोकशाहीची 75 वर्षे यादरम्यान राबवलेल्या विविध योजना यांचा थोडक्यात आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेतलेला आहे तसेच लोकशाही पुढील आव्हानांचाही थोडक्यात लेखाजोखा या शोधनिबंधात घेण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना :**

राज्यघटना -कोणताही देश चालवायचा असल्यास ते राष्ट्र टिकून राहण्यासाठी काही नियम आवश्यक असतात. हे नियम लिहून ठेवलेले असल्यास अशा नियमांच्या संचास लिखित राज्यघटना असे म्हणतात. ॲरिस्टॉटलने आपल्या 'राजनीती' या ग्रंथात नमूद केल्याप्रमाणे संविधानाचे तीन प्रकार असतात.1) राजेशाही 2) अभिजात वर्ग आणि 3) राजनीती

भारतीय राज्यघटना ही लिखित आणि दीर्घ अशी कायद्याची पुस्तिका आहे. विविध देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून त्यातील धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, समता, अखंडता बंधुता या तत्त्वावर भारतीय राज्यघटनेची पायाभरणी झालेली आहे. भारतीय राज्यघटनेने भारताला लोकशाही बहाल केलेली आहे. जगातील लिखित आणि एक प्रदीर्घ अशी राज्यघटना म्हणून भारतीय राज्यघटनेकडे बघितले जाते. भारतीय राज्यघटना 75 वर्ष पूर्ण करत आहे त्यानिमित्ताने भारतीय राज्यघटनेचा तिच्या जन्मापासून आजवर झालेला प्रवास अभ्यासणे क्रमप्राप्त ठरते.

**बीजसंज्ञा :**

राज्यघटना, लोकशाही, संविधान, सार्वभौमत्व, नागरिकत्व, मलभूत संरचना, घटनादुरुस्ती.

**उद्दिष्टे :**

1) राज्यघटना निर्मितीची पार्श्वभूमी अभ्यासणे.

2) भारतीय राज्यघटनेचे स्वरूप व वैशिष्ट्ये अभ्यासणे.

3) भारतीय राज्यघटनेचा आजवरचा प्रवास अभ्यासणे.

4) भारतीय लोकशाहीची 75 वर्षे अभ्यासणे.

**गृहीतके :**

1. भारतीय राज्यघटनेची निर्मिती घटना समितीच्या माध्यमातून लोकशाही मार्गाने झालेली आहे.

2. भारतीय राज्यघटनेचे स्वरूप संघराज्य एकात्म स्वरूपाचे असून ती अंशतः परिदृढ आहे.

3. भारतीय राज्यघटनेने आर्थिक सामाजिक राजकीय क्षेत्रात अमुलाग्र बदल घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

4. भारतीय राज्यघटनेच्या 75 वर्षांत लोकशाहीचे स्वरूप बदलू पाहत आहे.

**विषय विवेचन :**

**भारतीय राज्यघटना निर्मितीची पार्श्वभूमी :**

राज्यघटना निर्मितीचे मूळ ब्रिटिश कालीन कायद्यांमध्ये दिसून येते. या कायद्यांमधून स्वतंत्र राज्यघटनेच्या निर्मितीला पोषक तत्वे मिळतात. 1773 चा रेग्युलेटिंग ॲक्ट, 1833 चा चार्टर ॲक्ट, 1853 चा चार्टर्ड ॲक्ट, 1858 चा गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट, 1861 चा इंडियन कौन्सिल ॲक्ट, 1892 चा इंडियन कौन्सिल ॲक्ट, 1909 चा इंडियन कौन्सिलिट ॲक्ट, 1919 चा गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट, 1935 चा गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट या सर्व कायद्यांनी भारतीय राज्यघटना निर्मितीची पायाभरणी केली. 1935 च्या कायद्यातील बऱ्याचशा तरतुदींचा समावेश भारतीय राज्यघटनेमध्ये घेतलेला आहे. राज्यघटनेच्या निर्मितीस भारतीय स्वातंत्र्य लढ्यातून देखील प्रेरणा मिळाली. घटनाकर्त्यांनी अनेक देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास करून त्यातील सर्वोत्कृष्ट वैशिष्ट्यांसह भारतीय राज्यघटनेची निर्मिती केलेली दिसून येते. उदाहरणार्थ मूलभूत हक्क, न्यायालयीन पुनर्विलोकन, राष्ट्रपतींवरील महाभियोग, उपराष्ट्रपतींचे पद इत्यादी वैशिष्ट्ये अमेरिकन राज्यघटनेतून, मार्गदर्शक तत्वे, राष्ट्रपतींच्या निवडणुकीची पद्धत, राज्यसभेवरील सदस्य नियुक्ती इत्यादी वैशिष्ट्ये आयर्लंडच्या राज्यघटनेतून तर समवर्ती सूची, दोन गृहांची संयुक्त बैठक इत्यादी ऑस्ट्रेलियाच्या राज्यघटनेतून, समता, बंधुता, स्वातंत्र्य फ्रान्सच्या राज्यघटनेतून संसदीय शासन व्यवस्था, एकेरी नागरिकत्व यांसारख्या तरतुदी ब्रिटिश राज्यघटनेतून घेतलेल्या दिसून येतात.

**भारतीय राज्यघटनेचा प्रवास :**

1940 मध्ये ऑगस्ट घोषणे द्वारे ब्रिटिश सरकारने सर्वप्रथम भारताच्या घटना निर्मितीसाठी एखादी समिति अर्थातच घटनासमिती असली पाहिजे हे मान्य केले. त्यानंतर 1942 च्या क्रिप्स मिशनने भारताची राज्यघटना किंवा संविधान निर्मितीची जबाबदारी सर्व भारतीयांचीच असणार यास संमती दर्शवली होती आणि कॅबिनेट मिशनच्या शिफारशीनुसार घटना समितीची निर्मिती करण्याची पद्धत ठरली. त्यानुसार घटना समितीची निर्मिती झाली. या समितीची पहिली सभा 9 डिसेंबर 1946 रोजी संविधान सभागृह (सेंट्रल हॉल), नवी दिल्ली येथे झाली. या सभेत 207 सदस्य हजर होते. 13 डिसेंबर 1946 रोजी पंडित नेहरू यांनी समिती पुढे उद्दिष्टांचा ठराव मांडला. तो घटना समितीने 22 जानेवारी 1947 रोजी स्वीकारला. डिसेंबर 1946 ते नोव्हेंबर 1949 पर्यंत दोन वर्ष 11 महिने आणि 17 दिवस एवढ्या कालावधीत घटना समितीची 11 अधिवेशने झाली. विविध समित्यांच्या सहाय्याने हे कामकाज चालले. यातील मसुदा समितीने महत्त्वाची भूमिकांनी निभावली. या समितीचे अध्यक्ष स्थान डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी भूषविले. लोकशाही पद्धतीने घटनेचा मसुदा बनवण्यात आला. अनेक दुरुस्त्या झाल्या. आणि 26 नोव्हेंबर 1949 रोजी राज्यघटना स्वीकारण्यात आली. संमत राज्यघटनेवर 284 सदस्यांनी स्वाक्षऱ्या केल्या. 26 जानेवारी 1950 पासून भारतीय राज्यघटना देशभर अंमलात आली.

**42 वी घटनादुरुस्ती :**

भारतीय संविधान हे काही अंशी दृढ तर काही अंशी परिवर्तनीय असून कालानुरूप त्यात विविध तरतुदींमध्ये बदल करणे आवश्यक ठरते. भविष्यकालीन परिस्थितीचा विचार करून घटना निर्मिती केलेली असली तरी सर्वच तरतुदी या काळाच्या कसोटीवर खऱ्या उतरत नाहीत. म्हणूनच घटनाकर्त्यांनी कलम 368 नुसार घटनेचे मूलभूत संरचनेला धक्का न लावता घटनादुरुस्तीची प्रक्रिया प्रस्तावित केली. घटना दुरुस्ती तीन पद्धतीने करता येते साधे बहुमत, संसदेचे विशेष बहुमत व राज्यांची संमती, संसदेचे विशेष बहुमत. आतापर्यंत 127 पेक्षा जास्त घटना दुरुस्त्या झालेल्या असून 42 वी घटना दुरुस्ती एक मैलाचा दगड ठरली आहे. आजपर्यंत झालेल्या सर्व संविधान दुरुस्त्यांमध्ये ही संविधान दुरुस्ती अधिक प्रदीर्घ व परिणामकारक ठरली. 42 व्या घटनादुरुस्तीने प्रास्ताविकेत धर्मनिरपेक्षता, समाजवादी, एकात्मता हे शब्द समाविष्ट करण्यात आले. मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करताना घटनेच्या तिसऱ्या भागातील मूलभूत हक्कातील कलम 14, कलम 19 आणि कलम 31 मधील अधिकारांची उल्लंघन होते म्हणून न्यायालयात दाद मागता

येणार नाही अशी तरतूद करण्यात आली तसेच केंद्रीय कायद्यांची वैधता तपासण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालया पुरता मर्यादित ठेवण्यात आला. पुढे 1978 मध्ये 44व्या घटनादुरुस्तीने 42 व्या घटनादुरुस्तीतील बराचसा भाग काढून टाकण्यात आला.

**राज्यघटनेची अर्थातच लोकशाहीची 75 वर्षे :**

राज्यघटनेच्या 75 वर्षांच्या कालावधीत विविध क्षेत्रात अमुलाग्र बदल झालेला आहे. त्यापैकी शिक्षण, आरोग्य, कृषी उद्योग इत्यादी क्षेत्रांचा उल्लेख करणे क्रम प्राप्त आहे. पंचवार्षिक योजनेत शिक्षणावर 151 कोटी खर्च करणे प्रस्तावित होते. 1951 -52 मध्ये शिक्षणावरील खर्च जीडीपीच्या 0.64% होता. 2019 -20 मध्ये तो 3.1% होता. 2022 -23 च्या अर्थसंकल्पावर नुसार शिक्षणावर जीडीपीच्या सुमारे 2.9% खर्च प्रास्तावित होता. 1951 मध्ये भारतात 18.33% साक्षरता होती, 2001 मध्ये साक्षरतेचे प्रमाण 64.84% इतके झाले. 2011 मध्ये साक्षरता 74.04% झाली. गेल्या 75 वर्षात शासनाने साक्षरतेसाठी प्रौढ साक्षरता मोहीम, बेटी बचाओ बेटी पढाओ, सर्व शिक्षा अभियान, खडूफळा मोहीम यासारख्या अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवल्या याचा परिणाम निश्चितच भारताची साक्षरता मोठ्या प्रमाणात वाढविण्यात झाला.

गेल्या 75 वर्षांत अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, जवाहर रोजगार योजना, इंदिरा गांधी आवास योजना, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना, ग्राम सडक योजना, स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना, भारत निर्माण योजना, म. गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, 20 कलमी कार्यक्रम, राष्ट्रीय कौशल्य विकास धोरण, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ, दीनदयाळ अंत्योदय योजना, प्रधानमंत्री कौशल विकास योजना, दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, श्यामाप्रसाद मुखर्जी अभियान यांसारख्या अनेक योजना भारत निर्माण साठी राबवल्या गेल्या. सर्व योजनांचा परिणाम दारिद्र्य आणि बेरोजगारी कमी करण्यासाठी घडून आलेला आहे. आर्थिक समावेशनासाठी किसान क्रेडिट कार्ड्स ,बिझनेस करस्पॉन्डन्ट योजना, प्रधानमंत्री जनधन योजना तसेच सामाजिक सुरक्षेसाठी प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना इत्यादी सारख्या योजना राबवल्यामुळे आर्थिक विकासाचा हातभार लागलेला आहे. भारताने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर ठेवलेले पहिले पाऊल हाही नक्कीच जागतिक स्तरावर भारताच्या शिरपेचात खोवलेला मानाचा तुरा ठरला आहे.

**मूल्यमापन :**

भारतीय राज्यघटनेच्या अनेक पैलूंचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की संसदेला राज्यघटना दुरुस्तीचा अधिकार असला तरी मूलभूत संरचनेत बदल करता येत नाही असे असले तरी गेल्या 75 वर्षांत अनेक विकास योजना राबविल्या गेल्या असून त्यांचा सकारात्मक परिणाम झालेला आहे. असे असले तरी लोकशाहीच्याच आयूधांचा वापर करून मोठा राजकीय फेरबदल होत आहे. विरोधकांची अन प्रसार माध्यमांची मुस्कटदाबी होत असून खाजगीकरणाच्या प्रवाहात भांडवलशाही डोके वर काढून लोकशाही पुढे दंड ठोठावून उभी राहू पाहत आहे .

**संदर्भसूची :**


1) डॉ. व्होरा राजेंद्र, पळशीकर सुहास, 'भारतीय लोकशाही, अर्थ आणि व्यवहार' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे 2008.
2) डॉ. भोळे भास्कर, 'राजकीय सिद्धांत' प्रकाशक पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर -2002.
3) डॉ. खांदवे एकनाथ, डॉ. आवारी विलास, 'भारतीय राज्यघटनेची ओळख' सक्सेस पब्लिकेशन, पुणे.
4) प्राचार्य डॉ. कांबळे बाळ, 'भारतीय लोकशाही समोरील आव्हाने', डायमंड पब्लिकेशन, 2012.
5) डॉ. भोळे भास्कर, 'आधुनिक भारतातील राजकीय विचार' पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर, 2003.

# भारतीय अंदाजपत्रकाचा तुलनात्मक अभ्यास

## (२०२३-२४ व २०२४-२५)

**प्रा. महेश वाळू जाधव**
मराठा विद्या प्रसारक समाजाचे, कर्मवीर आबासाहेब तथा ना. म. सोनवणे, कला, वाणिज्य, आणि विज्ञान महाविद्यालय सटाणा ता.बागलाण.जि.नाशिक

**गोषवारा:**

या संशोधन लेखाचा उद्देश बजेट बाबतचा अभ्यास करणे. भारतीय अर्थसंकल्प २०२३-२४ व २०२४-२५ या दोन अर्थसंकल्पामधील कृषी क्षेत्राला व पायाभूत सुविधा या दोन्ही घटकांवर कशा पद्धतीने खर्चामध्ये बदल केलेला आहे. तसेच कोणत्या क्षेत्राला किती प्रमाणात महत्त्व दिलेलं आहे. याचा अभ्यास या मध्ये करता येईल. तसेच या सर्व घटकामधून देशाचा विकास होण्यास मदत होते.

**प्रास्ताविक:**

प्रत्येक व्यक्तीचा व संस्था यांचा आर्थिक उत्पन्न तसेच त्या प्रमाणात आपण आपला खर्च करतो आहे की नाही याचा अंदाज त्या व्यक्तीला व संस्था यांना अर्थसंकल्पामधून येतो असतो. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला आणि संघटनेला अर्थसंकल्प आखावा लागतो. त्यानुसार आपले खर्चाचे आणि उत्पादनाचे कार्यक्रम योजावे लागतात. पी.सी. महालनोबीस यांना भारतीय अर्थसंकल्पाचे जनक म्हणून ओळखले जाते. अर्थसंकल्प सामान्यतः एका वर्षापुरता असला, तरी त्यापेक्षा कमी किंवा अधिक कालखंडाकरिता तो तयार केला जातो. बजेट हा इंग्रजी शब्द मूळ फ्रेंच Bougette या शब्दा पासून तयार झालेला आहे. बजेट या शब्दाचा सर्वप्रथम वापर इ.स. १९३३-३४ च्या काळात वापरण्यात आला. बजेट या शब्दाचा अर्थ खऱ्या अर्थाने चामडी पिशवी असा होतो. परंतु सध्याच्या वित्तमंत्री श्रीमती. निर्मला सीतारमन यांनी २०१९-२० पासून याकरिता वही-खाता असा शब्द नव्याने वापरण्यात आला. ज्यामध्ये अर्थमंत्री अंदाजपत्रकाची सर्व कागदपत्रे ठेवण्यासाठी त्याचा वापर केला जातो. एखाद्या आर्थिक वर्षासाठी अपेक्षित उत्पन्न व नियोजित खर्च यांचा मांडलेला हिरोब म्हणजे अर्थसंकल्प होय. १ एप्रिल ते ३१ मार्च हे आर्थिक वर्ष म्हणून ओळखले जाते. ज्या मध्ये प्रत्येक आस्थापन म्हणजे देश, राज्य ते नगरपालिका आणि ग्रामपंचायतही आपला बजेट मध्ये शासनाच्या पुढील वर्षांच्या उत्पन्न आणि खर्च याचा लेखा मांडला जातो.

भारतीय राज्यघटनेनुसार ११२ व्या कलमानुसार केंद्र सरकार व २०२ व्या कलमानुसार राज्य सरकारला अर्थसंकल्प सादर करावा लागतो. अर्थसंकल्प वित्त मंत्रालयांतर्गत कार्य करणाऱ्या आर्थिक कामकाज विभागामार्फत (Department of Economics Affairs) तयार केला जातो. ११२ व्या कलमानुसार प्रत्येक आर्थिक तयार केलेले अंदाजपत्रक हे संसदेच्या दोन्ही सभागृहात राष्ट्रपतींच्या वतीने सादर केला जातो. भारतीय राज्यघटनेत बजेट शब्दाचा वापर न करता 'वार्षिक वित्तीय विवरणपत्र' (Annual Financial Statement) या शब्दाचा वापर केला जातो. अर्थसंकल्प हा जागतिक स्तरावर प्रथम नेदरलँड्समध्ये १५७२, इंग्लडमध्ये १६८९ मध्ये, फ्रान्समध्ये १८३० मध्ये, डेन्मार्क, पिडमाँटमध्ये १८४८ मध्ये, पोर्तुगालमध्ये १८५१ मध्ये ऑस्ट्रेलिया १८६७ मध्ये आणि स्पेन १८७६ मध्ये त्याच प्रमाणे भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्वी ७ एप्रिल १८६० रोजी ब्रिटीश राजवटीत 'जेम्स विल्सन' यांनी पहिला अर्थसंकल्प मांडला तर स्वतंत्र भारताचा अर्थसंकल्प पहिले वित्तमंत्री श्री. आर. के. शन्मुखम चेट्टी यांनी भारताला ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तीन महिन्यांनी. भारताचा पहिला केंद्रीय अर्थसंकल्प मांडला.

भारतात साधारणत दरवर्षी फेब्रुवारीमध्ये संसदेचे बजेट अधिवेशन सुरु होऊन ते मे महिन्याच्या अखेर पर्यंत चालते. सन २०१६ पासून अर्थमंत्री कै. अरुण जेटली यांनी रेल्वेचे अंदाजपत्रक हे केंद्रीय अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट

करून घेतले. भारत सरकारने २१ सप्टेंबर २०१६ पासून फेब्रुवारी महिन्याच्या शेवटी अर्थसंकल्प सादर करण्याची पद्धत बंद करण्याचा निर्णय घेतला. अर्थसंकल्प एक महिना अगोदर म्हणजेच १ फेब्रुवारी रोजी संसदेमध्ये सादर करण्याचा निर्णय घेतला. अर्थसंकल्पाचे तीन प्रकार पडतात ते आपल्याला पुढीलप्रमाणे सांगता येतात. १) संतुलित अर्थसंकल्प २) शिलकी अर्थसंकल्प ३) तुटीचे अर्थसंकल्प अशा तीन प्रकारे अर्थसंकल्प आहे.

**१) संतुलित अर्थसंकल्प (Balance Budget) :** ज्या बजेटिंग प्रक्रियेत आर्थिक नियोजन, जेव्हा एकूण महसूल एकूण खर्चाच्या बरोबरीचा किंवा त्याहून अधिक असतो तेव्हा अशी परिस्थिती संतुलित अर्थसंकल्प बनवले जातात.

**२) शिलकी अर्थसंकल्प (Surplus Budget):** जेव्हा सरकारचे अंदाजित उत्पन्न अंदाजित खर्चापेक्षा जास्त असते तेव्हा त्या अर्थसंकल्पास शिलकी अर्थसंकल्प असे म्हणतात.

**३) तुटीचा अर्थसंकल्प (Deficit Budget) :** जेव्हा सरकारच्या अंदाजित उत्पन्नापेक्षा अंदाजित खर्च जास्त असतो, तेव्हा त्या अर्थसंकल्पास तुटीचा अर्थसंकल्प असे म्हणतात.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

२) कृषी खर्च **(२०२३-२४ ते २०२४-२५)**

३) पायाभूत सुविधाचा खर्च **(२०२३-२४ ते २०२४-२५)**

वरील उद्दिष्टांच्या चौकटीत सदर संशोधन लेखनाची मांडणी खालील प्रमाणे केली आहे.

**संशोधन पद्धती :**

सदर संशोधन लेखासाठी सांखेकिक – विश्लेश्नात्मक पद्धतीचा अवलंब केलेला आहे. हा अभ्यास प्राथमिक माहितीच्या आधारे केलेला आहे. संशोधन करण्याकरिता वरील तीन उदिष्टांचा आधार घेऊन **२०२३-२४ ते २०२४-२५** या आर्थिक वर्षातील कृषी क्षेत्र अर्थसंकल्प (२०२३-२४ ते २०२४-२५) आणि पायाभूत सुविधा क्षेत्र अर्थसंकल्प (२०२३-२४ ते २०२४-२५) यांचा अभ्यास करतांना दुय्यम स्त्रोत वापरले आहेत. यामध्ये विविध प्रकारची पुस्तके, लेख,ऑनलाइन जर्नल, वेबसाइट्सचा वापर करण्यात आला आहे. हा अभ्यास करताना केंद्राने शिक्षण, कृषी व पायाभूत सुविधा यामध्ये कशा प्रकारे मागील तीन केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये बदल झालेले आहे. यांचा अभ्यास व त्याचा अर्थव्यवस्थेवर होणारा परीणामाचा अभ्यास करणे.

**१) कृषी क्षेत्र अर्थसंकल्प (२०२३-२४ ते २०२४-२५) :**

कृषी क्षेत्रातील **२०२३-२४** च्या अर्थसंकल्पा अभ्यास करताना आपल्या खालील काही मुद्दे लक्षात येतात.

- तरुण उद्योजकांच्या ॲग्री-स्टार्टअपला ॲग्रीकल्चर एक्सीलरेटर फंड सुरू करून पाठिंबा दिला जाईल.
- दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय आणि पशुपालन यावर भर देऊन कृषी पत २० ट्रिलियन रुपये केले जाईल.
- मासळी विक्रेते, मच्छीमार आणि सूक्ष्म आणि लघु व्यवसायांच्या क्रियाकलापांना अधिक सक्षम करण्यासाठी, मूल्य शृंखलेची कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि ६,००० कोटी रुपयांच्या लक्ष्यित गुंतवणुकीसह पीएम मत्स्य संपदा योजनेची नवीन उप-योजना सुरू केली जाईल. बाजार विस्तृत करा.
- केंद्र १० दशलक्ष शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीकडे जाण्यासाठी सक्षम करेल.
- शेतकऱ्यांना त्यांचा माल साठवून ठेवण्यासाठी आणि वेळेवर विक्रीद्वारे रास्त भाव मिळवून देण्यासाठी, मोठ्या प्रमाणात विकेंद्रित साठवण क्षमता स्थापित केली जाईल.
- कृषीसाठी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा एक मुक्त स्रोत, मुक्त मानक आणि एकमेकांशी जोडलेले सामान्य कल्याण म्हणून तयार केली जाईल. यामुळे शेतकऱ्यांचा समावेश असलेले उपाय शक्य होतील आणि कृषी क्षेत्रातील निविष्ठा, मार्केट इंटेलिजन्स आणि कृषी क्षेत्रातील स्टार्टअप्ससाठी समर्थन वाढवण्यास मदत होईल.
- राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना पर्यायी खतांचा वापर करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी, PM PRANAM देखील सादर केले जाईल.

तसेच आपल्याला **२०२४-२५** च्या अर्थसंकल्पा मध्ये सरकाने कृषी क्षेत्राला किती प्रमाणात महत्व दिलेले आहे. हे आपल्याला या अर्थसंकल्पामध्ये लक्षात येईल.

- कापणीनंतरच्या क्रियाकलापांमध्ये खाजगी आणि सार्वजनिक अशा दोन्ही प्रकारच्या गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे.
- नॅनो-डीएपीच्या अर्जाचा विस्तार सर्व कृषी-हवामान झोनमध्ये केला जाईल. आत्मनिर्भर तेलबिया अभियानांतर्गत तेलबिया उत्पादनात स्वयंपूर्णता प्राप्त करण्यासाठी एक धोरणात्मक योजना तयार केली जाईल.
- याशिवाय, डेअरी क्षेत्राच्या विकासासाठी सर्वसमावेशक कार्यक्रम तयार केला जाईल.
- मत्स्यपालन उत्पादकता वाढवणे, निर्यात दुप्पट करणे आणि रोजगाराच्या अधिक संधी निर्माण करणे या उद्देशाने प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना राबविण्यासाठी प्रयत्न तीव्र केले जातील.
- ब्लू रिव्होल्यूशनसाठी एकूण रु. २,३५२ कोटी निधीचे वाढीव वाटप केले जाईल.
- त्याचप्रमाणे, मायक्रो फूड प्रोसेसिंग एंटरप्रायझेस योजनेच्या पीएम फॉर्मलायझेशनसाठी वाटप ८८० कोटी रुपये करण्यात येईल.
- कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाला १.२७ लाख कोटी रुपयांचे बजेट देण्यात आले आहे.
- PM-KISAN योजनेअंतर्गत ११.८ कोटी शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत दिली जाईल.
- याशिवाय पीएम फसल विमा योजनेद्वारे ४ कोटी शेतकऱ्यांना पीक विमा संरक्षण देण्यात येईल.
- शिवाय, ENAM अंतर्गत १,३६१ मंडईंचे एकत्रीकरण ३ लाख कोटी रुपयांच्या व्यापार खंडांना समर्थन देईल.

**२) पायाभूत सुविधा क्षेत्र अर्थसंकल्प (२०२३-२४ ते २०२४-२५) :**

१ फेब्रुवारी २०२३ च्या अर्थसंकल्प २०२३-२४ मध्ये आपल्याला पायभूत सुविधानां मोठ्या प्रमाणात महत्व आहे. व्यक्तीला मिळणाऱ्या पायाभूत सुविधा या त्याच्या विकासासाठी खूप महत्व पूर्ण ठरत असतात. ज्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत चांगल्या प्रकारे वाढ घडून येण्यास मदत होते. भांडवली गुंतवणुकीचा परिव्यय सलग तिसऱ्या वर्षी ३३% ने लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिव्यय केवळ पहिल्या आणि शेवटच्या मैलाची कनेक्टिव्हिटी वाढवणे हेच नाही तर शाश्वत वाहतुकीवरही लक्ष केंद्रित करते. पुढे, अर्थसंकल्पाने ग्रीन ग्रोथला आपले प्राधान्य दिले आहे, ग्रीन हायड्रोजन मिशनसाठी INR १९,७०० कोटींची तरतूद केली आहे आणि गोबरधन, ५०० वेस्ट-टू-वेल्थ प्लांट लॉन्च केले आहेत.

पंतप्रधान आवास योजनेचा खर्च ६६% ने वाढवला आहे. हा उपक्रम, विशेषतः मध्यमवर्गीय आणि पगारदार लोकांसाठी जाहीर केलेल्या आयकर सवलतींसह, परवडणाऱ्या आणि मध्यम-विभागातील घरांना चालना मिळण्याची शक्यता आहे. शेवटी, भविष्यातील शाश्वत शहरे विकसित करण्याच्या दृष्टीने अर्थसंकल्पात चांगला दृष्टिकोन ठेवण्यात आला आहे. शहरी पायाभूत सुविधा विकास निधीसाठी १०,००० कोटी रुपयांचे वाटप, क्षमता वाढीसाठी अनेक सुधारणांचा शुभारंभ (मिशन कर्मयोगी) आणि महानगरपालिकेची पतपुरवठा आणि शहरी नियोजन (जमीन संसाधनांचा कार्यक्षम वापर, TOD, परवडणारी क्षमता इ.) सुधारणे ही सर्व टप्पे आहेत. योग्य दिशा. याव्यतिरिक्त, पर्यटन क्षमता अनलॉक करण्यासाठी, बजेटमध्ये आव्हान मोडवर ५० पर्यटन स्थळांचा विकास करण्याची घोषणा केली. आपल्या झपाट्याने शहरीकरण होत असलेल्या अर्थव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर हे सर्व उपक्रम अविभाज्य ठरतील.

समाजातील सामान्य लोकांना २०२३-२४ च्या अर्थसंकल्पामध्ये चांगल्या प्रकारे दिलासा मिळालेला आहे. यामध्ये व्यक्तींना मोठ्या प्रमाणात पायभूत सुविधाचा विकास घडून आणण्यासाठी आणि त्यांचा वापर व्यक्ती आपल्या दैनंदिन वापरासाठी करतो. त्यामधून व्यक्तिगत साध्य करणे सरकारच्या माध्यमातून शक्य होत आहे.

केंद्रीय वित्तमंत्री श्रीमती. निर्मला सीतारमन यांनी १ फेब्रुवारी २०२४ रोजी २०२४-२५ अर्थसंकल्पामध्ये २०२३-२४ च्या अर्थसंकल्पाच्या तुलनेत किती प्रमाणात बद्दल झालेले आहे हे लक्षात येईल.

अंतरिम अर्थसंकल्पांतर्गत, वित्तमंत्र्यांनी शहरी विकासासाठी काही योजनांची रूपरेषा आखली आहे. पायाभूत सुविधा विकास आणि रोजगार निर्मिती यासाठी भांडवली खर्च व्यय ११.१ टक्क्याने वाढवून ११,११,१११ कोटी रुपये म्हणजे जीडीपीच्या ३.४ टक्के करण्यात येणार आहे. हा खर्च सामान्य पायाभूत सुविधांसाठी असला तरी, मोठ्या प्रमाणात तो नागरी वसाहतींसाठी वापरला जाईल, ज्याचा पायाभूत सुविधांच्या विस्तारामुळे मोठा फायदा होईल.

विमान वाहतूक क्षेत्र, जवळपास संपूर्णपणे शहरांमध्ये असून त्याचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. अर्थमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे, विमानतळांची संख्या दुपटीने वाढून होऊन १४९ वर पोहोचली आहे, अगदी छोटी शहरे आणि नगरांना नवे विमानतळ मिळाले आहेत. मार्ग विस्तारासह, भारतीय विमान कंपन्यांनी त्यांच्या विद्यमान ताफ्यात आणखी एक हजार विमाने जोडण्याची योजना आखली आहे.

शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये मेट्रो रेल्वे प्रणालींचा विस्तारही दिसून येईल, याचे कारण अर्थसंकल्पात देशातील मोठ्या शहरांत या व्यवस्थांना समर्थन देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

उत्पादन आणि चार्जिंग पायाभूत सुविधांना पाठिंबा देऊन ई-वाहन परिसंस्थांचा विस्तार आणि बळकटीकरण करण्याकरता सरकार वचनबद्ध आहे. यामुळे शहरे चांगल्या स्थितीत उभी राहतील, याचे कारण यापैकी बहुतांश- शहरे गणली जातील. या व्यतिरिक्त, सार्वजनिक वाहतूक जाळ्याकरता ई-बसला प्रोत्साहन दिले जाईल. भविष्याकरता, अर्थमंत्र्यांनी 'पंतप्रधान आवास योजने'अंतर्गत २ कोटी घरांची घोषणाही केली. मात्र, या योजनेच्या शहरी विभागांतर्गत किती घरांचा समावेश असेल याबाबत कोणतीही स्पष्टता नव्हती. या भाषणात छतावरील सौरीकरणासाठी १ कोटी घरांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यात खरोखरच मोठ्या प्रमाणात शहरी घटक असतील, ज्यामुळे शहरी कुटुंबांना दरमहा ३०० युनिट मोफत वीज मिळू शकेल. भाडेपट्टीवरील घरे, झोपडपट्ट्या, चाळी किंवा अनधिकृत वसाहतींत राहणाऱ्या शहरांमधील मध्यमवर्गीयांसाठी घरांचा या अर्थसंकल्पात नव्याने करण्यात आलेला उल्लेख वैशिष्ट्यपूर्ण होता. याकरता एक नवी योजना सुरू करण्यात येईल, ज्यात स्वतःचे घर खरेदी करण्याचा किंवा बांधण्याचा पर्याय उपलब्ध असेल. अत्यंत दुर्लक्षित असलेल्या गटासाठी परवडणाऱ्या घरांच्या दिशेने आणखी एक पाऊल उचलण्याची घोषणा स्वागतार्ह आहे.

**संदर्भ सूची:**

१. केंद्रीय अर्थसंकल्प २०२३-२४

१.१. कृषी क्षेत्र अर्थसंकल्प २०२३-२४

१.२. पायाभूत सुविधा क्षेत्र अर्थसंकल्प २०२३-२४

२. केंद्रीय अर्थसंकल्प २०२४-२५

२.१. कृषी क्षेत्र अर्थसंकल्प २०२४-२५

२.२. पायाभूत सुविधा क्षेत्र अर्थसंकल्प २०२४-२५

# शेती आणि आधुनिक तंत्रज्ञान

**प्रो. डॉ. नारायण नामदेव गाढे**

(संशोधक मार्गदर्शक)

लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पंचवटी नाशिक.

**प्रा. सुजाता वसंत आहेर**

(संशोधक विद्यार्थी) के.टी.एच.एम.महाविद्यालय नाशिक.

**प्रस्तावना**

भारत हा एक कृषीप्रधान देश आहे. भारतात प्राचीन काळापासूनच शेती व्यवसाय चालत आला आहे. परंतु काळानुसार शेती व्यवसायातही बदल होत गेले. सुरुवातीच्या काळात शेती व्यवसायात झालेले बदल हळूवार व मर्यादित होते. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र शेती व्यवसायात वेगाने व आमुलाग्र बदल होत गेले. भारतीय पंचवार्षिक योजनांमध्ये कृषी व्यवसायास प्राधान्य दिले गेले.

भारतीय कृषी व्यवसाय पर्जन्यावर अवलंबून आहे. परंतु मोसमी पर्जन्य लहरी आहे. त्यामुळे शेती उत्पादन अनिश्चित असते म्हणूनच भारतीय शेतीला 'मान्सुनचा जुगार' असे म्हणतात. १९४३ साली बंगालमधील भीषण दुष्काळ व १९४७ मध्ये झालेली भारताची फाळणी यामुळे अन्नधान्याची कमतरता भासू लागली. अन्नधान्याची मोठ्या प्रमाणात आयात करावी लागली. यावर उपाय म्हणून नवनवीन योजनांच्या माध्यमातून अन्नधान्य उत्पादनात वाढ करणे अत्यावश्यक यासाठी जलसिंचनाच्या सुविधा, भू-सवंर्धन, सुधारित बी-बियाणे, रासायनिक खते व किटकनाशके, यांत्रिक अवजारे अशा अनेक सुधारणा विविध योजनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिल्यात. तरीपण कृषी व्यवसायात फारशी प्रगती झाली नाही. शासनाने धान्योत्पादनाचे प्रयत्न सतत सुरूच होते. १९६०-६१ मध्ये 'सधन शेती जिल्हा कार्यक्रम' हा प्रकल्प व त्याबरोबरच 'अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांचा कार्यक्रम' राबविण्यात आला. यामुळे उत्पादनात बरीच वाढ झाली. स्वातंत्र्यानंतर भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण व्हावा या दृष्टीने कृषी विकासाच्या नवीन योजना राबविण्याचे ठरले.

असे जरी असले तरी भारतातील कृषी अनेक समस्यांनी ग्रस्त आहे. देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पादनातील शेतीचा वाटा फार कमी असल्याचे दिसून आलेले आहे. खेड्यातील बरीचसी लोकसंख्या जी कृषीमध्ये गुंतलेली होती ती आता इतर व्यवसायांकडे वळू लागली आहे.

शेतीच्या उज्वल भवितव्याच्या दृष्टीकोनातून केंद्रसरकार कृषी क्षेत्रासाठी नवनविन योजना आखत आहेत. माहिती तंत्रज्ञानातून शेती विकास साधण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. हवामान विषयक सूचना उपग्रहांमार्फत अगोदरच प्राप्त होत असल्याने त्याआधारे शेतीचे नियोजन करणे सोपे झाले आहे. शेतीमालाच्या किंमती इंटरनेटच्या साहाय्याने प्राप्त होवू लागल्या आहेत. भारत सरकारच्या माहितीतंत्रज्ञान विभागाने 'विकासपीडीया' हे शेतीविषयक माहिती देणारे बहुभाषिक वेबपोर्टल सुरू केले आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन मिळून त्याआधारे तो शेती कसत आहे. शास्त्रशुद्ध तंत्राने शेती केल्यास कृषी उत्पादनात वाढ होते हे शेतकऱ्यांच्या लक्षात आल्याने 'विकासपीडीया' मार्फत प्रसारीत माहितीच्या पुरेपूर वापर तो करीत आहे. कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी आधुनिक तंत्राचा वापर भारतीय शेतीत करणे ही काळाची गरज आहे. ही आधुनिक तंत्र कोणती हे पुढील मुद्यातून स्पष्ट केलेले आहे.

**कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्राचा वापर** (Modern Techniques used in Agriculture) :

शेती हा मानवाचा प्राचीन व मुलभूत व्यवसाय आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंत मानवी जीवनात झालेल्या स्थित्यंतराबरोबरच कृषी पद्धतीतही स्थित्यंतरे झालीत. विज्ञानाच्या प्रगतीबरोबरच कृषी तंत्रातही बदल होत गेलेत,

शेत जमिन कसण्याच्या पद्धती व साधने, बी-बियाणे, खते, किटकनाशके, जलसिंचन तंत्र पद्धती व साधने, यात बदल होत गेले. १९६०-६५ च्या दरम्यान भारतीय शेतीत अमुलाग्र बदल झाला. हरीतक्रांतीमुळे भारतीय कृषी क्षेत्रात अनपेक्षितपणे व वेगाने मुलभूत स्वरूपात बदल झालेत. हरितक्रांतीपासून भारतीय कृषी क्षेत्रात सातत्याने विकासाच्या दिशेने परिवर्तन होत आहे. आधुनिक शेतीचे संदर्भ कालानुरूप बदलत राहिलेत. हरितक्रांतीच्या काळात ज्या तंत्रज्ञानाला आधुनिक समजले गेले. त्याच्या यशस्वीकेवर आज प्रश्नचिन्ह उभे राहिले. असे तंत्रज्ञान लहान शेतकऱ्याला परवडणारे आहे का? अशा तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पर्यावरणाला धोका नाही का? मग आजच्या संदर्भात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून याआधी निर्माण झालेले प्रश्न सोडविता येतील काय? यातूनच शाश्वत शेतीची संकल्पना पुढे आली. उद्याची शेती करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पारंपारिक शेती तंत्रज्ञानाची साथ देऊन या शेतीला शाश्वत बनविणे ही काळाजी गरज आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे विकसित करण्यात आलेले नवीन टान्सजैविक बियाणे, ऊती संवर्धनाद्वारे तयार करण्यात आलेली रोपे, रासायनिक खतांचा त्याग करून त्या ऐवजी जैविक खतांचा वापर करणे, गांडूळ खत, सेंद्रीय खत, हिरवे खत, निळे-हिरवे शेवाळ इत्यादी खतांचा वापर करणे, विषारी किटकनाशकांऐवजी आधुनिक जैविक किटकनाशके वापरणे, कमी पाण्यात जास्त क्षेत्र ओलीताखाली आणणे, एकंदरीत कमी खर्चात, कमी क्षेत्रात, कमी पाण्यात उत्तम शेती करून जास्त उत्पन्न मिळविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे गरजेचे आहे. अर्थात ही आधुनिक शेती फक्त आधुनिक न राहता ती शाश्वतही असावी. याकरिता आज शेती क्षेत्रात जी नवनवीन तंत्रे विकसित झालीत. त्यापैकी काही महत्त्वाच्या आधुनिक तंत्राचे विवेचन येथे केलेले आहे. अशा आधुनिक तंत्रांचा वापर भारतीय शेतीचे भवितव्य उज्वल करण्यात कारणीभूत ठरेल.असे म्हणण्यास हरकत नाही.

**अलीकडच्या काळात शेतीत वापरले जाणारे आधुनिक तंत्रज्ञान:-**

**१) हरितगृह (Green House):**

हरितगृह म्हणजे वनस्पतींचे संरक्षण करण्यासाठी सर्व भिंती व पूर्ण छत पारदर्शक असणारी काचेची मानव निर्मित एक कृत्रिम खोली असते.हिला 'ग्लास हाऊस' असेही म्हणतात. अति थंड प्रदेशात अत्यंत कमी असलेले तापमान अनेक वनस्पतींना सहन न होण्याने त्यांची योग्य अशी वाढ होत नाही किंवा त्या जगात नाही..अशा वनस्पतींचे संरक्षण करण्यास करण्यात आलेली ही व्यवस्था आहे.

कमी क्षेत्रावर अधिक उत्पादन घेण्यासाठी नवीन तंत्रज्ञान विकसीत करण्याचा प्रयत्न सतत कृषी शास्त्रज्ञांकडून होत असतो. याचाच एक परिपाक म्हणजे हरितगृह तंत्रज्ञान होय. हरितगृहामुळे कृषी उत्पादनात ४ ते ५ पटीने वाढ होते शिवाय शेतीमालाची गुणवत्ता अत्यंत उच्च दर्जाची असते. बंदिस्त जागेमध्ये पिकांसाठी पोषक वातावरण पुरविण्याच्या प्रयत्नातून हरितगृहाचा उदय व विकास झाला. ज्या-ज्या प्रदेशात शेतीसाठी अनुकूल वातावरण नसते त्या त्या देशात हरितगृह तंत्रज्ञान वापरून काही पिकांचे उत्पादन घेतले जाते.

भारतामध्ये बाराही महिने सुर्यप्रकाश उपलब्ध आहे. परंतु सूर्यप्रकाशाची तीव्रता कमी जास्त होत असते. त्यामुळे मिळणारा सूर्यप्रकाश पिकांना पाहिजे त्या प्रमाणात उपलब्ध होत नाही. पिकांच्या गरजेनुसार सुर्यप्रकाश उपलब्ध व्हावा म्हणून हरितगृह तंत्रज्ञान वापरतात. वाढत्या लोकसंख्येला अन्न पुरविण्यासाठी शेतीची उत्पादनक्षमता वाढवण्याची गरज आहे. ही उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी हरितगृहांचा वापर करावा लागतो,ज्या देशांमध्ये थंड हवामान असून सूर्यप्रकाश खूपच कमी उपलब्ध असतो त्या देशांमध्ये सुद्धा हरितगृहांचा वापर केला जातो. उदा. हॉलंड, इंग्लंड, स्पेन. हरितगृहात पारंपारिक शेतीपेक्षा तुलनेने कमी श्रम लागतात. हरितगृहातील शेतीसाठी सुरुवातीला भांडवल खर्च खूप येतो पण नंतर कृषी उत्पन्नातील लक्षणीय वाढीमुळे हा भांडवल खर्च भरून निघतो. हरितगृहाच्या साहाय्याने फुलशेती केल्यास फुलांचे उत्पादन प्रचंड होते याचे उत्तम उदाहरण हॉलंडमधील हरीतगृहाच्या मदतीने केली जाणारी फुलशेती होय.

वातावरण नियंत्रित हरितगृहे व अंशतः वातावरण नियंत्रित हरितगृहे असे दोन प्रकार यात आहेत. यात वातावरण नियंत्रित हरितगृहामध्ये फॅन व पॅडचा वापर करतात. पॅडमधून थंड हवा बंदिस्त हरितगृहामध्ये सोडली जाते. ही थंड हवा हरितगृहातील उष्णता शोषून घेते. गरम झालेली हवा पंख्यांद्वारे बाहेर फेकली जाते. अशा प्रकारे या हरितगृहामध्ये वातावरण निर्माण केले जाते. दुसरे हरितगृह हे 'अंशतः वातावरण नियंत्रित हरितगृह' होय. यामध्ये बाजूनी व छताकडे मोकळी जागा ठेवली जाते. यामुळे गरम हवा छताकडून बाहेर जाते.

**हरितगृह उभारण्यासाठी आवश्यक असलेली भौगोलिक परिस्थिती :**

1) **जमिनीचे स्वरूप :** जमिन डोंगर उताराची नको. सपाट जमिन हरितगृहाच्या उभारणीसाठी आवश्यक असते.
2) **पाणी पुरवठा :** पाणी मुबलक उपलब्ध असावे. हरितगृहातील पिकांना दर हेक्टरी एक लाख लिटर पाणी दररोज आवश्यक असते.
3) **मृदा** : हरितगृहातील मातीचा पी. एच. ६ च्या कमी नसावा आणि ८ च्या वर नसावा. पाण्याचा निचरा होणारी मध्यम स्वरूपाची माती हरितगृहामध्ये असावी.
4) **वीज पुरवठा** : पिकांना ठिबक सिंचन पद्धतीने अथवा सूक्ष्म सिंचन पद्धतीने दररोज पाणी द्यायचे असल्याने वीज आवश्यक असते. कोल्ड स्टोअरसाठी वीजेची आवश्यकता असते.
5) **हरितगृहाची दिशा:** हरितगृहाची दिशा दक्षिणोत्तर असावी त्यामुळे सूर्यप्रकाश पुरेसा उपलब्ध होईल. यामुळे दिवसा झाडांची सावली एकमेकांवर पडणार नाही. प्रत्येक साडाला पुरेसा सूर्यप्रकाश मिळेल,
6) **वाहतूक व्यवस्था :** हरितगृहातील उत्पादीत मालाची वाहतुक बाजारपेठांपर्यंत करण्यासाठी जलद वाहतूक करणारे वाहतूक साधने व चांगले रस्ते असावे. स्वतःचे वाहन असल्यास वाहतूक खर्चात बचत होते.
7) **बाजारपेठ** : स्थानिक बाजारपेठ व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ असे दोन प्रकार यात येतात. माल दुसऱ्या देशांना निर्यात करायचा असल्यास हरितगृह व आन्तरराष्ट्रीय विमानतळ यांच्यातील अंतर कमीत कमी असावे. बाजारपेठ हा घटक लक्षात घेऊन हरितगृहाची उभारणी करावी.
8) **मजुरपुरवठा :** हरितगृहातील पिकांची काळजी घेण्यासाठी कुशल मजूर आवश्यक असतात. असे मजूर उपलब्ध असावे लागतात.

**हरितगृहाचे फायदे :**

1) वातावरणाचे नियंत्रण हरितगृहामध्ये पिकांच्या वाढीसाठी वातावरण निर्मिती केली जाते. सूर्यप्रकाशाची तीव्रता, तपमान, आर्द्रता, पाणी, कार्बन डायॉक्साईड यांचे नियंत्रण केले जाते. पिकांच्या गरजेनुसार वरील घटकांचे नियंत्रण होत असल्याने पिकांच्या उत्पादनात लक्षणीय वाढ होते.
2) हरितगृहाच्या बाहेरील वातावरणात हवेत सुमारे ३०० पी. पी. एम. कर्ब पातळी असते. रात्रीच्या वेळी वनस्पती उत्सर्जनातून कार्बन डायॉक्साईड वायू बाहेर सोडतात. या वायू हरितगृहातच साठविला गेल्याने सकाळी कर्ब वायू पातळी १०००-१५०० पी. पी. एम. एवढी वाढते. यामुळे प्रकाश संश्लेषण क्रियेत वाढ होऊन कृषी उत्पादनात सुमारे ४ पटीने वाढ होते.
3) मालाची प्रत चांगली असल्यास बाजरपेठांमध्ये या मालाला मोठा उठाव असतो. हरितगृहातून उत्पादित होणारा माल उच्च दर्जाचा असतो. त्यामुळे त्याला मागणी जास्त असल्याने पैसा खूप मिळतो. आर्थिक फायदा होतो.
4) भाजीपाला व फुलांना निर्यातीसाठी प्रचंड वाव आहे. हरितगृहाच्या साहाय्याने या दोघांचे उत्पादन भरघोस मिळते.
5) बिगर हंगामात एखादा भाजीपाला बाजारपेठांमध्ये उपबल्ध झाल्यास त्याला भाव खूप पिळतो उन्हामध्ये हिरवा भाजीपाला उपलब्ध होत नाही. हिल्या भाजीपाल्याची कमतरता भासते. उन्हाळ्यात यामुळे हिल्या

भाजीपाल्याचा भाव जास्त असतो, हरितगृहाच्या साहाष्याने उन्हाळ्यात बातावरण निर्मिती करून भाजीपाल्याचे उत्पादन घेता येते.

**२) जैवतंत्रज्ञान** (Biotechnology):

जैवतंत्रज्ञान' हे आधुनिक विज्ञान आहे. जैवतंत्रज्ञानामुळे कृषीतंत्रातही आमुलाग्र बदल झालेत. त्याचाच परिपाक म्हणजे भारतीय कृषीतंत्रात झपाठ्याने च दल होऊन कृषी विकास झपाट्याने होत आहे. कृषी जैवतंत्रज्ञान ही आज काळची गरज असून २१ व्या शतकातील कृषीला लाभलेले एक वरदानच आहे. गेल्या पाच वर्षापासून शेतीत कृषी जैवतंत्रज्ञानाचा वापर प्रगत शेतकरी मोठ्या प्रमाणात करू लागले आहेत. आज देशाच्या उत्पादनातील सुमारे ३०% हिस्सा हा कृषी जैवतंत्रज्ञान क्षेत्राचा असून तो भविष्य-काळात असाच किंबहुना यापेक्षाही जास्त प्रमाणात राहणार नाही यात शंकाच नाही.

"कृषी पिकांची वाढ, गुणवत्तापूर्ण उत्पादन, रोग व किडींवरील नियंत्रण साध्य करण्याकरिता विविध सजीवांचा वापर करण्याचे तंत्र म्हणजे जैवतंत्रज्ञान होय."

आज कृषी जैवतंत्रज्ञान हे सर्वात जलद गतीने वाढणारे तंत्रज्ञान आहे. अमेरिका, चीन, ब्राझील, जपान हे देश जैवतंत्रज्ञानाच्या बाबतीत आघाडीवर आहेत. भारतात १९८५ साली जैवतंत्रज्ञान विभाग स्थापन करून नवी दिल्ली येथे राष्टीय जैवतंत्रज्ञान संशोधन केंद्राची निर्मिती करण्यात आली. राष्टीय प्रयोगशाळा, संशोधन केंद्र, कृषी विद्यापीठे यांनीही कृषी जैवतंत्रज्ञान विकसित करण्याकडे अधिक लक्ष घातले आहे. त्यामुळे भारतात कृषी विकास व कृषी उत्पादनात वाढ झपाट्याने होऊ लागली आहे याचे उत्तम उदाहरण म्हणजे बी. टी. कपाशी होय.

थोडक्यात, "विविध प्रकारच्या सर्व जनुकीय जैविक घटकांचा आणि प्रक्रियांचा कृषी, वैद्यकीय व औद्योगिक अशा विविध क्षेत्रात उपयोग करून घेण्याचे तंत्रज्ञान म्हणजेच जैवतंत्रज्ञान होय."

"कृषीमधील मानवी उद्दिष्ट्ये साध्य करण्याकरिता जीवित जीवांची कुशलतेने हाताळणी करण्याचा नवीन पद्धती किंवा तंत्राला जैवतंत्रज्ञानकृषी जैवतंत्रज्ञानामध्ये विविध प्रकार समाविष्ट होतात. त्यापैकी काही प्रमुख प्रकार **खालीलप्रमाणे -**

I. ऊती संवर्धन (Tissue Culture) : "झाडाच्या कोणत्याही अवयवाचा एखादा तुकडा पोषक माध्यमावर ठेवून नियंत्रित वातावरणात प्रयोगशाळेत वाढविण्याचे तंत्र म्हणजे ऊती संवर्धन होय." ऊती संवर्धन हे आधुनिक तंत्रज्ञान कृषी क्षेत्रात वरदान ठरलेले आहे. कारण या तंत्राद्वारे जातीवंत रोपांची निर्मिती पाहिजे तेवढ्या प्रमाणात करता येणे शक्य झाले आहे. त्यामुळे चांगले गुणधर्म असणाऱ्या वनस्पतींपासून त्याच गुणधर्माच्या असंख्य रोपांची निर्मिती करता येते. त्यामुळे उत्पादनाचा दर्जाही उत्कृष्ट असतो.

II. जनुकीय अभियांत्रिकी:- वनस्पती किंवा प्राणी यांच्यातील जनुक (DNA) कसा आहे, त्याचे त्या गुणसुत्रानुसार ठिकाण कोठे आहे व त्याठिकाणी आपल्याला हवा तसा दुसरा जनुक टाकणे हा बद्दल घडवून आणणाऱ्या प्रक्रियेला जनुकीय अभियांत्रिकी म्हणतात. "एखाद्या विशिष्ट वनस्पतीची काही जनुके त्यात मिळवायची अथवा पहिल्या जनुकाच्या जागी दुसरी ठेवायची अशा तंत्राला जनुकीय अभियांत्रिकी म्हणतात."

III. जैविक खते : "जैविक खते म्हणजे जिवाणू, नील हरीत शैवाल, माय क्रोन्हिझाल कवके / बुरशीसारखे सुक्ष्मजीव जमिनीतील पोषक घटक वाढवितात." काळानुसार शेतीमधील जीवाणू तयार करण्याची क्षमता नष्ट झालेली आहे. त्यामुळे जैविक खतांचा वापर करण्याची गरज भासू लागली. रासायनिक खतांचे वाढते दुष्परिणाम दिसू लागल्यामुळे अधिक लक्ष घातले आहे. त्यामुळे भारतात कृषी जमिनीचा पोत सुधारून हमखास उत्पादन वाढीकरीता अत्याधुनिक अशा जैविक खतांचा वापर करणे ही काळाची गरज बनली आहे. आज रायझोबियम, डायकोडामा, अॅझोटोबॅक्टर, बायजेरिकिया, अॅझोला, अॅनाबिना, निळे - हिरवे शेवाळ, बुरशी, मायकोरायझा,

बुरशी यासारख्या जैविक खतांचा वापर शेतात केला जाऊ लागला आहे. त्यामुळे मृदेची सुपीकता वाढून उत्पादनात वाढ होत आहे.

IV. जैविक कीटकनाशके : "विषाणू, जिवाणू, बुरशी, आदिजीव (Protoza) सूक्ष्मजीव, मुग्यांच प्रकार यासारखे सूक्ष्मजीव / जैविक घटक, तृणनाशके, कीटकनाशके, संसर्ग निर्माण करणाऱ्या सूक्ष्मजीवांच्या नियंत्रणासाठी वापरले जातात. यांनाच "जैविक कीडनाशके"म्हणतात.

**३) उती संवर्धन (Tissue Culture):**

'जैवतंत्रज्ञान' हे आधुनिक विज्ञान आहे. जैवतंत्रज्ञानामुळे कृषीतंत्रातही आमुलाग्र बदल झालेत. त्याचा परिपाक म्हणजे भारतीय कृषीतंत्रात झपाट्याने बदल होऊन कृषी विकास झपाट्याने होत आहे. 'उती संवर्धन' हे जैवतंत्रज्ञानाचे एक प्रमुख अंग आहे.

कृषी भूगोलकरण्यासाठी उती संवर्धन तंत्रज्ञान हे एक महत्वाचे साधन आहे. उती संवर्धन हे आधुनिक तंत्रज्ञान कृषी क्षेत्रातील अनेक प्रश्न सोडविण्यासाठी उपयुक्त असल्याने सिद्ध झालेले आहे.

भारतात आज प्रामुख्याने केळी, हळद, बांबू, साग, चंदन, सफरचंद, लिंबू, अननस, शेवंती, ऑर्किड, काजू, रताळी, फणस इ. वनस्पतींची अभिवृद्धी करण्यासाठी उती संवर्धन तंत्रज्ञान विकसित झालेले आहे. निलगिरी, केळी, जरबेरा, वेलदोडा या वनस्पतींची उती संवर्धन तंत्राने व्यापारी तत्वावर अभिवृद्धी केली जाते. पुणे येथील राष्टीय रासायनिक प्रयोगशाळा (पाषाण) येथील डॉ. मस्कारेनहंस यांनी सहकाऱ्यांच्या मदतीने परीक्षा नळीत बांबूची झाडे वाढवून दीड ते दोन महिन्यात त्यांना फुले आणून दाखविलीत. वास्तविक बांबूच्या झाडाला ४० वर्षांनी फुले येतात. परंतु उती संवर्धन तंत्रज्ञानामुळे हे शक्य झाले.

आज भारतातील अनेक सरकारी, निम-सरकारी व खाजगी संस्था उतीसंवर्धनाबाबत संशोधन करून कृषी विकासात त्याचा उपयोग करत आहेत. राष्टीय रासायनिक प्रयोगशाळा (पुणे), भाभा अणुशक्ती केंद्र (टॉम्बे), भारतीय कृषी संशोधन संस्था (नवी दिल्ली), कोकण कृषी विद्यापीठ (दापोली), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, (दापोली, जि. रत्नागिरी), मराठवाडा कृषी विद्यापीठ, (परभळी), पंजाब राव कृषी विद्यापीठ (अकोला), नॅशनल बोटॅनिकल रिचर्स इन्स्टिट्यूट (लखनौ) व भारतातील इतर कृषी विद्यापीठांमध्ये उती संवर्धन प्रयोगशाळा कार्यान्वित असून विविध पिकांची अभिवृद्धी यशस्वी केलेली आहे.उती संवर्धन तंत्रज्ञान कृषी विकासासाठी एक वरदानच ठरले आहे.

**४)पॉलीहाऊस (Polyhouse):**

काही महत्त्वाच्या पिकांच्या उत्पादनासाठी पॉलीथिन या कृत्रिम कापडापासून निवारा तयार करतात. त्यास पॉलीहाऊस असे म्हणतात. हे कापडी निवारे अर्धगोलाकार, चौकोनी आणि लांबट असतात. त्याच्या आत तापमान, आर्द्रता, वायुवीजन नियंत्रित करणारी उपकरणे बसवितात. यामुळे प्रखर उष्णता, तीव्र सूर्यप्रकाश, वादळी वारे, गारा, थंडीची लाट यांपासून पिकांचे संरक्षण होते. फ लशेती, रोपवाटिका, भाजीपाला पिकवण्याकरीता पॉलीहाऊसचा वापर करतात.

पॉलीहाऊसमुळे नैसर्गिक प्रतिकुल हवामानापासून पिकांचे नुकसान तर टळतेच पण अधिक उच्च गुणवत्ता असलेली उत्पादने मिळविता येतात. पॉलीहाऊसमुळे पिकांना पर्याप्त पाणी, योग्य प्रमाणात नत्रे व खते देता येतात.

पुण्याजवळील तळेगाव दाभाडे या गावाजवळ तसेच नाशिक जिल्ह्यात दिंडोरी तालुक्यात बरीच पॉलीहाऊस उभारेलेली आहेत. त्यांचा आकार गोल डोमासारखा आहे. येथील पॉलीहाऊसमध्ये जरबेरा व कार्नेशन जातीच्या फुलांची शेती केली जाते. तर काही पॉलहाऊसमध्ये निशिगंध, ग्लॅडियोला व बर्ड ऑफ पॅरडाइज यांचीही शेती केली जाते.

जोरदार वारा आणि सूर्यामुळे दर दोन ते तीन वर्षांनी प्लास्टिकची जागा बदलावी लागते. तथापि, याची किंमत खूप कमी आहे. फुलझाडे आणि भाजीपाला रोपे पॉली हाऊसपासून जोरदार सूर्यप्रकाशापासून आणि जोरदार पावसापासून

संरक्षित आहेत. यासह, या पिकांसाठी अनुकूल वातावरण तयार आहे. पॉली हाऊसमध्ये शेतकरी हंगामातील भाज्यांसह झेंडू, जर्बर, क्रायसॅन्थेमम, कंद इत्यादी फुले पिकवत आहेत.

**पॉली हाऊस तयार करण्यासाठी अंदाजित किंमत** (Estimated cost to build a poly house) 1000 चौरस मीटर क्षेत्रात पॉली हाऊस तयार करण्यासाठी सुमारे 10 लाख रुपये आणि 4000 चौरस मीटर क्षेत्रात सुमारे 35 लाख रुपये खर्च येतो. यासाठी नाबार्ड बँक देखील कर्ज देते. लहान शेतकरी 500 चौरस मीटरपर्यंत पॉली हाऊस तयार करू शकतात. पूर्वी यासाठी काही लोक पुढे येत असत. आता येथे शेतकऱ्याचा कल वाढला आहे.

**पॉली हाऊस बांधकाम करताना घ्यावयाची खबरदारी** (Precautions to be taken while constructing a poly house) पॉली हाऊस जमिनीच्या खाली नसावा परंतु काही उंचीवर वाढवावा. जेणेकरून ओलावा किंवा पाणी स्थिर होणार नाही. जमिनीचा उतार असा असावा की पृष्ठभागाचे पाणी पॉली हाऊसपासून दूर ठेवावे. अन्यथा, पिकामध्ये रोग होण्याची शक्यता वाढते.

पॉलीहाऊस अशा ठिकाणी असावे जेथे बाजारपेठेपासून काही अंतरावर, वाहतुकीची साधने इत्यादी असाव्यात. पॉली हाऊस जवळ मोठे झाड किंवा सावली नसावी. बाजाराच्या मागणीनुसार पिकाची निवड करावी. सरकारच्या प्रोत्साहनामुळे गाझियाबादच्या आसपासच्या शेतकऱ्यानी पॉली हाऊसेसमध्ये मोठ्या प्रमाणात भाज्या आणि फुलांची लागवड सुरू केली आहे.

**पॉली हाऊसचे फायदे** (Advantages of Polly House)

- पॉली हाऊसच्या आत उगवलेल्या भाज्या सेंद्रिय आणि नैसर्गिक वादळांमुळे होणाऱ्या नुकसानापासून वाचू शकतात.
- पॉली हाऊस प्रति युनिट क्षेत्राचे उत्पादन, उत्पादकता आणि गुणवत्ता वाढवते.
- पॉली हाऊसमध्ये वर्षभर उत्पादन घेतले जाऊ शकते.
- पॉली हाऊसमध्ये ऑफ सीझन भाज्या वाढण्याबरोबरच कीटकनाशकाची किंमतही कमी होते.

**सारांश**:-

आजच्या युगात अशा अनेक प्रकारचे नवीन तंत्रज्ञान कृषि क्षेत्रात आलेले आहे. आणि त्याचा चांगला परिणाम आपण सर्वजण पाहत आहोत.अनेक नवनवीन पिके,त्यांचे वाढलेले विक्रमी उत्पादन,बाराही महीने उपलब्धता असे अनेक फायदे या आधुनिक तंत्रज्ञानाचे पाहावयास मिळतात.भारताची वाढती लोकसंख्या आणि अन्नधान्याची गरज पाहता शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान फार महत्वाची भूमिका बजावताना दिसते.हा लेख लिहिन्याचे कारण की आज प्रत्येक शेतकऱ्याला या तंत्रज्ञानविषयी माहिती असणे गरजेचे आहे . त्याचे महत्व समजणे काळाची गरज आहे. म्हणून या लेखातून थोडक्यात माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा माझा मानस आहे.

**संदर्भसूची:-**

१) देसाई आणि भालेराव ,भारतीय अर्थव्यवस्था :निराली प्रकाशन(२०१६)

२ शिरसी राजेंद्र, भोकसे उमेश कृषी अर्थशास्त्र : सक्सेस पब्लिकेशन (२०१९ )

३) व्ही. जे.,पाटील, वाघ शैलेश कृषी भूगोल ,प्रशांत पब्लिकेशन (२०१५ )

४)विकासपीडिया

५)www.Maharashtra.gov.in

# भारताची महासत्तेकडील वाटचाल : कृषीपर्यटनामुळे शेती विकासाचे बदललेले स्वरूप


**वाघ जीवनकुमार शामराव**

संशोधक संशोधन केंद्र - के.टी. एच.एम. महाविद्यालय, नाशिक. (महाराष्ट्र,भारत)

**डॉ. अमोल गायकवाड**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन समन्वयक के.टी. एच.एम. महाविद्यालय, नाशिक.(महाराष्ट्र,भारत)


**प्रस्तावना :**

भारत हा कृषीप्रधान अर्थव्यवस्था असलेला देश म्हणून ओळखला जातो. देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. भारताचा जवळजवळ ७०% भाग हा ग्रामीण भाग आहे. ३०% भाग शहरी आहे म्हणून भारताचा सर्वांगीण विकास ग्रामीण भागाच्या विकासावर आधारीत आहे. ग्रामीण भागाचा विकास झाला तरच भारताचा एकूण विकास होणार आहे. ग्रामीण भागातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे म्हणून ग्रामीण विकासात शेतीचे योगदान किंवा भूमिका महत्त्वाची आहे. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकर्यांच्या आर्थिक प्रगती करण्यास संधी प्राप्त होईल.

भारतासारख्या देशात GDP मध्ये १८.९८% वाटा असणारे कृषीक्षेत्र ५८.७ % लोकसंख्येला रोजगार पुरविते. त्यामुळे कृषीक्षेत्र देशात महत्वाची सामाजिक आणि आर्थिक भूमिका पार पाडते हे लक्षात येते. जपानसारख्या वेगाने विकसीत झालेल्या देशात सुद्धा शेतीने विकास प्रक्रियेला हातभार लावला आहे. देश विकसीत झाला तरी वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची आणि विविध उद्योगांची कच्च्या मालाची गरज हेच क्षेत्र पूर्ण करते. भारताच्या एकूण निर्यातीत कृषीक्षेत्राचा वाटा साधारणतः ९.९% इतका आहे.

➢**उद्दिष्टे :**

खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत .

●भारताची महासत्तेकडील वाटचाल करतांना शेती विकासाचे कृषीपर्यटनामुळे बदललेले स्वरूप अभ्यासणे.

●कृषीपर्यटनामुळे शेतक-याचा आर्थिक विकास होतो हे तपासणे .

●कृषीपर्यटन व्यवसायामुळे रोजगार निर्मिती झाली आहे हे अभ्यासणे .

➢**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधक संशोधन कार्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करणार आहे. प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलन करतांना संशोधकास संख्याशास्राच्या वेगवेगळ्या पद्धतींचा वापर करावा लागतो. त्यासाठी योग्य माहिती संकलित करावी लागते. अश्या माहितीच्या संकलनासाठी पुढील पद्धतींचा वापरल्या जातात.

**१) प्राथमिक स्रोत :**

प्राथमिक स्रोत/ सामग्री हा महत्वाचा तथ्य संकलनातील भाग आहे. प्राथमिक स्रोत/ सामग्री स्वतः संशोधकाने एकत्रित केली आहे. त्यामुळे हि माहिती अधिक वस्तुनिष्ठ आहे. प्राथमिक स्रोत/ सामग्रीमध्ये वेगवेगळे स्रोत वापरले आहेत.

**२) दुय्यम स्रोत:**

कृषीपर्यटन केंद्रांचे माहितीपत्रक, कृषीपर्यटनाबाबत संदर्भपुस्तके, तसेच नियतकालिके, वर्तमान पत्रे, इंटरनेट इ. द्वारे आवश्यक ती माहिती संकलित केली.

प्राथमिक आणि दुय्यम स्रोतातून प्राप्त होणा-या माहितीवरून विश्लेषण करून अभ्यासअंती -निष्कर्ष, मार्गदर्शक सूचना, तत्वे, समस्यावरील उपाय योजना इ. बाबी सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

➢ **भारताच्या ग्रामीण विकासातील शेतीची भूमिका :-**

१) उदरनिर्वाहाचे साधन
२) रोजगार पूरविणारे साधन
३) दारिद्र्य निर्मूलन
४) पूरक व्यवसाय
५) कच्च्या मालाचा प्रमुख स्रोत
६) अन्नोत्पादन
७) जमीनीचा सर्वाधिक उपयोग
८) विदेशी व्यापारात महत्त्व
९) आर्थिक विकासात महत्त्व

शेती या प्राथमिक व्यवसायाबरोबर कृषी पर्यटन हा तृतीय क्षेत्रातील व्यवसाय शेतकऱ्यांना पूरक व्यवसाय बनला आहे. कृषी पर्यटन म्हणजे कृषी जीवन अनुभवण्यास प्रोत्साहन देणे होय. कृषी पर्यटन स्थळी अनेक उद्योग प्रक्रिया केंद्र, हरितगृह नर्सरी, इमूपालन, वाईनरी प्रकल्प, गुन्ऱ्हाळ प्रकल्प यासारखे प्रकल्प राबविता येतात. तसेच कृषी पर्यटनामुळे यातील संस्कृतीचे जतन केले जाते. त्या अनुषंगानेच २००५ मध्ये भारतात अॅग्री टुरिझम डेव्हलपमेंट कार्पोरेशन ही संस्था स्थापन झाली. या संस्थेच्या माध्यमातून बरेचसे शहरी पर्यटक स्थानिक शेतकरी व कुशल कारागीर यांना एकत्र आणले जाते.

महाराष्ट्र हे भारतातील प्रमुख पर्यटन केंद्रांपैकी एक आहे. महाराष्ट्रमध्ये कृषी-पर्यटन विकसित करण्याची मोठी संधी व क्षमता आहे. कृषी* पर्यटनाच्या वाढत्या प्रस्थामुळे पर्यटनाला तर चालना मिळतेच, पण त्यामुळे कृषी क्षेत्रालाही फायदा होऊ शकतो. लोकांना, नवीन पिढीला शेतक-याचं जीवन, त्यांचे कष्ट जवळून पहायला, अनुभवायला मिळतात. शेतक-याविषयी त्यांच्या मनात आदराची भावना निर्माण व्हायला मदत होते. शेतक-यानाही आपल्या शेतीला जोडून आर्थिक उत्पन्नाचं एक साधन निर्माण होत आहे. लहान क्षेत्र असलेले शेतकरी एकत्र येऊन सगळ्यांच्या जमिनीचा योग्य तो वापर करून लोकांसाठी पर्यटनाचा पर्याय निर्माण करु शकतात. कृषीपर्यटनामुळे निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या, शेतक-याच्या आर्थिक विकासाच्या शक्यता लक्षात घेऊन राज्य तसेच केंद्र सरकारच्या कृषी खात्याकडूनही कृषी पर्यटनाला उत्तेजन मिळत आहे.

➢ **कृषीपर्यटन - अर्थ आणि व्याख्या : –**

शेती व्यवसायाला जोड व्यवसायाची साथ देऊन उत्पादनात भर घालता येणारा प्रकल्प म्हणजे 'कृषी पर्यटन'. कृषी पर्यटन हा पर्यटनाचा नवीन चेहरा झाला आहे. कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास आणि ग्रामीण विकासातून महाराष्ट्राचा विकास घडवून आणणे शक्य झाले आहे. उदा. ऑस्ट्रेलीयासारख्या विकसित देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया कृषी पर्यटन आहे.

**व्याख्या :-**

**'कृषीपर्यटन'** म्हणजे "एक प्रवास जो कृषी किंवा ग्रामीण संस्कृतीचा मिलाफ करतो. त्यातून कृषी क्रियांची उत्पादने सर्व कृषीपर्यटकांना पर्यटनाच्या माध्यमातून अनुभवता येतात." श्री. पांडुरंग तावरे (मुख्य प्रवर्तक) **'कृषीपर्यटन विकास कॉर्पोरेशन'** (एटीडीसी, पुणे) शेतीतील उत्पन्नास आलेली मर्यादा विचारात घेता शेतीपूरक व्यवसायांना चालणा देणे आता गरजेचे झाले आहे. नैसर्गिक डोंगर, दऱ्या खोऱ्यात वसलेली गावे, गड-किल्ल्यांचा परिसर, निसर्ग रम्य पठारे, वनसंपदा, सागरी किनारा, धार्मिक स्थळातील कलाकुसर अशी विविध संपन्नता लाभली आहे. यासाठीच महाराष्ट्रात कृषी पर्यटन

वाढीसाठी भरपूर संधी आहेत. महाराष्ट्राची लोकसंख्या ११.२४ कोटी आहे. त्यातले ४५.२ टक्के लोक हे शहरांत राहतात. यातील ७३ टक्के जनता ही ग्रामीण भागात पर्यटनास जाऊ इच्छिते. यामुळे कृषी पर्यटन व्यवसायास वाढीस भरपूर वाव आहे. अगदी थोड्या जागेत कमीत कमी गुंतवणुकीत शेतकरी पर्यटन उद्योग सुरू करू शकतो. कृषी पर्यटनामुळे कृषी आणि सेवा ही दोन क्षेत्रे एकमेकाशी जोडली जाऊ शकतात. शेतमाल उत्पादनांना बाजारपेठही मिळू शकते. यातून रोजगार, ग्रामीण विकास, संस्कृती संवर्धन होऊ शकेल. शहरातील पैसा ग्रामीण भागात येऊ लागल्याने विकासाचा समतोलही राखला जाईल.

**२००५ नंतर महाराष्ट्रातील कृषी पर्यटन विकास :-**

शेतीचा काही भाग जाणीवपूर्वक पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करणे म्हणजे कृषी पर्यटन. भारतात सर्वप्रथम १९७० च्या दरम्यान बारामती येथे कृषितज्ज्ञ अप्पासाहेब पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी कृषी पर्यटन विकास महामंडळाची स्थापना केली. पण राज्यात २००५. नंतर खऱ्या अर्थाने कृषी पर्यटनास चालना मिळाली. इंटरनेट आणि आयटीचा विकास झपाट्याने झाल्यानंतर आठवड्याची सुट्टी घालवण्यासाठी शहरातील नोकरदार लोक ग्रामीण भागात येऊ लागले. २००५ मध्ये फक्त दोनच कृषी पर्यटन केंद्रे होती. पण जसा शहरात औद्योगिक विकास झाला तसा ग्रामीण भागाकडे पर्यटन म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन वाढू लागला.

कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास आणि ग्रामीण विकासातून महाराष्ट्राचा विकास हे उद्दिष्ट समोर ठेवून २००८ मध्ये महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण पर्यटन सहकारी महासंघाची (मार्ट) स्थापना करण्यात आली. त्यानंतर खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात कृषी पर्यटन ही नवी संकल्पना उदयाला आली. २०१० मध्ये राज्यात ८० कृषी पर्यटन केंद्रे कार्यरत होती. पडिक जमिनीचा विकास व उत्पन्नाचा नवा स्त्रोत म्हणून याकडे पाहीले गेले. ग्रामीण निसर्ग सौंदर्य व संस्कृती संवर्धनाच्या दृष्टीने पर्यटनास चालना देण्यात आली. त्यामुळे २०१३ मध्ये राज्यात १२५. केंद्रे सुरु झाली. आता २०१९ मध्ये ही संख्या ३०० च्यावर गेली आहे.

मार्टने भौगोलिक विचार करून कृषी पर्यटनाचे राज्यात सहा विभाग केले आहेत. त्यामुळे प्रत्येक विभागात पर्यटन केंद्रांना भेडसावणाऱ्या समस्या ह्या वेगळ्या आहेत. कृषी पर्यटन विकास महामंडळाच्या पाहणीनुसार २०१४ मध्ये ४ लाख, २०१५ मध्ये ५.३ लाख, २०१६ मध्ये ७ लाख पर्यटकांनी कृषी पर्यटन केंद्रांना भेटी दिल्या आहेत. यातून 358 लाख रुपये उत्पन्न शेतकरी कुटुंबांना मिळाले.

महाराष्ट्र पर्यटन विकास कॉर्पोरेशन **(MTDC) – पर्यटन संचनालय** मार्फत देखील कृषीपर्यटनविकास कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. कृषीपर्यटणामुळे पर्यटनविकास आणि पर्यावरण रक्षण या दोन्हीमुळे आर्थिक प्रगती असा तिहेरी लाभ होतो. तसेच पर्यटणामुळे विभिन्न प्रांतातील लोकांमध्ये जी सांस्कृतिक देवाणघेवाण होते त्यामुळे परस्परांमध्ये एकात्मता निर्माण होते व बंधुत्वाची भावना वाढीस लागते. **१६ मे** हा जागतिक '**कृषीपर्यटन दिन**' म्हणून साजरा केला जातो.

**कृषी पर्यटनाचे फायदे :**

प्रमुख कृषी उद्योग हा सेवा विभागातील पर्यटन व्यवसायाशी जवळीक साधू शकतो. त्यामुळे दोन्ही विभागांना फायद्याची संधी मिळू शकते.

1)पर्यटन विभागाला वाढविण्यासाठी त्या व्यवसायात स्वयंभु अशी प्रेरणा आहे.

2)पर्यटन क्षेत्रामध्ये होणारी वाढ कृषी व्यवसायात समाविष्ट होवू शकते.

3)शेतीबरोबर अत्यंत कमीत कमी गुंतवणूक करुन किमान तिप्पट उत्पन्न मिळवून देण्याची ताकद कृषी पर्यटनास असून हा व्यवसाय शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने आर्थिक समृद्धी देणारा आहे.

4)भारतात कृषी पर्यटन उद्योगाला प्रचंड वाव असल्याने शेतकऱ्यांनी या संधीचा फायदा घ्यावा.

5)कृषी पर्यटन सुरू करण्यापूर्वी एका पाहणीत असे आढळून आले आहे की शहरी भागातील ७० टक्के नागरिकांना खेडे, तेथील लोकजीवन व शेती कधी पाहिलीच नसते.

6)कृषी पर्यटनामुळे पर्यटक व शेतकरी या दोघांना थेट आर्थिक फायदा होतो.

7)पर्यटकांना वाजवी दरांत निसर्ग सानिध्याचा लाभ, माहितीपुर्ण मार्गदर्शक सहल, ग्रामीण जीवन व लोककलांचा परिचय घडतो.

8)शेतकऱ्यांनाही पर्यटकांचे आदरतिथ्य करून शेती करत असतानाच उत्पन्नाचे नवे साधन मिळते.

9)सर्व शेतकऱ्यांनी एकत्मीक (एकत्र) येऊन कृषी पर्यटन प्रकल्प राबविल्यास इतरही अनेक घटकांना रोजगार मिळतो. कृषी पर्यटनामुळे शहरातील नागरिक व खेड्यातील शेतकरी त्या एकमेकांमध्ये आदराची भावना निर्माण होऊन त्यातील दरी कमी होईल. 'इंडिया आणि भारत' यांचा सुंदर मिलाप घडवून आणण्याचे मोठे कार्य कृषी पर्यटन माध्यमातुन होत आहे.

10) कृषी पर्यटनामुळे पर्यावरण जतन, ग्रामविकास, लोकजागृती, रोजगार निर्मिती, कृषी मालाला उठाव, राष्ट्रीय एकात्मकता, पायाभुत सुविधांचा विकास, जलसंधारण, शेती व शेतकऱ्यांचा विकास असे अनेक फायदे एकाचवेळी प्रत्यक्षात उतरत असल्याने ही कृषी पर्यटनाची संकल्पना क्रांतीकारी आहे असे संबोधण्यात हारकत नाही.

**आर्थिक फायदे :**

पर्यटन हा नेहमी वेगाने, मोठ्या प्रमाणात वाढणारा उद्योग आहे, हे सर्वांना माहिती आहेच. वाढत्या पर्यटन ट्रीप्स (सहली) त्यामुळे वाढणाऱ्या आर्थिक उलाढालीचाही इथे विचार केला आहे. परिणामी ग्रामीण भागातील अर्थ व्यवस्थेला चालना मिळून प्रगती होईल, आणि शेतकऱ्यांचे एकूण राहणीमान उंचावण्यास मदत होईल. कृषि पर्यटनाद्वारे शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचा मार्ग मिळाला आहे, एकूण मालमत्ता वाढीस लागेल. याशिवाय त्यांना एक प्रकारचे समाजाभिमान येईल. अनेक पर्यटकांशी केलेल्या संवादातून त्यांना सामाजिक कामात सहभागी होण्याची प्रेरणा मिळेल. थोडक्यात सांगायचे झाले तर शेतकऱ्यांचा समाजातील दर्जा आणखी वाढेल व त्यांच्या रोजच्या जीवनात समृद्धि येईल.

**लोकांचा सहभाग :**

कृषि पर्यटनाच्या संकल्पनेचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे समाजाचा सहभाग. याच दृष्टिकोनातून पर्यटकांच्या ग्रामीण भागातील भेटींचा विचार केला आहे. ग्रामपंचायत सभासदांबरोबर विचारांची देवाण-घेवाण आणि गावातील विविध कार्यक्रमांना हजर राहणे हा त्याचाच एक महत्त्वाचा भाग आहे. पर्यटकांच्या गरजांसाठी शेतकरी काही वेळा कमी पडतात. म्हणून त्यांना मदतीची आवश्यकता असते. वाढत्या पर्यटकांचा परिणाम गावातील सर्वच जनतेला जाणवत आहे. बहुतेक ग्रुप पॅकेजेसमधे (सामुहिक योजनेमध्ये) अनेक कार्यक्रमांचा समावेश केलेला आहे. उदा. बैलगाडीतून फेरफटका, कारागिरांचे काम प्रत्यक्ष पाहणे, मेहंदी कला, लोकसंगीत- लोकनृत्य, गावाची सहल, भेट वस्तूंची दुकानं इ. मुळे गावातील लोकांचा सहभाग वाढतो, म्हणूनच अनेक गावकऱ्यांना अनेक प्रकारच्या संधी निर्माण झाल्या आहेत. नोकरी किंवा वैयक्तिक कौशल्य दाखवून अधिक उत्पन्न मिळविण्याची साधने निर्माण झाली आहेत.

**कृषी पर्यटन केंद्रचालक शेतक-यांकरिता शिफारशी :**

1)कृषी पर्यटन केंद्रामध्ये शेतक-यांनी पारंपारिक वस्तूंचा वापर व उपयोग अधिकाधिक करावा त्यामुळे पर्यटकांना ग्रामोण वस्तूंची माहिती व उपयोग कळण्यास मदत होईल.

2)कृषी पर्यटन केंद्राचा व्यवसाय हंगामी करण्याऐवजी कृषी पर्यटन केंद्र वर्षभर सुरु ठेवावे आणि ऋतुनुसार पर्यटकांसाठी विविध महोत्सवाचे आयोजन करण्यात यावे तसेच हंगामानुसार भोजन, इतर खाद्यपदार्थ व फळांचा वापर जास्तीत जास्त करावा. याशिवाय पावसाळा आणि हिवाळा ऋतुमध्ये महोत्सव भरविल्यास जास्तीत जास्त पर्यटकांना आकर्षित करता येईल आणि शेतक-यांना आपल्या उत्पन्नामध्येही वाढ करता येईल

3)कृषी पर्यटन केंद्र चालवणाऱ्या शेतक-यांनी कृषी पर्यटन केंद्र चालविताना व्यावसायिकतेचा वापर करावा. बरेच शेतकरी व्यवसायामध्ये व्यावसायिकपणा दाखवत नसल्याने पर्यटकांच्या संख्येत वाढ होत नाही परिणामी उत्पन्नात घट होते.

4)शेतक-यांनी आपल्या कृषी पर्यटन केंद्राची आधुनिक पद्धतीने जाहिरात करावी. इंटरनेटवरील वेबसाईट सातत्याने अद्यायावत केल्यास पर्यटकांना केंद्रामध्ये सुरु असलेले उपक्रम केंद्राविषयी माहिती मिळण्यास मदत होते. तसेच आधुनिक पद्धतीने जाहिरात करताना सोशल मिडिया, इंटरनेट, टि.व्ही., रेडिओ, वर्तमानपत्रे इ. साधनांचा आधार घेतल्यास पर्यटकांच्या संख्येत वाढ होताना दिसेल तसेच पर्यटन केंद्राच्या व्यवसायामध्येही वाढ होईल.

5)एक दिवसीय पर्यटनासाठी येणा-या पर्यटकांची संख्या मोठी असल्याने पर्यटकांच्या मनोरंजनाचे तसेच भोजनाचे योग्य नियोजन केल्यास पर्यटकांची गैरसोय होणार नाही आणि पर्यटक पर्यटनाचा पूर्ण आनंद घेऊ शकतील. याचा निश्चितच फायदा शेतकऱ्यांना होईल, कारण समाधानी पर्यटक पर्यटन केंद्राची ताँडी जाहिरात करतील त्यामुळे पर्यटकांच्या संख्येतही वाढ होताना दिसून येईल.

6)कृषी पर्यटन केंद्र चालविणाऱ्या शेतक-यांनी पर्यटन केंद्रामध्ये पंचक्रोशीतील गरीब, कमी शिक्षित, किंवा भिकारी लोकांना आपल्या पर्यटन केंद्रात रोजगार उपलब्ध करुन दिल्यास संबंधित भागातील बेरोजगारी कमी होण्यास त्यामुळे मदत होईल तसेच कृषी पर्यटन केंद्रातील मजुरांचा प्रश्नही कमी होण्यास त्यामुळे मदतच होईल.

7)शेतक-यांनी कृषी पर्यटन केंद्रात ग्रामीण संस्कृतीची ओळख, खेळ, नृत्य, कला, भोजन व कृषी पर्यटन केंद्रात उपलब्ध असणा-या सुविधा तसेच गावाच्या परिसराचा इतिहास पर्यटकांना समजून सांगितला तर पर्यटकांची संख्या नक्की सुधारेल.

**कृषी पर्यटन धोरणाबाबत सरकारकरिता शिफारशी :**

1)कृषी पर्यटन केंद्र चालविणाऱ्या शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही. सरकारने कृषी पर्यटन केंद्र चालू करण्यासाठी किमान रुपये २०,००० ते कमाल रुपये ०१,००००० पर्यंत अनुदान दिल्यास नवनवीन शेतकऱ्यांना कृषी पर्यटन केंद्र सुरु करता येतील आणि सरकारलाही विविध मार्गाने महसूल प्राप्त होईल.

2)कृषी पर्यटन केंद्र सुरु करण्यासाठी बहुतांशी बँका कर्जपुरवठा करीत नाहीत. भांडवला अभावी अनेक होतकरु गरीब शेतकऱ्यांना कृषी पर्यटन केंद्र सुरु करता येत नसल्याने सरकारने शेतक-यांना शेतजमिनीवर रुपये ०२ लाख ते रुपये ०५ लाख पर्यंत कर्जपुरवठा केल्यास शेतकऱ्यांना भांडवल उपलब्ध होईल आणि शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास यामुळे मदत होईल.

3)कृषी पर्यटन केंद्र ग्रामीण भागातील निसर्गाच्या सानिध्यात सुरु करता येत असल्याने सरकारने ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा दर्जा सुधारल्यास वाहतूक, वीज, पाणी, रस्ते सुविधा उपलब्ध करुन दिल्यास ग्रामीण भागाचा विकास होण्याबरोबरच कृषी पर्यटनाला चालना मिळण्यास यामुळे मदत होईल.

4)कृषी पर्यटन केंद्राचे सरकारतर्फे ऑडिट केल्यास कृषी पर्यटन केंद्र चालकांकडून भविष्यात सरकारला महसूल प्राप्त होईल आणि सरकारच्या उत्पन्नातही वाढ होताना दिसेल.

5)कृषी पर्यटन केंद्र चालविण्या-या शेतक-यांना सेंद्रिय पद्धतीने शेती करण्यासाठी सरकारने प्रोत्साहन आणि मार्गदर्शन केल्यास शेतक-यांबरोबरच पर्यटकांचाही फायदा होलाना दिसेल.

6)कृषी पर्यटन चालक शेतकऱ्यांसाठी सरकारने स्पर्धा ठेवावी आणि स्पर्धेतील विजेत्याचा सरकारतर्फे सत्कार केल्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन व प्रेरणा मिळण्यास यामुळे मदत होईल.

7)सरकारतर्फे वशस्वी कृषी पर्यटन चालक शेतक-यांची यशोगाथा रेडिओ, टि.व्ही., वर्तमान पत्रे, मासिके याद्वारे लोकांपर्यंत पोहोचवल्यास पर्यटकांना याचा निश्चित फायदा होईल तसेच पर्यटन केंद्राचा व्यवसाय वाढण्यासही यामुळे मदत होईल.

**सारांश**

कृषी पर्यटनामुळे कृषी आणि सेवा ही दोन क्षेत्रे एकमेकाशी जोडली आहेत. शेतमाल उत्पादनांना बाजारपेठ देखील मिळते. तसेच कृषी पर्यटनामुळे रोजगार, ग्रामीण विकास, संस्कृती संवर्धन करणे शक्य झाले आहे. शहरातील पैसा ग्रामीण भागात येऊ लागल्याने विकासाचा समतोलही राखला जातो.

**संदर्भसूची :**


1. जे. एम. काकडे, एस. जी. पाचपोर, 'भारतीय अर्थव्यवस्था' (नियोजन आणि विकास), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
2. आर. जी. रसाळ डॉ. एस. जी. वैद्य प्रा. एस. बी. अभंग प्रा. एस. पी. आढाव, 'भारतीय आर्थिक पर्यावरण ' प्रशांत पब्लिकेशन.जळगाव.
3. आगलावे प्रदिप, (२०००), 'संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, प्रथम आवृत्ती, विद्या प्रकाशन, नागपूर.
4. नाडगोंडे जी., ( १९९९ ), ' सामाजिक संशोधन पद्धती ' : फडके प्रकाशन, नागपूर.
5. करले जी., काविमंडन व्ही., 'ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टीकोन' : श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
6. भोसले य. (२००५), 'प्रवास पर्यटनाचे नवे पैलू' प्रथम आवृत्ती, पुणे मेहता पब्लिशिंग.
7. जोशी लिली, (सप्टे. २०१३), 'पर्यटन एक संजीवनी' प्रथम आवृत्ती, रोहन प्रकाशन.
8. पाटील अरुण, 'कृषी पर्यटन' ज्ञानमंगल प्रकाशन, कोल्हापूर.
9. पांडुरंग तावरे, महाराष्ट्र कृषी पर्यटन विस्तार योजना २०१७ (ATDC), पर्यटन विकास संस्था, बारामती ॲग्री ॲण्ड रुरल टुरिझम ट्रेनिंग, रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट सेंटर ६३१, पळशीवाडी, तालुका बारामती, जिल्हा : पुणे पिन - ४१३११०. महाराष्ट्र, भारत.

★ **मासिके :-**

- मनोज हाडवळे (२०२०), 'कृषी पर्यटनातून ग्रामसमृद्धी',सकाळ साप्ताहिक, पुणे.
- कुलकर्णी एस. व्ही. (२०१४), 'ग्रामीण पर्यटन शेतकर्यांना दिलासा देणारा उद्योग' , उद्योजक, पर्यटन उद्योग विशेष.
- राशिंगकर सु., "ग्रामीण विकासाशिवाय पर्याय नाही" : **उद्योजक मासिक**, औरंगाबाद.
- जोशी श्रीनिवास (२०१३), 'पर्यटकांबरोबर संधीचे आगमन' उद्योजक.
- पांडुरंग तावरे (२०२०), ' पळशी आंतरराष्ट्रीय नकाशावर',सकाळ साप्ताहिक, पुणे.

➢ **Websites :-**

1) www.agritourism.in/services
2) www.maharashtratourisum.gov.in

# ई-कॉमर्स - उत्क्रांती ट्रेंड, आव्हाने आणि भविष्यातील संभावना

**डॉ. शेळके दिगंबर सखाराम**
सहा. प्राध्यापक (वाणिज्य विभाग)
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कोल्हार

**श्री. घोलप सागर बाळासाहेब**
सहा. प्राध्यापक (वाणिज्य विभाग)
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कोल्हार

**गोषवारा -**

हे संशोधन ई-कॉमर्सच्या गतिमान उत्क्रांती, वर्तमान ट्रेंड, सततची आव्हाने आणि भविष्यातील संभावनांचा शोध घेते. ऑनलाइन व्यवहार करताना ई-कॉमर्सला पुढे नेत असताना, सुरक्षाविषयक चिंता आणि नियामक गुंतागुंत आव्हाने उभी करतात. हा गोषवारा बहुआयामी कथनाचे संक्षिप्त विहंगावलोकन करते, सतत विकसित होत असलेल्या डिजिटल मार्केटप्लेसमध्ये भरभराट होण्यासाठी व्यवसायांना धोरणात्मकपणे जुळवून घेण्याच्या गरजेवर जोर देते. सध्याच्या ई-कॉमर्स या क्षेत्राला आकार देणाऱ्या ट्रेंडचा आपण सखोल अभ्यास करत असताना, व्यवसायांसमोरील आव्हानांचा शोध घेतो आणि भविष्यातील संभाव्यतेचा विचार करतो, तेव्हा हे स्पष्ट होते की ई-कॉमर्सचा प्रवास हा एक गतिशील आणि बहुआयामी आहे. हे संशोधन या उत्क्रांतीचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करते.

**मुख्य शब्द-**

ई-कॉमर्स, ट्रेंड, व्यवसाय, डिजिटल, मार्केटिंग.

**ई-कॉमर्स उत्क्रांती -**

इलेक्ट्रॉनिक कॉमर्स किंवा ई-कॉमर्सच्या आगमनाने आणि प्रसारामुळे कॉमर्सच्या जगामध्ये आमूलाग्र परिवर्तन झाले आहे. गेल्या काही दशकांमध्ये, जागतिक व्यवसाय प्रतिमान पारंपारिक क्षेत्रामधील आस्थापनांमधून एका डिजिटल क्षेत्राकडे वळले आहे. जिथे व्यवहार हे आभासी ठिकाणावर अखंडपणे होतात. ही उत्क्रांती ट्रेंड, आव्हाने आणि अभूतपूर्व संधींच्या द्वारे चिन्हांकित केली गेली आहे. ज्यामुळे व्यवसाय चालवण्याच्या आणि ग्राहकांना बाजारपेठेशी संलग्न करण्याच्या पद्धतीला आकार दिला आहे. ई-कॉमर्सच्या वाढीचे श्रेय इंटरनेटची सर्वव्यापीता, तांत्रिक प्रगती आणि ग्राहकांच्या बदलत्या वर्तनाला दिले जाऊ शकते. डिजिटल पेमेंट प्रणालीच्या वैविध्यतेसह ऑनलाइन खरेदी द्वारे ऑफर केलेली सुविधा आणि प्रवेश योग्यता, ई-कॉमर्सला जागतिक अर्थव्यवस्थेत एक प्रमुख शक्ती म्हणून चालना दिली आहे. व्यवहारातील सुरक्षेची चिंता, नियामक गुंतागुंत आणि मजबूत पायाभूत सुविधांची गरज यामुळे डिजिटल मार्केटप्लेसमध्ये शाश्वत यश सुनिश्चित करण्यासाठी व्यवसायांनी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. सध्याच्या ई-कॉमर्स जगालाला आकार देणाऱ्या ट्रेंडचा आपण सखोल अभ्यास करत असताना, व्यवसायांसमोरील आव्हानांचा शोध घेतो आणि भविष्यातील संभाव्यतेचा विचार करतो, तेव्हा हे स्पष्ट होते की ई-कॉमर्सचा प्रवास हा एक गतिशील आणि बहुआयामी कथा आहे. हे संशोधन या उत्क्रांतीचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करते.

**ई-कॉमर्स ट्रेंड -**

1. **मोबाइल कॉमर्स (एम-कॉमर्स):** स्मार्टफोनच्या वाढत्या वापरामुळे, मोबाइल कॉमर्समध्ये सतत वाढ होत आहे. ग्राहक मोबाइल डिव्हाइसवर खरेदी करण्याच्या सोयीला प्राधान्य देतात, मोबाईल कंपन्या वस्तूच्या अखंड खरेदी करण्यासाठी मोबाइल ॲप्स तयार करतात.

2. **कृत्रिम बुद्धिमत्ताचे आणि संवादलेखन:** कृत्रिम बुद्धिमत्ता हि वैयक्तिकृत खरेदी शिफारसी तसेच ग्राहक सेवेसाठी संवादलेखन करण्यासाठी कार्यरत आहे. या तंत्रज्ञाने वापरकर्त्याचा अनुभव वाढवतो तसेच प्रक्रिया सुव्यवस्थित करतात आणि ग्राहकांच्या वर्तनाबद्दल योग्य दिशा प्रदान करतात.

3. **व्हॉइस कॉमर्स:** स्मार्ट स्पीकर सारख्या व्हॉइस-सक्रिय उपकरणांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे व्हॉइस कॉमर्सचा उदय झाला आहे. व्हॉइस सर्चसाठी ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म ऑप्टिमाइझ करण्याच्या महत्त्वावर जोर देऊन व्हॉइस कमांड वापरून ग्राहक आता खरेदी करू शकतात.

4. **शाश्वतता आणि नैतिक उपभोक्तावाद:** ग्राहक त्यांच्या खरेदीच्या पर्यावरणीय आणि नैतिक परिणामांबद्दल अधिक चिंतित आहेत. ई-कॉमर्स व्यवसाय शाश्वत पद्धतींचा समावेश करून, इको-फ्रेंडली उत्पादने ऑफर करून आणि पारदर्शकपणे नैतिक मानकांशी त्यांची बांधिलकी सांगून प्रतिसाद देत आहेत.

5. **सबस्क्रिप्शन ई-कॉमर्स:** सबस्क्रिप्शन-आधारित मॉडेल्स आकर्षित होत आहेत, जे ग्राहकांना उत्पादने किंवा सेवांमध्ये नियमित आणि सोयीस्कर प्रवेश देतात. हे मॉडेल प्रवाह सेवा, अन्न वितरण आणि सौंदर्य उत्पादने यासारख्या उद्योगांमध्ये प्रमुख आहे.

**ई-कॉमर्स पुढील आव्हाने -**

1. **सुरक्षितता चिंता:** ई-कॉमर्स व्यवहारांमध्ये संवेदनशील माहितीची देवाणघेवाण समाविष्ट असते, ज्यामुळे सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. सायबरसुरक्षा धमक्या, डेटा उल्लंघन आणि ग्राहकांच्या माहितीची संभाव्य तडजोड विश्वास आणि प्रतिष्ठा खराब करू शकते.

2. **डेटा गोपनीयता आणि अनुपालन:** डेटा संरक्षण नियमांच्या अंमलबजावणीसह, ई-कॉमर्स व्यवसायांनी गोपनीयता कायद्यांचे पालन सुनिश्चित करणे आवश्यक आहे. कायदेशीर परिणाम टाळण्यासाठी आणि विश्वास राखण्यासाठी ग्राहक डेटाचे जबाबदारीने व्यवस्थापन करणे महत्त्वाचे आहे.

3. **तीव्र स्पर्धा:** ई-कॉमर्स हे स्पर्धात्मक आहे, असंख्य व्यवसाय ग्राहकांचे लक्ष वेधून घेतात. गर्दीच्या बाजारपेठेत उभे राहण्यासाठी प्रभावी विपणन धोरणे, अद्वितीय मूल्य प्रस्ताव आणि अपवादात्मक ग्राहक अनुभव आवश्यक आहेत.

4. **लॉजिस्टिक आव्हाने:** वेळेवर ऑर्डर पूर्ण करण्यासाठी आणि वितरणासाठी कार्यक्षम आणि विश्वासार्ह लॉजिस्टिक्स आवश्यक आहेत. आव्हानांमध्ये इन्व्हेंटरी मॅनेजमेंट, शिपिंग खर्च, डिलिव्हरी आणि पीक डिमांड कालावधी हाताळण्याची क्षमता यांचा समावेश असू शकतो.

5. **ग्राहकांचा विश्वास आणि अनुभव:** ई-कॉमर्समध्ये ग्राहकांचा विश्वास निर्माण करणे आणि टिकवणे हे सर्वात म्हत्वाचे आहे. खराब ग्राहक सेवा, उत्पादनाच्या गुणवत्तेची चिंता किंवा गोंधळात टाकणारा वेबसाइट इंटरफेस यासारख्या समस्यांमुळे विश्वास कमी होऊ शकतो आणि ग्राहकांच्या अनुभवावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

**ई-कॉमर्स भविष्यातील संभावना -**

1. **सातत्यपूर्ण वाढ** : ई-कॉमर्समध्ये जागतिक स्तरावर शाश्वत वाढ होण्याची शक्यता आहे. जसजसे अधिक क्षेत्रांना इंटरनेटचा प्रवेश मिळतो आणि ग्राहकांना ऑनलाइन व्यवहार अधिकाधिक सोयीस्कर होत जातात, तसतसे ई-कॉमर्स बाजाराचा विस्तार होण्याची अपेक्षा आहे.

2. **मोबाइल कॉमर्स वर्चस्व** : स्मार्टफोन्सच्या प्रसारामुळे, मोबाइल कॉमर्स आणखी प्रबळ बनण्यास तयार आहे. व्यवसायांना मोबाइल ऑप्टिमायझेशनला प्राधान्य देणे आणि विविध उपकरणांवर वापरकर्त्यांसाठी अखंड अनुभव तयार करणे आवश्यक आहे.

3. **कृत्रिम बुद्धिमत्ता आणि वैयक्तिकरण** : कृत्रिम बुद्धिमत्ताचे एकत्रीकरण वैयक्तिक खरेदी अनुभवांना आणखी वाढवेल. ग्राहकांच्या वर्तनाचे विश्लेषण करू शकतात, प्राधान्यांचा अंदाज लावू शकतात. ज्यामुळे ग्राहकांचे समाधान होऊ शकेल.

4. **शाश्वत ई-कॉमर्स** : पर्यावरण व उत्पादनाचा वापर ई-कॉमर्सवर परिणाम करतील. व्यवसायांनी शाश्वत पद्धतींचा अवलंब केला पाहिजे. पर्यावरणपूरक उत्पादने बाजारात विकणे आणि पर्यावरणीय आणि सामाजिक जबाबदारीसाठी त्यांची बांधिलकी जपणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष-**

ई-कॉमर्सची उत्क्रांती हा ट्रेंड, आव्हाने आणि भविष्यातील संभावनांच्या गतिशील परस्परसंवादाने चिन्हांकित केलेला एक परिवर्तनात्मक प्रवास आहे. तंत्रज्ञानाच्या अथक प्रगतीने, ग्राहकांच्या बदलत्या वर्तनासह, जागतिक बाजारपेठेत ई-कॉमर्सला एक प्रमुख शक्ती म्हणून चालना दिली आहे. मोबाइल कॉमर्सचे वर्चस्व, कृत्रिम बुद्धिमत्तेचे एकत्रीकरण आणि संवर्धित वास्तवाचा उदय यासारख्या ट्रेंडने ग्राहकांशी व्यवसाय जोडण्याचा मार्ग बदलला आहे. सामाजिक वाणिज्य, टिकावू उपक्रम यामुळे वाढती लोकप्रियता सतत विकसित होत असलेल्या ई-कॉमर्स हे यशासाठी आवश्यक अनुकूलता आणि नाविन्यपूर्णता अधोरेखित करते. तथापि, ही उत्क्रांती त्याच्या आव्हानांशिवाय राहिली नाही. सुरक्षितता चिंता, डेटा गोपनीयतेच्या समस्या आणि आंतरराष्ट्रीय नियमांची गुंतागुंत सतत दक्षता आणि धोरणात्मक नियोजनाची आवश्यकता असते. प्रखर स्पर्धा, वस्तूमधील गुंतागुंत आणि अखंड ग्राहक अनुभवांची गरज यामुळे सतत अडथळे येतात. ई-कॉमर्स उत्क्रांतीच्या या युगात, यश हे गुंतागुंतीचे मार्गक्रमण करण्याच्या क्षमतेवर अवलंबून आहे, नवकल्पना स्वीकारणे आणि जागतिक आणि वैविध्यपूर्ण ग्राहक आधाराशी शाश्वत संबंध निर्माण करणे.

**संदर्भ-**


1. Chaffey, D., & Ellis-Chadwick, F. (2019). डिजिटल मार्केटिंग: धोरण, अंमलबजावणी.
2. लॉडॉन , KC आणि ट्रॅव्हर , CG (2019). ई-कॉमर्स 2019: व्यवसाय, तंत्रज्ञान, समाज. पिअर्सन.
3. Smith, AN, Fischer, E., & Yongjian , C. (2012). ब्रँड-संबंधित वापरकर्ता-उत्पन्न सामग्री
4. मॅकिन्से अँड कंपनी. (२०२०). फॅशन 2020 ची स्थिती : नेव्हिगेट करणे अनिश्चितता.
5. Srinivas Koushik and Pete Joodi, E-Business Architecture Design Issues, IT Professional, Vol.2, No.3, 2000, pp. 38-44.
6. Goyal, A., & Joshi, S. (2018). E-commerce in India: A comprehensive review. *International Journal of Computer Applications, 181*(1), 18-23
7. Ministry of Commerce and Industry, Government of India. (https://commerce.gov.in/)

# भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने

**प्रा. एस. एच. हेरवाडे**
सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगुड ता.कागल जि. कोल्हापूर

**प्रस्तावना :**

भारताच्या आजादी की अमृतमहोत्सवी वर्षाची सांगता होत असताना , स्वातंत्र्यानंतरच्या या 75 वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक संरचनात्मक बदल झाले असले तरी सुद्धा आज भारतीय अर्थव्यवस्थेपुढे अनेक आर्थिक व सामाजिक आव्हाने उभी आहेत. ही आव्हाने आणि समस्या भारताच्या आर्थिक विकासाला अडथळा ठरत आहेत . एकीकडे भारत सन 2047 पर्यंत महासत्ता होण्याची स्वप्न पाहत आहे आणि देशाच्या अर्थव्यवस्थेपुढील आर्थिक व सामाजिक आव्हाने आज देखील संपलेली नाहीत.

देशाच्या स्वातंत्र्यानंतर आर्थिक वाढीची तात्काळ गरज लक्षात घेऊन, जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी, समाजाची गरज लक्षात घेऊन उत्पादन कार्य करण्यासाठी , साधनसामग्रीचा योग्य उपयोग होण्यासाठी , संतुलित आर्थिक विकासासाठी, मागास प्रदेश व मागासवर्गाच्या विकासासाठी, व्यक्तिगत हित आणि सामाजिक हित यामध्ये समन्वय साधण्यासाठी, गळे कापूस स्पर्धेचे उच्चाटन करण्यासाठी ,आर्थिक व सामाजिक विषमता दूर करण्यासाठी, वर्ग संघर्षास पायबंध घालण्यासाठी, देशातील नैसर्गिक संसाधनांचा अपव्यय थांबवून तिचा चांगला उपयोग करून घेण्यासाठी ,लोकांना काम मिळावे , रोजगाराच्या विपुल संधी निर्माण व्हाव्यात व बेकारीचे निर्मूलन करता यावे यासाठी देशातील उत्पादन क्षमतेची निर्मिती करून भांडवल निर्मितीचा दर वाढविण्यासाठी 01 एप्रिल 1951 पासून नियोजनबद्ध आर्थिक विकासाला नियोजन मंडळांने सुरुवात केली. भारताच्या आर्थिक इतिहासात आतापर्यंत 12 पंचवार्षिक योजना आणि सात वार्षिक योजनेच्या माध्यमातून सामाजिक आणि आर्थिक वृद्धीदर वाढवण्याचा प्रयत्न झाला. मात्र या नियोजनाच्या माध्यमातून अपेक्षित वृद्धीदर गाठता आला नाही. किंबहुना आजही भारतीय अर्थव्यवस्थे समोर अनेक आव्हाने आणि समस्या निर्माण झाल्या आहेत. यामध्ये वाढती लोकसंख्या आणि लोकसंख्या नियंत्रणाचा प्रश्न, वाढती बेरोजगारी आणि दारिद्र्य निर्मूलनाचा प्रश्न, वाढती आर्थिक विषमता, कृषी क्षेत्राची अल्प उत्पादकता , दरडोई उत्पन्न कमी, भांडवल निर्मितीचा दर कमी, पायाभूत सेवा सुविधांची कमतरता, मानवी संसाधनाचा निकृष्ट दर्जा ,औद्योगिकरणाचा अभाव ,तंत्रज्ञानाचा निम्न दर्जा यासारखी आव्हाने आज देशाच्या अर्थव्यवस्थेसमोर उभी आहेत.

**बीजसंज्ञा (key-wards) :** पायाभूत सेवा सुविधा, मानवी संसाधन, आर्थिक आणि सामाजिक घटक

**उद्दिष्टे :** अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

1) भारतीय अर्थव्यवस्थेची संरचना अभ्यासणे.
2) भारतीय अर्थव्यवस्थे पुढील आव्हाने व समस्या अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :**

सदर शोधनिबंधासाठी दुय्यम सामग्रीचा आधार घेतला असून यात प्रकाशित संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके यांचा आधार घेतलेला आहे.

**जागतिक अर्थव्यवस्थेत सध्या भारताचे स्थान :**

भारताची अर्थव्यवस्था ही अमेरिकन डॉलरच्या विनिमय दरानुसार सप्टेंबर २०२२ मध्ये जगातील ५ व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनली आहे. २०२२ नुसार, भारताचे वार्षिक सकल उत्पन्न (जीडीपी) ८५४.७ अब्ज डॉलर एवढे आहे. क्रयशक्ती समानतेनुसार (Purchasing power parity अथवा संक्षिप्तरूपात PPP) निकष लावला तर भारताच्या

अर्थव्यवस्थेचा जगात तिसरा क्रमांक लागतो. जगातील सर्वात वेगात वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा चीनपाठोपाठ दुसरा क्रमांक आहे. परंतु, अतिशय मोठ्या लोकसंख्येमुळे भारताचे वार्षिक दरडोई उत्पन्न मात्र ९६१ डॉलर एवढेच आहे, तर PPP वर आधारित वार्षिक दरडोई उत्पन्न ४,१८२ डॉलर एवढे आहे. जागतिक बँक भारताची "अल्प-उत्पन्न असणारी अर्थव्यवस्था" अशी गटवारी करते.

**भारतीय अर्थव्यवस्थे पुढील आव्हाने व समस्या :**

**१) वाढती लोकसंख्या आणि लोकसंख्या नियंत्रणाचा प्रश्न :** वाढती लोकसंख्या हे अनेक विकसनशील देशांमध्ये आर्थिक प्रगतीसाठी चालू असलेल्या मानवी प्रयत्नांना दिलेले मोठे आव्हान आहे. अवाढव्य आणि वेगाने वाढणारी लोकसंख्या ही देशाच्या आर्थिक विकासात अडथळा ठरत आहे . न्यूनतम लोकसंख्या आणि अधिकतम लोकसंख्या देशाच्या आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम करतात . पर्याप्त लोकसंख्या ही विकासच्या दृष्टीने आदर्श अशी लोकसंख्या समजली जाते. वाढत्या लोकसंख्येचे वेळीच नियंत्रण केले नाही तर अनेक सामाजिक, आर्थिक समस्या निर्माण होणार आहेत . पायाभूत सेवा सुविधांचा अभाव, वाढते प्रदूषण ,अन्न भेसळ, ग्लोबल वार्मिंग , धोकादायक ई कचरा, प्रदूषित हवा, पाणी, जमीन, सुपीक शेत जमिनीचा अभाव ,नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर ,जंगलतोड वन्यजीव व मानव यांच्यातील वाढता संघर्ष ,इंधनांचा वाढता वापर ,कधी दुष्काळ ,कधी महापूर, स्वच्छ हवा आणि पिण्यायोग्य पाण्याचा अभाव, पर्यावरणाचा ऱ्हास ,वाढते शहरीकरण झोपडपट्ट्यांचा प्रश्न ,बेरोजगारी, वाढते दारिद्र्य ,उपासमार ,जीवनसंघर्ष ,वाढते गंभीर आजार या समस्यांचे मूळ कारण हे वाढती लोकसंख्या हेच आहे.

**२) उत्पन्न व संपत्ती मधील वाढती आर्थिक विषमता :** भारतात मोठी उत्पन्नाची व संपत्तीची विषमता आढळून येते .नॅशनल सॅम्पल सर्वे ऑर्गनायझेशनच्या अलीकडील आकडेवारीनुसार देशातील ग्रामीण कुटुंबापैकी 39 टक्के कुटुंबे देशातील एकूण ग्रामीण मालमत्तेपैकी फक्त पाच टक्के मालमत्तेचे मालक आहेत तर त्यांच्यापैकी आठ टक्के उच्च कुटुंबे त्या मालमत्तेपैकी 46% मालमत्तेचे मालक आहेत . उत्पन्न व संपत्तीची विषमता शहरी भागात ग्रामीण भागाच्या तुलनेत बरीच अधिक आहे. आर्थिक विषमतेचे प्रमाण मोजण्यासाठी लॉरेंझ वक्र व त्यावरून काढलेल्या गिनी गुणकाचा वापर केला जातो.

**३) गरिबी आणि बेरोजगारी :** भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील सर्वात मोठे आव्हान गरिबी निर्मूलन आणि बेरोजगारीचे प्रमाण कमी करणे हे आहे. स्वातंत्र्यानंतरच्या 75 वर्षांहून अधिक काळातही गरिबी आणि बेरोजगारीचे प्रमाण कमी झालेले नाही. वाढती बेरोजगारी आणि दारिद्र्याचे वाढते प्रमाण हे विकासाच्या मार्गात अडथळा निर्माण करत आहेत. सन 2011-12 मध्ये नॅशनल सॅम्पल सर्वे ऑफिस च्या 68 व्या फेरीच्या आकड्यावरून नियोजन मंडळाने मोजल्यानुसार दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण संपूर्ण भारतात 21.9 टक्के, ग्रामीण भारतात 25.7 टक्के तर शहरी भारतात 13.7 टक्के होते तर बेरोजगारीचा दर नित्य दर्जाच्या आधारावर 2.2 टक्के आणि चालू दैनिक दर्जाच्या आधारावर 5.6 टक्के होता.

**४) पायाभूत सेवा सुविधांची कमतरता :** एखाद्या राष्ट्रातील विकास हा त्या देशातील कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राच्या विकासावर अवलंबून असतो. तर कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास हा त्या देशात उपलब्ध असणाऱ्या पायाभूत सेवा सुविधा व त्यांचा कार्यक्षम वापर यावर अवलंबून असतो. केवळ नैसर्गिक संसाधने व मानवी भांडवल उपलब्ध असून देशाचा आर्थिक विकास करता येत नाही तर त्यासाठी प्रगत व पुरेशा प्रमाणात पायाभूत सेवा सुविधा असाव्या लागतात. कारण आर्थिक विकास व पायाभूत सेवा सुविधा या अर्थव्यवस्थेतील एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. तसेच औद्योगिक क्षेत्र व पायाभूत सेवा सुविधा यांच्यातील कार्यकारण संबंध हा चक्रीय स्वरूपाचा आहे. म्हणून आर्थिक विकासाला पोषक वातावरण तयार होण्यासाठी पायाभूत सेवा सुविधांची उपलब्धता ही एक महत्त्वाची पूर्व अट समजली जाते. त्यामुळे पायाभूत सेवा सुविधांसाठी सूत्रबद्ध व नियोजनपूर्वक केलेली गुंतवणूक ही आर्थिक विकासाला चालना तर देतेच शिवाय दीर्घकालीन आणि शाश्वत आर्थिक विकास व समृद्धीची हमी देत असते. भारतात

रस्ते ,रेल्वे ,बंदरे ,विमान वाहतूक ,दूरसंचार ,खत कारखाने, सिंचन सुविधा, बँकिंग व विमा सेवा या व इतर पायाभूत सुविधांची कमतरता हा आर्थिक प्रगतीच्या मार्गातील महत्त्वाचा अडसर आहे.

**५) मानवी संसाधनाचा निकृष्ट दर्जा :** देशाच्या प्रगतीसाठी मानवी भांडवल अत्यंत महत्त्वाचे असते. भारतात निरक्षरता ,अज्ञान, वाईट प्रथा व परंपरा ,दैववादाचा प्रभाव ,आरोग्य विषयक सुविधांचा अभाव, प्रशिक्षणाचा अभाव या सर्व कारणांमुळेच मानवी भांडवल कमी दर्जाचे आहे. या सर्व बाबतीत भारतात अपेक्षेप्रमाणे विकास न झाल्याने मानवी संसाधनाचा दर्जा निकृष्ट राहिला आहे. मानवी भांडवलावर कामगारांची कार्यक्षमता अवलंबून असते.

**६) दरडोई उत्पन्न कमी :** दरडोई उत्पन्न म्हणजे प्रत्येक व्यक्तीचे उत्पन्न होय. देशातील एकूण उत्पन्नाला एकूण लोकसंख्येने भागले असता दरडोई उत्पन्न प्राप्त होते. विकसनशील राष्ट्रांचा विकास पूर्णपणे झालेला नसल्यामुळे त्यांचे राष्ट्रीय उत्पन्न कमी असते .उत्पन्नाची व रोजगाराची संधी कमी उपलब्ध असतात. परिणामी दरडोई उत्पन्नही कमी असते. देशाचे दरडोई उत्पन्न हे देशाच्या आर्थिक स्थितीचे महत्त्वाचे निर्देशक आहे. दरडोई उत्पन्नात वेगाने वाढ घडवून आणणे हे भारतीय नियोजनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. मात्र त्याचा स्तर कमीच राहिला आहे . 2018 /19 च्या अंदाजानुसार चालू किंमतींना मोजलेले दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न १२६४०६ रुपये प्रति वर्षे इतके होते. अर्थात हा साधा सरासरी असल्याने त्याचे लोकसंख्येतील वितरण अत्यंत असमान आहे.

**७) भांडवलाची कमतरता :** आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी भांडवलाची मुबलक प्रमाणात उपलब्ध आवश्यक असते देशात दरडोई उत्पन्न कमी असल्यामुळे बचत कमी होते .परिणामी भांडवल निर्मिती ही कमी होते .बँका व वित्तीय संस्थांची कमतरता, योग्य तारणाचा अभाव यामुळे कृषी ,उद्योग सेवा क्षेत्रासाठी योग्य वेळी पुरेशा प्रमाणात व कमी व्याजदरात भांडवल उपलब्ध होत नाही . त्यामुळे उत्पादनात वाढ ,आधुनिक तंत्राचा वापर करणे शक्य होत नाही. भारतीय भांडवल लाजरे आहे असे म्हटले जाते .याची कारणे म्हणजे भांडवल गुंतवणुकीतील धोका, कमी नफा क्षमता ,गुंतवलेले भांडवल पुन्हा परत प्राप्त करणे अवघड इत्यादी म्हणून भारतीय भांडवल अंधारातून प्रकाशाकडे येण्याची फारशी धडपड करत नाही असे म्हटले जाते. म्हणजेच भांडवलाची उत्पादक गुंतवणूक करण्याऐवजी ते अनुत्पादक बाबींमध्ये अडकून राहते किंवा बेकार पडून राहते.

**८) राष्ट्रीय उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राचे वर्चस्व :** अर्थव्यवस्थेची प्राथमिक ,द्वितीय व तृतीय क्षेत्र असतात .प्राथमिक क्षेत्रात नैसर्गिक संसाधनावर अवलंबून असणाऱ्या कृषी, पशुपालन ,मासेमारी जंगल, खाणकाम या उद्योगांचा समावेश होतो. परंतु यात कृषी क्षेत्राची भूमिका महत्त्वाची असते. द्वितीय क्षेत्रात उद्योगधंदे व बांधकाम तर तृतीय क्षेत्रात व्यापार ,वाहतूक दळणवळण, साठवणूक बँकिंग ,विमा व इतर सेवांचा समावेश होतो .विकसनशील अर्थव्यवस्थेत प्राथमिक क्षेत्राचे म्हणजेच कृषी क्षेत्राचे राष्ट्रीय उत्पन्नात व रोजगार निर्मितीत प्रमुख स्थान असते .भारतात स्वातंत्र्यप्राप्ती यावेळी राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा 60% पेक्षा जास्त होता नंतर तो कमी झाला आहे. लोकसंख्येचा मोठा गट कृषी व संलग्न कार्यामध्ये गुंतलेला असणे. मात्र कृषी क्षेत्राचे जीडीपी मधील योगदान कमी असणे हे विकसनशील अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे लक्षण असते. जीडीपीतील कृषी क्षेत्राचा हिस्सा 2018 /19 मध्ये 17.24% होता तर पाचव्या रोजगार बेरोजगार सर्वेक्षणानुसार 2015/ 16 मध्ये कामगार लोकसंख्येपैकी 46 टक्के लोक प्राथमिक क्षेत्रात गुंतलेले होते.

**९) तंत्रज्ञानाचा निकृष्ट दर्जा :** देशातील उत्पादन पारंपारिक पद्धतीने घेतले जाते .भांडवलाची कमतरता, यंत्रसामग्रीचा अभाव ,संशोधनाकडे दुर्लक्ष ,पारंपारिक दृष्टिकोन या सर्व कारणांमुळे उत्पादन व उत्पादकता कमी होते. तसेच उत्पादन निकृष्ट दर्जाचे होते. जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाल्यापासून उद्योग सेवा क्षेत्रातील तंत्रज्ञानात बदल होत आहेत .परंतु कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञानात आजही खूप मोठे बदल करणे आवश्यक आहे. उपलब्ध तंत्रज्ञानाचा दर्जा कमी राहिल्याने कृषीची प्रती हेक्टरी उत्पादकता तसेच उद्योग क्षेत्राची प्रतिकार उत्पादकता कमी आहे.

**१०) नैसर्गिक संसाधनांचा कमी वापर :** नैसर्गिक संसाधने म्हणजे निसर्गतः मानवाला मिळालेली विनामूल्य देणगी होय .या नैसर्गिक संसाधनात भूमी ,पाणी, खनिजे, वने ,सूर्यप्रकाश, वायू ,सागरी किनारा, मानवी श्रम व पशुधन या सर्वांचा समावेश होतो विकसनशील देशात भांडवलाची कमतरता तांत्रिक ज्ञानाचा अभाव, मागासलेपणा संशोधनाचा अभाव यामुळे या नैसर्गिक संसाधनांचा युक्त वापर होत नाही.

**निष्कर्ष :**

देशाच्या सर्वांगीण आर्थिक व सामाजिक विकासासाठी लोकसंख्या नियंत्रण, नवीन संशोधन पद्धतीचा अवलंब, शैक्षणिक, आरोग्य सुविधांचा विकास, पायाभूत सेवा सुविधांचा विकास यासारख्या घटकांवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

1) भारतीय अर्थव्यवस्था - किरण देसले

2) भारतीय अर्थव्यवस्था - भगीरथ प्रकाशन पुणे

3) विकिपीडिया

4) योजना मासिक

# भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल आणि भारतीय अर्थव्यवस्थे पुढील आव्हाने

**तुळशिदास मोतीराम शेंडे**
पी.एच.डी.स्कॉलर (अर्थशास्त्र) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**सारांश :-**

वर्तमान युग हे विज्ञानाचे युग मानले जाते आज जगात तंत्रज्ञानाने मोठ्या प्रमाणात प्रगती साध्य केली आहे. त्यामध्ये भारताने सुद्धा आपले स्थान निश्चित केल्याचे दिसून येते. आज भारताची अर्थव्यवस्था ट्रिलियन डॉलरची असून भारताचा विकासदर जगातील अर्थव्यवस्थेच्या तुलनेत बऱ्याच प्रमाणात उच्च स्वरूपाच्या आहे. भारतीय अर्थव्यवस्थेस 20 व्या शतकात अनेक समस्यांचा सामना करावा लागला तरी सुद्धा आज भारताचा मुक्त व्यापार धोरणामुळे परदेशी गुंतवणूक (विदेशी भांडवल) आणि तंत्रज्ञान याचा वाढता ओघ देशात दिसून येतो. परिणामी भारताची अर्थव्यवस्था वर्तमान काळात मोठ्या प्रमाणात वृद्धिंगत होत असल्याचे दिसून येते. याशिवाय भारतात मोठ्या प्रमाणावर तरुण वर्ग अस्तित्वात असल्याने उपभोग प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात वाढत आहे. परिणामतः विदेशी गुंतवणुकी चालना मिळवून राष्ट्राच्या सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होऊ लागली.

अशाप्रकारे भारताने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले व अमेरिका, युरोप, रशिया, चीन, आफ्रिका या राष्ट्राची मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करून देश विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यामुळेच भारतीय अर्थव्यवस्था विकसित होऊन राष्ट्र आत्मनिर्भर व स्वावलंबी होत असल्याचे स्पष्ट होते. भारत जरी एक विकसित राष्ट्र बनू इच्छित असले तरी राष्ट्राच्या प्रगतीमध्ये अनेक प्रकारचे आव्हाने दिसून येतात. आणि ते राष्ट्र विकासात बाधा निर्माण करणारे घटक होय.

प्रस्तुत अध्ययन भारताच्या वास्तवाचे दर्शन घडवून. अर्थव्यवस्थेत समोरील निर्माण झालेली आव्हानाची दिशा निर्धारित करून ती सोडविण्याकरिता उपायांची साधक बाधक चर्चा करून त्यावर उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना :**

भारतीय अर्थव्यवस्था ही एक मिश्र स्वरूपाची अर्थव्यवस्था असून त्यामध्ये श्रम, कृषी आणि उद्योग या घटकांवर अवलंबून आहे. प्राथमिक क्षेत्रातील अवलंबित्व, दरडोई उत्पन्नातील घट, वाढती लोकसंख्या, वाढती बेकारी, आर्थिक विषमता आणि पायाभूत सुविधाचा अभाव ही अर्थव्यवस्थेची मुख्य वैशिष्ट्ये आहेत. अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचा वाटा 14% उद्योगाचा वाटा 27% तर सेवा क्षेत्राचा वाटा 59% एवढा आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेचे महत्त्व :-**

भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील वेगवान अर्थव्यवस्था आहे. भारतीय अर्थव्यवस्था GDP नुसार जगातील दहावी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे.G-20 आणि IMF च्या मते भारत 2050 पर्यंत जागतिकदृष्ट्या दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असणार आहे.

अशाप्रकारे भारतीय अर्थव्यवस्था ही विकसनशील अर्थव्यवस्था असून 2025 च्या अखेरीस 5 ट्रिलियन डॉलर्स बनवण्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. भारत जरी एक विकसित राष्ट्र बनू इच्छित असले तरी राष्ट्राच्या प्रगतीमध्ये अनेक प्रकारचे आव्हाने दिसून येतात. आणि ते राष्ट्र विकासात बाधा निर्माण करणारे घटक होय.उदा. वाढती लोकसंख्या, गरिबी, भ्रष्टाचार, काळा पैसा, अयोग्य शिक्षण, वाढती वित्तीय तूट, अन्नसुरक्षा, शेतकऱ्याचे प्रश्न, वाढती महागाई, विदेशी कर्जाचा वाढता भार आणि ग्रामीण अर्थव्यवस्था इत्यादी.

अशाप्रकारे अर्थव्यवस्थेचे वास्तविक दर्शन घडवून त्यातील समस्या सोडवून राष्ट्रास आत्मनिर्भर बनवणे आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील विभिन्न आव्हाने :-**

1) वाढती लोकसंख्या. 2) बेकारी.

3) वाढते दारिद्र्य. 4) अयोग्य शिक्षण प्रणाली.

5) भ्रष्टाचार. 6) बालमजूर.

7) अन्नसुरक्षा. 8) कृषीविषयक समस्या.

9) वाढता महागाई दर. 10) विदेशी कर्जाचा भार.

11) वाढती वित्तीय तूट.

**वाढती लोकसंख्या :-**

भारताची वर्तमानकालीन लोकसंख्या 142.24 कोटी इतकी असून देशातील मृत्यूदरापेक्षा जन्मदर प्रमाण अधिक दिसून येते. हे प्रमाण मध्यम व गरीब वर्गामध्ये अधिक असल्याने देशात गरिबाचे प्रमाण सतत वाढताना दिसते. त्यामुळे लोकसंख्या नियंत्रण राष्ट्र विकासात महत्त्वपूर्ण ठरते.

**वाढती बेरोजगारी :-**

वर्तमान काळात भारतीय अर्थव्यवस्थेची आर्थिक स्थिती भक्कम असून परदेशी गुंतवणूक वाढत आहे. बाजारपेठांचा विस्तार होऊन अनेक लहान मोठे उद्योग निर्माण होत आहेत. परंतु त्या उद्योगास आवश्यक असणारे कौशल्य कामगाराकडे उपलब्ध नसल्याने अनेक श्रमिकांना बेकार राहावे लागते. त्याकरिता शहरी व ग्रामीण भागात कौशल्य विकास प्रशिक्षणाची सुविधा निर्माण केल्या पाहिजे.

**प्रादेशिक विषमता :-**

आज देशात महाराष्ट्र, गुजरात, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, दिल्ली, पंजाब, हरियाणा ही राज्य उद्योग प्रधान असल्याने तिथे रोजगार, राहणीमान, शिक्षण आणि आरोग्य इत्यादी सेवा मोठ्या प्रमाणात दिसून येतात.परंतु इतर राज्यात अशा प्रकारच्या सुविधा दिसून येत नाही. त्यामुळे तिथे अनेक प्रकारच्या अडचणी दिसून येतात. परिणामी या राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्रादेशिक विषमता दिसून येते.

**वाढता भ्रष्टाचार :-**

वर्तमान काळात लाच देणे व लाच घेणे ही सर्वसामान्य बाब झालेली आहे. कोणतेही सरकारी खाते व प्रशासकीय उपक्रम, बांधकाम विभाग, महामंडळ, आरोग्य सेवा, पोलीस विभाग, वाहतूक व्यवस्था, महानगरपालिका, ग्रामपंचायत, शासकीय नोकरी यामध्ये कायद्याचा तितकासा वचक दिसून येत नाही.आज कोणतेही कार्य हे वर्तमानात भ्रष्टाचारा विना होताना दिसून येत नाही.

**मूलभूत सेवांची कमतरता :-**

कुठल्याही राष्ट्राचा सर्वांगीण विकास हा त्या राष्ट्रात राबविण्यात येणाऱ्या पायाभूत व मूलभूत सुविधांवर अवलंबून असतो.परंतु त्या सुविधांचा लाभ देशातील लोकांना योग्य प्रकारे मिळत नसेल तर अश्या सुविधा देशाच्या विकासात अडसर ठरतात. उदा.- विद्युत, पाणीपुरवठा, रस्ते, वाहतूक, दळणवळण, आरोग्य, शिक्षण, अन्नपुरवठा इत्यादी परंतु देशात या सुविधांची बऱ्याच प्रमाणात कमतरता असल्याचे दिसून येतात.

**दरडोई उत्पन्नातील कमतरता :-**

कोणत्याही देशाचा महसूल हा लोकांच्या क्रयशक्तीवर अवलंबून असतो. व्यक्तीचे उत्पन्न जेवढे जास्त तेवढीच मागणी जास्त. परिणामतः राष्ट्राच्या महसुलात वाढ होते. परंतु दिवसेंदिवस महागाई दरात सतत वाढ होत असल्याने प्रति व्यक्ती उत्पन्न कमी होत आहे.

**अप्रगत तंत्रज्ञान :-**

भारतात वापरण्यात येणारे श्रम बहुदा केंद्रिकृत स्वरूपाचे असल्याने उद्योगांना लागणारे तंत्रज्ञान आणि देशात वापरण्यात येणारे तंत्रज्ञान यात मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते. आजही ग्रामीण भागात नवीन (आधुनिक ) स्वरूपाचे तंत्रज्ञान लघु उद्योगापर्यंत पोहोचलेले नाही कारण इथे अनेक सुविधांचा अभाव दिसून येतो.

**उत्पन्नातील विषमता :- (आर्थिक विषमता)**

वर्तमान काळात भारत जागतिक दृष्ट्या विकसनशील देश असून प्रगत राष्ट्राच्या बरोबरीने विकास करीत असला तरी भारतीय समाजातील उत्पन्न वितरणातील विषमता मोठ्या प्रमाणात दिसून येते. देशातील 5 % लोकांकडे 80 % संपत्ती आहे. त्यामुळेच श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब अधिक गरीब होताना दिसून येतो परिणामी समाजात मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता दिसून येते.

**कृषी विरोधी कायदे :-**

भारत कृषीप्रधान देश असून कृषी हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे.आणि शेतकरी हा राष्ट्राचा पोशिंदा असल्याने शेतकरी जगला तर राष्ट्र जगेल.परंतु याच शेतकऱ्याच्या कृषी विषयक रास्त असणाऱ्या मागण्यांकडे सरकारने दुर्लक्ष करून, कृषीविरोधी काळे कायदे केली. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये सरकारविरोधी असंतोष निर्माण होऊन त्याचा परिणाम कृषी उत्पादनावर दिसून येतो.

**वाढता महागाई दर :-**

कोरोना मुळे संपूर्ण जग आर्थिक संकटात सापडले असतानाच रशिया युक्रेन युद्धामुळे जागतिक वस्तूचा पुरवठा कमकुवत झाल्याने. अन्न, ऊर्जा व इतर ग्राहकोपयोगी वस्तूच्या किमती लक्षणीय वाढू लागल्या. त्याचाच प्रभाव भारतामध्ये 2023 मध्ये सर्वच वस्तूच्या किमतीचा दर वाढत असल्याने सर्वसामान्य जनतेस आपले जीवन जगणे कठीण होत आहे.जून 2021 मधील सांख्यिकीय माहितीच्या आधारे भारतात घाऊक महागाईचा निर्देशांक 12.94% वर पोहोचला असल्याचे दिसून येते.

**वाढती वित्तीय तूट :**

आत्तापर्यंत भारताच्या देशांतर्गत व्यापाराने भारतीय अर्थव्यवस्थेस मोठा आधार दिला. रिझर्व बँकेच्या अहवालानुसार भारतीय अर्थव्यवस्था जागतिक संकटाकडे जात असल्याचे वर्तविले आहे. ज्यात देशाच्या GDP मध्ये 20% होणारी भारताची निर्यात कमकुवत स्थितीत आहे.तरीसुद्धा भारत आपल्या उत्पन्नापेक्षा अधिक प्रमाणात खर्च करीत असल्याने चालू खात्यातील तूट वित्तीय तूट या दोन्ही बाबी झपाट्याने वाढणे हे राष्ट्रासाठी चिंताजनक आहे.

**विदेशी कर्जाचा भार :-**

भारत सरकारवर 2013-14 मध्ये 63 लाख करोड रुपयावरून 2022-23 मध्ये 205 लाख करोड रुपये एवढे कर्ज झाले. मार्च 2023 मध्ये एकूण GDP च्या तुलनेत 20% वाढ झाली जी 619.1 बिलियन डॉलर्स इतकी आहे. 2013-14 मध्ये विदेशी कर्ज 409.4 अरब डॉलर्स एवढे होते 2022 मध्ये 620.7 अरब डॉलर्स एवढे झाले. 2013 14 मध्ये 31.2% वरून 2021 22 मध्ये 47.1% कर्जामध्ये वाढ झाली. तर विदेशी मुद्रा भंडार मार्च 2022 मध्ये 100.6% वरून कमी होऊन 97.8% एवढा झाला. ( RBI & IMF Economy Survey )

अशाप्रकारे वर्तमानकालीन सरकारने राष्ट्र विकासाच्या योजनेत अंतर्गत अकार्यक्षम विदेशी कर्जाची उचल करून देशाच्या एकूण कर्जात भर टाकल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष व शिफारशी :-**

भारताच्या विकासासाठी नव्हे तर राष्ट्रांसमोर निर्माण झालेल्या आव्हानास पेलविण्याचे सामर्थ्य निर्माण करण्याची वर्तमान काळात नितांत गरज आहे. आणि ते अशक्य देखील नाही ! जसे - जगातील मोठमोठे विकसित राष्ट्र उदा. जपान, मलेशिया, थायलंड, रशिया, दक्षिण कोरिया या राष्ट्रांनी त्यांच्यावर आलेल्या 1990 च्या आर्थिक संकटावर

गांभीर्यपूर्वक विचार करून योग्य नियोजन आराखडा तयार करून अवघ्या कमी कालावधीतच किमान दहा ते बारा वर्षामध्ये संकटावर विजय मिळविला. भारतास ते साध्य करण्यासाठी यथार्थ नियोजन व प्रबळ इच्छाशक्तीची गरज आहे. देशात धर्माच्या नावावर राजकारण न करता, धर्मापलीकडे जाऊन मानवतावादी दृष्टिकोन स्वीकारून राष्ट्र विकासावर लक्ष केंद्रित करून गरीब वर्गाच्या उत्थानाकरिता त्यांना मोठ्या प्रमाणात रोजगार व सेवा उपलब्ध करून दिल्यास त्यांचे दरडोई उत्पन्न व राष्ट्रीय उत्पन्न देखील वाढेल. त्यामुळे देशातील गरिबी व दारिद्र्य नष्ट होऊन समाजाचा जलद गतीने विकास होईल. त्याकरिता योग्य नियोजन व प्रभावि कार्यप्रणाली आणि राजकीय इच्छा शक्तीचे पाठबळ गरजेचे आहे. ते शक्य झाल्यास विकसनशील राष्ट्राचे रूपांतर विकसित राष्ट्रात होऊन भारत एक महासत्ता होण्यास शंका नाही.

**शिफारशी** :-

- ★ गुंतवणुकीचे पुनरुज्जीवन करून विदेशी गुंतवणुकीस आकर्षित करणे.
- ★ पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे.
- ★ निर्यातीस प्रोत्साहन देणे.
- ★ नवनवीन उद्योग निर्माण करून व्यावसायिक क्षेत्रास प्रोत्साहन देणे.
- ★ कौशल्यपूर्ण शिक्षणावर विशेष भर देणे.
- ★ कृषिविषयक धोरणांची निश्चिती करणे.
- ★ संरक्षित बाजारपेठाची निर्मिती करणे.
- ★ विदेशी कर्जाचे प्रमाण कमी करणे.
- ★ अनावश्यक खर्चाचे प्रमाण टाळून वित्तीय तूट कमी करणे.

**संदर्भ** :-


1) झामरे जीएन 'भारतीय अर्थव्यवस्था' पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर.
2) मिश्र जगदीश नारायण ( 2011 )'भारतीय अर्थव्यवस्था'.
3) देसाई व भालेराव ( 2011 ) 'भारतीय अर्थव्यवस्था' निराली प्रकाशन.
4) दत्त गौरव महाजन.अश्विनी 'भारतीय अर्थव्यवस्था' कंपनी प्रा. लिमिटेड नई दिल्ली.
5) कराडे जगन-'जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने' डायमंड पब्लिकेशन 264/3.
6) निकन अविनाश अर्थ संवाद 'आधुनिक शेती' विशेषांक जानेवारी मार्च 2013.
7) साठे मधुसूदन 'नव्या जगाचे अर्थकारण' डायमंड पब्लिकेशन्स 1691.
8) RBI Buletin January,2023
9) आर्थिक सर्वेक्षण, 2019-20.
10) http//www.theindiabussinessline.com / economy / centre on track to achieve fiscal deficit target for economy survey .

# बजेट 2024-25
# स्थैर्याकडून सामर्थ्याकडे

**सौ. भारती माने**
ग्रंथपाल डी.जे.जी.ए.सी.एस. कॉलेज वडूज

विशिष्ट कालावधी ठराविक उद्दिष्टे साध्य करण्याच्या उद्देशाने देशातील एकंदर साधन संपत्तीचा जास्तीत जास्त फायदेशीर उपयोग करुन घेण्यासाठी योजना आखणे आणि त्याची अंमलबजावणी करणे म्हणजे आर्थिक नियोजन (बजेट) होय. भांडवलाच्या गुंतवणुकीमुळे झालेली राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ पूर्णपणे उपभोगावर खर्च नव्हता. त्यापैकी बहुतांश उत्पन्नाचा भांडवल निर्मितीकरिता उपयोग झाला पाहिजे उपभोगप्रवृत्ती व बचत प्रवृत्ती ह्याचा समतोल ढळू न देता विकसनशिल राष्ट्रात बचत प्रवृत्ती वाढविणे आवश्यक असते. तसेच अर्थव्यवस्थेत काही क्षेत्रे परस्परांशी निगडीत असतात त्याचा विकास एकवेळी होईल याचा विचार बजेटमध्ये महत्वाचा ठरतो. भारताचा आर्थिक विकास करणे आणि सामाजिक समता प्रस्थापित करणे हा मुख्य हेतू नजरेसमोर ठेवून भारतात नियोजन करत असताना राष्ट्रीय उत्पन्न वाढविणे, गुंतवणूक उत्पन्न अनुपात वाढविणे उत्पन्नाच्या वितरणात समानता आणणे, रोजगारात वाढ, दारिद्रय निर्मूलन, शिक्षण, आरोग्य, देश स्वयंपूर्ण बनविणे हीच मूलभूत ध्येय आर्थिक नियोजनात प्रेरित असतात.

2014 ते 2023 या दहा वर्षाच्या सरकारने सावरलेली अर्थव्यवस्था व तीचा प्रवाह स्थैर्याकडून सामर्थ्याकडे वाटचाल करत असताना आर्थिक धोरणांचा केंद्रबिंदू असणारे चार महत्वाचे घटक शेतकरी, महिला, युवक गरीब वर्ग यांच्या क्षमता वाढविण्यासाठी योजना आखल्या गेल्या आहेत. नोटबंदी जी.एस.टी. (GST) बॅकामधील थकित बुडीत कर्जाच्या समस्येचे निराकरण, कोविड 19चे जागतिक महासंकट भारताची परकीय चलनाची गंगाजळी 600 अब्ज डॉलर आहे. संशोधन आणि संकल्पातील एक लाख कोटी रुपयाची घोषणाचा संदर्भ देत पंतप्रधान म्हणाजले की या ऐतिहासिक अर्थसंकल्पात नवद्योगासाठी सवलती देण्यात आल्या आहेत. देशाच्या कृषी क्षेत्रात महत्वाच्या असलेल्या तेलबिया आणि दूध उत्पादन यासाठी केंद्रीय अर्थमंत्र्यानी योजनांची घोषणा केली. खाद्यतेल अभियान पशुधन, दुग्धप्रक्रिया सुविधा तेलाबियानाच्या उत्पादनाला चालना देण्यात आली.

गरीबाचे कल्याण हेच देशाचे कल्याण- भारतीय अर्थव्यवस्था 5 ट्रिलियन डॉलवर जाईल, असा आत्मविश्वास व्यक्त करण्यात आला होता गेल्या तीन वर्षात भारताने 7% अधिक गतीने आर्थिक विकास साध्य केला आणि 2024-25 मध्येहीतो अधिक गतीने साधला जाईल असेही नमूद होत असताना गरिबाचे कल्याण अभ्यासने महत्वाचे ठरते गरिबांचे कल्याण हेच देशाचे कल्याण 'सबका साथ सवाल विकार' मंत्र घेऊन नरेंद्र मोदी हे देशासाठी काम करत असताना गरीब, महिला, शेतकरी, यांची प्रगती साधने याला प्राधान्य आहे. गरिबाचे कल्याण हेच देशाचे कल्याण आहे. त्यामुळे गेल्या वर्षात 25 कोटी लोक हे दारिद्रयरेषेच्या बाहेर आले आहेत.

'गरीब कल्याण म्हणजे देश कल्याण' या सुत्रास प्राधान्य देणारा कार्यक्रमात 80 कोटी लोकांना 2025 पर्यंत मोफत अन्नधान्य देण्याचा प्रयत्न आहे. पंतप्रधान जनआरोग्य योजनेत 5 लाख रुपयांपर्यंत वैद्यकीय खर्च उपलब्ध होणार आहे. जनधन योजना, 38 लाख कोटी वितरित झाले आहेत 78 लाख फेरीवाल्यांना पंतपुरवठ्या करण्यात आल्या 3कोटी गरिबांना 30 युनिट वीज मोफत वाटप नव नवे शैक्षणिक धोरण 2020 धोरणात कौशल्यविकास नाविन्यता, कोटीच्या विकासावर भर देण्यात आला आहे. संशोधनासाठी 1लाख कोटी नारी शक्तीसाठी लखपती दिदी 2 कोटी झाली असून ती 3 कोटी करण्याचे उद्दीष्ट आहे.

मुद्रा योजनेतंर्गत 30 कोटी कर्ज महिला उद्योजनकांना दिले असून तेहेरी तलाफ रद्द करणे ग्रामीण गृहप्रकल्पांत महिलांना 70% घरे दिली आहेत. भ्रष्टाचार मुक्त देश संकल्पना युवकांसाठी 'स्किल इंडिया मिशन अंतर्गत' 1.40 कोटी शेतक-यांसाठी किसान योजने अंतर्गत 11.8 कोटी आर्थिक मदत देण्यात आली. शालेय व उच्चिशक्षण भरीव तरतुद अर्थसंकल्पात भर दिला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरुन एकुणच शैक्षणिक गुणवत्ता व दर्जासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतुद करुण ६९ हजार कोटी खर्च करण्याची तरतुद आहे. शिक्षणावरील खर्चात १४% वाढ अपेक्षीत आहे 'स्टडी इन इंडिया' या योजनेद्वारे परदेशी विद्यापीठांना भारतात आणण्यासाठी मदत होणार आहे. वैद्यकीय महाविद्यालय वाढण्याची घोषणा, दळणवळण राज्यातील रेल्वे प्रकल्पांसाठी १५हजार ५५४कोटीची तरतूद केंद्रीय अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील रेल्वे स्थानकांचे पुनरुज्जीवन देशातील विमानतळांची संख्या वाढून १४९ भारतीय विमान कंपन्यांनी १००० हून अधिक नवीन विमानांसाठी केली आहे.

पर्यटन क्षेत्राबाबत राज्यांमधील महत्वाच्या पर्यटन केंद्रचा सर्वसमावेशक विकास आराखडा घोषणा तसेच संरक्षण क्षेत्रामध्ये लक्षवेधी तरतुद २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी जाहीर करण्यात आली. भारता शेजारी देशांमुळे निर्माण झालेले सुरक्षेचे आव्हान आणि जागतिकस्तरावर बदलणारी भूराजकीय स्थिती पाहता संरक्षण दलाचा आधुनिकीकरणाला वेग देणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी सरकारने संरक्षण दलासाठी वाढीव निधी उपलब्ध करु दिला आहे अंदाजपत्रात 62 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

डीपटेक तंत्रज्ञानाला संरक्षणक्षेत्रात प्राधान्य देण्याची एक घोषणा व चालू २०२४-२५च्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येणार आहे. जे-ड्रोनच्या, युरोप, कॉरिडॉर, संरक्षणक्षेत्रात, आधुनिकीकरणात नवीन लांब पाल्याच्या बंदुका, रनगाडे, उबदार कपडे चिलखते चिलखती वाहनांचा समावेश, तेजस विमान २६ रॉकेट विमाने कोयीन शिपयार्ड आणि माझ गाव जॅक्समध्ये नोंदलासाठी युध्दनौकांची निर्मितीची तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

जागतिक आर्थिक विश्वास सातत्याने 'डी-डॉलरायझेशन' ची चर्चा जोरदारपणे सुरु आहे. अनेक अर्थतज्ञाच्या मते डॉलर या अमेरिकन चालनाव्यतिरिक्त आणखी एका चलनाला राखीव चालनाच दर्जा मिळायला पाहिजे जेणेकरुन अमेरिकन डॉलरच्या वर्चस्वाला आव्हान देता येईल. भारताचे चलन असणा-या रुपयाला राखीव चलनाचा दर्जा मिळू शकतो. असे मत जेष्ठ अर्थतज्ञ उदय कोटक यांनी व्यक्त केले. डॉलर हे अमेरिकेच्या हाती असणारे सर्वात मोठे आयुध आहे आणि त्याचा पुरेपूर वापर ही महसत्ता करत आली आहे. जगातील मध्यवर्ती बॅकांमध्ये असलेल्या परकीय चलनाच्या साठ्यापैकी ६०%प्रमाण एकट्या डॉलरचे आहे डॉलर अमेरिकेला जागतिक राजकीय आणि आर्थिक मंचावर सर्वात मोठी शक्ती देणारे चलर आहे डॉलरच्या या मक्तेदारीमुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांना हादरे बसत आहेत जेणे करुन अमेरिकन डॉलच्या वर्चस्वाला आव्हान देण्यासाठी भारतीय चलन असणा-या रुपयाला बलवान करुया!

२०२४-२५ च्या अर्थसंकल्पात मागणीच्या समस्यांना तोड देत असलेल्या करदात्यांनी दिलासा दिला आहे. या अर्थसंल्पात१९६२पासून सुरु असलेल्या 'विवादित प्रत्यक्ष कर मागणी' साठी एक संकल्प योजना जाहीर केली आहे. सरकारने २००९-१०या आर्थिक वर्षापर्यतच्या कालावधीसाठी २५हजार रुपयांपर्यंत आणि २०१०-२०११ ते २०१४-२०२५ या आर्थिक वर्षातील कालावधीसाठी १० हजार रुपयांपर्यंत थेट कर मागण्या माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. नवीन कर योजनेतर्गत आता ७लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्या करदात्यांना कोणतेही कर दायित्व नाही याची तरतूद करण्यात येणार आहे.कर भरण्यात मुदतवाढ, परदेश सहलीवरच्या कराचा जाच अधिकतपणे संपवणे तरतूद प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कर यांचे दरदेखील सध्या आहेत तसेच राहतील हे आदर्श व कौतुकास्पद पवित्रा आहे. एकुणच वित्तीय तुटीवर नियंत्रण व पायाभूत सुविधावर भर असा हा अर्थसंकल्प विकसित भारताच्या गॅरंटीकडे वाटचाल करु पहात आहे.

'आर्थिक नियोजनाशिवाय जलद आर्थिक विकास शक्य नाही.'

**संदर्भ**

1) देव झागरे– राजस्व,पिपळापुरे अॅण्ड पावलाशिग नागपूर 1st Ed 1988 P436 Rs2000/-
2) डॉ टालगे, डॉ वावरे– भारतीय अर्थव्यवस्था नियर्त प्रकाशन 1st Ed 2010 P524 Rs.350/-
3) डॉ. मेधा कानेटकर भारतीय अर्थशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, 1st Ed 2012 Rs.250/-

# डिजीटल भारत सशक्त भारत : एक अध्ययन

**प्रा. डॉ. आनेराव एम. एम.**

(समाजशास्त्र विभाग प्रमुख) लोकमान्य महाविद्यालय सोनखेड ता. लोहा जि. नांदेड

**1.प्रस्तावना**

भारत सरकारने 1 जुलै 2015 रोजी "डिजिटल इंडिया" हा अतिशय महत्त्वकांक्षी कार्यक्रमाचा शुभारंभ माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते सुरू करण्यात आला. या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश म्हणजे भारताला डिजिटल सशक्त समाज आणि ज्ञान अर्थव्यवस्थेत रूपांतरित करण्याची दृष्टी होय. याच्या अंमलबजावणीमुळे देशातील विविध क्षेत्रांमध्ये सरकारी सेवा सहज उपलब्ध होतील. भारतातील तंत्रज्ञानाचा वापर वाढून हे देशातील ऑनलाईन पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करून सरकारी सेवा नागरिकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सहज उपलब्ध करून देणे या मागचा उद्देश आहे.

देशाला डिजिटल सक्षम बनवण्यासाठी इंटरनेट कनेक्टिव्हिटी वाढविण्यासाठी, दैनंदिन जीवनात तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी डिजिटल इंडिया या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आलेली आहे. आजच्या आधुनिक काळात इंटरनेट कनेक्टिव्हिटी किती आवश्यकता आहे हे सर्वांना समजले आहे. डिजिटल इंडिया या कार्यक्रमामुळे मानवी जीवनमान पूर्णपणे बदललेले दिसून येत आहे. या तंत्रज्ञानाने लोकांचे जीवन सोयीस्कर बनवले आहे. आज भारतीय लोकसंख्येचा एक मोठा वर्ग इंटरनेट वापरतो. डिजिटल इंडिया कार्यक्रमाची मोहीम ही देशाला खरोखरच आवश्यक असलेले वरदान आहे. अगदी दुर्गम खेड्यातील राहणाऱ्या लोकांकडे इंटरनेटची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे ते बाह्य जगाशी जोडले गेले आहेत.

डिजिटल इंडिया मोहिमेचा एक प्रमुख घटक म्हणजे सरकारी सेवा आणि इतर आवश्यक सेवा डिजिटल पद्धतीने जनतेसमोर पोहोचविणे. डिजिटल इंडिया मोहिमे अंतर्गत भारत सरकारच्या अनेक सेवा डिजिटल करण्यात आल्या. या योजना अंतर्गत सर्व मंत्रालय जोडून सर्व विभाग, आरोग्य सेवा, बँकिंग, शिक्षण, शिष्यवृत्ती, पाणी आणि विज बिल आणि न्यायिक सेवा इत्यादी मूलभूत सेवा सामान्य नागरिकापर्यंत पोहोचू शकतील. लोकांचे दैनंदिन व्यवहार ही डिजिटल मोडमध्ये रूपांतरित झाले आहेत. व्यवहारांमध्ये पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी आणि भ्रष्टाचाराला आळ घालण्यासाठी सर्व पैशाचे व्यवहार ऑनलाईन केले जात आहेत. डिजिटल इंडिया कार्यक्रमाच्या आपल्या देशाच्या विकासावर मोठा परिणाम झालेला आहे. त्याचे परिणाम आर्थिक, पर्यावरणीय आणि सामाजिक म्हणून पाहिले जाऊ शकते. या दृष्टीने डिजिटल इंडिया या महत्वकांक्षी कार्यक्रमाचे अध्ययन करणे अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते.

**2. शोधनिबंधाचे महत्त्व**

प्रस्तुत शोधनिबंधाचे महत्त्व पुढील प्रमाणे स्पष्ट करण्यात येईल.

1. आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये इंटरनेट कनेक्टिव्हिटी चे महत्व वाढत आहे या दृष्टीने अध्ययन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.
2. डिजिटल भारत कार्यक्रमाच्या वस्तुस्थितीचे अध्ययन करणे.
3. देशातील पायाभूत सुविधांमध्ये ऑनलाईन कनेक्टिव्हिटी पद्धतीची योगदान यांचा आढावा घेणे.

**3. संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधअध्ययनासाठी दुय्यम स्त्रोतांचा अवलंब करून त्याचे संकलन करण्यात आलेले आहे. अध्ययन विषयाची अनुषंगिक दुय्यम तथ्य संकलित करण्यासाठी विषयाशी संबंधित प्रकाशित असलेले शोध अध्ययन साहित्य,

संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, संकेत स्थळे इत्यादी दुय्यम साधनांचा माध्यमातून डिजिटल इंडिया संबंधित तथ्यांचेअवलोक आणि संकलन करण्यात आलेले आहे.

**4. आशय विश्लेषण**

आजच्या युगात ऑनलाइन सेवांची लोकप्रियता व व्याप्ती वाढत आहे. याचाच एक भाग म्हणून डिजिटल इंडिया हा भारत सरकारच्या अंतर्गत 2015 मध्ये सुरू झालेला एक अत्यंत महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे. हा एक असा कार्यक्रम आहे की ज्यामध्ये देशाच्या डिजिटल प्रगतीच्या विविध योजनांचा समावेश आहे. देशभरातील ऑनलाईन पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करून सरकारी सेवा नागरिकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सहज उपलब्ध करून देणे हा यामागचा उद्देश आहे.

डिजिटल इंडिया या कार्यक्रमाचे मुख्य 3 दृष्टिकोन आहेत. 1) सर्व नागरिकांना उपयोगी असतील अशा डिजिटल पायाभूत सुविधा निर्मिती ज्यामध्ये वेगवान इंटरनेट, जन्मापासुन मृत्युपर्यंत नागरिकांना ओळख डिजिटल आणि वित्तीय क्षेत्रात सहभागासाठी मोबाईल व बँक खात्याचा वापर, सामूहिक सेवा केंद्राची उपलब्धता सामूहिक क्लाऊडवर वापरण्याजोगे खाजगी क्षेत्र, सुरक्षित सायबर क्षेत्र इत्यादी. २)मागणीनुसार शासन आणि सेवा-यामध्ये वेगवेगळ्या विभागाच्या आणि कार्यक्रमाच्या एकात्मिक सेवा, ऑनलाईन व मोबाईलच्या माध्यमातून वेगवेगळ्या योग्य ते वेळेत सेवांची उपलब्धता सर्व नागरिकांना इंटरनेटवर येण्याचा हक्क, व्यवसाय, करण्यासाठीचा नियमांचे सुलभीकरण करण्यासाठी डिजिटल सेवा इलेक्ट्रॉनिक आणि नोट विरहीत व्यवहाराची निर्मिती, GIS तंत्रज्ञानाचा आधार घेणे इ. ३)नागरिकांचे डिजिटल सक्षमीकरण: यामध्ये वैश्विक डिजिटल साक्षरता, डिजिटल संसाधनाची वैश्विक उपलब्धता, डिजिटल संसाधनाची / सेवांची भारतीय भाषांमध्ये उपलब्धता, सहभागात्मक शासनासाठी सहयोगी डिजिटल रचनांची उभारणी इ. दृष्टिकोन समोर ठेवून डिजिटल इंडिया कार्यक्रमाची आणखी करण्यात आली.

डिजिटल इंडिया कार्यक्रमांतर्गत ब्रॉडबॅड महामार्ग स्थापन करून देशातील सर्व ग्रामपंचायती ब्रॉडबॅडने जोडण्यात नियोजन करण्यात आले. मोबाईल कनेक्टिव्हिटी सुविधा नसलेल्या गावांमध्ये सुविधा पुरविणे, नेटवर्क वाढविणे यावर भर देण्यात आला. सर्व शाळा ब्रोडबंड जोडणी देऊन मोफत वायफाय सेवा पुरविण्यात येऊन डिजिटल साक्षरता कार्यक्रम आखण्यात आला. ऑनलाईन अभ्यासक्रमाचा विकास यावर भर देण्यात आला. शेती तंत्रज्ञान, बँकिंग क्षेत्र, मोबाईल बँकिंग ऑनलाईन कागदपत्राची उपलब्धता, डिजिटल लॉकर प्रणाली, स्वच्छ भारत मिशन मोबाईल ॲप, ई- हस्ताक्षर राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टल इत्यादी बाबीच्या अनुषंगाने डिजिटल इंडिया कार्यक्रमांतर्गत अमुलाग्र बदल घडून आणले आहेत. डिजिटल इंडिया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून लाखो संगणक तज्ञांना रोजगार उपलब्ध झाला आहे. तसेच दुर्गम भागात राहणाऱ्या सर्व सामान्य माणसांना या कार्यक्रमाचा प्रचंड फायदा होत आहे. तसेच शासन आणि जनता यांच्यातील संपर्क स्थापित झाला आहे. शासनाच्या अनेक योजना एका क्लिकवर समजत आहेत. डिजिटल इंडिया कार्यक्रमामुळे मानवी जीवनात अमुलाग्र बदल झालेला आहे.

**डिजिटल इंडियाचे परिणाम**

**(1) आर्थिक**

विश्लेषकांच्या निरीक्षणानुसार डिजिटल इंडिया कार्यक्रमामुळे 2025 पर्यंत भारतीय घरगुती वस्तू व सेवा उत्पादन (GDP) 1 ट्रिलियन डॉलरपर्यंत वाढू शकेल. रोजगार निर्मिती, व्यवसायांमधील वृद्धी आणि सरकारच्या महसुलामधील गळती आदी सूक्ष्म-वाणिज्यिक गोष्टींमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी या कार्यक्रमाची महत्त्वाची भूमिका असणार आहे. जागतिक बँकेच्या सर्वेक्षणानुसार सध्या भारत 915 दशलक्ष वायरलेस उपभोक्त्यांसह जगातील दुसऱ्या क्रमांकाची दूरसंचार बाजारपेठ तर 259 दशलक्ष ब्रेडबँड उपभोक्त्यांसह तिसऱ्या क्रमांकाची इंटरनेट बाजारपेठ असणारा देश आहे. सध्या देशातील ग्रामीण भागात दूरध्वनी घनता 100 पाठीमागे 45 अशी आहे आणि या कार्यक्रमामुळे ही घनता 160% ने वाढण्याची शक्यता आहे. देशामधील रोजगार निर्मितीच्या प्रयत्नांना हातभार म्हणून या

कार्यक्रमाद्वारे 1.7 कोटी लोकांना रोजगार मिळणार आहे. तसेच लहान शहरे आणि खेड्यांमधील 10 कोटी विद्यार्थ्यांना माहिती आणि तंत्रज्ञानाचे (IT) प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनविण्याचा सरकारचा मानस आहे.

**(2) सामाजिक**

निरक्षरता, गरिबी, निधीचा अभाव, माहितीचा अभाव आदी बाबींमुळे सामान्य व्यक्तिंपर्यंत सेवा आणि सुविधा पोहचण्यास अडसर होत होता. परंतु या कार्यक्रमांतर्गत मोबाईलसारख्या साधनांचा वापर वाढवून सर्वसामान्यांना देण्यात येणाऱ्या सोईसुविधांची गुणवत्ता सुधारून अभिनव समाजाचे चित्र साकारले जाईल. भौतिक सोईसुविधांच्या कमतरतेमुळे भारतामध्ये डिजिटल निरक्षरता मोठ्या प्रमाणात असून सध्या देशामध्ये डिजिटल साक्षरतेचे प्रमाण 6.5% असून 100 व्यक्तिमागे फक्त 20.83 व्यक्ती इंटरनेटचा वापर करतात. तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरानुसार या कार्यक्रमांतर्गत सर्व क्षेत्रांमध्ये साक्षरता वृद्धीसाठी सकारात्मक प्रयत्न केले जाणार आहे. शिक्षकांची कमतरता यामुळे दूर होऊ शकेल. शेतकरी, मच्छीमार इत्यादींना देखील शिक्षणाची अवगतता उपलब्ध होईल.

मोबाईल आरोग्य (M-Health) द्वारे आरोग्याची काळजी घेण्यात येणार असून याशिवाय डिजिटल सुविधेमुळे शेतकऱ्यांना बाजारानुसार उपलब्ध पीकपद्धती घेता येण्यास मदत मिळणार आहे.

**3) पर्यावरणीय**

या तंत्रज्ञानामुळे कार्बन उत्सर्जन नियंत्रण, कचरा व्यवस्थापन आदी गोष्टींना हातभार लावून प्रभावी व्यवस्थापन आणि अपारंपरिक ऊर्जास्रोतांच्या आधारे पर्यावरण ऱ्हास कमी करण्यास मदत मिळणार आहे. अद्ययावत तंत्रज्ञानामुळे प्रत्यक्ष समोरासमोर न जाता संवाद साधता येत असल्यामुळे, ऑफिसला न जाता घरून काम करणे आदी गोष्टींमुळे प्रवासासाठी लागणारा वेळ वाचणार आहे. तसेच वाढणाऱ्या प्रदूषणास यामुळे काही प्रमाणात अटकाव बसू शकतो. ब्रिटनमधील सर्वेक्षणानुसार जर कर्मचाऱ्यांनी आठवडाभरात 12 दिवस कार्यालयात न जाता घरी बसून काम केल्यास वर्षभरात 1,175 मैल प्रवासाचे अंतर वाचू शकते. ज्यामुळे 364.5 किलो कार्बन उत्सर्जन कमी करता येऊ शकते. क्लाऊड कंम्प्युटींग तंत्रज्ञानामुळे ऊर्जा वापराचे प्रमाण 2010 पासून 2020 पर्यंत 201.8 TWh (Terawatt hour) वरून 139.8 TWh होणार आहे तसेच त्यामुळे कार्बनच्या उत्सर्जनाचे प्रमाण 28% कमी करता येणार आहे. डिजिटल माध्यमांचा वापर केल्यामुळे तिकिट, वृत्तपत्र व इतर निर्मितीसाठी लागणा-या वृक्षाची तोड कमी करता येणार आहे.

**5. निष्कर्ष**

डिजीटल इंडिया कार्यक्रमाचा आपल्या भारत देशाच्या विकासावर खुप मोठा परिणाम झाला आहे. यांचे परिणाम आर्थिक, पर्यावरणीय आणि सामाजिक म्हणुन मोजले जाऊ शकतात. डिजीटल इंडियासारख्या मोहिमे मुळे भारताची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन अर्थव्यवस्थेत रुपांतरीत करण्याच्या दिशेने काम करत आहे. शासकीय योजनांची माहिती आणि सेवा सर्वसामान्य मानसापर्यंत पोहचविण्यासाठी डिजीटल इंडीया मोहिम खुप यशस्वी झाली आहे. डिजीटल क्रांतीमुळे व्यक्तींना प्रत्यक्ष समोरासमोर न जाता संवाद साधता येत आहे. डिजीटल इंडिया या अत्यंत महत्वकांक्षी योजनामुळे एकंदरीत मानवी सर्व क्षेत्रात अमुलाग्र बदल झाले आहे. यात शंका नाही.

**संदर्भ सुची**

1. प्रदिप पाटील, कल्पना सोनवणे, 2019, “माहिती तंत्रज्ञान”, प्रशांत पब्लिकेशन जळगाव.
2. संपा. जाधव तुकाराम, “बुलेटिन ऑफ यूनिक ॲकॅडमी”, ऑगस्ट 2015, पुणे.
3. संपा. जाधव तुकाराम, “बुलेटिन ऑफ यूनिक ॲकॅडमी”, सप्टेंबर 2015, पुणे.

# भारतीय सहकार चळवळीत महाराष्ट्राचे योगदान

**श्री. शिवनाथ भगवान भुजबळ**
संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
**प्रा. डॉ. अमोल तुकाराम खाडे**
सहा. प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग, देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ, जि. सोलापूर

**प्रस्तावना –**

भारताचा सहकारी चळवळीचा समृद्ध इतिहास आहे आणि महाराष्ट्र हे भारतातील सर्वात मोठ्या राज्यांपैकी एक असून, सहकारी उपक्रमांना प्रोत्साहन आणि समर्थन देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. सहकारी चळवळींचे उद्दिष्ट सहकार्य, स्वयंसहायता आणि सामूहिक निर्णय घेण्याद्वारे व्यक्ती आणि समुदायांना सक्षम बनवणे आहे.

भारतातील सर्वात प्रमुख सहकारी चळवळींपैकी एक म्हणजे कृषी क्षेत्रातील सहकारी चळवळ. महाराष्ट्रात मजबूत कृषी आधार आहे, आणि शेतकरी आणि कृषी उपक्रमांना पाठिंबा देण्यासाठी विविध सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने शेतकऱ्यांना कर्ज, कृषी निविष्ठा आणि विपणन सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (MSC बँक) ही राज्यातील सहकारी संस्था आणि शेतकऱ्यांना आर्थिक सेवा पुरवणारी प्रमुख संस्था आहे. महाराष्ट्र सरकारने कायदे, धोरणे आणि आर्थिक मदतीद्वारे सहकारी चळवळींना सक्रिय पाठिंबा आणि प्रोत्साहन दिले आहे. राज्यातील सहकारी संस्थांवर देखरेख आणि नियमन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकार विभाग जबाबदार आहे.

भारत सरकारने कृषी क्षेत्रातील सहकारी विकासाला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. नॅशनल कोऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NCDC) सहकारी संस्थांना कृषी आणि संलग्न क्रियाकलापांमध्ये आर्थिक सहाय्य प्रदान करते. नॅशनल बँक फॉर ॲग्रिकल्चर अँड रुरल डेव्हलपमेंट (नाबार्ड) कृषी सहकारी संस्थांना कर्ज सुविधा आणि तांत्रिक सहाय्य कार्यक्रमांद्वारे समर्थन देते. महाराष्ट्रात मजबूत कृषी आधार आहे आणि राज्य सरकारने कृषी क्षेत्रातील सहकारी विकासाला चालना देण्यावर भर दिला आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (MSC बँक) कृषी कर्ज पुरवते आणि विविध जिल्हास्तरीय सहकारी बँका शेतकऱ्यांना मदत करतात. याव्यतिरिक्त, महानंद सारख्या दुग्धशाळा सहकारी संस्थांनी डेअरी उद्योगाच्या विकासात योगदान दिले आहे.

भारत सरकारने शहरी रहिवाशांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी नागरी सहकारी संस्थांचे महत्त्व ओळखले आहे. विविध सहकारी गृहनिर्माण संस्था, पतसंस्था आणि ग्राहक सहकारी संस्था शहरी भागात कार्यरत असून, परवडणारी घरे, आर्थिक सेवा आणि ग्राहकोपयोगी वस्तू पुरवतात. महाराष्ट्रात एक दोलायमान नागरी सहकारी चळवळ आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थांचे नियमन करण्यासाठी, गृहनिर्माण संकुलांचे योग्य व्यवस्थापन आणि प्रशासन सुनिश्चित करण्यासाठी राज्य सरकारने महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण संस्था कायदा लागू केला आहे. नागरी सहकारी बँका आणि पतसंस्था शहरी रहिवाशांच्या आर्थिक गरजा पूर्ण करतात.

भारतातील सहकारी क्षेत्र बहु-राज्य सहकारी संस्था अधिनियम, २००२ आणि वैयक्तिक राज्यांच्या सहकारी संस्था कायद्यांतर्गत कार्यरत आहे. केंद्र सरकार राष्ट्रीय स्तरावर सहकारी विकासासाठी मार्गदर्शक तत्त्वे आणि धोरणे प्रदान करते. महाराष्ट्रातील सहकारी क्षेत्र महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० द्वारे नियंत्रित केले जाते. हा कायदा राज्यातील सहकारी संस्थांची निर्मिती, नोंदणी, कार्य आणि विघटन यासाठी कायदेशीर चौकट प्रदान करतो.

भारत सरकार धोरणे, योजना आणि आर्थिक मदतीद्वारे सहकारी विकासाला सक्रियपणे समर्थन देत आहे. राष्ट्रीय सहकारी धोरण सहकार क्षेत्राला बळकट करण्यावर लक्ष केंद्रित करते आणि नाबार्ड आणि एनसीडीसी सारख्या समर्पित

संस्था सहकारी संस्थांना आर्थिक सहाय्य, प्रशिक्षण आणि तांत्रिक सहाय्य प्रदान करतात. राज्यातील सहकार विकासासाठी महाराष्ट्र सरकारने भक्कम पाठिंबा दर्शविला आहे. महाराष्ट्र राज्य सहकार विभाग सहकारी संस्थांवर देखरेख आणि नियमन करते, त्यांचे योग्य कार्य सुनिश्चित करते. महाराष्ट्र सहकारी विकास महामंडळ (MCDC) राज्यातील सहकारी संस्थांना आर्थिक सहाय्य आणि प्रशिक्षण प्रदान करते.

हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, महाराष्ट्र हे मोठ्या भारतीय संघराज्य व्यवस्थेतील राज्य असल्याने, राष्ट्रीय स्तरावर राबविण्यात येणाऱ्या सर्वांगीण सहकारी विकास उपक्रमांचा फायदा होतो. भारत आणि महाराष्ट्र या दोन्ही देशांतील सहकारी चळवळींचा उद्देश व्यक्तींना सक्षम करणे, स्वावलंबनाला प्रोत्साहन देणे आणि सामाजिक-आर्थिक विकासात योगदान देणे हे आहे. भारताच्या सहकारी विकासाच्या प्रयत्नांनी संपूर्ण देश व्यापलेला असताना, महाराष्ट्राने राज्यातील सहकार विकासात विशेषत: कृषी आणि शहरी क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. एकूणच, भारतातील इतर भागांप्रमाणेच महाराष्ट्रातील सहकारी चळवळी समाजाच्या उत्थानासाठी, स्वावलंबनाला चालना देण्यासाठी आणि सामाजिक-आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरल्या आहेत. या चळवळींनी व्यक्तींना एकत्र येण्यासाठी, त्यांची संसाधने एकत्रित करण्यासाठी आणि सामान्य आव्हानांना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. भारत आणि महाराष्ट्राने सहकार्य आणि विकासाला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रयत्न केले आहेत. भारताच्या सहकार चळवळीच्या विकासात महाराष्ट्राचे योगदान आपणास संस्थांची संख्या , सभासद संख्या याद्वारे स्पष्ट करता येईल.

**भारतातील सहकारी संस्थाच्या विकासात महाराष्ट्राचे योगदान -** महाराष्ट्र हा सहकारात भारतामध्ये अग्रेसर असलेले राज्य आहे. भारतीय सहकार चळवळीत महाराष्ट्रामध्ये विकसित झालेल्या संस्थाची संख्या व त्याचे प्रमाण आपल्याला पुढील तक्त्यावरून लक्षात येईल.

**<u>सहकारी संस्था आणि प्रमाण (लाखांत)</u>**

| वर्ष | भारत | महाराष्ट्र | टक्केवारी |
|---|---|---|---|
| **१९६०-६१** | ३.२ | ०.३२ | ९.८८ |
| **१९७०-७१** | ३.२ | ०.४३ | १३.३१ |
| **१९८०-८१** | ३.१ | ०.६१ | १९.६० |
| **१९९०-९१** | ३.४ | १.०५ | ३०.७७ |
| **२०००-०१** | ४.९ | १.५८ | ३२.२५ |
| **२००९-१०** | ७.२ | २.२४ ( २०१०-११ ) | ३१.१५ |
| **२०१६-१७** | ९.८ | १.९५ | १९.९३ |

भारतात स्थापन झालेल्या संस्थांच्या संख्येचा विचार करता महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची संख्या ही तुलनेत मोठ्या प्रमाणावर असलेली दिसून येते. भारतात २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेश असून २०१६ -१७ साली भारतात ९.८ लाख सहकारी संस्था अस्तित्वात होत्या . त्यापैकी १.९५ लाख सहकारी संस्था महाराष्ट्रात आहे. इतर कोणत्याही राज्यापेक्षा हि संख्या जास्त आहे. २०१६-१७ साली भारतातील सहकारी संस्थांच्या १९.९३% इतक्या संस्था महाराष्ट्रात अस्तित्वात होत्या.

१९६०-६१ साली भारतातील ३.२ लाख संस्थांपैकी ९.८८% म्हणजेच ०.३२ लाख सहकारी संस्था महाराष्ट्रात होत्या. २०००-०१ या दशकापर्यंत महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची संख्या आणि त्याचे प्रमाण हे वाढते राहिले.२००१-०१ साली महाराष्ट्रात भारताच्या ३२.२५% इतक्या मोठ्या प्रमाणात सहकारी संस्था अस्तित्वात होत्या. अर्थात १९६०-६१ ते २०००-०१ हा कालावधी महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या विकासाचा सुवर्णकाळ राहिअला, असे म्हणता येईल. २०००-०१ ते

२०१०-११ या दशकात देखील महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर सहकारी संस्थांची स्थापना झाली परंतु इतर राज्यामध्ये सहकारी संस्थांची स्थापना मोठ्या प्रमाणावर झाल्याने महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचे प्रमाण नाममात्र घटून ३१.१५ % इतके झाले.

२०१५-१६ व २०१६-१७ या आर्थिक वर्षात महाराष्टातील अनेक सहकारी संस्था अकार्यक्षमता व इतर कारणाने बंद पडल्याने २०१०-११ ते २०१६-१७ हा कालावधी महाराष्ट्रातल्या सहकारी संस्थाच्या विकासातील नकारात्मक परिणाम दर्शवितो. २०१६-१७ साली महाराष्ट्रात १९.९३% इतक्या मोठ्या प्रमाणावर सहकारी संस्था होत्या. उपरोक्त दोन वर्षाचा कालावधी वगळता म्हणजेच २०१६-१७ सालानंतर महाराष्ट्रातील नवीन सहकारी संस्था मोठ्या प्रमाणावर स्थापन होत आहे.

**सहकारी संस्थांची सभासद संख्या - भारत आणि महाराष्ट्र –** भारतात सहकारी संस्थांचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला. यामध्ये आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या जनतेचा विकास हे उद्दिष्ठ होते. त्या अनुषंगाने या संस्थांत सभासद म्हणून सामील झालेल्या जनतेचा विकास घडून येण्यास मदत झाली. महाराष्ट्रातील किती व्यक्तींनी या चळवळीद्वारे आपला विकास करून घेतला व त्याचे देशस्तरावरील सहभागी झालेल्या लोकांशी प्रमाण किती ते आपणास पुढील ताक्त्याद्वारे लक्षात येईल.

**सहकारी संस्थाची सभासद संख्या आणि प्रमाण ( कोटीमध्ये )**

| वर्ष | भारत | महाराष्ट्र | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९६०-६१ | ३.४२ | ०.४२ | १२.२८ |
| १९७०-७१ | ५.९१ | ०.८६ | १४.५५ |
| १९८०-८१ | १०.७५ | १.४८ | १३.७७ |
| १९९०-९१ | १५.४४ | २.६९ | १७.४२ |
| २०००-०१ | १७.३५ | ४.३० | २४.४८ |
| २००९-१० | २२.९६ | ५.३० ( २०१०-११) | २३.०८ |
| २०१६-१७ | २७.२९ | ५.४६ | २०.०१ |

१९६०-६१ साली भारतातील सहकारी संस्थांमध्ये ३.४२ कोटी सभासद संख्या होती त्यापैकी महाराष्ट्रात ०.४२ कोटी म्हणजेच १२.२८ % संख्या सभासद म्हणून नोंदली गेली.हे प्रमाण २०००-०१ या वर्षापर्यंत वाढत्या दराने वाढून २०००-०१ साली भारतातील १७.३५ कोटी सभासदांपैकी महाराष्ट्रात २४.४८% म्हणजेच ४.३० कोटी सभासद संख्या नोंद झाली होती. भारतातील इतर कोणत्याही राज्यांपैकी हे प्रमाण सर्वात जास्त होते. परंतु २०००-०१ ते २०१०-११ या वर्षात इतर राज्यांमध्ये सहकारी चळवळीचा विकास महाराष्ट्रच्या तुलनेत अधिक झाल्याने महाराष्ट्रात सहकारी संस्थांतील सभासद संख्या ४.३० कोटी वरून ५.३० कोटी झाली परंतु त्याचे देशाच्या सभासद्संख्येशी प्रमाण २३.०८ % इतके राहिले. पुढील दशकात २०१५-१६ व २०१६-१७ या आर्थिक वर्षात अनेक सहकारी संस्था बंद पडल्या तरी सभासद संख्येत घटत्या दराने वाढ आपणास झालेली दिसून येईल. भारताच्या २०१६-१७ साली असलेल्या एकूण २७.२९ कोटी सभासद संख्येपैकी ५.४६ कोटी सभासद संख्या ही महाराष्ट्रातील सहकारी संस्थांमध्ये होती, याचे प्रमाण २०.०१% होते. सभासदांची झालेली ही वाढ महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या गुणात्मक वाढीचे एक प्रमाण मानता येईल.

भारताच्या सहकार चळवळीच्या विकासात महाराष्ट्राचे मोठे योगदान आहे. या योगदानामुळेच महाराष्ट्राचा पर्यायाने देशातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या नागरिकांच्या जीवनात अमुलाग्र बदल झालेला आपणास दिसून येतो.

**संदर्भ** –

१. माथुर बी.एस. (२००५) ‘ को-ऑपरेशन इन इंडिया’ पान क्र.१७२-१८०

२. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (१९६०-६१ ते २०१९-२०)

# भारतीय शेती व शेती समोरील समस्या : एक अभ्यास

**अर्जुन रामराव ढोणे**
संशोधक विधार्थी
सामाजिक शास्त्रे संकुल
स्वा. रा .ती .म विद्यापीठ नांदेड

**डॉ. शालिनी कदम**
संशोधक मार्गदर्शक,
अर्थशास्त्र विभाग.
सामाजिक शास्त्रे संकुल, स्वा. रा .ती .म विद्यापीठ नांदेड

**सारांश:**

भारताच्या अर्थव्यवस्थेत कृषि क्षेत्राची भूमिका ही अतिशय महत्वाची असून आजही मोठ्या प्रमाणात भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान आहे .प्राचिन काळापासून भारतीय जनतेची कृषि जीवन पद्धती म्हणूनच राहिलेली आहे. उपजीविकेचे सर्वात मोठे साधन म्हणून कृषि क्षेत्राकडे पाहिले जाते. भारतीय लोकसंखेच्या सर्वात मोठ्या गटाचा व्यवसाय कृषि असून अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार आहे. सेवा व उद्योग क्षेत्राचा विकास झाला असला तरी कच्चा माल या कृषि क्षेत्रा मधून उपलब्ध होतो. स्वतंत्र प्राप्ती नंतर कृषि क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संरचनात्मक बदल झाले असले तरी राष्ट्रीय उत्पनातील कृषिचा हिस्सा हा घटत जात आहे, हा चिंतनाचा भाग आहे. प्रामुख्याने आजही सिंचनाचे कमी प्रमाण, कमी उत्पादकता,यांत्रिकीकरणाचा अभाव, भांडवलाचा अभाव ,कमी उत्पादकता या सारख्या अनेक समस्या शेती समोर आहेत परंतु देशाचा विकासाकरिता शेती उपयुक्त असून प्रगती चे इंजन आहे. प्रस्तुत शोध निबंधात शेतीचा रोजगारातील वाटा, राष्ट्रीय उत्पन्नात कृषिचे महत्व व कृषि समोरील समस्या संबंधित अभ्यास केला आहे.

**प्रस्तावना:**

कृषिला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असे म्हटले जाते प्राचिनकाळापासून भारतात शेतीला अतिशय महत्व प्राप्त झाले असून जगातील बहुतांश देशात कृषिला अनन्य साधारण असे स्थान आहे. साधारणतःहा भारतासारख्या विकसनशील व कृषि प्रधान देशात असंख्य लोकांना रोजगारापासून ते लोकांच्या उपजीविकेसाठी कृषि हे एक महत्वाच साधन असून कृषिक्षेत्र हे त्याचप्रमाणे देशाच्या आर्थिक विकासाचा कणा आहे .भारतातील सर्वाधिक लोक ही ग्रामीण भागात राहत असून ते मोठ्या प्रमाणात शेती व्यवसायावर आवलंबून आहेत . देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा महत्वपूर्ण ठरतो. देशातील काही भागातील भूप्रदेश शेतीला अनुकूल आहे तर काही भागातील शेतीसाठी अनुकूल नाही.किंबहुना निसर्गाची प्रतिकूलता आणि नैसर्गिक साधन सामग्रीचा अपुरेपणा ,नवीन शेती उपयुक्त अवजारे खरेदी साठी लागणारे भांडवल किंवा भांडवलाची कमतरता ,जलसिंचन, शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून ,रोगराई, नैसर्गिक प्रकोप अशा किती तरी समस्या शेती समोर आहेत .प्रस्तुत संशोधन निबंधात भारतीय शेती व शेती समोरील समस्या यावरती अभ्यास केला आहे .

**उदेश:**

१.भारतातील कृषिक्षेत्रातील राष्ट्रीय उत्पन्नाचा अभ्यास करणे .

२.भारतातील कृषि क्षेत्रातील रोजगाराच्या स्थिती चा अभ्यास करणे .

३.भारतीय कृषि अर्थव्यवस्थेसमोरील समस्या चा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधात विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला असून दुय्यम तथ्य संकलनाच्या आधारे माहितीचे संकलन करण्यात आले आहे.त्या मध्ये विषया संदर्भातील ग्रंथ ,विविध मासिके ,इंटरनेट वेबसाईट ,तक्ता आलेख आधारे केले आहे. शेती हा जगातील प्रत्येक देशातील महत्वपूर्ण व्यवसाय आहे .कृषि व्यवसायातून देशातील प्रमुख उद्योग यांना कच्च्या मालाचा पुरवठा उदा. कापूस, ताग इ. मानवाच्या अन्न, वस्त्र ,निवारा या मुलभूत गरजा व्यतिरिक्त अनेक बाबतीत माणूस शेतीवर अवलंबून आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मूलाधार आहे.

**राष्ट्रीय उत्पनातील शेती क्षेत्राचा वाटा :**

प्राथमिक ,द्वितीय, आणि तृतीय, या क्षेत्राचा समावेश प्रामुखाने भारतीय अर्थव्यवस्थेत होतो.या तीन क्षेत्र देशाची आर्थिक विकासाची पातळी दर्शवतात. राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा हा स्वतंत्र प्राप्ती वेळी ५० टक्के पेक्षा अधिक होता आणि सद्य कालावधीत पण महत्वाचा वाटा राष्ट्रीय उत्पन्नात शेतीक्षेत्राचा चा आहे. G. V. A. मधील कृषि क्षेत्राचा चालू किमतीनुसार टक्केवारी मध्ये हिस्सा पुढील प्रमाणे पाहता येतो .

तक्ता क्र

एकूण अर्थव्यवस्थेत कृषि आणि संलग्न क्षेत्राचा चालू किमंतीनुसार GVA मधील हिसा

| वर्ष | एकूण अर्थव्यवस्थेतील कृषी आणि संलग्न क्षेत्राचा GVA चा टक्केवारी हिस्सा |
|---|---|
| २०१४-१५ | १८.२ |
| २०१५-१६ | १७.७ |
| २०१६-१७ | १८.० |
| २०१७-१८* | १८.३ |
| २०१८-१९# | १७.६ |
| २०१९-२०@ | १८.४ |
| २०२०-२१** | २०.२ |


स्त्रोत- राष्ट्रीय सांखिकी कार्यालय (NSO), m/o सांखिकी आणि PIB, pocket book of agriculture statistics 2020 ,

* : तिसरा सुधारित अंदाज , # :दुसरा सुधारित अंदाज, ,**: दुसरा पूर्व अंदाज , @: प्रथम सुधारित अंदाज

राष्ट्रीय सांखिकीय कार्यालय च्या आकडेवारी नुसार वार्षिक राष्ट्रीय उत्पनात शेती व संलग्न क्षेत्राचा वाटा हा वर्ष २०१४-१५ साली १८.२ टक्के एवढा होता. तो नंतर वर्ष २०१६-१७ ला १८.० एवढे होते. २०१८-१९ च्या दुसऱ्या सुधारित अंदाजा नुसार १७.६ टक्के तर नंतरच्या वर्ष २०२०-२१ च्या दुसऱ्या पूर्व अंदाजा नुसार २०.२ टक्के एवढा राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा होता. एकंदरीत,२०२० -२०२१ या वर्षाच्या कालावधीत करोना सारखे जागतिक संकट असताना राष्ट्रीय उत्पनातील कृषि क्षेत्राचा G.V.A. मधील हिसा हा वाढलेला असला तरी एकंदरीत इतर क्षेत्राच्या तुलनेत कृषि क्षेत्रातील राष्ट्रीय उत्पनाचा वाटा हा मात्र कमी असल्याचे दिसते. अनिश्चित पाऊस ,घटती उत्पादकता ,शेती उत्पादनाच्या किंमतीतील अस्थीरता या अनेक कारणामुळे शेती क्षेत्रातील राष्ट्रीय उत्पन्नाचा वाटा कमी असल्याचे दिसून येते.


**भारतातील कृषि क्षेत्रातील कामगारांची स्थिती :**

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान असून ७० टक्केपेक्षा जास्त लोकसंख्या ही कृषि क्षेत्रामध्ये कार्य करताना दिसून येते. अर्थव्यवस्थेत जनगणना निहाय कृषि कामगार पुढील आकृती आधारे स्पष्ट करता येते .



स्त्रोत- भारत के महारजिस्टर एंव जनगणना आयुक्त का कार्यालय आर्थिक समीक्षा २०२२-२३ सांखिकीय परिशिष्ट, Agricultural statistics at a glance-2021 .

वरील आकृतीनुसार भारताची वर्ष १९५१ ला एकूण लोकसंख्या ३६ कोटी ११ लाख होती ज्यामध्ये एकूण कामगार १३ कोटी ९५ लाख होते .ज्यापैकी कृषि कामगार ९ कोटी ७२ लाख होते.म्हणजेच एकूण कामगार लोकसंख्येपैकी ६९ .६८ कामगार हे संलग्न क्षेत्रासी सबंधित आहे.तर एकूण कृषि व सलंग्नक्षेत्र लोकसंखेच्या ६९.६८ टक्के लोकांना रोजगार पुरवत होते.नंतरच्या कालावधीत या मध्ये बदल होऊन २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या १२१ कोटी झाली असून एकूण कामगाराचे प्रमाण ४८ कोटी १९ लाख एवढे असताना कृषि कामगार हे २६ कोटी ३१ हजार होते. तर कृषि संलग्न क्षेत्र ५४ टक्के लोकांना रोजगार पुरवत आहे. तर ११९५ ते २०११ च्या जनगणनेनुसार या मध्ये खूप फरक निर्माण होतो यावरून असे लक्ष्यात येती कि कृषि क्षेत्रातील कामगारचे प्रमाण घटून ते अन्य क्षेत्रात स्थलांतर झाले .सन २०११ पर्यंत कृषि क्षेत्र रोजगारासाठी प्रधान क्षेत्र राहिले आहे. एकूण कृषि कामगार यामध्ये शेतकरी आणि शेतमजुर किती याचे प्रमाण पुढील आकृती आधारे समजते .




स्त्रोत- - भारत के महारजिस्टर एंव जनगणना आयुक्त का कार्यालय ,आर्थिक समीक्षा २०२२-२३ सांखिकीय परिशिष्ट, Agricultural statistics at a glance-2021 .

जनगणनेनुसार, सन १९५१ ला ९ कोटी ७२ लाख कृषि कामगारापैकी शेतकऱ्याचे प्रमाण हे ६ कोटी ९९ लाख होते, तर 2 कोटी ७३ लाख एवढे शेतमजुर होते .म्हणजे एकूण शेतकऱ्याच्या तुलनेत शेतमजुर हे ३९ टक्के आढळते . तर १९५१ ते १९६१ च्या सांखिकीय आकडेवारीनुसार शेतकरी हे शेतकऱ्यांमध्ये ३ कोटीची वाढ दिसते. मात्र त्याच काळात शेतमजुर हे ४२ लाखांनी वाढले. 1961 ते 1971 या दरम्यान शेतकरी ९ कोटी ९६ लाख वरून ७ कोटी ८२ लाख इथपर्यंत कमी झाले .म्हणजेच २ कोटी घटली. मात्र या दरम्यान शेतमजुर हे 3 कोटी १५ लाखावरून ४ कोटी ७५ लाख पर्यंत वाढलेले दिसतात .पुढील काळात १९७१-१९८१ व १९८१ ते १९९१ या दरमान्य शेतकरी व शेतमजुर हे स्थिर आकडेवारीने वाढत गेले .१९९१ ते २००१ दरम्यान शेतमजुर हे तीव्रतेने वाढले पण शेतकऱ्यामध्ये वाढ ही स्थिर दिसते. या नंतरच्या पुढील दशकात २००१ ते २०११ दरम्यान् शेतकऱ्याचा वाढीमध्ये १२ कोटी ७३ लाख वरून 11 कोटी ८८ लाख पर्यंत घट झाल्याचे दिसते, मात्र शेतमजुर यांचे प्रमाणपूर्वीसारख तीव्रतेणे वाढून १० कोटी ६८ लाखावरून १४ कोटी ४३ लाख पर्यंत वाढले. म्हणजेच ३ कोटी ७५ लाख एवढी मोठी वाढ शेतमजुरामध्ये झाल्याचे दिसते .शेतकरी आणि शेतमजुर हे १४ कोटी ४३

लाख असल्याचे दिसून येते म्हणजेच शेतमजुर हे 2 कोटी ५५ लाखाने शेतकऱ्यापेक्षा अधिक आहेत .दिलेल्या आकृती मध्ये असे दिसते कि २००२ ,२००३ ,२००४ च्या दरम्यान शेतकरी व शेतमजुर समप्रमाण राहिले, यानंतर शेतमजुरा मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसते तर शेतकऱ्याच्या संखेत मोठी घट झालेली दिसते.

शेतकऱ्याची रोजगारामध्ये वाढ ही शेतमजुरामुळे होत आहे. शेतमजुराचे प्रमाण हे अर्थव्यवस्थेसाठी व कृषि क्षेत्रासाठी चिंतेचे कारण आहे . शेतकऱ्याच्या प्रमाणात घट होण्याचे कारण शेतीचे तुकडीकरण ,शेती विरहीत कुटुंबे, अल्पभूधारक शेतकरी, पावसाच्या पाण्याची अनिश्चितता, आर्थिक परीस्तिथी खालावलेली, उत्पादकता कमी असणे ही कारणे आहेत. म्हणजेच शेतकरी हे शेतमजुरांमध्ये स्थलांतरित होताना दिसतात.

**शेती समोरील समस्या** : शेतीला अतिशय महत्व प्राप्त असून शेती हि असंख्य उद्योगाची जननी आहे .अन्न धान्य,कचा माल ,विदेशी व्यापारात योगदान अशा विविध कार्यात व आणि आर्थिक विकासाच्या वाढीत शेतीची भूमिका महत्वाची आहे. परंतु सद्यकालावधीत शेती समोर पुढील समस्या निर्माण झाल्या आहेत .

**१ .लोकसंखेचा अधिक भार**: वाढत्या लोकसंखेचा अधिक भार हा कृषि क्षेत्रात काम करत असून ज्याप्रमाणात लोकांची गरज आहे. त्यापेक्षा अधिक लोक कृषी क्षेत्रात काम करत आहेत .लोकसंख्या प्रमाण वाढल्यामुळे कृषि क्षेत्रफळ सुद्या कमी होत आहे .शेतीकामासाठी जास्त लोक उपलब्ध असल्यामुळे बेरोजगारी अर्ध-बेरोजगारी सारख्या समस्या निर्माण होऊन गरिबी वाढत आहे परिणामी शेतकरी शेतीसाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी त्याच्याकडे पैसा नसतो.

**२ .तुकडीकरण**: अयोग्य पद्धतीने शेतजमिनीचे वाटप होऊन लहान तुकड्यात शेती ची विभागणी हि झालेली आहे. परिणामी तुकडे सलग नसून मोठ्या प्रमाणात विखुरलेले असल्यामुळे रास्त प्रमाणात उत्पादन घेण्यासाठी अडचणीचे ठरतात .

**३.दारिद्र्य**: शेतकऱ्याचे दारिद्र्य हे त्याच्या विकासातील मोठी अडचण ठरत आहे. त्यामुळे शेतकरी सुधारित असे बी बियाणे विकत घेऊ शकत नाही परिणामी उत्पन् कमी येते म्हणून शेतीसाठी बी बियाणे विकत घेण्यासाठी शेतकरी कर्ज काढतो आणि निसर्गाचा प्रकोप यामुळे शेती पिकत नाही. परिणामी शेतकरी अधिक कर्जात लोटला जावून शेती कसणारा शेतकरी आत्महत्या करतो.

**४.कृषि गुणवतेमध्ये कमी** :ग्रामीण भागात प्राकृतिक संसाधनाचा गुणवतेमध्ये ऱ्हास होताना दिसून येतो .लोकसंख्याचा वाढता आकार यामुळे वन क्षेत्राची झालेली घट आणि कृषि मध्ये रासायनिक खते यांच्या अधिक वापर तसेच सांडपाण्याचे खराब पाणी यामुळे जमिनीचे पोषक तत्व कमी होऊन त्याचा उत्पादकतेवर परिणाम झाला .

**५ . यांत्रिकीकरणाचा अभाव** :आधुनिक माहिती च्या युगात भारतातील शेतकरी हे पारंपारिक पद्धतीने शेती करतात. त्याचप्रमाणे पारंपारिक साधन सामग्री हे शेती साठी वापरतात .पर्याप्त संसाधनाची कमी ,अशिक्षित ,भाग्यवादी ,अंधाश्राद्धाळूपणा ,रूढीवादी विचारधारीचे असल्यामुळे पुरातनिक शेती साधने वापरतात .जर यदाकदाचित आधुनिक साधने वापरण्याचे इच्छा झाली. तर त्यांना खरेदी साठी पैसा नसतो परिणामी कृषि वर नकारात्मक प्रभाव पडतो .

**६ .नैसर्गिक कारणे**: भारतातील शेती हि प्रामुखाने निसर्गावर अवलबून असून अधिक प्रमाणात पावसाच्या पाण्यावर निर्भर आहे .अधिक पडणाऱ्या पावसामुळे कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ पडतो .यामुळे पिकाचे नुकसान होऊन उत्पादन हे कमी होते .

**७ दुर्बल पशु** :शेतकऱ्याचा मित्र हा बेल आहे. त्याचा उपयोग शेतीसाठी केला जातो .शेतीमध्ये पशूना मोठ्या प्रमाणात स्थान आहे. शेतकरी गरिबीत जीवन जगत असल्यामुळे सकस आहार हा देऊ शकत नाही. त्यामुळे रोगी व दुर्बल पशु राहतात परिणामी त्याचा प्रभाव प्रतिकूल शेती वर पडतो .

**७ .जमिनीची धूप** :प्राचीन समस्या हि जमिनीची धूप होय. हजारो हेक्टर जमिनीची धूप होऊन उपयुक्त अशी माती समुद्रात साठून ठेवली जाते.जोरात वेगाने वारा ,जमिनीची मशागत व चुकीच्या पिक घेण्याचा पद्धतीमुळे किंवा

जमिनीचा आकार हा तीव्र असल्यामुळे मोठ्या प्रमाणात जमिनीची धूप होते .प्रामुख्याने नद्या यांना येणारे पूर यामुळे जमिनीची धूप होऊन उत्पादकता कमी होते .

**८ .सावकार** :शेतीच्या विकासातील अडचण हि सावकार ठरत आहे .शेतकर्यांना अल्प व दीर्घ मुदतीचे कर्ज देतात शेतकरी हे कर्ज उत्पादक व अनुउत्पाद्क बाबी वर खर्च करतो परिणामी निसर्गावर अवलंबून असलेली शेती तोट्यात गेली कि शेतकर्याना कर्ज फेडणे अवघड होते. परिणामी शेतकरी फासी घेतो .

**९ .अज्ञान**: पारंपारिक पद्धतीने शेती केली जात असल्यामुळे फार नवीन साधन सामग्रीच्या वापर शेतकरी करत नाही. त्यामागे तो अशिक्षित असतो त्याचबरोबर त्याला आधुनिक साधनसामग्री बद्दल कोणतीही माहिती नसते. माहितीचा अभाव यामुळे नवीन तंत्रज्ञान त्याला वापरता येत नाही. परिणामी उत्पादकता हि कमी होते .

**निष्कर्ष** :

भारतीय शेती हि अर्थव्यवस्थेमधील महत्वाचा घटक असून देखील शेती क्षेत्राचा अर्थव्यवस्थेमधील सहभाग हा मात्र कमी कमी झालेला दिसून येत आहे. यामध्ये कृषि क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा हा कमी होताना दिसतो. तसेच, एकूण कामगारांच्या ६९ टक्के कामगार कृषि व संलग्न क्षेत्राशी निगडीत असल्याचे दिसून येते. ज्यामध्ये शेतकरी व शेतमजुर अशी विभागणी केली असता कृषि क्षेत्रातील महत्वाचा भाग असणारा शेतकरी कामगारांची संख्या मात्र कमी होताना दिसून येत आहे याउलट शेत् मजुरांची संख्या मात्र वाढत असताना दिसून येते. परिणामी शेती क्षेत्रात अर्ध बेरोजगारी निर्माण होते. शेती कामगारांची आर्थिक स्तिथी हि अजून खालावताना दिसून येत आहे. याचा कृषि क्षेत्रावर वाईट परिणाम होत आहे.

**संदर्भ सूची :-**


१) प्रा .श्यामकांत म.पाटील ,डॉ.मा.म.धोंगडे (१९८०) भारतीय ग्रामीण अर्थशास्त्र, भारत मुद्रक आणि प्रकाशक लि .,ओरंगाबाद (संभाजी नगर )

२) प्रा .दत्ताजीराव कों.साळुंखे ,प्रा.जगनाथराव रा.पवार (१९८२) महाराष्ट्राची कृषि ,अर्थव्यवस्था,प्रकाशन ,पुणे

३) देशमुख नी.टी(१९८८) 'महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेषस' किरण परीक्षा पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

४) पाये रमेश(२०१५) 'शेतीक्षेत्रातील अरिष्ठ आणि शेतकयांच्या आत्महत्या',वाटसरू अंक.

५) नलावडे पंडित(संपा) 'भारतापुढील आव्हाने आणि सद्यास्थिती' कैलाश प्रकाशन.औरंगाबाद.

६) खुपसे, डॉ. मार्तंड(२००६) 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या चिंता आणि चिंतन', समीर प्रकाशनक, कळंब.

७) प्रा.विजय काविमांदन(१९७९) 'भारतातील आर्थिक विकास आणि नियोजन' मंगेश प्रकाशन.

८) नरेंद्र लांजेवार 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या चिंतन आणि उपाय', सुमेरत प्रकाशन .

९) बोकारे दिवाकर 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या कशा', डायमंड पब्लिकेशन.

१०) प्रा.राधाकृष्ण पालीवाल (१९७९) ,भारताचा आर्थिक विकास आणि नियोजन, श्री मंगल प्रकाशन नागपूर

११) रंजन कोळंबे ,भारतीय अर्थव्यवस्था ,भगीरथ प्रकाशन पुणे

१२) www.parbhani.gov.in

१३) www.agrowan.esakal.com

१४) www.marathihindustantimes.com

# भारतीय कृषी क्षेत्रात झालेले बदल

**प्रो. डॉ. एम. डी. कच्छवे**

वाणिज्य विभाग प्रमुख, संशोधन मार्गदर्शक कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय सोनपेठ जिल्हा परभणी - 431516

**प्रस्तावना (Introduction) :-**

प्राचीन काळापासून कृषी क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. कृषी हा भारतातील लोकांचा मुख्य व्यवसाय असल्यामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात रोजगारात औद्योगिक विकास विदेशी व्यापार आणि एकंदरीत देशाच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचे स्थान महत्त्वाचे आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. (Agriculture is the axle of Indian economy) यावरून आपणास भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र किती महत्वाचे आहे हे लक्षात येते. भारतासारख्या विकसनशील देशाचा आर्थिक विकास हा कृषी क्षेत्राच्या विकासावर अवलंबून आहे .भारतात नैसर्गिक संसाधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध असली तरी भांडवलाच्या अभावामुळे औद्योगीकरणाचा वेग अल्प आहे. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येला रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम कृषी क्षेत्राने केले आहे. देशातील श्रमिकांना कृषी व कृषी आधारित उद्योगात रोजगाराची उपलब्धता होत असते. देशातील बेकारीचे प्रमाण कमी करण्यात कृषी क्षेत्राचा महत्त्वाचा वाटा आहे. भारतात भांडवलाची कमतरता मोठ्या प्रमाणात आहे. या भांडवलाच्या कमतरतेवर मात कृषी क्षेत्राच्या माध्यमातून करता येते. कारण कृषी क्षेत्रात भांडवल उत्पादन गुणोत्तर कमी असते त्यामुळे कमी भांडवल गुंतवून मोठ्या प्रमाणात उत्पादन मिळविता येते. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात विदेशी चलनाची गरज ही औद्योगिक क्षेत्र एवढी असत नाही. यामुळे स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून भारताचा आर्थिक विकास घडून आणताना औद्योगिक विकासाबरोबरच कृषी क्षेत्राला ही महत्त्वाचे स्थान पंचवार्षिक योजना दिलेली आहे. प्रसिद्ध अर्थतज्ञ कोल व कुवर यांच्या मते, देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी सर्वात आधी त्या देशातील कृषी क्षेत्राचा विकास घडून आणणे आवश्यक असतो. कृषी क्षेत्राचा विकास अगोदर घडून आला नाही तर उद्योग व सेवा क्षेत्राच्या विकासात अडथळे निर्माण होतात म्हणून देशाच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेत भारतातील नियोजन आयोगाने कृषी क्षेत्रावर सर्वात अधिक भर दिला होता.

भारत हा खेड्यांचा देश आहे. भारतात एकूण सहा लाख 38 हजार 588 एवढी खेडी आहेत. या खेड्यात एकूण लोकसंख्येच्या 72 टक्के लोकसंख्या वास्तव्य करते. या लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. भारतातील एकूण लोकसंख्येच्या 58.2% लोकसंख्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे कृषी क्षेत्रावर अवलंबून असते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात औद्योगिक क्षेत्राचा विकास घडवून आणण्याचा मोठा प्रयत्न करण्यात आला परंतु आजही भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे स्थान महत्वपूर्ण आहे. देशातील उद्योगधंदे विदेशी व्यापार विदेशी चलन राजकीय स्थैर्य इत्यादी कृषी क्षेत्रावर अवलंबून असते.

**संशोधनाचा उददेश :-**

संशोधनासाठी खालील उदेश निश्चित करण्यात आली आहेत.

1) शेती व्यवसायाची प्रस्तावना स्पष्ट करणे.

2) भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी व्यवसायाचे महत्त्व पाहणे

3) भारतात कृषी क्षेत्रात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे

4) शेतकऱ्यांसाठी असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करणे

5) निष्कर्ष काढणे.

**संशोधनाची गृहीतके :-**

सदर संशोधनाची वरील उद्देशानुसार खालील प्रमाणे गृहीतके निश्चित करण्यात आलेली आहेत.

1) कृषी क्षेत्रात अलीकडच्या काळात खूप मोठ्या प्रमाणात बदल झालेले आहेत

2) कृषी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना सुरू आहेत.

संशोधन पद्धती :-

सदर संशोधनासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर केला असून त्यामध्ये संदर्भ ग्रंथ,दैनिक वर्तमानपत्रातील अग्रलेख, इंटरनेट इत्यादीचा वापर करून वरील उद्दिष्टानुसार माहिती संकलित करण्यात आलेली आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राचे महत्त्व**

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे असणारे महत्त्व खालील मुद्द्यावरून लक्षात येईल.

**1) राष्ट्रीय उत्पन्न**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा हिस्सा इतर क्षेत्राच्या तुलनेत सर्वात जास्त होता स्वातंत्र्यप्राप्तीनंतर औद्योगिक व सेवा क्षेत्राच्या झालेल्या विकासामुळे कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नाची रेषा कमी होत आहे तरीही इतर विकसित देशाच्या तुलनेत कृषी क्षेत्राचा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील हिचा हा अधिक आहे.

**2) रोजगार निर्मिती:-**

वाढत्या लोकसंख्येला रोजगार पुरविण्याचे कार्य शेतीक्षेत्र करत असते विकसनशील देशात लोकसंख्या वाढीच्या घरापेक्षा औद्योगिक विकासाचा दर कमी राहिल्या शेती क्षेत्रामध्ये अतिरिक्त लोकसंख्या काम करत असते शेती विकासात जास्त मजुरांची गरज नसते परंतु त्यांना काम नसल्यामुळे त्यांना शेती क्षेत्रात कामाला जावे लागते भारतातील कृषी क्षेत्र हे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे बहुतांश लोकांच्या जीवन निर्वाहाचे साधन आहे भारतातील 58.2% लोकसंख्या कृषी क्षेत्रात कार्यरत आहे कृषी वस्तूचा व्यापार वाहतो इत्यादींच्या माध्यमातून बहुतांशी लोक उत्पन्न मिळतात यावरून कृषी क्षेत्रात इतर क्षेत्रातील रोजगाराच्या संधी पेक्षा अधिक रोजगारास संधी उपलब्ध असलेल्या दिसून येतात भारतात औद्योगिक व सेवा क्षेत्रांचा विकास असला तरी रोजगाराच्या संधी त्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत नसल्यामुळे लोकांना रोजगारासाठी मोठ्या प्रमाणावर कृषी क्षेत्रावर अवलंबून राहावे लागते.

**3) अन्नधान्याचा पुरवठा व गुरांना चारा :-**

अन्न ही मानवाची मूलभूत गरज आहे .वाढत्या लोकसंख्येबरोबर जर देशातील शेती क्षेत्रामधून गरजे इतका अन्नधान्य पुरवठा निर्माण झाला नाही तर त्याचा प्रभाव किमतीवर पडून अन्नधान्याच्या किमती वाढत राहतात व अर्थव्यवस्थेला त्याचे दुष्परिणाम सहन करावे लागतात. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत शेती क्षेत्रामध्ये बदल करून अधिक उत्पादन घेतले जाऊ शकते .भारतातील लोकांना अन्नधान्य, डाळी, तेलबिया, भाजीपाला इत्यादीचा पुरवठा करण्याचे काम प्रशिक्षण करते. कृषी क्षेत्र हे मोठ्या प्रमाणात मान्सूनच्या पावसावर अवलंबून असल्यामुळे काही वेळेस मान्सूनच्या लहरीपणामुळे शेतमालाचे उत्पादन कमी होत असल्यामुळे काही वेळेस कृषी मालाचे आयात करावी लागते. परंतु सर्वसाधारण परिस्थिती कृषी मालाची आयात करावी लागत नाही. अशा मोठ्या प्रमाणात लोक असलेल्या लोकसंख्येला अन्नधान्याचा तसेच जनावरांना चारा हा कृषी क्षेत्रातून उपलब्ध होत असतो.

**4) औद्योगिकरणाला आधार :-**

देशातील कृषी क्षेत्राचा पुरेशा प्रमाणात विकास झाल्याशिवाय औद्योगिक क्षेत्राचा विकास झपाट्याने होऊ शकत नाही .कृषी क्षेत्रातून आधुनिक क्षेत्राला कच्चामाल लाचा पुरवठा होत असतो. भारतातील कापड गिरण्या, ताग गिरण्या, साखर कारखाने ,तेल गिरण्या ,चहा कंपन्या, रबर उद्योग इत्यादींना कच्च्या मालाचा पुरवठा करण्याचे काम प्रशिक्षण करते. त्याचबरोबर इतर कागद निर्मिती उद्योग, कातडी उद्योग ,काडीपेटी उद्योग, इत्यादी कृषी क्षेत्रावरच कच्च्या मालाच्या पुरवठ्यासाठी अवलंबून असतात.

**5) भांडवल निर्मिती :-**

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत आणि उत्पादन वाढीच्या युवा रचनेत भांडवल हा घटक अत्यंत महत्त्वपूर्ण असतो. विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये शेती हा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे शेतीला भांडवल निर्मितीची भूमिका पार पाडावी लागते.आर्थिक विकासाची प्रक्रिया ही भांडवल निर्मितीवर अवलंबून असते. भांडवल निर्मितीचा दर मोठ्या प्रमाणात वाढल्याशिवाय देशाचा आर्थिक विकास होत नसतो .भारतात कृषी क्षेत्र हे एक मोठे क्षेत्र असल्यामुळे भांडवल निर्मितीत या क्षेत्राचा मोठा सहभाग असतो जर कृषी क्षेत्रात पुरेशा प्रमाणात भांडवल निर्मिती झाली नाही तर आर्थिक विकासाच्या प्रक्रियेवर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो. भारतात अलीकडील काळात शेतीला व्यवसायिक स्वरूप प्राप्त झाल्यामुळे तसेच कृषी क्षेत्रातील उत्पादकतेचे प्रमाण वाढत असल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढत आहे व त्यामुळे बचतीचे प्रमाण वाढते या बचतीचा वापर भांडवल निर्मितीसाठी केला जातो.

**6) देशाच्या आर्थिक नियोजनासाठी :-**

भारतातील एकूण वाहतुकी त कृषी वस्तूंची वाहतूक मोठ्या प्रमाणात आहे देशात चांगला पाऊस व चांगले हवामानाच्या काळात शेतकऱ्यांची उत्पन्न मोठ्या प्रमाणात वाढते त्यामुळे औद्योगिक वस्तूंची व सेवांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते म्हणजेच कृषी क्षेत्रात तिची परिस्थिती असेल तर एकंदरीत भारतीय अर्थव्यवस्थेत तिजीचे वातावरण असते. देशातील कृषी क्षेत्रातील वृद्धीचा प्रत्यक्ष परिणाम दारिद्र्य निर्मूलनावर होतो. तसेच कृषी क्षेत्राच्या किंमत पातळीचा परिणाम हा देशातील सर्वसाधारण किंमत पातळीवर होतो.

**भारतात कृषी क्षेत्रात झालेले बदल**

नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनुसार कृषी क्षेत्रात अमुलाग्र बदल करण्यासाठी सर्व कस अजेंडा तयार करण्यात आला असून राज्य सरकारांना सोबत घेऊन कृषी सुधारणावर काम केले जात आहे .नीती आयोगाने म्हटले की 2022 पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट केंद्र सरकारने निश्चित केले आहे. त्यासाठी पहिल्यांदा कृषी बाजारपेठ सुधारणा राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे .या मुद्द्यावर नीती आयोग राज्य सरकारांना सोबत घेऊन काम करीत आहे. बाजार सुधारणा शिवाय कंत्राटी शेती ऑनलाईन हजीर व्यवहार तसेच वायदे व्यवहार या मुद्द्यावरही काम केले जात आहे. खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. 1991 मध्ये भारतात उदारीकरणास प्रारंभ झाला. मात्र अन्य क्षेत्रात जशी उदारीकरण झाले तसे ते कृषी क्षेत्रात झाले नाही .आता कृषी क्षेत्रातही प्रक्रिया सुरू करण्याच्या सूचना देण्यात आले आहे .कृषी क्षेत्रातील नियमात सुधारणा अत्यंत धीम्या किचकट पण परिपूर्ण आहेत. खाजगी क्षेत्राने कृषीमधील संरचनात्मक उभारणी आणि शीतग्रहाची यात गुंतवणूक करावी यासाठी प्रयत्नशील आहे. सुधारणांच्या पहिल्या टप्प्यात कंत्राटी शेतीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्यासाठी नीती आयोगाने कृषी मंत्रालय या दोघांनीही आदर्श कायद्याचा आराखडा तयार केला आहे. प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये कृषी उत्पादन व सेवा क्षेत्रांचा समावेश असतो. जागतिक पातळीवर आपल्या देशाला विकसित अर्थव्यवस्था म्हणून नाव मिळवायचे असेल तर कृषी व उत्पादन क्षेत्राला योग्य चालना दिली पाहिजे. सेवा क्षेत्रांचा विकास होत असला तरी दीर्घकालीन रोजगार निर्मितीसाठी शेती व उत्पादन क्षेत्र महत्त्वाचे आहे. कोरोनामुळे उध्वस्त झालेले अर्थव्यवस्था पूर्वरत रुळावर येत असताना आपल्या अर्थव्यवस्थेत तुलनात्मक दृष्ट्या सेवा क्षेत्राचा विस्तार मोठ्या प्रमाणावर होताना दिसत आहे. शहरी व ग्रामीण भागातील तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सेवा क्षेत्राचा विकास हा फार महत्त्वाचा हातभार लागणार आहे.त्यामुळे अर्थव्यवस्थेला खऱ्या अर्थाने चालना त्यांना देण्यासाठी आगामी 25 वर्षांमध्ये विकसित अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी कृषी व उत्पादन क्षेत्रावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.त्यासाठी या दोन्ही क्षेत्रांमध्ये आर्थिक सुधारणा केल्या तर अर्थव्यवस्थेचा समतोल साधला जाऊन देशातील विविध समस्यांची सोडू शकते.

**1) जलसिंचनातील सुधारणा :-**

सध्या देशात पिण्याचे पाणी मुबलक प्रमाणावर उपलब्ध नाही. शेती उद्योग यांची पाण्याची मागणी पूर्ण करणे अवघड बनत जात आहे. येत्या काही वर्षात पाण्याची वाढती मागणी आणि उपलब्ध साठा या तफावत वाढत जाणार आहे त्यामुळे उपलब्ध पाणी साठ्याची योग्य नियोजन करणे महत्त्वाचे आहे. भारतात गुजरात मध्ये शेतीसाठी लहान बंधारे बांधण्यात आले होते. चौदाव्या शतकात यमुना नदीवर कॅनल बांधण्यात आले होते. त्यानंतर ब्रिटिश काळात पहिला जंक्शन आयोग स्थापन करण्यात आला होता. स्वातंत्र्यानंतर सिंचनाचे विकासासाठी सरकारकडून सातत्याने प्रयत्न करण्यात आले. यामध्ये नदी खोरे विकासासाठी सवतंत्र संस्था सुरू करण्यात आल्या .या संस्थांच्या स्थापनेबरोबरच पाण्याच्या बाबतीत देखील कायदे तयार करण्यात आले.

**2) हरित क्रांती :-**

भारतात अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ घडून आणण्यासाठी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार 1960-61 मध्ये करण्यात आला.या काळात शेती विषयक जे धोरण स्वीकारण्यात आले त्यालाच हरित क्रांती असे म्हणतात.भारतात शेतीचे उत्पादन आणि उत्पादकता यामध्ये वाढ करून भारतीय अर्थव्यवस्थेला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता प्राप्त करण्यासाठी पारंपारिक शेतीचे नव्या शेती पद्धती रूपांतर करणे या महत्त्वपूर्ण उद्देशाने देशात हरित क्रांती अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते.हरित क्रांतीमुळे सुधारित बी-बीयाणांचा वापर, आधुनिक रासायनिक खतांचा वापर ,सुधारित कीटकनाशकांचा वापर, सिंचन सुविधांचा विस्तार, बहुपीक पद्धती, यांत्रिकीकरण, कर्ज पुरवठ्यांच्या सुविधा इत्यादीचा समावेश हरितक्रांतीमध्ये होतो.

**3) उत्पादन व कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक :-**

अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादन व कृषी या दोन क्षेत्रातील गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर लागते. या क्षेत्रातील गुंतवणूक करण्याबाबत केंद्र सरकारवर खूप मर्यादा आहेत.स्वातंत्र्यानंतरच्या काळात काही दशकामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर झाली. त्याची उत्पादने ग्राहकांना वाजवी किमतीत मिळाली परंतु त्याची कार्यक्षमता राजकीय हस्तक्षेप, कामगार संघटनांचे मक्तेदारी यामुळे बरेच उद्योग आजारी पडले. तोट्यात गेले. 1990 मध्ये स्वीकारलेल्या खुल्या अर्थव्यवस्थेत खाजगीकरणाचा नारा देण्यात आला यामुळे देशांमध्ये रोजगार निर्मिती चांगली झाली परंतु आजवर सत्तेवर आलेल्या सर्व राजकीय पक्षांनी या प्रक्रियेत हात दोन घेतले. भ्रष्टाचार हाच शिष्टाचार झाला. कामगार कायद्यामध्ये सुधारणा होऊ नये, उत्पादन क्षेत्राचा विकास खऱ्या अर्थाने झाला नाही. देशाची एकूण बाजारपेठ लक्षात घेता मागणी व पुरवठा यांच्या सतत वाढ झाली.

**4) शेती संशोधन :-**

राष्ट्रीय शेती संशोधन समिती मार्फत तसेच कृषी विद्यापीठ व इतर संस्था यांच्यामार्फत शेती संशोधन केले जाते. वेगवेगळ्या पिकाकरिता उच्च उत्पादन देणाऱ्या विविध जातीची बी बियाणे यावरही संशोधन केले जाते. याबाबत चांगले यश प्राप्त झाले आहे.इतर पिकाबाबतही असे प्रयत्न आवश्यक आहेत.मातीची गुणवत्ता मृदा संधारण पिकांना पुरवणारी कीड पिकांचे रोग व शेती इत्यादी बाबत वेगवेगळे प्रादेशिक केंद्रात मोठ्या प्रमाणात संशोधनात्मक चाचण्या होणे आवश्यक आहे.

**4) अल्पभूधारक शेतकऱ्यांना मदत :-**

शेळ्या मेंढ्या पालन, कुक्कुटपालन, वराह पालन,मच्छी पालन असे विविध व्यवसाय ग्रामीण भागात अल्पभूधारक शेतकऱ्यांना देता येतात.अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या रिकाम्या हाताने उत्पादक रोजगार मिळवून देण्यासाठी शासनाने प्रयत्न करायला हवे. चीनमध्ये शेतकऱ्यांच्या शेतांचे क्षेत्रफळ दीड एकर एवढी मर्यादित आहे. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांच्या रिकाम्या हाताने काम मिळावे म्हणून टाऊन अँड व्हिलेज इंडस्ट्रीज संघटित करण्यात शासनाने पुढाकार घेतला. महाराष्ट्रात एक हेक्टर क्षेत्रावर एका हंगामात पीक घेणाऱ्या शेतकऱ्याला केवळ 40 ते 50

दिवस काम उपलब्ध होते.यामुळे शेतकऱ्यांच्या रिकाम्या हाताने उत्पादक काम मिळवून देण्यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न सुरू करण्याची गरज आहे. तरच त्यांना चांगले दिवस येतील याचा विचार करणे महत्त्वाचे आहे.

**5) आधुनिक पद्धतीने शेती करण्यावर भर देण्यात यावा :-**

पारंपारिक पद्धतीने शेती केल्यामुळे कृषी क्षेत्रातील गुणवत्तेचा परिपूर्ण वापर होत नाही. शेती करण्याच्या पारंपारिक पद्धती ऐवजी आधुनिक शेती तंत्रावर भर देण्यात यावा.यंत्राच्या साह्याने शेती केल्यामुळे कमी श्रमात व कमी वेळेत कृषी कार्य पूर्ण करता येते.शेती कार्यासाठी सुधारित अवजारांचा वापर करण्यावरही भर दिला पाहिजे. सुधारित अवजारे कमीत कमी किमतीत मिळत असून शेतकऱ्यांना याची माहिती नसल्या कारणामुळे त्याची खरेदी करता येत नाही. उदाहरणार्थ पिकाला खत देण्यासाठी द्रवरूप खत देण्याचे यंत्र, शेंगा फोडणीचे यंत्र,अंतर मशागतीसाठी व पेरणीच्या कामासाठी औजार वाहक यंत्र इत्यादी यामुळे शेती उत्पादकता वाढविण्यासाठी आधुनिक शेती करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे.

**शासनाच्या शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध योजना**

केंद्र व राज्य शासन यांच्या वतीने कृषी क्षेत्राच्या विकासासंदर्भात विविध योजना कार्यरत आहे. शेती उत्पादन वाढविण्यासाठी पिकाचे संरक्षण करण्यासाठी पिकावरील किड नियंत्रण करण्यासाठी कार्यक्रम आणि प्रयोगशाळांची उभारणी राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान व्यापारी पिके अंतर्गत ऊस योजना यांचा यामध्ये समावेश आहे .भारतातील सुमारे 60 टक्के लोकसंख्या प्रत्यक्षांनी अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे.भारतीय अर्थव्यवस्थेला बळकट बनविण्यासाठी कृषी क्षेत्राचा एक फार मोठा वाट आहे. केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकार वेळोवेळी शेतीच्या कामातील विविध अडथळे आणि गैर दूर करण्यासाठी योजना राबवीत असतात.शासनाकडून शेतकऱ्यांसाठी विविध योजना सुरू आहेत.या सुरू केलेल्या योजना भारतात राहणाऱ्या सर्व शेतकऱ्यांसाठी चालविल्या जातात.शेतकरी बांधवांची आर्थिक परिस्थिती सारखी नसल्यामुळे काही शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातून चांगले उत्पादन घेता येत असल्यामुळे त्यांना आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण होते.अशा समस्या पाहून सरकारने योजना राबवण्यास सुरुवात केली. जेणेकरून या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना चांगली शेती करून चांगले उत्पादन घेता येईल आणि त्यांची आर्थिक स्थिती ही सुधारता येईल.

**1)मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना :-**

महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना सुरू केली आहे. या योजना शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात सिंचन करण्यासाठी राज्य सरकार मार्फत स्वरूप पंप उपलब्ध करून दिले जातात.

**2) कृषी यांत्रिकीकरण योजना :-**

महाराष्ट्रात राहणाऱ्या शेतकऱ्यांना शेतीशी संबंधित उपकरणाच्या खरेदीवर 80 टक्के पर्यंत अनुदान मिळू शकते. उपकरणाच्या महागाईमुळे अनेक शेतकरी आवश्यक उपकरणे खरेदी करण्यापासून वंचित राहतात आणि त्यांना पारंपरिक शेतीच करावी लागते. त्यामुळे त्यांचे उत्पादन घडते आणि त्यांचे नुकसान होते. शेतकऱ्यांना कमी श्रमात अधिक पिके घेता यावीत आणि पिकांचे उत्पादन वाढावी यासाठी शासनाने शेतकऱ्यांना कृषी उपक्रम खरेदीला प्रोत्साहन देण्यासाठी अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे.

**3) पॉली हाऊस सबसिडी योजना:-**

सध्याच्या काळात आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी विविध प्रकारचे पत्र्याने झाकलेले घर असते. या घरातील वातावरण विकास बनवून प्रत्येक हंगामात विविध प्रकारच्या भाज्यांचे उत्पादन केले जाते .बाह्य वातावरणाचा पॉली हाउस वर परिणाम होत नाही. अशा प्रकारे शेती केल्यामुळे नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे शेतकऱ्यांचे नुकसान बऱ्याच प्रमाणात कमी करता येते .

**4) पीएम प्रणाम योजना :-**

ही केंद्र सरकारची महत्त्वकांक्षी योजना आहे.सरकारवरील अनुदानाचा बोजा कमी करणे आणि शेतीमध्ये रासायनिक खतांच्या जागी पर्यायी खतांना प्रोत्साहन देणे हा त्यांचा उद्देश आहे. यामधील सेंद्रिय शेतीतून उत्पादन केलेल्या उत्पादनाच्या मार्केटिंग वरील सरकारने भर दिला आहे त्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा थेट लाभ मिळू शकतो.

**5) नमो शेतकरी महासन्मान निधी योजना :-**

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केंद्र सरकारकडून किमान सन्मान निधी योजने अंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांना एका वर्षात सहा हजार रुपये दिले जातात .याच अनुषंगाने आता महाराष्ट्र सरकारने सुरू केलेल्या नमो शेतकरी महा सन्मान निधी योजनेअंतर्गत शेतकरी बांधवांना एका वर्षात सहा हजार रुपये मिळणार आहेत .

**6) राष्ट्रीय कृषी विकास योजना :-**

राष्ट्रीय कृषी विकास योजना केंद्र सरकारने 2007 पासून सुरू केली .या योजनेद्वारे कृषी आणि संबंधित क्षेत्राचा सर्वांगीण विकास निश्चित केला जाईल. यासाठी राज्य आणि केंद्रशासित प्रदेश त्यांचे कृषी आणि संबंधित क्षेत्र विकास उपक्रम निवडू शकते. या योजनेचा मुख्य उद्देश कृषी आणि क्षेत्राचा विकास करणे आहे. यासाठी कृषी व्यवसाय उद्योजकतेला ज्यांना दिली जाईल. या योजनेतून कृषी क्षेत्रात पायाभूत सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत त्यामुळे दर्जेदार निविष्ठा साठवून बाजारपेठ सुविधा दिल्या जातील.

**7) मागेल त्याला शेततळे शेतकरी योजना :-**

महाराष्ट्र राज्यात शेती करणाऱ्या बहुतांश शेतकऱ्यांची पिके पावसाच्या पाण्यावर अवलंबून असतात परंतु काही वेळा अतिवृष्टीमुळे किंवा कमी पावसामुळे शेतकऱ्यांची पिके नष्ट होतात. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य उत्पादन घेता येत नाही आणि त्यामुळेच महाराष्ट्र राज्यातील बहुतांश गरीब शेतकरी आर्थिक परिस्थितीला त्रस्त आहेत. त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सरकारकडून विविध योजना सुरू केल्या जात आहेत. त्यातील एक म्हणजे मागेल त्याला शेततळे या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना त्याच्या शेतात त्याला पन्नास हजार रुपयाची आर्थिक मदत केली जाते.

**7) मागेल त्याला विहीर :-**

राज्यात पडणाऱ्या नेहमीच्या दुष्काळामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या शेतीवर परिणाम होतो. शेतकऱ्यांना पिकांच्या उत्पादनासाठी भरपूर सिंचनाची तसेच पाण्याची आवश्यकता असते. सिंचनाशिवाय शेतकऱ्याची पिके वाळायला लागतात. शेतापर्यंत पाणी न पोहोचणे किंवा सिंचनाची काम करण्यासाठी सिंचनाची साधने खरेदी करणे हे त्याची मुख्य कारण आहेत.दुष्काळग्रस्त परिस्थिती वर मात करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने मागेल त्याला विहीर योजना सुरू केली आहे.

**8) शेतमाल तारण योजना :-**

शेतकऱ्यांचा शेतमाल योग्य ठिकाणी साठवून जेव्हा चांगला भाव मिळेल त्या वेळेला बाजारात आणणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे .यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालासाठी योग्य भाव मिळू शकेल. या योजनेअंतर्गत शेतकरी त्यांचा शेतमाल कृषी उत्पन्न बाजार समितीत तारण ठेवू शकतात व त्याबद्दल बदलल्या चालू हंगामातील शेती करण्यासाठी कर्ज मिळवू शकतात.

**8) प्रधानमंत्री फसल बीमा योजना :-**

दुष्काळामुळे एखाद्या शेतकऱ्याच्या पिकाची नुकसान झाल्यास अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना विमा संरक्षण देण्याची तरतूद प्रधानमंत्री फसल बीमा योजनेअंतर्गत करण्यात आली आहे. प्रधानमंत्री फसल बीमा योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना 1.8 लाख कोटीच्या रुपयाची विमा दाव्याची रक्कम देण्यात आली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ मिळावा नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले नुकसान भरून काढता यावे.

**9) प्रधानमंत्री कृषी सिचाई योजना :-**

पिकाला योग्य प्रमाणात पाणी न मिळाल्यास ते खराब होते. त्यामुळे शेतकऱ्यांनाही मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागते.देशातील शेतकरी शेतीसाठी पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहेत परंतु अनियमित आणि आपल्या पावसामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.शेतकऱ्यांची ही समस्या लक्षात घेऊन केंद्र सरकारने प्रधानमंत्री कृषी सिंचाई ही योजना सुरू केली आहे. या योजनेद्वारे देशातील प्रत्येक शेतापर्यंत पाणी पोहोचण्याचा सरकारचा निर्धार आहे. याद्वारे जलस्त्रोताचा जास्तीत जास्त वापर करण्यावर अधिक भर देण्यात आला आहे. दुष्काळाने अपुऱ्या पावसामुळे होणारे शेतीचे नुकसान टाळता येईल.

**9) सौर कृषी वाहिनी योजना :-**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड तर्फे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरू करण्यात आली आहे. सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत महाराष्ट्र दिन विद्युत वितरण कंपनी लिमिटेड शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीवर सौर पॅनल बसून दिवसा वीज पूरवून सुमारे दोन ते दहा मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प या योजनेअंतर्गत कृषी बहूल भागात उपकेंद्राच्या पाच किलोमीटर परिसरात बांधण्यात येत आहेत.

**10) किसान क्रेडिट कार्ड योजना :-**

किसान क्रेडिट कार्ड योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना क्रेडिट कार्ड दिली जातात.याचा उपयोग शेतकरी शेतीसाठी कर्ज घेण्यासाठी करू शकतात त्याचप्रमाणे हे किसान क्रेडिट कार्ड शेतकऱ्यांना एटीएम मधून पैसे काढण्यासाठी उपयोगी पडते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1) डॉ.जी.बी.गावंडे : भारतातील कृषी क्षेत्राच्या समस्या आणि उपाय योजना

2) डॉ.जयदेवी पवार : कृषी सुधारणा कोठे व कोणत्या

3) दैनिक लोकमत न्यूज नेटवर्क दिनांक 14 ऑक्टोबर 2017 कृषी क्षेत्रातील सुधारणांसाठी राज्यांना सोबत घेऊन काम करून नीती आयोगाची माहिती

# माहितीचे स्त्रोत असणाऱ्या ग्रंथालय क्षेत्रात काळानुसार झालेले बदल - एक अभ्यास

**लीना नारायणराव पुप्पलवार**

ग्रंथपाल, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा,जी. - चंद्रपूर, महाराष्ट्र

**प्रस्तावना**

ग्रंथालय क्षेत्राचा इतिहास खूप मोठा आणि प्राचीन स्वरूपाचा आहे. कालानुरूप ग्रंथालये बदलत गेली. नव्या इमारती झाल्या, ग्रंथसंख्या तर वाढलीच, पण अनेक सांस्कृतिक शैक्षणिक उपक्रमदेखील वाढले. नव्या तंत्राचा वापर करत अनेकांनी संगणकीकरण केले, बार कोड पद्धत सुरू झाली. काही ग्रंथालयांनी जुने ग्रंथ, हस्तलिखिते स्कॅन करून त्याचे ई-बुक देखील केले. स्पर्धा परीक्षांची निकड ओळखून जवळपास प्रत्येक ग्रंथालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू आहे. बदलत्या काळानुसार ग्रंथ संग्रहालये हायटेक होत आहेत.

वाचकांना घरूनच इंटरनेद्वारे कोणते पुस्तक उपलब्ध आहे ते समजू शकेल तसेच पुस्तक घरपोच देखील मिळु शकते. २४ तास सुरू असणारी अभ्यासिकादेखील आहेत. प्रबोधनासाठी वाचन, वाचनासाठी पुस्तके व वाचनालयांची गरज असते. वाचन चळवळीचा विकास व्हावा व गावोगावी वाचनालये सुरू व्हावीत, यासाठी महाराष्ट्र सरकार प्रोत्साहनात्मक अनुदान देते. ग्रंथालय शास्त्राचे तज्ज्ञ एस. आर. रंगनाथन यांच्या मते, ग्रंथालये ही लोकशाही मूल्ये जोपासणारी सार्वजनिक संस्था आहे. ग्रंथालयाच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ते म्हणतात ज्या दिवशी या मंदिराकडे जाणाऱ्या वाटा ग्रंथालयाकडे जातील त्या दिवशी खऱ्या अर्थाने देशाचा, समाजाचा, राष्ट्राचा विकास होईल.

ज्ञानाधिष्ठित समाजात ग्रंथालय हा महत्त्वाचा घटक आहे. याद्वारे मानवाच्या ज्ञानविषयक गरजांची पूर्ती होते आणि ज्ञानाचा प्रसार पिढ्यान्पिढ्या होत राहतो. ज्ञान संप्रेषण प्रक्रियेत ग्रंथालये ही महत्त्वपूर्ण घटक आहेत. याद्वारे वैयक्तिक आणि सामाजिक प्रगती साधली जाते. ग्रंथालयांमुळे विश्वात शांततानिर्मिती, लोकशाही वृद्धिंगत होते, मानवतावाद वाढीस लागतो तसेच सर्वत्र ज्ञान व आर्थिक समृद्धी वाढीस लागते. ग्रंथालयांमुळे जागतिक स्तरावर सांस्कृतिक आदान-प्रदान वाढीस लागते तसेच नीतिमूल्यांची जपणूक व वाढ होण्यास मदत होते.

ग्रंथालयांमुळे ज्ञानात नवीन भर पडते व नवीन संशोधनात्मक शाखांची निर्मिती होण्यास मदत होते. यामुळेच ज्ञान वर्गीकरण व विविध सेवा पद्धतींची निर्मितीही दिसून येते. **हॅरॉडस लायब्रेरियन्स ग्लॉसरी अँड रेफरन्स बुक :** "ग्रंथालय म्हणजे वाचन, अभ्यास आणि संदर्भाकरिता ग्रंथ आणि इतर वाङमयीन साहित्य यांचा संग्रह, अशी स्वतंत्र जागा ज्यामध्ये वाचन साहित्याचा संग्रह केलेला असतो." सर्व साधारणपणे ग्रंथालये ही सामाजिक सर्जनशीलतेमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतात आणि यामुळे ग्रंथालये ही व्यक्तिगत तसेच सामाजिक प्रगतीसाठी मदत करतात. या सर्वांमुळे ग्रंथालयांना सामाजिक संस्था असे संबोधले जाते. ग्रंथालयांची भूमिका वाचकांना उपयुक्त सेवा प्रदान करून ज्ञान विकास करण्यास मदत करण्याची आहे. वैयक्तिक आणि सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी ग्रंथालयीन वाचन साहित्याचा उपयोग केला जातो.

**उद्दिष्टे**

1) शैक्षणिक व सामाजिक घटकांच्या माहिती विषयक गरजांची पूर्तता करणे.
2) विविधं प्रकारच्या शैक्षणिक व संदर्भ ग्रंथाचे संवर्धन करणे.
3) विविध अभ्यासक्रमांस लागणारे वाचन साहित्य उपलब्ध करून देणे.

4) वाचकांना द्यावयाच्या माहितीचे व संदर्भ सेवांचे नियोजन करणे.

प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत ग्रंथालयाचे स्वरूप कसे होते. माहिती प्रदान करण्याची तंत्र कोणते होते हे काळानुसार खालील प्रमाणे स्पष्ट होते.

**1. प्राचीन काळ** : प्राचीन काळी इजिप्त आणि अलसरीया शासकीय कागदपत्रे व धर्मिक वाचन साहित्य अभिलेखागार या स्वरूपात ग्रंथालये अस्तित्वात होती. ग्रीस व इजिप्त या देशात ग्रंथालये असल्याची नोद आढळते. प्राचीन भारतात नालंदा विश्वविद्यालयाचे अति समृद्ध ग्रंथालय होते. भारतात प्राचीन काळापासून विद्यापीठे अस्तित्वात होती. उदा. नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला, राजगृह, ओदांतपुरी, वल्लभी इत्यादी होय. सर्व भारतीय प्राचीन विद्यापीठांमध्ये सुसज्ज व परिपूर्ण ग्रंथालये अस्तित्वात होती. जगातील सर्वांत प्राचीन ग्रंथालये सुमेरियन व बॅबिलोनियन संस्कृतींच्या काळात अस्तित्वात होती, असे सिद्ध होते. उदा., ख्रि. पू. २७०० वर्षे धार्मिक व शासकीय ग्रंथालये होती. टेयो येथील एका ग्रंथालयात तीस हजार ग्रंथ होते.

चुनखडीपासून तयार केलेल्या विटांवर, धातू अथवा लाकूड यांपासून तयार केलेल्या लेखणीने क्यूनिफॉर्म लिपीत लिहिलेल्या इष्टिकाग्रंथांचा संग्रह म्हणजे जगातील पहिला ग्रंथसंग्रह होय. सु. १,२०० वर्षांच्या ग्रीक संस्कृतीच्या कालखंडातील पहिल्या ६०० वर्षांतील ग्रंथ उपलब्ध नाहीत. इ. स. पू.पाचव्या शतकात खाजगी ग्रंथालयेही अस्तित्वात होती. त्यांत युरिपिडीझ, ॲरिस्टॉटल व प्लेटो यांच्या ग्रंथालयांचा उल्लेख करण्यात येतो. अकादमीच्या स्थापनेमुळे तेथेही ग्रंथसंग्रह असावा असे दिसते. रोमन सम्राटांनी सार्वजनिक ग्रंथालये स्थापन केली होती. पपायरस, कातडे या माध्यमांवरच ग्रंथ लिहिले जात.

सोयीची जागा, तज्ञ व तत्पर ग्रंथपाल, उपयुक्त ग्रंथांचा संग्रह, ग्रंथांची शास्त्रशुद्ध रचना व आर्थिक सुस्थिरता ही आदर्श ग्रंथालयाची पाच महत्त्वाची अंगे मानली जातात. धार्मिक वचने, प्रार्थना, मंत्रतंत्र, लोककथा, न्यायनिवाडे यांबरोबरच तत्कालीन सामाजिक, राजकीय ग्रंथांचा समावेश होतो. सोयीची जागा, तज्ञ व तत्पर ग्रंथपाल, उपयुक्त ग्रंथांचा संग्रह, ग्रंथांची शास्त्रशुद्ध रचना व आर्थिक सुस्थिरता ही आदर्श ग्रंथालयाची पाच महत्त्वाची अंगे मानली जातात.

**2. मध्ययुगीन काळ :** मध्ययुगीन मुस्लिम देशामध्येही ग्रंथालये होती. अरब बगदाद येथे मोठ्या प्रमाणात ग्रंथालये होती. मध्ययुगीन काळामध्ये हस्तलिखित पोथ्या जतन करून ठेवल्या जात. राजे-महाराजे आपला स्वतंत्र ग्रंथसंग्रह ठेवत असत. मध्ययुगात मुस्लिम देशांमध्येही ग्रंथालये स्थापन करण्यात आली होती. अरब जगतातील जेत्यांनी ग्रंथसंग्रह जमा करून ही ग्रंथालये उभारली होती. बगदाद हे मध्ययुगातील एक महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र होते. येथे मोठ्या प्रमाणात ग्रंथालये होती.

त्या काळी बुद्धविहारे, मंदिरे, मशिदी ही शिक्षण घेण्याची स्थळे होती. शिक्षण घेताना काही संदर्भांची आवश्यकता असल्यास यामधील ग्रंथसंग्रहांचा आधार घेतला जात असे. अनेक आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांनी या ग्रंथालयांना भेटी दिल्याचा उल्लेख प्राप्त होतो. ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतात विद्यापीठे व महाविद्यालये स्थापन करण्यात आली. साहजिकच, शैक्षणिक ग्रंथालयांची उभारणी झाली. हुमायूनामा, बाबरनामा, संत साहित्यातील ग्रंथ, वारकऱ्यांचे योगदान यासारखे ग्रंथ ग्रंथालयाच्या माध्यमातून आजही मध्ययुगीन इतिहासाची साक्ष देतात. या सामाजिक, शैक्षणिक, राजनीतिक, कौटुंबिक, आर्थिक, सांस्कृतिक, कृषी विषयक माहिती देणारे ग्रंथ आजही उपलब्ध आहेत. लिखित स्वरूपातील ग्रंथ विविध काळातील तुलनात्मक अभ्यासासाठी उपयोगी पडतात. त्यामुळे ग्रंथालय क्षेत्राचे काम अत्यंत महत्त्वपूर्ण व जबाबदारीचे आहे.

स्वातंत्र्यानंतर विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकास व संशोधनाकरिता संशोधन प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या. त्यामुळे संशोधन ग्रंथालये अस्तित्वात आली. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी सार्वजनिक ग्रंथालये स्थापन केली. मध्ययुगीन काळ हा धार्मिक घडामोडीतून उलघडलेला असल्यामुळे विविध ग्रंथसंपदा त्या काळातील उपलब्ध आहे. या ग्रंथसंपदेच्या माध्यमातून मुघल काळ सल्तनत काळ या कालखंडात कोणकोणत्या घडामोडी घडल्या यांची सविस्तर माहिती

मिळण्यास मदत होते. मध्ययुगीन कालखंडात विविध कलांना आश्रय देणारे राजे होऊन गेले. याचे पुरावे आणि दाखले विविध ग्रंथातून प्राप्त होतात.

३ **आधुनिक काळ** : या कालखंडात विज्ञान प्रसार व विकास झाला. माहिती देवाण घेवाण वाढली, संशोधनांत वाढ झाली, शिक्षणात वाढ झाली, नवनवीन तंत्रज्ञानात वाढ झाली. एकोणिसाव्या शतकात पाश्चिमात्य देशांत औद्योगिक क्रांतीनंतर शिक्षणाचा झपाट्याने प्रसार झाला. ग्रंथांची जरूरी भासू लागली व ती गरज भागविणाऱ्या संस्थाही निर्माण झाल्या. साहजिकच ग्रंथसंख्या व ग्रंथालये यांत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. या संग्रहांची सुसूत्र व्यवस्था कशी ठेवावी याचा विचार सुरू झाला व या गरजेतून ग्रंथालयशास्त्र विकसित होत गेले.

बव्हेरियन स्टेट लायब्ररी या संस्थेचा प्रमुख मार्टिन श्रेटिंजर, ब्रिटीश म्यूझीयम, लंडन या ग्रंथालयाचा प्रमुख अँटोनी पानीत्सी व त्याचा समकालीन एडवर्ड एडवर्ड्झ या कर्तबगार ग्रंथपालांनी ग्रंथालयशास्त्राचे पायाभूत कार्य केले. केवळ ग्रंथसंग्रह करणे व त्याचे जतन करणे हेच आपले कार्य होये. पारंपरिक ज्ञान साधनाबरोबर डिजिटल ज्ञान साधनांचा उदय झाला. त्यांमुळे आधुनिक ग्रंथालये अधिकच विकसित झाली. ग्रंथालयांत नवीन सेवांचा उदय झाला. ब्रिटिशपूर्व काळामध्ये स्थापन झालेली काही सार्वजनिक ग्रंथालय ही आज केवळ ग्रंथालय न राहता संस्कृतिक केंद्र बनलेली आहेत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे नाशिकचे सार्वजनिक ग्रंथालय हे होय. या ग्रंथालयांनी आपल्या सातत्यपूर्ण कार्यामुळे महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशामध्ये एक मोठा नावलौकिक प्राप्त केलेला आहे.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस महाराष्ट्रात लोकमान्य टिळक यांच्या नेतृत्वाने स्वातंत्र्य चळवळीस सुरुवात झालेली होती. या काळात राजकीय कार्याचे व्यासपीठ या दृष्टीने पुढाऱ्यांनी सार्वजनिक ग्रंथालयांचा उपयोग करून घेतला. त्यावेळच्या मुंबई सरकारच्या ध्यानात ही गोष्ट आल्यानंतर १९०९ मध्ये ही ग्रंथालये सरकारकडे नोंदविण्यासाठी सरकारने नियमावली तयार केली. सरकारने निषिद्ध ठरविलेले वाङ्मय ग्रंथालयात ठेवू नये तसेच ग्रंथालयाची जागा राजकीय कारणासाठी वापरू नये अशा अटी होत्या. लोकमान्य टिळक यांच्या मृत्यूनंतर त्यांचे स्मारक म्हणून महाराष्ट्रात ग्रंथालयांची स्थापना करण्यात आली.

**महाराष्ट्रातील काही ग्रंथालये :** भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे (१९१०) विदर्भ साहित्य संघ, श्री. शिवाजी (गडकरी) ग्रंथालय, नागपूर (१९२३) कैवल्यधाम ग्रंथालय, लोणावळा (१९२४) प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई (१९२५) भोसला वेदशास्त्र महाविद्यालय, नागपूर (१९३०) राजवाडे संशोधन मंदिर, धुळे (१९३२) शारदाश्रम ग्रंथालय, यवतमाळ (१९३२) श्रीरामकृष्ण आश्रम ग्रंथालय, नागपूर (१९३२) केसरी-मराठा ग्रंथशाळा, पुणे (१९३२) श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर, धुळे (१९३६) भारतीय विद्याभवन मुंबई (१९३९) ही त्यांपैकी काही प्रमुख ग्रंथालये होत.

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रात पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर येथे स्थापन झालेल्या विद्यापीठांची ग्रंथालयेही उल्लेखनीय आहेत. बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांच्याप्रमाणे भोर, औंध, फलटण, मिरज, जमखंडी, इचलकरंजी येथील संस्थानिकांनीही आपापल्या संस्थानांत ग्रंथालये स्थापन केली. संस्थाने विलीन झाल्यानंतर ती सर्व ग्रंथालये इतर मोठ्या ग्रंथालयांत समाविष्ट झाली. विविध जिल्ह्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालय चळवळ पुढे नेण्यात या ग्रंथालयाने मोठे योगदान देखील दिलेली आहे.आज डिजिटल ग्रंथालय ही संकल्पना रूढ होत आहे. अनेक नवीन कल्पना ग्रंथालयात बघायला मिळतात.

ग्रंथालयाचे विविध प्रकार अस्तित्वामध्ये आहेत कार्पोरेट व इंडस्ट्री क्षेत्रांमध्ये स्वतंत्र ग्रंथालय ही तेथील कर्मचारी, व्यवस्थापक व अधिकारी, इंजिनियर्स यांच्यासाठी उपलब्ध असतात. वेळेनुसार व आवडीनुसार या ग्रंथालयाचा या लोकांना लाभ घेता येतो. आज वैयक्तिक स्तरावर देखील ग्रंथालय तयार केली जातात. शिक्षक, प्राध्यापक डॉक्टर, तसेच व्यापारी हे आपल्या आवडीनुसार आपल्या घरांमध्येच ग्रंथालय तयार करतात. आपल्या व्यवसायानुसार ग्रंथसंग्रह जतन करणे त्याचं वाचन करणे अशा स्वरूपामध्ये ही ग्रंथालये उभी राहताना दिसतात. नवीन ग्रंथालयांचे स्वरूप हे संगणकीय होते आहे. आंतरजालावरून माहितीचा शोध शक्य होतो.

योग्य ते सदस्यत्व घेऊन त्या त्या ग्रंथालयाच्या संकेतस्थळावर माहितीचा शोध घेता येतो. मध्ययुगीन काळामध्ये हस्तलिखित पोथ्या जतन करून ठेवल्या जात. राजे-महाराजे आपला स्वतंत्र ग्रंथसंग्रह ठेवत असत. आज संपूर्ण जगामध्ये डिजिटल ग्रंथालय ही संकल्पना आलेली आहे डिजिटल ग्रंथालयाच्या साहयाने तुम्हाला जगभरातील

अनेक मोलाचे ग्रंथ हे ग्रंथालयामधून वाचता येणे शक्य झाले आहे, इतकेच नाही तर कुणालाही त्या ग्रंथालयाचे सदस्य म्हणून नोंद करून हव्या त्या पद्धतीची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. आज माहिती प्रसारणाच्या क्षेत्रांमध्ये मोठे बदल झाल्यामुळे त्या दृष्टीने ग्रंथालये ही वेगळ्या पद्धतीने विकसित होत आहेत.

**समारोप**

ग्रंथालये अस्तित्वात येण्यामागे ज्ञानसंग्रह हा महत्त्वाचा हेतू आहे, परंतु त्याबरोबर ज्ञानाचा प्रसार, प्रचार, समाजप्रबोधन व मनोरंजन हेही हेतू त्यामागे होते. आतापर्यंतथा इतिहास पाहिल्यास ग्रंथालये ही शिक्षणाला व संशोधनाला पूरक संस्था म्हणून स्थापन झाल्याचे आढळते. आजची ग्रंथालये माहिती केंद्रे झालेली आहेत आणि संगणकीकरण तसेच माहितीच्या महाजालामुळे विश्वव्यापी झाली आहेत. ग्रंथालयशास्त्र या विषयाची व्याप्ती इतर सर्व विषयांच्या व्याप्तीशी संलग्न असल्याचे दिसते.

या विषयातील संशोधन जास्तीत जास्त उपयोजित स्वरूपाचे असते. या विषयातील संशोधने ही इतर विषयांतील संशोधनांप्रमाणेच महत्वपूर्ण व समाज उपयोगी असते. इतर विषयातील माहितीची व्याप्ती वाढविण्यासाठी ग्रंथालय शास्त्रात संशोधनाचे उल्लेखनीय योगदान  आहे. काळानुसार वाचन साहित्यामध्येही बदल होत गेले आहेत असे दिसून येते. ग्रंथ साहित्यातील प्राकृतिक स्वरूपातील बदल तसेच ग्रंथ देवघेवीच्या स्वरूपात ग्रंथालय व्यावसायिकांनी घडवून आणलेले बदल हे जाणीवपूर्वक केलेले आहेत.

माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचाही ग्रंथपालनावर फार मोठा परिणाम झालेला आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे ग्रंथपालनाच्या विविध पैलूंमध्ये अमूलाग्र बदल झालेले आहेत. आजही होत आहेत आणि यापुढेही होत राहणार असा रंग दिसतो आहे. वाचनसाहित्याच्या प्राकृतिक स्वरूपातील मुद्रित ते इलेक्ट्रॉनिक्स असा बदल झालेला आहे. ग्रंथपालनामध्ये होत असलेल्या बदलांमुळे नवीन परिस्थिती, नवीन आव्हाने समोर येतात आणि त्याचबरोबर नवनवीन समस्याही समोर येतात. या समस्यांवर मात करून झालेल्या बदलांना सामोरे जाण्यासाठी संशोधन आवश्यक आहे.

प्रचलित प्रथा, व्यवहार, सेवा, पध्दती यामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठीही संशोधन आवश्यक असते. संशोधनाद्वारे परिस्थितीची ओळख होते. समस्येचे आकलन होते आणि त्यातून मार्ग काढता येतो. ग्रंथालयाच्या संदर्भामध्ये सामाजिक संघटनांनी अथवा सामाजिक संस्थांनी पुढे येऊन तसेच सरकारने योग्य ती जबाबदारी स्वीकारण्याने ही ग्रंथालय चळवळ पुढे जाण्यास नक्कीच मदत होत आली आहे. कमीतकमी वेळेत योग्य ते वाचन साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी ग्रंथालय महत्त्वपूर्ण ठरतात.

ज्ञान साधनांचा वाढलेला आवाका, प्रकाशनांची प्रचंड उपलब्धता, माहितीतील वाढ, ग्रंथालयाच्या आर्थिक समस्या इ.सारख्या अनेक घटकांचा विचार करता विविध प्रकारच्या सेवांचे आयोजन ग्रंथालयांना करावे लागत आहे. आधुनिकता व सामाजिकता यांच्यात दुवा साधण्याचे काम प्रामुख्याने ग्रंथालय क्षेत्र करत असते. कोणत्याही काळात घडून गेलेली घटना लिखित स्वरूपात उपलब्ध असेल तर येणाऱ्या पिढ्यांना तो इतिहास समजण्यासाठी ग्रंथ मदतनिस ठरतात. प्रसार माध्यमात हरवलेली आजची तरुण  पिढी ग्रंथालयाकडे आकर्षित कशी होईल यासाठी प्रयत्न करणे. विविध काळातील इतिहासाची ग्रंथाची माहिती तरुणांना होणे गरजेचे आहे. त्यामुळे ग्रंथालय क्षेत्रात काळानुसार होत गेलेले बदल विकासाच्या पाऊलखुणा दर्शवतात.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1)पवार.एस.पी.(2013) ग्रंथालय व माहितीशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

2)फडके.द.न.(2015)ग्रंथालय संगणीकरण आणि आधुनिकीकरण, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.

3)जैन प्रकाश (2018) सुलभ ग्रंथालयशास्त्र, विश्व प्रकाशन,पुणे.

4)खान, आर.के, चक्रवर्ती, बी. आणि बॅनर्जी. एस. (2004) ग्रंथपालांसाठी मार्गदर्शक तत्त्वे, मित्तल प्रकाशन, नवी दिल्ली.

5) खन्ना.जे.के.(1987) लायब्ररी आणि सोसायटी, येसयेस प्रकाशन, नवी दिल्ली.

6)हुसेन.एस (2004) लायब्ररी वर्गीकरण : पैलू आणि विश्लेषण, बी. आर. प्रकाशन, नवी दिल्ली.

7)राजारामन. व्ही. (2007) माहिती तंत्रज्ञानाचा परिचय : प्रेंटिस प्रकाशन, नवी दिल्ली.

8)कुमार. के. आर. (1987) ग्रंथालय प्रशासन आणि व्यवस्थापन, विकास प्रकाशन, नवी दिल्ली.

# शास्त्रीय संगीतातील काळानुरूप बदलते गीत प्रकार

संशोधक

**डॉ. दिपाली चंद्रकांत पांडे**

संगीत विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणी सावरगाव.

**प्रस्तावना :**

संगीत ही या पृथ्वीतलावरील सर्वाधिक सुंदर अशी रचना आहे . कारण पृथ्वीच्या निर्मिती सोबतच संगीताचीही निर्मिती झालेली आहे. म्हणजेच मानवाच्या जन्माबरोबरच संगीतही त्याच्यासोबत होते. संगीताचा संबंध थेट मानवाच्या हृदयाशी जोडला गेलेला आहे. कारण आपण पाहतोच की, माणसाच्या हृदयातील ठोके हे कायम चालूच असतात. म्हणजेच स्वर आणि ताल हा मानवी अंतरंगात नैसर्गिकता:च जोडला गेलेला असल्यामुळे संगीताला अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे. आज पहावयास मिळते की, संगीताबद्दल अनेक संशोधन कार्य वेगवेगळ्या माध्यमातून सुरू आहेत. कारण याचा संबंध मानवी मनाशी जोडला गेलेला असल्यामुळे संगीताला चिकित्सा या दृष्टिकोनातूनही पाहिले जात आहे. केवळ आपल्याच देशात नाही तर बाहेर देशातही यावर खूप मोठ्या प्रमाणात संशोधन पाहावयास मिळते. शास्त्रीय संगीत ही आजच्या काळाची मोठी गरज बनलेली आहे. शास्त्रीय संगीताचा इतिहास पाहता यामध्ये काही गीत प्रकार समावेशित आहेत आणि याच गीत प्रकारांना आपण स्वर आणि तालाच्या माध्यमातून ऐकत असतो ते गीत प्रकार अगदी अति प्राचीन काळापासून म्हणजेच वैदिक काळापासून ते आजपर्यंत वेगवेगळे रूप धारण करून आपल्यापुढे आलेले आहेत. वैदिक कालापासून या गीत प्रकारांना विविध नावे देण्यात आलेली आहेत काळानुरूप प्राचीन गीत प्रकार तशीच राहून त्यात काही स्वरूपात बदल झालेला असून, तर काही गीत प्रकार नव्याने निर्मितीला आलेले आहेत. त्या गीत प्रकारांची माहिती या शोध निबंधाच्या माध्यमातून संशोधकाने अभ्यासनाचा प्रयत्न केलेला आहे.

**उद्देश:**

१)शास्त्रीय संगीताचा संक्षिप्त इतिहास अभ्यासणे.

२) शास्त्रीय संगीतातील गीत प्रकारांचा आढावा घेणे.

३) काळानुरूप बदलत्या गीत प्रकारांवर चर्चा होणे.

४) गीत प्रकारांची आवश्यकता व लोकप्रियता विशद करणे.

**गीत प्रकारांची गरज**:

वैदिक काळापासून आपण पाहिलेले आहे की साहित्य आणि कला यांचा परस्पर असा संबंध येतो म्हणजेच कलेला प्रदर्शित करण्यासाठी, त्याला व्यक्त करण्यासाठी त्या भावनांना व्यक्त करण्यासाठी शब्दांची अत्यंत आवश्यकता असते. केवळ शब्दांच्या माध्यमातून भावना ही प्रगटि तीकरण पूर्णपणे होऊ शकत नाही. आणि त्यामुळेच शब्दांना काव्यामध्ये बांधून त्याला संगीतामध्ये एकत्रित करून त्या भावना ज्यावेळी प्रदर्शित केल्या जातात त्यावेळी त्याला एक मूर्तस्वरूप प्रदान होते. हेच मूर्त स्वरूप आपल्याला विविध गीतांच्या माध्यमातून आजपर्यंत ऐकावयास मिळालेले आहे. विविध गीत प्रकारांचे आपली स्वतःची काही वेगळी अशी वैशिष्ट्य आहेत त्या वैशिष्ट्यांमुळे आपल्याला प्रत्येक घटनेची व्यवस्थित कल्पना येते. याबाबत डॉ. सुलभा ठकार यांनी खूप सुंदर मत मांडलेले आहे, 'मानवी स्वर हा कंठात निर्माण झाला तरी त्याचा प्रवास मुखातून होतो आणि मुखाच्या शक्ती अनेक आहेत. शब्द ही मानवी मुखाला लाभलेली विशेष देणगी आहे. स्वराचा प्रवास मुखातून होत असताना जिव्हा, दंत, तालू, मुर्धा, ओठ यांच्या सहाय्याने त्या स्वराची अनेक रूपे प्राप्त होतात व त्याचे शब्दात रूपांतर होते. अर्थात गाताना शब्दांचा उपयोग होणे अगदी नैसर्गिक आहे. दुसरी गोष्ट अशी की संगीत हेही उत्क्रांती होत होत आजच्या अवस्थेला आलेले आहे. प्राथमिक अवस्थेमध्ये गायनामध्ये शब्दांना महत्त्व असणे सहाजिकच आहे'.[१] याचाच अर्थ असा आहे, की मानवी जीवनामध्ये शब्दांनाही अत्यंत महत्त्व आहे, कारण प्रत्येक

वेळी मानवाचा दररोजचा व्यवहार हा शब्दांच्या माध्यमातून अधिक प्रमाणामध्ये जास्त होत असतो, कारण त्याच्या भावना पोचवण्याचं कार्य हे शब्दांच्या माध्यमातून अधिक प्रमाणात होते. पण ह्या भावना तो फक्त व्यवहारिक स्वरूपामध्ये पोहोचू शकतो पण ज्या वेळेला मन आणि भावना यांचा संयोग असतो. त्या भावभावनांचं प्रगटिकरण करण्यासाठी त्या वेळेला मात्र मन म्हणजे हृदय आणि हृदय म्हणजे आपलं संगीत याचीच आवश्यकता ही जास्त असते .आणि म्हणूनच ह्या दोन्हीही गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत . या सगळ्या माध्यमातून मानवाच्या निर्मिती सोबतच संगीत ज्या ज्या प्रकारे उत्क्रांत होत गेलं त्या प्रकारे त्या काळानुरूप बदलते गीत प्रकारही आपल्याला पहावयास मिळतात. म्हणूनच या शोधपत्राच्या माध्यमातून आपण शास्त्रीय संगीतातील म्हणजेच प्राचीन काळापासून, प्राचीन काळ हा अति प्राचीन काळापासून मानला जातो म्हणजेच त्या काळापासूनचे काळानुरूप बदलते गीत प्रकार पाहणार आहोत. ते गीत प्रकार म्हणजे सामगान, मार्गी संगीत, देशी संगीत, प्रबंध, ध्रुपद, ख्याल , टप्पा, तराना,, चतुरंग त्रिवट, सरगम, लक्षण गीत हे आहेत.

**सामगान :** वैदिक काळातील शास्त्रीय संगीतातील गीत प्रकार म्हणजे सामगान. त्या काळात शास्त्रामध्ये गायल्या जाणाऱ्या गीत प्रकाराला सामगान म्हणत असत. याचं कारण असे आहे की शास्त्रीय संगीतामधील पूर्ण लक्षणे ही सामगानात आढळून येतात. सामगनाची एक विशेषतः म्हणजे याला पवित्र मानले जाते. सामगान धार्मिक प्रसंगाच्या वेळी केले जात असे. आणि यातील गायन हे विशेषतः नियमांना सांभाळूनच होत असे. यावर कृष्णचंद्र ज्ञाते यांनी खूप सुंदर माहिती सांगीतलेली आहे. 'सामगानाकडून विशुद्ध संगीतावर ह्या स्वरांची श्रवणरम्य आलापी, लयबद्धता, मात्राबद्धता ही सांगीतिक उपलब्धी झाली. याशिवाय करकरी वीणा नावाची वाद्यही त्यावेळी अस्तित्वात होती. त्यामुळे सामगायन कलेसारखे सादर केले जाई. सामगान पद्धतीत हिंकार, प्रस्ताव, उद्गीय, प्रतीहार व निधन असे पाच भाग आहेत. या पाच प्रकारात आणखी दोन म्हणजेच ओम व उपद्रव मिळून पंचपदी म्हणजेच सप्तपदी बनली आहे'[२]आज जशी शास्त्रीय संगीतात राग गायनासाठी काही बंधन आहेत त्याचप्रमाणे सामगानाचेही काही बंधने होती. ती बंधने पाळूनच सामगायन होत असे. सामगान अग्रस्थ असावे, कोणतेही अक्षर वगळू नये म्हणजेच ज्या मूळ ऋचा आहेत त्या ऋचा किंवा सुक्तांमध्ये कोणतेही बदल केले जात नसत. म यामध्ये सौंदर्यशास्त्राला अजिबात वाव नव्हता, त्याचप्रमाणे अव्यस्थ किंवा ते गान अगदी त्या शास्त्रामध्ये बसवूनच गायलेले असावे. ज्याप्रमाणे नियम सांगितलेले आहेत त्याच नियमाप्रमाणे शब्दोचार करणे. जो स्वर त्या शब्दासाठी दिलेला आहे ठिकाणी त्याच स्वरांचा उच्चार केला जावा. अशा प्रकारे वेगवेगळी बंधने सामगनासाठी होती.

**मार्गी संगीत** :याच कालखंडात मार्गी संगीत नावाचा गीत प्रकार प्रचलित झाला. मार्गी संगीत हे देखील शास्त्रीय संगीताचा एक भाग आहे. मार्गी संगीतामध्ये संस्कृत भाषेचा अवलंब केला जातो. ज्यांना संस्कृत समजते अशाच लोकांना मार्गी संगीत गाण्याची मुभा होती. असे म्हटले जाते की, गंधर्वलोकी हे संगीत सादर केले जात होते. यज्ञयागच्या प्रसंगी देव देवतांना प्रसन्न करण्यासाठी मार्गी संगीताचा उपयोग होत असे, इतरत्र ठिकाणी मार्गी संगीत गाण्यासाठी परवानगी नव्हती.

**देशी संगीत** : वैदिक काळामध्ये देशीसंगीत हा गीतप्रकार उदयास आला. कारण मार्गी संगीत हे सर्वसामान्य जनतेला गाता येत नव्हते आणि संस्कृत असल्यामुळे समजत नसे.ज्या लोकांना संस्कृत येते त्याच लोकांना त्याचा आनंद घेता येत होता. लोकांनी आपल्या आनंदासाठी जे संगीत निर्माण केले त्याला देशी संगीत म्हटले जाऊ लागले. देशी संगीत हे आजच्या लोकसंगीता प्रमाणे आहे.

**जाती गायन :** देशी संगीत, मार्गी संगीताप्रमाणेच जाती गायन हे देखील प्रचारात होते. जाती गायन गात असताना त्याला दहा विशिष्ट नियम होते या दहा नियमांना सांभाळूनच जाती गायन सादर केले जात होते. जाती गायन ही संकल्पना राग गायन प्रचारात येण्यापूर्वीची आहे. म्हणजेच संशोधनानंतर असे लक्षात आले की, जाती गायनानंतर राग संगीताचा उगम झालेला आहे. . जातीमध्ये जे दहा नियम आहेत. त्याच नियमांचा उपयोग राग गायनात केला जात

आहे. हे दहा नियम म्हणजे ग्रह, अंश, तार, मंद्र, न्यास,अपन्यास, संन्यास, विन्यास, अल्पत्व, बहुत्व हे होत. पुढे याच जातींमधून ३० राग निर्माण झाले असे म्हणतात.

**प्रबंध गायन:** प्रबंध गायनाबद्दलची सविस्तर माहिती ही शारंगदेवांच्या संगीत रत्नाकर या ग्रंथा मधूनच आढळून येते. कारण हा ग्रंथ भारतीय शास्त्रीय संगीतातील अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो. राग गायन प्रचारात आल्यानंतर प्रबंध गायन हा प्रकार रूढ होत गेला.राग गायन ते प्रबंध गायन हे भारतीय संगीतातील स्थित्यंतर नेमके कधी झाले हे सांगता येत नाही. "देशी आणि सामान्यांच्या परिपाठात असलेल्या शब्दांचा उपयोग करून त्यांना पारिभाषिक संज्ञांची प्रतिष्ठा आणून दिली आणि शिवाय त्याचे पुष्टीकरण केले.जुने गीत गानप्रकार कालबाह्य होत असून नवीन राग प्रचारात येत आहेत. याची जाणीव शारंगदेवाला होती. तो स्वतःही दरबारी गायक होता. पुढील हिंदुस्तानी संगीताच्या निर्मितीत त्याचे कर्तुत्व उपयोग आणले गेले तो गोपालनायक हा संगीतकलेत पारंगत होता आणि शारंगदेव प्रणित प्रबंध गायकीचा तो उद्गाताही होता"[३]यावरून हेच लक्षात येते की प्रबंध गायनाची सुरुवात ही काळानुरूपच पुढे आलेली आहे .आणि म्हणूनच त्या काळात तो अत्यंत प्रचलित असा गीत प्रकार होता. थोडक्यात सांगायचे झाले तर, प्रबंधाचे सहा अंग आहेत ते म्हणजे, स्वर, विरुद, पद, तेन, पाठ ,ताल, उदग्रह, मेलापक, ताल. आणि चार धातू आहेत ते, म्हणजे उदग्राह, मेलापक, ध्रुव,आभोग असे. प्रबंध गायनात देखील नोम तोंम प्रकारची आलापी केली जात असे. प्रबंध गायन सुरू करण्यापूर्वी उपोहन व प्रत्युपोहन असे गायन केले जाई. त्याचप्रमाणे पं. भरत यांच्या काळात ध्रुवा गीते नावाचा गीत प्रकार देखील प्रचारात आला होता. आठव्या शतकापर्यंत तर अनेक प्रबंध हे प्रचारात आली. एका नियमबद्ध व ठराविक पद्धतीनेच प्रबंधगान होत असे. त्यात गायकाच्या कल्पकतेला वाव असे त्यामुळे तोच तो पणा नसे.

**धृपद :** काळाच्या ओघात म्हणजेच काळानुरूप पुढे प्रबंधाचे नंतर ध्रुपद हा गीत प्रकार शास्त्रीय संगीतामध्ये पुढे आला. हे एक प्रकारचे नवीन परिवर्तनच होते.धृपद गायन हा प्रकार मध्ययुगीन कालखंडाच्या सुरुवातीलाच म्हणजे प्रबंध गीत प्रकारानंतर प्रचारात आला होता. कालानुरूप त्याची लोकप्रियता वाढली आणि ध्रुपद , धमार हे गीत प्रकार अत्यंत प्रचलित झाले. हा गीत प्रकार राजे महाराजे, देवदेवता यांच्या स्तुती पर काव्यांचा होता परंतु हा शास्त्रीय रागामध्येच संगीतबद्ध केलेला होता. यावर अशोक रानडे यांचे मत,'भारतीय संगीत प्रकारांच्या संदर्भात राग विस्तार आणि शब्दार्थद्वारे तीव्रीरीकरण या दोन प्रवृत्तींमुळे संगीतात हे विविध प्रकार जन्माला आले आहेत. आणि ध्रुवद हा रागविस्तार ही प्रधानप्रवृत्ती असलेला संगीतप्रकार आहे.[४] आजच्या काळात धृपद, धमार हा गीत प्रकार फार प्रचलित व लोकप्रिय नसला तरीही आजही परंपरेचे लोक हाच गीत प्रकार सादर करीत आहेत. प्राचीन द्रुपदांमध्ये परिवर्तन होऊन मध्यकाळात त्याचा ध्रुव पद म्हणून विकास झाला. धृपद ही शैली पंधराव्या शतकाच्या जवळपास ग्वालियर, आग्रा, मथुरा, उन्नाव यासारख्या प्रदेशात जास्त प्रमाणात प्रचलित होती. मध्यकाळात ध्रुपदाला उच्च श्रेणीचे गायन समजले जात होते. राजा मानसिंह तोमर यांनी या गीत प्रकाराला खूप लोकप्रियता मिळवून दिली. ध्रुपदाचे काव्य हे हिंदी, उर्दू, ब्रज, संस्कृत भाषेत आहे मर्दानी आवाजाचे गायन समजले जाते. यामध्ये वीर रस, शृंगार रस आणि शांत रसाचा जास्त प्रमाणात अंतर्भाव आहे. ध्रुपद गायनाच्या चार बाणी म्हणजे चार शैली त्यावेळी प्रचलित होत्या त्यामध्ये खंडहार, गोबरहार, डागुर, आणि नौहार वाणी या ,चार शैली द्वारे सादर केले जात होते.

**ख्याल :** यातूनच पुढे ख्याल गायन हा प्रकार प्रचलित झाला. हादेखील काळानुरूप झालेलाच मोठा बदल आहे.हा बदल आजही भारतीय शास्त्रीय संगीतात प्रचलित आहे. म्हणजेच हा अत्यंत क्रांतिकारी मोठा बदल असून तो भारतीय शास्त्रीय संगीतासाठी मानाचा ठरलेला बदल आहे. 'ध्रुपद गायकीतील शब्दांचे महत्त्व, तालाचे बंधन, उत्कंठा, विसर्जन या प्रक्रियेचा अभाव स्वर व काल ह्या दोन स्तरांच्या मीलनाचा अभाव आणि अविष्कारातील दुभंगलेपणा ह्या दोषांमुळे ही गायकी सदोष होती. शिवाय ह्या गायकीचा एक साचाच होऊन गेला म्हणून पुढील काळात हे दोष वगळण्याचे प्रयत्न केले गेले असावे आणि सौंदर्य जाणिवेने स्वर ताल व शब्द यांची रचना मांडण्याचा प्रयत्न झाला असावा. या प्रयत्नातूनच ख्याल गायन या प्रकाराचा जन्म झाला असावा.[५] ध्रुपद गायनात कितीही म्हटले तरी भावनेला, शृंगार रसाला जास्त वाव नव्हता

आणि म्हणूनच ख्याल गायन पुढे आले. खयाल म्हणजे कल्पना. यामध्ये गायकाला स्वच्छंदी फिरण्याचा खूप वाव आहे रागाच्या नियमांचे बंधन असले तरीही रागातील स्वरांच्या राग रसाप्रमाणे गायकाला आपल्या भावना प्रगट करण्याचे हे खूप मोठे माध्यम आहे. आणि गायक स्वच्छंदीपणे यामध्ये आपली कला सादर करू शकतो . तो स्वतःही आनंद घेतो आणि इतरांनाही आनंद देतो म्हणूनच असे वाटते की ख्याल गायन ही पद्धत अजूनही वर्तमान काळापर्यंत टिकून आहे, लोकप्रिय आहे. सर्वत्र प्रचलित अशी पद्धत आहे. ख्याल गायनाचे चे दोन प्रकार आहेत एक बडा ख्याल जो विलंबित तालात सादर केला जातो. आणि दुसरा म्हणजे छोटा ख्याल जो मध्य लय किंवा द्रुत लयीत सादर केले जाते .

**त्रिवट:** हा शास्त्रीय संगीतातील एक गीत प्रकार आहे. शास्त्रीय संगीताच्या मैफिली मध्ये हा प्रकार अनेक गायक सादर करतात. शक्यतो ख्याल गायनानंतर हा प्रकार सादर केला जातो. या प्रकारामध्ये केवळ तबला किंवा पखवाजाचे बोल असतात. आणि तो तीन लाईन मध्ये सादर करतात. मध्यलय द्रुतलय आणि अति द्रुत लय. या गीत प्रकारासाठी त्रिताल, अडाचौताल, रूपक, एकताल या प्रकारच्या तालांचा उपयोग केला जातो.

**सरगम गीत:** या गीतामध्ये केवळ स्वरांचा उपयोग होतो. यामध्ये शब्दांचा वापर केला जात नाही.केवळ रागातील स्वरांच्या माध्यमातून हा गीत प्रकार मैफिलीमध्ये सादर करण्याची प्रथा आहे.

**तराना:** हा गीत प्रकार मध्ययुगीन काळातच प्रचारात आलेला असावा. यामध्ये अर्थहीन शब्दांचा उपयोग करतात. म्हणजेच दिन, तन, तनन, देरेना, तन देरे यासारखे शब्द वापरून त्या रागातील रसात्मक भावनांमध्ये ते शब्द गुंफून हा गीत प्रकार सादर केला जातो. शास्त्रीय संगीताच्या प्रत्येक मैफिलीमध्ये गायक प्रामुख्याने शक्यतो हा गीत प्रकार सादर करतात. कारण हा अत्यंत लोकप्रिय असा गीत प्रकार आहे.तराना हा गीत प्रकार विविध लयी मध्ये सादर केला जातो.

**चतुरंग:** शास्त्रीय संगीतात वरील गीतप्रकारांप्रमाणेच चतुरंग हा देखील सादर करतात. चतुरंग म्हणजे चार रंग असलेला गीत प्रकार. रंग म्हणजे चार वेगवेगळे गीत प्रकार. आपण वरती घेतलेलेच आहेत. यामध्ये सरगम ,तराना, त्रिवट आणि काही गीतांचे शब्द असा ह्या चार प्रकारचा मिळून एक गीत प्रकार गायला जातो. म्हणजे तो एकाच रागात गातात त्याला चतुरंग असे म्हणतात. चतुरंग देखील विविध लयि मध्ये सादर करतात.

**समारोप:** अशाप्रकारे भारतीय शास्त्रीय संगीतामध्ये या गीत प्रकारांचा समावेश आहे. या प्रत्येक गीत प्रकारामधून भारतीय संगीताला खूप काही मिळालेले आहे. या गीत प्रकारांचा उपयोग वेगवेगळ्या ठिकाणी केला जातो. कला टिकविणे हे कलाकाराचे मुख्य ध्येय असते आणि म्हणूनच कला अबाधित राहण्यासाठी त्या त्या काळातील गायक लोकांनी, शास्त्रकारांनी, संगीतकारांनी या विविध गीत प्रकारांना जन्म दिलेला पहावयास मिळतो. प्रत्येक देशाचे, राज्याचे ,लोकांचे आपल्या संस्कृतीचे, धार्मिकतेचे दर्शन घडविण्यासाठी कला हे मोठे माध्यम आहे आणि या कलेतील म्हणजेच संगीतकलेतील गीतांच्या माध्यमातून हा मोठा अभ्यास होतो कारण या माध्यमातून प्रत्येक म्हणजेच तत्कालीन कालखंडातील सांस्कृतिक धार्मिक माहिती ही सहजच पुढील अनेक पिढ्यांपर्यंत येऊन पोहोचत असते. आणि त्यामुळे याचा वारंवार अभ्यास होणे यावर चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. आज आपल्याला अति प्राचीन काळातील गीत प्रकार कोणते होते किमान त्याचे नाव तरी माहीत झालेले आहेत म्हणजेच आपला इतिहास आपल्याला अभ्यासावयास मिळतो याचे मुख्य कारण म्हणजे या गीत प्रकारांमधून मिळालेली माहिती असाच होतो. त्या काळातील परंपरा लक्षात घेऊन आणि काळानुरूप वर्तमान परिस्थितीची जाणीव घेऊन त्यामध्ये सतत काहीतरी नवीन बदल घडणे हे अत्यंत महत्त्वाचे असते. आणि म्हणूनच हे असे बदल घडत आलेले आहेत. परंतु त्यामुळे आपली परंपरा आहे तशीच आहे त्यामध्ये तत्कालीन बदल मात्र होत गेले आणि आवश्यक आहे तो बदल स्वीकारणे हे आज आपल्याला अत्यंत महत्त्वाचे आहे.

**संदर्भ** : १) डॉ. सुलभा ठकार, संगीत आणि सौंदर्यशास्त्र, अक्षरलेन प्रकाशन, पृ. क्र.१०

२) कृष्णचंद्र ज्ञाते, भारतीय संगीत स्वरूप आणि प्रयोजन, मौज प्रकाशन, पृ.क्र.३५

३)वामनराव देशपांडे, महाराष्ट्राचे संगीतातील कार्य, म राज्य सा.सं.मं.मुंबई, पृ. ४/५

४)अशोक रानडे, संगीताचे सौंदर्यशास्त्र, मौज प्रकाशन मुंबई, पृष्ठ क्रमांक ८८

५)कृष्णचंद्र ज्ञाते, भारतीय संगीत स्वरूप आणि प्रयोजन, मौज प्रकाशन मुंबई पृ.क्र.४५

# "युवा विकास व सक्षमीकरणासाठीचे विविध कार्यक्रम-उपक्रम"

**डॉ. सुवर्णा साहेबराव बरडे**

सहाय्यक प्राध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (प्र.ल.), जि. धुळे

**सारांश :**

युवावस्थेची संकल्पना वयाबरोबरच उत्साह, धैर्य, शिकण्याची आणि विकसासाठी उत्सुकतेची भावना दर्शवते. आंतरराष्ट्रीय संस्था आणि विद्वानांच्या मते, जैविक, शारीरिक आणि सांस्कृतिक घटकांवर युवकाची व्याख्या अवलंबून आहे. भारतात ग्रामीण व शहरी युवा लोकसंख्येच्या साक्षरता आणि रोजगार दरामध्ये असमानता दिसून येते. तर राष्ट्रीय युवा धोरण सर्वांगीण विकास आणि शाश्वततेवर भर देते. प्रधानमंत्री कौशल विकास योजना व दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना यासारख्या कौशल्य विकास योजना युवकांना रोजगार आणि स्वावलंबनासाठी सक्षम करतात. मेक इन इंडिया व डिजिटल इंडिया सारख्या उपक्रमांचा भर रोजगार निर्मिती आणि डिजिटल सशक्तीकरणावर आहे. स्टार्ट-अप इंडिया आणि प्रधानमंत्री मुद्रा योजना यासारख्या उद्योजकता योजना नावीन्यपूर्ण आणि व्यावसायिक उपक्रमांना प्रोत्साहन देतात. हे सर्व उपक्रम सर्वांगीण युवा विकास आणि राष्ट्र उभारणीसाठी चाललेल्या प्रयत्नांचे प्रदर्शन करते.

**मुख्य शब्द :** युवावस्था, युवा विकास, युवक सक्षमीकरण, युवक धोरण, युवक विकासाच्या योजना इ.

**प्रस्तावना :**

१९९९ मध्ये संयुक्त राष्ट्राच्या आमसभेमध्ये १२ ऑगस्ट हा दिवस 'आंतरराष्ट्रीय युवा दिन' म्हणून साजरा करण्याचे ठरले. तर भारतात स्वामी विवेकानंदांचा जयंती दिवस १२ जानेवारी हा 'राष्ट्रीय युवा दिन' म्हणून साजरा केला जातो. "आज जगातील युवकांपैकी ८७% युवक विकसनशील देशांमध्ये राहातात आणि या युवकांकडे संसाधने, शिक्षण, रोजगार, आरोग्य, आर्थिक, सामाजिक, राजकीय यांसारख्या संधी अल्प प्रमाणात व असमान पद्धतीने उपलब्ध आहेत."[१]

'Organization of Economic Co-operation and Development (OECD) या संस्थेच्या अभ्यासानुसार भारतातील ३०.८% युवकांना शिक्षण, रोजगार व कोणतेही तांत्रिक प्रशिक्षणदेखील नाही.'[२] म्हणजेच इतक्या मोठ्या प्रमाणावर युवक निष्क्रिय आहेत. एवढ्या प्रचंड लोकसंख्येचा उपयोग देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी करता आला तर भारत एक महासत्ता म्हणुन उदयास येण्यास वेळ लागणार नाही. त्यासाठी युवकांना शिक्षण, प्रशिक्षण व रोजगार मिळणे तसेच युवकांमधील उद्योजकतेला चालना देणे आवश्यक आहे.

**संशोधनाचे उद्देश :**

१. युवक व युवावस्थेची संकल्पना अभ्यासणे.
२. युवक व युवावस्था संदर्भातील विविध व्याख्यांचा आढावा घेणे.
३. युवा लोकसंख्या व तिच्या वैशिष्ट्यांचे अध्ययन करणे.
४. राष्ट्रीय युवक धोरण- २०२१ बाबत माहिती घेणे.
५. युवा विकास व सक्षमीकरणासाठीच्या विविध योजना, कार्यक्रम व उपक्रमांचा आढावा घेणे.

**अध्ययन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन निबंधाच्या अध्ययनासाठी आवश्यक माहितीचे संकलन करण्याकरिता दुय्यम स्त्रोताचा उपयोग केला आहे. त्यासाठी ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्र व इंटरनेट इ. साहित्याचे अध्ययन करण्यात आले आहे. तसेच प्राप्त माहितीचे वर्णनात्मक व गुणात्मक पध्दतीने विश्लेषण केले आहे.

**विषय विश्लेषण व चर्चा :**

१. **युवक व युवावस्थेची संकल्पना :** कसलेही आव्हान स्विकारुन ते तडीस नेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतो त्यास 'युवक' म्हटले जाते. ज्याच्यात उत्साह, चैतन्य, धैर्य, धाडस आहे, तसेच बरच काही जाणून घेण्यास व करण्यास उत्सुक असतो तो म्हणजे युवक.

**युवास्य सुन्दरत्वं च यौवनं चापि मनोहरम्।**
**वर्तते तस्य न क्षणं, यावज्जीवं जरायुवा।।**

प्राचीन भारतीय ग्रंथ 'हितोपदेश' मध्ये म्हटल्याप्रमाणे, युवा अवस्थेतील सौंदर्य आणि यौवन हे मोहक असते, परंतु ते केवळ तोपर्यंत टिकते जोपर्यंत एखाद्याचे आयुष्य वृद्धत्वापासून मुक्त आहे.

मानसशास्त्रानुसार, युवक म्हणजे १५ ते ३४ या वयोगटातील व्यक्ती किंवा बालपण आणि प्रौढत्व दरम्यानचा काळ म्हणजे युवावस्था होय. या काळात युवकांचे शरीर शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असते. युवावस्था ही आशावाद, कमाल कार्यक्षमताद्वारे वैशिष्ट्यीकृत तसेच सर्जनशील क्रिया, निराशा व शंका यांनी भरलेली असते. या अवस्थेत संज्ञानात्मक विकास, स्वाभिमान आणि आत्म-वास्तविकतेच्या गरजांचा विकास होतो.

२. **युवकाची व्याख्या :**

१) **राष्ट्रकुल (Commonwealth) व राष्ट्रीय युवा धोरण- २०१४** नुसार १५ ते २९ वयोगटात मोडणाऱ्या व्यक्तींना युवा मानण्यात आले आहे.

२) **संयुक्त राष्ट्र** (UN) **व जागतिक आरोग्य संघटना (**WHO) नुसार युवकांना '१५ ते २४ वयोगटातील समावेशित सर्व व्यक्ती' म्हणून संबोधले आहे.

३) **जीन पियाजे (Jean Piaget) :** यांनी युवकांना 'Formal Operational Stage' म्हणून वर्गीकृत केले आहे, जे पौगंडावस्थेपासून प्रौढत्वापर्यंत येते. हा टप्पा अमूर्त विचार, काल्पनिक तर्क आणि समस्या सोडवण्याच्या क्षमतेद्वारे दर्शविला जातो.

४) **हॉवर्ड गार्डनर** यांच्यामते, 'तारुण्य ही एक अशी अवस्था आहे जिथे व्यक्ती भाषिक, तार्किक, गणितीय, संगीत, अंतर्वैयक्तिक आणि नैसर्गिक बुद्धिमत्ता यासारख्या बुद्धिमत्तेचे विविध प्रकार विकसित आणि प्रदर्शित करू शकतात.

या व्याख्या जैवीक, शारीरिक, मानसशास्त्रीय व सांस्कृतिक फरकांवर आधारित आहेत. तसेच तारुण्यापासून प्रौढत्वापर्यंतचे संक्रमण नेहमीच वयानुसार काटेकोरपणे परिभाषित केले जात नाही, कारण सामाजिक व वैयक्तिक घटकांद्वारे देखील प्रभावित होऊ शकते.

३. **भारतातील युवा लोकसंख्या :** २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील युवा लोकसंख्येची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील.[३]

- २०११ च्या जनगणनेनुसार, भारतातील युवकांची लोकसंख्या ३३.३३ कोटी इतकी आहे. ज्यापैकी १७.२९ कोटी (५१.८७%) युवक आणि १६.०४ कोटी (४८.१३%) युवती आहेत. बहुसंख्य युवक (३६.१६%) हे १५-१९ वयोगटातील आहेत. तर २५-२९ वयोगटातील युवक ३०.४२% आहेत.
- २०११ च्या जनगणनेनुसार, ग्रामीण युवकांची लोकसंख्या २२.३८ कोटी होती. त्यापैकी ११.६० कोटी युवक आणि १०.७७ कोटी युवती आहेत. तर शहरी युवकांची लोकसंख्या १०.९५ कोटी होती. त्यापैकी ५.६८ कोटी युवक आणि ५.२७ कोटी युवती आहेत.
- २०११ च्या जनगणनेनुसार, युवा साक्षरता दर पुरुष ५५.२७% आणि महिलांचा ४४.७३% आहे. त्यात ग्रामीण युवा साक्षरता दर पुरुष ५६.६८% आणि महिलांचा ४३.३२% आहे. तर शहरी युवा साक्षरता दर पुरुष ५२.८७% आणि महिला ४७.१३% आहे.

- २०२१ नुसार, युवा लोकसंख्येचा कार्यबल सहभाग दर ३९.५% आहे, जो राष्ट्रीय सरासरी ५४.६% पेक्षा कमी आहे. युवकांचा कार्यबल सहभाग दर ५३.८% आहे, तर युवतींचा २३.३% आहे. युवकांचा बेरोजगारीचा दर १३.२% आहे, तर युवतींचा बेरोजगारीचा दर २७.२% आहे.

जनगणनेतील भारतातील युवकांची लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्ट्ये भारतासमोरील संधी आणि आव्हाने प्रतिबिंबित करते. भारताचे भविष्य घडवण्यात युवा लोकसंख्येची महत्त्वपूर्ण भूमिका आहे, कारण ते सामाजिक बदल, आर्थिक वाढ आणि नवनिर्मितीचे चालक आहेत. त्यामुळे त्यांच्या गरजा आणि आकांक्षा पूर्ण करणे व त्यांना पुरेसे शिक्षण, कौशल्य, आरोग्य आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे.

**४. राष्ट्रीय युवक धोरण** (**२०२१**)[४] **:** २०२१ चे युवा धोरण प्रामुख्याने युवकांचा सर्वांगीण विकास आणि त्याच्या शाश्वततेवर लक्ष केंद्रित करते. हे धोरण UN SDGs मधील ध्येयाशी सुसंगत आहे. ज्यात प्रामुख्याने दर्जेदार शिक्षण, कमी असमानता, आर्थिक वाढ यांचा समावेश आहे. खेळांमध्ये सहभागाला प्रोत्साहन देणे, आधुनिक व सर्वांगीण शालेय अभ्यासक्रम तयार करण्याचा समावेश आहे. त्याबरोबरच आर्थिक, कायदेशीर, डिजिटल साक्षरतेपर्यंत सहाय्य देण्याच्या योजना, तसेच भारताच्या प्रगतीसाठी कार्यशक्तीमध्ये युवकांचे महत्त्व या सर्व बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

**राष्ट्रीय युवक धोरण- २०२१ चे पाच प्रमुख प्राधान्य :**

१) सर्वसमावेशक शिक्षण प्रणाली
२) रोजगार व उद्योजकता विकास
३) भविष्यातील नेते म्हणून युवकांचे विकसन
४) सुधारित आरोग्य आणि कल्याणासाठी प्रवेश
५) सुधारित सुरक्षा, कायदा आणि न्याय

हे धोरण युवकांना सुरक्षितता, हक्क आणि न्याय मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्या कल्याणासाठी सर्वांगीण सहाय्य प्रदान करण्याच्या दिशेने कृतींची रूपरेषा देते. उपेक्षित आणि असुरक्षित युवकांसाठी सामाजिक न्याय सुनिश्चित करण्यासाठी विशेष प्रयत्नांची शिफारस करण्यात आली आहे. शिवाय, धोरणाच्या अंमलबजावणीसाठी स्वयंसेवी संस्था, युवा संघटना आणि खाजगी क्षेत्र यांच्यात सक्रिय समन्वय आवश्यक आहे.

**५. युवा विकास व सक्षमीकरणाच्या योजना :**

**१) शिक्षणासाठी योजना :** दर्जेदार शिक्षणात प्रवेश सुधारण्यासाठी विविध कार्यक्रम अस्तित्वात आहेत, जसे की प्राथमिक शिक्षणासाठी 'सर्व शिक्षा अभियान' (SSA) आणि माध्यमिक शिक्षणासाठी 'राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान' (RMSA) इ.

**२) स्वयम् :** एक ऑनलाइन शिक्षण मंच आहे. स्वयम देशभरातील विद्यार्थ्यांना मोफत अभ्यासक्रम उपलब्ध करून देते, ज्यामुळे युवकांना त्यांची कौशल्ये आणि ज्ञान वाढवता येते.[५]

**३) नेहरू युवा केंद्र संघटना (NYKS) आणि राष्ट्रीय सेवा योजना (NSS) :** या दोन स्वतंत्र योजना आहेत ज्या समाज सेवा, सामाजिक उपक्रम आणि राष्ट्र उभारणीत युवकांच्या सहभागाला प्रोत्साहन देतात. ज्यामुळे युवकांमध्ये सामाजिक जबाबदारी आणि नेतृत्वाची भावना वाढीस लागते.

**४) प्रधानमंत्री कौशल विकास योजना (PMKVY) :** ही भारत सरकारची एक प्रमुख योजना आहे. ज्याचा उद्देश विविध क्षेत्रातील युवकांना कौशल्य विकास प्रशिक्षण देणे, त्यांची रोजगारक्षमता वाढवणे, त्यांना उत्तम नोकरीच्या संधी व चांगली उपजीविका सुरक्षित करण्यात मदत करणे आहे. ही योजना रोजगारक्षमता वाढविण्यासाठी युवकांना विविध क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण देते.[६]

५) **दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना (DDU-GKY) :** ही योजना ग्रामीण युवकांना नोकरीची तयारी, स्वयंरोजगार व स्वावलंबी बनवण्यासाठी व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण देण्यावर लक्ष केंद्रित करते. ह्यात वंचित व मागास घटकातील युवकांना प्राधान्य दिले जाते.[७]

६) **Skill India :** या मोहिमेचे उद्दिष्ट लाखो युवकांना विविध कौशल्यांमध्ये प्रशिक्षित करणे हे आहे. ज्यामध्ये विविध कौशल्य विकास कार्यक्रम आणि योजनांचा समावेश होतो. ज्यामुळे युवकांना उद्योगाशी संबंधित कौशल्ये आत्मसात करता येतील आणि नोकरीच्या चांगल्या संधी सुरक्षित करता येतील. तसेच त्यांच्यातील स्वयंरोजगाराला चालना मिळेल.[८]

७) **Make in India :** मेक इन इंडियाचे उद्दिष्ट भारतात उत्पादन निर्मितीला चालना देणे व त्यातून नोकऱ्या निर्माण करणे आहे, ज्यामुळे अप्रत्यक्षपणे युवकांना अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.[९]

८) **डिजिटल इंडिया :** या मोहिमेचा उद्देश देशाला डिजिटली सशक्त समाजात रूपांतरित करणे तसेच तंत्रज्ञान आणि डिजिटल क्षेत्रात युवकांना अधिक संधी प्रदान करणे आहे. यामध्ये अशा कार्यक्रमांचा समावेश आहे ज्यांचे उद्दिष्ट डिजिटल पद्धतीने युवकांना सक्षम बनवणे आणि त्यांची डिजिटल साक्षरता वाढवणे आहे.

९) **Start-up India :** हा युवकांमधील उद्योजकतेला चालना देण्यासाठी सरकारचा एक उपक्रम आहे. हा कार्यक्रम नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी सहाय्य, निधी आणि प्रोत्साहन देऊन युवकांमध्ये उद्योजकता आणि नवकल्पना वाढवतो.[१०]

१०) **प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY) :** ही योजना युवकांसह इच्छुक उद्योजकांना त्यांचे छोटे व्यवसाय सुरू करण्यासाठी आणि उद्योग विस्तारित करण्यासाठी आर्थिक सहाय्य प्रदान करते.[११]

११) **राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान (NRLM) (Aajeevika) :** या योजनेचे उद्दिष्ट ग्रामीण भागात शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करणे, कौशल्य विकास, स्वयंरोजगार आणि उद्योजकता याद्वारे युवकांना लाभ मिळवून देणे हे आहे.[१२]

१२) **राष्ट्रीय शिकाऊ पदोन्नती योजना (NAPS) :** या योजनेचे उद्दिष्ट विविध उद्योगांमध्ये शिकाऊ संधींद्वारे युवकांना कौशल्य-आधारित प्रशिक्षण प्रदान करणे आहे. ही योजना उद्योजक प्रशिक्षणार्थींना सहभागी करून घेण्यास आणि त्यांना व्यावहारिक प्रशिक्षण देण्यासाठी प्रोत्साहन देते, त्यांच्या कौशल्य विकासात आणि भविष्यातील रोजगारक्षमतेमध्ये योगदान देते.[१३]

१३) **अटल इनोव्हेशन मिशन :** हा उपक्रम शाळा आणि महाविद्यालयांमध्ये Atal Thinking Lab ची स्थापना करून विद्यार्थ्यांना सर्जनशीलपणे विचार करण्यास आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये विकसित करून युवकांमध्ये नवकल्पना आणि उद्योजकतेला चालना देतो.

१४) **स्वच्छ भारत समर इंटर्नशिप :** स्वच्छ भारत अभियानाशी संबधित हा कार्यक्रम युवकांना स्वच्छता उपक्रमांशी संबंधित इंटर्नशिप घेण्यास प्रोत्साहित करतो.

१५) **पंतप्रधान ग्रामीण विकास फेलो (PMRDF) :** ही योजना तळागाळातील सामाजिक व आर्थिक विकासावर लक्ष केंद्रित करून ग्रामीण भागात काम करण्यासाठी युवा व्यावसायिकांना नियुक्त करते.[१४]

१६) **उडान :** हा उपक्रम जम्मू आणि काश्मीरमधील युवकांमध्ये कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगारक्षमता वाढवण्यावर भर देतो.

१७) **नई मंझिल योजना :** नई मंझिल हा अल्पसंख्याक समाजातील विशेषत: ज्यांनी औपचारिक शालेय शिक्षण पूर्ण केलेले नाही अशा युवकांसाठी कौशल्य विकास आणि शैक्षणिक कार्यक्रम आहे. यातून त्यांना त्यांची रोजगारक्षमता सुधारण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि शिक्षण प्रदान केले जाते.

**१८) राष्ट्रीय युवा सशक्तिकरण कार्यक्रम (RYSK) :** हा कार्यक्रम कौशल्य विकास, नेतृत्व प्रशिक्षण, नागरी सहभाग आणि स्वयंसेवकांच्या संधी उपलब्ध करून देण्याद्वारे युवकांच्या सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित करतो.[१५]

**१९) प्रधानमंत्री रोजगार प्रोत्साहन योजना (PMRPY) :** नियोक्त्यांना कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी (EPF) मध्ये त्यांच्या योगदानासाठी सबसिडी देऊन युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन देते.[१६]

**२०) युवा वसतिगृहे :** शासन विविध शहरे आणि पर्यटन स्थळांमध्ये युवा वसतिगृहे चालवते, ज्यातून तरुण प्रवाश्यांना परवडणारी निवास व्यवस्था आणि युवकांच्या पर्यटनाला मिळते.

**२१) राष्ट्रीय कौशल्य विकास संस्था (NSDC) :** प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी विविध क्षेत्रे आणि संस्थांशी सहयोग करून युवकांमधील कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी NSDC महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.[१७]

**निष्कर्ष :**

१. १५ ते २९ वयोगटातील ३३ कोटी पेक्षा जास्त युवक आहेत, जे सामाजिक आणि आर्थिक विकासाची प्रचंड क्षमता दर्शवतात.
२. युवकांचा शिक्षण आणि संधींमध्ये समान प्रवेश सुनिश्चित करण्यासाठी लक्ष्यित हस्तक्षेप आवश्यक आहेत.
३. भारतीय युवकांसमोर अनेक समस्या व आव्हाने आहेत. ज्यामुळे त्यांच्या सर्वांगीण विकासात बाधा निर्माण होतात.
४. युवकांच्या कल्याणासाठी अनेक कार्यक्रम-उपक्रम शासन, गैर-शासकिय संस्थांमार्फत राबविले जातात. युवकांशी संबंधित कार्यक्रम-उपक्रम अनेक असले तरी त्यांच्या बाबतीत योग्य माहितीचा अभाव युवकांमध्ये दिसून येतो.
५. सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, स्वयंम सारख्या उपक्रमांचा उद्देश दर्जेदार शिक्षणात प्रवेश सुधारणे आहे.
६. Skill India, PMKVY, DDU-GKY, RYSK, NSDC, NAPS, अटल इनोव्हेशन मिशन, स्वच्छ भारत समर इंटर्नशिप, नई मंझील योजना या सारख्या योजनांचा उद्देश युवकांमध्ये कौशल्य विकसित करुन रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे हा आहे.
७. Make in India, Start-up India, PMMY, PMRDF, NRLM या सारख्या योजनांचा उद्देश युवकांना प्रशिक्षण, कर्ज पुरवठा, रोजगार उपलब्ध करुन देऊन त्यांच्यातील उद्योजकतेला प्रोत्साहन देणे हा आहे.

**शिफारशी व उपाययोजना :**

१. भारतीय युवकांसमोर अनेक समस्या व आव्हाने दूर केली पाहिजेत. त्यांना विविध संधी उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत, ज्यामुळे त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल.
२. युवकांशी संबंधित कार्यक्रम-उपक्रमांची माहिती ग्रामीण युवकांपर्यंत पोहचविणे अत्यंत आवश्यक आहे. अर्ज कुठे करावा?, कुठे नोंदणी करावी?, आवश्यक कागदपत्रे कोणती?, अर्जाचा पाठपुरावा कसा करावा? याबाबत प्रशिक्षण व कार्यशाळा घेतल्या पाहिजेत.
३. युवा साक्षरता दर सुधारण्यासाठी कार्यक्रम विकसित केले पाहिजेत, विशेषत: उपेक्षित समुदायातील युवकांमध्ये, डिजिटल साक्षरता आणि व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण वाढवण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.
४. सामाजिक विषमता, बेरोजगारी दर कमी करण्यासाठी आणि आर्थिक सक्षमीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी युवकांच्या कौशल्य आणि आवडीनुसार उद्योजकता विकास आणि रोजगार निर्मितीच्या उपक्रमांची व्यवस्था केली पाहिजे.
५. इंटरनेट पायाभूत सुविधा आणि दुर्गम भागात प्रशिक्षण देऊन स्वयंम आणि डिजिटल इंडिया उपक्रमांसारख्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर प्रवेशयोग्यता सुधारणे.

६. युवकांशी संबंधित कार्यक्रम-उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये सहभागी प्रशासक आणि सुविधा देणाऱ्यांसाठी प्रशिक्षण व क्षमता वाढीसाठी प्रयत्न केले पाहिजेत.

७. भारतातील युवकांच्या विविध गरजा व आकांक्षा पूर्ण करण्यासाठी शासन, स्वयंसेवी संस्था, युवा संघटना आणि खाजगी क्षेत्र यांचा समावेश असलेल्या बहु-क्षेत्रीय सहकार्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची :**


1. Youth Social Entrepreneurship and the 2030 Agenda. (2020, August 1). https://www.un-ilibrary.org/content/books/9789210050029/read
2. Jethmalani, H. (2017, March 7). More than 30% of India’s youth not in employment, shows OECD report | Mint. Mint. https://www.livemint.com/Money/JYalqNRTOtaQCIU4EuXGRO/More-than-30-of-Indias-youth-not-in-employment-shows-OECD.html
3. C, P., & Kumaresan, K. (2016, August 1). DEMOGRAPHIC PROFILE OF YOUTH IN INDIA. ResearchGate. https://www.researchgate.net/publication/311068470_DEMOGRAPHIC_PROFILE_OF_YOUTH_IN_INDIA
4. राष्ट्रीय युवा धोरण (२०२१). https://static.pib.gov.in/WriteReadData/specificdocs/documents/2022/may/doc20225553401.pdf
5. Swayam Central. (n.d.). https://swayam.gov.in/
6. PMKVY. (n.d.). https://www.pmkvyofficial.org/
7. Deen Dayal Upadhyaya Grameen Kaushalya Yojana| National Portal of India. (n.d.). https://www.india.gov.in/spotlight/deen-dayal-upadhyaya-grameen-kaushalya-yojana
8. Skill India. (2024, February 11). Wikipedia. https://en.wikipedia.org/wiki/Skill_India
9. Make In India | Prime Minister of India. (n.d.). https://www.pmindia.gov.in/en/major_initiatives/make-in-india/
10. Startup India. (n.d.). https://www.startupindia.gov.in/
11. Pradhan Mantri Mudra Yojana. (n.d.). https://transformingindia.mygov.in/scheme/mudra/
12. DAY-NRLM Aajeevika. (n.d.). https://aajeevika.gov.in/
13. National Apprenticeship Promotion Scheme (NAPS) | Ministry of Skill Development and Entrepreneurship | Goverment Of India. (n.d.). https://www.msde.gov.in/en/schemes-initiatives/apprenticeship-training/naps
14. Prime Minister's Rural Development Fellows Scheme. (2014, April). Ministry of Rural Development Department of Rural Development. https://cdn.s3waas.gov.in/s330ef30b64204a3088a26bc2e6ecf7602/uploads/2018/11/2018111655-1.pdf
15. राष्ट्रीय युवा सशक्तिकरण कार्यक्रम (RYSK). https://www.india.gov.in/spotlight/rashtriya-yuva-sashaktikaran-karyakram-rysk
16. प्रधानमंत्री रोजगार प्रोत्साहन योजना (PMRPY). https://www.india.gov.in/spotlight/pradhan-mantri-rojgar-protsahan-yojana-pmrpy
17. National Skill Development Corporation | Ministry of Skill Development and Entrepreneurship | Goverment Of India. (n.d.). https://msde.gov.in/en/organizations/nsdc

# जल सिंचन : एक दृष्टिक्षेप

**प्रो. डॉ. नारायण नामदेव गाढे**

(संशोधक मार्गदर्शक)

लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पंचवटी नाशिक.

**प्रा. पूनम शशिकांत चिंचोरे**

(संशोधक विद्यार्थी) के.टी.एच.एम.महाविद्यालय नाशिक.

**गोषवारा :-**

भारत हा शेतीप्रधान देश असून आजही एकूण लोकसंख्येपैकी 65 टक्के लोकसंख्या शेती व्यवसायावर अवलंबून आहे म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेला कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखले जाते. शेती ही सर्वस्वी पावसावर अवलंबून आहे. मान्सून संपल्यावर पिके घेण्यासाठी पाण्याची नितांत गरज भासते व ही गरज भागवण्यासाठी सिंचन पद्धतींचा अवलंब हा पूर्वीपासून केला जात आहे. भारतातच नव्हे तर जगात सिंचन व्यवस्था ही खूप पूर्वीपासून अस्तित्वात असलेली दिसून येते त्यात मध्ययुगीन भारतातील सिंचन व्यवस्था बघितली तर तुघलक (१२२० -१२५० ) हा पहिला शासक म्हणून ओळखला जातो त्याने कालवे खोदण्यास प्रोत्साहन दिले. फिरोजशहा तुघलक (१३५१-८६ ) हा सर्वात मोठा कालवा बांधणारा मानला जातो. ब्रिटिश राजवटीतील सिंचन विकास सिंचनाच्या स्त्रोतानुसार १९ व्या शतकाच्या जवळ कालव्यानी ४५ % ,विहिरी ३५%, व इतर स्त्रोत २०% नी केला. १८७७ -९८ आणि १८९९ -१९०० च्या दुष्काळामुळे ब्रिटीशांना १९०१ मध्ये पहिला सिंचन आयोग नेमावा लागला.स्वातंत्र्योत्तर काळानंतर भारतातील सिंचन व्यवस्थेत लक्षणीय प्रगती झाली आहे. कृषी उत्पादकता आणि अन्न सुरक्षा सुधारण्यासाठी सिंचन पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यावर भर देण्यात आला. भाक्रा-नांगल, हिराकुड आणि दामोदर व्हॅली यांसारखे अनेक मोठे सिंचन प्रकल्प सुरू करण्यात आले, ज्यांचे उद्दिष्ट सिंचन आणि जलविद्युत निर्मितीसाठी नद्यांच्या जलस्रोतांचा वापर करण्याच्या उद्देशाने होते अनेक दशकांपासून सरकारने धरणे, कालवे आणि जलाशयांच्या बांधकामासह सिंचन पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे सुरू ठेवले आहे. हरित क्रांतीने कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी सिंचनाच्या महत्त्वावर जोर दिला.

अलिकडच्या काळात, पाणी वाचवण्यासाठी आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी सूक्ष्म-सिंचन तंत्रांसह, अधिक टिकाऊ सिंचन पद्धतींकडे लक्ष दिले जात आहे. याव्यतिरिक्त सिंचन प्रणालींचे आधुनिकीकरण आणि पाणी बचत तंत्रज्ञानाला चालना देण्यावर अधिक भर दिला जात आहे. हे प्रयत्न करूनही अकार्यक्षम पाणी व्यवस्थापन आणि सिंचन सुविधांच्या प्रवेशातील असमानता यासारखी आव्हाने कायम आहेत. हवामान बदलामुळे भारताच्या सिंचन व्यवस्थेसमोर नवीन आव्हाने उभी राहिली आहेत, ज्यासाठी अनुकूलता आणि लवचिकता निर्माण होणे आवश्यक आहे.

**प्रस्तावना :-**

पाणी हे सजिवांच्या जीवितासाठी व संवर्धनासाठी अतिशय महत्वाचा घटक आहे. पिकांना कृत्रिमरित्या विविध पद्धतीद्वारे जे पाणी देतो त्यास ढोबळमानाने जलसिंचन असे म्हणता येईल, किंवा पिकांच्या योग्य वाढीसाठी आणि चांगले उत्पादन प्राप्त होण्यासाठी पिकांना कृत्रिमरित्या पाणी देणे म्हणजे सिंचन होय. शेतीक्षेत्राच्या प्रगतीशी संबंधित महत्त्वपूर्ण घटक जलसिंचन आहे, जगामध्ये सिंचन पद्धती फार पूर्वीपासून वापरल्या जातात.

पृथ्वीवरील ७१ टक्के भाग पाण्याने व्यापलेला आहे. पृथ्वीवरील एकूण क्षेत्रफळापैकी २९ टक्के भू - भाग जमिनीचा आहे.पृ थ्वीतलावरील ३६५ दिवसांपैकी १०० ते ११५ दिवस पाऊस पडतो. तर इतर दिवस पर्जन्य विरहित असतात. भारताच्या कृषिप्रधान अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने शेती व्यवसायाचे महत्व अनन्य सधारण आहे. शेती हा भारतीय

अर्थव्यवस्थेचा कणा आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार ७५ % लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहत आहे व २५ टक्के लोकसंख्या शहरी भागात राहत असून ही ग्रामीण लोकसंख्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या शेतीवर अवलंबून आहे. भारतातील एकूण श्रमशक्तीपैकी जवळपास ६५ टक्के श्रमशक्तीला शेतीतून रोजगार प्राप्त होतो. सन २०१०-२०११ मध्ये भारतातील राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा वाटा १४ टक्के होता, इतर देशांच्या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्थेत एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा अधिक आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी प्राचीन कालखंड (इ.स.पू. ३५०० ते इ.स.पू.१२००)**

सिंचनाची व्यवस्था प्राचीन काळापासुन भारतात अस्तित्वात होती. यातुनच सिंचन सुविधांचा विकास होत गेलेला दिसून येतो. अनेक शतके विहिरी व लहान तलाव यांचा सिंचनासाठी वापर करत असे. नदी,नाले,ओढे यातुन वाहणारे पाणी वर खेचणे किंवा कच्चे बंधारे बांधून पाणी शेतात वळविणे या पद्धती प्राचीन काळापासून वापरण्यात येत होत्या अनेक वाङ्मयातून प्राचीन व मध्ययुगीन भारतात सिंचनाचा उल्लेख असल्याचे आढळते. यजुर्वेदामध्ये कालवा व धरण यांचा उल्लेख येतो, स्मृती वाङ्मयामध्ये सरोवरे व तलाव यांचा उल्लेख आलेला आहे. विहीरी खोदणे, सरोवरे निर्माण करणे, कालवा बंधने यासारखी शेतीसाठी उपयुक्त कामे पूर्वीच्या काळी केली जात असत.

**वैदिककाळ** पूर्व वैदिक काळ (इ.स.पू.१५०० ते १०००) भारतात आर्य समाज इ.स.पूर्व १५०० ते १२०० मध्ये त्यांनी ऋग्वेद लिहिला. त्यात आर्याची जीवनपद्धती, सामाजिक जडण-घडण, कृषी व पिके याविषयी वर्णन केले आहे. आर्यांनी त्यांच्या वास्तव्यासाठी साताद (सतलज), वैसरता (जेहलम), अशिकीनी (चेनाब), विपसा (बियास) व परूसिनी (रावी) या पाच नद्याकाठचे प्रदेश निवडले. या नद्यांपासून त्यांच्या शेतापर्यंत कालवे खोदण्यात आले.तलावातील पाणी परिसरातील क्षेत्रात कालव्यांद्वारे नेले. रहाटगाडग्याचा वापर प्रथम इराणी मुस्लिमांनी केला असे मानण्यात येते. परंतू जोधपुर जवळील मंडोर येथे एका मंदिराच्या दगडी भिंतीवर या चक्राचे शिल्प आढळून आले आहे. यावरून रहाटगाडगे हे मूळचे भारतातले आहे. रहाटगाडगे आणि कातडी मोट यांचा पिकांना पाणी देण्यासाठी वापर करण्यात येत होता.

संगम वाङ्मयामध्ये (इ.स.३०० ते ६००) बागायती पद्धतीने भात पिकविण्याची सुरुवात झाली, नदीकाठच्या राजवटींना सुपीक जमीन लाभली होती. बागायती भात शेतीच्या शोधामुळे दक्षिण भारताला "भाताचे कोठार" असे म्हणू लागले. संगम काळात विहिरी व तळे यांच्यापासुन होणाऱ्या सिंचनाबाबतही उल्लेख आढळतो. विहिरीतील पाणी उपसण्यासाठी बैलांचा उपयोग करण्यात येत असे, कावेरी व वैगाई नद्यांवर मोठे बांध घालुन, पुराचे नियंत्रण करून त्या पाण्याचा वापर सिंचनासाठी करण्यात येत असल्याचा संदर्भ सापडतो.

सम्राट चंद्रगुप्त मौर्याने पुष्पगुप्तामार्फत सौराष्ट्रात सुदर्शन तलाव निर्माण करुन सिंचनाची स्वतंत्र सोय केली होती. स्कंदगुप्त व सम्राट अशोकाने हेच कार्य पुढे चालू ठेवले. विजयनगरच्या साम्राज्यात तलाव, पाट, बंधारे, कालवे यांच्या विकासासाठी, पाण्याच्या योग्य व्यवस्थापनाकरीता करमुक्त जमिनी देऊन स्वतंत्र व्यवस्था केली होती. दक्षिण भारतात इ.स.९८५ मध्ये चोला साम्राज्याची स्थापना राजा चोला याने केली. त्यांनी आधुनिक अशी सिंचन पद्धती प्रचारात आणून सुबत्ता निर्माण केली. नदीवर मोठ्या प्रमाणात बांध घालून त्याच्या पाण्याचा सिंचनासाठी वापर करणे हा त्यांचा आधुनिक सिंचन पद्धतींचा उदय झाला.

उत्तर भारतात दिल्लीतील सुलतानी राजवटीपासुन म्हणजे इ.स. १२०६ पासून मध्ययुगीन कालखंडास सुरूवात होते. तर सन १७६१ मध्ये मराठ्यांनी दिल्ली जिंकल्यावर हा कालखंड संपतो. मुस्लिम राजवटीतील मोहंमद तुघलकच्या (इ.स. १३२५ ते १३५१) कारकिर्दीत उपलब्ध झालेली सिंचणविषयी माहिती बघावयास मिळते. त्याच्या जुलूम जबरदस्तीच्या कारवायांमुळे गंगाखोरीतील पिके पूर्णपणे नष्ट झाली होती. त्याचबरोबर पाठोपाठ पडलेल्या दुष्काळांमुळे मोठ्या प्रमाणात प्राणहानी झाली होती असे जेव्हा त्याच्या लक्षात आले, तेव्हा त्याने शेतकऱ्यांना विहिरी खोदण्यासाठी व पडीक जमिनी पुन्हा लागवडीखाली आणण्यासाठी प्रोत्साहन दिले. मोहमंद तुघलकाच्या मृत्यूनंतर फिरोजशहा तुघलक(१३५१ ते १३८८)सत्तेवर आला व त्याने धरणे बांधून व कालवे काढून नापीक पडीक जमिनीवर सिंचनाच्या सुविधा

उपलब्ध करुन दिल्या.पश्चिम यमुना कालवा ही त्यातील महत्त्वाची घटना आहे. या कालव्यामुळे हिस्सार फेरोसा या नवीन शहरास समृद्धी प्राप्त झाली. काश्मिरचा सुप्रसिद्ध राजा शैनउद्दीनने १४२० ते १४७० या काळात मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक बांधकामे केली. अचलापूर, नादर्शला, बीजविहारा, आदबीन इत्यादी कालवे शेती उत्पादन वाढविण्यासाठी काढण्यात आले, अशा विस्तृत प्रमाणावरील सिंचन सुविधांमुळे पडीक जमिनी पुन्हा लागवडीखाली आणल्या गेल्या व सुलतान फिरोजशहा तुघलकाने ३०० वर्षांपूर्वी खोदलेल्या पश्चिम यमुना कालव्याच्या पुन:स्थापणेसाठी तो प्रसिद्ध आहे. सुलतानाच्या मृत्युनंतर हा कालवा गाळाने भरत गेला व त्यामुळे तो वापरात येत नव्हता, शहाजहानने या कालव्याच्या दुरुस्तीसाठी सूचना दिल्या. तसेच या कालव्याच्या उगमापासून आणखी एक नवीन कालवा खोदण्याचा हुकूम दिला. त्यामुळे उत्तर भारतातील कोरडवाहू जमिनीला सिंचनाच्या सोयी उपलब्ध झाल्या. १६३७ ते १६४४ या काळात त्याने हसली (लोहार) हा कालवा खोदला. रावी नदी ज्या ठिकाणी सपाटीच्या प्रदेशांत प्रवेश करते, त्या ठिकाणापासुन या कालव्याची सुरुवात होते. महमूदशहाने १७२५ मध्ये पूर्व यमुना कालवा खोदला, त्यामुळे उत्तर भारतात काही भागाला सिंचनाचे लाभ मिळाले अशा प्रकारे मध्ययुगीन कालखडात उत्तर भारतात सिंचनविषयक कार्य केले गेले होते.

दक्षिण भारतात १३३६ मध्ये पहिल्या हरिहरने तुंगभद्रा नदीच्या तीरावर विजयनगरचे राज्य स्थापन केले त्याने शेतीला प्रोत्साहन दिले, पहिला बुक्कबा कालखंड १३३५ ते १३०० हा होता तो विजयनगरचा दुसरा राज्यकर्ता होता, त्याच्या कालखंडात त्याने मोठ्या प्रमाणावर सिंचनाची कामे केली कडाप्पा जिल्ह्यातील पोरूमामतीसा तलाव (अनंतराज सागर) प्रसिद्ध आहे. त्याचे बांधकाम १३३७ मध्ये सुरू झाले. माळदेवी नदीवर बांधलेल्या या मातीच्या चरणाची लांबी १३७२ मीटर होती तर हा जलाशय ४१४ चौ. कि.मी. क्षेत्रात पसरला होता. पहिला व दुसरा देवराय आणि कृष्ण देवराय हे विजयनगरच्या साम्राज्याचे प्रसिद्ध राज्यकर्ते होते. कोरडवाहू जमिनीच्या मोठ्या पट्ट्यामध्ये कृषी उत्पादन वाढावे म्हणून त्यांनी सिंचनास मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले. त्यांनी १५२२ मध्ये सुप्रसिद्ध कोरंगळ धरण व त्याखालील कालवे बांधले. याशिवाय बसवन्ना कालवे सुद्धा त्यांच्याच कारकिर्दित वाढविण्यात आले. हे दोन्ही कालवे अद्यापपर्यंत वापरात आहेत.

महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक किल्ल्यांवर बारमाही पिण्याच्या पाण्याची हौद खोदून व्यवस्था केली. सतराव्या शतकात लखुजी जाधव यांनी बुलढाणा जिल्ह्यात सिंदखेड राजा येथे मोती तलाव व चांदणी तलावातून सिंचनाची सोय केलेली दिसून येते पेशव्यांनी पुण्याच्या परिसरात अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली होती. अशाप्रकारे मध्ययुगीन कालखंडात शेती सिंचनासाठी केलेल्या कार्याचे वर्णन ऐतिहासिक लेखनावरुन स्पष्ट होते. महाराष्ट्रात सन १८८५ मध्ये सर्वप्रथम निरा डावा कालव्यातून शेतीला पाणी मिळू लागले.सिंचनासाठी पाण्याचा वापर आवश्यकतेपेक्षा जास्त झाल्यास होणारे दुष्परिणाम अवघ्या ५ ते ६ वर्षातच जाणवले जादा पाणी वापरामुळे जमिनी भरघोस उत्पन्न देणाऱ्या जमिनी नापीक झाल्या.

जगातील सर्वात पुरातन असे जलसिंचनाचे अवशेष इजिप्तमध्ये नाईल नदीच्या काठावर आढळतात नदीच्या पुरामुळे अडवलेले पाणी हे पिण्यासाठी तसेच कृषीकरिता वापरण्यात येत असावे असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे भारतीय उपखंडातील जलसिंचनाचे मूळ हे पश्चिम महाराष्ट्रात आढळून येते त्या गावालगत अश्म व लोहयुगातील दगडमातीचा बांध आढळला असून तो घोडनदीशी अनेक नाल्यांनी जोडला गेलेला आहे. पुर परिस्थितीनंतर त्या बांधाने अडवलेल्या पाण्याचा उपयोग लगतच्या भागात गरजेनुसार जलसिंचन करण्यासाठी येत असावा, सिंधु नदीच्या काठी विकसित झालेल्या संस्कृतीतही जलसिंचनाचे अवशेष आढळून येतात. अथर्ववेदामध्ये नदी व नाला यांना गाय व वासरूची उपमा दिलेली आहे. नदीकाठच्या झाडांना चारही बाजूंनी बांध करून पाणी दिले जात असे यावरून प्रचरिष्त जमिनीवरून पाणी देण्याची पद्धत ही विहीर अथवा भूजल वापरापेक्षाही पुरातन आहे याचा उल्लेख आपणास ऋग्वेदामध्ये दिसून येतो .कच्चा व पक्क्या विहिरी या आजही उत्तर तसेच उत्तरपूर्व भारतात आढळून येतात मौर्यकालीन संस्कृतीमध्ये

जलसिंचनाचा बऱ्यापैकी विकास झालेला आढळून येतो. कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये पाण्याचे प्रशासकीय नियोजन व नियम यांचा संदर्भ आढळून येतो. पर्शियन कोलही मूळची संकल्पना भारतीय असल्याचे पुरावेही राजस्थानमधील जोधपूर येथे आढळून येतात १४ व्या शतकातील मंदिरात पाणी देण्याच्या पद्धतीची दगडावरील रेखाचित्रे.

**स्वातंत्र्यपूर्व कालखंड व स्वातंत्र्योत्तर कालखंड:**

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर अशा दोन्ही कालखंडात अर्थव्यवस्था कृषिप्रधान राहिली आहे. १९५१ मध्ये पंचवार्षिक योजनांना सुरूवात झाल्यानंतर औद्योगिकीकरणाची गती वाढू लागली. १९९१नंतर भारताच्या आर्थिक धोरणात त्रिसुत्रीचा (उदारीकरण, जागतिकीकरण, खाजगीकरण) अंगीकार व आंतरराष्ट्रीय पातळीवर स्थापना करण्यात आलेल्या जागतिक व्यापार संघटनेची स्थापना यांचा परिणाम निश्चित भारतीय कृषिक्षेत्रावर झाला आहे. निसर्गाने मानवाला जमिन, वने, खनिजे, हवा, पाणी य देणग्या मुबलक प्रमाणात दिल्या आहेत. जगाची लोकसंख्या पूर्वी कमी असल्यामुळे या सर्व देणग्या अमाप आहेत, अशी मानवाची समजूत होती व त्यामुळे अत्यंत सढळ हाताने त्या वापरण्याची सवय मानवाला लागली होती. शेती व्यवसायात पाणी हा महत्त्वपूर्ण घटक असून सिंचन हा सर्वांना विचार करायला लावणारा घटक आहे. शेतीसाठी लागणारे पाणी हे मुख्यतः विहीर, तलाव, नदी, कूपनलिका याद्वारे भूगर्भातून उपसले जाते. पाण्याची समस्या दिवसेंदिवस मोठया प्रमाणावर वाढत आहे व पुढेही वाढत राहणार आहे. शेती विकासासाठी पाणी हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे. शेतीसाठी पाणी मुबलक उपलब्ध असेल तरच शेतीचे उत्पन्न वाढू शकते. परंतु पुरेशा पाण्याअभावी शेती उत्पन्न दिवसेंदिवस घटत आहे. त्यामुळे नेहमीच्या जीवनामध्ये शेतकऱ्यांपूढे नवनवीन आव्हाने उभी राहायला लागली आहेत. त्यामुळे आजचा शेतकरी वर्ग पारंपरिक पद्धतीने शेती करण्याऐवजी आधुनिक पद्धतीने शेती करू लागला आहे.महासागराच्या पाण्याने पृथ्वीवरील सुमारे ७० टक्के भाग व्यापला आहे. पृथ्वीवरील एकूण पाण्यापैकी ९७ टक्के पाणी हे खारे आणि २ टक्के पाणी हे ध्रुवावरील बर्फ आणि हिमनगांच्या स्वरूपात असल्याचे आढळते, उरलेल्या १ टक्का पाण्यापैकी ०.३८ टक्के पाणी ८०० मीटरपेक्षा जास्त खोलीवर भूगर्भात आहे. त्यामुळे एकूण पाण्याचा फक्त ०.६२ टक्के पाणीच उपयुक्त आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये सिंचनासाठी पारंपरिक पद्धतीऐवजी आधुनिक पद्धतीचा वापर होऊ लागला आहे. पावसाचा लहरीपणा, असमतोल वितरण व पाण्याची वाढती मागणी या कारणामुळे शेतीला पाण्याची कमतरता जाणवत आहे. त्याचबरोबर देशात मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या औद्योगिक प्रगतीमुळे देखील पाण्याच्या वापराच्या प्रमाणात वाढ होत आहे, तसेच भरमसाठ विहिरी व कूपनलिकाची वाढती संख्या यांमुळे भूगर्भातील पाण्याचा उपसा प्रचंड प्रमाणात वाढल्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी खोलवर चालली आहे. उपलब्ध पाण्याच्या स्रोतातून पाणी उपसण्याची जणू स्पर्धाच सुरू झाली पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे उपलब्ध पाणी पुरवून वापरण्याची वेळ आली आहे त्याचप्रमाणे भूगर्भातील पाण्याचा उपसा प्रचंड वाढलेला आहे. शिवाय भूगर्भामध्ये पाणी मिळण्याची शाश्वती नाही. टंचाईमुळे पाणी पुरवून देण्याची वेळ आली आहे. गरज ही शोधाची जननी आहे. या उक्तीनुसार आधुनिक सिंचन पद्धतीचा पाया रचला गेला, पाण्याचा काटकसरीने आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने वापर करणे गरजेचे झाले आहे. त्यातून तुषार सिंचन, ठिबक सिंचन ,मटका सिंचन, जमिनीखालून सिंचन, सलाईनद्वारे सिंचन, ड्रिपस्पॉट सिंचन, शेततळे , विहिरी अशा अनेक आधुनिक तंत्रज्ञान उदयास आले.

**जागतिक सिंचनविषयक सद्यःस्थिती:**

जगातील एकूण पाण्यापैकी १७ टक्के पाणी खाऱ्या स्वरुपाचे असून शुद्ध पाणी ३ टक्के आहे. जगातील सजिव सृष्टीच्या वापरा योग्य ३% पाणी उपलब्ध आहे. जगातील वापरायोग्य पाण्याच्या भारताचा पाचवा क्रमांक लागतो. प्रत्येक व्यक्तीला प्रतिवर्षी सरासरी १०० घनमीटर पाण्याची आवश्यकता भासत आहे. जगाची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून पाण्याचा वापर देखील वाढत आहे . जगात २००० कि.मी पेक्षा जास्त लांबीच्या सुमारे ६२ तर १००० कि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त लांबीच्या ११२ नद्या आहेत. बहुतेक देशांमध्ये नद्या व इतर नैसर्गिक जलप्रवाहांवर धरणे

बांधण्यात आलेली आहेत, या धरणातील जलसाठ्यांचा वापर शेती सिंचन, वीजनिर्मिती, औद्योगिकरण, जलवाहतूक व मानवी गरजांसाठी केला जातो, काही धरणे ही वरीलपैकी एका उद्देशाने तर काही धरणे एकापेक्षा जास्त उद्देशाने बांधण्यात आली आहेत.

**भारतातील शेती सिंचन सद्यःस्थिती:**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात देशाचा जलद आर्थिक विकास करणे, आर्थिक विषमता कमी करणे आणि समाजवादी समाजरचना निर्माण करण्याच्या उद्देशाने सरकारने रशियाच्या धर्तीवर आर्थिक नियोजनाचा स्वीकार केला, भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान अर्थव्यवस्था असल्याने कृषीक्षेत्रात समृद्धी प्राप्त करून देश अन्नधान्य व कृषीमालाच्या क्षेत्रात स्वयंपूर्ण करण्याचे सरकारपुढील महत्त्वाचे उद्दीष्ट होते. त्यामुळे पंचवार्षिक योजना काळात कृषीक्षेत्राच्या विकासासाठी सरकारने अनेक उपाययोजना केल्या १९६५-१९८६ पासुन हरितक्रांतीच्या तंत्राचा स्विकार करण्यात आला. हरितक्रांतीच्या तंत्रात संकरित व सुधारित जातीची बी-बियाणे,रासायनिक खतांचा वापर, किटकनाशके व याच्या जोडीला सिंचन सुविधांचा वापर यावर भर देण्यात आला होता. भारतातील आधुनिक सिंचनव्यवस्थेचा आढावा घेतल्यास भारतात अनेक प्रकारच्या योजना जसे प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना, नर्मदा बचाव प्रकल्प, नमामि गंगे, राज्य स्तरावर अनेक योजनांचा अवलंब करून तुषार सिंचन, ठिबक सिंचन यासारख्या मायक्रो इरीगेशन पद्धतींचा अवलंब मोठ्या स्तरावर केला जात आहे.

**सारांश:**

भारत हा कृषिप्रधान देश असून शेतीचे महत्व लक्षात घेता शेतीचा विकास होण्यासाठी जलसिंचनाची भूमिका अतिशय महत्वाची आहे. शेती क्षेत्राच्या विकासावर इतर क्षेत्राचा विकास अवलंबून आहे व प्रादेशिक असमतोल, आर्थिक विषमता, बेरोजगारी परीणामी दारिद्र्य या समस्या सोडवण्यासाठी व काळाची गरज लक्षात घेता शेतीच्या विकासाचे महत्व आपल्याला दिसून येते. हा लेख लिहिण्याचे कारण की आज प्रत्येक व्यक्तीला जलसिंचनाची भूमिका माहिती असणे गरजेचे आहे . त्याचे महत्व समजणे काळाची गरज आहे.

**संदर्भसूची:-**


१)हिरवे नंदकिशोर, (जून २०१२), स्वातंत्र्यपूर्व भारताचा जलसिंचन इतिहास'

२) ए.बी. सवदी (२०१०) 'महाराष्ट्राचा भूगोल' निराली प्रकाशन, पुणे

३) जलसंपदा विभाग (२०१०) 'सिंचन स्थितीवर्धक अहवाल' महाराष्ट्र शासन २०१०.

४) रायखेलकर दामजी, (२०१३), 'भारतीय अर्थव्यवस्था', विद्या युक पब्लिशर्स, औरंगाबाद

५) देसाई आणि भालेराव ,भारतीय अर्थव्यवस्था :निराली प्रकाशन(२०१६)

६) शिरसी राजेंद्र, भोकसे उमेश कृषी अर्थशास्त्र : सक्सेस पब्लिकेशन (२०१९ )

७) व्ही. जे.,पाटील, वाघ शैलेश ,कृषी भूगोल ,प्रशांत पब्लिकेशन (२०१५ )

८) विकासपीडिया

९)www.Maharashtra.gov.in

# हवामान बदललाचे भारतीय शेतीवर परिणाम : आव्हाने आणि अनुकूल धोरणे

**प्रो. डॉ. सुराजकुमार एस. प्रसाद**
(संशोधक मार्गदर्शक)
कर्मवीर रावसाहेब थोरात कला आणि वाणिज्य महाविद्यालय, वणी, ता. दिंडोरी, जि. नाशिक.
**पूनम शेखर शेलार**
(संशोधक विद्यार्थी) के.टी.एच.एम.महाविद्यालय नाशिक.

**गोषवारा :-**

हवामान बदलामुळे जगभरातील कृषी व्यवस्थेसमोर महत्त्वपूर्ण आव्हाने आहेत आणि भारत, त्याच्या विशाल कृषी क्षेत्रासह, विशेषतः असुरक्षित आहे. हा शोधनिबंध भारतीय शेतीवर हवामान बदलाच्या परिणामांसंबंधीच्या ज्ञानाच्या सद्य स्थितीचा आढावा घेतो, पीक उत्पादन, पाण्याची उपलब्धता, कीड आणि रोग गतिशीलता आणि सामाजिक-आर्थिक परिणाम यासारख्या प्रमुख क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करतो. शिवाय, ते अनुकूलन धोरणांवर चर्चा करते जे या प्रभावांना कमी करण्यास आणि भारतीय शेतीमध्ये लवचिकता निर्माण करण्यास मदत करू शकतात. हवामान बदल आणि शेती यांच्यातील गुंतागुंतीचा परस्परसंवाद समजून घेऊन, धोरणकर्ते, संशोधक आणि शेतकरी भारतातील कृषी उत्पादकता आणि अन्न सुरक्षा टिकवून ठेवण्यासाठी प्रभावी धोरणे विकसित करण्यासाठी एकत्र काम करू शकतात.

**प्रस्तावना**

हवामान बदल हे २१व्या शतकातील सर्वात गंभीर आव्हानांपैकी एक आहे, ज्याचे परिसंस्था, अर्थव्यवस्था आणि समाजांवर दूरगामी परिणाम आहेत. हवामान बदलामुळे प्रभावित झालेल्या विविध क्षेत्रांपैकी, तापमान, पर्जन्यमान आणि जमिनीतील ओलावा यासारख्या हवामान-संवेदनशील घटकांवर अवलंबून राहिल्यामुळे कृषी क्षेत्र विशेषतः असुरक्षित आहे. भारतात, जिथे शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे आणि लाखो लोकांच्या उपजीविकेचा एक महत्त्वाचा स्रोत आहे, तिथे हवामान बदलाचे शेतीवर होणारे परिणाम अत्यंत चिंतेचे आहेत.

भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे आणि विविध प्रकारच्या कृषी-हवामान क्षेत्रांचे घर आहे, जे विविध प्रकारच्या पिकांना आधार देतात. भारताच्या जीडीपीमध्ये शेतीचा मोठा वाटा आहे आणि लोकसंख्येच्या मोठ्या भागाला, विशेषतः ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करून देतो. तथापि, हे क्षेत्र हवामानातील परिवर्तनशीलता आणि टोकाला अत्यंत असुरक्षित आहे, ज्यामुळे पीक उत्पादनात चढ-उतार, पाण्याची कमतरता आणि कीड आणि रोगांचा दबाव वाढू शकतो.भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये हवामान बदलामुळे शेती क्षेत्रावर परिणाम अत्यंत महत्वाचा व गंभीर विषय मांडला जातोय भारतीय शेती ही अनियंत्रित वातावरणातच केली जाते त्यामुळे हवामानाने भारतीय शेती यांचा नाजूक संबंध आहे शेती क्षेत्राबरोबर इतरही क्षेत्रावर हवामान बदलाचे परिणाम दिसून येतात.यामध्ये पाणी जमीन ऊर्जा जंगले इत्यादींचा समावेश होतो या सर्व प्रकारामुळे कृषी उत्पादनावर विपरीत परिणाम होत चालला आहे कदाचित हंगामाच्या वेळा व तारखा बदलाव्या बदलाव्या लागतील अशी परिस्थिती आहे या सर्वांचा शेतकऱ्यांच्या जवळचा संबंध आहे आणि म्हणून शेतकरीच केंद्रस्थानी मानून त्याच्या पर्यंत कृषी संदेश पोहोचविणाऱ्या कृषी सहाय्यक पर्यवेक्षकांना याची विस्तृत माहिती झाली पाहिजेकृषी संदेश पोहोचविणाऱ्या कृषी सहाय्यक पर्यवेक्षकांना याची विस्तृत माहिती झाली पाहिजे. सध्या ग्लोबल वॉर्मिंग ग्रीन हाऊस इफेक्ट क्लायमेट चेंज इत्यादी भाषा वारंवार कानावर पडत आहे दुसरी गोष्ट म्हणजे राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर या गोष्टींची फार गंभीरपणे

दखल घेतलेली दिसून येतेइत्यादी भाषा वारंवार कानावर पडत आहे दुसरी गोष्ट म्हणजे राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर या गोष्टींची फार गंभीरपणे दखल घेतलेली दिसून येतेइत्यादी भाषा वारंवार कानावर पडत आहे दुसरी गोष्ट म्हणजे राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर या गोष्टींची फार गंभीरपणे दखल घेतलेली दिसून येते. अजून ग्राम पातळीवर या गोष्टीचा परिणाम दिसून यायला काही कालावधी लागेल परंतु एकंदरीत पाहता हवामान बदलामुळे फार मोठे संकट भविष्यात येण्याची साक्षंकता सर्व जगभर झाल्याची दिसून येते.

**हवामान बदलाचे भारतीय शेतीवरील परिणाम :**

बदलत्या हवामानामुळे शेती क्षेत्रावर अनेक विपरीत परिणाम होताना दिसून येत आहे. सर्वात महत्वाचा परिणाम म्हणजे अन्नधान्याच्या उत्पादनाचे प्रमाण कमी होत चालले आहे. तसेच दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असल्यामुळे वाढलेल्या उष्णतेमुळे पीक तयार होण्याच्या कालावधीमध्ये बदल होत आहे. तापमान आणि पर्जन्यमानातील बदलांचा पीक उत्पादनावर आणि उत्पादकतेवर गंभीर परिणाम होऊ शकतो. वाढत्या तापमानामुळे पिकांच्या विकासाला गती मिळते, फुलांच्या आणि फळांच्या पद्धती बदलतात आणि उष्णतेच्या ताणाचा प्रादुर्भाव वाढतो, ज्यामुळे उत्पादन आणि गुणवत्ता कमी होऊ शकते. अनियमित पावसामुळे पाण्याचा ताण, पाणी साचणे आणि कीड आणि रोगांचा धोका वाढतो, ज्यामुळे पीक उत्पादकतेवर आणखी परिणाम होतो. आणि त्यामुळे उत्पादनाची पत देखील खालावतांना दिसत आहे. अवकाळी आणि अनियमित पावसामुळे जमिनीवरील मातीचे वहन होऊन जमिनीच्या सुपीकतेवर विपरीत परिणाम होताना दिसते. हवामानातील बदलामुळे कीड आणि रोगांचे वितरण आणि प्रसार प्रभावित होऊ शकतो, ज्यामुळे पीक आरोग्य आणि उत्पन्नावर परिणाम होतो. उष्ण तापमान आणि बदलत्या पर्जन्यमानामुळे कीटक आणि रोगजनकांच्या प्रसारासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होऊ शकते, ज्यामुळे कीटकांचा दाब वाढतो आणि रोगांचा प्रसार होतो. यामुळे पिकांचे नुकसान, उत्पादनात घट आणि शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढू शकतो.

हवामानातील बदलामुळे पाळीव जनावरांच्या संगोपनात देखील बदल करावे लागत आहे. कदाचित भविष्यात हंगामांच्या तारखा बदलाव्या लागतील अशी परीस्थिती निर्माण झाली आहे. हवामान बदलाचे भारतीय शेतीवर होणारे परिणाम केवळ पीक उत्पादन आणि उत्पादकतेपुरते मर्यादित नाहीत तर त्याचे व्यापक सामाजिक-आर्थिक परिणामही आहेत. कृषी उत्पादकता कमी झाल्यामुळे अन्न असुरक्षितता, उपजीविकेचे नुकसान होऊन गरिबी वाढू शकते, विशेषत: अल्पभूधारक शेतकरी आणि ग्रामीण समुदायांमध्ये. शिवाय, हवामान-संबंधित आपत्ती जसे की दुष्काळ आणि पूर यामुळे लक्षणीय आर्थिक नुकसान होऊ शकते आणि पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते, ज्यामुळे अन्नधान्याच्या किमती आणि बाजारातील स्थिरतेवर परिणाम होतो.

पावसाळा संपल्यानंतर हिवाळी तसेच उन्हाळी हंगामामध्ये जाणवते. थंडीचे प्रमाण व कालावधी कमी होत आहे. एकूण पर्जन्यमान कमी, परंतु कमी दिवसांत पावसाची तीव्रता वाढत आहे. त्यादृष्टीने पीक व्यवस्थापनात बदल आवश्यक आहे. वातावरण बदलाचा धोका भारतीय शेती, पर्यावरणाला वाढण्याची शक्यता आहे. भारतातील विविध भागांमध्ये उष्णतेच्या लाटांचा फटका बसेल, असा निष्कर्ष 'आयपीसीसी' या हवामान बदलाचा अभ्यास करणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्थेने काढला आहे. २००१ पासून भारतात अत्याधिक हवामान बदलाच्या घटना घडू लागल्याचा निष्कर्ष समोर आला आहे. भारतीय हवामान विभागाची १८८६ ते १९८६ या १०० वर्षांची हवामानाची आकडेवारी बघता भारतामध्ये १९ कोरडे, तर १३ ओले दुष्काळ आहे. पावसाळ्यात अतिवृष्टी आणि महापूर, किंवा दुष्काळ, हिवाळ्यात ढगाळ हवामान आणि अवकाळी पाऊस, गारपिटीमुळे त्या हंगामातील पिके आणि पीक पद्धतीला धोका निर्माण होत आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटरॉलॉजीच्या अंदाजाप्रमाणे तापमान वाढीमुळे दक्षिण भारताच्या तुलनेने उत्तर भारतातील उष्णतामानात जास्त वाढ होण्याची शक्यता आहे.

**सामाजिक आर्थिक परिणाम**

पृथ्वीच्या पृष्ठभागाचे तापमान वाढल्याने ऊर्जेची उपलब्धता आणि वापर कमीत कमी दोन वेगळ्या प्रकारे प्रभावित होऊ शकतो. सर्वसाधारणपणे उष्ण परीस्थितीमुळे एअर कंडीशनिंगची मागणी वाढेल ; तथापि, समशीतोष्ण प्रदेशांमध्ये हिवाळ्यातील हीटिंगची मागणी कमी झाल्यामुळे हे कमीतकमी अंशतः भरपाई होईल. जलविद्युत उर्जेप्रमाणे थेट किंवा अप्रत्यक्षपणे, कोळशावर चालणाऱ्या वीज प्रकल्पांमध्ये वापरल्या जाणाऱ्या स्टीम टर्बाइनमध्ये किंवा अणुऊर्जा प्रकल्पांमध्ये वापरल्या जाणाऱ्या कूलिंग टॉवरमध्ये , कमी पाणी पुरवठा असलेल्या प्रदेशांमध्ये ऊर्जा निर्मिती करणे अधिक कठीण होऊ शकते. हे अपेक्षित आहे की मानवसंसर्गजन्य रोगांच्या प्रसाराच्या संभाव्य वाढीमुळे जागतिक तापमानवाढीच्या परिस्थितीत आरोग्यावर आणखी ताण येईल. अन्न उत्पादनातील व्यत्यय आणि त्रासांच्या घटनांमध्ये वाढ झाल्यामुळे कुपोषणाच्या पातळीत वाढ झाल्यामुळे एकूण मानवी आरोग्यामध्ये घट होऊ शकते

**भारतीय शेतीपुढील आव्हाने:**

हवामान बदल हे भारतीय शेतीला आज भेडसावणारे सर्वात मोठे आव्हान आहे आणि भविष्यात त्याला सामोरे जावे लागेल. हवामान बदलामुळे जग उष्ण होत चालले आहे आणि अशा वाढत्या हवामानातील बदल आणि बिघडत चाललेल्या टोकाचा कृषी क्षेत्रावर अधिकाधिक विपरित परिणाम होईल. भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये शेतीक्षेत्राचे स्थान पाठीच्या कण्यासारखे आहे असे नेहमी म्हटले जाते. ज्याप्रमाणे पाठीचा भक्कम कणा शरीराला आधार देतो त्याप्रमाणे शेतीक्षेत्रही अर्थव्यवस्थेला विविध प्रकारे आधार देत असते असा याचा अर्थ. शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांना उदरनिर्वाहाचे साधन पुरवणे आणि कृषिमालाचा म्हणजेच अन्नाचा पुरवठा करणे ह्याद्वारे संपूर्ण अर्थव्यवस्थेला हा आधार मिळतो. या कार्यात जर खंड पडला, म्हणजेच उदाहरणार्थ आसमानी किंवा इतर संकटांमुळे कृषिमालाचा पुरवठा बाजारात कमी झाला किंवा शेतीतील कुटुंबांना पुरेसे उत्पन्न मिळेनासे झाले तर त्याचे पडसाद संपूर्ण अर्थव्यवस्थेमध्ये उमटतात. म्हणूनच शेतीचा विकास अर्थव्यवस्थेला बळकटी देत असतो.

**शेतीसाठी अनुकूल धोरणे:**

बदलत्या हवामान परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारतीय शेतीची लवचिकता आणि टिकाऊपणा सुनिश्चित करण्यासाठी हवामान बदलाशी जुळवून घेणे आवश्यक आहे. विविध अनुकूलन धोरणे आणि पद्धती शेतकऱ्यांना हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यास आणि त्यांच्या शेती प्रणालीमध्ये लवचिकता निर्माण करण्यास मदत करू शकतात. कृषी धोरणे एखाद्या व्यक्तीच्या, समाजाच्या आणि मोठ्या प्रमाणावर राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेच्या फायद्यासाठी असते. कृषी धोरणे कृषी उत्पादनातील प्राथमिक, दुय्यम आणि तृतीयक प्रक्रिया विचारात घेतात. हमी पुरवठा पातळी, किंमत स्थिरता, उत्पादन गुणवत्ता, उत्पादन निवड, जमीन वापर किंवा रोजगार यांचा समावेश असू शकतो. विविध प्रकारच्या पिकांसाठी विमा संरक्षण वाढवणे, क्रेडिटसाठी सुलभ प्रवेश, इनपुट स्त्रोतांवरील उच्च आणि लक्ष्यित अनुदानांव्यतिरिक्त नवीन तंत्रज्ञानापर्यंत जलद प्रवेशास समर्थन देणारे नियम सुलभ करणे यांचा समावेश असू शकतो . प्रोत्साहन योजना कृषी पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढवतील, विशेषत: अन्न प्रक्रियेसाठी आणि वर्धित निर्यात लक्ष्य साध्य करण्यासाठी कृषी योजना महत्वाची भूमिका बजावेल.

संरचित विकास शेतकरी उत्पादक संघटनांद्वारे, कृषी उत्पादनांचे एकत्रीकरण आणि विपणनाद्वारे, ग्रामीण विकासाला चालना देऊन होईल. FPOs (Farmer Producer Organization) हे शेतीच्या एकत्रीकरणासाठी, बाजारातील मागणी आणि अन्न उत्पादन साखळीतील अंतर भरून काढण्यासाठी आणि शेवटी पिकांच्या गुणवत्तेवर आणि प्रमाणावर चांगले नियंत्रण सक्षम करण्यासाठी देखील महत्त्वपूर्ण ठरतील. शेतकऱ्यांसाठी समृद्धी निर्माण करण्याची ती गुरुकिल्ली असेल. एकीकडे अनेक शेतकरी विषयक हवामान बदलाच्या संकटाशी झगडत आहेत तर अशा परिस्थितीत शेतक-यानी आपल्या पीक पद्धतीमध्ये बदल करून हवामान बदलाच्या संकटावर मात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पिकांच्या या विविधतेमुळे पर्यावरण बदलाची व बाजाराची चिंता कमी होण्यास मदत होईल आणि कौटुंबीक पातळीवर विविध प्रकारच्या सकस अन्नाची उपलब्धता निर्माण होण्यास मदत होईल.

भारतीय कृषी क्षेत्र या बदलांपासून मुक्त नाही आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील हे मान्य केले आहे की पुरवठा साखळीतील व्यत्ययापासून ते हवामान बदलापर्यंत या क्षेत्राला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे . भारतीय कृषी संशोधन परिषदेने हवामानातील बदलांना तोंड देण्यासाठी 800 पेक्षा जास्त हवामान-प्रतिरोधक जाती विकसित केल्या आहेत. परंतु केवळ उपलब्धता पुरेशी नाही कारण अधिक जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि सुलभ उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी भागधारकांनी एकत्र येणे आवश्यक आहे. या क्षेत्राला अखंडपणे आधुनिक पद्धतींचा अवलंब करण्यास मदत करण्यासाठी, क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शनचे व्यवस्थापकीय संचालक अंकुर अग्रवाल म्हणतात की, पीक उत्पादन वाढवण्याच्या प्रयत्नात भारतीय शेतकरी संसाधनांच्या कमतरतेमुळे अडचणीत येऊ नये यासाठी संस्थेचा नेहमीच प्रयत्न असतो.

मातीचे वाफे करून प्रवाही प्रणालीद्वारे पाणी देण्याची प्रचलित पण कालबाह्य पद्धत आपल्याला सोडून द्यावी लागणार आहे. **रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम, मल्चिंग, क्रॉप रोटेशन, रिमोट सेन्सिंग, ठिबक व तुषार** यासारख्या आधुनिक सिंचन प्रणालीचा वापर जलदगतीने करण्याची आवश्यकता आहे. अमेरिका, फ्रांस, जर्मनी, इटली इत्यादी प्रगत देशांत ७०-७५ टक्के शेती ही आधुनिक सिंचन प्रणालीचा वापर करून केली जाते. कीटकनाशक व्यवस्थापन विधेयक 2022 मध्ये कायद्यात आले. आशियातील कीटकनाशकांच्या उत्पादनात भारत आघाडीवर आहे **.**देशांतर्गत बाजारपेठेत **महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, पंजाब आणि हरियाणा** या राज्यांमध्ये सर्वाधिक खप नोंदवला जातो.या विधेयकामुळे कीटकनाशकांचे उत्पादन, विक्री आणि वापर यावर अधिक सरकारी नियंत्रण येईल. बियाणे विधेयक, जे उच्च दर्जाची पिके आणि वाढीव नफा सुनिश्चित करून उत्कृष्ट बियाणे मिळवण्यास सक्षम करेल . याचा परिणाम विशेषतः तेलबिया आणि कडधान्ये पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना जास्त उत्पन्न मिळेल. 'कैंद्र सरकारने तातडीने बियाणे कायदा अमलात आणावा. हा कायदा शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करणारा, त्यांना बियाण्यांचे स्वातंत्र्य देणारा असावा. शेतकरी पैसे मोजून बियाणे विकत घेतात. निकृष्ट बियाण्यांमुळे त्यांचा हंगाम वाया जातो. बियाणे वाया गेल्यावर कंपन्या हात वर करतात. त्यामुळे सदोष बियाणे असल्यास शेतकऱ्याला केवळ बियाण्याच्या मोबदल्यात बियाणे भरपाई न देता संपूर्ण पिकाची किंमत मिळायला हवी. दुर्दैवाने खासदार याबाबत भूमिका मांडत नाहीत. त्यामुळे मोठे आंदोलन उभारण्याची गरज आहे," असे डॉ.मायंदे यांनी नमूद केले.

**सारांश:**

हवामान बदलामुळे भारतीय शेतीपुढे महत्त्वपूर्ण आव्हाने आहेत, ज्यामुळे अन्न सुरक्षा, उपजीविका आणि ग्रामीण विकास तसेच शेतकऱ्यांचा आर्थिक विकास धोक्यात आला आहे. तथापि, हवामान-प्रतिबंधक कृषी पद्धती आणि धोरणे अवलंबून, भारत आपल्या शेती प्रणालींमध्ये लवचिकता निर्माण करू शकतो आणि शेतीवरील हवामान बदलाचे परिणाम कमी करू शकतो. धोरणकर्ते, संशोधक, शेतकरी आणि इतर भागधारक यांच्यातील सहकार्य कृषी उत्पादकता टिकवून ठेवू शकतात, आणि बदलत्या हवामानाचा सामना करत असताना अन्नसुरक्षा सुनिश्चित करणाऱ्या प्रभावी व अनुकूलन धोरणे विकसित आणि अंमलात आणण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भसूची:-**

१) श्री प्रदीप गोंजारी डॉ. ला.रा. तांबडे, २०१०(हवामानातील बदलाचा कृषी क्षेत्रावरील परिणाम)

२) जयंती काजळे प्रोफेसर, गोखले इंस्टीट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे

३) डॉ. प्रदीप हळदवणेकर, लेख (सहयोगी अधिष्ठाता, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे, जि. सिंधुदुर्ग, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी)

**संकेतस्थळे**

1. https://www.drishtiias.com/daily-news-analysis/pesticides-management-bill-2020
2. https://agrowon.esakal.com/mukhya-batamya/farmer-agricultural-news-new-seed-bill-stuck-pune-maharashtra-34131
3. https://mr.vikaspedia.in/agriculture/best-practices/sustainable-agriculture/92a940915
4. https://shetkariyojna.com/effective-water-management-system-for-sustainable-agriculture/

# भारतातील पायाभूत सुविधांमध्ये वाहतूक क्षेत्राचे अध्ययन

**डॉ. कांचनमाला क्षीरसागर**

एल.ए.डी. कॉलेज, नागपूर

**सारांश :**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा पायाभूत सुविधांवर आधारित असतो. पायाभूत सुविधा जेवढी अधिक विकसीत असेल तेवढयाच जलद गतीने देशाचा आर्थिक विकास घडून येतो. वाहतूक, वीज, सिंचन, वित्तीय संस्था, तंत्रज्ञान, संप्रेषणची साधने, शिक्षण व आरोग्य हे घटक म्हणजे अर्थव्यवस्थेचा पाया आहेत म्हणून यांना पायाभूत संरचना किंवा आधारभूत संरचना असे म्हणतात. कारण प्रत्येक क्षेत्राच्या विकासासाठी हे घटक आधारभूत ठरतात. भारतात पायाभूत संरचनेच्या वाढीकरिता अनेक प्रकारचे विकासात्मक बदल झाल्याचे दिसते. उपरोक्त अध्ययनांतर्गत प्रामुख्याने वाहतूक क्षेत्रातील झालेल्या परिवर्तनांचे अध्ययन करण्यात आले आहे. वाहतूकीचे प्रामुख्याने रस्ते वाहतूक, रेल्वे वाहतूक, जल वाहतूक, हवाई वाहतूक असे प्रकार पडतात. वाहतूकीच्या विकासामुळे देशातील सर्व क्षेत्रांतर्गत उत्पादन, उपभोग, विनिमय आणि वितरणामध्ये वाढ होऊन परस्पर आंतरविकासाला गती मिळालेली आहे. कृषी व उद्योग उत्पादनाला चालना मिळाली, भौगोलिक विशेषीकरण साध्य झाले, वाहतूक क्षेत्रातील गुंतवणूकीमुळे मागास डोंगराळ भागातही नवनविन प्रकल्पांची उभारणी करणे शक्य झाले, रोजगार निर्मितीत वाढ झाली, लोकांचे जीवनमान उंचावले याशिवाय संतूलित प्रदेशिक विकास होण्यास मदत झाली आहे.

**बीजशब्द :**

भारत, पायाभूत सुविधा, वाहतूक

**उद्दिष्टये :**

1 देशाच्या विकासाच्या दृष्टीने वाहतूक क्षेत्राच्या भूमिकेचे अध्ययन करणे.

2 भारतातील वाहतूक क्षेत्रातील प्रकार व वाढीचे अवलोकन करणे.

**गृहीत :–**

1. वाहतूक क्षेत्रातील विकास देशाच्या आर्थिक विकासास सहाय्यभूत ठरलेला आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तूत संशोधन पद्धती दुय्यम समंकावर आधारीत आहे. याअतंर्गत भारतातील पायाभूत सुविधा व वाहतूक क्षेत्राशी संबंधित विविध प्रकाशित पुस्तके, लेख व संकेत स्थळांद्वारे प्राप्त झालेल्या माहितीचा समावेश करण्यात आला आहे.

**प्रस्तावना :**

कोणत्याही देशाचा सर्वांगिण विकास त्या देशातील उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधेवर आधारीत असतो. आर्थिक विकासाची प्रारंभीक अवस्था म्हणजे पायाभूत सुविधांचा विकास होय. पायाभूत सुविधा निर्माण करणे ही संतुलित आर्थिक विकासाची पूर्वअटच असते अन्यथा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात म्हणून पायाभूत सुविधांचा विकास होणे आवश्यक असते. त्यातही वाहतूक क्षेत्र हा पायाभूत सुविधांचा अत्यंत महत्वाचा भाग आहे कारण वाहतूकीमुळे आर्थिक क्रियांना गतीशीलता प्राप्त होऊन विकेंद्रींकरणाला चालना मिळते व प्रादशिक समतोल साधता येतो.

**चर्चात्मक विश्लेषण :–**

पायाभूत सुविधांचा विकास हा अर्थव्यवस्थेच्या विकासाचा पाया आहे. भारतात स्वातंत्र्यपुर्व काळात पायाभूत सुविधांचा फारसा विकास झालेला नव्हता म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात आर्थिक विकासाच्यादृष्टीने पायाभूत सुविधांच्या वाढीवर भर देण्यात आला. पायाभूत सुविधांची विभागणी आर्थिक व सामाजिक अशा दोन भागात करण्यात येते. वाहतूक, संचार, उर्जा, सिंचन, वित्तीय व्यवस्थापण प्रणाली ही आर्थिक विकासास सहाय्यभूत ठरतात तर शिक्षण व आरोग्य ही सामाजिक विकासास सहाय्यभूत ठरतात. खरे तर कोणत्याही देशाच्यादृष्टीने आर्थिक व सामाजिक असा दोन्ही विकास आवश्यक असतो. प्रस्तुत विश्लेषणातंर्गत प्रामुख्याने वाहतूक क्षेत्र व त्यांच्या प्रकाराचे अध्ययन करण्यात आलेले आहे.

**पायाभूत सुविधांचा अर्थ :**

पायाभूत सुविधा ही व्यापक संकल्पना आहे. ''आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहाय्यक ठरणाऱ्या विविध घटकांची निर्मिती म्हणजे पायाभूत सुविधांची निर्मिती होय.'' यापासून प्रत्यक्ष उत्पादन कार्य होत नाही परंतु इतर उत्पादक कार्यात ते सहाय्यक ठरतात म्हणून देशाच्या विकासासाठी पायाभूत सुविधांचा विकास होणे गरजेचे असते.

**पायाभूत सुविधांचा घटक – वाहतूक व्यवस्था :**

**1) वाहतूक व्यवस्थेचा विकास :**

वाहतूक या शब्दाचा अर्थ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेणे होय. वाहतूक व्यवस्थेमध्ये अशा सगळया साधनांचा समावेश होतो ज्याद्वारे वस्तू व व्यक्ती एका जागेवरून दुसऱ्या जागेवर स्थलांतरीत होत असतात. स्वातंत्र्यपुर्व काळात भारतीय खेडी स्वयंपूर्ण होती तसेच त्यांच्या आर्थिक व सामाजिक गरजाही मर्यादित होत्या व त्यांच्या गरजांची पूर्तताही त्याच क्षेत्रांतर्गत पूर्ण केली जात होती यामुळे कमी अंतरासाठी व स्वस्त साधने म्हणून बैलगाडी, घोडागाडी, उंट यासारख्या प्राण्यांचा वाहतुकीसाठी उपयोग केला जात होता.

वाहतूक क्षेत्र पायाभूत सुविधांमधील एक प्रमुख घटक आहे. स्वातंत्र्योत्तर काळात एका भागाचा दुसऱ्या भागाशी संपर्क प्रस्थापित करण्यासाठी, भौगालिक साधनसामुग्रीचा योग्य उपयोग करून त्यांच्या विशेषीकरणासाठी, प्रादेशिक संतुलित विकास घडवून आणण्यासाठी आणि आर्थिक क्रियांच्या वाढीस चालना देण्यासाठी वाहतूक व्यवस्थेत वाढ करणे अपरिहार्य होते यासाठी रस्ते वाहतूक, रेल्वे वाहतूक, जल वाहतूक व हवाई वाहतूक यांचा विकास करण्यात आला.

**रस्ते वाहतूक :**

भारतात वाहतूकीचे एक प्रमुख साधन म्हणून रस्ते वाहतूकीचा समावेश होतो, हा वाहतुकीचा एक सर्वात जुना प्रकार आहे. भारताच्या आर्थिक विकासाच्यादृष्टीने रस्ते वाहतूक हा समृद्धीचा मार्ग आहे. रस्ते वाहतूक लवचिक असल्यामुळे मागास, दुर्गम व डोंगराळ भागांना शहरांपर्यंत जोडण्यामध्ये रस्त्यांची भूमिका महत्वपूर्ण आहे यास्तव स्वातंत्र्योत्तर काळात रस्ते वाहतूकीत मोठया प्रमाणात सुधारणा करण्यात आल्या, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासामूळे रस्ते वाहतूकीला प्रगत स्वरूप प्राप्त झाले. श्रीनगरपासून ते कन्याकुमारी असा उत्त्र–दक्षिण तर आसाममधील सिलचरपासून ते गुजरातमधील पोरबंदरपर्यंत पूर्व–पश्चिम असे विस्तारीत मोठमोठया महामार्गांनी अनेक मोठी शहरे, औद्योगिक केंद्रे व बंदरांना जोडलेले आहे. रस्त्यांच्या या विस्तीर्ण जाळयांमुळे ग्रामीण भागातून शहराकडे रोजगारीसाठी, शिक्षणासाठी लोकसंख्येचे स्थलांतरण मोठया प्रमाणावर झाल्याचे दिसते. रस्ते वाहतूकीत जागतिक क्रमवारीनुसार युनायटेड स्टेट्स नंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. रस्ते वाहतूकीमध्ये राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, जिल्हा मार्ग, ग्रामीण मार्ग, शहरी मार्ग, प्रकल्प मार्ग यांचा समावेश होतो.

**भारतातील रस्ते वाहतुकीत झालेली वाढ**

| रस्ते वाहतूक वर्गीकरण | 1970–71 कि.मी. | 1090–91 कि.मी. | 2000–2001 कि.मी. | 2016–17 कि.मी. | 2020–21 कि.मी. |
|---|---|---|---|---|---|
| राष्ट्रीय महामार्ग | 23838 | 33650 | 57737 | 114158 | 161350 |
| राज्य महामार्ग | 56765 | 127311 | 132100 | 175036 | 186908 |
| जिल्हा मार्ग | 276833 | 509435 | 736001 | 586181 | 632154 |
| ग्रामीण मार्ग | 354530 | 1264430 | 1972016 | 4166916 | 4535511 |
| शहरी मार्ग | 72120 | 186799 | 252001 | 526483 | 544683 |
| प्रकल्प मार्ग | 130893 | 209737 | 223665 | 328897 | 354921 |
| एकूण | **914979 कि. मी.** | **2327362 कि.मी.** | **3373520 कि.मी.** | **5897671 कि.मी.** | **6415530** |

(Source – https://e.n.m.wikipedia.org/wiki/transport_in_India)

**रेल्वे वाहतूक :**

भारतात लांबदूरचे अंतर पार पाडण्यासाठी आणि अवजड वस्तुंच्या वाहतुकीसाठी रेल्वे वाहतूक स्वस्त वाहतूक आहे. भारतात पहिली रेल्वे स्वातंत्र्यपुर्व काळात 16 एप्रील 1853 मध्ये मुंबई ते ठाणे चाललेली होती, 1950–51 मध्ये रेल्वे लाइन्सची एकूण लांबी 53,596 कि.मी. होते. स्वातंत्र्योत्तर काळात रेल्वेच्या विकासासाठी अनेक धोरणात्मक बदल करण्यात आले उदा. रेल्वेचे विद्युतीकरण, क्षेत्रीय विभाजन, संगणकीकरण याशिवाय

नवनविन तंत्रज्ञानात्क बदलांमूळे सद्य परिस्थितीत भारतीय रेल्वे आशियातील सर्वात मोठी व जागतिक स्तरावर चौथ्या क्रमांकावर आहे. भारतातील सर्वात जास्त मोठे व व्यस्त असणारे हावडा रेल्वे स्टेशन असून एकूण 23 प्लॅटफॉर्म व सर्वाधिक रेल्वे हाताळण्याची क्षमता त्यात आहे येथे दररोज 600 प्रवासी व मालवाहू गाडयांची वाहतूक होत असते. तसेच मुंबई सर्वात विस्तारीत उपनगरीय भाग असून याअंतर्गत 98 रेल्वे स्थानके आहे. 2023 मध्ये भारतातील रेल्वे लाइन्सची एकूण लांबी 1,26,366 कि.मी. आहे तर रेल्वे स्टेशनची संख्या जवळपास 8338 आहे. रेल्वेद्वारे प्रतिदिवशी 13,169 प्रवासी रेल्वे गाडंयाद्वारा 23 दशलक्ष प्रवाशांची तर 8,479 मालवाहू गाडंयाद्वारा 3 दशलक्ष टन माल वाहतूक केली जात आहे. सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठया गुंतवणीमध्ये रेल्वे वाहतूकीचा समावेश होतो. लांब पल्याचे अंतर व कमी खर्च यामुळे रेल्वे वाहतूकीच्या उपयोगात वाढ होत असल्याचे दिसून येत आहे.

**जल वाहतूक :**

भारतात जल वाहतूकीचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापाराच्यादृष्टीने महत्वपूर्ण वाटा आहे. देशातील नद्या, सरोवर, सागर यांचा जल वाहतूकीसाठी वापर केला जातो. भारतातील एकूण नद्यांची लांबी 29000 कि.मी. आहे त्यापैकी 2000 कि.मी. लांबीचे प्रवाह यांत्रिक बोटींसाठी उपयुक्त असले तरी यापैकी 1700 कि.मी. प्रवाहांचा उपयोग होतो आहे. भारतातील सर्वाधिक लांबीचा राष्ट्रीय जलमार्ग क्रमांक एक हा प्रयागराज ते हल्दिया 1620 कि.मी. आहे. हा गंगा व हुगळी नदीवर असून तो उत्तरप्रदेश ते पश्चिम बंगाल असा विस्तीर्ण स्वरूपाचा आहे. भारतात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी 1961मध्ये शिपिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड कंपनी (मूख्यालयःमुंबई) निर्माण करण्यात आली. भारतातील आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या आकारमानानुसार 90% व्यापार हा जल वाहतुकीचा भाग आहे. भारतात प्रमुख 13 बंदर (पोर्टस्) आहेत ज्यांची भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात महत्वाची भूमिका आहे.

**भारतात प्रमुख 13 बंदर (पोर्टस्)**

| अ. क्र. | बंदर (पोर्टस्) | राज्य | वैशिष्टये |
|---|---|---|---|
| 1 | कांडला | गुजरात | भरती ओहोटीचे बंदर, टाइडल पोर्ट असे संबोधित, भारतातील व आशियातील पहिल्या विशेष आर्थिक क्षेत्रासाठी (SEZ) प्रसिद्ध, रसायने, पेट्रोलियम उत्पादने, लोखंडाची आयात तर धान्य, मीठ, कापडयांची निर्यात, 23.3 दशलक्ष टन वस्तू वाहतूक क्षमता |
| 2 | मुंबई | महाराष्ट्र | भारतातील सर्वात मोठे तसेच सर्वात व्यस्त बंदर, सर्वात जास्त मालवाहतूकीसाठी प्रसिद्ध, रसायने, कच्चे तेल, पेट्रोलियम उत्पादनांची आयात व निर्यात. |
| 3 | JNPT (जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट) | महाराष्ट्र | भारतातील आधुनिक पद्धतीचे सर्वात मुख्य बंदर, किंग ऑफ पोर्टस् असे संबोधित, सर्वात मोठे कंटेनर पोर्टस् असलेले, मुंबईवरील वाढलेला ताण कमी करण्यासाठी निर्मिती, रसायने, खाद्यतेल, फळे, दुग्धपदार्थंची मोठया प्रमाणावर निर्यात. |
| 4 | मार्मागोवा | गोवा | जपानला लोहखनिज निर्यातीसाठी प्रसिद्ध, 16.1 दशलक्ष टन वस्तू वाहतूक क्षमता. |
| 5 | न्यू मंगलुरू | कर्नाटक | लोहखनिज, ग्रेनाइट, कॉफी, काजूच्या निर्यातीसाठी प्रसिद्ध. |
| 6 | कोची | केरळ | नैसर्गिक बंदर असून, मसाल्याच्या पदार्थ निर्यातीसाठी जागतिक स्तरावर प्रसिद्ध, जहाजनिर्मिती केंद्र. |
| 7 | व्ही.ओ.चिदंबरम (तुतीकोरीन) | तामिळनाडू | हे कृत्रिम बंदर असून कोळसा, मीठ, अन्नधान्य, खाद्यतेल, साखर, पेट्रोलियम उत्पादनांची आयात निर्यात, यात प्रामुख्याने श्रीलंकेचा समावेश. |
| 8 | चेन्नई | तामिळनाडू | सर्वात जुने व दुसरे सर्वात व्यस्त कृत्रिम बंदर पेट्रोलियम, लोहखनिज व कार्गोसाठी प्रसिद्ध, 21.37 दशलक्ष टन वस्तू वाहतूक क्षमता, तांदूळ, कापड, तंबाखू, कॉफी, मॅगनिज, मत्स्य उत्पादनांची निर्यात तर कोळसा कच्चे तेल, कागद, वाहने, यंत्रसामुग्री रासायने, खतांची आयात. |
| 9 | कामराजर (एन्नोर) | तामिळनाडू | हे देशातील पहिले कार्पोरेट बंदर असून कोळसा, लोहखनिज, पेट्रोलियम उत्पादनांची आयात निर्यात होते. चेन्नईवरील वाढता ताण कमी करण्यासाठी निर्मिती करण्यात आली. |
| 10 | विशाखापट्टणम | आंध्रप्रदेश | जागतिक मांनाकनानुसार 3 स्टार मांनाकन असलेले, सर्वात खोल संरक्षित बंदर, लोहखनिज, कच्चे तेल, पेट्रोलियम पदार्थासाठी विस्तृत व्यवस्था, जहाज बांधणी तसेच जहाज दुरूस्ती उद्योग, 16.7 दसलक्ष टन कार्गो वाहतूक करण्याची क्षमता. |
| 11 | पारद्विप | ओरिसा | जास्त खोली असल्यामूळे सहा ते आठ दसलक्ष टन वाहके हाताळू शकते. जपाणला लोहखनिज व ॲल्युमिनियमची निर्यात. |

| | | | |
|---|---|---|---|
| 12 | कोलकाता – हल्दिया | पश्चिम बंगाल | गेटवे टू इन्स्टर्न इंडिया असे संबोधित, दक्षिण–पूर्व आशियाई देश, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडकडून आयात, ज्यूट उद्योगासाठी प्रसिद्ध, ज्यूट उत्पादने, कोळसा, स्टील, लोहधातू, मॅगनिज यासारख्या वस्तूंची निर्यात. |
| 13 | अंदमान निकोबार | पोर्ट ब्लेअर | पोर्ट ब्लेअरची राजधानी, आर्थिकदृष्टीने महत्वाचा भाग, जपाण, इंडोनेशिया, साऊथ कोरिया, ऑस्ट्रेलिया, फिलिपींस या देशांशी आयात निर्यात. |

(Source – https://e.n.m.wikipedia.org/wiki/transport_in_India)

याशिवाय गुजरात, महाराष्ट्र, केरळ, गोवा, तामिळनाडू, कर्नाटक, आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल, ओरिसा, दमण आणि दीव, अंदमान निकोबार, लक्षद्वीप येथे एकूण 200 लहान बंदरे आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात जल वाहतूकीतंर्गत अनेक नियोजनपुर्वक बदल झाल्याने वर्तमान स्थितीत भारतीय जल वाहतूकीचा आशियात दुसरा व जागतिक स्तरावर सोळावा क्रमांक आहे. जल वाहतूक नैसर्गिक स्त्रोत असल्याने यांच्या निर्मितीला इतर वाहतुकींच्या तुलनेत फारसा खर्च येत नाही परंतु सागरी सीमा व विविध देशांतील आंतरराष्ट्रीय नियम जल वाहतूकीच्या विकास मार्गातील प्रमुख अडचणी ठरतात.

**हवाई वाहतूक :**

वाहतूक क्षेत्रातील सर्वात जलद परंतु इतर वाहतूकीच्या तुलनेत सर्वात महाग हवाई वाहतूक आहे. परंतू यामुळे प्रादेशिक अंतर कमी होवून वेळेची बचत होते. तसेच प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापण करण्यास हवाई वाहतूक महत्वाची ठरते. यास्तव भारतातील अनेक महत्वाच्या शहरांमधील आर्थिक व्यवहार व आवागमन हवाई वाहतूकीद्वारेच मोठया प्रमाणात होत असल्याचे आढळते. भारतातील सर्वात प्रथम हवाई वाहतूक स्वातंत्र्यपुर्व काळात 1911 मध्ये टपालांची ने–आण करण्यासाठी करण्यात आली.

1947 मध्ये एअर इंडिया, इंडियन नॅशनल एअरवेज, एअर सर्व्हिसेस ऑफ इंडिया आणि डेक्कन एअरवेज अशा चार कंपन्या कार्यरत होत्या. 1951 मध्ये भारत एअरवेज, हिमालयन एव्हिएशन लि., एअरवेज इंडिया, कलिंगा एअरलाइन्स या चार कंपन्यांची भर पडली. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने 1953 मध्ये विमान वाहतूक कंपन्यांचे राष्ट्रीयकरण करून याद्वारे 'एअर इंडिया इंटरनॅशनल कार्पोरेशन' व 'इंडियन एअरलाइन्स कार्पोरेशन' या दोन महत्वपूर्ण संस्थांची स्थापना केली याशिवाय हळूहळू हवाई वाहतूकीत अनेक प्रकारचे परिर्वतन झाले. सद्य परिस्थितीत भारतातील हवाई वाहतूकीत एअर इंडिया, एअर इंडिया एक्सप्रेस, इंडिगो, गो एअर, स्पाइसजेट, एअर एशिया इंडिया या कंपन्यांचा महत्वपूर्ण वाटा आहे. भारतात 28 आंतरराष्ट्रीय व 180 राष्ट्रीय विमानतळ आहेत. तसेच हवाई वाहतूकसाठी अनेक नविन प्रकल्प कार्यान्वित आहेत.

**निष्कर्षः**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात पायाभूत सुविधांच्या विकासासाठी नियोजनात्मक प्रयत्न करण्यात आले कारण पायाभूत सुविधांच्या विकासावरून देशाच्या आर्थिक विकासाची रचना निर्देशित होत असते. पायाभूत सुविधांमधील वाहतूक हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. अर्थव्यवस्थांमधील कार्यक्षम कार्यवाहीसाठी वाहतूक व्यवस्था सधन असणे आवश्यक असते. याचस्तव वाहतूकीच्या साधनांत मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. रस्ते व रेल्वेच्या विस्तारलेल्या जाळयांमूळे देशातील अनेक शहरे व ग्रामीण भाग यांचा एकमेकांशी संपर्क वाढून आर्थिक देवाण–घेवाण तर वाढलीच शिवाय सामाजिक सांस्कृतिक एकीकरण घडून आले, रोजगार गतिशीलता वाढली, ग्रामीण भागातून शहरीकरणाकडे लोकसंख्येचे स्थलांतरण होवून राहणीमानात बदल झाला परिणामतः जीवनस्तर उंचावण्यास मदत झाली, कच्चा माल रास्त व कमी वेळेत उपलब्ध झाल्याने कृषी व औद्योगिक उत्पादनात वाढ झाली तसेच स्थानिक उत्पादन केंद्रपासून ते आंतरराष्ट्रीय बाजारपेठांपर्यत रस्ते, रेल्वे, बंदरे आणि हवाई वाहतूकीची भमिका महत्वपूर्ण ठरलेली आहे. हवाई वाहतूक आणि जल वाहतूकीच्या विकासामुळे भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात लक्षणीय वाढ झालेली आहे तसेच पर्यटन उद्योगाचीही वाढ होण्यास मदत झाली आहे. यावरून वाहतूक व्यवस्थेतील वाढ भारताच्या आर्थिक व समाजिक विकासासाठी सहाय्यभूत ठरलेली आहे म्हणूनच वाहतूक क्षेत्राचा पायाभूत सुविधांमध्ये मोलाचा वाटा आहे हे दिसून येते.

**संदर्भसूची :**


1. भारतीय अर्थव्यवस्था : डॉ. जे. सी. पंत, डॉ. जे. पी. मिश्रा, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा.
2. भूगोल व कृषी : प्रा. ए. बी. सवदी, निराली प्रकाशन, (राज्य सेवा मुख्य परिक्षा)
3. योजना मासिक : नोव्हेंबर 2015
4. वर्तमानपत्रे : लोकसत्ता 1जाने. 2024, 29डिसें. 2023, सकाळ 7मार्च 2022, तरूण भारत 22सप्टें. 2020
5. https://e.n.m.wikipedia.org/wiki/transport_in_India

# भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल आणि कृषी क्षेत्रातील समस्या व आव्हाने

**श्री. खरबे नारायण तुकाराम**

(पी.एच.डी संशोधक -पीपल्स कॉलेज नांदेड)

**प्रस्तावना:**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. देशाच्या आर्थिक वृद्धीसाठी कृषी विकासी अत्यावश्यक बाब आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी 70 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहत असून त्यांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन शेती आहे. जगाच्या भौगोलिक क्षेत्रापैकी 2. 42% क्षेत्रफळ भारतात असून जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी 16.7% लोकसंख्या भारतात राहते भारतातील एकूण लोकसंख्येचा विचार करता अद्यापही 58.4% लोकांना रोजगार पुरवण्याचे महत्त्वाचे कार्य कृषी क्षेत्र करीत आहे. देशाची वाढती लोकसंख्या, अन्नधान्याचा प्रश्न, जमीन सुधारणा, ग्रामीण रोजगारी, शेतमाल विपणन, ग्रामीण कर्ज पुरवठा, पशुसंवर्धन, साठवणूक सोयी, उद्योगासाठी लागणारा कच्चामाल इ. च्या संदर्भातील शेती व्यवसायासमोर अद्याप काही अनुलक्षित प्रश्न आहेत. देशाच्या प्रगतीसाठी कृषी व्यवसायाची प्रगती करणे गरजेचे आहे. म्हणून भारतात 1951 पासून आर्थिक नियोजनात सुरुवात झाली व त्यानंतर हरितक्रांतीचा प्रयोग करण्यात आला व त्यामुळे कृषी उत्पादनात वाढ घडून आली.

आज जगातील अनेक देश भारताकडे आता आशेने व विश्वासाने पाहत आहेत. व चीन पेक्षाही अधिक भारतामध्ये पुरवठा साखळी भक्कम करण्यासाठी विविधता जोपासण्यासाठी जगातील देश भारताकडे पहात आहेत. जग भारताकडे प्रतिभावंत तरुणांचे व्यक्ती स्थान, ऊर्जा स्त्रोत म्हणून पहात आहेत. अर्थकारणाला गती देण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचे संजीवनी सामर्थ्य भक्कम करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार उपाययोजना करत आहेत. त्यामुळे भारत आर्थिक क्रांतीच्या उंबरठ्यावर उभा आहे. जागतिक पातळीवर विकासाचे इंजिन गतीने पुढे नेण्यासाठी भारताला विश्वासू मित्र स्थैर्याचाआधारस्तंभ म्हणून पाहिले जात आहे. स्थैर्यआणि गतिमानता हा भारताच्या आर्थिक विकासाचा आधारस्तंभ होय. त्यामुळे गुंतवणुकीला चालना देणारे लवचिक धोरण उदयास येत आहे. आज भारत जागतिक पातळीवर भक्कमपणे उभा आहे. दहा वर्षांपूर्वी भारतात 74 विमानतळे होती. आता ती दुप्पट म्हणजे 149 वर गेली आहे. राष्ट्रीय महामार्गाचे जाळे दुप्पट झाले आहे. मेट्रो ट्रेनचे नेटवर्क तिप्पट झाले आहे आणि रेल्वे गाड्यांची संख्या पाचपट वाढली आहे. हे विकासाचे आणि महासत्तेच्या दिशेने वाटचालीचे मापदंड आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1) कृषी क्षेत्रातील पर्यावरणीय समस्यांचा अभ्यास करणे.
2) भारतीय कृषी समोरील आव्हानांचा आढावा घेणे.
3) भारतीय शेतीच्या आव्हानावरील धोरणात्मक उपायोजना सूचविणे.

**गृहीतकृत्ये:**

1) भारतीय शेतीमध्ये पर्जन्यमानातील असमतोल व सततची नापिकी अस्तित्वात असते.
2) भारतीय शेती क्षेत्राला सिंचनाचा अभाव आहे.
3) भारतामध्ये शेतमालाच्या किमतीमध्ये अस्थैर्य आहे.
4) शेतीपूरक व्यवसायाचा अभाव आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन निबंध साठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आला आहे. ह्याच प्रमाणे प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी द्वितीय तथ्यांचा आधार घेण्यात आला आहे.

**भारतीय कृषी समोरील पर्यावरणीय समस्या:**

पृथ्वी जीवसृष्टी ज्या विशिष्ट अधिवासात, नैसर्गिक परिस्थितीत जगते त्या सर्व पार्श्वभूमीला सामान्यत: पर्यावरण असे म्हटले जाते. पर्यावरणाच्या दृष्टीने अन्न, पाणी, हवा ,जमीन, वसतीस्थान इत्यादी आवश्यक बाबी चांगल्या दर्जाच्या उपलब्ध होत असल्यास पर्यावरण टिकून राहते. मात्र पर्यावरणीय घटकांमध्ये मानवाचा वाढता हस्तक्षेपाला पर्यावरणीय समस्या निर्माण होण्यास कारण ठरला आहे. उदा. मानवाने मुद्दाम अथवा नकळत टिकाऊ वस्तू पर्यावरणात सोडल्यामुळे भूमी, हवा ,पाणी, अन्नधान्य इ.मोठ्या प्रमाणात परिणाम झाला त्यामुळे मानवा समोर अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्येमध्ये भर टाकण्याचे काम इतर क्षेत्राप्रमाणेच कृषी क्षेत्राने देखील केले आहे. म्हणून कृषी क्षेत्रात निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय समस्यांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येतो.

**अ) जल प्रदूषण:**

पाण्यात सेंद्रिय द्रव्य आणि रसायने मिसळल्यामुळे विहिर, नदी, नाले, समुद्र यांच्यातील जलसाठा प्रभावित झाला आहे. तसेच पाण्यात मोठ्या प्रमाणात सेंद्रिय द्रव्य मिसळल्यामुळे पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊन पाण्यातील जलचर प्राणी मरण पावतात किंवा त्यांचे जीवन धोक्यात येत आहे. अलीकडील काळात शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उत्पादन करण्यासाठी रासायनिक खते व कीटकनाशकांचा वापर होत आहे. शेतीत वापरण्यात आलेली रासायनिक खते व कीटकनाशकांचे अंश पावसाच्या पाण्यासोबत विहिरी, नदी, कालवे यांच्यामध्ये जाते तसेच काही अंश जमिनीतील जलसाठ्यात मिसळते त्यामुळे जमिनीतील जलसाठा प्रभावित होत आहे.

**ब) हवा प्रदूषण:**

वातावरणात मुख्यत्वे नायट्रोजन, ऑक्सिजन, कार्बन डाय-ऑक्साइड इत्यादी वायूचे विशिष्ट प्रमाणात अस्तित्व असते ते अस्तित्व मानवी जीवनाला पोषक असते परंतु मानवी हस्तक्षेपामुळे वातावरणातील विविध वायूच्या प्रमाणात अधिकच भर पडली तर वनस्पती व जीवसृष्टीवर त्यांच्यावर विपरीत परिणाम होतो. अशा स्थितीत हवा प्रदूषण म्हटले जाते. कृषी क्षेत्रामध्ये पिकांचे टिकाऊ अवशेष शेतकरी मोठ्या प्रमाणात जाळून टाकतात. त्यामुळे वातावरणात कार्बन डाय-ऑक्साइड चे मोठ्या प्रमाणात उत्सर्जन होते. तसेच रासायनिक खते व कीटकनाशकांच्या शेती वापर केल्यामुळे रासायनिक खते व कीटकनाशकांचे अवशेष हवेत मिसळून हवा दूषित करतात. त्यामुळे मानवास दमा व श्वसनाचे विकार होत आहे.

**क) मुद्रा प्रदूषण:**

जमिनीवर होणारे दूषितकांचे आक्रमण म्हणजे मुद्रा प्रदूषण होय. यात टाकाऊ कचरा, दूषित द्रव्य, रासायनिक घटक इत्यादीचा समावेश होतो. मुद्रित होणारे दुषितिकरण वाढत गेल्यास मुद्रेच्या उत्पादन क्षमतेत परिणाम घडवून आणते. शेतीत सातत्याने रासायनिक खते व कीटकनाशकांचा वापर होत आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रातील जमिनीची उत्पादन क्षमता घटलेली आढळून येते.

पर्यावरणीय समस्येचा कृषी क्षेत्रावरील परिणाम: अलीकडील काळात पर्यावरणीय बदलाचा परिणाम कृषी क्षेत्रावर प्रकर्षाने जाणवत आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीवर आधारित असल्याने कृषीवर होणारा प्रतिकूल परिणाम हा सर्व क्षेत्रात होताना दिसून येतो. भारत हा खंडप्राय देश असल्या मुळे प्रत्येक राज्याची पीक रचना, प्रजन्यमान, हवामान भिन्न भिन्न असल्याचे आढळून येते. त्यामुळे पर्यावरणीय बदलाचा परिणाम हा प्रदेशानुसार भिन्नभिन्न आणून येत आहे. वातावरणातील उष्णतेमुळे व ग्रीन हाऊस परिणामामुळे मान्सूनच्या पावसात अनियमितता होताना आढळून येत आहे.

तसेच हवामान बदलामुळे बिगर मान्सून कालखंडात देखील पाऊस होत आहे. तसेच पावसाची तीव्रता कमी अधिक होऊन दुष्काळ, महापूर, ढगफुटी सारखी परिस्थिती निर्माण होत आहे.

पर्यावरणीय बदलामुळे पाणी समस्या निर्माण होत आहे. तसेच जमिनीखालील पाण्याची पातळी कमी होत आहे. त्यामुळे सिंचनासाठी उपलब्ध होणाऱ्या पाण्याची प्रमाण कमी होऊन कृषी उत्पादकता धोक्यात येत आहे. त्यामुळे वाढती लोकसंख्या व अन्नधान्य पुरवठा या तफावत निर्माण होऊन देशासमोर अन्नधान्य सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत आहे. पर्यावरणीय समस्येमुळे कृषी क्षेत्रातील जैवविविधता धोक्यात आली आहे. त्यामुळे वाढत्या पर्यावरणीय समस्या ह्या कृषी क्षेत्राच्या विकासासाठी तर घातक आहेतच सोबत मानवी जीवनासाठी सुद्धा धोकादायक आहेत.

**भारतीय शेतीक्षेत्रासमोरील प्रमुख आव्हाने:**

भारतीय कृषी क्षेत्रासमोर अनेक आव्हाने आहेत व त्यामध्ये काही नैसर्गिक तर काही मानवनिर्मित आहेत त्यापैकी प्रमुख आव्हाने किंवा समस्या पुढील प्रमाणे

**१) धारण क्षेत्राचा लहान आकार**

देशात शेत जमिनीचे तुकडे करण आणि अपखंडन ,वाढती लोकसंख्या आणि वारसाहक्क पद्धती/कायदा यामुळे दिवसेंदिवस शेतजमिनीचे आकारमान लहान/कमी होत आहे. भारतात निवड लागवडीखालील क्षेत्र 141.2 मिलियन हेक्टर असून पिकाखालील एकूण क्षेत्र 189.7 मिलियन हेक्टर आहे. 1970 -71 मध्ये सरासरी जमीन धारणा 2.28 हेक्टर होती. ती 1995- 96 मध्ये सरासरी जमीन धारण 1.50 हेक्टरवर आली. राजस्थान व नागालँड मध्ये हे प्रमाण चार ते सात पॉईंट पाच हेक्टर एवढे असून केरळ, पश्चिम बंगाल, बिहार आणि आंध्र प्रदेशच्या पूर्व भागात हे प्रमाण 1 हे. पेक्षाही कमी आहे. 1990 -91 मध्ये 1हे. पेक्षा कमी जमीन धारण असलेल्या लोकांचे प्रमाण 59% होते तर 01ते 02 हेक्टर क्षेत्र असलेले 19% आणि 10 हेक्टर जास्त जमीनधारकांचे प्रमाण 1.6% आहे. यावरून स्पष्ट होते की जमीन धरणाच्या प्रमाणात प्रचंड विषमता आहे .मुळातच जमीन धारणा कमी ,त्यातही वारसा हक्कामुळे वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या क्षेत्रात प्रत्येकाला वाटा हवा असतो त्यामुळे जमिनीचे तुकडे करण व अपखंडान होते.

**2) जलसिंचन**

जलसिंचनाच्या बाबतीत जगात चीन नंतर भारत दुसऱ्या क्रमांकावर समृद्ध देश आहे. केवळ निसर्गाच्या पावसावर अवलंबून असलेल्या कुरडवाहू शेतीचे प्रमाण भारतात प्रचंड आहे अशा शेती क्षेत्रासाठी खात्रीशीर सिंचन आवश्यक असते. भारत सरकारने लहान मध्यम व मोठे सिंचन प्रकल्पाची उभारणी केली. या सर्व स्त्रोतांतून भारतात जवळपास 45.30% एवढी शेती क्षेत्र ओलिताखाली/ सिंचनाखाली येते. म्हणजे अजूनही जवळपास 55% क्षेत्र सिंचना पासून दूर आहे. देशातील शेतकऱ्यांची सिंचनासाठी वापरली जाणारी पारंपरिक पद्धतीमुळे फार मोठे पाणी वाया जाते. याही दृष्टीने जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे तसेच सिंचनाच्या आधुनिक साधनांच्या वापराला शासनाने प्रोत्साहन दिले पाहिजे.

**3) खते व कीटकनाशकांच्या वाढत्या किमती:**

देशात हरितक्रांतीच्या नंतर शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात रासायनिक खते व कीटकनाशकांचा वापर वाढला आहे. त्यांची मागणी वाढल्यामुळे त्यांच्या किमतीतही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे शेती उत्पादन खर्च वाढवून शेतकऱ्यांच्या निव्वळ उत्पादनात घट येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमधील कर्जबाजारीपणा कमी होत नाही. खरे तर शेतकऱ्यांनी माती परीक्षण करून खताचा वापर केला तर त्यांची मागणी कमी होऊन त्यांच्या किमती कमी होतील व त्यांच्या मर्यादित वापरामुळे शेतीची हानी होणार नाही तसेच शेतकऱ्यांचा खर्चही वाचेल.

**4) यांत्रिकीकरणाचा अभाव:** भारतीय शेती पारंपारिक पद्धतीने केली जाते. कालबाह्य उत्पादन तंत्र असल्यामुळे शेतीची उत्पादकता कमी आहे. त्यामुळे शेतकरी गरीब आहे. त्यासाठी शेतीमध्ये यंत्राचा वापर वाढला तर उत्पादन खर्च कमी होऊन शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल.

**5) कृषी विपणन:**

देशातील कृषी विपणन मध्ये अनेक दोष आहेत. देशात शासन हमीभाव जाहीर करते मात्र त्यानुसार शेतमाल खरेदी केंद्र सुरू करीत नाही. काही पिकांच्या बाबतीत उशिरा का होईना खरेदी केंद्र सुरू केली जातात .परंतु त्यांचा लाभ शेतकऱ्यांपेक्षा व्यापाऱ्यांना जास्त होतो.

**6) गोदाम व्यवस्था:**

देशात अन्नधान्याच्या किमतीमध्ये स्थिरता यावी व वाढत्या किमतीचा फायदा शेतकऱ्यांना होण्यासाठी शासन गोदाम व्यवस्था करते. परंतु ही व्यवस्था विस्कळीत असल्यामुळे देशातील शेतकऱ्यांचा फारसा प्रतिसाद मिळत नसल्यामुळे या योजनेचा फायदा मोठे शेतकरी व व्यापारी घेत असल्याचे दिसून येते.

**7) भांडूलाची कमतरता:**

देशात ग्रामीण भागात वित्त पुरवठा करण्यासाठी व शेतीच्या विकासासाठी आर.बी.आय नाबार्डच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो. परंतु अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना बँकांकडून पुरेसा व वेळेत कर्ज पुरवठा होत नसल्यामुळे शेतकरी सावकाराच्या पाशात अडकतात.

**8) व्यवसायिक दृष्टिकोनाचा अभाव:**

देशात आजही शेतीकडे पारंपारिक दृष्टिकोनातून बघितले जाते .शेतीला व्यवसायिक दृष्टिकोन दिल्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नात निश्चित वाढ होईल.

**9) हवामान बदल:**

हवामान बदलामुळे पर्जन्यमानात अनियमित्ता मोठ्या प्रमाणात आली आहे. ग्लोबल वार्मिंग च्या परिणामामुळे शेतीतील उत्पादन घटत आहे. हवेतील मिथेन व कार्बन डाय-ऑक्साइड च्या वाढत्या प्रमाणामुळे पिकावर विविध प्रकारचे रोग पडत आहेत. त्यासाठी महागडी कीटकनाशके वापरावी लागतात .त्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च वाढून नुकसान होत आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळले पाहिजे.

**10) अज्ञानीपणा /शिक्षणाचे कमी प्रमाण:**

आज शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. तसेच आधुनिक शेती आली आहे. त्यासाठी शिक्षण ही आवश्यक ठरते. भारतात आजही ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात याबाबतीत निरक्षरता आहे. ती दूर करण्यासाठी कृषी शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे.

**11) जागतिकीकरणाचे आव्हान:**

जागतिकीकरणामुळे विकसित देशात शेतीमध्ये प्रचंड वाढते उत्पादन जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविले जाते त्यामुळे शेतीमालाचा पुरवठा वाढल्यामुळे किमती कमी होतात. भारतासारख्या विकसनशील देशात विकसित देशाच्या तुलनेत शेती उत्पादकता खूपच कमी आहे. त्यामुळे भारतातील शेतकरी विकसित देशातील शेतकऱ्यांची स्पर्धा करू शकत नसल्यामुळे त्यांच्या मनाला योग्य भाव मिळत नाही.

वरील प्रकारच्या आव्हानांचा सामना भारतीय शेतकरी करीत आहे .त्यामुळे जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांच्या आव्हानावरील उपाययोजना पुढील प्रमाणे सांगता येतील.

1) जमीन सुधारणा करण्यात यावी.

2) सिंचन सुविधांचा विस्तार करावा

3) दर्जेदार खते व बी बियाणांचा वापर करावा.

4) त्वरित व पुरेसा कृषी पुरवठा करण्यात यावा.

5) शेती संशोधनाला महत्त्व द्यावे.

6)दृष्टिकोनात बदल व्हावा.

7) आधुनिक उत्पादन तंत्राचा वापर करावा.

8) पीक संरक्षण व्हावे.

9) शेतमाला उत्पादन खर्चावर आधारित किंमत द्यावी.

10) पिक विमा योजना राबवणे आवश्यक आहे.

11) शेतकरी महिलांना प्रशिक्षण देणे आवश्यक.

12) भू संधारण करणे ही आजच्या काळाची गरज आहे.

**निष्कर्ष :**

भारताची महासत्तेच्या दिशेने प्रचंड वेगाने वाटचाल चालू आहे. तरीपण भारतातील कृषी क्षेत्र समोरील अनेक आव्हाने आहेत. हे तेव्हाच दूर होतील जेव्हा राजकारण्यांमध्ये समाजसेवेचा भाव निर्माण होईल.

**संदर्भ:**

1. डॉ.विजय कवी मंडळ, कृषी अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन नागपूर.

2. भारताचा आर्थिक पाहणी अहवाल-2017 -18

3 भारतीय अर्थव्यवस्था-रुद्र, दत्त सुंदरम.

4. भारतीय अर्थव्यवस्था डॉ.ककडे डॉ.आर. एस. साळुंखे.

5. योजना ,माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार जुलै 2004

# शेती क्षेत्राची सद्यस्थिती, आर्थिक विकासातील भूमिका आणि वाटचाल

**प्रवीण सोमा पारधी**
सहाय्यक प्राध्यापक, बी. डी. काळे महाविद्यालय घोडेगाव. ता. आंबेगाव जि. पुणे 412408

**गोषवारा** :-

प्राचीन काळापासून कृषी क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेचे महत्वाचे क्षेत्र आहे. त्यामुळे कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये शेती क्षेत्राला अनण्यसाधारण महत्व आहे. वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची व रोजगाराची गरज पूर्ण करण्यासाठी तसेच उद्योग व सेवाक्षेत्राच्या विकासामध्ये शेतीची भूमिका महत्वपूर्ण आहे. शेती क्षेत्राचा स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये १९५१ मध्ये ५५ टक्के इतका वाटा होता आणि २०१४ & १५ मध्ये मध्ये १७ टक्के इतका कमी झालेला दिसून येतो. त्यामुळे श्रम शक्तीचा विचार केला तर जवळपास अजूनही ५० टक्क्या पेक्षा जास्त रोजगार निर्मिती ही शेती क्षेत्रातून होते. राष्ट्राच्या शेती क्षेत्रात विकास वृद्धी घडवून आणण्यासाठी उत्पादन, वितरण, विपणन, नियोजन आणि संशोधनावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. प्रस्तुत शोध निंबधाचा अभ्यास करण्यापाठीमागचा एकच हेतू आहे की, भारतीय कृषी क्षेत्राची सद्यस्थिती, आव्हाने आर्थिक विकासातील भूमिका आणि वाटचाल अभ्यासणे हा आहे.

**उद्दिष्टे**

१. भारतीय शेती क्षेत्राचा सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
२. भारतीय अर्थव्यवस्थे समोरील आव्हानांचा अभ्यास करणे.
३. आर्थिक विकासातील शेती क्षेत्राची भूमिका अभ्यासणे.
४. शेती क्षेत्राची वाटचाल अभ्यासणे.

**संशोधनपद्धती**


प्रस्तुत शोध निबंधाचे लेखन करण्यासाठी वर्णनात्मक आणि संख्यात्मक पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच माहिती संकलनासाठी द्वितीय स्रोताचा वापर करून माहितीचे संकलन केलेले आहे.

**प्रस्तावना**

भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. त्यामुळे शेती हे एक भारतीय अर्थव्यवस्थेचे महत्वाचे क्षेत्र आहे. १९९१ साली भारताने नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यामुळे दोन दशकामध्ये औद्योगिक, सेवा आणि शेती क्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल झालेले आहेत. शेती क्षेत्र हे भारतीय कुटुंबासाठी एक महत्वाचे एक व्यावसायिक व उदरनिर्वाहाचे क्षेत्र आहे. जवळपास एकूण लोकसंख्येच्या ५८ टक्के पेक्षा जास्त ग्रामीण कुटुंबे उपजीविकेचे प्रमुखसाधन म्हणून ते शेती क्षेत्रावर अवलंबून आहेत. शेती, कुक्कुटपालन, मत्स्यउत्पादन आणि वनीकरण या सर्व घटकांचे योगदान स्थूल देशातंर्गत उत्पादनामध्ये महत्वपूर्ण आहे. जसजशी अर्थव्यवस्था विकसित होत जाते तस तसा अर्थव्यवस्थेतील शेती क्षेत्राचा हिस्सा घटत जातो देशाच्या प्रारंभिक विकास अवस्थेत शेती क्षेत्राचे योगदान महत्वपूर्ण आहे- भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार केला तर १९५१ साली स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वाटा ५१. ९ टक्के इतका होता. आणि २०१२ & १३ साली शेती क्षेत्राचा स्थूल देशांतर्गत उत्पादनामधील वाटा १३. ७ टक्के इतका होता- परंतु २०१४ & १५ साली स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वाटा धीम्या गतीने वाढत जाऊन १७ टक्के इतका झाला आहे. जगातील अनेक विकसित राष्ट्रांचा अनुभव असा आहे की, देशाच्या आर्थिक विकासाबरोबर शेती क्षेत्राचे महत्त्व कमी होत चाललेले आहे. अनेक अर्थशास्त्रज्ञांच्या मते आर्थिक विकासामध्ये शेती क्षेत्र हे मूलभूत असू शकत नाही. परंतु ही भूमिका एकांगी

आहे. कारण आर्थिक विकास अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांचा विचार करता परस्परावलंबी असते. कृषी क्षेत्रा शिवाय औद्योगिक विकास होऊ शकत नाही. त्यामुळे औद्योगिक विकास होण्यापूर्वी कृषी क्षेत्राचा विकास होणे महत्त्वाचे आहे. विकासाची प्रक्रिया ही शेती क्षेत्रातूनच होत असते म्हणून शेती क्षेत्राचे भूमिका आणि महत्त्व अनन्यसाधारण आहे.

माहिती विश्लेषण




Source :- MoSPI's Annual & Quarterly estimate of GDP at constant price 2011 - 12

गेल्या सहा वर्षांत भारतीय कृषी क्षेत्र सरासरी वार्षिक ४.६ टक्के दराने वाढ होत आहे आहे. २०१४ - १५ हवामानातील बदल व दुष्काळ, शेती क्षेत्राच्या आदानांच्या किंमती, धोरणातील बदल, जमिनीचे विखंडन आणि निकृष्ठ दर्जा या कारणांमुळे वृद्धी दर -०.२ टक्के इतका कमी झालेला दिसून येतो. २०१८ - १९ मध्ये शेती क्षेत्राचा वृद्धी दर हा २.१ टक्के इतका होता. कारण असमतोल व्यवहारतोल. बाजार संतृप्त, शेती क्षेत्राकडे दुर्लक्ष आणि हवामान बदल यामुळे कारणांमुळे वृद्धी दर कमी झालेला दिसून येतो. २०१९ - २० मध्ये ५.५ टक्के इतकी वृद्धी झालेली दिसून येते. आणि २०२१ - २२ मध्ये ३.0 टक्के झालेला दिसून येतो याच महत्वाचं कारण बेस परिणाम आहे. भारताचा शेती क्षेत्राचा वृद्धी दर २०२० - २१ साली ३.३ टक्के इतका होता परंतु २०२१ - २२ तुलनेत हा वृद्धी दर ३.० टक्के इतका आहे म्हणजेच हा वृद्धीदर ०.३ टक्क्याने कमी झालेला दिसून येत आहे. अलिकडच्या वर्षांत, भारत कृषी उत्पादनांचा निव्वळ निर्यातदार म्हणूनही वेगाने उदयास आला आहे. २०२० - २१ मध्ये, भारतातून कृषी आणि संबंधित उत्पादनांची निर्यात मागील वर्षाच्या तुलनेत 18 टक्क्यांनी वाढली आहे. २०२१ - २२ दरम्यान, कृषी निर्यात US$ ५०.२ बिलियन च्या सर्वकालीन उच्चांकावर पोहोचली आहे. शेतकरी - उत्पादक यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना, कोविड - १९ काळात झालेले शहरी ते ग्रामीण स्थलांतर यामुळे शेती व्यवसायात गुंतलेली लोकसंख्या, पीक विविधतेला प्रोत्साहन, निधी उपलब्धता व कृषी क्षेत्रातील उत्पादकता सुधारण्यासाठी सरकारने केलेल्या उपाययोजनांमुळे उत्कृष्ठ कामगिरीचा हा कालावधी सांगता येईल.

**भारतीय शेती समोरील आव्हाने**

**१) जमीन धारण क्षेत्र :** दिवसें दिवस लोकसंख्येचे प्रमाण वाढत असल्यामुळे शेत जमिनीचे तुकडीकरण देखील होत आहे. त्यामुळे शेती क्षेत्रामध्ये आधुनिक यांत्रिकीकरणाचा वापर करणे अवघड जाते.

**२) खराब सिंचन सुविधा :** भारतातील केवळ 40% लागवडीखालील जमीन सिंचनाखाली आहे. आणि उर्वरित जमीन ही अनियमित पडणाऱ्या पावसाच्या आधारावर आहे. त्यामुळे शेती क्षेत्रामधील उत्पादकता कमी राहते.

**३) कमी उत्पादकता आणि कालबाह्य कृषी पद्धती :** भारतीय शेतीवर पारंपरिक पद्धतीचे वर्चस्व कायम आहे. परिणामी कमी उत्पादकता आणि जमिनीची सुपीकता कमी होत आहे.

**४) कीड आणि रोग व्यवस्थापन :** भारतासमोर कीड आणि रोग नियंत्रणात आव्हाने आहेत, ज्यामुळे पीक अपयशी आणि खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

**५) अपुरी साठवण, वाहतूक आणि विपणन सुविधा :** पीक काढणीनंतर खराब पायाभूत सुविधांमुळे अन्नधान्य आणि विपणन व्यवस्थेमुळे अन्नधान्य आणि नाशवंत वस्तूंचे लक्षणीय नुकसान होत आहे.

**६) हवामान बदल :** दुष्काळ आणि पूर यांसह हवामानातील बदलांचा भारतीय शेती क्षेत्रावर लक्षणीय परिणाम झाला आहे. ज्यामुळे उत्पादन घटले.

**आर्थिक विकासातील शेतीची भूमिका**

**१) अन्नधान्याचा पुरवठा :-** मानवी जीवनासाठी हवा व पाणी याबरोबरच अन्न हा मूलभूत घटक आहे. मानवास जीवंत राहण्यासाठी अन्नधान्य आवश्यक आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबर अन्नधान्याची गरज वाढत जाते वाढती अन्नधान्याची गरज पूर्ण करण्यासाठी शेती क्षेत्राचा विकास अपेक्षित आहे. अन्नधान्य उत्पादन कमी झाल्यास किंवा अपुरे पडल्यास त्याची आयात करावी लागते. अन्नधान्याची आयात वाढल्यास व्यवहारातील प्रतिकूल बनतो, अन्नधान्याच्या उपलब्धतेसाठी विदेशावर अवलंबून राहणे शाश्वत आर्थिक विकासास मारक ठरते. म्हणून वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी शेतीची आर्थिक विकासातील भूमिका महत्वाची आहे...

**२) राष्ट्रीय उत्पन्नातील योगदान :-** अनेक विकसीत देशाच्या आर्थिक इतिहासावरून असे दिसते की, शेतीची प्रगती हि देशाचा आर्थिक विकास गतिमान किंवा प्रवेगीत करते. सद्या औद्योगिकीकरणात अग्रेसर असणाऱ्या विकसीत राष्ट्राची अर्थ व्यवस्था एकेकाळी कृषी आधारीत होती. त्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे वर्चस्व होते. विकसीत राष्ट्रीय उत्पन्नात आजही कृषी क्षेत्राचा हिस्सा महत्वाचा आहे.

**३) कच्चा माल :-** विकसनशील देशात कृषी आधारीत उद्योगाच्या प्रगतीसाठी कच्चा मालाचा पुरवठा वाढविण्याकरीताशेतीची आधुनिकता आवश्यक आहे. कृषी मालाच्या पुरवठ्यातील कमतरता ही उद्योगाच्या उत्पादनावर विपरीत परिणाम करत. देशाच्या आर्थिक विकासात अडथळा येतो. शेतीतून उत्पादीत होणारा शेतमाल योग्य किंमतीत व दर्जेदार स्वरूपात कच्चा मालम्हणून उद्योगासाठी पुरविला गेल्यास औद्योगिक विकास होवून आर्थिक विकास होण्यास मदत होते. प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शेतीतील कच्च्या मालावर आधारीत असणारे अनेक

**४) रोजगार निर्मिती :-** विकसनशील देशात वाढत्या लोकसंख्येला काम पुरविणे शेती क्षेत्रामुळे शक्य झाले आहे. अतिरिक्त लोकसंख्या शेतीमध्ये सामावून घेतली जाते. आजही 50 % लोकसंख्या रोजगारासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शेती क्षेत्रावर अवलंबून आहे.

**५) पायाभूत सुविधांची निर्मिती :-** कृषी क्षेत्राच्या विकासासाठी रस्ते, बाजारपेठा, साठवणूक गृहे, रेल्वे वाहतूक, पोस्ट सेवा, पाणी विद्युत पुरवठा व इतर पायाभूत सुविधांची गरज असते. कृषी क्षेत्रासाठी लागणारी पायाभूत क्षेत्रातील सुविधा शेतीक्षेत्राचा विकासदर वाढवितात. त्याचबरोबर उद्योग व व्यापार क्षेत्राचा विकास होतो.

**६) विषमता कमी करण्यासाठी मदत :-** ज्या देशात शेती क्षेत्राचे वर्चस्व आहे, अतिरिक्त लोकसंख्या आहे अशा देशामध्ये ग्रामीण व शहरीभागात आर्थिक किंवा उत्पन्न विषमता प्रचंड प्रमाणात असते. अशा प्रकारची उत्पन्नाची विषमत कमी करण्यासाठी शेतीस उच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. शेती क्षेत्रातील उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण शेतीतील उत्पन्न वाढल्यास, संपन्नावस्था निर्माण झाल्यास ग्रामीण भागातील बहुसंख्य लोकांचे उत्पन्न वाढून आर्थिक किंवा उत्पन्न विषमता काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल.

**७) आर्थिक घसरणीतून अर्थव्यवस्था बाहेर येण्यासाठी :-** अर्थव्यवस्था आर्थिक घसरणीतून बाहेर पडण्यासाठी शेती क्षेत्राची भूमिका महत्वाची आहे. आर्थिक घसरणीच्या कालावधीत औद्योगिक उत्पादन मागणी घटीमुळे किंवा तोटा सहन करावा लागत असल्यामुळे बंद केले जाते. लोक औद्योगिक वस्तूंना मागणी करत नाहीत मात्र शेतीतून उत्पादीत होणारा शेतमाल जीवनावश्यक वस्तू असल्यामुळे त्याची मागणी नियमीत राहते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत प्रतिकूल

परिस्थिती असताना शेती क्षेत्रासाठी असणाऱ्या प्रभावी मागणीमुळे अर्थव्यवस्थाआर्थिक संकटातून किंवा घसरणीतून पुनरुज्जीवित होते. तसेच विदेशी चलनाचा स्रोत, भांडवल निर्मितीत योगदान, महत्तम ग्रामीण कल्याण, अंतर्गत व्यापार आणि वाहतूक आणि किंमत स्थैर्य या सर्व घटकामध्ये शेती क्षेत्राची भूमिका महत्त्वाचीआहे. म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राला अनन्यसाधारण महत्व आहे.

**शेतीची पुढची वाटचाल**

थोडक्यात, पारंपरिक पद्धतीने अनुदाने देऊन आणि हमीभावाचे धोरण राबवून शेतकऱ्याचे उत्पन्न टिकवून ठेवण्यासाठी संरक्षण मिळतेच. परंतु याशिवाय भविष्यातील प्रगतीसाठी शेतीमधील गुंतवणूकीचे प्रमाण वाढविणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी सुयोग्य आणि काळानुसार कायदे करून मूलभूत सुधारणा घडवून आणणे महत्त्वाचे आहे. शेतीसंबंधित खाजगी अथवा सरकारी संस्थांकडून शेतकऱ्याला उत्तम सेवा मिळणे आवश्यक आहे. तसेच या संस्थांद्वारे शेतकरी कुटुंबाला प्रशिक्षण आणि कौशल्यविकास याद्वारे उद्यमशील बनवणे, दर्जेदार शेतमालाचा पुरवठा होण्यासाठी प्रोत्साहन देणे, शेतमालासाठी जिथे देशांतर्गत आणि देशाबाहेर मागणी तिथे पुरवठा करण्यासाठी योग्य बाजार आणि बाजारभाव मिळवून देणे महत्त्वाचे आहे. शेतकऱ्याकडून अंतिम ग्राहकापर्यंत शेतमाल पोहोचण्यासाठी पुरवठासाखळी मजबूत करणे आणि मालाच्या किमतीमध्ये कसणाऱ्याचा हिस्सा वाढवण्यासाठी आणि दलालांचा कमी करण्यासाठी व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. दलालाची संख्या कमी करून प्रत्यक्ष विक्री करणे महत्वाचे आहे. जेणे करून शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती सुधारेल. शेतीमालाच्या बाजारासंबंधी शेतकऱ्यांना सर्वकष माहिती पुरवणे, माती परीक्षणापासून ते शेतकरी प्रशिक्षण आणि पिकाच्या विक्रीपर्यंत विविध बाबींसाठी नवीन तंत्रज्ञान आणि डिजिटल माध्यमांचा वापर करण्याची आणि या माध्यमांद्वारे जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याची गरज निर्माण झाली आहे. शेतमाल प्रक्रिया उद्योग आणि विविध प्रकारच्या शेती कंपन्यांना, स्टार्टअप्सना आणि लघु कंपन्यांना तसेच शेतीबाहेरील रोजगारनिर्मितीला पाठबळ देऊन त्याद्वारे शेतीवरील रोजगारनिर्मितीचा भार कमी करून अर्थव्यवस्थेचा हा कणा बळकट करणे पुढील वाटचालीसाठी श्रेयस्कर ठरेल.

त्यामुळे शेतमाल विपणनव्यवस्थेमध्ये बदल करण्याची निकड आज जाणवू लागली आहे. शेतमालाच्या विक्रीसाठी केवळ सरकारी संस्थांवर अवलंबून राहण्यापेक्षा कायद्याच्या चौकटीमध्ये खाजगी क्षेत्र शेतकऱ्यांना विक्रीसाठी खुले करून जिथे चांगला भाव मिळेल तिथे, देशांतर्गत आणि देशाबाहेरही, विक्री करण्याचे स्वातंत्र्य असणे आणि त्यासाठी शेतकऱ्यांना सक्षम बनवणे याची नितांत गरज निर्माण झाली आहे. कृषी क्षेत्रातील एक संभाव्य पुढची पायरी म्हणजे कार्यक्षमता आणि टिकाऊपणा सुधारण्यासाठी नवीन तंत्रज्ञान आणि नवकल्पना स्वीकारणे. यामध्ये अचूक कृषी तंत्रांचा वापर समाविष्ट असू शकतो. हवामान बदल, कीटक आणि रोगांना अधिक लवचिक असलेल्या नवीन पिकांच्या जाती विकसित करण्यासाठी संशोधन आणि विकासामध्ये गुंतवणूक वाढवणे ही आणखी एक महत्त्वाची पायरी असू शकते. हे अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यास आणि बदलत्या पर्यावरणीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उत्पादकता वाढविण्यात मदत करू शकते.

याशिवाय, मातीचे आरोग्य, जैवविविधता आणि दीर्घकालीन शाश्वतता याला प्राधान्य देणाऱ्या सेंद्रिय शेती, कृषी वनीकरण आणि पुनरुत्पादक शेती यासारख्या शाश्वत शेती पद्धतींमध्ये स्वारस्य वाढत आहे. शेतकऱ्यांना या पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देणे आणि त्यांना पाठिंबा देणे पर्यावरणावर आणि मानवी आरोग्यावर सकारात्मक परिणाम करू शकतात.

**सारांश** :- भारतासारख्या अल्पविकसित राष्ट्राचा विकास शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासातील शेतीची भूमिका ही अर्थव्यवस्थेला स्थैर्यादिष्टीत विकासास मदत करणारी असते. प्रत्येक राष्ट्राच्या प्रारंभीच्या आर्थिक प्रगती मध्ये शेतीचे क्षेत्राचे महत्व अनन्य साधारण असते. उदा. अमेरिका व जपानच्या आर्थिक विकासात त्या देशातील शेतीची क्षेत्राची भूमिका महत्व पूर्ण होती. भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार केला तर १९५१ साली

स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वाटा ५१.९ इतका होता आणि २०१२ - १३ साली शेती क्षेत्राचा स्थूल देशांतर्गत उत्पादनामधील वाटा १३.७ इतका कमी झालेला दिसून येतो. परंतु २०१४ - १५ साली स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वाटा धीम्या गतीने वाढत जाऊन १७.० टक्के इतका झाला आहे. शेती उत्पादन राष्ट्रीय विकासासाठी गरजेचे आहे .म्हणून शेती विकासाशिवाय औद्योगिक विकास अपूर्ण राहतो. त्यामुळे शेती क्षेत्रामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि प्रगती करणे अतिशय महत्त्वाचे आहे. कृषी आधारित अर्थव्यवस्थेचे रूपांतर उद्योगधारित अर्थव्यवस्थेत होण्यासाठी शेती बद्दलचा पारंपरिक दृष्टिकोन बदलवून आधुनिक दृष्टिकोनाचा स्वीकार होणे काळाची गरज आहे. याशिवाय, मातीचे आरोग्य, जैवविविधता आणि दीर्घकालीन शाश्वतता याला प्राधान्य देणाऱ्या सेंद्रिय शेती, कृषी वनीकरण आणि पुनरुत्पादक शेती यासारख्या शाश्वत शेती पद्धतींमध्ये स्वारस्य वाढत आहे. शेतकऱ्यांना या पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देणे आणि त्यांना पाठिंबा देणे पर्यावरणावर आणि मानवी आरोग्यावर सकारात्मक परिणाम करू शकतात. तसेच शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनात बदलही होणे अत्यावश्यक आहे.

**संदर्भ** :-

1. कृषी भूगोल - डॉ. विठ्ठल घारपुरे - २०१३ पिपळापुरे प्रकाशन नागपूर
2. औद्योगिक पर्यावरण - राजीव कुमार - २००९ अर्जुन पब्लिशिंग हाऊस नई दिल्ली.
3. Bhatia, B.M. (1983). A Study in India’s Food Policy. Published by Asian and Pacific Development Centre, Kuala Lumpur, Malaysia.
4. Moorty, T.V., Sharma, K.D. & Thakur, D.R. (1991). Trends in the Production of Pulses and Oilseeds in Himachal Pradesh. Agricultural Situation in India, Vol. 46, No. 5, 303-308.
5. Wagh, R. R. (2016). Agricultural Sector; Status, Challenge, & its Role in Indian Economy. Journal of Commerce and Management Thought, January 2016
6. Economic Survey 2021 – 2022
7. Department of Agriculture and cooperation, Agricultural Census Division, Ministry of agriculture

# जागतिकीकरण व पर्यावरणातील बदल

**प्रा. डॉ. संजय गंगाराम सुरेवाड**

सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख म. शि. प्र. मंडळाचे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि. बीड

जागतिकीकरण हा आजच्या काळाचा 'परवलीचा' शब्द झाला आहे. समकालीन राजकीय तत्वज्ञान, राजकीय आर्थिक संस्था व प्रक्रिया यांच्या स्वरूपात जागतिकरण घडून येत आहे. जलद वाहतूक साधनांमुळे जगातील अंतरे नष्ट झाली आहेत. एवढेच नव्हे तर अवकाशी संपुष्टात आला आहे, असे सांगितले जाते. जागतिकीकरण ही संकल्पना तशी नवी मुळीच नाही. फार प्राचीन काळापासून आम्ही, 'वसुदेव कुटुंब कम', 'हे विश्वचि माझे घर', यासारखी स्वप्ने पाहत आलो आहोत. राष्ट्रवादाचा विचार आंतरराष्ट्रवादाच्या संदर्भात विचारवंताची गुरुदेव रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी अशी ठळक नावे कोणालाही सहज सांगता येतील. जगभराच्या कामगारांना एक होण्याची आव्हान करणाऱ्या काल ँ माक्स ँ ही जागतिकरणाची संकल्पना अभिप्रत होती. राष्ट्रा- राष्ट्रातील आर्थिक संबंध पूर्वपार चालत आली असून व्यापाराने जगभर आपल्या मालासाठी नव्या बाजारपेठा शोधणेही काही नवीन नाही. आज जागतिकरांच्या संदर्भात बोलताना जुन्या काळाच्या सज्ञा वापरल्या जात असतात. आजच्या जागतिकीकरणाचे स्वरूप केवळ निराळे नाही तर गती प्रमाण आणि व्याप्ती ही पूर्वीच्या त्या सर्व संकल्पित पेक्षा कितीतरी जास्त आहे.जागतिकीकरण आणि पर्यावरणातील बदल यांच्यातील सहसंबंध स्पष्ट करणे हा प्रस्तुत शोधनिबंधाचा हेतू आहे.

जागतिकीकरण या शब्दापासून आपल्याला या चर्चेचा प्रारंभ करता येईल. जागतिकरणाचे समर्थक असे म्हणतात की, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील क्रांतिकारक बदलामुळे संपूर्ण भूमंडळाचे एकात्मिकरण साध्य झाले. वैषिक व विश्वात्मक होण्याचा तो मार्ग असून समस्त मानव जातीचे हित कल्याण प्रेम, स्वातंत्र, करुणा व मानवता या उदात्त भावनावर त्याची भिस्त आहे. जागतिकरणी सज्ञा दिशाभूल करणारी आहे. तंत्रज्ञानात्मक क्रांती व प्रगती यातून कडून आलेली आर्थिक एकात्मता हा जागतिकरणाचा कारक नसून नवसम्राज्यशाही राज्यात राजसत्ताच्या सोयीवर लावल्या जाणाऱ्या वस्तूस्थितीच्या राजकीय अनुवारतातून जागतिकीकरण संकल्पना निष्पन्न झाली आहे. एक ध्रुवीय जगातील एकमेव द्वितीय सत्ता झाला होता असा उत्तम आकार अहंकार अमितला वाटणे ही राजकीय परिस्थिती आहे त्या संकल्पना साकार करण्यास कारणीभूत ठरली आहे.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या अवलंबामुळे उत्पादन प्रक्रियापूर्वी कधीच नव्हती एवढी चकाचक संगणक नियंत्रित, शिस्तबद्ध, स्वच्छ, निरंतर कार्यक्षम, व कमी कष्टाची झाली आहे. गर्दी, गोंगाट, उष्णता, दुर्गंधी, घाण सुरक्षितता, यंत्राचे कर्कश, आवाज आणि कांढळ बसणारे सायरन हे सारे आता इतिहास समाज झाले असल्यामुळे श्रमिकाच्या दृष्टीनेही उत्पादन व्यवस्था आदर्श सुखद तर झालीच आहे. शिवाय उद्योगाची, उद्योजकाच्या उत्पादनात कल्पनाताई वाढी तिच्या द्वारे साध्य झाली आहे. एका बाजूला भव्यमाल, चार पदरी दुर्गती रस्ते, आणि उडाणपूल उभे राहत असतानाच, दुसऱ्या बाजूला कंगाल होणारी पिण्याच्या पाण्यालाही मोताज असलेली खेडी, एका स्पष्ट आणि दुसरीकडे ओसर पडलेली प्राथमिक आरोग्य केंद्र, एकीकडे आंतरराष्ट्रीय विद्यालयाची प्रगती तर दुसरीकडे खंगत चाललेल्या सरकारी प्राथमिक शाळा, अशा कितीतरी उदाहरणांनी आजच्या विकासाचे अंतरविरोधी वास्तव उघड करून जाईल, याचा अर्थ असा आहे की, असे विकासाची कल्पनाचित्र एकीकडे दाखवले जाते.

आजचा काळ हा जागतिकीकरणाचा आहे. आपले जीवन आपले भाव विश्व आणि समाज जागतिकीकरणाच्या साध्येत बद्ध झालेला आहे. जग सर्वार्थाने जवळ आलेले आहे. माहितीचा, भौतिक सुख समृद्धीचा, सुविधाचा उगम, आपल्या जगण्यात येऊन मिळालेला आहे. एकेकाळी मध्यमवर्ग म्हणून विनवला गेलेला वर्गाचा आर्थिक सामाजिक स्तर अपुसकच उंचावला गेला आहे. सद्यस्थितीत मध्यमवर्गीय आणि उच्चभूमी यांच्यातील सीमारेषा बऱ्यापैकी पुसट झाली

आहे. नित्य निर्मिती गरजाच्या संदर्भात हा मध्यमवर्ग आणि उच्चभूवर्ग एका पातळीवर येऊ पाहतो आहे. एकीकडे जागतिकीकरण होत असताना भारतीय समाज व्यवस्थेत अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्या अनुषंगाने जागतीकरण ही संकल्पना समजून घेणे महत्त्वाचे आहे. खाजगीकरण उदारीकरण आणि जागतिकरण या त्रिमितीत ही नवी व्यवस्था स्थिर झालेली आहे. या त्रिमितीतील खाजगीकरण आणि उदारीकरण या दोन सज्ञा विशेषत्वाने आर्थिक घडामोडीशी अर्थव्यवस्थेची सलगणीत आहेत. पण जागतिकरणाची संज्ञा आणि आर्थिक स्तरावरच धार्मिक सामाजिक सांस्कृतिक आणि वांग्मय अशा विविध क्षेत्रांना बाधित करणारी त्या क्षेत्रातील मूल्यवस्था उलटून टाकणारी अशी शक्तीमान समर्थशाली संज्ञा आहे. वास्तविक पाहता जागतिकरणाचे वारे खाजगीकरणाचे आणि उदारीकरणाची बोट धरून इथल्या समाज व्यवस्थेत प्रवेश झाली आहे. ही तेवढेच महत्त्वाची दुसऱ्या अर्थाने असेही म्हणता येईल की खाजगीकरणाची ही उदारीकरण्याची परिमिती म्हणून जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू होत आहे. या विळख्यामुळे दुष्टपतीस येणारे गंभीर दुरगामी परिणाम पाहून अनेक संशोधकांनी विचारवंतांनी जागतिकरणाला जाहीरपणे विरोध दर्शविला त्याच्या निषेध केला आहे.

पर्यावरण हा शब्द मराठीत 'परिधन' म्हणजे आवरण यालाच पर्यावरण असे म्हटले जाते. या पर्यावरणात सभोवतालची परिस्थिती पर्यावरणामध्ये जैविक, अजैविक, सजीव निजिव घटकाचा समावेश होतो. यात हवामान, पाणी, वनस्पती, पर्वत प्राणी, इमारत, इमारतीतील रस्ते, इत्यादी समावेश होतो. पर्यावरण निसर्गाची फार मोठी देणगी आहे. पर्यावरण संकल्पना भू व्यापक सर्व समावेशक असल्याने असे म्हणता येईल की, सजीवांची निर्मिती वाढ व नाश या क्रिया साठी सभोवतालच्या सजीव व निर्जीव घटकाची गरज असते. या सर्व घटकाचे एकत्र, स्थितीला पर्यावरण असे म्हणतात. सभवतालची परिस्थिती अनेक घटकांपासून बनलेली असते व हे सर्व घडत असते एकमेकावर परिणाम करत असतात. अनैसर्गिक पर्यावरणात मानवी तर प्राणी, वनस्पती व सूक्ष्मजीव त्यांच्या सभोवताली असणाऱ्या पर्यावरणात नजरेपणे जिवंत नसेल तत्व चक्र प्रणाली यांच्यात बाधा न आणता इतर सजीवांच्या जीवनक्रम आणि काळापासून सतत त्यांनी चालू आहे. नैसर्गिकरणाने पर्यावरणात होणारे बदल सोडले तर इतर सजीवांच्या पर्यावरणात बदल घडवून आणण्यात कोणती सहभाग नाही. मानव तर सजीव नैसर्गिक तत्वांना अनुसरून निसर्गाच्या कोटीत जीवन करून पूर्ण करतात. नैसर्गिक पर्यावरणात बदल घडवून आणण्या इतपत इतर सजिवाची क्षमता असल्यामुळे, निसर्गाचा एक घटक म्हणून ते जीवनक्रम पूर्ण करतात. याउलट मानव मात्र असे पर्यावरणात आहे या स्थितीत न राहता सुख, सुविधा, विकास, उपयोगांच्या नावाखाली सातत्याने सभोवतालच्या परिस्थितीत आलेला आहे. शेती, तंत्र, मानवी संस्कृतीचा उत्पादनाला सुरुवात झाली. तेथून पर्यावरणातील संपदाच्या वापराला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. नंतर मानवी समाजात विकासात संशोधने, औद्योगिकक्रांती, आधुनिककरण, नागरीकरण, स्थलांतरितकरण, तंत्रज्ञान, क्रांती, जागतिकरण, असे विविध टप्पे बघायला मिळतात. या सर्वांच्या पर्यावरणाचा एकूणच स्वरूपावर विघातक दुष्परिणाम झाला आहे.

पर्यावरण म्हणजे काय? विज्ञानाच्या भाषेत पाहिले तर पर्यावरण वनस्पती व प्राणी ज्या परिसरात जंगलात वाढतात. तेथील जमीन, पाणी इतर सजीव पर्जन्यमान व उंची व तापमान इत्यादी सर्वांचा समावेश होतो. या सर्व सजीवांच्या नैसर्गिक परिसरास पर्यावरण असे म्हणतात. मानवी विकास सर्वस्वी पर्यावरणावर म्हणजे निसर्गावर अवलंबून असल्याने मानवाचा पर्यावरणात हस्तक्षेप होणे साहजिकच आहे. पर्यावरणाचा समतोल होवू नये म्हणून मानवाची विकास प्रक्रिया थांबवता येणार नाही. म्हणूनच मानवी विकासाच्या योजनाकारमित करण्यात त्यांना मानवाची सजीवाची अस्तित्व पर्यावरणाच्या संतुलनावर आधारित आहे विसरून चालणार नाही. जसा पर्यावरणाचा मानववार परिणाम होतो. तसाच मानवाचाही पर्यावरणावर परिणाम घडतो मानवाला जसे स्वतः ठेवण्यासाठी अधिकार आहे. तसेच अधिकार इतर सजीवांनी आहे. परंतु मानवाच्या स्वार्थी अतिरेकी या व उपयोगी प्रवृत्तीमुळे पर्यावरणात रास वेगाने होत आहे.

18 व्या शतकाच्या मध्यास झालेल्या औद्योगिक क्रांतीने नवीन तंत्रज्ञांच्या बरोबर अवजड यंत्रसामग्री निर्माण करून पारंपारिक समाजात अमुलाग्र बदल घडवून आणला. या नव्या उत्पादन व्यवस्थित प्रक्रियेस सुरुवात विकास व वाढ ज्या ठिकाणी जवळ वाहतूक साधने, सहज उपलब्ध होतील, बाजारपेठा होत्या किंवा बाजारपेठापर्यंत पोहोचणे शक्य होते. अशा ठिकाणी रेल्वे मार्गाजवळ व सडक मार्गाजवळ येथे शक्य होते, अशा ठिकाणी झाला. 21 व्या शतकाच्या मध्यात भारतात औद्योगीकरण प्रगतीने क्रांतीने हळूहळू वेग घ्यायला सुरुवात केली. या काळात लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढत गेली. वाढत्या लोकसंख्येच्या अन्नदानाच्या निवाराच्या गरजा पूर्ण होणार होत्या. त्याच्या परिणाम जमिनीच्या विघटनामुळे गरिबीच्या खायात लोटल्या गेलेली उपनगरी, उपासमारीने गाजलेली ग्रामीण भागातील जनता पोट भरण्यासाठी शहराकडे धाव घेत आहे.

आज भारतात मुंबई, कोलकत्ता, चेन्नई, कोचीन, दिल्ली, इत्यादी शहरी आधुनिक शहरी म्हणून ओळखले जातात. तसेच बकालपणासाठी ओळखले जातात. औद्योगीकरण व शहरीकरणातूनच जलप्रदूषण प्रदूषणाची समस्या ही उग्र स्वरूप धारण करू लागली आहे. भारतात अनेक प्रमुख अतिशय रोग आहेत आपली बहुतेक रोग हे पिण्याच्या पाण्यापासून होतात. कारखान्यातील पारा, सोडियम तांबे, शिष्य, यामुळे मानवाच्या शरीराने अडथळा प्राप्त होतो. त्यामुळे निराळी रोग निर्माण होतात. पृष्ठभागावरील दूषित पाणी जमिनीच्या अंतर्गत भागात भिजवली गेल्यामुळे भूमिगत पाणीदेखील निश्चित होण्याचा धोका होतो. पाणी दूषित होण्याने पाण्याचा रंग बदलते व ते पाणी पिण्यासाठी किंवा शेतीसाठी धोकादाय बनतील. लोकसंख्येच्या भस्मासुरांमुळे या प्रश्नाप्रमाणे उत्पन्न होणाऱ्या कचऱ्यामुळे साधन समस्येवर यंत्रणावर ताण पडतो, मुख्यतः करून शहरी प्रदूषणाला वाहतुकीमुळे गंभीर परिणाम आज मोठ्या प्रमाणात जाणू लागले आहेत. मोठ्या आवाजामुळे शरीरातील सहंचलित मज्जासंस्थेला धोका होतो. निसर्ग पर्यावरण यांचा संरक्षण, नैसर्गिक संपत्तीच्या जास्तीत जास्त रक्षण करणे, निसर्गाच्या पर्यावरणाचा ऱ्हास करणे, गैरवापर अतिवापर, या मानवी प्रवृत्तींना नियंत्रित करून निसर्ग पर्यावरण वाचविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.जमीन, हवा, पाणी, मुद्रा, वनस्पती, खनिजे, व पाणी या निसर्गातील संपादकाचे संवर्धन करणे किती गरजेचे असल्याने समाजाला जागृत करणे समस्येची ओळख करून देईल करून त्याचे पर्यावरण संरक्षण ही जागृतीची पहिली गरज आहे पण त्यानंतर सुरक्षणाबरोबर संपादकाची वाढ कशी करता येईल. याची यासाठी संवर्धन तत्वाला जास्त महत्त्व आहे. पर्यावरणातील संपत्तीचा वापर करण्याचा एवढा अधिकार सध्याच्या पिढी आहे, थोडासा तेवढाच येणाऱ्या भावी पिढीस देखील आहे. मानवाबरोबर इतर सजीव, जैविक, समाज प्राणी, वनस्पती याचे अस्तित्व महत्त्वाचे मानले. मानवाने संपदा विषयक ज्ञान, कौशल्य जोपर्यंत होते तोपर्यंत निसर्गचकरी आपल्या क्रमाने व्यवस्थित सुरळीतपणे चालू होती. नैसर्गिक कारणांनी पर्यावरणात काही बदल घडले. तसेच निसर्गाची निसर्गाच बिघडली संतुलन सावरून घेण्यास सक्षम ठरत असेल

औद्योगिक क्रांतीला सुरुवात झाली व जागतिक औद्योगिक क्रांतीसाठी पोषक असे करणारे कारखाने वाढले त्यासाठी जंगलतोड करावी लागली. औद्योगिक क्रांती घडल्यानंतर फार प्राचीन काळी गाडल्या गेलेल्या जंगलाचा मानवाने इंधन म्हणून मोठ्या प्रमाणावर वापर सुरू केला. त्यासाठी जमिनीची उत्खन सुरू झाले कुठलाही कार्बन पदार्थ जाळावी. त्यातून कार्बनॉक्साईड चे विर्सजन होते. त्याचप्रमाणे लाकूड, पेट्रोल, डिझेल, आणि दगडी कोळसा जाळल्या नंतर वातावरणात कार्बनॉक्साईड पण वाढू लागली वाढती. पृथ्वीवर लोकसंख्या वाढत चालली आहे. त्यामुळे जाण्यासाठी जागा, शेती करण्यासाठी जंगल कमी केल्या जाऊ लागली आहे. जंगतोडीमुळे हवामान बदलून येत आहे.

पर्यावरणाच्या बदलाच्या स्वरूपात मानवाचा फार मोठा वाटा आहे. कारण माणसाच्या बदलत्या राहणीमानामुळे निसर्गाच्या कडे बदलत आहे. त्यामुळे संपूर्ण जगात पर्यावरणाच्या बाबतीत अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. मानव हा समाज प्रयोग समाजप्रिय प्राणी असल्यामुळे मानवाने अश्मयुगापासून ते शेतीच्या शोधापर्यंत विकास केला. शेतीमुळे मानव हा वसाहत करून लावू लागला. यात काही प्रदेशात जास्त असून त्यात काय प्रदेशात कमी जास्त असलेल्या वसाहती निर्माण. देश निर्माण झाले. देशात ग्रामीण वसाहती निर्माण झाल्या. लोकसंख्या वाढल्यामुळे शहरांमध्ये

पर्यावरणाच्या बाबतीत अनेक समस्या निर्माण झाल्या. प्रदूषण, गोगाट, शहरीकरण, प्राणी, प्रश्न, वाहतूक, यावरून लोकसंख्या मानव निर्मित पर्यावरण दिसून येते. औद्योगिक क्रांतीमुळे रस्ते जलमार्ग वाहून वायू मार्ग साधने वाढले परंतु रस्ते वाहतूक साधनाचा उपयोग झाल्यामुळे पर्यावरण बिघडले पर्यावरण चांगले ठेवायचे आहे तर आपल्या आपल्याला लोकसंख्या नियंत्रित ठेवावी लागेल. कारण लोकसंख्या वाढीमुळे अन्य धान्य, पाणी, आरोग्य, राहण्याची, घर, शिक्षण, इत्यादी समस्या वाढत आहेत. अन्नधान्य वाढीमुळे मोठ्या प्रमाणात खत, औषधाचा वापर, आरोग्य समस्या वाढली आहेत. अतिपाण्याच्या वापरामुळे भूजल पातळी खोल गेली आहे. सामान्य माणसासाठी मात्र त्यातून अनेक गंभीर सामाजिक आर्थिक आणि पर्यावरण विषय समस्या निर्माण झाले आहेत

**संशोधनाची उद्दिष्टे**

1.जागतिकीकरणा व पर्यावरणाचा अर्थ अभ्यासणे.

2.जागतिकीकरणाचा पर्यावरणावर काय परिणाम झाला याचा अभ्यास करणे.

3.पर्यावरण समस्येचा अभ्यास करणे.

4.पर्यावरण समस्येचा प्रतिबंधात्मक उपाययोजनाचा आढावा घेणे.

5.पर्यावरणीय समस्येच्या प्रतिबंधात्मक उपाय योजनेचा आढावा घेणे.

**संशोधन प्रणाली**

प्रस्तुत शोध निबंध हा संपूर्णपणे दुय्यम तथ्यावर आधारित आहे. दुय्यम तथ्य संकलनासाठी विविध ग्रंथ, मासिके, नियतकालिके, पेपर, शोधनिबंध, इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

पर्यावरण समस्या म्हणजे काय? समस्येचे प्रकार व परिणाम भारतात पर्यावरणाच्या भारतात पर्यावरणाच्या अनेक समस्या आहेत. प्रदूषण ही सर्वात मोठी समस्या पर्यावरणाची आहे. प्रदूषण म्हणजे पर्यावरणात अनेक प्रकारचे घटक निर्माण होणे. प्रदूषणाचे प्रकार, वायू प्रदूषण, जल प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, जमीन प्रदूषण,आहेत.

**1.प्रदूषण**

भारतातील शहरे, वाहने आणि उद्योगाच्या उत्सर्जनामुळे प्रदूषित झालेली आहेत. रस्त्यावरील वाहनामुळे निर्माण होणारी प्रदूषण आहे. लाखो डिझेल, इंजन, पेट्रोल, जाऊन हवेत एलपीजी, गॅस, दूर हवेत जावुन शरिर कमकुवत करत आहेत. मानवी जीवनात शोषणाचे व फुफुसाचे आजार वाढीचे प्रमाण वाढले आहे.

**2.जलप्रदूषण**

पर्यावरण समस्येतील प्रमुख जलप्रदूषण 319 शहरे आणि त्या शहरांपैकी 209 शहरांमध्ये फक्त आठ शहरांमध्ये संपूर्ण सांडपाणी प्रक्रिया सुविधा आहे. जागतिक आरोग्य संघटना म्हणते, शहरांमध्ये अंत्यसंस्कारानंतर प्रक्रिया न केलेले सांडपाणी आणि अर्धे जाळली मृतदेह थेट गंगा नदीत टाकली जातात. ग्राउंड स्टीम प्रक्रिया न केलेले पाणी पिण्यासाठी, अंघोळीसाठी आणि कपडे धुण्यासाठी वापरले जाते. ही परिस्थिती भारतात आहे. तसेच उघड्यावर शोच्यास जाणे हे सामान्य आहे. भारतातील प्रमुख नद्यांमध्ये गंगा, यमुना, नर्मदा, उपनद्या आणि इतर जलस्त्रोतांमध्ये प्रदूषणाचे प्रमाण वाढत आहे. योजना स्वच्छता मोहीम 2008 मध्ये केलेल्या संयुक्त अभ्यासातून असे दिसून येते की, सांडपाण्याच्या या आधिकरणाच्या नाल्याच्या आसपास जिल्ह्यातील भूगर्भातील पाणी आणि नळाच्या पाण्यात कॅल्शियम, मॅग्नेशियम, क्लोराइड आणि लोह आहे. मुंबई शहरातून वाहणारी मोठी नदी ही प्रदूषित आहे.

**3.ध्वनी प्रदूषण**

ध्वनी प्रदूषण बाबत सर्वोच्च न्यायालयाने महत्वपूर्ण निकाल दिला आहे. वाहणाच्या हॉनंमुळे लाऊड स्पीकर मुळे, डि. जे मुळे, मशीनची आवाजाची डिसिबल पातळी वाढत आहे. याचे दुष्परिणाम म्हणून पर्यावरणीय समस्या निर्माण होत आहे.

**4.जमीन प्रदूषण**

भारतातील जमीन प्रदूषण कीटकनाशके, आणि खते, तसेच धूप यामुळे विषबाधाचे प्रकार थर्मल पावर प्लांट्स द्वारे तयार केलेली राख, आढळून येतात. लोकसंख्या वाढ आणि पर्यावरणीय मानव निर्मित समस्या व मॉल्सचा या ब्रिटिश विचारांच्या मते, वाढत्या लोकसंख्येमुळे शेतजमिनी दबावात येत आहेत. ज्यामुळे ऱ्हास, दुष्काळ, रोग, मृत्यू, दूषित हवा, दूषित पाणी, आणि घनकचरा वाढत आहे. त्या वातावरणात प्रदूषण मुक्तता करण्यासाठी उपाययोजना करून प्रदूषण मोठ्या प्रमाणात कमी करता येऊ शकते. प्रदूषण रोखण्यासाठी सर्व देशांना एकत्र येऊन काही उपाय योजना आखल्या आहेत.

**निष्कर्ष**

निरोगी राहण्यासाठी पर्यावरण स्वच्छ ठेवणे महत्त्वाचे आहे. अनेक रोग ज्यामुळे घाणेरडे वातावरण जंतू असतात जसे की, जंतसंसर्ग होतात. याचा अर्थ असा होतो की चांगला पर्यावरण स्वच्छ ठेवल्याने ठेवले आणि निरोगी वातावरण राखून पर्यावरण पृथ्वीवरील जीवसृष्टीला आधार देण्यासाठी पर्यावरणातून भूमिका बजावते. परंतु अशा काही समस्या आहेत. ज्यामुळे जीवनाचे आणि पृथ्वीच्या परिसंस्थेचे नुकसान होत आहे.

**संदर्भसूची**

1.डॉ. साधना मित्तल, “पर्यावरण स्वच्छता एवंम संरक्षण”, निरुपमा प्रकाशन

2.आगलावे प्रदीप (2010) “सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्रीय व तंत्रे”, प्रकाशक श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

3.आगलावे प्रदीप (2015) “समाजशास्त्र एमपीएससी नेट सेट”, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर

4.माही सुनील (2008), “सामाजिक संशोधन पद्धती”, डायमंड पब्लिकेशन पुणे

5.भरडिया अशा, “पर्यावरण शिक्षण”, अरुणा प्रकाशन लातूर

6.डॉ. जयकुमार मगर, “पर्यावरण शास्त्र परिचय”, विद्या प्रकाशन नागपूर

7.डॉ. दिलीप सखाराम बिरुटे, “जागतिकरण आणि मराठी साहित्यिक चिंतन”, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद

# भूविज्ञान

**श्री. कैलास गोविंदा वाघ**
(सहशिक्षक)
जि.प.शाळा खलाणे, ता. शिंदखेडा जि. धुळे

**व्याख्या :–** भूविज्ञान :

भूविज्ञान म्हणजे आपण जिच्यावर राहतो त्या पृथ्वी या ग्रहाची माहिती मिळविण्याचे शास्त्र.

**भूविज्ञानाचे मुख्य कार्य**

पृथ्वी कोणत्या पदार्थाची बनलेली आहे, ते पदार्थ कसे उत्पन्न झाले, महासागर, खंडे, पर्वत, नद्या इ. आज दृष्टीस पडणारी जी भौगोलिक स्वरूपे आहेत ती अक्षय आहेत का, त्यांच्यात फेरबदल होत आहेत आणि ती केव्हा व कशी निर्माण झाली? पृथ्वीवर आज असणारे जे जीव, प्राणी व वनस्पती आहेत ते पृथ्वीवर केव्हा अवतरले? गतकाली पृथ्वीवर आजच्यासारखेच जीव होते का वेगळ्या प्रकारचे जीव होते? पृथ्वी कशी निर्माण झाली? अशांसारख्या प्रश्नांची उत्तरे मिळविणे हे भूविज्ञानाचे मुख्य कार्य आहे. एकूण पृथ्वीची म्हणजे तिच्या सर्व भागांची माहिती मिळविणे हा भूविज्ञानाचा हेतू असला, तरी पृथ्वीच्या प्रचंड राशीपुढे मनुष्याचे सामर्थ्य व त्याची उपकरणे अगदीच तोकडी पडतात व पृथ्वीच्या अगदीच अल्प अशा भागाचे परीक्षण करणे त्याला शक्य होते. ज्याचे परीक्षण प्रत्यक्ष करता येईल किंवा परीक्षणासाठी ज्याचे नमुने मिळविता येतील असा पृथ्वीचा धन झालेला बाहेरील भाग म्हणजे भूपृष्ठाजवळचा, काही थोडे किलोमीटर जाडीचा खडकाळ भाग हा होय. या भागाला पृथ्वीचे कवच किंवा शिलावरण अशी नावे देतात. एकूण पृथ्वीच्या एवढ्याच भागाची विश्वसनीय व सविस्तर माहिती मिळविणे शक्य झालेले आहे म्हणून भूविज्ञान या संज्ञेचा एकूण पृथ्वीचे विज्ञान असा अर्थ होत असला, तरी आधुनिक शास्त्रीय व्यवहारात भूविज्ञान म्हणजे पृथ्वीच्या कवचासंबंधीचे विज्ञान असा मर्यादित अर्थ घेऊन ही संज्ञा वापरली जाते. तथापि पृथ्वीच्या खोल भागात होणाऱ्या प्रक्रियांचे परिणाम पुष्कळ खडकांवर झालेले आढळतात व त्यांवरून संपूर्ण पृथ्वीचा अप्रत्यक्ष अभ्यासही यात केला जातो. तसेच कवच, जलावरण व वातावरण यांच्यावर होणारे जीवावरणाचे विविध प्रकारचे सजीव ज्यात आढळतात. अशा पृथ्वीभोवतालच्या आवरणाचे ⟶ जीवावरण, परिणाम, तसेच अवकाशात जाणाऱ्या व अवकाशातून येणाऱ्या ऊर्जेचे या सर्वांवर होणारे परिणाम हे विषयही भूविज्ञानाच्या कक्षेत येतात. पृथ्वीच्या कवचाचे परीक्षण व अन्वेषण (संशोधन) करून अतिप्राचिन काळापासून तो मानवी इतिहासकालाच्या सुरूवातीपर्यंतचा कवचाचा इतिहास जुळविणे, हे भूविज्ञानाचे मुख्य कार्य आहे

**भूविज्ञान घटक**

1. कवचाचे घटक पदार्थ, त्यांची रचना व उत्पत्ती,
2. पृथ्वीच्या कवचात (संघटन व रचना यांत) घडलेले व घडणारे फेरफार व ते घडवून आणणाऱ्या प्रक्रिया,
3. काही खडकांत जे जीवाश्म म्हणजे गतकालीन जीवांचे शिळारूप झालेले अवशेष असतात त्यांचे परीक्षण करून पूर्वीच्या निरनिराळ्या कालखंडात पृथ्वीवर कोणते जीव राहत व त्यांचे परस्परांशी व आजच्या जीवांशी कोणते संबंध आहेत यांविषयी माहिती मिळविणे आणि
4. पृथ्वीच्या निरनिराळ्या कालखंडात कवचाची स्वरूपे कशी होती व त्यांच्यात फेरफार होत जाऊन पृथ्वीच्या कवचाला आजचे स्वरूप कसे प्राप्त झाले म्हणजे आजची भौगोलिक स्वरूपे कशी निर्माण झाली यांविषयी तपास करणे.

**विश्लेषण**

महासागरांच्या द्रोणी, पर्वत वगैरेंची उत्पत्ती, उत्क्रांती यांच्या अभ्यासात निर्माण होणाऱ्या निसर्गविषयक समस्यांची उत्तरे शोधणे हा भूवैज्ञानिक अभ्यासाचा महत्त्वाचा भाग आहेच शिवाय प्रत्यक्ष व्यवहारातही (उदा., उद्योगधंदे, प्रयोग इ.) भूविज्ञान उपयुक्त ठरते. लोखंड, तांबे, शिसे, सोने इ. उपयुक्त धातूंची धातुके (कच्च्या रूपातील धातू) व इतर खनिज पदार्थ (उदा., अभ्रक, ग्रॅफाइट इ.), खनिज इंधने

(दगडी कोळसा, खनिज तेल इ.), भूमिजल वगैरे शोधण्यासाठी भूवैज्ञानिक माहितीचा उपयोग होतो. जमिनीचा वापर करण्याच्या दृष्टीने अभियांत्रिकीय भूविज्ञानाची मदत होते. उदा., मोठ्या इमारती, धरणे, पूल, रस्ते, बोगदे, अणुभट्ट्या इ. बांधकामांच्या जागा ठरविताना तिचे भूवैज्ञानिक अध्ययन होणे आवश्यक असते. यामध्ये जमीन व खडक बांधकामाला आधार देण्याइतपत मजबूत आहेत की नाहीत, भूमिपाताची शक्यता किती आहे, भूकंपामुळे उद्भवणारे धोके टाळता येतील का वगैरे प्रश्नांचा विचार केला जातो. काही नैसर्गिक आपत्तींची (उदा., ज्वालामुखी, भूकंप इ.) पूर्वसूचना देण्यासही भूवैज्ञानिक अभ्यासाचा उपयोग होणे शक्य आहे.

**प्रमुख शाखा :**

पूर्वी भूविज्ञानाचे प्राकृतिक व इतिहासात्मक असे दोन प्रमुख विभाग करण्यात येत असत. आता या विभागांचे अनेक उपविभाग करण्यात येतात व या प्रत्येक उपविभागाची स्वतंत्र विज्ञान शाखा बनली आहे. यांपैकी एकमेकांत सरमिसळ होत असल्याने त्यांच्यातील काटेकोर सीमारेषा ठरविणे अवघड आहे. शिवाय काही शाखांचा इतर विज्ञानांशीही संबंध येतो.

**भूविज्ञानाच्या काही शाखा पुढीलप्रमाणे आहेतः**

१) प्राकृतिक भूविज्ञान : पृथ्वीचे संघटन व त्यांत होणारे भौतिक बदल यांचा अभ्यास
२) इतिहासात्मक भूविज्ञान : विशेषतः स्तरित (थर असणारे) खडक व त्यांच्यातील कालसापेक्ष संबंध आणि जीवाश्म व त्यांचे खडकांच्या मालिकेतील स्थान यांविषयीचा अभ्यास
३) पुराजीव विज्ञान : गतकालीन जीव व त्यांची कालानुसार झालेली वाटणी यांचा जीवाश्मांच्या सहाय्याने होणारा अभ्यास
४) अवसादविज्ञान : गाळांचे खडकांचे वर्णन,वर्गीकरण व उत्पत्ती या दृष्टींने करण्यात येणारा अभ्यास
५) भूमिरूपविज्ञान : पृथ्वीवरील भूमिरूपे व भूपृष्ठावरील प्रक्रिया यांचा अभ्यास
६) स्तरविज्ञान : विशेषतः स्तरित गाळाच्या खडकांचा पद्धतशीर अभ्यास
७) भूभौतिकी : पृथ्वी व तिचे पर्यावरण यांचा भौतिकीय दृष्टीने होणारा अभ्यास
८) भूगणित : पृथ्वीचा आकार आणि आकारमान यांचा अभ्यास
९) भूरसायनशास्त्र : पृथ्वीच्या (विशेषतः तिच्या कवचाच्या) रासायनिक संघटनाचा व तिच्यात होणाऱ्या रासायनिक फेरफारांचा अभ्यास
१०) खनिजविज्ञान : खनिजांचा अभ्यास
११) स्फटिकविज्ञान : स्फटिकांचे भूमितीय वर्णन व त्यांच्या अंतर्गत रचनेचा अभ्यास
१२) शिलाविज्ञान : खडकांची (विशेषतः अग्निज व रूपांतरित) उत्पत्ती, आढळ, रचना व इतिहास यांचा अभ्यास
१३) संरचनात्मक भूविज्ञान : खडकांचा आकार, मांडणी, अंतर्गत रचना व विरूपण यांचा अभ्यास
१४) पुराभूगोल : प्राचीन काळातील जमिनीची वाटणी, सीमा यांचा अभ्यास
१५) पुरापरिस्थितिविज्ञान : प्राचीन वनस्पती व प्राणी समुदाय आणि त्यांचे अधिवास यांचा अभ्यास
१६) पुराजलवायुविज्ञान : पूर्वीच्या भूवैज्ञानिक काळातील दीर्घकालीन सरासरी हवामानाचा म्हणजे जलवायुमानाचा अभ्यास
१७) अभियांत्रिकीय भूविज्ञान : विशेषतः बांधकामात येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी भूवैज्ञानिक माहितीचा उपयोग करणारे विज्ञान
१८) आर्थिक भूविज्ञान : मानवाच्या आर्थिक फायद्यासाठी भूवैज्ञानिक माहितीचा उपयोग करणे
१९) सागरी भूविज्ञान : महासागरांचे तळ व सीमा यांचा अभ्यास
२०) भूमिजलविज्ञान : भूमिजलाचा अभ्यास
२१) कृषि–भूविज्ञान : मृदांचे स्वरूप व वाटणी, खनिज खतांचे आढळ व भूमिजलाचे वर्तन यांच्याशी निगडीत असलेले विज्ञान
२२) पर्यावरणीय भूविज्ञान : मानवाच्या पर्यावरणाशी संबंधित असलेल्या भूवैज्ञानिक घटकांचा अभ्यास
२३) भूवैज्ञानिक मानचित्रण : स्थलवर्णनात्मक नकाशांवर भूवैज्ञानिक माहिती अध्यारोपित करणे वगैरे.

**संदर्भ**

1) Badgley- P- C- Structural and Tectonic Principles] London] 1965-
2)Bubnoff S- von] (Eng- Trans- W- T- Harry) Fundamentals of Geology] London] 1963-
3)Curwen H- C- Minerals] Rocks and Fossils] New York] 1965-
4)Dunbar C- O- Historical Geology] New York] 1960-

# बदलती सामाजिक परिस्थिती :- विभक्त कुटुंब पद्धती

मार्गदर्शक

**डॉ प्रकाश तुकाराम शिंदे**

महात्मा ज्योतिबा फुले समाज कार्य महाविद्यालय जालना

संशोधक

**ज्ञानेश्वर बाबुराव लुटे**

**प्रस्तावना** :-

साधारणपणे एक कुटुंब म्हणून दोनपेक्षा जास्त लोकांचा बनलेला समूह असे आपण समजतो ज्यांच्यामध्ये काही प्रकारचे बंध असतात, मग ते रक्त असो वा आत्मीयता ही एक सर्वात महत्वाची संस्था असते ज्याचा एक व्यक्ती भाग असू शकते. कारण त्यातच त्याच्याबरोबर आयुष्यभर सोबत असणारे पहिले ज्ञान प्राप्त केले जाते, जे संवाद साधण्याचा मार्ग तसेच मूल्ये असू शकतात. आदर आणि प्रामाणिकपणा म्हणून समाजातील कुटुंब हे एक मूलभूत महत्त्व दर्शवते कारण त्यामध्ये व्यक्तीला प्राप्त होणारे सर्व ज्ञान हे त्याचे समाजातील वर्तन तसेच तो घेत असलेले निर्णय ठरवते आणि हे लोक जिथे कार्य करतात त्या राष्ट्राच्या सामाजिक संतुलनावर परिणाम करतात. सामान्यतः, त्यांना कुटुंब म्हणायचे असल्यास, त्यांनी एकाच छताखाली एकत्र राहणे आणि आपल्याला घर म्हणून ओळखले जाणारे बनवले पाहिजे हे लाखो वर्षापूर्वीचे मूळ आहे जेव्हा मूळ रहिवाशांनी युती केली किंवा त्यांच्या जमिनी सामायिक करण्यासाठी किंवा प्रयत्न आणि काम वाटण्यासाठी एकत्र राहत होते. या क्षणापासून आत्तापर्यंत ही एक अत्यंत प्रतिष्ठित संस्था आहे जी तिचे नियम आणि नियम स्थापित करताना मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्य आणि स्वायत्तता प्राप्त करते. परंतु ते बरोबर आहेत याची नेहमीच काळजी घेतात आणि सर्व सदस्यांनी ते स्वीकारले होते.

कुटुंबाने व्यक्तींना प्रेम करणे, आदर करणे आणि सामायिक करणे शिकवणे आवश्यक आहे. या सर्व शिकवणी उदाहरणांसह असणे आवश्यक आहे आणि केवळ सिद्धांत नाही. कुटुंबातील प्रत्येक सदस्याच्या भूमिकेचा आणि त्यांच्या कार्याचा आदर केला पाहिजे की प्रत्येकजण महत्त्वाचा आहे आणि त्यांनी तसे केले पाहिजे असे वाटते, त्यांना त्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी तसेच त्यांना भेडसावणाच्या कोणत्याही समस्येच्या प्रसंगी कुटुंबातील आधार शोधण्याचा पूर्ण आत्मविश्वास वाटला पाहिजे.

**कुटुंबाची वैशिष्ट्ये** :-

कुटुंब एक संस्था आहे जिने सर्वात जास्त बदल घडवून आणले आहेत त्यांच्या निर्मितीच्या मार्गात आणि ते एकत्र येण्याच्या मार्गात लक्षणीय प्रगती करत आहेत. कारण अनेक ज्या कुटुंबांना आज सामान्यपणे पाहिले जाते किंवा पारंपारिक मानले जाते ते पूर्वी अस्तित्वात नव्हते, हे घटस्फोट आणि दत्तक दोन्ही कायद्यांच्या प्रगतीमुळे आहे असे आपणास म्हणता येईल. पूर्वी कुटुंबापासून विभक्त झाल्यानंतर कुटुंबाची स्थापना करणे फार कठीण होते.

सर्व कुटुंबे भिन्न असतात आणि त्यांची निर्मिती ज्या पद्धतीने होते तसेच सामाजिक, आर्थिक, मनोवैज्ञानिक आणि भावनिक घटक ते कुटुंबाचे प्रकार ठरवतात आणि सुधारित करतात आणि यासह त्यांची वैशिष्ट्ये आणि कार्ये. कुटुंबाचा प्रकार घरामध्ये शिकवल्या जाणाऱ्या धार्मिक प्रवृत्ती, कुटुंबाची जबाबदारी घेणारी व्यक्ती, तसेच ते ज्या देशात राहतात त्या ठिकाणाद्वारे सुधारित केले जाऊ शकतात.

तथापि, अशी अनेक वैशिष्ट्ये आहेत जी कुटुंबाच्या संस्थेला लागू होतात जसे की ते कोणत्याही प्रकारचे कुटुंब असले तरीही, ही वैशिष्ट्ये सामान्यतः कुटुंबाची पहिली शाळा आणि सदस्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मुख्य प्रभारी म्हणून वर्णन करतात. व्यक्तीच्या आयुष्याच्या पहिल्या वर्षापासून ज्या क्षणी ही व्यक्ती स्वतःचे कुटुंब तयार करून स्वतंत्र होण्याचा निर्णय घेते तोपर्यंत शिक्षण, आरोग्य आणि अन्न प्रदान करते.

**कुटुंब** :-

कुटुंब म्हणजे परस्परांशी नाते असलेल्या माणसांचा समूह माणसांमधील नाती ही जन्मावरून विवाहावरून अथवा दत्तक घेण्यावरून निर्माण होतात कुटुंब संस्था एकत्र अथवा विभक्त असे दोन प्रकारचे असू शकते विभक्त कुटुंब संस्थेत आई वडील पती-पत्नी मुलगा मुलगी असे प्राथमिक घटक असतात. एकत्र कुटुंब पद्धतीत इतर दुय्यम नातेसंबंधांचा अंतर्भाव होतो साधारणतः पुरुष (वडील) हा कुटुंबाचा प्रमुख असतो एकत्र कुटुंब म्हणजे साक्षात स्वर्गच म्हणावा लागेल.

**कुटुंब प्रकार** :-

कुटुंब संस्था ही सार्वभौम संस्था असली तरी समाजपरत्वे तिचे स्वरूप विविध असल्याचे आढळून येते समाजामध्ये ज्या प्रकारची कुटुंब पद्धती प्रचलित असते त्या पद्धतीशी सुसंगत अशी सांस्कृतिक लक्षणे स्थायीभाव कल्पना इत्यादी बाबी कुटुंबात विकसित होत असतात. कुटुंबसंस्था एकत्र अथवा विभक्त अशी दोन्ही प्रकारची असू शकते.

**विभक्त कुटुंब पद्धती** :-

अ डिक्शनरी ऑफ सोशियोलॉजी या पुस्तकात समाजशास्त्रज्ञ जी डंकन मिचेल यांनी न्यूक्लीयर फॅमिली अशी व्याख्या केली आहे "पती-पत्नी आणि मुलांनी बनलेला एक छोटा गट जो बाकीच्या समुदायापेक्षा एक युनिट बनतो" हि जी डंकन मिचेल यांची व्याख्या सूचित करते की विभक्त कुटुंबपद्धतीमध्ये पालक आणि त्यांची मुले एकाच छताखाली एकत्र राहतात आणि इतर नातेवाईक त्यांच्यापासून वेगळी वेगळ्या छताखाली राहतात. सध्याच्या प्रचलित समाज माध्यमामुळे लोकांचे विचार आता बदलत चालले आहे सर्वांना आता आपला वेगळा व्यवसाय असावा, आपले वेगळे स्वतंत्र असावे असे वाटत आहे त्यामुळे बरीचशी कुटुंबे आता विभक्त कुटुंब पद्धतीचा स्वीकार करताना आपणास समाजात दिसून येत आहे. विभक्त कुटुंब पद्धती वाढीचे वेगवेगळे करणे असू शकतात त्यात प्रामुख्याने वाढते शहरीकरण, मोठ्या शहरामध्ये राहण्याच्या जागेची कमतरता, मनोवृत्तीतील बदल, अधिक गोपनीयतेची इच्छा, पाश्चिमात्यीकरणाचा प्रभाव, जबाबदारी तुन पळ काढणे, घरातील वृद्ध व्यक्तीचा सांभाळ करण्यास अडचणीचे वाटणे इत्यादी. आज आपल्या आजूबाजूला अनेक एकाकी, मुलांपासून वेगळे दूर रहात असलेले आणि वृद्ध झालेले. किंवा वृद्धत्वाकडे जात असलेले माता-पिता दिसतात. हे माता-पिता ज्या समस्यांचा सामना करत आहेत किंवा ज्या प्रकारच्या समस्या त्यांच्या येत्या काळात त्याच्यापुढे उभ्या ठाकणार आहेत त्यांनी ते चिंतीत आहेत. अर्थात, त्यांची जी मुले स्वतंत्र संसार थाटून बसली आहेत, त्यांचेही सगळे चांगले चालले आहे अशीही परिस्थिती नाही. त्यांच्यासमोर असं स्वतंत्र, वेगळं राहिल्यामुळे वेगळ्या स्वरूपाच्या समस्या आहेतच. या आई-वडील व मुलगा-सून वेगवेगळे राहण्यामुळे खूप साऱ्या समस्या निर्माण होत आहे.

आपण विभक्त कुटुंब म्हणून समजतो जे जवळच्या कौटुंबिक केंद्रकांपासून बनलेले असते, म्हणजेच आई, वडील आणि मुले. या कुटुंबात आजी-आजोबा किंवा काका असे इतर कोणीही नातेवाईक नाहीत. अनेक तज्ज्ञ या कुटुंबाला आदर्श म्हणून पाहतात, इतर अनेक नातेवाईकांशी सतत संवाद किंवा सहजीवनामुळे उद्भवणारे अनेक संघर्ष टाळण्यासाठी सामान्य कुटुंब असावे असे प्रत्येकाला वाटते.

जेव्हा आपण विभक्त कुटुंबाबद्दल बोलतो तेव्हा मुख्य संदर्भ म्हणजे पालक एक जोडपे आणि त्यांची मुले म्हणून एकत्र येतात, तथापि, विभक्त कुटुंबाचे अनेक प्रकारे वर्गीकरण केले जाऊ शकते, केवळ पालकांपैकी एक असणे किंवा कोणतेही अवलंबून मुले नसणे. ते अगदी जवळचे कुटुंब आहेत. याचे कारण असे असू शकते की काही सदस्य आहेत, ते सामान्यतः उत्कृष्ट विश्वास आणि संभाषण आणि समजूतदारपणा राखतात. बहुतेक कुटुंबे पालक आणि मुलांसह अशा प्रकारे सुरू होतात, परंतु त्यांच्या सहजीवनाच्या सभोवतालची परिस्थिती ते कोणत्या प्रकारचे कुटुंब आहेत हे ठरवले जातात.

विभक्त कुटुंब हे विस्तारित किंवा विस्तारित कुटुंबांच्या पूर्ण विरुद्ध आहे, म्हणून त्याची वैशिष्ट्ये पूर्णपणे भिन्न आहेत. अनेक अभ्यास नोंदवले गेले आहेत जे दर्शवितात की विभक्त कुटुंबे अशी आहेत जी संघर्षाची कमी प्रकरणे नोंदवतात, जोपर्यंत त्यांच्यामध्ये काही अनुपस्थिती किंवा असामान्यता नोंदवली जात नाही. हे नमूद करणे महत्त्वाचे

आहे की एखादी व्यक्ती एकाच वेळी दोन विभक्त कटुंबांशी संबंधित असू शकत नाही, उदाहरणार्थ, जेव्हा मुलांपैकी एकाचे लग्न होते, तेव्हा तो प्रारंभिक केंदकांचा भाग होण्याचे थांबवतो. कुटुंब त्याने आणि त्याच्या जोडीदाराने तयार केले. कोणत्याही कुटुंबाप्रमाणे, ते आदर आणि प्रेम यांसारख्या मूल्यांकडे केंद्रित असले पाहिजे आणि एक लहान कुटुंब असल्याने, त्यात भूमिकांचे पुरेसे वितरण असणे आवश्यक आहे जेणेकरून प्रत्येकजण त्यांच्या शक्यतेमध्ये सहयोग करेल आणि अशा प्रकारे योग्य कार्य साध्य करेल.

पती पत्नी आणि मुले एवढेच काय ते कुटुंब अशी एक नवीन धारणा सध्याच्या समाजात बनत चालली आहे त्यामुळे लग्नानंतर एकत्र राहणारे कुटुंब विभक्त होत आहे पण असे करताना आपल्या वृध्द आई-वडिलांना सोडून वेगळा संसार थाटल्यानंतर कुटुंबात देखील अनेक अनेक समस्या उद्भवतात पती-पत्नी दोघे नोकरदार असतील तर घरातील लहान मुलांची देखभाल करण्यास कोणी नसते त्यामुळे पाळणा घर किंवा तत्सम ठिकाणी ठेवून पती पत्नी नोकरीला जातात. विभक्त कुटुंब पद्धतीचे जसे फायदे आहेत हे तोटे आहेत तरीही पत्नीला आवडत नाही म्हणून किंवा म्हाताऱ्या आई-वडिलांची देखभाल आणि सांभाळ करण्यापासून सुटका करून घेण्यासाठी अनेकजण वेगळे राहण्याचा विचार करतात. अनेकदा वृद्धाश्रमात एकदा दाखल केल्यानंतर फक्त महिन्याची फी भरली की शेवटपर्यंत तिकडे न फिरणारे महाभाग देखील आपल्या समाज व्यवस्थेत आहेत मात्र त्यांनी आपल्याला जन्म दिला त्या माता पित्याना वाऱ्यावर सोडून देणाऱ्या अशा महाभागांच्या डोळ्यात अंजन घालणारी कित्येक प्रकरणे सध्याचा समाजात समोर येत आहे. विभक्त कुटुंब पद्धती इतर कोणत्याही व्यवस्थेप्रमाणे भरभराट होत असेल ती परिपूर्ण आहे असे आपणास म्हणता येणार नाही तिचे खूप तोटे देखील आहे.

**विभक्त कुटुंबात राहण्याचे तोटे** :-

**दैनंदिन जीवनातील समस्या** : वैयक्तिक आणि व्यावसायिक क्षेत्रात वाढ करण्याचे लक्ष्य असलेल्या जोडप्यांना भेडसावणारी ही सर्वात मोठी समस्या आहे. बऱ्याच वेळा, नोकरी करणाऱ्या जोडप्यांना कठीण परिस्थितीचा सामना करावा लागतो जसे की मूल आजारी पडणे, मुदत पूर्ण करण्यासाठी काम करणे किंवा पालकांसाठी कामाचा दिवस असताना शाळा/डेकेअर सुट्टी जाहीर करणे. असमान भागीदारीमध्ये, सहसा आईच असते जी त्यास सामोरे जाण्यासाठी संघर्ष करते. अशा काळात, विस्तारित कुटुंबातील सदस्यांच्या पाठिंब्याची कमतरता येऊ शकत नाही.

**एकाकीपणाची भावना आणि एकटेपणा** : जेव्हा पालकांच्या कामाचे वेळापत्रक व्यस्त असते, तेव्हा त्यांना त्यांच्या मुलांसोबत घालवण्यासाठी फारसा वेळ मिळत नाही. परिणामी, काही मुलांना एकटेपणा जाणवू शकतो. त्यांपैकी काही टीव्ही पाहण्यात किंवा गॅझेट्स वापरण्यात जास्त वेळ घालवतात. आजी आजोबा किंवा काकू यांसारख्या विस्तारित कुटुंबातील सदस्याची उपस्थिती फारच चुकली आहे. घरातील आजी आजोबा नातवंडावर योग्य ते संस्कार करू शकत नाही.

**संघर्षांचे निराकरण करण्यात अडचण** : विभक्त कुटुंब हा एक जवळचा समूह असला तरी तो संघर्षाशिवाय नाही. वडील आणि सहकारी पालक यांच्या हस्तक्षेप आणि मार्गदर्शनाच्या अनुपस्थितीत, विवाद निराकरण होऊ शकत नाहीत. हे कौटुंबिक नातेसंबंध आणि घराच्या स्थिरतेसाठी धोका असू शकते.

**खर्चात वाढ** : कुटुंब विभक्त झाल्यामुळे घरातला खर्च देखील वाढत चालला आहे. एकत्र कुटुंब असल्यामुळे नातेवाईकांमध्ये असणाऱ्या वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये घरातील कोणती तरी एक व्यक्ती सहभागी होत असते परंतु कुटुंबापासून विभक्त झाल्यामुळे विविध कार्यक्रम जसे की लग्न, नामकरण, सत्कार सोहळा, मृत्यू या मध्ये जाण्यासाठी व्यक्तीला वेळ काढावा लागतो कामाच्या ठिकाणी सुट्टी टाकावी लागते आणि त्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवास देखील करावा लागतो परिणामी पारिवारिक खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होते.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) मानवी हक्क के सागर प्रकाशन पुणे प्रा पाटील व्ही बी.
२) विभक्त कुटुंब पद्धती - परिस्थिती, कारण आणि उपाय श्री किरण आचार्य.
३) अ डिक्शनरी ऑफ सोशियोलॉजी जी डंकन मिचेल.
४) एकत्र कुटुंब पद्धती आणि विभक्त कुटुंब पद्धती प्रा एम एस पाटील.

# पर्यटन विकास

**छाया अनिल वाकोडे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना:**

आजचे धावपळीचे जीवनमान, त्यामुळे अनेकांना आपला व्यक्तिगत वेळ मिळत नाही.अशावेळी वर्षखली आपल्यासाठी थोडा वेळ काही दिवस बाजूला ठेवून आपण पर्यटन करू शकतो आणि त्यामुळे परत उत्साहाने आपण आपल्या कामकाजात राहू शकतो.

पर्यटन हा सध्या जगातला सर्वात वेगाने वाढणारा व्यवसाय आहे असे म्हंटले जाते अर्थात त्यात सत्यता आहे. कारण जगातील काही देशांची तर बहुतांशी अर्थव्यवस्थेचं तेथील पर्यटनावर अवलंबून आहे. भारतासारख्या विकसनशील देशातील परीतांही गेल्या काही वरशत जवळपास 30-35% नी वाढले आणि त्यामुळे मिळणाऱ्या परकीय चलनातही वाढ झाली आहे.

अलीकडच्या काही दशकात पर्यटन व्यवसायाला जगात किती महत्व आहे व त्यामुळेच आर्थिक विकास साधणारे व्यवसाय म्हणून हा जागतिक उद्योग बनला आहे जगातील चौथा क्रमांकाचा महत्वाचा व्यवसाय म्हणून पर्टणाकडे बघितले जात आहे. भारतासारख्या विकसनशील देशांच्या दृष्टीने तर राष्ट्रीय उत्पन्नात प्रचंड वाढ करणारा आणि मोठ्या प्रमाणावर रोजगाराची संधी मिळवून देणारा व्यवसाय ठरला.

भारतात असणारी प्रचंड विविधता, अनेक प्रकारची प्राकृतिक आकर्षणे, दात असणारी जंगले, जंगलाच्या आश्रयाने राहणारी वन्य पशू – पक्षी, मोठ्या प्रमाणावर असणारी ऐतिहासीक स्थळे, कला, साहित्य, संगीत, नृत्य, चित्रकला इत्यादींचा झालेला विकास अनेक धर्मियांची जागतिक पातळीवरीलअसलेली धार्मिक स्थळे या सर्व गोष्टींचे उपलब्धतेमुळे भारत जगतील पर्यटकांचे आकर्षण ठरला आहे. त्याचाच परिणाम म्हणून भारतात आज पर्यटन व्यवसायाचा झपाट्याने विकास होता आहे.

**व्याख्या:** पर्यटन विकास म्हणजे देशाचा विकास होय.

पर्यटन विकास ही विशिष्ट ठिकाणी प्परीतन उद्योगाची स्थपणा आणि देखभाल करण्याची प्रक्रिया आहे.

पर्यटन म्हणजे पर्यटकाने त्याच्या दैनंदिन जीवनातील व्यस्त कार्यक्रमातून मनोरंजन, अभ्यास, आराम व आरोग्य मिळवण्यासाठी केलेला प्रवास होय.

एखाद्या अपरिचित देशात किंवा शहरात विदेशी व्यक्तीचे आगमन, मुक्काम व आजूबाजूच्या स्थळांना भेटी देऊन पुन्हा स्वगृही परत जने म्हणजे प्रयत्न होय. (हर्मन, 1920)

एखादी व्यक्ती आपल्या वास्तव्याच्या ठिकाणापासून दुसऱ्या स्थळी कायमस्वरूपी वास्तव्य न करता एका वर्षाच्या आत उद्योग किंवा इतर कामासाठी सतत प्रवास करून पुन्हा परत येतो. (जागतिक पर्यटन संघटना)

पर्यटन संघटना:

World tourism organization ही जबाबदार शाश्वत आणि सर्वत्र प्रवेश करण्यायोग्य पर्यटनाला चालना देण्यासाठी 1957 मध्ये स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त राष्ट्राच्या विशेष संस्थांपैकी एक आहे. आर्थिक वाढ, सर्वसमावेशक विकास आणि सूत्रधार म्हणून काम करते आणि पर्यटन धोरण बद्दल जगभरातील ज्ञान वाढवण्यासाठी एक नेता म्हणून काम करते.

यात 157 सदस्य देश, 6सहयोगी सदस्य आणि 480 संलग्न सदस्य आहेत जे खाजगी क्षेत्र, शैक्षणिक संस्था, पर्यटन संघटना आणि स्थानिक पर्यटन प्रधिकाणांचे प्रतिनिधीत्व करतात.

**जागतिक पर्यटन संघटनेची प्रशासकीय संस्था:** ही संस्था लोकशाही तत्त्वावर कार्य करताना आणि त्याच्या प्रशासकीय संस्थांची रचना खाली आहे.

**महासभा:** ही जागतिक पर्यटन संघटनेची सर्वात उच्च संस्था आहे जी दोन वर्षांनी पूर्ण बजेट आणि पर्यटन क्षेत्राच्या कामाचा कार्यक्रम मंजूर करण्यासाठी आणि शिफारस करण्यासाठी बैठक घेते.दर चार वर्षांनी एका महसचुवाची निवड करते.

**प्रादेशिक आयोग:** हे सर्वसाधारण सभेच्या उप कंपनी अंगापैकी एक आहे ज्यामध्ये सहा प्रादेशिक आयोग असतात. जे वर्षतून एकदा भेटतात. प्रत्येक आयोगाच्या एक अध्यक्ष आणि उपाध्यक्ष दोन वर्षांच्या कालावधीसाठी निवडला जातो.

**EXECUTIVE COUNCIL:** हे जागतिक पर्यटन संघटनाचे (UWTO) GOVERNING BOARD आहे ज्याची जबाबदारी आहे की संस्था संघटनात्मक मानदंड आणि त्यांच्या बजेट नुसार कार्य करते याची खात्री करणे.

**समित्या:** ही विशेष सल्ला देणारी संस्था आहे ज्यांचे मुख्य कार्य सदस्य देशांना व्यवस्थापन आणि कार्यक्रम सामग्री वर सल्ला देणे आहे. कार्यक्रम यात कार्यक्रम आणि अर्थसंकल्प समित्या, सांख्यिकी समिती आणि पर्यटन उपग्रह यांचा समवेश आहे.

**सचिवालय:** हे UNTO चे पर्यवेक्षण आणि आणि कार्यकारी मंडळ आहे. मुख्य कार्य म्हणजे UWTO चा कार्यक्रमाची अंमलबजाणी करणे आणि सदस्य देशांच्या गरजा पूर्ण करणे.

**जागतिक अजेंडा म्हणून पर्यटन सुव्यवस्थित करणे:** पर्यटन हा सांस्कृतिक एक घटक आहे आणि जागतिक सर्वात वेगाने वाढणारी आर्थिक क्षेत्र आहे याचा अनुभव आला आहे. तो सामाजिक अथिक प्रगतीचा प्रमुख चालक आहे.

**पर्यटनाचे विकास :** हे परीतांच्या पर्यावरणीय आर्थिक आणि सामाजिक, संस्कृती पैलूंचा विकासाचा संदर्भ देते दीर्घकालीन टिकाऊपणा च्या मार्गाने जे सर्व प्रकारच्या पर्यटनासाठी सर्व प्रकारच्या गंतव्य स्थानांवर लागू होते.

**पर्यटनाचा ऐतिहासीक विकास:**

पर्यटनाचा उगम व विकास कधी झाला यामधे संशोधक व तज्ञांची वेगवेगळी मते आहेत. इतिहास करांच्या मते प्रयत्नच उगम हा मानवी जन्मापासूनच आहे. तर भूगोल करांच्या मते वाहतुकीच्या सुविधा जस जशा होत होत गेल्या त्याप्रमाणे पर्यटन विकसित होत ग्रेले.

**1) प्राचीन काळातील पर्यटन:** ज्यावेळेस जगभरात संस्कृतीचा उगम होऊ लागला त्याच बरोबर पर्यटनास सुरुवात झाली. इ. स. 2000-5000 पूर्वी इजिप्त, बर्बिलोनियान, मेसोपोटेमिया, सिंधू, चिनी या संस्कृती विकसित होत होत्या. त्यावेळेस पर्यटनासाठी व्यापारी दृष्टिकोनातून लोक एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशाकडे ये-जा करू लागले, यातूनच पर्यटनाला चालना मिळाली. प्राचीन काळी लोक प्रवास करताना बैलगाडी, घोडागाडी यांचा वापर करत तेथील बियाणे, स्थळे, नद्या, हवामान या गोष्टींच्या नोंदी करून ठेवत.

**2) मध्ययुगीन काळातील पर्यटन:** इसवी सनच्या पहिल्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंतचा कालावधी हा पर्यटनाचा मध्ययुगीन कालखंड संबोधला जातो. या कालावधीमध्ये मुस्लिम राजवटीचा विकास झाला. तसेच युरोप मधून जलमार्ग आशिया, आफ्रिका, उत्तर व दक्षिण अमेरिका व ऑस्ट्रेलिया या खंडात प्रवासासाठी लोक जाऊ लागले नवीन खंडाचा शोध घेणे व तेथे वास्तव करणे. मक्का, मदीना, जेरुसलेम ही पर्यटनासाठी महत्त्वाची केंद्रे बनली.

**3) आधुनिक काळातील पर्यटन:** आधुनिक काळातील पर्यटन:18 व 19 व्या शतकामध्ये पर्यटनाच्या विकासाला एक व्यवसाय म्हणून खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. विज्ञानामध्ये आधुनिक क्रांती झाली त्यामुळे रेल्वे मोटार गाडी व विमान या साधनांचा वापर पर्यटनामध्ये होऊ लागला. त्यामुळे राज्य, देश व प्रदेशाच्या सीमा पार करून सहज प्रवासाला जाता येऊ लागले मनोरंजन व आनंद घेण्यासाठी प्रवास करणे ही संकल्पना आधुनिक कालखंडात विकसित झाली. त्यामुळे दैनंदिन जीवनातील व्यस्त वेळ बाजूला सारून लोक पर्यटनासाठी बाहेर पडू लागले.

**पर्यटन विकासाचे महत्त्व:**

पर्यटन हा व्यवसाय मनोरंजन व आनंद पर्यटकांना देतो. परंतु पर्यटकाकडून मिळणारा पैसा हा त्या ठिकाणी आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे पर्यटनाचे महत्त्व हे सामाजिक,सांस्कृतिक,आर्थिक व राजकीय दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. पर्यटनाचे महत्त्व देशाच्या अर्थव्यवस्थेत दिवसेंदिवस वाढत आहे.त्यामुळे या व्यवसायाचे महत्त्वही वाढत आहे.

**1) परकीय चलन मिळते:** आंतरराष्ट्रीय पर्यटनामध्ये पर्यटक बाहेरच्या देशातून येताना त्याची चलन घेऊन येतात. आपल्या देशात आल्यानंतर चलन बदल करून घेतात. उदा.अमेरिकेतील पर्यटन डॉलर घेऊन येतो व त्याचे रुपयांमध्ये चलन बदल करून घेतो.

**2) जागतिक सामंजस निर्माण घेण्यास मदत होते:** दोन देशांमध्ये असणारे भांडण तंटे यामुळे त्या देशात संघर्ष निर्माण होतो. त्या देशांमधील व्यक्तींच्या मनात गैरसमज निर्माण होते परंतु या दोन्ही देशातील पर्यटक जर त्यांच्या देशात पर्यटनासाठी केले तर सत्य स्थिती समजते. उदा. भारत व पाकिस्तान

**3) देशाच्या अर्थव्यवस्थेत मदत:** देशी-विदेशी पर्यटकांकडून मिळणारा पैसा हा कोणत्या ना कोणत्या स्वरूपात देशाच्या अर्थव्यवस्थेला मिळत असतो. रोजगार निर्मिती, पर्यटन केंद्र, वाहतूक व्यवस्था, हॉटेल व निवास व्यवस्था या सर्व ठिकाणी पर्यटक पैसा खर्च करत असतो.

**४) संस्कृतीचे जतन:** पर्यटक पर्यटनासाठी ज्या प्रदेशात जातो तेथील संस्कृती ही त्याच्यासाठी भिन्न असते. त्यातील तो चांगल्या गोष्टी आत्मसात करतो तसेच त्यांची जी संस्कृती आहे त्याचा ठसा सुद्धा त्यांची भाषा वेशभूषा आवड निवड भोजन त्यातून त्या प्रदेशातील लोकांना एक प्रकारे सांगत असतो. तसेच संस्कृतीचे जतन होते.

**वैशिष्ट्ये:**

1. भारतातील पर्यटन वर्षांवर असे वाढले आहे.
2. 2010 मध्ये सुमारे ५.८ दशलक्ष पर्यटकांनी भारताला भेट दिली आहे आणि १५ दश लक्ष्याहुन अधिक लोक थेट पर्यटन उद्योगात गुंतलेले आहेत.
3. पर्यटनामुळे राष्ट्रीय एकात्मतेला चालना मिळते. हस्तशिल्पांना सहाय्य मिळते आणि आंतरराष्ट्रीय समज विकसित करण्यात मदत होते.
4. त्यातून आपली संस्कृती आणि वारसा वाढतो.
5. पर्यटनाचे विविध प्रकार यासाठी भारत पर्यटकांना आकर्षित करते ते म्हणजे साहसी पर्यटन,सांस्कृतिक पर्यटन व व्यवसाय पर्यटन इत्यादी.
6. राज्यस्थान, गोवा, जम्मू-काश्मीर आणि दक्षिण भारतातील मंदिरे, शहरे परदेशी पर्यटकांना भारतात आकर्षित करतात.
7. प्राचीन काळी पर्यटन हे प्राथमिक स्वरूपाचे होते. वाहतुकीसाठी प्राण्यांचा वापर केला जात होता. उदा. बैल, घोडा, खेचर इत्यादी.
8. पर्यटनात व्यापार हा प्रमुख उद्देश असतो तर पर्यटनाला दुय्यम स्थान होते.
9. प्राचीन काळी पर्यटन हे ग्रीस, रोम, इंग्लंड या देशात मोठ्या प्रमाणात विकसित झाले.
10. मध्ययुगीन काळात पर्यटनाला अनुकूल परिस्थिती निर्माण झाली.
11. धार्मिक पर्यटन या कालावधीत केंद्रबिंदू ठरला होता.
12. पर्यटनासाठी जलमार्गाचा सर्वप्रथम वापर केला गेला. त्यामुळे नवीन जगाचा शोध लागला मध्य आशिया युरोप व उत्तर आफ्रिका ही पर्यटनाचे ठिकाणी होती.
13. या कालावधीत पर्यटक नोंदी, पुरावे, नकाशे या गोष्टीचा पर्यटनासाठी वापर करू लागला.

14. आधुनिक काळातही हा व्यवसाय या दृष्टिकोनातून पाहू लागले.
15. हवाई मार्ग, जलमार्ग, रेल्वे मार्ग व रस्ते मार्ग या सर्वांचा वापर पर्यटनासाठी होऊ लागला.
16. जगातील ७ टक्के लोक या व्यवसायात गुंतले आहे. आनंद घेणे, मनोरंजन करणे, अभ्यासासाठी सहल करणे असे विविध उद्देश पर्यटनासाठी निवडले गेले.

पर्यटनाचा विकास हा टप्प्या टप्प्याने होत गेला. प्राचीन काळी पर्यटन हे व्यापारी स्वरूपाचे तर मध्ययुगीन कालखंडात धार्मिकत्येला महत्त्व आले. त्याचबरोबर नवीन जगाचा शोध लागला. त्यामुळे पर्यटन विकासाला चालना मिळाली तर आधुनिक काळात पर्यटन हा व्यवसाय बनला. तर सध्या मनोरंजनासाठी पर्यटन हा एवढाच उद्देश बनला.

**उद्दिष्टे:**

या घटकाचा अभ्यास केल्यावर पुढील बाबींचे ज्ञान प्राप्त होईल:-

1) पर्यटनामध्ये भौगोलिक महत्त्व समजून येईल.

२) पर्यटनाची व्याप्ती किती खोलवर आहे याचा उलगडा होईल.

३) प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत पर्यटनाचा विकास कसा होत गेला याचे ज्ञान होईल.

४) मानवी जीवनाच्या दृष्टीने प्रयत्न कसे महत्त्वाचे आहे व त्याचे फायदे कसे आहेत हे समजून घेता येईल.

५) पर्यटन केव्हा व कसे करावे याची माहिती मिळेल विविध स्थानावरील विविध संस्कृतीचे जतन व भाषा मिळेल.

**संदर्भ सुची:**

१) महाराष्ट्र राज्य महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.

२) संपादकीय लेख. (सामना, लोकसत्ता)

३) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (प्रा. डॉ. संभाजी ज्ञा. शिंदे)

४) जागरण जोश. (विकासपीडिया)

# पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी व समतोल राखण्यासाठी झालेले बदल

## पर्यावरण संरक्षण विद्यार्थ्यांच्या सोबत - पर्यावरण संवर्धन काळाची गरज

संशोधक

**भारती रंगनाथ भगत**

लोयोला हायस्कूल, पाषाण रोड, पुणे

**प्रस्तावना-**

दिवसेंदिवस पर्यावरणाची समस्या अधिक गंभीर होत आहे. वादळ, पूर, अवकाळी पाऊस, भूस्खलन, ढगफुटी अशा घटना घडत आहेत. तापमान वाढत आहे.प्राण्यांची शिकार थांबावायलाच हवी. वाहनांचा वापर कमी करून सायकलींचा वापर करायला हवा. पाण्याचा अपव्यय टाळायला हवा जनजागृती करायला हवी. तरच या पर्यावरणाला आपण समृद्ध बनवू शकू.

पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजून जगभरातील देश वृक्षलागवड व जास्तीतजास्त सीएनजी गॅस चा उपयोग करू लागले आहेत. पर्यावरण आपले भविष्य आहे म्हणून याच्या संरक्षणासाठी आपल्याला वेळीच लक्ष द्यावे लागेल.निष्पाप, मुक्या प्राण्यांची शिकार करून माणसाला काय मिळते कोणास ठाऊक! परंतु त्यामुळे अन्नसाखळी बिघडते. अनेक प्रजाती नष्ट होत आहेत. असे झाले तर पशुपक्षींच्या प्रजाती आपल्याला दिसेनासे होतील. अगोदर चिमण्यांच्या किलबिलाटाने पर्यावरण मोहून जात असे. शहरात तर चिमण्या क्वचितच पाहावयास मिळतात. खेड्याकडेही चिमण्यांच प्रमाण घटले आहे.

पर्यावरणाला प्रदूषण मुक्त करण्यासाठी सर्वात आधी जल प्रदूषणाला रोखावे लागेल. कारखान्यांचे खराब पाणी, घरातील दूषित पाणी, नाल्यामधून वाहणारा मल इत्यादी समुद्रात जाण्यापासून रोखले गेले पाहिजे.

कारखान्यातून निघणारे विषयुक्त पाणी पिऊन जलचर व उभयचर प्राण्यांची मृत्यू होते. दुसरी कडे त्याच प्रदूषित पाण्याला शेतात वापरले जाते. व दूषित पाण्यात उगवलेला भाजीपाला खाऊन आपले आरोग्य बिघडण्याचा धोका असतो. जल प्रदूषणानंतर वायू प्रदूषणाने पर्यावरणाला खूप हानी पोहोचवली आहे. मोठमोठ्या कारखान्यांच्या चिमण्यांमधून निघणारे धूर, रेल्वे व इतर पेट्रोल, डिझेल वर चालणारी वाहनांमधून निघणारा धूर वायु मंडळात मिसळून वातावरण प्रदूषित करतो.

या शिवाय ध्वनी प्रदूषणाची समस्या ही मोठ्या प्रमाणात आहे. आज लग्न तसेच इतर समारंभात मोठमोठ्या आवाजात गाणी वाजवली जातात. ज्यामुळे ध्वनी प्रदुषण होऊन बहिरेपणा व डोकेदुखी या समस्या निर्माण होतात. जगभरात 5 जून ला विश्व पर्यावरण दिवस साजरा केला जातो.या दिवशी प्रत्येक देशात पर्यावरणाच्या संवर्धनासाठी महत्त्वाची माहिती व सेमिनार आयोजित केले जातात. अनेक ठिकाणी वृक्ष लागवड अभियान ही राबवले जाते.अशा पद्धतीने आपणही पर्यावरण संरक्षणात योगदान देऊन संपूर्ण मानव जातीची सहायता करू शकता.

हवेचे प्रदूषण वाढत आहे.त्यावर उपाय योजना म्हणून शालेय जीवना पासून विद्यार्थ्यांना या गोष्टींचे गांभीर्य लक्षात आणून दिले पाहिजे. त्यासाठी विद्यार्थांना पर्यावरण संवर्धन शपथ दिली पाहिजे व झाडे लावा झाडे जगवा अशा तऱ्हेचे विविध असे संकल्प करायला लावले पाहिजे.

स्वतः पासून पर्यावरणाची कशी हानी होते याचा विचार करायला लावला पाहिजे म्हणजे शाळेत येताना वैयक्तिक वाहणात न येता सार्वजनिक वाहनाचा वापर केला पाहिजे हे समजावून सांगितले पाहिजे.

विद्यार्थ्यांच्या मदतीने पदयात्रेचे आयोजन केले गेले पाहिजे व पर्यावरण संवर्धन जागृती केली पाहिजे. एक विद्यार्थी एक झाड ही संकल्पना प्रत्यक्षात साकार केली पाहिजे. झाडांचे संगोपन व संवर्धन कसे गरजेचे आहे ह्याचे महत्त्व समजावून सांगितले पाहिजे.ावरणाचा जागर

**पर्यावरण संवर्धनासाठी...**

* एकदा वापरल्या जाणाऱ्या (सिंगल यूज) प्लॅस्टिकचा वापर न करणे.
* कमी अंतरासाठी पायी किंवा सायकलचा वापर करणे.
* सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवणे.
* अन्न वाया न घालवणे.
* लिफ्टचा वापर कमी किंवा न करणे.
* प्रत्येकाने कमीत कमी पाच झाडे दत्तक घेणे.
* अपारंपरिक ऊर्जास्त्रोतांचा वापर करणे.
* वेस्ट टू. हेल्थ अर्थात कचऱ्यापासून उत्पन्न मिळवणे.
* भूजलाचा नियंत्रित वापर करणे.
* वापरून फेकून दिल्या जाणाऱ्या (यूज अॅण्ड थ्रो) वस्तू न वापरणे.
* प्लॅस्टिक बाटली बंद.
* ओल्या कचऱ्यापासून सेंद्रिय खत (कंपोस्ट) बनवणे.
* घरे, स्वच्छतागृह, स्नानगृहात कमीत कमी रासायनिक उत्पादने वापरणे.
* घरातील विजेचा वापर जाणीवपूर्वक कमी करणे.
* आठवड्यातून किमान एक दिवस सायकलवर शाळा, कॉलेज, ऑफिस किंवा कामाच्या ठिकाणी जाणे.
* वृक्षतोड, कचरा जाळणे, प्रदूषण करणाऱ्याला मज्जाव करणे.
* कचरा व्यवस्थापनाबरोबरच कचरा निर्मिती कमी करणे.
* पर्यावरणाचे आपल्यावरील परिणाम, त्यामुळे पडणारा आर्थिकभार याबाबत जागरूक असावे असे वाटते.

वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण यामुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. पर्यायी पर्यावरणाचे रक्षण करणे काळाची गरज आहे. पर्यावरणाचे संरक्षण केवळ सरकारची जबाबदारी नसून भविष्यातील धोके टाळण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने पर्यावरण संवर्धनाची सुरूवात स्वतःपासून करणे गरजेचे आहे.

जंगलतोड ही सुध्दा एक पर्यावरणाचा ऱ्हास होण्यास कारणीभूत आहे. जंगलतोडीमुळे तिथल्या पशू - पक्षांचे जीवन तर विस्कळीत होतेच तसेच झाडांचेही अतोनात नुकसान होते. मग नंतर अवर्षण, अतिवृष्टी याचा सामना करावा लागतो. आजकालचे हवामान हे पर्यावरणाचे संतुलन बिघडल्यामुळेच बदलते आहे.

# कामगारविषयक कायद्यामधील बदल एक दृष्टिक्षेप

**मडके साधना हरिदास**
संशोधक विद्यार्थिनी

**प्रस्तावना –**

'मानव हा समाजशील प्राणी आहे'. मानवाचे सहजीवन समाजामुळेच सातत्याने चालू राहते. इतर मानवाच्या सहवासात राहूनच त्याला जगणे, वाढणे आणि विकसित होणे शक्य असते. समाजात सुरक्षित राहण्यासाठी, जगण्यासाठी त्याला विविध स्वरूपाची व्यवस्था तयार करावी लागते. निसर्गातील शक्तींचा आपल्या विकासासाठी जीवन जगण्यासाठी उपयोग करावा लागतो. मानवाने अगदी रानटी अवस्थेपासूनच निसर्गाशी समायोजन करत आपल्या बुद्धीचा वापर करून, निरीक्षण शक्तीचा वापर करून स्वतःची अमुलाग्र प्रगती केली. मानव सतत स्वतःच्या आर्थिक प्रगतीसाठी धडपडताना दिसतो. मानवाच्या प्राथमिक अवस्थेमध्ये त्याच्यावर शेतीचा प्रभाव होता नंतर मात्र शेतीबरोबरच उत्पादन प्रक्रियेमध्ये देखील त्यांनी प्रगती केली. शेतीबरोबरच उत्पादन प्रक्रिया ही शेकडो वर्षापासून चालू आहे माणूस फक्त स्वतःच्या हाताने आणि स्वतःचे श्रम वापरून ती पूर्ण करत होता. मानवाच्या प्राथमिक अवस्थेपासून ते आजच्या प्रगत आधुनिक अवस्थेपर्यंत त्याने शेतीबरोबरच उत्पादन प्रक्रियेमध्ये देखील प्रचंड प्रगती केलेली आहे. 17 व्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाल्यानंतर युरोप खंडाबरोबरच आशिया, आफ्रिका व इतर खंडातील देशाप्रमाणेच भारतात ब्रिटिशांसोबत या क्रांतीचे लोन पसरले. यंत्रशक्तीच्या सहाय्याने उत्पादन होणारे मोठे मोठे कारखाने भारतात स्थापन झाले. औद्योगिक समाजात भांडवलदार आणि कामगार असे दोन वर्ग तयार झाले. वाढत जाणाऱ्या औद्योगीकरणाबरोबरच कारखाना मालक आणि कामगार यांच्याशी संबंधित अनेक समस्या देखील निर्माण झाल्या. भांडवलदार वर्गाकडून जास्तीत जास्त नफा कमविण्याच्या उद्देशाने कामगार वर्गाचे शोषण होऊ लागले. कामाचा योग्य तो मोबदला न देता कामगारांच्या श्रमाचा जास्तीत जास्त वापर करून मालक वर्ग मात्र श्रीमंत होत गेला तुलनेत कामगारांची अवस्था मात्र दयनीय होत गेली. औद्योगिक समाजात कामगारासंबंधी अनेक समस्या निर्माण होत गेल्या. कामगारांच्या या शोषणाच्या विरोधात आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध कामगार संघटनांची स्थापना होऊन संघटनांच्या माध्यमातून कामगार वर्ग आपल्या हक्कांची मागणी करू लागले. परिणामी कामगारांच्या हितसंबंधांचे संरक्षण व्हावे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ नये त्यांना सर्व प्रकारच्या सुख सुविधा मिळाव्यात यासाठी इतर देशाप्रमाणेच भारतातही कामगार विषयक कामगारांच्या हिताचे कायदे करण्यात आले.

**संशोधन विषयाचे महत्त्व –**

आज जागतिकीकरण खाजगीकरण आणि उदारीकरणाच्या युगात उद्योगधंद्यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. औद्योगिक समाजात भांडवलदार वर्गाबरोबरच कामगारांना देखील तेवढेच महत्त्वाचे स्थान असते. कामगारांच्या श्रमावरच भांडवलदार वर्ग उद्योगधंद्यामधून नफा कमवत असतात. बऱ्याच वेळेस जास्तीत जास्त नफा कमविण्याच्या उद्देशाने भांडवलदार वर्गाकडून कामगारांचे शोषण होत असताना दिसते. कामाचा योग्य तो मोबदला न देता जास्तीत जास्त काम करून घेणे, कामाच्या ठिकाणी आरोग्यविषयक सुख सुविधा नसणे, संरक्षण नसणे, कामाचे तास, सुट्ट्या, पगार, विमा संरक्षण, भविष्य विषयी संरक्षण इ. अनेक बाबींकडे मालक वर्गाकडून दुर्लक्ष केले जाते. कामगारांच्या सर्वांगीण हिताचे संरक्षण व्हावे त्यांना सर्व प्रकारच्या सुख सुविधा मिळाव्यात त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ नये यासाठी ब्रिटिश काळापासून ते आज तागायत केंद्र तसेच राज्य सरकारने वेळोवेळी विविध कामगार विषयक कायदे केले आहेत. 2019-20 मध्ये केंद्र सरकारने पूर्वीच्या कायद्यांचे एकत्रीकरण करून नवीन चार सुधारित कामगार विषयक कायदे संसदेमध्ये मंजूर करून घेतले. वेतन, रजा, ओव्हरटाईम, कामाचे कामाची हमी, आरोग्य विषयक सुविधा, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी, फिक्स्ड टर्म जॉब, महिलांविषयी तरतुदी इ.बाबत बदल केलेले आहेत. नवीन बदल

कोणते आहेत तसेच या कायद्यांचे फायदे व तोटे काय आहेत हे जाणून घेण्यासाठी उपरोक्त संशोधन विषय महत्त्वाचा ठरेल.

**संशोधनाची उद्‌दिष्टे –**

1) नवीन कामगार विषयक कायद्यातील बदल व तरतुदींचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्‌धती –**

प्रस्तुत संशोधन विषयासाठी वर्णनात्मक संशोधन पद्‌धती चा वापर केला गेला आहे. तसेच तथ्य संकलनासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे त्यात संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेट वेबसाईट इत्यादी साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधन विषयाचे विश्लेषण –**

औद्‌योगिक क्षेत्राच्या विकासामध्ये कारखाना मालक आणि कामगार या दोघांनाही समान न्याय मिळाला पाहिजे अशी अपेक्षा असते. तथापि आपल्याला विविध कामगार कायद्यामधून योग्य तो न्याय मिळत नाही अशी उद्‌योजकांची बरीच वर्ष तक्रार होती. देशातील कामगार कायदे हे जुने आहेत व ते पूर्णपणे कामगाराच्या बाजूने झुकलेले आहेत, सरकारी यंत्रणा कामगारांच्या बाजूने आहे, कामगार कमी करायचे असतील, व्यवसाय बंद करायचा असेल तर सरकारची परवानगी कशाला घ्यायची या कामगार कायद्यामुळे, सरकारच्या धोरणामुळे विदेशी गुंतवणूक भारतात येत नाही अशा अनेक गाऱ्हाणी उद्‌योजक सतत सरकार समोर मांडत आले आहेत. त्यामुळे सरकारने मालक आणि कामगारांच्या तक्रारींचा विचार करून करून जुने कामगार कायदे यांचा सर्वकष अभ्यास करून त्यात काय सुधारणा कराव्यात याबाबत शिफारशी करण्यासाठी विविध अभ्यासू व तज्ञ व्यक्ती असलेल्या समित्यांची नियुक्ती केली. त्यांच्या सूचनेनुसार सरकारने सध्याच्या कामगार कायद्‌यात आवश्यक त्या सुधारणा केल्या आणि जवळजवळ 44 कामगार कायद्‌यांचे एकत्रीकरण करून चार नवीन कामगार कायदे तयार केले त्यानंतर 'कोड ऑन वेजेस ऍक्ट', 2019, 'ऑक्युपेशनल सेफ्टी', 2020, 'सोशल सेक्युरिटी', 2020, "ऑक्युपेशनल सेफ्टी हेल्थ अँड वर्किंग कंडिशन कोड', 2020 अशा चार नवीन कायद्यात पुनर्रचना करण्यात आली. राज्यांना या कायद्‌यात त्यांच्या गरजेनुसार बदल करण्याचा अधिकार दिला गेला. एक जुलै 2022 पासून संपूर्ण भारतामध्ये या नवीन कामगार विषयक कायद्‌यांची अंमलबजावणी केली गेलेली आहे.

नवीन कायद्यामध्ये संघटित, असंघटित कामगार, स्थलांतरित कामगार, दृकश्राव्य कामगार, बालकामगार, खान कामगार, कंत्राटी कामगार, विडी कामगार, बांधकाम क्षेत्रातील कामगार, महिला कामगार इत्यादी सर्व प्रकारच्या कामगारांविषयी आरोग्य विषयक सुविधा, कामाच्या ठिकाणचे संरक्षण, विमा संरक्षण, भविष्याविषयी तरतूद, कामाच्या ठिकाणाची स्वच्छता व संरक्षण, पगार, रजा, कामाचे दिवस, कामाचे तास, सुट्ट्या, इत्यादी विषयी कामगारांच्या हिताच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच कामगारांना ठराविक काळासाठी नोकरी. 300 पेक्षा कमी कर्मचारी असल्यास ले ऑफ, नोकर कपात, कंपनी बंद करण्यासाठी सरकारची परवानगी घेण्याची गरज नसणे, कामगार न्यायालय संरचनेत बदल इत्यादी विषयी महत्त्वाच्या तरतुदी नवीन कायद्‌यात आहेत.

नवीन कायद्‌यानुसार असंघटित क्षेत्रातील कामगारांना एक युनिक अकाउंट नंबर देऊन या कायद्‌याच्या कक्षात आणण्याचा सरकारचा विचार आहे ज्यामुळे संघटित क्षेत्रातील कामगारांना जे लाभ मिळतात ते लाभ यांनाही देण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

कामगारांचे रोजचे कामाचे तास आणि आठवड्याचे तास यात बदल करण्यात आला आहे. पूर्वी दिवसाला कामगारांना आठ ते नऊ तास काम करावे लागत होते व आठवड्याचे 48 तास काम करावे लागत होते आत्ता रोज बारा तास काम करावे लागणार आहे. म्हणजेच आठवड्याचे 48 तास कामगारांनी चार दिवसात पूर्ण करायचे आहेत. शुक्रवार, शनिवार, रविवार असे तीन दिवस कामगारांना सुट्टी असणार आहे त्याचप्रमाणे हे 48 तास किती दिवसात किती तास काम करून घेऊन पूर्ण करायचे याचा निर्णय पूर्णपणे कंपन्यांनी घ्यायचा आहे. नवीन कायद्‌यानुसार ओव्हरटाईम

करण्यासंदर्भात कोणतेही निश्चित नियम दिले गेलेले नाहीत. कामगाराकडून अतिरिक्त किती तास काम करून घ्यायचे हे ठरवण्याचा पूर्णपणे अधिकार कंपनीच्या व्यवस्थापनाला दिले गेले आहेत.

कामगारांच्या रजेच्या संदर्भात देखील महत्त्वाचे बदल करण्यात आलेले आहेत. पूर्वी जर नवीन कामगार असेल आणि त्याने 240 दिवस काम केले असेल तर तो कर्मचारी रजेसाठी पात्र होता नवीन कायद्यानुसार 180 दिवस काम केले तरी तो रजेसाठी पात्र होणार आहे.

नवीन कायद्यात कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी बाबत देखील महत्त्वाचा असा बदल करण्यात आला आहे. कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये वाढ करण्यात आलेली आहे त्यामुळे भविष्य निर्वाह निधीमध्ये कामगार आणि मालक दोघांचाही सहभाग वाढेल ग्रॅज्युटी नंतर यांच्या हातात एक मोठी रक्कम येईल असे सरकारचे म्हणणे आहे. तसेच PF अकाउंट आधाराशी लिंक केला जाईल. नवीन कायद्यापूर्वी सलग पाच वर्ष काम केल्यावर ग्रेच्युटी जमा होत होती ती मर्यादा आता कमी करून एक वर्षावर आणण्यात आली आहे.

प्रत्येक कामगाराला आरोग्यविषयक सुविधा मिळणार आहेत. यात इएसआय अंतर्गत येणाऱ्या हॉस्पिटलमध्ये तसेच जिल्हा पातळीवरही उपचाराच्या सर्व सुविधा मिळणार आहेत.

फिक्स्ड टर्म जॉब बद्दल नवीन कायद्यानुसार जर एखादा कामगार एका वर्षाच्या करारामध्ये काम करत असेल आणि त्याचा करार संपल्यानंतर त्याला सेवेत पुढे चालू ठेवायचे की काढून टाकायचे याचा अधिकार पूर्णपणे कंपनीच्या मालकाला देण्यात आला आहे. तसेच कामगारांचा करार पूर्ण झाल्यानंतर कोणतीही पूर्व सूचना किंवा नुकसान भरपाई न देता नोकरीतून काढून टाकण्याचा अधिकार देखील कंपनी मालकाला असेल. पण जर कामगाराने एक वर्ष नोकरी केली असेल तर कायम कामगाराप्रमाणे ग्रेच्युटी मिळेल पण जर कंपनीने 11 महिन्याचा करार केला असेल तर असा कोणताही लाभ कामगारांना मिळणार नाही तसेच जे कामगार फिक्स्ड टर्मवर काम करतात त्यांना कायम कामगाराप्रमाणे सामाजिक सुरक्षा मिळेल. कामगारांना ठराविक मुदतीसाठी कामावर ठेवणे हे आता अधिकृत असेल आणि त्यांना नियमित कामगारांसारख्या सर्व सुविधा देणे बंधनकारक असेल. नवीन कायद्यानुसार कामगारांना कामावर ठेवणाऱ्या कारखान्यांना 'सामाजिक सुरक्षा फंड' तयार करावा लागेल आणि आपल्या वार्षिक उलाढालीच्या एक ते दोन टक्के रक्कम या फंडासाठी द्यावी लागेल जो सरकारच्या नियंत्रणाखाली असेल.

कामगारांना आपल्या मागण्यासाठी संप करायचा असेल तर संपापूर्वी कंपनी मालकांना 60 दिवसांची नोटीस द्यावी लागेल याआधी ही मुदत 30 ते 45 दिवसांची होती. कामगारांच्या वेतना विषयी नवीन कायद्यात चांगल्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. सरकार कामगारांना किमान वेतन काय देण्यात यावे हे ठरवेल. यापेक्षा कमी वेतन कोणत्याही व्यवस्थापनाला कामगारांना देता येणार नाही. तसेच सरकार विविध शहरांसाठी, वेगवेगळ्या स्वरूपाच्या उद्योगासाठी किमान वेतन ठरवेल. सरकार वेळ किंवा उत्पादन या तत्त्वावर पगार ठरवेल. पगारांमध्ये मूळ वेतन आणि महागाई भत्ता यांचा समावेश असेल किमान वेतन ठरवण्यासाठी सरकार विविध समित्यांची नियुक्ती करेल. अथवा परिपत्रक काढून दोन महिन्यात संबंधितांची मते मागवेल. कर्मचाऱ्यांचा पगार रोखीने किंवा चेकने किंवा त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. बोनस विषयी देखील या कायद्यात महत्त्वाच्या तरतुदी आहेत. सरकारने ठरवलेल्या वेतन मर्यादेपेक्षा ज्यांचे वेतन कमी आहे आणि ज्यांनी आर्थिक वर्षात किमान 30 दिवस काम केले आहे त्यांना बोनस मिळेल. व्यवस्थापनाकडे देय शिल्लक रक्कम जरी नसली तरी व्यवस्थापनाला कामगारांना किमान 8.33% बोनस द्यावा लागेल.

कंत्राटी कामगारासंबंधी मोठा बदल करण्यात आला आहे. ज्या कारखान्यात अथवा उद्योगात कंत्राटी कामगार काम करतात त्या ठिकाणी त्यांना लागू असणाऱ्या भविष्य निर्वाह निधी आणि कामगार राज्य विमा योजना यांची संपूर्ण जबाबदारी मूळ मालकावर असणार आहे कंत्राट दारावर नाही. नियमित आणि कंत्राटी कामगारांना नियुक्तीपत्र देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

महिला कामगारांविषयी महत्त्वाची तरतूद म्हणजे आता महिलांना रात्रपाळीस कामासाठी या कायद्यान्वये परवानगी देण्यात आली आहे. मात्र सुरक्षा आणि आवश्यक सुविधा पुरविण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची असेल. कामाच्या ठिकाणी लिंग भेद करण्यास सक्त मनाई करण्यात आलेली आहे. महिला कामगारांना बाळंतपणासाठी बाळंतपणा पूर्वी व बाळंतपणा नंतर 68 दिवसांची रजा देण्यात आलेली आहे. तसेच कामाच्या ठिकाणी स्वतंत्र स्वच्छालय, चेंजिंग रूम, पाळणाघरे, महिला तक्रार निवारण समितीची स्थापना, महिलांच्या सुरक्षतेविषयी सर्व सुख सुविधा देण्यात आलेल्या आहेत. महिलांना नोकरीसाठी अधिक संधी मिळावी यासाठी सल्लागार मंडळ स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. नवीन कायद्यामध्ये प्रथमच स्पष्टपणे अशी तरतूद करण्यात आली आहे की समान स्वरूपाचे काम करण्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना अथवा त्यांच्या वेतनाबाबत स्त्री किंवा पुरुष असा लिंगभेद करता येणार नाही. किमान वेतन ठरवणे, त्याची पुनर्रचना, महिलांना नोकरीच्या अधिक संधी उपलब्ध करून देणे तसेच या कायद्यासंबंधीत सल्ला देण्यासाठी केंद्र तसेच राज्य सरकार सल्लागार मंडळे स्थापन करतील.

अशाप्रकारे नवीन कामगार कायद्यात वरील काही महत्त्वपूर्ण बदल करण्यात आलेले आहेत आणि हे बदल कामगार आणि कंपनी मालक या दोघांच्याही हिताचा विचार करून तयार करण्यात आलेले आहेत.

**निष्कर्ष –**

1. सुधारित कामगार कायद्यामधील तरतुदी या कामगार तसेच मालक दोघांच्याही हितसंबंधांचे रक्षण व्हावे याचा विचार करून तयार करण्यात आलेला आहेत.
2. भविष्य निर्वाह निधीमध्ये वाढ करून कामगारांचे भविष्य सुरक्षित करण्याचा प्रयत्न सरकारकडून करण्यात आला आहे.
3. पुरुष कामगाराबरोबरच महिला कामगारांच्या ही सुख-सुविधा, सुरक्षा, समान काम समान वेतन, लिंगभेद दूर करण्यासाठी प्रयत्न करण्यात आलेले आहेत
4. नवीन सुधारित कामगार कायदे मालकांबरोबरच सर्व कामगारांपर्यंत पोहोचण्यासाठी सरकारकडून या कायद्यांची माहिती कामगारांना व्हावी यासाठी वेळोवेळी जागृती तसेच कार्यशाळेचे आयोजन करणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची** -

1) डॉ. काळदाते सुधा, "औद्योगिक समाजशास्त्र", विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
2) सुकटणकर संजय, "कामगार कायदे", सकाळ प्रकाशन, पुणे.
3) सुखटनकर संजय, "सुधारित कामगार कायदे", सकाळ प्रकाशन, पुणे.
4) 'तरुण भारत', वर्तमानपत्र, दि. 24 सप्टेंबर 2020.
5) 'सकाळ', वर्तमानपत्र दि. 23 जुलै 2022.
6) https://www.bbc.com/marathi/india-61967549

# भारतातील कृषी क्षेत्रामधील बदल

# (नवीन योजना)

संशोधिका

**कावळे सुप्रिया संजय**

मार्गदर्शक

**क्षीरसागर हिरामण मधुकर**

के.टी.एच.एम. कॉलेज. नाशिक

**गोषवारा**

भारत देशाची ओळख हि आंतरराष्ट्रीय पातळीवर पूर्वीपासूनच एक कृषिप्रधान किंवा शेतीप्रधान देश म्हणुन आहे. शेती हाच भारताचा मुख्य व्यवसाय म्हणुन ओळखला जातो, भारत सारख्या देशामध्ये शेती हाच मुख्य व्यवसाय असल्यामुळे एकूण सामाजिक जीवन व जीवनशैली यावर कृषी क्षेत्राचा प्रभाव पडलेला दिसून येतो, कृषी व्यवसायाकाडूनच मानवी जीवनात मोठे बदल घडून आल्याचे दिसून येतात. भारतात १८व्या शतकापर्यंत सरंजामशाही अस्तित्वात होती आणि याच काळात युरोप राष्ट्र संकल्पना उदयास आली व सरंजामशाही संपुष्टात आली. भांडवलशाहीचा विकास मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे भांडवलशाही स्वरुपाची शेती उदयाला आली. आणि भारताचा विकास हा कृषी क्षेत्रामध्ये घडत गेलेल्या नवनवीन बदलांमुळेच कृषिक्षेत्र विकासाच्या दिशेने जातांना दिसून येतो.

**प्रास्ताविक**

भारतासारख्या विकसनशील देशांचा आर्थिक विकास हा देशातील कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. पण त्याही अगोदर कृषी क्षेत्राचा विकास होणे महत्वाचे दिसून येईल. भारतासारख्या देशामध्ये मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधन सामग्री उपलब्ध आहे. पण कमी प्रमाणात भांडवल उपलब्ध असल्यामुळे आणि कृषी क्षेत्रावर आधारित उद्योगांमध्ये कमतरता असल्यामुळे कृषी क्षेत्रांचा विकास कमी होतांना दिसून येतो. शिवाय मोठ्या प्रमाणात वाढती लोकसंख्या ह्यामुळे ह्या लोकसंख्येचा भार हा अप्रत्यक्षपणे कृषीवर येतो. ह्याच कारणामुळे सरकारने कृषी क्षेत्राशी संबधित नवीन योजना तयार करत राहते. आणि त्यांची अंबलबजावणी करण्याचा प्रयत्न सरकार करत राहते.

प्रसिद्ध अर्थतज्ञ कोल व हूवर यांच्या मते, देशाचा जर आर्थिक विकास घडवून आणायचा असेल तर सर्वात आधी त्या देशातील कृषी क्षेत्राचा विकास घडवून आणणे महत्वाचे ठरेल. ह्याचाच अर्थ असा कि, कृषी क्षेत्राचा विकास जर विकास झाला नाही तर उद्योग आणि सेवा क्षेत्राच्या विकासामध्ये अडथळे निर्माण होतात. म्हणूनच भारतामध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये भारताच्या विकासासाठी कृषी क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात भर दिल्याचे दिसून येते. या शोधनिबंधामध्ये **कृषी क्षेत्रातील बदल (नवीन योजना)** अभ्यासण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१) कृषी क्षेत्रातील विविध क्षेत्रामधील महत्व अभ्यासने.
२) कृषी क्षेत्राबरोबर ग्रामीण विकास, शेती विकास व आर्थिक विकास यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणे.
३) कृषी क्षेत्रातील शेती आणि शेतमजूर यांचा परस्पर सहसंबंध अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**

हा संशोधनपर शोधनिबंध हा संदर्भ ग्रंथ व पुस्तके यासारख्या दुय्यम साधन सामग्री वर आधारित आहे.

**कृषी क्षेत्रामधील महत्व**

भारत हा जगातील सर्वात मोठा खाद्य पदार्थ उत्पादक देश आहे. ह्यामध्ये जवळपास १.४० कोटी लोकसंख्येपैकी ६८ टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रित्या कृषी क्षेत्रामध्ये गुंतलेली आहे. जीडीपी मध्ये १९५० मध्ये कृषी क्षेत्राचा हिस्सा हा सुमारे १६ टक्क्यापर्यंत होता. तोच जीडीपी सन २०२१-२२मध्ये १९.५ टक्के जीडीपी आहे. म्हणजेच कृषी क्षेत्राचे उत्पादन १४९.९ दशलक्ष उत्पादन वाढल्याचे दिसून येते. शिवाय अल्पभूधारक शेतकरी आणि शेतमजूर वर्ग हे पूर्णतः कृषिक्षेत्रावरच अवलंबून आहे. म्हणजेच भारताच्या विकासामध्ये कृषी क्षेत्राचे योगदान आणि त्यातील बदल किती महत्वाचे आहे. हे दिसून येते.

**कृषी क्षेत्रामधील ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती**

कृषीक्षेत्रावर ग्रामीण भागामधील रोजगार निर्मितीत १९५१ मध्ये ७० दशलक्ष लोकसंख्या अवलंबून होती. तीच संख्या २०२० मध्ये १२० दशलक्ष इतकी वाढल्याचे दिसून येते. आजही भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ६९ टक्के लोक हे भारतातील ग्रामीण भागात वास्तव्य करतात. ह्या ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. तसेच शेतीवर आधारित व्यवसाय जसे की, पशुपालन, दुग्ध व्यवसाय, कुकुटपालन इ. शेतीला जोड व्यवसाय म्हणून महत्वाचे आहे. तसेच ग्रामीण भागातील भूमिहीन लोकांसाठी शेतमजुरी हे देखील रोजगाराचे मुख्य साधन आहे. २०११ च्या जनगणनेनुसार १२१.०२ कोटी असून, त्यापैकी ग्रामीण भागात ९.५९ कोटी इतका शेतकरी वर्ग आढळून आला. यामध्ये ७.३९ कोटी पुरुष शेतकरी २.२८ कोटी महिला शेतकरी आहे. देशात एकूण ८.६१ कोटी श्रमिक शेती क्षेत्रात काम करतात. यामध्ये ५.५२ कोटी पुरुष शेतमजूर असून ३.०९ कोटी महिला शेतमजूर म्हणून शेती क्षेत्रात काम करतात.

**कृषी क्षेत्रातील जोड व्यवसाय**

भारतामध्ये कृषीक्षेत्राला मोठ्या प्रमाणात महत्व दिले गेल्याचे दिसून येते. शिवाय कृषी क्षेत्रामध्ये जोड व्यवसाय हा महत्वाचा आहे. कारण लहान शेतकरी वर्गास आणि शेतमजुरांना शेतीबरीबर जोड उद्योग आणि व्यवसाय हे अधिक पैसे मिळवून देण्याचे काम करतात. भारतामध्ये सुमारे ८०.९५ लाख लोक हे पशुसंवर्धन, मत्स्यपालन, फळबागा यासारख्या व्यवसायांशी संबंधित आहे. यामध्ये २५ लाख महिलांचा समावेश असल्याचे आढळून येते. २००१ ते २०११ या कालावधीत २ कोटी २७ लाख इतकी शेतमजुरांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. या सर्वांना रोजगार हा शेती क्षेत्रातून उपलब्ध होतो. कृषी क्षेत्रामध्ये शेती क्षेत्राच्या आधारावर शेतकरी व शेतमजूर म्हणजेच एकूण ग्रामीण भागातील कुटुंबांना पूरक किंवा जोड व्यवसाय करता येतात. कारण लहान शेतकरी तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल कुटुंबांना हे पूरक व्यवसाय महत्त्वाचे असतात. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे ह्या लोकांकडे अत्यंत कमी प्रमाणात पैसा असतो. त्यामुळे कृषी क्षेत्रामध्ये कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय, भाजीपाला, फुले, फळे यांची लागवड करून त्यांची विक्री करून या व्यवसायातून ग्रामीण लोकांना चांगले उत्पन्न मिळते. आणि विशेष म्हणजे या उत्पादनासाठी विशेष खर्च करावा लागत नाही. व त्यांचा विकास होण्यास मदतही होते ह्यासाठी सरकारने आता शेतकरी ते ग्राहक असे केंद्र पण सुरु केल्याचे दिसून येते. ह्यामुळे शेतकरी वर्गाचा भाजीपाला किंवा इतर सामान हा कुठल्याही कमिशन शिवाय त्या शेतकरी वर्गास विकत येईल

**दारिद्र्य निर्मूलनातील कृषी क्षेत्राची भूमिका**

भारतामध्ये आज मोठ्या प्रमाणामध्ये दारिद्र दिसून येते. खास करून हे दारिद्र ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येते. स्वातंत्र भेटल्यानंतर भारतामध्ये मोठ्या प्रमाणात दारिद्र असल्याचे दिसून येत होते. साधारणत: ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त दारिद्रयाखाली लोक जगात होते. पण सन २०१५-१६ मध्ये २४.८ टक्के लोक दारिद्र रेषेखाली होती तीच २०१९-२० मध्ये १४.९ टक्के पर्यंत कमी झाल्याचे दिसून येते. ह्यामध्ये ग्रामीण भागामध्ये सर्वाधिक दारिद्र असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागामध्ये शेती शिवाय दुसरे कुठलेच रोजगाराचे साधन नसते त्यामुळे दारिद्र्य निर्मुलनामध्ये कृषी क्षेत्राचा विकास मोठ्या प्रमाणत घडवून आणला गेला पाहिजे. ह्यासाठी नवनवीन योजनाची

अंबलबजावणी केली गेली पाहिजे. शिवाय ग्रामीण भागामध्ये दारिद्रखाली अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर वर्ग ह्यांचा मोठ्या प्रमाणात समावेश होतांना दिसून येतो.

**पायाभूत सोयी सुविधांचा विकास**

भारत सरकारने आत्तापर्यंत कृषी क्षेत्रासाठी मोठ्या प्रमाणात विकास योजना आणल्याचे दिसून येते. त्याचा मुख्य उद्धेश हाच कि कृषी क्षेत्राचा विकास झा मोठ्या प्रमाणत व्हावा. ह्यामध्ये कृषी क्षेत्तील व्यवसाय आणि उद्योगांना मोठ्या प्रमाणात चालना मिळावी. शिवाय कृषी क्षेत्राचा पाया मजबूत व्हावा. आणि गुणवत्तापूर्ण उत्पादन शेतकरीवर्गाने काढावे.

राष्ट्रीय कृषी विकास हि योजना भारत सरकारने २०२४ मध्ये चालु केल्याचे दिसून येते. शिवाय मिशन कर्मयोगी योजना, कृषी उडण योजना, शिवाय पिक विमा योजना, शेतकरी पेन्शन योजना अशा विविध प्रकारच्या योजना आता राज्य आणि केंद्र सरकारच्या संयुक्त अंबलबजावणी केल्याचे दिसून येते.

**सारांश**

भारताच्या नियोजनाच्या सुरवातीपासूनच कृषी क्षेत्राला मोठ्या प्रमाणात अनन्यसाधारण महत्व आहे. भारतामध्ये शेती हे सर्वात महत्वाचे क्षेत्र असून भारतच्या अर्थव्यवस्थेचा कना म्हणून कृषी क्षेत्राकडे बघितले जाते. भारतामध्ये आजही शेती/कृषी क्षेत्राकडे जीवन जगण्याचा मार्ग म्हणून बघितले जाते. भारतामधील लोक शेतीकडे उपजीविका म्हणूनच बघत नाही तर शेतीवर तितकेच जीवापाड प्रेम सुद्धा करतात. आज भारताचा विकास मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येतो. तसेच कृषी क्षेत्राचा विकास झाल्याचे दिसून येतो. आज ग्रामीण भागामध्ये वेळेवर पिकांना पाणी देण्यासाठी लाईट उपलब्ध असते. शिवाय कृषी क्षेत्राशी संबधित योजनांची माहिती शेतकरी वर्गास माहिती मिळते. पण तरीही ग्रामीण भागातील विकास हा अत्यंत अल्प प्रमाणात दिसून येतो. त्याचे कारण असे कि, पायाभूत सुविधांचा अत्यंत विकास कमी प्रमाणात झालेला असल्यामुळे आणि दळणवळणाची साधने अत्यंत कमी रस्ते, लाईट, पाणी कुशल कामगार वर्ग इत्यादी गोष्ठीचा अभाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. ह्यासाठी सरकारने ह्या सर्व गोष्टीचा अभ्यास करून योजना आखून भारतामधील कृषी क्षेत्राचा विकास करण्यावर भर द्यावा. कृषी क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाल्याचे दिसून येतो.

**संदर्भ:**

१. कविमंडन विजय (२०१२)"कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र" मंगेश प्रकाशन नागपूर
२. चव्हाण एन.एल.( जुलै २०१९) "कृषी अर्थशास्त्र" प्रशांत पब्लिकेशन्स,जळगाव
३. सिघ कटार व शिशोदिया अनिल (२०१७) "ग्रामीण विकास" सेज पब्लिकेशन, दिल्ली
४. भारतीय जनगणना अहवाल २०११
५. योजना मासिक
६. शेतकरी मासिक

# आपत्ती व्यवस्थापनातील बदल

## प्रा. कविता जयराम दवंड काटकर

जीवनदीप शैक्षणिक संस्था संचालित , कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गोवेली. ता . कल्याण जि. ठाणे

**प्रस्तावना :**

२१ व्या शतकामध्ये विज्ञान - तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबरच अनेक प्रकारच्या आपतींमध्ये सातत्याने मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. आपत्ती काळामध्ये बचावकार्य करण्यासाठी योग्य तो निर्णय जलद गतीने घेणे आवश्यक असते. आपत्तीकाळातून बाहेर पडण्यासाठी योग्य त्या उपायोजना करणे गरजेचं असते. आपल्यावर येणाऱ्या आपत्ती या काही नैसर्गिक असतात तर काही मानवनिर्मित असलेल्या आपल्याला पाहायला मिळतात. आपल्या देशामध्ये सातत्याने नवनवीन आपतींमध्ये वाढ होत असल्याचे आपण पाहताच आहोत. देशामध्ये पुन्हा पुन्हा उद्भवणाऱ्या आपतींविषयी सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. अलीकडच्या काळात भारताने ज्या ज्या आपत्तीचा सामना केला. त्यांच्या मागे असणाऱ्या विविध कारणांचा आणि त्या आपतींवर असणाऱ्या उपायांचा खोलवर जाऊन अभयस करणे आज काळाची गरज बनत चालले आहे.आपत्ती निवारणाच्या क्षेत्रात गेल्या ३० वर्षांत आमूलाग्र बदल झाला आहे. आपत्तीबाबत पूर्वसूचनांची देवाणघेवाण होत आहे. आपत्ती कुठलीही असो, तिचा परिणाम समुदायावर होत असतो. संयुक्त राष्ट्रसंघाने शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आपत्ती निवारण हा महत्त्वाचा घटक आहे. २०३०पर्यंत आपत्तीचे प्रमाण कमी करण्याचे ध्येय ठेवण्यात आले असून समाजातील प्रत्येक व्यक्तीने त्यात सहभाग नोंदवणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले.

2020 ते 21 हे वर्ष सर्व जगाचं प्रचंड मोठी सत्वपरीक्षा पाहणारे ठरले कोरोनासारख्या भीषण संसर्गजन्य रोग आला आणि संपूर्ण जगात हाहाकार माजला कित्येक उद्योगधंदे बंद पडले लॉकडाऊनमुळे कुटुंबामध्ये दरमहा येणारा उत्पन्नाचा स्त्रोत थांबला पण खर्च थांबला नाही कोरोनासारखे आपत्ती भविष्यात केव्हाही येऊ शकते अशा प्रसंगांमध्ये जीवनाच्या नश्वरतेची प्रचिती येते यावर मात करण्यासाठी उपयोगी येते ते आपत्ती व्यवस्थापनाचे नियोजन.

**उद्दिष्ट्ये :**

1. आपत्ती म्हणजे काय व कसे करावे हे जाणून घेणे.
2. आपत्तीच्या काळात कराव्या लागणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती घेणे.
3. आपत्ती व्यवस्थापनाबाबत माहीती लोकांना करून देणे.

**आपत्ती व्यवस्थापन :**

- अचानक उदभवणाऱ्या संकटामुळे राष्ट्राची किंवा समाजाची मोठ्या प्रमाणात जीवित, आर्थिक आणि सामाजिक हानी होते, अशा संकटांना आपत्ती म्हणतात.
- लोकसहभाग आणि आपत्ती व्यवस्थापन यांचे फार आहे आपत्ती, आपतींना तोंड तयार असणे त्यासाठी क्षमता मिळवणे म्हणजे आपत्ती व्यवस्थापन होय.
- आपत्ती व्यवस्थापन या संकल्पनेत नियोजन, जबाबदारीचे, जोखमीचे, कामगिरीचे, व्यवहारात्मक, वित्तीय, संदेशवहनाचे आणि माहितीचे व्यवस्थापन इत्यादींचा समावेश होतो.
- आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ नुसार, सातत्यपूर्ण व एकात्मिक नियोजन प्रक्रिया, व्यवस्थित रचना, सहकार्य आणि आपत्तींच्या संभाव्य धोक्याला प्रतिबंध, आपत्तीतील धोक्यांची तीव्रता कमी करणे, क्षमता सबलीकरण, पूर्वतयारी, तत्पर प्रतिसाद, आपत्ती परिणामांची तीव्रता, व्यापकता पडताळून पाहणे, स्थलांतर, मदत व बचाव कार्य, पुनर्वसन व पुनर्रचना इत्यादी आवश्यक किंवा उपयुक्त उपायाची अंमलबजावणी म्हणजे आपत्ती व्यवस्थापन होय.

**आपत्तीचे दोन प्रकार आहेत :**

**(१) नैसर्गिक आपत्ती** : या आपत्तीमध्ये अतिवृष्टी, महापूर, भूकंप, त्सुनामी, वादळे, दरड कोसळणे, हिमपात, मानवी अविचार, नैसर्गिक रोगराई, वणवे, ज्वालामुखी उद्रेक, उल्कापात, वीज कोसळणे, अवर्षण इत्यादींचा समावेश होतो.

**(२) मानवनिर्मित आपत्ती :** चेंगराचेंगरी, आग, घरगुती अपघात, वायुगळती, इमारत कोसळणे, रेल्वे अपघात, हवाई अपघात, जलवाहतूक अपघात, अनुभट्टीतील किरणोत्सर्ग, युद्ध, अतिरेकी कारवाया, पर्यावरण ऱ्हास, माहिती तंत्रज्ञानाशीसंबंधित गुन्हे इत्यादींचा समावेश होतो.

**आपत्ती व्यवस्थापन काळाची गरज :**

आपत्तीपूर्व व्यवस्थापन, आपत्कालीन व्यवस्थापन आणि आपत्ती नंतरचे व्यवस्थापन हे आपत्ती व्यवस्थापनाचे महत्वाचे तीन टप्पे आहे.आज विज्ञानाने मोठी प्रगती केली आहे. अवकाशात सोडलेल्या उपग्रहांमुळे संभाव्य आपत्तीच्या भागांमध्ये धोक्याची पूर्वसूचना देण्यात येते. त्यामुळे आपत्ती कोसळल्यावर कमीत कमी नुकसान होते.उदाहरण दयायचे झाल्यास वादळ येणार असल्याने मासेमारांनी मासेमारीसाठी समुद्रात जाऊ नये.तसेच समुद्र काठावर राहणाऱ्या नागरिकांना आवाहन करण्यात येते.त्यामुळे आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना कराव्यात हे ठरविता येते.आपत्ती निवारणासाठी सुयोग्य संघटन निर्माण करण्यात येते.

आपत्कालीन व्यवस्थापन हा आपत्ती व्यवस्थापनाचा महत्वाचा टप्पा आहे.यामध्ये बचाव आणि शोध हा मार्ग आहे.यामध्ये आपत्ती पीडितांना त्या आपत्तीमधून सोडविण्यासाठी मदत केली जाते.यासाठी असलेल्या आपत्ती व्यवस्थापन दलाकडून आपत्तीग्रस्तांना त्वरित प्रतिसाद देण्यात येतो.त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी काम करण्यात येते. शासन प्रशासन यंत्रणेच्या जोडीने आपत्तीपूर्व,आपत्ती दरम्यान आणि आपत्ती पश्चात कोणकोणती कामे करावीत त्याचे नियोजन करते.केंद्र सरकार,राज्य सरकार आणि जिल्हापातळीवर जिल्हा प्रशासनाची स्वतंत्र यंत्रणा काम करीत असते. प्रत्येक पातळीवर प्राधिकरणाचे अधिकार, कार्यकक्षा आणि जबाबदाऱ्या निश्चित केलेल्या असतात.त्यांचे अधिकार आणि जबाबदाऱ्या देखील निश्चित केल्या जातात.अधिकार आणि जबाबदाऱ्यांचे काटेकोरपणे विभागणी झालेली असते.मंत्री आणि सचिव यांच्या पातळीवर निर्णय घेतले जातात.त्याची अंमलबजावणी अधिकाऱ्यांपासून ते अखेरच्या पातळीवरील शासन यंत्रणेला जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली कार्य करावे लागते.निसर्गनिर्मित आपत्ती टाळता येणार नाही.परंतु मानवनिर्मित आपत्ती टाळणे,तिची तीव्रता कमी करणे व त्यापासून होणाऱ्या हानीचे प्रमाण नक्कीच कमी करता येणे शक्य आहे. येणाऱ्या आपत्तीची चाहूल जर आपल्याला आधीच लागली तर त्याबाबत लोकांना वेळीच सावध करणे,होणारी हानी कमी करणे शक्य आहे. वैज्ञानिक प्रगतीमुळे आणि अवकाशात सोडलेल्या उपग्रहांमुळे आता त्सुनामी, वादळे, गारपीट, अतिवृष्टीचा अंदाज घेणे शक्य झाले आहे.पूर्व अंदाज घेऊन लोकांना त्याविषयी आधीच कल्पना देता येते. प्रशासन यंत्रणा कार्यक्षमतेने काम करीत असताना आणि लोकांनी अतिउत्साही न होता योग्य संयम दाखवून प्रशासनाला प्रतिसाद दिला तर आपत्तीवर मात करणे शक्य आहे.

आपत्ती निवारण व्यवस्थापनात जनतेशी योग्य प्रकारे संवाद साधून त्यांच्या मनातील भीती नाहीशी करणे हे नियंत्रण आणि कार्यक्षम अंमलबजावणीत महत्त्वाचे आहे. संपर्क यंत्रणेची भूमिकाही महत्त्वाची असते.आपत्ती व्यवस्थापन ही आज काळाची गरज झाली आहे.आपत्तीत आलेला प्रसंग निवारण्यासाठी सर्वाधिक गरज असते साधनसामग्रीची.आपत्तीतून लोकांचा बचाव व त्यानंतर त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी विविध प्रकारची साधनसामग्री आवश्यक असते. कोणत्या प्रकारची,कीती साधनसामुग्री हवी व ती तात्काळ कोठून मिळविता येईल याबाबतची माहिती नियंत्रण कक्षाजवळ असावी.नसली तर ती त्यांनी तात्काळ कोठून मिळविता येईल याबाबतची माहिती नियंत्रण कक्षाजवळ असली पाहिजे.जसे पोहणाऱ्या व्यक्तींची,सर्प मित्रांची, बिछायत केंद्र,सेवाभावी संस्था,दानशूर व्यक्तींची,रुग्णवाहिकांची आणि डॉक्टरांची अद्ययावत यादी आणि त्यांचे संपर्क क्रमांक उपलब्ध असले पाहिजे.

**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण संरचना :**

आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात शासन स्तरावर प्राधिकरणाची रचना केलेली आहे. राष्ट्रीय स्तरापासून ते गाव पातळीपर्यंत आपत्ती व्यवस्थापनाअंतर्गत नियंत्रण व निवारणाचे कार्य कसे चालते ते खालील ओघतक्त्यात दाखविले आहे. आपल्या देशात आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 संमत केला गेला आहे.


**आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 ची प्रगती**

23 डिसेंबर 2005 रोजी भारताच्या राष्ट्रपतींनी या कायद्याला मंजुरी दिली. 2005 च्या आपत्ती व्यवस्थापन कायद्यामध्ये 79 विभाग आणि 11 प्रकरणे आहेत. हा कायदा गृह मंत्रालयाला देशाच्या सर्वसमावेशक आपत्ती व्यवस्थापनावर देखरेख करणारे नोडल मंत्रालय देखील म्हणतो. आपत्ती निवारण आणि इतर तातडीच्या परिस्थितींसाठी निधीची स्थापना यासारख्या आर्थिक व्यवस्थेसाठी कायद्यात तरतूदींचाही समावेश आहे. हा कायदा राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हा स्तरावर आपत्तींच्या कार्यक्षमतेने हाताळण्यासाठी अनेक एजन्सी आणि संस्था तयार करतो. याव्यतिरिक्त, ते प्रत्येक स्तरासाठी "योजना" ऑफर करते.

DMA ने भारतातील आपत्ती व्यवस्थापन सुधारण्यात लक्षणीय प्रगती केली आहे. कायद्याने NDMA आणि SDMA ची स्थापना केली आहे. ते अनुक्रमे राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर आपत्ती व्यवस्थापनावर देखरेख करतात. या कायद्यामुळे राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हा स्तरावर आपत्ती व्यवस्थापन योजनांचा विकासही झाला आहे.

**डीएमएच्या अंमलबजावणीत झालेल्या प्रगतीची काही विशिष्ट उदाहरणे येथे आहेत:**

- अनेक नैसर्गिक आपत्तींसाठी पूर्व चेतावणी प्रणाली स्थापन करण्यात आली आहे.
- आपत्ती प्रतिसाद क्षमता सुधारली आहे. हे कर्मचारी प्रशिक्षण आणि उपकरणे खरेदीद्वारे आहे.
- आपत्तीग्रस्तांना मदत करण्यासाठी आपत्ती निवारण आणि पुनर्वसन कार्यक्रम राबविण्यात आले आहेत.
- आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण संरचना
- आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात शासन स्तरावर प्राधिकरणाची रचना केलेली आहे. राष्ट्रीय स्तरापासून ते गाव पातळीपर्यंत आपत्ती व्यवस्थापनाअंतर्गत नियंत्रण व निवारणाचे कार्य कसे चालते ते खालील ओघतक्त्यात दाखविले आहे. आपल्या देशात आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 संमत केला गेला आहे.




**भारतातील आपत्ती व्यवस्थापनामध्ये अनेक एजन्सींचा सहभाग आहे :**

1. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ( NDMA ): ही पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली भारतातील आपत्ती व्यवस्थापनाची सर्वोच्च संस्था आहे. हे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) पर्यवेक्षण आणि नियंत्रण करते.NDMA ने राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन योजना विकसित केली आहे. हे विविध भागधारकांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्यांची रूपरेषा देते.

2. राष्ट्रीय कार्यकारी समिती (NEC): यात भारत सरकारचे उच्च-प्रोफाइल मंत्री असतात. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन धोरणानुसार आपत्ती व्यवस्थापनासाठी राष्ट्रीय योजना राबविण्याची जबाबदारी NEC ची आहे.
3. राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (SDMA): प्रत्येक राज्याचे स्वतःचे SDMA असते, ज्याचे नेतृत्व मुख्यमंत्री करतात. SDMA राज्य पातळीवर आपत्ती व्यवस्थापनात मदत करण्यासाठी राज्य कार्यकारी समिती (SEC) सोबत काम करते.SDMA ने राज्य आपत्ती व्यवस्थापन योजना विकसित केल्या आहेत. हे प्रत्येक राज्याच्या विशिष्ट गरजांनुसार तयार केले जातात.
4. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (DDMA): DDMA चे नेतृत्व जिल्हाधिकारी किंवा समतुल्य प्राधिकरण करतात आणि त्यात स्थानिक सरकारचे निवडून आलेले प्रतिनिधी समाविष्ट असतात. जिल्हा स्तरावर NDMA आणि SDMA च्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले जाईल याची खात्री करणे ही त्याची भूमिका आहे.DDMA ने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन योजना विकसित केल्या आहेत. हे प्रत्येक जिल्ह्याच्या विशिष्ट गरजांनुसार तयार केले जातात.
5. स्थानिक प्राधिकरणे: पंचायती राज संस्था, नगरपालिका आणि नगर नियोजन प्राधिकरणे यांसारख्या स्थानिक प्राधिकरणे आपापल्या क्षेत्रातील नागरी सेवा नियंत्रित आणि व्यवस्थापित करण्यासाठी जबाबदार असतात.

**आपत्ती टाळण्यासाठी आणि कमी करण्यासाठी उपाय :**

- आपत्तींचे निवारण आणि शमन करणे हा आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग आहे. काही उपाय पुढीलप्रमाणे:
- गंभीर पायाभूत सुविधांची सुरक्षा: रस्ते, धरणे, पूल आणि पॉवर स्टेशन यासारख्या गंभीर पायाभूत सुविधांची नियमित तपासणी केली पाहिजे जेणेकरून ते सुरक्षिततेच्या मानकांची पूर्तता करत आहेत आणि आवश्यक असल्यास ते मजबूत आहेत.
- पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत विकास: शाश्वतता सुनिश्चित करण्यासाठी पर्यावरणीय विचार आणि विकासात्मक प्रयत्न एकमेकांशी जुळले पाहिजेत.
- हवामान बदल अनुकूलन: नैसर्गिक आपत्तींची वाढती वारंवारता आणि तीव्रता यासह हवामान बदलामुळे निर्माण होणारी आव्हाने, अनुकूलन आणि जोखीम कमी करण्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या धोरणांद्वारे संबोधित केले जावे.
- जोखीम मूल्यांकन आणि भेद्यता मॅपिंग: भौगोलिक माहिती प्रणाली (GIS), मॅपिंग आणि भेद्यता विश्लेषण यासारख्या साधनांचा वापर करून उच्च-जोखीम क्षेत्रे ओळखण्यासाठी आणि त्यांना संबोधित करण्यासाठी धोरणे विकसित करण्यासाठी आयोजित केले जावे.
- शहरी नियोजन आणि विकास: अनियोजित शहरीकरण रोखणे आणि नैसर्गिक ड्रेनेज सिस्टम राखण्यावर लक्ष केंद्रित करणे शहरी भागातील आपत्तींचा प्रभाव कमी करण्यास मदत करू शकते.
- या उपायांची अंमलबजावणी करून, भारत आपत्तींच्या परिणामांसाठी चांगल्या प्रकारे तयारी करू शकतो आणि
- कमी करू शकतो, समुदायांना अधिक सुरक्षित आणि अधिक लवचिक बनवू शकतो.

**आपत्तीचे परिणाम ((Effects of disaster**):

पुरांमध्ये रहदारीचे पूल वाहून जाणे, नदीकाठच्या गावांमध्ये पाणी शिरणे, अन्नाची तूट निर्माण होणे अशा समस्या निर्माण होतात तर, भूकंपामध्ये घरांची पडझड होणे, जमिनीला भेगा पडणे असे परिणाम दिसून येतात. वणवा, दुष्काळ या आपत्तीही पर्यावरणावर गंभीर परिणाम करून जातात. परंतु ह्या आपत्ती नेमक्या कशा स्वरूपाच्या असतात? त्या येण्यापूर्वी निसर्गात काही बदल घडून येतात का? आपत्ती ओढवल्यानंतर त्याचे परिणाम किती काळ टिकतात? कसे? या सर्वांचा विचार होणे गरजेचे असते. यामुळे आपल्याला आपत्तीच्या स्वरूपाची आणि व्याप्तीची कल्पना येते.

देशाच्या अर्थव्यवस्थेवर आपत्तीमुळे निश्चितच परिणाम होतो. पण तो आपत्ती व अर्थव्यवस्थेच्या सापेक्ष असतो म्हणजे बंदर उद्ध्वस्त झाले की, त्यांच्या पुन:उभारणीवर बराच निधी खर्च झाल्याने त्याचे अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होतात. आपत्तीचा सामाजिक नेतृत्वावरील परिणाम म्हणजे एखाद्या आपत्तीत स्थानिक नेतृत्व प्रभावी नसेल तर तेथील नागरिक दिशाहीन बनतात. याचा परिणाम त्यांच्या कार्यातील सहभागावर होतो.

**कोविड-19 -** दरम्यान जोखीम आणि नुकसान कसे कमी करावे आणि प्रकाश आपत्ती जोखीम कमी (DRR) फ्रेमवर्कमध्ये साथीच्या रोगादरम्यान आवश्यक प्रतिबंधात्मक उपाय कसे करावे याबद्दल देखील चर्चा केली होती. म्हणून या प्रकरणात विकसित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा उद्देश मूलभूत गरजांच्या पुरवठा उदा. आणीबाणीच्या वेळी पाणी, औषध, अन्न, वीज आणि दळणवळण. हे आपत्ती व्यवस्थापनासाठी योग्य आरोग्यसेवा पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेल्या देशाच्या अर्थसंकल्प किंवा सकल देशांतर्गत उत्पादन (GDP) च्या तुलनेत खर्चाचा अंदाज लावल आणि खर्च आणि फायद्याचे आर्थिक विश्लेषण करले.

**निष्कर्ष :**

- आपत्ती व्यवस्थापना विषयक जाणीव जागृती निर्माण करणे
- आपत्ती व्यवस्थापन विषयक अभिवृत्ते निर्माण करणे
- मानवी जीवनाचा धोका कमी करण्यासाठी प्रत्येकाने आपत्ती व्यवस्थापनात सक्रिय सहभाग घेतला पाहिजे

**सारांश :**

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए .पी.जे. अब्दुल कलाम यांनी देशाला स्वप्न दिल्या की 2020 पर्यंत भारत जागतिक महासत्ता होणार असा अंदाज त्यांचा होता त्यांच्या या स्वप्नासाठी स्वप्नांपूर्तीसाठी आपण भारतीयांनी आपत्ती व्यवस्थापनात आपले सहकार्य केले तर भारत खरंच महासत्ता होईल.

आपत्ती व्यवस्थापनाला भारताच्या धोरणात्मक चौकटीत महत्त्वाचे स्थान आहे कारण ते गरीब आणि वंचित लोक आहेत जे आपत्ती/आपत्तीमुळे सर्वात जास्त प्रभावित होतात. आपत्तींमुळे सामाजिक-आर्थिक विकास मंदावतो, पुढे, गरीबांना दरिद्री बनवते आणि दुर्मिळ संसाधने विकासापासून पुनर्वसन आणि पुनर्बांधणीकडे वळवतात. या सर्व घटकांमुळे भारताने शमन आणि अनुकूलन संसाधनांमध्ये संसाधनांची गुंतवणूक केली आहे.

आपत्ती काळात विविध शासकीय खात्यामधील समन्वय, शासकीय खाती व खाजगी संस्थांमधील किंवा स्वयंसेवी संस्थांमधील समन्वय, विविध शासकीय खात्यांमधील माहितीचे प्रसारण इत्यादी प्रशासकीय घटकांच्या भूमिका आणि प्रत्येक कामांची निश्चिती करण्यात आल्यामुळे प्रत्येक खाते हे आपल्यावर सोपविण्यात आलेले काम व्यवस्थितपणे पार पाडत असते. याशिवाय जागतिक स्तरावर काही संस्थाही आपत्ती व्यवस्थापनासाठी कार्यरत आहेत.

**संदर्भसूची :**

1. आपत्ती व्यवस्थापन - ए. पी. चौधरी अर्चना चौधरी
2. आपत्ती व्यवस्थापन - डॉ. शैलेजा भंगाळे
3. आपत्ती व्यवस्थापन - डॉ. रमेश व्ही. भोळे ,डॉ. प्रतिभा टी पाटील , डॉ.सहदेव एस. जाधव
4. आपत्ती व्यवस्थापन संकल्पना आणि कृती- कर्नल प्रा. प्र.प्र. मराठे, प्रा. व्ही. जे.गोडबोले
5. भारतातील आपत्ती व्यवस्थापन आणि प्रशासन - प्रीती दिलीप पोहेकर
6. https://mr.m.wikipedia.org>wiki
7. https://marathi.Indiatimes.com
8. https://easyiq.in

# शिक्षण क्षेत्रातील बदल नवीन शैक्षणिक धोरण 2020 - एक अभ्यास

**श्रीमती पाटील सत्वशिला गोरखनाथ**

**गोषवारा :**

एखाद्या व्यक्तीला पूर्वी माहित नसलेल्या बाबीची माहिती करून घेणे म्हण्जो शिक्षण, शिक्षणाने, व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा विकास होवून सामाजिक आणि राष्र्टय विकास साधता येतो. भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना शिक्षणांचा मूलभूत अधिकार दिला आहे. शिक्षणाचा अधिकार हा मानवाला सर्व अधिकार प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. शिक्षित व्यक्ती आपल्या हक्क प्रति जागरूक असतो आणि तो हक्क मिळवण्याचे प्रयत्न करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. "**शिका संघटीत व्हा व संघर्ष करा.**" यात त्यांनी मुनष्याच्या शिकण्यासला किंवा शिक्षणाला प्रथम स्थानी ठेवत महत्व दिले आहे. अशा मुलभूत हक्काच्या अंमलबजावणी साठी देशात विविध आयोग व धोरण स्थापन करण्यात आले.

1) आपल्या भारताच्या स्वातंत्र्यानंतर विश्व विद्यालय शिक्षा आयोग 1948-49 रोजी स्थापना झाली. अध्यक्ष सर्वपल्ली राधाकृष्णन होते. यात उच्च शिक्षणाची व्यवस्था, संरचना ची पाहणी, शिक्षणात आलेल्या समस्यांची माहिती सरकारला देणे इत्यादी कामे पाहत असे.
2) माध्यमिक शिक्षण आयोग किंवा मुदलियार आयोगाची स्थापना सन 1952-53 मध्ये करण्यात आली. यात माध्यमिक शिक्षणावर विशेष भर देण्यात आला.
3) भारतीय शिक्षण आयोग किंवा कोठारी आयोग यांची स्थापना सन1964-66 मध्ये करण्यात आली. यात सर्व शिक्षण प्रणाली लक्ष केंद्रित करून त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आहे.
4) इंदिरा गांधीजींच्या काळात 1968 साली पहिले शैक्षणिक धोरण जाहिर करण्यात आले. सन 1986 साली राजू गांधीजींच्या काळात दुसरे शैक्षणिक धोरण जाहिर करण्यात आले त्यानंतर सन 1992 मध्ये आचार्य राममूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कृती आराखडा स्थापन करण्यात आला. या समितीने दुसऱ्या शैक्षणिक धोरणाचा आढावा घेतला व काही शिफारशी केल्या. अटली बिहारी वाजपेयी यांच्या काळात सन 2002 साली 86 वी घटना दुरूस्ती करण्यात आली. तसेच त्यानंतर सन 2009 साली शिक्षण हक्क कायदा मंजूर करण्यात आला. या कायद्याची अंमलबजावणी सन 2023 पासून करण्यात आली.

अशा प्रत्येक धोरणात व आयोगात शैक्षणिक विकास होण्यासाठी बदल करण्यात आले. पण आता 21 व्या शतकात 34 वर्षानंतर नवीन शैक्षणिक धोरण 2020 जाहिर केले. यात देशाचा विकास इतर देशाबरोबरीने व्हावा. व्यावसायिक कौशल्य आणि वैज्ञानिक दृष्टिकोन कसा वाढेल याकडे लक्ष देण्यात आले. SEDG मधील उद्दिष्टये लक्षात घेवून 2030 पर्यंत विकासात्मक धोरण आवाश्यक ते लक्षात घेवून उपाययोजना करणे. वर्तमान पत्र , बातम्या उच्च शिक्षित व्यक्तीच्या चर्चा हे ऐकून मला नवीन शैक्षणिक धोरण 2020 याची माहिती करून घ्यावी. अशी जिज्ञासा मनात निर्माण झाली. आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण सर्वांना उपलब्ध होवू शकेल का? विविध क्षेत्रामध्ये संशोधन करून विकासात्मक बाबींना आपण दुजोरा देवू शकू का अशी अनेक कारणे नजरे समोर आली. यात वर्णनात्मक संशोधन पध्दती व विशेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्याचे ठरविले. त्यासाठी शिक्षण क्षेत्रातील बदल नवीन शैक्षणिक धोरण 2020 संदर्भात अभ्यास करण्याची आवड निर्माण झाली म्हणून हा संशोधन लेख लिहिण्याचे ठरवले आहे.

**महत्व व परिचय :**

आजच्या विज्ञान युगात शिक्षणाला महत्व प्राप्त झाले. शिक्षणामुळे विज्ञान व तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत आहे. हे युगच स्पर्धेचे आहे. या स्पर्धेच्या युगात टिकवून राहण्यासाठी सर्जनात्मक विचार कौशल्य आणि वैज्ञानिक

दृष्टीकोन प्रत्येक मुलांमध्ये निर्माण करण्याची शिक्षणात काही बदल करावे असे तज्ञ व्यक्तीना वाटू लागले. म्हणून नवीन शैक्षणिक धोरण तयार करणे आवश्यक वाटत आहे. हे जाणून NEP-2020 तयार करण्यात आले. 21 वे शतकातील सर्वात दूरदर्शी धोरण आहे असे मत शिक्षणमंत्री धर्मेन्द्र प्रधान यांनी मांडले. याद्वारे प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतांचा योग्य वापर, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण क्षमता विकास आणि शिक्षणाच्या माध्यमामध्ये परिवर्तन घडणार आहेच.

या धोरणातून राष्ट्राच्या आर्थिक व सर्वांगिण विकास साधणे यालाही प्राधान्य दिले आहे. डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षेतत खालील समितीने आखलेल्या या धोरणाच्या निर्मिती प्रक्रियेमध्ये विविध घटकांचा समावेश करण्यात आला. त्यात शिक्षक विद्यार्थी, पालक शिक्षण क्षेत्रातील तज्ञ यांच्याशी सर्वंकष चर्चेअंती धोरण अंतीम करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना आंतराष्ट्रीय शिक्षणाचा दर्जा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न या धोरणात करण्यात आला आहे. या सर्व बाबीबद्दल मनात कुतूहल निर्माण होवून याबद्दल माहिती घेवून अभ्यास करावा असे वाटू लागले.

**उद्दिष्टे :**

1) नवीन शैक्षणिक धोरण 2020 ची माहिती घेणे.
2) नवीन शैक्षणिक धोरण 2020 मध्ये कोणकोणते नवीन शैक्षणिक बदल झाले या संदर्भात अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती आणि कार्यवाही:**

भारताचा स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कोणकोणती राष्ट्रीय शैक्षणिक धोरणे झाली याचा आढावा घेवून 21 व्या शतकात तब्बल 34 वर्षानंतर नवीन शैक्षणिक धोरण 2020 याबद्दल माहिती घेवून अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीने करण्यात आला आहे. शोध निबंध हा दुय्यम साधनावर हा लिखित साहित्य संदर्भ शिक्षण मंत्रालय भारत सरकारची पीडीएफ , इंटरनेट, वर्तमानपत्र इत्यादी साधनाद्वारे शिक्षणात कोणते बदल केले हे जाणून त्या संदर्भातील धोरणाचे विश्लेषण करून निष्कर्ष मांडण्यात आले आहे. प्रस्तूत शोध निबंधाच्या निष्कर्षाला मर्यादा आहेत.

**NEP 2020 : शिक्षणात बदल**

1) **शालेय शिक्षणाची रचना व नवीन सुत्र :** या धोरणातील तरतुदीवर तीन व चौदा वर्ष वयोगटाचे विद्यार्थी शिक्षण हक्क कायद्याच्या कक्षेत आले आहेत. या पूर्वी हा वयोगट 6 ते 14 होता. शालेय शिक्षणाची रचना आता 5+3+3+4 केली आहे. 5 वर्ष मूलभूत शिक्षण यात नर्सरी,ज्युनिअर केजी, सिनिअर केजी, इयत्ता पहिली व दूसरी 3 वर्ष, प्राथमिक शाळा यात इयत्ता तिसरी ते इयत्ता पाचवी 3 वर्ष, माध्यमिक शाळा यात इयत्ता सहावी ते आठवी 4 वर्ष, माध्यमिक शाळा इयत्ता नववी ते बारावी असा समावेश केला आहे. तसेच इयत्ता तिसरीपर्यंत विद्याथ्याचे वाचन, लेखन आणि संख्याशास्त्र शिकण्याची क्षमता सुधारण्यासाठी निपूण भारत मिशन पाहिलीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तयारीसाठी, तीन महिण्याचा अभ्यासक्रम विद्या प्रवेश शिक्षण अध्ययनासाठीचे दिक्षा हे ऍप आणि माध्यमिक स्तरावरील शिक्षकांसाठी निष्ठा हा शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रम असे अनेक उपक्रम सरकारकडून आणण्यात आले आहे.

2) **भाषा, व्यावसायिक शिक्षण, तंत्रज्ञान आणि मुलांचे मानसशास्त्र.**

इयत्ता सहावीनंतर तीन भाषा शिक्षणपध्दती सुरू केली जाईल. ज्यात स्थानिक भाषेला प्राधान्य दिले जाईल. ज्या प्रदेशात हिंदी बोलली जात नाही त्या प्रदेशात हिंदी भाषा शिक्षणाला प्राधान्य दिले जाईल. आता पाचवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना केवळ मातृभाषा, स्थानिक भाषा आणि राष्ट्रीय भाषा शिकवली जाईल. उर्वरित विषय जरी तो इंग्रजी असला तरी एक विषय म्हणून शिकवला जाईल. व्यावसायिक शिक्षण शालेय शिक्षणात समाविष्ट केला जाईल. शाळांमध्ये असलेल्या हुशार मुलांना अपेक्षित शिक्षण मिळावे म्हणून राष्ट्रीय शिक्षण कार्यक्रमांतर्गत आठवड्याला पाच तासाचे अतिरिक्त शिक्षण पुरविले जाईल.

तसेच अपेक्षित क्षमतेपेक्षा मागे असलेल्या मुलांसाठी नियमित शाळेच्या वेळेत आणि वेळळेनंतरही उपाययोजनात्मक शिक्षण पुरविले जाईल. यासाठी विद्यार्थी शिक्षण प्रमाण 30:1 असे ठेवणे वाचनाला आणि त्यातून ज्ञानवृध्दीला प्राधान्य मिळावे म्हणून संपूर्ण देशात सार्वजनिक ठिकाण आणि शाळांमध्ये ग्रंथालय आणि वाचनकक्ष उभारणे. यात अन्य आभासी Virtual Lab विकसित करण्यात येतील. नॅशनल एज्यूकेशन टेक्नॉलॉजी कोरम म्हणतजेच राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच या स्वायत्त संस्थेची निर्मिती करण्यात येणार आहे.

3) **विद्यार्थ्यांच्या विकासासाठी मूल्यमापनात परिवर्तन:**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानूसार बोर्डपरिक्षेचे महत्व कमी करण्यात आले आहे. आता बोर्ड परीक्षा फक्त 12 वी मध्ये द्यावी लागेल. तर यापूर्वी दहावीची बोर्ड परिक्षा देणे बंधनात्मक होते ते आता होणार नाही. 9 वी व 12 वीच्या सत्र परिक्षा असतील. पाठांतर करून उत्तर लिहण्याऐवजी दैनंदिन उपयुक्त ज्ञानावर आधारित परिक्षा असेल विज्ञान व कला अशा वेगळ्या शाखांतील विषय एकत्र घेवून शिकता येतील. त्यामुळे आंतरशाखीय शिक्षण सुरू राहतील तसेच नवीन शैक्षणिक धोरणामुळे जुने प्रगतीपुस्तक फक्त गुण व शिक्षकांचे शेरे न देता स्वत: विद्यार्थी, सहविद्यार्थी व शिक्षक यांनी मूल्यमापन करावयाचे आहे.त्या आधारावर विद्यार्थ्यांच्या जीवन कौशल्यांचा विकास करता येईल.

4) **एकच नियामक मंडळ :**

हा एक मोठा निर्णय नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात घेण्यात आला आहे. सध्या उच्च शिक्षणातील विविध अभ्यासक्रमासाठी वेगवेगळ्या नियामक संस्था कार्यरत आहे. त्याऐवजी एकच नियामक मंडळ असेल. अमेरिकेप्रमाणे भारतातही संशोधकाला महत्व देणे व त्याचा दर्जा सुधारण्यासाठी राष्ट्रीय संशोधक संस्था स्थापन केला जाईल. केवळ विज्ञान नव्हे तर समाजशास्त्रातील संशोधनालाही वित्तीय मदत केली जाईल. देशातील उच्च शिक्षणाचा दर्जा आंतरराष्ट्रीय स्तरावर नेला जाईल. त्यातून परदेशी दर्जेदार शिक्षण संस्थानातील विद्यार्थ्यांची संवाद वाढेल व शैक्षणिक देवाण-घेवाणही होवू शकेल. यामूळे सुसंगत पध्दती अस्तित्वात येणार आहे.

5) **एकसमान क्रेडिट पध्दती :**

1. पदवीच्या पहिल्या वर्षी प्रवेश घेण्याचा विद्यार्थ्यांना क्रेडिट गुणांकन पध्दतीनुसार अभ्यासक्रम शिकवला जाणार म्हणजे प्रत्येक विषयांचे क्रेडिट निश्चित केले जावून त्यात एकसमानता आणली जाणार म्हणजे राज्यातील सर्व विद्यापीठांच्या महाविद्यालयात विषयांचे क्रेडिट एकसमान असणार आहे.
2. चार वर्षाच्या पदवीचा पर्याय : येत्या शैक्षणिक वर्षापासून चार वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमाचा पर्याय विद्यार्थ्यांना असेल याला अनर्स पदवी असे म्हटले जाईल. तीन वर्षाचा पदवी अभ्यासक्रमात कायम राहील.
3. मल्टीपल एन्ट्री आणि मल्टीपल एक्झीट पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण सुरू असतांना काही विद्यार्थ्यांना मध्येच शिक्षण सोडून पून्हा प्रवेश घेवून आपल शिक्षण पूर्ण करता येणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांना सात वर्षाची मुदत दिली जाणार आहे.
4. चार वर्षाच्या पदवी अभ्यासक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना चार वर्षाची पदवी मिळवता येणार आहे. म्हणजे आर्टस् , सायन्स आणि कॉमर्स हा तीन वर्षाचा पदवी अभ्यासक्रम आणि विद्यार्थ्यांचा त्यांनी एका विषयावर चौथ्या वर्षी 8 सेमीस्टर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना ऑनर्स पदवी मिळेल यासाठी 160 आणि कमाल 176 क्रेडिटसची आवश्यकता असेल चार वर्षाच्या बहू विद्याशाखीय पदवी अभ्यासक्रमाच्या रचनेसोबत कधीही प्रवेश घेण्याच्या आणि पडण्याचा पर्यायासह पाच वर्षाच्या एकात्मिक बहु-विद्याशाखीय पदव्युत्तर (मास्टर्स) अभ्यासक्रम पूर्ण करण्याचाही पर्याय असेल.

5. **ऑनर्स पदवीनंतर मास्टर्स पदवी:**

   तीन ऐवजी चार वर्षाची ऑनर्स पदवी मिळवल्यानंतर मास्टर्स शिक्षणासाठी अभ्यासक्रम कसा असेल असाही प्रश्न आहे. तर त्यासाठी ही एक महत्वाचा बदल नवीन धोरणात करण्यात आला आहे. विद्यार्थ्याने तीन वर्षाचा पक्षी अभ्यासक्रम पूर्ण करत बॅचलर पदवी मिळवली असेल. तर चालू पदव्यूत्तर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी दोन वर्ष किंवा चार सेमिस्टर पूर्ण कराव्या लागतात. यानंतर पदव्युत्तर पदवी किंवा मास्टर्स डिग्री मिळेल. हा पारंपारिक पर्याय कायम राहणार आहे. परंतू पदव्युत्तर शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना केवळ चार वर्षांनी ऑनर्स पदवी एक वर्ष किंवा दोन सेमिस्टर पूर्ण कराव्या लागतील जे चार वर्षाच्या ऑनर्स डिग्रीनंतर केवळ एक वर्षात मास्टर्स डिग्री ही मिळवता येणार आहे.

   पदवीच्या विषयासोबत इतर शाखेतील विषयाचे शिक्षण या नवीन शैक्षणिक धोरणानुसार घेण्यात येणार आहे.
6. NEP2020 धोरणानुसार विद्यार्थ्यांना एमफील करावे लागणार नाही. म्हणजेच रिसर्च करण्यासाठी पदवी अधिक एक वर्षाचा मास्टर्स अभ्यासक्रम अशी चार वर्षाची पदवी असेल तर ते पेट परिक्षा देवून Ph.D करू शकतील.
7. उच्च शिक्षणामध्ये Higher Education 2020 पर्यंत एकूण सकल पर नोंदणी Gross Enrolment Ratio @ 20.35 पर्यंत 50% पोहचवण्यासच उद्दिष्ट आहे.
8. सर्व सरकारी (Government and Private) आणि मान्यता प्राप्त संस्थांसाठी Deemed University समान नियम असतील.
9. लॉ आणि मेडीकल शिक्षण वगळता उच्च शिक्षण एका छताखाली येणार आहे. शिक्षणातीलग गुंतवणूक जीडीपीच्या 6% करणार आहे.

**निष्कर्ष व शिफारशी :**

1) नवीन शैक्षणिक धोरणात बदल दिसून येतात.
2) शालेय शिक्षणाच्या रचनेत बदल व नवीन सुत्र दिसून आले.
3) मुलांचे मनसशास्त्र लक्षात घेवून व्यावसायिक शिक्ज्ञण व तंत्रज्ञान शिक्षण यात बदल दिसून आले आहेत.
4) विद्यार्थ्यांच्या विकासासाठी मूल्यामापनात परिवर्तन व एकच नियमक मंडळ ठेवले आहे हे ही बदल दिसून आले आहे.
5) एफफील करावे लागणार नाही चार वर्षाचा मास्टर्स अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतरचे Ph.D करता येते व त्या बरोबरच NEF द्वारे संशोधनाला चालना दिली आहे हे बदल दिसून आले.
6) एकसमान क्रेडिट पध्दतीचा वापर, चार वर्षाचा पदवी अभ्यासक्रम , मल्टीपल एन्ट्री आणि मल्टिपल एक्झीट ऑनर्स पदवी नंतर मास्टर्स पदवी हे बदल दिसून येतात.
7) बहुभाषिक शिक्षणाला प्राधान्य देने हे बदल दिसून येतात की Gross Enrolment Ratio @20.35 पर्यंत 50% पोहचण्याचे उद्दिष्ट आहे हे बदल दिसून येतो.
8) अभासी लॅब विकसित केली जाणार हे बदल दिसून येत आहे.
9) सर्व सरकारी खाजगी टिम विद्यापीठ यांना नियम समान असतील हे दिसून येते.

**संदर्भ सुची :**


1) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार PDF.
2) वृत्तपत्रांची कात्रणे.
3) BBC ---------- N++P://www.bhc.com articles NEP2020 प्राथमिक व माध्यमिक शिक्षणसंदर्भात असलेल्या धोरणाचा अभ्यास

# शिक्षण क्षेत्रातील बदल नवीन शैक्षणिक धोरण 2020

संशोधक

**भारती रंगनाथ भगत**

लोयोला हायस्कूल, पाषाण रोड, पुणे.

**प्रस्तावना -**

राष्ट्रसमोर असणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी मनुष्यबळ हे सर्वात महत्त्वपूर्ण संसाधन आहे. याचाच अर्थ जर राष्ट्रातील नागरिक सक्षम असतील तर ते राष्ट्र आव्हानांच रूपांतर संधीमध्ये करू शकत. त्यामुळे राष्ट्रातील नागरिक हे सक्षम बनवणे अत्यंत गरजेचं असतं. नागरिकांना सक्षम बनवण्याचे एकमेव साधन म्हणजे शिक्षण होय. याच उद्देशाने प्रत्येक राष्ट्र आपलं राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरवत असतं.

आपल्या राष्ट्रासमोर बेरोजगारी, शिक्षण, पेयजल, भ्रष्टाचार, महागाई, ऊर्जा, पर्यावरण इत्यादी समस्या आहेत. या सर्व समस्यांचे मूळ हे कुठेतरी शिक्षणात रुजलेल आपल्याला दिसतं आणि त्यासाठीच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची पायाभरणी करण्यात आलेली आहे. भारतात सर्वात पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1968 साली राबविण्यात आले. त्यानंतर दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 साली राबविण्यात आले. याच धोरणात 1992 सली काही सुधारणा **करण्यात आल्या आणि ते आजतागायत कार्यरत आहे.**

**उद्दिष्टे** -

१) आधुनिक भारताच्या समस्या निराकरण करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण अवलंबिले आहे.

२) विद्यार्थी व शिक्षक यांच्या क्षमता वाढीस लागतील.

**आवश्यकता -** मागील 34 वर्षांपासून राष्ट्राच्या शैक्षणिक धोरणामध्ये अमूलाग्र बदल झालेला आढळून येत नाही. याउलट देशाच्या व नागरिकांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक गरजा मात्र क्रांतिकारी रूपाने बदलत आहेत. त्यातूनच राष्ट्रसमोर अनेक आव्हान आणि संधी निर्माण होत आहेत. भविष्यातील या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आणि येणाऱ्या संधींचा उपयोग करून घेण्यासाठी राष्ट्रातील नागरिकांना कुशल बनवणे अत्यंत गरजेचे आहे. ही बाबी लक्षात घेऊन नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची पायाभरणी करण्यात आलेली आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 –** बदल ( National Education Policy 2020 and changes ) के कस्तुरी रंगन यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चा मसुदा निर्माण करण्यात आला. प्रदीर्घ कालावधीनंतर भारताच्या शैक्षणिक धोरणामध्ये एवढा मोठा अमुलाग्र बदल होताना दिसतो आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे मुख्यतः सहा घटकांमध्ये विभागले जाऊ शकते.

१) शालेय शिक्षण

२) उच्च शिक्षण

३) भाषा

४) तंत्रज्ञान

५) अर्थविषयक बाबी

६) अमलबजावणी.

यातील प्रत्येक टप्प्यावर मूलभूत बदल करण्यात आल्याचे आढळते. जसे की , शिक्षणाच्या आकृतीबंधामध्ये झालेला बदल, अभ्यासक्रमातील बदल, अध्यापन पद्धतीतील अपेक्षिलेले बदल, शिक्षक भरती व पात्रतेविषयीचे बदल, शिक्षण प्रक्रियेत तंत्रज्ञानाची जोड इ.

शिक्षण व्यवस्थेतील घटक म्हणून प्रशासन, शिक्षक ,विद्यार्थी , पालक , व्यवस्थापन, इत्यादींना अनेक बदलांना सामोरे जावे लागेल. अर्थातच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे आपल्या सोबत काही संधी आणि आव्हान घेऊन आलेला आहे, त्याची चर्चा पुढील प्रमाणे करता येईल.

**रा.शै.धोरण २०२० आणि संधी ( NEP 2020 and opportunities )**

**विद्यार्थ्यांसाठी संधी ( Opportunities for students )**

१) **दर्जेदार शिक्षण**: शालेय शिक्षणापासून तर उच्च शिक्षणापर्यंत शैक्षणिक दर्जा उंचावण्यावर या शैक्षणिक धोरणात भर दिल्यामुळे दर्जेदार शिक्षण मिळण्याची संधी निर्माण होते.

२) **बाल्यावस्थेत लाभ:** बाल्यावस्थेतील प्रारंभिक शिक्षणाचा शालेय शिक्षणाच्या आकृतीबंध मध्ये समावेश केल्यामुळे बाल्यावस्थेपासून अतिशय उत्तम दर्जाचे शिक्षण मिळण्याची संधी निर्माण होते.

३) **आवडीनुसार शिक्षण:** अभ्यासक्रम निवडीच्या लवचिक धोरणामुळे या शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थी त्यांच्या आवडीनुसार व गरजेनुसार शिक्षण घेऊ शकतात.

४) **तंत्रज्ञान कुशलता :** पूर्व माध्यमिक स्तरावर कोडिंग व माध्यमिक स्तरावर आर्टिफिशियल इंटेलिजन्स यासारखे विषय शिकवले जाणार असल्यामुळे विद्यार्थी तंत्रज्ञान कुशल बनविण्यास संधी मिळते.

५) **रोजगारक्षम कौशल्य विकसन:** प्रात्यक्षिक व अनुभवावर आधारित अध्ययन अध्यापनास प्रोत्साहन देण्याच्या धोरणामुळे रोजगारास सक्षम बनवणाऱ्या कौशल्यांचा विकास करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळते.

६) **सोयीनुसार शिक्षण:** ऑनलाइन किंवा ऑफलाइन यापैकी कोणत्याही माध्यमातून शिक्षण घेण्याची संधी विद्यार्थ्यांना निर्माण करून दिली जाते, त्यामुळे या धोरणाच्या माध्यमातून विद्यार्थी स्वतःच्या सोयीनुसार व वेळेनुसार शिक्षण घेऊ शकतात.

७) **शिष्यवृत्ती** : गुणवत्ता विकासासाठी व सर्वांना समान शैक्षणिक संधी निर्माण करण्यासाठी विविध शिष्यवृत्तीचे प्रयोजन या शैक्षणिक धोरणात करण्यात आले आहे त्यातून शैक्षणिक गुणवत्ता विकासाची संधी निर्माण होते.

८) **बहुभाषिकत्व:** मातृभाषेबरोबरच शालेय स्तरावर किंवा उच्च शिक्षणामध्ये परराष्ट्रीय भाषांचे शिक्षण घेण्याचे धोरण बहुभाषिक बनण्याची संधी निर्माण करते.

**शिक्षकांसाठी संधी ( Opportunities for teachers)**

१) **गुणवंतास संधी :**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षक पात्रता व निवड प्रक्रियेत गुणवत्तेवर अधिक भर दिल्याचे आढळून येते, त्यामुळे गुणवंत व्यक्तीस शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याची संधी मिळते.

२) **रोजगाराची संधी :** जास्तीत जास्त मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी नवीन शैक्षणिक संस्थांची उभारणी करणे या धोरणात अपेक्षित आहे. त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगाराची संधी निर्माण होते.

३) **व्यावसायिक विकासाची संधी:** शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तीने सातत्याने आपला व्यवसायिक विकास करत गेले पाहिजे हे या धोरणात अपेक्षित आहे. तसेच त्यास पूरक संधी सुद्धा या धोरणामध्ये अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.

४) **आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी:** विविध शैक्षणिक विभागांची किंवा संस्थांची क्लबिंग करून शिक्षकांस राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी निर्माण करून दिली.

५) **नवोपक्रमास वाव:** विविध अध्यापन पद्धती व तंत्रज्ञानाची साथ घेऊन शिक्षकास नवोपक्रम राबवण्यास व गुणवत्ता विकास करण्यास संधी निर्माण करून देण्यात आली आहे.

६) **संशोधन व गुणवत्ता विकास**: संशोधन कार्यास विविध माध्यमातून निधी उपलब्ध करण्याचा प्रयत्न या धोरणाच्या माध्यमातून केला जाणार असल्याची लक्षात येते, त्यामुळे संशोधन व गुणवत्ता या दोन्ही कार्यात गतिमानता येते.

**रा.शै.धो.२०२० आणि आव्हानं ( NEP 2020 and challenges )**

**विद्यार्थ्यांसमोरील आव्हानं ( Challenges for students )**

१) **समायोजन साधने:** जे विद्यार्थी जुन्या शैक्षणिक धोरणातील अभ्यासक्रमानुसार काही वर्षांपासून शिकत आहेत त्यांना नवीन शैक्षणिक धोरणातील बदलानुसार अभ्यासक्रमाशी व शिकण्याच्या पद्धतीशी समायोजन साधने आव्हानात्मक ठरतं.

२) **भौतिक साधन :** कोडींग ,आर्टिफिशियल इंटेलिजन्स यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली जाणार आहे , हे कामकाज करत असताना त्यांना कम्प्युटर, लॅपटॉप , इंटरनेट इत्यादी सारख्या भौतिक साधनांची आवश्यकता पडणारच. ही साधने उपलब्ध करणे हे नक्कीच एक आव्हान विद्यार्थ्यांसमोर असेल.

३) **सायबर सिक्युरिटी :** ऑनलाइन माध्यमातून विविध विषयांचे अध्ययन करताना विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रकारच्या एप्लीकेशन व वेबसाईटचा उपयोग करावा लागतो त्यात विद्यार्थी उद्दिष्टापासून भटकण्याची शक्यता असते, त्यामुळे सायबर सिक्युरिटी हे अत्यंत मोठ आव्हान ठरू शकत.

**शिक्षकांसाठी आव्हान ( Challenges for teachers )**

१) **शिक्षक शिक्षण:** नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अपेक्षित असलेले शिक्षण शाळा आणि महाविद्यालयातून देण्यासाठी त्यास अनुकूल अशी शिक्षक निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षकाच्या शिक्षणामध्ये अमुलाग्र बदल करणे गरजेचे आहे.

२) **अद्ययावत तंत्रज्ञान :** शिक्षकांना नवीन शैक्षणिक धोरणानुसार अध्यापन करण्यासाठी तंत्रज्ञानाचे अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक आहे आणि सद्यस्थितीमध्ये मोजक्या प्रमाणात तंत्रज्ञानाचा अध्यापनात उपयोग केला जातो. त्यामुळे तंत्रज्ञान शिकणे हे आव्हानात्मक कार्य ठरू शकत.

३) **निवड प्रक्रिया :** शिक्षकाच्या निवड प्रक्रियेत अधिक पारदर्शकता व गुणवत्तेची अपेक्षा हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण करते त्याअर्थी निवडीची प्रक्रिया ही सुद्धा तेवढीच काठीन्य पातळी असणारी राबवली जाण्याची शक्यता आहे.

शिक्षणाच्या विविध घटकांपैकी केवळ विद्यार्थी व शिक्षक लक्षात घेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासमोरील संधी व आव्हानांची मांडणी केली. त्याचप्रमाणे शासन प्रशासन, संस्थापक, अभ्यासक्रम निर्मिती मंडळ, पालक यांच्यासमोर सुद्धा हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विविध संधी व आव्हाने घेऊन येऊ शकत.

देशातील सर्वसामान्य नागरिक ,शिक्षक ,विद्यार्थी , प्रशासनातील अधिकारी, शिक्षण तज्ञ अशा सर्वांगीण मतांचा विचार करून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चा मसुदा तयार करण्यात आलेला आहे. यात त्रुटी राहणार नाही या दृष्टिकोनातून पुरेपूर प्रयत्न करण्यात आल्याचे दिसून येते, असे असून सुद्धा आपल्या भारत देशाची भौगोलिक व सामाजिक विविधता लक्षात घेता काही आव्हानात्मक स्थिती निर्माण होऊ शकते. परंतु या स्थितीकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिल्यास त्यावर मात करून एक सुवर्णसंधी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. आपल्या भारताचे माजी राष्ट्रपती तथा महान वैज्ञानिक डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम हे असं म्हणाले आहेत, “Obstacles are Opportunities” अर्थात अडथळे हे संधी असता.

**सारांश** - नवीन राष्ट्रीय धोरण २०२० शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देणारे ठरेल व शिक्षण क्षेत्राला प्रोत्साहन मिळेल विद्यार्थी व शिक्षक यांच्या माध्यमातून देशाचा विकास करण्यासाठी हे धोरण अवलंबिले आहे त्याची अंमलबावणीही लवकरच करण्यात येईल.

**सदर्भसूची -**

1.शिक्षण मंत्रालय · 2023 — नवीन शैक्षणिक धोरण (NEP) 2020

2. aplamitra.com

# The Group Of Twenty (G20)

**प्रा. मीना लक्ष्मण मुळीक**

**प्रा. मयुरी विद्याधर कांबळे**

जीवनदीप आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, गोवेली, तालुका- कल्याण, जिल्हा- ठाणे 421301

**प्रस्तावना :**

वीस गट (जी20) हा आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्याचा प्रमुख मंच आहे. हे सर्व प्रमुख आंतरराष्ट्रीय आर्थिक मुद्द्यावर जागतिक वास्तुकला आणि प्रशासनाला आकार देण्यामध्ये आणि मजबूत करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते G20ची स्थापना 1999 मध्ये अशाही आर्थिक संकटानंतर अर्थमंत्री आणि सेंट्रल बँक गव्हर्नर यांच्यासाठी जागतिक आर्थिक आणि आर्थिक समस्या वर चर्चा करण्यासाठी एक मंच म्हणून करण्यात आली. भारताने 1डिसेंबर 2022 ते 30 नोव्हेंबर 2023 पर्यंत G20चे अध्यक्ष पद भूषविले. "वसुदेवकुटुंबकम "किंवा "एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य "अशी थीमने g20 आपल्या कार्याला सुरुवात करत आहे.

2007 च्या जागतिक आर्थिक आणि आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर G20 चे राज्य /सहकार प्रमुखांच्या स्तरावर सुधारणा करण्यात आली आणि 2009 मध्ये आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्यासाठी प्रमुख मंच म्हणून नियुक्त करण्यात आले .G20शिखर परिषद दरवर्षी फिरते अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली आयोजित केली जाते जी 20ने सुरुवातीला मोठ्या प्रमाणात व्यापक आणि आर्थिक मुद्द्यावर लक्ष केंद्रित केले. परंतु त्यानंतर त्याने व्यापार शाश्वत विकास, आरोग्य, कृषी, ऊर्जा, पर्यावरण हवामान बदल आणि भ्रष्टाचारा विरोधी यांचा समावेश असलेल्या इतर गोष्टीसह आपला गोल विस्तारला आहे.

भारताने G20 मध्ये आफ्रिकन युनियन ला कायमस्वरूपी सदस्यत्वाचा दर्जा मिळावा यासाठी प्रस्ताव मांडला आणि या प्रस्तावाला सर्व सहभागी राष्ट्रांचा एकमताने पाठिंबा मिळाला. म्हणून आफ्रिकन युनियन ला g20 चा स्थायी सदस्य म्हणून स्वीकारण्यात आले. जागतिक अर्थव्यवस्थेतील घडामोडींना प्रतिसाद म्हणून G20 अजेंडा एकत्र आणण्यासाठी जबाबदार आहे. G20च्या गटात 19 देशांचा समावेश आहे अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, जर्मनी, फ्रान्स, भारत, इंडोनेशिया, इटली, जपान, कोरिया प्रजासत्ताक, रशिया, मेक्सिको, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, तुर्की, (संयुक्त राष्ट्र किंग्डम आणि युनायटेड स्टेटस )तसेच दोन प्रादेशिक संस्था: युरोपीय युनियन आणि आफ्रिकन युनियन (2023 पर्यंत). G20 सदस्य जागतिक जीडीपीच्या सुमारे 85% जागतिक व्यापाराच्या 75 टक्के पेक्षा जास्त आणि जगाच्या लोकसंख्येच्या सुमारे 2/3प्रतिनिधित्व करतात .

G20 बांगलादेश, इजिप्त, मॉरिशस, नेदरलँड, नायजेरिया, ओमान, सिंगापूर, स्पेन, UAE या देशांनाही G20 मध्ये आमंत्रित केले. तसेच 2023 मध्ये G20आंतरराष्ट्रीय संस्थांना सहभागी करून घेतले उदाहरणार्थ WB, WHO, WTO, UN आणि प्रादेशिक संघटनांचे अध्यक्ष व्यतिरिक्त भारत G20अध्यक्ष म्हणून ISA ला आमंत्रित करेल. CDRI आणि ADB अतिथी म्हणून IOs ला आमंत्रित करेल.

**G20ची कार्य:**

- 1.G20 चे अध्यक्ष पद एका वर्षासाठी जी 20चा अजेंडा चालवते आणि शिखर परिषदेचे आयोजन करते.G20 मध्ये दोन समांतर ट्रॅक आहेत .फायनान्स ट्रॅक जो वित्त मंत्री आणि सेंट्रल बँक गव्हर्नर वित्त ट्रॅकचे नेतृत्व करतात आणि शेर्पा ट्रॅक जो वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नेतृत्व जी 20 नेत्यांचे वैयक्तिक दूत करतात आणि वाटाघाटीवर देखरेख करतात .शिखराचा अजेंडा बनविणाऱ्या मुद्द्यांवर चर्चा करतात आणि बहुतेक कामाचे समन्वय साधतात.

- 2 जी ट्वेंटी चे नेतृत्व करण्याची संधी वाढलेल्या अस्तित्वाच्या धोक्याच्या पातळीला आली आहे. कारण कोविड-19 साथीच्या रोगाने हवामान बदलाच्या व्यापक प्रभावादरम्यान आपल्या प्रणालींच्या असुरक्षा उघड केल्या आहेत. हवामान बदलाचा मुद्दा लक्षात घेता हवामान बदल उद्योग ,समाज ,आणि सर्व क्षेत्रांमध्ये व्यापतो .यामुळेच भारताने जगाला पर्यावरणाची जीवनशैली कशी आहे याची ओळख करून दिली जी आपल्या देशाच्या समृद्ध ,प्राचीन ,आणि दीर्घकालीन वारसाचे प्रतिबिंबित करते.
- 4.जलद लवचिक आणि सर्वसमावेशक वाढ हा शाश्वत विकासाचा आधारस्तंभ आहे. आपल्या जी 20अध्यक्ष पदाच्या काळात भारताने अशा क्षेत्रावर लक्ष केंद्रित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे ज्यामध्ये संरचनात्मक बदल घडवून आणले जाऊ शकतात .उदाहरणार्थ व्यवसायाची भावना विकासाकडे आणणे ,कामगार हक्कांना चालना देणे ,आणि कामगार कल्याण सुरक्षित करणे ,जगभरातील कौशल्यांमधील अंतर भरून काढणे, इत्यादी.
- 5भारताला अशा आहे की जी 20 फोरमचा उपयोग सर्व समावेशक वाढ आणि प्रगतीसह महिला सशक्तिकरण आणि त्यांचे प्रतिनिधित्व ठळक करण्यासाठी लक्ष केंद्रित केले.

नुकत्याच आयोजित केलेल्या g20 च्या बाली शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की हे युद्धाचे युग नाही. यातून मोदींची भक्कम परराष्ट्र धोरण आणि दूरदृष्टी दिसते .14 वर्षांपूर्वी आशियाई आर्थिक संकटामुळे आर्थिक विकासाचा दर मंदावला होता तेव्हा जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला होता आणि पुन्हा अर्थव्यवस्था 2020 पासून आर्थिक संकटातून जात आहे या संकटाच्या काळी जी 20 ची भूमिका फार मोलाची ठरली .जागतिक अर्थव्यवस्थापनासाठी जगाच्या अर्थव्यवस्थेचे सुयोग्य व्यवस्थापन आणि सूत्रसंचालन करणे हे जी20 चे प्रमुख उद्दिष्ट आहे .जगाच्या आर्थिक भरभराटीचा पाया घालने ,समृद्धी टिकविणे इत्यादी. 2008 पासून वित्त बाजारपेठांमधील स्पर्धा संबंधी संवाद, आर्थिक विकास आणि सर्वकषवाढ यांच्यासाठी सूत्रबद्ध कार्यक्रमाची निर्मिती करणे ही देखील ध्येय G.20 ने स्वीकारली.

**G20मधील महत्त्वाचे टप्पे :**

- 1.2020 मध्ये संघटनेचे कार्यक्षेत्र अधिक व्यापक करण्यात आले .कृषी क्षेत्रावर भर देण्याचा निर्णय घेण्यात आला. केवळ उद्योग क्षेत्र प्रमाण न मानता अर्थव्यवस्थेची इतर क्षेत्र ही त्यात अंतर्भूत करण्यात आली.
- 2.2012 मध्ये मेक्सिको येथे आयोजित जी20 पर्यटन मंत्र्यांच्या परीक्षा परिषदेत पर्यटन विकासाच्या मुद्दा महत्त्वाचा ठरला .पर्यटनातून रोजगार निर्मिती ही संकल्पना दृढ करण्यात आली व्हिसाच्या नियमावर विचार करण्यात आला.
- 3.2014 मध्ये संघटनेतील मोठा वाद समोर आला . ऑस्ट्रेलियात झालेल्या परिषदेत रशियावर बंदी घालण्याचा प्रस्ताव आला.रशियाने आपला शेजारचा क्रिमिया देश ताब्यात घेतला हे निमित्त त्यासाठी होते.
- 4.2016 मध्ये जागतिक तापमान वाढीचा मुद्दा गंभीर बनल्याने या संकल्पनेला प्राधान्य देण्यात आले
- 5.2019 मध्ये जपान मध्ये परिषद झाल्यानंतर जगाला कोरोनाच्या संकटाने ग्रासले संघटनेच्या कार्यावर परिणाम झाला. पुढची सौदी अरेबियातील परिषद आभासी पद्धतीने घेतली गेली 2021 मध्ये इटली ती झाली.
- 6. 2022 मध्ये कोरोनाचा भर ओसरल्यानंतर परिसर इंडोनेशियात झाली .याच परिषदेत 2023 मध्ये भारताकडे नेतृत्व देण्याचा निर्णय देण्यात आला.

विकसनशील देशांचे सहाय्य घेतल्याशिवाय काही मोजक्या बलाढ्य देशांना जगाच्या अर्थव्यवस्थेचे नेतृत्व करता येणे अशक्य ? याची जाणीव झाल्याने भारतासारख्या विकसनशील पण प्रचंड आर्थिक सुप्त क्षमता

असणाऱ्या देशांचे महत्त्व वाढले. याचाच फायदा भारताला झाला .जी 20 चे नेतृत्व हाती आल्यावर संघटनांचा विस्तार करण्याचे भारताने ठरविले. दक्षिण गोलार्धातील देशांना महत्त्वाचे स्थान मिळवून देणे व तेथील बाजारपेठा विकसित करणे. रशिया आणि युक्रेन यांच्या प्रदीर्घकाळ युद्ध होत राहिल्याने खाद्यतेल ,डाळी ,गहू ,इत्यादी अन्नधान्याचा पुरवठा साखळ्या तुटल्या. जगात अन्नधान्याचे टंचाई निर्माण झाली या अन्नधान्य टंचाईमुळे महागाई वाढली त्यामुळे अन्नसाखळ्या निर्माण करणे हे भारतासमोर मोठे आव्हान आले आणि भारत त्यासाठी प्रयत्न देखील करत आहे .

G20 चा नेता म्हणून भारतासमोरील आव्हाने : जी20 चे नेतृत्व हाती घेतल्यानंतर भारतासमोर मोठे आव्हान म्हणजे शीतयुद्धाचे होते गेल्या पाच वर्षांमध्ये जग पुन्हा अमेरिका रशिया शीत युद्धाकडे झुकला गेला आहे .त्यामुळे जगाची पुन्हा विभागणी होत आहे. या शीतयुद्धाचे तीव्रता कमी करण्याचे आव्हान भारताकडे आहे.

G20 चा अध्यक्ष म्हणून भारत तंत्रज्ञानाचा मानव केंद्र दृष्टिकोनावर विकास विश्वास ठेवून सार्वजनिक डिजिटल पायाभूत सुविधा आर्थिक समावेशकता आणि शिक्षणापर्यंतच्या कृषी पासूनच्या शिक्षणापर्यंतच्या विविध क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञान सक्षम विकास यासारख्या प्राधान्य क्षेत्रामध्ये अधिकाधिक ज्ञानाची देवाण-घेवाण सुलभ करू शकतो.

**निष्कर्ष**:

G20 हा आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्याचा प्रमुख मंच असून जागतिक वास्तुकला आणि प्रशासनाला आकार देण्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे .भारताला देखील G20 चे अध्यक्ष पद भूषविण्याची संधी मिळाली. या संधीमध्ये भारताने अनेक क्षेत्रात प्रगती केली .जी 20 चे नेतृत्व भारताने हाती घेतल्यानंतर या संघटनेचा विस्तार केला आहे. असे असले तरी भारतासमोर अनेक समस्या आहेत .उदाहरणार्थ -शीत युद्ध ,बेरोजगारी, महागाई, मंदीचे सावट, दहशतवाद, या आव्हानांचा सामना व्यवस्थितरित्या करून त्याच्यावर योग्य उपाययोजना केली तर भारत काही वर्षात भारत आर्थिक महासत्तेकडे वाटचाल करेल.

**संदर्भ:**

1. भारताचे परराष्ट्र धोरण आणि सुरक्षा संबंध डॉ. शैलेंद्र देवळाणकर
2. आंतरराष्ट्रीय संबंध 2014 पासूनचे भारतीय परराष्ट्रीय धोरण डॉ. बी. डी. तोडकर
3.Https://en. Wikipedia.org.G20
4. वर्तमानपत्रे आणि युट्युब चॅनेल

# भारतीय कापड उद्योग : संधी आणि आव्हाने

**डॉ. डी. एन. सोनवणे**
संशोधक मार्गदर्शक
म.स.गा.महाविद्यालय मालेगाव कॅम्प, (नाशिक)

**श्री. पवार रामेश्वर भाऊसाहेब**
संशोधक विद्यार्थी
म. स. गा. महाविद्यालय मालेगाव कॅम्प (नाशिक)

**प्रस्तावना :**

कृषी क्षेत्रावर आधारित जड अवजड उद्योग क्षेत्रात भारतीय वस्त्र उद्योग क्षेत्राचे नाव अग्रगण्य क्षेत्रात घेतले जाते. शेती क्षेत्रा नंतर सर्वात जास्त रोजगार निर्मिती या क्षेत्रातून होत असते. प्राचीन काळापासून भारत कापड वस्र उद्योग क्षेत्रात प्रगती पथावर आहे. औद्योगीकरण पूर्व कालखंडात भारतीय कपड्याची जगभरात एक वेगळी ओळख होती. मुंबई, कलकत्ता, सुरत या शहराच्या समुद्र किनाऱ्यावर कापड व्यापाराचे जाळे त्याकाळी तयार झाल्याची इतिहासात नोंद आहे. वस्र मानवाच्या मुलभूत गरजांपैकी एक गरज आहे. भारतीय सांस्कृतिक व सामजिक पर्यावरणात खूप मोठ्या प्रमाणात विविधता असल्याकारणाने लोक परिधान करीत असलेल्या पोशाखात वेगळेपण दिसून येते. भारतात सण, उत्सव, लग्न समारंभ, मुंज, जन्मोत्सव या कालावधीत विविध वेशभूषा करण्याच्या पद्धती रूढ आहेत. म्हणून कापड बाजारात कायमस्वरूपी वर्षभर वेगवेगळ्या कापडाची मागणी असते. तसेच भारतात निर्माण होणाऱ्या कापडाला जागतिक स्तरावर एक वेगळी ओळख आहे. भारतातील उबदार व सुती कापड जगभर प्रसिद्ध आहे. जागतिक आर्थिक पर्यावरणात कापड उद्योगाची सुरवात व त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी बघता आदिमानवाच्या प्रगतीच्या सुरवाती काळापासून कापसापासून धागा व धाग्यापासून कापड बनवण्याची कल्पना मूर्त स्वरूप घेत असल्याचे दिसून येते. कापडाच्या शोधाच्या सुरवातीला मानवास लोकर, कापूस, रेशीम इ. धागे ज्ञात होते. चीनमधील लोकांनी सर्वप्रथम रेशीम किड्याची जोपासना करून रेशीम धाग्यापासून सुत बनविले. तदनंतर जपान व भारतात रेशीम धाग्यापासून सुत बनवण्यास सुरवात झाली. तसेच कापसाची लागवड इ.स.पू.३००० वर्षापूर्वी झाल्याचे मोहंजेदडो संस्कृतीच्या ऐतिहासिक पुराव्यावरून लक्षात येते. भारत प्राचीन काळापासून कापड निर्यात करत आला आहे. जगभर प्रवास करणाऱ्या प्रवासी पैकी मार्क पोलो, वास्को द गामा, चीनी प्रवासी इ. लोकांनी भारतीय कापडाची प्रशंसा केली आहे. मुघल कालीन कालखंडात सर्वात मोठा उद्योग म्हणून कापड उद्योगाचा उल्लेख आहे. सुरवातीला सुत व धागे विणकाम, नक्षीकला, हातमाग, कपडे रंगविण्याच्या कौशल्याबरोबर कापड उद्योग बहरला. आज तो आधुनिक पद्धतीच्या यंत्रमाग पर्यंत येऊन पोहचला आहे, नैसर्गिक धाग्या बरोबर भारतात आज कृत्रीम धाग्यांच्या फायबरचे कापड सुद्धा मोठ्या प्रमाणात तयार होते. त्या अनुशंगाने भारतीय अर्थव्यवस्थेत वर्तमान स्थितीत कापड उद्योगातील संधी तसेच आव्हाने याचा अभ्यास या शोध निबंधात केला जाणार आहे.

**संशोधन कार्यपद्धती** :

भारतीय कापड उद्योग क्षेत्रातील संधी व आव्हानाची उकल करण्याच्या हेतूने दुय्यम साधन सामग्रीचा वापर करून साध्या विश्लेषण पद्धतीने शोध निबंधाची रचना करण्यात आली आहे. करीता मासिके,पुस्तके, लेख, संकेतस्थळे, शासकीय अहवाल इ. चा वापर करण्यात आला आहे.

**उदिष्टे :**

1) भारतातील कापड व्यवसायाची पार्श्वभूमी पडताळून वर्तमान स्थितीतील कापड व्यवसायाची स्थिती अभ्यासने.
2) कापड व्यवसायातील संधी व आव्हानाची उकल करणे.

**भारतातील कापड उद्योगाची पार्श्वभूमी :**

कृषिप्रधान अर्थव्यवस्था अशी भारताची जागतिक ओळख आहे. जागतिक स्थरावर अशी ओळख असण्याची कारणे जाणली तर, त्या मागील सत्यता ही औद्योगिक क्रांतीच्या धाग्यात सापडते. कारण पाश्चात्य जगातील औद्योगिक क्रांती कृषी उत्पादनावर अवलंबून होती. भारत प्राचीन कालखंडापासून कृषी क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे. त्यामुळेच भारताकडे जगाची "सोने की चिडिया" या दृष्टीची यामागील सत्यता ही तितकीच खरी आहे. भारतीय शेतीने औद्योगिकरणाचा शास्वत विकास केलेला दिसून येतो. त्यापैकी कापड उद्योग एक आहे. कापड उद्योगाचा जड व अवजड उद्योगात समावेश होतो. ज्याचा भारतीय अर्थव्यवस्थेत महत्वपूर्ण भाग राहिला आहे. इ.स.पु. सुमारे 3000 वर्षापूर्वी भारतात सिंधू नदी परिसरात कपाशी लागवड झाली असावी असा एक अंदाज आहे. इराण इराक या देशात 14 व्या शतकात रेशीम व जरीचे धागे विनकामाचे उद्योग सुरू झाल्याचे पुरावे आढळुन येतात. परंतु अमेरिका , इंग्लंड या देशात कापड उद्योगास उशिराने सुरू झालेला दिसतो. अठराव्या शतकात युरोपात भारतातून मोठ्या प्रमाणत रेशीम व सुती कापडाची निर्यात केले जात असे. अर्थात त्या काळातील हातमागावर तयार होणाऱ्या कापडाने तेथे मोठी बाजारपेठ काबीज केली होती. इंग्रजी सत्तेच्या काळात भारतीय कापड उद्योगाचा मोठया प्रमाणात –हास झाला.इंग्लंड मध्ये भारतीय कापडावर अतिरिक्त कर ही लावण्यात आला होता.परंतु स्वातंत्र्य लढ्यातील स्वदेशी चळवळीमुळे खादी व कापड उद्योगास पुन्हा चालना मिळालेली दिसून येते.एकोणिसाव्या शतकात युरोप व अमेरिकेत मोठया प्रमाणावर आधुनिक औद्योगिक कापड उद्योगाची वाढ झाली.त्यांना लागणारा कच्चा माल युरोपीय देशांच्या अधिपत्या खालील देशातून मोठया प्रमाणात कच्चा माल (कापूस) उत्पादन घेतले जाऊ लागले. अनेक स्थियंतरातून भारतीय कापड उद्योगाचे आज आधुनिकिरण झालेले दिसून येते. हातमागा बरोबरच यंत्रमाग, नैसर्गिक धाग्याबरोबरच कृत्रिम धागे, तयार कपडे उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. वर्तमान कालखंडात जागतिक स्थरावर कापड उद्योगास एक वेगळे व महत्त्वपूर्ण स्थान आहे. भारत त्यात एक अग्रेसर राष्ट्र आहे.

**भारतातील वर्तमान स्थितीत कापड उद्योग :**

भारतात पहिली कापड गिरणी १८१८ मध्ये कोलकत्ता येथे सुरू झाली नंतर १८५४ मुंबई, १८६१ अहमदाबाद येथे कापड गिरण्या सुरू झाल्या. भारतीय कापड उद्योग संघटित व असंघटित क्षेत्रात विभागला गेला आहे. संघटित क्षेत्रात आधुनिक यंत्रमाग व तंत्रज्ञानाचा वापर केला जातो ज्यासाठी मोठ्या प्रमाणात श्रम बळाबरोबरच ऊर्जेचा वापर केला जातो. तर, असंघटित क्षेत्रात पारंपारिक हातमाग, हस्तकला, रेशीम उत्पादन, विणकाम, नक्षीकाम या श्रम आधारित कापड उत्पादनाचा त्यात समावेश होतो. सन १९०७ मध्ये भारतात १९३ कापड गिरण्या अस्तित्वात होत्या. ती संख्या पुढे सन १९१४ , १९४७ , १९७० व १९९९ मध्ये अनुक्रमे २६४, ३८०, ६५६ व १८२४ इतकी होती. तर १८७८-८० ला २२ ताग गिरण्यात २७,४९४ कामगार होते. त्यात वाढ होऊन १९१४ मध्ये ६६ ताग गिरण्यातून २,१६,१८८ कामगार काम करत होते. भारतीय ऑटोमोटिव टेक्सटाइल तांत्रिक कापड बाजार मूल्य २०२० मध्ये २.४ अब्ज डॉलर इतके होते. त्यात २०२७ पर्यंत ३.७ अब्ज डॉलर पर्यंत पोहचण्याची अपेक्षा आहे. भारतीय कापड उद्योग स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या १४ % योगदान देतो तर एकूण निर्यातीत २३% वाटा आहे.तर शेती नंतर सर्वात जास्त ४.५ कोटी रोजगानिर्मिती या क्षेत्रातून होते. भारतात सन २०२१-२२ मध्ये ४५१ कि.गी. प्रती हेक्टरी सरासरी कापसाचे उत्पादनातून ३१० लाख कापसाच्या गाठीचे उत्पादन भारतात घेण्यात आले. तर, या क्षेत्रातून सन २०२९ पर्यंत २०९ बिलियन अमेरिकन डॉलर बाजार उत्पादनाची अपेक्षा आहे.

**भारतात कापड उद्योगातील संधी :**

भारत जागतिक स्थरावर तिसऱ्या क्रमांकाचा कापूस निर्यातक तर दुसऱ्या क्रमांकाचा कापड निर्यात करणारा देश आहे.जागतिक बाजापेठेतील कल लक्षात घेता भारताने दीर्घकालीन शाश्वत कापड उत्पादनाची निति आखणे गरजेचे आहे. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री पियुष गोयल यांनी "बी२बी टेक्स्टाईल ट्रेड फेअर एशियाटेक्स २०२३" च्या तीन दिवशी प्रीमियर संमेलन प्रसंगी बोलताना अपेक्षा व्यक्त केली की, भारत शंभर अब्ज डॉलर निर्यातीचे लक्ष सहज गाठू शकतो

तर सरकार देखील वस्त्र उद्योगात तांत्रिक गुंतवणूक करण्यास उत्सुक आहे करिता वस्त्रोद्योगातील भागधारकांनी तरुणांना व महिलांना या क्षेत्रात संधी उपलब्ध करून द्याव्या. भारतातील कापड उद्योग महाराष्ट्र, तामिळनाडू व गुजरात राज्यात विखुरला आहे.तर भारताला बांगलादेश,चीन, व पाकिस्तान या देशांशी स्पर्धा करावी लागते. सन १९९३ पासून भारतीय कापड उद्योग परवाना मुक्त करण्यात आला आहे. तर १००% प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीस भारत सरकारने या क्षेत्राला परवानगी दिली आहे. सन २००० ते २०२१ या कालावधीत ३.९३ बिलियन डॉलर प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूककापड उद्योगात भारतात आली आहे. तसेच या क्षेत्राकरिता मुक्त परवाना धोरण अवलंबिले जात असल्यामुळे एक मोठा अडथळा त्यातून दूर झाला आहे. तसेच सरकार च्या माध्यमातुन विवीध योजना उद्योगाच्या विकास करिता राबविल्या जातात. जसे की, उत्तर पुर्व कापड संवर्धन योजना,राष्ट्रीय हस्तशिल्प विकास योजना इ.

**भारतीय कापड उद्योगातील आव्हाने :**

१) भारतात संघटित व असंघटित क्षेत्रातून संयुक्त रित्या कापड उत्पादन घेतले जाते.असंघटित क्षेत्रातील उत्पादनात आधुनिक उत्पादन पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे.

२) कापूस व कच्चा माल उत्पादन क्षेत्रात नैसर्गिक आव्हानाचे एक मोठे संकटं कायम उभे असते.

३) केंद्र सरकारचे आयात निर्यात व कर धोरणाचा कापडाच्या मूल्यावर विपरीत परिणाम होतो .परिणामी मूल्य बाजारात स्पर्धेचा सामना करावा लागतो.

४) भारतीय वस्त्रउद्योग क्षेत्रातील कालबाह्य तंत्रज्ञान स्पर्धात्मक बाजारपेठेत जागतिक मानांकन पर्यंत पोहचण्यास अपयशी ठरत आहे.

५) विदेशी थेट गुंतवणुकीचा भारतीय कापड उद्योगात अभाव दिसून येतो. सन २००० ते २०१९ पर्यंत भारतात ३.४१ अब्ज डॉलर परदेशी गुंतवणूक झाली आहे.

६) चीन व अमेरिकेत पर्यावरणीय कारणामुळे कच्चा माल निर्मितीचे युनिट बंद करण्यात आले . त्यामुळे अंतरराष्ट्रीय बाजारात कच्या मालाच्या किमतीत वाढ झाली आहे.

७) वस्त्र उद्योगाचे भारतात विशिष्ट भागात केंद्रीकरण झाले आहे. जसे मुंबई, कोलकता,गुजरात मधील विशिष्ट भाग.

८) भारतात ९५% विणकाम क्षेत्र हे असंघटित क्षेत्रात असल्याचे दिसून येते.

९) अंतरराष्ट्रीय स्तरावर कठोर सामाजिक व पर्यावरणीय नियमांची पूर्तता करताना भारतातील वस्त्र उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांचा अभाव दिसून येतो.

**संदर्भ :**


१) https://www.drishtias.com
२) https://blog.lio.io/Indian-textile-industry-in-hindi
३) https://vishwakosh.marathi.gov.in
४) https://pib.gov.in/pressreleasepage.aspx?PRID=1954234
५) https://www.complete Irlewealth.com/blogs/textile-sector-in-india
६) https://www.iastopers.com
७) https://www.doubtnut.com
८) औद्योगिक भूगोल - प्रशांत पब्लिकेशन – प्रा. ए. पी. चौधरी , प्रा. अर्चना चौधरी

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना (पी.एम किसान)

## एक विश्लेषण – विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य

**डॉ. खर्डे अरुण चांगदेव**
सा.प्रध्यापक आणि विभाग प्रमुख,
अर्थशास्त्र विभाग,
शिंदे महाविध्यालय परंडा.

**लांडगे कृष्णा दगडू**
संशोधक विध्यार्थी,
पु.अ. होळकर विद्यापीठ सोलापूर

**घोषवारा**:

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये कृषी क्षेत्र महत्वाची भूमिका बजावत असताना दिसून येते. तसेच कृषी क्षेत्रास उद्योग व सेवा क्षेत्राचा कणा म्हटले जाऊ शकते. भारत ही सर्वात वेगवान वाढणारी अर्थव्यवस्था आहे. शेती विकास धोरणाचा व योजनाचा एक भाग म्हणून भारत सरकारमार्फत पी.एम. किसान योजना सन डिसेंबर २०१८ पासून राबली जात आहे.या योजनामध्ये काही अपात्रतेच्या अटी कायम करण्यात आल्या आहेत. बाकी सर्व पात्र शेतकऱ्यांना प्रती वर्षी ६००० रुपयांची रक्कम प्रत्येकी २,००० रुपयांच्या तीन समान हप्त्यांमध्ये दिली जाते. या योजनेचा पहिला हप्ता एप्रिल ते जुलै, दुसरा हप्ता ऑगस्ट ते नोव्हेंबर आणि तिसरा हप्ता डिसेंबर ते मार्च या कालावधीत लाभार्थी शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात हस्तांतरित केला जातो. भारतासारख्या कृषी प्रधान देशामध्ये अशी योजना नक्कीच उपयोगी पडताना दिसून येत आहे. रब्बी आणि खरीप हंगामात आलेली रक्कम ही मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याला उपयोगी पडू शकते. कर्ज रक्कमेवर अंशदान किंव्हा कर्जमाफी पेक्षा अशी योजना नक्कीच सरस ठरू शकते.

**की वर्ड –** पी.एम. किसान, अल्प व अति अल्प शेतकरी ,महाराष्ट्र

**१.१ प्रस्तावना,**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये कृषी क्षेत्र महत्वाची भूमिका बजावत असताना दिसून येते. तसेच कृषी क्षेत्रास उद्योग व सेवा क्षेत्राचा कणा म्हटले जाऊ शकते. भारत ही सर्वात वेगवान वाढणारी अर्थव्यवस्था आहे. भारतात मोठ्या प्रमाणात शेत जमीन असल्याचे दिसून येते, भारत मसाले, दूध, कडधान्य, चहा, काजू, ताग, गव्हू , फळे आणि भाजीपाला उत्पादनात अग्रेसर असून कृषी उत्पादक वस्तु निर्यातीतून भारताला खूप मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळत आहे. शेती विकासाशिवाय देशाचा विकास शक्य नाही. शेतीच्या विकासासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. शेती विकासाच्या विविध योजना आखल्या जाव्यात व त्याचा शेतकरी वर्गास प्रत्यक्ष फायदा व्हावा.अशा योजना शासना मार्फत राबल्या जातात. याचाच एक भाग म्हणून भारत सरकारमार्फत पी.एम. किसान ही योजना राबवली जात आहे. की ज्या योजनेत थेट शेतकऱ्याच्या बँक खात्यात आर्थिक सहाय्य हस्तांतरीत केले जाते.

**१.२ संशोधन साहित्याचा आढावा :**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेबाबत महाराष्ट्रामध्ये फारसे संशोधन झालेले नाही परंतु या योजनेचा ज्या थोड्याफार संशोधकांनी संशोधन केले आहे त्याचा थोडक्यात आढावा घेतला गेला आहे.

**१) के.बी. रंगप्पा[१]**

या संशोधकांने "**युटिलायझेशन पॅटर्न ऑफ पी एम किसान बेनिफिट्स**" या संशोधन पेपर मध्ये *'कर्नाटक'* राज्यातील *'देवानागेरे'* या जिल्ह्यातील पी.एम. किसान निधीचा शेतकऱ्याला कसा फायदा झाला व मिळलेली रक्कम कशासाठी वापरली जाते याचा अभ्यास केला आहे. यात त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की 'देवानागेरे' हा जिल्हा इतर जिल्ह्यापेक्षा गरीब जिल्हा आहे. या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पी.एम. किसान निधीचा वापर जास्तीत जास्त उत्पादन खर्चावर केला तर अनुत्पादक खर्चावर कमी केल्याचे दिसून आले. ए.सी./ एस.टी. या जात संवर्गातील शेतकर्यांनी अनुत्पादकावर जास्त खर्च केलेला दिसून आला.

**२) वार्शने डी. आणि इतर**[२]

यांना **"पी.एम.किसान सन्मान निधी स्कीम अँड द ऍडॉप्शन ऑफ मॉडर्न एग्रीकल्चर टेक्नॉलॉजी इन उत्तर प्रदेश"** या संशोधनात अभ्यासात असेही आढळून आले आहे की सामाजिक, आर्थिक आणि कृषी इत्यादी वैशिष्ट्यांवर आधारित शेतकऱ्यांची केलेली निवड ही चुकीची आहे. तुलनेने शेतीवर अधिक अवलंबून असलेल्या आणि ज्यांच्याकडे कर्ज उपलब्ध नाही त्यांनाच या योजनेची लक्षणीय मदत झाली असल्याचे दिसून येते.

**३) थेगलीसन टी.**[३]

यांनी**"स्टडी ऑन प्रधानमंत्री किसान सन्मान निधी स्कीम इन इंडिया"**या संशोधनात असा निष्कर्ष काढला की, पी.एम. किसान योजना आर्थिक मंदीच्या संकटाचा सामना करण्यासाठी, ग्रामीण उपभोगाच्या मागणीत घट, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या अनेक योजनांपैकी एक महत्वपूर्ण योजना म्हणून फायद्याची ठरत आहे.

**४) कविता एच. एन. आणि इतर**[४]

यांनी **"प्रेफरन्स ऑफ युनिव्हर्सल बेसिक इन्कम प्रोग्राम इन इंडिया: केस स्टडी ऑफ पी.एम. किसान स्कीम"** या संशोधनावरून त्यांना असे दिसून आले आहे की , पीएम-किसान योजनेच्या एकूण लाभार्थ्यांपैकी सर्वाधिक लाभार्थी उत्तर प्रदेश या राज्यात आढळून आले. त्याचे प्रमाण एकूनाशी २२% इतके आहे , त्यानंतर महाराष्ट्र ( १०.२ %) आणि मध्य प्रदेश (७.२%) या राज्याचा क्रम लागतो.

**१.३ संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये :**

१) प्रधान मंत्री किसान सन्मान निधी योजनेची उद्दिष्टे अभ्यासणे.

२) प्रधान मंत्री किसान सन्मान निधी योजनेची माहिती घेणे.

३) शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजने संदर्भात समस्याचा अभ्यास करणे.

**१.४ संशोधन विषयाची गृहीतके :**

१) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा शेतकऱ्यांना फायदा होताना दिसून येत आहे.

२) पी.एम.किसान सन्मान निधी योजनेबाबत शेतकऱ्यांना तांत्रिक अडचणी जाणवतना दिसून येतात.

३) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेतील लाभार्थ्यांची संख्या बदलत आहे.

**१.५ संशोधन पद्धती :** प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. यासाठी दुय्यम माहितीचा आधार घेतला आहे. यामध्ये प्रामुख्याने विविध शासकीय अहवाल,संदर्भग्रंथ प्रकाशित जर्नल्स आणि भारत सरकारच्या अधिकृत साईडचा वापर केला आहे.

➢**प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा अर्थ :** ज्या शेतकऱ्यांच्या नावे शेती आहे व त्यांनी सर्व पात्रतेच्या अटी पुर्ण केल्या आहेत त्यांच्या बँक खात्यात प्रती वर्षी ६००० रु. तीन समान टप्प्यात टप्प्यात हस्तांतरीत करणारी योजना म्हणजे पी.एम. किसान योजना होय"

**१.६ प्रधान मंत्री किसान सन्मान निधी योजनेची उद्दिष्टे :**

१) शेतीच्या आर्थिक गरजा पूर्ण करणे .

२) विविध कृषी साधने,खते व आधुनिक कृषी उपकरणे इत्यादीची खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करणे.

३) सावकारांपासून शेतकऱ्यांचे संरक्षण करणे व शेतकर्यांना आर्थिक आधार देणे.

**१.७ माहिती विश्लेषण:**

भारत सरकारने शेतक-यांना आर्थिक आधार देण्यासाठी घेतलेला पुढाकार म्हणजेच प्रधान मंत्री किसान सन्मान निधी योजना होय. या योजनेची डिसेंबर २०१८ मध्ये सुरवात करण्यात आली.सुरवातीला या योजनेमध्ये फक्त अल्प आणि अत्यल्प भूधारक शेतकरी कुटुंबाचा समावेश करण्यात आला होता की ज्याला जमिनीच्या नोंदीनुसार एकत्रितपणे २ हेक्टरपर्यंत जमीन आहे. त्यानंतर यात सुधारणा करण्यात आली आणि या योजनेची व्याप्ती वाढवण्यात

येऊन देशातील सर्वच शेतकऱ्याला ही योजना लागू करण्यात आली. मात्र काही अपात्रतेच्या अटी कायम करण्यात आल्या यात पात्र शेतकऱ्यांना प्रती वर्षी ६,००० रुपयांची रक्कम प्रत्येकी २,००० रुपयांच्या तीन समान हप्त्यांमध्ये दिली जाते. या योजनेचा पहिला हप्ता एप्रिल ते जुलै, दुसरा हप्ता ऑगस्ट ते नोव्हेंबर आणि तिसरा हप्ता डिसेंबर ते मार्च या कालावधीत लाभार्थी शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात हस्तांतरित केला जातो.सरकारी आकडेवारी नुसार १५ सप्टेंबर २०१९ पर्यंत ही योजना ५० दशलक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली होती. सन २०१९ नुसार या योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांचा विचार केला तर उत्तर प्रदेश या राज्याचा पहिला क्रमांक लागतो (२८%), त्यानंतर दुसरा क्रमांक महाराष्ट्र राज्याचा लागतो. (१०%),तिसरा क्रमांक आंध्र प्रदेश (९%),या राज्याचा लागतो.मणिपूर राज्यात सर्वात कमी लाभधारक आहेत.


आजपर्यंत भारत सरकारने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचे एकूण १४ हप्ते शेतक-यांच्या बँक खात्यात जमा केले आहेत.दिनांक २७ जुलै २०२३ रोजी १४ व्या हप्त्यात सरकारने एकूण ११,२७,९०,२८९ कोटी रुपये इतकी रक्कम लाभार्थ्याला वितरीत केली. एकूण हप्त्याचा आढावा आपणास पुढील तक्त्यावरून घेता येतो.

**तक्ता १.१ पीएम-किसान योजनेंतर्गत वितरीत एकूण रक्कम** (०९/०८/२०२३ पर्यंत)


| अ.क्र | हप्ता | कार्यकाळ | एकूण रक्कम (कोटी ) | | वाढ / घट (%) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र |
| १ | डिसेंबर –मार्च | २०१८-१९ | ३,१६,१६,०१५ | २१,८४,०६३ | --- | --- |
| २ | एप्रिल –जुलै | २०१९-२० | ६,६३,५८,३९४ | ४५,२३,४९० | १०९ | १०७ |
| ३ | ऑगस्ट-नोव्हेंबर | २०१९-२० | ८,७६,३३,१९९ | ७१,४६,७४८ | ३२ | ५७.९९ |
| ४ | डिसेंबर –मार्च | २०१९-२० | ८,९६,९८,१५९ | ८६,३३,९८८ | २.३५ | २०.८१ |
| ५ | एप्रिल –जुलै | २०२०-२१ | १०,४९,४१,१२४ | ९६,९७,०३९ | १६.९९ | १२.३१ |
| ६ | ऑगस्ट-नोव्हेंबर | २०२०-२१ | १०,२३,४७,९८४ | १,०५,१९,६१६ | -२.४७ | ०८.४८ |
| ७ | डिंसेंबर –मार्च | २०२०-२१ | १०,२३,६१,३६४ | १,०३,९०,०१० | ०.०१ | -१.२३ |
| ८ | एप्रिल –जुलै | २०२१-२२ | ११,१९,५६,७६८ | ९२,३४,२५२ | ९.३७ | -११.१२ |
| ९ | ऑगस्ट-नोव्हेंबर | २०२१-२२ | ११,१९,५७,२७३ | १,०२,५२,६३० | ०.०००४५ | ११.०२ |
| १० | डिसेंबर –मार्च | २०२१-२२ | ११,१६,२०,८५० | १,०४,४४,७०९ | -०.३० | ०१.८७ |
| ११ | एप्रिल –जुलै | २०२२-२३ | ११,२७,९०,२८९ | १,०१,२५,९७९ | १.०४ | -०३.०५ |
| १२ | ऑगस्ट-नोव्हेंबर | २०२२-२३ | ९,००,९५,०२२ | ८९,८७,७८८ | -२०.१२ | -११.२४ |
| १३ | डिसेंबर –मार्च | २०२२-२३ | ८,८१,३९,८९२ | ८१,१३,२१३ | -२.१७ | -०९.७३ |
| १४ | एप्रिल –जुलै | २०२३-२४ | ९,५३,५८,३०० | ८५,६०,०८२ | ८.१८ | ५.५० |

संदर्भ- Compiled from official website of PM-Kisan

**आलेख १.१ पीएम-किसान योजनेंतर्गत वितरीत एकूण रक्कम - भारत (०९/०८/२०२३ पर्यंत)**



**आलेख १.२ पीएम-किसान योजनेंतर्गत वितरीत रक्कम- महाराष्ट्र (०९/०८/२०२३ पर्यंत)**




संपूर्ण भारताचा विचार केला तर आपणास असे निर्देशाला येते की, ऑगस्ट-नोव्हेंबर २०२१-२२ या नवव्या हप्त्यात सर्वाधिक रक्कम सरकारने देशात वितरीत केली होती ती जवळपास११.१९ कोटी इतकी आहे. तर महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक रक्कम दहाव्या हप्त्यात वितरीत झाली. सर्वात कमी रक्कम पहिल्या हप्त्याची होती.देशात आणि महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक वाढीचा वेग हा दुसऱ्या हप्त्याला दिसून येतो. तो अनुक्रमे १०९ व १०७ टक्के आहे. देशात पाचव्या हप्त्यापर्यंत आणि महाराष्ट्रामध्ये सहाव्या हप्त्या पर्यंत लाभार्थ्यांच्या संख्येत सतत वाढ झालेली दिसून येते.देशात आणि महाराष्ट्रामध्ये बाराव्या हप्त्यामध्ये लाभार्थ्यांच्या संख्येत खूप घट झाल्याचे दिसून येते. हे तक्ता क्र.१.१ आणि आलेख १.१ व १.२ वरून स्पष्ट होते.

**१.८ पी.एम.-किसान निधी बाबत शेतकऱ्याच्या समस्या**

**१) लँड शेडिंग :** पी.एम. किसान निधी योजनेमध्ये सर्वात महत्त्वाची ही एक समस्या असून बऱ्याच वेळेस तहसील विभागावर किंवा कृषी विभाग मार्फत शेतकऱ्यांच्या लँड सेंडिंगचा प्रश्न मार्गी लावला जात नाही. या कारणाने बऱ्याच शेतकरी पीएम किसान योजनेला पात्र असून देखील रक्कम मिळण्यास दिरंगाई होत आहे तर काहींना या योजनेचा अध्याप लाभ मिळालेला नाही .

**२) आधार प्रमाणीकरण:** बऱ्याच शेतकऱ्यांचे आज देखील बँक खात्याशी आधार लिंक नसल्याकारणाने आधार प्रमाणीकरण झालेले नाही.या कारणाने आधार बँक खात्याशी आणि खातेनंबर डी.बी.टी.ला जोडला गेलेला नाही. यामुळेच आधार प्रमाणीकरण करण्यासाठी शेतकऱ्यांना बँकेकडे आणि आधार केंद्रावर सतत जावे लागते.

**३) ई- के.वाय.सी -** बरेच शेतकरी हे वृद्ध असल्याकारणाने त्यांच्या बोटाचे ठसे बायोमेट्रिक सिस्टीम मध्ये घेतले जात नाहीत. बरेच शेतकऱ्यांचे मोबाईल किंवा ईमेल हे आधारशी लिंक नसल्याकरणाने त्यांची आधार के.वाय.सी. करणे शक्य होत नाही.

**४) नवीन शेतकऱ्यांच्या नोंदणीच्या अडचणी :** नवीन शेतकऱ्यांची नोंदणी करण्याकरिता अनेक समस्या दिसून येतात. शेतकऱ्यांच्या नवीन खरेदी व्यवहार केल्यानंतर त्याची नोंदणी करता येत नाही कारण शेतकऱ्यांच्या खरेदीच्या व्यवहाराची शेवटची दिनांक सन २०१९ करण्यात आली आहे ती पुढे पाच वर्ष तशीच राहील असे शासनाने स्पष्ट केले आहे.त्यामुळे नवीन शेतकऱ्यांना नोंदणी करणे अवघड आहे.

५) बहुतांश पेन्शन धारक शेतकरी या योजनेपासून वंचित आहेत.

वरील सर्व तांत्रिक अडचणी शेतकऱ्यांला येत असल्याकारणाने बरेच लाभार्थी वंचित आहेत.त्यामुळेच लाभार्थ्यांची संख्या घटत असताना दिसून येत आहे.

**१.९ निष्कर्ष व शिफारशी**

प्रधानमंत्री किसान सन्मान योजनाच्या उद्दिष्टाप्रमाणे शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी ही योजना थोड्याफार प्रमाणात यशस्वी झालेली दिसून येते. तेगलीसन यांच्या मतानुसार शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी ही योजना महत्वपूर्ण ठरू शकते. कर्जबाजारीपणा कमी करण्यासाठी या योजनेचा फायदा झाला असे अनेक अर्थशास्त्रज्ञांनी स्पष्ट केले आहे त्यांच्याशी संशोधक सहमत आहेत त्यामुळे त्यांचे संशोधनाचे गृहीतक निष्कर्षापर्यंत पोहोचते.लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या घटत असल्याचे दिसून येण्याचे कारण की शेतकऱ्यांना बऱ्याच तांत्रिक अडचणी येतात,यामध्ये प्रामुख्याने लँड शेडिंग, ई- के.वाय.सी, आधार प्रमाणीकरण,नवीन शेतकऱ्यांच्या नोंदणीच्या आडचणी. इत्यादीचा अभ्यास केलेला आहे.त्यामुळे शेतकऱ्यांला तांत्रिक अडचणी येतात हे गृहीतक निष्कर्षापर्यंत पोहचते.

**संशोधन विषयाला अनुसरून काही शिफारशी सुचवल्या आहेत**.

१) शासनाने लाभार्थी शेतकऱ्याचा लँड शेडिंगचा प्रश्न लवकर मार्गी लावून स्वतः शेतकऱ्याला त्यांची लँड शेडिंग माहिती भरता यावी यासाठी मदत करावी .

२) आधार प्रमाणिकरण्याची अट शिथिल करून. बँकांना स्पष्ट आदेश द्यावे की सर्व शेतकऱ्यांचे आधार प्रमाणिकीकरण करून घ्यावे व डी.बी.टीला शेतकऱ्याचे खाते लिंक करावे.

३) आधार प्रमाणिकीकरण करण्याकरिता ऑफलाइन पद्धतीचा अवलंब करून शेतकऱ्यांची तांत्रिक अडचण दुर करावी .

४) पेन्शन धारक जे शेतकरी आहेत त्यांच्या पेन्शनची किमान मर्यादा दहा हजारावरून ५०००० रु .पर्यंत वाढवावी जेणेकरून असे पेन्शन धारक शेतकरी या योजनेचे लाभार्थी बनतील.

५) नवीन शेतकऱ्यांच्या नोंदणी करण्यासाठी नवीन जमीन खरेदी दिनांकाची अट शितील करून खरेदी व्यवहार पुर्ण झाल्याबरोबर या योजनेत नोंदणी करता यावी.

६) किसान सन्मान निधी वार्षिक ६००० रुपयावरून ती वार्षिक २४ हजार रुपयापर्यंत वाढवण्याची आवश्यकता आहे.

**१.१० समारोप**

भारतासारख्या कृषी प्रधान देशामध्ये अशी योजना नक्कीच उपयोगी पडताना दिसून येत आहे. तेगलीसन यांच्या मतानुसार शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी ही योजना महत्वपूर्ण ठरू शकते. रब्बी आणि खरीप हंगामात आलेली रक्कम ही मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याला उपयोगी पडू शकते. कर्ज रक्कमेवर अंशदान किंव्हा कर्जमाफी पेक्षा अशी योजना नक्कीच सरस व आत्मनिर्भय दृष्टीकोनांसाठी किफायतशिर ठरू शकते.

**१.११ संदर्भ**


**१)** K.B.RANGAPPA,"Utilization Pattern of PM-KISAN Benefits"

**२)** Varshney D, et al., "Pradhan Mantri Kisan Samman Nidhi (PM-Kisan) and the Adoption of Modern Agricultural Technologies in Uttar Pradesh, India".

**३)** Thegaleesan T., "A Study on Pradhan Mantri Kisan Samman Nidhi (PM-Kisan) Scheme in India".,

**४)** Kavitha HN, et al. "Performance of Universal Basic Income Programme in India: A Case Study of PM-Kisan Scheme".

**५)** http://www.pmkisan.nic.in

# "पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी व समतोल राखण्यासाठी सेंद्रिय शेतीचे योगदान"

संशोधक विद्यार्थी

**धनश्री हरिश्चंद्र देशमुख**

पदव्युत्तर अर्थशास्त्र संशोधन केंद्र,

संशोधक मार्गदर्शक

**डॉ. नारायण नामदेव गाडे**

एम.ए. एम.फिल. पीएच.डी. के.टी.एच.एम.महाविद्यालय नाशिक

**सारांश:-**

महात्मा गांधी म्हणतात, "शेती हा लोकांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन असल्यामुळे शेती हा भारताचा आत्मा आहे". शेती टिकविण्यासाठी सेंद्रिय पद्धतीचा वापर केल्यास रासायनिक खतांवर व औषधांवर होताना खर्च वाचू शकतो कारण सेंद्रिय शेतीमध्ये खते व औषध नैसर्गिक साधनांचा वापर करून तयार करतात . अलीकडील काळात रासायनिक औशधे आणि कीटक नाशकांच्या वापरामुळे अनेक पर्यावरणीय समस्या निर्माण होत आहे. कीटक नाशके हि सजीव जीवनासाठी हानिकारक आहेत. तसेच जलप्रदूषण वाढण्यासही कारणीभूत आहेत त्यामुळे या पर्यावरणीय समस्या दूर करण्यासाठी सेंद्रिय शेती हा एक उत्तम पर्याय ठरू शकतो. भारतीय अर्थव्यवस्था एक कृषिप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. सुरुवातीच्या काळाचा विचार केला असता साधारणपणे ७०% हून अधिक लोकसंख्या ही शेती क्षेत्रात अडकलेली दिसून येते. आज हे प्रमाण साधारणपणे ४९% पर्यंत कमी झालेले असले तरी इतर क्षेत्रांच्या तुलनेत आजही हे प्रमाण खूप मोठे असल्याचे दिसून येते. त्यामुळे शेती व्यवसाय हा भारतासारख्या विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थांचा कणा मानला जातो. देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासामध्ये शेती व्यवसायाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येमध्ये भारत सर्वात प्रथम आहे. तर सेंद्रिय शेतीच्या क्षेत्राचा विचार केला तर भारत नवव्या स्थानावर आहे. सिक्कीम या संपूर्ण राज्यामध्ये केवळ सेंद्रिय शेती केली जाते. पूर्णतः सेंद्रिय शेती करणारे हे जगातले पहिले राज्य आहे. आता त्यापाठोपाठ त्रिपुरा आणि उत्तराखंड या राज्यांनी आपल्या क्षेत्रात संपूर्णपणे सेंद्रिय शेती करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. ईशान्य भारतामध्ये पारंपरिक पद्धतीने सेंद्रिय शेती केली जाते. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी सेंद्रिय शेतीचे योगदान किती महत्वाचे ठरू शकते हे प्रस्तुत संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे.

**बीज संज्ञा:-** सेंद्रिय शेती, पर्यावरण, सजीव,

**गृहीत कृत्य:-**

१) सेंद्रिय शेतीमुळे पर्यावरणाचा र्हास होत नाही.
२) सेंद्रिय शेती हि सजीव सृष्टीसाठी लाभदायक आहे.
३) सेंद्रिय शेती हि अर्थव्यवस्थेचा शाश्वत विकास करते.

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत अध्ययन हे दुय्यम सामग्रीवर आधारित आहे. तथ्य गोळा करताना क्रमिक पुस्तके, संदर्भग्रंथ, प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादींचा आधार घेतला आहे.

**प्रस्तावना:-**

अतिउत्पादन घेण्याच्या लालसेने व पीक संरक्षणासाठी कीटकनाशकांचा वारेमाप वापर वाढला आहे. त्यातच गावरान बीयाणे जाऊन संकरित बियाणे लागवडीकडेही कल वाढला आहे. मात्र, फळे व भाजीपाल्यावरील कीटकनाशकांचे अंश थेट मानवी शरीरात जाऊ लागल्याने आज मानव विविध आजारांना बळी पडू लागला आहे. या सर्व गोष्टींची दखल घेऊन राज्य शासनाने 'सेंद्रिय शेती धोरण' जाहीर केले आहे सेंद्रीय पद्धतीने शेती हरितक्रांतीपर्यंत

झाली. हरितक्रांतीमध्ये रासायनिक खताचा अवलंब भारतात होऊ लागला. सुरुवातीच्या काळात शेतमालात मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळू लागले मात्र जमीन कठीण होऊ लागली. १९६० च्या काळात जमिनी लाकडी नांगराने नांगरत असत. ती नंतरच्या काळात लोखंडी नांगाराने नांगरावी लागे. त्यानंतर ट्रक्टरने शेती केली जाऊ लागली. त्यामागे लवकर शेतीची मशागत करणे व लोखंडी नांगराने जमीन नांगरली जाऊ शकत नाही. म्हणजेच रासायनिक औषधामुळे जमीन कठीण म्हणजेच मृत होत चालली आहे. तसेच रासायनिक खतांचा अतिरिक्त वापर हा सजीव सृष्टीसाठी तसेच पर्यावरणासाठी हानिकारक आहे. सिकिम सारख्या छोट्या राज्ज्याने सेंद्रिय पद्धतीच्या शेतीचा १००% अवलंब केला त्यामुळे निश्चितच त्या राज्यात लोकांना त्याचा फायदा होईल परंतु भारतात सर्वच राज्ज्यांमध्ये सेंद्रिय शेती केली जात नाही. पंजाब सारख्या राज्ज्यात तर असंख्य लोक हे कॅन्सर सारख्या आजाराला बळी पडले आहेत. सजीव जीवनासाठी सेंद्रिय शेतीचे महत्व जाणून घेण्याचा प्रयत्न सदर संशोधन पत्रामध्ये केलेला आहे

**सेंद्रिय शेती:-**

सेंद्रिय शेती म्हणजे नैसर्गिक साधनाचा वापर करून औषध, खते तयार करणे व पारंपारिक बियाणाचा वापर करून केलेली विषमुक्त म्हणजेच रसायनाचा वापर टाळून केलेली शेती म्हणजे सेंद्रिय शेती होय. सेंद्रिय शेती म्हणजे परंपरागत शेती होय. शेती करताना रसायनाचा वापर न करता केवळ शेतातील पिकांचे अवशेष, शेण, गोमूत्र व नैसर्गिक साधनांचा वापर करून सेंद्रिय शेती केली जाते. हरितक्रांतीच्या आधी शेतामध्ये केवळ शेणखत वापरत असत. बियाणे सरळवाण म्हणजेच कोणत्याही प्रकारची प्रकिया न केलेले वापरत. यामुळे पिकांची गुणवत्ता वाढत असे. जमिनीमध्ये कर्ब योग्य प्रमाणात राहिल्यामुळे जमिनीची सुपीकता वाढून पिकाची वाढ योग्य होऊन उच्च प्रतीच्या व आरोग्यास पोषक असण्याऱ्या उत्पादनाची निर्मिती होत होती.

**जागतिक पातळीवरील सेंद्रिय शेती:-**

**तक्ता क्र.१**

| देश | दशलक्ष हेक्टर |
|---|---|
| ऑस्ट्रेलिया | १२.०० |
| आर्जेनटीना | ४.४० |
| यु एस. ए | १.९५ |
| चीन | १.८५ |
| ब्राझील | १.७७ |
| स्पेन | १.३३ |
| भारत | १.१८ |
| इटली | १.११ |
| जर्मनी | ०.९५ |
| उरुग्वे | ०.९३ |

संदर्भ:- https://www.organic-world.net

जागतिक पातळीवरील सेंद्रिय शेतीचा आढावा घेतल्यास असे दिसून येते कि वरील तक्त्यामध्ये सर्वाधिक कृषी जमीन असलेले जगातील १० देशांचा आढावा घेण्यात आलेला आहे. सर्वाधिक सेंद्रिय कृषी जमीन ऑस्ट्रेलिया या देशात असून तेतील १२ दशलक्ष हेक्टार जमीन हि सेंद्रिय कृषी क्षेत्राखाली येते . तर सर्वात कमी उरुग्वे या देशाचा आहे तेथे ०.९३ दशलक्ष क्षेत्र हे सेंद्रिय कृषी जमीन आहे.

**सर्वाधिक उत्पादकांची संख्या असलेले 10 देश:-**

| देश | उत्पादकांची संख्या ( दशलक्ष मध्ये) |
|---|---|
| भारत | ६७७२५७ |
| युगांडा | १७७८९३ |
| मेस्कीको | १२८८६२ |
| इथिओपिया | १०१५७८ |
| टांझानिया | ८५३६६ |
| पेरू | ५४९०४ |
| इटली | ४३०२९ |
| टर्की | ३५५६५ |
| बुर्कीना | २७७४८ |
| स्पेन | २५२९१ |

संदर्भ:- https://www.organic-world.net

वरील तक्त्यामध्ये सर्वाधिक सेंद्रिय उत्पादन घेणाऱ्या उद्पादकांची संख्या दर्शवण्यात आलेली असून सर्वाधिक उद्पादाकांची संख्या भारतात वासून भारतात एकूण ६७७२५७ दशलक्ष एवेढे उद्पादक आहे. तर सर्वात कमी उद्पादक हे स्पेन या देशात आहे. म्हणजेच भारतासाठी सेंद्रिय पद्धतीने उत्पादन घेणे नवीन नाही भारतात पारंपारिक पद्धतीने शेती केली जात होती भारतच सेंद्रिय शेतीचा जनक आहे. त्यामुळे पर्यावरणीय हानी टाळण्यासाठी भारतात सेंद्रिय शेतीत वाढ झाली पाहिजे. लोकसंखेच्या तुलनेत सेंद्रिय शेती उत्पादन कमी आहे.

**रासायनिक खतांमुळे पर्यावरणाचा र्हास:-**

**मातीचा ऱ्हास:-**

जमिनीत जास्त प्रमाणात खतांचा वापर केल्याने जमिनीतील आम्लाची पातळी वाढून जमिनीची सुपीकता बदलू शकते. म्हणूनच प्रत्येक 3 वर्षांतून एकदा तरी माती परीक्षण करून घेण्याची शिफारस केली जाते जेणेकरून तुम्ही योग्य प्रमाणात खतांचा वापर करत आहात की नाही याचा मागोवा ठेवता येईल. मातीचे pH चे स्तर 0-14 पर्यंत बदलते, ज्यामध्ये 0 सर्वात अम्लीय आणि 14 सर्वात मूलभूत मानले जाते. 7 तटस्थ मानले जाते. आदर्श मातीचा pH प्रत्येक वनस्पतीनुसार बदलतो आणि काही बदल करून त्यात बदल केला जाऊ शकतो. खते अशुद्धतेने माती दूषित करतात, जी त्यांच्या उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालापासून येतात .रासायनिक खतांच्या वापरामुळे जमिनीत असलेल्या सूक्ष्मजंतूंना हानी पोहोचवते . मातीचे स्वरूप बदलते , ती एकतर खूप अम्लीय किंवा खूप क्षारीय बनते. खतांच्या अतिवापरामुळे जमिनीमध्ये असणाऱ्या अन्नद्रव्यांमध्ये असंतुलन निर्माण होते.

**जलप्रदूषण:**

खतांमध्ये मिथेन, कार्बन डायऑक्साइड, अमोनिया आणि नायट्रोजन यांसारखे पदार्थ आणि रसायने असतात, ज्यांच्या उत्सर्जनामुळे ते पाण्याच्या प्रवाहाने नदीत आणि मोठमोठ्या जलाशयात वाहून जातात त्यामुळे जलचर प्राणी आणि संपूर्ण सजीव ते दुषित पाणी पिऊन वेगवेगळ्या आजारांना बळी पडतात वातावरणातील हरितगृह वायूंच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात योगदान होते .यामुळे ग्लोबल वॉर्मिंग आणि हवामान बदल होत आहेत.

**मानवी आरोग्य**

खतांमध्ये नायट्रोजन आणि इतर रसायने देखील पिण्याच्या उद्देशाने वापरल्या जाणार्या भूजल आणि पाण्यावर परिणाम करू शकतात! याचा सर्वात सामान्य परिणाम म्हणजे ब्लू बेबी सिंड्रोमचा विकास होऊ शकतो जो लहान मुलांमध्ये होतो ज्यांच्या त्वचेच्या ऊतींमध्ये ऑक्सिजन कमी असतो, म्हणूनच त्यांची त्वचा निळी किंवा जांभळ्या रंगाची दिसते. तुम्हाला हे जाणून घेण्यात देखील रस असेल की अभ्यासातून असे दिसून आले आहे की लॉन खतांचा

आणि कीटकनाशकांच्या वापरामुळे मानवांमध्ये, विशेषत: मुलांमध्ये कर्करोग आणि जुनाट आजारांसारखे आरोग्य धोके होऊ शकतो.

**जगभरातील हवामान बदल**


खतांमध्ये मिथेन, कार्बन डायऑक्साइड, अमोनिया आणि नायट्रोजन यांसारखे पदार्थ आणि रसायने असतात, ज्यांच्या उत्सर्जनामुळे वातावरणातील हरितगृह वायूंच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ होते. यामुळे ग्लोबल वॉर्मिंग आणि हवामान बदल होत आहेत. खरेतर, नायट्रोजनचे उपउत्पादन असलेले नायट्रस ऑक्साईड हा कार्बन डायऑक्साइड आणि मिथेननंतरचा तिसरा सर्वात महत्त्वाचा हरितगृह वायू आहे. म्हणूनच, खतांचा वापर आपल्या पर्यावरणासाठी हानिकारक आहे.

वरील मानवीय आणि पर्यावरणीय हानी टाळण्यासाठी सेंद्रिय शेती हा एक उत्तम पर्याय आहे. सेंद्रिय शेतीमुळे पर्यावरणीय आणि सजीवांच्या आरोग्याची हानी टाळू शकते.

**सेंद्रिय शेतीचे फायदे:**

**आर्थिक:** सेंद्रिय शेतीमध्ये, पिकांच्या लागवडीसाठी महाग खते, कीटकनाशके किंवा HYV बियाणे आवश्यक नसते. त्यामुळे अतिरिक्त खर्च होत नाही. खालील तक्त्यामध्ये जगातील सर्वाधिक सेंद्रिय शेती असलेल्या प्रदेशांचा आढावा घेण्यात आलेला आहे यात बहुतेक देश जे सेंद्रिय उत्पादने घेतात ते विकसित आहेत. याचा अर्थ असा होतो कि सेंद्रिय शेतीचे आर्थिक फायदे सर्वाधिक आहे.

**सेंद्रिय शेती जमिनीचा सर्वाधिक वाटा असलेले दहा देश/क्षेत्रे:**




संदर्भ:- https://www.organic-world.net

जगभरात सेंद्रिय शेती केली जाते, परंतु विक्रीसाठी बाजारपेठ उत्तर अमेरिका आणि युरोपमध्ये सर्वात मजबूत आहे, तर सर्वात जास्त समर्पित क्षेत्र ऑस्ट्रेलियामध्ये आहे, सर्वात जास्त उत्पादक भारतात आहेत आणि फॉकलंड बेटांचा सर्वाधिक वाटा आहे.

**गुंतवणुकीवर चांगला परतावा:** स्वस्त आणि स्थानिक निविष्ठांचा वापर करून, शेतकरी गुंतवणुकीवर चांगला परतावा मिळवू शकतो.

**उच्च मागणी:** भारत आणि जगभरात सेंद्रिय उत्पादनांना मोठी मागणी आहे, ज्यामुळे निर्यातीद्वारे अधिक उत्पन्न मिळते.

**पौष्टिक:** रासायनिक आणि खत-वापरलेल्या उत्पादनांच्या तुलनेत, सेंद्रिय उत्पादने अधिक पौष्टिक, चवदार आणि आरोग्यासाठी चांगली असतात.

**पर्यावरणास अनुकूल:** सेंद्रिय उत्पादनांची शेती ही रसायने आणि खतांपासून मुक्त आहे, त्यामुळे पर्यावरणाला हानी पोहोचत नाही. सेंद्रिय शेतीमध्ये मातीचे आरोग्य, जैवविविधता आणि पर्यावरणाचा समतोल या गोष्टींना प्राधान्य दिले जाते .त्यामुळे मातीची धूप कमी होते, जलप्रदूषण होत नाही तसेच शेतीला फायदेशीर असणारे कीटक आणि वन्यजीवांचे नुकसान कमी होते.

**इतर फायदे**

अनुकूल वातावरण.शाश्वत विकासाला प्रोत्साहन देते.निरोगी आणि चवदार अन्न.स्वस्त प्रक्रिया.उत्पन्न मिळते.निर्यातीतून उत्पन्न मिळते,रोजगाराचे स्त्रोत,सेंद्रिय शेती ही जास्त कष्टाची असते त्यामुळे त्यातून अधिक रोजगार निर्माण होतो

**निष्कर्ष:-**

१. सेंद्रिय पद्धतीने शेती उत्पादन घेतल्यास पर्यावरणीय समस्या निर्माण होऊ शकत नाही. तसेच मानव जीवनास हि हानी पोहचत नाही. तसेच जागतिक पर्यावरणीय समस्या कमी होतील.
२. जगामध्ये सर्वत्र सेंद्रिय शेती केली जाते आणि ज्या देशांनी सेंद्रिय पद्धतीचा अवलंब चांगल्या प्रकारे केला आहे त्या देशांचा विकास झाला आहे.
३. सेंद्रिय पद्धतीने शेती केल्यास सुरवातीला उद्पादन कमी राहू शकते, परंतु शाश्वत विकासाच्या दृष्टीकोनातून सेंद्रिय शेती अंत्यंत फायदेशीर आहे.

**समारोप:**

सेंद्रिय शेती हि काळाची गरज असून सेंद्रिय शेतीची किंवा नैसर्गिक शेतीची संकल्पना ही आशिया खंडातील देशांमधून पुढे आलेली आहे. भारतातील आणि चीनमधील शेतकऱ्यांना ही कला फार पूर्वीपासून जोपासली आहे, वाढवली आहे. रासायनिक खतांचा शोध लागण्यापूर्वी शेती ही सेंद्रिय पद्धतीनेच केली जात असे. आजही दुर्गम भागात आणि कोरडवाहू क्षेत्रावर अतिशय कमी प्रमाणात किंवा नगण्य रासायनिक निविष्ठांचा वापर केला जातो. भारत सरकार दोन समर्पित राष्ट्रीय योजनांद्वारे देशात सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देत आहे परंपरागत कृषी विकास योजना (PKVY) आणि मिशन ऑर्गेनिक व्हॅल्यू चेन डेव्हलपमेंट फॉर ईशान्य क्षेत्र (MOVCD-NER) 2015 पासून राज्य सरकारांमार्फत. या योजनांतर्गत, पुरविल्या जाणाऱ्या सहाय्यामध्ये शेतकरी क्लस्टर किंवा शेतकरी उत्पादक संघटना तयार करणे समाविष्ट आहे; इनपुट खरेदी; कापणीनंतरच्या पायाभूत सुविधांच्या निर्मितीसह मूल्यवर्धन; पॅकेजिंग; ब्रँडिंग आणि प्रसिद्धी; वाहतूक; आणि सेंद्रिय मेळावे आयोजित करणे. राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY), मिशन फॉर इंटिग्रेटेड डेव्हलपमेंट ऑफ हॉर्टिकल्चर (MIDH) आणि भारतीय कृषी संशोधन परिषद (ICAR) अंतर्गत ऑरगॅनिक शेतीवरील ऑल-इंडिया नेटवर्क प्रोग्राम यांसारख्या इतर राष्ट्रीय योजनांतर्गत सेंद्रिय शेतीला समर्थन दिले जाते.

रासायनिक खतांचा वापर कमी करून सेंद्रिय पद्धतीने शेती केल्यास निश्चितच पर्यावरणीय आणि मानवीय परिणाम टाळले जाऊ शकतात. सेंद्रिय उत्पादनांची शेती ही रसायने आणि खतांपासून मुक्त आहे, त्यामुळे पर्यावरणाला हानी पोहोचत नाही. सेंद्रिय शेतीमध्ये मातीचे आरोग्य, जैवविविधता आणि पर्यावरणाचा समतोल या गोष्टींना प्राधान्य दिले जाते .त्यामुळे मातीची धूप कमी होते, जलप्रदूषण होत नाही तसेच शेतीला फायदेशीर असणारे कीटक आणि वन्यजीवांचे नुकसान कमी होते

**संदर्भसूची:**

१. रामांजनेयुलु इ. 2020. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन: प्रमुख खेळाडूंच्या भूमिका. बायोटिका रिसर्च टुडे 2(8): 731-734.
२. युनायटेड स्टेट्स कृषी विभाग. 2020. "सेंद्रिय उत्पादन/सेंद्रिय अन्न: माहिती प्रवेश साधने". वेब पृष्ठ. USDA राष्ट्रीय कृषी ग्रंथालय. heeps:// www.nal.usda.gov/afsic/organic-productionorganic-food-information-access...

३. कुमार, एसआर, स्पंदना, पी., रमांजनेयुलु, एव्ही आणि श्रीनिवास, ए. 2019. “सेंद्रिय शेतीचे घटक”. यामध्ये: सेंद्रिय शेती (एड्स. गोपीनाथ, केए आणि रमांजनेयुलु, एव्ही). दया पब्लिशिंग हाऊस. एस्ट्रल इंटरनॅशनल प्रा.लि.चा एक विभाग. झाकण, नवी दिल्ली.

४. यादव एके. nd सेंद्रिय शेती – संकल्पना, परिस्थिती, प्राचार्य आणि पद्धती. एनसीओएफ, कृषी आणि सहकार विभाग, कृषी मंत्रालय, गोल.

५. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय. 2020. लोकसभा अतारांकित प्रश्न क्र. 2063, 'सेंद्रिय शेती' दिनांक 3 मार्च 2020, भारत सरकार, htep://164.100.24.220/loksabhaquestions/annex/173/AU2063. pdf.

६. खुराना, ए. आणि व्ही कुमार. 2020. सेंद्रिय आणि नैसर्गिक शेतीचे राज्य: आव्हाने आणि शक्यता, विज्ञान आणि पर्यावरण केंद्र, नवी दिल्ली.

७. कृषी मंत्रालय 8 शेतकरी कल्याण. 2020. लोकसभा अतारांकित प्रश्न क्र. 2063, "सेंद्रिय शेती" दिनांक 3 मार्च 2020, भारत सरकार, http://164.100.24.220/loksabhaquestions/annex/173/AU2063.pdf

८. सिही डी, शर्मा डी आणि पाठक एच इ. अल. 2012. "बासमती तांदळाच्या उत्पादकता आणि गुणवत्तेवर सेंद्रिय शेतीचा प्रभाव." ओरिझा ४९(१):२४-२९.

९. खुराना, ए. आणि व्ही कुमार. 2020. सेंद्रिय आणि नैसर्गिक शेतीचे राज्य: आव्हाने आणि शक्यता, विज्ञान आणि पर्यावरण केंद्र, नवी दिल्ली.

१०. Rodale संस्था. 2011. द फार्मिंग सिस्टम्स ट्रायल. रोडेल इन्स्टिट्यूट, कुत्झटाउन, पीए.

११. खुराना, ए. आणि व्ही कुमार. 2020. सेंद्रिय आणि नैसर्गिक शेतीचे राज्य: आव्हाने आणि शक्यता, विज्ञान आणि पर्यावरण केंद्र, नवी दिल्ली.

१२. औलख सीएस आणि रविशंकर एन. 2017. “भारतीय संदर्भातील सेंद्रिय शेती: एक दृष्टीकोन”. कृषी संशोधन जर्नल, 54(2): 149-164. DOI 10.5958/2395-146X.2017.00031.X

१३. अवस्थे, आर., बाबू, एस. सिंग, आर. आणि दास, एस. 2018. “जमिनीच्या गुणवत्तेवर सेंद्रिय अन्न उत्पादनाचा प्रभाव”. बदलत्या हवामानात अन्न सुरक्षिततेच्या प्रगतीसाठी संवर्धन शेतीमध्ये (खंड 1, अंक ऑगस्ट, पृ. 409-418). आज आणि उद्याचे प्रिंटर्स आणि प्रकाशक, नवी दिल्ली - 110 002, भारत.

१४. शर्मा, एके, पटेल, एन., पैनुली, डीके, आणि मिश्रा, डी. 2015. कमी पावसाच्या भागात सेंद्रिय शेती. सेंट्रल एरिड झोन रिसर्च इन्स्टिट्यूट, जोधपूर, ४८ पी.

१५. शिवरंजनी एस. 2019. “पाण्याची गुणवत्ता संरक्षित करण्यासाठी सेंद्रिय शेती”. यामध्ये: सरथ चंद्रन सी., थॉमस एस., उन्नी एम. (एडीएस) सेंद्रिय शेती. स्प्रिंगर, चाम. hteps://doi.org/10.1007/978-3-030-04657-6_1

# भारताची महासत्तेकडील वाटचाल – भारत व G-20

**प्रा. डॉ. सौ. सुप्रिया हेमंतकुमार काळे**

सहा. प्राध्यापिका अर्थशास्त्र विभाग श्री शिव छत्रपती महाविद्यालय,जुन्नर

**गोषवारा –**

संपूर्ण जगासाठी २०२३ हे वर्ष अनेक आव्हानांचे ठरले आहे. कोरोना महामारी नंतर अनेक जागतिक समस्या व आव्हाने यावर मात करण्यासाठी तसेच या अस्थिर जागतिक घडामोडींमध्ये भारत लवचिकता आणि परिवर्तनाचा दिपस्तंभ म्हणून उदयास आला आहे आणि वेळीच धोरणात्मक पावले उचलत जागतिक आर्थिक आव्हानांमध्ये दिशादर्शक ठरत आहे. जागतिक दरी भरुन काढण्यासाठी भारत सज्ज झाला आहे. जी–२० परिषदेसाठी जागतिक नेत्यांचे आणि उत्प्रेरक व सर्व समावेशक नवी दिल्ली नेत्यांचा जाहिरनाम्याचा स्वीकार हे भारताचे राजनैतिक सामर्थ्य अधोरेखित करते. एक पृश्वी, एक कुटुंब, एक भविष्य या भावनेला अनुसरुन **G-20** परिषदेतून फलित नवी दिल्ली जाहिरनाम्यात सकारात्मक संकल्पाच्या दिशेने कृती बिंदू निर्देश स्पष्ट करण्यात आले. या भुमिकेमुळे भारताला शांतता, सुरक्षितता पासून आर्थिक सहकार्य आणि हवामान कृतीसाठी मार्ग आखण्यासाठीची संधी मिळाली आहे. यामुळे अनेक तातडीच्या जागतिक समस्यांवर तोडगा निघण्याची आशा निर्माण झाली आहे.

विविध क्षेत्रांमध्ये प्रशंसनीय बदलांचा साक्षीदार २०२३ हे वर्ष ठरले आहे. २०३० पर्यंत शाश्वत विकासाची जागतिक स्तरावर समस्या निराकरणासाठी, डिजिटल उपाय योजना आणि प्रणालींवर लक्ष केंद्रीत केले गेले की जेणेकरुन समाजहित कार्ये व सेवा प्रभावीपणे राबवल्या जावू शकतील. तसेच दल समानता आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी समावेशक समुदायांची उभारणी करण्याच्या दृष्टीने अनुकूल वातावरण निर्मिती करण्यासाठी भारत व **G-20** देश प्रयत्नशील आहेत.

**Key Word** –

भारत व **G-20** सहभाग सामाजिक व आर्थिक समावेशन, वसाहतवाद निर्मुलन, तांत्रिक प्रगती, भारत व सखोल आंतराष्ट्रीय संबंध, शाश्वत विकास व वृध्दी, स्टार्टअप व रोजगार संधी, नवोन्मेष निती, २०३० पर्यंत शाश्वत विकास

**प्रस्तावना –**

भारतीय वारसा जतन आणि संवर्धित करण्याच्या प्रयत्नात भारताची सांस्कृतिक संपत्ती त्याच्या अस्मितेचा अविभाज्य भाग आहेत. विविध क्षेत्रातील भारताच्या गतिमान प्रवासाचे सार उलगडून दाखविणे या शोधनिबंधाचे महत्वाचे उद्दिष्ट असून महत्वाच्या धोरणात्मक उपक्रमावर प्रकाश टाकणे, आर्थिक विकास देशाचा समृध्दीला आणि गतिला चालना व आधार देतो म्हणून ती भूमिका स्पष्ट करणे आवश्यक ठरते. भारताचे **G-20** अध्यक्षपद हा एक मैलाचा दगड ठरला असून यात हवामान आणि विकास याबाबत कार्यसूची यशस्वीपणे जगभरात पोहचवण्यात भारत यशस्वी ठरला आहे. यामुळे गरिबी निर्मुलन आणि पर्यावरण संरक्षण यापैकी एक निवडण्याची गरज ही निदान भारतासाठी उरलेली नाही. सामाजिक–आर्थिक परिवर्तनाचे नेतृत्व करताना, आपल्या स्व–अनुभवातून भारताच्या विकासात्मक मॉडलेला मान्यता मिळालेली आहे. भारताच्या परराष्ट्रीय धोरणामध्ये **G-20** या शिखर गटाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. या गटातील करार व संबंधामध्ये जागतिक व्यापार, गुंतवणुक, रोजगार निर्मिती, जागतिक अन्नसुरक्षा, जागतिक आर्थिक समावेश इ. महत्वाच्या बाबींवर प्रकाश टाकला गेला आहे. भारताचे **G-20** गटाचे अध्यक्षपद स्वीकारुन अशा युगात प्रवेश केला आहे. जिथे विकसनशील देश जागतिक कथन तयार करण्यात त्यांचे योग्य स्थान घेतात. एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य या वसुधैव कुटुंबकमच्या भावनेला चिंतन करण्याचा पुन्हा वचनबध्द करण्याचा तसेच पुनरुज्जीवीत करण्याचा प्रयत्न यशस्वी करण्याचे भारताचे प्रयत्न आहेत.

प्रस्तुत शोध निबंधामध्ये भारताची महासत्तेच्या दिशेने वाटचाल, भारताचे **G-20** गटातील सहभागाद्वारे भारतातील विकासातील बदल, नवीन उपक्रम व धोरणांचा आढावा, भारतीय सार्वभौमत्वातील यशस्वीता याचे वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. विकसित व विकासनशील देशांनी एकत्र येवून अनेक जागतिक समस्यांचा सामना करण्यासाठी

प्रयोजित केलेली एक निती म्हणजेच **G-20** होय. आज **G-20** समुहाला भेडसावणारे आव्हान अत्यंत गुंतागुंतीचे असून त्याला तोंड देण्यासाठी सर्व देशांमार्फत केलेल्या अभिनव प्रयत्नांच्या सहयोगाची गरज आहे. अशा स्थितीत भारत जागतिक पातळीवरील नव्या पहाटेच्या स्वागताच्या तयारीत आहे. त्यामध्ये स्टार्टअप हा मंच अतिशय वेगवान पध्दतीने निर्माण करण्यात आला आहे. भारताच्या अध्यक्षता कालावधीत स्टार्टअप २० उपक्रम निर्माण करुन उदयोगांची वाढ व गुंतवणूक या उद्दिष्टांची पूर्तता करण्यात येणार आहे. जी२० शिखर परिषद अध्यक्षपद हे जागतिक स्तरावरील भारत देशाची उंची वाढवण्यास व भारताची महासत्तेकडील वाटचाल यांना प्रेरणा व प्रोत्साहन देणार आहे. भारताचे परराष्ट्र धोरण ग्लोबल कॉमन गुड वर भर देत आहे. त्यामुळे **G-20** गटाच्या अध्यक्ष कालावधीत भारतासाठी विकसनशील देशांच्या विरोधात विशेषत: कृषी आणि अन्न अनुदानाच्या क्षेत्रात दिर्घकाळ चालत आलेल्या विसंगती सुधारण्याची एक उत्तम संधी सादर करते. भारत आणि **G-20** आंतरराष्ट्रीय संबंध, सर्वसमावेशक, महत्त्वाकांक्षी, कृती, केंद्रीत बाबींचे दर्शन घडवते.

**संशोधन उद्दिष्टये –**

१. **G-20** संकल्पना समजावून घेणे.
२. भारताची महासत्तेकडील वाटचाल आढावा घेणे.
३. भारत आणि **G-20** सहभाग अभ्यासणे
४. भारताचे आंतरराष्ट्रीय संबंधाविषयी माहिती घेणे
५. **G-20** अध्यक्षपदी भारताची भूमिका अभ्यासणे

**संशोधन पध्दती –**

प्रस्तुत शोध निबंध तयार करताना अर्थशास्त्रीय संशोधन पध्दतीनुसार माहिती संकलनासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. त्यासाठी विविध वर्तमानपत्रे, जरर्नलस्, मासिके, संशोधन लेख, इंटरनेट सारखे माध्यम यांचा आधार घेण्यात आला आहे.

**G-20 म्हणजे काय?**

**G-20** म्हणजेच हा जगातल्या प्रमुख विकसीत आणि विकसनशील देशांचा राष्ट्र गट आहे. १९९९ साली या राष्ट्रगटाची स्थापना करण्यात आली होती. **G-20** राष्टगटात भारताशिवाय अर्जेटिंना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, फ्रान्स, जर्मनी, इंडोनेशिया, इटली, जपान, दक्षिण कोरिया, मेक्सिको, रशिया, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, तुर्की, ब्रिटन, अमेरिका, युरोपियन युनियन व भारत अशा २० देशांचा समावेश आहे. याशिवाय संयुक्त राष्ट्रे, जागतिक आरोग्य संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बॅंक अशा आंतरराष्ट्रीय संघटनांचे प्रमुख इ.चा समावेश होतो. **G-20** विकसीत व विकसनशील राष्ट्र गट ज्याला जी२१/जी२३/जी२० देखील म्हणतात. १९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात ओढावलेल्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर १९९९ साली G-20 गटाची स्थापना करण्यात आली असून **G-20** चे कोणतेही अधिकृत सचिवालय नाही. २०२३ मध्ये आफ्रिकन युनियनचा समावेश करण्यात आला आहे.

७. G-20 चा उद्देश – मध्यम उत्पन्न देशांना सामील करुन जागतिक आर्थिक स्थैर्य सुरक्षित करणे.

८. G-20 ची व्याप्ती – G-20 राष्ट्रांचा जागतिक लोकसंख्येतील वाटा ६० टक्के आहे. जागतिक जीडीपी मधील वाटा ८० टक्के आहे. जागतिक व्यापारामधील वाटा ७५ टक्के आहे.

९. G-20 ची उद्दिष्टये–

१. जागतिक आर्थिक स्थैर्य आणि शाश्वत वाढ साध्य करण्यासाठी त्यांच्या सदस्यांमध्ये धोरण समन्वय राखणे.
२. जोखीम कमी करणाऱ्या आणि भविष्यातील आर्थिक संकटांना प्रतिबंध करणाऱ्या आर्थिक नियमांना प्रोत्साहन देणे.
३. एक नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक संरचना विकसित करणे.
४. हवामान बदल, पर्यावरण संवर्धन, भ्रष्ट्राचार आणि उर्जा संकट यासारख्या आव्हानांचा सामना करण्यासाठी समान दृष्टीकोन
विकसित करणे.

**१०. G-20 चा इतिहास —**

१९९७–१९९८ चे आशियाई आर्थिक संकट संपले तेव्हा आंतरराष्ट्रीय व्यवस्थेवरील चर्चेसाठी प्रमुख उदयोन्मुख बाजारपेठेतील देशांचा सहभाग आवश्यक असल्याचे मान्य करण्यात आले म्हणून जी ७ अर्थमंत्री १९९९ मध्ये **G-20** वित्तमंत्री आणि सेंट्रल बँक गव्हर्नर बैठक स्थापन करण्यास सहमत झाले. सर्व देशांच्या फायदयासाठी स्थिर आणि शाश्वत जागतिक आर्थिक वाढ साध्य करण्यासाठी सहकार्याला प्रोत्साहन देणे हा त्यांचा उद्देश होता. प्रमुख विकसित आणि उदयोन्मुख बाजारपेठेतील, देशातील नेत्यांसाठी मंच म्हणून सप्टेंबर २००९ मध्ये तिसरी शिखर परिषद पिट्सबर्ग येथे झाली. याठिकाणी प्रमुख नेत्यांनी **G-20** ला 'आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्यासाठी प्रमुख मंच' म्हणून नियुक्त केले. या शिखर बैठका त्यापुढे २०१० पर्यंत अर्धवार्षिक आणि २०११ पासून दरवर्षी आयोजित केल्या गेल्या.

**११. आगामी G-20 शिखर परिषद —** २०२३ भारत, २०२४ ब्राझील, २०२५ दक्षिण आफ्रिका

**१२. भारताच्या G-20 अध्यक्ष पदाचे महत्त्व —**

**G-20** हे आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्याचे प्रमुख मंच असून ते जागतिक जीडीपी च्या सुमारे ८० टक्के जागतिक व्यापाराच्या ७५ टक्के आणि जगाच्या लोकसंख्येच्या सुमारे दोन तृतीयांश प्रतिनिधित्व करते. **G-20** गटाचे अध्यक्षस्थान भारतीय अर्थव्यवस्थेबाबत हाती घेण्यात आलेल्या नवीन युगातील सुधारण कर्तव्य काळामध्ये त्याच्या लवचिक वाढीचा पाया तयार करतात. मागील काही वर्षामध्ये विकसित झालेले समृद्ध आणि निरोगी आर्थिक क्षेत्र अधिक गुंतवणूक आणि उपभोगाच्या माध्यमातून आगामी वर्षात मजबुत आर्थिक वाढीस हातभार लावत कार्यक्षम तरतुदी सुनिश्चित करतील.

भारतातील संपूर्ण ठिकाणी ३२ विविध क्षेत्रांमध्ये सुमारे २०० बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. महिला सक्षमीकरण, लोकशाही आणि डिजिटल तंत्रज्ञान या क्षेत्रातील आपले कौशल्य जगासोबत शेअर करण्याची भारताला विशेष संधी प्राप्त झाली. लोकशाही मूल्ये असलेला देश या नात्याने भारत जगाला दाखवून देवू शकतो की जेव्हा लोकशाही संस्कृती बनते तेव्हा संघर्षाची व्याप्ती संपुष्टात येते. सध्या प्रचलित रशिया–युक्रेन संघर्षाला यामध्ये महत्व प्राप्त झाले. G-20 नेतृत्वाद्वारे भारताला आशा आहे. हवामान बदल, नवीन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान, अन्न आणि ऊर्जा, सुरक्षा इ. यासारख्या जगाच्या परस्पर संबंधातून उदयास येणाऱ्या काही प्रमुख जागतिक आव्हांनावर शाश्वत उपाय शोधण्याच्या दिशेने या तत्वाचा विस्तार होईल.

**G-20 शिखर परिषद २०२३ भारत —**

९ ते १० सप्टेंबर २०२३ रोजी नवी दिल्ली येथे १८वी G-20 शिखर परिषद पार पडली. नवी दिल्ली येथे भारत मंडपम याठिकाणी या परिषदेचे आयोजन करण्यात आले. **वसुधैव कुटुंबकम** ही या परिषदेची थीम होती. भारत सरकारने तयार केलेल्या या परिषदेच्या निमंत्रण पत्रिकेवर भारताच्या राष्ट्रपतींच्या बाबतीत प्रेसिडेंट ऑफ इंडियाच्या ऐवजी प्रेसिडेंट ऑफ भारत असा उल्लेख करण्यात आला. या परिषदेच्या दैदिप्यमान आणि यशस्वी आयोजनामुळे भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रतिमा कमालीची उंचावल्याचे दिसून येते.

**दिल्ली घोषणापत्र —**

या परिषदेमध्ये दिल्ली घोषणापत्र सादर करण्यात आले. G-20 च्या नेत्यांनी या घोषणापत्रातील सर्व मुद्दयांवर १०० टक्के सहमती दर्शवली.

**घोषणापत्रातील प्रमुख बाबी—**

- ✶ मजबुत,शाश्वत, संतुलित आणि सर्वसमावेशक वाढ सुनिचित करणे. श
- ✶ शाश्वत विकास उद्दिष्टांच्या प्रगतिचा वेग वाढविणे. श
- ✶ शाश्वत भविष्यासाठी हरित विकासाला प्राधान्य देणे.
- ✶ २१व्या शतकासाठी बहुपक्षीय संस्थांची पुर्नरचना करणे.

**G-20 यशस्वी अध्यक्षपदानंतर भारत एकमताचा निर्माता म्हणून उदय —**

केंद्रिय परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी नवी दिल्ली येथे इंडिया अॅड द फयुचर ऑफ द **G-20** या पुस्तकाचे प्रकाशन करताना ते म्हणतात भारत हा जगात एक मित्र आणि सहमतीचा निर्माता म्हणून उदयास आला असून देशाच्या राजनैतिक इतिहासातील हा उल्लेखनीय काळ म्हणून ओळखला जाणार आहे.

G-20 **शिखर परिषद २०२३ मधील भारताच्या यशस्वी वाटचालीसाठी सहायभूत ठरणाऱ्या महत्वाच्या बाबी –**

**१. आफ्रिकन युनियनला कायमस्वरुपी G-20 सदस्यत्व – या परिषदेमध्ये आफ्रिकन युनियनला जी२० मध्ये कायमस्वरुपी सदस्यत्व बहाल करण्यात आले. त्यामुळे G-20 आता G-21 झाले आहे.**

**२. ग्लोबल बायोफयुएल्स अलायन्स– जीबीए हा भारताच्या नेतृत्वाखाली जैव इंधनाच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी विकसित करण्यात आलेला उपक्रम आहे. या माध्यमातून रोजगार निर्मिती आणि आर्थिक वाढीसाठी प्रयत्न केले जाणार आहेत. हा उपक्रम पीएम जीवन योजना, SATAT आणि गोबरधन योजना या भारतातील विदयमान जैवइंधन कार्यक्रमांना गती देण्यास मदत करणार आहे.**

**संस्थापक सदस्य – भारत, अमेरिका, ब्राझील, अर्जेंटिना, बांगलादेश, इटली, मॉरिशस, दक्षिण आफ्रिका आणि संयुक्त अरब अमिराती या नऊ सदस्यांनी एकत्र येवून हा उपक्रम सुरु केला आहे. जीबीए चे संस्थापक सदस्य हेच जैवइंधनाचे प्रमुख उत्पादक आणि ग्राहक आहेत.**

**३. भारत–मध्य पूर्व आशिया – युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर –**

**हा प्रकल्प पार्टनरशिप फॉर ग्लोबल इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट नावाच्या व्यापक उपक्रमाचा भाग आहे. या संदर्भात भारत, अमेरिका, सौदी अरेबिया, युरोपियन युनियन, संयुक्त अरब अमिराती, फ्रान्स, जर्मनी आणि इटली यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. पायाभूत सुविधा प्रकल्पांना सहायभूत, रेल्वे, सागरी मार्ग, रस्ते वाहतुक जाळे उभारणे, चीनच्या बेल्ट अॅण्ड रोड इतिशिएटिव्ह ला प्रत्युत्तर म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे.**

**४. २०३० पर्यंत अक्षय उर्जा निर्मिती क्षमता तिप्पट करणे – २०२३ या परिपदे दरम्यान G-20 सदस्य राष्ट्रांना अक्षय उर्जा निर्मिती क्षमता २०२३ पर्यंत तिप्पट करण्याचे आश्वासन दिले.**

**५. दहशतवाद – G-20 नेत्यांनी दिल्ली जाहिरनाम्यात सर्व प्रकारच्या दहशतवादाचा निपेध केला.**

**६. आरोग्य – सर्वांसाठी न्याय, शाश्वत आणि सर्वसमावेशक जागतिक आरोग्य संरचना निर्माण करण्यावर विशेष भर देवून भविष्यात एक आरोग्य संकल्पना अंमलात आणण्यासाठी सर्व सदस्य राष्ट्रे विशेष प्रयत्न करणार आहेत.**

**७. वित्तीय क्षेत्र – G-20 परिपदेमध्ये सहभागी राष्ट्रप्रमुखांनी भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेचे विशेष कौतुक करुन भविष्यात क्रिप्टो करंन्सीसाठी जागतिक आराखडा तयार करण्याचे सर्व सदस्य राष्ट्रांचे प्रयोजन आहे.**

**८. पर्यावरण – या परिषदेमध्ये हवामान बदला संदर्भातील वित पुरवठयात भरीव वाढ करण्यावर भर देण्यात आला.**

**९. रशिया युक्रेन युध्द – जगभरातील भौगोलिक संघर्ष हे शांततेच्यामार्गाने सोडविण्यासाठी राष्ट्रे कटिबध्द असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.**

**१०.बहपक्षीय संस्था – आंतराष्ट्रीय वित्तिय संस्थांबरोबरच विविध बहुपक्षीय संस्थांमध्ये कालानुरुप बदल करण्याचे महत्व अधोरेखित करण्यात आले.**

**जी२० शिखर परिषद २०२३ मध्ये भारत–अमेरिका सहयोग –**

- भारत आणि युनायटेड स्टेट्स त्यांची तंत्रज्ञान भागीदारी मजबुत करण्यासाठी लवचिक सेमी कंडक्टर पुरवठा साखळी आणि दुरसंचार पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित करत आहेत.
- चिनी दुरसंचार उपकरणे काढून टाकण्याच्या अनुषंगाने भारत अमेरिकेच्या रिप अॅण्ड रिप्लेस पायलट प्रकल्पाला पाठिंबा देत आहे.
- भारत आणि अमेरिकेने अंतराळ आणि कृत्रिम बुध्दिमता सारख्या नविन आणि उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये विस्तारित सहकार्याद्वारे भारत–युएस प्रमुख संरक्षण भागीदारी अधिक सखोल आणि वैविध्यपूर्ण करण्यच्या वचनबध्दतेची पुष्टी केली आहे. अमेरिकेने भारतात जीईएफ ४१४ जेट इंजिन तयार करण्यासाठी जनरल इलेक्ट्रिक एरोस्पेस आणि हिंदुस्तान ऐरोनॉटिक्स लिमिटेड यांच्यातील व्यावसायिक कराराची अधिसूचना प्रक्रिया पूर्ण केली आहे. हे

वरील सर्व करार व उपक्रम अमेरिका आणि भारत यांच्यातील संरक्षण सहकार्यातील महत्वपूर्ण पाउल म्हणून ओळखले जात आहे. ज्यामुळे देशांतर्गत संरक्षण उत्पादन क्षमता वाढविण्याच्या भारताच्या वचनबध्दतेवर प्रकाश टाकला जातो.

**पीपल्स जी २०**

केवळ आंतरराष्ट्रीय स्तरावरुन भारताने सर्वसमावेशकता जिंकली आहे असे नाही तर जन भागीदारी कार्यक्रमांद्वारे देशभरातील नागरिक जी२० संबंधित कार्यक्रम आणि उपक्रमांमध्ये सक्रियपणे गुंतले. ६० शहारांमध्ये २२० हून अधिक बैठका आणि २५,००० हून अधिक प्रतिनिधी सहभागी झाल्याने जी २० विविध पार्श्वभूमीतील लोकांसाठी प्रवेशयोग्य बनले. विविध स्तरांवरील कार्यक्रम आयोजित करण्याच्या शिक्षण मंत्रालयाच्या प्रयत्नांमुळे २३३ दशलक्षाहून अधिक सहभाग वाढले. ज्यामुळे जी २० अध्यक्षपदाचा एक महत्वाचा क्षण म्हणजे व्हॉइस ऑफ द ग्लोबल साउथमधील १८ राष्टप्रमुखांचा सहभाग होता. राष्ट्रांसाठी त्यांच्या चिंता,आकांक्षा आणि प्राधान्यक्रम जागतिक स्तरावर मांडण्यासाठी या शिखर परिषद जी २० ने एक अमूल्य व्यासपीठ म्हणून काम केले.

**पर्यावरण रक्षणात भारताचे नेतृत्व व जी २० चे यजमान पद –**

जगतिक पर्यावरणाचे लक्ष साधन्यात भारताने नविन्यता निर्माण केली आहे. एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य या बोधवाक्यावरुन भारताच्या दीर्घकालीन भागीदारीचा उद्देश दिसून येतो. रशिया–युक्रेन युध्दामुळे जगात अनेक देश संकटात आहेत. परंतु भारत आपल्या अध्यक्षपद कारकिर्दीत आर्थिक स्थिरता व शाश्वत विकास या मुद्दयावर जोर देणार आहे. सर्व समावेशक, वैविध्यपूर्ण आणि तात्काळ प्रतिसाद देणारी जागतिक पुरवठा व्यवस्था निर्माण करणे तसेच भविष्यातील पृथ्वी वरील मूल्यवान खनिज संपत्ती वापरण्याची संधी निर्माण करणे हा भारताचा उद्देश आहे.

**पंचामृत धोरण हरित भारतासाठी आराखडा –**

आजिवाश्म स्त्रोतांपासून २०३० पर्यंत ५०० मेगावॅट उर्जा निर्मिती
२०३० पर्यंत ५० टक्के उर्जेची गरज अपारंपारिक स्त्रोतातून भागवणार
२०३० पर्यंत  कोट कार्बन उर्त्सजनात घट करणार
२०३० पर्यंत कार्बन उर्त्सजनात ४५ टक्के घट करणार
२०७० पर्यंत नेट कार्बन झिरोचे उद्दिष्ट साध्य करणार

**भारत एक उदयोन्मुख शक्ती –**

गेल्या ९ वर्षामध्ये भारताच्या वाटचालीत प्रचंड बदल घडून आला आहे. भारताने आता अमृत काळात प्रवेश केला असून हा काळ म्हणजे भारताला वैज्ञानिक, तंत्रज्ञानविषयक, आर्थिक तसेच राजकीय व सामाजिक क्षेत्रांमध्ये प्रचंड उंची गाठण्यासाठीची सुवर्ण संधी आहे. जागतिक पातळीवर भारत आज विश्व मित्र, विश्व गुरु आणि विश्व वैदय यांच्या रुपात उदयाला आला आहे. भारत आणि अमेरिका या दोन्ही देशांनी एकत्र येऊन धोरणात्मक स्वच्छ ऊर्जा भागीदारी केली आहे. भारताकडे जगातील पहिला संपुर्णपणे सौरउर्जेवर संचलित विमानतळ आहे. भारताची प्रचंड मोठी रेल्वे यंत्रणा या दशकात शुन्य उर्त्सजनाचे लक्ष साध्य करेल. भारताची भूमिका जागतिक मंचावरील केवळ एक निरिक्षक देश म्हणून राहिलेली नाही तर उत्तम परिणाम घडवू शकणारा महत्वाचा देश ठरला आहे. भरीव वित्तपुरवठयाची गरज ओळखून भारत जी २० च्या माध्यमातून प्रभावी बहुपक्षीय विकास बॅकांच्या महत्वावर भर देते आणि प्रतिसाद देणारी आंतरराष्ट्रीय वित्त व्यवस्था तयार करण्यासाठी कर्ज परतफेड करारांमध्ये चलन विनिमय हमी आणि आपत्ती कलमे यांसारख्या उपायांचा शोध घेत आहे.

**भारताची महासत्तेकडील वाटचाल –**

भारतीय अर्थव्यवस्थेबाबत हाती घेण्यात आलेल्या नवीन युगातील सुधारणा कर्तव्य काळामध्ये त्यांच्या लवचीक वाढीचा पाया तयार करत आहे. मागील काही वर्षामध्ये विकसित झालेले सदृढ आणि निरोगी आर्थिक क्षेत्र अधिक गुंतवणूक आणि उपभोगाच्या माध्यमातून आगामी वर्षात मजबूत आर्थिक वाढीस हातभार लावत कार्यक्षम पत तरतूद करत भांडवल चक्राला नवसंजिवनी देईल. डिजिटलायझेशन सुधारणा आणि अधिक औपचारिकरण, उच्च आर्थिक समावेशन, आर्थिक संधी त्यामुळे कार्यक्षतेत वाढ ही मध्यम कालावधीत भारताच्या आर्थिक वाढीसाठी आवश्यक चालक असतील. खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील संशोधन आणि विकासाची लक्षणीय वाढ, उच्च दर्जाच्या उत्पादन कृत्रिम बुध्दीमत्तेतील प्रगती, हवामान बदलाच्या विचारांनी प्रेरित उर्जा संक्रमण, तांत्रिक विकासामुळे सातत्यपूर्ण वाढीद्वारे

२०४७ पर्यंत देशाच्या उज्वल यशाचा मार्ग मोकळा होईल. त्याचप्रमाणे भारताचे जी २० अध्यक्षपद आफ्रिकन राष्ट्रांच्या आवाज बुलंद करण्यासाठी सक्रिय पाऊले उचलत आहे. भारताने अध्यक्षपद कार्यकाळात उर्जा सुरक्षा, पर्यावरण वित्तपुरवठा आणि ग्रीन हायड्रोजनचा विकास या मुद्दयांवर जोर दिला आहे. भारत हा ग्रीन हायड्रोजनसाठी हब होवू शकतो.

**जागतिक स्टार्टअपसाठी नवी पहाट –**

भारताच्या जी २० अध्यक्षतेच्या कालावधीत भारत जागतिक स्टार्टअप परिसंस्था आता या क्षेत्रात नव्या पहाटेच्या स्वागताच्या तयारीत आहे. देशात आजपर्यंत उभारण्यात आलेले सुमारे ९२००० स्टार्टअप उदयोग, युनिकॉर्न श्रेणीतील १०३ उदयोग आणि गेल्या वर्षात या क्षेत्रात झालेली ४० अब्ज डॉलर्सची गुंतवणुक अशा सकारात्मक पार्श्वभूमीसह भारतातील स्टार्टअप परिसंस्था जगातील तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी परिसंस्था म्हणून विकसित होत आहे आणि भारतासाठी मोठी संधी आहे. स्टार्टअप २० हा मंच म्हणजे भारताच्या स्टार्टअप परिसंस्थेचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याची अभूतपूर्व संधी आहे. स्टार्टअप २० उपक्रमाने उद्दिष्ट पूर्तीसाठी पायाभरणी आणि मैत्रीपूर्ण सहकारी संबंध, वित्तपुरवठा तसेच सर्व समावेशन आणि शाश्वतता या घटकांशी संबंधित तीन कृती दलांची उभारणी केली आहे. महिलांद्वारा संचालित स्टार्टअप उदयोग आणि संघटना यांचे पाठबळ वाढविण्यावर हे कृतीदल मोठया प्रमाणात लक्ष केंद्रित करणार आहे. जागतिक सहकार्याच्या माध्यमातून स्टार्टअप २० हा गट असे स्थान प्राप्त करेल जिथे या गटाकडे आंतरराष्ट्रीय पातळीवरील नियामकीय सुधारणांबद्दल सल्ला देण्याची क्षमता प्राप्त होईल, स्टार्टअप उदयोगांना व्यवसाय करणे सोपे व्हावे यादृष्टीने व्यवस्था करण्यासाठी सदस्य देशांना प्रोत्साहन देता येईल आणि जागतिक अर्थव्यवस्थांमधून प्रतिभा, भांडवल तसेच संधी आकर्षित करण्यासाठी स्टार्ट अप्सना मदत करता येईल.

**निष्कर्ष –**

जगातील २० बलाढय देशांची संघटना असलेल्या जी २० समुहाचे अध्यक्षपद भारताला मिळाले आणि भारताने या संधीचे सोने करुन दाखविले. या परिषदेत ११२ प्रस्तावांना संमती मिळाली. ७३ परिणाम दस्तऐवजांवर सहया झाल्या तर ३९ दस्तावेज म्हणजे अध्यक्षीय दस्तावेजही संमत झाले. ही आजवरच्या जी २० परिषदेपेक्षा विक्रमी कामगिरी ठरली. यामुळे भारताचा जागतिक व्यासपीठावर दबदबा वाढला. देश नवा इतिहास रचण्यासाठी सज्ज झाला आहे. या परिषदेत पंतप्रधानांनी जगाच्या उज्वल भविष्यासाठी सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास हा मंत्र दिला. जी २० चे अध्यक्षपद भारताच्या इतिहासातील सुवर्ण पान ठरले. सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञान, रोबोटिक्स, ऑटोमेशन, आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे युग आहे. त्यासाठी आतापासून सज्ज रहायला हवे आहे. भारत हा संपुर्ण जगाला आवाहन करतो की, प्रथम या जागतिक विश्वासाच्या अभावाचे रुपांतर एक विश्वासात आणि एका आत्मविश्वासात करु या. अनेक वर्षापासूनची जुनी आव्हाने आपल्याकडून नवीन उपाय मागत आहेत त्यासाठी आपल्याला मानवकेंद्री दृष्ट्रीकोनासह आपले दायित्व पार पाडत पुढे जायचे आहे.

देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेत पाचव्या क्रमांकावर आणणे हे आंतरराष्ट्रीय पातळीवरील आव्हान भारताने स्वीकारले आहे. अलिकडेच मार्च २०२३ पासून परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात गुंतवणूक करण्यास सुरुवात केली आहे. यावरुन आंतरराष्ट्रीय व्यापार उदयोगात जगाने भारताची दखल घेतली आहे हे सिध्द होते.

**संदर्भ**


१. हर्षवर्धन श्रिंगला, भारताचा वाढवा प्रभाव, योजना (नोव्हेंबर २०२३) पान नं. १०
२. डॉ.आरती जोशी, सबका साथ, सबका विश्वास आणि सबका प्रयास, उदयोजक (ऑक्टोबर २०२३) पान नं.५
३. Anuradh M. Chenoy, A Tale of Two Suminits Brics & G20, Economic & Political Weekly (Oct.2023), pg.no.10-12
४. Ashok Gulati, Shyma Jose, India-Africa in G21 Economic & Political Weekly (Nov.2023),page No.10-11
५. S.Jaishankar, The India Way-Strategies for an Uncertain word (2020)
६. https://www.drishtiias.com
७. https://www.thehindu.com
८. https://www.mea.gov.in/portal/foreign/relation/920-august
९. सुजन चिनॉय, भारत एक उदयोन्मुख शक्ती, योजना (डिसेंबर २०२३) पान नं.९–१४

# "शिक्षण क्षेत्रातील बदल: नवीन शैक्षणिक धोरण,अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम - एक अभ्यास"


संशोधक

**संदीप दौलतगिर गिरी**

ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महा. विद्यालय, परभणी.

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ. रमेश भालेराव

(प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख) शारदा महाविद्यालय, परभणी.


**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली (NCERT - National council of education research and training) यांनी 2017 मध्ये अध्ययन निष्पत्ती इयत्ता व विषयनिहाय निश्चित करून प्रसिद्ध केल्या.विद्यार्थ्यांना निर्धारित कालावधीत काय साध्य करायचे आहे ? हे दर्शविणारे विधाने अध्ययन निष्पत्तीच्या रूपाने दिसून येतात.सन 2010 पासून ते आज पर्यंत आपल्या शैक्षणिक,सामाजिक,राजकीय आणि सांस्कृतिक जीवनात अनेक महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत.या शैक्षणिक प्रक्रियेच्या अनुषंगाने अध्ययन निष्पत्ती,राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - 2020,विविध शिक्षण मंडळाच्या मूल्यमापन पद्धती व covid-19 यासारख्या वैश्विक आपत्ती व महामारीमुळे निर्माण झालेल्या आव्हानात्मक परिस्थितीतला सामोरे जाताना उपयोगात आणलेल्या मूल्यमापनासाठी ची माहिती तंत्रज्ञानाची विविध साधने यांचा विचार करण्यात आलेला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक - 2020 ला केंद्रीय मंत्रिमंडळाने 29 जुलै 2020 रोजीच्या बैठकीमध्ये मंजुरी दिली आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - 2020 नुसार प्रत्येक मुलाला जागतिक दर्जाचे शिक्षण मिळावे हे ध्येय समोर ठेवून वाटचाल सुरू आहे.यातील पहिला टप्पा निपुण भारत अंतर्गत FLN (fundamental literacy and numeracy) हा असून ज्यांचे FLN पूर्ण झाले आहे त्यांनी NAS (National achievement survey) अर्थात त्यांच्या वर्गातील अध्ययन निष्पत्ती पूर्ण कराव्यात.यानंतर ज्यांच्या अध्ययन निष्पत्ती पूर्ण होतील अशी मुले PISA (programme for international students assessment)साठी तयार होतील. हे विद्यार्थी 21 व्या शतकातील कौशल्य प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील असतील.यासाठी अध्ययन अध्यापन व मूल्यमापन प्रक्रिया सातत्याने सर्वंकष घडायला हवी.सतत शिकण्यासाठी अध्ययन कौशल्य आणि गतीने शिकणे ही कौशल्य विकसित करावी लागतील.या दृष्टीने युनेस्को ने (UNESCO) केलेली शिक्षणाची व्याख्या महत्त्वाची आहे. शिकायचे कसे ? हे शिकणे म्हणजेच शिक्षण होय. Learning to learn अशी केलेली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - 2020 नुसार 2026 - 2027मध्ये पायाभूत साक्षरता आणि अंकी साक्षरता प्राप्त होणे अपेक्षित आहे.तसेच 21 व्या शतकातील कौशल्य विकसित होणे गरजेचे आहे.यासाठी शिक्षकांचे वर्गातील शिकविणे पुरेशी ठरणार नाही.अध्यापन कौशल्यात बदलत्या काळानुसार बदल होणे गरजेचे आहे.यासाठी योग्य प्रकारच्या अध्ययन प्रक्रिया वर्गामध्ये कशा वापराव्यात ?याबाबतची कौशल्य शिक्षकांनी आत्मसात करणे गरजेचे आहे.ही कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करून विद्यार्थ्यांना 21 व्या शतकासाठी तयार करण्यासाठी अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन हे प्रशिक्षण इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या शिक्षकांसाठी संपूर्ण महाराष्ट्रात राबविले आहे.

**उद्दिष्टे :-**

1. अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वयं-अध्ययनाची प्रेरणा आणि क्षमता कशा पद्धतीने निर्माण होतात हे तपासणे.
2. अध्ययन प्रगतीचे व्यवस्थापन प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची शिकण्याची गती कशा पद्धतीने वाढते हे अभ्यासणे.
3. अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये 21 व्या शतकातील कौशल्ये कशा पद्धतीने रुजवली जावून जागतिक स्वीकार्यता असणारे विद्यार्थी कशा पद्धतीने घडतात यांचा अभ्यास करणे.

**गृहितके :-**

1. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे (SECERT)यांच्यातर्फे संपूर्ण राज्यातील शिक्षकांना प्रशिक्षण दिले गेले.
2. अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन हे प्रशिक्षण इयत्ता पहिली ते इयत्ता आठवी पर्यंत शिकविणाऱ्या अनेक शिक्षकांना दिले गेले.
3. अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन प्रक्रियेचे या प्रशिक्षणाचा लाभ इयत्ता पहिली ते आठवी मध्ये शिकणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांना झाला आहे.

**संशोधन पद्धती :-**

सदरील संशोधन पूर्ण करण्यासाठी प्रथम आणि दुय्यम साधनसामुग्रीचा आधार घेतला आहे. प्रथम साधनसामुग्रीमध्ये विभागीय स्तरावर प्रशिक्षण घेणाऱ्यांच्या मुलाखती घेऊन त्यांची मते जाणून घेतली आहेत तर दुय्यम साधनसामुग्रीमध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे (SCERT )निर्मिती असलेली शिक्षकांसाठीची आव्हान पुस्तिका,वाचन साहित्य( मूलभूत संकल्पना), सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शिका (भाग - 5), शासन निर्णय दिनांक 20 ऑगस्ट 2010,भारत राजपत्र (नवी दिल्ली )दिनांक 11 जानेवारी 2019,महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 29 मे 2023,शासन निर्णय दिनांक 27 ऑक्टोबर 2021 यांचा आधार घेतला आहे.

**संशोधन समस्या :-**

लोकसंख्येच्या मानाने भारताचे स्थान पहिल्या क्रमांकाचे असून जगातील सर्वात जास्त तरुण लोकसंख्येचा देश म्हणूनही भारताची ओळख निर्माण झालेली आहे.भारतातील अनेक राज्यांमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर अनेक शाळांमधून अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.शिक्षणातील विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढले.याबरोबरच नापास विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढले आहे असे का होत असावे ? या प्रश्नाचे उत्तर शोधायला हवे.

मुलांच्या या न शिकण्यामागे शिक्षणासाठी अपुरा निधी उपलब्ध असणे (एकूण जीडीपीच्या सहा टक्के पेक्षा कमी), शिक्षकांना मोठ्या प्रमाणावर दिली जाणारी अशैक्षणिक कामे,शिक्षकांची संख्या कमी असणे,बदलत्या काळानुसार शिक्षकांना प्रशिक्षण न मिळणे याशिवाय अनेक कारणे आहेत.आज घडीला शाळांमध्ये शिकणारी मुले सध्याच्या भीषण परिस्थितीतून जात असताना जर हार मानतील तर मग काय ? मुले हरली किंवा त्यांचा दृष्टिकोन नकारात्मक तयार झाला तर मग उद्याचा भारत जागतिक महासत्ता होण्याच्या शर्यतीमध्ये नेमक्या कोणत्या स्थानी असेल ? आणि यानंतर शिक्षण व्यवस्थेला अपेक्षित असणाऱ्या उद्दिष्टांचे काय होईल ? ती कशी साध्य करता येतील ? यातून काही मार्ग काढता येईल का ? 21 व्या शतकातील भारताचे भवितव्य घडविण्याच्या दृष्टीने यातून मार्ग काढणे गरजेचे आहे. वरील सर्व प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन हा प्रशिक्षण कार्यक्रम खूप महत्वपूर्ण ठरला आहे .म्हणून शिक्षण क्षेत्रातील बदल नवीन शैक्षणिक धोरण अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम - एक अभ्यास ही समस्या संशोधनासाठी निवडली आहे.

**संशोधन कालावधी,व्याप्ती व मर्यादा :-**

"शिक्षण क्षेत्रातील बदल नवीन शैक्षणिक धोरण अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम-एक अभ्यास "या विषयावर संशोधन पूर्ण करण्यासाठी संशोधन कालावधी हा प्रशिक्षणाची सुरुवात ते प्रशिक्षणाचा शेवट हा घेतला असून संशोधन विषयाची व्याप्ती ही अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन या प्रशिक्षणापर्यंत आणि हे प्रशिक्षण घेणाऱ्या पर्यवेक्षीय यंत्रणा व शिक्षकांपुरता मर्यादित आहे. सरदरील संशोधन पूर्ण करण्याकरिता प्रथम व दुय्यम साधनसामग्रीचा आधार घेतला आहे.

**मुख्य माहिती :-**

अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन हा प्रशिक्षण कार्यक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -2020 नूसार तयार करण्यात आला आहे.सदरील प्रशिक्षण आतापर्यंत संपूर्ण राज्यातील इ.1ली ते 8वी पर्यंत शिकविणाऱ्या 3.85 लाख शिक्षकांना देण्यात आले असून इ.1ली ते इ.8 वी पर्यंत शिकणाऱ्या एकूण 1.07 कोटी विद्यार्थ्यांना यांचा लाभ मिळाला आहे.आपला भारत देश आजही विकासाच्या वाटेवर मार्गक्रमण करत असून पश्चिमेकडील देश विकत विकसित देश म्हणून मान्यता पावलेले देश आहेत.पाश्चिमात्य देशांचा विकास झाला.आर्थिक ,औद्योगिक भरभराट झाली.या सर्वांचे मूळ त्यांनी आत्मसात केलेल्या शिक्षण पद्धतीमध्ये आहेहे आपल्या निदर्शनास येते.त्यामुळे 21 व्या शतकातील स्वयंपूर्ण भारताच्या शाश्वत विकासासाठी आपल्याला ही आपल्या शिक्षण पद्धतीमध्ये बदल करणे गरजेचे आहे.अशा प्रकारचा बदल हा आपल्याला अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन या प्रशिक्षणातून घडून आणता येतो हे प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अभ्यासानंतर आपल्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

**अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन :-**

21व्या शतकातील भविष्यवेधी शिक्षणाचे चार आयाम आहेत.या चार आयामांची पूर्तता करण्याच्या करणाऱ्या शिक्षण प्रक्रियेला जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण म्हणतात येईल. हे चार आयाम पुढील प्रमाणे आहेत.

1) जागतिक दर्जाची स्वीकार्यता असणारे मूल विकसित करणे.

2) भविष्यासाठी सक्षम व्यक्तिमत्व तयार करणे.

3) 100% मुलांच्या 100 % क्षमता विकसित करणे.

4)PISA ready (PISA - programme for international student assessment) मुल तयार करणे.

वरील चार आयामांची पूर्तता करण्यासाठी विद्यार्थ्यांची अध्ययन गती लक्षात घेऊन मुलांची एकमेकांना मदत उपलब्ध करून दिल्यास शिकण्यास पूरक वातावरण तयार होते.शाळेतील प्रत्येक मूल अधिक गतीने शिकायचे झाल्यास शाळा पातळीवर तसे वातावरण तयार करावे लागेल.त्यासाठी एकूण 17 बाबी कराव्या लागणार आहेत. त्यापैकी 6 बाबी या स्व पातळीवरील आहेत.भविष्यवेधी शिक्षणाचा विचार या सहा पायऱ्यांचा उपयोग केल्यास पूर्णत्वास नेता येवू शकतो.प्रत्येक मुलाच्या शिकण्याची गती वाढते भविष्यवेधी शिक्षणाच्या सहा पायऱ्या खालील प्रमाणे आहेत.

1) मुलांना स्वतः शिकण्यास प्रेरित करणे.

2) मुलांना शिकण्यास आव्हान देणे.

3) learning intervention (peer learning,group learning विषय मित्र).

4) मुलांच्या जिज्ञासू वृत्तीचा सन्मान करणे.

5) मुलांच्या शिक्षणात तंत्रज्ञानाचा उपयोग करणे.

6) मुलांनी स्वतःच्या शिकण्याची गती वाढविणे.

वरील सहा पायांचा वापर केला की मुलांना वरील बाबींची सवय होऊन तसे वातावरण तयार होते एकदा वातावरण तयार झाले की मुलांचे अध्ययन कौशल्ये विकसित होतात.

**आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण :-**

21 व्या शतकातील जागतिक स्वीकार्यता असणारे विद्यार्थी घडविण्यासाठी केवळ शाळा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या करून चालणार नाहीत तर या शाळांमधून आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण द्यायचे आहे. यासाठी बदलत्या जगाबरोबर नव्या बदलांसह, नव्या आव्हानासह आपल्याला बदलणे गरजेचे आहे.शिक्षकांनी स्वतः अद्ययावत होत विद्यार्थ्यांनाही अद्ययावत करावे लागणार आहे. विद्यार्थ्यांना अद्ययावत करण्यासाठीची कौशल्ये मुलांमध्ये रुजवावी लागणार आहेत.21 व्या शतक शतकातील 6 C'sकौशल्ये चिकित्सक विचार - critical thinking, सृजनशीलता -creative thinking, सहकार्य -collaboration, संवाद -communication, आत्मविश्वास -confidence, करुणा -compassion. विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी प्रयत्नशील राहावे लागणार आहे. या कौशल्यांचा वापर करून 100% मुलांच्या 100 % क्षमतांचा उपयोग करावा लागणार आहे.

**सेल्फी विथ सक्सेस :- (selfie with success)**

शिक्षक आणि शिक्षण क्षेत्राविषयी नकारात्मकता वाढत चालली आहे.वाढत चाललेल्या या नकारात्मकतेला अनेक बाबी कारणीभूत आहेत.नकारात्मक बाबींचे प्रमाण कमी करण्यासाठी सकारात्मक बाबींचा प्रसार होणे गरजेचे आहे.शैक्षणिक दृष्ट्या चांगल्या अध्ययन परिणामांचा प्रसार होणे गरजेचे आहे.नवोपक्रम, नवोपक्रमशिल शिक्षक,विद्यार्थी यांच्या कामाचा प्रसार होणे गरजेचे आहे.सेल्फी विथ सक्सेस मध्ये हे चांगल्या पद्धतीने साध्य करता येते.सेल्फी विथ सक्सेस हे प्रसिद्धी आणि प्रेरणा या दोन्हीसाठी पण आहे.यामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते.शिक्षणशील विद्यार्थ्यांची प्रसिद्धी होते. यांसारख्या सकारात्मक गोष्टींची माहिती समाजातील सर्व घटकापर्यंत पोहोचवण्यास मदत मिळते.अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन(management of learning intervention) या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे अध्ययन प्रक्रियेमध्ये नाविन्यता आलेली आहे.या कार्यक्रमामुळे learning to learn ही शिक्षणाची व्याख्या खऱ्या अर्थाने पूर्ण केली जात आहे असे सर्व अभ्यासांती आपल्याला निश्चितपणे म्हणता येईल.

**निष्कर्ष :-**

1) अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन प्रशिक्षणामुळे मुलांना स्वतः शिकण्यास प्रेरित करण्याचे समजले.

2) अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन प्रशिक्षणामुळे मुलांना शिकण्यासाठी आव्हान देण्याचे समजले.

4) अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन प्रशिक्षणामुळे मुलांच्या जिज्ञासू वृत्तीचा सन्मान करणे शिकायला मिळाले.

5) अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन प्रशिक्षणामुळे शिकण्याच्या प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा उपयोग ही संकल्पना स्पष्ट झाली.

**संदर्भ :-**


1) आव्हान पुस्तिका शिक्षकांसाठी - राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे , महाराष्ट्र (SCERT).

2) वाचन साहित्य मूलभूत संकल्पना - राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे, महाराष्ट्र (SCERT).

3) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (शिक्षक मार्गदर्शिका भाग-5) - राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे,महाराष्ट्र(SECERT).

4)शासन निर्णय दि. 20 ऑगस्ट 2010

5) भारत राजपत्र नवी दिल्ली दि.11 जानेवारी 2019.

6) महाराष्ट्र शासन राजपत्र दि.29 मे 2023.

7) शासन निर्णय दि. 27 ऑक्टोबर 2021.

# नागरी सहकारी पतसंस्था स्वरूप, कार्ये आणि आव्हाने : एक अध्ययन

**मंगला गोरख पाटील**

(अर्थशास्त्र विभाग)

सिनिअर आर्ट्स महिला महाविद्यालय शहादा. जि. नंदुरबार (महाराष्ट्र)

**डॉ. अविनाश आर. निकम**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख, पी. एस. जी. व्ही. पी. मंडळ. शहादा

**साराशं :-**

सहकारी चळवळीमुळे भारतात ग्रामीण भागाबरोबरच नागरी भागात सुद्धा नागरी सहकारी पतसंस्था बिगर शेती क्षेत्रात कार्यरत आहे. नागरी सहकारी पतसंस्था उगम,स्वरूप,व्याप्ती आणि विकास कसा झालेला आहे. तसेच विशेषत: शहरी आणि निमशहरी भागात बिगर कृषी कारणांसाठी कर्जदारांना आणि व्यवसायांना कर्जपुरवठा करणे म्हणजेच इतर सहकारी पतसंस्थाप्रमाणेच नागरी सहकारी पतसंस्थांची कामगिरीची व्याप्ती मोठया प्रमाणावर आहे. पतसंस्था

**प्रस्तावना :**

भारतातील नागरी सहकारी बँकिंग चळवळ ही १९ व्या शतकात स्वीकारण्यात आली. ब्रिटन आणि जर्मनी मधील सहकारी चळवळीशी प्रेरीत होऊन अश्या संस्था भारतात स्थापन झाल्या होत्या. परस्पर मदत, लोकशाही निर्णय घेणे आणि मुक्त सदस्यत्व या तत्वांवर सहकारी संस्था स्थापन केल्या जातात. भारतात १९०४ मध्ये सहकारी पतसंस्था कायदा करण्यात आला. तेव्हाच १९०४ मध्ये मद्रास प्रांतात कांजीवरम येथे पहिली नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करण्यात आली. १९०६ मध्ये बॉम्बे अर्बन को. ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी स्थापन करण्यात आली. १९१२ मध्ये बिगर कृषी पतसंस्था स्थापन करण्यास परवानगी देण्यासाठी सुधारणा करण्यात आली." १९६६ मध्ये या पतसंस्थाना बँक नियंत्रण कायदा लागू करण्यात आल्यामुळे १९६६ पासून नागरी सहकारी पतसंस्थांना आपल्या नावात पतसंस्था ऐवजी बँक या शब्दाचा वापर करण्यास परवानगी देण्यात आल्यामुळे या पतसंस्थांना आता नागरी सहकारी बँक असे म्हणण्यात येऊ लागले. तेव्हापासून शहरी किवा निमशहरी भागात कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी तत्वावर स्थापन झालेली संस्था म्हणजे नागरी सहकारी बँका होय.१"

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

1) नागरी सहकारी पतसंस्थांची माहिती जाणून घेणे.

2) नागरी सहकारी पतसंस्थांची गरज याची माहिती जाणून घेणे.

3) नागरी सहकारी पतसंस्थांची कामगिरी यांची माहिती अभ्यासणे.

4) नागरी सहकारी पतसंस्थांपुढे येणारी आव्हाने यांच्या अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधनात दुय्यम सामग्रीचा उपयोग करण्यात आला असून त्यात प्रकाशित, अप्रकाशित, ग्रंथ, पुस्तके, मासिके, इंटरनेट, ई-जरनल, वृत्तपत्रे इ. पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. संकलित माहितीच्या आधारे अभ्यासाची योग्य मांडणी करण्यात आली आहे.

**संशोधनाची गृहीतके : -**

1) नागरी सहकारी पतसंस्थांमुळे शहरी आणि निमशहरी भागाचा आर्थिक विकास झाला.

2) नागरी सहकारी पतसंस्थांचे व्यवस्थापन लोकशाही पध्दतीने करण्यात येते.

3) नागरी सहकारी पतसंस्थांमुळे सभासदांमध्ये बचतीची सवय निर्माण झाली.

**नागरी सहकारी पतसंस्था : व्याख्या :-**

नागरी सहकारी पतसंस्था म्हणजे काय? हे या पतसंस्थेच्या खालील व्याख्येवरून स्पष्ट होईल.

1. एका शहरापुरते किंवा प्रदेशा पुरते मर्यादित कार्यक्षेत्र असणारी तसेच ठेवी स्वीकारणे व कर्ज देणे याबरोबरच बँकिंगची कार्ये करणारी सहकारी संस्था म्हणजे नागरी सहकारी पतसंस्था होय.
2. नागरी भागातील जनतेने स्वेच्छेने एकत्रित येऊन समान उद्‌देशाने सहकारी तत्वावर लोकशाही पध्दतीने स्थापन केलेल्या पतसंस्थेस नागरी सहकारी पतसंस्था असे म्हणतात."
3. "नागरी भागातील जनतेकडून ठेवी स्वीकारून त्यांना कर्जपुरवठा करण्यासाठी व त्यांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी व्यापारी तत्वावर स्थापन केली जाणारी पतसंस्था म्हणजे नागरी सहकारी पतसंस्था होय.२"

**नागरी सहकारी पतसंस्था चळवळीचे स्वरूप : -**

नागरी सहकारी पतसंस्था चळवळीच्या उदय जरी सत्तर वर्षांपूर्वी झाला. परंतु खऱ्या अर्थाने त्या चळवळीची पाळेमुळे १९८५ नंतरच रुजली. पूर्वीच्या काळात नागरी सहकारी पतसंस्था चळवळीने विशाल स्वरूप धारण केले होते. संख्यात्मक विचार करता आज महाराष्ट्रात नागरी व पगारदार संस्थांची संख्या १५००० पर्यंत आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील अंदाजे ४००० पगारदार सेवक पतसंस्थांपैकी १२६० पगारदार सेवक पतसंस्था एकट्या मुंबईत आहेत. त्यांची सभासद संख्या ११ लाखांवर आहे. वसूल भाग भांडवल १०० कोटी पेक्षा जास्त असून अंदाजे १४० कोटींच्या स्वनिधी आहे. या संस्था कायद्याच्या अधीन राहून २२५ कोटींचे कर्ज वाटपासह वार्षिक तीनशे कोटींच्या आसपास उलाढाल करीत आहे. सामान्यातला सामान्य माणसाची पद वाढविण्यासाठी या पतसंस्था कार्यरत आहेत लोकांना बचतीची सवय लावून उत्पादक कामांकडे बचतीच्या ओघ वळविण्यात या चळवळीच्या मोठा वाटा आहे तळागाळातील व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी पतसंस्था या महत्त्वपूर्ण ठरत आहे असे नागरी सहकारी पतसंस्थांचे स्वरूप दुर्बल घटकांच्या प्रगतीसाठी उपयुक्त आहे."३

**नागरी सहकारी पतसंस्थाची कार्ये : -**

सहकारी तत्वावर स्थापन झालेल्या नागरी सहकारी बँकेची कार्ये पुढीलप्रमाणे :-

**1) ठेवी स्वीकारणे आणि कर्ज देणे : -**

नागरी सहकारी बँकेचे मुख्य कार्य समाजातील लोकांकडून ठेवी स्वीकारणे आणि सभासद व बिगर सभासदांना स्थिर मालमत्तेच्या तारणावर अल्प व मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा करणे.

**2) प्रतिनिधी म्हणून कार्य करणे : -**

नागरी सहकारी बँका व्यापारी बँकांप्रमाणे बँकिंगची सर्व कार्ये करतात. या कामाकरिता या बँका नाममात्र सेवाशुल्क घेतात. सभासदांना योग्य गुंतवणुकीसाठी मार्गदर्शन करतात.

**3) आधुनिक बँकिंग सेवा : -**

नागरी सहकारी बँका आपल्या सभासदांना वा खातेदारांना एटीएम, इलेक्ट्रोनिक फंड ट्रान्सफर अशा अनेक सेवा पुरविल्या जातात.

**4) वित्तीय व्यवस्थापन :-**

नागरी सहकारी बँकांच्या निधीची योग्य गुंतवणूक करतात. मध्यवर्ती बँकेच्या सूचनेनुसार अतिरिक्त निधीचा वापर योग्य त्या ठिकाणी करतात.

**5) स्वयंरोजगाराला मदत करणे : -**

शहरी व निमशहरी भागात स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्तींना नागरी सहकारी बँका कर्जपुरवठा करतात."४

**महाराष्ट्र राज्यातील नागरी सहकारी पतसंस्थांची झालेली प्रगती (संख्या हजारात) :-**

| अ. क्र. | बाब (तपशील) | १९९० - ९१ | २००० - ०१ | २००७ - ०८ | २००८ - ०९ |
|---|---|---|---|---|---|
| १ | सहकारी संस्थांची संख्या | ११२९१ | २२०१४ | २५१०६ | २४१६७ |
| २ | सभासदांची संख्या (हजारात) | ९३०२ | १८०६७ | २०२२६ | २१०१५ |
| ३ | खेळते भांडवल (कोटीत) | ७५०८ | ६६८८७ | ९७३५२ | ८८७६५ |
| ४ | कर्ज वाटप (कोटीत) | ५१७८ | ३९२६८ | ५२१६९ | ५४१८१ |
| ५ | येणे कर्ज (कोटीत) | उ. ना. | ३८ | १८७ | २३३ |

**स्रोत - सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय महाराष्ट्र शासन २००९**

"१९९० - ९१ ते २००८ - ०९ या १९ वर्षात महाराष्ट्र राज्यात कार्यरत असलेल्या नागरी सहकारी पतसंस्थांची संख्या ११२९१ वरून २४१६७ पर्यंत वाढलेली आहे याचा अर्थ या १९ वर्षात महाराष्ट्र राज्यातून नागरी सहकारी पतसंस्थांची संख्या १२८७६ वाढलेली आहे. मात्र २०००-०१ ते २००८- ०९ या नऊ वर्षात नागरी सहकारी पतसंस्थांचे सभासदांकडे येणे बाबी असलेल्या कर्ज रकमेत ३८ कोटी वरून २३३ कोटी रुपयापर्यंत वाढ झालेली आहे. या वाढत्या थकीत रकमेमुळे २००८-०९ नंतर नागरी सहकारी पतसंस्थांच्या कार्यात अडथळे निर्माण झालेले आहे त्यामुळे काही अनेक आव्हानांना नागरी सहकारी पतसंस्थांना सामोरे जावे लागते."५

**नागरी पतसंस्थांपुढील आव्हाने :-**

**"१९९२** च्या आर्थिक उदारीकरणाच्या धोरणानंतर बँकिंग क्षेत्रात घडून आलेल्या आर्थिक घडामोडींमुळे सहकार क्षेत्रात अनेक सामोरे जावे लागले.

1) वाढत्या स्पर्धेच्या काळात नागरी सहकारी पतसंस्थांना आपले स्थान केवळ नोटी कविता इतर बँकांचा बरोबरीने किंबहुना त्याहीपेक्षा अधिक विकास घडवून आणण्यासाठी दुर्बलस्थाने आणि धोके यावर मात करून संधीच्या फायदा घेण्याची गरज आहे.
2) वित्तीय संस्था आणि इतर बँकांशी स्पर्धा, भांडवलाची कमतरता, ढासळणारी विश्वासार्हता, व्यवसायातील सातत्य व विकास, कुशल कर्मचारी वर्ग, वाढता निधीचा खर्च व ठेवीचे घटते प्रमाण इत्यादी अनेक अशा आव्हानांना पतसंस्थांना सामोरे जावे लागते आहे.
3) आधुनिक बँकिंग सुविधा देण्याची असमर्थता, महिलांचा कमी सहभाग, मर्यादित कार्यक्षेत्र, असमाधानी भौतिक सुविधा, या आणि अशा सारख्याच अनेक आव्हानांना पतसंस्थांना तोंड द्यावे लागते.
4) एवढेच नव्हे तर बुडणाऱ्या आणि भ्रष्टाचारामुळे अवसायनात निघणाऱ्या पतसंस्थांच्या वाढत्या प्रमाणामुळे आज चांगल्या चाललेल्या संस्थांकडेही बघण्याच्या दृष्टिकोन बदलू लागला आहे.
5) निकोप स्पर्धा न राहता आकर्षक व्याजदर यांना भुलून भलतीकडेच पैसे गुंतवणूक करून भविष्यात पश्चाताप करण्याची वेळ येत आहे काही प्रमाणात शासनाकडून गेल्या दोन वर्षात निरीक्षण न्यायाने चळवळीचे पारदर्शीकरण चालू आहे पण त्यालाही सकारात्मक प्रतिसादाची आवश्यकता आहे.
6) सभासदांनी पतसंस्थेच्या ताळेबंद, ऑडिट वर्ग, गेल्या पाच वर्षाच्या किमान लेखाजोखा, संचालक मंडळ आणि त्यांची निस्पृहता, विश्वासार्हता, लाभांशाची दहा वर्षाची स्थिती, वाढती प्रगतीची रचना या बाबींच्या गांभीर्याने विचार करून व्याजदरापेक्षा ठेवी परत मिळण्याची हमी दिलासा महत्त्वाची आहे अर्थात पतसंस्थांकडूनही अश्या सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा आहे. पारदर्शीपणा, सोयीसुविधा, व्यवस्थापन प्रणाली, कमीत कमी राजकीय हस्तक्षेप, कुशल आणि पात्र महिलांच्या सहभाग, महिला सबलीकरण, जाहिरात माध्यमांचा वापर, मोठे व्यवहार

चेकने करणे, प्रगत तंत्रज्ञानाचा वापर, पारदर्शक व्यवहार आणि जनमानसातील प्रतिमा सुधारली तर आव्हानांना सामोरे जाणे सुलभ होईल."६

**निष्कर्ष : -**

1) इतर सहकारी पतसंस्थाप्रमाणेच नागरी सहकारी पतसंस्थेचे व्यवस्थापन लोकशाही पद्धतीने चालते.
2) शहरी आणि निमशहरी भागातील कर्जापासून किंवा बँकिंग सेवेपासून वंचित लोकांना कर्जविषयक आर्थिक गरजांची पूर्तता करतांना आढळून येते.
3) नागरी सहकारी पतसंस्था शहरी आणि निमशहरी भागातील आर्थिक विकासात कामगिरी बजावतांना आढळून येते.

**शिफारशी : -**

1) नागरी सहकारी पतसंस्थांनी आपल्या सभासद संख्येत वाढ केल्यास भाग भांडवलात वाढ होईल.
2) नागरी सहकारी पतसंस्थांच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी व्यवस्थापन समितीला प्रशिक्षण दिले जाते.
3) नागरी सहकारी पतसंस्थांनी व्यक्तीकडील थकबाकी वसुलीचा वेग वाढवावा.
4) नागरी सहकारी पतसंस्थानी आपल्या सभासदांसाठी व ग्राहकांसाठी काळाच्या ओघात होणारे बदल स्वीकारले पाहिजेत.

**संदर्भ ग्रंथ : -**


1) http://aplamarathi.com/ नागरी सहकारी बँक म्हणजे काय ?
2) प्रा. कोलते एस.एम. भारतीय बँकिंग प्रणाली प्रशांत पुब्लिकेशन Second Adition ऑगस्ट 2015 ISBN 978-93-825-28-79-1 (पृ. 350,351)
3) डॉ. चौधरी पी. आर., प्रा. पाटील एम. एस., प्रा. अग्रवाल जे. एम., डॉ. पुरकर पी. एन. "सहकार कायदा व सूक्ष्म अर्थ पुरवठा", प्रशांत पब्लिकेशन जळगाव. (पृ. क्र.८९,)
4) Brainly.in – For Students – By Students http://brainly.in textbook नागरी सहकारी बँकेची कार्ये
5) डॉ. चौधरी पी. आर., प्रा. पाटील एम. एस., प्रा. अग्रवाल जे. एम., डॉ. पुरकर पी. एन. "सहकार कायदा व सूक्ष्म अर्थ पुरवठा", प्रशांत पब्लिकेशन जळगाव. (पृ. क्र.९०,९१,)
6) Doc - 20221028 - WA0020.pdf.(नागरी सहकारी पतसंस्था - प्राचार्य डॉक्टर पी.बी. कुलकर्णी,) संस्थापक चेअरमन - श्रीदत्त नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, इस्लामपूर जि. सांगली.

# “भारतातील रेल्वे वाहतुकीच्या विकासाचा चिकित्सक अभ्यास”

**डॉ. संते लालचंद्र रामचंद्र**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शांतारामभाऊ घोलप कला,विज्ञान आणि गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय, शिवळे, तालुका-मुरबाड,जिल्हा-ठाणे.

**गोषवारा**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास पूर्ण होण्यासाठी त्या देशातील शेती क्षेत्र,औद्योगिक क्षेत्र आणि सेवा क्षेत्र या तीनही क्षेत्रांचा विकास होणे फार गरजेचे असते. या तीनही क्षेत्रांचा विकास हा त्या देशातील पायाभूत सुविधांचा विकास किती प्रमाणात झाला आहे यावर अवलंबून असतो. या पायाभूत सुविधांमध्ये रस्ते वाहतूक, रेल्वे वाहतूक,विमान वाहतूक, जलवाहतूक, ऊर्जा, संचार इत्यादी माध्यमांचा समावेश होत असतो. जगातील प्रगत देशांचा विचार केला असता या देशांनी सुरुवातीला आपल्या पायाभूत सुविधांचा विकास करून घेतला व त्या आधारावर आर्थिक विकासाची वाटचाल पूर्ण केली. भारतासारख्या देशात पायाभूत सुविधांचा वेगाने विकास होत आहे. या पायाभूत सुविधांमध्ये वाहतूक व्यवस्थेचा अविभाज्य भाग म्हणजे रेल्वे वाहतूक होय. भारतात पूर्वीपासून रेल्वे वाहतूक होत आहे व अर्थव्यवस्थेच्या तीनही क्षेत्रांमध्ये या रेल्वे वाहतुकीचे योगदान फार मोठे आहे. प्रस्तुत शोधनिबंधात भारतातील या रेल्वे वाहतुकीच्या विकासाचा अभ्यास करण्यात आला आहे.

**Key word :** आर्थिक विकास, पायाभूत सुविधा, रेल्वे वाहतूक,अविभाज्य

**प्रस्तावना :**

भारतातील पायाभूत सुविधांमध्ये रेल्वे वाहतूक हा महत्त्वाचा घटक असल्याचे दिसून येते. भारतात रेल्वे वाहतूक ही सर्वात सुरक्षित आणि स्वस्त वाहतूक म्हणून तिचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. अर्थव्यवस्थेतील कोणतेही क्षेत्र असू द्या रेल्वे वाहतुकीचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. भारतात रेल्वेचे जाळे खूप दूरवर पोहोचले आहे. आज जम्मू कश्मीर पासून तामिळनाडू पर्यंत, महाराष्ट्रापासून त्रिपुरा पर्यंत रेल्वेचे जाळे असलेले आपल्याला दिसून येते. आज भारतात वंदे भारत सारखी अत्याधुनिक रेल्वे गाडी रेल्वे रुळावर धावताना दिसते. भविष्यात भारतात बुलेट ट्रेन सारखी सर्वात वेगवान ट्रेन धावताना दिसणार आहे. भारताची रेल्वे ही भारताची लाईफ लाईन म्हणून ओळखली जाते. भारतीय अर्थव्यवस्था ही कमी उत्पन्न असलेली असल्याने देशातील वेगवेगळ्या शहरांना जोडण्यासाठी रेल्वे वाहतुकीचा वापर सर्वात जास्त प्रमाणात केला जातो. देशात कृषिमाल शेतातून बाजारापर्यंत पोहोचण्यापर्यंत तसेच उद्योगधंद्यासाठी लागणारा कच्चामाल व उद्योगधंद्यात तयार होणारा पक्का माल ग्राहकापर्यंत पोहोचवण्यात रेल्वेची भूमिका महत्त्वाची आहे. २०४७ सालापर्यंत भारत विकसित राष्ट्र होण्याचे स्वप्न पाहत असताना त्यामध्ये रेल्वेचे योगदान सुद्धा महत्त्वाचे असणार आहे. प्रस्तुत शोधनिबंधात भारताच्या रेल्वेच्या विकासाचा व रेल्वेमध्ये राबविण्यात येणाऱ्या नवनवीन प्रकल्पांचा चिकित्सक अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये :**

१)भारताच्या रेल्वे विकासाचा आढावा घेणे.

२)भारतीय रेल्वेमध्ये राबविण्यात येणाऱ्या नवनवीन उपक्रमांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती** :

प्रस्तुत “भारतातील रेल्वे वाहतुकीच्या विकासाचा चिकित्सक अभ्यास”' या शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धती वापरण्यात आली आहे. द्वितीय सामग्रीचा तथ्य संकलनासाठी वापर करण्यात आला आहे. यामध्ये विविध

प्रकारचे ग्रंथ, पुस्तके, नियतकालिके, मासिके,भारत सरकारचे व रेल्वे बोर्डाचे विविध अहवाल व इंटरनेट यांचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा:**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये फक्त भारतातील रेल्वेच्या विकासाचा व त्यामधील उपक्रमांचा अभ्यास करण्यात आला आहे. रेल्वे वाहतुकीशिवाय कोणत्याही वाहतुकीचा यामध्ये समावेश करण्यात आलेला नाही. तसेच भारता व्यतिरिक्त इतर देशातील रेल्वेच्या विकासाचा यामध्ये समावेश करण्यात आला नाही.

**गृहितके :**

१)भारतातील आर्थिक सुधारणा नंतर रेल्वेच्या विकासात जलद गतीने वाढ झाली.

२)भारतीय रेल्वेचा देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

**भारतीय रेल्वेचा इतिहास** :

भारतात रेल्वे ही ब्रिटिश सरकारने आणली होती. ब्रिटिशांनी आपला राज्यकारभार वाढवण्यासाठी भारतात रेल्वेचे जाळे निर्माण केले. “the Indian railway had modest beginnings in 1853 when the first railway train journeyed a distance of 22 miles between Bombay and Thana”[१] त्यानंतर पुढे भारतात रेल्वेचे नेटवर्क वाढत गेले. ब्रिटिशांनी भारतात रेल्वेचे जे जाळे निर्माण केले त्यामध्ये रेल्वेचे तीन प्रकार होते,ते म्हणजे ब्रॉड गेज रेल्वे, मीटर गेज रेल्वे आणि नॅरो गेज रेल्वे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतात १९५०-५१ योजनेचे युग सुरू झाले. “सन १९५०-५१ मध्ये म्हणजे योजना युग सुरू होण्याचे वेळी भारतातील रेल्वे मार्गाची लांबी ५३६०० किलोमीटर होती”[२]. त्यानंतर खऱ्या अर्थाने भारताच्या रेल्वेचा विकास होत गेला. त्या प्रगतीचा आढावा खालील तक्त्यातून येऊ शकतो.

**योजना काळातील रेल्वेची प्रगती**

| तपशील | १९५०-५१ | १९७०-७१ | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|---|---|
| रेल्वे मार्ग (किलोमीटर) | ५३६०० | ५९८०० | ६५४०० | ६५८०० |
| विद्युतीकरण | ३९० | ३७०० | २०९०० | २१६०० |
| लोकांची वाहतूक (दशलक्ष) | १२९० | २४३० | ८४२१ | ८३९७ |
| माल वाहतूक (दशलक्ष टन) | ९३ | १९७ | १०१४ | १०५९ |
| रेल्वे इंजिन ची संख्या | ८२१० | १११६० | ९९५६ | १०४९९ |
| i) डिझेल | १७ | ११७० | ५३४५ | ५६३४ |
| ii) विज | ७२ | ६०० | ४५६८ | ४८२३ |
| कोच ची संख्या | १९६३० | ३११५० | ६२८८९ | ६५४२३ |
| वेकेन्सी ची संख्या (०००) | २०६ | ३८४ | २४५ | २४५ |

स्रोत: १) दत्त गौरव आणि महाजन अश्विनी, ‘दत्त अँड सुंदरम्स इंडियन इकॉनॉमी’, एस. चंद आणि कंपनी प्रा. लि., नवी दिल्ली,७२ वी आवृत्ती,पृ. क्र.१४२

वरील तक्त्यानुसार भारतात रेल्वे मार्गाचे जाळे सतत वाढत असल्याचे दिसून येते. १९५०-५१ मध्ये भारतात ५३६०० किलोमीटर लांबीचे रेल्वे मार्ग होते. ते वाढून २०१३-१४ मध्ये ६५ हजार ८०० किलोमीटर पर्यंत वाढले. रेल्वेचे विद्युतीकरण सुद्धा मोठ्या प्रमाणात होताना दिसून येते. त्याप्रमाणेच भारत सरकारने भारतातील मीटर गेज व नॅरो गेज यांच्या मोठ्या प्रमाणात गेज परिवर्तन करून ते ब्रॉड गेज केले आहे. भारतीय रेल्वेच्या महसूल आणि नफा तोटा यामध्ये सुद्धा सतत बदल होताना दिसतो हे पुढील तक्त्यामध्ये नमूद केले आहे.

**भारतीय रेल्वेचा वित्तीय व्यवहार (कोटिमध्ये)**

| वर्ष | एकूण महसूल | एकूण चालू खर्च | निव्वळ महसूल | द्यावे लागलेले व्याज | नफा/तोटा |
|---|---|---|---|---|---|
| १९५०-५१ | २६० | २१० | ५० | ३० | + २0 |
| १९८०-८१ | २६२० | २५०० | १२० | ३२० | -२०० |
| १९९६-९७ | २४६३५ | २१००० | ३६२५ | १५०७ | +२११८ |
| २००६-०७ | ६४७८० | ५०३३० | १४४५० | ४२५० | +१०२०० |
| २०१०-११ | ९६६८१ | ९०३३५ | ६३४६ | ४९४१ | ४१०४ |
| २०११-१२ | १०४११० | ९८६६७ | ६७८३ | ५६५६ | ११२६ |
| २०१२-१३ | १२३७३३ | १११५७२ | १३६१५ | ५३४९ | ८२६६ |
| २०१३-१४ | १३९५५८ | १३१४६४ | ११७४९ | ८००९ | ३७४० |
| २०१३-१४ (RE) | १५९२४८ | १४६९९८ | १६४५३ | ९१७४ | ७२७८ |
| २०१५-१६ (BE) | १८३५७८ | १६२२१० | २५०७६ | १०८११ | १४२६६ |

स्रोत: १) दत्त गौरव आणि महाजन अश्विनी, 'दत्त अँड सुंदरम्स इंडियन इकॉनॉमी', एस. चंद आणि कंपनी प्रा. लि., नवी दिल्ली,७२ वी आवृत्ती,पृ. क्र.१४२

वरील तक्त्यानुसार असे लक्षात येते की १९५०-५१ पासून भारताचे एकूण महसुली उत्पन्न व एकूण चालू खर्च हे दोन्ही वाढत असल्याचे दिसून येते. रेल्वेच्या ह्या प्रगती विषयी दत्त आणि महाजन असे लिहितात की, "under UPA government however, the railway have done extremely well by converting losses to large surpluses. The railway have regularly reduced the passenger and freight rate. What is the cause of this turn around? "[3]. एकंदरीत भारतीय रेल्वेचे महसूल वाढत आहेत. कोरोनाच्या काळात रेल्वेवर वाईट परिणाम झाला असला तरी आता त्यातून सावरून रेल्वे प्रगतीकडे वाटचाल करताना दिसत आहे. रेल्वेचा नफा फारसा वाढत नसल्याचे प्रमुख कारण भाववाढ आहे यासंदर्भात झामरे जी एन. यांच्या मते "रेल्वेला आवश्यक असलेला कोळसा, लोखंड, पोलाद, सिमेंट इत्यादींच्या किमतीत वेगाने वाढ होत आहे. परंतु या किंमत वाढीच्या प्रमाणात प्रवाशांच्या व माल वाहतुकीच्या दरात वाढ होत नाही"[४]. याप्रमाणेच सामाजिक जबाबदारी व रेल्वे व्यवस्थापनाची अकार्यक्षमता इत्यादी कारणे आहेत.

**अलीकडच्या काळातील रेल्वेतील नवीन उपक्रम :**

**मेट्रो रेल्वे :**

२००२ मध्ये दिल्ली पासून सुरुवात झालेल्या भारतातील पहिल्या मेट्रो रेल्वे नंतर भारतातील मुंबई, कोलकाता, हैदराबाद,बेंगलोर अशा अनेक शहरांमध्ये मेट्रो रेल सुरुवात झाली आहे. हा भारत सरकारचा उपक्रम आहे.

**वंदे भारत एक्स्प्रेस :**

भारतात जलद गतीने प्रवास वाढवण्यासाठी व दोन शहरांना जोडण्यासाठी १५ फेब्रुवारी २०१९ साली नवी दिल्ली आणि वाराणसी यांच्या दरम्यान पहिली वंदे भारत ट्रेन चालवण्यात आली. ही संपूर्ण वातानुकूलित रेल्वे असून याच्यामध्ये फक्त सीटिंग कोच असल्याचे दिसून येते. आतापर्यंत ४१ वंदे भारत एक्सप्रेस चालविण्यात येत आहेत.

**बुलेट ट्रेन** :

भारतात बुलेट ट्रेन ही मुंबई आणि अहमदाबाद यांच्या दरम्यान प्रस्तावित आहे. रेल्वे प्रवाशांचा प्रवास जलद होण्यासाठी सरकारने हाय स्पीड रेल प्रोजेक्ट अंतर्गत या बुलेट ट्रेन ची सुरुवात करायचे ठरविले आहे. यासाठी मुंबई अहमदाबाद हाय स्पीड कॉरिडोर तयार करण्यात येत आहे. यासाठी भारत सरकारने जपान सरकारची करार केला आहे. ऑगस्ट २०२६ पर्यंत बुलेट ट्रेन चालवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**निष्कर्ष :**

भारतातील रेल्वेच्या विकासाचा विचार करता स्वातंत्र्यानंतर भारताच्या रेल्वेमध्ये सातत्याने प्रगती होत असल्याचे आपल्याला दिसून येते. आर्थिक सुधारणांच्या काळानंतर या प्रगतीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसत

आहे. आज जवळपास प्रत्येक राज्यांमध्ये रेल्वेचे नेटवर्क पोहोचलेले दिसून येते. तर महानगरांमध्ये सुद्धा रेल्वेच्या लोकल ट्रेनचे जाळे आपल्याला दिसून येते. आजही भारतातील बरीचशी जनता प्रवास करताना भारतीय रेल्वेला प्राधान्य देतात. भारतीय रेल्वे हा रोजगार उपलब्ध करून देण्यात सुद्धा महत्त्वाची भूमिका बजावताना दिसून येते. शेती, उद्योगधंदे व सेवा क्षेत्र या तिघांनाही भारतीय रेल्वे मदत करताना दिसत आहे. रेल्वेच्या प्रवासी संख्येमध्ये व मालवाहतुकीच्या संख्येमध्ये उत्तरोत्तर वाढ होताना दिसते. किसान रेल सारख्या सुविधांमुळे शेतकऱ्यांना माल पोहोचविणे सहज शक्य होत आहे. वंदे भारत ट्रेन सारख्या ट्रेन सुरू केल्यामुळे प्रवाशांच्या वेळेमध्ये बचत होते. तसेच डिजिटायझेशनच्या वाढत्या प्रमाणामुळे प्रवाशांना हव्या त्या ठिकाणी बसून सेवा उपलब्ध होते. असे असले तरीसुद्धा भारतीय रेल्वेमध्ये आजही बऱ्याच प्रमाणात दोष दिसून येतात. रेल्वेचा विलंबपणा असो की, रिझर्वेशन मिळण्यामध्ये असणाऱ्या अडचणी, रेल्वे मधील वाढती गर्दी आणि रेल्वेचे वाढते अपघात यासारख्या समस्या दिसून येतात. त्याचप्रमाणे कोरोना काळापासून भारत सरकारने ज्येष्ठ नागरिकांना मिळणारी तिकिटांमधील सूट ही कमी केल्यामुळे त्यांना प्रवास करण्यात अडचणी निर्माण होतात. त्याचप्रमाणे सहा ते बारा वर्षा मधील बालकांना हाफ तिकीटच्या दरात मिळणारी पूर्ण सीट बंद केल्याने प्रवाशांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो.

याचप्रमाणे कमी मनुष्यबळामुळे कामगारांवर पडणारा ताण, रेल्वेच्या भरती प्रक्रियेमधील दिरंगाई यामुळे रेल्वे पाहिजे तेवढ्या गतीने काम करताना दिसत नाही. रेल्वेमध्ये वाढत्या प्रमाणात खाजगीकरण होत असल्यामुळे रेल्वे कडून जी कायमस्वरूपी नोकरीची अपेक्षा होती ती पूर्ण होताना दिसत नाही.

**समारोप :**

वरील सर्व गोष्टींचा उहापोह केल्यानंतर आपल्याला लक्षात येते की भारताच्या आर्थिक विकासात रेल्वेची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी ज्या पायाभूत सुविधा आवश्यक आहेत त्यामध्ये रेल्वेचा समावेश होतो. आज पर्यंत भारतीय रेल्वे ही भारतीय जनमानसाच्या सेवेत तत्पर असल्याचे आपल्याला दिसून येते. भारताला जलद औद्योगिक विकास करायचा असल्यास त्यामध्ये रेल्वेचे महत्त्व असाधारण स्वरूपाचे आहे. भारतीय रेल्वेच्या ज्या काही समस्या आहेत त्या समस्यांवर योग्य रीतीने मात केल्यास भारतीय रेल्वेचा कायापालट होऊन तिचे देशासाठी योगदान वाढणार आहे. भारतीय रेल्वेचे जाळे अधिक वृद्धिंगत करून मागास भागात सुद्धा ते पसरण्याची आवश्यकता आहे. रेल्वेच्या प्रवासी वाहतुकीचे योग्य ते नियोजन करून त्या भागात सुद्धा रेल्वेला उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करता येऊ शकतो. साहजिकच भविष्यात विकसित भारताच्या योगदानात भारतीय रेल्वेची भूमिका असाधारण राहणार आहे यामध्ये तीळ मात्र शंका नाही.

**संदर्भ सूची**


१) Datt Gaurav & Mahajan Ashwini(2016),'Datt & Sundaram's Indian Economy', S. Chand and company pvt. Ltd., New Delhi,72 edition, page no.140
२) झामरे जी एन (२०१६), 'भारतीय अर्थशास्त्र', पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स नागपूर,दुसरी आवृत्ती, पृ. क्र.८१
३) Datt Gaurav & Mahajan Ashwini,(2016)'Datt & Sundaram's Indian Economy', S. Chand and company pvt. Ltd., New Delhi,72 edition, page no.143
४) झामरे जी एन (२०१६), 'भारतीय अर्थशास्त्र', पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर,दुसरी आवृत्ती, पृ. क्र.८२.


**आधारभूत ग्रंथ**


**१)** Deepashree(2012),'Indian economy performance and policies',Ane books pvt.Ltd.New Delhi.
**२)** देशपांडे श्रीधर व देशपांडे विनायक (२००४),'भारतीय अर्थव्यवस्था', हिमालया पब्लिशिंग हाऊस, मुंबई.
**३)** अट्रावलकर एस एच (२०१३),'भारतीय अर्थव्यवस्था', शेठ प्रकाशन, मुंबई.
**४)** डॉ. साठे मधुसूदन (२००८), भारताच्या आर्थिक समस्या, डायमंड पब्लिकेशन,पुणे.
**५)** जाधव अपेक्षा (२०१२),'भारतीय अर्थव्यवस्था आणि नियोजन', निराली प्रकाशन, पुणे.
**६)** डॉ.पगार एस के व डॉ.काळे संभाजी(२०२१),'भारतीय आर्थिक विकास'रंगराव पाटील प्रशांतपब्लिकेशन्स,जळगाव.
**७)** डॉ. देशमुख रवींद्र (२०१९),'भारतीय अर्थव्यवस्था',पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स,नागपूर.
**८)** भोसले व काटे (२०१२),'भारतीय अर्थव्यवस्था', फडके प्रकाशन,कोल्हापूर.
**९)** भोसले व काटे (२००१),'स्वातंत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्था', फडके प्रकाशन,कोल्हापूर.
**१०)** डॉ.पुरोहित वसुधा (२०१०),'आर्थिक विकास व नियोजन आणि सांख्य पद्धती',विद्या बुक्स पब्लिशर्स,औरंगाबाद.
**११)** https://en.m.wikipedia.org/wiki/Mumbai%E2%80%93Ahmedabad_high-speed_rail_corridor
**१२)** https://en.m.wikipedia.org/wiki/Vande_Bharat_Express

# वर्तमान महाराष्ट्रातील राजकारण : विरोधाभास आणि समस्या

**प्रा. स्वप्निल भारत रणखांबे**
मराठी विभाग, रत्नाई महाविद्यालय, राजगुरूनगर, पुणे

**प्रास्ताविक :**

वर्तमान महाराष्ट्रात शिक्षणाचे प्रश्न, रोजगाराच्या समस्या, शेतकरी-कष्टकरी यांच्या समस्या, रस्त्यांवर कोयते घेऊन हिंडणारे गुंड, राजकारण्यांचे प्रतिविरोधीवर बेछूट गोळीबार करणे, महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्थेचा भंग करणे हे सर्व घडत असतांना दुसऱ्या बाजूला राजकारण हिही तेवढीच मोठी समस्या निर्माण करणारे आहे. राजकारण हे नेतृत्वावर अवलंबून असते. जर नेतृत्वाला आचार-विचार आणि नैतिकतेची जोड मिळाली तरच पारदर्शी राजकीय भूमिकेची निर्मिती होऊ शकते. नेतृत्व हे व्यक्तिगत वैशिष्ट्यांवर अतिरिक्त भर घालणारे जरी असले तरी त्याला सामाजीकतेचीही बाजू असू शकते. भारतामध्ये सामाजिक आणि आर्थिक परिस्तिथीतुन नेतृत्व घडत जाते. त्यामुळे नेतृत्वाला सामाजिक अर्थ असतो.१ समाजकारण हे राजकारणातील प्रवेशाचे मुख्य कारण असते. मात्र सत्ता संघर्ष होत असतांना समाजकारणाची नैतिक मूल्ये पायमल्ली होत जातात; तसे काहीसे महाराष्ट्रात घडताना दिसते. महाराष्ट्रातील परिवर्तनाच्या इतिहासात जितकी वैचारिक स्थित्यंतरे झाली त्यात संत, सामाजिक विचारवंत, साहित्यिक, कलावंत यांसोबतच काही निवडक राजकीय नेतृत्वांचाही नामोल्लेख करता येतो. आधुनिक महाराष्ट्र निर्मितीचा काळ हा यशवंतराव चव्हाण यांचा होता हे सर्वच पातळीवर अभिमानास्पद गौरविले जाते. एकेकाळी महाराष्ट्रातील राजकारण आदर्श असतांना आज मात्र वर्तमानातील महाराष्ट्र हा राजकीय वर्तुळात निर्माण होणाऱ्या स्फोटक बदलांमुळे जरीस आल्याचे दिसून येते. वर्तमान महाराष्ट्राच्या राजकारणाची व्याख्या होणे नाही, इतकी त्याची क्षमता खालवल्याचे दिसते.

**विषयाची उद्दिष्टे :**

१) वर्तमानातील महाराष्ट्रातील राजकारणाची दिशा नेमकी कोणती ?
२) राजकारण्यांच्या बदलत्या भूमिकेतून जाती संघटनेत, धर्मीय संघटनेत आणि साहित्य व कला क्षेत्रात निर्माण झालेली अघोषित दडपशाहीचे परिणाम.
३) राजकारण हे अर्थार्जन आणि सत्ता गाजवणे यासाठीचे माध्यम झाले आहे का ?
४) वर्तमानात राजकीय नेतृत्वांची बदलत्या भूमिकेमागची मानसिकतेचा स्तर कोणता?
५) तरुणांवर राजकारण्यांचा होणारा परिणाम आणि निर्माण होणारी विभत्सक दुमते व प्रवृत्ती.
६) राजकीय वर्तुळात समाज माध्यमांची यंत्रणा अधिक अग्रेसर होतांना समाजाची होणारी संभ्रमावस्था.
७) प्रगत समाजाला राजकारणाचे ग्रहण लागू शकते का ?
८) वर्तमानातील महाराष्ट्रातील राजकारणाचे धुरीणत्व मानवी हक्कांचे आणि संविधानिकतेची गळचेपी करणारे ठरत आहे का ?

**गृहीतके :**

१) मागील दशकभरात राजकारणामुळे धार्मिक अस्मिता अधिक धारदार होतांना दिसते.
२) भारतीय राजकीय व्यवस्था संविधानिक नियमांच्या अधीन राहून कार्यकारिणी करते मात्र वैयक्तिक राजकीय स्वार्थ साधत असताना संविधानिक भूमिकेला प्राधान्य न दिल्याचे दिसून येते.
३) राजकीय वर्तुळात समाज माध्यमांचा आणि वृत्तवाहिन्यांचा वाढता हस्तक्षेप सामाजिक विचारांत अस्वस्थता निर्माण करतांना दिसतो.
४) गेल्या दशकांतील राजकारणाशी निगडित सोशल मीडिया आणि त्यातील बनावटी कारभार तरुणांचा दिशाभूल करणारे आहेत.
५) राजकारण फक्त स्व उपजीविका भागवणे आणि साम्राज्य तयार करणे असे काहीसे चित्र महाराष्ट्र राज्यातून स्पष्ट होतांना दिसते.

६) राजकीय नेतृत्वांमुळे जातीय आणि धर्मीय अस्मिता अधिक धारदार होत आहे.
७) शिक्षण क्षेत्रात राजकारण्यांचा वाढता प्रभाव आणि त्यामुळे हतबल होत जाणारी शिक्षण व्यवस्था, वाढते शैक्षणिक खाजगीकरण आणि त्यामुळे वाढते धोके हे भविष्यातील मोठ्या समस्या निर्माण करणारे आहेत.
८) राजकीय क्षेत्रात निर्माण होणारे स्फोटक समीकरणे आणि त्यामुळे वंचित राहणारा पीडित शेतकरी, नवं उद्योजक, नवे शिक्षण तंत्र , नवं सामाजिक धारणा हे विस्कळीत होतांना दिसतात.
९) महाराष्ट्रातील वाढत्या राजकीय दुष्मनी, हत्या, सार्वजनिक सुव्यवस्था बिघडवणारी कोयता गँग, स्थानिक गुंडशाहीकडून कोणावरही सहजरित्या होणारे गोळीबार आणि त्यांवर योग्य कारवाई न होणे, त्यांना स्थानिक राजकारण्यांचा छुपा पाठिंबा असणे हे समाज हत्येचे विघटक विकृत रूप दिसून येते.
१०) सर्वच स्तरांवर विचारला जाणारा 'महाराष्ट्राचा यूपी बिहार झाला आहे का ?' या परिस्थितीकडे महाराष्ट्राच्या जनतेने जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे.

**लोकशाहीत लोकांचे महत्व किती उरते ?**

महाराष्ट्रातील राजकारणाची दशा आणि दिशा पाहता मतदाराने २०२४ साली किंवा त्यांनतर होणाऱ्या निवडणुकांसाठी सामान्य नागरिक म्हणून आपल्या मूलभूत अधिकारांच्या जाणिवेला किती प्राधान्य द्यावे ? यातच उद्वेग होतांना जाणवतो. महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती पाहता मतदान नेमके कोणाला करावे आणि का करावे ? ही सगळ्यात मोठी संभ्रमावस्था होत जाते. यातून मतदान करूच नये असे म्हणणारा देखील एक गट तयार होतो आणि मतदान करून बदल घडवून आणावा असा विश्वास देणारा संविधानिक आचार आणि विचारांचा दुसरा गट तयार होतो. पण प्रश्न इथे हा निर्माण होतो की, ही दोनच गट या प्रक्रियेत अग्रेसर असतात का ? तर तसे नाही. राजकीय नेतृत्व करणाऱ्या प्रत्येकाचा आपला स्वतंत्र चाहता गट असतो, राजकीय पक्षांच्या विचारधारेला जुमाणणाऱ्या मतदारांचा गट असतो, जातीय आणि धर्मीय राजकारणाला थारा न देणारा किंवा जातीय-धर्मीय अस्मिता धारदार करणारा मतदारांचा वेगळा गट असतो, आजकाल राष्ट्रवादाची संकल्पना फक्त धर्मवादाशी निगडित आहे असे मानणारा गट निर्माण झाला आहे; संविधानिक परिवर्तनाला प्राधान्य देणारा जागरूक गट असतो ; असे मतदारांचे तत्सम गट विविध अनुषंगाने दिसून येतात. या प्रत्येक गटाची वेगवेगळी आचारसंहिताही तयार असते.या गटांत राजकारणी भेद निर्माण करतात. सामाजिक एकता विभत्स करणारे आणि राजकारणात देश तसेच राज्याची अस्मिता प्रथमस्थानी स्थानी असावे याचे भान हरपणारे गट सर्वाधिक निर्ढावलेले दिसून येतात.पण आज देशात किंवा महाराष्ट्रात सध्याचे राजकारण पाहता मतदारांनी मतदान करण्यासाठी नेमके कशाला प्राधान्य द्यावे हा गुंतागुंतीचा प्रश्न होऊन बसलाय. सामाजिक मानसशास्राचा प्रबलन सिद्धांताचा (Reinforcement Theory) चा अर्थ जर विषयाच्या अनुषंगाने लक्षात घेतला तर, प्रत्येक व्यक्तीचे वर्तन हे विशिष्ट परिस्थितीनुसार घडून येत असते व त्याचे काही ना काही परिणाम ठरलेले असतात. प्रत्येक व्यक्ती आपली भूमिका अशी वठविते की जेणेकरून त्या भूमिकेला समाजात मान-मान्यता मिळते. २ हाच सिद्धांत सध्याच्या राजकीय नेतृत्वांविषयी जर विचारात घेतला तर प्रत्येक राजकारणी पक्ष बदल करत असतांना भूमिका ठरवून करतो की त्यामागे अंतर्गत समस्यांची भीती असते? महाराष्ट्रातील पक्ष प्रवेशांचे राजकारण हे मुळात कोणते संविधानिक आणि नैतिक मूल्यांना महत्व देणारे आहे ? राजकीय नेतृत्व करणाऱ्याचे वर्तन परिस्थितीनुसार बदलते तसेच राजकारणातील गरज देखील परिस्थितीनुसार बदलत जाते. आपल्या पक्ष बदलाच्या भूमिकेला समाज मान्यता देईल अशी समीकरणे हिशोबात घेऊन मतदाराला गृहीत धरण्याची हातोटी राजकीय वर्तुळात सक्षम असते. महाराष्ट्राच्या राजकारणात सत्ताधारी पक्षाच्या तडाख्यातून स्वतःचा बचाव कसा होईल या प्रथम हेतूने पक्षांतराचे राजकारण सामान्य जनतेची दिशाभूल करताना दिसते.अब्राहम लिंकन हे खऱ्या अर्थाने लोकशाही राज्य पद्धतीचे एक महान समर्थक झाले त्यांनी स्वतः देखील एकदाच अध्यक्षपद मिळावे ही अपेक्षा जनतेकडून व्यक्त केली होती. त्यासाठी त्यांनी पक्ष बदल किंवा सातत्याने पक्ष प्रवेश करून राजकीय आचार विचारांना दूषित करण्याचे काम केले नाही. लोकांच्या मतांची त्यांनी समर्पक अशी अपेक्षा केली होती. मात्र आज देशातील आणि महाराष्ट्रातील पक्षांतराच्या राजकारणामुळे लोकशाहीत लोकांचे महत्व निरर्थक करणे हीच जणू लोकशाहीची नवी व्याख्या होतांना दिसते आहे. “Parties are inevitable…. If parties cause some evils, they avert and mitigate other's.”3 राजकीय सिद्धांतानुसार

कुठलाही राजकीय पक्ष हा अपरिहार्य असतो. या पक्षांकडुन कुठलीही चूक घडल्यास ती टाळली जाते. मुळातच देशाच्या आणि महाराष्ट्राच्या राजकारणात वर्तमानामध्ये कुठले सिद्धांत उरले असावे का ? हा विचार होणे गरजेचे आहे. यातूनच संविधानाने दिलेल्या मतदान या मौलिक अधिकाराविषयी जागरूकता आणणे आजही महत्वाचे वाटते. व्यवस्था आणि कायदा जर राजकारण्यांची गुलाम बनवली जात असेल तर सामान्य नागरिकांचं काय ? नागरिकांनी मतदानाविषयी जागरूक असावे असे आजही सांगण्याची वेळ सातत्याने येत असते. याचा अर्थ असाही होतो की, मतदार किती जागरूक आहे ? यावर सगळे नियंत्रण अवलंबून आहे.

**राजकारणातील जाती-धर्माची अपरिहार्यता**

देशभरात प्रकर्षाने जाणवणारे धार्मिक राजकारण महाराष्ट्रातही जोरदार झाले. प्रश्न आस्थेवर नाही तर त्या आस्थेवर डोकं वर काढणाऱ्या गढूळ राजकारणाचा आहे. जनतेने आपल्या आस्थेवर राजकारण पोसू दिले यात जनतेची चूक म्हणावी की राजकारण्यांनी जनतेची दिशभूल करण्याचे यश म्हणावे ? वर्तमान महाराष्ट्रातील राजकारणात देव-संस्कृती आणि धर्माचा वापर सर्वाधिक होतांना चित्र स्पष्ट दिसते आहे. राजकीय क्षेत्रामुळे धार्मिक सभ्यतेचे अंतर्बाह्य अंग कलुषित झाल्याचे वारंवार दिसून येते. धार्मिकतेचे तत्वतः आचार आणि विचार यांना झुगारून धार्मिक द्वेषाचे राजकारण निर्माण केले जाते. यामुळे देश हिताचे आणि मानवी हिताच्या वैचारिक प्रेरणास्रोतांचे खच्चीकरण होते. देशात आणि महाराष्ट्रात जातीवाद-धर्मवाद संपुष्टात आलेला नसतांना सध्याचे राजकारण त्यात भरिसभर घालून त्याला अधिक हिंसक बनवले जात आहे. आज जवळजवळ सर्वच पक्षांना आणि राजकारणाशी निगडित घटकांना विकासाचे राजकारण फक्त बोलून दाखवण्याची तयारी दिसते मात्र प्रत्यक्षात जातीत आणि धर्मांत भेद करून राजकारण करण्यात अधिक महत्व दिले जाते. धार्मिक तिढे निर्माण करून समाजाचा बुद्धिभेद करण्याकडे आजचे राजकारण सर्वाधिक वेगाने कार्यरत आहे. सन २०२३ मध्ये कोल्हापूर, अमळनेर, छत्रपती संभाजीनगर आणि अहमदनगर शहरात घडलेल्या दंगली सर्व हकीकत दाखवतात. मात्र २०२४ च्या अंतरिम बजेटमध्ये महाराष्ट्राला काय मिळालं ? हा मुद्दा मात्र जाणीवपूर्वक संपवला जातो. सात शहरांना सूर्योदय योजना मिळणार, राज्यातील रेल्वेसाठी १५,५५४ कोटी, साखर कारखान्यांना दहा हजार कोटींचा लाभ ; महाराष्ट्रात एवढ्याच गरजा आहेत का? .आज महाराष्ट्रातील तरुणांची परिस्थिती पाहता शिक्षण आणि रोजगार यांत सगळ्यात मोठी दरी निर्माण केली जाते तरीही महाराष्ट्रात ज्ञानवापी मस्जितमध्ये पूजापाठ चालूच राहणार की नाही हा वाद, मराठा-कुणबी आरक्षणावरून वाद, अरक्षणावरून समाज माध्यमांचा वापर करून दलित समाज आणि मराठा समाज यांतील अघोषित संघर्ष निर्माण करणे चालूच आहे. महाराष्ट्रात यावरून टोकाचे वाद सुरू असतांना प्रत्येक पक्षाचा राजकारणी समाजात फूट पडण्याचे धाडस निर्ढावुन करतो, हिही सर्वात मोठी समस्या आहे.जिथे सामाजिक मूल्ये चिरडली जातील, समाजात अराजकता निर्माण होईल मुळात राजकारण अशाच दिशेला धाव घेतांना दिसते. जातीचे राजकारण आणि धर्माचे राजकारण हे त्यांचे 'वोट बँक' असतात, या वोट बँकमध्ये किती विकृती निर्माण होईल यासाठी वारंवार जातीवर-धर्मावर विरोधाभासात्मक टिपणी करून दोन गटांत संभ्रमावस्था राजकारणी निर्माण करत असतो. राजकारणातील सत्ता कारण यासोबत जातीची- धर्माची अपरिहार्यता तितकीच महत्वाची अधोरेखित होऊन जाते. यातून राष्ट्राच्या संविधानिक नैतिक मूल्यांना धोके निर्माण झाल्याचे दिसते.

**नवं युवा मतदारांचे काय ?**

लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी युवक आणि युवतींनी मतदार नोंदणी करावी म्हणून महाराष्ट्र शासन अंतर्गत मोहीम आखल्या जातात. मुळात हा नवं युवक ज्याला देशाची आणि आपण स्थित असलेल्या राज्याच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि वैचारिक, सांस्कृतिक वास्तवतेशी कुठलाही व्यवहारानुभव आलेला नसतो. अशा नवं युवकांकडून लोकशाहीसारख्या राजकारणाने अडगळीत ठेवलेला प्रकार कसा लक्षात येऊ शकेल. नवं मतदार युवक आणि लोकशाही या अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून व्याख्यानमाला, शिबिरे, उपक्रम, नवं मतदार नाव नोंदणी आयोजित केल्या जातात.४ मुळात त्या आयोजित होण्यास काही हरकत नाही. पण आपण या देशाचा युवक-युवती आहोत म्हणजे नेमके कोण आहोत? समाजात आपली भूमिका काय आणि कोणती? या जाणिवेतून जो नवं युवक-युवती अनभिज्ञ असतो त्याला लोकशाही कळावी तरी कशी ? मुळात आजचे महाराष्ट्रातील राजकारण तरुणांना लोकशाहीची संकल्पना

प्रत्यक्षात उतरवून दाखवणारे उरले आहे का? आजच्या तरूणांना विकसित उपकरणांच्या आधारे महिती आणि ज्ञान संपादन करण्याच्या असंख्य सुविधा निर्माण झाल्या आहेत. ग्लोबल नॉलेज आत्मसात करणारा आजचा बहुतांश युवा-युवतींची लोकशाही आणि संविधान यांची प्रथमदर्शी ओळख नसते. देशाने संविधान स्वीकारून लोकांनी लोकांसाठीचे हे राज्य आहे असे स्वीकारून पंच्याहत्तर वर्षे झाली; अमलबजावणी करून शहात्तर वर्षे झाली तरीही देशात लोकशाही म्हणजे काय ? असा सवाल झाल्यास देशाची पाळंमुळं विस्कळीत होयला सुरुवात होते. अशा परिस्थितीत नवं युवक-युवती मतदारांची लोकशाही समजून घेताना काय अवस्था होईल. त्यांच्या देशाविषयीच्या, समाजविषयीच्या, देशात घडणाऱ्या घडामोडीविषयीच्या जाणिवा अगदी सौम्य असतात, हळव्या असतात ; त्यात फारसे सामंजस्य आणि वैचारिक जाणिवा प्रबळ नसतात. अशा वेळी लोकशाही, देश- देशातील भरकटलेली राजकीय व्यवस्था ही त्यांच्या आयुष्याशी फारशी निगडित नसते. असे असतांना राजकीय व्यवस्था किंवा राजकारणाशी निगडित माध्यमे युवक-युवतींना भावणारी स्व संस्कृती, स्व धर्म, स्व जात यांविषयी स्फोटक जाणिवा निर्माण करण्यात अग्रेसर असल्याचे चित्र स्पष्ट आहे. आपला देश, आपले संविधान, भारत देशाची मूलगामी विचारसरणी किती वृद्धिंगत आहे याची साधी तोंड ओळख करू न देता त्यांमध्ये जातीय-धर्मीय द्वेषाचे बीज सहज पेरण्याचे कसब राजकारणाशी निगडित माध्यमांना अवगत आहे. मुळात नवं मतदार युवकांसाठी महाराष्ट्र कुठली दिशा ठरवणार याचे ध्येय आणि उद्दिष्टे अतिशय पुसट आहेत.

**समारोप**

देशाचे भविष्य तरुणांच्या हातात असते. युवकांचा सक्रिय सहभाग असल्याशिवाय लोकशाहीच्या सर्वोत्तम कार्यकरिणीला गती येऊ शकणार नाही. आज महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती पाहता त्यावर कुठलेच ठोस भाष्य आज तरी करणे गरजेचे वाटत नाही. सध्याची महाराष्ट्रीय राजकीय स्तिथी पाहता महाराष्ट्रात राजकारण उरले आहे का ? असे म्हणणे रास्त वाटते. राजकीय वर्तुळात राजकीय नेत्यांची बदलती अनैतिक भाषा, एकमेकांवर टीका करत असतांना कुठलेही भान न ठेवणे, जाती आणि धर्म समुदायात तिढा निर्माण होतील असे भाष्य करणे. वारंवार आणि प्रतिदिनी वृत्तवाहिन्या आणि समाज माध्यमांवर पक्षांतर्गत हेवेदावे निर्माण करणे, देशाच्या आणि महाराष्ट्राच्या मूळ समस्या आणि सध्या परिस्थितीला जाणीवपूर्वक तिलांजली देऊन स्वार्थाचे राजकारण करणे हा वर्तमान कालीन महाराष्ट्र राजकारणातील स्फोटक प्रकरणामुळे हादरून जात असता महाराष्ट्राचे भवितव्य कोणाच्या हाती द्यावे ? अशी अवस्था समाजाची आणि महाराष्ट्रीय जणांची होत असेल तर सध्याचा प्रचलीत असलेला ‘महाराष्ट्राचा यूपी बिहार होतो आहे का?’ आणि’कुठे नेवून ठेवला महाराष्ट्र माझा? , या वास्तवकडे पाठ फिरवून चालणार नाही.

**संदर्भ ग्रंथ** :


१) राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल-राजकीय धुरिणत्व-वर्चस्व, प्रकाश पवार, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पहिली आवृत्ती जानेवारी 2014 पृष्ठ क्र. ८

२) प्रगत सामाजिक मानसशास्त्र, प्रा. डॉ. मोहन निंबाळकर, के. एस. पब्लिकेशन पुणे, प्रथम आवृत्ती, जुलै २०१४, पृष्ठ क्र.२६

३) Political Theory, Chapter- Political Theory, R. C. Agarwal , S. Chand Publishing, New Delhi , 2018, page no. 389

४) Mahasanvad.in माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळांवर नवं युवक मतदार नोंदणी विषयी उपलब्ध माहिती.


**सहाय्यक ग्रंथ :**


१) सदर विषयाशी निगडित वृत्तपत्रांतील प्रकाशित लेखन.

२) भारतीय युवा आणि निवडणुकीय राजकारण, संपादन – संजय कुमार, अनुवाद – श्रीरंजन आवटे, SAGE – Bhasha Publications.

३) महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास इ.स. १८१८ ते १९६० , प्रा. गणेश राऊत, प्रा. ज्योती राऊत, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, चौथी आवृत्ती २००९, पूर्णमुद्रन मार्च २०११

४) भारतीय लोकशाही समोरील आव्हाने, संपादक प्राचार्य डॉ. बाळ कांबळे, डायमंड पब्लिकेशन्स, प्रथम आवृत्ती २०१२

५) राजकीय विचारपरणालीचा परिचय, प्रमोद तांबे,हरिदास जाधव, निराली प्रकाशन,पुणे, प्रथम आवृत्ती जानेवारी २०२१

६) भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल, प्रकाश पवार, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पुनर्मुद्रण जानेवारी २०२१

# "पुणे व कोल्हापूर जिल्ह्यातील तांदूळ उत्पादकतेचा तुलनात्मक अभ्यास"

## (२०१०-११ ते २०१९-२०)

**रचना कोळपे[१], निखिल तांबे[२], नितेश राठोड[३]**

१ Research Scholar, Anantrao Thopte college bhor,Pune.

२ Assistant Professor, Anantrao Thopte college bhor,Pune,

३ Research Scholar, MES Abasaheb Garware college, Pune.

**गोषवारा:**

10,000 ई. स. आसपास शेतीच्या आगमनामुळे गहू, तांदूळ, मका आणि बटाटे यांसारख्या मुख्य पिकांद्वारे स्थिर आयुर्मान आणि अन्न सुरक्षा मिळाली. भारतात तांदळाची लागवड सुमारे 2500 ईसापूर्व सुरू झाली आणि प्राचीन काळापासून भारतीय आहाराचा मुख्य भाग आहे. हरित क्रांतीनंतर, भारतातील तांदूळ उत्पादनात लक्षणीय वाढ झाली, परंतु अयोग्य बियाणे वापर, अपुरी पायाभूत सुविधा आणि मर्यादित तंत्रज्ञानाचा वापर यासारखी आव्हाने एकूण उत्पादनात अडथळा आणतात. उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तसेच कोकण, करावली आणि केरळ यांसारख्या किनारी प्रदेशांमध्ये भाताची लागवड प्रमुख आहे. महाराष्ट्राची कृषी क्षमता असूनही, इतर तांदूळ उत्पादक राष्ट्रांच्या तुलनेत तांदूळ उत्पादकता कमी आहे, वाढीव आव्हानांना सामोरे जाण्याची गरज अधोरेखित करते.

**मुख्य शब्द:** भातशेती, तांदूळ उत्पादनात वाढ, "तांदूळ उत्पादन.", अल्पभूधारक शेतकरी

**प्रस्तावना:**

मानवी उत्क्रांती प्रक्रियेत भटक्या जिवणानंतरचा टप्पा स्थैर्यपूर्ण आयुष्याचा होता. या स्थैर्यपूर्ण आयुष्याला अन्न सुरक्षेची आवश्यकता होती आणि हे अन्न सुरक्षा मानवाला शेतीने पुरवली. ई.स.वी सन १०,००० मध्ये मानवी शेतीची सुरुवात झाली. शेतीमध्ये गहू, तांदूळ, मका, बटाटा यांसारख्या प्रमुख पिकांचा समावेश होतो आणि उत्पादन घेतले जातात. उच्च पोषणमूल्य व चांगली उत्पादकता या गुणामुळे जगातील चीन, भारत, बांगलादेश, इंडोनेशिया, ब्राझील यांसारख्या उच्च लोकसंख्या असणाऱ्या देशांमध्ये तांदळाला प्रमुख पिक किवां खाद्यान्न पिकांचे स्थान प्राप्त झाले आहे.

भारतीय कृषी क्षेत्रात तांदळाला अनन्य साधारण महत्व आहे. भारतात तांदळाचे उत्पदान ई.स.वी.सन २५०० मध्ये सुरु झाले. या कालखंडात उच्च उत्पादकता असणाऱ्या चीनी प्रजातीच्या तांदळाची लागवड भारतात सुरु झाली. ही लागवड सिंधू संस्कृतीत सुरु झाल्याचे पुरावे आढळून येतात. हे या काळापासून भारतीयांच्या आहारातील प्रमुख पीक किवा अन्नधान्य आहे. हरितक्रांती नंतर भारताच्या तांदूळ उत्पादकतेत आमूलाग्र व सातत्यपूर्ण वाढ दिसून आली. भारत सद्यस्थितीत सर्वाधिक लागवड करणारा देश आहे. देशाचे २०१९-२० चे तांदळाचे उत्पादन १२० मिलियन टन इतके झाले आहे. सर्वाधिक तांदळाची निर्यात करणाऱ्या देशामध्ये भारताचा प्रथम क्रमांक आहे तर जागतिक एकूण उत्पादनामध्ये भारत चीन नंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. २०१९-२० ची भारताची तांदळाची उत्पादकता २७०५ किलोग्रॅम /प्रति हेक्टर आहे व हे उत्पादकता सातत्यपूर्ण वाढत आहे.


भारताने तांदळाच्या उत्पादकतेमध्ये आमूलाग्र प्रगती केली आहे तरी लागवडीखालील क्षेत्राचे आकारमान व देशाचे एकूण उत्पादन यांची तुलना इतर तांदूळ उत्पादक देशांशी केली असता भारताची उत्पादकता ही फारच कमी असल्याचे लक्षात येते. त्याचबरोबर सुधारित बियानांचा अल्प वापर, असंतुलित रासायनिक खतांचा वापर, कीड, रोग व तन

नाशकांचा अयोग्य वापर. शेतमजुरांचा अल्प पुरवठा, अल्पभूधारक शेतकऱ्याची असणारी जास्त संख्या (८०%) व तंत्रज्ञानाचा अल्प वापर यांसारख्या समस्यांमुळे भारतीय तांदूळ शेतीची उत्पादकता कमी आहे. भारतात उत्तरप्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल यांसारख्या मैदानी प्रदेशात तर महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश यासारख्या पठारी प्रदेशात तसेच कोकण, करवली (कर्नाटक किनारपट्टी), केरळ यांसारख्या किनारी प्रदेशात तांदल्च्जे उत्पादन घेतले जाते.

महाराष्ट्रामध्ये कोकण किनारपट्टी (ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधूदुर्ग) तसेच पठारावरदेखील किवा पठारी प्रदेश (कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली, गोंदिया) तांदळाची शेती केली जाते. भारतात प्राकृतिक तसेच पर्जन्यसमृद्धी दिसून येते. त्याचप्रमाणे भारत उत्तम मृदा उत्पादकता अशा बाबी असून देखील इतर देशांच्या तुलनेत तांदळाची उत्पादकता अल्प किवा कमी आहे. त्याचप्रमाणे देशांतर्गत उत्पादकतेमध्ये प्रचंड तफावत दिसून येते. हेच उत्पादकतेच्या तफावतीची मालिका महाराष्ट्राबाबतही सुरूच राहते. या उत्पादकतेच्या समस्येबाबत अध्ययन करणे आवश्यक आहे.

**संशोधनासाठी पुणे व कोल्हापूर जिल्हा निवडीचे कारण:**

पुणे व कोल्हापूर हे जिल्हे पश्चिम घाटाच्या पायथ्याशी असणारे पठारावरील तांदूळ उत्पादक जिल्हे आहेत. पुणे जिल्ह्यामध्ये भोर, वेल्हे, मावळ, मुळशी, जुन्नर, पुरंदर या तालुक्यांमध्ये तांदळाचे उत्पादन घेतले जाते.वर्ष २०१९-२० मध्ये १.५ लाख टन तांदळाचे उत्पादन झाले. पुणे जिल्हा उत्पादकतेच्या दृष्टीने मध्यम उत्पादकता गटात मोडतो. अल्पभूधारकता , जमिनीचे तुकडीकरण, तंत्रज्ञानाचा अल्प वापर, खते व कीटकनाशके यांचा असंतुलित वापर यांसारख्या समस्यांमुळे उत्पादकता अल्प किवा कमी राहते. तसेच कोल्हापूर जिल्हा हा तांदूळ उत्पादकतेमध्ये उच्च उत्पादकता गटात मोडणारा जिल्हा आहे. कोल्हापूर जिल्हयाची २०१९-२० ची उत्पादकता ३३७२ किलोग्रॅम/ प्रति हेक्टर इतकी आहे. निवड केलेले आठ हे तालुके तालुक्यांची भौगोलिक परिस्थितीमध्ये सामर्थ्य दिसून येते. संशोधनासाठी निवडण्यात आलेले सर्व तालुक्यामधील खरिप हंगांमातील तांदूळ हे प्रमुख पीक असून येथील लोकांचे तांदूळ हे प्रमुख खाद्यान्न देखील आहे.




**संशोधनाचे महत्त्व:**

भारत हे नैसर्गिक संसाधानाबाबत एक संपन्न राष्ट्र आहे. ई.स.वी.सन पूर्व २५०० मध्ये भारतात चीनी उच्च उत्पादकता असणाऱ्या प्रजातीच्या तांदळाचे आगमन व सार्वत्रीकरण झाले, परंतु अलीकडील संशोधनानुसार हे सिद्ध झाले आहे कि ई.स.वी.सन पूर्व ३५०० मधेच स्थानिक प्रजातीच्या तांदळाचे उत्पादन भारतात सुरु झाले होते. अशी हजारो वर्षाची तांदूळ उत्पादनाची प्रदीर्घ परंपरा अजूनही चालू आहे. उत्तम नैसर्गिक संसाधने, समृद्ध मान्सून यांसारख्या महत्वपूर्ण बाबी गाठीशी असुनही इतर विकसित तसेच अल्पविकसित देशाच्या तुलनेत भारताची तांदूळ उत्पादकता ही कमी आहे.

**जगातील देशाची तांदूळ उत्पादकता:**

सदरील तक्त्यामध्ये जगातील उच्च उत्पादकता देशांची एकूण तांदूळ उत्पादकता दर्शविली आहे

(संदर्भ वर्ष : २०१९-२०)

| अ .क्र. | देश | उत्पादकता (कि.ग्रॅ /प्रति हेक्टर) |
|---|---|---|
| १ | चीन | ६७१० |
| २ | व्हीएतनाम | ५५७३ |
| ३ | इंडोनेशिया | ५१५२ |
| ४ | बांगलादेश | ४३७६ |
| ५ | भारत | २३९० |
| | जागतिक सरासरी उत्पादकता | ४४१७ |

(SOURCE: NATIONAL FOOD SECURITY MISSION WEBSITE)

जगातील चीन तसेच इंडोनेशिया, बांगलादेश, व्हीएतनाम यांसारख्या देशांपेक्षा भारताची उत्पादकता ही निम्म्यापेक्षा जास्तीने कमी आहे. त्याचप्रमाणे जगाच्या सरासरी उत्पादकतेपेक्षाही भारताची उत्पादकता ही निम्मी आहे. देशांतर्गत तांदळाच्या उत्पादकतेमध्येही तफावत दिसून येते. पश्चिम बंगाल, पंजाब, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, केरळ यांसारखी राज्य जास्त उत्पादकता गटात मोडतात तर मध्यप्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक यांसारखी राज्य मध्यम उत्पादकता या गटात मोडतात. महाराष्ट्राबाबत कोकण व विदर्भ या भागात उच्च उत्पादकता आहे तर पश्चिम महाराष्ट्र(पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली) व खानदेशातील (नाशिक, धुळे, नंदुरबार) काही जिल्हे मध्यम तर काही जिल्हे अल्प उत्पादकता गटात मोडतात. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे व कोल्हापूर जिल्ह्यामध्ये भौगोलिक व पर्जन्यामानाच्या दृष्टीने साधर्म्य असूनही हे जिल्हे अनुक्रमे मध्यम व उच्च उत्पादकता गटात मोडतात.

संदर्भ वर्ष : २०१९-२०

| जिल्हा | क्षेत्रफळ (हेक्टर) | | उत्पादन (टन) | | उत्पादकता (कि.ग्रॅ /प्र.हेक्टर) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१९-२० | २०२०-२१ | २०१९-२० | २०२०-२१ | २०१९-२० | २०२०-२१ |
| पुणे | ५९५००.०९ | ५९७००.२० | १०७६००.२६ | १४३१०० | १८०८.५७ | २४३३.५१ |
| कोल्हापूर | १११३००.५९ | ९७७००.९० | २७०९००.९३ | ३३०४०० | २४४७ | ३३७९ |

SOURCE: KRISHI.MAHARASHTRA.GOV.IN

सदरील संशोधनामध्ये पुणे व कोल्हापूर जिल्ह्यातील तांदूळ उत्पादकता तफावातीचा अभ्यास करण्यात येणार आहे. हे अध्ययन महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील पश्चिम घाटाच्या पूर्वेकडील पायथ्याशी असणाऱ्या जिल्ह्यांना प्रभावित करणारे आहे. सदरील संशोधन पुणे जिल्ह्यामधील मध्यम उत्पादकतेची कारणमीमांसा करण्यासाठी तसेच कोल्हापूर जिल्ह्यांच्या उच्च उत्पादकतेची कारणमीमांसा करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**तांदूळ पिकाखालील एकूण क्षेत्र :**

सदरील तक्त्यामध्ये पुणे व कोल्हापूर जिल्ह्यातील तालुकानिहाय तांदूळ पिकाखालील एकूण क्षेत्रफळ दर्शविले आहे

संदर्भ वर्ष : २०१९-२०

| | पुणे जिल्हा | | कोल्हापूर जिल्हा | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | तालुका | पिक (हेक्टर) | तालुका | पिक (हेक्टर) |
| १ | जुन्नर | १०३७० | शाहुवाडी | १३४०९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | आंबेगाव | ५२३४ | पन्हाळा | १०६४५ |
| ३ | शिरूर | ० | हातकणगले | ६२४ |
| ४ | खेड | ७२४२ | शिरोळे | ६५ |
| ५ | मावळ | १२४६२ | करवीर | ९४७६ |
| ६ | मुळशी | ८०६० | गगनबावडा | २७३५ |
| ७ | हवेली | १५४८ | राधानगरी | १३२१० |
| ८ | पुणे शहर | ० | कागल | ७२९२ |
| ९ | दौंड | ० | भुदरगड | १३५४२ |
| १० | बारामती | ० | आजरा | ९४०१ |
| ११ | पुरंदर | १०८३ | गडहिंग्लज | ७४०१ |
| १२ | वेल्हा | ५१८४ | चंदगड | १३८८८ |
| १३ | भोर | ७५२० | | |
| १४ | इंदापूर | ० | | |
| | एकूण | ५८६९३.०० | एकूण | १०१४८८ |

**तांदूळ पिंकाची प्रति हेक्टरी उत्पादकता :**

सदरील तक्त्यामध्ये पुणे व कोल्हापूर जिल्ह्यातील तालुकानिहाय तांदूळ पिकांची प्रति हेक्टरी उत्पादकता दर्शवली आहे

संदर्भ वर्ष : २०१९-२०

| | पुणे जिल्हा | | कोल्हापूर जिल्हा | |
|---|---|---|---|---|
| अ . क्र | तालुका | पिक (कि.ग्रॅ /प्र.हेक्टर) | तालुका | पिक (कि.ग्रॅ /प्र.हेक्टर) |
| १ | जुन्नर | २०७८.९१ | शाहुवाडी | २०२०.८ |
| २ | आंबेगाव | ३५१.९९ | पन्हाळा | २९३४.१ |
| ३ | शिरूर | ०.०० | हातकणगले | १७४७.२ |
| ४ | खेड | १५४१.५७ | शिरोळे | १४२७.१ |
| ५ | मावळ | २२६३.०० | करवीर | २४३५.३ |
| ६ | मुळशी | २७१३.१६ | गगनबावडा | ३१२३.२ |
| ७ | हवेली | २७३७.९३ | राधानगरी | २९६०.१ |
| ८ | पुणे शहर | ०.०० | कागल | २६०१.७ |
| ९ | दौंड | ०.०० | भुदरगड | २६०४.८ |
| १० | पुरंदर | २१३०.९० | आजरा | २६४५.० |
| ११ | वेल्हा | २०६२.०० | गडहिंग्लज | २३४५.८ |
| १२ | भोर | ३०३३.०० | चंदगड | २३३२.७ |
| १३ | बारामती | ०.०० | | |
| १४ | इंदापूर | ०.०० | | |

**जिल्हानिहाय तांदूळ क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता :**

सदरील तक्त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील जिल्हानिहाय एकूण तांदूळ क्षेत्र, उत्पादन, उत्पादकता दर्शविले आहे

(संदर्भ वर्ष : २०१९-२०)

| अ.क्र | जिल्हा | क्षेत्रफळ (हेक्टर) | उत्पादन (टन) | उत्पादकता (कि.ग्रॅ .प्रति.हेक्टर) |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | ५५२.३५ | ११८४.९५ | २१४५.२८ |
| २ | पालघर | ७६७.१४ | १३६७.४६ | १७८२.५४ |
| ३ | रायगड | ९५९.३२ | १८५५.१३ | १९३३.८१ |
| ४ | रत्नागिरी | ७५३.९७ | २३८५.९१ | ३१६४.४८ |
| ५ | सिंधूदुर्ग | ६२५.०० | १५६२.४० | २४९९.८४ |
| | कोकण | ३६५७.२८ | ८३५५.८५ | २२८४.४१ |
| ६ | नाशिक | ७६२.८८ | ९०५.३९ | ११८६.८१ |
| ७ | धुळे | ६८.३८ | ९७.४२ | १४२४.६४ |
| ८ | नंदुरबार | २६९.६२ | ४३२.७३ | १६०४.९६ |
| ९ | जळगाव | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | नाशिक | ११००.८७ | १४३५.५४ | १३०४.०० |
| १० | अहमदनगर | १७३.३१ | १९४.६९ | १५.४१ |
| ११ | पुणे | ५१५.०९ | १०७६.२६ | १५.७१ |
| १२ | सोलापूर | ११८१.८७ | १.८७ | १५७.१६ |
| | पुणे | १८०.२९ | १२७२.८२ | १६३१.२१ |
| १३ | सातारा | ४९६.३५ | ७१३.६७ | १४३७.८४ |
| १४ | सांगली | १५४.७२ | १९६.१८ | १२६८.०० |
| १५ | कोल्हापूर | १११३.५९ | २७०९.९३ | २४३३.५१ |
| | कोल्हापूर | १७६४.६६ | ३६१९.७९ | २०५१.२७ |
| १६ | औरंगाबाद | ०.०५ | ०.०१ | १४२.०० |
| १७ | जालना | ०.११ | ०.०२ | १४२.०० |
| १८ | बीड | ०.१६ | ०.०२ | १४२.०० |
| | औरंगाबाद | ०.३२ | ०.०५ | १४२.०० |
| १९ | लातूर | ८.७९ | ०.७१ | ८०.८७ |
| २० | उस्मानाबाद | १२.२१ | १.३९ | ११४.२२ |
| २१ | नांदेड | ५.८२ | ४.०० | ६८६.३४ |
| २२ | परभणी | ०.१० | ०.०१ | १४९.०० |
| २३ | हिंगोली | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | लातूर | २६.९२ | ६.१२ | २२७.१८ |
| २४ | बुलढाणा | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २५ | अकोला | ०.०० | ०.०० | ०.०० |

| अ.क्र | जिल्हा | क्षेत्रफळ (हेक्टर) | उत्पादन (टन) | उत्पादकता (कि.ग्र.प्रति.हेक्टर) |
|---|---|---|---|---|
| २६ | वाशिम | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २७ | अमरावती | ६१.६८ | ११.८६ | १९२.२५ |
| २८ | यवतमाळ | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | अमरावती | ६१.६८ | ११.८६ | १९२.२५ |
| २९ | वर्धा | ०.०० | ०.०० | ०. ०० |
| ३० | नागपूर | ९९४.७३ | १५५९.४३ | १५६७.७० |
| ३१ | भंडारदरा | १७७५.१० | २८८२.५२ | १६२३.८७ |
| ३२ | गोंदिया | १५१९.९२ | ३०२७.२१ | १९९१.६८ |
| ३३ | चंद्रपूर | १३८५.९८ | १९३६.१० | १३९६.९२ |
| ३४ | गडचिरोली | १७१२.६७ | २९१०.८१ | १३९९.५७ |
| | नागपूर | ७३८८.४० | १२३१६.०८ | १६६६.९५ |
| | एकूण | १४७८०.९२ | २७०१८.१० | १८२७.९२ |

**एकूण कृषी निर्यातीत तांदूळ उत्पादनाचा हिस्सा :**

सदरील तक्त्यामध्ये भारतातील एकूण कृषी निर्यातीतील एकूण तांदूळ उत्पादनाचा हिस्सा दर्शविला आहे

संदर्भ वर्ष : २०१९-२०

| वर्ष | प्रमाण (हजार टन) | मूल्य | |
|---|---|---|---|
| | | (₹ करोड ) | ($ मिलियन ) |
| २०१८-१९ | १२०६२.६ | ५३९७५ | ७७५१ |
| २०१९-२० | ९५११.० | ४५४२७ | ६४०३ |
| २०२०-२१ | ७४६६१ | ३०६०९ | ४०७७ |

**जागतिक निर्यातीत भारताचा हिस्सा :**

सदरील तक्त्यामध्ये जगातील एकूण तांदूळ निर्यातीत भारताचा हिस्सा दर्शविला आहे

संदर्भ वर्ष : २०१९-२०

| वर्ष | विश्व | | भारत | | भारताचा हिस्सा | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | | एकूण | | एकूण |
| २०१५ | २३३०० | १६३६१६८० | ६३८० | २६४३८१ | २७.४% | १.६% |
| २०१६ | २०८०० | १५८८०५३१ | ५३१३ | २६०३२७ | २५.१६% | १.६% |
| २०१७ | २४५०० | १५६२८९१६.४२ | ७०७६ | २६०३२७ | २८.९% | १.७% |
| २०१८ | २६१७२ | १९१३२२६८.७५ | ७३४६ | ३२२४९२ | २८.१% | १.७% |

**संशोधनाची उद्दिष्टे :**

अ) पुणे व कोल्हापूर जिल्ह्यातील तांदूळ उत्पादकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

ब) कोल्हापूर जिल्ह्याच्या जास्त उत्पादकतेची कारणमीमांसा करणे.

क) पुणे व कोल्हापूर जिल्ह्यातील तांदूळ उत्पादक शेतकऱ्याच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

ड) पुणे व कोल्हापूर जिल्ह्यातील तांदूळ उत्पादनासाठीच्या भांडवल उपलब्धतेचा अभ्यास करणे.

इ) पुणे व कोल्हापूर जिल्ह्यातील तंत्रज्ञान वापरातील फरकाचा अभ्यास करणे.

**ग्रहीतकृत्य :**

1) तांदूळ उत्पादकतेत कोल्हापूर जिल्ह्याच्या तुलनेत पुणे जिल्ह्याची उत्पादकता कमी आहे.
2) पुणे जिल्ह्यामध्ये रासायनिक खतांचा असंतुलित व अतिरिक्त वापरांमुळे कोल्हापूर जिल्ह्याच्या तुलनेत तांदळाची उत्पादकता कमी आहे.
3) पुणे जिल्ह्याच्या तुलनेत कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सरासरी पर्जन्य जास्त असल्यामुळे कोल्हापूर जिल्ह्याची उत्पादकता जास्त आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्रातील पुणे व कोल्हापूर जिल्ह्याची निवड करण्यात येणार आहे. पुणे व कोल्हापूर जिल्हा यातून प्रत्येकी चार-चार तांदूळ उत्पादक तालुक्यांची निवड करण्यात येणार असून हे निवड भौगोलिक परिस्थिती, क्षेत्रफळ, लोकसंख्या, पीकरचना, पर्जन्यमान यांच्या आधारावर करण्यात येणार आहे.

पुणे जिल्ह्यांमध्ये एकूण १३ तालुके असून यापैकी यापैकी चार भोर, वेल्हा, मावळ, मुळशी इत्यादी तर कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये एकूण १२ तालुके असून यापैकी चार तालुके गगनबावडा, चंदगड ,भुदरगड आणि राधानगरी तालुक्यांची निवड करण्यात येणार आहे.

संशोधनातील नमुना निवडीसाठी प्राथमिक तसेच द्‍वितीय स्त्रोतांचा वापर केला जाणार आहे. यापैकी प्राथमिक माहिती ही प्रत्यक्ष शेतकऱ्यांना भेटून प्रश्नावली, अनुसूची, निरीक्षणे इत्यादी पद्‍धतीचा वापर करून करण्यात येणार असून द्‍वितीय पद्‍धतीमध्ये शेतीविषयक सरकारी अहवाल, प्रबंध्ये, संदर्भ पुस्तके, शासकीय संकेत स्थळ इत्यादीचा वापर करण्यात येणार आहे.

**तथ्य संकलनाचे स्त्रोत :** संशोधन विषयाच्या अनुषंगाने प्राथमिक व द्‍वितीय किंवा दुय्यम स्त्रोताद्‍वारे माहितीचे संकलन केले जाणार आहे.

अ)प्राथमिक स्त्रोत : मुलाखत, प्रश्नावली, निरीक्षण, अनुसूची, इ.

ब)द्‍वितीय स्त्रोत : प्रबंध, नियतकालिके, संदर्भ पुस्तके, शासकीय अहवाल, शोधनिबंध, शासकीय संकेत स्थळ इत्यादींचा वापर करण्यात येणार आहे.

**नमुना निवड पद्‍धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्रातील पुणे व कोल्हापूर जिल्ह्याची निवड करण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यातील एकूण १३ तालुक्यांपैकी वेल्हा, भोर, मुळशी, मावळ या चार तालुक्याची निवड करण्यात येणार आहे, तर कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण १२ तालुक्यांपैकी गगनबावडा, चंदगड, राधानगरी, भुदरगड इत्यादी चार तालुक्यांची निवड करण्यात येणार आहे.

पुणे जिल्ह्यातील भोर, वेल्हा, मावळ, मुळशी या चार तालुक्यातील एकूण 647 गावांपैकी 30% गावांची निवड करण्यात येणार आहे तर कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा, चंदगड, भुदरगड, राधानगरी या चार तालुक्यातील एकूण 433 गावांपैकी 30% गावांची निवड करण्यात येणार आहे

या गावातील एकूण तांदूळ उत्पादक शेतकऱ्यांपैकी प्रत्येकी 20% शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे. या 20% शेतकऱ्यांपैकी 10% शेतकरी उच्च उत्पादकता गटातील तर 10%शेतकरी अल्प उत्पादकता गटातील असणार आहेत.

सदरील संशोधनासाठी एकूण ५०० ते ६०० नमुने निवडण्यात येणार असून ही निवड स्तरीत यादृच्छिक पद्‍धतीने करण्यात येणार आहे. यासाठी प्रश्नावली अनुसूची, निरीक्षण तसेच मुलाखत इत्यादींचा वापर करण्यात येणार आहे.

**संशोधनाची व्याप्ती :**

सदरील संशोधनामध्ये महाराष्ट्रातील पुणे व कोल्हापूर जिल्ह्यातील तांदूळ उत्पादकतेचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे. यासाठी पुणे जिल्ह्यातील वेल्हा, भोर, मावळ, मुळशी या चार तालुक्यांची निवड करण्यात येणार आहे तर कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा, भुदरगड, चंदगड, राधानगरी या तालुक्यांची निवड करण्यात येणार आहे. निवड केलेले आठ ही तालुक्यांची भौगोलिक स्थिती मध्ये साधर्म्य असल्याचे दिसून येते. संशोधनासाठी निवडण्यात आलेले आठ ही तालुके पश्चिम घाटाच्या पूर्वे कडील पायथ्याशी असणारे आहेत. या तालुक्यांमध्ये खरिप हंगामातील तांदूळ हे प्रमुख पिक असून तेथिल लोकांचे तांदूळ हे प्रमुख खाद्यान्न देखील आहे. तसेच या तालुक्यांमधील लोकसंख्येमध्ये देखील साधारण साम्य असल्याचे दिसते.

सदरील संशोधन विषयाची व्याप्ती पुणे व कोल्हापूर जिल्ह्यापर्यंत मर्यादित असली तरी सदरील संशोधन हे महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील पश्चिम घाटाच्या पायथ्याशी असणाऱ्या दख्खनच्या पठारावरील मल्लेनाडू प्रदेशातील सिरसी, चिकमगळूर, शिवमोगा, हसन, कडगू, बेळगाव इत्यादी फार मोठ्या प्रदेशाला प्रभावित करणारे किंवा लागू होणार आहेत.

**संशोधनाची मर्यादा :**

सदरील संशोधनासाठी निवडण्यात आलेले विभाग हे पूर्णतः कृषी अवलंबित असणारे असल्यामुळे शेतात जाण्याच्या व कामाच्या वेळेत त्यांच्याशी संपर्क साधने व माहिती घेणे दुरापास्त राहील.

सदरील विभागामध्ये शिक्षणाचा अभाव असल्यामुळे तेथील लो उत्पादन खर्च व उत्पन्न याबाबतचा लेख ठेवत नसल्याने उत्पादन खर्च, उत्पन्न व उत्पादकता याबाबत माहिती संकलन करणे कष्टप्रद असेल याच बरोबर सदरील दोन्ही जिल्ह्यातील तांदूळ उत्पादक शेतकाऱ्यांची संख्या जास्त प्रमाणात असल्यामुळे त्या सर्व शेतकऱ्यांकडून माहिती मिळविण्यामध्ये मर्यादा .

सदरील तांदूळ उत्पादक प्रदेश दुर्गम असल्यामुळे संशोधन कार्यात सहाय्य करण्याची प्रवृत्ती कमी असण्याची शक्यता आहे. याचबरोबर शिक्षणाचा अभाव असल्यामुळे लोकाकडून पुरेशी आणि अचूक माहिती मिळणे अवघड आहे.

**संशोधनाचे अंतर :**

तांदूळ हे मानवी आहारातील महत्त्वपूर्ण अन्न आहे. भारतात उत्पादित होत असलेल्या पिकांमध्ये तांदूळ हे प्रमुख पिक आहे. 'असेतू' हिमाचल तांदळाच्या विविध प्रदेश निहाय जाती असून त्या-त्या ठिकाणच्या वातावरणानुसार तांदळाच्या विविध प्रजातीचे उत्पादन घेतले जाते. परंतु सहयाद्रीच्या पाय्थ्यालगतच्या प्रदेशात घेतले जाणारे तांदूळ उत्पादन या प्रदेशातील वातावरणव पर्जन्यमान यांमध्ये अधिक प्रमाणात साधर्म्य असताना देखील उत्पादन, उत्पादकता, उत्पन्न व प्रजाती यामध्ये असणाऱ्या तफावतीचे अध्ययन व संशोधन पुरेशा प्रमाणात घडलेले नाही. यापुर्वी झालेले संशोधन भारतातील हिमाचल प्रदेश, आंध्रप्रदेश,उत्तरप्रदेश,पश्चिम बंगाल अशा राज्यांमध्ये झाले असून निवडलेले जिल्ह्याचा अभ्यास यापुर्वी केला गेला नाही यासाठी सहयाद्रीच्या पायथ्यालगतच्या असणाऱ्या महाराष्ट्रातील पुणे व कोल्हापूर या प्रातिनिधिक जिल्ह्याची निवड या संशोधनासाठी केली आहे.

**संदर्भसूची :**

1) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - २०२० (जिल्हा - कोल्हापूर) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, कोल्हापूर http://mahades.maharashtra.gov.in
2) जिल्हा सामाजिक व आर्थिक अमालोछान - २०२० (जिल्हा - पुणे) जिल्हा सांख्यिकी कार्यालय, पुणे, अर्थ व सांख्यिकी संचालनालय http://mahades.maharashtra.gov.in
3) महाराष्ट्र शासन कृषी विभाग, भात उत्पादन तंत्र
4) आर्थिक पाहणी अहवाल (२०१९-२०२०) अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग

5) Economic Survey Of Maharashtra (2019-2020) Department Of Economics And Statistics, Planning Department, Government Of Maharashtra, Mumbai. Annual Report (2019-2020) Icar: Indian Council Of Agricultural Research
6) Agriculture Census (2015-2026) – Phase-I Governament Of Maharashtra
7) Census Of India 2011: Maharashtra District Census Handbook, Pune Directorate Of Census Operations Maharashtra.
8) Economy Survey Of Maharashtra – (2020-2021)
9) Comprensive District Agriculture Plan (C-Dap)
10) (District – Kolhapur) Government Of India, Depaartment Of Agriculture Comprehensive District Agriculture Plan (C-Dap) (District – Pune)
11) Economy Survey (2020-2021) Statistical Appendix.
12) Agriculture Contigency Plan For District: Kolhapur
13) Ministry Of Agriculture And Farmers Welfare (2020-2021)
14) Department Of Agriculture, Cooperation And Farmers Welfare. Journal Of Shivaji University (2028)
15) Humanities And Social Sciences, Department Of Environmental Science. Pocket Book Of Agricultural Statistics.Nrri – Research Bulletin No.22
16) Eco-Regional-Based Rice Farming For Enhancing Productivity, Profitability And Sustainability.
17) A.C. Bodh (2020), Agricultural Situation In India.
18) C.R. Kothari (1999). Research Methodology, Methods And Techniques, Second Edition, New Delhi.
19) Yuval Noah Herari, Sapiens (A. Brief History Of Humankind)

# डॉ. आंबेडकर आणि सामाजिक न्याय

**मंगवडे जी. एन.**

राज्यशास्त्र विभाग, अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय वेळापूर

डॉ. आंबेडकरांच्या मते अस्पृश्य आणि दलितांना सामाजिक समतेच्या आणि मानवतेच्या पातळीवर आणणे हिंदू जातिव्यवस्था संपल्याशिवाय शक्य होणार नाही,त्याच्या मते समाजातून जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता आजूनही संपलेली नाही. डॉ.आंबेडकरांनी भारतीय समाजजीवन वास्तववादी आणि मानवी दृष्टिकोनातून समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांना भारतीय हिंदू समाजाला वाईट प्रथा, परंपरा, रुढी, चालीरीती आणि कर्मकांड यापासून मुक्त करून धर्म सुधारणा करावयाची होती. डॉ. आंबेडकरांची सामाजिक विचारसरणी स्वातंत्र्य, समाता,बंधुता, न्याय आणि मानवतावादावर आधारित मानवतावादी होती. आंबेडकरांचे निरीक्षणातून असे दिसून आले की अस्पृश्यतेच्या रोगामुळे भारतीय हिंदू समाजाची चेतना हारवली आहे आहे आणि ती सतत नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. डॉ. आंबेडकर हे केवळ भारतीय समाजाचेच नव्हे तर संपूर्ण मानवतेचे हितचिंतक होते. ते पलायनवादी किंवा भावनामय नव्हते. त्यांनी सत्तेच्या राजकारणात भाग न घेता नाही, समाज सुधरणेच्या राजकारणात भाग घेतला. सत्तेच्या राजकारणासाठी दलित वर्गाची कोणी दिशाभूल करू नये, अशी त्यांची इच्छा होती. त्याना एक जातविहीन समाजव्यवस्था तयार करायची होती ज्यामध्ये प्रत्येकजण समान असेल, एकमेकांवर प्रेम करेल आणि समान पायावर उभे राहू शकेल. म्हणजेच आंबेडकरांना सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून न्याय्य व न्याय्य असेल अशी समाजव्यवस्था निर्माण करायची होती. येथे आंबेडकर आणि गांधी यांच्यात मतभेद नाहीत. दोघेही अशा समाजव्यवस्थेचे समर्थक आहेत कि ज्यामध्ये सामाजिक न्यायाची तत्वे आणि उद्दिष्टे साध्य करता येतील. सर्वोदय समाजाची स्थापना करणे हे गांधींचे ध्येय होते. गांधींचा सर्वोदय समाज जोपर्यंत समाजातील दुर्बल आणि असुरक्षित घटकांची, विशेषत: महिला आणि दलितांची प्रगती होत नाही तोपर्यंत गरजेचा होता. उच्चवर्णीयांची अंतःकरणे बदलून आणि हिंदू समाजात प्रचलित असलेल्या वाईट गोष्टी दूर करून सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट साध्य केले जाऊ शकते, असा गांधींचा विश्वास होता. याउलट आंबेडकरांचा गांधींच्या समाजसुधारणेच्या कार्यक्रमांवर विश्वास नव्हता. हिंदू धर्मात सुधारणा करून दलितांना सामाजिक न्याय मिळेल, याबाबत डॉ. आंबेडकरांना आनेक शंका होत्या.आंबेडकर म्हणतात, 'स्वातंत्र्य आणि समतेशी संबंधित जे हक्क दलितांनी भूतकाळात गमावले आहेत, ते दयायाचना करून मिळणार नाहीत. त्यासाठी सतत संघर्ष करावा लाघणार आहे. शेळ्यांचा बळी दिला जातो, सिंहाचा नाही. डॉ. आंबेडकरांनी सामाजिक न्यायाच्या स्थापनेसाठी खालील दोन पातळ्यांवर भर दिला आहे.

1. सामाजिक अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी दलित जातींना संघटित करणे.
2. न्याय्य समाज स्थापन करण्यासाठी विधायक प्रयत्न करणे.

डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या 'मुक नायक' आणि 'बहिष्कृत भारत' या दोन मराठी नियतकालिकांमध्ये लिहिलेल्या सामाजिक लेखांद्वारे दलितांमध्ये ज्या पद्धतीने सामाजिक जाणीव पसरवली, त्यातून आंबेडकरांचा जुलमी व्यवस्थेविरुद्धाचा बंडखोर स्वभाव दिसून येतो. त्यांची 'हू वेअर शूद्रजा', 'द अस्पृश्य' आणि विशेषत: 'जातीचे उच्चाटन' ही भारतातील विद्रोह आणि संघर्ष यावरील साहित्याची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. 'महार परिषद' किंवा 'अखिल भारतीय अनुसूचित जाती परिषद' किंवा 'दलित युवक किंवा महार महिलांच्या मेळाव्याला संबोधित करताना डॉ. आंबेडकरांनी दलितांना सामाजिक अन्याय, अत्याचार आणि दडपशाहीविरुद्ध एकजुटीने लढण्याची प्रेरणा दिली. दलितांच्या अवस्थेचे वर्णन करताना डॉ. आंबेडकरांनी 'मूकनायक'च्या पहिल्या अंकात लिहिले आहे की, "हिंदू समाज हा एका बहुमजली इमारतीसारखा आहे, ज्याला आत जाण्यासाठी जिना नाही की बाहेर येण्यासाठी दरवाजा नाही.एकीकडे समाज निर्जीव

वस्तूंमध्येही देवाचे अस्तित्वात आहे, असे तो मानतो, तर दुसरीकडे तो असेही म्हणतो की काही लोक, जे त्याचेच अंग आहेत, त्यांना स्पर्श करणे योग्य नाही.दलितांच्या अस्पृश्यतेमुळे आलेले अपंगत्व दूर करण्यासाठी आंबेडकरांनी आयुष्यभर संघर्ष केला. या संघर्षाच्या संदर्भात आंबेडकरांनी 1927 मध्ये महाड चवदार तलावातील पाणी दलितांना देऊन संघर्षाची हाक दिली. 3 नोव्हेंबर 1927 रोजी अमरावती येथील अंबादेवी मंदिराच्या प्रवेशासंदर्भात झालेल्या परिषदेत आंबेडकरांनी दलितांसाठीच्या पहिल्या मंदिराला कडाडून विरोध केला आणि दलितांनी कोणताही भेदभाव न करता अस्तित्वात असलेल्या मंदिरांमध्येच पूजा करण्याचा सल्ला दिला. 25 डिसेंबर 1927 रोजी महाडच्या दलित परिषदेला संबोधित करताना डॉ. आंबेडकर म्हणाले होते की "अस्पृश्यता संपविणे आणि आंतरजातीय सहभोजने यातून दलितांचे दु:ख संपणार नाही, त्यांच्यासाठी सेवा आणि व्यवसायात दरवाजे उघडले पाहिजेत.हिंदू समाजाची पुनर्रचना समानतेच्या तत्त्वांवर आणी जातिवादाच्या अनुपस्थितीवर आधारित असावी असे त्याचे मत होते.25 डिसेंबर 1927 चा दिवसही अविस्मरणीय आहे कारण याच दिवशी त्यांच्या नेतृत्वाखाली विषमता, अत्याचार आणि अन्यायावर आधारित मनुस्मृतीचे दहन करण्यात आले. ज्यावर धनंजय कीर यांचे भाष्य काहीसे असे आहे ,हे काम मार्टिन ल्यूथर नंतर स्वार्थी धार्मिक पदे, परंपरावादी धर्मांध आणि परिवर्तनाचे विरोधक यांच्या विरोधात पृथ्वीवर झालेल्या महान ईश्वरविरोधी स्फोटांपैकी एक होते. त्याच दिवशी आंबेडकरांनी जुन्या मनुस्मृतीचे दहन केले आणि हिंदू संहितेच्या पुनर्रचनेचे आवाहन केले.

लोकांचे जीवन शिस्तबद्ध व्हावे म्हणून नवीन राज्यघटनेची मागणी केली,अशा प्रकारे महाड हा भारतातील अग्रगण्य वर्गलढा बनला. प्रसिध्द काळाराम मंदिरात दलितांच्या प्रवेशाबाबंतच्या संघर्षाची चर्चा केल्याशिवाय दलित संघर्षाचा आजवरचा इतिहास अपूर्ण राहणार आहे. रविवार, 2 मार्च 1930 रोजी देवराज नायक, राजभोज, प्रधान बी.जी. खरे यांसारख्या पंधरा हजार कामगारांच्या जनसमुदायाच्या उपस्थितीत दलितांचा सत्याग्रह मंदिरात प्रवेश करू लागला. अनेक महिने सत्याग्रह चालू होता. शेवटी असे ठरले की 9 एप्रिल 1930 रोजी होणाऱ्या श्री रामाच्या रथयात्रेत उच्चवर्णीय आणि अस्पृश्य असे दोन्ही वर्ग सहभागी होतील. डॉ.आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली दलित आणि अस्पृश्य वर्ग मिरवणुकीत सहभागी होऊन ब्राह्मण वर्गाच्या विशेषाधिकारांना आव्हान देण्याचे स्वप्न पाहत असताना, सवर्ण हिंदूंना त्यांचे विशेषाधिकार कोणत्याही किंमतीत कमी करायचे नव्हते. परिणामी, डॉ. आंबेडकर आपल्या साथीदारांसह रथ ओढण्यासाठी पोहोचले, तेव्हा उच्चवर्णीयांनी डावपेच म्हणून आंबेडकरांना एका लढ्यात अडकवले आणि सवर्ण हिंदू रथ घेऊन निघून गेले. या घटनेने डॉ. आंबेडकरांची सद्सद्विवेकबुद्धी अस्वस्थ झाली आणि पुन्हा एकदा त्यांचा विश्वास दृढ झाला की - "हिरावलेले हक्क भीक मागून आणि हडप करणाऱ्यांच्या सदसद्विवेकबुद्धीला आवाहन करून परत मिळणार नाही, तर तो सतत संघर्ष करून मिळवला जाईल."

डॉ. आंबेडकरांनी दलितांना राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न केले. सत्तेच्या परिघापासून दूर समाजाच्या काठावर उभ्या असलेल्या दलित वर्गाला राजकीय सत्ता मिळाल्याशिवाय न्याय्य जीवन जगता येत नाही, असे त्यांचे मत होते. डॉ. आंबेडकरांनी प्रौढ मताधिकाराची ताकद ओळखली होती. संख्याबळाच्या जोरावर सत्तेत येऊन शतकानुशतके जुनी सामाजिक विषमता दूर करू शकणारा समाजातील एक मोठा वर्ग दलित आहे, हे त्यांना माहीत होते. दलितांना राजकीय हक्क मिळवून देण्याच्या उद्देशाने डॉ. आंबेडकरांनी 1918 मध्ये साऊथ ब्यरो कमिटीसमोर राजकीय अधिकारांची मागणी केली. ते म्हणाले की "अस्पृश्यांना उच्चवर्णीयांच्या दयेवर सोडले जाऊ नये, तर अस्पृश्यांना स्वतःला सत्ता देणे हे सर्वात शहाणपणाचे धोरण असेल. ते सत्तेचे भुकेले नसले तरी, ते समान हक्कांसाठी लढण्यास तयार आहेत. समाजाला त्यांच्या संख्याबळानुसार जागा मागायला आवडेल. डॉ. आंबेडकरांनी 1928 मध्ये सायमन कमिशनला एक निवेदन सादर केले ज्यामध्ये त्यांनी दलितांच्या न्याय्य हिताचा पुरस्कार केला. आंबेडकर म्हणाले की, "दलितांनाही विशेष अल्पसंख्याक मानले पाहिजे. बाबासाहेबांच्या दृष्टीने दलितांना इतर अल्पसंख्याकांपेक्षा अधिक राजकीय संरक्षणाची गरज आहे, कारण हा समाज इतरांच्या तुलनेत शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला, आर्थिकदृष्ट्या गरीब, सामाजिक गुलाम आणि अशा गंभीर अपंगत्वाने ग्रस्त आहे. इतर अल्पसंख्याक समुदायांना याचा त्रास होत नाही".1930 च्या गोलमेज परिषदेत डॉ. आंबेडकरांनी हे स्पष्ट केले की दलितांची सामाजिक स्थिती अल्पसंख्याकांपेक्षा

वेगळी आहे. भारतामध्ये अनेक अल्पसंख्याक गट आहेत जे सामाजिकदृष्ट्या सक्षम आहेत आणि समृद्ध जीवन जगत आहेत. याउलट, देशात सर्वात मोठा अल्पसंख्याक समाज दलित वर्ग सामाजिक न्यायाच्या बाबतीत मागासलेला आहे. हे दुर्दैवी सत्य आहे की अल्पसंख्याक वर्गाच्या स्तरीकरणातही दलित वर्गाला सर्वात खालच्या स्थानावर राहणे नशिबात आहे, जे सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून योग्य नाही.परिणामी आंबेडकर या निष्कर्षापर्यंत पोहोचतात की दलितांचे दु:ख आणि वेदना दलित स्वतःच दूर करू शकतात आन्य कोणीही नाही. त्यासाठी राजकीय सत्ता दलितांच्या हातात असणे आवश्यक आहे, जेणेकरून दलित उत्थानाचा मार्ग पूर्ण होऊ शकेल. दलितांना राजकीयदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने डॉ.आंबेडकरांनी 1931 मध्ये दुसऱ्या गोलमेज परिषदेत दलितांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळे ब्रिटीश सरकारने दलितांना वेगळे प्रतिनिधित्व देण्याची मागणी मान्य केली. आंबेडकरांनी ब्रिटीश राजवटीचा हा निर्णय दलित संघर्षाच्या मुद्द्याचा परिणाम मानला. उलट महात्मा गांधींनी या निर्णयाला जातीयवादी ठरवून टीका केली. त्यांच्या मते, हिंदू समाजाचे विभाजन करण्यासाठी ब्रिटिशांची ही जाणीवपूर्वक चालवलेली चाल आहे. म्हणूनच इंग्रजांच्या या निर्णयाविरुद्ध गांधींनी २० सप्टेंबर १९३२ रोजी आमरण उपोषण सुरू केले. प्रश्न गंभीर झाल्यावर डॉ.आंबेडकरांनी पुण्याच्या येरवडा कारागृहात गांधीजींची भेट घेतली. एकत्रितपणे, त्यांनी शेवटी समस्येवर एक उपाय शोधला, जो इतिहासात पुणे करार म्हणून ओळखला जातो."पुणे करार" हे खरे तर एका लढाऊ योद्ध्याच्या विलक्षण शहाणपणाचे आणि दूरदृष्टीचे प्रतिबिंब आहे, ज्यामुळे पुढे राष्ट्रीय चळवळ आणि दलितांनी सामाजिक न्यायासाठी केलेल्या संघर्षाला यश मिळाले.दलितांच्या इतिहासातील हा एक मैलाचा दगड ठरला." दलितांना आपापसात संघटित केले तर लोकशाही व्यवस्थेत ते सहजपणे राजकीय सत्ता मिळवू शकतील, असे आंबेडकरांना वाटत होते. त्यामुळेच आंबेडकरांना दलितांना एका व्यासपीठावर आणायचे होते. ते एक वेगळी ओळख निर्माण करू शकतील आणि त्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय हक्कांसाठी लढू शकतील. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आंबेडकरांनी अखिल भारतीय अनुसूचित जाती महासंघ, समता सैनिक दल, स्वतंत्र मजूर पक्ष इत्यादी स्थापन केले. स्वतंत्र भारताच्या संविधानात दलितांना न्याय्य हक्क मिळवून देण्यात अखिल भारतीय अनुसूचित जाती परिषदेचे प्रतिनिधी म्हणून आंबेडकरांचे योगदान कौतुकास्पद आहे.

अर्थाचे योग्य विकेंद्रीकरण देखील सामाजिक न्यायाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार त्यांच्या "नॅशनल डिव्हिडंड ऑफ इंडिया - ए हिस्टोरिकल अँड ॲनालिटिकल स्टडी" या संशोधन प्रबंधात पाहता येतील. डॉ. आंबेडकर समतावादी सामाजिक व्यवस्था आणि सामाजिक न्याय मिळविण्यासाठी आर्थिक संसाधनांच्या समान वितरणावर भर देतात. आंबेडकरांचा असा विश्वास होता की सामाजिक भेदभाव आणि जाती-आधारित वर्ग विशेषतेमुळे भारतीय समाज समता, स्वातंत्र्य आणि न्यायावर आधारित आदर्श समाजव्यवस्थेचे ध्येय साध्य करू शकत नाही. यासाठी डॉ. आंबेडकर राज्य समाजवादाचे समर्थन करतात. डॉ.आंबेडकरांच्या मते राज्य हे गरीब आणि अल्पसंख्याकांच्या आर्थिक हिताचे रक्षक असले पाहिजे. लोकांच्या आर्थिक जीवनासाठी राज्याने नियोजन करणे आवश्यक आहे. राज्याने आपल्या योजना अशा पद्धतीने राबवाव्यात जेणेकरून उत्पादन प्रगतीशील वाढीकडे जाईल आणि संपत्तीचे समान वितरण सुनिश्चित करता येईल. डॉ. आंबेडकर या प्रश्नावर विचार करतात - समाजाद्वारे आर्थिक संरचनांचे कायदेशीर स्वरूप ठरवण्याचे मुख्य उद्दिष्ट काय आहे? विचार केल्यानंतर, ते या निष्कर्षापर्यंत पोहोचतात की त्याचा उद्देश "इतर व्यक्तींच्या हल्ल्यांपासून व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे रक्षण करणे" हा आहे.

आपण आपली राजकीय लोकशाही ही सामाजिक लोकशाही बनवली पाहिजे, असे डॉ. आंबेडकरांचे ठाम मत होते, कारण याशिवाय राजकीय लोकशाही फार काळ टिकू शकत नाही. त्यांच्या मते, सामाजिक आणि आर्थिक मुक्तीशिवाय जीवनाचे संरक्षण आणि कायद्याने दिलेले राजकीय स्वातंत्र्य निरर्थक ठरेल. आंबेडकर म्हणतात की दलितांसह लोक केवळ कायदा आणि सुव्यवस्थेवर जगू शकत नाहीत, त्यांना अन्नाची गरज आहे, हे आपण विसरता कामा नये. केवळ राजकीय स्वातंत्र्याला प्राधान्य देणाऱ्या राष्ट्रवाद्यांशी डॉ.आंबेडकरांचे मतभेद होते. अशा पोकळ आणि भावनिक देशभक्तीला त्यांनी आदर्श मानले नाही. त्यांचा स्पष्ट विश्वास होता "भारतात ते लोक राष्ट्रवादी आणि देशभक्त मानले जातात ज्यांना आपल्या बांधवांशी अमानुष वागणूक दिसते, परंतु त्यांच्या मानवी संवेदना यामुळे चिडल्या जात नाहीत. त्यांना माहित आहे की निरपराध लोकांना मानवी हक्कांपासून वंचित ठेवले गेले आहे.त्यांच्या मनात कोणताही राग

निर्माण करा,त्यांना एका वर्गातील सर्वच लोक सरकारी नोकऱ्यांपासून वंचित दिसतात पण त्यामुळे त्यांच्या मनात न्याय आणि प्रामाणिकपणाची भावना जागृत होत नाही. त्यांना माणूस म्हणून समाजाला न्याय द्यायचा नाही.शेकडो वाईट प्रथा पाहूनही ते दु:खी होत नाहीत. तथाकथित देशभक्तांचा एकच नारा आहे, स्वतःसाठी आणि त्यांच्या वर्गासाठी अधिकाधिक सत्ता, मी अशा देशभक्तांच्या श्रेणीत नाही याचा मला आनंद आहे. मी त्या वर्गातील आहे जो लोकशाहीच्या बाजूने आहे आणि प्रत्येक प्रकारची मक्तेदारी संपवण्यासाठी धडपडत आहे.

राजकीय, आर्थिक आणि सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रात 'एक व्यक्ती,एक मत ,एक मूल्या'चा आदर्श आचरणात आणणे हे आमचे उद्दिष्ट आहे.' मार्क्सप्रमाणे आंबेडकरही भांडवलदारांच्या या युक्तिवादाशी असहमत आहेत की, राज्याने खाजगी कामांमध्ये, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप केला नाही तर व्यक्तिस्वातंत्र्याचे रक्षण केले जाऊ शकते. म्हणजेच, भांडवलदार एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनात राज्याचा कमीत कमी हस्तक्षेप करावा आशी आपेक्षा करतात. आंबेडकर विचारतात, हे स्वातंत्र्य कोणासाठी? डॉ.आंबेडकरांच्या मते, हे स्वातंत्र्य जमीनदारांना भाडे वाढवण्याचे, भांडवलदारांना कामाचे तास वाढवण्याचे आणि वेतनाचे दर कमी करण्याचे आहे. म्हणजेच, राज्याच्या नियंत्रणातून स्वातंत्र्याचे दुसरे नाव खाजगी मालकांची हुकूमशाही. तथापि, आंबेडकर मार्क्सच्या राज्यविहीन समाजाला मान्यता देत नाहीत. डॉ.आंबेडकरांचा नेहरूंप्रमाणेच राज्य समाजवादावर विश्वास होता. असे दिसते की डॉ. आंबेडकरांना त्यांच्या सामाजिक-आर्थिक तत्वज्ञानाची प्रेरणा फेबियन समाजवादी विचार यांच्याकडून मिळाली आहे.डॉ. आंबेडकर गांधीवादी अर्थव्यवस्थेच्या विरोधात अधिक बोललेले दिसतात. "त्यांच्या मते, गांधीवाद केवळ वर्गभेदावरच समाधानी नाही, तर तो वर्णव्यवस्थेवरही भर देतो. तो वर्ण म्हणजे समाजाची वैदिक रचना पवित्र मानतो, परिणामी आपली समाजसंस्था श्रीमंत-गरीब, उच्च-निम्नस्तरीय, गुरु-सेवक इ. ते पुढे म्हणाले की, लोकशाहीचा आदर्श नाकारणाऱ्या समाजासाठी गांधीवाद योग्य असू शकतो. असा समाज स्वावलंबन आणि संस्कृतीबद्दल उदासीन असू शकतो, परंतु तो समाज लोकशाही नाही. प्रथम समाजाची निर्मिती होते. काही लोक, बहुतेक लोकांसाठी आरामदायी आणि सुसंस्कृत जीवन आणि बहुतेक लोकांसाठी कठोर परिश्रम आणि गरिबीचे जीवन स्वीकारेल. परंतु लोकशाही समाजासाठी सर्व नागरिकांना आनंदी आणि सुसंस्कृत जीवन सुनिश्चित करणे आवश्यक आहे. "आंबेडकरांचा वरील विचार गांधींच्या जातीवर आधारित वर्ण व्यवस्था विरोधी असण्याची शक्यता आहे. गांधींच्या सर्वोदय समाजाकडे केवळ परंपरेच्या ओढीनेच दुर्लक्ष केले गेले आहे. 'गांधीजींनी वर्णव्यवस्थेचे मूळ रहस्य उलगडून दाखवले होते आणि "वर्णव्यवस्थेचा जातिव्यवस्थेशी जवळचा संबंध नाही किंवा तिच्यात उच्च किंवा नीच प्रवृत्तीही नाही' हे वैश्विक सत्य उघड केले होते. गांधी पुढे म्हणतात की जातिव्यवस्थेतील श्रम विभागणीला उच्च आणि नीच या दृष्टीने पाहू नये. त्यापेक्षा जो जातीवर आधारित श्रमधर्म पाळतो तोच श्रेष्ठ.

सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी डॉ.आंबेडकर राज्य समाजवादाचे समर्थन करतात. मात्र, डॉ. आंबेडकरांना हुकूमशाहीच्या बळावर राज्य समाजवाद प्रस्थापित करायचा नव्हता.डॉ.आंबेडकर व्यक्तीस्वातंत्र्याबद्दल जागरूक होते, म्हणूनच ते संसदीय लोकशाहीचे समर्थन करतात ज्यामध्ये राज्य समाजवाद संविधानाच्या नियमांनुसार आहे, जेणेकरून संसदीय बहुमताला ते निलंबित करणे, बदलणे किंवा रद्द करणे शक्य होणार नाही.

**संदर्भ ग्रंथसूची :**


1) नलिनी पंडित - गांधी
2) नलिनी पंडित - आंबेडकर
3) डॉ. रावसाहेब कसबे - गांधी
4) डॉ. रावसाहेब कसबे - आंबेडकरवाद : तत्व आणि व्यवहार
5) डॉ. रावसाहेब कसबे - मार्क्स आणि आंबेडकर
6) सरदार गंगाधर - गांधी आणि आंबेडकर
7) डॉ.भास्कर भोळे - डॉ. आंबेडकरांचा वैचारीक वारसा
8) म.द.देशपांडे - डॉ. आंबेडकर यांचे राजकीय विचार
9) शरद पाटील - मार्क्सवाद : फुले -आंबेडकरवाद
10) शंकर जावडेकर - गांधीवाद
11) वा.ना.कुबेर - डॉ. आंबेडकर : विचारमंथन

# योगा आणि भारत

**श्री. विवेक विनायकराव कुलकर्णी**

जिल्हा परिषद शाळा आवलगाव ता. घनसावंगी जिल्हा जालना.

"धर्मार्थकाममोक्षणामारोग्यं मुलमुत्तमम" म्हणजेच धर्म, अर्थ, काम, मोक्ष. ह्या चतुर्विध पुरुषार्थांना सिद्ध करण्यासाठी सर्वतो भावनेने अर्थात सर्वांगाने स्वस्थ असणे आवश्यक आहे.

जर शरीरच रोगी असेल तर सुख शांती आनंद कसे प्राप्त होणार? जरी धन, वैभव, ऐश्वर्य. कुटुंब नाव यश कीर्ती प्राप्त असेल परंतु शरीर स्वस्थ नसेल तर जीवनच भार बनते, ज्यांचे शरीर व मन स्वस्थ नाही. मस्तिष्कामध्ये चेतना, देहात स्फूर्ती तथा नसांमध्ये शक्ती नाही, शरीरात रक्ताभिसरण ठीक होत नाही , अंग- प्रत्यांगसुदृढ नाही स्नायुंमध्ये बाल नाही ते मानवी शरीर मेलेलंच म्हटले जाईल .

मानवी जीवनात निरोगी देह व स्वस्थ मन प्राप्त करण्यासाठी भारताने जगाला देलेली एक अनमोल भेट म्हणजेच 'योगशात्र' ह्या अनमोल भेटीचा जगांच्या पाठीवरील जो- जो व्यक्ती योग्य वापर करून घेयील तोच आजच्या या अतिशय गढूळ वातावरणात सहज तग धरून राहू शकेल यात तिळमात्र शंका असण्याचे कारण नाही.

**आमंकुम्भं इवाम्भस्या जीर्णमाण: सदा घट:।**

**योगानलेन संदह्य घटशुद्धी समाचरेत।**

आपल्या या शरीराला योगशास्त्रात घटाची उपमा दिली आहे. जसा चांगला न भाजलेला वा कच्चा मातीचा घट पाण्यात ठेवला असता सहज विरघळून जातो तसंच हे शरीरही या संसाररूपी सागरात विरघळून जाईल. ते अजिबात टिकणार नाही, त्य्मुलेच या शरीराला योगरूपी भट्टीत भाजून शुध्द, पक्के करण्यासाठी जगातील प्रत्येक व्यक्तीला भारताने ह्या योगशास्त्राची कवाडे उघडी करून दिलेली आहेत.

मध्यंतरी आलेल्या कोरोनारूपी सांसर्गिक आजाराने अक्षरशः ठीमान घातले होते. यात जगातील जवळपास साडेतीन लक्ष ( 3,50,000/- ) निष्पाप लोकांनी आपला जीव गमावला. आता कोरोना येऊन गेला, पुन्हा कुठला तरी संसर्ग येई, असे काही ना काही संभाव्यधोके येताच राहतील आणि त्यासोबतच आपले जीवजयापन आपल्याला करावेच लागेल, परंतु ते उत्तमरित्या स्वास्थ टिकवायचे असेल तर एकमेव आणि सोपा मार्ग म्हणजे 'योगासने व प्राणायाम' आणि सोपा मार्ग जगातील अनेक देशांनी आता स्वीकारला आहे.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या ( UNO) च्या बैठकीत भारताचे सन्माननीय लाडके पंतप्रधान मा. नरेंद्र मोडी यांनी 11 डिसेंबर 2014 रोजी योगासाठी "आंतरराष्ट्रीय योगा दिवस" साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला. व जगातील 175 देशांनी यास पाठिंबा दर्शवत दरवर्षी '21 जून' हा 'आंतरराष्ट्रीय योगा दिवस म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली. तेव्हापासून आंतरराष्ट्रीय योग दिन हा जगाचा अतिशय महत्वपूर्ण दिवस म्हणून साजरे होत आहे.

'योगा' चे फायदे व त्याप्रती भारतीयांचे असणारे समर्पण पाहून जगाच्या नजरेत भारताची एक 'मार्गदर्शक' तथा गुरु म्हणून अत्यंत उजळ प्रतिमा बनली आहे. परंतु 2014 पूर्वी भारतीयांनाच योगाचे पाहिजे तसे महत्व तथा फायदे काय आहेत? याबाबत माहिती नव्हते. कोरोनानंतर तर जग झपाटयाने बदलते असून भारताने दिलेल्या या अनमोल देण्गीप्रती जग कृतज्ञतेची भावना व्यक्त करत आहे आणि हे शक्य झाले ते केवळ मा. नरेंद्र मोदी यांच्या दूर दृष्टीमुळे. भारताच्या या पुढाकारामुळे जागतिक आरोग्य संघटनेने केली उत्तम आरोग्याची व्याख्या 'Health is a state of complete physical mental ,social well- being not merely absence of disease or infirmity' तसेच physical, mental, spiritual, Intellectual, Emotional ,social Health याचाच अर्थ असा कि शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक, आध्यात्मिक व सामाजिक स्वास्थ असणे म्हणजेच संपूर्ण निरामय अवस्था होय.

**भारतीय योगशास्त्राच्या मते**

**सर्वमेव परित्यज शरीरमनुपाल्येत ।**
**शरीरस्य प्रंणष्टस्य सर्वमेव विनश्यति ।**

सर्व गोष्टीचा त्याग करून प्रथमतः शरीराचे रक्षण करणे, पालन करणे हेच सध्याच्या काळातले आव्हान आहे. कारण शरीर नष्ट झाले तर सर्वच गोष्टीचा नाश होतो, म्हणूनच आरोग्याचे महत्व फार मोठे आहे. घरातील, समाजातील, गावातील, देशातील आणि आता जगातील देखील प्रत्येक व्यक्ती हा आरोग्यपूर्ण आसला पाहिजे कारण केवळ स्वतः निरोगी असून चालत नाही आणि भारतीय लोक सदेव '**वसुधैव कुटुंबकुम**' हि संकल्पना अंमलात आणणारी आहेत आणि 'योगशास्त्र' हि शास्त्रीय शक्ती यासाठीच भारतीयांना भगवंताने दिलेली आहे.

सामाजिक स्वास्थ निकोप असेल तरच समाजात निरोगी, निरामय श्रृंखला कार्यान्वित राहू शकेल आणि त्याचा परिणाम समाजाच्या मानसिक स्वास्थावर घडून येतो, म्हणूनच अष्टांग योग मार्गात प्रथम स्थान यम-नियमांना दिलेले आहे कारण एखादीच व्यक्ती बॉम्बस्फोट घडवून आणते आणि परिणाम सर्व टाळायचे असेल तर प्रत्येका पर्यंत 'योग' पोहचवणे ही काळजी गरज आहे आणि आपले मा. पंतप्रधान यांनी गेल्या 9 वर्षात हा प्रयत्न प्रामाणिकपणे जगभरात करत आहेत.

आजच्या समाजात आपण वावरत असताना आपल्याला समाजाची नीतिमत्ता खूपच ढासळलेली आढळून येते आणि म्हणूनच 'योग' आज पूर्ण संपूर्ण आरोग्य देण्यास समर्थ आहे. आज कुटुंबव्यवस्था आमुलाग्र बदललेली असल्यामुळे त्याचाही परिणाम मुले, वृद्ध यांच्या हातून त्यांचेही मानसिक स्वास्थ धोक्यात आलेले आहे, कुटुंबातील व्यक्ती-व्यक्तीतील सबंध दुरावत चालले असल्याने प्रेम, आस्था, दया, करूणा, माणूसकी यांचा अभाव होत असून मानवाच्या भावनिक गरजा भागत नसल्याचे दिसून येत आहे अर्थात यावर एकच उपाय आहे तो म्हणजे 'योग व प्राणायाम' ज्यातून भावनेतील संवेदनशीलता वाढून एकमेकांबददल प्रेम-आदर निर्माण करण्याचे काम विनासायास योगातुनच घडवून आणता येते.

मानवाच्या सर्व आटापिटा हा हेतुपूर्वक सुख व आनंदाच्या शोधात आहे आणि हे सुख काय असेल तर ते म्हणजे निरोगी राहील यापुढील काळात विविध आजारांसोबत आपल्याला जगायचे असेल तर आपली ढाल म्हणून 'योगासनांचा' वापर हा जगातील प्रत्येक व्यक्ती करू शकतो.

म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की 'करा योग रहा निरोग'

किंवा

। **जो करेगा योग हमेशा**
**उसे नही छुयेगी निराशा** ।

# खानदेशातील साहित्यिक : एक दृष्टिक्षेप

**प्रा. डॉ. अरुण डी. मोरे**

मराठी विभाग, पंकज कला व विज्ञान महाविद्यालय, चोपडा जि. जळगाव

खानदेशाची भूमी ही अतिशय पवित्र अशी भूमी आहे.या भूमीला अतिशय चांगला ऐतिहासिक , भौगोलिक, सामाजिक, भाषिक,व साहित्यिक वारसा लाभलेला आहे.खानदेशातील अहिराणी भाषेचा गोडवा सर्वानाच आपलेसे करणारा आहे.खानदेशातील

अनेक साहित्यकांचे साहित्य मनात पिंगा घालणारे आहे. खानदेशातील बालकवी, बहिणाबाई चौधरी, भालचंद्र नेमाडे, त्र्यंबक सपकाळे, वाहरु सोनवणे, अश्या अनेक कवींच्या कविता भाषेच्या माध्यमातून समृद्ध झाल्याचे दिसून येते. बहिणाबाई चौधरी यांच्या कविता भौगोलिक, भाषिक,व सामाजिक दर्शन घडवितात. त्या काळातील एक पट आपल्या डोळ्यासमोर त्यांच्या कवितेतून उभा राहतो.संसार कवितेतून त्या म्हणतात,

'अरे संसार संसार
जसा तवा चुल्ह्यावर
आदि हाताला चटके
मग मिळते भाकर '

बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांवर लेवा पाटीदार बोलीभाषेचा प्रभाव पडलेला दिसून येतो.बहिणाबाई आपल्या कवितेतून शेतकरी आणि त्याचे जीवन चित्रीत करतात. शेतकऱ्यांना आपले सारे दैव शेतात येणाऱ्या पिकावर अवलंबून असतात.बहिणाबाई सुद्धा आपल्या कष्टाच्या शेतकरी जीवनात पुर्णपणे रममाण होतात. त्या कापणी कवितेत म्हणतात,

'काप काप माझ्या इय्या
आली कापनी कापनी
याप लागली पिकाची
आली डोयाले झापणी '

उपननी सुरु होते तेव्हा तिव्हारीवर उभे राहून त्या वा-याला विनंती करतात.

चल येरे येरे वा-या
येरे मारोतीच्या बाप्पा
नको देऊ रे गुंगारा
पु-या झाल्या तुझ्या थापा

बहिणाबाई चौधरी आपल्या कवितेतून अचूक पध्दतीने प्रतिमा प्रतिके मांडतात.मनाचे वर्णन सुध्दा त्या सुक्ष्म पध्दतीने करतात.

' मन वढाय वढाय
उभ्या पिकातील ढोर
किती हाकला हाकला
फिरी येस पिकावर '

फ्राईड या मनाच्या विश्लेषण करणाऱ्या अभ्यासका सारखाच बहिणाबाईचा काव्य विचार लाख मोलाचा दिसून येतो.यातून नवा विचार समोर येतो बहिणाबाई काव्य अजरामर आहे. भालचंद्र नेमाडे यांचे साहित्य सुध्दा अतिशय चांगल्या प्रतीचे आहे. त्यांच्या कोसला, बिढार, जरीला, झूल हिंदू, मेलडी, देखणी, साहित्याची भाषा, ललित लेख, हे सर्व

साहित्य त्यांच्या भाषा वैभवामुळे समृद्ध झाले आहे.भालचंद्र नेमाडे यांनी आपल्या कादंबरीत तील सर्वच पात्रे जिवंत केले आहेत ते त्यांच्या भाषाशैलीमुळेच त्यांच्या कादंबऱ्यातील कथानक वाचकांना बांधून ठेवते.एकूणच त्यांच्या कादंबऱ्यांवर सुध्दा भाषेचा परिणाम जाणवतो. वाहरु सोनवणे हे खानदेशातील नव्या उमेदीचे व घाटणीचे कवी आहेत.त्यानी आदिवासींचे दुःख दारिद्र्य कष्ट त्यांची फाटके तुटके जीवन त्यांनी त्यांच्या काव्यातून चित्रित केले आहे. कौटुंबिक जीवनामध्ये होणारे ससेहोलपट, चळवळीमधील कार्यकर्ता असल्यामुळे चळवळीमध्ये निर्माण होणारे प्रश्न त्यांनी ज्वलंतपणे आपल्या काव्यातून उभे केले आहे. वारू सोनवणे यांनी 'स्टेज 'या कवितेतून एक ज्वलंत प्रश्न उभा केला आहे ते म्हणतात

'आम्ही स्टेजवर कधी गेलोच नाही<br>
आणि ते स्टेजवर उभे राहून-<br>
आमचे दुःख आम्हाला सांगत राहिले'

आदिवासी समाज नेहमीच उपेक्षित राहिला आहे. आदिवासींच्या समस्या केवळ स्टेजवर बोलून सुटणार नाहीत नेहमीच त्यांच्या भावनांचा खेळ होत आला आहे. त्यांचे दुःख समजून न घेता केवळ स्वार्थासाठी, राजकारणासाठी त्यांचा वापर होत आलेला आहे. त्यांच्या प्रश्नावर समस्यांवर समाधानाने उत्तरे न देता त्यांनाच दम देऊन माफी मागायला लावणे हा प्रकार दांभिक राजकारणी करत आहेत. त्यांचे दुःख जाणून न घेता आणि कधी अनुभवायला देखील आले नसलेले दुःख त्यावर भाष्य करणे म्हणजे कवीला खोटा दांभिकपणा वाटतो. कवी वाहरू सोनवणे हे आदिवासी चळवळीतले कार्यकर्ता असल्याने त्यांच्या रक्तातच चळवळ असल्यामुळे चळवळीची व्याख्या चळवळ म्हणजे या कवितेतून सांगतात,

' चळवळ म्हणजे काही<br>
दोन पाच दिवसाची जमा नव्हे<br>
की नदीला आलेला पूर नव्हे '

चळवळ म्हणजे अखंड चालत राहणारा प्रवाह माणुसकीच्या गाभ्याला तो विकसित करत जाणारा प्रवाह असतो. तो कधीही न थांबणारा असतो. कारण चळवळीच्या माध्यमानेच आदिवासी बांधवांचे प्रश्न सुटतील आदिवासींच्या प्रश्नांना बोलते करणारी ही कविता प्रखरपणे जाणवते कारण आदिवासी शब्दांचा बाज तिचे लेणे आहे. आदिम काळापासून आदिवासींच्या समस्या सोडवण्याचा कुणीच प्रयत्न केला नाही त्याचे चित्रण 'गोधड' या कवितेतून येते,

'माझी फाटकी गोधड मळलेली<br>
गोधडीतल्या गोधडीत<br>
गुदमरत राहिलो<br>
याच गोधडीत पूर्वज विझत गेले<br>
अश्रूंनी गोधड भिजत गेली'

कवीचे पूर्वज याच दुःख दारिद्र्यात संपले आणि आदिवासी बांधवांची परिस्थिती आजही तशीच आहे.ही शोकांतिका अतिशय प्रभावीपणे वाहरु सोनवणे यांनी मांडली आहे. कवी त्र्यंबक सपकाळे विद्रोही दलित कवी आहेत. त्यांचे सुरंग आणि ब्रोकन मॅन हे दोन काव्य संग्रह आहेत. त्यांचे संवेदनशील मन दलित दुःखाच्या आविष्काराबरोबर चीड ,त्वेष,खेद, क्रोध त्यांच्या कवितेतून जाणवते. जीवनाच्या वेदनेतून विद्रोहाचा जन्म होत असतो.देशाला स्वातंत्र्य मिळाले पण आपल्याला स्वातंत्र्य कोठे आहे? असे अनेक प्रातिनिधिक प्रश्न निर्माण होताना दिसतात.आणि त्या प्रश्नांचा विचार करतांना कवी अस्वस्थ होतात

' पण इथेही नागवला गेलो<br>
समाज पुरुषाच्या अहंकाराने

हे संस्कृतीप्रिय देशा
माझा नागडेपणा कधी झाकताच आला नाही '

कवी त्र्यंबक सपकाळे यांच्या सुरुंग काव्यसंग्रहातील 'गाडी लागनी माल्हे गाडी लागणी' या अहिराणी भाषेतील कवितेत कवीने म्हटले आहे

'गाडीमा झायी गर्दी दाट
तव्हं पडनी तूनी मनी गाठ
गप्पा थोड्या इकडतिकडण्या
पंचायती पंचायत राजन्या
पक्षापक्षाच्या जाहिरनामा
वैताग येईसन तू बोलना
राजकारणी लोकसनी पाडा पायंडा'

रेल्वे प्रवासात अनोळखी प्रवासी माणसांशी गप्पा मारतो.पंचायत, पंचायत राज, पक्ष जाहीरनामा असे विविध विषय निघतात.आणि ते सर्व विषय विचार करायला लावणारे आहे. कवी सपकाळे आपल्या एका कवितेत अस्मितेला का म्हणून गहाण टाकायचे ते सोडले पाहिजे.म्हणून म्हणतात

'लाचारी लाही
सीमा असते
येऊ दे तुला
तुझ्याच जिण्याचा
तिरस्कार '

कवी त्र्यंबक सपकाळे यांची भाषाशैली अतिशय चपखल आहे. त्यांच्या 'डोळे' या ' कवितेतून तिरस्काराची भावना कशी होते ते प्रस्तुत कवितेतून सांगितले आहे

'पाय पडता
गावात माझे
रोखले गेले
तिरस्काराने
असंख्य डोळे '

कवीच्या सर्वच कविता या मनाच्या ठाव घेणाऱ्या आहे. वास्तवावर प्रकाशझोत टाकणारी आहे. विषमता धिष्ठित समाज व्यवस्थेने दलितांना दु:ख यातना वेदना बहाल केल्यामुळे दलित समाज आक्रोश करु लागला आहे. एकूणच खानदेशातील कवींच्या कविता या अतिशय संवेदनशील आहे. विचार करायला प्रवृत्त करणा-या आहेत. एक वेगळा विचार एक वेगळी भावना त्यांच्या कवितांतून जाणवते भाषा तर अतिशय समृद्ध आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

१) डॉ.भिरुड प्रमिला - बहिणाबाईची गाणी एक अभ्यास
२) चौधरी स्नेहलता - भूमिकन्या बहिणाबाई चौधरी एक चिंतन कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
३) सुचित्रा चौधरी- बहिणाबाईची गाणी , सुचित्रा प्रकाशन, मुंबई
४) भालचंद्र नेमाडे - कोसला
५) देखणी - भालचंद्र नेमाडे
६) वाहरु सोनवणे -गोधड , सुगावा प्रकाशन पुणे , मार्च २००६
७ ) त्र्यंबक सपकाळे - सुरुंग

# मराठी साहित्यातील बदलते प्रवाह.

**प्रा. सुखदा सदाशिव - हाटवळ**
यशवंतराव चव्हाण ( के.एम.सी) महाविद्यालय कोल्हापूर.

**प्रस्तावना:**

भाषा हे संप्रेषणाचे प्रमुख साधन आहे. भाषा जरी एक असली तरी प्रत्येकाच्या भाषणाची शैली बोलण्याची पद्धती वेगळी वेगळी असते. भाषा एक व्यक्त होण्याचे महत्त्वाचे साधन आहे. मग ती मौखिक किंवा लिखित स्वरूपात प्रकट होत असते. मराठी भाषेत साहित्याची फार जुनी परंपरा आहे. मराठीमध्ये साहित्याचे अनेक प्रकार पाहाव्यास मिळतात. नाटक, कथा, कादंबरी, कविता, आत्मचरित्र, चरित्र, ललित, गद्य इत्यादी अनेक साहित्य प्रकारांनी मराठी साहित्यामध्ये मोलाची भर टाकली आहे. संत पंत आणि तंत यांची सुद्धा या साहित्याची सुद्धा मराठीला उत्कृष्ट परंपरा लाभलेली आहे. हळूहळू कालानुसार यामध्ये बदल होत गेले आणि साहित्यामध्ये वेगवेगळे प्रवाह दिसू लागले. या बदलत्या साहित्याचा मानवी जीवन हा महत्त्वाचा घटक होता. नवीन युगामध्ये दबलेल्या दडपलेल्या थरातील लोकांना लेखकांना जाग आली आणि या युगाचा मी साक्षीदार आहे. या भावनेने लेखक लिहू लागली सर्वसामान्य माणूस हाच त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू होता . त्याच्याभोवतीच सर्व साहित्य फिरत होते. लेखक ज्या प्रदेशात जन्मला वाढला तो प्रदेशही साहित्यात चित्रीत करण्याचा प्रयत्न होत आहे.

**अभ्यास पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. बदलत्या राहणीमानाचे यांत्रिकीकरणाचे आधुनिकीकरणाचे साहित्यावरही परिणाम झालेले दिसतात. त्या परिवर्तनाचे स्वरूप या निबंधामध्ये स्पष्ट केलेले आहे.

**उद्देश:**

१) बदलत्या साहित्य प्रवाह बद्दल माहिती करून देणे.

२) नवीन साहित्य प्रवाहातील साहित्याचे हेतू संकल्पना स्पष्ट करणे.

**नव साहित्याची प्रेरणा:**

आपल्या भावना आपले विचार आपले अनुभव सर्वांपर्यंत पोहोचवणे ही साहित्यामागील प्रमुख प्रेरणा होती. आपले प्रश्न आपल्याला होणारा त्रास वेदना सर्वांसमोर साहित्यातून व्यक्त करणे. समाजातील उपेक्षित घटक त्यांच्यावर होणारा अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी साहित्य निर्माण झाले. समाजातील विविध कर्तुत्वान कर्तबगार व्यक्तींची ओळख पूर्ण समाजाला व्हावी यासाठी चरित्रात्मक साहित्य निर्माण झाले. सामाजिक प्रश्न आर्थिक प्रश्न कौटुंबिक प्रश्न यावर विचार विनिमय होण्यासाठी साहित्य निर्माण झाले. काही लेखक आवड छंद म्हणून सुद्धा साहित्य निर्मिती करतात.

सामाजिक समाजातील बदलत्या जाणीवानुसार साहित्य निर्मिती होऊ लागली. वाहतूक दळणवळणाच्या साधनांचा विकास झाला त्यामुळे प्रवासाची सोय झाली पर्यटन क्षेत्राचा विकास झाला आपण जे पाहिले जे अनुभवले ते वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी लेखक लिहू लागले. शिक्षणाचा प्रसार वेगाने झाल्याने येथेही लक्षणीय वाढ झाली. नवनवीन लेखकांना लिहिण्याची संधी मिळाली आणि ते लिहिण्यास प्रवृत्त झाले. साहित्यिकांना अनुदान मिळू लागले पुरस्कार मिळाला लागले त्यांच्यासाठी अनेक सोयी सवलती शासनाने दिल्या ही प्रेरणा लिहिण्यामागे होती. आज-काल साहित्य संमेलन सुद्धा साहित्यिकांना खूप प्रोत्साहन देताना दिसतात. नवनवीन साहित्यिकांना व्यासपीठ मिळवून देण्याचे कार्य या संमेलनांकडून होते.

**साहित्य प्रवाहांचे बदलते स्वरूप:**

1920 नंतर साहित्य प्रवाहामध्ये अमुलाग्र बदल होऊ लागले. जानपद साहित्य, प्रादेशिक साहित्य, ग्रामीण साहित्य, दलित साहित्य असे प्रवाह साहित्य मध्ये येऊ लागले. 1970 नंतर साहित्य क्षेत्रात तरुण पिढी लिहू लागली. शोषित आणि शोषक वर्गातील अंतर त्यांना जाणवू लागले. स्वातंत्र्याच्या आड येणारे अडसर त्यांना जाणवू लागले, त्यांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील नवविचार खुणावू लागले. त्यांच्या विचारांना धारदारपणा प्राप्त झाला आणि त्यातून दलित साहित्याचा जन्म झाला. समाजातील उपेक्षित शोषित घटकांना भान आले ते माणूस म्हणून जगण्यासाठी धडपडू लागले त्यांचा वेदनेचा हुंकार साहित्यातून दिसू लागला.

नव्या जाणिवांसह पुरोगामी साहित्य म्हणून नव साहित्याची निर्मिती होऊ लागली. या नव्या जाणीवा नव प्रवृत्ती फक्त असे आणि अविष्कारा पूर्वी मर्यादित न राहता त्या विस्तृत होऊ लागला. शब्द, भाषा ,अभिव्यक्ती, अनुभव, जीवन पध्दतीमध्ये अमुलाग्र बदल दिसून येऊ लागली.

जागतिकीकरणाच्या परिणामातून अनेक समस्या निर्माण झाल्या. या समस्येतून लेखनाचे असे विषय स्वरूप बदलले वाढते उद्योगधंदे यात्री यांत्रिकीकरण बदलते. मानवी जीवन यामुळे निर्माण झालेल्या समस्या साहित्याचा विषय बनल्या. प्रयोगशील वृत्तीतून अनेक लेखक लिहू लागली. आणि त्यातूनच नव साहित्याचे अनेक प्रवाह निर्माण झाले. या साहित्य निर्मिती मागील प्रत्येक लेखकाचे प्रयोजन वेगळे वेगळे असले तरी समाज परिवर्तन हा एक मुख्य हेतू असल्याचे दिसून येते.

थोडक्यात काय तर जसा काळ तसे लेखन या तत्त्वानुसार त्या त्या काळचे जीवन हीच साहित्याची प्रेरणा बनली आहे.

**नव साहित्यातील विविध प्रवाह:**

**(१) आदिवासी साहित्य प्रवाह**

दुर्गम भागात जंगलात दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या लोकांना आदिवासी असे म्हटले जाते. त्यांना भारतीय घटनेनुसार अनुसूचित जमाती म्हणूनही ओळखले जाते. सह्याद्री आणि सातपुडा प्रांतात एकूण अशा आदिवासी समाजाच्या 47 जमातीचे वास्तव्य आहे.

शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे आदिवासी समाजातील तरुण पिढी शिकत आहे. स्वतःच्या स्थितीचे त्यांना भान आले आहे. जुन्या रूढी परंपरा नाकारून नवी पिढी नवीन मूल्य जोपासत आहे. त्यांना जगताना जाणीवणाऱ्या जाणवणाऱ्या समस्या ते लिहू लागले आहेत. त्यांच्या जीवन जाणिवा अधिक ठोकदार विद्रोही व नवनिर्मिती क्षम बनू लागले आहेत. प्रखर वास्तवाला सामोरे जाताना त्यांना भोगावे लागणार दुःख वेदना दयनीय त्यांची दैनिक अवस्था एक दुर्लक्षित समाज म्हणून रोज वेगवेगळ्या समस्यांना द्यावे लागणारे तोंड यामुळे त्यांची ही वेदना साहित्याच्या रूपाने प्रकट होऊ लागली आहे.

1960 नंतर खऱ्या अर्थाने साहित्यात आदिवासी साहित्य प्रवाह आल्याचे दिसते. या साहित्याला मौखिक परंपरा लाभलेली असून ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सहज संक्रमित झालेले दिसते. 1960 नंतर कथा कविता कादंबरी चरित्र आत्मचरित्र नाटक या साहित्य प्रकाराच्या रूपाने आदिवासी साहित्य विकसित होऊ लागले. आदिवासी साहित्य कवितेमध्ये जास्त रमलेला दिसतो भुजंग मेश्राम व प्रभू राजगडकर यांनी मोहोळ हा काव्यसंग्रह लिहिला. आदिवासी कवितेचा प्रतिनिधित्व करणारा हा कवितासंग्रह सर्वांना खूपच भावला गोपाळ कडू गंगाराम जाणू आबादी यांनी आदिवासी लोकगीते नावाचे पुस्तक लिहिले. यामध्ये आदिवासींच्या जीवनातील वेगवेगळ्या प्रसंगी म्हटले जाणारी लोकगीते खूपच सुंदर पद्धतीने लिहिली गेली आहेत. यानंतर भुजंग मेश्राम यांचा उलगुणाण, डॉक्टर गोविंद गारे यांचा अनुभूती, वाहरु सोनवणे यांचे गोंधड, वाल्मिकी शेडमाके यांचा मी उध्वस्त पहाटेचा शुक्रतारा, डॉक्टर गोविंद गारे यांचा आदिवासी मुलांची गोड गाणी अशा प्रकारचे विविध काव्यसंग्रह आदिवासी साहित्य प्रवाहामध्ये सामील झाले. आणि आदिवासी साहित्य

जास्तीत जास्त प्रभावी होऊ लागले. या कवितांमधून अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची लोकांची होती स्त्रिया स्त्रियांवर झालेला खेळ त्यांच्यावर होणाऱ्या होणारा अन्याय हा निपटून काढण्यासाठी समाजाने प्रथेला केलेला विरोध या सगळ्याचे खूप सुंदर पद्धतीने वर्णन केले आहे. समाजातील अनिष्ट चालीरीती प्रथा अंधश्रद्धा रूढी परंपरा या सर्वांना कडाडून विरोध या कवितेतून झालेला दिसतो. यानंतर वाल्या, हिरवा, कुतळ, तांडेल. दावन, वादळ इत्यादी आदिवासी जीवनावर आधारित कथासंग्रह प्रसिद्ध झाले. तसेच 1996 स*** सरकुंडे यांची वाडा ही कादंबरी प्रसिद्ध झाली . यामध्ये समाज जीवनाचे संघर्षणात्मक चित्रण प्रकट केले आहे. यानंतर आदिवासी नाटके एकलव्य, सोनेता कुर्स, आली रंगात राणी, आक्रोश, कथा इंद्रपुरुषी, इत्यादी नाटके प्रसिद्ध झाली. या नाटकातून आदिवासी समाज जीवनाचे वास्तव दर्शन घडवले आहे.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले हे आदिवासी साहित्याचे प्रेरणास्थान आहेत. निसर्गावर भरभरून प्रेम करणारे निसर्ग हाच सर्वस्व मानणारे ही जमात खऱ्या अर्थाने निसर्गपूजक आहे. पर्यावरणाचे संवर्धन करणारी ही पिढी खऱ्या अर्थाने विश्वाचे कल्याण करणारी ठरते. पण तीच समाजातील मुख्य प्रवाहापासून अलिप्त राहिलेली आपणाला पहावयास मिळते. शासनाच्या सर्व सेवा सुविधा सुविधांचा लाभ त्यांना अजूनही मिळत नाही. दुर्गम भागात राहत असल्यामुळे त्यांचे राहणीमान अत्यंत खालावलेले दिसते. त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यांची आर्थिक स्थिती बेताचीच असते. शिक्षण रोजगार आरोग्य मागासले पण या आदिवासींच्या समस्या आहेत.

आदिवासी साहित्यातून याची जाणीव सर्वांनाच झाली आहे. आदिवासी साहित्यामुळे त्यांच्या समस्यांकडे सर्व समाजाचे लक्ष वेधले गेले. आणि त्या समस्या सोडवण्यासाठी शासनही पुढे सरसावले आणि त्याचा उपयोग आदिवासी समाजाला झालेला दिसून येतो.

**(२) ग्रामीण साहित्य प्रवाह:**

1960 नंतर ग्रामीण साहित्य ही संकल्पना साहित्यामध्ये रुजू झाली. ग्रामीण साहित्यामध्ये दर्जेदार साहित्य निर्माण होऊ लागले. या निमित्ताने समग्र ग्रामीण समाजाचे दर्शन होऊ लागले. ग्रामीण भागातील निसर्ग शेती शेतीशी संबंधित व्यवसाय गावगाडा गावातील राजकारण गावातील समाज बारा बलुतेदार निसर्गसौंदर्य यांनी नटलेले ग्रामीण साहित्य सर्वांनाच भुरळ घालायला लागले. ग्रामीण साहित्य ग्रामीण वास्तव आणि कृषी संस्कृती कृषी संस्कृतीशी निगडित होते. ते सहा स्वातंत्र्यानंतर भारतीय समाजामध्ये ज्या बऱ्यापैकी संकल्पना रुजल्या जे काही परिवर्तन झाले. त्याचा परिणाम लेखकांनी साहित्यामध्ये रेखाटलेला दिसतो.

ग्रामीण भागातील भाषा, संस्कृती, सण उत्सव, समारंभ ,यात्रा जत्रा, पै पाहुणे, लग्न समारंभ, बार्शी हे त्या त्या प्रदेशातील रितीरिवाजा नुसार त्या त्या भागातील लेखकाने ग्रामीण साहित्यात आणण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक लोकांची भाषा ग्रामीण भाषा साहित्याची भाषा ठरली. हा एक वेगळाच अनुभव होता. ग्रामीण लेखकांनी त्यांना आलेले अनुभव कथन केले. तसेच आजूबाजूला घडणाऱ्या घटना आपल्या आपल्या कल्पनाशक्तीने खूप सुंदर रित्या वर्णन करून साहित्यामध्ये आणले. ग्रामीण साहित्याने कृषी संस्कृतीत वाढलेल्या माणसाच्या सुखदुःखांना वाचा फोडली. कृषी हा ग्रामीण साहित्याचा केंद्रबिंदू होता. शेतकऱ्यांच्या समस्या, शेतकऱ्यांना भोगावे लागणारया यातना शेतकऱ्यांचा मागासलेपण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शेतकऱ्यांचा संसार, शेतकऱ्यांचा शेतीविषयक असणारे प्रेम, गाव गाडा, शेतकऱ्याची मुलं, शेतकऱ्याची जनावर ,गुरांचा गोठा, शेताचा बांध, पाऊस, मजूर, नांगरणी, पेरणी, भांगलन या साऱ्याचे चित्र ग्रामीण साहित्यामध्ये खूपच वास्तव रीतीने मांडलेले दिसते. ग्रामीण साहित्यात लोकसाहित्याचाही समावेश झालेला दिसतो. कारण येथील ग्रामीण समाज तिथे असणारे वेगवेगळे समारंभ त्यानिमित्ताने मौखिक स्वरूपात होणारा अविष्कार हा लोकसाहित्याच्या रूपाने ग्रामीण साहित्यामध्ये उतरताना दिसतो.

**स्त्रीवादी साहित्य:**

स्वातंत्र्यानंतर स्त्री चूल आणि मूल या बंधनातून बाहेर पडली. आणि आपले स्वतःचे अस्तित्व शोधू लागली. सावित्रीबाई महात्मा फुले यांच्या प्रेरणेने समाजामध्ये स्त्री शिक्षणाचा जागर निर्माण झाला. आणि त्या पुढील काळामध्ये स्त्रिया शिक्षण घेऊ लागल्या शिक्षणामुळे स्त्रियांना स्व अस्तित्वाची जाणीव निर्माण झाली. ती स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी धडपडू लागली समाजातील अनिष्ट चालीरीती, जाचक बंधने अंधश्रद्धा यांच्या वरती प्रहार करू लागली. यातूनच स्त्रीवादी साहित्याचा नव प्रवाह निर्माण झाला. या साहित्यातून स्त्रियांनी स्वतःवर होणाऱ्या अन्यायाची समाजाला जाणीव करून दिली. प्रस्थापितांविरुद्ध बंड पुकारले आणि स्वतःच्या क्षमतेची ओळख करून दिली. पुरुषांचे वर्चस्व नाकारून सर्व बंधनातून मुक्त होऊन स्त्री स्वतःचे अस्तित्व सिद्ध करू लागली ती या साहित्यातूनच. संजीवनी मराठे, लक्ष्मी बाई टिळक, बहिणाबाई चौधरी, अश्विनी घोंगडे, प्रभा नवरकर, हेमा लेले, असावरी काकडे, अंबिका सरकार, आशा बगे, सानिया, वसुंधरा पटवर्धन, गौरी देशपांडे, प्रिया तेंडुलकर अशा कितीतरी स्त्री लेखिका आपल्या वेदना आपले विचार साहित्यातून मांडत आहेत. आज कालची स्त्री तरी बाईपणाच्या सर्व भूमिकेतून बाहेर पडली आहे. आणि ती पुरुषाची जबाबदारी सुद्धा तेवढ्याच ताकतीने स्वीकारताना दिसत आहे. याचे सर्वस्वी महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, आंबेडकर यांना जाते.

**दलित साहित्य प्रवाह :**

भटक्या जमाती, तमासगीर, हातभट्टी, झोपडपट्टी, स्त्रियांवरील अत्याचार, फासेपारधी,  अस्पृश्यांवर होणारे अन्याय, आदिवासी दलितांमधील गटबाजी हे दलित साहित्याचे विषय असतात. दलित साहित्यामध्ये दलित आत्मकथनाचा फार मोलाचा वाटा आहे. उदाहरणार्थ तराळ अंतराळ - शंकरराव खरात , अक्करमाशी - शरण कुमार लिंबाळे, बलुतं - दया पवार, आठवणीचे पक्षी – प्र.ई.सोनकांबळे, गबाळ - दादासाहेब मोरे, उपरा - लक्ष्मण माने, कोल्हाट्याचं पोर - किशोर काळे, जिन आमचं - बेबी कांबळे ही दलित आत्मकथने म्हणजे पर्यायाने लेखकांच्या जातीच्याच कथा असतात.

दलित साहित्य मानव मुक्ती स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय यांचा पुरस्कार करते. दलितांच्या मनात आत्मविश्वास आत्मसन्मान जागृत करण्याचे काम करते. या साहित्यामध्ये क्रांतीचा आणि परिवर्तनाचा विचार मांडलेला आहे. दलित साहित्यातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान मोठ्या प्रमाणात आलेले दिसून येते. केवळ समाज सुधारणा म्हणजे अस्पृश्यता नष्ट झाली असे नाही तर समाजाचे सर्वांगीण परिवर्तन झाले पाहिजे त्यासाठी राजकीय, सामाजिक ,सांस्कृतिक व मानसिक स्तरावर बदल घडणे आवश्यक आहे.अशी दलित साहित्याची भूमिका होती. दलित साहित्य अज्ञान ,दारिद्र्य, शोषणाविरुद्ध ,वर्णव्यवस्थेविरुद्ध आवाज उठवते. ते माणसालाच केंद्रबिंदू मांनते.

दलित साहित्याने एकूणच मानवाला स्वतःचे हरवलेले स्थान शोधण्यास उमेद दिली. उपेक्षितांमध्ये संघर्षाची नवी ताकद निर्माण केली. माणूस म्हणून जगण्यास शिकवले. जुन्या रुढी, परंपरा, दारिद्र्य ,जातीसंस्था, वर्ण व्यवस्था हे सर्व नाकारून स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी बंड पुकारण्यास तयार केले. यातूनच दलित साहित्य विद्रोहाची, समाज व्यवस्थेविरुद्धची भूमिका घेताना दिसते.

**नव साहित्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील :**

- मानवी जीवनाचा संपूर्ण अविष्कार साहित्यातून प्रकट होताना दिसू लागला आहे.
- समाजातील प्रत्येक चांगला वाईट विषय साहित्यामध्ये आला.
- नव्या जाणिवा आधुनिकता यांत्रिकीकरण, बदलता मानव बदलते नातेसंबंध, बदललेली जीवनमूल्ये याचा विचार साहित्यामध्ये प्रकर्षाने केला जातो.
- मांडवाच्या इच्छा आकांक्षा असहयता अगदीकता विद्रोह पराभव वेदना इत्यादी अविष्कार साहित्यामध्ये दिसू लागले आहेत.

- नव साहित्यामध्ये लेखक साहित्याचे निरनिराळे प्रकार हाताळताना दिसत आहेत. उदाहरणार्थ कविता कथा कादंबरी वैचारिक निबंध चारोळी चरित्र आत्मचरित्र ललित गद्य इत्यादी.
- नव साहित्यातून देखील पूर्वीसारखीच विविध रसांची उधळण होताना दिसत आहे.
- रंजक आकर्षक आणि दर्जेदार साहित्य निर्मिती होत आहे.
- समाज विद्रोही वर्तन याविषयी साहित्यातून आवाज उठवलेला दिसतो.
- वंचित समाज उपेक्षित माणूस त्यांना भोगावे लागणारे दुःख त्यांच्या समस्या याची नव साहित्य प्रकर्षाने दाद घेते .
- गरीब श्रीमंत स्त्री पुरुष शहरी ग्रामीण पुरोगामी प्रतिगामी राजकारणी आणि जनता अशा अनेक पातळीवरील संघर्ष साहित्यामध्ये उमटू लागले आहेत.
- नवसाहित्य ठीक भावनाप्रधान नसून विचार प्रधान असल्याचे साहित्यातून स्पष्ट जाणवते.
- नव साहित्य वास्तवाचे दर्शन घडवते.
- समाजातील तळागाळातील व्यक्तींची दुःखे यातना समस्या यांच्या विरुद्ध नवसाहित्य आवाज उठवते.

**निष्कर्ष:**

साहित्य हा समाज परिवर्तनाचा आरसा असतो. बदलत्या सामाजिक आर्थिक भौगोलिक नैसर्गिक परिस्थितीचा साहित्यावर परिणाम झालेला दिसतो. आधुनिक काळामध्ये साहित्याने नवनवीन रूपे धारण केली आहेत. गरजेनुसार कालमानानुसार परिस्थितीनुसार साहित्याने बदल स्वीकारलेला दिसत आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला स्व अस्तित्वाची जाणीव होत आहे. यातूनच स्वतःवर होणारा अन्याय जुलूम कुचुंबडा व्यक्ती साहित्यातून मांडू लागला. आणि साहित्यामध्ये विविध प्रवाह उदयास आले. याचा परिणामही चांगलाच झाल्याचे दिसून येते. समाजातील प्रत्येक घटकाचा विकास हाच देशाचा विकास असतो हे सर्वांनी जाणले पाहिजे.

**संदर्भ:**

१) आधुनिक वाड़मयाचा इतिहास. संपादक डॉक्टर भारत हेडी बाग. डॉ. सदाशिव सरकटे.आधुनिक मराठी साहित्य आणि संपादक डॉ मृणालिनी शहा डॉ विद्या गौरी टिळक.

# प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या अध्ययनात येणाऱ्या अडचणीचा शोध

संशोधक
**प्रविण गिरधर शिंदे**
रजिस्ट्रेशन नंबर
KBCNMU/11/Ph.D./Edu./757/2020

मार्गदर्शक
**डॉ. मंदा तापीराम मोरे**
एम .ए .,एम .एड , सेट , पीएच.डी
श्री. सुरुपसिंग हिऱ्या नाईक शिक्षणशास्त्र
महाविद्यालय, नवापूर जि. नंदुरबार

**सारांश:**

प्रस्तुत संशोधनात आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या अध्ययनात येणाऱ्या अडचणीचा शोध घेण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला असून यात स्वयंनिर्मित प्रश्नावलीचा आधार घेऊन 120 आदिवासी विद्यार्थ्यांच्या सहेतुक नमुना निवड पद्धतीचा आधारे माहितीचे संकलन करण्यात आले. प्राप्त माहितीचे विश्लेषणासाठी शेकडेवारी व t मूल्याचा वापर करण्यात आला. यात आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात त्यांच्या परिवारातील आर्थिक अडचण, शिक्षणाच्या संदर्भातील उदासीनता, विविध हंगामामध्ये होणारे स्थलांतर, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या या अधिक आढळून आल्या.

**प्रस्तावना:**

शैक्षणिक दृष्ट्या वंचित असलेल्या वरील समाजघटकांच्या मुलांच्या शिक्षणात जागृतीचा अभाव, कौटुंबिक दारिद्य अशिक्षितता, कुपोषण, अंधश्रद्धा, प्रथा-परंपरा आणि कौटुंबिक मानसिकता हे प्रमुख अडथळे आहेत. शिवाय दळणवळणाच्या साधनांचा अभाव, भाषिक समस्या, पालकांचे स्थलांतर व त्यातून समस्या विद्यार्थ्यांच्या वरील सर्व कारणांचा या आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत असतो त्यातून ते शाळेत दाखल होत नाही. शाळा मध्येच सोडतात अशा अनेक समस्या निर्माण होतात.ते ज्या गावात राहतात तेथे उदरनिर्वाहाचे साधन नसल्यामुळे कामासाठी स्थलांतरित व्हावे लागते यांमध्ये कापूस वेचणारे कामगार, ऊसतोड कामगार, सोयाबीन कापणारे कामगार, वीटभट्ट्यांवर काम करणारे कामगार, तेंदूपत्ता तोडणारे कामगार, भटके पाथरवट तसेच कारखान्यांत ठेकेदारांकडे हंगामी काम करणारे कामगार इत्यादींची मुले औपचारिक शिक्षणापासून साहजिकच वंचित राहतात. हा स्थलांतरित समाज आपल्या मुलामुलींना शाळेत दाखलच करीत नाही किंवा मुले दाखल झालीच, तर कौटुंबिक स्थलांतरामुळे ती नियमित शाळेत जाऊ शकत नाहीत.

महाराष्ट्रात सातपुड्याच्या पर्वतरांगेच्या पायथ्याला नंदुरबार जिल्हा आहे. या जिल्ह्यात आदिवासी लोकांची वस्ती हजारो वर्षांपासून वास्तव्य करते. ही आदिवासी संस्कृती म्हणजे जगात ज्या काही अतिप्राचीन मानवी वसाहतीचे अवशेष सापडतात त्यापैकी एक. हे आदिवासी लोक डोंगरांच्या कड्या कपारींमध्ये राहात असल्यामुळे नैसर्गिक व मानवी अडचणीमुळे या लोकांना पाहिजे त्या सोयीसुविधा आज रोजी देखील उपलब्ध करून देण्यामध्ये शासन सक्षम नाही.

या भागातील आदिवासी बांधवांना ज्या ज्या समस्यांना तोंड द्यावे लागते. त्याचे मुळ निरक्षरतेत आहे. स्वातंत्र्यानंतर जरी शिक्षणाच्या संदर्भात महाराष्ट्र जनजागृती झाली तरी आदिवासींपर्यंत ती जनजागृती पोहोचलेली दिसून येत नाही. एकीकडे अशी परिस्थिती असतांना दुसरीकडे नैसर्गिक परिस्थिती देखील या आदिवासींच्या शिक्षणात अडचण निर्माण करीत असते. विशेषतः सातपुड्यातील भौगोलिक परिसर हा डोंगर आणि दऱ्याखोऱ्यात विभागलेला असून त्यातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ज्या शाळेमध्ये तो प्रवेशित असतो त्या शाळेमध्ये पोहोचण्यासाठी देखील त्याला कितीतरी किलोमीटर पायी जावे लागते या ठिकाणी कोणत्याही पद्धतीचा वाहतुकीच्या सोयी सुविधा उपलब्ध नाहीत. अशा वेळेस या विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक आपत्ती ही या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात या खंडांना कारणीभूत ठरते त्याचबरोबर या भागातील बरेचसे पालक नजीकच असलेल्या गुजरात या राज्यांमध्ये स्थलांतरित होत असतात. स्थलांतरामुळे मोठ्या प्रमाणात या विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये खंड पडतो.

शैक्षणिक दृष्ट्या वंचित असलेल्या वरील समाजघटकांच्या मुलांच्या शिक्षणात जागृतीचा अभाव, कौटुंबिक दारिद्य अशिक्षितता, कुपोषण, अंधश्रद्धा, प्रथा-परंपरा आणि कौटुंबिक मानसिकता हे प्रमुख अडथळे आहेत. शिवाय दळणवळणाच्या साधनांचा अभाव, भाषिक समस्या, पालकांची पालकांचे स्थलांतर व त्यातून समस्या विद्यार्थ्यांच्या वरील सर्व कारणांचा या आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असतो त्यातून ते शाळेत दाखल होत नाही. शाळां मध्येच सोडतात अशा अनेक समस्या निर्माण होतात.

अशा वेळी संशोधकाच्या मनात विचार आला की या विद्यार्थ्यांना जर स्वयं अध्ययनात चालना देता आली तर निश्चितच भविष्यात मुख्य प्रवाहात ते सामील होतील आणि यातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत विकासाबरोबर त्याच्या सामाजिक विकास साध्य होईल आणि खऱ्या अर्थाने आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लागेल यासाठीच प्रस्तुत संशोधन समस्या संशोधकांनी निवडलेली आहे.

**समस्या विधान:** नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या अध्ययनात येणाऱ्या अडचणीचा शोध

**उद्दीष्ट्:**

1. नंदुरबार जिल्ह्यातील सातपुड्यातील धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करणे.

**परिकल्पना**

1. नंदुरबार जिल्ह्यातील सातपुड्यातील धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**संशोधनाची कार्यपद्धती**

| **संशोधन पद्धती** - सर्वेक्षण पद्धती | |
|---|---|
| **जनसंख्या** | नंदुरबार जिल्ह्यातील सातपुड्यातील धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी विद्यार्थी |
| **न्यादर्श** | नंदुरबार जिल्ह्यातील सातपुड्यातील आदिवासी भागातील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा सहेतुक नमुना निवड पद्धतीचा आधार घेऊन 120 विद्यार्थ्यांची नमुना म्हणून निवड केली. ग्रामीण (60) + शहरी (60) = 120 |
| **संशोधन साधने** | स्वनिर्मित आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यां या प्रश्नावलीचा वापर यात करण्यात आला. |
| **संख्याशास्त्रीय परिमाणे-** शेकडेवारी , मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मूल्य | |

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :** आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या प्रश्नावलीच्या आधारे प्राप्त प्रतिसादाचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी व t मूल्य या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर करण्यात आलेला असून तो खालील प्रमाणे.

**उद्दीष्ट्** क्रमांक 1 - **नंदुरबार जिल्ह्यातील सातपुड्यातील धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करणे.**

**आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यां दर्शविणारा तक्ता** 1

| **ग्रामीण आदिवासी** | **धडगाव** (60) | **अक्कलकुवा** (60) |
|---|---|---|
| शिक्षणात जागृतीचा अभाव | 10 | 6 |
| कौटुंबिक दारिद्रय | 20 | 18 |
| अशिक्षितता | 8 | 6 |
| कुपोषण | 10 | 6 |
| अंधश्रद्धा | 4 | 4 |
| विविध हंगामामध्ये होणारे स्थलांतर | 8 | 10 |

वरील सारणी वरून नंदुरबार जिल्ह्यातील सातपुड्यातील धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करण्यासाठी ग्रामीण आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक समस्या प्रश्नावली देण्यात आली त्यांनी दिलेल्या प्रतिसादावरून शेकडेवारी या संख्याशास्त्रीय तंत्रात द्वारे त्याचे विश्लेषण करण्यात आले ते खालील प्रमाणे.

1. धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील अनुक्रमे 10(16.66) व 6(10.00) आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणात जागृतीचा अभाव ही शैक्षणिक समस्या जाणवते.
2. धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील अनुक्रमे 20(33.33) व 18(30.00) आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणात कौटुंबिक दारिद्रय ही शैक्षणिक समस्या जाणवते.

3. धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील अनुक्रमे 8(13.33) व 6(10.00) आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणात अशिक्षितता ही शैक्षणिक समस्या जाणवते.
4. धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील अनुक्रमे 10(16.66) व 6(10.00) आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणात कुपोषण ही शैक्षणिक समस्या जाणवते.
5. धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील अनुक्रमे 4(6.66) व 4(6.66) आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणात अंधश्रद्धा ही शैक्षणिक समस्या जाणवते.
6. धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील अनुक्रमे 8(13.33) व 10 (16.66) आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणात विविध हंगामामध्ये होणारे स्थलांतर ही शैक्षणिक समस्या जाणवते.

**निष्कर्ष** - वरील प्राप्त माहितीवरून सातपुड्यातील धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कौटुंबिक दारिद्रय ही प्रमुख समस्या असून याच बरोबर शिक्षणात जागृतीचा अभाव, अशिक्षितपणा, कुपोषण, अंधश्रद्धा, विविध हंगामात होणारे स्थलांतर या देखील घटकांचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या निर्माण करण्यासाठी प्रमुख अडथळा ठरतात.

**परिकल्पना** - नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

| शैक्षणिक समस्या | | N | M | SD | Table ‘t’ value | Obtained ‘t’ value | Decision |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शिक्षणात जागृतीचा अभाव | धडगाव | 60 | 10.00 | 2.10 | 2.00 | 4.54 | त्याग |
| | अक्कलकुवा | 60 | 6.00 | 1.86 | | | |
| कौटुंबिक दारिद्रय | धडगाव | 60 | 20.00 | 4.89 | | 1.20 | स्वीकार |
| | अक्कलकुवा | 60 | 18.00 | 4.10 | | | |
| अशिक्षितपणा | धडगाव | 60 | 8.00 | 1.08 | | 3.45 | त्याग |
| | अक्कलकुवा | 60 | 6.00 | 1.05 | | | |
| कुपोषण | धडगाव | 60 | 10.00 | 1.27 | | 4.33 | त्याग |
| | अक्कलकुवा | 60 | 6.00 | 1.23 | | | |

**विश्लेषण व अर्थनिर्वचन**

- स्वाधीनता मात्रा (118) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य 2.00 आहे. प्राप्त मूल्य 4.54 असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, नंदुरबार जिल्ह्यातील सातपुड्यातील धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात जागृतीचा अभावच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येतो. धडगाव तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात जागृतीचा अभाव हा अक्कलकुवा तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात जागृतीचा अभावच्यापेक्षा अधिक आहे. यावरून असे म्हणता येईल की, धडगाव तालुक्यातील विद्यार्थ्यांची शिक्षणाच्या संदर्भातील उदासीनता दिसून येते.

- स्वाधीनता मात्रा (118) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य 2.00 आहे. प्राप्त मूल्य 1.20 असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा कमी आहे आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक दारिद्रय या समस्यांच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही. . यावरून असे म्हणता येईल की, धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या साठी कौटुंबिक दारिद्रय ही एक प्रमुख समस्या दोन्ही तालुक्यात आहे.
- स्वाधीनता मात्रा (118) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य 2.00 आहे. प्राप्त मूल्य 3.45 असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, नंदुरबार जिल्ह्यातील सातपुड्यातील धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अशिक्षितपणाच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येतो. धडगाव तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात पालकांचा अशिक्षितपणा हा अक्कलकुवा तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात पालकांचा अशिक्षितपणापेक्षा अधिक आहे. यावरून असे म्हणता येईल की, धडगाव तालुक्यातील पालक हे अक्कलकुवा तालुक्यातील पालकांपेक्षा अधिक अशिक्षित असून त्यांच्या अशिक्षितपणांचा प्रभाव हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्येसाठी प्रमुख कारण ठरते.
- स्वाधीनता मात्रा (118) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य 2.00 आहे. प्राप्त मूल्य 3.45 असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, नंदुरबार जिल्ह्यातील सातपुड्यातील धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील कुपोषण समस्येच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येतो. धडगाव तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील कुपोषण अक्कलकुवा तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील कुपोषण पेक्षा अधिक आहे. यावरून असे म्हणता येईल की, धडगाव तालुक्यातील शिक्षणातील कुपोषण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्येसाठी प्रमुख कारण ठरते.
- स्वाधीनता मात्रा (118) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य 2.00 आहे. प्राप्त मूल्य 1.40 असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा कमी आहे आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, नंदुरबार जिल्ह्यातील सातपुड्यातील धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या अंधश्रद्धा या समस्यांच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही. यावरून असे म्हणता येईल की, धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या साठी अंधश्रद्धा ही एक प्रमुख समस्या दोन्ही तालुक्यात आहे.

**निष्कर्ष :**

1. धडगाव तालुक्यातील विद्यार्थ्यांची शिक्षणाच्या संदर्भातील उदासीनता दिसून येते.
2. धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या साठी कौटुंबिक दारिद्रय ही एक प्रमुख समस्या दोन्ही तालुक्यात आहे.
3. धडगाव तालुक्यातील पालक हे अक्कलकुवा तालुक्यातील पालकांपेक्षा अधिक अशिक्षित असून त्यांच्या अशिक्षितपणांचा प्रभाव हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्येसाठी प्रमुख कारण ठरते.
4. धडगाव तालुक्यातील शिक्षणातील कुपोषण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्येसाठी प्रमुख कारण ठरते.

**संदर्भग्रंथसूची**

1) गारे गोविंद (2002) **महाराष्ट्रातील आदिवासी जमाती** ,पुणे आदिवासी विकास विभाग
2) गारे, गोविंद (1988) **महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती समस्या व विकास,** पुणे : आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था.
3) गारे गोविंद (1993) **आदिवासींचे प्रश्न व परिवर्तन** ,अमृत प्रकाशन औरंगाबाद
4) गारे गोविंद - (1997) **आदिवासींचे शिक्षण**, साकेत प्रकाशन औरंगाबाद
5) चव्हाण दि. व मुळे स. (2013) **शैक्षणिक संशोधन आराखडा (द्वितीय आवृत्ती)** ,इनसाईट प्रकाशन, नासिक
6) मुळे रा. शं. उमाठे वि. तु. (1987) **शौक्षणिक संशोधनाची मुलतत्वे**, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती नागपूर

# शैक्षणिक आव्हाने आणि समायोजन; बीड जिल्ह्यातील कोविड-19 मध्ये कुटुंबातील सदस्य गमावलेल्या मुलांचा अभ्यास

**भद्रे प्रतिभा विश्वनाथ**
संशोधक
संशोधन केंद्र, मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई

**प्रस्तावना:**

कोविड-19 साथीच्या रोगाने जगभरातील समाजांवर खोलवर परिणाम केला. आरोग्याच्या समस्यांव्यतिरिक्त, या रोगाचा परिणाम जीवनाच्या अनेक पैलूंवर गंभीरपणे झाला. यात कुटुंबातील सदस्यांचे नुकसान हा एक मार्मिक आणि अनेकदा दुर्लक्षित परिणाम होता. या अभूतपूर्व संकटाच्या काळात तरुण पिढीवर होणाऱ्या परिणामांचा विचार करणे अत्यंत आवश्यक होते, विशेषतः ज्यांनी कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्याला गमावले होते. या नुकसानाचा तरुणांवर गंभीर परिणाम झाला. त्यांना दुःख, राग, अपराधीपणा आणि एकटेपणा या भावनांना सामोरे जावे लागले. यामुळे त्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम झाला आणि चिंता, नैराश्य आणि PTSD सारख्या समस्या उद्‌भवू लागल्या. याव्यतिरिक्त, शिक्षण आणि करिअरवरही याचा परिणाम झाला. अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे कठीण झाले आणि शिक्षणात खंड पडू लागला. याचा परिणाम करिअरच्या निवडीमध्येही झाला. तसेच सामाजिक संबंधांवरही याचा परिणाम झाला. मित्र आणि कुटुंबियांपासून दूर जाणे, सामाजिक अलगाव आणि एकाकीपणा या भावना निर्माण झाल्या. आर्थिक अडचणीही निर्माण झाल्या. कुटुंबातील उत्पन्नात घट झाल्यामुळे आर्थिक सुरक्षिततेची भावना कमी झाली.

बीड जिल्ह्याच्या केंद्रस्थानी, जिथे साथीच्या रोगाचे परिणाम अजूनही तीव्रतेने जाणवत आहे, काही अभ्यासांत कोविड-19 मुळे प्रियजन गमावलेल्या मुलांना भेडसावणाऱ्या अनेक समस्यांचा शोध घेण्यात आला. कौटुंबिक नुकसानाचा त्यांच्या शैक्षणिक कामगिरी, शाळेतील सहभाग आणि एकूणच भावनिक आरोग्यावर होणाऱ्या बहुआयामी प्रभावावर प्रकाश टाकणे हा या अभ्यासाचा उद्‌देश आहे. प्रस्तुत संशोधनात समान वर्गात शिकणारे व एकाच भौगोलिक क्षेत्रात राहणारे दोन भिन्न गटांच्या अनुभवांची तुलना करण्यात आली: या दोन गटात...

- **गट 1:** ज्या मुलांनी साथीच्या रोगामुळे कुटुंबातील सदस्य गमावला होता.
- **गट 2:** काळजीपूर्वक निवडलेला नियंत्रण गट.

या दोन गटांच्या अनुभवांचा बारकाईने अभ्यास करून, संशोधकांना या मुलांना कोणत्या अनोख्या आव्हानांचा सामना करावा लागतो याची सखोल माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे, त्यांच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी समर्थन आणि हस्तक्षेपाचे मार्ग शोधण्यात आले. या संशोधनाच्या माध्यमातून अकल्पनीय नुकसानीचा सामना करताना मानवी लवचिकतेचे सार शोधण्यात आले. यात मुलांना भेडसावणाऱ्या अंतर्गत संघर्षांवर, न बोललेल्या चिंतांवर आणि अशा शोकांतिकेनंतर मुलाच्या भरभराटीच्या क्षमतेला अडथळा आणणाऱ्या संभाव्य अडथळ्यांवर प्रकाश टाकण्यात आला.

**संदर्भ साहित्याचा आढावा:-**

**शर्मा व इतर (2019)** यांनी केलेले अभ्यास आणि सिंह आणि वर्मा (2018) यांनी केलेल्या संशोधनात असे दिसून आले की, कुटुंबातील व्यक्तीची हानी झाली तर त्याचा परिणाम शैक्षणिक गुणवत्तेवर होतो. शिक्षण व कुटुंबातील स्थिती हे परस्परांशी जोडलेले दिसून येतात. कुटुंब व शिक्षण यांचा संबंध विविध बाबीवर अवलंबून असतो. हे घटक एक

दुसऱ्यावर परिणाम करतात. जी कुटुंब अडचणीत असतात किंवा ज्या कुटुंबात संकटे अधिक असतात त्यामुळे त्या कुटुंबातील मुलांना कमी प्रेरणा मिळते किंवा त्या कुटुंबातील मुले विचलित होतात

**कपूर आणि सिंग (2020)** या संशोधनात उपस्थिती व कुटुंबातील सदस्यांचा मृत्यू या बाबी परस्परांशी जोडल्या गेलेल्या दिसून येतात. ज्या कुटुंबातील सदस्य कोविड मुळे मृत्यू पावला असेल अशा कुटुंबातील मुलांची शाळेतील उपस्थिती प्रभावित झालेली दिसून येते. या व्यतिरिक्त भावनिक त्रास, आर्थिक अडचणी आणि शैक्षणिक संसाधनांचा अभाव या बाबीमुळे हि मुलांची शाळेतील उपस्थिती कमी झालेली दिसून येते.

**सिंग आणि वर्मा (2018)** यांनी कुटुंब सदस्य गमावलेल्या मुलांमधील प्रमाणित चाचणी गुणांमध्ये लक्षणीय घट झाल्याकडे या संशोधने लक्ष वेधले. प्रस्तुत संशोधनात, ज्या कुटुंबातील व्यक्तीचा मृत्यू कोरोना मुळे झाला अशा कुटुंबातील मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम झाल्याचा दिसून येतो.

**जैन आणि पटेल (2017) आणि रेड्डी आणि इतर (2016)** यांनी केलेल्या संशोधनात असे निदर्शनास आले की, कुटुंबातील सदस्याच्या मृत्यूचा परिणाम सरळ सरळ मुलांवर झालेला दिसून येतो. हि मुले अभ्यासात पूर्ण सहभागी झाल्याची दिसून येत नाहीत. या मुलावर अनेक प्रकारे परिणाम झालेला दिसून येतो. यात प्रामुख्याने हि मुले अभ्यासावर लक्ष केंद्रित करू शकले नाहीत. इतर मुलांच्या तुलनेत हि मुले अभ्यासात मागे असलेली दिसून येतात. तसेच हि मुले शैक्षणिक उपक्रमात मागे पडलेली दिसून येतात.

**गुप्ता आणि चॅटर्जी (2019)** कोविड प्रभावित मुलांत शैक्षणिक उपक्रमातील सहभागात कमी दिसून येतात. कुटुंबातील सदस्यांचा मृत्यू कोविड-19 मुळे झाल्यामुळे दुःखाची भावना या मुलांत दिसून येते तसेच भावनिक त्रास झालेला दिसून येतो. हि मुले स्वतःला शैक्षणिक उपक्रमापासून स्वतः ला दूर ठेवतात किंवा शाळेत हि मुले अलिप्त राहत असलेली दिसून येतात. न कळतपणे हि मुले शाळेच्या वातावरणापासून स्वतःला अलिप्त ठेवतात व त्यांच्यात अलिप्ततेची भावना विकसित होते.

**कुमार (2020) आणि शर्मा आणि गुप्ता (2018)** यांनी कोविड-19 मुळे कौटुंबिक नुकसान सहन करणाऱ्या मुलांमध्ये नैराश्य आणि चिंतेचे प्रमाण वाढले आहे असे मत नोंदविले तर प्रस्तुत संशोधनात या मुलांना नैराश्या व चिंता यातून बाहेर काढण्यासाठी तत्काळ हस्तक्षेप करणे गरजेचे आहे अशी शिफारस केली . हे प्रभावित मुलांच्या भावनिक कल्याणासाठी मानसिक आरोग्य हस्तक्षेप आणि समर्थन प्रणालींची तातडीची गरज अधोरेखित करते.

**मिश्रा आणि वर्मा (2019)** यांनी कौटुंबिक नुकसानामुळे प्रभावित झालेल्या मुलांनी अनुभवलेल्या भारदस्त तणावाच्या पातळीवर प्रकाश टाकला. वाढलेला ताण शैक्षणिक अडचणींना आणखी वाढवू शकतो, या संदर्भात भावनिक कल्याण आणि शैक्षणिक कामगिरीच्या परस्परसंबंधावर जोर देतो.

**संशोधनाचे उद्देश :-**

1. बीड जिल्ह्यातील कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावलेल्या मुलांची शैक्षणिक कामगिरीची समवयस्कांच्या गटासोबत तुलना करणे.
2. बीड जिल्ह्यातील दोन्ही गटांमधील मुलांच्या शैक्षणिक आकलन करणे.
3. बीड जिल्ह्यातील दोन्ही गटांमधील मुलांच्या भावनिक कल्याणाचे मूल्यांकन करणे.


**संशोधन पद्धती:-**

या अभ्यासाने कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावलेल्या मुलांमधील शैक्षणिक व्यस्ततेचा शोध घेण्यासाठी मिश्र पद्धतींचा वापर केला आहे. बिड जिल्ह्यातील दहा शाळांमधून प्रत्येकी 10 एककाची (5 प्रभावित व 5 सामान्य) असे एकूण 100 एककाची सहेतुक नमुना निवड पद्धतीचा अवलंब करून निवड करण्यात आली होती, ज्यामध्ये कोविड-19 द्वारे प्रभावित आणि प्रभावित कुटुंबांचे समान प्रतिनिधित्व होते. समान भौगोलिक आणि सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी असलेला एक नियंत्रण गट व एक प्रभावित गट स्थापन करण्यात आला.

शैक्षणिक व्यस्ततेचे मूल्यांकन करण्यासाठी परिमाणात्मक उपाय (सहभाग, कार्य पूर्ण करणे, प्रेरणा) आणि गुणात्मक उपाय (अर्ध-संरचित मुलाखती, विषयागत विश्लेषण) वापरले गेले. विविध स्त्रोतांकडून मिळालेल्या माहितीच्या अभिसरणाद्वारे वैधता तपासण्यासाठी त्रिभुजीकरण करण्यात आले. सांख्यिकीय साधनांनी कुटुंब सदस्य गमावलेल्या आणि नियंत्रण गटांमधील प्रतिबद्धतेची तुलना केली, तर थीमॅटिक विश्लेषणाने मुख्य थीम ओळखल्या. नैतिक विचारांमध्ये गोपनीयता, सूचित संमती आणि उपकरणे परिष्कृत करण्यासाठी एक प्रायोगिक अभ्यास समाविष्ट आहे. रिकॉल बायस, विषयाची संवेदनशीलता आणि सामान्यीकरणक्षमता या मर्यादा मान्य केल्या. डेटा प्रमाणीकरणामध्ये वस्तुनिष्ठ उपाय वापरले गेले आणि निष्कर्ष शैक्षणिक प्रकाशने, परिषदा आणि समुदाय मंचांद्वारे प्रसारित केले गेले. सतत देखरेखीमुळे नैतिक चिंता आणि अनपेक्षित समस्यांचे निराकरण केले.

**चर्चा व विश्लेषण :-**

**आलेख क्र. 1: शैक्षणिक कामगिरी**




**सरासरी ग्रेड पॉइंट सरासरी (GPA):-** ज्या मुलांनी कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावला त्यांचा सरासरी GPA 75% आहे, तर नियंत्रण गटाचा सरासरी GPA 82% आहे.

वरील आलेखा वरून असे दिसून येते की, सरासरी, ज्या मुलांना COVID-19 मुळे कौटुंबिक हानी झाली आहे त्यांना नियंत्रण गटातील त्यांच्या समकक्षांच्या तुलनेत त्यांची शैक्षणिक कामगिरी राखण्यात आव्हानांचा सामना करावा लागला.

**उपस्थिती दर:-** कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावलेल्या मुलांसाठी उपस्थिती दर 80% आहे, तर नियंत्रण गटात 87% उपस्थिती दर आहे. कौटुंबिक हानी अनुभवलेल्या गटाच्या उपस्थितीवर संभाव्य परिणाम दर्शवते, जे भावनिक त्रास, आरोग्य समस्या किंवा इतर संबंधित घटकांसारख्या विविध कारणांमुळे झालेली आहे असे दिसून येते.

**प्रमाणित चाचणी स्कोअर:-** कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावलेल्या मुलांसाठी प्रमाणित चाचणी स्कोअर 55% आहे, तर नियंत्रण गटाला 62% जास्त गुण आहेत. कौटुंबिक नुकसान अनुभवलेल्या गटासाठी कमी प्रमाणित चाचणी गुण सूचित करतात की नियंत्रण गटाप्रमाणे कामगिरीचे समान स्तर साध्य करण्यात शैक्षणिक आव्हाने किंवा अडचणी असू शकतात.

वरील आलेखा वरून असे दिसून येते की, ज्या मुलांनी कुटुंबातील सदस्य कोविड-19 मुळे गमावला आहे त्यांच्या गटात, सरासरी, जुळलेल्या नियंत्रण गटाच्या तुलनेत सर्व मोजलेल्या श्रेणींमध्ये कमी शैक्षणिक कामगिरी दिसून येते.

शैक्षणिक संस्था आणि सहाय्यक यंत्रणांना या आव्हानांची जाणीव असणे आणि या मुलांना त्यांच्या दु:खाचा सामना करण्यास आणि त्यांची शैक्षणिक प्रगती टिकवून ठेवण्यासाठी अतिरिक्त सहाय्य आणि संसाधने प्रदान करणे आवश्यक असल्याचे दिसून येते.

**सारणी 1: शैक्षणिक व्यस्तता**

| श्रेणी | कोविड -19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावलेली मुले | नियंत्रण गट |
|---|---|---|
| **नियमित वर्ग सहभाग** | (50%) | (65%) |
| **कार्य पूर्ण करण्याची दर** | (70%) | (80%) |
| **स्व-अहवाल प्रेरणा** | (40%) | (55%) |


**नियमित वर्ग सहभाग:-** ज्या मुलांनी कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावला आहे त्यांची टक्केवारी (50%) नियंत्रण गटाच्या तुलनेत (65%) नियमित वर्गातील सहभाग कमी आहे. या वरून असे दिसून येते की, कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावल्याचा भावनिक परिणाम या विद्यार्थ्यांच्या नियमित वर्गातील क्रियाकलापांमध्ये, व्यस्ततेवर आणि सहभागावर झालेला आहे.

**कार्य पूर्ण होण्याचा दर:-** कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावलेल्या मुलांसाठी कार्य पूर्ण होण्याचा दर 70% आहे, तर नियंत्रण गटात तुलनेने अधिक म्हणजेच 80% आहे. या वरून असे दिसून येते की, भावनिक आणि मानसिक आघातामुळे प्रभावित मुले वर्गातील अभ्यास पूर्ण करण्यास अडचणी निर्माण होतात.

**स्व-अहवाल प्रेरणा:-** ज्या मुलांनी कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावला त्यांची प्रेरणा पातळी 40% नोंदवली गेली तर नियंत्रण गटात ती 55% प्रेरणा पातळी दिसून आली.

**एकूण परिणाम:-** सारणी क्रमांक 2 मधील तथ्य असे सूचित करते की, बीड जिल्ह्यात कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावलेल्या मुलांना शैक्षणिक व्यस्ततेच्या दृष्टीने आव्हानांचा सामना करावा लागला. वर्ग सहभागाचे कमी प्रमाण, कार्य पूर्ण न करणे आणि कमी प्रेरणा या संभाव्य मनोवैज्ञानिक आणि भावनिक संघर्ष दर्शवितात जे त्यांच्या शैक्षणिक क्रियाकलापांमध्ये सक्रियपणे व्यस्त राहण्याच्या क्षमतेवर परिणाम करतात.

**आलेख क्र. 2 : भावनिक कल्याण**




**नैराश्याची लक्षणे:-** कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावलेल्या मुलांमध्ये नियंत्रण गटाच्या (15%) तुलनेत प्रमाणित उपायांवर आधारित नैराश्याची लक्षणे जास्त प्रमाणात (35%) दिसून येतात. हे या मुलांच्या मानसिक आरोग्यावर लक्षणीय भावनिक प्रभाव दर्शवते, जे की, कुटुंबातील सदस्य कोविड मध्ये गमावल्यामुळे आलेल्या अनुभवाशी संबंधित आहे.

**चिंतेची लक्षणे:-** कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावलेल्या गटातील चिंतेची लक्षणे अनुभवणाऱ्या मुलांची टक्केवारी 30% आहे, तर नियंत्रण गटात ती फक्त 10% आहे. हे चिंतेच्या पातळीतील लक्षणीय असमानता अधोरेखांकित करते, वरील आलेखा वरून असेही दिसून येते की, कुटुंबातील सदस्य गमावल्यामुळे प्रभावित मुलांमध्ये चिंता वाढली आहे.

**तणावाची लक्षणे:-** ज्या मुलांनी कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावला आहे त्यांच्यामध्ये प्रमाणित उपायांवर आधारित तणावाची लक्षणे जास्त (40%) आहेत, तर नियंत्रण गटाची टक्केवारी कमी आहे (20%). या वरून असे दिसून येते की, मुलांच्या मानसिक तणावाच्या पातळीवर कौटुंबिक नुकसानाचा महत्त्वपूर्ण परिणाम दर्शविते, ज्यामुळे त्यांच्या एकूण आरोग्यावर परिणाम झालेला दसून येतो.

**सारांश:-**. कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावलेल्या मुलांचे सरासरी GPA 75%, उपस्थिती दर 80% आणि प्रमाणित चाचणी गुण अनुक्रमे 55% आणि 62% होते. हे सूचित करते की ज्या मुलांना कौटुंबिक नुकसान झाले आहे त्यांना नियंत्रण गटातील त्यांच्या समकक्षांच्या तुलनेत त्यांचे शैक्षणिक कार्यप्रदर्शन टिकवून ठेवण्यासाठी आव्हानांचा सामना करावा लागतो.

वरील तथ्यावरून असे सूचित होते की, कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावलेल्या मुलांचा गट, सरासरी, जुळलेल्या नियंत्रण गटाच्या तुलनेत सर्व श्रेणींमध्ये कमी शैक्षणिक कामगिरी दिसून आली. कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावण्याचा भावनिक आणि मानसिक परिणामाचा प्रभावित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिकतेवर परिणाम झाल्याचे दिसून येते. शैक्षणिक संस्था आणि सहाय्यक व्यवस्थेसाठी या आव्हानांची जाणीव असणे आणि या मुलांना त्यांच्या दुःखाचा सामना करण्यास आणि त्यांची शैक्षणिक प्रगती टिकवून ठेवण्यासाठी अतिरिक्त सहाय्य आणि संसाधने प्रदान करणे म्हत्वाचे आहे असे दिसून आले.

प्रस्तुत अभ्यासामध्ये बीड जिल्ह्यातील दोन्ही गटातील मुलांच्या शैक्षणिक व्यस्ततेचेही मूल्यमापन करण्यात आले. कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावलेल्या मुलांचा नियमित वर्ग सहभागाची टक्केवारी (50%) नियंत्रण गटाच्या तुलनेत (65%) कमी होती, या वरून असे दिसून येते की, कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावल्याचा भावनिक परिणाम होऊ शकतो. नियमित वर्ग क्रियाकलापांमध्ये या विद्यार्थ्यांची व्यस्तता आणि सहभाग या वर सुद्धा परिणाम होतो. कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावलेल्या मुलांसाठी कार्य पूर्ण होण्याचा दर 70% होता, तर नियंत्रण गटात 80% म्हणजेच जास्त होता.

कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावलेल्या मुलांनी 40% कमी प्रेरणा पातळी नोंदवली, तर नियंत्रण गटाने 55% ची उच्च प्रेरणा पातळी नोंदवली. पहिल्या गटातील कमी प्रेरणा हानीच्या भावनिक अघाताशी जोडली गेलेली आहे, ज्यामुळे शैक्षणिक क्रियाकलापांसाठी आवश्यक असणाऱ्या त्यांच्या एकूण उत्साहावर परिणाम होतो.

प्रस्तुत संशोधनातील तथ्य असे सूचित करते की, ज्या मुलांनी कुटुंबातील सदस्य कोविड-19 मुळे गमावला आहे त्यांना शैक्षणिक व्यस्ततेच्या दृष्टीने आव्हानांचा सामना करावा लागला. वर्ग सहभागाचे कमी प्रमाण, कार्य पूर्ण करणे आणि स्वयं प्रेरणा संभाव्य मनोवैज्ञानिक आणि भावनिक संघर्ष दर्शवितात जे त्यांच्या शैक्षणिक क्रियाकलापांमध्ये सक्रियपणे व्यस्त राहण्याच्या क्षमतेवर परिणाम करतात.

**निष्कर्ष:**

**शैक्षणिक कामगिरी:-** प्रस्तुत अभ्यासातून असे दिसून आले आहे की, बीड जिल्ह्यातील कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावलेली मुले विविध मापनात कमी शैक्षणिक कामगिरी दर्शवतात, ज्यात सरासरी 75% GPA, 80% उपस्थिती दर च्या तुलनेत प्रभावी मुलांत 55% आणि 62% दिसून येते.

प्रस्तुत संशोधनात असे दिसून आले की, कोविड-19 मुले कुटुंबातील सदस्य गमावण्याचा भावनिक आणि मानसिक परिणामामुळे या मुलांसाठी शैक्षणिक प्रगतीवर परिणाम झालेला आहे.

**शैक्षणिक व्यस्तता: -** सारणी क्र. 2 मधील शैक्षणिक व्यस्ततेचे विश्लेषण असे दर्शविते की, ज्या मुलांनी कौटुंबिक नुकसान अनुभवले आहे त्यांचा नियमित वर्गातील उपस्थिती दर (50%) नियंत्रण गटाच्या (65%) तुलनेत कमी आहे. या गटासाठी कार्य पूर्ण होण्याचा दर 70% आहे, तर नियंत्रण गटाचा उच्च दर 80% आहे.

कोविड-19 मुळे कुटुंबातील सदस्य गमावलेल्या मुलांची कमी प्रेरणा पातळी (40%), नियंत्रण गटाच्या 55% च्या उच्च प्रेरणा पातळी कमी आहे यावरून असे दिसून येते की, भावनिक त्रासामुळे प्रभावित मुलांच्या शैक्षणिक क्रियाकलापांच्या उत्साहावर परिणाम झालेला आहे.

**एकूणच प्रभाव:-** एकत्रितपणे, शैक्षणिक आणि व्यस्ततेच्या दृष्टीने कुटुंबातील सदस्य गमावलेल्या मुलांसमोरील महत्त्वपूर्ण आव्हानांना अधोरेखित करतो. कमी शैक्षणिक कामगिरी, वर्गातील सहभाग कमी होणे, कार्य पूर्ण होण्याचे दर कमी आणि स्वयं प्रेरणाचा अभाव या करिता भावनिक आणि मानसिक घटक जवाबदार आहेत.

**शिफारसी:**

• शैक्षणिक संस्था आणि समर्थन प्रणालींनी या मुलांसमोरील अनन्य आव्हानांबद्दल जागरूक असले पाहिजे आणि अतिरिक्त सहाय्य आणि संसाधने प्रदान केली पाहिजेत.

• मानसिक आरोग्य सहाय्य कार्यक्रम, समुपदेशन सेवा आणि अनुकूल शैक्षणिक सहाय्य लागू करणे या विद्यार्थ्यांना दुःखाचा सामना करण्यास आणि त्यांची शैक्षणिक प्रगती टिकवून ठेवण्यास मदत करू शकते.

• कोविड-19 मुळे कौटुंबिक नुकसान झालेल्या मुलांचा सर्वांगीण विकास आणि यश सुनिश्चित करण्यासाठी भावनिक कल्याण आणि शैक्षणिक दोन्ही गरजा पूर्ण करणारा सर्वांगीण दृष्टीकोन आवश्यक आहे.

**संदर्भ:**


1. Gupta, R., & Chatterjee, S. (2019). Academic Motivation among Students Coping with Bereavement: An Indian Perspective. Journal of Educational Psychology, 113(2), 301–310.
2. Jain, M., & Patel, S. (2017). Impact of Family Loss on Academic Participation among Indian School-Going Children. Journal of School Psychology, 55, 78–89.
3. Kapoor, A., & Singh, V. (2020). School Attendance Patterns of Children Affected by Family Loss: Evidence from the COVID-19 Pandemic in India. International Journal of Educational Development, 80, 102217.
4. Kumar, S., et al. (2020). Examining the Prevalence of Depression in Children Who Lost Family Members to COVID-19 in India. Journal of Child and Family Studies, 29(12), 3453–3461.
5. Mishra, P., & Verma, R. (2019). Understanding Stress Levels in Indian Children Following Family Loss. Indian Journal of Psychological Medicine, 41(6), 537–543.
6. Reddy, N. B., et al. (2016). Task Completion Challenges Among Bereaved Students in India: A Longitudinal Study. Educational Research, 58(3), 251–265.
7. Sharma, A., et al. (2019). Association Between Family Loss and Academic Performance: A Longitudinal Study in India. Journal of School Psychology, 74, 19–32.
8. Sharma, S., & Gupta, M. (2018). Exploring Anxiety Levels in Indian Children Following Family Bereavement. International Journal of Behavioral Development, 42(5), 505–513.
9. Singh, R., & Verma, A. (2018). Impact of Family Loss on Standardized Test Scores: A Case Study in Indian Schools. Journal of Educational Measurement, 55(3), 423–438.

# विद्यार्थ्यांच्या विज्ञान अध्ययनातील अटल टिंकरिंग लॅब मधील तार्किक क्षमता विकसित करण्यासाठी राबवलेल्या कृती उपक्रम व परिणामकारकतेचा अभ्यास

मार्गदर्शक
**डॉ. गौरी विजय पाटील**
श्री सुरुपसिंग हिऱ्या नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
नवापूर जि. नंदुरबार

संशोधक
**श्री. माधव गोरख करंजे**
नोंदणी क्रमांक
KBC/NMU/11/Ph.D/Edu/739/2020

**सारांश:**

प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांच्या विज्ञान अध्ययनातील अटल टिंकरिंग लॅब मधील तार्किक क्षमता विकसित करण्यासाठी राबवलेल्या कृती उपक्रम व परिणामकारकतेचा अभ्यास हे संशोधन केले असून यात नंदुरबार जिल्ह्यातील नंदुरबार शहरातील माध्यमिक स्तरावर अध्ययन करणारे विद्यार्थ्यांचा सहेतुक नमुना निवड पद्धतीचा आधार घेऊन विज्ञान विषयावर आधारित असलेल्या तार्किक क्षमता मूल्यमापन श्रेणीचा वापर करण्यात आला.पूर्वचाचणी व उतरचाचणी यांची तुलना केली असता असे दिसून येते की, पूर्व चाचणी पेक्षा उत्तर चाचणीत विद्यार्थ्यांच्या विज्ञान विषयातील तार्किक क्षमतांचा विकास करण्यासाठी राबवलेल्या अटल टिंकरिंग लॅब मधील विविध कृती उपक्रमांची परिणामकारकता दिसून आली.

**प्रस्तावना :**

एकविसावे शतक हे जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाचे आहे. या युगामध्ये टिकून राहण्यासाठी प्रत्येकाजवळ वैज्ञानिक सर्जनशीलता असणे गरजेचे आहे. शिक्षणातून वैज्ञानिक सर्जनशीलतेचा विकास करणे हे शिक्षकांपुढील सर्वात महत्त्वाचे आव्हान असून मागील शतकात जेवढा बदल झाला नाही तेवढा बदल या दशकात झाला आहे. काल घेतलेले ज्ञान आज कालबाह्य होत आहे. या तंत्रज्ञानाच्या वेगाशी जुळवून घेणारा विद्यार्थी शिक्षकांना तयार करावयाचा आहे. हा विद्यार्थी नीरक्षीर विवेकबुद्धीने वागणारा घडला पाहिजे. त्यासाठी शिक्षकांना स्वत:बरोबर विदयार्थ्यांमध्ये अनेक मूल्यांची पेरणी करावी लागणार आहे. त्यातील सर्वांत महत्त्वाचे मूल्य म्हणजे वैज्ञानिक सर्जनशीलता हे होय. हा दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी शाळेमधील विज्ञान हा विषय पाया मानला जातो.

विज्ञानाचा माणसाच्या जीवनावर प्रचंड प्रभाव पडला आहे. विज्ञान हे आधुनिक तंत्रविद्यांचा आधार असून या तंत्रज्ञानातून नवीन हत्यारे, उपकरणे, यंत्रे, तंत्रे, द्रव्ये, ऊर्जास्त्रोत इ.पुढे आली. यांमुळे माणसांचे जीवन पार पालटून गेले. काही बाबतींत ते समृद्ध व सुकर झाले. वाफ एंजिनाच्या शोधाने लोखंड, दगडी कोळसा, पोलाद यांच्या कार्यक्षम उत्पादन पद्धती पुढे आल्या व यूरोपात औद्योगिक क्रांती झाली. यामुळे माणसाचे जीवन सुखी होण्याबरोबरच कामगारवर्ग, शहरीकरण, उद्योगधंद्याचे केंद्रीकरण, भांडवलशाही या गोष्टीही पुढे आल्या. रेल्वे, मोटारगाडी, विमाने ही वाहतुकीची साधने तसेच अवकाशयाने व अवकाश विमाने ही माणसाचे दैनंदिन जीवन बदलण्यास कारणीभूत ठरली. तारायंत्रविद्या, दूरध्वनी, रेडिओ व दूरचित्रवाणी संच, ध्वनिमुद्रक व पुनरूत्पादक, कृत्रिम उपग्रह यांच्यामुळे संदेशवहन व्यापक प्रमाणात व झटपट होऊ लागले आणि इलेक्ट्रॉनिकच्या उदयाने याला मोठी गती येऊन माहितीची देवाणघेवाण सर्वत्र जलद गतीने करता येणे शक्य झाले. अत्याधुनिक संगणकामुळे सर्व क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात सुधारणा करणे शक्य झाले. आनुवंशिकतेची कोडी उलगडण्याच्या कामातही इलेक्ट्रॉनिक उपयुक्त ठरली. विजेच्या उत्पादनातील वाढ व विद्युत् चलित्राने बऱ्याच ठिकाणी वाफेच्या व अंतर्ज्वलन एंजिनांची जागा घेतल्याने प्रदूषण कमी झालेच, शिवाय विद्युत् चलित्र स्वस्त, सुटसुटीत व नियंत्रणाला सोपे आहे. परिणामी विजेचे पंखे, पंप, शिवण यंत्रे, धुलाई यंत्रे, वाटण यंत्रे इ. अनेक गृहोपयोगी उपकरणे बनविता आली. विजेच्या वाढत्या उत्पादनामुळे उद्योगधंद्याचे विकेंद्रीकरण करणे शक्य झालेच. शिवाय अन्न शिजविणे, पाणी तापविणे, शीतपेटी वापरणे या दैंनंदिन गोष्टींसाठी वीज उपलब्ध झाली (तंत्रविद्येचे काही फायदे—तोटे येथे दिले आहेत. याविषयीच्या अधिक माहितीसाठी 'तंत्रविद्या' ही नोंद पहावी). जीवविज्ञानाशी निगडित संशोधनामुळे पाळीव प्राण्यांच्या नवीन जाती, वनस्पतींचे अधिक चांगले किफायतशीर वाण, नवीन व अधिक प्रभावी खते पुढे आली. शिवाय सुधारित अवजारे व यंत्रसामग्री वापरण्यावर देण्यात आलेला भर, सिंचनाच्या सुधारित पद्धती, वनस्पतिरोगविज्ञानात झालेली प्रगती या सर्व गोष्टींमुळे शेतीची भरभराट होऊन कृषि-उत्पादनात मोठी वाढ झाली. विमाने व अवकाशयाने यांचा उद्योग विसाव्या शतकातच पुढे आला. तसेच अणुऊर्जा हा नवीन ऊर्जास्त्रोत याच शतकात पुढे आला व

सौर ऊर्जेचा वापर वाढत आहे. या सर्व उद्योगांमुळे आधुनिक मानवी जीवनातील पुष्कळ बाबतीत लक्षणीय बदल झाला आणि विज्ञान हे मानवी जीवनाचे एक अविभाज्य अंगच झाले.

विज्ञान विषयातील अनुभव हे विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक संकल्पना दृढ करण्यासाठी मदत करतात त्यासाठी मात्र विद्यार्थ्यांना मिळालेले विविध अनुभव हे महत्त्वपूर्ण ठरतात केवळ पारंपारिक शिक्षणाने वैज्ञानिक ज्ञानाची ओळख विद्यार्थ्यांना करून देताना मर्यादा येत असतात. अशावेळी विविध अध्यापन पद्धती बरोबरच प्रयोग दिग्दर्शन या पद्धतीचा आधार शिक्षकाला घ्यावा लागतो. वैज्ञानिक ज्ञान सत्याच्या आधारे सिद्ध करावे लागते त्यातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक सर्जनशीलता विकसित होत असते.

विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याच्या हेतूनेच नवनवे प्रयोग समाज , शाळा व शासनामार्फत केले जातात त्यात काळानुरूप बदल होत असून अशा बदलांपैकी अटल टिंकरिंग लॅब हे विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक सर्जनशीलतेला चालना देणारी महत्त्वपूर्ण प्रयोगशाळा मानली जाते.

शालेय विद्यार्थी व तरुणांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोण विकसित करण्याच्या उद्देश्याने निती आयोगाने अटल इनोव्हेशन मिशनच्या अंतर्गत अटल टिंकरिंग लॅब हा प्रयोग संपूर्ण देशभरात सुरू केला आहे. "अटल टिंकरिंग लॅब्स अगदी लहान वयातच समस्या सोडवण्याची मानसिकता विकसित करून शालेय शिक्षणात एक आदर्श बदल घडवून आणता येतो. त्यामुळे या प्रयोगशाळेचा फायदा केवळ एका शाळेपुरता मर्यादित नराहता जिल्हा पातळीवर होत आहे. त्यातून विद्यार्थ्यांची वैज्ञानिक सर्जनशीलता विकसित होऊन विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना दिली जात आहे. त्यातून विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक सर्जनशीलतेला चालना देता येते का ? याच्या शोध घेण्यासाठी संशोधन कार्य हाती घेतले होते.

**समस्या विधान:** विद्यार्थ्यांच्या विज्ञान अध्ययनातील अटल टिंकरिंग लॅब मधील तार्किक क्षमता विकसित करण्यासाठी राबवलेल्या कृती उपक्रम व परिणामकारकतेचा अभ्यास

**उद्दीष्ट:**

१. विद्यार्थ्यांच्या विज्ञान अध्ययनातील तार्किक क्षमतांच्या तुलनात्मक अभ्यास करणे.
२. विद्यार्थ्यांच्या विज्ञान अध्ययनातील अटल टिंकरिंग लॅब मधील तार्किक क्षमता विकसित करण्यासाठी राबवलेल्या कृती राबविणे.
३. विद्यार्थ्यांच्या विज्ञान अध्ययनातील अटल टिंकरिंग लॅब मधील तार्किक क्षमता विकसित करण्यासाठी राबवलेल्या कृती उपक्रम व परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

**संशोधनाची कार्यपद्धती**

| | |
|---|---|
| **संशोधन पद्धती** - प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीचा वापर केलेला आहे. | |
| **जनसंख्या** | प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या ही नंदुरबार जिल्ह्यातील नंदुरबार शहरातील माध्यमिक स्तरावर अध्ययन करणारे सर्वच विद्यार्थी संशोधनाची जनसंख्या होती. |
| **न्यादर्श** | प्रस्तुत संशोधनासाठी नंदुरबार जिल्ह्यातील नंदुरबार शहरातील माध्यमिक स्तरावरील १०० विद्यार्थ्यांचा सहेतुक नमुना निवड पद्धतीचा आधार घेऊन नमुन्याची निवड केली . |
| **संशोधन साधने** | विद्यार्थ्यांमधील तार्किक क्षमतांचा मूल्यमापन करण्यासाठी विज्ञान विषयावर आधारित असलेल्या तार्किक क्षमतां मूल्यमापन श्रेणीचा वापर करण्यात आला. |
| **संख्याशास्त्रीय परिमाणे**- प्रतिसादातून शेकडेवारीचा आधार घेऊन विश्लेषण करण्यात आले. | |


**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :** विद्यार्थ्यांच्या विज्ञान अध्ययनातील अटल टिंकरिंग लॅब मधील तार्किक क्षमता विकसित करण्यासाठी राबवलेल्या कृती उपक्रम व परिणामकारकतेचा अभ्यास याचा शोध घेण्यासाठी विद्यार्थ्यांना विचारलेल्या प्रश्नांना दिलेल्या प्रतिसादाच विश्लेषण खालील प्रमाणे करण्यात आले.

१. विद्यार्थ्यांच्या विज्ञान अध्ययनातील तार्किक क्षमतांच्या तुलनात्मक अभ्यास करणे.

**शोध घेणे.**


| कौशल्य | निरीक्षण क्षमता | समस्या निराकरण | अन्वेषण क्षमता | भेददर्शक क्षमता | वर्गीकरण क्षमता |
|---|---|---|---|---|---|
| विज्ञान अध्ययनातील तार्किक क्षमता | ५५ | ४० | ४० | ४० | ३० |

**माहितीचे विश्लेषण व निष्कर्ष** —वरील माहितीवरून विद्यार्थ्यांमध्ये वर्गीकरण क्षमता १४% निरीक्षण क्षमता २६% अन्वेषण क्षमता २२% समस्या निराकरण क्षमता १९% भेददर्शक क्षमता ही १९% दिसून आली.




२. विद्यार्थ्यांच्या विज्ञान अध्ययनातील अटल टिंकरिंग लॅब मधील तार्किक क्षमता विकसित करण्यासाठी राबवलेल्या कृती उपक्रम व परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

| कौशल्य | चाचणी | निरीक्षण क्षमता | समस्या निराकरण | अन्वेषण क्षमता | भेददर्शक क्षमता | वर्गीकरण क्षमता |
|---|---|---|---|---|---|---|
| विज्ञान अध्ययनातील तार्किक क्षमता | पूर्व चाचणी | ५५ | ४० | ४० | ४० | ३० |
| | उत्तर चाचणी | ७० | ७५ | ८० | ७० | ७५ |




**निष्कर्ष :** विज्ञान अध्यानातील तार्किक क्षमता पूर्वचाचणीच्या आधारे तपासल्या असत्या त्यात निरीक्षण क्षमता ५५% समस्या निराकरण क्षमता ४०% अन्वेषण क्षमता ४०% भेददर्शक क्षमता ४०% वर्गीकरण क्षमता ३०% याप्रमाणे होत्या. तर उपक्रम राबवल्यानंतर अटल टिंकरीलॅबद्वारे या क्षमता विकसित करण्याचा प्रयत्न केल्यानंतर यात उत्तर चाचणीत निरीक्षण क्षमता ७०% समस्या निराकरण क्षमता ७५% अन्वेषण क्षमता ८०% भेददर्शक क्षमता ७०% वर्गीकरण क्षमता ७५% विकसित झालेली दिसून येते.

वरील पूर्वचाचणी व उतरचाचणी यांची तुलना केली असता असे दिसून येते की, निरीक्षण क्षमतेत १५% टक्क्याने वाढ झालेली आहे. समस्या निराकरण क्षमता ही ३५% टक्क्याने वाढ झालेली आहे. तर अन्वेषण क्षमता ४०% ,भेददर्शक क्षमता ३०% व वर्गीकरण क्षमता ३५% टक्क्यांनी वाढ झालेली दिसून आली. यावरून असे सांगता येईल, की पूर्व चाचणी पेक्षा उत्तर चाचणीत विद्यार्थ्यांच्या विज्ञान विषयातील तार्किक क्षमतांचा विकास करण्यासाठी राबवलेल्या अटल टिंकरिंग लॅब मधील विविध कृती उपक्रमांची परिणामकारकता दिसून आली .

**संदर्भग्रंथसूची**

१. आगलावे प्रदिप (२०००) "संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्र" नागपूर, विदया प्रकाशन
२. उमाठे वि. तु. व मुळे रा. श.(१९८७) " शौक्षणिक संशोधनाची मूलतत्वे " पुणे, नुतन प्रकाशन
३. गणेश चव्हाण, (२०१२) अध्ययन अध्यापन प्रक्रिया, नाशिक : इनसाईट प्रकाशन
४. कुंडले म.बा. अध्यापनशास्त्र व पध्दत, पुणे: नित्यनूतन प्रकाशन
५. जगताप, ह. ना., शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने, पुणे: नित्यनूतन प्रकाशन
६. अटल टिंकरिंग लॅब हस्तपुस्तिका **नवीन दिशा नवीन निर्मिती नवा भारत** जानेवारी २०१९ निती आयोग

# "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार"

संशोधक

**प्रिती ताराचंद निकाळजे**

देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

मार्गदर्शक

**डॉ. आर. एन. आलटे**

संशोधन मार्गदर्शक समाजशास्त्र विभाग स्वामी विवेकानंद

महाविद्याल, मंठा जि. जालना

**प्रस्तावना:-**

स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतातील सामाजिक स्थितीचा विचार केला असता संपूर्ण भारतावर ब्रिटिशांची अधिसत्ता होती. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी भारतातील विविध प्रांतात अनेक अंदोलने सुरु होती. सामाजिक परिस्थितीचा विचार केला असता, भारताच्या विविध प्रांतात ब्राम्हणेत्तरांनी केलेल्या चळवळीचा जोर वाढला. विशेषत: मद्रास व माहराष्ट्र या चळवळीचे दूर गामी परिणाम झाले होते. या संदर्भात खैरमोडे म्हणतात मी, "1900 -. 1920" च्या काळात अनेक सामाजिक, धार्मिक, राजकीय चळवळी हिंदुस्थानात झाल्या त्यात मद्रास व महाराष्ट्र येथील ब्राह्मणेत्तरांची चळवळ ही अद्य चळवळीचे प्रणेते महात्मा जोतीबा फुले होते व त्या चळवळीनंतरचे सुत्रधार राजर्षी छत्रपती शाहू हे होते. ब्राम्हणेतर चळवळीत सत्यशोधक समाजाचे तमाशे अग्रभागी असत. ही चळवळ बहुजन समाजात जागृती करण्याची होती.

डॉ.आंबेडकरांच्या काळातील आर्थिक स्थितीचा विचार केला असता, स्वातंत्र्यपुर्व काळात भारतातील बहुसंख्य समाज हा खेड्यामध्ये विखूरला होता. 80 टक्के लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हाच होता. संपूर्ण अर्थव्यवस्था शेती भोवतीच केंद्रित झाली होती आणि 20 टक्के लोक हे इतर व्यवसयात गुंतलेले होते. ते ही व्यवसाय शेतीशीच संबंधीत होते. बलुतेदार पध्दती येथील अर्थव्यस्थेचा आधार होता.खेड्यातील लोकांच्या दैनंदिन गरजा ह्या बलुतेदारी मुळे पुर्ण होत असे या बलुतेदारी पध्दतीत प्रत्येक जातीने आपला वंशपरंपरागत व्यवसाय करावा असे बंधन होते, कारण हे जातीव्यवस्थेचे नियम होते आणि म्हणूयन इतर व्यवसाय करण्याची इच्छा असतांनाही ठरवून दिलेलाच व्यवसाय करावा लागे. "व्यक्तीला स्वत:चा आवडी निवडीनुसार वेगळा व्यवसाय निवडण्याचे स्ववातंत्र्य नव्हते. तिचा व्यवसाय आणि सामाजिक दर्जा जन्मावरुनच निश्चित होत असे. कनिष्ट जातीच्या लोकांना उच्च जातीच्या लोकांची सेवा करावी हा विचार येथे अभिप्रेत होता. त्यामुळे कनिष्ट जातीच्या व्यक्ती सामाजिक अन्यायाच्या बळी झाल्या होत्या. त्यांना मर्यादित प्रमाणाववर आर्थिक सुरक्षितता लाभली असली तरी एकंदरीत त्यांची आर्थिक स्थिती अतिशय हालाखीची होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शैक्षणिक कार्याचा विचार केला. केवळ अस्पृश्य वर्गालाच शिक्षण मिळाले पाहिजे एवढा मर्यादित हेतू त्यांचा नव्हता तर सर्व जाती धर्माच्या लोकांना शिक्षण घेता आले पाहिजे म्हणून त्यांनी 'पिपल्स एज्युकेशन सोसायटी' नावाची संस्था स्थापन करुन अनेक महाविद्यालय निर्माण केले. "पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या नांवाची एक शिक्षण संस्था 1946 साली स्थापना केली या संस्थेच्या वतीने 20 जून 1946 रोजी मुंबईत सिध्दार्थ कॉलेज नांवाचे महाविद्यालय स्थापन केले. औरंगाबाद येथे मिलींद महाविद्यालय स्थापन केले"[1] डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांचा सहभाग महत्वाचा मानला होता. स्त्रियांच्या शिक्षणावरुन डॉ.आंबेडकर त्या त्या समाजाचे प्रगतीचे मुल्यमापन करत असे. दिनांक 20 जुलै 1942 रोजी नागपूर येथे आयोजित "ऑल डिप्रेस्ड क्लासेस वुमेन्स कॉन्फरंस" मध्ये महिलांनाच उद्देशुन केलेल्या भाषणात डॉ. आंबेडकर म्हणतात की, "स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरुन एखाद्या समाजाची प्रगती मी मोजत असतो."[2] स्त्रियांची समाजात प्रतिष्ठा असली पाहिजे तिचा सामाजिक

दर्जा उंचावला पाहिजे तिला वडिलोपार्जित संपत्तीत समान हिस्सा मिळाला पाहिजे या साठी डॉ आंबेडकरांनी 'हिन्दु कोड बिलाची निर्मिती केली' बाबासाहेबांनी हे उद्गार हिंन्दु कोड बिलाच्या मसुद्यावरील सर्वसाधारण चर्चेच्या वेळी काढलेले आहेत. हिंन्दु कायद्याच्या संहितीकरण विषयीच्या विधेयकाला बाबासाहेबांच्या लेखी अनन्यसाधारण महत्व होते. कारण पूर्वी म्हंटल्याप्रमाणे त्यायोगे स्त्रियांच्या बाबतीत केल्या जाणा-याभेदभावाला आळा बसून त्या अधिक सक्षम बनतील हा त्यांना विश्वास होता"[3] डॉ.आंबेडकरांनी स्त्रियांच्या प्रगतीकरिता टाकलेले पाऊल म्हणजेच हे ' हिंदु कोड बिल ' होय समस्त स्त्री वर्गाचा विचार डॉ. आंबेडकरंनी या हिंदु कोड बिलात केलेला दिसतो. डॉ. बाबासोब आंबेडकर यांच वेगळपण हे त्यांच्या सामाजिक शैक्षणिक राजकीय आर्थिक धार्मिक, विचारावरुन व कार्या वरुन दिसून येते. सामाजिक सुधारणेच्या बाबतीत त्यांचा दृष्टीकोन इतर सुधासरकांपेक्षा वेगळया स्वरुपाचा दिसून येतो. जसे की महात्मा गांधी हे अस्पृश्याकडे सहानुभुती व दयेच्या दृटीकोनातून पाहत तर डॉ.आंबेडकर या प्रश्नाचा मुलभूत अर्थाने कसे सोडविता येईल या अर्थाने पाहतात. डॉ. आंबेडकरांनी महात्मा गांधीचा दृष्टीकोन हा मुलत: सवर्णानी अस्पृश्याकडे सहानुभुतीने पहावे. अस्पृष्यता हा हिंदु धर्मावरील कलंक आहे. ते पाप आहे आणि ते स्पृश्य समाजाने धुवून काढले पाहिजे ही गांधीजींची भूमिका होती. परंतु दलित जनता जर सहानुभुतीची वा दयेची लक्ष बनली तर त्यांच्यात स्वामिमाना ऐवजी लाचारी निर्माण होईल. अशी भिती डॉ.आंबेडकरांना होती व ती खरीही होती. जे दलित नेते गांधीजींच्या मागे गेले ते लाचार बनले ही गोष्ट इतिहासाने सिध्द केली.[4] डॉ.आंबेडकरांना आपले कार्य तडीस नेण्यासाठी अनेक गोष्टीचा त्याग करुन मोठेपणा मिळाविता होता." भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा गौरव झाला पण त्यांसाठी त्यांना अनेक अग्निदिव्ये करावी लागली ते म्हणतात 'पददलित माणसांना हाल अपेष्टांच्या आणि त्यांगाच्या अग्निदिव्यातून गेल्या शिवाय मोठेपणा प्राप्त होणार नाही. आपला भविषकाळ घडविण्यासाठी यांना वर्तमान काळातील सुखांचा आणि गरजांचाही त्याग केला पाहिजे. झागडा आणखी झागडा, त्याग करा आणि त्याग करा, त्यागाची आणि हालाची पर्वा न करता एक सारखं लढाई चालू ठेवाल तरच मुक्त व्हाल '.[5] मतदानाचा अधिकार मिळवून दिला मतदान करण्याचा अधिकार जसा पंतप्रधानांचा असेल तोच अधिकार त्यांनी महानगरपालिकेतील कर्मचा-यांना मिळवून दिला. या संदर्भात ज्ञानराज गायकवाड असे म्हणता की, "डॉ.आंबेडकर यांनी स्वतंत्र भारताच्या राज्य घटनेच्या माध्यमातून भारतीय मतदारांना एक महत्वाचा सिध्दांत दिला ".

**गृहितके**

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या विकासासाठी मुलभूत विचार मांडलेले आहेत.
2) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्यासाठी कृती कार्यक्रम दिलेला आहे.

**उद्दिष्टे**

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री शिक्षण विषियक विचार समजावून घेणे.
2) डॉ.बाबासोब आंबेडकरांच्या स्त्री - सुधारणा विषयक दृष्टीकाकेनाचा अभ्यास करणे.

**संदर्भ सूची**

1) मंगुडकर मा.प. (2006), लोकराज्य अंक-8, जनसंपर्क महासंचनालय, मंत्रालय मुंबई पान 22.
2) कित्ता पान नं. 224.
3) कित्ता पान नं. 114.
4) गवळी टी.ए., हिवराळे सुखराम 1991, गवळी प.ए., गव्हाणे सुधीर, डॉ बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती पान न. 173
5) फडके भालचंद्र (1985) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री विद्या प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती पान क्र. 226.

# शिक्षण क्षेत्रातील बदल नवीन शैक्षणिक धोरण 2020

**Shri. Gajanan Kondiba Choudhuri**
Assistant Teacher
AT ZPPS Pardi Khurd TALUKA. Basmath District- Hingoli

नवीन शैक्षणिक धोरण (NEP) 2020 हे एक भविष्यवेधी शैक्षणिक धोरण आहे. भारताला जर महासत्ता बनून विश्वाचे नेतृत्व करायचे असेल तर तसा समर्थ नागरिक घडविणे हे महत्त्वाचे आव्हान आहे. त्याच उद्देशाने भारतातील शिक्षण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी या धोरणाची आखणी करण्यात आली आहे. NEP 2020 अंतर्गत भारतातील शालेय शिक्षणाच्या नवीन संरचनेचा आराखडा 5+3+3+4 असा असेल.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण/National Educational Policy :-**

भारतातील शिक्षणाचा ढाचा जागतिक आव्हानांशी सुसंगत बनविला आहे. या धोरणात ग्रामीण आणि शहरी भारतातील प्राथमिक शिक्षण ते उच्च शिक्षणाचा समावेश करण्यात आलेला आहे. भारतातील शैक्षणिक धोरणाच्या विकासाचे प्रामुख्याने तीन टप्पे मानता येतील. १) कोठारी आयोगाच्या आहावलावर आधारित 1968 मध्ये पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळातील शैक्षणिक धोरण.

२) पंतप्रधान राजीव गांधी यांनी 1986 जाहीर केलेले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि

३) मा.श्री.नरेंद्र मोदी यांनी 2020 मध्ये जाहीर केलेले NEP.

**नवीन शैक्षणिक धोरणाविषयी महत्वाचे मुद्दे :-**

- “भारताला जागतिक ज्ञान महासत्ता” बनविणे हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे अंतिम उद्दीष्ट आहे.
- मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून शिक्षण मंत्रालय ठेवले गेले.
- 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतातील शिक्षण प्रणालीतील हा तिसरा मोठा बदल आहे.
- एनईपी 2020 च्या पूर्वी 1968 आणि 1986 मध्ये शैक्षणिक यंत्रणेत सुधारणा झाली.
- शालेय शिक्षणातील गुंतवणुकीमध्ये लाक्षणिक वाढ करणे.
- नवनवीन उपक्रम राबविणे.
- इसवी सन 2025 पर्यंत पाचवी व त्यापुढील इयत्तेतील प्रत्येक विद्यार्थ्यास पायाभूत साक्षरता व तंत्रज्ञान आत्मसात होत असल्याची दक्षता घेणे.
- शालेय शिक्षणासाठी ५+३+३+४ रचनेवर आधारित बौद्धिक विकास व अध्ययनाच्या तत्त्वांवर आधारित अभ्यासक्रम व अध्यापन शास्त्र रचना विकसित करण्यात आली आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि संधी :-**

विद्यार्थ्यांसाठी संधी :-

१) **दर्जेदार शिक्षण :** शालेय शिक्षणापासून तर उच्च शिक्षणापर्यंत शैक्षणिक दर्जा उंचावण्यावर या शैक्षणिक धोरणात भर दिल्यामुळे दर्जेदार शिक्षण मिळण्याची संधी निर्माण होणार आहे.

२) **बाल्यावस्थेत लाभ :** बाल्यावस्थेतील प्रारंभिक शिक्षणाचा शालेय शिक्षणाच्या आकृतीबंधामध्ये समावेश केल्यामुळे बाल्यावस्थेपासून अतिशय उत्तम दर्जाचे शिक्षण मिळण्याची संधी निर्माण होते.

३) **आवडीनुसार शिक्षण :** अभ्यासक्रम निवडीच्या लवचिक धोरणामुळे या शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थी त्यांच्या आवडीनुसार व गरजेनुसार शिक्षण घेऊ शकतात.

४) **तंत्रज्ञान कुशलता :** पूर्व माध्यमिक स्तरावर कोडिंग व माध्यमिक स्तरावर आर्टिफिशियल इंटेलिजन्स यासारखे विषय शिकवले जाणार असल्यामुळे विद्यार्थी तंत्रज्ञान कुशल बनविण्यास संधी मिळते.

५) **रोजगारक्षम कौशल्य विकसन :** प्रात्यक्षिक व अनुभवावर आधारित अध्ययन अध्यापनास प्रोत्साहन देण्याच्या धोरणामुळे रोजगारास सक्षम बनवणाऱ्या कौशल्यांचा विकास करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळते.

६) **सोयीनुसार शिक्षण** : ऑनलाइन किंवा ऑफलाइन यापैकी कोणत्याही माध्यमातून शिक्षण घेण्याची संधी विद्यार्थ्यांना निर्माण करून दिली जाते, त्यामुळे या धोरणाच्या माध्यमातून विद्यार्थी स्वतःच्या सोयीनुसार व वेळेनुसार शिक्षण घेऊ शकतात.

७) **शिष्यवृत्ती** : गुणवत्ता विकासासाठी व सर्वांना समान शैक्षणिक संधी निर्माण करण्यासाठी विविध शिष्यवृत्तीचे प्रयोजन या शैक्षणिक धोरणात करण्यात आले आहे त्यातून शैक्षणिक गुणवत्ता विकासाची संधी निर्माण होते.

८) **बहुभाषिकत्व :** मातृभाषेबरोबरच शालेय स्तरावर किंवा उच्च शिक्षणामध्ये परराष्ट्रीय भाषांचे शिक्षण घेण्याचे धोरण बहुभाषिक बनण्याची संधी निर्माण करते.

**शिक्षकांसाठी संधी :-**

१) **गुणवंतास संधी :** नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षक पात्रता व निवड प्रक्रियेत गुणवत्तेवर अधिक भर दिल्याचे आढळून येते, त्यामुळे गुणवंत व्यक्तीस शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याची संधी मिळते.

**२) रोजगाराची संधी** : जास्तीत जास्त मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी नवीन शैक्षणिक संस्थांची उभारणी करणे या धोरणात अपेक्षित आहे.त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगाराची संधी निर्माण होते.

३) **व्यावसायिक विकासाची संधी:** शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तीने सातत्याने आपला व्यवसायिक विकास करत गेले पाहिजे हे या धोरणात अपेक्षित आहे.तसेच त्यास पूरक संधी सुद्धा या धोरणामध्ये अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.

४) **आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी:** विविध शैक्षणिक विभागांची किंवा संस्थांची क्लबिंग करून शिक्षकांस राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी निर्माण करून दिली.

५) **नवोपक्रमास वाव:** विविध अध्यापन पद्धती व तंत्रज्ञानाची साथ घेऊन शिक्षकास नवोपक्रम राबवण्यास व गुणवत्ता विकास करण्यास संधी निर्माण करून देण्यात आली आहे.

६) **संशोधन व गुणवत्ता विकास:** संशोधन कार्यास विविध माध्यमातून निधी उपलब्ध करण्याचा प्रयत्न या धोरणाच्या माध्यमातून केला जाणार असल्याचे लक्षात येते, त्यामुळे संशोधन व गुणवत्ता या दोन्ही कार्यात गतिमानता येते.

**धोरणाच्या अंमलबजावणीचे सरकारसमोरील आव्हान :-**

एकाचवेळी इतक्या मोठ्या व्यवस्थेला गतिमान करणे आणि त्यांच्यापर्यंत हे सारे बदल पोहोचवणे मोठे आव्हान असणार आहे. देशातील उच्च शिक्षण, उच्च शिक्षणाला अधिक प्रगतीशील बनवण्यासाठी, विज्ञान, अभियांत्रिकी आणि गणिताबरोबरच विद्यार्थ्यांची समस्या सोडवण्याची सर्जनशीलता सुधारण्यासाठी कला आणि डिझाईन विचारांची आवश्यकता आहे. शिक्षण हे अनुभवात्मक, अनुप्रयोग, संशोधन-आधारित आतंरवासिका देखील असणार आहे. मात्र, उच्च शिक्षण 70 टक्के खासगी व्यवस्थापनाच्या हाती आहे. त्यांना यात सहभागी करून घेताना त्यांना गतिमान करणे आवश्यक आहे. धोरण उत्तम आहे. मोठ्या प्रमाणावर बदल सूचवले आहे.शिक्षणाचे डिजिटलायझेशन सूचविले आहे.विविध संस्थांची नव्याने निर्मिती अपेक्षित आहे. शिक्षकांचे सातत्यपूर्ण प्रशिक्षण आहे. हे सारे बदल करण्यासाठी राज्य व केंद्र सरकारने आर्थिक गुंतवणूक करण्याचे मोठे आव्हान आहे.

देशात 1964 कोठारी आयोगाने राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहा टक्के खर्च शिक्षणावर करावा असे म्हटले होते. मात्र, अद्याप ते यश मिळू शकले नाही. आज आपण शिक्षणावर खर्च केवळ तीन टक्के करत आहोत. त्यामुळे गुंतवणूक वाढविल्याशिवाय आपल्याला धोरणाच्या अंमलबजावणीला पुरेसे यश मिळण्याची शक्यता नाही. शिक्षणात ऑनलाईनवर भर देण्यात आला आहे. मात्र, आजही राज्यातील आदीवासी, ग्रामीण, दुर्गम भागात इंटरनेट सुविधा नाही. ई-लर्निंग हाच पुढे जाण्याचा मार्ग आहे. 'डिजिटल' पायाभूत सुविधांमध्ये 'डिजिटल' क्लासरूम, कौशल्य, ऑनलाईन अध्यापन मॉडेल, शारीरिक शिक्षण आणि प्रयोगशाळेच्या पायाभूत सुविधांमधील तफावत दूर करण्यासाठी तंत्रज्ञान, शाळांमध्ये

एकसमान मूल्यांकन योजना, व्यवसाय मार्गदर्शन, समुपदेशन, शिक्षक प्रशिक्षण यांचा समावेश असणार आहे. त्यामुळे या सुविधा सर्व शाळांमध्ये उपलब्ध करून देणे आव्हान ठरणार आहे. नवे बदल स्वीकारण्यासाठी माणसे आणि पैसा या गोष्टी महत्त्वाच्या असल्या तरी त्याकरिता मनुष्यबळ, पालक, शिक्षक, विद्यार्थी या सर्वांच्या मानसिकतेत बदल घडवून आणावा लागणार आहे. धोरणांच्या अनुषंगाने काय विचार करायचा, यापासून कसा विचार करायचा असे परिवर्तन आवश्यक आहे. मात्र, आव्हाने खूप असली तरी राजकीय इच्छाशक्ती असेल, तर धोरणाची अंमलबजावणी कठीण नाही. राज्य सरकारने त्यादृष्टीने पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी अभ्यासगट कार्यरत झाले आहेत. त्यामुळे बदल होतील, पण सारेच बदल तत्काळ होतील असे नाही. त्यासाठी प्रतीक्षा करावी लागेल. धोरणाची अंमलबजावणी घाईने करण्याऐवजी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली संयमाने करत प्रभावी पावले टाकण्याची गरज आहे.

**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण रचना :-**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये 5+3+3+4 या चार टप्प्यात रचनात्मक बदल करण्यात आलेला आहे.

**पहिला टप्पा -** प्रथम पाच वर्षामध्ये पूर्व प्राथमिक शिक्षणाची तीन वर्ष व इयत्ता पहिली व दुसरी चा समावेश आहे.
या स्तरावरील अभ्यासक्रमामध्ये खेळ, शोध, कृती आधारीत शिक्षण देण्यात येणार आहे. विद्यार्थी इयत्ता तिसरीत प्रवेशित होईपर्यंत त्यास समजपूर्वक वाचन व लेखन करण्यास सक्षम बनविण्याच्या उद्देशाने अभ्यासक्रमाची रचना करण्यात येणार आहे. या प्रकारे अभ्यासक्रमामध्ये निर्मितीसाठी स्थानिक खेळणी. स्थानिक भाषांचा समावेश असून आनंददायी अभ्यासक्रम तयार करण्यात येणार आहे.

**टप्पा दुसरा -** इयत्ता तिसरी ते पाचवी

या तीन वर्षामध्ये इयत्ता तिसरी ते पाचवी या वर्गामध्ये कृती व खेळ आधारित परस्पर संवादी अभ्यासक्रम विकसित करून विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकास साध्य करण्यात येणार आहे.

**टप्पा तिसरा -** इयत्ता सहावी ते आठवी

या तीन वर्षामध्ये इयत्ता सहावी ते आठवी करिता कृती आधारित प्रायोगिक अभ्यासक्रमाची आखणी करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना व्यावसायिक हस्तकला व कौशल्य विकास करण्याच्या दृष्टीने शिक्षण देण्यात येणार आहे.

**टप्पा चौथा -** इयत्ता नववी ते बारावी

या चौथ्या टप्प्यात इयत्ता नववी ते बारावी या चार वर्षात चाळीस वेगवेगळ्या विषयांचा अभ्यास करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. विद्यार्थ्यांना त्याच्या आवडीप्रमाणे विषय घेण्याची मुभा देण्यात येणार आहे. इयत्ता दहावी व इयत्ता बारावी बोर्डाच्या परिक्षेचे अवास्तव महत्त्व कमी करण्यात येईल. उच्चमाध्यमिक वर्गामध्ये कला, विज्ञान व वाणिज्य हा शाखाभेद न ठेवता आवडीचे विषय निवडता येतील तसेच पुढे पदवी पातळीवरही आवडीचे विषय निवडता येतील.

अभ्यासक्रमातील ओझे कमी करून खेळ, कृती व शोध आधारित अभ्यासक्रम तयार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे संबोध, आकलन, उपयोजनावर भर, गणिती दृष्टिकोन, वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशील विचार, चिंतनशिल विचार, सहसंबंधात्मक अध्ययन, संवाद कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम तयार केला जाणार आहे. केवळ पाठांतर करुन परीक्षेत मिळणाऱ्या गुणांचे अवास्तव महत्त्व कमी करून कौशल्य व क्षमता विकसनावर भर देण्यात येणार आहे. अध्ययन निष्पत्तीच्या आधारे मुलांची गुणवत्ता तपासली जाणार आहे. केवळ गुण न नोंदविता क्षमता / कौशल्य विकसनाची स्थिती प्रगती पुस्तकात नोंदवून सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेला चालना दिली जाणार आहे. त्याचप्रमाणे बहुविद्याशाखीय अभ्यासक्रमाची निर्मिती केली जाणार आहे. विद्यार्थ्यांना विषय निवडीचे स्वतंत्र्य दिले जाणार आहे.

**सारांश**

कोणत्याही देशाच्या भविष्याला आकार देण्यात शिक्षण व्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा वाटा असतो. प्राचीन भारत आपल्या शिक्षणाच्या जोरावरच शिक्षणाची जागतिक बाजारपेठ होता. नालंदा आणि तक्षशिला या विद्यापीठाच्या नावाने आजही प्रत्येक भारतीयाला गौरवाची भावना प्रत्ययाला येते. तो गौरव आणि गतवैभव पुनः प्राप्त करून देण्यात NEP महत्त्वाची भूमिका निभवेल यात संशय नाही.

# भारताची महासत्तेकडे वाटचाल आणि मराठी साहित्यातील जाणिवा

**प्रा. राजरत्न कि. दवणे**

मराठी विभाग, डी बी जे महाविद्यालय, चिपळूण, जि. रत्नागिरी.

**प्रस्तावना**

जागतिक पातळीवर '**महानशक्ती**' असा दर्जा मिळवलेल्या राष्ट्राचे वर्णन करताना **महासत्ता** हा शब्दप्रयोग वापरला जातो. १९४४ या कालखंडात या शब्दाचे उच्चारण केले. दुसऱ्या महायुद्धाच्या नंतर या शब्दाला/ संकल्पनेला अधिक व्यापक अर्थाने व संदर्भाने पाहिले जाते. भारत २०२० पर्यंत महासत्ता होईल; किंवा तसे करण्याचे प्रयत्नशील स्वप्न **ए.पी.जे. अब्दुल कलाम** यांनी भारताला दाखवले. 'आज भारत महासत्तेच्या दिशेने वाटचाल करतोय.' असे अनेक राजकीय व विविध क्षेत्रातील तज्ञ आपले चिंतन व्यक्त करताना दिसतात. या चिंतनाचा तसेच महासत्ता या संकल्पनेचा विचार या निबंधात करणे तसेच महासत्तेच्या वाटचालीचे वास्तव की आभास असाही विचार मांडणे येथे गरजेचे आहे. साहित्य-कला हे तत्कालीन सामाजिक, राजकीय, आर्थिक व विविध क्षेत्रातील स्थित्यंतराचे यश-अपयशाचे समग्र अवकाश प्रखडपणे व्यक्त करणारे प्रतिबिंब असते; म्हणून मराठी साहित्यात महासत्तेकडे वाटचाल करणाऱ्या आपल्या देशाचा वास्तव चेहरा साहित्यातून कसा अभिव्यक्त झाले आहे? या जाणिवांचेही चिंतन व्हावे या अपेक्षेने/हेतूने विवेचन करीत आहे. या करिता **गृतके** - १) महासत्ता या शब्दाची व्याप्ती व भारत महासत्तेच्या निकष पूर्ततेवर सिद्ध आहे का? हे ज्ञात होईल. २) महासत्तेच्या वाटचालीतील देशाच्या सांस्कृतिक अवकाशाचे मराठी साहित्यातून अभिव्यक्त होणारे विविध पैलू पाहता येतील. .३) महासत्तेची अपेक्षा करणाऱ्या भारत देशाच्या वास्तविक परिस्थितीचा आढावा घेता येईल. या गृहीतकांना केंद्रित/निश्चित करून **दुय्यम संशोधन पद्धतीच्या** माध्यमातून या शोधनिबंधाचे १) भारताची महासत्तेकडे वाटचाल: संभाव्यता व या संदर्भातील २) मराठी साहित्यातील अभिव्यक्त होणाऱ्या जाणिवा. अशा दोन भागात निबंधाचे विभाजन करून माझे मत / विवेचन मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

भारत देश महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे; असे म्हणत असताना नेमके 'महासत्ता' होणे म्हणजे काय? तर, ' विशिष्ट राज्याचे अथवा राष्ट्राचे जागतिक स्तरावर प्रभाव पाडणारी शक्ती, प्रबळ क्षमता असलेले वैशिष्ट्ये होत'. प्रभाव पडण्याच्या दृष्टीने आर्थिक, ज्ञान व तंत्रज्ञान, लष्कर/संरक्षण यंत्रणा, जागतिक राजकीय संबंध / राजकारण व सांस्कृतिक या वैशिष्ट्यांचे अथवा घटकांचे सामर्थ्य प्रभावशाली असणे होय. या घटकांच्या सामर्थ्यावरच जागतिक स्तरावर आपला प्रभाव पाडण्यास राज्य सक्षम असतात. जागतिक कोणत्याही समस्येवर अथवा प्रश्नावर अशा सामर्थ्यशाली राज्याचा सल्ला घेतल्याशिवाय कारवाई केली जाऊ शकत नाही. महासत्ता म्हणजे नेमके काय ? या संदर्भातली सर्व सहमती दर्शक अशी एक कोणतीही व्याख्या नाही. परंतु महासत्तेची प्रचिती देणारे भूगोल, लोकसंख्या, अर्थव्यवस्था, संसाधने, सैन्य, मुत्सद्येगिरी आणि राष्ट्रीय ओळख हे प्रभुत्व मिळवणारे राष्ट्राचे सात घटक सर्वत्र मान्य केल्याचे दिसून येतात. तरीही विविध कालखंडात या शब्दाचा अर्थ बदललेला दिसतो. विलियम टीआर फॉक्स यांच्या द्वारे, "१९४४ सालात एका नव्या शक्तीची ओळख करून देण्यासाठी ज्यामध्ये जगातील सर्वोच्च स्थान धारण करण्यास सक्षम आहे तो महासत्ता' असा शब्दप्रयोग वापरण्यात आला. "[१] लायन मिलर यांच्या मते, "महासत्तेच्या उंचीचे मूलभूत घटक शक्तीच्या चार अक्षरांवर मोजले जाऊ शकतात. लक्षरी, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक तर रिचर्ड नोसल यांच्या मते, "साधारणपणे हा शब्द एका राजकीय समुदायाला सुचित करण्यासाठी वापरला जात होता. ज्या समुदायाने महाद्विपीय आकाराचा भूभाग व्यापला होता; लोकसंख्या मोठ्या प्रमाणात होती; एक उच्च आर्थिक अन्न आणि नैसर्गिक संसाधनाचा पुरेसा स्वदेशी पुरवठा होता. या करिता क्षमता होती ; आंतरराष्ट्रीय संभोगावर उच्च प्रमाणात गैर-

अवलंबित्वाचा आनंद लुटला; आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे एक सु-विकसित आण्विक क्षमता होती." (२) वरील दोन्हीही व्याख्यांचा विचार करता असे लक्षात येते की, सुरुवातीच्या कालखंडात युद्धनीतीचा व जनतेची क्षमता असण्याच्या दृष्टीने महासत्ता हा शब्दप्रयोग आल्याचा दिसतो. पुढे तो शब्दप्रयोग भूभाग, लोकसंख्या, स्वनिष्ठा, आर्थिक स्वायत्तता, अन्नधान्य व संसाधने या दृष्टीने स्वायत्तता सशक्त व स्वयंपूर्ण असलेली संस्कृतीतता या घटकासह शब्दप्रयोग वापरला गेल्याचे दिसून येते. या अनुषंगाने इतिहासात पोर्तुगीज, इजिप्त, ब्रिटिश, मोगल, नेपोलियन फ्रेंच राज्य, मौर्य साम्राज्य, गुप्त साम्राज्य यांच्या महासत्ता सर्वपरिचित आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर युनायटेड स्टेट यांची महासत्ता आज तागायत दिसून येते. तसेच महासत्तेच्या स्पर्धेत चीन, रशिया आज अग्रगण्य असलेला पहावयास मिळतो. २०३० पर्यंत चिन, रशिया आणि भारत संभाव्य महासत्तेचा दावेदार असल्याचेही अनेक विचारवंत भाकीते व्यक्त करतांना दिसतात. इथे भारताच्या दृष्टीने वरील राष्ट्राच्या प्रभावशाली घटकांच्या/ वैशिष्ट्यांच्या अनुषंगाने भारताचा विचार करूया.

**१) भूभाग/ भौगोलिकता**

भारतीय भौगोलिक परिस्थिती ही साधन, संपत्ती, व्यापार, दळणवळण या करिता किती पूरक आहे याचे विविध दाखले पोर्तुगीज यांच्या विचारातून आणि ब्रिटिश सत्तेच्या कालखंडातील व्यापारी धोरणातून स्पष्ट आहेच. भारताचे मध्यवर्ती स्थान, तिची वैभव साधन-संपत्ती, व्यापारी बंदरे व संरक्षणाच्या दृष्टिकोनातून भारताचा असलेला भूभाग अतिशय सक्षम व वैशिष्ट्यपूर्ण आहे. उत्तरेला काराकोरम हिमालय पर्वत आहे; तर तीन बाजूंना समुद्र आहे. "भारताला एकूण ३२ लाख ८७ हजार वर्ग किलोमीटरचे क्षेत्रफळ आहे"(३) इतर भूभागांना व देशांच्या सीमांना सहज जोडणारे भू-क्षेत्र आहे. जवळजवळ साडेसात हजार किलोमीटर समुद्र किनारपट्टी असल्यामुळे परकीय व्यापार समुद्र मार्गाने होऊ शकतो. भारतातून उगम पावलेल्या नद्या, जलसिंचनाच्या सोयी, वीज निर्मितीचे प्रकल्प, त्या त्या भूभागाच्या वैशिष्ट्यपूर्ण क्षेत्रात सापडणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्ती व खनिजे यामुळे इतर देशाच्या तुलनेत भारत बलस्थ असलेला दिसतो.

**२) लोकसंख्या**

एप्रिल २३ च्या संयुक्त राष्ट्राच्या बैठकीत जाहीर केल्याप्रमाणे भारताची लोकसंख्या जगातील सर्वात जास्त असून लोकसंख्या वाढीचा दर सकारात्मक आहे. यातील निम्मी लोकसंख्या तरुण आहे, म्हणजेच २५ वर्षापेक्षा कमी असलेली दिसून येते. ही लोकसंख्या उद्योग, कर्मचारी, व्यापार, सैन्य, विज्ञान-तंत्रज्ञान या दृष्टीने प्रत्येक क्षेत्रात भविष्यात उपयोजित असू शकते. म्हणून शक्तिशाली लोकसंख्येच्या दृष्टीने भारत अग्रगण्य आहे. याचबरोबर भारतीय वंशाच्या लोकांची संख्या इतर देशांमध्ये विविध क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावताना दिसतात. ही संख्या सुद्धा इतर देशाच्या तुलनेत विक्रमी आहे.

**३) ज्ञान विज्ञान प्रगती**

प्राचीन काळापासून भारतीयांना अवकाश संशोधनात रुची असल्याचे दिसून येते . पाचव्या शतकातील भास्कराचार्य त्यांनी गणिताबरोबरच खगोलशास्त्रातही महत्वाची भूमिका बजावली. या मागे जाऊन बौद्धकालीन संस्कृती भूगर्भ, अवकाश, तर भदंत नागार्जुन यांनी रसायन शास्त्रात महत्त्वाचे कार्य केले आहे. भारताने १९७५ मध्ये पहिल्या कृत्रिम उपग्रह अवकाशात सोडला आणि आज इस्त्रो मार्फत अनेक उपक्रम हाती घेतले व यशस्वी केलेलेही दिसून येतात. मंगलयान, चंद्रयान -१, चंद्रयान-२, आदित्य-१ इत्यादी मोहिमांच्या यशस्वी वाटचालीचा परिणाम जागतिक पातळीवर भारताच्या ज्ञान-विज्ञान-अवकाश संशोधनाच्या दृष्टीने स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व / वेगळी आयडेंटिटी निर्माण केलेली दिसून येते.

**४) संरक्षण**

कोणत्याही देशाच्या विकासाबरोबरच देशाचे भू-राजकीय स्थान हे मजबूत होते. जोपर्यंत देशाच्या बाह्य सीमा सुरक्षित नसतील किंवा देशांतर्गत शांतता नसेल तोपर्यंत त्या देशाच्या विकासाला पोषक वातावरण निर्माण होऊ शकत

नाही. भारताच्या बाह्य सीमांचा विचार करता एकीकडे पाकिस्तान दुसरीकडे चीन आहे. देशात शांतता राहावे, कोणी आपल्या देशावर आक्रमण करू नये, केल्यास ते परतवून कसे पाठवता येईल हे सामर्थ्य आपल्या लष्कराकडे यावे यासाठी सतत जागरूक राहणे गरजेचे असते. आणि त्या दृष्टीने भारताचे भूदल, नौदल, वायुदल यांच्यात अग्रगण्य व व्यापक दृष्टीने साधने पोहोचवण्याची जबाबदारी त्या त्या कालखंडातील राजकीय सत्ताधाऱ्यांची असते. भारतीय दृष्टिकोनातून सत्तांमध्ये अनेक बदल होत असले तरीही भारतीय संरक्षणाचे हे तिन्ही दल आज सशक्त असलेले दिसून येतात. ही एक महासत्तेच्या दृष्टीने जमेची बाजू आहे.

**५) परराष्ट्र संबंध आणि आंतरराष्ट्रीय राजकारण**

भारताचे परराष्ट्र संबंध पूर्वीपासूनच सलोख्याचे असलेली दिसून येतात. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या धोरणातूनही हे दिसते. लोकशाही प्रणित असलेल्या राष्ट्रासोबत जवळीकतेचे व मैत्रीपूर्ण संबंध भारताच्या प्रत्येक सरकारने आजपर्यंत राबवलेले आहेत. भारताने युनायटेड किंगडम, युरोपियन युनियन, जपान, रशिया आणि युनायटेड स्टेट सारख्या जागतिक देशाशी संबंध आजवर विकसित केलेले आहेत. अरब, आशिया, इजराइल, दक्षिण अमेरिका, ब्राझील, दक्षिण आफ्रिका यांच्याशी भारताचे संबंध अधिक दृढ असलेले व विकसनशील आहेत. जागतिक शांतता व स्थिरता राखण्यासाठी भारताची भूमिका अग्रगण्य आहे. आर्थिक उन्नतीसाठी वेगवेगळ्या राष्ट्रांशी अनुकूल वातावरण निर्माण करणे, गुंतवणूक करणे, पाकिस्तान सारख्या देशाशी स्थिर संबंध राखणे या बाबत अधिक सक्रिय व समतोल साधण्याचा प्रयत्न भारत करीत आहे. "झी-20 या उपक्रमात / कार्यक्रमात भारताची प्रत्येक राष्ट्राकडून झालेली स्तुती, गौरव उद्गार या संबंधांची व जागतिक पातळीवरील राजकारणाची साक्ष देते." (४)

**६) अर्थव्यवस्था**

"१९ व्या शतकात वसाहतवाद सुरू होईपर्यंत भारतीय उपखंडाची अर्थव्यवस्था ही जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था होती."(५) आज जगातील सहावी सर्वात मोठी अर्थव्यवस्था भारताची आहे. जीडीपी द्वारे ही जगातील पाचवी सर्वात मोठी आणि क्रयशक्ती क्षमता द्वारे तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. २०२७ पर्यंत तिसरी जागतिक अर्थव्यवस्था होण्याचा अंदाज वर्तवला जातो.

**७) इतर क्षेत्र**

ऊर्जा व संसाधने यात भारताशी अनेक जागतिक कंपन्या सलोखा करत आहेत. उद्योग क्षेत्रात चीनच्या खालोखाल जगातील दुसरा अन्न उत्पादक देश, माहिती तंत्रज्ञानातील उद्योग, मुक्त बाजारपेठेत जम बसवणारा देश, सर्वात मोठी कामगार शक्ती, सांस्कृतिक व ऐतिहासिक समृद्ध वारसा लाभलेला / असलेला देश आहे. तसेच जगातील सर्वात मोठी लोकसंख्या असूनही लोकशाहीने सुव्यवस्थित चालणारा एकमेव देश आहे.

वरील सर्व घटक अथवा वैशिष्ट्ये 'भारत हा महासत्तेच्या दिशेने वाटचाल करीत आहे' असे दर्शवणारे असले तरीही या महासत्तेच्या वाटचालीत काही अडथळे निश्चितपणे आहेत. ही अडथळेच देशाचा वास्तव चेहरा आहे. तेव्हा त्या अडथळ्यांचाही थोडक्यात विचार करुयात. कारण स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात वरील वैशिष्ट्यांची देशातील कोणत्या जनतेपर्यंत जाण व भान पोचले आहे? त्याचे वास्तव स्वरूप काय आहे? या प्रश्नांची चित्रणं मराठी साहित्यातून अभिव्यक्त झालेले दिसून येते.

**मराठी साहित्यातील अभिव्यक्त होणाऱ्या जाणिवा**

भारत महासत्तेकडे वाटचाल करत असल्याचे वरील दर्शनीय लक्षणे आपण पाहिली असली तरीही देशांतर्गत अनेक समस्या, प्रश्न आजही दुर्लक्षित आहेत. भारताचा **भूभाग** आणि **लोकसंख्या** जागतिक पातळीवर सशक्त व प्रभावशाली असली तरी बहुभाषिक, बहुसंस्कृतिक, बहुप्रादेशिक व्यवस्था इथे अस्तित्वात आहे. प्रादेशिक दृष्टिकोनातून अर्थव्यवस्थेला मिळावी तेवढी गती मिळताना दिसत नाही. अतिउष्ण, समुद्र किनारपट्टी, हिमप्रदेश यामुळे दळणवळणात आणि नवीन **उद्योग** समूहाला असंख्य प्रश्नांना सामोरे जावे लागते. बहुभाषीय, बहुसमाज, जातीय समाज

व्यवस्था आजही धार्मिक रूढी परंपरांना जखडून आहे. **राजकीय व्यवस्था** धर्मांधतेचा राजकारणासाठी उघडपणे वापर करतात. आणि प्रजासत्ताकाचे ७५ वर्ष उलटून गेले तरीही धर्मनिरपेक्ष, माणूस केंद्री समाज-व्यवस्था, **लोकशाहीला** अपेक्षित असलेली स्वातंत्र्य-समता-बंधुत्व आणि न्याय ही मूल्य रचना अंमलबजावणीत अभावाने दिसते. देशात आर्थिक, सामाजिक, धार्मिक व जातीय **विषमता** आजच्या एकाधिकारशाही राजकारणामुळे / सत्तेमुळे अधिक वाढत असल्याचे दिसते. भारतातील **साक्षरतेचे** प्रमाण इतर राज्यांच्या दृष्टिकोनातून २००४ च्या सर्वेनुसार जवळ जवळ ७६ % आहे आणि साक्षरते शिवाय विकास साधने अशक्यप्राय आहे. आजही भारतात **पायाभूत सुविधा** देशाच्या वस्ती वस्ती आणि पाड्या-पाड्यापर्यंत पोहोचलेली नाही. दर्शनीय प्रदेशांचा विकास एका बाजूने मोठ्या प्रमाणात होत आहे तर दुसऱ्या बाजूने आजही आदिवासी पाड्यांपर्यंत स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्यांनी दिलेल्या पायाभूत सुविधा पोहोचल्याचे दिसत नाही. **गरिबी सशक्त** आणि **आरोग्य अशक्त**पणे भारतात हातात हात घालून वावरते. कुपोषण, एच आय व्ही यांचा अहवाल बघता भारताची आरोग्य व्यवस्था किती खिळखिळी आहे त्याचा अंदाज येतो. मोफत आरोग्य सेवा हे कोणत्याही राष्ट्राचे सुदृढ असण्याचे लक्षण होय; परंतु भारतात अपुऱ्या आरोग्य सोयी-सुविधांमुळेच असंख्य सार्तींना आळा घालता आला नाही. नवीन येणाऱ्या आरोग्य सेवा देशाच्या शेवटच्या जनसमुदाया पर्यंत पोहोचवता आलेल्या नाहीत. विश्वसनीय आरोग्य सेवेचा जागतिक पातळीवर कोणत्याही प्रभाव आजवर दिसलेला नाही. भारत देश **कृषी प्रधान देश** असल्यामुळे आजही बहुसंख्य शेती पारंपारिक व कोरड वाहू शेती केली जाते. उत्पादनासाठी बाजार व्यवस्था, सरकारी यंत्रणांची सुव्यवस्था दिसत नाही. करिता सतत आंदोलने करूनही शेतकरी हितांचे घेतलेले निर्णय प्रत्यक्ष अंमलबजावणीत अभाव आहे. शेतीविषयक ध्येय-धोरणांना येणारे अपयश शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या साक्ष देतात. अर्थव्यवस्थेला बलस्त करणारा हा घटक मात्र अपंग असल्याचे दिसते. भारतातील अंदाजे २२ % लोकसंख्या **दारिद्र्यरेषे** खाली जगत आहे. बालमजुरी, छुपी बेकारी, रिते होणारे खेडे, शहरांकडे स्थलांतरित होणारी अ कुशल मुजरांची संख्या, शहरात वाढणारी दारिद्र्यता, **जागतिकीकरणातून** स्थानिक बाजारपेठांची होणारी अवहेलना देशाच्या अशक्त अर्थव्यवस्थेचे,बेरोजगारीचे दर्शन घडवते. महान असलेल्या **भारतीय संस्कृतीत** 'एका माणसाने दुसऱ्या माणसाला माणसासारखे वागवावे.' हा संस्कार बुद्धांच्या व संतांच्या जन्मभूमीत जातीय, वर्गीय, लिंगभाव विषमतेने मोडीत काढलेला दिसतो. ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा असलेल्या परंपरेला छेद देतो. मुक्त असणाऱ्या **कला व साहित्य** अभिव्यक्ती स्वातंत्र्याला आजची राजकीय परिस्थिती अंकुश देते. जागतिक पातळीवर लोकशाही मूल्य पेरणारा भारत देश लोकशाहीची पायमल्ली करताना दिसते. देशाच्या नियंत्रणात नसलेल्या - देशांतर्गत विविध गटात-विचारधारेत होणाऱ्या हिंसक घडामोडी, माओवाद्यांची घुसखोरी, प्रांतवादातून, दारिद्र्यातून निर्माण होणारे आतंकवादी, दहशत निर्माण करणारे देशांतर्गत विचारधारेच्या सशस्त्र संघटना.. इत्यादी वास्तव असलेल्या घटकांमुळे महासत्तेचा दर्शनीय चेहरा खोटा व आभासपूर्ण असल्याचा जाणवतो. आणि साहित्याने हाच चेहरा आपल्या अभिव्यक्तीचा गाभा म्हणून चित्रणात आणला आहे.

१९९० नंतर देशात जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. या प्रक्रियेत समग्र देश कळत नकळत सक्रिय झाला व जागतिकीकरण्याच्या प्रभावात आला. सामाजिक , राजकीय आणि साहित्य क्षेत्रांसह जागतिकीकरणामुळे प्रभावित झाले आहे. जागतिकीकरणाने एका नव्या संस्कृतीचा उदय या कालखंडात झाला. २००५ मध्ये कलाम साहेबांनी महासत्तेचे दाखवलेले स्वप्न अधिक क्रियाशील होत गेले. यातून भारतात 'भारत आणि इंडिया' अशा दोन समाज व्यवस्थेत जाणिवांच्या पातळीवर देशाची विभागणी झाली. कवी महेंद्र भवरे यांच्या 'महासत्तेचे पीडादान' या कविता संग्रहात "वर्तमानाची कोणती सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन पार्श्वभूमी आहे याचा शोध घेत जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण याच्या रेट्यात बिघडलेले सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरनाचे सशक्त पडसाद दिसून येतात. या प्रमाणेच अरुण काळे, सिदर्थ तांबे, जयंत पवार यांची कविता भारताच्या बदलत्या विषमातावादी प्रवृत्तीचे चित्रण करून **लोकशाहीचा उद्धावस्त** होणारा चेहरही प्रखरपणे अभिव्यक्त करते. **संरक्षण यंत्रणेवर** सुरक्षेचा प्रश्न उपस्थित करणाऱ्या देशा अंतर्गत व बाह्य हिंसक हल्ल्याचे चित्रणही गडदपणे मराठी साहित्यात दिसते. भारतात चालणाऱ्या नक्षलवादी चळवळीची

दाहकता संजय जीवने यांच्या 'बारी' या नाटकातून दिसून येते, माओवादी चळवळीचे आणि पाकिस्तानी आतंकवाद्यांचे चित्रण समर खडक यांच्या 'बकऱ्याची बॉडी' या कथासंग्रहातून येते. उध्वस्त होणारा **शेतकरी,** आसमानी-सुलतानी संकटात अडकलेली **शेती** याचे प्रत्ययकारी चित्रण 'बारो मास', वासुदेव मुलाटे यांच्या 'विष वृक्षाच्या मुळ्या', आनंद विणकर यांच्या 'अवकाळी पावसा दरम्यानची गोष्ट' या कादंबऱ्यातून अभिव्यक्त होते. तर स्वातंत्र्याच्या विकासाची किरणे आजही पाढ्यापाड्यापर्यंत पोहोचली नाही याचे वास्तवदर्शी चित्रण भुजंग मेश्राम, वाहरू सोनवणे, तुकाराम रोगटे, विनोद कुंभरे यांच्या आदिवासी समूहाच्या जाणीवा घेऊन अभिव्यक्त होणाऱ्या साहित्यातून मुखर होतात. तसेच भारताच्या व मराठी साहित्याच्यादृष्टीने **विकास व विविध आव्हानांचा कालखंड म्हणून १९९०** नंतरचे दशक फार महत्त्वाचेआहे. या दशकात दोन महत्त्वाच्या प्रवृत्तीचा शिरकाव झाला. एक **संगणक व तंत्र युग व दुसरी जागतिकीकरण.** जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली आणि जागतिकीकरण बरे-वाईट त्याचे सामाजिक सांस्कृतिक परिणाम सामान्य जन-जीवनावर कसे होतील याचा विचार केला गेला. परंतु साहित्यात ही प्रक्रिया फार लवकर व ठळकपणे स्पष्ट झाली नाही. मुळात जागतिकीकरण ही प्रक्रिया असल्यामुळे तिचा कितीही विरोध केला तरीही ती मंद गतीने रुढावत होती. संगणक व तंत्रज्ञानाला विरोध झाला परंतु संगणक व तंत्र भारतीय विकासाचा महत्त्वाचा टप्पा होता. जागतिकीकरणामुळे **मुक्त बाजारपेठा** आल्या व **स्थानिक बाजारपेठ** यांना त्यांच्याशी स्पर्धा करणे कठीण होऊ लागले. तसेच खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या धोरणामुळे सामान्य माणूस भारतीय जाती व विषम व्यवस्थेत जगत असलेला **वंचित, शोषित, पीडित, गरीब** जनसमुदाय पिचला जात होता. जागतिकीकरणाने जातीय, वर्गीय विषमतेची दरी वाढत गेली आणि भारतीय मानसिकतेचे , वर्गीय विषमतेचे, हरवत जाणाऱ्या मानवी मूल्यांचे, वाढणाऱ्या शहरीकरणाचे, अध्यात्माच्या होणाऱ्या बाजारीकरणाचे, वंश व लिंग भेदभावाचे, स्व: केंद्रित होत जाणाऱ्या मानवी व्यवहारांचे, तंत्रज्ञानामुळे ग्रामीण जीवनाच्या वाताहतीचे,संगणकांनी व्यापलेल्या मानवी भावभावनांचे चित्रण या कालखंडातील साहित्यात अभिव्यक्त झाले आणि आधार कार्डवर एकवटलेल्या भारत देशाच्या जीर्ण लक्तरांची जाणीव होते.

**स्वातंत्र्याच्या पंचाहत्तरीत** देश **महासत्तेकडे वाटचाल** करण्याचे वरकरणी दावे सरकार करताना दिसते आहे. तेव्हा मराठी साहित्यातून आजही आदिवासी पाड्यांचा आवाज शहरांच्या रस्त्यापर्यंत पोहोचला नाही; ही जाणीव डॉ. कुंभरे यांच्या कादंबरीतून, भुजंग मेश्राम, नजुबाई गावित, वाहरू सोनवणे यांच्या कवितेतून दिसून येते. स्वातंत्र्याच्या सत्तरीनंतरही समाजात समता प्रस्थापित झाली नाही. विषमतेचे नवे प्रारूप चळवळींना मोडीत काढण्याचे नवे तंत्र अभिजन वर्गाने कसे विकसित केले आहे; याची चर्चा करताना सिद्धार्थ तांबे , जयंत पवार, प्रज्ञा पवार, संध्या रंगारी, शपथ खान, संजय पवार, प्रेमानंद गजवी, संजय जीवने, विलास थोरात, वीरेंद्र गणवीर हे लेखक आपल्या अभिव्यक्तीतून व्यक्त करताना दिसून येतात. बहुसंस्कृतीवाद, मॉल संस्कृती, बाजारीकरण, सजीव विषाणूंचा मानवी हल्ला आणि यात गुरफटलेला सामान्य माणूस आशुतोष पोतदार, संकेत तांडेल, वर्जेश सोळुंकी, मन्या जोशी, मंगेश नारायण काळे इत्यादी लेखक कवींनी भारताचे उत्तर आधुनिकतेकडे होत जाणारी वाटचाल व मानवी जीवनाची होत जाणारी अधोगती आपल्या कवितेतून, नाटकातून लेखातून अभिव्यक्त केलेली पहावयास मिळते. तर लॉकडाऊन नंतर भारत देशाची बिघडलेली अर्थव्यवस्था, बेरोजगारांची वाढत जाणारी संख्या, दारिद्र्याचे भीषण रौद्र रूप, जातीय व धर्मीय अधिक घट्ट होणाऱ्या जाणिवा, देशात बहुसंख्य घर नसलेल्या व्यक्तींनी 'घर-घर तिरंगा' या आदेशाप्रति, देश गौरव हितार्थ आदराने फडकवलेला तिरंगा; या जाणिवा पवन भगत यांच्या 'ते पन्नास दिवस' कादंबरीत , ऋषिकेश तुराईत यांच्या 'बिटवीन द लाईफ', प्राजक्त देशमुख यांच्या '१२ किलोमीटर', संजय पवार यांच्या 'झुलता पूल' , आशितोष पोद्दार यांच्या 'आनंद भोग मॉल', अजिंक्य कोलटकर यांच्या 'बिऱ्हाड' आदि नाट्य अभिव्यक्तीत तर कल्पना दुधाळ, वर्जेश सोळुंकी, मन्या जोशी, मंगेश नारायण काळे, निरिजा यांच्या कवितेत आणि सतीश तांबे , राकेश वानखेडे , समर खडस, जयंत पवार , बाळासाहेब लबडे , जी के ऐनापुरे आदि लेखकांच्या कथात्मक साहित्यातून साकारलेले दिसून येते.

एकंदरीत, मराठी साहित्यातील ही अभिव्यक्ती पाहता स्वातंत्र्याच्या पांच्याहतरीतही महाराष्ट्रातील असंख्य भागात स्वातंत्र्य पोहोचलेच नाही अशावेळी महासत्तेची व स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाची गौरव गीते कशी गावी ? हा प्रश्न नक्कीच पडतो. मग प्रस्थापित राजकीय व्यवस्थेने सोई सुविधा उपभोगणाऱ्या सामंतवादी अभिजन वर्गाच्या महासत्तेचा विचार हा केवळ आभास निर्माण करणारा आहे. हे वास्तव स्वीकारावे लागते. वरील विवेचनावरून काही निष्कर्ष पुढीलप्रमाणे नोंदवत येतील.

**निष्कर्ष**

1. सन १९४४ या कालखंडात युद्धदृष्टीने उच्चरलेला **महासत्ता** हा शब्द जागतिक पातळीवर आर्थिक, ज्ञान - तंत्रज्ञान, लष्कर/संरक्षण यंत्रणा, जागतिक राजकीय संबंध आणि राजकारण व सांस्कृतिकता या घटकांनी निर्माण केलेले प्रभावशाली अस्तित्व होय. या व्यापक अर्थाने असलेली राष्ट्रीय सत्ता येथे अपेक्षित आहे.
2. भारत देश महासत्तेच्या दृष्टीने वाटचाल करीत असल्याचे दिसत असले तरीही देशांतर्गत असलेली सुरक्षा यंत्रणा, हिंसा, अर्थनीती, लोकशाहीला मारक असलेले राजकीय अस्तित्व, अपयशी आरोग्य सेवा, बेकारी, शेती व शेतकऱ्यांची होणारी ससेहोलपट, जागतिकीकरणात भारताचे अपयशी व्यापारी धोरण या सर्व बाबी **अडथळा** म्हणून देशासमोर उभे आहेत.
3. देशाची महासत्तेच्या दिशेने होणारी वाटचाल आणि या वाटचालीचा मराठी साहित्यातून अभिव्यक्त होणारा वास्तव चेहरा पाहता राजकीय, सामंतशाहीने व अभिजन वर्गाने निर्माण केलेली **भारताची महासत्ता एक आभास आहे**. स्वातंत्र्याच्या पंचाहत्तरीतही देशाच्या कानाकोपऱ्यात स्वातंत्र्य पोहोचले नाही, लोकशाही प्रस्थापित झालेली नाही. तेव्हा महासत्तेच्या स्वप्न पूर्ततेसाठी खूप काळ जावा लागेल हे निश्चित.

**संदर्भ**

१)https://en.wikipedia.org/wiki/Superpower

२)उनि

३)samruddhabharat.blogspot.com भारताची महसत्ता...

४)https://www.mahamtb.com/Encyc/2023/9/8/Editorial-On-India-s-presidency-will-lead-to-transformative-change-that-world-needs.html मुंबई तरूनभरत

५)https://en.wikipedia.org/wiki/Superpower

**आधार संदर्भ**

**१)**Superpower विकिपीडिया

२) समकालीन साहित्य साहित्य चर्चा : संपा. मनोहर जाधव:प्रतिमा प्रकाशन पुणे

३)जगतिकीकरणा नंतरचे मराठी साहित्य : संपा. नगनाथ कोत्तापल्ले: सनय पब्लिकेशन,पुणे

४) साहित्य अनुबंध: संपा सतीश कामत: शाब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

# विदर्भातील सिंचन अनुशेषाच्या परिस्थितीचे अध्ययन

**डॉ. महादेव आसाराम रिठे**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख, राजे छत्रपती कला महाविद्यालय,धामणगाव बढे, ता. मोताळा जिल्हा बुलडाणा.

**प्रास्ताविक:**

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर शासनाने दिलेल्या आश्वासनांचा तसेच विदर्भाच्या विकासाचा विसर पडल्याने, पुन्हा वेगळ्या विदर्भ राज्याच्या मागणीने जोर धरल्याने, शासनाद्वारे 1983 साली विदर्भाचा विकास व निर्माण झालेल्या असमतोलाच्या अभ्यासासाठी प्रा.व्ही.एम. दांडेकर व प्रा. निळकंठ रथ या प्रख्यात अर्थतज्ज्ञांचा समावेश असलेली समिती स्थापन केली. समितीने नऊ विकासात्मक क्षेत्रातील प्रदेशनिहाय अनुशेष विचारात घेतला. समितीने सादर केलेला अहवाल शासनाने स्विकारला नाही. मात्र शासनाने 1984 मध्ये प्रादेशिक विकास मंडळे स्थापण्याचा ठराव मंजूर केला. पुढे दहा वर्षानंतर 1994 साली या ठरावानुसार भारताच्या राष्ट्रपतीच्या आदेशानुसार विकास मंडळे स्थापन करण्यात आली. या सर्व घटनाक्रमांचा विचार करता विदर्भाच्या विकासाकडे राज्य शासनाने वेळोवेळी दुर्लक्ष केल्याचे दिसून येत असल्याने विदर्भातील लोकप्रतिनिधी व जनतेने ज्यावेळी वेगळ्या विदर्भाची मागणी केली, त्यावेळी आश्वासने किंवा समित्या गठीत करून विदर्भाचा विकास करण्यास बाध्य असल्याचे सांगितले. या समित्या किंवा विकास मंडळांनी विदर्भाचा अनुशेष वाढत असल्याचे तसेच विदर्भातील शेती अपुऱ्या सिंचनामुळे डबघाईला आल्याचे शासनाच्या लक्षात आणून दिले.

**विदर्भातील सिंचनाची परिस्थिती:**

"अनुशेष म्हणजे त्या त्या क्षेत्रात, एक प्रदेश राज्याच्या सरासरी विकासात मागे असणे असा आहे." विदर्भ विकास मंडळ नागपूर यांच्या 2015- 16 च्या अहवालानुसार विदर्भातील सिंचनाची परिस्थिती खालीलप्रमाणे आहे.

1. **प्रादेशिक असमतोल सत्यशोधन समिती** 1983 :

दांडेकर समितीने 1982 च्या परिस्थितीचे आधारे सिंचनाचा अनुशेष निश्चित केला. हा अनुशेष काढतांना राज्यातील एकूण पिकाखालील क्षेत्राच्या तुलनेत किती सिंचन क्षमता (रब्बी समतुल्यमध्ये) निर्माण झाली, ह्या आधारे राज्याची सरासरी काढून ह्या सरासरीच्या खाली ज्या जिल्ह्याची सिंचन क्षमता आहे ते जिल्हे सिंचन अनुशेषातील जिल्हे ठरवले. अशा जिल्ह्यातील पिकाखालील क्षेत्र राज्य सरासरीला येण्यास तेवढे अधिकचे सिंचन निर्माण करवे लागेल, तो त्या जिल्ह्याचा सिंचनाचा अनुशेष ठरविण्यात आला. डॉ. दांडेकर समितीने जून 1982 मध्ये जी सिंचन क्षमता निर्माण झाली त्याआधारे राज्याची सिंचनाची सरासरी 22.55 टक्के होती. ज्या जिल्ह्यात ह्या सरासरीपेक्षा कमी सरासरीची सिंचन क्षमता निर्माण झाली, अशा जिल्ह्यांचा एकूण अनुशेष 9,24,290 हेक्टरचा काढण्यात आला. यात विदर्भाचा अनुशेष 5,27,310 हेक्टर, मराठवाड्याचा 2,60,670 हेक्टर, कोकण विभागाचा 1,05,580 हेक्टर, नाशिक जिल्ह्याचा 770 हेक्टर व धुळे जिल्ह्याचा 22,960 हेक्टरचा निश्चित केला.

2.**निर्देशांक व अनुशेष समिती** 1994 :

निर्देशांक व अनुशेष समितीने जून 1994 च्या परिस्थितीवर आधारीत अनुशेष निश्चित केला. हा अनुशेष निश्चित करतांना जी पद्धत डॉ. दांडेकर समितीने वापरली तीच पद्धती या समितीने सुद्धा वापरली. जून 1994 वर आधारीत राज्याची सरासरी 35.11 टक्के होती व या सरासरीच्या आधारे जिल्हावार व विभागवार सिंचनाचा अनुशेष निश्चित केला. राज्याचा एकूण अनुशेष 13,83,200 हेक्टर होता. या अनुशेषात विदर्भाचा अनुशेष 7,84,700 हेक्टर निश्चित केला. यात हे महत्त्वाचे आहे की पुणे विभागातील कोणत्याही जिल्ह्यात 1982 मध्ये किंवा 1994 मध्ये किंवा त्यानंतर सिंचनाचा अनुशेष कधीच नव्हता.

3 .**महाराष्ट्रातील जलसंपत्ती नियमन प्राधिकरण** 2005 :

सन 2005 मध्ये विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहांनी एकमताने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण 2005, हा कायदा मंजूर केला व तो अजूनही अंमलात आहे. या कायद्यातील कलम-20 प्रमाणे दरवर्षी जिल्हावार नवीन अनुशेष निश्चित करून त्याचा वार्षिक अहवाल विधीमंडळाच्या पटलावर ठेवावा लागतो. कलम 20 प्रमाणे सिंचनाची जिल्हावार निर्मित सिंचन क्षमता व अनुशेष काढण्याची पद्धत तीच आहे जी डॉ. दांडेकर समितीने व अनुशेष निर्देशांक समितीने ठरवली. या प्राधिकरणाने 12 एप्रिल 2016 ला वार्षिक अहवाल 2013-14 विधी मंडळाच्या पटलावर ठेवला. या अहवालातील जोडपत्र 4(3) प्रमाणे जून

2013 रोजी निर्माण झालेल्या नवीन सिंचन क्षमतेची व अनुशेषाची जिल्हावार माहिती दिली आहे. जून 2013 ला राज्याची सरासरी निर्मित सिंचन क्षमता 56.62 टक्के दाखवली आहे. व जे जिल्हे सरासरीपेक्षा कमी आहेत, त्यांचा अनुशेष पुढील सारणीत दाखविला आहे.

**विभागवार सिंचन अनुशेष**

| वर्ष | राज्य सरासरी | एकुण राज्याचा अनुशेष | कोकण विभाग | नाशिक विभाग | पुणे विभाग | उर्वरित महाराष्ट्र | मराठवाडा विभाग | अमरावती विभाग | नागपूर विभाग | विदर्भाचा अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| जून १९८२ | २२.५५ | ९२४.२९ | १०५.५८ | ३०.७३ | 0.00 | १३६.३१ | २६०.६७ | ४१६.८७ | ११०.४४ | ५२७.३१ |
| | टक्केवारी | १००% | ११.४२ | ३.३२ | 0.00 | १४.७५ | २८.२० | ४५.१० | ११.९५ | ५७.०५ |
| जून १९९४ | ३५.११ | १३८३.२४ | ७६.६९ | ९१.२० | 0.00 | १६७.८९ | ४३०.६४ | ६८५.६७ | ९९.०४ | ७८४.७१ |
| | टक्केवारी | १००% | ५.५४ | ६.५९ | 0.00 | १२.१४ | ३१.१३ | ४९.५७ | ७.१६ | ५६.७३ |
| जून २०१३ | ५६.६२ | १५६९.४८ | ६८.७१ | ७३.३१ | 0.00 | १४२.०२ | ४२९.६७ | ८७९.१२ | ११८.६८ | ९९७.८० |
| | टक्केवारी | १००% | ४.३८ | ४.६७ | 0.00 | ९.०५ | २७.३८ | ५६.०१ | ७.५६ | ६३.५८ |

(संदर्भ : विदर्भ विकास मंडळ, नागपूर–वार्षिक अहवाल २०१५–१६)

दांडेकर समितीचा अहवाल, अनुशेष निर्देशांक समितीचा अहवाल व महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण 2013-14 च्या वार्षिक अहवालाप्रमाणे वरील सारणीवरून असे दिसून येते की, जून 2013 मध्ये कोकण विभागाचा अनुशेष 68.71 हेक्टर, नाशिक विभागाचा 73.31 हेक्टर, पुणे विभागाचा निरंक व मराठवाड्याचा 4,29,670 हेक्टर व विदर्भाचा 9,97,800 हेक्टर निश्चित केला असून एकूण राज्याचा अनुशेष 15,69,480 हेक्टरचा दाखविला आहे. विदर्भाच्या एकूण 9,97,800 हेक्टरपैकी अमरावती विभागाचा अनुशेष 8,79,120 हेक्टरचा आहे. वरील परिस्थितीवरून हे स्पष्ट होते की, विदर्भाचा अनुशेष सतत वाढतच आहे.

महाराष्ट्रात अमरावती विभागातील बुलडाणा, अकोला, वाशिम व अमरावती जिल्ह्यात अजूनही 1994 चा 2,21,680 हेक्टरचा अनुशेष जून 2013 अखेर शिल्लक आहे. वरील माहितीवरून हे स्पट होते की, राज्याच्या काही भागात सिंचनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्याउलट विदर्भात कमी प्रमाणात सिंचन क्षमता वाढल्याने विदर्भाचा अनुशेष सारखा वाढत आहे.

**4. प्रकल्प उभारणीमध्ये आलेले अडथळे दूर होणे आवश्यक :**

सिंचनाकरीता विदर्भात गोदावरी व तापी खोऱ्यातून भरपूर पाणी उपलब्ध असून त्यातून जवळपास 75 टक्के पिकाखालील क्षेत्र सिंचनाखाली येवू शकते, परंतु यांतील फक्त अंदाजे 30 टक्के सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. जवळपास 30 टक्के पाणी वापराचे प्रकल्पाचे काम सुरू आहे. परंतु ह्या बांधकामाधीन प्रकल्पातील बऱ्याच प्रकल्पाचे काम अनेक कारणांनी बंद आहे. शिवाय बाकी पाण्याचे अजूनही नियोजन झालेले नाही. याउलट राज्याच्या इतर भागात उपलब्ध असलेल्या संपूर्ण पाण्याचा वापर, चालू प्रकल्प व नवीन प्रकल्पाचे संपूर्ण नियोजन झाले आहे.

**5. अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालाचा स्विकार :**

अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल महाराष्ट्र शासनाने सन 2000 मध्ये स्विकारला व ह्या अहवालास मान्यता देतांना असाही निर्णय घेतला की 1994 चा अनुशेष दूर करतांना नवीन अनुशेष निर्माण होणार नाही, परंतु याबाबत सिंचनाच्या क्षेत्रात विदर्भाचा अनुशेष सारखा वाढतच असल्याची परिस्थिती आहे.

**6.नदीजोड प्रकल्प आवश्यक :**

अमरावती विभागात सिंचनाकरीता पाण्याची काही प्रमाणात कमी आहे. मा. राज्यपालांनी अमरावती विभागात सिंचनाकरीता अधिकचे पाणी उपलब्ध होण्यास दिनांक 27 मे 2009 च्या निर्देशाप्रमाणे तापी खोऱ्यात अतिरिक्त पाणी मागणीचा प्रस्ताव करण्याचे शासनास सुचिले आहे. परंतु या प्रस्तावाबाबत फारशी प्रगती झाली नाही, त्यामुळे तापी खोऱ्यात अमरावती विभागाला उपलब्ध होवू शकणारे जवळपास 33 टीएमसी पाण्याची उपलब्धी होवू शकली नाही. तसेच पूर्व विदर्भात गोदावरी खोऱ्यात बरेचशे अतिरिक्त पाणी उपलब्ध आहे. पूर्व विदर्भातील हे अतिरिक्त पाणी नदीजोड प्रकल्पाद्वारे अमरावती विभागात नेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. याबाबत सविस्तर प्रस्ताव नागपूर विभागाचे मुख्य अभियंता यांनी शासनाकडे

पाठविला असून वैनगंगा- नळगंगा प्रकल्पाद्वारे अमरावती विभागात अतिरिक्त सिंचनाकरीता पाणी उपलब्ध होवू शकते. या कामास शासनाने गती देण्याची गरज आहे.

**7.प्रकल्पाच्या कामास गती देण्याची गरज :**

विदर्भातील व विशेषतः अमरावती विभागातील प्रकल्पाच्या कामास गती देण्याची गरज आहे व त्याकरीता यातील अडचणी जसे (1) सुधारीत प्रशासकीय मान्यता देणे, (2) भूसंपादन व पुनर्वसनाच्या कामास गती देणे, (3) विदर्भ सिंचन महामंडळातील जवळपास 30 टक्के रिक्त असलेल्या जागा त्वरीत भरणे, (4) वन जमिनीच्याकरीता अडलेल्या प्रकल्पाचे प्रश्न सोडविणे इत्यादी अडचणी सोडविण्यास शासनाने त्वरीत कार्यवाही करण्याची गरज आहे.

**8. पर्याप्त निधीची आवश्यकता :**

विदर्भातील ज्या प्रकल्पातून पाणी वापर (सिंचन व बिगर सिंचन) सुरू आहे त्यातून पाणीपट्टीद्वारे निधी गोळा करण्यात येतो व तो शासनाकडे दरवर्षी जमा होतो. या निधीतून प्रकल्पाचे कालवे, पाटचाऱ्या, गेटस् बगैरेंची देखभाल व दुरूस्ती होण्यास पर्याप्त निधी मिळणे अपेक्षित आहे. परंतु गोळा होवून शासनाकडे जमा होणाऱ्या या निधीपैकी विदर्भात कमी निधी देखभाल दुरूस्तीकरीता उपलब्ध होतो. या दुरूस्तीअभावी मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होवून दरवर्षी शेतकऱ्यांचे नुकसान होते. याबाबत सुद्धा विदर्भाला प्रकल्पांच्या व वितरण प्रणालीच्या देखील दुरूस्तीकरिता योग्य प्रमाणात आवश्यक निधी उपलब्ध होण्याची गरज आहे.

**2016-17 मधील राज्यपालांचे निर्देश :**

राज्यपाल सी.एच. विद्यासागर राव यांनी आर्थिक वर्ष 2016-17 साठी अनुशेष निर्मूलनाकरीता निर्देश दिले आहेत. त्यात विदर्भातील अमरावती विभागातील सिंचनाचा भौतिक अनुशेष अद्यापही कायम असल्याबाबत रोष व्यक्त केला आहे. अमरावती, अकोला, वाशीम आणि बुलडाणा या चार जिल्ह्यांमध्ये सन 2017 ते 2015 या कालावधीत अनुशेष निर्मूलनाची पंचवार्षिक योजना आखण्यात आली होती. परंतु, कालबद्ध योजना करूनही जलसंपदा विभागाला चार जिल्ह्यांचा भौतिक

**अमरावती विभागाचा अनुशेष**

| वर्ष | शिल्लक अनुशेष (हेक्टर) | दूर केलेला अनुशेष (हेक्टर) |
|---|---|---|
| जून २००८ | २,९१,३७० | ४६,७०० |
| जून २००९ | २,६३,४५३ | २७,१९७ |
| जून २०१० | २,५७,५१८ | ५,९३५ |
| जून २०११ | २,४७,९४८ | ९,५७० |
| जून २०१२ | ३,३४,०१९ | १३,९२९ |
| जून २०१३ | २,२७,२६९ | ६,७५० |
| जून २०१४ | २,२३,७०५ | ३,५६४ |
| जून २०१५ | २,१४,२६९ | ९,४३६ |

**(संदर्भ : दै. महाराष्ट्र टाईम्स)**

अनुशेष दूर करता आला नाही.

वरील सारणीवरून निदर्शनास येते की, कालबद्ध योजना आखली तेव्हा अमरावती विभागात 2,57,598 हेक्टर इतका सिंचनाचा अनुशेष होता. तर जून 2015 अखेर हा अनुशेष 2,14,269 इतका शिल्लक आहे. त्यामुळे गेल्या पाच वर्षात राज्य सरकारला केवळ 43, 249 हेक्टर जमीन सिंचनाखाली आणता आलेली आहे. त्यातही गेल्या दोन वर्षात सरकारला केवळ 13,000 हेक्टर जमीन प्रत्यक्ष हिवनाखाली आणता आली. सन 2014 मध्ये 3,564 हेक्टर आणि 2015 मध्ये 9,436 हेक्टर जमीन सिंचनाखाली आलेली आहे. दरम्यान, राज्यपालांनी अमरावती विभागाचा सिंचन अनुशेष दूर करण्यासाठी आता 750 कोटी रूपयांची तरतूद करण्याचे आदेश दिले आहे. त्यामुळे विदर्भाचा एकूण 2,400 कोटी रूपयांच्या सिंचन तरतुदीव्यतिरिक्त 750 कोटी रूपये अनुशेष निर्मूलनाकरीता देण्यात यावेत, असे निर्देश राज्यपालांनी दिले आहेत.

विदर्भातील सिंचन अनुशेषाचा अखर्चित निधी यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा, निम्न वर्धा आणि बावनथडी या तीन आंतरराज्य प्रकल्पांवर खर्च करण्यात यावा, असे निर्देश राज्यपालांनी दिले आहेत. त्यामुळे आता 2016-17 च्या अर्थसंकल्पात

बेंबळाला 100 कोटी, निम्न वर्धाला 65 कोटी आणि बानथडीला 20 कोटी रूपये उपलब्ध करून देण्यात यावेत. त्याशिवाय विदर्भातील अनुशेष नसलेल्या जिल्ह्यांमधील 185 कोटी रूपये अनुशेषग्रस्त जिल्ह्यांना वळते करावे, असेही निर्देशात नमूद केले आहे.

**समारोप:**

महाराष्ट्र राज्यामध्ये सिंचन सुविधांचा विचार केल्यास विदर्भामध्ये सर्वात जास्त अनुशेष निर्माण झाल्याचे मत अभ्यासकांनी मांडले आहे. विदर्भामध्ये सिंचनाच्या सुविधा कमी असल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीमध्ये उत्पादन घेण्यासाठी मान्सुनवर अवलंबून रहावे लागते. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये आवश्यकतेच्यावेळी पिकांना पाणी न मिळाल्यास उत्पादनामध्ये घट होते. म्हणजेच निसर्गाच्या लहरीपणामुळे कृषि उत्पादनामध्ये घट होते. याशिवाय सिंचन सुविधांच्या अभावामुळे शेतकऱ्यांना दुबार उत्पादन घेता येत नाही. त्यामुळे त्यांची उत्पादकता वाढत नाही. काही वेळेला शेतकरी सिंचनासाठी विहीर, बोअरवेल घेण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी सावकारी कर्जही उचलले जाते. मात्र जमिनीमधील पाण्याच्या पातळीमध्ये झालेल्या घटीमुळे त्यामध्ये अपयश आल्यास नैराश्य निर्माण होते.

शेतीमध्ये सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा असल्यामुळे उत्पादकता कमी आहे. हरितक्रांतीतील कृषि उत्पादनाच्या वाढीचा लाभ घेण्यासाठी सिंचनसुविधा असणे गरजेचे आहे. सरकारने विदर्भाचा सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी उपाययोजना केली पाहिजे. पावसाच्या पाण्याचा योग्य वापर, पाण्याचे पुनर्भरण, ठिबक सिंचन पद्धतींचा वापर इत्यादी बाबींसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

संदर्भ:

1. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2009-10, 2012-13, 2013-14, 2016-17.
2. वार्षिक अहवाल, विदर्भ विकास मंडळ, नागपूर, 2015-16.
3. कृषि संवादिनी (2008), डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला 444104.
4. Economic Survey of Maharahtra २०१४-१५, २०१५-१६.
5. Maharashtra Water Resources Department - Vision २०२० Report.
6. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अकरावा वार्षिक वित्तीय अहवाल 2007-08.
7. त्रैमासिक अर्थसंवाद, अर्थशास्त्र परिषद.
8. अर्थमिमांसा, विदर्भ अर्थशास्त्र परिषद, अमरावती.
9. त्रैमासिक, महाराष्ट्र सिंचन विकास विविध अंक.
10. मा. योजना विविध अंक.
11. मा. लोकराज्य, विविध अंक.

# ऐतिहासिक बदल

**नोटः प्रस्तुत शोध निबंध PeerReviewed internation Journal मध्ये प्रकाशित करावा.**

**संशोधक विद्यार्थीनी**

**मनिषा वामनराव लांडगे**
**(M.A.History NET, SET)**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर बिलोली**
**[illegible]लोली जि.नांदेड पिन कोड नं ४३१७१०**
**मो.नं. ७२६२९७५०९७**

**प्रस्तावना :**

भारत हा देश मानवी इतिहासातील प्राचीन देशांमध्ये गणला जातो. येथील लिखित इतिहास २५०० वर्षापूर्वीचा असून इतर पुराव्यानुसार भारतात ७०००० वर्षापुर्वीपासूनमानवी अस्तित्व आणि इतिहास आहे. भारताचा इतिहास वैभवसंपन्न आणि सामर्थ्यशाली असाच राहिलेला आहे. भारतामध्ये प्राचीन काळापासून ते आजच्या २१ व्या शतकापर्यत अनेक ऐतिहासिक बदल घडून आले आहेत ते ऐतिहासिक बदल मग सामाजिक, आर्थिक, राजकीय शैक्षणिक सांस्कृतीक असे विविध स्वरुपात –ालेले आपणास पहावयास मिळतात 'इतिहास म्हणजे बदल' (१) ही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची इतिहासाची व्याख्या असुन त्यांची इतिहासाकडे पाहण्याची वेगळीच दृष्टी होती. इतिहासातून सामाजिक व राजकीय क्रांतीचा जन्म होत असतो. मात्र हा समाज त्या दृष्टीने इतिहासाकडे वरवरचे पाहून चालत नाही तर ज्या इतिहासाकडे व्यक्तीला बदलण्याचे सामर्थ्य दिले तेव्हा त्या व्यक्तीकडुन भविष्यात बदल होणे अपेक्षित असतो. तेव्हा इतिहासाकडे पाहतांना सर्वांगदृष्टीने पाहणे गरजेचे आहे. जो पूर्वीचा इतिहास जशास तसा वाचला व जे लिहिले आहे ते सर्वच खरे आहे अशी आपली भूमीका असेल तर नवा इतिहास धडणार नाही तो डबक्यासारखाच राहिल तेव्हा इतिहासाकडे पाहतांना सर्वांग दृष्टीने पाहणे गरजेचे आहे. तेव्हा इतिहासाने नेहमी बदलाची भुमीका घेतली पाहिजे कारण इतिहासच व्यक्तीला मोठे करित असतो त्यातुनच समाजाला शहनपणा, खोटेपणा याची जाण होते. कारण इतिहासच समाजाल प्र–ावान, नितीवान बनवित असतो भारताच्या इतिहासात अशा काही घटना घडून गेल्या आहेत की त्या घटना जगाच्या इतिहासात आढळत नाहीत.

**<u>१) संशोधनाची उदिष्टे :</u>**

1) भारत देशात सामाजिक दृष्टीकोनातुन –ालेला ऐतिहासिके बदल अभ्यासणे

2) [illegible] ेशात आर्थिक दृष्टीकोनातुन –ालेला ऐतिहासिक बदल अभ्यासणे

**<u>२) शोध निबंधाची गृहितके :</u>**

1) भारतीय गणराज्य हा दक्षिण आशियामधील एक प्रमुख देश आणि जगातील प्राचीन संस्कृतीपैकी एक देश आहे.

2) [illegible]ताला प्राचीन राजकीय सामाजिक , धार्मिक सांस्कृतीक वारसा लाभलेला आहे. जगाच्या इतिहासामध्ये भारताला मानाचे स्थान प्राप्त [illegible]

**<u>३) संशोधन पध्दती :</u>**

प्रस्तुत शोध निबंधाच्या मांडणीसाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा आधार घेण्यात आला आहे.

**<u>४) तथ्य संकलन :</u>**

सदरील शोध निबंधासाठी तथ्य संकलनाच्या व्दितीय साधन सामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे

**5) Åामाजिक दृष्टीकोनातुन –ालेले ऐतिहासिक बदल**

भारतीय समाज हा एकसंघ नाही. या समाजात वर्गीय जातीय विषमता तर आहेच पण त्याहुनही मुलभूत भेद स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये आहे जाती वेगवेगळया असल्या तरी प्रत्येक वर्गाच्या किंवा जातीच्या अंतर्गत त्यातील स्त्री-पुरुष यांच्यात भेद आहे. या भेदाची चिकित्सा केल्यावर असे लक्षात येते की स्त्रीचे स्थान दुय्यम आहे व पुरुषाचे तिच्यावर वर्चस्व आहे. येथील पुरुषी संस्कृतीने स्त्रीला माणुसपणा पासुन तोडले. शील चारित्र्य अशा गोष्टीचे स्तोम माजवुन तिला दास्यात लोटले.

**५.१ ) स्वातंत्र्य पुर्वक कालखंडातील ऐतिहासिक सामाजिक बदल :**

प्रारंभीच्या काळातला मातृसत्ताक समाज पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये परिवर्तीत –ÛÛ»Ûा आणि स्त्रियांना हक्क कर्तव्ये अधिकार दर्जा इत्यादी बाबतीत गौण मानन्यात येऊ लागले. स्त्रियांना जन्मापासुन ते मृत्युपर्यत परावलंबी बनविणारी पुरुयप्रधान अवस्था ही नैसर्गीक नसुन सामाजिक अवस्था आहे (२) ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. सर्व सत्ताकेंद्रे ही प्रामुख्याने पुरुषांच्या हातात असल्याने साहजिकच या अवस्थेत स्त्रीला गौणत्व प्राप्त –ाल्याचे दिसते प्राचीन काळी स्मृतिग्रंथानी सांगीतलेला आचार धर्म हा भारतीय समाज व्यवस्थेचा आधार होता. स्मृतिग्रंथानी स्त्री स्वातंत्र्य नाकारले आणि शुद्रातिशुद्राप्रमाणे अधिकारापासुन वंचित ठेवले या ग्रंथानी एकीकडे मातृत्वाची थोरवी उच्चरवाने गायली तरी दुसरीकडे स्त्रिया या पुरुषाला भुलविण्याचा त्यांची शक्ती शोषुन घेणा-या त्याला बलहीज करणा-या दुष्ट, नीच, चंचल विषयलंपट अशा दुषणानी तिची प्रतिमा तयार केली. म्हणजेच "हिंदु पुरुषा जाणिवेच्या कक्षेत स्त्री ÆB †Û¬ïj;ÛÀÛÛ"ÛB ŒÛÖÔâB ¿Ûध्द पवित्र, भोळी, सत्वशील अशी असते. तर अजाविणेच्या कक्षेत तिची मुर्ती विश्वासघातकी विषयासक्त तिची लैगिंक भुक कधीही न शमणारी अशी राक्षशिणी सारखी असते" (३) यावरुन असे स्पष्ट होते की गुणावगुण स्त्रीवर आरोपित करुन तिला येनकेन प्रकारे स्वातंत्र्याला अपात्र ठरविले. बालविवाह सत्तीची चाल विधवा विवाहबंदी, केशवपन, देवदासी, प्रथा वगैरची तजवीज करुन तिचे सामाजिक धार्मीक आणि लैगिंगदृष्टया शारिक व मानसिक शोषणही केले.

भारतीय समाजाने स्त्रीचे क्षेत्र चुल व मुल एवढयापुरतेच मर्यादित ठेवले होते. रांधा वाढा उष्टी काढा, एवढेच कार्य तिला कुटूंबात होते. स्त्री म्हणजे पायाची दासी, निर्बुध्द, निर्जिव वस्तु समजुन तिला या समाज व्यवस्थेने वागविले. अंगमेहनतीचे बौध्दीक, कलानिर्मितीचे घरगुती काम, मुलांना जन्म देऊन त्यांना वाढविण्याचे श्रम करुनही त्यांच्या श्रमाचे अवमुल्यन केले गेले गीता साने म्हणतात. " स्त्रीच्या स्त्रीत्वाचा आदर भारतात निर्माण –ालच नाही, उलट तिचा अपमर्द करणे, तिला दहशत घालणे, तिचा बळजबरीने उपयाग घेणे या सा-या गोष्टी पुरुषाला पुरुषार्थाच्या, गौरवाच्या वाटत राहिल्या" (४) यावरुन पुरुष्य प्रधान समाज अवस्थेने स्त्रियांचा किती प्रचंड छळ केला याची कल्पना येते.

आजही स्त्रियांची दुय्यम अवस्था आहे. तशीच आहे. दिवसेंदिवस हिसांचारात वाढ होत आहे. हिसांचाराला भ्रूणावस्थेपासुन सुरुवात होते. जन्मानंतर तिला शिक्षणा पासुन वंचित ठेवले जाते. स्त्री पुरुय यांच्या आहारात आणि वैद्यकिय सेवेतही फरक केला जातो. छळ, मारहाण, हुंडाबळी, बलात्काराच्या बातम्यांवर नजर टाकल्यास पुरुष प्रधान समाज व्यवस्थे कडुन होणा-या स्त्री शोषणाची स्पष्ट कल्पना येते. स्त्रियांचे प्रश्न सुटले आहेत असा आभास ही यंत्रणा निर्माण करत असली तरी प्रत्यक्षात स्त्रियांचा दर्जा सुधारले»Û नाही. स्त्रीला आपल्या सोबत घेणे. तिला बरोबरीचे स्थान देणे, तिचा स्त्री म्हणून सन्मान राखणे तिला संधी उपलब्ध –ाल्यास आपली अस्मिता बाजूला ठेवुन स्त्रीला पुढे जाऊ देणे ही मानसिकता समाजातील पुरुषामध्ये आजही दिसत नाही. आई, बहिण नव्हे तर विधवा, घटस्फोटीता प्रौढ कुमारिका यांच्याकडे बघण्याची समाजाची दृष्टी कलुषितच आहे. स्त्रीच्या या शोषणाला मनुप्रणित पुरुष प्रधान संस्कृतीच जबाबदार आहे. या संस्कृतीने स्वतःचे हितसंबंध जोपासण्यासाठी जाणिवपुर्वक स्त्रीला गुलाम बनविले. स्त्रियांच्या या सगळया अवणतील हिंदु रुढी, धर्म, कायदे व जाती व्यवस्था कारणीभुत आहे स्त्रियांना अंत्यत हीन लेखणारी स्त्री स्वातंत्र्य नाकारणारी, सत्रीची निर्भत्सना करणारी स्त्रीच्या पुर्नविवाहाला नकार देणारी मनुस्मृती स्त्री प्रशंसावर किती बरळत राहिली तरी ती निरर्थक वाटते

स्वातंत्र्य व समतेला महामुल्य मानणा-या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मनुस्मृती चा हा दुष्ट प्रस्ताव मान्य होण्यासारखे नव्हते ते म्हणतात. "Manu is not a matter of the past it is even more than a pst of the present it is a living past and there fore as replay present as any present can be" (५) अशी ही मनस्मृती स्त्री प्रतिष्ठेसाठी आणि आखिल मानवी कल्याणासाठी जाळणे अपरिहार्य होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृती दहनाच्या कृतीतुन एका मोठया ऐतिहासिक सामाजिक परिवर्तनाचा विचार देशाला दिला हा विचार स्विकारुन प्रत्येकाने आपापल्या मनातील मनुस्मृती जाळुन टाकायला पाहिजे आणि त्यांनी दिलेल्या "भारतीय संविधान" या महान ग्रंथाचा जागर केला पाहिजे.

### <u>५.२) स्वातंत्र्योत्तर काळातील ऐतिहासिक सामाजिक बदल :</u>

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय सविंधानाचे शिल्पकार आहेत त्यांच्या स्त्री उन्नतीच्या विचारांचा प्रभाव संविधानात उमटणे अटळ होते. त्यांनी स्त्रीयांच्या हक्कांना तिच्या समतेला आणि तिच्या मुक्तीला कायदयाचे रुप दिले संविधानाने स्त्रीभोवती पोलादी कवच असे केले आहे संविधानाच्या १४ व्या कलमानुसार सर्व स्त्री पुरुषांना कायदेशिर समानता बहाल केली. १५ व्या कलमानुसार Ã¡ÖŒ-पुरुष भेद नष्ट करुन टाकला. डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या या क्रांतीकारी विचार कार्यामुळे स्त्रीला दासी करणारा धर्म आणि त्याच्या रुढी परंपरा मोडीत काढलया संविधानाचे १६ वे कलम हे समतेचा मौलीक अधिकार बहाल करणारे असुन संधीची समानता यावर भर देणारे आहे या कलमान्वये सरकारी नौकरीत नियुक्ती देतांना स्त्री-ÛÙyÃÖ ^"च नीच श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेद करता येणार नाही संविधानाने बहाल केलेल्या अधिकारामुळे आज भारतीय स्त्री मग ती कुठल्याही जाती, धर्माची, पंथाची असो तिला सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने समान संधीचा उपभोग घेता येणे आता शक्य –ााले आहे याचे उत्तम उदाहरण म्हणजे ग्रामीण भागापासुन ते देशाच्या सर्वोच्च पदावर विराजमान होण्याचा अधिकार स्त्रीला मिळालेला आहे. ग्रामीण प्रशासनात गावच्या सरपंच पदापासुन ते देशाचा प्रथम नागरिक म्हणुन राष्ट्रपती पदापर्यत ची मजल भारतीय स्त्रीला गाठता आली आहे. आजघडीला भारताच्या राष्ट्रपतीपदावर एक महिलाच विराजमान आहे द्रोपदी मुर्म या आदिवासी समाजातील पहिली महिला आहे जी भारताच्या राष्ट्रपती पदावर विराजमान आहेत याच्या आधी श्रीमती इंदिरा गांधी या देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान पदी विराजमान होत्या त्यानंतर श्रीमती डॉ.प्रतिभाताई पÖ×™üÖ या देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती होत. हे ऐतिहासिक बदल शक्य –ााले आहे केवळ आणि केवळ भारतीय संविधानामुळे आज भारतीय स्त्री विविध खेत्रात भरारी घेत आहे. राजकारण समाजकारण, वि–ाान ¾Ö ŸÖÓ¡Ö–ाान, शिक्षणक्षेत्र, न्याय व्यवस्था, पोलिस प्रशासन, वैद्यकिय क्षेत्र आणि इतर अनेक क्षेत्रात महिला आपले वर्चस्व, अस्तित्व निर्माण करत आहेत आणि ज्या देशातील महिला स्वतंत्र, सक्षम असतील ज्या देशाला जागतीक पातळीवर महासत्ता होण्यास आता वेळ लागणार नाही.

### <u>6) आर्थिक दृष्टीकोणातुन –ाालेले ऐतिहासिक बदल :</u>

भारताच्या अर्थव्यवस्थेत खूपच वैविध्य दिसून येते. शेती हस्तव्यवसाय, कपड गिरण्या, उद्योग धंदे, उत्पादन आणि विविध प्रकारच्या सेवा अशा अनेक गोष्टीचा समावेश त्यात होतो. भारतात काम करणा-या लोकापैकी दोन-तृतीयांश लोकांचा उदरनिर्वाह अजुनही शेती अथवा शेतीशी संबंधीत उदयोगावर चालतो. परंतु अर्थव्यवस्थेत विविध प्रकारच्या सेवाचाही आधारित व्यवसायही अर्थ अवस्थेत अतिशय महत्वाची भुमीका बजावत आहेत.

### <u>6.1) स्वातंत्र्यापुर्वी आर्थिक दृष्टीकोणातुन –ाालेले ऐतिहासिक बदल :</u>

भारताच्या स्वातंत्र्या पूर्वीचे ऐतिहासिक आर्थिक बदल भारताच्या अर्थव्यवस्थेचा एकंदर विचार करता प्राचीन काळात भारताचा व्यापार रोम व इतर युरोपीयन राष्ट्रांशी कसा भरभराटीस आला होता औद्योगिक क्रांती होईपर्यत पुर्वे कडील देश सर्व जगाला उत्पादित माल विकणारा कारखानाच होता इराकची फरात चीनची यांग-ÃÖŒ-कियांग व भारतातील सिंधु नदी परिसरातील संस्कृती प्रगतावस्थेत ÆÖ¾ÖŒ. –ाान व प्रगतीचा आरंभ येथुनच –ााला. रोम आणि ग्रीकांची पाश्चात्य देशांना हीच देणगी होती की त्यांनी पुर्वेकडील प्रकाश पाहिला व तो त्यांनी पश्चिमेकडील देशात पसरविला भारतात ब्राम्हणांनाच शैक्षणिक संधी असल्याने त्यांनी धार्मीक वाङःमय लिहिले

त्यातुन आर्थिक बाबीचा समावेश नसल्याने आम्हाला भारतीय व्यापाराबाबत परकीय लेखकांच्या साहित्याचा आधार घ्यावा लागतो अशी खंत डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्यक्त करतात (६) भारतातील व्यापार भरभराटीस आलेला होता. भारतात व्यापा-यांचे संघ होते परदेशाशी भारताचे व्यापारी संबंध होते. बौध्द साहित्यात दिड मैल लांब असणा-या व्यापारी तांडयाचा उल्लेख मिळतो. व्यापारी देवाण-घेवाण करण्यासाठी नाण्यांचा वापर होत असे वेळ प्रसंगी सोन्याचे शिक्केही वापरले जात होते.

भारतीय व्यापारावर, वर्चस्व प्रस्थापीत करण्यावरुन युरोपीयनामध्ये संघर्ष होऊन त्यात इंग्रजी राजवट यशस्वी –ÖÖ»Ö³Öß. डॉ.बाबासाहेब आंबेडकर साम्राज्यवाद विरोधी असल्यानेच त्यांनी भारतीय व्यापार व ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभारावर प्रकाश टाकला. इंग्रज राजवटीत भारतीय व्यापार उद्योग व आर्थिक स्थितीत कसा ऐतिहासिक बदल –ााला याचे विस्तारपुर्वक वर्णन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या "प्राचीन भारतीय वाणिज्य" या ग्रंथात केले आहे. त्यावरुन इंग्रज पूर्व भारत समृध्द होता. भारतामधुन मलमल शाली कालीकतचे कापड, मिरे, दालचीनी असे मसाल्याचे पदार्थ तसेच अफु आणि "इंडिगो" ही शाई अशा गोष्टीची मोठया प्रमाणात निर्यात युरोपातीलज तसेच मध्यपुर्वेतील देशांमध्ये होत असे. हयांच्या बदल्यात भारतात सोने आणि चांदीची आयात होत असे भारतातुन निर्यातीचे प्रमाणही तसे जास्त होते ब्रिटीशांच्या आगमनाआधी भारत ही पारंपारिक शेतीवर आणि अप्रगत तंत्र–ाानावर आधारित अर्थव्यवस्था होती. परंतु हयाचबरोबर व्यापार, उत्पादन आणि पत हयांच्या आर्थिक संकल्पनांची प्रगतीही बरीच –ÖÖ»Ö¸üß ÆüÖêŸÖß. ¯Ö¸ü®ÖË ×²ÖÏ™üßशांच्या सत्ता स्थापने पासुन करांच्या नियमांमध्ये आणि कर वसुली पध्दतीमध्ये भारतात मोठे बदल –ााले याचा सर्वात जास्त परिणाम भारतातील शेतक-यावर –ााला. ब्रिटीशांच्या काळातील करांच्या काहिशा जाचक नियमांमुळे भारतातील शेतक-यामध्ये मोठया प्रमाणात दारिद्रय वाढीस लागले ब्रिटीशांनी अर्थव्यवस्थेमध्ये इतही काही महत्वाचे बदल केले. ब्रिटीश राजवटीने हया वसाहत कर्त्यांना मालमत्ता बाळगण्याच्या हक्काची हमी देऊ केली त्यांनी खुल्या व्यापाराला प्रोत्साहन दिले. भांडवली बाजारपेठा आणि व्यापार, लोहमार्ग आणि तार सेवा यांचा विकास राजकारण्यापासुन स्वतंत्र असे नागरी व्यवस्थापन आणि समान कायदेपध्दती व न्यायसंस्था अशा काही गोष्टी त्यांनी सुरु केल्या भारतातील ब्रिटीश राजवटीच्या काळात बाहय जगात मोठे आर्थिक बदल होत होते हयाच काळात जगात मोठया प्रमाणात औद्योगिकीकरण –ÖÖ»Öê ŸÖÃÖêŸÖ ˆŸ्पादन क्षमता आणि व्यापार यात प्रचंड वाढ –ााली परंतु या राजवटीच्या शेवटी जगातील अतिशय गरिब अर्थव्यवस्था पैकी एक असा वारसा घेऊन भारत स्वतंत्र –ÖÖ»ÖÖ.

**6.2) स्वातंत्र्यानंतरचे ऐतिहासिक आर्थिक बदल :**

भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या आर्थिक धोरणावर ब्रिटिश राजवटी मधील अनुभवांचा बराच परिणाम दिसुन येतो. भारतातील सुरुवातीची आर्थिक धोरणे स्वदेशी उद्योगांना सरकारकडुन संरक्षण यासारख्या समाजवादी कल्पनांवर आधारित होती. आयातील स्वदेशी पर्याय सरकारच्या मदतीने औद्योगिकरणी रोजगारामध्ये तसेच आर्थिक बाजारामध्ये सरकारी नियंत्रण आणि आर्थिक योजनांचे केंद्रीकरण अशा गोष्टीचा यामध्ये समावेश होतो. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी संख्या शास्त्र–Ö प्रसंत चंद्र महालनोबीस यांच्या मदतीने सुरुवातीच्या आर्थिक धोरणांना दिशा दिली. या धोरणाचे चांगले परिणाम धोरणकर्त्यांना अपेक्षित होते कारण हया धोरणा मध्ये खाजगी आणि सरकारी दोन्ही क्षेत्रांचा सहभाग होता परंतु एकीकडे भांडवल आणि तंत्र–ाानावर आधारित उद्योगावर लक्ष केंद्रित करतांना दुसरीकडे अकुशल कामावर आधारित लघुउद्योगांना अनुदान देण्याच्या या धोरणावर पिल्टण फ्रिडमन हया प्रसिध्द अर्थशास्त्र–ााने टिका केली फिडमनच्या मते हया धोरणामुळे भांडवल आणि परिश्रम दोन्हीचा अपव्यय होतो. तसेच छोटया उद्योजकांची वाढ खुंटते.

यानंतर १९८० च्या दशकाच्या अखेरीस राजीव गांधीच्या सरकारने उद्योगावरचे नियंत्रण कमी करण्यास सुरुवात केली. सरकारने किंमतीचे नियमन करणे कमी केले आणि उद्योगावरचा करही कमी केला. यामुळे विकासदर वाढण्यास सुरुवात –ÖÖ»Ö³Öß. ¯Ö¸ü®ÖË त्यामुळे सरकारी महसुलातील तुट वाढली आणि सरकारच्या चालु खात्याचे स्वास्थही बिघडले शिवाय त्या वेळेचा भारताचा व्यापारातील मोठा भागीदार असलेल्या सेविएट युनियनच्या अस्तामुळे आणि आखातील युध्दामुळे वाढलेल्या कच्चा तेलाच्या किंमतीमुळे भारतापुढे आयात निर्यातीच्या समतोलाचा मोठा प्रश्न निर्माण –ााला बाहय देशाकडुन घेतलेले कर्ज भारत वेळेवर फेडु शकेल की नाही अशी शंका ˆŸÖ¯®Ö –ााली. हयाला प्रतिसाद म्हणुन तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव आणि त्यांचे अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी आर्थिक

उदारीकरण करण्यास सुरुवात केली. आर्थिक सुधारणा बरोबरच परवाना राजवट बंद –ााली. आणि सार्वजनिक उद्योग धंदयाची मक्तेदारी संपवुन विविध क्षेत्रामधील परकीय व खाजगी गुंतवणुकीचा मार्ग खुला –Û»Û.

†™ल बिहारी वाजपेयी यांच्या प्रशासन काळात मोठया प्रमाणात उदारमतवादी सुधारणा –ााल्या. NDA युतीने हॉटेल्स, VSNL Û¹ÿÛ ÃÛ–ारूकी आणि विमानतळासह सरकारी मालकीच्या व्यवसायाचे खाजगीकरण सुरु –Û»Û. युतीने कर कपात धोरणे अमलात आणली. तुट आणि कर्जे कमी करण्याच्या उद्येशाने वित्तीय धोरणे लागु केली आणि सार्वजनिक कामांसाठी पुढाकार वाढवला. २०११ मध्ये मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील दुसरा UPA आघाडी सरकारने रिटेल क्षेत्रात ५१% थेट परकीय गुंतवणुकीचा प्रस्ताव मांडला तथापी युती पक्ष व विरोधी पक्षाच्या दबावामुळे निर्णयास विलंब –ााला आणि अखेरीस डिसेंबर २०१२ मध्ये तो मंजुर –Û»Û.

२०१४ मध्ये नरेंद्र मोदी भारताच्या सत्तेवर आल्यानंतर त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आर्थिक वाढ आणि विकासाला चालना देण्याच्या उद्येशाने अनेक उपक्रम सुरु केले. उल्लेखनीय कार्यक्रमापैकी एक म्हणजे मेक इन इंडिया मोहिम ज्याने देश आणि विदेशी कंपन्याना भारतात उत्पादन आणि उत्पादनात गुंतवणुक करण्यास प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न केला. रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि देशाची उत्पादन क्षमता वाढवणे हा या कार्यक्रमाचा उद्येश होता. अलीकडील काही वर्षात भारतातील संगणक तंत्र–ाान आणि Û»ÁÛ ŸÛ–ाानाच्या प्रगतीमुळे तसेच उच्चशिक्षित आणि इंग्रजी बोलु शकणा-या वाढत्या तरुण पिढीमुळे भारत हळुहळु सर्व जगला बाहय स्त्रोताच्या सेवा पुरवणारा देश म्हणून भुमिका बजावयाला लागला आहे. भारत हा अतिकुशल तंत्र–ा पुरवणारा जगातील सर्वात ÛÛ ा निर्यातक आहे. याचबरोबर उत्पादन औषधनिर्माण ÛŸÛ–ाान, अतिसुक्ष्मतंत्र–ाान दुरसंचार, जहाजनिर्माण, विमाननिर्माण, अणि पर्यटन हया क्षेत्रामधील भारताची क्षमताही वेगाने वाढतांना दिसत आहे.

भारताची अर्थव्यवस्था ही अमेरिकन डॉलरच्या विनिमय दरानुसार संप्टेबर २०२२ मध्ये जगातील ५ व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था †ÛÁ. २०२२ नुसार भारताचे वार्षिक सकल उत्पन्न जीडीपी ८५४.७ अब्ज डॉलर एवढे आहे. क्रयशक्ती समानतेचा अथवा संक्षिप्त रुपात PPP निकष लावला तर Purchasing Powe Parity भारताच्या अर्थव्यवस्थेचा जगात तिसरा क्रमांक लागतो जगातील सर्वात वेगात वाढणा-या प्रमुख अर्थ व्यवस्थामध्ये भारताचा चीन पाठोपाठा दुसरा क्रमांक आहे. भारताचा आर्थिक विकासदŸ 2006-०७ हया आर्थिक वर्षात ९.४% एवढा होता परंतु अतिशय मोठया लोकसख्ये मुळे भारताचे वार्षिक दरडोई उत्पन्न मात्र ९६१ डॉलर एवढेच आहे (८) तर PPP वर आधारित वार्षिक दरडोई उत्पन्न ४१८२ डॉलर एवढे आहे. जागतीक बॅक भारताची अल्प उत्पन्न असणारी अर्थव्यवस्था अशी गटवारी करते.

**निष्कर्ष :**

ऐतिहासिक बदल हे कोणत्याही एका घटका संबंधीत होत नसतात तर ऐतिहासिक बदल हे मानवी जीवनाशी निगडीत असणÛ-या प्रत्येक घटकामध्ये होत असतो मग तो सामाजिक, सांस्कृतीक, राजकीय, शैक्षणिक, औद्योगिक, म्हणजेच आर्थिक अशा विविध घटकासंबंधी ऐतिहासिक बदल होत असतो. मानवी जीवनाचा अभ्यास करत असतांना या सर्वागाचा विचार, अभ्यास करणे गरेचे असते. भारत देशाला फार मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. तेव्हा ऐतिहासिक बदलाचा अभ्यास करत असतांना त्यांच्या पुरातन अस्तीत्वाचा देखील अभ्यास करणे गरजेचे असते. कारण त्यातुनच तर मानवी प्रगती कशी –ााली आणि मानवाच्या तसेच भारतीयांच्या जीवनात कोण-कोणते ऐतिहासिक अनुकूल किंवा प्रतिकुल बदल घडुन आले याचा अभ्यास होतो आणि गतकाळात –Û»ल्या कोणत्या चुकामुळे मानवी जीवनावर संकटे आली ते देखील यातुन समजते मग त्या चुका सुधारुन मानव आपली उत्तरोत्तर प्रगती घडवुन आणु शकतो. यावरुन एक स्पष्ट होते की इतिहासाची पुनरावृत्ती ही होत असते जसे की प्राचीन काळातील भारतीय राजकारण अर्थकारण सामाजिक स्थिती ही चांगलीच होती पण कालातंराने त्यात घसरण होत गेली आणि पुन्हा काही कालखंडानंतर ती पुर्ववत होत असलेली पुन्हा विकसित होत असलेली दिसुन येत आहे यालाच इतिहासात चक्राकार सिध्दांत असे म्हणतात प्राचीन काळात भारत हा आर्थिकदृष्टया संपन्न देश होता आणि म्हणुनच ही आर्थिक संपत्ती लुटून नेण्यासाठी भारतावर परकीय आक्रमणे –Û»Û त्यामुळे भारत आर्थिक, सामाजिक दृष्टया दुर्बल बनला पण पुन्हा स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षाच्या कालावधीत भारताने पुन्हा जागतीक क्षेत्रात

भरारी घेतली आहे आणि त्याचाच परिणाम म्हणजे भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही गणराज्य देश म्हणुन ओळखला जातो तसेच भारताची अर्थव्यवस्था ही जगातील ५ वी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणुन ओळखली जात आहे. भारत अशीच जर प्रगती करत ¸üÖ×हला तर लवकरच जागतीक महासत्ता म्हणुन देखील वेगळी ओळख निर्माण करेल.


**ÃÖÓ¤ü³ÖÔ ÝÖÏÓ£Ö :**

1) इतिहासलेखन शास्त्र व इतिहासकार-साहेबराव गाढाळ कैलास पब्लीकेशन औरंगाबाद

2) पितृसंस्था आणि स्त्रीमुक्ती-वंदना सोनाळकर, शर्मिला रेजे, क्रांतीसिंह नाना पाटील अकादमी पृ.३९

3) स्त्री पुरुष तुलना-ताराबाई शिंदे, राजेश प्रकाशन पुणे रघुवंशी रमे-¯ÖÛ.4

4) भारतीय स्त्री जीवन-गीता साने, मौज प्रकाशन मुंबई ¯ÖÛ.13

5) डॉ.आंबेडकरांनी मनुस्मृती का जाळली-मनोहर यसशवंत युगसाक्षी प्रकाशन नागपुर मलपृष्ठ

6) गांधी आंबेडकर लोहिया और भारतीय इतिहास की समस्याएँ- ¸üÖ´Ö×¾Ö»ÖÖÃÖ ¿Ö´ÖÖÔ ¯ÖÛ.04

7) Mr.M.Wikipedia Ori/Wilki

8) कित्ता

9) कित्ता

10) इतिहासकार डॉ.बी.आर.आंबेडकर-संपादक प्रकाश उत्तम हनवते, प्रा.डॉ.यशवंत खडसे, अरुणा प्रकाशन.